<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांकः-२०/१/२००३

<u>इतिवृत्त</u>

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दि. २० १ २००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४०. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४१. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ८. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४३ | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४६. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४७. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४८. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५०. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १६. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन | ५१. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १८. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५४. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५५. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५६. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५७. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. शांताराम निकम | ५८. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २९. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६४. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. मोहन साधवानी, | ६६. | श्री. बहरानी मोहन |
| ३२. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३४. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७०. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| ३६. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७१. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ७२. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. संगिता रमेश जावळे,२ श्री. उमाप रामदास राघोजी, ३. श्री. यादव लालबिहारी बुझारत ४. श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ, ५. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण,६. श्रीमती. किरण लखी माखीजा, ७ श्रीमती. इंदु भठिजा, ८. श्री. इदनानी राजू चंदभान हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्तांच्या अनुपस्थितीत श्री. आर.के. सोनावणे अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांचे स्थानी प्राधिकारी अधिकारी म्हणून आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, एक शोक प्रस्ताव मांडु इच्छितो की, भारताचे प्रसिध्द कवी श्री. हरीवंशराय बच्चन यांचे नुकतेच निधन झाले आहे. म्हणुन मी सभागृहास विनंती करतो की त्यांना श्रध्दांजली आर्पित केली जावी.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>डॉ. हरीवंशराय बच्चन यांना श्रध्दांजली आर्पित करण्यासाठी कृपया सर्वांनी उभे रहावे.

<u>शोक प्रस्ताव :-</u>

'मेरे शव के पिछे चलनेवालो, याद इसे रखना
राम नाम है सत्त्य, न कहना सच्ची मधुशाला'

अशा सहजसोप्या रचनांनी सर्वसामान्य जनतेच्या मनात आढळस्थान मिळवणारे हिंदी साहित्त्यातील युगपुरूष डॉ. हरीवंशराय बच्चन यांना त्यांच्या हजारो चाहत्त्यांनी साश्रूनयनांनी दि. १९.१.२००३ रोजी निरोप दिला. त्यांचे चिरंजीव महानायक आमिताभ बच्चन यांनी पित्त्याच्या पार्थिवास अग्नी दिला तेव्हा जुहूच्या हिंदू स्मशानभुमीवर मोठया संख्येने जमलेल्या आप्तस्वकीयांच्या अश्रुंचा बांध फुटला.

डॉ. हरीवंशराय बच्चन हे खऱ्या अर्थाने लोक कवी होते. सर्वसामान्य जनतेच्या मनाला भीडतील आणि त्यांच्या ओठावर खेळतील अशा सहजसोप्या रचना करीत त्यांनी हिंदी कवितेला नवे परिमाण प्राप्त करून दिले. कविता हाच त्यांचा श्वास होता. हा श्वास शनिवारी रात्री ११. ३७ वाजता थांबला. जुहू येथील प्रतिक्षा बंगल्यातच त्यांचे निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली आर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र.   ८३ अ   दिनांक:-२० ७ २००३.

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार डॉ. हरीवंशराय बच्चन यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

एकमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली आर्पित केली.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:'- मी एक अभिनंदन प्रस्ताव मांडु इच्छितो. शाहु महाराजांच्या शताब्दी वर्षामध्ये श्री. सुशिलकुमार शिंदे यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदी निवड झालेली आहे. या शाहु महाराजांच्या शताब्दी वर्षामध्ये एका दलितास न्याय मिळाला आहे. दलिताचा सन्मान झाला आहे. म्हणुन मी महाराष्ट्र शासनाचे व सोनिया गांधी यांचे अभिनंदन करतो. व आमचे जे नविन मुख्यमंत्री आहेत श्री. सुशिलकुमार शिंदे यांचे सुध्दा अभिनंदन करतो.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा. महापौरजी, प्रश्नोत्त्तरास सुरूवात करण्यापुर्वी महाराष्ट्राच्या कर्मभुमीमध्ये एक दलितांचा नेता ज्याचे नेतृत्व आज महाराष्ट्रास मिळाले आहे. श्री. सुशिलकुमार शिंदे यांचा अभिनंदन प्रस्ताव येण्याअगोदर मी आणखी दोन नेत्त्यांचे अभिनंदन करू इच्छितो. आमचे मा. खासदार श्री. रामदास आठवले साहेब व मा. खासदार दादासाहेब गवई साहेब यांचे अभिनंदन यासाठी करू इच्छितो की या महाराष्ट्रात एक दलित मुख्यमंत्री होण्यासाठी श्रीमती. सोनिया गांधी यांच्या माध्यमातुन त्यांनी विशेष प्रयत्त्न केले. व महाराष्ट्रास न्याय दिला. म्हणुन मी त्यांचेही अभिनंदन करू इच्छितो.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-मा. महापौरजी, मी एक अभिनंदन प्रस्ताव मांडु इच्छितो.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-अभिनंदन प्रस्ताव झाला आहे. श्री. शांताराम निकम यांनी मांडला आहे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-त्या आतिरिक्त मी अभिनंदन प्रस्ताव मांडु इच्छितो सभागृहाची कार्यवाही सुरू होण्याअगोदर महाराष्ट्र राज्यात मा. श्री. सुशिलकुमार शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री म्हणुन कार्यभार स्विकारला आहे. या अभिनंदन प्रस्तावाचे सुचक आहेत श्री. मोहन बहरानी, डॉ. (श्रीमती) जया साधवानी, श्रीमती. ज्योती कालानी, श्री. किशोर वनवारी ,श्री. हरदास माखीजा, श्री. नाना पवार, व अनुमोदक आहेत श्री. अशोक ठाकुर, श्री. विनोद तलरेजा, श्री. ठाकुरदास बहरानी, श्री. गौतम भालेराव ,श्रीमती. बेबी तुलसी वसीटा.

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):- या अभिनंदन प्रस्तावा....

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-त्यांचे सुध्दा अभिनंदन केले पाहिजे त्यांनी ३ वर्ष कामकाज चालविले काही त्रास होवू दिला नाही.

मा. सचिव:-सर्वांची नावे जोडली जातील.

अभिनंदन प्रस्ताव :-

महाराष्ट्रात पहिला दलित मुख्यमंत्री होण्याचा मान श्री. सुशिलकुमार शिंदे यांना मिळाला असला तरी यापुर्वी सहा वेळा त्यांना नशिबाने हुलकावणी दिली होती. मुख्यमंत्री पदासाठी १९८३ साली पहिल्यांदा श्री. शिंदे यांचे नाव चर्चेत आले. श्री. बाबासाहेब भोसले यांच्या उचलबांगडी नंतर श्री. शिंदे मुख्यमंत्री होणार होते. असे श्री. शिंदे यांचे नाव सातत्याने सहा वेळा मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणुन घेतले गेले होते. सातव्यांदा मात्र त्यांना नशिबाने साथ दिली. आणि श्री. सुशिलकुमार शिंदे हे महाराष्ट्राचे पहिले दलित मुख्यमंत्री झाले.

प्रदिर्घ काळ राजकारणात असलेल्या श्री. सुशिलकुमार यांनी सत्तेच्या सुरातील ''आरोह अवरोह'' अनेकदा ऐकले आणि अनुभवले. या फिरत्या राजकारणातही त्यांनी आपली वाचनाची आणि संगिताची आवड जपली आहे. पुस्तकातले 'शब्द' आणि 'कॅसेट' मधील 'सुर' पक्के असतात हे त्यामागचे कारण असावे.

१९८९पर्यंत श्री. शिंदे यांनी महाराष्ट्र विधानसभेत ९ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम केला आहे. १९७४ ते १९९२ अशी १२ वर्ष श्री. शिंदे यांनी विविध खात्यांचे मंत्रीपद सांभाळले. दोन वेळा ते कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्षपदी होते. १९९२ साली तत्कालिन पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांच्या निमंत्रणावरून श्री. शिंदे यांची अखिल भारतीय कॉंगेस सरचिटणिस पदी नियुक्ती करण्यात आली. राज्यसभेवर त्यांची निवड झाली. राज्यसभेत सर्व सदस्यांमध्ये जास्त प्रश्न मांडणारा खासदार म्हणुन श्री. शिंदे यांना नॅशनल सिटीझन पारीतोषिक देण्यात आले आहेत. १९९८ ला सोलापुर लोकसभा मतदान संघातुन खुल्या गटासाठी असणा-या जागेवर श्री. शिंदे १ लाखाहुन अधिक मतांनी विजयी झाले. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत श्री. शिंदे हे कॉंग्रेसचे उमेदवार होते. दिलखुलास व्यक्तीमत्त्व म्हणुन श्री. शिंदे ओळखले जात होते. अनेक पक्षांत त्यांचे मैत्रीचे संबंध होते. साहित्य, कला, नाटय, चित्रपटात त्यांना रूची होती.

तसेच उपमुख्यमंत्री पदी श्री. छगन भुजबळ यांची फेरनिवड झाल्याबददल त्यांचेही अभिनंदन करण्याचे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ८३ ब दिनांक:-२० १ २००३.

सुचकांची नावे :-
१. श्री. शांताराम निकम
२. श्री. मोहन बहरानी
३. डॉ. (श्रीमती) जया साधवानी
४. श्रीमती. ज्योती कालानी
५. श्री. किशोर वनवारी
६. श्री. हरदास मारवीजा
७. श्री. नाना पवार

अनुमोदकांची नावे :-
१. श्री. प्रमोद टाले
२. श्री. अशोक ठाकुर
३. श्री. विनोद तलरेजा
४. श्री. ठाकुरदास बहरानी
५. श्री. गौतम भालेराव
६. श्रीमती. बेबी तुलसी वसीटा

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. सुशिलकुमार शिंदे यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पदी तर श्री. छगन भुजबळ यांची महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री पदी झालेल्या निवडीबददल त्यांचे अभिनंदन करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-</u>अभिनंदन प्रस्तावानंतर मा.महापौरांच्या परवानगीने मी आपणांसर्वांना आपल्या वतीने व माझे पती श्री. मोहनजी साधवानी यांच्यावतीने २७ तारखेला माझ्या घरी पुजेचे आयोजन केलेले आहे. त्याबाबतचे निमंत्रण आपणां सर्वांना मिळाले आहेच. मी व माझे पती आपणांस निवेदन करतो की, आपण त्यात सहभागी होवून परमेश्वराकडुन आर्शिवाद प्राप्त करून घ्याल. असे माझे आपणांस वैयक्तिक निवेदन आहे.

मा. सदस्या श्रीमती. नीना नाथानी सभागृहातुन बाहेर पडल्या.
<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्त्तरे.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>मा. सचिव साहेब, मागील महासभेमध्ये आमचे २८ ते ३२ क्रमांकाचे प्रश्न होते. त्याबाबत फक्त ऐवढी माहिती दिली जावी की त्या कोर्ट प्रकरणांबाबत काय झाले?

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>कल्याण दिवाणी न्यायालयाने जो अंतिम स्थगिती आदेश दिला होता. तो मा. उच्च न्यायालयाने १० जानेवारी २००३ रोजी उठविला आहे. त्याचबरोबर हे सुध्दा निर्देश दिले आहेत की, कल्याणचे जे दिवाणी न्यायालय आहे त्यांनी न्यायिक अधिकारीताबाबत तीन आठवडयाच्या आत निर्णय घ्यायचा आहे. त्या निर्णयानंतर दोन आठवडयांचा कालावधी राहिल व त्यानंतर अंतिम निर्णय होईल.

प्रश्न क्र. ३३ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३३:-:-</u>यु. नं. ९९ शिट नं. ४७ विकास हॉस्पीटल जवळ, उल्हासनगर-३ येथील श्री. दिगंबर यशवंत पिसार यांचे नावे असलेल्या सीडी नं. बे.डी.एम/सी-२/प्लॉ-ट/सीडी आर नंबर २१८१, दिनांक ३१.१२.८१ ची मंजूर झालेली सनद सत्त्य (खरी)आहे का?

<u>उत्तर:-</u> यु. नं. ९९ सिट नंबर ४७ विकास हॉस्पीटल जवळ, उल्हासनगर-२ येथिल श्री. दिगंबर यशवंत पिसाळ यांच्या नावे असलेल्या सीडीची मंजुर झालेली सनद सत्त्य (खरी) असल्याबाबत मा. उप-विभागीय अधिकारी यांचे कार्यालयाकडून सनद पडताळणीचे पत्र क्र. ठा/२/भुखंड/वशी / ९० , दिनांक २८.४. २००२ अन्वये या कार्यालयास दिनांक २.५.२००२ रोजी सनद पडताळणी पत्र पाप्त झाले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>प्रश्न क्र. ३४ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३४:-:-</u> यु. नं. ९९ सिट नंबर ४७ विकास हॉस्पीटल जवळ, उल्हासनगर-१ या भुखंडावरील इमारत आराखड्यानुसार आहे का? सदर इमारत बांधकाम आराखड्यानुसार मंजुर आहे का? व आराखड्यानुसार इमारत बांधकाम केले आहे का? इमारतीचे बांधकाम वाढीव केले आहे का? केले असल्यास किती वाढीव बांधकाम केले? जर वाढीव बांधकाम केले असल्यास महापालिकेने कोणती कारवाई केली? त्याचा तपशील व सविस्तर खुलासा येत्त्या महापालिकेच्या सर्व साधारण सभेत प्रश्नांची सुचक, योग्य व समाधानकारक उत्त्तर दयावीत.

<u>उत्त्तरः-</u> १)नाही.
२)नाही.
३)नाही.
४)होय, एकूण ८३८.६९ चौ.मी. वाढीव बांधकाम केले आहे.

५)महानगरपालिकेच्या आतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कायदेशीर नोटिस दिनांक १३.५.२००२ रोजी बजाविली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>साहेब, उत्त्तर कोण देणार?

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>नगररचनाकार उत्त्तर देतील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, साहेब हा जो आपण प्लान मंजुर केला आहे. त्यावेळी पाहिले होते का की हा भुखंड आरक्षित आहे की नाही? तिथे आरक्षण आहे का?

<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>त्या भुखंडाच्या मागे आरक्षण आहे. शाळेचे आरक्षण आहे. आरक्षित भुखंड सोडुन बांधकाम परवानगी दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आरक्षित भुखंड सोडुन परवानगी दिली आहे. आरक्षित भुखंडावर बांधकाम करण्यास बिल्कुल परवानगी दिलेली नाही? व हे जे आपण लिहिले आहे की मंजुर विकास आराखड्यानुसार तयार केलेले नाही. तर आपण त्यावर काय कार्यवाही केली? सदर इमारत मंजुर विकास आराखड्यानुसार नाही. तर त्याबाबत काय कार्यवाही केली?

<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>बेकायदेशिर बांधकामाबाबत त्यांना नोटीस दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>किती दिवसाची नोटीस दिली आहे?

<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>अतिक्रमण विभागाने नोटीस दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आपल्या कार्यक्षेत्रा अंतर्गत काही नाही? जर कुणी बेकायदेशिर बांधकाम करत असेल तर ते आपल्या कार्यक्षेत्रात येत नाही का?

<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>किती चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे ते काढुन दिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>कारवाई कोण करणार?

*श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-*ज्या अधिका-यास कायदेशिर अधिकार असतात त्याच अधिका-यांने नोटीस बजावली आहे.

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*ज्याने नोटीस दिली व कारवाई करणार त्यांनाच उत्तर देण्यासाठी बोलवा.

*मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-*यांचे नाव आहे श्री. रविंद गुरव यांची नेमणुक सहाय्यक आयुक्त म्हणुन करण्यांत आलेली आहे.

*श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-*मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. अतिरिक्त आयुक्त व सन्मानिय सदस्य माझी ओळख महापालिका सचिवांनी करून दिली आहेच. तरीही मी माझ्या शब्दात सांगु इच्छितो, मी रविंद्र गुरव, मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम विभागात काम करत होतो. आता येथे प्रतिनियुक्तीने सहाय्यक आयुक्त म्हणुन माझी नेमणुक करण्यांत आलेली आहे. आता हा जो प्रश्न क्र. ३३ आहे या प्रकरणामध्ये संबंधितास नोटीस बजावलेली आहे. परंतु नंतर ही बाब न्यायप्रविष्ट झाली म्हणुन अनाधिकृत बांधकाम विभाग याबाबत काहीही कारवाई करू शकत नाही.

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*न्यायप्रविष्ट आहे? पुर्णच्या पुर्ण प्रकरण.

*श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-*होय.

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*आपण जे म्हणत आहात की स्थगिती आदेश आहे. आपण मोजमाप करून दिले आहे का की, ऐवढे ऐवढे बांधकाम आहे.

*श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-*होय. झालेल्या चटई क्षेत्राचे उल्लंघन नगररचना विभागाकडुन काढुन देण्यात आलेले आहे. त्यानुसार जे चटई क्षेत्राचे उल्लंघन निर्देशनास आले आहे त्याचे निष्कासन करण्यासाठी आम्ही त्यास नोटीस दिली होती परंतु नंतर ती बाब न्यायप्रविष्ट झाली. म्हणुन अतिक्रमण विभागाने त्यावर कारवाई केली नाही.

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*आपण मोजमाप घेतले आहे का? चटई क्षेत्राचे उल्लंघन किती आहे? नाला किती फुटाचा तयार केला आहे? नाल्यावर किती बाय किती फुटाचे अनाधिकृत बांधकाम केले आहे. ते कोर्टामध्ये दिल आहे का? मागच्यावेळी याबाबत चर्चा झाली होती त्यावेळेला स्पष्ट असे उत्तर दिले नव्हते की इतक्या बाय इतक्या फुटाचे अनाधिकृत बांधकामाबाबत स्थगिती आदेश आहेत व इतक्या बाय इतक्या फुटाचे अनाधिकृत बांधकाम बिना स्थगिती आदेशाचे आहे. असे काही आहे का?

*श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-*आता सध्या याची सविस्तर माहिती माझ्याकडे नाही.

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*याची सविस्तर माहिती कोण देईल?

*श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-*मी सभागृहास आश्वस्थ करू इच्छितो की, लवकरात लवकर...

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*सर्वजण आश्वस्थच करतात. उत्तर कुणी देत नाहीत.

श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-लवकरात लवकर याबाबत जी काही सविस्तर माहिती आहे ती सभागृहासमोर सादर करेन.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तर मग हा प्रश्न पुढील महासभेत ठेवावा लागेल.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-चार महिन्यापासुन प्रकरण तेथेच येवून थांबले आहे. मोजमाप भेटत आहे की नाही? आश्वासनावर आश्वासन मिळत आहेत. एक अधिकारी जातो दुसरा येतो, दुसरा जातो तिसरा येतो मला वाटते माझी पाच वर्षे यामध्येच निघुन जातील.

श्री. रविंद्र गुरव (सहाय्यक आयुक्त):-नाही,सभागृहास माझी विनंती आहे की, मी फक्त चार दिवसापुर्वीच या विभागाचा कार्यभार स्विकारला आहे. मी पुर्ण खात्रीने हे सांगतो की, जर मला आपण थोडी वेळ दिली तर याबाबत सविस्तर माहिती आपणांस दिली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा. सचिव साहेब, मला असे वाटते की यांच्याकडे जर आता उत्तर नसेल तर हा प्रश्न पुढील महासभेसाठी ठेवला जावा. हा जो ३४ क्रमांकाचा प्रश्न आहे तो पुढल्या महासभेत ठेवला जावा कारण की यांच्याकडे माहिती नाही.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-आपल्या प्रश्नामध्ये नाला किती आहे, किती होता ते थोडेच लिहीले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ते लिहिले नाही. चटई क्षेत्राचे झालेले उल्लंघन काढुन दिलेले आहे. जेव्हा चटई क्षेत्राच्या उल्लंघनाची गोष्ट येते.....

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-आपले म्हणणे बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- यांनी सांगावयास पाहिजे की, इतक्या बाय इतक्या फुटाचा नाला आहे. त्यावर स्थगिती आदेश आहे. बाकी जो आहे त्यावर स्थगिती आदेश नाही. ही माहिती त्यांना नाहीच.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-त्याबाबत मी खुलासा करतो कारण त्या दाव्यात महापालिकेतर्फे मी उत्तर दाखल केले होते. मागील वेळी सुध्दा मी उत्तर दिले होते यावेळेस पुन्हा देत आहे. जेव्हा त्याचा स्थगिती आदेश आला होता त्यावेळी नाल्यावर स्लॅब नव्हता. त्यावेळी माप घेण्याची यांना आवश्यकताच पडली नाही. व श्री. ढाकरे साहेबांनी त्यांना जे परवानगीचे पत्र दिले होते त्यामध्ये सुध्दा कोणतेही मोजमाप नव्हते. व जो अंतिम स्थगिती आदेश आला तेव्हा २७'' x ५''. ५'' मीटर नाल्यावर स्लॅब होता. व स्थगन आदेश आल्यानंतर त्यांनी जो अतिरिक्त स्लॅब तयार केला तो १६'. ५०'' x ५'. ५०'' पुढे अतिरिक्त नाला तयार केला होता.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यावर काय कारवाई झाली?

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-व दुसरी गोष्ट अशी की मा. उच्च न्यायालयाने वरीष्ठ दिवाणी न्यायालयाचा पुर्णच्या पुर्ण आदेश रद्द केला आहे व ५ आठवड्यानंतर आपणांस कारवाई दिसून येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पाच आठवड्यानंतर?

मा. सचिवः-कारण की मा. उच्च न्यायालयाने एक कायदेशिर मुददा उपस्थित केला आहे की हे जे कल्याणचे दिवाणी न्यायालय आहे त्यांना स्थगीती आदेश देण्याचा किंवा दावा चालविण्याचा काही एक अधिकार नाही. त्या अधिकाराबाबत त्यांना तीन आठवडयाच्या आत निर्णय घ्यायचा आहे. जर अधिकाराबाबत निर्णय विकासकर्त्याच्या विरोधात येत असेल तर त्यास दोन आठवडयाची वेळ अपिल करण्यासाठी देण्यात येईल. जो काही निर्णय येईल त्यानंतर हे उच्च न्यायालयात जातील कल्याणच्या दिवाणी न्यायालयात जाणार नाहीत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यांनी जे ८३९ मीटर चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे ते सुध्दा त्यामध्ये येईल?

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-पुर्णच्या पुर्ण नाला जाईल पाच आठवडयानंतर असे अपेक्षित आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पाच आठवडयानंतर?

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-आज आम्ही तो आदेश कल्याण दिवाणी न्यायालयात सादर केला आहे. व त्यांनतर ५ आठवडे.

पुढचा प्रश्न .....

मा. सचिवः-प्रश्न क्र. ३६ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. ३६:-बिल्डींग व्यवसायीक बांधकाम करीता असतांना अरिक्ति टीडीआर. किंवा एफ.एस.आय. कुठल्या स्वरुपाचा वापरु शकता अतिरिक्त एफ.एस.आय. एकावेळी किती ठिकाणी वापरु शकतो महानगरपालिकेचे काय नियम आहेत?

उत्तरः- मंजूर विकास योजनेतील अथवा सुधारित विकास योजनेतील सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित असलेल्या अथवा रस्ता व रस्ता रुंदीकरणाखलील जागा महानगरपालिकेच्या ताब्यात दिल्यास त्या पोटी टीडीआर.द्वारे एफ.एस.आय. अनुज्ञेय आहे. अतिरिक्त एफ.एस.आय. विविधी ठिकाणी अळवा एकाच ठिकाणी वापरु शकतो. महानगरपालिकेस मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण यांनी बांधकाम नियंत्रण नियमावली मध्ये नियम १४.१ ते १४.७ मध्ये अंतर्भाव केलेला आहे, सदर नियम महानगरपालिकेस लागू आहेत. तथापि टीडीआर मंजुर करतांना एम.एम.आर.डी.ए. यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-उत्तर ठिक आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-प्रश्न क्र. ३५ चे काय?

मा. सचिवः-प्रश्न क्र. ३५ मागे घेण्यात आला आहे. प्रश्न क्र. ३७ श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. ३७:- ''गणपती प्लाझा'' टर्निंग पॉईंट हॉटेल जवळ, उल्हासनगर-३ चालू असलेले बांधकाम प्लॉन प्रमाणे आहे का? यामध्ये टीडीआर. वापरले आहे का? असल्यास कुठला टीडीआर. आहे?

उत्तरः- चालू असलेले बांधकामास मंजुर नकाशाप्रमाणे असल्याने त्यास तळमजला पर्यंतच्या बांधकामास बांधकाम पुर्णतेचा दाखला दिनांक ३०.७.२००१ रोजी देण्यात आलेला आहे.

सदर बांधकामास टीडीआर. वापरलेला नाही.

मा. सचिवः-प्रश्न क्र. ३८ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. ३८:-''हजारी व्हिला'' ओटी.सेक्शन उल्हासनगर-१ चालू असलेले बांधकाम हे किती अनधिकृत आहे? टीडीआर. वापरला आहे का? व्हायोलन /प्लोअर व्हायालेशन, कमर्शियल प्रायमेस महानगरपालिकेच्या प्लॅन व्यतिरिक्त आहे का? असल्यास आपण काय कारवाई करु शकतो?

उत्तरः- १) सदरचे बांधकाम चटई क्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन नाही तथापि वापरात अंतर्गत बदल केलेला होता.

२) टीडीआर. वारलेला नाही.

३) अर्जदार यांना अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागामार्फत दिनांक ७.७. २००१ रोजी नोटिस बजावली होती. कारण प्रत्यक्षात जागेवर मंजुर नकाशा व्यतिरिक्त वाणीज्य वापरात अंतर्गत बदल केलेला होता.

४) अर्जदारांना नोटिस बजावल्यानंतर दिनांक २३.५.२००२ रोजी सुधारित नकाशे सादर केलेल आहेत. परंतु प्रत्यक्ष जागेवर गॅरेजच्या समोर अनाधिकृतपणे जास्तीचे बांधकाम म्हणजे १०८ चौ.मी. केलेले असल्याने सदर बांधकाम अर्जदारांनी स्वतःहून तोडल्यानंतर सुधारित नकाशे दिनांक १८.६.२००२ रोजी मंजुर केलेले आहेत. सुधारित नकाशे मंजूर केल्यानंतर परत अनाधिकृत बांधकाम केल्यास सदर बांधकाम तोडुन टाकण्यात येईल.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सचिवः-प्रश्न क्र. ३९ व ४० हा श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३९:- उल्हासनगर-१ येथिल जुने पोस्ट ऑफिस तोडुन बांध्ण्यात येणारी नविन इमारत मंजुर आराखडयानुसार आहे का? नसल्यास त्या इमारतीचे वाढीव बांधकाम केले आहे का? असल्यास किती वाढीव बांधकाम केले आहे? त्या अनाधिकृत बांधकामावर कोणती कार्यवाही केली?

उत्तरः- होय,

वाढीव बांधकाम नाही.

वाढीव बांधकाम नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न येत नाही.

होय.

वाणिज्य वापरासाठी बांधकाम पुर्णतेचा दाखला दिनांक ३०.७.२००१ रोजी नगररचनाकार विभागात दिला आहे.

नाही.

प्रश्न क्र. ४०:- ट्रेनिंग पॉईंट हॉटेलमागे पुनम बिल्डींग लागुन उल्हासनगर-३ येथे तयार झालेली ''गणपती प्लाझा'' इमारत मंजुर आराखडयानुसार आहे का?

त्या इमारतीला महापालिकेने पुर्णतेचा दाखला दिला आहे का? तसेच सदर इमारतीचे वाढीव बांधकाम करण्यात आले का?असल्यास किती वाढीव बांधकाम करण्यात आले? त्या अनाधिकृत बांधकामाबाबत महापालिकने कोणत्त्या प्रकारची कारवाई करण्यात आली?

उत्तरः- वाणिज्य वापरासाठी बांधकाम पुर्णतेचा दाखला दिनांक ३०.७.२००१ रोजी नगररचनाकार विभागाने दिला आहे.

नाही.

वाढीव बांधकाम नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न येत नाही.

मा. सचिवः-श्री. भुल्लर साहेब आपणांस काही विचारायचे आहे का? पुढचे प्रश्न घ्यायचे का?

प्रश्न क्र. ४१ ,४२ ,४३ ,४४ ,४५ श्री. राज असरोंडकर यांचे आहेत.

प्रश्न क्र. ४१:-२० ऑक्टोंबर, ९६ रोजी म्हणजे नगरपालिकेला महापालिकेचा दर्जा प्राप्त होण्यापूर्वी उल्हासनगर पालिकेत वर्ग-३ व ४ मधील मंजुर / नामंजुर पदावर एकुण किती कर्मचारी कार्यरत होते?

उत्तरः- १) २० ऑक्टोंबर , ९६ रोजी म्हणजे नगरपालिकेच्या दर्जा प्राप्त होण्यापूर्वी वर्ग-३ व ४ मधील मंजुर/ नामंजुर पदांवर कार्यरत कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे....

| अ. क्र. | आस्थापना | वर्ग | मंजुरपदे | कार्यरत संख्या | नामंजुर पदे |
|---|---|---|---|---|---|
| १) | महानगरपालिका आस्थापना | ३ | ३५० | २९६ | -- |
| | | ४ | २९१ | २७७ | -- |
| २) | पाणीपुरवठा विभाग आस्थापना | ३ | १२८ | ८६ | -- |
| | | ४ | १३० | १२४ | -- |
| ३) | आरोग्य विभाग आस्थापना | ४ | स.का. १०४४ | १०४४ | -- |
| | | | मुकादम २६ | २६ | -- |
| | | एकुण | ----१९६९ | १८५६ | -- |

प्रश्न क्र. ४२:-सद्यस्थितीत उल्हासनगर महापालिकेत वर्ग ३ व ४ मधील मंजुर / नामंजुर पदांवर एकूण किती कर्मचारी कार्यरत आहेत?

उत्तरः- सद्यस्थितीत उल्हासनगर महापालिकेत वर्ग ३ व ४ मधील मंजुर / नामंजुर पदांवर कार्यरत कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | आस्थापना | वर्ग | मंजुरपदे | मंजुर पदावर कार्यरत | नामंजुर पदावर कार्यरत | एकुण कार्यरत |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | महानगरपालिका | ३ | ३७० | २४८ | ८१ | ३२९ |
| | आस्थापना | ४ | २९१ | २४७ | ४५७ | ७०४ |
| २) | पाणीपुरवठा | ३ | ११८ | ८० | -- | ८० |
| | विभाग | ४ | १३० | ११३ | -- | ११३ |
| | आस्थापना | | | | | |
| ३) | आरोग्य | ४ | स.का. १५५० | १२२३ | -- | १२२३ |
| | विभाग | | मुकादम ७० | ४९ | -- | ४९ |
| | आस्थापना | | | | | |
| | | एकुण ---- | २५३९ | १९६० | ५३८ | २४९८ |

<u>प्रश्न क्र. ४३:-</u>२० ऑक्टोबर, ९६ नंतर आज पावेतो उल्हासनगर महानगरपालिकेत मंजुर /नामंजुर पदावर वर्ग ३ व ४ मधील किती नविन नेमणुका झाल्या आहेत?

<u>उत्तरः-</u>२० ऑक्टोबर, ९६ नंतर आज पावेतो उल्हासनगर महानगरपालिकेत मंजुर /नामंजुर पदावर वर्ग ३ व ४ मधील नविन नेमणुकांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | आस्थापना | वर्ग | मंजुर पदावरील नवीन नेमणूका | नामंजुर पदावर कार्यरत | एकुण कार्यरत कार्यरत |
|---|---|---|---|---|---|
| १) | महानगरपालिका | ३ | २४ | ८१ | १०५ |
| | आस्थापना | ४ | ४३ | ४५७ | ५०० |
| २) | पाणीपुरवठा | ३ | -- | -- | -- |
| | विभाग | ४ | -- | -- | -- |
| | आस्थापना | | | | |
| ३) | आरोग्य | ४ | स.का. २०० | -- | २०० |
| | विभाग | | मुकादम २५ | -- | २५ |
| | एकुण ---- | | २९२ | ५३८ | ८३० |

<u>प्रश्न क्र. ४४:-</u>समकालावधीत उल्हासनगर महापालिकेत एकुण किती कर्मचारी वर्ग ३ व ४ सेवानिवृत्त झाले, मयत पावले किंवा बडतर्फ झाले?

<u>उत्तरः-</u> समकालावधीत उल्हासनगर महापालिकेत सेवानिवृत्त/मयत/बडतर्फ इ. झालेल्या कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | आस्थापना | वर्ग | सेवानिवृत्त/मयत/बडतर्फ इत्यादी कर्मचारी |
|---|---|---|---|
| १. | महानगरपालिका | ३ | ७२ + ४ = ७६ |
| | | ४ | ७३ + १० =८३ |
| २. | पाणी पुरवठा | ३ | ०६ + ३ = ९ |
| | | ४ | ११ + १ = १२ |
| ३. | आरोग्य विभाग | ४ | सफाई कामगार ४८ |
| | | | मुकादम ०१ |
| | | एकुण | २११ |

प्रश्न क्र. ४५:-उल्हासनगर महानगरपालिकेत वर्ग ३ व ४ मधील विविध संवर्गात मागसवर्गीयांचा किती अनुशेष आहे?

उत्तर:-उल्हासनगर महापालिकेतील वर्ग ३ व ४ च्या मागासवर्गीयांच्या अनुशेषाबाबतची माहिती खालील प्रमाणे.

| अ. क्र. | संवर्गाचे नांव | सरळ सेवा वर्ग -३ | सरळ सेवा वर्ग -४ | पदोन्नती वर्ग -३ |
|---|---|---|---|---|
| १. | अनूसचित जाती | ११ | ०२ | ०३ |
| २. | अनुसचित जमाती | ५४ | ६२ | ०९ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | ०९ | १३ | ०४ |
| ४. | भटक्या जमाती (ब) | ०७ | ०६ | - |
| ५. | भटक्या जमाती (क) | ०८ | ०७ | ०१ (ब क) |
| ६. | भटक्या जमाती (ड) | ०३ | ०४ | - |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०४ | ०४ | - |
| ८. | इतर मागास वर्ग | ०८ | १३ | - |

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-मा. महापौर महोदया, हा प्रश्न मी ज्यावेळेला विचारला होता. आणि त्याचे उत्तर जे सर्वांच्या हातामध्ये आहे. ते उत्तर आणि सध्या माझ्याकडे असलेले नविन उत्तर यामध्ये फरक आहे. आधीच्या उत्तरामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली होती की, आमच्या महापालिकेत जेवढे कर्मचारी कार्यरत आहेत. त्यातील किती कर्मचारी वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये काम करतात याबाबत अचुक आणि सविस्तर माहिती नाही. असा पहिल्या उत्तरापासुन अर्थ निघतो. परंतु त्यानंतर याबाबत कदाचित काही चौकशी झाली आहे. व उत्तर बदलले आहे. बदलेले जे उत्तर आहे त्याबाबत सुध्दा माझ्या काही शंका आहेत. श्री. भडकवाड साहेब ४१क्रमांकाचा जो प्रश्न आहे त्यामध्ये मी असे विचारले होते की २० ऑक्टोबर १९९६ रोजी म्हणजे महानगरपालिकेचा दर्जा प्राप्त होण्यापुर्वी नगरपालिकेमध्ये वर्ग ३, वर्ग ४ मध्ये किती कर्मचारी कार्यरत होते? तर आपण उत्तर दिले आहे की, महापालिका आस्थापनेत वर्ग ३ मध्ये २९६ आणि वर्ग ४ मध्ये २७७ तर या कर्मचारी संख्येमध्ये नगरपालिका आस्थापनेवर त्यावेळी रोजंदारीवर जे कार्यरत होते. त्यांचा यामध्ये समावेश दिसत नाही. तर तो का समाविष्ट केलेला नाही? नगरपालिका आस्थापनेमध्ये जे त्यावेळेला रोजंदारीवर काम करत होते. त्यांची संख्या यामध्ये दिसत नाही. म्हणजे १८५३ ऐवढेच कर्मचारी कार्यरत होते का की त्यापेक्षा जास्त होते?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव, आणि मा. सदन, प्रश्न क्र. ४१ मध्ये २० ऑक्टोबर , १९९६ रोजी म्हणजे महापालिकेचा दर्जा प्राप्त होण्यापुर्वी वर्ग ३ आणि ४ मध्ये मंजुर नामंजुर पदावर किती कर्मचारी कार्यरत होते. त्याचा खुलासा दिलेला आहे. १८५३ आणि जे रोजंदारीवरील २.११.९६ मध्ये जे कर्मचारी घेतलेले आहेत. या कर्मचा-यांचा त्याच्यामध्ये उल्लेख नाही कारण ते त्यावेळेस स्थायी किंवा अस्थायी पदावर नव्हते. ते रोजंदारीवर होते त्यामुळे त्यांची संख्या त्यामध्ये दिलेली नाही.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-असे किती कर्मचारी होते?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-असे ५३८ कर्मचारी होते.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-वर्ग ३ आणि वर्ग ४ मिळुन? त्याची वर्गवारी आहे का आपल्याकडे? वर्ग ३ व वर्ग ४ ची.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-वर्ग ३ मध्ये ८१ होते, आणि वर्ग ४ मध्ये ४५७ होते.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-त्यापेक्षा जास्त नव्हते ना? ठिक आहे. पुढचा प्रश्न घेवू का? प्रश्न क्र. ४२ ला तुम्ही उत्तर दिलेले आहे आणि त्यामध्ये २४७२ कर्मचारी आपल्याकडे आहेत असे म्हंटले आहे. आणि त्याबरोबर १३ जुन २००२ रोजी जी आणखी पदे ज्यांना शासनाकडुन मंजुरी मिळाली त्याचा उल्लेख माझ्याकडे आहे. प्रश्न असा आहे की मंजुर पदांच्या दर्शाविलेल्या संख्येमध्ये या पदांचा समोवश आहे का? तर तुम्ही जी मला मंजुर पदांची संख्या दिलेली आहे ती आहे २५३९.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर सभागृहातुन बाहेर पडले.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-त्यामध्ये १३ जुनच्या अगोदरचा हा प्रश्न विचारलेला होता. त्यामुळे १३ जुनची आकडेवारी त्यामध्ये आलेली नाही.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-दिलेली नाही? नगरपालिकेच्या मंजुर पदावर काम करत असलेले कर्मचारी ते त्या त्या पदांची आवश्यक अर्हता आहे त्यानुसार काम करत आहेत का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-प्रश्न समजला नाही. जरा परत सांगा.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-सध्या मंजुर पदांवरती जे जे कर्मचारी उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत आहेत तर त्या सर्व कर्मचा-यांकडे त्या त्या पदांसाठी आवश्यक असलेली अर्हता भरती नियमावली नुसार प्रत्येक पदासाठी जी जी पात्रता आवश्यक आहे. तर अशी त्या कर्मचा-यांकडे आहे का? जे मंजुर पदांवर कार्य करत आहेत?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-९६ मध्ये जेव्हा महानगरपालिका झाली आणि त्यानंतर जी प्रस्तावित आस्थापना आहे त्या आस्थापनेमध्ये जे रोजंदारीवरचे कर्मचारी आहेत ५३८ अशा कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कुठलीही भरती नव्याने केलेली नाही. आणि नगरपालिकेच्या कालावधीतील जे कर्मचारी आहेत त्यांना दुसरीकडे ठेवलेले नाही परंतु महापालिका झाल्यानंतर ज्या ज्या पदोन्नत्त्या दिल्या आहेत किंवा भरती केली जाते. ती बिल्कुल नियमानुसार केली जात आहे.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-म्हणजे सध्या मंजुर पदांवर जे जे कर्मचारी आहेत त्या सर्वांकडे आवश्यक अर्हता, पात्रता आहे? मंजुर पदांबाबत विचारतो नामंजुर पदांबाबतचे नाही. मंजुर पदांवर जे कर्मचारी आहेत त्यांच्याकडे तरी किमान अर्हता असायला हवी.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-महापालिका झाल्यानंतर जी काही भरती झालेली आहे अस्थायी पदाची ५३८ सोडले तर, ते सुध्दा अस्थायी स्वरूपावर घेतलेले आहेत, रोजंदारीवरील कर्मचारी , नियमित पदावर ज्या नेमणुका झालेल्या आहेत. त्यामध्ये कुठलेही अर्हता प्राप्त नसलेल्या कर्मचा-यांची भरती केलेली नाही.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-केलेली नाही? आणि त्यासाठी ज्या नियुक्त्या करताना बी.पी.एम.सी ॲक्टमध्ये जी निवड प्रक्रिया आहे तीचा अवलंब केला आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-बिल्कुल, बी.पी.एम.सी ॲक्टमध्ये जी कार्यपध्दती दिलेली आहे. त्यानुसार या महापालिकेने निवड समिती गठीत केलेली आहे. तिच्यामध्ये आयुक्तांचे प्रतिनिधी आहेत. उपायुक्त मुख्यालय आहे. मागासवर्गीय कक्षाचे उपायुक्त आहेत. आणि महापालिका लेखा परिक्षक....

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-वर्ग ३ आणि वर्ग ४ मध्ये.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-त्या निवड समितीच्या समोर जी जी पदे भरावयाची आहेत. आणि पदोन्नत्त्या आहेत ते सर्व प्रस्ताव पाठविले जातात. आणि महापालिकेने जी विहीत अर्हता तयार केलेली आहे त्यानुसार भरती चालु आहे.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-प्रश्न क्र. ४३ मध्ये म्हणजे पुढच्या प्रश्नामध्ये आपण उत्तर दिले आहे की, मंजुर पदांवर वर्ग ३ मध्ये २४ नेमणुका केल्या आहेत. आणि वर्ग ४ मध्ये ४३ नविन नेमणुका आपण केल्या आहेत. तर या ज्या नेमणुका आहेत २४ आणि ४३ तर त्या जरा कळु शकतील का कोण कोणत्त्या पदासाठी होत्त्या?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-नाही आपण जो प्रश्न विचारला होता. वर्ग ३ मध्ये किती पदे भरली आहेत. व वर्ग ४ मध्ये किती पदे भरली आहेत.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-त्यांची पदे आपणांस कळु शकतील का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. परंतु आपल्या प्रश्नाप्रमाणे आकडेवारी दिलेली आहे. आवश्यकता वाटल्यास आपण दुसरा प्रश्न विचारून आपण खुलासा मागु शकता. आपणास ती माहिती देण्यास तयार आहोत.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-मग तो प्रश्न वर्षानंतर येईल?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-ते महासभेवर अवलंबुन आहे. एका दिवसात घेतला तरी देवू.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-पण आपण नामंजुर पदांवर ८१ आणि ४५७ म्हणजे २.११.९६ चा जो प्रशासकीय ठराव आहे त्यानुसार ज्या ज्या नेमणुका रोजंदारीवरच्या कायम करण्यांत आल्या. तर ती संख्या आहे का ही? जे नामंजुर पदांचे आपण आकडे दिले आहेत. वर्ग ३ वर ८१ आणि वर्ग ४ मध्ये ४५७ ही तीच संख्या आहे का? आपण महासभेसमोर याची खात्री देवू शकता का? त्यावेळी नगरपालिका आस्थापनेवर रोजंदारीवरती जे कर्मचारी कधीही काम करत नव्हते. अशांना सुध्दा २.११.९६ च्या प्रशासकीय ठरावाचा फायदा देवून कायम करण्यात आलेले नाही अशी खात्री आपण सभागृहास देवू शकता का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-२.११.९६ला जे लोक रोजंदारीवर काम करत होते. आणि त्यांना शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन पदांवर सामावुन घेण्यांत आले होते. त्यामध्ये त्यावेळेसच्या तात्त्कालीन अधिका-याने कोणते निकष बघितले होते त्यांची रोजंदारीवरची काय रेकॉर्डर्स बघितली होती. ते आज रोजी माझ्याकडे नाही. परंतु हे सर्व कर्मचारी ....

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-आहे की नाही?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मी शाश्वती देणार नाही. रेकॉर्ड तपासल्या शिवाय मला अशी शाश्वती देता येणार नाही.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-मी असा प्रश्न विचारला की १.११.९६ चा जो प्रशासकीय ठराव होता. तो नगरपालिका आस्थापनेवर जे लोक रोजंदारीवर काम करत होते. त्यांना कायम करण्यासाठी होता. त्यांच्यामध्ये २४० दिवसांचा निकस होता. बरोबर आहे ना? तर आपण सभागृहामध्ये, उपायुक्त मुख्यालय म्हणुन अशी खात्री देवू शकता का? १.११.९६च्या ठरावाने तेच कर्मचारी कायम झाले आहेत. जे पुर्वी रोजंदारीवर काम करत होते. आपण त्या रोजंदारीवरील कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी तयार केली आहे. बरोबर आहे ना?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मी त्याचेच उत्तर आपणास दिले आहे. की यापुर्वी तत्कालिन प्रशासकांनी त्यावर जो निर्णय घेतला त्यावेळेस ते लोक रोजंदारीवर होते किंवा नव्हते. यासाठी कुठले निकष व कुठली कागदपत्रे तपासली गेली. तपासली नसतील तर त्याच्या व्यतिरिक्त कोण, असे निकष न लावता कोणी माणसे घुसवली. याबाबत मी आज रोजी कागदपत्र तपासल्या शिवाय कोणतेही अभिवचन देवू शकणार नाही.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-तत्कालिन प्रशासकांनी जो निर्णय घेतला त्याबाबत मी आक्षेप घेतलेला नाही. किंवा त्याच्यावर मी भाष्य केलेले नाही. त्या निर्णयाची अंमलबजावणी करताना. जे कर्मचारी त्यावेळी नगरपालिका आस्थापनेवरती कधीही नव्हते ते सुध्दा त्या ठरावाचा फायदा मिळवून आतमध्ये घुसले आहेत असा माझा आरोप आहे. तर अशी तुम्ही खात्री देवू शकता का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मला खात्री देता येणार नाही. कारण की तो अभिलेख मी तपासलेला नाही.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-आयुक्त महोदय हा अतिशय गंभिर प्रश्न आहे. या प्रश्नासाठी मला सहा महिने थांबावे लागले. महत्त्वाची गोष्ट अशी की जेव्हा या नगरपालिकेला महापालिकेचा दर्जा मिळाला आणि त्यानंतर या ठिकाणी प्रशासकांची नेमणुक झाली. तर त्यावेळी प्रशासकांनी महासभेचे अधिकार वापरून १.११.९६ रोजी प्रशासकीय ठराव केला होता. आणि त्यानुसार जे कर्मचारी रोजंदारीवर काम करत होते. ज्यांना २४० दिवस सलग पुर्ण झाले आहेत. अशा कर्मचा-यांना त्याचा फायदा दयायचा होता. परंतु प्रत्यक्षात या ठरावाची अंमलबजावणी करताना नगरपालिकेच्या आस्थापनेवर जे कर्मचारी कधीही नव्हते अशाही कर्मचा-यांना त्याचा फायदा देण्यांत आलेला आहे. असा माझा आरोप आहे. मला वाटते ते प्रकरण गंभीर आहे. आपण म्हणता जी सेवाजेष्ठता यादी तयार करायची आहे वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये त्यामध्ये अनेक कर्मचारी असे आहेत. जे महापालिका आल्यानंतर नियुक्त झालेले आहेत. किंवा महापालिका येण्याच्या पाच सहा महिने अगोदर नियुक्त झाले आहेत. परंतु त्यांना सुध्दा १.११.९६ च्या ठरावाचा फायदा देण्यात आलेला आहे. तो कसा? हे तर अशक्यच आहे ना? जे कर्मचारी महापालिकेचा दर्जा मिळण्यापुर्वी सहा आठ महिन्यापुर्वी आलेले असतील ज्यांना २४० दिवस पुर्ण झालेले नाहीत. त्यांच्या नेमणुका फक्त सहा सहा महिन्यासाठी तात्पुरत्त्या करण्यात आलेल्या असतील. त्या कर्मचा-यांना १.११.९६च्या ठरावाचा फायदा घेण्याचा प्रश्न येत नाही. परंतु असे सुध्दा झालेले आहे. असा माझा आरोप आहे. तर असे झालेले नाही याची खात्री तुम्ही सभागृहाला देवू शकता का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मा. महापौर महोदया, सन्माननिय सदन श्री. राज असरोंडकर साहेबांनी हा जो आरोप केलेला आहे. त्याबददल मी

खुलासा करू इच्छितो की, हे अभिलेख आता पर्यंत काही आम्ही तपासलेले नाहीत. त्यांच्या प्रश्नाप्रमाणे आम्ही उत्तर दिलेले होते. परंतु असे ठराविक कर्मचारी नव्हते अशी काही माहिती जर आपल्याकडे असेल तर ती दिली तर त्या अनुषंगाने आम्ही तपासणी करू.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>श्री. भडकवाड साहेब, श्री. राज असरोंडकर यांनी जो मुददा उपस्थित केला आहे. ठरावाच्या वेळी किंवा त्याअगोदर असलेले कर्मचारी कायम करायचे होते. हे बरोबर आहे का? तेवढयाच लोकांना कायम करायचे होते. त्यानंतर जर कायम झाले असतील तर ते नियमबाहय आहे. हे बरोबर आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मी तेच म्हणतो आहे.

<u>मा.सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>श्री. राज असरोंडकर यांनी जो मुददा उपस्थित केला आहे. ठरावाच्या नंतर किंवा त्या कालावधी नंतर जे लोक कामाला लागले त्यांना सुध्दा त्याचा फायदा देण्यात आलेला आहे. तुमच्या कडे त्याची अचुक माहिती नाही. हे जर नियमबाहय असेल तर? त्यांनी जो मुददा उपस्थित केला त्यानुसार ते नियमबाहय आहे. त्या लोकांना त्याचा फायदा मिळावयास नको होता. असे असतानासुध्दा काही लोकांना तो मिळाला आहे. हे चुकीचे आहे की बरोबर आहे?ऐवढे फक्त सांगा. हे नियमात बसणारे आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>तो जो ठराव झालेला आहे. त्याच्यात, माझ्या माहितीप्रमाणे, तीन वर्ष ज्याची सेवा झालेली आहे. अशा सर्व रोजंदारीवरील कर्मचा-यांना कायम सेवेत सामावुन घेतले आहे. त्या तीन वर्ष सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त बाबतचा श्री. राज असरोंडकर साहेबांचा प्रश्न असेल तर त्याबाबतचा अभिलेख सध्या माझ्याकडे येथे उपलब्ध नाही.

<u>मा.सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>याचा अर्थ असा, जेवढे मला समजते, एखादा कर्मचारी ९५, ९६ला कामाला लागला असेल तर तो २.११.९६ च्या ठरावाने कायम होवू शकत नाही.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मी आपणांस तीच विनंती केली की अशा काही कर्मचा-यांची जर आपणांकडे नावे , यादी असेल तर ती आम्हास दीली तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रश्न असा आहे की मुददा फिरविण्यात काही अर्थ नाही. याचा अभ्यास दरवेळेस आम्ही करायचा, तुमचे कागद आम्ही शोधायचे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>असे बिल्कुल अपेक्षीत नाही. मी आपल्याला पहिल्यांदाच सांगितले की, या प्रश्नाची तड लावण्याचा आम्ही प्रयत्न करतो. सद्यस्थितीत माझ्या समोर जेवढे प्रश्न आले होते. त्या अनुषंगाने उत्तरे दिली होती. त्यामुळे आता समोर उभे राहिल्यामुळे माझ्याकडे अभिलेख नाहीत. परंतु याची आम्ही तपासणी करतो.

<u>मा.सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>जे उत्तर तुम्ही आधी दिले होते सभागृहासमोर ते उत्तर आकडेवारीमध्ये चुकले होते. पण तुमच्या चुका काढण्यामध्ये मला स्वारस्य नव्हते. चुका काढणे हा माझा हेतु पण नव्हता. आपल्याला यामध्ये परीणाम आणायचा आहे. त्यामुळे आकडेवारीमध्ये ज्या चुका झाल्या आहेत त्या मी तुमच्या, प्रशासनाच्या नजरेत आणुन दिल्या. त्यानंतर तुम्ही उत्तर सुधारले,

चांगले व्यवस्थित उत्तर तुम्ही सभागृहासमोर आणले. आताची जी स्थिती आहे ती तुम्ही सभागृहासमोर आणलीत. तुमच्याकडे वर्ग ३ , वर्ग ४ ची मसुदा सेवाजेष्टता यादी आहे. बरोबर आहे? २.११.९६च्या सालामध्ये मला असे वाटते की, जानेवारी महिन्यामध्ये रोजंदारीवरील कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द केली आहे. बरोबर आहे ना? म्हणजे मसुदा सेवा जेष्ठता यादीमध्ये ज्या कर्मचा-याची नावे होती तेच कर्मचारी येथे असले पाहिजे होते.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्याचा उददेशच हा असतो की, सेवाजेष्ठता यादीमध्ये सुध्दा चुका होवू शकतात. आणि सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द झाल्यानंतर काही कर्मचा-यांनी आम्ही त्याठिकाणी काम करत होतो असे पुरावे दिले किंवा कसे झाले? हे लोक घुसले कसे? हे तपासण्यासाठी माझ्याकडे आज रोजी अभिलेख नाही. ते तपासलेच नाही.

<u>मा.सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>माझा आक्षेप हा फक्त २.११.९६च्या ठरावाच्या अंमलबजावणी पुरताच मर्यादीत आहे. व जी मसुदा यादी वर्ग ३ व वर्ग ४ ची तुम्ही प्रसिध्द केली आहे. त्याच्या प्रत्येक नावासमोर त्याचा कायम झाल्याचा दिनांक त्याचा कॉलम तुम्ही टाकलेला आहे. जेवढया कर्मचा-यांच्या नावासमोर २. ११.९६ रोजी कायम असे जेथे जेथे लिहिले आहे. ते सर्व कर्मचारी, त्यांनी नगरपालिका आस्थापनेवर किमान तीन वर्ष तरी काम केलेले असले पाहिजे. परंतु माझा असा आरोप आहे की, असे तीन वर्ष काम न केलेले नगरपालिकेच्या आस्थापनेवर कधीही नव्हते. ज्यांना २.११.९६च्या ठरावाचा फायदा मिळु शकत नव्हता. अशा सुध्दा कर्मचा-यांना २.११.९६च्या प्रशासकीय ठरावाचा फायदा देण्यांत आलेला आहे. त्यांना कायम करण्यांत आलेले आहे हा माझा मुददा आहे. दुसरे याला जोडुनच सांगतो, प्रश्न जरा लांबचा आहे तरी पण तो वापरायला हरकत नाही. माझ्या या प्रश्नाशी संबंधित आहे. त्या प्रश्नाला उत्तर देताना असे दिले आहे की, या नगरपालिकेमध्ये विविध न्यायालयाच्या स्थगन आदेशाव्दारे ७६९ कर्मचारी कार्यरत आहेत. आणि या सर्वांना २.११.९६च्या ठरावा अन्वये कायम करण्यांत आलेले आहे. तुम्ही सांगता की, ८१ आणि ४५७ दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये ७६९ चा आकडा दिला आहे. म्हणजे एक वर्षानंतर मी त्याचे स्पष्टीकरण मागायचे का? तो प्रश्न जेव्हा येईल तेव्हा. लक्षात आले का? माझ्या प्रश्नाला असे उत्तर देण्यांत आले आहे की न्यायालयाच्या स्थगन आदेश आधारे ७६९ कर्मचारी कार्यरत आहेत. या सर्वांना २.११.९६च्या ठरावान्वये कायम करण्यांत आलेले आहे. व तुमची आकडेवारी सांगते की ८१ आणि ४५७ म्हणजे ५३८फक्त कायम करण्यांत आले आहेत.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>माझ्याशी संबंधित जो प्रश्न आहे त्याच्याबाबतीत, हे रोजंदारीवर असणा-या कर्मचा-यांना जेव्हा कायम सेवेत सामावुन घेतले. त्यावेळेस महासभा अस्तित्त्वात नव्हती. प्रशासक या नात्त्याने महासभेचे सर्व अधिकार प्रशासक यांच्याकडे होते. त्याच्यामध्ये तीन वर्ष सेवा झालेली आहे. रोजंदारीवरील जे कर्मचारी आहेत त्यांच्या सेवा प्रशासकाने महासभेच्या अधिकाराने शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन, आस्थापनेवरील पदांच्या मंजुरीस अधिन राहुन कायम केलेले आहेत. याचा अर्थ आदेश काढणारे प्राधिकारी सुध्दा महासभा आहे आणि निकष ठरविणारा प्राधिकारी सुध्दा महासभा आहे. तीन वर्षाचा जो निकष प्रशासकाने ठरविण्यात आलेला होता. त्या निकषाच्या विरोधामध्ये किंवा तो निकष डावलुन जर त्या तात्त्कालिन प्रशासकांच्या आदेशामध्ये असे काही कर्मचारी आले असतील तर ते महासभेच्या अधिकारामध्ये झालेली गोष्ट आहे आणि ती या महासभेपुढे आणण्यात येईल तपासणीकरून.

<u>मा.सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>तुम्ही मॅन्युप्युलेशन करता,ती महासभेच्या अखत्त्यारीतील गोष्ट नाही जे कर्मचारी कायम झाले ते प्रशासकीय ठरावानुसार प्रशासकीय ठराव ही वेगळी बाब आहे. व त्याची अंमलबजावणी ही वेगळी बाब

आहे. त्याची अंमलबजावणी प्रशासकांनी केली नव्हती. त्याची अंमलबजावणी आयुक्तांनी केली होती. ती त्यांनीच केली होती का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-प्रशासकीय ठराव हा महासभेचे अधिकार प्रशासकाला असल्यामुळे केलेला ठराव आहे म्हणजे तो महासभेने केलेला ठराव आहे. महासभेमध्ये झालेल्या प्रत्येक ठरावाची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. अन्यथा ठराव बेकायदेशिर असेल तर कलम ४५१ नुसार शासनाकडे पाठवुन विखंडीत केला पाहिजे.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-ठराव आपल्या जागेवर बरोबर आहे. परंतु ठरावाची अंमलबजावणी करताना त्यामध्ये नावे घुसडण्याचा अधिकार प्रशासनाला आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-नाही नाही. प्रश्न मुळतः काय आहे. प्रशासकांनी नावे घुसविली आहेत की नंतर प्रशासनाने पुन्हा नावे समाविष्ट केली आहेत?

मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे:-श्री. भडकवाड साहेब, त्यांचा प्रश्न स्पष्ट आहे. ठराव झाला त्यावेळी जी नावे होती त्या नावांना कायम करण्यात त्यांचा काहीही आक्षेप नाही. महासभेने ठराव केला प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली त्याबद्दलही त्यांचा काही आक्षेप नाही. पण त्यानंतर तुम्ही एक मुददा उपस्थित केला की त्यानंतर किती घुसले? कसे घुसले? याबाबतीत तेव्हाच्या प्रशासकाला माहिती. तुम्हाला त्यांची आकडेवारी माहिती नाही किंवा हे कसे घुसले ते माहित नाही. पण जर घुसले असतील, नसतील घुसले तर प्रश्नच नाही. पण घुसले असतील अशी त्यांची खात्री आहे. पण घुसले असतील तर ते कायदेशिर आहे का? आणि जर बेकायदेशिर असेल नियमबाहय असेल तर त्यावर कारवाई काय? हे साधे आणि सरळ उत्तर आहे त्याचे.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-महासभा ही नेमणुक प्राधिकारी आहे. कायदा स्पष्ट आहे. नेमणुक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या निकषानुसार भरती झाली पाहिजे. प्रशासक यांनी जो निर्णय घेतलेला आहे तो नेमणुक प्राधिकारी म्हणुन घेतलेला आहे. त्या निकषाप्रमाणे ज्या कर्मचा-यांच्या बाबतीत नियुक्ती प्रशासनाने दिलेली आहे. ती प्रशासकाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे दिलेली असली पाहिजे. अन्यथा अशी जर काही नेमणुक जी प्रशासकाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे नाही किंवा ठरावाप्रमाणे नाही अशी दिली असेल तर ती बेकायदेशिर आहे.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया आणि आयुक्त महोदय हा प्रश्न मांडताना आणि त्यावरील माझ्या भावना अतिशय तीव्र आहेत. मी या शहरामधुन अनुसूचित जातीच्या प्रभागामधुन निवडुन आलेलो एक नगरसेवक आहे. आणि त्यामुळे येथे नगरसेवक म्हणुन काम करत असताना याठिकाणी मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्त्व करणे. हे सुध्दा मी माझे कर्तव्य समजतो. मा श्री. सुशिलकुमार शिंदे सारखे दलित मुख्यमंत्री झाले तर सभागृहात सर्वांना आनंद होतो. आणि येथे प्रस्ताव सुध्दा ठेवले जातात अभिनंदनाचे. परंतु अशा कोरडया अभिनंदनाने काही होत नसते. ज्यावेळेला आपण दलित मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो त्यावेळेला आपली सुध्दा जबाबदारी असते. आपण येथे महासभेमध्ये प्रतिनिधीत्त्व करीत असताना दलितांवर अन्याय करू नये. ४५ व्या क्रमांकाचा जो प्रश्न आहे. मी तो प्रश्न पुर्ण करतो. त्यामध्ये मागासवर्गीयांचा अनुशेश दिलेला आहे. की अनूसूचित जाती, अनूसूचित जमाती इतर मागासवर्गीय यांचा किती शेष बाकी आहे. जवळ जवळ अडीचशे जागांचा शेष या

महापालिकेत वेगवेगळया प्रवर्गातील बाकी आहे. एकाबाजुला अडीचशे जागांचा अनुशेष बाकी रहातो. आणि दुस-या बाजुला गेल्या पाच वर्षामध्ये खुशाल तुम्ही ८३० नविन नेमणुका करता आणि त्यावेळेला निवड पध्दतीचे कुठलेही निकष पाळत नाहीत. तुम्ही कुठल्याही जाहिराती देत नाहीत. तुम्ही मुलाखती घेत नाहीत. निवड समिती नेमत नाहीत. आणि या सगळया पध्दतीने तुम्ही नेमणुका करत असता. ८३० एकाबाजुला तुम्ही नविन नेमणुका केल्या आहेत. आणि दुस-या बाजुला २५० जागांचा मागासवर्गीयांचा अनुशेष बाकी आहे. हा मागासवर्गीयांवर अन्याय नाही का? महापालिका का झाली? नगरपालिकेच्या वेळी येथे प्रचंड गोंधळ होता प्रशासनामध्ये अनागोंदी होती. म्हणुन महापालिका झाली. महापालिका झाल्यानंतर परत तेच? महापालिका झाल्यानंतर सुध्दा पाच वर्षामध्ये ८३० नेमणुका होतात. व अडीचशे जागांचा अनुशेष बाकी रहतो. यावर प्रशासन काही स्पष्टीकरण करणार आहे का? तुम्हाला ३१ मार्च पर्यंतची मुदत आहे. त्या मुदतीमध्ये २५० चा अनुशेष तुम्ही भरून काढणार आहात का? मी तुमचे अभिनंदन करतो. मागासवर्गीय संघटनेच्या वतीने मी उपोषणास बसलो होतो त्या उपोषणाच्यावेळी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी तुम्ही सुरू केलीत. त्याबददल मी तुमचे अभिनंदन करतो सभागृहामध्ये परंतु ३१ मार्च पर्यंत अनुशेष भरून काढला जाईल याची तुम्ही खात्री देणार आहात का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>रोजंदारीवर जे कर्मचारी कार्यरत होते. त्यांना कायम सेवेत सामावुन घेण्याचा तत्त्कालिन प्रशासकांनी जो निर्णय घेतलेला आहे परंतु १३ जुनला शासनाने पदांना जी मंजुरी दिलेली आहे आणि त्या रोजंदारीवरील कर्मचा-यांना कायम करण्याचा जो मुददा विचाराधिन आहे त्यामध्ये निश्चितपणे मागासवर्गीय कक्षाचे जे नॉर्मस आहेत. ते पुर्णपणे पाहिले जातील. त्यानंतर कायम स्वरूपी आस्थापना प्रत्येक कर्मचा-याला दिली जाईल. ही झाली पहिली बाब. दुसरी बाब अशी की, ३१ मार्च पर्यंतची जी शासनाने मुदत दिलेली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणु इच्छितो की, महापालिका आस्थापनेवरील जी तांत्रिक डिपार्टमेंटस आहेत, पाणी पुरवठा विभाग ,क्षमा करा, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, आरोग्य विभाग त्यांचे सर्व पदोन्नत्त्या आम्ही केलेल्या आहेत. आणि त्याच्यामध्ये शंभर टक्के मागासवर्गीयांचे जे नॉर्मस आहेत, ते पुर्णपणे पाळलेले आहेत, त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची एक सुध्दा चुक आम्ही घडवून दिलेली नाही. आणि जो अनुशेष भरण्याची प्रक्रिया आहे त्यामध्ये सुध्दा मागासवर्गीयांच्या पदांना समझोता केला जाणार नाही, ती मागासवर्गीयांचे पदे मागासवर्गीयांच्या कॅटेगिरीतून भरली जातील.

<u>मा सदस्य श्री राज असरोंडकरः-</u> प्रश्न संपण्यापर्वी आयुक्तांना माझी विनंती आहे की,या संदर्भात जे-जे मुददे उपस्थित झालेत तर त्याबददल आपण चौकशी करणार आहात का? २११९९६ च्या ठरावाची अंमलबजावणी करतांना जो गैरप्रकार झाला असा जो माझा आरोप आहे. तर त्या अनुषंगाने चौकशी करण्यांत येईल का?

<u>मा. आयुक्त ( श्री. बा. र. पोखरकर ):-</u> सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी मुददा उपस्थित केला आहे. ९६ मध्ये तत्त्कालिन प्रशासक यांनी जो ठराव केला होता. त्या ठरावाच्या आधाराने महापालिकेमध्ये किंवा तत्त्कालिन नगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना नियमित करण्यात आले होते. परंतु असे होताना त्या ठरावाची अंमलबजावणी होताना जे कर्मचारी त्या तत्त्कालीन नगरपालिकेमध्ये नव्हते. असे कर्मचारी किंवा जे कर्मचारी त्यासाठी पात्र नव्हते अशा कर्मचा-यांचा समावेश झालेला आहे. असा त्यांचा प्रश्न आहे. या प्रश्नाबाबत मी सांगु इच्छितो की प्रत्येक कर्मचा-याबाबत ही बाब तपासुन बघावी लागेल. किंवा यापुर्वीच उपायुक्त मुख्यालय यांनी सुचविले की आपल्याकडे जर अशा काही कर्मचा-यांची माहिती असेल व ती प्रशासनाला दयावी. अन्यथा प्रत्येक

कर्मचा-यांबाबत काही अनियमितता झाली का? हे तपासुन बघितल्याशिवाय आता या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही. त्यामुळे याची चौकशी करायची किंवा नाही. जेव्हा ही तपासणी होईल त्याच्यामध्ये काही अनियमितता झाली असेल तरच त्याचे उत्तर देता येईल. व ही अनियमितता झाली किंवा नाही त्याबाबत प्रशासन निश्चितपणे तपास करेल.

<u>मा सदस्य श्री राज असरोंडकरः-</u>धन्यवाद.

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. ४६ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ४६:-</u>ब्लॉक नं. ए <u>४७७/५३३</u> उल्हासनगरन येथिल सिस्टर के.ओ. रोसी यांच्यावर संदर्भ कार्यालयाचे पत्र क्र. उमपा /नरवि /बाप /१२७/९८ /६८३, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००२ च्या नोटिस अन्वये जागेवर मंजुर नकाशा व्यतिरिक्त जागेवर वाढीव, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्यासंबंधी खालील प्रश्नांची उत्तरे दयावीत?

उपरोक्त नोटिस क्र. उमपा /नरवि /बाप /१२७/९८ /६८३, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००२ अन्वये सिस्टर रॉसी यांना वाढीव बांधकाम संबधी ३० दिवसात अहवाल सादर न झाल्यास वाढीव बेकायदेशीर अनाधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही अंतर्गत सदर मंजुर नकाशा व्यतिरिक्त जागेवर समास अंतरामध्ये जास्तीचे किती बांधकाम करण्यात आले आहे? या प्रकरणात एकतर्फी कार्यवाही केली जाणार असतांना संबंधित विभागाने या बेकायदेशीर अनाधिकृत बांधकामाबाबत कोणत्त्या प्रकारची कार्यवाही केली? कार्यवाही केली नसल्यास विलंब काय झाला?

<u>उत्तरः-</u> उपरोक्त जागेवर सद्या शाळा असून त्या ठिकाणी बांधकाम पुर्णतेचा दाखला न घेता वापर चालू आहे, त्या संदर्भीत नगररचनाकार विभागाकडुन दिनांक ११.६.२००२ रोजी पत्र मिळाले त्या नुसार अनाधिकृत बांधकाम विभागाकडुन अतिरिक्त बांधकाम केल्याबददल एम.आर.टी.पी. कायद्याअन्वये दिनांक १२.६.२००२ रोजी नोटिस देण्यात आली आहे.

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. ४७ हा श्री. लालबिहारी यादव यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ४७:-</u> उल्हासनगर मे कुल कचरे के कितने खत्ते है? कितीने खत्तो को रोजाना साफ किया जाता है? शसाहर को साफ रखने के लिए महानगरपालिकाने किस कंपनी को ठेका दिया? उस कंपनी का ठेका किन शर्ती पर दिया गया है?

<u>उत्तरः-</u> उल्हासनगर शहरात अंदाजे ४९३ ठिकाणी कचरा कुंड्या आहेत.
सर्व ठिकाणच्या दैनंदिन कचरा उचलण्यात येतो.

शहरात दैनंदिन गोळा होणारा कचरा उचलण्यासाठी महापालिकेने मे. व्ही. आर. पनवेलकर यांना कचरा वाहतूक कामाचा ठेका दिलेला आहे.

सर्व कचरा कुंडी ठिकाणावर दैनंदिन गोळा होणारा कचरा उचलण्याचा अटी-शर्ती पाहण्यासाठी कार्यालयात उपलब्ध ठेवल्या आहेत.

<u>मा.सचिवः-</u>प्रश्न क्र. ४८,४९,५० हे श्री.बच्चाराम रूपचंदानी यांचे आहेत.

प्रश्न क्र. ४८:-ओ)वेदर द कमिशनर इज वेअर ऑफ सेक्शन ६७ अे ऑफ द ब. पीएमसी ॲक्ट, १९४९ वीच ऑन जॉइन अपऑन हीम टू सबमीट इनव्हॉर्नमेंट स्टेटस रिपोर्ट वीदीन द सीटी टू द कॉरपोरेशन बीफोर द थर्टीफस्ट डे ऑफ जुलै ऐव्हरी यीअर?

उत्तरः-होय.

प्रश्न क्र. ४९:-व्हाय धिस हॅज नॉट बीन डन बाय द कमिशनर इन आवर कॉरपोरेशन?

उत्तरः-उल्हासनगर महापालिकेकडे ठाणे, कल्याण महापालिका सारखा स्वतंत्र पर्यावरणाशी निगडीत कक्ष अथवा कर्मचारी वर्ग नसल्याने यापूर्वी अहवाल बनविता आला नव्हता. परंतु या वर्षी आरोग्य विभागाकडुन सदर अहवाल बनविण्यात येत असून दि. ३१ जुलै, २००२ पुर्वी अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्रश्न क्र. ५०:-वेदर द कमिशनर इनटेंडस टू डू ॲटलिस्ट धिस यिअर?

उत्तरः-होय.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी श्री. बच्चाराम रूपचंदानी यांना विनंती करेन फक्त एकच शब्द बोलतो. आज आमच्या श्री. मोहन (गाडा) रामरख्यानी यांचा ५८ वा वाढदिवस आहे म्हणुन भाभी ज्योती कालानी त्यांना पुष्पगुच्छ देतील. व सर्वांना पेढे वाटप करतील.

''तुम जिओ हजारो साल
साल के दिन हो पचास हजार''

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-अधिकारी कोण आहे? कोण उत्तर देणार?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मा. महापौर महोदया, सन्माननिय सदन श्री. लाल विहारी यादव यांनी जो प्रश्न विचारला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आरोग्य विभागाचा कार्यभार आपल्याकडे दिला आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-आरोग्य विभागाचा अतिरिक्त कार्यभार माझ्याकडे नाही परंतु अतिरिक्त आयुक्तांनी मला उत्तर देण्यास सांगितले आहे. म्हणुन उत्तर देण्यास मी उभा आहे. आणि माझ्याकडुन काही प्रश्नांचा खुलासा नाही झाला तर साहेब उत्तर देतील. श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी वरील प्रमाणे प्रश्न विचारला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-उत्तरात आपण होय लिहिले आहे. ही माहिती आयुक्तांनी कधी घेतली?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-आयुक्तांना माहिती पहिल्यापासुन आहे. कायदयामध्ये ते आहे.

मा. सदस्या श्रीमती. ससाणे लक्ष्मी सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-परंतु या अगोदर कारवाई का होत नव्हती?



श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-या बाबत मी सभागृहाच्या निर्दशनास आणु इच्छितो की, २००२च्या अगोदर ......

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-यामध्ये आपण इतिहास लिहिला आहे. हे शहर ५० वर्ष जुने आहे वगैरे वगैरे तो काही अहवाल नाही.
श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल जो आहे तो हे सांगु इच्छितो की २००२च्या अगोदर कधी सादर केलेला नव्हता. हा पहिलाच रिपोर्ट आहे. त्यामुळे काही गोष्टी त्यामध्ये आल्या नसतील. यानंतर प्रत्येक वर्षी त्यामध्ये सुधारणा केली जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तर यावर्षी आपण काय केले आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):- यावर्षाची सुध्दा तयारी सुरू आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-त्यामध्ये आपण काय सुधारणा केली आहात?
मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला.
श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-ते आजच्या तारखेला मी कसे सांगु शकतो? ३१ जुलैला आम्ही तो महासभेसमोर सादर करू.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-जुलै मध्ये आपणांस तो दयायचा होता. त्यामध्ये आपण फक्त इतिहास दिला आहात. ५० हजार जुने शेअर आहेत. ऐवढे हे आहेत, एवेढया शाळा आहेत. त्याचा काय फायदा आहे?
मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातून बाहेर पडले.
मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-याबाबीकडे मी लक्ष वेधु इच्छितो. जो महासभेसमोर अहवाल आला होता. तो काही पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल नव्हता. उल्हासनगरवर तो एक निबंध होता. १९४७ मध्ये देशाची फाळणी झाली. त्यानंतर उल्हासनगर हे एक कॅम्प होते. पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल काय आहे? आमचे आयुक्त साहेब ठाण्याला राहतात. ठाण्यामध्ये आपण गेलो तर असे दिसुन येते की तेथे प्रत्येक चौकात एक बोर्ड असतो. प्रदुषणाबाबतची माहिती असते. सल्फरडाय ऑक्साईडची शहरामध्ये ऐवढी मात्रा आहे. कार्बनडाय ऑक्साईडची ऐवढी मात्रा आहे. या चौकामध्ये ऐवढी त्या चौकामध्ये ऐवढी आमच्या कडचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल ज्याने तयार केला. त्यांच्यावर मी भाष्य करू इच्छित नाही. परंतु तो इनव्हारलमेंट स्टेटस रिपोर्ट नाही.तो फक्त उल्हासनगर शहराच्या विकासावरचा निबंध आहे. याचा अर्थ असा आहे की जसे ठाण्यामध्ये बोर्ड लागतात, मुंबईमध्ये बोर्ड लागतात जसे अन्य शहरामध्ये बोर्ड लागतात. व त्या मात्रांबाबत तांत्रिक कर्मचारी वर्ग असतो. कोणत्या विभागात प्रदुषणाची परिस्थिती काय आहे ती आमच्या समोर आली पाहिजे. ती त्यात नव्हती. यासाठी मी श्री. बच्चाराम रूपचंदानी यांच्या प्रश्नाबाबत खुलासा करू इच्छितो की तो पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल नव्हताच. ख-या अर्थाने पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल आमच्या महानगरपालिकेमध्ये आला पाहिजे. तो आपण कधी दयाल. नाहीतर म्हणाल की जुलै महिना येवून गेला परंतु अदयाप व्यवस्था झालेली नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-जसे की मी अगोदरच सांगितले २००२ च्या अगोदर कधीही अशा प्रकारचा रिपोर्ट तयार केलेला नव्हता. तर ही जबाबदारी आमचे तत्कालिन उपायुक्त श्री. कारचे साहेब यांच्यावर सोपविण्यात आलेली होती. त्यांनी तो रिपोर्ट पहिल्यांदाच तयार केला होता. म्हणुन त्यांच्याकडे मुळ गाभा किंवा पुर्वीची काही माहिती नव्हती. म्हणुन त्या रिपोर्टमध्ये चुका नक्कीच असतील. पंरतु या नंतर जो पण रिपोर्ट प्रत्येक वर्षी सादर केला

जाईल. मी सभागृहाच्या हे लक्षात आणुन देवू इच्छितो की यामध्ये तांत्रिक निष्णांत लोक असतील याबाबत ज्या तांत्रिक संस्था आहेत त्यांच्यामार्फत योग्य असा रिपोर्ट महासभेस सादर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>यावर्षीचा जो रिपोर्ट आहे त्यामध्ये या गोष्टी आल्या पाहिजेत. जसे मी आताच म्हंटले की तो पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल नव्हता. आता जानेवारी महिना आहे आतापासुनच आम्ही प्रशासनाला सुचित करत आहोत. कमीत कमी त्याची तयारी झाली पाहिजे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मी सभागृहाच्या लक्षात आणुन देवू इच्छितो की, आयुक्त साहेबांनी परवाच सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली होती. त्यावेळी आयुक्त साहेबांनी आरोग्य विभागास ही ताकीदही दिली होती की, मागच्यावेळी आरोग्य विभागाचा जो पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करण्यात आला होता तो खुपच उशिरा तयार करण्यांत आला होता. त्यामुळे त्यामध्ये बरेचसे मुददे आले नव्हते. परंतु मागील वर्षी तो पहिल्यांदाच तयार करण्यांत आलेला असल्यामुळे तसे झाले होते. यावर्षी आतापासुनच त्याची सुरूवात केली जावी. व विहित वेळेत तो महासभेपुढे सादर केला जावा असे आयुक्त साहेबांनी निर्देश दिले होते.

<u>मा.सचिव:-</u>प्रश्न क्र. ५४ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>प्रश्न क्र. ५१ ,५२ ,५३ ....

<u>मा. सचिव:-</u>ते प्रश्न त्याबाबतच आहेत ना? पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बाबतचेच आहेत. आपणांस विचारायचे असतील तर आपण विचारू शकता. विचारायचे आहेत? त्यांच्याशीस संबंधित आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>हे प्रश्न वेगळे आहेत. लेखा विभागाबाबत आहेत.

<u>मा.सचिव:-</u>प्रश्न क्र. ५१ ,५२ ,५३ हे श्री.बच्चाराम रूपचंदानी यांचे आहेत.

<u>प्रश्न क्र. ५१:-</u>वेदर द कमिश्नर इज अवेअर ऑफ द सेक्शन ९४ ऑफ द बी.पी.एम.सी ॲक्ट वीच एनजॉइन अपऑन हीम टू प्रिपेअर अ डीटेलड रिपोर्ट ऑफ द सीटी ॲन्ड स्टेटमेंट ऑफ अकाऊंटस् इमीडीएटली आफ्टर एव्हरी फस्ट डे ऑफ एप्रिल?

<u>उत्तर:-</u>होय. ॲज पर कॉज ९४ (२) ऑफ बी.पी.एम.सी ॲक्ट १९४९ रिपोर्ट ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन एलॉग वीथ इनकम ॲन्ड एक्सपेंडीचर इज टू बी प्रापेअर्ड इन सच अ फार्म.

<u>प्रश्न क्र. ५२:-</u>व्हाय धिस प्रॅक्टीस इज नॉट फॉलोड बाय द मिश्नर इन आवर कॉरपोरेशन?

<u>उत्तर:-</u>ॲन प्रीसक्राइबड बाय द स्टॅडींग कमिटी फॉम टाईम टू टाईम डायरेक्टड. नो सच फॉम इज प्रीसक्राइब बाय दम स्टॅडींग कमीटी ॲन्ड हॅज नॉट डायरेक्टेड सो फॉर. देअर फोर नो सच रिपोर्ट इज प्रीपेअर्ड.



<u>प्रश्न क्र. ५३:-</u>वेदर द कमिश्नर इनटेंडस टू डु नाऊ?

उत्तरः-नो सुनर द फॉर्म इज प्रीसक्राइब दॅन प्रीपअरेशन ऑफ रिपोर्ट वील बी अन्डरटेकन.

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-मा. महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव आणि सर्व सन्माननिय सदस्य हा प्रश्न विचारला गेला आहे कलम ९४ नुसार प्रशासनास प्रशासनिक अहवाल दयायचा आहे. त्याबाबत जे उत्तर दिले गेले आहे. ते असे आहे की, स्थायी समितीने त्याचा मसुदा तयार करावयाचा आहे. त्यांनी ते निश्चित करावयाचे आहे की तो कोणत्त्या विहित नमुन्यात दयायचा आहे. व जसा तो फॉर्म निश्चित केला जाईल. व त्यात माहिती दिली जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-माझा प्रश्न असा आहे की आपण स्थायी समितीला कळविले आहे का?

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-आमच्या उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज आहेत ते प्रत्येक अर्थसंकल्पात देत असतो. ती माहिती आम्ही देत राहतो. प्रशासनिक अहवालात काय काय आणखी मुददे असावेत ते अदयाप निश्चित केलेले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-माझे म्हणणे आहे की आपण स्थायी समितीला याबाबत मार्गदर्शन केले आहे का?

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-हे जे उत्तर आहे ते मागील मुख्य लेखा अधिका-यांकडुन दिले गेले होते. याअगोदर अशाप्रकारचा प्रस्ताव स्थायी समितीत सादर केलेला नाही. यापुढे केला जाईल. प्रत्येक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाची माहिती बजेटमध्ये प्रत्येक वर्षी आम्ही देत असतो. अनुक्रमणिकेमध्ये देत असतो. त्यावरून माहित पडते की, मागील वर्षी किती उत्पन्न व खर्च झाले होते? यावर्षापासुन पुढे अधिक स्पष्टपणे प्रस्ताव तयार करून सादर केला जाईल.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ५४ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते सभेत उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ५४:-शांतानगर जकात नाका समोर, आनिल स्टील फर्निचर व गौतम इंटरप्रायजेस दुकानामधील गल्लीत, कल्याण -अंबरनाथ रोड, शांतीनगर, उल्हासनगर-३ येथे नव्याने तयार झालेल्या इमारतीबाबत प्रश्नाची उत्तरे देणे बाबत.

उपरोक्त नमुद केलेल्या पत्त्यानुसार नव्याने तयार झालेल्या तळमजला अधिन दोन मजले इमारतीचे बांधकाम मंजुर इमारतीचे बांधकाम मंजुर आराखडयानुसार आहे का? सदर इमारतीस वाढीव बांधकाम करण्यात आले आहे का? असल्यास किती वाढीव बांधकाम करण्यात आले त्याबाबत सविस्तर तपशिल दयावा? तसेच सदर बेकायदेशिर व अनाधिकृत नव्या इमारतीबाबत कोणत्त्या प्रकारची कार्यवाही करण्यात आली आहे का? नसल्यास का?



उत्तरः-होय.

उपरोक्त नमुद केलेल्या पत्त्यानुसार भुखंडाचा क्रमांक अथवा महसुली क्र. अथवा घर क्रमांक दिलेला नसल्याने निश्चित स्थान कोणते आहे. याबाबत बोध होत नाही. कारण सदर परिसराच्या ठिकाणी दिनांक १५.७.२००१ रोजी प्रत्यक्ष जागेवर चौकशी केली असता गेल्या दोन ते तीन वर्षामध्ये नव्याने कोणत्त्याही स्वरूपाचे बांधकाम केलेले नाही. असे स्थानिक चौकशित आढळुन आले. तरी निश्चित महसुली क्रमांक दिल्यास परिपुर्ण स्वरूपाचे उत्तर देता येईल.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ५५ हा श्री. देवेंदसिंग खेमाणी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५५:-हाऊ मेनी लेटरर्स ऑफ विथड्रॉव्हल ऑफ सुपरव्हिजन फॉर डेव्हलपमेंट वर्क बाय वेरीअस आर्कीटेक्ट हॅव बीन रिसीव्हड बाय यु फॉम जानेवारी २००१ टू जुन २००२?

उत्तरः-हेय. इन ऑल २२८ लेटर ऑफ वीथड्राव्हल ऑफ सुपरव्हिजन फॉर डेव्हलपमेंट वर्क हॅव बीन रिसीव्ह बाय धिस ऑफीस फॉम जानेवारी २०१० टू जुन २००२.

मा. सदस्य श्री. देंवेंदसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, हा जो प्रश्न मी विचारला आहे. तो असा आहे की, आमच्या नगररचना विभागातुन बांधकाम नकाशे मंजुर होतात. त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर जे बांधकाम होत आहे ते मंजुर नकाशा नुसार आहे की नाही? हे कुणी पहात नाही. व यावर गंभीरपणे पाहिले जात नाही. त्यामध्ये आमचे आर्कीटेक्ट असा काही खेळ खेळतात की, जेव्हापासुन चटई क्षेत्राचे उल्लंघन व्हायचे आहे. तेव्हा पासुन एक विथड्रावल लेटर नगररचनाविभागास देतात. व नगररचना विभाग ते पत्र घेतल्यानंतर शांततेने बसुन रहातात. किंवा जास्तीत जास्त एखादी नोटीस देतात. व त्यानंतर यांची भुमिका समाप्त होते. व चटई क्षेत्राचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर सुरू होते. मी हा प्रश्न विचारला आहे (त्यांनी वरील प्रमाणे प्रश्न व उत्तर वाचुन दाखविले.)तर याशी संबंधित एक गोष्ट मी विचारू इच्छितो मी जो कालावधी विचारला आहे त्या कालावधीमध्ये किती नकाशे मंजुर केले?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-त्याची माहिती यामध्ये दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-दिली नाही. कबुल आहे. परंतु पुर्ण वर्षाचा हा जो कालावधी आहे. त्यामध्ये शंभर, दिडशक नकाशे तर मंजुर केले असतीलच?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-कदाचित होवू शकते?

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-म्हणजे जेवढे नकाशे मंजुर होतात त्यांच्या सरासरी ऐवढेच बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र येतात. तर मग बांधकाम पुर्णत्त्वाचे दाखले किती लोकांना दिले?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-या हिशोबाने २२८ लोकांनी बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र दिले आहे. व त्यांना नोटीस पाठविली आहे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-नोटीस कसली पाठविली आहे?



श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-चटई क्षेत्र उल्लंघनाची त्यांना नोटीस दिली आहे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-नाही. नाही.

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आपण प्रथम प्रश्न नीट ऐकुन घ्या. आमचे सन्माननिय सदस्य काय आरोप लावत आहेत? काय प्रश्न विचारत आहेत? नोटीस दिली तेवढे उत्तर पुरेसे नाही. प्रश्न काय विचारला आहे. ११८ नोटीसा आपण काढल्या आहेत, आपला विभाग काय करत आहे?*

*<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>११८ नोटीसा काढल्या आहेत. चटई क्षेत्र उल्लंघनानुसार त्यांना नोटीसा काढल्या आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>त्यानंतर काय झाले?*
*<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>त्यानंतर अनाधिकृत बांधकाम विभागाकडुन सुध्दा त्यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>नोटीस दिल्यानंतर मुददा समाप्त? अशा प्रकारे काम होत आहे एक-एक विभागामध्ये? व प्रेस वाल्यांना बोलावुन मोठ-मोठया गोष्टी केल्या जात आहेत. अशी एक म्हण आहे की, ''बेटे पैदा किए तो हमने, बेटीयॉ पैदा की तो सत्तापक्ष ने''? अशा प्रकारचे काम चालु आहे आपल्या विभागामध्ये भ्रष्टाचार चालु आहे. आपल्या अधिका-यांना सांगा की बरोबर उत्तरे दया आमच्या सदस्यांचे समाधान करा. फक्त नोटीस दिली आणि काम संपले असे होता कामा नये.*

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानीः-</u>अनाधिकृत बांधकामाची नगरसेवक माहिती देतात. आयुक्त श्री. पोखरकर साहेबांच्या नावाने फॅक्स पाठविला जातो. तो फॅक्स १०० ते ५०० रू. मध्ये विकला जातो. त्याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. नगररचना विभाग कशासाठी आहे? माझ्याकडे शेकडो फॅक्स पडले आहेत.आपणांस वाटत असेल तर आज सुध्दा आपणांकडे फॅक्स आलेला आहे परंतु तो आपल्या पर्यंत पोहोचत नाही. दहा वेळा मी श्री. पोखरकर साहेबांना विनंती केली आहे की हे महापालिकेत काय होत आहे.? फॅक्स ५०० रू. मध्ये विकला जातो?*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, ज्यांनी चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे त्यांना नोटीस दिली आहे किंवा नाही दिली ही गोष्ट मी करत नाही. मी इथे असे म्हणत आहे की बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र जे आपणांस आर्कीटेक्ट कडुन मिळाले आहेत. ते किती मिळाले? आपण उत्तर दिले आहे की, ११८ विथड्रावल लेटर मिळाली. म्हणुन मी विचारले की किती नकाशांना मंजुरी दिली आपण म्हणता की याच सरासरी नुसार मंजुर केले आहेत. जर तेवढेच नकाशे मंजुर केले व तेवढयाच नकाशांचे बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र प्राप्त झाले तर बांधकाम पुर्णत्त्वाचे किती लोकांना दाखले आपण दिलेत? व विथड्रावल लेटर नंतर बांधकाम त्याच स्थितीत बंद झाले का? ते पहाणे कुणाची जबाबदारी आहे?*
*<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>आपण प्रश्नामध्ये किती विथड्रावल झाले असा प्रश्न विचारला आहे म्हणुन बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र आकडेवारी दिली आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. देंवेद्रसिंग खेमाणीः-</u>बरोबर आहे. परंतु त्याबरोबर काही माहिती आपण तयार ठेवली पाहिजे ना? या माहितीसाठी मी आणखी आठ महिने थांबायचे का? व जे आर्कीटेक्ट आहेत ज्यांनी बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र दिले आहेत.*



*त्यांमागे त्यांचा हेतु काय आहे? आम्हाला उत्तर हवे आहे. गप्प राहुन काम चालणार नाही.*

*<u>श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-</u>त्यांचा हेतु काय आहे हे मी कसे सांगणार?*

मा.सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-१७० इमारतींना जी नोटीस दिली आहे ती त्या २२८ मधील आहे का? की अलग आहे?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-त्यामधीलच आहेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-त्यामधीलच आहेत?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-ज्या आर्कीटेक्टनी बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र दिले आहे आणि साईटवर काम चालु आहे अशा आर्कीटेक्टवर आपण काय कारवाई केली आहे?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-जानेवारी २००२ मध्ये कुणाचेही लायसन्स नुतनीकरण केले नाही.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिग खेमाणीः-तर आता जे प्लान मंजुर केले जात आहे ते प्लान कुठून येत आहेत. अंबरनाथहुन येत आहेत की कल्याण, नविन मुंबई वरून येत आहेत?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-ज्याचेकडील कॉन्सील ऑफ आर्कीटेक्टस न्यु दिल्लीचे सदस्य आहेत. त्यांच्याकडुन येत आहेत.

मा. सदस्य श्री. देंवेद्रसिंग खेमाणीः-नाही. नाही मी काय सांगत आहे की जुन २००२नंतर आपण जी आर्कीटेक्टची यादी दिली आहे. हे उल्हासनगर मधील माहितगार आर्कीटेक्ट आहेत. त्यांचे लायसन्स आपण नुतनीकरण केले नाही परंतु आता जे एक दिड वर्षापासुन प्लान मंजुर होत आहेत. ते आर्कीटेक्ट कुठून आले?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-कॉन्सील ऑफ आर्कीटेक्ट न्यु दील्ली चे जे प्रॅक्टीसनर आहेत ते येतात. ते कुणी मुंबईचे आहेत, दिल्लीचे आहेत, कुणी बॅंगलोरचे आहेत, किंवा कुणी अंबरनाथचे आहेत तर कुणी उल्हासनगरचे आहेत.

मा. सदस्य श्री. देवंद्रसिंग खेमाणीः-किती आर्कीटेक्टस आहेत?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-पाच-सहा असतील.

मा. सदस्य श्री. देवंद्रसिंग खेमाणीः-पाच किंवा सहा असतील? वर्ष २००२ नंतर २००३ आले आहे. या कालावधीत जरूर १००-१५० प्लान मंजुर झाले असतील. तर हे पाच-सहा लोकच प्लान मंजुर करून घेत आहेत. त्यांची नावे काय आहेत?मा. महापौरजी, हे पहा मुददा खुप गंभीर आहे. आयुक्त साहेबांनी सुध्दा लक्ष दिले पाहिजे. व याच्या तळापर्यंत जाणे अतिशय गरजेचे आहे. खुपच चुकीचा खेळ होत आहे? बिल्डर, आर्कीटेक्ट व आपल्या विभागातील काही लोक मिळुन खिचडी तयार करतात. व मी विचारत आहे की यामागे हेतु काय आहे? तर ते म्हणतात की तो हेतु आम्हाला माहित कसा पडेल? असे म्हणणे म्हणजे असे वाटते की येथे काही लहान मुले बसली आहेत. त्यांना कुणाचा हेतु समजण्याची कुवत नाही. आर्कीटेक्ट बांधकाम पर्यवेक्षण माघारपत्र देतात. व त्यांना नोटीस बजावली जाते.



हे आर्कीटेक्टचे अनुज्ञप्ती नुतनीकरण करत नाहीत यामध्ये यांची जबाबदारी समाप्त होते. यापुढे कोण कारवाई करणार? कोण लक्ष देईल? व आम्ही जो प्रश्न विचारत आहोत त्याचे बरोबर उत्तर देत नाहीत. असे कसे चालेल?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-त्या पाच-सहा लोकांची नावे सांगितली जावीत. जर वाईट काम असेल तर म्हणतील की नगरसेवक लोकांनी केले सत्ताधारी पक्षांनी केले.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-काही चुकीचे काम झाले तर म्हणतील नगरसेवक लोकांनी केले. सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी केले.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-आपण प्रथम ती पाच सहा नावे सांगा. जे बाहेरचे आर्कीटेक्ट येथे प्लान पास करत आहेत.

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-एक श्री. आहुजा आहेत. दुसरा श्री. हरचंदानी आहे.
मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-साहेब पुर्ण नाव सांगा.

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-श्री आहुजा आणि श्री. हरचंदानी.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-श्री हरचंदानी आणि?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-श्री. प्रदिप तांबे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-जे पण असतील.

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-बाकीची तीन नावे नंतर सांगतो.

मा. सदस्य श्री दिलीप लालवानी:-दोनशे, अडीचशे माघार पत्र काढली आहेत. आणि फक्त तीनच नावे आपणांस आठवतात? आपण म्हणता पाच-सहा नावे आहेत ती पाच-सहा नावे आपल्या लक्षात नाहीत?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-बाकी तीन लोकांची नावे आठवत नाहीत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-दोन नावांमध्ये तर आपण आडनावे सांगितली. नावे सांगितलीच नाहीत. हे लोक आपल्या कार्यालयात येतात आपल्या बरोबर उठतात बसतात.

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-आडनावेच माहीत आहेत पुर्ण नावे माहित नाहीत.
मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-२१८ नोटीसा आपण काढल्या आहेत.

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-बाकीच्या २० लोकांचे अनुज्ञप्तीचे नुतनीकरण केलेले नाही.

मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला व ते सभागृहात शेवटी उभे राहीले.

--३०--

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-हे लोक बांधकाम पर्यवेक्षक माघारपत्र का देत आहेत? याबाबत आपण कधी गंभीरतेने विचार केला आहे. ते लोक बांधकाम पर्यवेक्षक माघारपत्र का देत आहेत. कारण काय आहे?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-लायसन रिनिव्हल करत नाहीत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-लायसन रिनेव्हल केले नाही त्यामध्ये भुषण रूपाणी व थोरात हे लोक आहेत का?

श्री.सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-ही नावे नाहीत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-म्हणजे त्यांचे लायसन रिनेव्हल केले आहे?

श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-नाही केले? थोरातचे पण नाही आणि भुषण रूपाणी यांचे सुध्दा नाही? परंतु हे लोक तर नेहमी आपल्या विभागात बसलेले असतात. त्यांच्या हातामध्ये प्लान पास करावयाच्या फाईल्स असतात ही काय भानगड आहे?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-ते लोक दुस-याच्या नावाने प्लान पास करण्यासाठी येतात. व पुर्ण दिवसभर महापालिकेत असतात. मोठ मोठया नावाचे आर्कीटेक्ट....

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-मा. महापौरजी, अतिशय दुःखाने म्हणावे लागत आहे की, मी जे प्रश्न विचारले त्याचे समाधानकारक उत्त्तर मला मिळाले नाही. आयुक्त साहेब आम्हाला कोणत्त्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्त्तर मिळाले नाही. म्हणुन हा प्रश्न प्रलंबित ठेवला जावा. पुढल्या महासभेत यावर मी चर्चा करेन. सचिव साहेब उभे राहीले आहेत मला वाटते की ते प्रश्नोत्त्तराची वेळ संपल्याची घोषणा करण्यासाठी उभे राहीले आहेत?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ५५ जो आपण आता विचारला प्रश्न क्र. ५६ व ५७ त्याच्याशी संबंधित आहे. व आपला जो प्रश्न आहे की, हे पत्र आल्यानंतर आपण काय केले? तो प्रश्न क्र. ५६ आहे. प्रश्न क्र. ५६ पासुन पुढचे प्रश्न पुढे घेवू.

प्रश्नोत्त्तराची वेळ संपली.

मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-माझा पॅनल क्र. ५ आहे. राणा ट्रेडींग येथे किती तरी अतिक्रमणे होत आहेत. पुढच्या बाजुने दुकाने बांधण्याचे काम सुरू झाले आहे. त्यांनी परवानगी घेतलेली नाही. ती सर्व बांधकामे बेकायदेशिर आहेत. पाणी येत नाही. टॅक्स घेतला जातो. लाईट नाही, टॅक्स घेतला जातो. काही माहित पडत नाही. कुठे कुठे पाया बांधला आहे. पत्रे पडले आहेत. म्हारळ गावापर्यंत बांधकामे चालु आहेत. त्याकडे कुणाचे लक्ष नाही. मेहरबानी करून याची दखल घेतली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-साहेब तेथे चालु स्थितीत जी बांधकामे आहेत.



मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा :-अशी बांधकामे बरीच आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-राणा ट्रेडींगच्या बाजुला जेवढी काही बांधकामे चालु आहेत. ती तोडली जावीत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आयत्त्यावेळीचे सहा विषय आहे त्यातील एक विषय आहे घनकचरा कृती आराखडा मंजुर करण्याबाबतचा दुसरा विषय आहे. उल्हासनगर-३

येथील नेहरू चौक ते प्रेमचंदानी रस्त्त्यावरील चौकास नाव देण्याबाबतचा व इतर असे एकुण सहा विषय आहेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आता या आयत्त्यावेळच्या विषयांबाबत आमचा विरोध आहे. आयत्त्यावेळचे विषय बरेच येत आहेत. म्हणुन आम्हास असे वाटते की ते नेहमीच सभा सुचनेवर आले पाहिजेत. मागील महासभेत सुध्दा आम्ही नेहमी असेच करत होतो. कारण की अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. व सात-सात विषय आयत्त्यावेळच्या विषयान्वये येत आहेत. हे असे झाले की रस्त्त्यापेक्षा फुटपाथ मोठा. सभा सूचनेवरील विषय कमी व आयत्त्यावेळचे विषय जास्त म्हणुन यास आमचा विरोध आहे. हे सर्व विषय नियमित सभा सुचनेवर आणले पाहिजेत. त्यासाठी योग्य ती वेळ पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>जे विषय आयत्त्यावेळच्या विषयान्वये आज येथे आणले गेले आहेत. ते स्विकृत करण्यासाठी प्रथम वाचले जावेत.त्यानुसार कोणकोणता विषय घेतला पाहिजे किंवा कोणता विषय नियमित सभा सुचनेवर घेतला पाहिजे हे तर जेव्हा चर्चा होईल तेव्हा निर्णय घेवू. पहिले आपण ते स्विकृत करून घेत आहात ना?

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>स्विकृत करून घेण्यासाठी अनुमती पाहिजे. त्यानंतर....

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>प्रथम आपण विषय वाचुन दाखवा त्यानंतर ठरवू या कोणकोणता विषय घ्यायचा. श्री. लाल पंजाबी साहेबांनी सातही विषयांबाबात हरकत घेतली त्याच बाबत मी बोलत आहे. मला वाटते की सातही विषय वाचुन दाखविले जावेत. त्यांनतर निर्णय घेवू. आपणांस जर सातही विषयाबांबत विरोध करायचा असेल तर आपण करा. जर एखादा विषय चांगला वाटला तर आपण त्याबाबत सहमती दर्शवा.

मा. सदस्य /सदस्या श्रीमती. मीना सोंडे, श्री. कन्हैयालाल नाथानी, श्रीमती. रेखा कृष्णानी ह्या / हे सभागृहातुन बाहेर पडल्या / पडले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>चांगले किंवा वाईट याचा प्रश्न नाही. मी आपणांस समजावु इच्छितो की हे विषय धोरणात्त्मक निर्णय घेण्याबाबतचे आहेत. आम्हाला असे वाटते की आयत्त्यावेळचा विषय जेव्हा काही अत्त्यंत तातडीची स्थिती असेल तेव्हा आला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री. लाल पंजाबी यांना मी सांगु इच्छितो की, विषय वाचुन दाखविल्यानंतर समजेल कारण की आयुक्तांनी ते विषय आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणले आहेत म्हणजे त्यामध्ये काहीतरी तातडीची बाब असेलच. आम्हाला वाटले की तातडीचा विषय आहे. तर तो या सभेत घेवू तातडीचे वाटले नाही तर ते नियमित सभा सूचनेवर घेवू. म्हणुन आपण आधी सातही विषय वाचा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आम्ही म्हणतो की, सातही विषयाबाबत आमचा विरोध आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय स्विकृत करायचे की नाही प्रथम याचा निर्णय घ्यायचा आहे. पहिला विषय आहे घनकचरा कृती आराखडयास मंजुरी देणे बाबतचा आहे. दुसरा विषय आहे नेहरू चौकापासुन प्रेमचंदानी चौकापर्यंतच्या रस्त्त्यास नाव देणे बाबत. पुज्य बच्चामल जी.एस. दुसरा विषयही नामकरणाबाबत आहे. उल्हासनगर स्टेशन जवळील उड्डाण पुलास संगित आचार्य मास्टर चंदर असे नाव देणे बाबत. त्यानंतरचा विषय आहे. पाणी पुरवठा खाजगीकरणाबाबतचा. यापुढील विषय आहे.



नामकरणाबाबतचा उल्हासनगर ३ येथील श्रीराम सिनेमा जवळील उड्डाण पुलास श्री. परसराम जिया उड्डाण पुल असे नाव देणे बाबत. व शेवटचा विषय आहे जकात नियमावलीमध्ये सुधारणा करणे बाबतचा. कारण की एक नियम असा आहे की, एसकॉटची जी फी घेतो ती वीस रूपये. २० रू. पेक्षा जास्त रक्कम

घेऊ शकत नाही. म्हणुन त्या नियमामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव दिलेला आहे. स्थायी समिती जो दर निश्चित करेल तेवढा दर लावला जाईल. व त्यामध्ये आणखी एक जकातीचा मुददा आहे. बाब क्र. ८६ मध्ये, अनुसूचीमध्ये ज्या कोणत्याही बाबी लिहिल्या नाहीत. त्यावर दीड टक्के जास्तीत जास्त या दराने जकात दर लावू शकतो. त्याबाबत त्यांनी प्रस्तावित केले आहे दिड टक्याच्या ऐवजी चार टक्के दर लावणे बाबत. हे प्रस्ताव स्विकृत करायचे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>उड्डाण पुलाबाबतचा जो प्रस्ताव आहे तो घेतला जावा. जे नाव देण्याबाबतचे प्रस्ताव आहेत ते घेतले जावेत. घनकचरा कृती आराखडयाबाबतचा प्रस्ताव घेतला जावा.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार:-</u>मा. सभागृह नेताजी.....

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मा. महापौर व सदन जकातीबाबतचा जो विषय आलेला आहे त्याबाबत मी बोलु इच्छितो की,

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौरजी, हा प्रस्ताव सभेच्या कामकाजात घेण्यासाठी स्विकृत केला आहे का, चर्चा चालु केली आहे?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>प्रशासनाच्या वतीने मी विंनती करू इच्छित आहे. कल्याण महापालिकेत या एसकॉटचा दर १००रू आहे. ठाण्यामध्ये ६० रू आहे. व आपल्या कडे २० रू. आहे. व त्यापेक्षा जास्त दर आपण लावू शकत नाही. जकात ही आपल्या उत्पन्नाची बाब आहे. तसेच बाब क्र. ८६ मध्ये ज्या बाबी आहेत. त्यांच्यावर वरील जकात दर जास्तीत जास्त ४ टक्के करायचा आहे. त्यामध्ये आम्ही दर निश्चित करत नाही. जकात नियमामध्ये ४ टक्के जास्तीत जास्त कर दर्शाविलेला आहे. स्थायी समिती त्यावर किती दर निश्चित करते....

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>४ टक्के जो दर करणार आहात. तो शहरवासियांवर ओझे टाकण्यासारखा आहे. तो प्रस्ताव आपण आयत्त्यावेळच्या विषयामध्ये का आणु इच्छिता. या प्रस्तावाबाबत आम्हा सर्वांना आपसात चर्चा करू दया. आम्हाला या प्रस्तावाबाबत स्पष्टीकरण दया त्यांनतर भलेही आपणांस पास करायचे आहे तर पास करा. परंतु चर्चा करण्यास वेळ दया. आयत्त्यावेळी मध्ये आणण्याचा हा काय विषय आहे का?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>श्री. भडकवाड साहेब, जकाती बाबत टेंडर काढलेले आहे. त्याचा कालावधी निश्चित आहे. आता तो कालावधी पुर्ण होईपर्यंत हा विषय मध्ये आणण्याचा काही प्रश्नच नव्हता. जकातीचे एसकॉट वाढविल्यामुळे महापालिकेला काही फायदा होणार नाही. ठेकेदाराने ठरलेल्या एसकॉटसह जकात दरासह ठेका घेतलेला आहे. त्यामुळे हा विषय मध्येच व आयत्त्यावेळी आणण्याचा काही प्रश्नच नाही.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मी पुन्हा सभागृहास कनव्हेंन्स करू इच्छितो. आताचा जो ठेकेदार आहे त्यास याचा फायदा होणार नाही. आता आम्ही जे प्रस्तावित केले आहे ते डिलिशनचा कॉज आहे त्यामध्ये आम्ही २० रू.चे १००



रू. करत नाही. जे पण करायचे आहे ते नंतर स्थायी समितीला करायचे आहे. ८६ क्रमांकाची बाबीचा जो विषय आहे त्यामध्य कमाल दर ४ टक्के आहे. आम्ही तो ४ टक्के प्रस्तावित करीत नाही. तो नियमामध्ये कमाल दर आहे. तो नियम येथे मंजुर झाल्यानंतर मंजुरीसाठी शासनाकडे जाईल. तोपर्यंत जुलै महिन्यापर्यंतचा जो कालावधी आहे तोपर्यंत आम्हास शासनाकडुन मंजुरी मिळेल. मी हे म्हणत नाही की पुढे जावून

आपण हे दर चार टक्के करा. ते दीड टक्के जरी केले तरी तो आपला निर्णय होईल. परंतु आम्ही कायदयामध्ये बदल करू इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, श्री. भडकवाड साहेब जे म्हणत आहेत त्याच्याशी मी सहमत आहे. जकातीच्या एसकॉटचे जे दर आहेत ते २० रू. वरून १०० रू. करणे हे स्थायी समितीचे, महासभेचे अधिकार आहेत. बाब क्र. ८६ वर दिड टक्के दर आहे तो ३ टक्के, करायचा की ४ टक्के करायचा याचा निर्णय घ्यायचा आहे. हे लोक नियमावलीमध्ये बदल करून शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन, उपविधीमध्ये बदल करून शासनाकडे पाठवू इच्छितात. आता ठेकेदाराला फायदा किंवा जनतेवर ओझे जुलै पर्यंत पडणार नाही. पुढल्या महिन्यात दर निश्चित होणार आहेत. मार्च मध्ये जे अंदाजपत्रक पारीत होईल त्यामध्ये प्रत्येक बाबीवर दर वाढतील. दर वाढवायचे आहेत की नाहीत की तेवढेच ठेवायचे आहेत याचा निर्णय स्थायी समिती व महासभेने घ्यायचा आहे. एसकूटचा २० ते १०० रू. पर्यंत लिमिट आहे. येथे मंजुर करून शासनास पाठवणार. व याची जी अंमलबजावणी होईल ती जुलै नंतर होईल. त्यामध्ये ही जर स्थायी समिती व महासभेने दर वाढविण्याची मंजुरी दिली तरच जर आम्ही सारखे ठेवले तर नाही वाढणार.

मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड व श्रीमती. प्रेमा खांडेकर हया सभागृहातुन बाहेर पडल्या /पडले.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>एसकॉटबाबत आमची हरकत नाही. एसकॉट जो कोणी भरेल तो आमचा शहरवासी भरणार नाही. शहरातुन बाहेर जाणारा भरेल त्यामुळे त्यास आमची हरकत नाही. आमची हरकत ८६ क्रमांकाच्या बाबी बाबत आहे. आपणांस जर जुलैमध्ये ते करायचे आहे तर जुलै साठी आता तातडीचे काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>शासनाकडे पाठवावे लागते.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>पुढच्या महिन्यात करू शकता ना? अशी काही तातडीची बाब नाही. चर्चा करण्याचा मुददा आहे. आपण चर्चा करून सर्वांना समजवा. त्यानंतर भलेही आपण घ्या ना. शहरवासियांवर ओझे वाढविण्याची बाब आहे. त्यासाठी सर्वांना समजावुन सांगा. जर आपण एसकॉटचा मुददा घेवू इच्छित असाल तर त्यामध्ये सुधारणा करून एसकॉटचा प्रस्ताव मंजुर करा. त्याबाबत कुणालाही हरकत नाही.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर, श्री. अंकुश म्हस्के, श्रीमती. जया साधवानी सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी हे सांगु इच्छितो की बाब क्र. ८६ बाबत उपविधीमध्ये सुधारणा करून शासनाकडे पाठवायचे आहे. त्यासाठी स्पष्ट तीन महिन्याची मुदत पाहिजे. श्री. भडकवाड साहेब आपणास सुचना हरकती मागविण्यास व शासनाकडे पाठविण्यास किती वेळ पाहिजे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>हा जो प्रस्ताव आहे तो आपल्या नियमामध्ये सुधारणा करण्यासाठी आहे. जोपर्यंत स्थायी समिती निश्चित करत नाही की तो दर दिड टक्के ठेवायचा आहे की वाढवायचा आहे. त्याचा कमाल दर जो आहे तो ४ टक्के आहे. उदया जर स्थायी समितीने म्हंटले की हा दर ०. २० करायचा आहे तर ते ही चालेल परंतु आजच्या तारखेला नियमात जे आहे त्यानुसार दिड टक्कयाच्या पुढे आम्ही जावू शकत नाही. म्हणुन नियमामध्ये बदल करायचा आहे. महासभेत मंजुर केल्यानंतर त्यावर सुचना हरकती मागविल्या जातील. त्यानंतर शासनाकडे जाईल. नंतर पुन्हा मंजुर होईल यासाठी वेळ जाईल. यामुळे शहरातील व्यापा-यांवर आजच्या तारखेला कोणतेही ओझे पडणार नाही. जुलैच्या नंतरही जर दिडच टक्के ठेवत असतील तर पुढेही अडचण येणार नाही. जो पर्यंत स्थायी समिती निश्चित करत नाही की याचे दर अमुक अमुक ऐवढे असले पाहिजे तोपर्यंत त्यात काही गैर नाही.



<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>श्री. भडकवाड साहेब आम्ही आपले सर्व म्हणणे समजतो. आपण म्हणता ही बाब एवढी तातडीची आहे तर ती आपण नियमित सभा सुचनेवर का ठेवली नाहीत. एक आठवडा अगोदर आपणांस याची तातडी वाटली नाही. आज एकदम तातडीची स्थिती कशी आली?

मा. महापौरः-याबाबत आयुक्त साहेब खुलासा करतील.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-आयत्त्यावेळच्या विषयान्वये प्रस्ताव आणुन एका विषयामध्ये आम्ही बदल करणार होतो. म्हणुन एकाच्या ऐवजी दोन्ही प्रस्ताव एकसाथ आणले आहेत.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-महापौर महोदया, हा जो आयत्त्यावेळचा विषय आपल्या समोर ठेवला आहे. त्याबाबत मी निवेदन करू इच्छितो. जेव्हा कुठला प्रस्ताव मा.महासभेसमोर मांडला जातो. तर त्यास पुरेशी वेळ देवून आणला पाहिजे. हि गोष्ट खरी आहे. परंतु प्रस्ताव तयार करण्याची जी पध्दत आहे ती नेहमी चालु असणारी प्रक्रिया असते. प्रशासनाचा असा कोणताही उददेश नसतो की, अचानक एखादा प्रस्ताव आणुन सभागृहाची मंजुरी घ्यावी.परंतु जेव्हा निकडीची स्थिती निर्माण होते तेव्हा तो प्रस्ताव सभागृहासमोर आणला जातो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आयुक्त साहेब, असा विषय जर नियमित सभा सूचनेवर एक आठवडयानंतर आणला तर कोणता फरक पडणार आहे?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-गोष्ट खरी आहे, कोणताही फरक पडत नाही. मी आता सन्माननिय सदस्यांना सांगितले की प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया नेहमी चालु असते. व जेव्हा प्रशासनाला वाटते, उदाहरणा दाखल एसकॉटचा विषयी मी सांगु इच्छितो. आमच्या येथे एसकॉटवर वीस रू. ची मर्यादा ठेवली आहे. आमचे जे उपविधा आहेत ते महाराष्ट्र शासनाकडे पाठविले जातात व
त्यानंतर शासन त्यास मंजुरी देते. त्याची प्रक्रिया अशी असते की, महासभा
जेव्हा उपविधी तयार करते. त्यावर सूचना हरकती मागविल्या जातात त्यामध्ये एक महिन्याचा कालावधी जातो त्यानंतर ते शासनाकडे पाठविले जातात. शासन न जाणे त्यास मंजुरी देण्यासाठी किती कालावधी घेईल. तर हा जो विषय आहे तो उत्त्पन्न वाढविण्यासंबंधीचा आहे. पुढे आमचा अर्थसंकल्प तयार करायचा आहे. यासाठी आम्ही कोणतेही दर अंतिम करत नाही. फक्त जी मर्यादा आहे ती काढुन टाकत आहोत. एसकॉट किती करायचा तो मुददा पुन्हा सभागृहासमोर येईल. किंवा स्थायी समितीपुढे जाईल.ही जी प्रक्रिया आहे ती खुपच दिर्घ स्वरूपाची असते.
मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-ही पहिली स्टेप आहे ना?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-अंतिम निर्णय सभागृहास घ्यावयाचा आहे. व घनकचरा कृती आराखडा जो आहे त्याबाबत मी सभागृहास विनंती करतो. याबाबत २०००मध्ये आम्ही एक ठराव पारीत केला होता ग्रीन कोल बाबत परंतु कित्त्येक कारणांमुळे या विषयास अंतिम स्वरूप प्राप्त झाले नाही. घनकचरा कृती आराखडयाबाबत आम्हाला लवकरात लवकर निर्णय घेणे अर्निवार्य राहिल. २०००च्या ठरावावर कार्यवाही झालेली नाही. म्हणुन याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे जे आदेश आहेत /मार्गदर्शक तत्त्वे आहेत.त्यानुसार हा फक्त धोरणात्त्मक निर्णयाचा प्रकार आहे. या निकडीमुळे तो आपल्या समोर आणण्यांत आला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-एक आठवडयानंतर नियमित सभा सूचनेवर हा प्रस्ताव आणला तर काय फरक पडणार आहे?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-तो निर्णय आपणांस घ्यायचा आहे. आपणांस जसे पाहिजे तसे आपण करू शकता. बाकी पाणी पुरवठयाबाबत च्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. त्याबाबत मी आपणांस विनंती करणार नाही. जर आपण घनकचरा कृती आराखडयाचा व एसकॉटचा प्रस्ताव घेतला तर बरे होईल.



मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी आयुक्त साहेबांच्या मताशी सहमत आहे. व पुन्हा एकदा सभागृहात खुलासा करू इच्छितो की जो बाब क्र. ८६बाबतचा प्रस्ताव आहे. व आता जो दर दिड टक्का आहे तो जुलै पर्यंत दिड टक्का राहिल. पुढच्या महिन्यामध्ये जे दर निश्चित होणार आहेत. अर्थसंकल्प येणार आहे. त्यावेळी सर्व पक्षाचे नेते मंडळी बसुन आम्ही निर्णय घेवू त्यांना जर वाटत असेल की दिड टक्के ठेवावे तर दिडचे दोन टक्के होणार नाही. हे फक्त शासनाकडे मंजुरीस पाठविण्यासाठी आहे. तसेच एसकॉटचा

जो मुददा आहे अंबरनाथ वरून जो माल कल्याण किंवा मुंबई कडे जातो. किंवा कल्याण वरून अंबरनाथकडे जो माल जातो त्यांचे वाहनास एसकॉट आकारण्याबाबत कुणाचीही हरकत नाही. तर हो जो मुददा आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच पाणी पुरवठा विभागाचे खाजगीकरण करण्याचा जो मुददा आहे तो पण महत्त्वाचा आहे. तो मंजुर केला पाहिजे. पाणी पुरवठा विभागाचे खाजगीकरण होत असेल तर खुपच चांगली गोष्ट आहे. आम्ही तो मुददा मंजुर केला पाहिजे. कुणी ठेकेदार पाणी पुरवठा विभागाचा ठेका घेत असेल तर आमची त्यास काही हरकत नाही. आमचा जो पाणी पुरवठा विभागाचा कर्मचारी वर्ग आहे तो आम्हास इतर ठिकाणी कामास लावता येईल. त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली होईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सर्व प्रस्ताव घेतले जावेत?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आमचा विरोध आहे?

मा. महापौरः- सदरचे आयत्त्यावेळचे ६ विषय कार्यसुचीवर घ्यायचे किंवा नाही याबाबत मी प्रस्ताव मतास टाकत आहे.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):- जे सन्माननिय सदस्य आयत्त्यावेळचे ६ विषय कार्यसुचीवर समाविष्ट करण्याच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात मतेः-

१ श्रीमती. मोकल सिमा चंदाराम
२. श्री. पुरस्वानी जमनादास
३. श्री. रूपचंदानी बच्चाराम
४. श्री. असरोंडकर राज
५ श्री. सोनावणे नथु
६. श्री. गायकवाड दिलीप
७ श्रीमती. बामणकर नंदिनी
८ श्रीमती. माने किरण
९ श्री. चव्हाण रमेश
१०. श्री. बोडारे धनंजय
११ श्री. पाटील विश्वनाथ
१२ श्री. चौधरी राजेंद
१३. श्रीमती. जयश्री. सुर्वे

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने मतेः-

१. श्री. टेकचंदानी राजु
२. श्रीमती. रामचंदानी भावना
३ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
५ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
६ .श्री. ऐडके गणपत
७ श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
८ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल



९. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१० श्री. पवार नाना आनंदा
११ श्रीमती. आहुजा नीता
१२ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१३ श्री. शांताराम निकम
१४ श्री. ठाकुर विनोद लालसिंग

१५ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१६ .श्रीमती. वनवारी मोना अशोक
१७ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८. श्री. जेसवानी सतरामदास
१९ .श्री. लुंड गोविंदराम
२० श्रीमती. खिलनानी भावना रवि
२१ श्री. खेमाणी दर्शनासिंग देवेंद्रसिंग
२२ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२३ श्री. पमनानी ईश्वर
२४ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२५ श्री. साधवानी मनोज
२६ श्रीमती. भठिजा कोमल
२७ श्री. रामरख्यानी मोहनदास
२८ श्री. होशियारसिंग लबाना
२९. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३०. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३१ .श्रीमती. रिझवानी सुजाता
३२ श्रीमती. भारती पहलाज
३३. श्रीमती. दासानी मिनु
३४ श्री. जाधव सुरेश
३५ .श्री. जाधव प्रशांत
३६ श्री. प्रमोद टाले
३७ श्री. साधवानी मोहन
३८ श्री. भालेराव गौतम
३९ .श्रीमती. वसीटा बेबी
४० श्री. बेहरानी मोहन
४१ .श्रीमती. मालती करोतिया राधाचरण
४२ श्री. बेहरानी ठाकुरदास

<u>मा. महापौर :-</u> सदरच्या प्रस्तावाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

प्रशासनातर्फे आजच्या सभेच्या कार्यसुचीवर पुढील सहा विषय समाविष्ट करण्या करिता सूचना करण्यात आलेली आहे. आपल्या कार्यसूचीवरील विषय क्र. ११ नंतर खालील विषय आजच्या कामकाजात समावेश करणेस येणेप्रमाणे.

१. महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याचे व्यवस्थापन घनकचराकृती आराखडयास मंजुरी देणे बाबत.
२. उल्हासनगर ३ येथील नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी रस्त्त्यावरील मातृभुमी सॉ मिल समोरील चौकास व या चौकापासुन बगिच्या समोरील पप्पु सोसायटीकडे जाणा-या अंतर्गत रस्त्त्यास पूज्य श्री.बच्चनमल जी. एस. मार्ग असे नाव देणे बाबत.
३. उल्हासनगर स्टेशन जवळील उड्डाण पुलास संगिताचार्य मास्तर चंदन उड्डाण पुल असे नाव देणे बाबत.
४. महानगरपालिका पाणीपुरवठा व मलनि:स्सारण क्षेत्रामध्ये कार्यक्षमता आणि गुंतवणुक वाढविणेसाठी खाजगी संस्थेच्या सहभागाबाबत.
५. उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमावलीत फेरफार करणे बाबत.



६. उल्हासनगर येथील श्रीराम सिनेमा जवळील उड्डाण पुलास श्री. परसराम जिया उड्डाण पुल असे नाव देणे बाबत.

करिता वरील सहा विषय कार्यसूचीवर आयत्त्यावेळचे विषय म्हणुन सामावुन घेणेस प्रस्तावित.

ही महासभा वरील सहा विषय आयत्त्यावेळचे विषय म्हणुन कार्यसूचीवर सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**बहुसंख्येने**

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढल्या विषयाकडे जाण्याअगोदर एक स्थगन प्रस्ताव आला आहे त्याचे सुचक आहेत श्री. किशोर वनवारी, श्री. बच्चाराम रूपचंदानी, श्री. ठाकुर बेहरानी व अनुमोदक आहेत श्री. लाल पंजाबी, श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रमोद टाले.

सूचना ही आहे की, उल्हासनगर रेल्वे स्टेशनवर रिझर्व्हेशन काऊंटर उपलब्ध करण्यासाठी या प्रस्तावास मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. व आपणां सर्वांची अनुमती असेल तर तो प्रस्ताव चर्चेस घेतला जाईल. २/३ बहुमताच्या आधारावर. ठिक आहे. घेतला जावा ना?

मा. महापौरः- आपल्या सर्वानुमते सदरचा स्थगन प्रस्ताव स्विकृत करुन कार्यसुचीवरील इतर विषय सोडुन हया स्थगन प्रस्तावावर अग्रक्रमाने चर्चा करण्यास घेत आहे. सुचकाने चर्चा करावी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-सर्व राजकीय पक्षांनी उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे तिकीट आरक्षण केंन्द रेल्वेच्या जागेवर उपलब्ध व्हावे अशी धारणा झाली आहे म्हणुन त्यामुळे मी पुढील प्रमाणे प्रस्ताव मांडत आहे.

आज दिनांक २०.१.२००३च्या सभेच्या कामकाजाच्या क्रमातील कामाची इतर कोणतीही बाब विचारार्थ घेण्यापुर्वी शहरात खालील निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा घडवून आणण्याच्या प्रयोजनार्थ आपल्या संमतीने महासभेचे कामकाज स्थगित करणेसाठीचा प्रस्ताव मांडत आहे.

१) उल्हासनगर रेल्वेस्टेशन येथील पॅसेंजर रिझरव्हेशन ऑफीस येथे संगणकीकरण करणेबाबत चर्चा करणेसाठी.

सुचकांची नावे :-श्री. किशोर वनवारी
श्री. बी. बी. रूपचंदानी
श्री. ठाकुर बेहरानी

अनुमोदकांची नावेः-श्री. लाल पंजाबी
श्री. रमेश चव्हाण
श्री. प्रमोद टाले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-मी, श्री. किशोर वनवारी यांचे म्हणण्यास सहमत आहे म्हणुन मी व माझ्यासह इतर अनुमोदक या प्रस्तावाचे अनुमोदन करित आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-स्थगन प्रस्ताव जो आम्ही दिला आहे. त्यावर आता चर्चा चालु होईल का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आपणांस त्यावर काय कार्यवाही पाहिजे?



मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे पुर्वीचे जे बुकींग कार्यालय बंद पडलेले आहे. त्यामध्येच बुकींग कार्यालय सुरू झाले पाहिजे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-व आपण जमिन देणार नाहीत?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-महापालिकेने त्यांना का जमिन दयायची? तेथे जे कार्यालय पडुन आहे. तेथेच बुकींग कार्यालय चालु केले पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-या व्यतिरिक्त आणखी एक गोष्ट मी सांगु इच्छितो. आम्ही या मताशी सहमत आहोत की जेथे बुकींग कार्यालय होते तेथेच बुकींग कार्यालय सुरू झाले पाहिजे. रेल्वे कडे जागा आहे. सदस्यांच्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो की, रेल्वेकडे २४ तास सलग विद्युत पुरवठा आहे. तेथेच बुकींग कार्यालय झाले तर पुढे कधी अशी वेळ येणार नाही की रिझर्व्हेशन बंद आहे अमुक आहे तमुक आहे. तर हा ठराव सर्वानुमते समंत केला पाहिजे.

मा. महापौर:-सदर स्थगन प्रस्तावा अंती आपल्या सर्वांच्या समंतीने पूढील प्रमाणे प्रस्ताव पारीत करण्यांत येत आहे.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
श्री. बच्चाराम रूपचंदानी
श्री. ठाकुर बेहरानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण
श्री. लाल पंजाबी
श्री. प्रमोद टाले

प्रस्ताव

उल्हासनगर विठ्ठलवाडी रेल्वे पॅसेंजर असोसिएशन व शहरातील बहुसंख्य नागरिकांनी उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे कॉम्प्युटराइजड रिझर्व्हेशन व्यवस्था उपलब्ध होणेस वेळोवेळी जोरदार मागणी केलेली आहे. उल्हासनगर शहर हे औद्योगिक वसाहतीचे शहर असून धंदे व व्यवसायासाठी रेल्वे मार्गाने सतत ये जा होत असते. तसेच परगावाहून देखील व्यवसाय प्रयोजनार्थ प्रवाशांची ये जा या मार्गाने होत असून रेल्वे तिकीटांचा जास्तीत जास्त खप होत असलेले हे रेल्वे स्थान आहे. त्याअर्थी विषयांकीत प्रकरणी मुख्य व्यवस्थापक वाणिज्य, मध्य रेल्वे, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र. सीसीआरएस/बीबीडबलुपी/२००२-०३ दि. ९.१२.२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत एकूण क्षेत्र ११५६ चौफुट जागा विद्युत पुरवठासह विनामुल्य उपलब्ध करून देणेबाबत मागणी केलेली आहे, उल्हासनगर महानगरपालिकेकडे स्वतःची मालकीची जागा उपलब्ध नसून ती सुविधा रेल्वे विभागास पुरविणे शक्य नाही. म्हणुन या विषयी चर्चेअंती योग्य निर्णयासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ८४ दि. २०.१.२००३

हि महासभा वरील परिस्थिती विचारात घेता रेल्वे विभागास उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे त्यांच्या स्वजागेवर संगणीकृत तिकीट आरक्षण केंद्र उपलब्ध करून देणेसाठी जोरदार मागणी करीत आहे.

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा. सचिव:-याशिवाय एक लक्षवेधी सुध्दा आहे. २६७ सफाई कामगारांची पदे भरण्यासाठी लक्षवेधी दिली गेली आहे. तिचे सुचक आहेत श्री. किशोर वनवारी व अनुमोदक आहेत श्री. सतरामदास जेसवानी यास सुध्दा मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. याशिवाय आयत्त्यावेळीचे सहा-सात विषय आहेत. त्यातील एक विषय आहे.

घनकचरा कृती आराखडा मंजुर करण्याबाबत. दुसरा विषय आहे. उल्हासनगर ३ येथील नेहरू चौक ते प्रेमचंदानी रस्त्यावरील चौकास नामकरण देण्याबाबत.

मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड हे सभागृहात परत आले.

<u>मा. सचिवः-</u>लक्षवेधी ?

<u>लक्षवेधी</u>

उपरोक्त विषयान्वये आपणांस लक्षवेधणेसाठी हे लक्षेवधी निवेदन करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेत रोजंदारीवर काम करणारे एकुण २४७ सफाई कर्मचारी होते त्यांना कमी करणेत आल्यानंतर त्यांनी मा. न्यायालयाकडे दाद मागितली असता त्यांना कामावर घेणेसाठी म्हणुन मा. न्यायालयाने महापालिकेस दिले असताना देखील आजपर्यंत त्यांची भरती केली नाही. हा न्यायालयाचा अपमान आहे. कारण सद्या लोकसंख्येप्रमाणे ज्यादा सफाई कामगारांची आवश्यकता आहे. यावर लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी विनंती.

सुचक :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदक :-श्री. सतरामदास जेसवानी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, अतिरिक्त आयुक्त साहेब इथे जी आम्ही लक्षवेधी आणली आहे तीचा सुचक मी आहे व अनुमोदक आमचे श्री. सतरामदास जेसवानी आहेत. त्यामध्ये जो आकडा लिहिला गेला आहे तो चुकीचा लिहिला गेला आहे. आम्ही मागणी केली आहे की जे २६७ लोक आहेत ज्यांचे बाबत कामगार न्यायालयाचा सुध्दा आदेश आहे. त्यांना कायम करून येथे महापालिकेत सफाई कामगार म्हणुन घेतले जावे. आज दोन वर्ष झाली कोर्टाचा आदेश येवून पडला आहे. परंतु आपसामध्ये काही लोक भांडत आहेत. तो म्हणत आहे माझी माणसे सामावुन घ्या, तो म्हणतो माझी माणसे सामावुन घ्या. हि गोष्ट लक्षात न घेता. जी कामगार न्यायालयात लिस्ट दिली होती व जे युनियन वाले कामगार न्यायालयात गेले होते. त्यामधील जे लोक सध्या आहेत. त्यातील बरेचसे लोक मृत्यु पावले आहेत. काही लोक दुसरीकडे कायम सेवेत लागले आहेत. अशा लोकांची नावे कमी करून जे २६७ लोक आहेत त्यापैकी दिडशे मिळोत किंवा २०० मिळोत अशा लोकांना महापालिकेत भरती करून ज्या ज्या सदस्यांच्या पॅनलमध्ये सफाई कामगार कमी आहेत तेथे किंवा श्री. आर. के. सोनवणे साहेब जसे म्हणत आहेत की जे मुख्य रस्ते आहेत ते खुप चांगले असले पाहिजेत. त्याचबरोबर आमच्या गल्ल्या व नालेही स्वच्छ असले पाहिजेत. अशी आमची त्यांना विनंती आहे. जे नवी भरती करू त्याच लोकांना रस्त्यावर कामास लावले जाईल. जे पुर्वीचे कामगार आहेत त्यांच्याकामामध्ये कुठलाही व्यत्यय आणला जाणार नाही कारण की आता हे काम सुखरूपपणे चालु आहे. कुठे कुठे ओरड आहे त्याचे कारण आहे त्याठिकाणी सफाई कामगार कमी आहेत. अशा नगरसेवकांच्या प्रभागांना प्राधान्य दिले जावे. व हे सफाई कामगार लवकरात लवकर भरती केले जावेत. भलेही आपण त्यांच्याकडुन हमी पत्र लिहुन घ्या. त्यांच्याबरोबर समझोता करा की त्यांना दहा वर्षापर्यंत फक्त पगार मिळेल पाचव्या वेतन आयोगानुसार पगार मिळणार नाही. किंवा आपणांस बोनस मिळणार नाही. किंवा आपणांस ॲडव्हान्स मिळणार नाही. जर अशा प्रकारचा करार, महापालिकेची आर्थिक परिस्थीती लक्षात घेवून केला तर , अगोदरच आमच्याकडे सफाई कामगार कमी आहेत. महानगरपालिकेत खाडाबदली सफाई कामगार सुध्दा नाहीत. आज आमच्या पॅनलमध्ये अशी परिस्थती आहे की प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात जर २०-२० सफाई कामगार असतील तर त्यामधील दहा लोक गैरहजर असतात. ५० टक्के लोक दररोज गैरहजर असतात. खाडाबदलीचे कामगारही नाहीत.



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आयुक्तांच्या जागी अतिरिक्त आयुक्त बसले आहेत. सफाई कामगार दिडशे, पावणे दोनशे भरती करावे. ते लवकरात लवकर करावे कारण की शहरात साफ सफाई समस्या आहे. त्यांची भरती केल्याने ही समस्या सुटेल.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त / प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया व सर्व सन्माननिय सदस्य या लक्षवेधीवर निवेदन करताना मला सदनाला आधी हे सांगायचे आहे की, महापालिकेची जी लोकसंख्या आहे ती २००१च्या जनगणनेनुसार ४. ७० लाख आहे. आणि क्षेत्रफळ आहे १३ चौ. की. मी. आता आमच्याकडे जे आरोग्य विभागात काम करत आहेत त्यांची कर्मचारी संख्या आहे ११९०. लोकसंख्येनुसार व वर्ल्ड वेल्थ ऑरगनायझेशनचे जे नॉमर्स आहेत त्या हिशोबाने पाहिले गेले तर एक हजार लोकसंख्येसाठी २. ५ असे सफाई कामगार पाहिजे. ४. ७० लोकसंख्येनुसार पाहिले तर ११९० लोक पुरेसे आहेत. दुसरे जर नॉमर्स पाहिले तर एकुण एरिया १३०० हेक्टर आहे. त्यासाठी पाहिले गेले तर त्या हिशोबाने देखिल ११९० लोक सफाई कामगार पुरेसे आहेत. कारण की जर २६७ लोकांची जर भरती करायची आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात कमीत कमी दोन करोड रू. ची तरतुद करावी लागेल. २६७ लोक जे घ्यायचे आहेत त्यांच्याकडे कोर्टाचे आदेश आहेत असे सांगितले आहे. त्यात २६७ ठराविक लोक आहेत असे काही आदेश नाही. त्यात ४९३३ लोक ज्यांची सेवाजेष्ठता यादी तपासुन त्याचे परिक्षण करून ते २६७ कोण आहेत ते पाहायचे आहे त्यात वेळ जाईल. कोर्टाचे ठराविक आदेश असे देखिल राहिल की २६७ लोकांनाच घेतले जावेत. आणि जरूरत नाही तरी घेतले जावे असे कोर्टाचे ठराविक आदेश नाहीत. मला वाटते आधी कोर्टाच्या सर्व आदेशांचे लिगल ॲसपेक्टस ते वेरीफाय करावे लागतील. जरूरत रिॲसेस करावी लागेल. जर गरज असेल तर त्यानंतर त्यावर निर्णय घेतला जावा. फक्त काही लोक कोर्टात गेले आणि ते म्हणत आहेत आम्हाला कामावर परत घ्या. त्याने हा निर्णय घाईचा होईल. घाईघाईत निर्णय घेतला तर आजची जी महापालिकेची आर्थीक परिस्थिती आहे त्यावर अजुन ओझे टाकणे तर ते पण योग्य नाही. आणि आताची जी कर्मचारी संख्या आहे. त्यातुनच जर काम होत असेल आणि मला खात्री आहे करू शकु. तो आधी प्रयत्न केला पाहिजे. जे ११९० सफाई कामगार आहेत त्यांच्याकडुनच काम करून घेतले पाहिजेत. त्यात २५ ते ३० टक्के गैरहजेरीचे प्रमाण असते. ती गैरहजेरी कमी व्हावी म्हणुन कडक कारवाई उपाय करत आहोत. तरीही जर गैरहजेरी कमी नाही झाली तर खाडाबदली विषयी विचार केला जावू शकतो परंतु नविन भरती करून महापालिकेवर अजुन आर्थिक ओझे टाकणे मला ठिक वाटत नाही. आधी आपण लिगल ॲसपेक्टस जे आहेत. ते आधी वेरीफाय करू. विभाग वेरीफाय करू. त्यांनतरच त्याबाबत विचार होवू शकतो मला असे वाटते की सदनाने ही गोष्ट लक्षात घेवून आमच्या सभागृहनेत्त्यांनी जी लक्षवेधी आणली आहे ती त्यांनी परत घ्यावी.

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता हे सायं ६. ०५ सभागृहात उपस्थित झाले व श्री. कन्हैयालाल नाथानी हे सायंकाळी ६. ०५ सभागृहात परत आले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, लक्षवेधीचा जो मुददा असतो तो दोन तास आधी दयावा लागतो. परंतु मी ही लक्षवेधी महासभेची कार्यसूची निघण्याआधीच दिली आहे. म्हणजे आठ-दहा दिवस त्यांना अभ्यास करण्यासाठी मी दिले. माझ्यामते आठ-दहा दिवस अभ्यास करणे किंवा कोर्टाचे आदेश काय आहेत किंवा किती लोक भरती करू शकतो मला वाटते हा कालावधी भरपुर होता. कारण की लक्षवेधी कुणी कुणी दोन वाजता देतात. दोन तास आधी दिली तरी चालते परंतु मी कार्यसुची निघण्याआधी दिली आहे. सभागृहात जितके पण सदस्य बसले आहेत. त्या सर्वांकडे कार्यसूची बरोबर लक्षवेधी देखिल पोहोचली आहे. म्हणजे १२ तारखेला कार्यसूची निघाली आहे. आठ-दहा दिवस भरपुर आहेत. त्याकरिता आयुक्तांनी त्यावर अभ्यास करायला पाहिजे होता. आज इथे उल्हासनगर महानगरपालिकेत त्यांनी सांगितले की भरपुर कर्मचारी वर्ग आहे असे



नाही. आमचे बरेचसे सदस्य इथे सदनात बसले आहेत ते ओरडतात आमच्याकडे सफाई कामगार अपुरे आहेत. व त्यांचे काम होत नाही. त्यांनतर जे गैरहजर असतात त्या कर्मचा-यांचे २५ ते ३० टक्के प्रमाण आहे. मला असे वाटते

माझ्या पॅनलमध्ये मी एक ते दिड महिन्यापासुन अभ्यास करत आहे. आमच्या पुर्ण पॅनलमध्ये ५८ लोक आहेत त्यापैकी २०, १९,२२ रोज गैरहजर असतात. हे जे ४० ते ५० टक्के गैरहजर असतात. दुपारी कोणी नसते असे खुपसे मा. सदस्य आहेत ज्यांनी दोन-दोन, चार-चार सफाई कामगार कुणी पाच, कुणी दहा असे स्वखर्चाने ठेवले आहेत. आज महापालिकेची परिस्थिती ही आहे की, कोणत्त्याही प्रभागात स्पेअरमध्ये इतके कर्मचारी नसतात की ड्रेन साफ करू शकेल. म्हणुन खुपसे सदस्य स्वखर्चाने सफाई कामगार ठेवून सफाई करून घेतात. तर मला वाटते ही सदनाची भावना आहे की जे २६७ लोक आहेत. मी स्पष्टपणे म्हंटले की जरूरी नाही की तुम्ही २६७ भरती करा. दिडशे, पावणे दोनशे, सव्वाशे, शंभर भरती कराल तेव्हा महासभेत अर्थसंकल्पाच्या वेळी हा मुद्दा येईल. तर तशी तरतुद ठेवू. परंतु जी उल्हासनगर शहरात सफाई आहे. रोज रोड, गल्या साफ झाल्या पाहिजेत. ड्रेन्स पण झाले पाहिजे, शौचालये पण साफ झाली पाहिजे. पुर्ण शहरात सफाई झाली पाहिजे. मी श्री. आर. के. सोनवणे यांना एका गोष्टीचा खुलासा करू इच्छितो. ते नवे असल्याने त्यांना बहुतेक माहित नाही. कल्याणमध्ये सगळया ठिकाणी गल्लीमध्ये रोडच रोड आहे. आपण सी. सी. पॅसेज किंवा ड्रेन पाहिलेच नसेल. तेथे भुयारी गटारे आहेत. उल्हासनगर शहरात फिरलात तर तुम्हाला दिसेल की रोड पेक्षा हजार पटीने जास्त सी सी पॅसेज आहेत, गल्ल्या आहेत, गटारे आहेत. हे जे उल्हासनगर शहर आहे त्यात जी बॅरेक पध्दत आहे. मिलिटरी कॅम्पचे क्षेत्र असल्यामुळे या शहराचा नकाशा कल्याण शहरासारखा नाही . इकडे बरेचसे सी. सी. पॅसेज आहेत, ड्रेनस् आहेत ज्यांची रोज सफाई करावी लागते. आणि जनता साफ सफाई दिवाबत्ती त्यासाठीच कर भरते. त्यांना ती सुविधा मिळाली पाहिजे. ही गोष्ट लक्षात घेवून मी स्पष्टपणे म्हंटले. तुम्ही जितके पण कर्मचारी संख्या फेब्रुवारी मध्ये आमच्या समोर आणाल. आम्ही महासभेत त्यासाठी तरतुद ठेवू. एक करोड दिड करोड जी काही असेल ते सर्व पास करू. परंतु शहरात जी अस्वच्छता आहे त्यासाठी सफाई कामगारांची भरती होणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-</u>सुटटीच्या दिवशी सर्व गल्ली, रस्त्यांवर कचरा पडलेला दिसतो. खास करून रविवारी सगळयांना सुटटी दिली जाते. त्यामुळे इतके रस्ते खराब असतात. त्यासाठी आम्हाला कामगार पाहिजे. दोन दिवस सुटटी असेल तर दोन दिवस येत नाहीत. म्हणुन सुटटीच्या दिवशी आम्हाला कुणीतरी सफाई कामगार हवा आहे.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब शहरात म्हाडा तर्फे राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत कमीत ७५ शौचालये बनविली जात आहेत. लवकरच ते काम सुरू होणार आहे. आधीच शहरात जी शौचालये बनविली आहेत. त्यांची साफसफाई होत नाही तर पुढे आधुनिकीकरणाने शौचालये इथे बनणार आहेत. तर त्याच्या देखभाल व्यवस्थेसाठी आपण काय बंदोबस्त करणार जरा आयुक्तांनी याचा खुलासा करावा. मला वाटते माझा सल्ला देखिल आहे की देखभाल दुरूस्तीसाठी एखादया खाजगी कंपनीला ठेका देण्यात यावा. तर ती योजना यशस्वी ठरेल नाही तर हा पुर्ण खर्च जो सरकार करते. एक करोड सव्वीस लाख रू. म्हाडा तर्फे मिळत आहेत. व एक करोड १४ लाख रू. शौचालयास वाल्मिकी आंबेडकर योजनेतर्फे दिले जात आहेत. ही चांगली संधी वाया नाही गेली पाहिजे. यासाठी आयुक्तांनी जरा खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>मा. महापौर, आयुक्तांनी खुलासा केला की सफाई कामगार बरोबर आहेत. जरूर आहे तेवढा कर्मचारी वर्ग आहे. ते ठिक



आहे. माझ्या पॅनलमध्ये गौतम बुध्द नगर, साईबाबा कॉलनी, गुरूतेगबहादुरनगर , महेंद्र नगर येते. त्यात सफाई कामगार विषयी मी महासभेत एक प्रश्न देखिल टाकला आहे त्याचे उत्तर आले आहे की त्या चारही नगरामध्ये फक्त एक महिला

सफाई कामगार आहे ती पण अर्धा दिवस काम करते. मी खुपदा स्वच्छता निरिक्षक खटावकर यांना सांगितले. बेजबाबदार स्वच्छता निरिक्षक आहेत. मी त्याविषयी तुम्हाला सांगितले होते तुम्ही म्हणालात मी त्याच्याकडुन बरोबर काम करून घेतो आम्हाला तुमच्यावर भरोसा आहे तुम्ही त्यांच्याकडुन काम करून घ्याल. त्या चारही नगरात फक्त एकच बाई काम करते. पुर्ण झोपडपटटी क्षेत्र आहे त्यात इतकी अडचण आहे सफाईची मी खाजगी दोन-तीन माणसे ठेवली आहेत ते काम करतात. त्याशिवाय माझ्या प्रभागाला लागुन श्री. शाम रोहडा यांचा प्रभाग आहे. जुन्या प्रभागानुसार आम्हाला सफाई कामगार दिले गेले होते. कधी त्याचे सफाई कामगार त्याच्याकडे येतात कधी माझे त्याच्याकडे जातात. श्री. श्याम रोहडा यांचे कामगार शव उचलायला जातात. चार लोक रोज जातात सेंट्रल हॉस्पीटलमध्ये त्यामुळे चार कर्मचारी अजून कमी पडतात. रोडची सफाई तर आमची होतच नाही. म्हणून आमचे निवेदन आहे की, जे २६७ सफाई कामगार आहेत, ते जर घेतले तर आम्हांला तीन-चार सफाई कामगार जास्तीचे मिळतील. आमच्या प्रभागात सफाईत सुधारणा होईल.

<u>मा. महापौरः-</u> मी सर्व, सदस्यांचे म्हणणे ऐकले मला पण असे जाणवले की, कारण की, शहरात खरोखरच अस्वच्छता आहे. मी आयुक्तांना सांगते की, लवकरात लवकर दोनशे लोक बरेच दिवस काम करून नंतर बरेच वर्ष घरात बसले आहे. त्यांनापण काहीतरी आधार दिला पाहिजे. त्यांना लवकरात लवकर कामावर घेतले जावे असे निर्देश आयुक्तांना देते.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u> मा. महापौरांना धन्यवाद देतो, त्यांनी आयुक्तांना निर्देश दिले त्यांना एकदा नाही करोडदा धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> सन्माननिय महापौरजी, अतिरिक्त आयुक्त साहेब, व सद्याचे आयुक्त साहेब, आपल्याकडे पूर्वी प्रभागनिहाय सर्व कामकाज चालत होते. परंतु आता पॅनल पध्दत झाल्यामुळे आपल्याला आमची विनंती आहे की, आपण सफाई कामगार देखील पॅनलवाईज दया. जेणेकरुन एक दुस-या नगरसेवकांचे आपसात भांडण होऊ नये याची पण काळजी घ्यावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणीः-</u> मा. महापौर, सर्वात आधी मी, अतिरिक्त आयुक्तांचे अभिनंदन करतो. त्यांनी माझ्या प्रभागात जे कामगार बरोबर काम करत नव्हते. त्यांना निलंबित केले. मला वाटते असेच अनुशासन केले तर डिसीप्लेन मेंटेन होईल. त्यासाठी वेळोवेळी उचित कार्यवाही केलीच पाहिजे. कारण की, असे पाहिले गेले आहे की, कामगार नुसते सही करून निघून जातात. काम करत नाही. ऑटो रिक्षा चालवतात. गैरहजर जास्त असतात, जर अशी योग्य कारवाई केली तर , कामगारांच्या मनात अनुशासनाची भिती निर्माण होईल. ते गरजेचे आहे. सेनिटेशनचे जे काम आहे त्यात सुधारणा होऊ शकते. मी अतिरिक्त आयुक्तांना अभिनंदना सोबत असापण एक सुझाव देतो की, जे पण आपल्याकडे हजार-अकराशे लोक आहेत. त्यातुन ज्या कामगारांची काम करण्याची अजिबात इच्छा नाही, किंवा रिक्षा चालवतात. खाजगी कामे करतात. त्या लोकांना योग्य कारवाई करावी. व जे लोक काम करण्यास तयार आहेत, जे कोर्टाचे आदेश घेऊन आले आहेत, त्यांच्या मनात काम करण्याची भावना आहे, अशा लोकांना संधी दयावी. जेणेकरुन शहरात सफाई चांगली होईल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, जसे की महापौरांनी सांगितले की, सफाई कामगार गैरहजर असतात, त्यांच्याविषयी



खाडाबदली कामगार ठेवण्याचा विचार करत आहे. मला वाटते हे खुप-खुप आवश्यक आहे. खाडाबदली पध्दत जर लागु झाली तर महापालिकेस जे नुकसान होत आहे, ते पण होणार नाही, बचत होईल. कारण की, जे कर्मचारी खाडाबदली ठेऊ त्यांचा पगार देखील कमी असेल, कुणा प्रभागात दहा कामगार

कुणाकडे पंधरा, त्यातून दोनतीन जण गैरहजर असतात. त्यावेळी आमच्याकडे कुणी सफाई कामगार नसतो. जे लोक भरती कराल त्याबरोबर खाडाबदली पध्दत देखील लागू केली तर खुप चांगले होईल.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:-मा. महापौरजी, खाडा बदली विषयी जे बोलत आहात. जर त्यांना ठेवले तर ते परत कोर्टात जावून आदेश आणतील. मग त्यांना पण पुन्हा कामावर ठेवावे लागेल.
मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-नाला सफाईसाठी जे लोक ठेवले ते कोर्टात जावू शकतात....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी श्री. जमनादास पुरस्वानी यांना सांगु इच्छितो की, मा महापौरांनी रूलिंग दिले आहे. त्यानंतर बोलणे योग्य नाही.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-मा. आयुक्त साहेब, मी नविन तयार होणा-या शौचालयाविषयी सांगु इच्छितो. मेहरबानी करून त्याविषयी काय मार्ग काढता ते सांगा.

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के व श्री. अशोक ठाकुर हे सभागृहात परत आले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मेहरबानी करून कायम स्वरूपी कामग्रार घेतले जावेत. मी म्हंटले २६७ भरती करावे. त्यांनतर श्री. खेमाणी बोलले, नंतर श्री. जमनादास पुरस्वानी यांनी खाडाबदली विषयी म्हंटले. महापौरांनी २६७ पदे भरण्याविषयी रूलिंग दिले आहे. खाडाबदली भरतीने नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-२०० कामगार भरती विषयी आम्ही पण सांगितले पण खाडाबदली कामगार ठेवा.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले जावे. शौचालये बांधण्यापुर्वीच त्याविषयी विचार केला तर ते चांगले राहतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-अतिरिक्त आयुक्त साहेब तुमचा अभिप्राय काय याबाबत?

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-मी एक महत्त्वाचा मुददा मांडला आहे त्याकडे लक्ष दिले जात नाही. करोडो रूपये सरकारचे वाया जात आहेत त्यासाठी तुम्ही उत्तर दया. याची काय व्यवस्था करणार तुम्ही?
मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आयुक्त साहेब, तुम्ही २०० लोक भरती करू शकतात का?तुमचा अभिप्राय काय याबाबत?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-महापौरांनी जे आदेश दिले त्याची अंमलबजावणी होणार का?
मा. महापौर:-मी रूलिंग दिले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-महापौरांनी रूलिंग दिल्यावर बोलले नाही पाहिजे. मेहरबानी करून रूलिंग दिल्यानंतर बोलु नये.

मा. महापौर:-रूलिंग तर मी दिले आहे ना?



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-लवकरात लवकर घेतले पाहिजे.

मा. महापौर:-रूलिंग तर मी दिले आहे ना? आपण ऐकले नाही का? लवकरात लवकर बोलले, ऐकु नाही आले?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-तुमचे रुलिंग काही ऐकले जाते का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-यापुर्वी पण तुम्ही खुप कामांना रुलिंग दिले त्याची अंमलबजावणी झाली का?

मा.महापौरः-नाही झाले तर आता होईल.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-कृपया शांती ठेवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-नुसती आश्वासने देवून सभागृहाची दिशाभुल करू नका.

मा. महापौरः-आम्ही रुलिंग दिले आहे होईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-जे शक्य आहे त्यावरच रुलिंग दया. रुलिंग देताना विचारपुर्वक रुलिंग्र दया.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-या सभेआधी तुम्ही श्री. सोनवणे साहेबांना आदेश दिले होते काम झाले पाहिजे. तुम्ही १५ दिवसापुर्वी आश्वासन दिले होते अतिक्रमण हटविले जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-पंधरा दिवसाचे एक महिना झाले काम झाले का?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-अजुन पर्यंत त्यावर अंमलबजावणी झाली का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-रस्त्त्यावरील गाडी हटविण्याचे काम नाही का?

मा. महापौरः-श्री. सोनवणे साहेब आपण उत्तर दया.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः- त्यावेळी पिठासन अधिकारी उपमहापौर होते त्यांनी रुलिंग दिले. आमची लक्षवेधी होती त्यावेळी गाडी हटविण्याचे काम पंधरा दिवसात केले जाईल असे आपण रुलिंग दिले होते. ते काम झाले का? आज, एक महिना झाला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-दहा दिवसात सांगितले होते. दोन महिने झाले अजुन झाले का?

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-महापौर महोदया, आपल्या आदेशान्वये निवेदन करतो तसे लक्षवेधी सूचनेवर आपण रुलिंग दिले आहे. त्यावर मी उत्तर देवू इच्छित होतो परंतु आता



मी देणार नाही परंतु दुसरा जो विषय लक्षवेधीशी संबंधित नाही. तरी मुददा आला आहे. पंधरा दिवसाच्या आत रोडवरील अतिक्रमण हटविणे. मला वाटते, सदनातील सदस्य सहमत असतील रस्त्त्याच्या बाजुला जी अतिक्रमणे आहेत, काही फुटपाथांवर टप-या आहेत. त्या हटविण्याचे काम सुरू आहे. तुमची जितकी अपेक्षा असेल तितके बहुतेक काम झाले नसेल. परंतु काम सुरू झाले आहे आणि परिणाम दिसण्यासाठी काहीतरी वेळ लागेलच.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा. आयुक्त साहेब,आमचा विषय फुटपाथवरील अतिक्रमणाविषयी होता. तसेच गॅरेज समोर उभ्या राहीलेल्या वाहनांविषयी होता.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. आयुक्त साहेब आम्ही आपणांस विनंती केली होती की सर्वात आधी दोन नंबर नेहरू चौक ते गोल मैदान तिथुन तुम्ही सुरूवात करा. म्हणजे शहरातील अतिक्रमण हटवत आहात असे दिसून येईल.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-महापौर महोदया,या शहरात जितके पण '' ना फेरीवाला क्षेत्र'' जे घोषित केले गेले आहे. या महापालिकेच्या महासभेने जो निर्णय घेतला आहे की या शहरात त्यानुसार फेरीवाल्यांना त्या क्षेत्रात परवानगी देणार नाही. त्यांना तिथुन हटवु.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः- मा. आयुक्त साहेब,आमचा विषय फुटपाथवरील अतिक्रमणाविषयी होता. तसेच गॅरेज समोर उभ्या राहीलेल्या वाहनांविषयी होता. त्याविषयी आपण काय कार्यवाही केली. आता पण आपण जावून बघा. गॅरेजच्या ऐवढया गाडया उभ्या आहेत जाण्या येण्यासाठी रस्ता नाही.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-महापौर महोदया, मी सदनाला सांगितले आहे की कार्यवाही सुरू झाली आहे. सदस्यांची जशी इच्छा आहे तशी पण कार्यवाही केली जाईल. वेळ दयावा. तुम्हाला जशी हवी तशी कार्यवाही होईल. थोडे तर थांबा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-तुम्ही म्हणाला होतात पंधरा दिवसात होईल. म्हणुन आम्ही थांबलो होतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-महापौरांनी रूलिंग दिले होते पंधरा दिवसात झाले पाहिजे.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-एकदम बरोबर मा. महापौरांचे आदेश होते. त्यानुसारच कारवाई सुरू झाली आहे. पंधरा दिवसाच्या आत कारवाई सुरू झाली आहे. हे सदनाने लक्षात घेतले पाहिजे. तुम्ही जो रोड, टपरी सांगितले ते नसेल हटविले.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः- साहेब आपल्याला विंनती आहे आपण स्वतः जावून तिथे पहावे. आम्ही एक व्यक्ती किंवा एक वस्तु सांगत नाही तुम्ही स्वतः जावून पहा तिथे काय आहे ते?

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-टपरी ट्रक पंधरा फुट जागा अडवुन ठेवतात. प्रत्येक रोडवर दहा-दहा, वीस-वीस ट्रक लाईनीत उभे आहेत. ८० फुटाचा रस्ता झाल्यावर देखिल दोन्ही बाजुला पंधरा फुट रस्त्यावर वाहने उभी आहेत. ते लवकर हटविले पाहिजेत. मधुबन ते दुनिचंद कालानी कॉलेज पर्यंत पुर्ण रोड भरलेला आहे.



मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-हटविले जाईल, हटविले जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सभागृह नेता तुम्ही हटविणार आहात का?

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-टपरी ट्रक पंधरा फुट जागा अडवुन ठेवतात. प्रत्येक रोडवर दहा-दहा, वीस-वीस ट्रक लाईनीत उभे आहेत. ८० फुटाचा रस्ता झाल्यावर देखिल दोन्ही बाजुला पंधरा फुट रस्त्यावर वाहने उभी आहेत. ते

लवकर हटविले पाहिजेत. मधुबन ते दुनिचंद कालानी कॉलेज पर्यंत पुर्ण रोड भरलेला आहे. टपरी पाच फुटाची आहे, पन्नास फुटाचा ट्रक रस्ता अडवतो त्यावर कुणाचे लक्ष जात नाही. माझा प्रभाग एक नंबर आहे तिथुन सुरूवात झाली पाहिजे. तुम्ही सभागृह नेता आहात उलट तुमच्या पॅनल पासुन उलटी सुरूवात झाली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी,आता जे आमचे श्री. सोनावणे साहेब सांगत आहेत. आमचे मधुबन ते दुनिचंद कालानी कॉलेज पर्यंत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>कोणते सोनावणे दोन दोन सोनावणे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आमचे सदस्य श्री. नथु सोनावणे जे म्हणत आहेत मधुबन ते शहीद दुनिचंद कालानी कॉलेज पर्यंत. दुसरे शहाड स्टेशन येथे हाथगाडया उभ्या असतात. त्याविषयी खुलासा करू इच्छितो की जेव्हा ''ना फेरीवाले क्षेत्र''चा मुददा आला होता. तेव्हा २० ''ना फेरीवाला क्षेत्र'' होते व ९ ''फेरीवाला क्षेत्र'' होते. तर हॉकर्स झोन जिथे हाथगाडया उभ्या राहु शकतात तो सर्वांच्या संमतीने डिफर करण्यांत आला होता. कारण की सर्व राजकीय नेत्त्यांनी बसुन एकमत होवून नंतर ते ठरविले परंतु जे २० ''ना फेरीवाला क्षेत्र'' होते. त्यावेळी महाराज भुल्लर यांनी एक रोड शहाड स्टेशन वरून इथे येतो त्यावर सांगितले होते की, हा रोड वगळण्यांत यावा. कारण की तिथे हातगाडीवाले उभे राहिले पाहिजेत. मला वाटते श्री. नथु सोनावणे व श्री. भुल्लर यांचा पॅनल एकच आहे. त्यांनी त्यावेळी तो रोड डिफर करायला सांगितला होता. जर श्री. नथु सोनावणे म्हणतात, जरा याकडे लक्ष दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-</u>मी ट्रक बाबत बोलत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>सन्माननिय महापौर, सभागृह नेता दिशाभुल करत आहेत. भांडणे लावण्याची कामे करत आहेत ते आपसात नगरसेवकांमध्ये. यांनी ट्रक विषयी सांगितले ते हातगाडीविषयी बोलत आहेत. हातगाडी आणि ट्रकमध्ये फरक आहे की नाही ते सांगा. स्त्री आणि पूरूष यामध्ये फरक किती आहे हे जर त्यांना समजत नसेल तर समजावुन दयावे लागेल. हातगाडी कुठे आणि ट्रक कुठे. तुम्ही भांडणे लावण्याचा प्रयत्न करू नका. तुम्हाला जर ऐकु येत नसेल तर तुम्ही खाली बसा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी यानंतर ट्रक विषयीच बोलणार होतो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>हो तुम्ही पुढच्या सभेत बोला ट्रकवर. तुम्ही भांडणे लावण्याचा प्रयत्न करू नका. शहाड फाटक विषयी ते बोललेच नाही आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>हा मुददा नाही तरी चर्चा होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>'आपण सभागृह नेता आहात आपल्याला समजायला पाहिजे............



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>तुम्ही हा मुददा इतिवृत्त कायम होताना काढायला पाहिजे होता. आपण महापौरांचे नाव घेवून म्हणालात की रूलिंग दिल्यावर त्यावर अंमलबजावणी होत नाही म्हणुन हा विषय सुरू झाला. मी हातगाडी नंतर ट्रक विषयी बोलणार होतो. त्या ट्रक कुणाच्या आहेत?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>श्री. किशोर वनवारीचे ट्रक आहेत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मधुबन ते दुनिचंद कालानी रस्त्यापर्यंत खुलासा करा.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे :-</u> शहाड स्टेशनच्या बाबतीत आम्ही काही बोललेच नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> ठिक आहे, यांची जी तक्रार आहे, हातगाडी, ट्रक, रिक्षा, मेटडोर, जे काही असेल ते हटवून घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा. महापौर साहेब, महापौरांच्या रुलिंगचे पालन होईल काय?

<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, आपण सभागृहात जे पण निर्णय देतात, त्यावर अंमलबजावणी होईल काय असा प्रश्न विचारला गेला आहे. आपण दिलेल्या निर्देशाची छानबिन करून जे निर्देश कार्यवाही करण्यासारखे आहे, त्यावर अंमलबजावणी केली जाते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचून दाखवितात.

मागील सभेचे दि. २०.१२.२००२ व २६.१२.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>जितके पण ठराव आम्ही कायम केले त्याची अंमलबजावणी आज इतिवृत्त कायम झाल्यावर त्वरीत करण्यात यावी भले आम्ही कुणाला प्रमोशन दिले असो. मागील महिन्यात जितके पण निर्णय झालेले आहे त्यावर आज इतिवृत्त कायम झाल्यावर उदयापासुन त्वरीत अंमलबजावणी झाली पाहिजे. येणा-या महासभेत एकही असा मुददा नसावा जो प्रलंबित असेल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, पान नं ७३ वर दोन नंबरच्या नाल्याच्या स्लॅबसंबंधी जी चर्चा चालु होती सभागृहामध्ये आणि ती कंन्टीन्यु होत आली. श्री. सोनवणे साहेबांच्या नंतर सभागृह नेता यांनी बोलण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनतर विधी अधिका-यांनी आपले मत तिथे दिले होते सभागृहामध्ये तर त्यानंतर विधी अधिका-यांनी आपले मत दिल्यानंतर त्याच्याशी पुन्हा माझी क्रॉस क्वेश्चन झाले होते. दोन -चार प्रश्नांनंतर शेवटी मी असा प्रश्न उपस्थित केला होता की, त्याठिकाणी जो स्लॅब आहे त्या स्लॅबचे मोजमाप जेव्हा सुरूवातीला प्रकरण कोर्टामध्ये गेले त्यावेळेला कोर्टासमोर ठेवले होते का? आणि हा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारल्यानंतर त्यांनी असे उत्तर दिले होते शेवटी की स्लॅबचे मोजमाप सुरवातीला कोर्टामध्ये ठेवले गेले नव्हते. हा सगळा भाग इतिवृत्तात आलेलाच नाही.



<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तुम्ही जे बोललात ते शब्द न शब्द आले आहे. त्या व्यतिरिक्त आपण काही वेगळे बोलला नव्हतात. म्हणुन ते आले नाही.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>तुम्ही जे स्टेटमेंट दिले आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तुम्ही विचारलया नंतर मी स्टेटमेंट दिले.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-तुमच्या बरोबर पण माझे क्रॉस क्वेश्चन झाले नव्हते का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्ही मला फक्त एकदा विचारले आणि मी पण फक्त एकदाच उत्तर दिले. त्याशिवाय आपण काही बोललाच नव्हतात. तुम्ही फक्त विचारले होते की नाल्याचे जे मोजमाप आहे ते कोर्टात तुम्ही सादर केले होते की नव्हते केले. त्याचे उत्तर मी पुर्णपणे तुम्हाला दिले होते त्यानंतर तुमचे काही वर्णन नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-ज्यावेळी अतिरिक्त आयुक्त साहेबांशी चर्चा चालु होती हा विषय चालु होता. त्यानंतर तुम्हाला पण स्पष्टीकरण दयायला सांगितले होते. आपण स्पष्टीकरण दिल्यानंतर माझे आपल्याशी क्रॉस क्वेश्चन झाले होते. त्यात तुम्ही कबुल केले होते की ते मोजमाप कोर्टात पाठविले नव्हते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ते ७३ नंबर पानावर आले आहेत. मी एकदाच उत्तर दिले होते आणि एकदाच ते आले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-स्लॅबचे मोजमाप कोर्टासमोर ठेवले नव्हते. हा मुददा आलाच नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-७३ नंबर पान वाचा ना आपण? विधी अधिकारी समोर लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-ही तर क्लीअर कट मिसयुज आहे. हे पहा ७३ नंबर पानावर माझ्या नावापासुन जी सुरूवात झाली आहे त्यांनतर श्री. आर. के. सोनवणे साहेबांनी उत्तर दिले होते श्री. किशोर वनवारी यांनी बोलण्याचा प्रयत्न केला परंतु आपण मध्येच आपला मुददा सुरू केला. आपला मुददा संपल्यानंतर मी तुमच्या बरोबर क्रॉस क्वेश्चन केले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्ही फक्त एकदाच विचारले होते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-मी तुम्हाला वारंवार विचारले होते की स्लॅबचे मोजमाप हे पहिल्यांदा कोर्टासमोर ठेवले होते का? आपण दोन चार प्रश्नानंतर नाही म्हणुन सांगितले होते. आणि ती चर्चा इथे आली नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की तुम्ही फक्त एकदाच मला विचारले होते. ७३ नंबर पानावर जे उत्तर दिले आहे. त्यात त्याचा उल्लेख आहे. तुमच्या प्रश्नाचेच उत्तर आहे त्यात.



मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-तुम्ही सभा संपल्यावर मला कॅसेट ऐकवणार का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आम्ही तुम्हाला कॅसेट ऐकवु शकतो परंतु इतिवृत्त कायम केले जाते तेव्हा मा. महापौर सभेचे मत घेवून ते कायम केले जाते. तुम्हाला जे पाहिजे ते तुम्ही जोडु शकता. त्यांनी जर मान्य केले तर तुम्ही जोडु शकता.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आम्हाला जे हवे आहे ते नाही जोडायचे. जे घडले आहे ते त्यात जोडायचे आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-इतिवृत्तात वाक्ये टाकायची की नाही टाकायची? इतिवृत्त म्हणजे सभेचे कामकाज होते. ते सर्व यात आले पाहिजेत. त्यात जर असेल तर इतिवृत्तात टाकु शकतो नाही तर नाही. असा काही प्रश्नच येत नाही. जे झाले ते तर यायलाच पाहिजे ना.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मी पुर्ण खात्रीने सांगत आहे की, जे हे सांगत आहेत ते कुठेही बोलले नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-सचिव साहेब चुकी होवू शकते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-चुकी होवू शकते त्यासाठी मी उपाययोजना देखिल सांगितली. मा. महापौरांनी सांगितले तर त्यांचे म्हणणे इतिवृत्तांत जोडता येइल. सभेचे मत घेऊन तुम्हांला हवे तर तुम्ही इतिवृत्तात समावेश करा माझी काही हरकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- त्यांना कॅसेट ऐकायची आहे, त्यात ते आले आहे अशी त्यांची खात्री आहे. परंतु दुसरी गोष्ट अशी आहे, तुम्ही म्हणता चुक नाही. पान नंबर १२६ वर पहा. श्री. पी.डी. डोईफोडे, यांना महापालिका सेवेत प्रतिनियुक्तीने शाखा अभियंता या पदावर कार्यरत ठेवणेस मान्यता देणे बाबत. त्यांना कार्यरत ठेवण्याच्या बाजुने ४२ मते, आणि कार्यरत ठेवण्याच्या विरोधात १६ मते आहेत पदावर ठेवण्याच्या बाजुने ४२ मते आहेत, आणि विरोधात १६ मते आहेत. असे असतांना तुम्ही ठराव करतांना म्हणता इथून परत पाठविण्यात यावे. असा बहुमताने ठराव झाला म्हणजे नक्की काय? तुम्ही ठरावात जे म्हटले आहे ते बरोबर आहे की, मतदान जे घेतले ते बरोबर आहे. तुम्ही मतदान घेतले आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-:- ती चुक झाली आहे. जी दुरुस्ती आहे ती करण्यास आम्ही तयार आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- चुक कोणती आहे? नंतर जे म्हटले ते चुकीचे आहे की मतदान जे घेतले ते चुकीचे आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कार्यरत ठेवण्याच्या बाजुने ४२ मते आहेत. १६ विरोधात आहेत. माझ्या म्हणण्याचा उद्देश असा आहे की, नाही, नाही त्यांना कार्यरत न ठेवण्याच्या बाजुने ४२ मते आहे, आणि कार्यरत ठेवण्याच्या बाजुने १६ मते आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- नक्की चुक कोणती आहे?



मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-त्यांना कार्यरत न ठेवण्याच्या बाजुने ४२ मते आहेत. जी चुक आहे ती दुरुस्ती केली जाते.
मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- कशी चुक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ही क्लरीकल चुक असु शकते, टायपिंग चुक असु शकते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- ही क्लरीकल मिस्टेक कशी असु शकते. क्लरीकल मिस्टेक कशी असते ते मी तुम्हांला सांगतो, आम्ही काय समजणार चुकी कशात आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-हे पहा इतिवृत्त हे प्रारुप आहे. हे नेहमी दुरुस्ती योग्य असते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- इतिवृत्ताचा मग अर्थ काय असतो? इतिवृत्त म्हणजे जे सभेत झाले ते पुढच्या सभेत त्याचा मसुदा ठेवायचा. ते मंजुर करायचे आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मी सदनाला माहिती देऊ इच्छितो, हे प्रारुप असतो, दुरुस्ती झाल्यानंतरच इतिवृत्त कायम केले जाते. दुरूस्ती असेल तर करू नाही तर नाही. आणि सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर जे म्हणत आहेत त्यांनी जर ते म्हंटले असेल तर ते इतिवृत्तात आले पाहिजे नाही तर नाही. म्हणुन यात उल्लेख नाही. मी त्यांना ऐकवेन पण त्यांची खात्री पटण्यासाठी. परंतु खरे हे आहे की तसे काही आले नाही आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-सचिव महोदय, माझ्या मुददयावर काय स्पष्टीकरण आहे. कॅसेट ऐकवणार ना?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कॅसेटमध्ये असेल तर तशी इतिवृत्तात सुधारणा करू नाही तर विषय संपला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-धन्यवाद.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-एक छोटीशी क्लेरीकल मिस्टेक आहे. २० तारखेच्या इतिवृत्तात त्यात ११ नंबर पानावर महासभेला जे अधिकार दिले आहेत त्याचा उल्लेख आपण करत आहात. उल्लेख ऐवजी त्यावेळी मी उल्लंघन म्हंटलो होतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ठिक आहे.

मा.महापौरः-सदरचे इतिवृत्त वरील सुचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषयः- उल्हासनगर सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ या योजनेची
सुधरित वाढीव रक्कमेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-अधिकारी कोण आहे? हे रिवाईज का झाले?

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया,जी मुळ योजना होती ती १८. ८० करोड रू. ची होती. ती आता २५ करोड ची झाली आहे. त्यात काही नविन कामांचा समावेश आहे. काही जे



मुळ काम आहेत त्यांचे दर वाढले आहेत. या दोन कारणांमुळे या योजनेची रिवाईज्ड कॉस्ट २५ करोड पर्यंत झाली आहे.

मा. श्रीम. जया साधवानी यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-त्यात विभाजन आहे. रिवाइज आहे नविन ची वेगळी गोष्ट आहे. विलंब झाल्यामुळे किती खर्च वाढला हे सांगावे.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-मुळ योजनेचे इस्टीमेट ९५-९६ डि.एस.आर. प्रमाणे बनविले होते. परंतु योजना मंजुर होवून कार्यान्वित होईपर्यंत ९९-२००० वर्ष या डी.एस.आर. योजनेला लागले त्यामुळे कॉस्ट ओव्हर ऑल जी आहे विलंब झाल्यामुळे ती आहे १३४ लाख व नविन कामांचा समावेश जो यात केला आहे. त्यामुळे ४८६ लाख म्हणजेच ४ करोड ८६ लाख रू. रक्कम वाढली.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-पहिला टप्पा पुर्ण झाल्यानंतर किंवा चालु असताना दुसरा टप्पा सुरू करण्याची परवानगी आपण मागत आहात. ते करत असताना पहिल्या टप्याचे काम किती झाले आहे?

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया, आम्ही यात मंजुरी जी मागितली आहे ती पहिल्या टप्याची रिवाईज योजनेसाठी मागितली आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-नाही दोन्ही आहेत. दुसरा टप्पा पण आहे ना?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-दुस-या टप्याचे पण लिहिले आहे ना?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-ठिक आहे, पहिल्या टप्याचे काम किती झाले आहे?
मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-पहिल्या टप्यात आठ इ.एस.आर. जे बांधायचे होते त्यापैकी ७ जलकुंभाचे काम चालु आहे. त्यापैकी चार जलकुंभ मार्च -एप्रिल पर्यंत कार्यान्वित होवू शकते. तीन जलकुंभ जुन-जुलैमध्ये कार्यान्वित होतील. एका जलकुंभाला जी जागा पाहिजे होती ती जागा अजुन संपादन नाही होवून शकली रमाबाई आंबेडकर टेकडी इथे. त्यामुळे जलकुंभाचे कामच नाही सुरू झाले. कनेक्शनसाठी ज्या वितरण वाहिन्या टाकायच्या होत्या त्याचेही काम अजुन चालु आहे. एक जलकुंभ सोडुन पहिल्या टप्याचे सर्व काम जवळ जवळ जुलै शेवट पर्यंत पुरे होईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-त्यात विठ्ठलवाडीचा एक जलकुंभ आहे. तो जलकुंभ ८२ सालामध्ये बांधला आहे. ७८ साली काम सुरू झाले होते. ८२ मध्ये पुर्ण झाले आहे  परंतु आज त्या जलकुंभाची स्थिती बरोबर नाही. जर तिथे साठवण केले  तर खाली पडण्याची संभावना आहे.  ते दुरूस्त करण्याचे काम या टप्यात नव्हते. ते रिपेअर करण्याचे काम यात टाकले की नाही टाकले?

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया ,विठ्ठलवाडी जलकुंभाचा आता वापर केला जात नाही आहे.  आता तो वापरायचा निश्चित आहे. तिथे दुरूस्ती करणे जरूरी आहे. त्याचा समावेश या रिवाईज योजनेत केला आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, हे जे १८. ८० कोटी वाढून २५ करोड झाले आहे. तर मला असे वाटते की, आमचे मा. आयुक्त



महोदय आताच सभागृहाबाहेर पडले आहेत नाहीतर मी त्यांना हा प्रश्न विचारणार होतो. याचा जो खर्च वाढला आहे त्याचे श्रेय ते कोणाला देणार होते. लोकप्रतिनिधीना देणार होते का स्वतःला हे मी विचारू इच्छितो. परंतु आयुक्त साहेब इथे उपलब्ध नाही. मी विचार करतो की ते पत्रकार परिषद बोलावून...

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-का हे आयुक्त नाहीत का?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:'-नाही मी त्यांनाच हा प्रश्न विचारणार होतो. ते आले तर मी विचारेन नाही आले तर मी पुढील महासभेत विचारेन. मला फक्त विचारायचे होते की याबाबत पण पत्रकार परिषद बोलावून ते काही सांगणार आहेत का? परंतु आता ते नाहीत नंतर मी विचारेन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आयुक्त साहेब तुम्ही सांगा त्यांना.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-नाही हा प्रश्न श्री. सोनवणे साहेबांशी संबंधित नाही. आम्हाला त्यांच्याकडुन उत्तर नको.

मा. महापौर:-नाही नाही आयुक्त साहेब उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-रूलिंग दिले आहे महापौरांनी.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मा. महापौरजी, मला हे विचारायचे आहे. आमची जी १८ करोडची योजना होती ती आता २५ करोड झाली आहे.

मा. महापौर:-आयुक्त साहेब स्वत: उत्तर देवू इच्छितात तर तुम्हाला काय हरकत आहे.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-आम्हाला आयुक्तांकडुन आश्वासन पाहिजे त्यांनी प्रेस नोट काढली आहे. त्याविषयी विचारायचे आहे. हे काय एक-एक उत्तर देणार? जर सर्वांचे उत्तर देवू शकतील तर त्यांनी दयावे. नाही तर आम्हाला श्री. पोखरकर साहेबांकडुन उत्तर पाहिजे आहे.

मा. महापौर:-श्री. पोखरकर साहेब नाहीत त्यांच्या जागी श्री. सोनवणे साहेब उत्तर देत आहेत ना?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-महापौरजी, श्री. पोखरकर साहेब आपल्या केबीनमध्ये जावून बसले आहेत. ते काय घाबरतात का इथे यायला.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-महापौरांनी जे वर्तमानपत्रात दिल आहे.........

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरांनी रूलिंग दिले आहे त्यांचा सन्मान झाला पाहिजे.
काही विपक्ष सदस्य:-महापौरांनी रूलिंग दिले आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.



मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-महापौर साहेब त्यांनी सत्ताधारी पक्षावर आरोप लावला आहे तुम्ही पण सत्ताधारी पक्षात आहात. तुम्ही महापौर आहात तुम्ही प्रश्न समजण्याचा प्रयत्न करा.

मा. महापौर:-जर आयुक्त साहेब उत्तर दयायला तयार आहेत तर ऐकुन घ्यायला काय हरकत आहे. श्री. दिलीप भाई तुम्ही वारंवार उठबस करता.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-तुम्ही आमच्या भावना समजण्याचा प्रयत्न करा.

मा. सदस्य श्री. मोहन वेहरानी:-मा.महापौरांनी रूलिंग दिले आहे तुम्ही समजण्याचा प्रयत्न करा ना?

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.
मा.महापौर:-हे आयुक्त उत्तर दयायला तयार आहेत ना. एक आयुक्त नाही तर दुसरे आयुक्त आहेत ना त्यांना उत्तर देवू दया ना.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-आयुक्त साहेब कॅबिनमध्ये जावून का बसले आहेत इकडे का येत नाहीत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-आमचा प्रश्न तर पुर्ण होवू दया.

मा. सदस्य श्री. मोहन वेहरानी:-महापौरांनी रूलिंग दिले आयुक्तांचे उत्तर तर ऐकुन घ्या.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-आमचा प्रश्न तर पुर्ण होवून दया.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-श्री. पोखरकरांना इथे बोलवा.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-महापौरांचा हा अपमान आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. मोहन वेहरानी:-आयुक्त साहेब, महापौरांनी रूलिंग दिले आहे तुम्ही उत्तर दया ना मेहरबानी करून.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-आयुक्त साहेब तुम्ही उत्तर दया. सन्माननिय महापौरांचा अपमान करायचा प्रयत्न करू नका.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-मला पण या मुददयावर उत्तर दयायचे होते. सन्माननिय सदस्य श्री. देवेंद्रसिंग म्हणाले की हे जे एक करोड ३४ लाख वाढले आहेत याला जबाबदार कोण? प्रशासन की लोकप्रतिनिधी? मी सभागृहात सांगु इच्छितो की याला जबाबदार कोणी नाही. कारण की ही जी किंमत वाढली आहे. याचे कारण जर तुम्हाला कळले तर तुम्हाला समजेल. जेव्हा एखादा प्रकल्प तयार होतो. प्राकलन बनवतेवेळी एका वर्षाचे डी.एस.आर. केले जाते. त्या वर्षाचे दर लावले जातात. त्यांना प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणे निविदा मागविणे ऐजन्सी नियुक्त करणे त्यावर अंमलबजावणी करणे त्यात काही वेळ तर जातो. कामीच अंमलबजावणी करताना



देखिल समस्या येतात जसे की, ई.एस.आर. साठी आम्ही जागा निश्चित केली होती. त्या जागे ऐवजी दुसरी कडे ई.एस.आर. बनवावा लागला उदा. बिर्ला गार्डन येथे इ.एस. आर बनवायचे होते परंतु वरती फॉरेस्ट खात्त्याची जागा असल्याने त्यामुळे जी.एस.आर. बदलुन ई.एस. आर. बनवावा लागला. मध्यंतरी एम.एस.ई.बी ने आपल्या अनामत रक्कमेमधुन ते बनविले. ना ते प्रशासनाच्या हातात आहे ना आपल्या हातात अशा काही कारणास्तव जसे की जागा बदलणे. पाले ते गायकवाड पाड्यापर्यंत लाईन टाकायची आहे. त्यासाठी काही जमिन

वनविभागाकडुन घ्यायची आहे. काही खाजगी जमिन संपादन करायची आहे. यात काही वेळ जातो. ९५-९६ सालच्या डि.एस.आर नुसार बनविलेल्या प्राकलनाचे काम जर ९९ साली सुरू केले तर हे नक्की की किंमत वाढणार. हे जे प्राईस ऐकसलेशन आहे. त्यास ना प्रशासन जबाबदार आहे ना लोकप्रतिनिधी जबाबदार आहे. कोणत्त्याही शासनाची योजना दिर्घ कालावधी साठी असते. तुम्ही शासनाची जी पण योजना पाहाल. आधी दहा करोड त्याकामासाठी ठेवले होते. ते काम होईस्तोपर्यंत १३ करोडची किंमत पडते.

मा. सदस्य श्री. देवंद्रसिंग खेमाणीः-धन्यवाद, तुम्ही खुलासा केल्याने एक गोष्ट तर निश्चित झाली. ही जी किंमत वाढली आहे. याचा आरोप कमीत कमी लोकप्रतिनीधीवर तुम्ही लावणार नाही धन्यवाद.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मा. महापौरजी, मला हे सांगा श्री. पोखरकर महासभा सोडुन आपल्या दालनात का बसले आहेत. आम्ही काय इथे फालतु लोक बसलो आहोत.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रमोद टाले सभागृहातून बाहेर पडले.

मा. महापौरः-कोणत्त्यातरी विषयी आयुक्तांना काही समस्या निर्माण झाली असेल त्यांच्या ऐवजी श्री. सोनवणे साहेब इथे बसले आहेत. ते इथे बसले आहेत याचा काही कुणाला विरोध आहे?काही कारण असु शकते तुम्हाला पण समस्या असु शकते.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-ही सभा तोपर्यंत होणार नाही जोपर्यंत पोखरकर साहेब येणार नाही. आमच्यावर आरोप ठेवतात लाज वाटली पाहिजे सत्तापक्ष.....

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-त्यांनी इथे यायला पाहिजे ना. पत्रकार परिषदेत मोठ-मोठे आरोप करतात. आता वेळ आली आहे प्रश्नाचे उत्तर दयायची तर निघुन गेले आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-कृपया महापौरांचा अपमान करू नका.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-जो पर्यंत श्री. पोखरकर येत नाहीत तोपर्यंत सभा चालवणार नाही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे /श्री. राजेंद्र चौधरीः-सचिवांना विचारा कायदा काय आहे ते?



मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-नेहमी श्री. पोखरकर घाबरतात आणि पळुन जातात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-कायदा काय म्हणतो?

मा. सदस्य श्री. देवंद्रसिंग खेमाणीः-पोखरकर साहेबांना बोलवण्याचे आदेश दया. सत्ताधारींना चपराक असे कसे?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-सचिव साहेब नियम सांगा.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-श्री. पंजाबी साहेब तुम्हाला फोन आला का की आयुक्त साहेब दालनात बसले आहेत ते? तुम्हाला कसे माहित पडले दालनात बसले आहेत ते?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-आम्ही चालवु सभा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आता जे सभागृहात....

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-ते डरपोक आहेत पळुन जातात सभागृहातुन.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आमच्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, एम.एम. आर.डी. ए. कडुन कर्ज घेतले होते. आम्ही एम.जे. पी कडे पाठविले होते. आमच्या निधीमधुन त्यांनी ठेकेदारांना पैसे दिले. म्हणुन पहिल्या टप्प्याचे काम त्याला विलंब झाला. आमचे जे सदस्य बोलु इच्छितात त्याचा मी खुलासा करू इच्छितो. आमचे जे पैसे होते ते एम.जे.पी. वाल्यांनी दुस-या ठेकेदारांना दिले. म्हणुन त्याचा खुलासा पाहिजे. मा. आयुक्त साहेबांनी स्वतः मान्य केले होते की आमचे जे ठेकेदाराला पेमेंट आहे ते देण्यात विलंब झाला. आमचे महापालिकेचे पैसे त्यांना वेळेवर पोहोचले ते पैसे त्यांनी ठेकेदाराला न देता दुस-या कामात लावले. ही गोष्ट लक्षात ठेवून आम्हा सदस्यांची जी भावना आहे की आयुक्त साहेब इथे उपस्थित असले पाहिजे. किंवा ही सभा स्थगित करून दुस-या दिवशी ठेवू शकता. ज्या दिवशी आयुक्त उपस्थित राहु शकतील. हा महत्त्वाचा मुददा आहे. सात करोडचा तोटा महापालिकेला होणार आहे. त्यानुसार जे दर वाढले आहेत व आजची जी परिस्थिती आहे ही गोष्ट लक्षात ठेवून हे जे रिवाईज एग्रीमेंट आणले आहे. याचा खुलासा झाला पाहिजे. यासाठी दोषी कोण आहे? तर मेहरबानी करून आमचे आयुक्त साहेब इथे उपस्थित नाही. सभा स्थगित करून दुस-या दिवशी ठेवावी.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-रात्री दहा-दहा वाजेपर्यंत दालनात बसतात आणि इथे आमचा सामना करण्यासाठी येत नाहीत. आता पण त्यांच्या दालनात श्री. पोखरकर बसले आहेत त्यांना बोलवा महापौरजी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी, सभागृहात अतिरिकत आयुक्त हे सक्षम अधिकारी आहेत. ते इथे बसले आहेत. आयुक्तांची खुर्ची इथे रिकामी नाही. अतिरिक्त आयुक्त इथे बसले आहेत. त्यांचा कार्यभार घेवून ते बसले आहेत. चांगल्यात-हेने सभा चालवत आहेत. ज्या काही अडचणी आहेत ते सांगत आहेत. जरूरी नाही की इथे आयुक्तच पाहिजे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-महासभा चालु असताना आयुक्त त्यांच्या दालनात जावून का बसले आहेत?



मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-तुम्ही अतिरिक्त आयुक्तांवर अविश्वास दाखवत आहात.

काही विपक्ष सदस्य :-नियम काय आहेत?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-आयुक्त नसताना अतिरिक्त आयुक्त त्यांच्या जागी सभा चालवु शकतात की नाही?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-यापुढे जर आयुक्त नसतील तर आम्ही देखिल सभा चालवु देणार नाही. हे तुम्ही ठरवा.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-बहुमताच्या आधारावर आम्ही सभा चालवु तुम्ही चिंता करू नका.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-मध्येच उठुन गेले तर आम्ही सभा चालवु देणार नाही.

मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहन सभागृहातून बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-बहुमतावर दादागिरी करू नका.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:- ,जो पर्यंत आयुक्त येत नाही तोपर्यंत ही कार्यवाही इथेच थांबवावी.

मा. श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त /प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया, तुमच्या निर्देशानुसार मी पुन्हा सभागृहात निवेदन करू इच्छितो. इथे काही तरी चुकीची समजुत होत आहे असे मला वाटते. मा. सभागृह नेता यांनी म्हंटले की, सात करोडचा तोटा झाला आहे. मी यांना सांगु इच्छितो की या योजनेची किंमत वाढली याचा अर्थ असा नाही की सात करोडचे नुकसान होत आहे. ४ करोड ८६ लाख हे तर न्युवर्क स्किममध्ये जोडावे लागले त्यामुळे वाढले. १ करोड ३४ लाख जी दोन तीन कारणे मी सांगितले. जमिन जी आधी उपलब्ध केली गेली होती......

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-आयुक्त साहेब, आम्हाला तुमच्याकडुन काहीच स्पष्टीकरण नको आहे. आम्हाला तुमचे म्हणणे समजले आहे इकडे प्रश्न हा आहे की श्री. पोखरकर साहेब जर कॅबीनमध्ये बसले आहेत तर त्यांनी सभेत यावे किंवा सभा मेहरबानी करून स्थगित करावी. तुमची भावना व तुम्ही जे समजावू इच्छितात ते आम्ही समजलो आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-ते तुमच्या म्हणण्याने संतुष्ठ आहेत परंतु त्यांना उत्तर श्री. पोखरकरांकडुनच पाहिजे आहे ही गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-मा.महापौरांनी रूलिंग दिले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-सत्तेचा दुरूपयोग होत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा.महापौर साहेब, तुम्ही सांगा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-श्री. पोखरकर साहेबांनी उत्तर दयावे हे जरूरी आहे का?



इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-हा मा. महापौरांचा अपमान आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-रूलिंग दिल्यानंतर मा. महापौरांचा अपमान केला जात आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी मा. महापौरांसमोर अशी विनंती करतो की, मेहरबानी करून ही सभा २८ तारखेला ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत यावी.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-कारण काय आहे? आता सभा चालु होती आता लगेच स्थगित का?

काही विपक्ष सदस्यः- ,कारण काय ते सांगा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-सात वाजले आहेत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-सभा दहा वाजेपर्यंत चालु शकते.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-महापौरजी, तुम्ही तुमचे रुलिग दया. काय करू इच्छितो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-दर वेळी सात वाजता तुम्ही सभा बंद करणार का?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-सात वाजता नेहमी बंद करणार का?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-तुम्ही तुमचे रुलिंग दया . तुमचे मत काय?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-सभा स्थगित करण्याचे कारण काय?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापालिकेत वाईट राजकारण खेळले जाते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा. महापौरांच्या आदेशाने दोन मुददे स्पष्ट करून घेवू इच्छितो पाहिला मुददा तुम्ही विचारला की आयुक्त नसताना आयुक्तांच्या जागी बसलेले अधिकारी सक्षम असतात की नाही? त्यांच्या जागी जे अधिकारी असतात ते सक्षम असतात. दुसरे असे की, सभा चालु असताना जर कोणी स्थगन प्रस्ताव आणला तर त्या मुददयावर बहुमताने निर्णय घेतला जातो. जर सभा स्थगित करायची असेल तर बहुमताने निर्णय घेवून सभा स्थगित करू शकतो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:- कारण सांगा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:'-प्रस्ताव घ्या त्याची कारणे सांगा.

मा. सदस्य श्री. गौतम भालेराव:- का स्थगित करत आहेत त्याचे कारण तर सांगा ना?



मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी इथे काही मुददे आणले आहे स्थगन प्रस्ताव आणला आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-श्री. पोखरकर साहेबांना फक्त टारगेट करण्याचे लक्ष्य आहे का?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-फक्त श्री. पोखरकर साहेबांना टारगेट करण्यासाठी राजनिती खेळत आहेत.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी:-श्री. पोखरकर हटाओ मिटिंग चलाओ.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-एका व्यक्तीला वाईट राजकारणाचे शिकार बनवले जात आहे. आणि वारंवार बहुमताच्या आधारे हे करत आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-सचिवजी एक सांगा, आयुक्त असणे कंम्पलसरी आहे का?

मा. सदस्य श्री. सतरामदास, श्री. लुंड गोविंदराम, श्री. टेकचंदानी राजु हे सभागृहातून बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-सत्तेचा दुरूपयोग आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-सत्तेचा दुरूपयोग करू नका.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-सचिवजी एक सांगा, आयुक्त असणे कंम्पलसरी आहे का? कायदयात तसे आहे का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा. आयुक्तांच्या जागी जे अधिकारी असतात ते प्राधिकृत अधिकारी सक्षम असतात.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-पुढच्या वेळेस पण ते येणार नाहीत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-हा सोनवणे साहेबांवर अविश्वास आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-यापुढे आयुक्त साहेब नसले तर मिटिंग चालवणार नाही का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-श्री. राजेंद्रजी मी याचा खुलासा करतो. मा. श्री. आर. के. सोनवणे साहेब नविन आहेत. आम्हाला चर्चा करायची आहे.

काही विपक्ष सदस्य :-नाही, नाही ते सक्षम आहेत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-श्री. सोनवणे साहेबांवर तुमचा विश्वास नाही का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-हे सभागृह आहे तमाशा नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-तमाशा बनवुन ठेवला आहे. महापौरांचा अपमान आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-ही महासभा आहे का काय आहे?



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-सोनवणे साहेब सभा चालवु शकतात ते सक्षम आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-सोनवणे साहेब सभा चालवु शकतील याचा आम्हाला विश्वास आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-सोनवणे साहेब सभा चालवु शकतील याचा आम्हाला विश्वास आहे.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>तुम्ही सोनवणे साहेबांविषयी काय सांगता आम्हाला माहित आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>जर तुम्हाला विश्वास आहे तर श्री. पोखरकर साहेब कशाला हवे आहेत?*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>ही सभा स्थगित करण्यात यावी.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>कारण सांगा.*
*<u>मा. महापौरः-</u>सदरचा सभा स्थगन प्रस्ताव मी मतास टाकत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>कारण सांगा. मतदान घेण्याआधी सभा स्थगित करण्याची कारणे तुम्ही सांगीतली नाहीत.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे सभा स्थगित करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत.*
*<u>सभा स्थगित करण्याच्या बाजुने ३६ मते</u>*

१ श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३ श्री. मुलचंदानी महेंद परसराम
४ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
५ श्री. ऐडके गणपत
६ श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
७ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९ श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१० श्री. पवार नाना आनंदा
११ श्रीमती. आहुजा नीता
१२ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१३ श्री. शांताराम निकम
१४ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१५ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१६ श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१७.श्रीमती. वनवारी मोना अशोक
१८ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१९ श्रीमती. खिलनानी भावना रवि
२० श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२१ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२२ श्री. पमनानी ईश्वर
२३ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास



२४ श्रीमती. भठिजा कोमल
२५ श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
२६. श्री. ठाकुर नरेंदकुमार केवलराम
२७. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
२८.श्रीमती. रिझवानी सुजाता
२९ श्रीमती. भारती पहलाज
३०. श्रीमती. दासानी मिनु
३१ श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती

३२ श्री. जाधव प्रशांत
३३ श्री. साधवानी मोहन
३४ श्रीमती. साधवानी जया
३५ श्रीमती. वसीटा बेबी
३६ श्रीमती. मालती करोतिया राधाचरण

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे सभा स्थगित करण्याच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>कारण सांगा त्याचे? स्थगित करण्याचे कारण काय?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>सचिव साहेब आम्ही वांरवार सांगितले आहे तुम्ही सभा बरोबर चालवत नाही. या स्थगन प्रस्तावाचे सुचक कोण आहेत? अनुमोदक कोण आहेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>सूचक मी आहे, अनुमोदक श्री. नारायण पंजाबी आहेत. सुचक श्री. किशोर वनवारी, अनुमोदक श्री. नारायण पंजाबी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे सभा स्थगित करण्याच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. १८ मते.

<u>सभा स्थगित करण्याच्या विरोधात:- १८ मते</u>

१. श्री. भालेराव गौतम यशवंत
२. श्री. ठाकुर अशोक भगवानदास
३. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
४. श्री. बेहरानी ठाकुर वर्यलदास
५. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
६. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
७. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
८. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
९. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
१० श्री. सोनावणे नथु
११ श्री. गायकवाड दिलीप
१२. श्रीमती. बामणकर नंदिनी
१३ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१४ श्री. चव्हाण रमेश महादेव
१५ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१६ श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१७. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
१८. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

--६१ --

इकडे मा. सदस्य श्री. राजु टेकचदांनी ,श्री. सतरामदास जेसवानी यांनी मतगणनेनंतर सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>महापौरांचे मत कुठे आहे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> सभा स्थगित करण्याच्या विरोधात १८ मते.

<u>मा.महापौर:-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढील प्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

<u>प्रस्ताव</u>

सध्या आयुक्त सभेच्या बाहेर पडल्याने कार्यसुचीवरील विषय क्र. ३ बद्दल किंवा इतर कोणत्त्याही विषयाबाबत सभेमध्ये चर्चा चालु ठेवणेसाठी आयुक्तांस उपस्थित रहाणे आवश्यक आहे म्हणुन, या कारणावरून हि सभा २८.१.२००३ संध्याकाळी ४.०० वाजता किंवा इतर कोणत्त्याही दिवसापर्यंत सभा तहकुब करण्याबद्दलचा ठराव प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र.८४ अ</u> <u>दि. २०.१.२००३</u>

हि महासभा वरील कारणास्तव आजची दि. २०.१.२००३ ची सभा तहकुब करणेस, तसेच दि. २८.१.२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करणेस मान्यता देत आहे.

<u>बहुसंख्येने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ७.१० वाजता सभेचे कामकाज स्थगित करून दि. २८.१.२००३ सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत पुढे ढकलल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२०/२/२००३

इतिवृत्त

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/२/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दि. २०.२.२००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७ | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४०. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४१. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ८. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४३ | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४४. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४६. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२ | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४७. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४८. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५०. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५१. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२ | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५३. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५४. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५५. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ | ५६. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्री. नाना आनंदा पवार | ५७. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५८. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २४. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५९. | श्रीमती. किरण माखिजा |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६०. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्री. शांताराम निकम | ६१. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६३. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६४. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६६. | श्री. बहरानी मोहन |
| ३२. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६७. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६८. | श्री. बेहरानी ठाकुरदास |
| ३४. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७०. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७१. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |



तर

१. मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी व मा. सदस्य / सदस्या २. श्री. मोहन साधवानी ,३. श्रीमती. भावना रवी खिलनानी ,४श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के ,५ श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, ६ श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास ,७. श्रीमती. इंदु भठिजा, ८. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास, ९. श्री. बदरीया राजेश नानिकराम हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ५. २२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्तांच्या अनुपस्थितीत श्री. आर.के. सोनावणे अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांचे स्थानी प्राधिकारी अधिकारी म्हणून आसनस्थ झाले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय :- करांचे दर निश्चित करणेबाबत आणि स्थायी समितीने प्रस्तावित केलेल्या सन २००२-२००३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००३-२००४ च्या तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजाचे अंतीम स्विकृती बाबत.

मा. महापौर यांच्या आदेशान्वये मा. स्थायी समिती सभापती यांना मंचावर आमंत्रित करण्यांत येत आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कलानी :-</u>मा. महापौर.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>एक सेकंद आपल्याकडे आपल्या भाषणाची जी प्रत आहे. ती सर्वसाधारणपणे सन्माननिय सदस्यांना वाटप केली जात होती. तर ती वाटप करण्याची अशी काही व्यवस्था केली आहे का? आपले जे भाषण आहे त्याची प्रत नेहमी सदस्यांना वाटप केली जाते.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>माझ्या मते अशी प्रत वाटप केली जात नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मागील वर्षी दिली होती.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>नाही, मागील काही वर्षात दिलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>ब-याचवेळा दिलेली आहे, नेहमी दिली जात होती.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>पहिल्या वर्षी सुध्दा दिली गेली होती जेव्हा आपण बजेट सादर केला होता.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>यावर्षी तर अशी काही व्यवस्था नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-तशी व्यवस्था असावयास पाहिजे होती कारण बजेटवरील भाषण हे काही सर्व साधारण भाषण नाही. ते एक अतिशय महत्त्वाचे भाषण आहे. त्याची प्रत सर्व सदस्यांना दयावयास पाहिजे होती.

--३--

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, प्रत्येक वर्षी, अशी प्रथा आहे की, स्थायी समिती मध्ये जो बजेट पारीत होतो तोच महासभेत पारीत होतो. त्याचे जे भाषण असते ते स्थायी समितीमध्ये कलेले भाषण असते. व स्थायी समिती अध्यक्षा जे भाषण वाचून दाखवित आहेत ते त्याच्याशी संबंधित आहे जो बजेट जो स्थायी समितीत मंजुर झालेला आहे व महासभेत हा बजेट मंजुर झाल्यानंतर बजेटची प्रत्येक सदस्यास जी प्रत दिली जाईल त्यामध्ये बजेट भाषणाची प्रत सुध्दा असते मला असे वाटते की हे भाषण शांतपणे ऐकुन घ्याल व समजुन घ्याल तर खुपच चांगले होईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी, स्थायी समिती अध्यक्षा, दोन तीन वेळा आपण बजेट सादर केला आहे. त्यावेळी त्या भाषणाची प्रत आम्हास दिली जाते यावर्षी बजेट पुस्तीकेमध्ये आम्हास बजेट भाषणाची प्रत मिळेलच परंतु आता आपण जे भाषण देत आहात. त्यातील आकडयांची लेखी माहिती आम्हाला मिळाली तर अधिक चांगल्या प्रकारे आम्हास चर्चा करता येईल त्यासाठी मी आपणास निवेदन करतो की छोटीसी गोष्ट आहे, ५ मिनिटात जर त्याची झेरॉक्स प्रत करून आम्हास दिली तर फारच चांगले होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आतापर्यंतची ही प्रथा आहे की बजेट भाषणाची प्रत सभागृहात कधी दिलेली नाही. भाभी ज्योती कलानी आपले भाषण वाचुन दाखतील ते कृपया सर्वांनी शांततेने ऐकुन घ्यावे. त्यानंतर त्यावर चर्चा करून बजेट मंजुर करूनच आपण येथुन जावू.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-मा. महापौर, मा. उपमहापौर ज्या आज अनुपस्थित आहेत, मा. आयुक्त , मा.सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, सर्व गटनेते, प्रभाग समित्त्याचे सभापती तसेच अन्य समित्त्याचे सभापती, सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका भगिनी, सर्व अधिकारी कर्मचारी पत्रकार बंधु.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- मा. महापौर एक सेंकंद, पाणी पुरवठ्याबाबत आपण चर्चा करणार होतो...

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- मा. महापौरजी, सभा सुरू होण्यापुर्वी आपण चर्चा करणार होतो...

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आपण बोलला होतात, आपण आपले वक्तव्य का बदली करत आहात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- मा. महापौर, भाषण मध्येच थांबविणे ठिक नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आपण नेहमी निवेदन बदली करत आहात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-महापौरजी, आपण वेळोवेळी निवेदन का बदलता?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:- मा. महापौरजी, यानंतर चर्चा करू.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-परंतु याची इतिवृत्तात नोंद येईलच जे आपण बोलले होते ते....

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-बजेट मंजुर होतच राहील परंतु उल्हासनगरची जनता पाणी पुरवठयाबाबत हैराण आहे................

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-सचिव साहेबांना विचारा, काय बोलले होते?



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-सचिव साहेब, आपण म्हंटले, ते काय म्हंटले होते?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-असे सांगितले होते की, बजेटच्या सभेमध्ये त्याचा खुलासा केला जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-असे आपण म्हंटले होते सभा सुरू होण्या अगोदर खुलासा करू.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सुरू होण्या अगोदर नाही, बजेटच्या सभेत याचा खुलासा केला जाईल असे म्हंटले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- टेपमध्ये असे आहे का?

मा. सचिव :-यामध्ये दुमत नाही.
मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-ठीक आहे. परंतु खुलासा करा,

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-प्रथम पाण्याचा मुददा घ्या.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-सन्माननिय सदस्य हो, बजेटचे हे जे भाषण आहे, आपल्या समोर आम्ही जो बजेट ठेवत आहोत तो सुरू झाला आहे, व त्यामध्ये पाण्याचा सुध्दा एक रकाना आहे, आपणासमोर बजेट सादर केल्यानंतर पाण्याची जी समस्या आहे त्याबाबत आपण विचारू शकता.

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते, प्रभाग समित्त्यांचे सभापती अन्य समित्त्यांचे सभापती सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, सर्व अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधु तसेच उपस्थित नागरीक, बजेटच्या या विशेष सभेत आपणा सर्वांचे स्वागत आहे. या महासभेत ३-यांदा बजेट सादर करण्याचे भाग्य मला प्राप्त झाले आहे. अशी संधी फारच कमी लोकांना मिळते. मी आभार मानते शहरातील नागरिकांचे, तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविकांचे ज्यांनी माझ्यापक्षावर विश्वास ठेवला व ही संधी दिली. खाजगी क्षेत्रात व्यापारी तसेच औदयोगिक क्षेत्राचा समावेश होतो. सार्वजनिक क्षेत्रात प्रशासकीय, निमशासकीय क्षेत्राचा समावेश होतो. निमशासकीय क्षेत्रात नगरपालिका तसेच महानगरपालिकेचा समावेश होतो. या संस्थाच्या विविध प्रकारच्या समस्या एक सारख्याच आहेत ज्यामध्ये मुख्य हे आहे की उत्पन्न मर्यादित तर खर्च अमर्यादित या सर्व समस्यांचे निवारण करण्यासाठी ज्या यंत्रणेची स्थापना झाली ती आहे बजेट. ब-याच कालावधी पूर्वी बजेटला नियंत्रणाचे साधन मानले जात होते. परंतु आजच्या काळात बजेटला नियोजनाचे साधन मानले जाते. उपलब्ध साधनांचा योग्य व काटकसरीने उपयोग करून जनहितासाठी सुविधा उपलब्ध करून देणे हा बजेटचा मुख्य उददेश आहे. चालु वर्ष २००२-२००३ करिता तयार केलेल्या १५७८९कोटी रूपयाचे उत्पन्न तसेच १५७८४ खर्चाच्या अंदाजास, कमी वसुली झाल्यामुळे सुधारित करून ११९.१६ कोटी रूपयाचे उत्पन्न तसेच ११८.९२ कोटी रूपयांचा खर्च सिमीत करण्यांत आला आहे.

वर्ष २००३-२००४ या वित्तिय वर्षासाठी प्रशासनामार्फत १४९. ४६ कोटी रूपयांचे उत्पन्न तसेच १७१.९८ कोटी खर्चाचा अंदाज सादर करताना २३. ५२ कोटी रूपयांची तुट दर्शविली होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी ज्यामध्ये विरोधी पक्षाचे सदस्य सुध्दा सहभागी आहेत त्यांनी फेरबदल करून बजेट तयार केला आहे. त्याचे विवरण या प्रमाणे आहे.



| | प्रशासकीय अंदाज | स्थायी समितीचा अंदाज |
|---|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | २४ लाख | २४ लाख |
| जकात | ५७. ४६ कोटी | ५७. ४६ कोटी |
| मालमत्ताकर | ५० कोटी | ५० कोटी |
| पाणीपुरवठा | २० कोटी | ४० कोटी |
| अनुदाने | ७. ६९ कोटी | ७. ६९ कोटी |
| कर्ज | २. ३५ | २. ३५ कोटी |
| संकीर्ण खर्च | १०. ७२ | १०. ४८ कोटी |
| हे खर्च मिळुन | १४८. ४६ कोटी | १६८. २२ कोटी |

प्रशासनामार्फत सुचविण्यांत आलेले मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी दरामध्ये वाढीच्या प्रस्तावास मा. सदस्यांनी एकजुट होवून नामंजुर केले आहे.

याचबरोबर शहरातील व्यापारी बंधु, ज्याचेकडे नळजोडणी नाही, त्यांची मागणी मंजुर करून, त्यांना आकारण्यांत येणारे ६० रू. प्रतिमहाचे बिल माफ करण्यांत येत आहे. काही कारणांमुळे प्रशासन वसुलीचे उदिष्ट साध्य करू शकला नाही. ही गोष्ट खरी आहे परंतु येणा-या वर्षामध्ये वसुलीचे उदिष्ट साध्य करण्यात प्रशासन यशस्वी होईल ही अपेक्षा व्यक्त करून स्थायी समितीचे मा. सदस्यांनी पाणी पट्टीचे लक्ष्य ४० कोटीचे ठेवले आहे. जे की,चालु वर्ष २००२-२००३ मधील लक्ष्य / उददीष्टा पेक्षा कमी आहे. शहरातील लोकांना कराच्या ओझ्या पासुन काही वेळेपर्यंत वाचविले जावु शकते हा उददेश लक्षात ठेवून हे उदिष्ट साध्य करण्याची जबाबदारी प्रशासनावर सोपविण्यांत आली आहे. आम्हास विश्वास आहे की आपण सर्व सदस्य या निर्णयास मंजुरी दयाल.

मा. सदस्य श्रीम. किरण माने ५.४० वाजता सभागृहातून बाहेर पडल्या.

<u>खर्च बाजु:-</u>वित्तिय वर्ष २००३-२००४ मध्ये अपेक्षित १६८ कोटी मधील आवश्यक प्रशासकीय खर्च पाणी पुरवठा तसेच विकास कार्यासाठी करण्यांत आलेल्या तरतुदीचे विवरण मी आपल्या समोर ठेवत आहे.

प्रशासकीय खर्च :- ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीमुळे प्रशासकीय खर्चात फार मोठी वाढ झाली आहे. हे सर्वांना अवगत आहेच परंतु आमच्या महानगरपालिकेने योजनाबध्दरितीने मागील काही वर्षात पार्ट पेमेंट करून हे ओझे कमी करण्यामध्ये सफलता प्राप्त केली आहे. महानगरपालिका कर्मचा-यांना पगारच्या फरकाची रक्कम जवळ जवळ दिली गेली आहे. आता फक्त भविष्य निर्वाह निधीत जमा करावयाच्या रक्कम दयायची बाकी आहे. या रक्कमेसाठी २००३-२००४ च्या बजेटमध्ये रू. <u>१०००/-</u> प्रती कर्मचारी या हिशाबाने फंड उपलब्ध केला आहे. येणा-या वर्षामध्ये कर्मचा-यांना देण्यात येणा-या Arrears / थकबाकीचे देणे पुर्ण होईल अशी आम्ही अपेक्षा करतो.

१. पगार पेन्शन भत्ते :-तसेच प्रशासकीय खर्चासाठी २९. ५० कोटी रूपयांची तरतुद केली आहे. आम्ही आमच्या कार्यकालामागील काही वर्षामध्ये कर्मचा-यांच्या संबंधित सर्व महत्त्वाच्या मागण्या पुर्ण केल्या आहेत. अशा परिस्थितीत जनहित लक्षात घेवून कर्मचा-यांवर सोपविण्यांत

आलेली कामे ते कार्यकुशलतेने पार पाडतील अशी अपेक्षा आम्ही त्यांच्याकडुन करतो.

२. पाणी पुरवठा :-आम्ही मागील वर्षाचा अंदाज सादर करताना असे आश्वासन दिले होते की एम.आय.डी.सी कडुन आकारण्यांत आलेले विलंब शुल्क रदद करण्यासाठी आमचे आमदार मा. श्री. सुरेश (पप्पु) कालानी यांचे प्रयत्न चालु आहेत. आम्हास हे सांगण्यांत आनंद होत आहे की, ते प्रयत्न यशस्वी झाले आहेत व एम.आय.डी.सी ने विलंब शुल्क रदद केल्या बाबतचे लेखी पत्र महानगरपालिकेला दिले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा योजना पुर्ण होण्याची शहरवाशीय प्रतिक्षा करत आहेत, ती प्रतिक्षा जवळ



जवळ संपत आली आहे. या योजनेनुसार तयार होणा-या टाक्यामध्ये ट्रायल

बेसीसवर / चाचणी पध्दतीवर पाणी भरण्याचे काम सद्या चालु आहे व योजना एप्रिल २००३ मध्ये कार्यान्वीत होईल. एम.आय.डी.सी. चे पाणी बिल देण्यासाठी २८ कोटी रूपयांची तरतुद केली आहे.

३. रस्ते / पुल विकास :-आपण सर्वजण जाणता की शहराची प्रतिमा तयार करण्यासाठी मजबुत पायाभुत सोयी (इन्फास्टक्चर)म्हणजे. रूंद रस्ते व पुल इत्त्यादी असणे आवश्यक आहे. माझे भाग्य आहे की माझ्याच कार्यकालामध्ये सुरू केलेले रस्ते पुलांच्या विकासाचे काम पुर्ण होत आहे, श्रीराम सिनेमा जंक्शन पवई पुल, उल्हासनगर स्टेशन उडडाणपुल तसेच वाको जंक्शन ते मानेरा जंक्शन यांचे कामाची गती पहाता आपण अंदाज करू शकता की आता थोडयाच दिवसाची गोष्ट आहे. ऐवढेच नाही तर या रस्त्त्यावर वाहतुकीस अडथळा आणणारे विद्युत पोल तसेच ट्रान्सफार्मर इत्त्यादी हटविण्याचे काम सुध्दा काही दिवसात पुर्ण होईल.

वाहतुक नियमानुसार सर्व रस्त्त्यांवर तसेच speed Brakers / दक्षता रोधक वर रंगाचे पटटे मारणे तसेच झेब्रा क्रॉसिगचे काम की जे प्रथमच केले आहे ते सुध्दा अंतिम टप्यात आहे.

रस्ते तर तयार केले परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याची वेळेवर देखरेख दुरूस्ती करणे. येणा-या वर्षाचे अंदाजपत्रकात या रस्त्त्याच्या दुरूस्तीसाठी १ कोटी रूपयांची तरतुद केली आहे.

मागील वर्षी आम्ही ६ नवीन रस्त्त्यांच्या विकासाची योजना तयार केली होती परंतु हाती घेतलेल्या रस्ते विकास कार्यक्रम पुर्ण होण्यामध्ये जास्त वेळ लागल्यामुळे त्या रस्त्त्याचे काम सुरू होवू शकले नाही ते प्रयत्न चालु ठेवत आम्ही पुढील वर्षात खालील रस्त्त्याचा अनुक्रमांक निहाय विकास करण्याची योजना आखली आहे. व त्यासाठी ५ कोटी रूपये मंजुर केले आहेत.

**मा. सदस्या श्रीम. प्रेमा खांडेकर ५. ५५ वाजता सभागृहातुन बाहेर पडल्या.**

१. सीरू चौक ते बाशाराम अपार्टमेंट उल्हासनगर-२
२. बेवस चौक ते हीलव्हयु अपार्टमेंट उल्हासनगर १
३. साधूबेला हायस्कुल ते मोती अपार्टमेंट मार्गे हनुमान मंदीर उल्हासनगर.१
४. क्रांतीनगर शेरावाली अपार्टमेंट ते बॅरेक नंबर १९०९ उल्हासनगर-५
५. कॅनेरा बॅक ते सेक्शन २६ मार्गे मानेरा रोड गुरू रानी आश्रम उल्हासनगर ४
६. हनुमान मंदिर ते ई.एस.आय.एस. हॉस्पीटल गेट उल्हासनगर-२
७. सोनसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक रोड उल्हासनगर २

८. ओ.टी. सेक्शन कमला नेहरू नगर ते मुरबाड रोड उल्हासनगर-२
९. राधास्वामी सस्तंग हॉल के पास Culvert उल्हासनगर-३
१०.रना टेंडींग कंपनी ते खुनी खड्डा मार्गे एस.ई.एस. स्कुल उल्हासनगर-१
१०. सिंग हाऊस ते पानी पुरवठा ऑफिस उल्हासनगर-४
११. टागोर सोसायटी ते उड्डाण पुल उल्हासनगर-४
१२. अशोक सिनेमा ते खेमीडाईंग कंपनी च्या समोर मनीषा नगर मार्गे
दसरा मैदान उल्हासनगर-३
१३. अंबिका मंदिर ते उड्डाण पुल उल्हासनगर-४
१४. रामायणनगर ते ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-३
१५. शिवाजी चौक ते संतु बिल्डींग उल्हासनगर-३

बांधकाम विभागासाठी एकुण ३४.०६ कोटी रूपये ठेवले आहेत.



४. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंन्ट / घनकचरा कृती आराखडा
प्रत्येक क्षणाक्षणाला निर्माण होणारा कचरा शहरातील काही डंम्पींग ग्राऊंडवर डंम्पींग केला जातो. केन्द तसेच राज्य सरकारच्या नियमानुसार निर्माण होणा-या या कच-याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. या नियमानुसार २००३-२००४ या वर्षात बंदगाडी, बंद कचराकुडी तसेच घंटागाडी या माध्यमातुन कच-याची वाहतूक करण्याची योजना आहे. महानगरपालिकेने याकामी निविदा मागविल्या आहेत. याकामासाठी ३ कोटी रूपयांची तरतुद केलेली आहे.

५. फायर फायटींगः-महानगरपालिकेच्या अग्निशामन विभागास आणखी मजबूत करण्यासाठी एक गाडी उपलब्ध करून देण्याची योजना आहे. गाडीच्या चेसीससाठी आवश्यक ती रक्कम कंपनीत जमा केली आहे. चेसिसवर फायब्रीकेशन करण्यासाठी १७ लाख रूपयांची तरतुद केली आहे. आगीपासुन संरक्षण करण्यासाठी साहित्य खरेदी करणेसाठी २० लाख रूपये तसेच अग्निक्षमन इमारत दुरूस्ती, देखभाल व नुतनीकरण यासाठी ३५ लाख रूपये ठेवले आहेत.
६. फॉगींगमशिन :-शहरामध्ये मच्छरांची समस्या तसेच मलेरीया प्रतिबंधक उपायानुसार दोन नविन फॉगींगमशिन उपलब्ध करून देण्याची योजना आगामी वित्तीय वर्षात आहे. हया गाडया खरेदी करण्यासाठी १५ लाख रूपयांची अदांजपत्रकात तरतुद केली आहे.
७. भुयारी गटार योजनाः-महानगरपालिकेकडे भुयारी गटार साफसफाईसाठी एक jetting machine fitted गाडी आहे. या विभागाची आवश्यकता लक्षात घेता आणखी एक नविन गाडी खरेदी करण्यासाठी २५ लाख रूपयांचा निधी मंजुर केला आहे.
८. उद्याने विकासः-रस्ते विकास कार्यक्रमानुसार शहरातील मुख्यरस्त्यांचे दोन्हीबाजुस वृक्षारोपण केले आहे. शहराचे सौदर्य राखण्यासाठी प्रभागातील प्रत्येक उद्यानाचे सुशोभीकरण करण्यासाठी सर्वसाधारण निधी तसे प्रभाग समित्यांमार्फत १३४ लाख रूपयांची तरतुद केली आहे.
९. सौर उर्जा व पवनचक्कीव्दारे निर्माण होणारी विजव्यवस्थाः- एम.एस.ई.बी. च्या वाढत्या बिलापासुन थोडी राहत मिळण्यासाठी महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या काही भागामध्ये विद्युत पुरवठा करण्यासाठी केंन्द्र सरकारच्या साहयतेने २७ लाख रूपये खर्चाचा सौर उर्जा प्रकल्प मंजुर केला आहे हा प्रकल्प सुरू होताच १५००० युनीट विजेचे प्रत्येक वर्षी उत्पादन होईल.
१०.महापौर, उपमहापोर, स्थायी समिती सभापती निधी

महापौर निधी ५० लाख, उपमहापौर निधी २५ लाख स्थायी समिती सभापती निधी २५ लाख नेहमी प्रमाणे ठेवण्यांत आला आहे परंतु स्थायी समिती तसेच अन्य काही सदस्यांनी हया निधीचा उपयोग करण्याची एक नविन सूचना दिली आहे ती या प्रकारची आहे.

अ) सभागृहाचे वातानुकूलीकरण रू. . ७० लाख

ब) महापौर बंगला रू. १० लाख

क) आयुक्त बंगला रू. १० लाख

ड)नामनिदेशित सदस्य निधी रू. १० लाख

११. नगरसेवक निधी

शहरामधील सर्व प्रभागातील अंतर्गत रस्ते तसेच पॅसेज यांचे सिमेंट कॉक्रटीकरण करण्यांत आलेले आहे. तरीही आपल्या प्रभागामध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासकीय नियमानुसार ३. ७५ लाख रू. प्रत्येक नगरसेवकास निधी मंजुर केला आहे.

१२.कर्ज परतफेडः- महानगरपालिकेने घेतलेली अनेक प्रकारची कर्ज जसे की पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना, हुडको तसेच एम.एम.आर.डी ए. इत्यादीच्या कर्जाच्या परतफेडीसाठी २५. ९२ कोटी रूपयांची तरतुद करण्यांत आली आहे.



१३. प्राथमिक शिक्षण :- शहरातील गरीब मुलांना प्राथमिक शिक्षण महानगरपालिकेव्दारे चालविण्यांत येणा-या शाळेतुन दिले जाते. या शाळांची सुव्यवस्था राखण्यासाठी शिक्षण मंडळावर निवडणूक आलेल्या नविन सदस्यांनी दाखविलेल्या आवश्यकतांच्या आधारावर प्राथमिक शिक्षणासाठी ५. ७५ कोटी रूपयांची तरतुद केली आहे.

भारतीय क्रिकेट संघ वल्डकप, जिंकेल अशी आम्हास खात्री आहे आणि यासाठी आपणा सर्वांच्या शुभेच्छा त्यांच्यापाठीशी आहेत. त्याचबरोबर स्थायी समितीचे सन्माननिय सदस्यांनी एकमताने तयार केलेल्या या बजेटमध्ये कोणत्त्याही प्रकारची कर वाढ केलेली नाही. महासभेचे सर्व सदस्य एकजुट होवून यास अंतीम स्विकृती देतील अशी सुध्दा मी अपेक्षा करते.

माझ्या कार्यकालात सर्व पदाधिकारी तसेच अधिका-यांनी मला सहकार्य दिले मार्गदर्शन केले. यासाठी मी त्यांची आभारी आहे.

जयहिंद. जयमहाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः</u>-महापौर महोदया, आयुक्त, सभापती स्थायी समिती, आपण हे जे भाषण केले, की ज्या दुकानदारांकडे नळजोडणी नाही त्या दुकानदारांचे पाण्याचे बिल माफ केले जात आहे. स्थायी समिती मध्ये आम्ही दोन मुदयांवर हरकत घेतली होती. आम्ही असे म्हंटले होते की ज्या झोपडपटटीमध्ये पाणी येत नाही त्यांच्याकडुन सुध्दा पाणी बिलाची रक्कम वसुल केली जावू नये व ज्या स्लम आहेत जेथे पाणी येत नाही त्यांचे पाणी बिल सुध्दा माफ केले जावे. या मुदयांचा त्यावेळी काही खुलासा केला नव्हता. त्यावेळी आपण आम्हास आश्वासन दिले होते की, महासभेमध्ये आम्ही याबाबत खुलासा करू. त्यावेळी आपण आम्हास सांगितले होते की बजेट एकमताने मंजुर केला जावा. आम्ही आपल्यावर भरोसा ठेवून त्यावेळी बजेट एकमताने मंजुर केला होता. मी भाभी ज्योती कालानी यांना विचारू इच्छितो की याबाबत आपले काय उत्तर आहे. कारण की तेथे आम्ही हे प्रश्न उपस्थित केले होते.

**मा. सदस्य श्री. मोहन बहरानी सभागृहात बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-मा. महापौरजी, स्थायी समिती अध्यक्षा , आयुक्त साहेब, व सभेचे सर्व सदस्य यापुर्वी जेव्हा दुकानदारांवर पाण्याचे बिल जबरदस्तीने लावले गेले होते. फ्लॅटधारकांवर बिल लादले गेले झोपडपटटी वासियांवर लादले गेले त्यावेळी झोपडपटटी प्रभागातुन निवडुन आलेल्या सदस्यांनी अशी मागणी केली होती की झोपडपटटयांमध्ये नळजोडण्या नाहीत ही बिले

कोणत्त्या पध्दतीने आकारली जातात. त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते प्रत्येक झोपडपटटीमध्ये आम्ही १०-१०सार्वजनिक नळ लावु. (comman tap लावु)ज्या झोपडपटटी धारकांकडे नळ नाही. परंतु बिल भरण्यास बाध्य आहेत. त्यांनी सार्वजनिक नळावरून पाणी भरू शकतील परंतु २ वर्षामध्ये असे काहीही पाऊल उचललेले नाही. व गरीब जनतेवर पाण्याचे बिल लादले जात आहे. भारतीय जनता पार्टीच्या हस्ताक्षर मोहीमेनंतर दुकानदारांचे पाणी बिल माफ केले आहे. आमची मागणी स्विकारली आहे म्हणुन मी स्थायी समिती अध्यक्षाचे आभार मानतो. मी निवेदन करतो की, गरीब जनतेवर जे ओझे लादले जात आहे. त्याबाबत विचार केला जावा. जेणेकरून जे लोक पाण्याची नळ जोडणी नसतानाही पाणी बिल भरतात. ते त्यातुन मुक्त होवू शकतील.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>सन्माननिय महापौर, सन्माननिय स्थायी समिती अध्यक्षा मा. आयुक्त साहेब याठिकाणी सन्माननिय बच्चाराम रूपचंदानी यांनी झोपडपटट्यामधील ज्या लोकांना पाण्याचे बिल विनाकारण आकारले आहे. त्याबाबत स्थायी समितीमध्ये मी स्वत: हा मुददा घेतला होता. त्याठिकाणी आम्हाला आश्वासन देण्यांत आले होते की, दुकानदारांचे बिल ज्याप्रमाणे माफ करण्यांत आले. त्याप्रमाणे याचे बिलाबाबत सुध्दा महासभेत खुलासा होईल व बिल शिथील करण्यांत येणार आहे. त्याचबरोबर एक महत्त्वाचा मुददा आम्ही त्याठिकाणी मांडला होता तो मी येथे निर्दशनास आणुन देवू इच्छितो. बजेट वाचुन दाखवत असताना सन्माननिय विनोद



तलरेजा हे पास पास म्हणत होते. त्यावेळी आम्ही म्हंटले होते की, याचा महासभेत खुलासा झाला पाहिजे. तुम्ही येथे अती घाई करून पास करता हे ठिक आहे पण त्याचबरोबर महानगरपालिकेवर विनाकारण जो खर्च लादला जात आहे. जम्बोजेट प्रमाणे याठिकाणी काही विशेष समित्त्या, तुम्ही नेमल्या आहेत, त्यामध्ये काही समित्त्या तुम्ही कमी करणार आहात का? त्यावर स्थायी समितीमध्ये श्री. विनोद तलरेजा यांनी सांगितले की, काही समित्त्या हया निष्कारण झालेल्या आहेत त्यावर जो महापालिकेचा खर्च होतो तो खर्च करण्यासाठी आम्ही काही समित्त्या कमी करणार आहोत.  सन्माननिय महापौर मी आपणांस विनंती करू इच्छितो की, किती विशेष समित्त्या यांनी कमी केलेल्या आहेत त्याचा खुलासा या ठिकाणी करण्यांत यावा, विशेष समित्त्या?

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u>मा. महापौर, पाण्याच्या प्रश्नाबाबत आताच दोन तीन नगरसेवकांनी चर्चा केली. ज्याप्रमाणे व्यापारी लोकांची, दुकानदारांची पाणी बिले माफ केली त्याप्रमाणे पुष्कळशा अशा ऐरिया, उल्हासनगरमध्ये आहेत. तेथे नळाला पाणी येत नाही. त्याच्यावर सुध्दा मिळकत करामध्ये पाणी बिल आकारले आहे. ज्याच्या घरामध्ये पाणी येत नाही त्यांनी पाणी बिल का भराव? ज्याच्याकडे पाणी येते त्यांच्याकडे भरपुर आहे परंतु जेथे पाणी येत नाही तेथे अजिबातच पाणी नाही आणि दुसरी गोष्ट अशी आहे की ज्या ऐरियामध्ये पाणी कमी दाबाने येते त्यांना विद्युत मोटार लावून पाणी खेचुन घ्यावे लागते. त्यामुळे त्यांना मोठ्या रक्कमेची विजेची बिले भरावी लागतात. जेथे नळाला पाणी येत नाही किंवा कमी येते अशा विभागाचा सर्व्हे करून त्यांना पण पाणी बिल माफ कराव. याबाबत मागे एकदा मी महासभेमध्ये बोललो होतो की ज्यांना पाणी येत नाही त्यांनी पाणी बिल का भराव? कारण पाणी मिळण्यासाठी ते भटकत असतात. माझ्या प्रभागात सद्या प्रायव्हेट बोरींग मारण्याचे काम चालु आहे.  हया बोरींगवरून पाणी घेणा-याकडुन बोरींगवाले दरमहा १०० ते १५० रू. बिल आकारतात. तर अशा लोकांनी प्रायव्हेट बोरींगवाल्यांचे व महापालिकेचे बिल का भराव? महापालिकेचे नळावरील दोन दोन हंडे पाणी आणण्यासाठी ते इकडे तिकडे भटकत असतात. ज्यांच्याकडुन मिळेल त्यांच्याकडुन पाणी भरण्यासाठी ते फिरत असतात. प्रायव्हेट बोरींगचे बिल भरून त्यांनी महानगरपालिकेचे पाणी बिल का भरावे? ज्या विभागात अजिबात पाणी पुरवठा होत नाही किंवा कमी होतो तेथील लोकांना विजेचे जादा बिल भरावे लागते. तर अशा विभागांचा सर्व्हे करून तेथील लोकांचे

पाणी बिल माफ करण्यांत यावे ज्याप्रमाणे व्यापारी लोकांना पाणी मिळत नाही म्हणुन त्याचे पाणी बिल माफ केले त्याप्रमाणे यांचेसुध्दा पाणी बिल माफ करण्यांत यावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा. महापौर, स्थायी समिती अध्यक्षा, आयुक्त साहेब व सहकारी हो, माझ्या सहका-यांनी पाणी बिलाबाबत म्हंटले आहे. त्याच्याशी मी सहमत आहे. त्या विषयाबरोबरच पुर्ण बजेटची जी रचना आहे त्याबाबत काही सांगु इच्छितो. आम्हाला वाटत होते की, आम्हाला बजेटचे भाषण मिळावे कारण की हा जो बजेट आहे त्यात येणा-या पुर्ण वर्षाचा कार्यक्रम असतो असे त्यांनी म्हंटले काही काही शब्द आम्हास ऐकु आले, नियोजन करावे लागते, बजेट म्हणजे नियंत्रण नव्हे तर ते नियोजन आहे तर आम्हाला वाटते की, शहर विकासासाठी आपले तर आम्हास वाटते की शहर विकासासाठी आपले नियोजन काय आहे? बजेट भाषणाची प्रत देण्याची प्रथा सर्व ठिकाणी असते. भलेही लोकसभा असो, विधानसभा असो किंवा अन्य महापालिका असोत त्यामध्ये स्थायी समितीच्या अध्यक्षांचे भाषण झाल्यानंतर त्याच्या प्रती सदस्यांना वितरीत केल्या जातात. त्यानंतर चर्चा होते आपण ती प्रत दिली नाही कदाचित त्याचा अर्थ हा सुध्दा होतो की यावर मोकळया मनाने चर्चा व्हावी असे आपणास वाटत नाही. प्रत दिली नाही तरी त्याबाबत आम्ही चांगल्या प्रकारे चर्चा करू शकतो. असे आम्ही मानतो हा जो बजेट आपण सादर केला, भाषण वाचून दाखविले. ते ऐकण्यामध्ये तर फार चांगले वाटते. जेव्हा बजेट सादर केला जातो तेव्हा मोठी सोनेरी स्वप्ने शहरवासियांना दाखविली जातात व जसे वर्ष संपत येते तेव्हा तो स्वप्नाचा महाल पत्त्यासारखा कोसळुन पडतो व १५७ कोटीचा बजेट कमी कमी होत ११९ कोटीचा होतो. व शहराचा काहीही



विकास होत नाही. मागील वर्षी १५७ कोटीचा बजेट तयार केला होता व वर्षाच्या शेवटी सांगण्यात आले की हा जो बजेट आहे तो ११९ कोटीचा आहे. आम्हाला वाटत होते की, आम्हाला आपल्या भाषणाची प्रत मिळाली परंतु ती मिळाली नाही. स्थायी समितीमध्ये सदस्यांना ज्या नोटीस दिल्या जातात. गोषवारे दिले जातात व काही गोषवारे सभागृहापासुन लपवुन ठेवले जातात ते गोषवारे सभागृहात दिले नाहीत. उदाहरणा दाखल मी आपणास सांगु इच्छितो की, जेव्हा बजेट स्थायी समितीत चर्चेस आला होता तेव्हा पहिली जी ८ पाने आहेत ती पाने कोणत्याही नगरसेवकास वितरीत केलेली नाहीत. माझ्याकडे त्यांची प्रत आहे. त्यामध्ये हे दाखविण्यात आलेले आहे की महानगरपालिकेवर किती कर्ज आहे. सांगायला तर असे सांगितले जाते की आमचा बजेट शिल्लकी बजेट आहे. पहिल्या दिवशी तो खुप चांगला वाटतो. पत्रकार वर्तमानपत्रामध्ये बातमी छापुन आणतात की उल्हासनगर महानगरपालिकेचा शिल्लकी अर्थ संकल्प सभागृहात मंजुर केला. या बजेटमध्ये हे सुध्दा यावयास पाहिजे होते की, आमच्या महानगरपालिकेवर किती कर्ज आहे. मागील वर्षी आम्ही किती कर्ज दिले? यावर्षी किती कर्ज रक्कम फेडणार आहोत? स्थायी समितीमध्ये प्रशासनाच्या वतीने जेव्हा हया बाबत प्रशासनामार्फत गोषवारा आणण्यांत आला होता. त्यामध्ये हे सुध्दा दर्शविण्यांत आले होते की, आमच्या महानगरपालिकेवर किती कर्ज आहे. मागील वर्षी आम्ही किती कर्ज दिले? यावर्षी किती कर्ज रक्कम फेडणार आहोत? स्थायी समितीमध्ये प्रशासनाच्या वतीने जेव्हा हया बाबत प्रशासनामार्फत गोषवारा आणण्यांत आला होता. त्यामध्ये हे सुध्दा दर्शविण्यांत आले होते की, आमच्या महानगरपालिकेवर किती कर्ज आहे. १४८.४८ कोटी रू. कर्ज आहे. त्यामध्ये एम.आय.डी.सी. चे पाणी बिल आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-श्री. लाल साहेब किती कर्ज आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-१४८ कोटी, तर सांगायला तर असे सांगितले जाते की, हा शिल्लकी अर्थसंकल्प आहे. परंतु वास्तविकता आपण पाहिली तर असे

दिसन येईल की हा बजेट नसुन तुट आहे. कारण की आम्ही कर्ज परतफेडीचे त्यांना पैसे देवु इच्छित नाही किंवा कमी पैसे देत आहोत. त्यासाठी आम्ही आकडे सांगत नाही. व लोकांची दिशाभुल करतो मागील वर्षी अशी तरतुद ठेवली होती की एम.जे.पी ला १० कोटी देवू. (अण्डर ग्राऊंड ड्रेनेजचे) परंतु प्रत्यक्षात १ पैसा सुध्दा दिला नाही. एम. जे.पी. ला पाणी पुरवठा कर्जामधुन आम्ही ९ कोटी ७९ लाख रू. आम्ही देवू ९ कोटी त्या ऐवजी आम्ही दिले १ कोटी ७८ लाख तर हे जे आकडे आहेत ते सदस्यांपासुन शहरवासियांपासुन लपवुन ठेवले जातात. व फक्त कागदोपत्री हा शिल्लकी अर्थसंकल्प आहे. असे दाखवुन सादर केला जात आहे. बजेट पुर्ण न झाल्यामुळे त्याचा परिणाम होतो... आम्ही मागच्यावेळी सुध्दा सांगितले होते की हा बजेट वस्तुस्थिती दर्शक नाही. दाखविण्यासाठी आकडे दाखविले जातात की पाणी पुरवठा विभागातून ४० कोटी येतील. मालमत्ता करापोटी ४० कोटी येतील परंतु वास्तविकता ही आहे की आम्ही जर हे सर्व रेकॉर्ड पाहिले तर असे दिसुन येईल की, आज सुध्दा येणा-या बजेटमध्ये आम्ही दर्शविले आहे की पाणी पटटीची ४० कोटीची वसुली होईल व मालमत्ता करापोटी ५० कोटी रूपयांची वसुली होईल परंतु आज पर्यंतचे रेकॉर्ड पाहिले तर असे दिसुन येईल की १९९८-९९ पासुन २००३ पर्यंत..

पाण्याची वसुली झाली आहे ती फक्त १६ कोटी लोकांची दिशाभुल करण्यासाठी आम्ही मोठमोठे आकडे दर्शवितो याबाबत आणखी काही उदाहरण देतो येथे असे दर्शविण्यांत आले की यावर्षी आम्ही अमुक अमुक हे रस्ते तयार करणार आहोत, पवनचक्कीवर उर्जा तयार होईल, हेच भाषण..... मी आपणास सांगु इच्छितो की हेच रस्ते आज सुध्दा आहेत. त्यावेळेला सांगण्यांत आलेले रस्ते तेच रस्ते आता पुन्हा दर्शविले आहेत. सिरू चौक ते बाशाराम अपार्टमेंट उल्हासनगर २ बेवस चौक ते हीलव्हु अपार्टमेंट उल्हासनगर १, साधुबेला हायस्कुल ते मोती अपार्टमेंट मार्गे



हनुमान मंदीर उल्हासनगर १ हे जे रस्ते आहेत ते मागच्यावर्षी सुध्दा सांगितले होते. परंतु त्या रस्त्यापैकी एकही रस्ता तयार झाला नाही. तर या ज्या गोष्टी आहेत बोलण्यासाठी भाषण करण्यासाठी चांगल्या आहेत परंतु प्रत्यक्षात जे काम आहे ते होत नाही. हा जो बजेट आहे तो पुर्णपणे वस्तुस्थितीच्या विपर्यस्त आहे. मी आज सुध्दा दाव्यानिशी सांगत आहे. मागच्यावेळी सुध्दा मी सांगितले होते की, ऐवढी वसुली होवू शकणार नाही. भलेही आपण दाखविण्यासाठी हा बजेट १६८ कोटीचा केला आहे. परंतु हा आकडा विशेष करून जे उत्पन्न आहे ५० कोटी व ४० कोटी पाणी पुरवठा विभागातुन, ते पुर्ण होणार नाही. व हे आकडे फक्त बजेट संकलित करण्यासाठी आहेत. जर आपणांस खरोखरच बजेट करायचा होता तर, मी सांगितले की, वसुली कमी झाल्यामुळे शहरातील विकास कामे रखडतात. प्रशासनावरील खर्च कमी करण्याकडे आपण कधीही लक्ष दिले नाही. व मी आपणांस सांगु इच्छितो की, प्रशासनावरील खर्च दिवसेंदिवस वाढून यावर्षी २६ कोटी झाला आहे. मागील वर्षी तो २१ कोटी होता त्याअगोदर १९ कोटी होता. त्याअगोदर १६ कोटी होता. १९९९ मधील बजेट पहाता ऐ बजेट मधील प्रशासनिक खर्च १६ कोटी नंतर १९ कोटी, २००१-२००२ मध्ये २१ कोटी झाला. यावर्षी आम्ही जो प्रस्तावित केला आहे. तो प्रशासनावरील खर्च आहे २६ कोटी रू. आमचा विकास निधी कमी कमी होत चालला आहे. मागच्यावर्षी आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागावर ३२ कोटी रूपये खर्च करण्याचे जाहीर केले होते. तो खर्च कमी होत २१ कोटी झाला. सामान्य प्रशासनावर खर्च वाढवत आहात. व शहरातील विकास कामांवर... आम्हाला यासाठी दुःख होते की, बजेटचा आम्ही विरोध यासाठी करतो की, शहराच्या विकासासाठी आपण रक्कम कमी कमी करत चालले आहात. प्रशासनिक खर्च वाढवत चालला आहात म्हणुन आम्ही म्हणतो की शहराचा विकास करण्याकडे आपले लक्ष नाही. सार्वजनिक बांधकाम विभागावर मागच्या वर्षी आपणांस ३२ कोटी खर्च करायचे होते ते कमी करून आपण २१ कोटी खर्च केले व यावषी सुध्दा तो खर्च कमी

दाखविला आहे. भांडवली खर्च पाहिला तर उलट शहराचा विकास ठप्प होईल. पाण्याची गोष्ट चालली होती..... आमचे आयुक्त आता अतिरिक्त आयुक्त श्री. सोनवणे साहेब आहेत. ते पण आम्हाला सांगतात की,आता जलकुंभ तयार होत आहे. नविन पाणी पुरवठा योजना दोन तीन महिन्यामध्ये पुर्ण होईल. व आम्ही सुध्दा समजतो की, लवकरच पुर्ण होईल. आमची आपणांकडुन ही अपेक्षा आहे. वितरण व्यवस्था सुधारली जावी या शहरामध्ये पाण्याची कमतरता नाही. परंतु वितरण व्यवस्थेसाठी आपण खर्च कमी दाखविला आहे. उलट खर्च वाढविला आहे तर तो कुठे वाढविला आहे. टॅकरवर. १९९९ मध्ये टॅकरवर जो खर्च होता तो ५० लाख तो पुढील वर्षी झाला ५४ लाख व सन २००१-२००२मध्ये हा खर्च ८३ लाख झाला आहे. व आताचा खर्च आपण दिड कोटी रूपये खर्च करत आहात. टॅकर वरील खर्च आपण वाढवत चाललो आहोत. आणि यावर्षीच्या बजेटमध्ये सुध्दा आपण टॅकर वरील खर्च वाढवत चाललो आहोत. म्हणजे याचा अर्थ आपण जनतेस सांगु शकतो की या सत्ताधारी पक्षाकडुन नळाव्दारे पाणी मिळेल अशी अपेक्षा आपण बाळगू नका. टॅकरव्दारे पाणी मिळेल. अशी अपेक्षा ठेवा. कारण की टॅकर वर जो खर्च वाढवत चालले आहेत त्यावरून हे सिध्द होत आहे. आपण यावरील खर्च कमी करावयास पाहिजे होता. म्हणजे आपणांस सुध्दा विश्वास नाही की तीन महिन्यात वितरण व्यवस्थेत सुधारणा होणार नाही. व आम्हाला असे वाटत आहे की हे जे पाणी पुरवठा विभाग आहे त्याचे नाव टॅकर पुरवठा विभाग असे केले तर अधिक चांगले होईल कारण की यांचे सारस्य टॅकरमध्ये जास्त दिसुन येत आहे. टॅकरमध्ये काहीतरी जास्त सारस्य दिसते. त्यासाठी हे करत आहेत. म्हणुन आम्हाला वाटते की शहराला टॅकर मुक्त करण्यासाठी योजना तयार केली पाहिजे. टॅकरवरील खर्च वाढविण्यासाठीची नको. अशा गोष्टी ब-याच आहेत. रोडवर आपण १४ कोटी खर्च करण्याचे दर्शविले होते. व शेवटी त्यावर खर्च होतो ५ कोटी रू. माझे सहयोगी आपणांस आणखी काही सांगणार आहेत म्हणुन मी ऐवढेच सांगु इच्छितो की हा जो बजेट आहे तो वस्तुस्थितीच्या विपर्यस्त हेराफेरी केलेला व यामध्ये शहर विकास कार्यांवर वाजवी पेक्षा जास्त कपात केली आहे. त्यामुळे शहराचा काही विकास होणार नाही.

**मा. सदस्या श्रीम. सिमा मोकल ६.१० वाजता सभागृहातून बाहेर पडल्या.**



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>महापौर महोदया, बजेट भाषणामध्ये असे सांगण्यांत आले की, फायर ब्रिगेड साठी आम्ही ऐवढा खर्च करू. परंतु मला अत्यंत खेदाने असे म्हणावे लागत आहे की,नेताजी येथे जे फायरब्रिगेटचे ऑफीस आहे. ते बंद केले आहे. असे म्हंटले जाते की ती जी इमारत आहे ती कधीही पडु शकते. मला सांगण्यांस अत्यंत दुःख होते की त्या इमारतीचे बांधकाम १९८७ला सुरू झाले होते व १९९६ ला पुर्ण झाले. २००० मध्ये ती वापरात आणली. व २००१ मध्ये घोषित केले की धोकादायक इमारत आहे. आजपर्यंत तीची दुरूस्ती झालेली नाही. परंतु तरतुद ठेवण्यांत आली होती. जर फायरब्रिगेड स्टेशनसाठी जर तुम्ही काही करू शकत नसाल तर आता आपण जे आकडे दर्शविले आहेत त्याबाबत काय अपेक्षा करावी की यावर्षी ते होईल. आमच्या शहरात एकच फायर स्टेशन नेताजी चौक येथे आहे ते सुध्दा तयार केले जावू शकत नाही. १० लाख त्याच्या दुरूस्तीसाठी ठेवले होते त्यातील १ रू सुध्दा आजपर्यंत खर्च केला गेला नाही. व तेथील लोकांचे दुसरीकडे स्थलांतर केले आहे. आम्ही फक्त आकडे दर्शवत आहोत. १० लाख अमुक या गोष्टीसाठी ठेवले. मागच्या वर्षी भुयारी गटार योजनेसाठी एक गाडी खरेदी करण्याची तरतुद केली होती. परंतु आता दुस-या वर्षीचे अर्थसंकल्पीय भाषण सुरू झाले आहे तरीही मागील वर्षाची गाडी अदयाप आलेली नाही. फायर ब्रिगेडची जी आवश्यकता आहे. त्याकडे लक्ष दिले पाहिजे. परंतु आपण नुसते भाषणात म्हणाल की हे करायचे आहे ते करायचे आहे जसे की मागील वर्षी आपण बाशाराम अपार्टमेंटचा जो रोड तयार करण्याचे म्हंटले होते. व दुसरे जे रोड तयार करायचे होते त्या पुर्ण वर्षामध्ये एका सुध्दा रस्त्याचे काम चालु झाले नाही. ३३ रस्त्याचे काम आमच्या कालावधीमध्ये चालु

झाले होते. ते सुध्दा अदयाप आपण पुर्ण करू शकला नाहीत. माझी आपणांस ही विनंती आहे की, या बाबींकडे लक्ष दिले जावे. विशेष करून फायरब्रिगेडकडे जास्त लक्ष दिले जावे. कारण की ही खुप आवश्यक अशी बाब आहे. फायरब्रिगेट नसल्यामुळे कॅम्प ४ व ५ मध्ये आपत्ती निर्माण होवू शकते. सुधारीत अर्थसंकल्पापर्यंत फायरब्रिगेडच्या इमारतीची दुरूस्ती केली जावी.

<u>मा.सदस्य श्री. देंवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, जसे की आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हंटले की, आम्ही जी हस्ताक्षर मोहिम सुरू केली होती त्यासाठी भाभी श्रीमती. ज्योती कालानी यांनी त्यांना अतिशय चांगला प्रतिसाद दिला. तर याबाबतचे सारे श्रेय श्री. जमनादास यांनी स्वतःकडे घेतले आपल्या सहका-यांसाठी ते काही बोलले नाहीत ही चांगली गोष्ट नाही. व श्री. लाल पंजाबी साहेब यांनी सूचना दिली आहे की, टॅकरवर फार मोठया प्रमाणावर खर्च होत आहे त्यांना वाटत असेल तर टॅकर बंद केले जावेत. अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. महापौरजी, आम्हास वाटते की, नळाव्दारे पाणी यावे आपणांस समजत नाही काय करणार?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>महापौर महोदया, सर्व प्रथम आज हा जो बजेट स्थायी समिती अध्यक्षा भाभी ज्योती कालानी यांनी सादर केला आहे त्याचे आम्ही स्वागत करतो. कारण एक परंपरा चालत आली होती की नळ नसतानाही व्यापा-यांकडुन १२५ रू. पाणी बिल घेतले जात होते. त्यास आम्ही पहिल्याच वर्षी कमी करून ती रक्कम अर्धी केली. १२५ चे ६० रूपये केले. व दुस-या वर्षी पुर्ण रक्कम हटविली. मी या बजेटचे स्वागत यासाठी सुध्दा करतो की, कोणत्याही प्रकारची कर वाढ आम्ही केली नाही. जेथे १५-१५ दिवसांनी पेट्रोल डिझेल आणि गॅसच्या किंमती वाढत आहेत. मी या बजेटचे स्वागत यासाठी पण करतो की, सर्व विकास कामे दर्शावुनही जे रस्ते तयार झाले नाहीत ते रस्ते पुर्ण करण्यासाठी आम्ही योजना हाती घेतली आहे. की योजना आम्ही अर्धवट सोडणार नाही. आम्ही स्वागत करतो या बजेटचे त्याचबरोबर आम्हाला अपेक्षा नाही तर पुर्ण खात्री आहे की, हे जे येणारे वर्ष आहे ते आमचे आयुक्त श्री. सोनवणे साहेब यांचे आहे आम्ही जोरदार टाळयांनी त्यांचे स्वागत करतो. आमची एक मनोकामना पुर्ण झाली आहे. शहराच्या



विकासासाठी व समस्यांच्या सोडवणुकीसाठी दिवसरात्र जे मेहनत करत आहेत. त्यांना आज पुर्ण पणे कार्यभार मिळाला आहे जेणेकरून ते प्रत्येक विभागाचे काम अधिक चांगल्याप्रकारे करू शकतील. कामकाज पाहु शकतील. मी या बजेटचे स्वागत करतो व या बजेटचे स्वागत प्रत्येक शहरवासियांनी स्वागत केले पाहिजे कारण की हा एक संतुलित बजेट आहे. काही सोनेरी स्वप्न नाही जसे श्री. लाल पंजाबी यांनी म्हंटले या बजेटमध्ये कुठेही असे म्हंटले नाही की, सोन्याचे रस्ते तयार केले जातील. चांदीच्या बसेस चालवु असे कुठेही म्हंटलेले नाही. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळाले तर आम्ही अधिक चांगल्या प्रकारे या बजेटच्या माध्यमाने काम करू शकु. याचबरोबर मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, शिक्षण मंडळाकडे, आज आमच्या शहरातील सर्व शाळांची स्थिती दयनिय आहे. आमच्या शिक्षण मंडळामध्ये तीन-चार कोटी रूपये नेहमी बाकी असायचे. आधी नगरपालिकेच्या कालावधीत वीस टक्के रक्कम नगरपालिका देत होती व ८० टक्के अनुदान महाराष्ट्र शासनाकडुन दिले जात होते. परंतु जसे की मध्यंतरी राजकारण केले गेले. भाभी ज्योती कालानी यांची सत्ता संपुष्ठात आणण्याच्या इरादयाने या शहरामध्ये महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली. त्यामुळे ना आम्ही जकात कर भरण्यास मजबुर आहोत. तर शिक्षण मंडळावर जो आम्ही २० टक्के खर्च करत होतो तो आम्हास ५० टक्के दयावा लागत आहे. व ५० टक्के जी रक्कम

महाराष्ट्र शासनाकडुन आलेली आहे. व ती पगारापोटी खर्च झालेली आहे. जे तीन ते चार कोटी रू. शिल्लक रहात होते. ते सुध्दा खर्च झाले आहेत. परंतु आमचे आयुक्त श्री. पोखरकर जे होते ते वारंवार सांगत असायचे आपण खर्च करा आम्ही नंतर देवू. आज शिक्षण मंडळाची ही स्थिती आहे की आज त्यांना पगार चालविण्यास पैसे नाहीत. आज मुलांना बसण्यास बेंच नाहीत. शाळेची अत्यंत जर्जर अवस्था झाली आहे. आज महानगरपालिकेची आमची जी प्राथमिक जबाबदारी आहे. साफसफाई व पाणी याच बरोबर मुलांचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी सुध्दा आहे. त्यामुळेच आमचा भारत देश सोनेरी स्वप्न पाहु शकेल. शिक्षण मंडळाच्या बाकी ज्या हप्त्यांच्या रक्कमा राहिल्या आहेत. त्या रक्कमा आमचे श्री. रामनाथ सोनवणे साहेब अग्रक्रमानुसार अदा करतील. आज आम्ही चांगले सदस्य निवडुन दिले आहेत. ते दिवसरात्र मेहनत करत आहेत. त्यांच्यासमोर बरीच आव्हाने उभी केली आहेत. त्या आव्हानांमध्ये आपण त्यांना जर पुर्णपणे सहकार्य केले नाही तर कोणत्या प्रकारे शिक्षण मंडळाच्या समस्या सोडवाल अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करतो की यावर्षामध्ये आज आणि उदयाच जी त्यांची उर्वरीत रक्कम आहे. ती त्यांना अदा केली जावी. जेणेकरून शिक्षण मंडळाचे कार्य प्रगतीने पुढे चालु राहिल. त्याचबरोबर श्री. मुरली रोहडासारखे जे सभापती झाले आहेत. ते चांगले सभापती आहेत कार्यक्षम आहेत व खुपच चांगले प्रयत्न करत आहेत. शाळांच्या पहाणी करत आहेत. अशा सभापतीच्या अध्यक्षतेखाली शिक्षण मंडळ आणखी प्रगती करेल अशी मी त्यांना शुभेच्छा व्यक्त करतो. त्याचबरोबर भाभी ज्योती कालानी यांना पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद. जयहिंद. जय महाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, मा. स्थायी समिती अध्यक्षा व आयुक्त साहेब ब-याच दुःखाने म्हणावे लागत आहे की, जेव्हा भाभी ज्योती कालानी भाषण वाचुन दाखवित होत्या. तेव्हा मला असे वाटत होते की कदाचित भाभी ज्योती कालानी यांनी मागिल वर्षाचे भाषण तर चुकीने उचलले नाही ना? मी श्री. लाल पंजाबी व श्री. बच्चाराम रूपचंदानी यांना विचारले की भाभींकडुन काही चुक तर झाली नाही. ज्या रस्त्यांचा येथे तपशिल दिला जात आहे. ते तर मागील वर्षीच्या भाषणामध्ये दाखविले होते. व त्यावेळी.......

यावेळी सभागृहात एका अज्ञात इसमाने प्रवेश केला.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>(त्या अज्ञात इसमास उद्देशुन)कृपया आपण बाहेर जा. सुरक्षा रक्षक कुठे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>काय आहे हे? कोण आहेत ते?



<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ती व्यक्ती पोलीस हवालदार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सुरक्षा रक्षक कुठे आहेत?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>महानगरपालिकेची व्यवस्था इतकी बिघडली आहे की, येथे सुरक्षा रक्षक सुध्दा नाहीत व १६८ कोटीचा बजेट आज मंजुर होत आहे. खुप शरमेची गोष्ट आहे. या अगोदर भाभीजी म्हणाल्या की मी अतिशय भाग्यवान आहे की तिस-यांदा मी महासभेत बजेट सादर करीत आहे. परंतु तीन वर्षापासुन शहराचे दुर्भाग्य होत आहे. १५७ कोटीचा बजेट जेव्हा भाभींनी सभेमध्ये सादर केले होते त्यावेळी सुध्दा मी म्हंटले होते, जर आपण त्यावेळचे इतिवृत्त काढुन पाहिले तर मी म्हंटले होते की हा बजेट ५० कोटी तुटीचा आहे. आज आपण आकडे मिळवून पहा. १५७ कोटीचा बजेट पुर्ण ५० कोटी तुटीचा सिध्द झाला आहे. किंवा नाही? आज मी पुन्हा दाव्यानिशी सांगतो

की, १६८ कोटीचा हा बजेट ६० कोटी तुटीचा होईल. व आज जे महापालिकेवर १४८ कोटीचे कर्ज आहे. ते २०० कोटी पर्यंत पोहोचेल कृपया येथे जे आकडे दर्शविण्यांत आले आहेत. मला कुणी सांगावे की आपले जे महसुली उत्पन्न आहे. ते पुर्ण वर्षाचे महसुली उत्पन्न किती आहे. जे आपणांस पगार भत्ते इत्त्यादी वर खर्च करायचा आहे. महसुली खर्च किती आहे तो सांगितला जावा. कृपया कुणी अधिकारी....

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-श्री. जमनुजी केंद्र सरकारचा....

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-कृपया श्री. जमनुजी बोलत असताना आपण मध्ये बोलु नका.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-पुर्ण वर्षाचा महसुली खर्च किती आहे? ज्यामध्ये आपण काही कपात करू शकत नाही. जसे पगार भत्ते आपणांस दयायचेच आहेत. महसुली खर्च किती आहे तो सांगावा म्हणजे मला पुढे बोलता येईल.

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-मा. महापौरजी, मा. स्थायी समिती अध्यक्षा व मा. आयुक्त साहेब, प्रशासकीय खर्चात पगार, भत्ते, पेंन्शन , फंड इत्त्यादींचा समावेश होतो. पगारावर २३ कोटी ३८ लाख, एकुण २६ कोटी रूपयांचा खर्च पगार, भत्ते इत्त्यादीवर.....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-महसुली खर्चात ८८ कोटी रू. दाखविले आहेत. ते तेवढे आहेत की नाही?

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-मी प्रत्त्येक बाबीकडे येत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-एकुण मला सांगा ना?

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-८८ कोटी, ६१ लाख, ६८ हजार...

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-महसुली खर्च ८८ कोटी आहे तर ३१ मार्च २००३ पर्यंत जुने देणे जे आहे ते किती आहे.

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-ते यामध्ये समाविष्ट आहेत.



मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-व आता आमची आजपर्यंतची जी वसुली आहे, दिड महिना अदयाप बाकी आहे. ते किती कोटी आहे मागच्या वर्षाची? एकुण आतापर्यंतची वसुली किती आहे?

श्री. हरेश इदनानी (प्रभारी मुख्य लेखा अधिकारी):-७७ कोटी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-म्हणजे ८८ कोटी पेक्षा कमी? पुढे जावुन ३१ मार्च पर्यंत ती ८८ कोटी पर्यंत पोहचेल? सांगण्याचे तात्त्पर्य हे आहे की, पुर्ण वर्षामध्ये जर एक वीट सुध्दा खरेदी केली नाही. विकास कार्य केले नाही. ठेकेदारांना मागचे देणे दिले व पगार व भत्ते दिले तर आमच्या महानगरपालिकेत

आम्ही काहीच विकास कार्य करू शकत नाही. असे बोगस बजेट, आपण सांगा ८८ कोटी रूपयांची जर आपली वसुली झाली तर आपण दुसरे काय करू शकतो? कर्ज घेणार? १४८ कोटीच्या तुटीच्या बजेटला आपण २०० कोटी पर्यंत घेवून जाणार? या प्रकारचे बजेट, यामध्ये जकातीची वसुली दर्शविण्यांत आलेली आहे. जकातीची वसुली पहिल्यावर्षी आमचे लक्ष होते, वसुलीचे कोणतेच लक्ष आम्ही पुर्ण करू शकलो नाही. जकात वसुलीचे काम ठेक्यावर देवून सुध्दा दोन कोटी रू. चा तोटा झाला आहे. ५३ कोटी ७५ लाख रू चे लक्ष्य आम्ही ठेवले होते. व आम्हास ५१ कोटी ६५ लाख रू. मिळत आहेत. जर त्यांना सरकारी आकडयांच्या हिशोबाने दहा टक्के वाढविले तरी यावर्षाचे जकात वसुली ६० कोटी असली पाहिजे. परंतु बजेटमध्ये ती ५७ कोटी दर्शविली आहे. ठेकेदारास खुश करण्यासाठी व कमिशन वसुल करण्यासाठी तीन कोटी लक्ष्य कमी ठेवले आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>हरकत. हे काय बोलत आहेत?कमिशन बिमिशन ही काय बात आहे?

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>अशा प्रकारचा आरोप...

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आपणांस सुध्दा बोलण्याची संधी मिळेल.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>शेम, शेम असे बोलता कामा नये.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>श्री. सोनवणे साहेब आयुक्तांच्या खुर्चीत बसले आहेत. मी त्यांचे अभिनंदन करतो. कल्याण मध्ये त्यांनी या अगोदर जकातीचे खाजगी करण न करता स्वतः जकात वसुली करून उद्दीष्ठा पेक्षा जास्त वसुली केली आहे. ते श्री. सोनवणे साहेब येथे आयुक्तांच्या खुर्चीत बसले आहेत तर काय जे कल्याण मध्ये करू शकतात ते उल्हासनगरमध्ये करू शकत नाहीत?१५७ कोटीच्या ठिकाणी ७० कोटी रू. वसुल करू शकतात. अशा अधिका-याचे मी अभिनंदन करतो व निवेदन करतो की हे जे जकात खाजगीकरण जे येथे निवडणुकीच्या काळात ४१ जागा जिंकणा-या सत्ताधारी पक्षाने जनतेस आश्वासन दिले होते की, आम्ही जकात वसुलीचे खाजगीकरण करणार नाही. व येथे असे आश्वासन दयावे की पुढल्या वर्षी जकात वसुली महानग्रपालिका करेल. श्री. सोनवणे साहेबांसारखे अधिकारी आमच्या बरोबर असतील तर आम्ही ७० कोटी रूपये वसुली करू शकतो. खर्च कमी करू शकतो. शहरावर कर्ज वाढविणे ठिक नाही. पुढचा मुददा आहे टॅक्सचा टॅक्सचे आकडे पहा. आतापर्यंतची वसुली ५ कोटी रू. झाली आहे.दाखविले आहे २७ कोटी. ५ कोटी वसुलीच्या ठिकाणी यावर्षी ३४ कोटीचे लक्ष्य दर्शविले आहे. पाच कोटी वसुलीत आणखी किती वसुली वाढवू शकणार आहात. सहा कोटी, सात कोटी २५ कोटीचा घाटा? फक्त आकडे पुर्ण



करायचे आहेत? हत्ती तर सर्वांनी पाहिला आहे. हत्तीचे दोन दात असतात ते फक्त दिसतात. हत्ती जेवण करू शकत नाही. ३४ कोटी दाखविले, सरकारी आकडयांनुसार तीन वर्षाचे आकडे आपण पहा. त्यामध्ये जो सर्वात मोठ आकडा आहे तेवढा ठेवा. आपण यावर्षी वसुली केली आहात पाच कोटी व पुढल्या वर्षी आपण कराल ३४ कोटी? हे कसे होईल? एक-एक गोष्ट जर आपण पाहिलीत प्रशासनिक खर्च वाढविला आहे. आमच्या समित्त्या, दरवर्षी आम्ही २५ लाख रू. खर्च करतो. काय जरूरत आहे समित्त्या तयार करण्याची? प्रभाग समित्त्या तयार झाल्या नंतर पुर्ण महाराष्ट्रात कुठेही समित्त्या नाहीत. बारा-बारा समित्त्या, खर्च

कमी केला जात नाही. महाराष्ट्रात राष्ट्रवादी कॉग्रेस व कॉग्रेसची सत्ता आहे त्यांनी आपल्या मंत्रीमहोदयांच्या खर्चात कपात केली आहे. कृपया आपण येथे खर्चात कपात करा. १५-१५ हजाराचे भत्ते बंद करा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>काही दिवसापुर्वी आपण सुध्दा सभापती होतात....

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>पृष्ठ क्र. ८ वर अुनदाने दर्शविली आहेत. ऐवढी अनुदाने येतील मागच्या वर्षी एक सुध्दा अनुदान आले नाही. यावेळी दर्शविले आहे की कमीत कमी १० कोटी रू. अनुदान येईल अशाप्रकारे आकडे फिरवुन फिरवुन बजेट तयार करणे व सादर करणे, लोकांची दिशाभुल करणे हे बरोबर नाही. पृष्ठ क्र. ११ वर आयुक्त कार्यालयाचा खर्च दर्शविण्यांत आला आहे. आमच्या प्रभागात काही अडचण असेल व आम्ही ५० हजार किंवा एक लाखाचे एखादे काम सांगितले तर आम्हाला सांगितले जाते की बजेटमध्ये तशी तरतुद नाही. आपले काम होणार नाही. पृष्ठ क्र. ११ वर आयुक्त कार्यालयाचा खर्च दर्शविण्यांत आला आहे. ७५ लाख ५३ हजार आजपर्यंत खर्च झाला आहे ४ लाख आणखी ४ लाख ४८ हजार खर्च करतील. बजेटमध्ये तरतुद नाही तरीही साडे आठ लाख रूपये खर्च करत आहेत. व येथे दर्शविले आहे. १८ लाख प्रत्येक वर्षी काय आयुक्त कार्यालयाचा खर्च तिपटीने वाढतो. प्रत्येक विभागाचा खर्च वाढवुन दाखविला आहे. हा बजेट पुर्णपणे बोगस आहे. हे टी.ए.डी.ए. नंतर टाडा काय आहे? पान नं. १४ मध्ये टाडाचा खर्च टि.ए.डी.ए. काय दाखविला आहे? कचरा वाहतुक खर्च तीन कोटी पर्यंत पाहोचला आहे. जेव्हा आमचे श्री. शुळ साहेब आयुक्त होते त्यांनी तीन गाडया खरेदी केल्या होत्या. त्यामध्ये सकींग मशिन होती. जेसीबी मशिन होती. व दुसरी मशिन होती. अशा प्रकारे तीन मशिन होत्या त्यांनंतर आजपर्यंत कोणतीही मशिन आली नाही. टॅकरवरील खर्च वाढत चालला आहे. परंतु टॅकर खरेदी करण्यासाठी कधी तरतुद केली नाही. आज जर गजानन मार्केट किंवा अन्य कुठल्याही मार्केटमध्ये आग लागली तर आमच्याकडे कोणतीही अशी व्यवस्था नाही की आम्ही ती आग विझवु शकु. एक टॅकर पाण्याचा भरल्यानंतर दुसरा टॅकर भरण्यासाठी आमच्याकडे व्यवस्था नाही. येथे पाण्याची एकही टाकी नाही. त्यासाठी काहीही तरतुद नाही. येथे फक्त प्रार्थमिक शाळा आहेत. माध्यमिक शाळा नाहीत. पुर्व प्राथमिक शाळा नाहीत तरीही त्यांचे सभापती आहेत. व त्यांचे खर्च होत आहेत. या पध्दतीने जर बजेटचा अभ्यास केला तर बजेटमध्ये काहीच नाही. ठेकेदारांची जुनी बिले देण्यासाठी व कर्मचायांचे पगार देण्यासाठी या व्यतिरिक्त शहरामध्ये कोणतीही कामे करण्यासाठी आमच्याकडे पैसाच नाही. हा बजेट अतिशय बोगस आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, याठिकाणी मी प्रथम मी अभिनंदन करेन आमचे जेष्ठ सदस्य श्री. लाल पंजाबी यांचे, त्यांच्या भाषणातुन त्यांनी या संपुर्ण अंदाजपत्रकाचे बिंग फोडले आहे. त्यांनी जी सुरवात केली ती गेल्या वेळच्या ज्या रस्त्यांचा तुम्ही विकास करणार होतात ते रस्ते पुन्हा यावर्षीच्या यादीमध्ये आले. बजेट सादर करण्याची तिसरी संधी मिळाली म्हणुन तुम्ही सांगितले की हे आमचे सौभाग्य आहे म्हणुन. आपण अशी अपेक्षा करू या की चौथी, पाचवी, सहावी संधी मिळेपर्यंत हे बाकीचे रस्ते सुध्दा पुर्ण होतील. मागच्या वेळेला ज्यावेळी अंदाजपत्रक सादर करताना आपण भाषण केले त्यावेळेला आपण सांगितले की हे जे



अंदाजपत्रक तयार करणे म्हणजे तारेवरची कसरत असते. प्रत्यक्षामध्ये जर आपण संपुर्ण अंदाजपत्रक डोळयाखालुन घातले तर ते लक्षात येते की ती तारेवरची कसरत नाही. तर ती आकडयांची सर्कस आहे. आणि पुढे पुढे ज्यावेळेला प्रशासन त्या अदांजपत्रकाची अंमलबजावणी करायला लागले तेव्हा त्या सर्कशीचा तमाशा कधी झाला ते सुध्दा कधी कुणाला कळाले नाही. अंदाजपत्रक हा बघायला गेले तर अर्थसंकल्प सुध्दा असतो. परंतु इथे फक्त अंदाजपत्रक आहे.

आणि मला असे वाटते की अंदाजपत्रक तयार करणेची जी पध्दत आपण काही वर्षापासुन चालु केली आहे. त्यावरून असे दिसते की हे अंदाजपत्रक म्हणजे अंदाजपंचे पत्रक आहे की ज्याठिकाणी आपल्याला वाटले की याठिकाणी ३४ कोटी उत्पन्न दाखवु या तर तेथे ३४ कोटी करायचे. जिथे ४० कोटी उत्पन्न पाहिजे तिथे ४० कोटी करायचे. कुठे आपल्या मनामध्ये आले की कमी करायला पाहिजे तिथे कमी करायचे? कशाचा कशाला थांगपत्ता नाही. कुठल्याही प्रकारचा संकल्प नाही, आणि संकल्पामध्ये कुठलाही अर्थ नाही. अशाप्रकारचा अर्थहीन संकल्प असलेले वित्तिय अंदाजपत्रक आपण गेल्या तीन वर्षापासुन बनवता आहात आणि वरती आपण त्याचे श्रेय सुध्दा घेता. याठिकाणी कुठला विषय निघाला की सदस्य उठतात कारण मला खात्री आहे सत्ताधारी पक्षीयांकडे बहुतेक बोलायला कुठला मुददा नाही. आणि बोलायचे मुददे संपले की मग राजकीय गुंतागुंतीवर यायचे. या सभागृहामध्ये ५० वेळा हा विषय निघाला की महापालिका झाली, ती तुम्ही आणली. तुमच्या सहका-यानी आणली. इथे प्रत्त्येक वेळेला मुददा काढणारे जे सदस्य आहेत त्यांना मला विचारायचे आहे की, १९९६ सालात शिवसेना भाजपाच्या सरकारनी इथे महापालिका आणली ही गोष्ट खरी आहे त्याचे आम्ही आजही समर्थन करतो. त्यावेळी तिची गरज होती. तुम्ही ज्या पध्दतीने गेल्या पंधरा वर्ष अंदाधुंदीचा कारभार केला. तो कारभार रोखण्यासाठी हे गरजेचे होते. तो निर्णय शिवसेना भाजपा सरकारने घेतला. तुम्ही आता इथे असे उत्तर दया की १९९३ साली जेव्हा ही नगरपालिका, ज्यांच्या नेतृत्त्वाचा आपण नेहमी इथे कौतुक करता. त्यांचे नेतृत्त्व त्याकाळी नगरपालिका होती त्यावेळी ती बरखास्त कुठल्या सरकारने केली? त्यावेळी तर शिवसेना भाजपाचे सरकार नव्हते. त्यामुळे मुददे काढताना ज्यावेळेला आपण एक बोट समोरच्या कडे दाखवतो त्यावेळेला चार बोटे आपल्याकडे सुध्दा असतात त्याची सुध्दा आपण काळजी घेतली पाहिजे. अंदाजपत्रक बनविताना मला असे इथे असे वाटते की प्रशासनाने खुलासा केला तर बरे होईल. श्री. सोनवणे साहेबांसारखे कर्तव्य दक्ष अधिकारी आहेत. सत्ताधारी पक्षाचा त्यांच्यावर चांगला भरोसाही आहे, आमचा सुध्दा आहे परंतु आमच्या पेक्षा दुप्पट भरोसा सत्ताधारी पक्षाचा आहे. याठिकाणी एक गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे की अंदाजपत्रक आपण कशाचा आधारावर बनवतो की फक्त बनवायचे म्हणुन बनवतो. जे रकाने तयार केले आहेत त्यांना आधार काय? ज्या आकडयाची निश्चिती कशी करायची? मला असे वाटते की १९७१ चा जो म्युनिसिपल अकाऊंट कोड आहे त्याच्या आधारावरच आपण अंदाजपत्रक तयार करत असणार. अशी मला अपेक्षा आहे अंदाज आहे माझा. आणि त्यानुसार उत्पन्नाचे जे अंदाजित आकडे आहेत. गेल्या तीन वर्षातील प्रत्यक्ष आकडे त्यांची सरासरी आणि चालु अंदाजपत्रकातील जो सुधारित अंदाजपत्रक आहे. त्याच्यामध्ये दहा टक्के अधिक वसुली योग्य रक्कम या दोन्हीपैकी जे कमी असेल ते कमी घेवून आपल्याला पुढील वर्षाचा जो अंदाज आहे तो वर्तवायचा आहे. यादृष्टीने आपण बघितले तर मालमत्ता कराच्या ज्या रक्कमा आहेत. त्या गेल्या तीन वर्षातील रक्कमा आपण बघितल्या तर आणि त्याची जर आपण सरासरी काढली ती सरासरी अवघी ९ कोटी २७ लाख ऐवढी येते. आणि आपले चालु वर्षातील जे उत्पन्न आहे ते २० कोटी सुधारित अंदाज दाखविला आहे त्यामध्ये दहा टक्के वाढविले तर २२ करोड होतात. यापैकी जे कमीत कमी उत्पन्न आहे ९ कोटी २७ लाख हे खरे म्हणजे आपण पुढच्या वर्षासाठी ग्राहय धरायला हवे होते. परंतु आपण ते वाढवुन ३४ करोड केले. आणि ज्यावेळेला प्रशासनाने स्थायी समितीला बोट पकडायला दिले तेव्हा मला असे वाटते की स्थायी समितीने प्रशासनाचे मनगट पकडले. ज्यावेळेला आपण मालमत्ता करामध्ये अवास्तव वसुलीचे लक्ष्य धरले प्रशासनाने जेव्हा अकाऊंट कोडचे नियम तोडले प्रशासनाने जेव्हा त्यांना टेक ओव्हर केले आणि ९-१० कोटीच्या ऐवजी थेट ३४ कोटीचे लक्ष धरले तेव्हा स्थायी समितीला सुध्दा पाणी पटटीच्या २० कोटीचे लक्ष वाढ करून ४० कोटी



**मा. सदस्या श्रीम. माने किरण ६.४० वाजता सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

करण्यास काहीही वाटले नाही. इथे आम्हाला फक्त आकडे जुळवायचे आहेत. लोकांना खुश करायचे आहे. आम्हाला महापालिकेचा कारभार कसा चालतो? पैसे

कुठून येतात? कसे खर्च करतात?त्याचे आम्हाला काय देणेघेणे आहे? याठिकाणी ज्यावेळेला आयुक्तांनी १४८ कोटीच्या उत्त्पन्नाचे बजेट सादर केले. आणि १७१ कोटीचा खर्च त्यामध्ये दाखविला होता. २३ कोटीची तुट होती ती तुट भरून काढण्यासाठी कर वाढ सुचविली होती. ती आपण अमान्य केलीत ठिक आहे. आपल्याला लोकांना खुश करायचे असते. आपण लोकांच्या जिवावर निवडुन येतो. परंतु ज्यावेळेला आपण करवाढीचा मार्ग अमान्य करतो. उत्त्पन्नाचे कुठलेही वाढीचे मार्ग आपण सुचवित नाही. नविन मार्ग आपण शोधत नाहीत. तर हा जो किमान खर्च आहे त्या खर्चात तरी काटकसर केली पाहिजे. एवढी तरी अपेक्षा सत्त्ताधारी पक्षाकडुन बाळगायला हरकत नव्हती. आपण काटकसर केली आहे. पण आपण काटकसर कुठे केली? आयुक्तांचे जे उत्त्पन्न होते ते अवघे १४८ कोटीचे आणि त्यांनी जी तरतुद केली होती त्या तरतुदीचे तुम्ही काय केले स्थायी समितीमध्ये ते सांगणे फार महत्त्वाचे आहे. नविन दिवाबत्ती खरेदी. आयुक्तांच्या अदांजपत्रकात तरतुद होती ४२ लाखाची स्थायी समितीने केली ३४ लाखाची. त्त्यामध्ये १४ लाख हे देय रक्कमा आहेत. महापालिका इमारतींची दुरूस्ती आयुक्तांच्या अंदाजपत्रकामध्ये ३० लाखाची तरतुद होती. स्थायी समितीने ती १५ लाखाची केली. आणि त्यातही मागे असे दाखविले आहे की, देणे २० लाखाचे आहे. म्हणजे २० लाखाचे देणे आहे १५ लाखाची तरतुद आहे. आरक्षित भुखंडावर तटबांधणी यामध्ये आयुक्तांच्या अंदाजपत्रकामध्ये २५ लाखाची तरतुद होती. स्थायी समितीने ती अवघी पाच लाखाची केली आहे म्हणजे या शहरातील आरक्षित भुखंड किंवा मोकळे भुखंड वाचावेत. त्यांच्याभोवती कंपाऊंड करावे. असे स्थायी समितीला वाटत नाही. पाणी पुरवठा साहित्त्य खरेदी दुरूस्ती आयुक्तांच्या १४८ कोटी उत्त्पन्न दाखवायच्या तरतुदीमध्ये तरतुद होती ५८ लाखाची स्थायी समितीने केली ती १८ लाखाची. पाणी पुरवठा साहित्त्य नविन आयुक्तांच्या अंदाजपत्रकामध्ये ७० लाख होती. स्थायी समितीने ती ३० लाख केली. भुयारी गटार जोडणी साहित्त्य खरेदी या शहरामध्ये आपण जर बघितले तर प्त्त्येक नगरसेवक येथे बसलेले आहेत त्या प्त्त्येक नगरसेवकाचा हा रोजचा अनुभव आहे की पुर्ण प्रभागामध्ये कुठे न कुठे तरी जे भुयारी गटार आहे. ते प्त्त्येक ठिकाणी कुठे ना कुठे ओव्हर फ्लो होत असते. हे रोजचे दुखणे आहे. त्यावर आयुक्तांनी आपल्या अंदाजपत्रकात २० लाखाची तरतुद केली होती. तुम्ही ती ५ लाखावर आणलीत. आणि ऐवढेच नाही तर महिला बालकल्याण समितीवरचा जो खर्च आहे. महिला बालकल्याणचे काम म्हणजे कल्याणकारी काम परंतु असे दिसते की आपल्याला या कल्याणकारी कामाचे देणे घेणेच नसते. २५ लाखाची गेल्यावेळेस तरतुद होती ती यावेळेस स्थायी समितीने १५ लाखावर आणली. बहुतेक मला वाटते की ते रेनकोट गोडाऊनमध्ये सडत पडले आहेत.

**मा. सदस्य श्री. मोहन बहरानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>हिंदीमध्ये आपण बोललात तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मार्केट दुरूस्तीसाठी दहा लाखाची तरतुद होती. ती आपण पाच लाखावर आणलीत. स्पोर्टस कॉम्प्लेक्स, टाऊन हॉल, यात्री निवास यांच्यावर जवळ जवळ ५० लाखाची तरतुद होती. स्थायी समितीने ती २५ लाखावर आणली. आणि उदयाने दुरूस्ती व निगा यावर आयुक्तांनी २५ लाखाची तरतुद केली होती आपण ती दहा लाखावर आणलीत. आपण मगाशी आणखी एक श्रेय घेतले की, प्रभाग समितीमध्ये उदयान दुरूस्तीसाठी १ कोटी ३४ लाखाची आपण तरतुद केलेली आहे. ही तरतुद गेल्यावर्षी सुध्दा होती. याठिकाणी प्रभाग समितीचे चार सभापती, बहुतेक तीन बसले असतील, एक नसेल त्यातला. तीन सभापती इथे बसलेले असतील त्यांनी उठुन सांगावे की प्रभाग समितीमध्ये उदयानांवर एक कोटी रू. तरतुद होती. रस्ते दुरूस्तीवर आणखी काही लाख होती. त्यातील किती खर्च झाले? कितीची प्रस्ताव तयार केले? याठिकाणी प्रभाग समितीच्या सभापतींच्या

कार्यालयातील कर्मचा-यांची अशी हालत आहे की प्रभाग समितीचे काम काही नाही. इथे बसुन काय करायचे? तिथे लोकांच्या दैनंदिन तक्रारी नोंदवुन घ्यायला सुध्दा रजिस्टर नाही. ही प्रभाग समितीची हालत. इथे एक सभापती राजीनामा देण्यास निघाले होते. प्रभाग समितीचे अस्तित्त्व हे त्याठिकाणची केबिन त्या केबिनमध्ये लावलेली वातानुकूलित यंत्रणा नविन खुर्च्या ऐवढया पुरतीच मर्यादित राहिलेले आहे. मग आपण त्याचे श्रेय कसले घेता? आपण याठिकाणी मागच्या वेळेला नविन बजेटवर बोलण्यापेक्षा गेल्यावेळेला आपणच होतात. आपणच सभापती होतात, आपण सांगितले की, ही तिसरी संधी आहे. आम्हाला तर वाटते की आपणांस पुन्हा पुन्हा संधी मिळो परंतु आपण हे सुध्दा येथे स्पष्ट केले पाहिजे की, नविन वर्षामध्ये आपण बरेच काही करणार आहात. चारही बाजुने बराच पैसा येणार आहे. परंतु आपण आधी हे ठरविले पाहिजे की हेच लोक आहेत यांनी मागच्या वर्षी सुध्दा बजेट सादर केला होता. म्हंटले होते की कुठे, कुठे काय, काय करणार आहेत. त्यातील किती आपले प्रस्ताव पुर्ण झाले? गेल्या तीन चार वर्षापासुनचे प्रकल्प चालु झाले आहेत. त्या प्रकल्पांना रडत खडत कसे तरी महापालिका प्रशासन पुर्ण करत आहे. त्या रखडत राहिलेल्या प्रकल्पांचे सुध्दा श्रेय आपण घ्यायचे. जे पुर्ण होते त्याचे श्रेय आपण घ्यायचे आणि जे नाही होत त्याचे खापर प्रशासनाच्या माथी फोडायचे तर ही आपली प्रवृत्ती. आयुक्त श्री. पोखरकर यांच्या नावाने शंख केला जातो. आणि ज्यावेळेला आम्ही त्यांच्याबाजुने बोलतो तेव्हा आमच्यावर असा आरोप केला जातो की तुम्ही आयुक्त पोखरकरांच्या बाजुने आहात. इथे हा तो मुददा नाही आहे. त्या व्यक्तीने याठिकाणी या शहरासाठी एम.आय.डी.सी. चे ९० कोटीचे कर्ज होते त्या एम.आय.डी.च्या कर्जाच्या थकबाकीच्या बाबतीमध्ये त्यांनी आकडेवारी सकट एम.आय.डी.सीशी भांडण केले आणि त्या थकबाकीमधील १४ कोटीची रक्कम माफ करून घेतली. हे त्यांचे श्रेय नाही का? आणी तुम्ही काय केलेत? तुम्ही १०-१५ एम.एल.डी. पाणी वाढविण्याचे श्रेय घेतले. आणि ते श्रेय घेण्याच्या नावाखाली तुम्ही एम.आय.डी.सी ला स्टॅंडिंग चार्जेस भरण्याची कबुली दिलीत. आणि दरवर्षाला १७ कोटीचा भुर्दंड या महापालिकेवर लादलात. ही तुमची काम करण्याची पध्दत आणि हे सर्व असताना याठिकाणी मगाशी एक विषय निघाला आठवला म्हणुन उल्लेख करतो की शाळांची हालत काय आहे? शाळांची स्थिती अतिशय खराब आहे. शाळांमध्ये बसायला बेंच नाहीत. पावसाचे पाणी आतमध्ये येते. कोण होते शिक्षण मंडळामध्ये? शिक्षण मंडळामध्ये तुम्ही सगळे तुमचे सोयरे संबंधी, नातेमंडळी होती. त्याठिकाणी तुमचीच सत्ता होती. आणि त्यावेळेला शिक्षण मंडळाचे वाटोळे कुणी केले? १५ वर्ष शिक्षण मंडळ तुमच्याकडे होते. काय केले त्या शिक्षण मंडळासाठी तुम्ही? अक्षरशः तुम्ही ज्या गोष्टीचा याठिकाणी बसुन आपण बाऊ करतो. या शहरामध्ये सिंधु संस्कृती आहे. सिंधी शाळा एकेक करून बंद पडल्या. याची तुम्ही कधीही तमा बाळगली नाही. सिंधी शाळा तिकडे बंद पडल्या मराठी शाळांमध्ये मुलांना बसायला बेंच नाहीत. पंधरा वर्ष तुमच्या कडे शिक्षण मंडळ असताना सुध्दा आणि तुम्ही याठिकाणी नुसते शिक्षण मंडळात नाही तर १९८६ पासुन ते २००३ पर्यंत गेल्या १७ वर्षामध्ये जर शिवसेना भाजपाची दोन वर्ष सोडली तर पंधरा वर्ष सत्ता तुमच्याकडेच होती. प्रत्त्येक वेळेला ज्या ज्या वेळेला राज्य सरकारनी येथील चौकशीचे अहवाल तयार केले त्या सर्व अहवालामध्ये तुमच्या कारभाराचा पंचनामा अगदी व्यवस्थितपणे ठळकपणे मांडुन ठेवलेला आहे. एकदा वेळ काढा आणि सगळे अहवाल वाचुन घ्या. साधारपणे आपण असे ठरवतो की ज्यावेळेला आपल्या हातून चुका होतात त्या चुकांमधुन खरे म्हणजे शिकायचे असते. पण तसे काही दिसत नाही. मागच्या वेळचे अंदाजपत्रक आपल्या तोंडघशी पडले. तरी आपण पुन्हा एकदा त्याची पुनरावृत्ती केली आहे. यावेळेला आपण १६८ कोटीचे बजेट सादर केले आहे. येथील नगरसेवकांनी सांगितले की त्यातील १०० कोटी सुध्दा वसुल होणार नाहीत. पुन्हा एकदा घाटयामध्ये जाईल. प्रश्न हा नाही कागदावरचे आकडे मागे पडतील. प्रश्न हा आहे की येणा-या कालावधीमध्ये या महापालिकेचे अस्तित्त्व धोक्यामध्ये येणार आहे. १९९३ साली मगाशी मी आठवण केली तो मुददा मुददाम जोडतो. ज्यावेळी तुमची सत्ता असताना तुमच्याच सरकारने तुमची नगरपालिका बरखास्त केली त्याचे

प्रमुख कारण हे होते की, तुम्ही तिथे कारभार करत असताना त्या नगरपालिकेची आर्थीक पत धोक्यामध्ये



आणलीत. माझी तुम्हाला विनंती आहे की तुमच्या सरकारवरती अशी पाळी पुन्हा आणु नका की या महापालिकेची आर्थिक पत आणि तुमची ५०-५५ लोकांची सत्त्ता असलेला येथील जो कारभार आहे. तो बरखास्त होईल अशी पाळी आणु नका. अशी तुम्हाला हात जोडुन विनंती करतो आणि माझे भाषण संपवतो. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले ६.४४ वाजता सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>महापौर महोदया,अर्थसंकल्पावर बरीच चर्चा झालेली आहे. त्याची चिरफाड सुध्दा व्यवस्थित झालेली आहे. अर्थसंकल्प यासाठी समोर ठेवला जातो किंवा मंजुरी घेतली जाते त्यानुसार वाटचाल करावी हा त्यामागचा उद्‍देश असतो. कुठल्याही गोष्टीचे नियोजन असेल आणि त्यानुसार वाटचाल केली तर यश निश्चित असते. नियोजन नसेल आणि नुसतीच वाटचाल केली तर तोंडघशी पडावे लागते आणि मार खावा लागतो त्याच पध्दतीचा हा अर्थसंकल्प याठिकाणी सादर केलेला आहे. कसलेही नियोजन नसताना फक्त आकडयांची जुळवाजुळव केली हे आमच्या सदस्यांनी प्रत्त्येक वेळा सांगुन दिले आहे. ही वर्षानुवर्ष चालत आलेली परंपरा ती पुढे चालु ठेवली आहे. पहिल्यांदा मी स्थायी समिती अध्यक्ष आणि सर्व सभासदांचे अभिनंदन करतो आणि त्यांना धन्यवाद देतो. की त्यांनी गरिब बिचा-यावर होणारा अन्याय जो त्यांनीच केला होता तो काढला आहे. की ज्यांच्या घरात किंवा दुकानात नळ जोडणी नाही त्यांना बिल माफ केले आहे. आता आमच्या सदस्यांनी सांगितले की झोपडपटयांमध्ये..... त्याचवेळेला ही चर्चा झालेली आहे. झोपडपटटयांमध्ये सुध्दा ब-याच लोकांकडे नळजोडण्या नाहीत. त्यांची सुध्दा बिले माफ व्हावीत आणि प्रशासनाला मी एक आठवण करून देतो की हा एक धोरणात्त्मक निर्णय आहे. व्यापार किंवा घर याच्या व्याखेत न जाता जो शेवटचा मुद्दा आहे की ज्यांच्याकडे नळजोडणी नाही त्याच्याकडुन बिल घेवू नये. जरी बहुमताने यांनी मंजुर केले तरी प्रशासन ते ठरवू शकत नाहीत की व्यापार आणि घर. ज्याच्याकडे नळ जोडणी नाही त्याला बिल नाही हा एक धोरणात्त्मक निर्णय मान्य आहे. ते प्रशासनाने लागु करावे. तर आणि तरच याला मान्यता दयावी. दुसरी महत्त्वाची गोष्ट हा अर्थसंकल्प लागु करताना पुन्हा सांगावेसे वाटते की वर्षानुवर्ष जे आकडे पुरविलेले आहेत. सर्व सदस्यांनी सांगितले आहे. तेच मी पुन्हा सांगतो ९६-९७ पासुन ९९ साली अर्थसंकल्प सादर केला ८३कोटीचा प्रत्त्यक्ष उत्त्पन्न होते फक्त ७७ कोटी २०००-२००१साली फक्त १३३ कोटीचा अर्थसंकल्प सादर केला आणि प्रत्त्यक्ष उत्त्पन्न फक्त ८७ कोटीचे झालेले आहे. म्हणजे जवळ पास ४६ कोटी हे कमी उत्त्पन्न झालेले आहे. २००१-२००२साली १७३ कोटीचे अर्थसंकल्प सादर केला आणि प्रत्त्यक्ष उत्त्पन्न मात्र ८३ कोटी ४५ लाख म्हणजे जवळपास ९० कोटीने जास्त अर्थसंकल्प याठिकाणी मांडला गेला होता. त्याच पध्दतीचा अर्थसंकल्प आताही याच ठिकाणी दिला आहे. उलट पक्षी उत्त्पन्नामध्ये कुठल्याही प्रकारची वाढ याठिकाणी नमुद केलेली नाही. उत्त्पन्न कमी करण्याचा प्रयत्त्न केलेला आहे. ११९ कोटी या प्रशासनाने जी आकडेवारी दिलेली आहे. त्यानुसार ११९ कोटी उत्त्पन्न आहे आणि १७१ कोटी खर्च आहे. ११९ कोटी मधुन जे उत्त्पन्न झाले त्यामध्ये अगोदरच्या ज्या नळजोडण्या होत्त्या त्या व्यापारी किंवा ज्यांच्याकडे नळजोडणी नाही अशा लोकांचे बिल माफ करावे या उद्‍देशाने साधारणतः तीन ते चार कोटी उत्त्पन्न कमी होईल. असे असताना सुध्दा फक्त जुळवाजुळव करण्यासाठी पाणी बिलामध्ये मागच्या वर्षीचे उपन्न १६ कोटी आहे. किती काही केले नैसर्गिक वाढ ही दहा टक्के जरी धरली तरी हे १६ कोटीवर साधारणतः दिड कोटी वाढेल. १८ कोटी जास्तीत जास्त प्रशासनाने उत्त्पन्न अपेक्षित केले होते ते वास्तविक होते. वास्तविकतेला धरून होते. परंतु स्थायी समितीने ते ४० कोटी

केले हे कुठून आणले काही समजत नाही.मालमत्ता करामध्ये सुध्दा तशाच प्रकारची वाढ केलेली आहे. मिळकत वाढविण्यासाठी काही उपाय त्या अर्थसंकल्पामध्ये केलेले नसुन कुठलीही एक चांगली कल्पना शहरातील लोकांना टॅक्सच्या उत्पन्नातुन, शहरातील लोकांकडुन आम्ही जो टॅक्स घेतो त्या बदल्यात त्यांना चांगल्या गोष्टी देणे हे सुध्दा महापालिकेचे काम आहे. पण अशी कुठलीही तरतुद या ठिकाणी केलेली नाही. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, मागच्या वर्षी जे रस्ते बजेटमध्ये दाखविले होते तेच रस्ते या बजेटमध्ये दाखविले आहेत. यावर



श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की, मागच्या वर्षीचे राहिलेले आम्ही पुर्ण करतो. ते वर्षानुवर्ष असेच चालु राहु दया कारण की याच्या पलिकडे आपण दुसरे काही करू शकणार नाही. तुम्ही जिददी आहात माहित आहे. ते तुमच्या बोलण्यातुन सुध्दा आले. कुठल्या ठिकाणी काय बोलले पाहिजे कुठले विधी निषेध पाळले पाहिजे. श्री. सोनवणे साहेबांचे तुम्ही अभिनंदन केले अर्थसंकल्पावर चर्चा चालु असताना. त्याचवेळी हे ही तुम्ही दाखवुन दिले जाणीव करून दिली की श्री. सोनवणे साहेबांना आम्ही आणले आहे.आमची इच्छा होती, तुमची इच्छा होती, तुमची मुराद पुर्ण केली त्यासाठी कुठे नवस केला असेल तर तो फेडुन सुध्दा या. त्यासाठी इथे तरतुद काही असेल तर ती ही करा. विधी निषेध याठिकाणी पाळले पाहिजेत. अर्थसंकल्पामध्ये नविन कुठलीही योजना याठिकाणी शहरामधील नागरिकांना दिलेली नाही. मिळकत वाढविण्यासाठी आम्ही काही प्रस्ताव प्रशासनाला सुचवतो. प्रशासनाने मागे जो दरवाढीचा प्रस्ताव याठिकाणी दिलेला होता. आणि दर वाढ किवा खर्चामध्ये कपात करा. तर आम्ही दर वाढ केली नाही, खर्चामध्ये कपात सुध्दा केली नाही. त्यामध्ये एक मिळकत वाढेल, उत्पन्न वाढेल असा मुददा आहे. तो मुददा प्रशासनाने लक्षात घ्यावा. रस्ता कर बसविणे हे अधिनियमाचे कलम १४८ क नुसार महापालिका क्षेत्रातील इमारती व जमिनीवर कर बसविता येईल. आम्ही फक्त सध्या इमारतीवर कर बसवतो. मोकळया असलेल्या जमीनीवर आम्ही हा कर बसवित नाही. हा कर बसवला तर तो अपेक्षित किती होईल त्याचा एक अंदाज आज जर मिळाला तर बरे होईल. त्यामध्ये शासकीय जमिनी आल्या, खाजगी जमिनी आल्या. शासकीय जमिन आता शासन स्वत:कडे असलेली जमिन खाजगी लोकांना देते कारण महापालिकेने ते ताब्यात घेतलेल्या आहेत या केवळ एका कारणाखाली पण त्याचा महसुल महापालिकेला शासन सुध्दा भरत नाही व खाजगी ज्यांनी नंतर सनदा काढुन घेतल्या आहेत ते सुध्दा भरत नाहीत. त्या स्त्रोतातुन उत्पन्न मिळेल अशा दृष्टीने पाऊल टाकावे. आणि खर्च, त्यातुन मिळणारे उत्पन्न हे त्याच बाबीवर खर्च करावा असा एक आमचा प्रस्ताव आहे. शासनाने ८७ साली जे भुखंड आरक्षित केले होते. ते भुखंड नंतर शासनच महापालिकेच्या ताब्यात नसल्यामुळे ते परस्पर खाजगी लोकांना सनद देतात. आणि केवळ महापालिकेने ताबा घेतला नाही हे सांगुन मोकळे होतात. तर अशा रिकाम्या जागा घेण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये तरतुद करावी. तरतुद असली पाहिजे होती पण ती केली नाही तर यापुढे तरी करावी. जेणेकरून राहीलेले भुखंड महापालिकेच्या ताब्यात घेवून त्याचा या सर्वसामान्य लोकांना उपयोग करता येईल अशा प्रकारच्या अपेक्षा उल्हासनगर वासियांना किंबहुना आम्हाला अपेक्षा होती की या अर्थसंकल्पामध्ये तरी काही तरी नविन घडले पण काही न करता जे जुने होते तेच पुढे मांडुन त्याची जुळवाजुळव करण्यासाठी फक्त आकडेवाढविले आहेत त्या पलिकडे काही नाही तर असा हा अर्थहीन अर्थसंकल्प मंजुरीसाठी ठेवला तर आम्ही त्यास विरोध करू. त्यासाठी अर्थ असलेला अर्थसंकल्प आपण सादर करावा. जयहिंद. जय महाराष्ट्र.

**मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी ६.५१ वा. सभागृहातुन बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा.महापौरजी, आमच्या भाभी श्रीमती. ज्योती कालानीजी आमचे आयुक्त साहेब, आमचे सचिव साहेब, आज आमच्या विरोधी पक्षीयांच्या सदस्यांनी मनमोकळेपणाने आपले विचार मांडले. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. महासभेमध्ये चर्चा झाली पाहिजे. सर्वात प्रथम मी आमच्या भाभी ज्योती कालानी स्थायी समिती सभापती यांना शुभेच्छा देतो की त्यांनी तिस-यांना बजेट सादर केला आहे. आतापर्यंत मला समजले नाही की, आता जे सदस्य बोलत होते ते उत्पन्न वाढविण्यासाठी बोलत होते की, आम्ही जे कर कमी केले आहेत ते वाढविण्याच्या बाजुने बोलत होते. कधी बोलतात हे जास्त ठेवले आहे, कधी बोलतात महिला बालकल्याण समिती निधी.... सर्वसाधारण निधी जो होता तो यावर्षी आम्ही कमी केला आहे तो यासाठी केला आहे की जेणेकरून वास्तववादी बजेट तयार होईल. आम्ही

लोकांनी जकात वसुलीचे जे ५७ कोटीचे लक्ष्य ठेवले आहे. ते अजुन पर्यंत आमचे गटनेता श्री. जमनादास पुरस्वानी यांना समजले नाही. ही तरतुद ३१ मार्च पर्यंतची आहे. कारण की आमचा जो जकात ठेका जातो तो जुलै महिन्यापासुन जातो परंतु हा जो बजेट तयार होतो तो ३१ मार्च पर्यंतचा म्हणुन ते लक्ष्य ५७ कोटीचे ठेवण्यात आले आहे. तर मेहरबानी करून यापुढे जरा अभ्यास करा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>हे पहा आपण स्वत: अभ्यास करून या. मागील वर्षी ५३ कोटीचे लक्ष्य ठेवले होते, मागील पूर्ण वर्षात किती कोटीचे लक्ष्य ठेवले होते?



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आता मी तर आपल्यामध्ये बोललो नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आपण सांगता अभ्यास करा. आधी आपण अभ्यास करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आता मला वाटते आपण बसुन घ्यावे. जेव्हा श्री. दर्शनसिंग आणि श्री. दिलीप लालवानी बोलतात तेव्हा श्री. रमेश चव्हाण यांना राग येतो.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आमचे सदस्य कुणाचे नाव घेऊन टीका टीप्पणी करीत नाहीत. आपण आधी अभ्यास करून या. आपण स्वत:ला हुशार समजु नका. एका वर्षाचे जकात वसुलीचे लक्ष्य ५३ कोटी होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आज आमचे बंधु म्हणाले की, स्थायी समितीमध्ये अमुक एक मुददा उपस्थित केला होता. परंतु बजेट एकमताने मंजुर केला. मला समजत नाही की त्यावेळी त्यांना जर एखादा मुददा पसंत नव्हता तर त्याचवेळी त्यांनी हरकत घ्यावयास हवी होती. एकमताने ठराव कसा पारीत झाला? श्री. बच्चाराम रूपचंदानी व श्री. दिलीप गायकवाड यांनी ठरावावर स्वाक्षरी दिली नाही. ठराव एकमताने मंजुर करण्यासाठी, हे मी मान्य करतो. परंतु अर्थसंकल्प आपण एकमताने पारीत केला आहे. सगळेजण दोन दोन वेळा बोलले आहेत मला एक वेळा तर बोलु दया.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>श्री. किशोर वनवारी यांना बोलायचे आहे त्यांनी सभागृहात बोलावे परंतु कुणाचे नाव घेवून ते का बोलत आहेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>दोन दोन सदस्य उठून उभे राहतात व बोलु लागतात. हा सभागृहाचा अपमान आहे. परवानगी न घेता बोलत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>महापौरजी त्यांना सांगा, ते नाव घेवून आरोप करत आहेत. हे चुकीचे आहे. आमच्यावर आरोप केला तर आम्ही त्यांचे मध्येच खंडन करू. त्यांनी अभ्यास करून यायला पाहिजे. यांना मी सांगतो की अभ्यास करून आला नसाल तर आधी अभ्यास करून या. कृपया आयुक्तांनी सांगावे की, जकातीचे जे लक्ष्य ठेवले आहे ते पुर्ण वर्षाचे आहे की ३१ मार्च पर्यंत आहे? पुर्ण वर्षाचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्री. बोडारे साहेब यांना सांगा मध्ये बोलत आहेत. हे वारंवार मध्ये मध्ये बोलतात. आता यांनी सांगितले की मी स्थायी समितीमध्ये होतो का? बिल्कुल नव्हते. परंतु एकमताने व बहुमताने हे मला

समजते. स्थायी समितीचा जो ठराव आलेला आहे तो एकमतानेचा आहे. बहुमताचा नाही. तर यासाठी मला असे वाटते की, बजेट एकमताने पारीत झाला आहे.

यावेळी मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी हे काहीतरी बोलत होते परंतु ते स्पष्टपणे ऐकु येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>सभागृह नेत्त्यांना बोलु दिले जावे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आपण बोलत आहात का मी बसु?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>सभागृह नेत्त्यांना बोलु दिले जावे.



<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>स्थायी समितीमध्ये बजेट एकमताने पारीत होण्याच्या अगोदर आम्ही काही मुददे त्याठिकाणी मांडले होते त्याबददल जर सभागृह नेत्त्यांना माहित नसेल तर त्यांनी याठिकाणी आरोप करू नये.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>सभागृह नेत्त्यांना बोलु दिले जावे. त्यांच्या बोलण्यामध्ये अडथळा आणु नये.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>श्री. विनोद तलरेजा यांच्याबरोबर बोलणे झालेले आहे. म्हणुन त्यांनी याबाबत बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी येथे स्पष्ट केले आहे. बजेट एकमताने पारीत झालेला आहे. तेच मी सांगतो. ऐकुन घ्या ना. मी काय म्हणतो. आमच्या बंधुनी सांगितले की हा जो बजेट आहे तो बिल्कुल बोगस आहे. आम्ही आकडे ॲडजस्ट केले आहेत. वगैरे वगैरे, ठिक आहे. मला वाटते आपण दर वाढविण्याच्या बाजुने आहात म्हणुनच एवढे बोलत आहात. तर आयुक्त साहेबांनी २३ कोटीचे जे दर वाढविण्याचे प्रस्ताव दिले होते. त्यास संमती दया. त्यामध्ये काही सुधारणा सुचवा आम्ही दर वाढवतो. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आरपी आय. पुर्ण शहराच्या हितासाठी आहे, आमचे आमदार श्री. पप्पु कालानी स्थायी समिती अध्यक्षा ज्योती कालानी यांनी सांगितले आहे की शहरवासियांवर कुठल्याही प्रकारचा कर वाढवायचा नाही. आज आमचे सदस्य फक्त बोलु इच्छितात काही सुचना करत नाहीत तर हे ठिक नाही. आपणांस जर कुठेही बदल करायचे असतील आपणांस वाटत असेल की आमचे हे आकडे बरोबर नाही ते आकडे सुधारणा करा ना? येथे आम्हाला असे वाटले की सर्वसाधारण निधी जास्त आहे तो किती असला पाहिजे. त्या हिशोबाने आम्ही सव्वा तीन कोटी रू. कमी केले आहेत. वास्तविक बजेट तयार करण्यासाठी तर आज आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी मागच्या वर्षीच जाहिर केले होते की, ज्या दुकानदारांकडे नळजोडणी नाही त्यांना पाण्याचे बिल दिले जाणार नाही. याचे पुर्ण श्रेय आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांना आहे. आमचे कॉंग्रेस,राष्ट्रवादी कॉंग्रेस, आर.पी. आयचे जे गटनेते आहेत. त्या सर्वांना याचे श्रेय आहे. मी तर म्हणत होतो की हे श्रेय सर्वांचे आहे. परंतु हे म्हणतात की, आम्ही बजेटचा ठराव स्थायी समितीमध्ये एकमताने पारीत केलेला नाही. मी तर म्हणतो की, दुकानदारांवर पाण्याचे बिल न आकारणे यामध्ये सर्व पक्षाच्या लोकांचे श्रेय आहे असे मी बोलु इच्छित होतो परंतु हे म्हणतात की आम्ही त्याबाबत हरकत घेतली होती. मी असे म्हणतो की स्थायी समितीमध्ये बजेटबाबतचा जो ठराव पारीत झाला त्यामध्ये एकमताने पारीत झाल्याचे लिहीले आहे. त्या हिशोबाने मी बोलत होतो मला माहित नव्हते हरकत घेतल्यानंतर एक मताने ठराव पारीत केला होता. आता आमचे प्रभाग समितीमध्ये

तीन लाखाची तरतुद केलेली आहे. त्याचे कारण आहे मागच्या वर्षी आम्ही लोकांनी तीन तीन लाखाची तरतुद ठेवली होती. आर्थिक परिस्थिती खराब असतानाही आमच्या आयुक्त साहेबांनी फक्त एकेक लाखाचे आमचे काम केले होते. दोन दोन लाखाचे काम केले नाही. चार लाखाच्या नगरसेवक निधीमध्ये दोन लाखाचे काम केले होते. दोन लाखाचे राहिले होते. त्यानुसार प्रत्येक नगरसेवक दहा दहा हजाराच्या मतदार संघातुन निवडुन आला आहे. प्रत्येक सदस्याचे प्रभागात योग्य ते काम झाले पाहिजे. ते लक्षात घेवून आम्ही पावणे चार लाख नगरसेवक निधी. तीन लाख रूपये. प्रभाग समितीमध्ये त्यातील एकेक लाख एकेक सदस्याचे व महापालिकेचा जो सर्वसाधारण निधी आहे तो सव्वा तीन कोटीचा निधी कमी केला आहे आयुक्त साहेबांनी मागच्या वर्षी सर्वसाधारण निधीतुन सव्वातीन कोटीची कामे केली परंतु प्रभाग समिती व नगरसेवक निधीतील कामे करत नव्हते. म्हणुन आम्ही प्रयत्न करून मागील वर्षी त्याच्या मागील वर्षी ज्या ज्या शिर्षामध्ये जेवढा खर्च झाला आहे ते लक्षात घेवून तेवढया रक्कमेची तरतुद ठेवली आहे. बाकी कमी केले आहे. जेणेकरून सदस्यांना हा बजेट वास्तववादी वाटावा. बोगस वाटु नये. ही गोष्ट आम्ही लक्षात घेतली आहे. आता आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी दोन वेळा दोन शब्दांचा उल्लेख



केला त्याबाबत आमच्या श्री. दर्शनसिंग व श्री. दिलीप लालवानी यांनी हरकत घेतली. मी आपणांस त्या शब्दाचा पुर्नउच्चार करतो. एक वेळा आपण म्हंटले की, आपण कमिशन खाल्ले.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मी कुणावरही आरोप लावला नाही. मी म्हंटले.....

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>आपण सत्ताधारी पक्षावर आरोप लावलात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आपण म्हंटलात की, ठेकेदाराला फायदा देण्यासाठी, कमिशनसाठी आपण जकात वसुलीचे लक्ष्य कमी ठेवले. तो आपला शब्द चुकीचा होता. माफी मागा, माफी मागा असे आम्ही म्हणणार नाही परंतु आपण यापुढे बोलताना शब्द सुधारा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>माफी मागण्यासाठी नाही कमीत कमी शब्द तर मागे घेण्यास सांगितले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>व दुसरा एक शब्द आपण उच्चारला आहात. शरम येते. आपण शरम येते हा जो शब्द वापरला आहे. हे जे दोन्ही शब्द आपण वापरले आहेत सभागृहामध्ये.....

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>कृपया आपण ते शब्द उच्चारून दाखवा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आपण हे शब्द उच्चारले आहे. ते मेहरबानी करून यापुढे वापरू नका. असंसदीय शब्द वापरून न बोललेले बरे. पुढे चालुन ते शब्द उच्चारले नाही पाहिजेत. प्रभाग समितीचे काम यावर्षी तीन लाखाचे झाले पाहिजे. त्यासाठी आम्ही सर्वसाधारण निधी सव्वा तीन कोटीने कमी केला. नगरसेवक निधी बजेटच्या हिशोबाने १ टक्के होतो. तो पावणे चार लाख रू. यावर्षी ठेवला आहे. नगरपालिका शिक्षण मंडळात पंधरा वर्षापासुन काही सुधारणा झालेली नाही. आम्ही लोक सुधारणा करत नाही तर मग आपले सदस्य काय करतात? जे शिक्षण मंडळामध्ये होते. आपले सदस्य आता सुध्दा शिक्षण मंडळामध्ये आहेत. त्यांना सांगा की कामे करून घ्या. फक्त आमचेच सदस्य शिक्षण मंडळात नाहीत. आपले पण सदस्य आहेत. त्यांना आपण सांगा की शिक्षण मंडळात सुधारणा करून घ्या. त्यासाठीच आपण त्यांना निवडुन पाठविले आहे. दुसरे आज आमच्या श्री. दिलीप लालवानी यांनी म्हंटले की आमची सरकार

अशी नाही की आठ आठ दिवसामध्ये पेट्रोलचे भाव वाढवत आहे. गॅसचे भाव वाढवत आहे. लोकल कॉल तीन मिनिटा ऐवजी दोन मिनिटे केला जात आहे. टेलिफोनचे बिल वाढवत आहेत. आम्ही लोक त्या बाजुचे नाहीत. आम्हाला वाटते की, केंद्रामध्ये आपल्याच पक्षाचे सरकार आहे. आपण जर कर वाढवु इच्छित असाल तर त्यासाठी आम्ही तयार आहोत. मेहरबानी करून आज मला असे वाटते की, बजेटमध्ये काही सुधारणा केल्या पाहिजेत. स्थायी समितीमध्ये कचरा वाहतुकीसाठी जी ३ कोटीची तरतुद केली आहे. मागील वर्षी ती अडीच कोटीची होती. ती अडीच कोटी करून दहा लाख रू. महापौर बंगल्यासाठी,दहा लाख आयुक्तांच्या बंगल्यासाठी दहा लाख रू. आमच्या नामनिर्देशित सदस्यांसाठी त्यामध्ये श्री. लाल पंजाबी सुध्दा येतात त्यांना सुध्दा दोन दोन लाखाचा निधी मिळेल. त्यांच्याकडे सुध्दा काही लोक तक्रारी घेवून जातात त्या तक्रारींचे ते या निधीतुन निवारण करू शकतील. म्हणुन श्री. लाल पंजाबी यांच्यासाठी सुध्दा आम्ही दोन लाखाची तरतुद करू इच्छितो. त्यांना सुध्दा दोन दोन लाखाचे काम करण्याचा अधिकार असला पाहिजे. व दहा लाख रू. महापालिका इमारतीच्या दुरूस्तीसाठी ठेवले जावेत. हे बदल करून बाकी मागील वर्षी कचरा वाहतुकीसाठी जे अडीच कोटी रू. होते. त्याप्रमाणे यावर्षी सुध्दा अडीच कोटीची तरतुद केली जावी. त्यांनतर महापौर निधी उपमहापौर निधी व स्थायी समिती सभापती यांचा ७० लाखाचा निधी हे सभागृह वातानुकूलित करण्यासाठी ठेवले आहे. महापौर निधी ५० लाख, उपमहापौर



मा. सदस्या श्रीम. माने किरण व श्रीम जयश्री सुनिल सर्वे ७.०० वाजता सभागृहातून बाहेर पडल्या.

निधी २५ लाख व स्थायी समिती सभापती निधी २५ लाख हा निधी हे बदल झाले पाहिजेत. आज इथे जे बजेट सादर केले त्यामध्ये आमच्या सदस्यांनी टॅकरवरील खर्चाबाबत हरकत घेतली. टॅकर वरील खर्च वाढवुन ठेवला आहे. आपण जर प्रत्येक टॅकरवर ५० रू. १०० रू. २०० रू. शुल्क आकारू इच्छित असाल तर, आम्ही तर असे शुल्क आकारू इच्छित नाही. आपण जर आकारू इच्छित असाल तर आम्ही आपल्या बरोबर आहोत. परंतु आपल्याकडुन तशी सूचना आली पाहिजे. त्याप्रमाणे करण्यास आम्ही तयार आहोत. त्यानंतर आम्ही १६ रस्ते या बजेटमध्ये ठेवले आहेत. त्यामध्ये आणखी ४ रस्ते मी जोडु इच्छितो जरूरी नाही की आम्ही बजेटमध्ये वीस रस्ते ठेवत आहोत ते वीस च्या वीस झाले पाहिजेत. आयुक्त साहेबांना त्यामधील जे रस्ते निकडीचे / तातडीचे वाटतील ते रस्ते घेतले जातील. मागील वर्षीच्या रस्त्यांची जी स्थिती आहे ती आपणांस माहित आहे. सिरू चौकचा जो रस्ता आहे तो प्रगती पथावर आहे. त्याची मार्कींग सुध्दा दिली आहे. आजच आयुक्त साहेबांनी सही करून पी.डब्लु.डी. विभागात फाईल पाठविली आहे. आमचे आयुक्त श्री. पोखरकर साहेबांनी, आम्ही लोकांनी जी आश्वासने दिली. सत्ताधारी पक्षाने जी आश्वासने दिली. ३३ रस्ते संदर्भात आज जवळ जवळ ते ३३ रस्ते पुर्ण होत आले आहेत. पवई येथील उड्डाण पुलाचे काम आमच्याच कार्यकालावधीत पुर्ण झाला आहे. विरोधी पक्षीयांना माझी अशी विनंती आहे की,शहराच्या विकासासाठी आमच्या बरोबर खांदयाला खांदा लावुन विकास कार्याकडे लक्ष दयावे हीच आमची विनंती आहे. व चांगल्या कामासाठी वापर करा अशी मी अपेक्षा ठेवतो. व आमचे नेहमी हे धोरण राहिले आहे की, विरोधी पक्षीय ज्या काही सुचना करतात त्या ऐकुन घेतल्या पाहिजेत. म्हणुन मी सुरवातीपासुन शेवट पर्यंत गप्प बसुन ऐकत होतो. आपण जे जे बदल करू इच्छिता त्याबाबत आम्ही सुध्दा विचार करू की हे झाले पाहिजे आवश्यक आहे किंवा नाही. आमचे बंधु श्री. बोडारे साहेब म्हणाले की, झोपडपट्टयांमध्ये नळ जोडण्या नाहीत. म्हणुन दुकानदारांना पाणी जसे माफ केले तसे केले जावे. म्हणुन माझी अशी विनंती आहे की, झोपडपट्टी धारकांचे पाणी बिल माफ केले तर बॅरेकवाले पण म्हणतील की आमचे पण बिल माफ करा. बिल्डींगवाले ही म्हणतील, फ्लॅटवालेही म्हणतील हे लक्षात घेता आज महापालिका एम.आय.डी.सी. ला जे ३४ कोटी रू. भरत आहेत त्याबाबत १०० टक्के वसुली फक्त १३ कोटी

रू. आहे. आजही आम्ही शहर वासियांना पाणी बिल कमीच आकारत आहोत. झोपडपट्टीधारकांना फक्त ४० रू. दरमहा आकारत आहोत. बॅरेक व चाळीवाल्यांना तो ५० रू. आहे. फ्लॅट व बंगलेवाल्यांना १०० रू. आहे. तो खुपच चांगला आहे. आपण म्हणता की, बजेटचे आकडे मिळविण्याचा प्रयत्न करत आहात. आपण म्हणता की यांनाही पाणी बिल कमी करा. त्यांना पाणी कमी करा. इकडे दहा दहा वेळा पेट्रोलचे भाव वाढविले जातात. लोकल कॉलचा एक मिनिट कमी केला जात आहे. सर्व सरकारे तुटीत आहेत. भलेही केंद्र सरकार असो किंवा महाराष्ट्र सरकार असो. आम्हाला असे वाटत नाही की त्यांनी कर वाढविले म्हणुन आम्ही कर वाढवावेत. हा जो बजेट सादर केला आहे तो अतिशय चांगला आहे. मला वाटते मागील वर्षापेक्षा हा बजेट अतिशय चांगला आहे. सव्वा तीन कोटीची तरतुद कमी केली आहे सर्वसाधारण निधीमध्ये. आणि जे ५० कोटी रूपयाची टॅक्समध्ये तरतुद ठेवली आहे. त्याचे कारण आहे की बजेटमध्ये सुधारणा करण्याचे आयुक्तांना अधिकार आहेत. त्यासाठी स्थायी समिती किंवा महासभेची जरूरी नाही. ते त्यांच्या अधिकारात आहे. माझी सभागृहाच्या वतीने अशी विनंती आहे. जी नविन बांधकामे होतील त्यांना नविन दर लागु होतील. जुनी जी बांधकामे आहेत, बंगले आहेत त्यांना जुने दर लागु राहतील. नविन बांधकामांना नविन दर लावले तर ही जी ५० कोटीची तरतुद आहे ती पुर्ण होईल. अशी आम्ही अपेक्षा करतो. व जी ॲसेसमेंट आहे ती सुध्दा नव्याने केली जावी. व ज्या लोकांनी अदयाप पर्यंत पऱ्याचे छप्पर असलेली जागा आर.सी. सी. छप्पर असल्याचे ॲसेसमेंट मध्ये दर्शविले आहे अशा लोकांची सुध्दा पुन्हा ॲसेसमेंट करू. त्यामुळे आम्हाला बरेचसे फायदयाचे होईल. व आमचे आयुक्त मा. श्री. पोखरकर साहेबानी अनाधिकृत नळजोडणी वर १०४० रू. मंजुर केले होते. त्यांचा प्रस्ताव ३००० रू. चा होता.



यावेळेला आपण जो फार्मुला आणला आहे तो अतिशय चांगला आहे. १००० रू. नळजोडणीची अनामत रक्कम आहे. १००० रू. त्यांना दंड अशाप्रकारे २००० रू. आकारले तर व आपण त्यांची नळजोडणी नियमीत केली तर पुर्ण शहरात १० ते १५ हजार अनाधिकृत नळजोडण्या आहेत. याचे जर महापालिकेला उत्पन्न मिळाले तर महापालिकेची स्थिती आणखी सुधारेल. तर मला वाटते की सभागृहात प्रत्त्येक सदस्यांनी एकेक वेळा बोलावे. ते खुप चांगले होईल. एका सदस्याला एका वेळी बोलले पाहिजे परंतु एक सदस्य प्रत्त्येक वेळी जेव्हा आठवण येईल तेव्हा बोलत राहीले तर ते सभागृहात चांगले नाही. यासाठी सदस्यांने एकदाच बोलावे जसे मी आज एकदाच बोललो तर त्या हिशोबाने प्रत्त्येकाने बोलले तर खुपच चांगले होईल. माझ्यामते चर्चा खुपच झाली आहे. मी आणखी चार रस्त्यांची नावे देत आहे ती त्यामध्ये जोडली जावीत. आयुक्तांवर सोपवु या. यामधील त्यांना जो रोड योग्य वाटेल त्यांना वाटले की, अमुक हा रोड गंभीर अडचणीचा आहे त्याप्रमाणे त्यांनी रस्ते घ्यावेत स्थायी समिती अध्यक्षा भाभी ज्योती कालानी यांनी आमच्या समोर जो बजेट सादर केला आहे. त्यामध्ये आम्ही उल्हासनगर वासियांवर कोणताही नविन कर लादलेला नाही. उल्हासनगर वासियांना आम्ही ही भेट दिली आहे. ज्या दुकानदारांकडे नळ जोडणी नाही त्यांना पाणी बिल नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आर.पी. आय. युतीचा विजय असो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>बाकी आमचे जे आकडे कमी केले आहेत त्याबाबत मी सर्व सदस्यांना सांगु इच्छितो की स्थायी समितीने जसा हा ठराव एकमताने पारीत केला आहे. तसाच महासभेनेही एकमताने पारीत करावा. जसे स्थायी समितीमध्ये आपण हरकती घेतल्या होत्त्या. त्याप्रमाणे येथे सुध्दा हा ठराव एकमताने पारीत केला जावा. धन्यवाद.

मा. सदस्या श्रीम. सिमा मोकल यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>मा. महापौरजी, याठिकाणी सभागृह नेते यांनी आमच्यावर जो आरोप लावलेला आहे. तो खरा आहे किंवा खोटा आहे हे सिध्द

करण्याच्या अगोदर मी याठिकाणी आपल्या निर्दशनास आणु इच्छितो की स्थायी समितीमध्ये ज्यावेळेस अर्थसंकल्प हा विषय मांडला गेला. बजेटच्या बाबतीत चर्चा करण्याअगोदर जेवढे मुददे आम्ही त्याठिकाणी मांडले होते ते सर्व मुददे आम्ही पुर्ण करणार आहोत असे श्री. विनोद तलरेजा यांनी सांगितले होते. स्थायी समिती अध्यक्षा ज्योती कालानी यांनी सुध्दा त्याठिकाणी आश्वासन दिलेले आहे. व याठिकाणी त्याचा खुलासा करणार आहे असे सांगितले होते. सर्व प्रथम आम्ही त्यांना सांगितले होते की प्रभाग समिती, विषय समित्या तुम्ही कमी करणार आहात की नाही? अर्थसंकल्पामध्ये हा खर्च तुम्ही कमी केला पाहिजे. मला जर पाच हजार रूपये पगार असेल व माझ्या घरामधील खर्च जर ८०००रू. असेल तर तो न झेपण्यासारखा आहे. याठिकाणी आपण न झेपणारा खर्च कमी केला पाहिजे. असे मी तेथे म्हंटल्यानंतर त्यांनी सांगितले की, विषय समित्या आम्ही कमी करणार आहोत. हे श्री. विनोद तलरेजा यांचे शब्द आहेत. याठिकाणी सभागृहनेते श्री. वनवारी साहेबांना सांगु इच्छितो की, त्याठिकाणी आपण नव्हतात आपण स्थायी समितीचे सदस्य नाहीत आणि त्याठिकाणी आपण उपस्थित नसताना याठिकाणी आपण आरोप लावणे योग्य नाही त्याचबरोबर ज्याप्रमाणे व्यापा-यांना पाणी पटटी कर आपण कमी केला आहे. त्याबरोबर झोपडपटट्यांतील लोकांना सुध्दा पाणी बिल कमी केले पाहिजे. झोपडपटटीमध्ये गरीब लोक राहतात त्यांना सुध्दा पाणी पटटी कर माफ करण्यात यावा. हे सुध्दा त्यांनी त्याठिकाणी मान्य केले आहे. त्याचबरोबर टॅकरव्दारे पाणी देण्याबाबत मी दोन वेळेस हा महत्त्वाचा मुददा सभेमध्ये मांडला होता की गोषवा-यामध्ये लिहुन आले होते की ७० टक्के पाणी बंगले आणि सोसायटयांना आपण पुरवतो महानगरपालिकेव्दारे आणि ३० टक्के पाणी झोपडपटट्यांना देतो तर त्याठिकाणी मी स्थायी समिती सदस्यांना व अध्यक्षांना विनंती केली होती की आपण महाराष्ट्रामध्ये कुठल्याही नगरपालिकेमध्ये, महानगरपालिकेमध्ये टॅकरव्दारे निशुल्क पाणी दिले जात नाही तरी पण माझी याठिकाणी अशी विनंती राहील की ७० टक्के बंगले व इमारतींना जर आपण मोफत पाणी देता तर त्याठिकाणी तरतुद करून त्यांच्यावर कर लादावा. भलेही तो कमी असेल. त्याठिकाणी झोपडपटट्यांमध्ये ३० टक्के पाणी जाते. त्याठिकाणी चार्जेस न लावता ७० टक्के पाण्यावर आकार



लावावा. त्याठिकाणी स्थायी समितीचे आमचे अध्यक्ष सन्माननिय श्रीमती ज्योती कालानी यांनी सांगितले की,आमचे मतदार हे नाराज होवून जातील. तर त्यांना मी आठवण करून देवू इच्छितो की, जर तुमचे मतदार बिल्डींग, सोसायटया, बंगल्यामध्ये राहत असतील पण आमचे मतदार बिल्डींग आणि सोसायटयामध्ये राहतात.आमचे मतदार नाराज होत नसतील का? याठिकाणी मी आपणांला आवर्जुन सांगु इच्छितो की मतांच्या भिकेसाठी जर महानगरपालिकेचे दिड कोटीचे नुकसान होत असेल तर त्याठिकाणी आपण स्थायी समितीत वारंवार सांगुन सुध्दा त्याच्यामध्ये तरतुद करण्यांत आली नाही. तर पुर्ण या महासभेत अर्थसंकल्प आल्यानंतर पुन्हा एकदा मी सांगितले की हा जो दिड कोटीचा आपला घाटा होत आहे तो जर भरून काढायचा असेल तर ७० टक्के ज्याठिकाणी आपण मोफत पाणी देतो त्याठिकाणी आकार लावला जावा. त्यावर श्री. विनोद तलरेजा यांनी सांगितले की, विचार केला जाईल. त्याचबरोबर महापौर फंड हा सुध्दा, त्यांनी वाचताना अशी काही दिशाभुल केली की, महापौर फंड आम्ही रदद करतो. हा महापौर निधी राहणार नाही असे त्यांनी सांगितले होते. स्थायी समिती अध्यक्षा याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्यासमोर मी त्यांना आठवण करून देवू इच्छितो की हा महत्त्वाचा मुददा आहे याचा खुलासा करण्यात आलेला नाही. महापौर फंड आपण देणार आहात कींवा नाही? त्याचबरोबर उपमहापौर फंड हा सुध्दा स्थायी समितीमध्ये सांगितले गेले की तो दिला जाणार नाही. त्याची दुस-या ठिकाणी तरतुद केली जाईल. त्याचबरोबर स्थायी समिती सभापती फंड जो आहे तो सुध्दा दिला जाणार नाही. यावर्षी तो सुध्दा रदद करण्यांत आलेला आहे. या सगळया गोष्टीचा, आठ महत्त्वाचे मुददे मी मांडलेले आहेत याचा पुर्णपणे खुलासा करण्यात यावा. व याची पुर्णपणे माहिती नसताना सभागृहनेते त्यांनी जो आरोप केला आहे तो पाठीमागे घ्यावा. तो चुकीचा आरोप आहे. जे आमचे मुददे त्याठिकाणी मांडले गेले व त्यांनी त्याला होकार देवून पास केले आहे. ते

याठिकाणी सुध्दा त्यांनी सर्व संमतीने ठराव पारीत करावा अशी माझी याठिकाणी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब इथे भाषण करताना श्री. किशोर वनवारी यांनी माझ्यावर आरोप लावले की मी अभ्यास करून आलो नाही. तर कृपया याविषयावर जरा आयुक्त साहेबांनी सांगावे की जे ५३ कोटी ७५ लाख एक वर्षाचे ठेवले आहे. त्यामध्ये दहा टक्के वाढ करून साठ कोटी रू. करा असे मी म्हंटले त्यात चुकीचे काय म्हंटले? व एक गोष्ट ही सुध्दा सांगा की येथे वसुलीचे आकडे सांगितले गेले. वसुली अधिका-यांना करायची आहे. तर कृपया या बजेटवर आयुक्त साहेब काही बोलतील तर बरे होईल. १६८ कोटीची वसुली होईल की नाही. आपण ज्याप्रमाणे कल्याण महानगरपालिकेमध्ये जकातीची वसुली ही महानगरपालिकेने स्वतः करून उददीष्ठा पेक्षा अधिक वसुली केली. तर काय उल्हासनगर मध्ये शक्य नाही. आम्ही उल्हासनगरच्या जनतेला जी आश्वासने दिली होती. शहरामध्ये जकात वसुलीचे काम महानगरपालिका सांभाळेल त्याचे खाजगीकरण केले जाणार नाही. त्या विषयावर जर स्थायी समितीच्या बजेटमध्ये येथे फेरफार केला जावू शकत असेल तर कृपया याठिकाणी याबाबत सुध्दा फेरफार केला जावा की, येणारी जी जकात वसुली आहे ती महानगरपालिका सांभाळेल व आम्ही सात कोटी पेक्षा जास्त ७० कोटी पर्यंत पोहचु. कृपया आयुक्तांनी याबाबत महासभेस जरा स्पष्टीकरण करावे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आयुक्त साहेब, आपण दुकानदार बंधुवरील पाण्याचा टॅक्स कमी करणार आहात. हा धोरणात्त्मक निर्णय आहे. तुम्ही कोणत्त्या आधारावर त्यांचा पाणी बिलाची रक्कम माफ करता. त्यांच्याकडे नळजोडणी नाही म्हणुन तुम्ही त्यांचे पाण्याचे बिल माफ करता. झोपडपटटीमध्ये पण, आम्ही सगळयांचे नाही म्हणत, ज्यांच्याकडे कनेक्शन नाही अशा लोकांची पाणी बिले तुम्ही माफ करावीत. आयुक्त साहेब हा अर्थसंकल्प प्रत्यक्षात उतरेल किंवा नाही कारण की याची अंमलबजावणी तुम्ही करणार आहात.हे शक्य आहे की नाही, याबाबत तुम्ही उत्तर दयावे.



<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर, मा. स्थायी समिती सभापती, उपस्थित सर्व सदस्य, एक तर जकातीच्या आकडयांबाबत मला विचारणा करण्यांत आली आहे. जकात वसुली, आमच्या आर्थीक वर्षानुसार पाहिली तर १ एप्रिल पासुन ३१ मार्च पर्यंत असते. उल्हासनगर महानगरपालिकेने त्याचे खाजगीकरण केले त्याची सुरूवात १ एप्रिल पासुन सुरू होण्याऐवजी जुलै पासुन सुरू होते. यासाठी जेव्हा आम्ही १२ महिन्याच्या कालावधीसाठी ठेका देतो. जकात ठेक्याची रक्कम त्या वित्तिय वर्षामध्ये पुर्ण पणे वसुल होत नाही. मागील वर्षी जी वसुली केली त्यामधील काही व पुढच्या वर्षासाठी जो ठेका निश्चित केला आहे त्यामधील काही, ६० कोटी वर्षाचे याप्रमाणे जर ठेका दिला तर ५४ कोटी, ५४ लाख दिले गेले आहे. परंतु बारा महिन्यात ५४ कोटी आम्हास मिळणार नाही त्यापेक्षा कमी मिळणार आहेत. कारण की मागील वर्षाचे जे महिने आहेत त्यामध्ये काही कमी रक्कम मिळणार आहे. त्याच हिशोबाने पाहिले गेले तर ५७ कोटी जी रक्कम दर्शाविली आहे ती योग्य आहे. इथे जे ५७ कोटी १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंतची अपेक्षीत धरली आहे ती बरोबर आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>यांचे म्हणणे होते की, ठेक्याची रक्कम किती असेल?

*<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>ठेक्याची रक्कम जी आहे ती यावर्षाची प्रत्यक्ष वसुली त्यावर दहा टक्के वाढ ऐवढी नेहमी असते.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>यावर्षी जी रक्कम अपेक्षित करणार आहात त्या रक्कमेपर्यंतची वसुली महापालिका करू शकते की नाही? जी आपण कल्याणमध्ये करून दाखविली आहे. येथे आपण करून दाखवु शकत नाही का?*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मागच्या वर्षी आपण कमी रक्कमेची मंजुर केली होती.*

*मा. सदस्या श्रीम. नंदीणी ब्राम्हणकर ७.१० वाजता सभागृहातुन बाहेर पडल्या.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आयुक्त साहेबांना उत्तर देवू दया ना. आयुक्त साहेबांनी जी कमाल कल्याणमध्ये करून दाखविली ते आपण उल्हासनगरमध्ये करू शकत नाहीत का?*

*<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>आजपर्यंतचा येथील जो अनुभव आहे. महापालिका कर्मचा-यांकडुन जेवढी जकात वसुली होत होती त्यापेक्षा जास्त वसुली अभिकर्तो नेमल्यानंतर झाली आहे. उल्हासनगर हे एक असे शहर आहे इथे जकात वसुलीचा ठेका यशस्वी झाला आहे. इतर ठिकाणी जसे की, आम्ही कल्याणमध्ये प्रयत्न केले, एकच वर्ष झाले पंरतु एका वर्षातच त्या ठेकेदारास नुकसान झाले त्यामुळे तो निघुन गेला असे त्याचे म्हणणे आहे. इतर ठिकाणी सुध्दा मग ती अमरावती असो, मालेगाव असो जेथेसुध्दा खाजगीकरणाचा प्रयत्न केला गेला तेथे तो यशस्वी झाला नाही. एकवर्ष कसेतरी निभावुन नेले. कोल्हापुरमध्ये तर मध्येच सोडावे लागले. राज्य सरकारला मध्यस्थी करून मध्येच तो ठेका थांबवावा लागला. पंरतु येथे तो यशस्वी झाला आहे. व मला वाटते आपण जी ठेक्याची रक्कम निश्चित कराल ती राज्य शासनाची जी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. ती लक्षात घेवून ठरवाल व जे ठरवाल त्यापेक्षा जर कमी आले तर सभागृहास व आयुक्तांना त्यावेळेला निर्णय घ्यावा लागेल. आमच्या निविदा रक्कमेपेक्षा जर ते कमी रक्कमेचा ठेका आला तर व जर सदनाचे असे मत झाले की, खाजगीकरण केले नाही पाहिजे, नगरपालिका कर्मचा-यांकडुन वसुली केली पाहिजे तर आपण जसे म्हणता त्याप्रमाणे आम्ही पुर्ण प्रयत्न करू. व ठेकेदार जी रक्कम भरेल त्यापेक्षा जरूर जास्त रक्कम वसुल करू.*

--२९--

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. आयुक्त साहेब, जर जकातीची निविदा निघाली तर, जकातीची निविदा अशी निघते की ठरवून दिलेल्या रक्कमेपेक्षा दोन कोटी ती कमी आली तर आपण दुसरी निविदा मागवु शकत नाही. अशा परिस्थितीत जकातीची निविदा मागविली होती, मी आपणांस निवेदन करेन की, कमीत कमी दोन महिने किंवा दिड महिना अगोदर ही प्रक्रिया सुरू केली तर जर आम्हाला २ कोटी किंवा ३ कोटी जकात निविदा ठेका कमी आला तर आम्ही दुस-यांदा किंवा तिस-यांदा जकात निविदा मागवु शकतो. जेणे करून आमचे जे लक्ष्य आहे ते पुर्ण करून घेवू शकतो. मी आपणांस निवेदन करतो की, जकातीचा ठेका अशापरिस्थीतीत देवू नये की आज यांची मुदत संपते व उदया निविदा उघडली जाते. अशा पध्दतीने करू नये. एक दिड महिन्याची प्रक्रिया ठेवली जावी.*

***मा सदस्य श्री. ठाकुर बेहरानी सभागृहातुन बाहेर पडले.***

*<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>आपली ही जी सूचना आहे, जेव्हा निविदा मागविल्या जातील व निर्धारित केलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कमेची निविदा येईल. अशी परिस्थिती जर आली तर त्यावेळेस दुसरी निविदा मागविण्याबाबत विचार केला जाईल आता त्यावर भाष्य करणे योग्य*

होणार नाही. दुसरे असे की सन्माननानिय विरोधी पक्षनेता यांनी विचारले होते की झोपडपट्टयांमध्ये जेथे नळजोडण्या नाहीत. तेथे जो सरसकट पाणी पट्टीचा दर लावला आहे. त्याबाबत काय केले जावू शकते. आम्ही यावर्षी जो प्रस्ताव दिला होता तो आमचा मुळ प्रस्ताव पाहिला तर एकत्रित मालमत्ता करामध्ये पाण्यासाठी दोन प्रकारचे कर आहेत. एक आहे पाणीपट्टी. जे पाणी पुरविले जाते भलेही ते सार्वजनिक नळाव्दारे असो. किंवा टॅकर व्दारे असो, विंधन विहरी व्दारे असो. किंवा विहिरीव्दारे असो. ज्या व्दारेही पाणी पुरवठा केला जातो. त्याबाबत सर्व लोकांकडुन पाण्याचे जे दर वसुल करायचे आहेत ते कोणत्त्या प्रकारचे असावेत व दुसरे असे की, जी भांडवली कामे ,पाणी पुरवठा योजनेसाठी जो खर्च करावा लागतो त्यासाठी पाणी पुरवठा लाभ करहे दोन कर आहेत. येथे हे दोन्हीही सरसकत दराने घेतले जात होते. जसे की १०० रू. महिना, ६० रू. महिना याप्रमाणे, जेथे पाणी पुरवठा केला जात नाही तेथे सुध्दा लावला जात आहे. सरसकट दराने पाणी पुरवठा लाभ कर लावणे. हे कायदयानुसार बरोबर नव्हते. त्यामुळे आमच्याकडे जेव्हा एक शिष्टमंडळ आले तेव्हा आम्ही त्यांना असे आश्‍वासन दिले होते की, पुढील बजेटमध्ये जेव्हा आम्ही दर प्रस्तावित करू. त्यावेळी पाणी पुरवठा लाभ कर कर योग्य मुल्यांनुसार प्रस्तावित करू. व तसे आम्ही ५ टक्के कर योग्य मुल्याच्या हिशोबाने केले होते. परंतु येथे अगोदर एक टक्का होता. तोच स्थायी समितीने स्विकृत केला म्हणजे ४ टक्के दरवाढीचा जो प्रस्तव होता तो स्विकृत केला नाही. राहीली गोष्ट पाणीपट्टीची जेथे पाणी नळाव्दारे दिले जाते किंवा दिले जात नाही. त्यासाठी सरसकट दर निश्‍चित करणे हा स्थायी समितीचा अधिकार आहे. व त्या अधिकाराने स्थायी समितीने सरसकट दर निश्‍चित केला आहे. जे दर निश्‍चित केले आहेत ते योग्य आहेत. कायदयानुसार योग्य आहे. ४० रू. ठेवायचे २० रू. ठेवायचे तो स्थायी समितीचा अधिकार आहे. १०० ठेवायचे ५० ठेवायचे तो सुध्दा स्थायी समितीचा अधिकार आहे. त्या अधिकारानी स्थायी समितीने पाणीपट्टीचा जो दर निश्‍चित केला आहे. त्यानुसार सर्वांत कमी जो दर आहे. तो चाळी व झोपडपट्टी धारकांसाठी आहे. ४० रू. जो दर आहे त्यामध्ये बिल्कुल वाढ केलेली नाही. परंतु जे फ्लॅट आहेत किंवा बंगले आहेत. त्यामध्ये आम्ही वाढ प्रस्तावित केली होती. स्थायी समितीने ती स्विकृत केली नाही. तेच दर कायम ठेवले. वाढही केली नाही व कमीही केले नाही. राहिली गोष्ट बजेटच्या वस्तुस्थितीची त्याची अंमलबजावणी होईल किंवा नाही. ज्या हिशोबाने उत्पन्न अपेक्षित धरले आहे. त्यानुसार होइल. बजेट शब्दाचेच विश्‍लेषण केले तर आपणांस असे दिसुन येईल की, अंदाजपत्रक. अंदाजाबाबत वस्तुस्थिती आज कशी सांगितली जावू शकते? तो अंदाज आहे होवू शकते ५० कोटी आम्ही अंदाज करू. ५५ कोटी होवु शकतात किंवा ४५ कोटी होवू शकतात. अदांजामध्ये १० टक्के पुढे मागे होवू शकते. परंतु अंदाज वास्तवात उतरेल किंवा नाही. त्याबाबत आज, जसे की, आपण मागील तीन वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे आकडे पाहिले तर ते पाहील्यानंतर काही बोलु शकत नाही. जसे की आम्ही रिवाईज



असेसमेंटची गोष्ट केली. शहरामध्ये प्रत्येक इमारत व जागेची मोजणी झाली पाहिजे आकारणी झाली पाहिजे परंतु ती येथे झालेली नाही. मालमत्ता कराचे उदाहरण घ्या. ५० कोटी उत्पन्न अपेक्षित धरले आहे. मागील कोणत्त्याही वर्षी २२ कोटी पेक्षा जास्त वसुली झालेली नाही. परंतु यावर्षी आम्ही अपेक्षा करत आहोत ४० कोटीची जे की आजपर्यंत २० कोटी झाले आहेत. १८ कोटीपेक्षा जास्त झाले आहेत. व पुढील वर्षीच्या अंदाजपत्रकात आम्ही अपेक्षा करत आहोत ५० कोटीची ती अपेक्षा आम्ही का केली? आम्हाला कारण दयावे लागते. ते कारण असे आहे येथील ब-याचशा मिळकतींची आकारणी झालेली नाही. किंवा आकारणी करावयाची आहे. किंवा तिची आकारणी व्यावसायिक वापराशी केली आहे. तर प्रत्यक्षात ती रहिवासी वापरातील आहे. मिळकत आर.सी.सी. छप्पर असलेली आहे. परंतु तीला कर लावले आहेत. ए.सी. सी. छप्पर असलेल्या मिळकतीचे, या ज्या चुका कर आकारणीमध्ये झाल्या आहेत त्या जर आम्ही सुधारल्या तर कर योग्य

मुल्य १९८६ पासुन बदलले नाही ही गोष्ट आपणांस सांगितली पाहिजे की ठाणे जिल्हयामध्ये जेवढयाही नगरपालिका आहेत. त्यासर्व महानगरपालिकांमध्य उल्हासनगर महानगरपालिकेचा करयोग्य मुल्याचा दर(लेटींग रेट) कमी आहे. कराचे दर मी म्हणत नाही ते तर कमी आहेतच. आर.सी.सी. बांधकांमास ९० पैसे प्रतिफुट किंवा ९ रू. प्रति १०० चौरस फुट याप्रमाणे आहे. परंतु तेच दर कल्याणमध्ये जर आपण पाहिले तर २३ रू. आहे. ठाण्यामध्ये बघितले तर १५ रू. पेक्षा जास्त आहे. ते लेटींग रेट जर वाढविले तर व मिळकतींची पुर्न मोजणी केली तर जसे की आमच्या कायदयामध्ये तरतुद आहे. ते केले तर ५० कोटी वसुली संभव होईल असे मला वाटते. राहीली पाणी कराची गोष्ट, पाणी करामध्ये ....

**मा. सदस्या श्रीम. ससाने लक्ष्मीबाई ७.३० वाजता सभागृहातून बाहेर पडाल्या.**

यावेळी सत्ताधारी पक्षातील काही सदस्य टाळया वाजवून स्वागत करत होते.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u> 'जे लोक टाळया वाजवत आहेत ते कर वाढविण्याच्या बाजुने आहेत का? लेटींग व्हॅल्यु?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी याबाबत खुलासा करू इच्छितो, मी जे दोन शब्द म्हंटले ते स्पष्टपणे म्हंटले की जुन्या कोणत्त्याही इमारतींवर हे दर लागु होणार नाही. ज्या नविन इमारती, झोपडे, बंगले तयार होतील त्यांना नविन दर लागतील. त्यानंतरही आपणांस सत्ताधारी पक्षावर गर्व असला पाहिजे. ते पुर्ण ठाणे जिल्हयामध्ये जेवढे दर कमी नाहीत तेवढे येथे आहेत. आयुक्त साहेबांनी स्वत: कबुल केले आहे की, १९८६ पासुन आम्ही लेटींग व्हॅल्यु वाढविलेली नाही. तर कृपया आपण आमच्या भावना समजुन घ्या. पुर्ण शहरवासियांवर आम्ही करांचे ओझे टाकु इच्छित नाही. म्हणुन ठाणे जिल्हयात सर्वात कमीत कमी दर येथे आहेत. झोपडपटटयांसाठी सुध्दा सर्वात कमी दर येथे आहेत. आम्ही सर्व शहरवासियांबरोबर आहोत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>साहेब, झोपडपटटीचा मुददा धोरणात्त्मक मुददा आहे त्याबाबत तुम्ही काही सांगितले नाही. नळजोडणी ज्याच्याकडे नसेल त्याच्याकडुन तुम्ही पाणी पटटी घेणार आहात का? धोरण काय ठरविले की, दुकानदारांकडे नळजोडणी नाही. म्हणुन त्यांच्याकडुन तुम्ही पाणीपटटी घेणार नाहीत. आणि हेच झोपडपटटीमध्ये नळजोडणी ज्यांच्याकडे नसेल त्यांच्याकडुनही तुम्ही पाणीपटटी घेवू नका ना हेच आमचे म्हणणे आहे. आम्ही कुठे म्हणतो की, दुकानदारांकडु न घ्या म्हणुन जर तुम्ही दुकानदारांकडुन घेत नाही तर झोपडपटटी धारकांकडुन पण घेवू नका ना? न्याय सगळयांना सारखाच पाहिजे. एकाला एक आणि एकाला दुसरा असा नको त्यामुळे आंदोलने होतील, मोर्चे निघतील. तुम्ही जे करता ते व्यवस्थित करा.

<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>पाणी पटटी आकारण्याबाबत आम्ही सांगीतले आहे की, जेथे प्रत्यक्षात नळजोडणी नाही.



परंतु दुस-या कोणत्त्याही माध्यमाने पाणी घेतले जाते. आपण जर सेक्शन १३० व १३४ वाचले तर आम्ही जो दर झोपडपटटीधारकांसाठी प्रस्तावित केला आहे. तो
योग्य आहे. तेथे जर सार्वजनिक नळाव्दारे किंवा टॅकरव्दारे पाणी पुरवठा होत आहे. टॅकरही नाही सार्वजनिक नळही नाही असे होवू शकत नाही. मग लोक पाणी कुठून पिणार?

**मा. सदस्य श्री. सतरामदास सभागृहातुन बाहेर पडले.**

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मग व्यापा-यांना कुठून पाणी मिळते?

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-व्यापारी लोक पुर्ण दिवसभरात एक मडके पाणी पितात. फ्लॅटमध्ये घरांमध्ये जेवणासाठी, कपडे धुण्यासाठी, आंघोळीसाठी पाणी वापरले जाते......

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-दुकानदार आपल्या घरून पाणी घेवून येतात हे इतिवृत्तांतात लिहा.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तरी आम्ही श्री. बच्चाराम रूपचंदानी यांना विचारू इच्छितो की त्यांना वाटते का की दुकानदारांनाही पाणी बिल दिले पाहिजे?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आम्हाला वाटते की, या दोघांचेही पाणी बिल रदद केले जावे. स्थायी समिती अध्यक्षांनी तसे आश्वासन दिले होते. आपण झोपडपट्टीधारकांना बिल माफ करण्याच्या विरोधात आहात का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्त साहेबांनी याचा खुलासा केला आहे. की झोपडपट्टी धारकांना जो पाणीपट्टीचा दर आकारला आहे तो कमीत कमी आहे. कलम १३० आणि १३४ नुसार ते कुठून ना कुठून पाणी घेतात. त्यानुसार त्यांच्याकडुन पाणीपट्टी घेवू शकतो. कुणाला सार्वजनिक नळ नाही तर टॅंकर नाही तर बोअरवेल असे काहीतरी साधन आहे. म्हणुन लोक पाणी भरतात त्यासाठी श्री. रमेशजी आपण असा विचार करू नका की फक्त झोपडपट्टीधारकांसाठीच होत आहे. हा कर बॅरेक व चाळी यांना सुध्दा लावला आहे. त्यानंतर ४० फ्लॅट आहे त्या सोसायटीमध्ये दोनच नळजोडण्या आहेत. ४० फ्लॅट आहे. ज्या ३८ लोकांना नळजोडण्या नाहीत त्यांनाही पाणी पट्टी आकारली जात आहे. आपण फक्त एकच गोष्ट बोलु नका. झोपडपट्टयांच्या बरोबर चाळी,बॅरेक व सोसायटी, फ्लॅट या सर्वांना पाणीपट्टी आकरली जात आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-साहेब धोरणात्मक निर्णय आहे. सर्वांना माफ केले जावे.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आपण पण पेट्रोल, डीझेल, गॅस यावरच्या किंमती कमी करा. आम्ही पण पाणी पट्टी माफ करतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-सभागृह नेताजी ते आम्ही वाढविलेले नाहीत. महापालिकेने वाढविलेले नाहीत. जे आपल्या हातात आहे ते आपण सांगा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आपणांस आयुक्त साहेबांनी सांगितले, आम्ही १ रू. सुध्दा वाढविला नाही.मागील तीन वर्षापासुन जे दर आहेत तेच ठेवले आहेत. ४० रू. आहे तर ४० रू. ठेवले आहेत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-भेदभाव करू नका. आपण पण झोपडपट्टीचे नेतृत्त्व करीत आहात. आपणंास सरसकट दर ठेवायचे आहेत तर दुकानदारांनापण ठेवा ना?
मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आम्ही झोपडपट्टयांमधुन, सोसायटयांतुन बॅरेकमधुन निवडुन आलो आहोत. तिघांनाही आम्ही पाणीपट्टी आकारत आहोत.



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आपण झोपडपट्टयांच्या विरोधात आहात.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-सन्माननिय महापौरजी, याठिकाणी मी आपणांस महत्त्वाचे सांगतो. स्थायी समितीमध्ये मी सांगितले होते की, शहाड गावठाण माझ्या प्रभागातील विभाग आहे. त्याठिकाणी सेंच्युरी रेयॉन कंपनीतुन

पाणी घेतले जाते. तरी पण त्या लोकांना पाण्याची बीले लावली आहेत. अशीच काही उदाहरणे झोपडपट्टीमध्ये आहेत. काही लोक दुसरीकडुन भाड्याने पाणी घेतात. तर त्यांना याठिकाणी पाण्याचा कर लादु नये.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब आपण सांगितले की, झोपडपट्टयांमध्ये सार्वजनिक नळ आहेत. झोपडपट्टयांमध्ये पाण्याचे टॅकर जातात. माझ्याकडे पुरावा आहे की मी टॅकरसाठी २७ पत्र दिली आहेत. मी उदया तुमच्या ऑफीसमध्ये त्याबाबतचा रेकॉर्ड दाखवितो. एका पत्रामध्ये मला एक सुध्दा टॅकर मिळालेला नाही. माझा पुर्ण पॅनल झोपडपट्टीचा आहे. माझी विनंती आहे तुम्हाला की तुम्ही श्रीमंत माणसाला बिल माफ करता. व्यापारी मंडळी आमचे भाऊबंद आहेत. ते श्रीमंत आहेत ते पाण्याचे बिल भरू शकतात. झोपडपट्टयांमध्ये राहणारे लोक आर्थिक दृष्टया असमर्थ आहेत. ते मोल मजुरी करून जीवन जगतात. अशा लोकांना १०० रू. दरमहा हिशोबाने आजही बिल येत आहे. तर मला एक विनंती करायची की झोपडपट्टीमध्ये ज्या लोकांना नळजोडणी नाही. त्यांना पाण्याचे बिल माफ केले जावे. ज्या लोकांना पाण्याची सोय नाही. आणि या गोष्टीसाठी जे मोर्चे, धरणे या ज्या पुढच्या मोहिमा होतील त्यासाठी आपणांस सामारे जावे लागेल तरी कृपया व्यापारी मंडळींचे बिल जसे माफ केले तसे झोपडपट्टीधारकांचेही बिल माफ करावे अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब आपण आताच सांगितले की झोपडपट्टयांमध्ये सार्वजनिक नळ आहेत. परंतु सर्व झोपडपट्टयांमधील सार्वजनिक नळ कधीच काढुन घेतलेले आहेत. कुठल्याच झोपडपट्टीमध्ये सार्वजनिक नळ नाहीत. दुसरी महत्त्वाची गोष्ट आपण सांगितलीत की उल्हासनगरमध्ये राहतो म्हणजे आपण उल्हासनगरचे पाणी कुठूनतरी पितो. मग ते बावडीचे असुदे, टॅकरचे असु दे किवा बोअरवेलचे असु दया. माझे असे म्हणणे आहे की, प्रभाग क्र. ९ मध्ये मा. आयुक्त साहेबांनी लक्ष दयावे. प्रभाग क्र. ९ मधील भारत नगर हा जो ऐरीया आहे त्या भारत नगर येथे एक कानसईचा नाला आहे. त्या नाल्याच्या पलिकडे अंबरनाथ विभाग येतो तर भारत नगरचे लोक अंबरनाथ वरून पाणी आणतात. आणि तिकडच्या लोंकांना त्याचे पैसे देतात तर त्या लोकांनी सुध्दा आपल्या नगरपालिकेचा पाण्याचा टॅक्स भरायचा का? मा. आयुक्त साहेबांना माझा प्रश्न आहे की प्रभाग क्र. ९मधील भारत नगरमधील लोकांनी काय करायचे?

**मा. सदस्या श्रीम. किरण माने , श्रीम. नंदिनी बामणकर ७.४० वाजता सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

<u>मा. महापौर:-</u>बजेट सर्व संमतीने पारीत कराल तर बरे होईल.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहेत. हे समजुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-</u>मा. महापौरजी, आपण म्हणाला होतात की, पाण्याचा जो विषय आहे त्यावर चर्चा केली जाईल. बजेट भलेही आपण मंजुर करा परंतु पाण्याच्या प्रश्नाचे काय करता?

**मा. सदस्या श्रीम. सिमा मोकल, श्रीम. रेखा किशनानी हया सभागृहातुन बाहेर पडल्या.**

<u>मा.महापौर:-</u>श्री. जमनु पुरस्वानी आणि श्री. अशोक ठाकुर यांनी पाणी प्रश्नाबाबत एक मुददा उपस्थित केला आहे की, शहरात बरोबर पाणी पुरवठा होत नाही. मी



आयूक्त साहेबांना निर्देश देते की ज्या प्रभागात नळाव्दारे पाणी येत नाही. तेथे टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला जावा.

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>गुरूवारी रात्री पासुन शुक्रवार रात्री पर्यंत पुर्ण एक दिवस पाणी येत नाही. असे आपण सांगितले आहे त्याबददल चर्चा करावी असे आमचे म्हणणे आहे.*

***मा. सदस्या श्रीम. बेबी वसिटा सभागृहातुन बाहेर पडल्या.***

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मा. आयुक्त साहेब, माझी विनंती तुम्ही लक्षात घेतलेली दिसत नाही. टॅंकरमध्ये भयंकर मोठ घोटाळा आहे. झोपडपटटीमध्ये एकही सार्वजनिक नळ नाही व टॅंकरव्दारे सुध्दा पाणी पुरवठ होत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>पास, पास, पास.*

*<u>मा. महापौरः-</u>मतदान घेतले जावे.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>मा.महापौरजी, आपण पास म्हणता आम्ही नापास म्हणतो. आपण ५५ आहात आम्ही १८ आहोत. आम्हास आतमध्ये बसण्याची परवानगी देवू नका हा प्रस्ताव पारीत केला जावा. आम्ही निघुन जातो आपण प्रस्ताव पारीत करा.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>पाणी प्रश्नाबाबत चर्चा करा.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>आपणांस जे वाटते ते पास करा.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौरांचा आदेश आहे की, हा प्रस्ताव मतदानास टाकला जावा.*

*जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.*

*<u>प्रस्तावाच्या बाजुने मते :-४३</u>*

१ श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
५ श्री. ऐडके गणपत
६ श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
७ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९ श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१०. श्रीमती. गुप्ता आशा
११.श्री. पवार नाना आनंदा
१२ श्रीमती. आहुजा नीता
१३ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१४ श्री. शांताराम निकम
१५ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१६. श्रीमती. सोनेजी मीना
१७ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१८ श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१९.श्रीमती. वनवारी मोना अशोक
२० श्री. वनवारी किशोर नारायणदास
२१. श्री. लुंड गोविंदराम



२२ श्री. खेमाणी दर्शनासिंग देवेंद्रसिंग

२३ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२४ श्री. पमनानी ईश्वर
२५ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२६. श्रीमती. पंजाबी दिपा
२७. श्री. साधवानी मनोज
२८ श्रीमती. भठिजा कोमल
२९. श्री. रामरख्यानी मोहनदास
३० श्रीमती. माखिजा किरण
३१ श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३२. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३३. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३४. डॉ. नाथानी निना
३५ श्रीमती. रिझवानी सुजाता
३६ श्रीमती. भारती पहलाज
३७ श्रीमती. दासानी मिनु
३८ श्री. जाधव प्रशांत
३९. श्री. जाधव सुरेश
४० श्री. भालेराव गौतम यशवंत
४१ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
४२ श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
४३ श्रीमती. करोतिया मालती

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात मते :-१५</u>

१०. श्रीमती. संगिता जावळे
११. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
१२. श्री. उमाप रामदास
१३. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
१४. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
१५. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
१६. श्री. यादव लालबिहारी बुझारत
१७. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
९ श्री. सोनावणे नथु
१० श्री. गायकवाड दिलीप
११. श्रीमती. बामणकर नंदिनी
१२ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१३ श्री. चव्हाण रमेश महादेव
१४ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१५ श्री. पाटील विश्वनाथ गौतम

<u>मा. महापौरः-</u>मा. सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी अर्थसंकल्पात ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्यानुसार याबाबत बहुमताने पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :-सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रकास मंजुरीसाठी महापालिकेस शिफारस करणे बाबत आणि सन २००३-२००४ करिता अर्थसंकल्पिय अंदाज तयार करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

स्थायी समितीने दि. ७.२.२००३ च्या ठराव क्र. १०७ प्रमाणे कोणतीही कर वाढ नसलेला सन २००३-२००४ चा रूपये ९. ९७ लाख शिल्लकीचा अर्थसंकल्पीय अदांज व सन २००२-२००३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाचे अंतिम स्विकृती बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित केलेला आहे त्यासोबत मुख्य लेखा अधिकारी यांनी विविध उत्पन्न व खर्चाच्या शिर्षाखाली अंदाजित केलेल्या रक्कमेबाबतची छापील प्रत महासभेपुढे ठेवली आहे.

सन २००२-२००३चे सुधारित अर्थसंकल्पिय अंदाज पुढील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

उत्पन्न :- रू. ११९१६२६

खर्च :- रू. ११८९२३२

अखेरची शिल्लक :- रू. २३९४

वरील आकडे जसेच्या तसे स्विकृत करणे योग्य राहील.

सन २००३-२००४चा स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्पिय अंदाज पुढील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

उत्पन्न :- रू. १६८२१९८

खर्च :- रू. १६८१२०१

अखेरची शिल्लक :- रू. ९. ९७

वरील अंदाज विचारात घेता काही बाबीसाठी पुढील प्रमाणे फेरफार करून स्विकृती देणे योग्य राहिल. ,

<u>अर्थसंकल्पिय अंदाज खर्चाच्या बाजुने</u>

<u>रूपयांचे आकडे हजारात</u>

| खर्चाची बाब | अंदाजाची रक्कम | पान क्र |
|---|---|---|
| कचरा वाहतुक खर्च | - ५००० | १८ |
| नविन कारंजे (फाऊंटन) बनविणे | + १००० | २७ |
| महापालिका इमारती बनविणे<br>१ महापालिका इमारती १०००<br>२ महापौर निवास १०००<br>३ आयुक्त निवास १००० | + ३००० | २७ |
| कार्पोरेटर फंडातुन विकास कार्य (नामनिर्देशित पालिका सदस्य) | + १००० | २७ |

या व्यतिरिक्त दिनांक १.१.९९ पुर्वीच्या अनाधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्यासाठी पुर्वी निर्धारित केलेल्या शुल्क, अनामत रक्कम व इतर आकार याशिवाय खालील प्रमाणे दंड आकारून सदर नळजोडण्या नियमित करणेसाठी प्रस्तावित आहे.

| नळ जोडणी आकार मिमि | घरगुती | बिगर घरगुती |
|---|---|---|
| १५ | रू. १००० | रू. ३००० |
| २० | रू. १८०० | रू. ५४०० |
| २५ | रू. ३००० | रू. ९००० |
| ४० | रू. ६००० | रू. १८००० |
| ५० | रू. १०००० | रू. ३०००० |

सन २००३-२००४ करिता अर्थसंकल्पीय अंदाजात यापुर्वी प्रमाणे महापौर निधी, उपमहापौर निधी व स्थायी समिती सभापती निधीचा अर्थसंकल्पिय अंदाजात जसाच्या तसा अंर्तभाव राहील, महापालिका सभागृहात वातानुकूलित यंत्रणा बसविण्याचे काम यावर्षी घेता येणार नाही. तसेच स्थायी समितीचे सभापतींनी आपल्या अर्थसंकल्पिय भाषणात उल्लेख केलेल्या १६ रस्त्यांच्या विकासा व्यतिरिक्त आणखी चार रस्ते प्राधान्याने सामावुन घेणे आवश्यक आहे.

१. राधास्वामी पासुन ते साईबाबा मंदीर नाका क्र. ८ पर्यंत
२. न्यु इंग्लिश स्कुल पासुन ब्लॉक ९२६ कुर्ला कॅम्प उल्हासनगर-५
३. रेल्वे उड्डाण पुल ते अंबरनाथ कानसई नाल्याच्या साईटच्या पी.डब्लु.डी. ब्रीज पर्यंत
४. प्रेम टेकडी ते पाण्याची टाकी उल्हासनगर-५

म्हणुन स्थायी समितीच्या ठरावाच्या धर्तीवर खर्चाच्या बाजुला वर सुचविल्याप्रमाणे काही फेरफार करून अनाधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या दंड आकारास संमती देवून सन २००३-२००४ चा अर्थसंकल्पीय अंदाज आणि २००२-२००३ च्या सुधारित अर्थसंकल्पास जसे च्या तसे स्विकृती देणेस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १०१ दिनांक:-२०.२.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील स्थायी समितीने दि. ७.२.२००३च्या ठराव क्र. १०७ च्या धर्तीवर कोणतेही करवाढ न करता वरील प्रस्तावित केलेल्या फेरफारासह सन २००३-२००४चा रू. ९. ९७ लाख शिल्लकीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास आणि सन २००२-२००३च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देत आहे आणि मुख्य लेखा अधिकारी याबाबतची छापील प्रत प्रसिध्द करील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

-परंतु ____

१. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील वाणीज्य वापर होत असलेल्या कोणत्त्याही जागांना महापालिका जलव्यवस्था केंन्द्रातुन नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा होत नसेल त्यास पाणीपट्टी बसविण्यात येणार नाही.

२. या सरकारी वर्षात सुध्दा महापालिका जकात वसुली कामीचे कर्तव्य अभिकरणाने पार पाडील.

३. सन २००३-२००४च्या सरकारी वर्षात दिनांक १.१.९९ पुर्वीच्या अनाधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी यापुर्वी निर्धारीत केलेल्या शुल्क अनामत रक्कम व इतर आकाराशिवाय खालील प्रमाणे दंड आकार लावता येईल.

| नळ जोडणी आकार मिमि | घरगुती | बिगर घरगुती |
|---|---|---|
| १५ | रू. १००० | रू. ३००० |
| २० | रू. १८०० | रू. ५४०० |
| २५ | रू. ३००० | रू. ९००० |
| ४० | रू. ६००० | रू. १८००० |
| ५० | रू. १०००० | रू. ३०००० |

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

बहुमताने
महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-ही तर दादागिरी आहे?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-भाईगिरी आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आता मी असे म्हणतो की, बजेटच्या प्रस्तावावर मतदान झाले आहे. आता श्री. अशोक ठाकुर यांनी मांडलेल्या पाण्याच्या समस्येबाबत चर्चा केली जावी.

मा. सदस्य श्री. टेकचंदानी राजु यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-मा. आयुक्त साहेब, सभागृहात येताना आम्हाला एक पत्र देण्यांत आले. जाहिर सूचना, शहरात १० टक्के पाण्याची कपात केली जात आहे. आठवडयातून एक दिवस पाणी बंद राहील. आता प्रश्न असा उपस्थित होतो की आधीपासुन एम.आय.डी.सी ची जी भुमिका आहे.....

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आपला एक सदस्य बोलत आहे. बाकीचे सदस्य उठुन बाहेर चालले आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-सत्ताधारी पक्षाची पाणी प्रश्नाबाबतची भुमिका पहा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी, श्री. जाधव सुरेश, श्री. जाधव प्रशांत, श्री. नाना पवार, श्री. गोविंदराम लुंड, श्री. मनोज साधवानी, श्रीमती. आहुजा निता, श्रीमती. मिना सोंडे, श्रीमती. माया मसंद, श्रीमती. वनवारी मोना, श्रीमती. भठिजा कोमल, डॉ. निना नाथानी, श्रीमती. भारती छाबरिया हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-शरमेची गोष्ट आहे. श्री. अशोक ठाकुर पाणी प्रश्नाबाबत बोलत आहेत आणि सभागृह नेते सभागृहातुन बाहेर चालले आहेत. यात सत्ताधारी पक्षाच्या सदस्याची काय इज्जत?

यावेळी काही सन्मानिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहेत. हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-शेम, शेम. तुम्ही चर्चा करा आम्ही सभागृहातुन बाहेर जातो.

यावेळी शिवसेना, भाजपा या विरोधी पक्षाचे सर्व सदस्य सभागृहातुन बाहेर पडले.

--३८--

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः</u>-भडकवण्याचे प्रयत्न करू नका. आमचे बहुसंख्य सदस्य येथे बसलेले आहेत. मेहरबानी करून भडकवण्याचे प्रयत्न करू नका....

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहेत. हे समजुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः</u>-एम.आय.डी.सी.ची जी भूमिका आहे....

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः</u>-श्री. अशोक ठाकुरजी आपण बिनधास्त बोला पुर्ण सत्ताधारी पक्ष आपल्या बरोबर आहे हे आपणांस भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः</u>-मा. महापौरजी, एम.आय.डी.सी.ची या शहराबाबतची जी भुमिका आहे. ती योग्य नाही. उल्हासनगर महानगरपालिका एम. आय.डी.सी. चे एक चांगले आणि रोख रक्कम भरणारे ग्राहक आहे. व त्या हिशोबाने एम.आय.डी.सी वाले उल्हासनगर महानगरपालिकेला दिवाळखोरीत गेलेली महापालिकासमजुन त्यांनी काहीतरी फसवेगिरीचे काम चालु केले आहे. व जेवढे पैसे घेतात मला वाटते की त्याच्या ७५ टक्के सुध्दा शहरात पाणी येत नाही. तर कोणकोणत्त्या ठिकाणावरून किती पाणी येते याचे त्यांचेकडुन आकडे घेतले जावेत. व तेवढे पाणी बरोबर येत आहे का? शहरात जलकुंभ नसल्यामुळे काही ठिकाणी पाणी येते तर काही ठिकाणी पाणी पाहिजे तेवढया दाबाने मिळत नाही. आम्ही नगरविकास सचिवांकडे सुध्दा गेलो होतो.की पाण्याची समस्या तयार झाली आहे. आणि एम.आय.डी.सी वाले जाणीवपुर्वक समस्या निर्माण करत आहेत. महापालिकेचे अधिकारी लोक तर दिवसरात्र मेहनत करून पाणी पुरवठयात सुधारणा व्हावी म्हणुन प्रयत्न करत आहेत. नगरविकास सचिवांनी सांगितले की लोकसंख्येच्या प्रमाणात उल्हासनगरला जास्त प्रमाणात पाणी पुरवठा केला जात आहे. तेथील पाणी वितरण व्यवस्था बरोबर नाही. तर मेहरबानी करून आपण उत्तर दया की पाणी पुरेसे आहे किंवा नाही? पाणी का येत नाही? वितरण व्यवस्था बरोबर आहे किंवा नाही? १० टक्के आता कपात केली आहे त्यामुळे समस्या निर्माण झाली आहे. पुढे चालुन एप्रिल, मे, जुन महिन्यामध्ये मला वाटते त्यावेळेस २०-२५ टक्के पाणी कपात करतील तर मला नाही वाटत की २५ टक्क्यापेक्षा जास्त कोणत्याही भागात पाणी येईल. तर आतापासुन जी समस्या निर्माण होत आहे त्यासाठी काही ना काही करावे लागेल. आम्ही एम.आय.डी.सीच्या विरोधात आंदोलन चालविण्यास तयार आहोत. आपण खुलासा करा कुठून समस्या निर्माण होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी</u>-मा.महापौरजी,मी सभागृहाच्या वतीने आयुक्त साहेबांना विनंती करेन की, आपल्या शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे त्यासाठी एम.आय.डी.सी जबाबदार आहे व तेथे नुकताच चार पाच महिन्यापुर्वी एक एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर म्हणुन कोणी श्री. नागे नावाचा व्यक्ती आला आहे. आल्यापासुन त्यांने आमच्या शहरावर फार अन्याय केला आहे जाणीव पुर्वक पाण्याची कपात करून व आमच्या शहरवासियांना तो सतावत आहे. व आमच्या महानगरपालिकेच्या आयुक्तांतर्फे व आपल्यातर्फे एम.आय.डी.सी ला असे एक पत्र लिहिले जावे की, त्या व्यक्तीला तेथुन त्वरीत हटविले जावे. नाहीतर मला नाही वाटत की आपणांकडे पाणी येईल. जेव्हा जेव्हा आम्ही त्यांच्या विरोधात एखादया वरिष्ठ अधिका-याकडे, मुख्य अभियंत्यांकडे किंवा मंत्रालयात जातो तेव्हा तेच

सांगतात की, आम्ही उल्हासनगरवासियांना बरोबर पाणी देतो परंतु उल्हासनगरवासियच ते पाणी पुर्णपणे उचलु शकत नाही. ते आम्हाला तेथे चुकीचे ठरवतात. परंतु प्रत्यक्षात ते आमच्या शहरासाठी जे पाणी शुध्दीकरण केले जाते ते पाणी ते कंपन्यांना विकतात. व त्याचे काही रेकार्ड नाही व आपणांस असे दाखवतात की आपण उल्हासनगर वासियांना भरपुर पाणी देतो. प्रत्यक्षात ते कल्याण डोंबिवली विभागातील एम.आय.डी.सी. मधील कंपन्यांना आमच्या कोटयाचे पाणी पुरवतात. व याची शासनाला सुध्दा माहिती नाही.

--३९--

याबाबतीत चौकशी करून त्यांना तेथुन हटविले जावे. त्यांच्यामुळे ३०-३५ टक्के पाणी दररोज आपणांस कमी मिळते. व एम.आय.डी.सी व श्री. नागवे यांच्या विरोधात एक ठराव पारीत केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, एम.आय.डी. ला आपली महापालिका बरोबर वेळेवर बिल देते जे त्यांच्याकडुन येते. त्यानंतरही आमच्या शहरात पाण्याची टंचाई आहे. व जसे आता श्री. नारायण पंजाबी यांनी सांगितले की तेथे नागीया नावाचा एक इंजिनिअर आहे तो खाजगी फॅक्टरी किंवा इतर काही कंपन्यांना जादा पाणी देतो. तर येथे आम्ही एक ठराव तयार करून शासनास पाठवु या की श्री. नागीया यांना येथुन तात्काळ हटविले जावे. जेव्हा आम्ही वेळेवर पाणी बिल देतो तरीही एम.आय.डी.सी. आम्हास ब्लॅकमेलिंग का करते त्यासाठी येथे ठराव पारीत केला जावा.

<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, आज शहरात काही ठिकाणी पाण्याची टंचाई आहे यामध्ये दुमत नाही. एम.आय.डी.सी कडुन पंधरा दिवसापुर्वी आम्हाला एक पत्र आले होते त्यामध्ये त्यांनी लिहिले होते की प्रत्येक दिवशी दहा टक्के पाणी कपाती बाबत लिहिले होते.परंतु आमच्या शहराची वितरण व्यवस्था व भागौलीक रचना दोन्ही गोष्टी लक्षात घेवुन आम्ही त्यांना विनंती केली होती की, प्रत्येक दिवशी १० टक्के कपात करण्याऐवजी जर आपण आठवडयातुन एक दिवस पाणी बंद ठेवले तर योग्य होईल. नाहीतर काही विभाग आमचे असे आहेत की दहा टक्के पाणी कपात झाली तर त्यांना कधीच पाणी मिळणार नाही. उंच भागात राहणारे लोक आहेत त्यांना कधीच पाणी मिळणार नाही. आठवडयातुन सहा दिवस पाणी चांगले दिले व एक दिवस पाणी बंद ठेवले तर लोकांना सुध्दा याची सवय होईल. त्याचे कारण हे आहे की आमच्याकडे पाणी पुरवठा करणारी जी धरणे आहेत त्यांच्यातील पाण्याची पातळी कमी झाली आहे. व जर १५ जुलै पर्यंत हा जो पाण्याचा उपलब्ध साठा आहे. त्याचा जर उपयोग करायचा आहे. तर कपात करणे जरूरी आहे. काहीतर कपात करणे जरूरी आहे. म्हणुन आम्ही त्यांच्याशी सहमती दिली की दहा टक्के कपात करण्याऐवजी आठवडयातुन एकदा कपात केली तर ती भविष्यासाठी चांगली होईल परंतु झाले हे की, दोन दिवस अगोदरपासुन, धरणातुन जे पाणी सोडले जाते ते सोडताना काहीतरी झाले आणि पाणी कमी आले. एम.आय.डी.सी.च्या शहाड वॉटर हाऊस येथुन आपण जे पाणी उचलतो. तेथे पाण्याची पातळी कमी झाली होती. पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पाण्याचे ड्राॅवल कमी झाले, एम.आय.डी.सी. चे पंप कमी चालवावे लागले. व पुर्ण शहरात २२ टक्क्यापेक्षा जास्त पाणी कपात झाली. आजचा पाणी पुरवठा पाहिला तर २० टक्के कपात झाली आहे. म्हणजे आजही पाणी कमी आले आहे. तसे तर कालच पाणी बंद व्हावयास पाहिजे होते. परंतु दोन दिवसापासुन एम.आय.डी.सी कडुन आम्हाला पाणी कमी मिळत आहे. आता यामध्ये तर जितके पाणी आम्हाला मिळते त्याचे वितरण करायचे झाले तर सर्वप्रथम आमची वितरण व्यवस्था व्यवस्थित केली पाहिजे. त्यासाठी आता ७ जलकुंभांची बांधणी चालु आहे. ती झाल्यानंतर पाण्याची विभागवार वितरण व्यवस्था होवू शकेल. व आमच्या येथे पाणी पुरवठयाच्या ज्या लाईन्स आहेत त्यांच्यावर अनाधिकृत नळ जोडण्या झाल्या आहेत. व दुर वरून नळ जोडण्या घेण्याची लोकांना सवय झाली आहे. जेथुन पाणी मिळेल तेथुन पाणी घेण्याची सवय झाली आहे. दोन इंचाची एक इंचाची

अशा लाईनचे बंचच्या बंच तेथुन गेले आहेत. ते बंच बंद करून तेथुन तीन इंचाची, सहा इंचाची अशी पुरेशा क्षमतेची पाईप लाईन, ज्या विभागामध्ये पाणी पुरवठा करायचा आहे त्या विभागातील पाण्याची मागणी लक्षात घेवून जोपर्यंत आम्ही त्या नळजोडण्या बंद करून एका लाईनमधुन पाणी देत नाहीत. तोपर्यंत वितरण व्यवस्था सुधरू शकत नाही. दुसरे असे की, जोपर्यंत आम्ही एम.आय.डी. सी. वर विसंबुन आहोत. तोपर्यंत येथे पाण्याची समस्या होईल म्हणजे आमची वितरण व्यवस्था तयारही झाली, कार्यान्वितही झाली तरीही आम्हाला किती पाणी दयायचे आहे ते एम.आय.डी.सी ठरवेल व जोपर्यंत आम्ही त्यांच्यावर विसंबुन राहु, त्यांना पैसेही देवू तरीही, तरीही जोपर्यंत विसंबुन राहु तोपर्यंत त्यांचा प्राधान्य क्रम अलग असेल दुस-याही



ग्राहकांना पाणी दयायचे आहे. आम्हालाही पाणी दयायचे आहे. आम्ही, त्यांचे जे चार-पाच ग्राहक आहेत, कल्याण -डोंबिवली महापालिका आहे, नवी मुंबई महापालिका आहे. काही औद्योगिक कारखाने आहेत. हे जे चार-पाच ग्राहक आहेत त्यामधील आम्ही एक आहोत. तर आम्हाला नेहमी त्यांच्यावर विसंबुन रहावे लागेल. तर आमची पाण्याची समस्या आमची अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था सुधारल्यानंतरही तशीच राहील. जोपर्यंत आम्ही स्वतःचा स्तोत्र शोधत नाही, एम. आय.डी.सी चा शहाड येथील सोर्स आहे. तो जोपर्यंत ताब्यात घेत नाही, जोपर्यंत आमचा स्वतःचा वैयक्तिक सोर्स तोपर्यंत हे असे होत राहील. म्हणुन मला वाटते की, पाण्याबाबत एक दिर्घ स्वरूपाचे धोरण आणि एक अल्प मुदतीचे धोरण ठरवावे लागेल. ते तयार करून या सभागृहासमोर आम्ही लवकरच येवू. जे अल्प मुदतीचे धोरण असेल त्यामध्ये आमची अंतर्गत वितरण व्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न असतील. व दिर्घ मुदतीच्या धोरणामध्ये आपला स्वतःचा सोर्स तयार करणे हे होवू शकते. त्यांनतरच पाण्याची समस्या नेहमी करता सुटू शकते. तोपर्यंत नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>नाही. साहेब तो जो नागीया नावाचा अभियंता आहे त्याच्यावरही कारवाई केली जावी. जो आम्हाला बरोबर पाणी पुरवठा करत नाही. त्याच्यावर तर कारवाई केली पाहिजे ना साहेब?

<u>मा. श्री. आर. के. सोनवणे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मी ,सन्माननिनय सदस्य श्री. नारायण पंजाबी यांच्या मताशी सहमत नाही. सभागृहामध्ये कोणत्त्याही अधिका-यावर जर आरोप लावायचे असतील तर त्याअगोदर आपल्याकडे पुरावे असले पाहिजेत. ते अधिकारी आमचे महापालिकेचे नाहीत. एम.आय.डी.सी. चे अधिकारी आहेत. व त्यांची काय मजबुरी आहे? कोणत्त्या कारणामुळे ते आम्हाला तेवढे पाणी देऊ शकत नाहीत? हे आधी समजुन घेतले पाहिजे. सभागृहाने कोणत्त्याही अधिका-याच्या अनुपस्थितीत त्याच्या विरूध्द आरोप लावणे मला योग्य वाटत नाही. असे होता कामा नये. त्याबाबत आपणांस वैयक्तिकपणे जे काही करायचे असेल ते करा. येथे या सभागृहामध्ये कुणाच्या विरोधात असे आरोप लावु नका.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. आयुक्त साहेब, आठवडयातुन एक दिवस पाणी बंद ठेवण्याची आपली जी सुचना आहे ती उल्हासनगरची जनता मंजुर करत आहे. प्रश्न हा उठतो की, बाकी जे पाणी दयायचे आहे. पाले ३६ एम.एल.डी. जुने एम.बी.आर. २५, नविन एम.बी.आर ३२, शांतीनगर झोन १२, बिर्ला . ८० , शहाड २ . ५ व सी ब्लॉक २ एम.एल.डी. तर बाकी दिवस ऐवढे पाणी दिले पाहिजे ना? त्यासाठी काय करणार?एम.आय.डी.सी. वाले जाणीव पुर्वक बहाणा करतात की, डॅममध्ये पाण्याची पातळी पुरेशी नाही. कधी बोलतात लाईट बंद होती, कधी बोलतात कचरा आला आहे जलशुध्दीकरण केंद्रामध्ये तर जनतेला आपण कसे तोंड दयायचे आणि ही समस्या कशी सुटेल जोपर्यंत कायम स्वरूपाचा मार्ग निघत नाही. हे जे आकडे लिहिले आहेत त्याप्रमाणे पाणी तर दिले पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आता आता आपण सांगितले की, आज आपल्याकडे जे आकडे आहेत. २० टक्के कमी पाणी आमच्या शहरात येत आहे. जर आम्हाला दररोज २० टक्के पाणी कमी येत आहे. तर मग शुक्रवारी पाणी पुरवठा बंदची आपली जी सुचना होती ती तर बंद व्हावयास पाहिजे होती. प्रत्येक दिवसाची दहा टक्के पाणी कपात सुध्दा आपणांस मान्य नाही. तर जी २० टक्के पाणी कपात सध्या होत आहे. तर त्या हिशोबाने जर शुक्रवारीही पाणी बंद केले तर ही कपात तर ४० टक्यापर्यंत प्रत्येक आठवडयात प्रत्येक महिन्यात होईल. जोपर्यंत ते लोक २० टक्के पाणी कमी देत आहेत अशा परिस्थितीत त्यांच्याकडुन दहा टक्के आणखी पाणी घेण्यासाठी आम्ही प्रयत्न केले पाहिजेत. व तोपर्यंत शुक्रवारचा बंदचा कार्यक्रम स्थगित केला पाहिजे. १० टक्के कमी दिले व शुक्रवारी पाणी बंद ठेवले तर आमची काही हरकत नाही. परंतु दररोज २० टक्के कमी देवून शुक्रवारी बंद ठेवले तर दोन्ही बाजुने मार बसता कामा नये.



त्यासाठी आमची आपणांस विनंती आहे की, आपण हा प्रश्न एम.आय.डी.सी वाल्यांशी उपस्थित करा. मीा आपल्या वतीने आपल्या पक्षाच्या वतीने आमचे जे संबंधित मंत्री महोदय आहेत श्री. पतंगराव कदम आहेत त्यांच्याशी मी तीन चार वेळा याबाबत बोललो आहे. एम.आय.डी.सी च्या धोते साहेबांशी मी बोललो आहे. मी एक पत्र लिहीले आहे श्री. पतंगराव कदम यांना, वैयक्तिकपणेही त्यांच्याशी बोललो आहे. पुढील आठवडयात पुन्हा आम्ही त्यांना भेटणारही आहोत. परंतु आपण आपल्या वतीने येथुन या मुददयाचा पाठपुरावा केला पाहिजे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब जसे की आता पाण्याची समस्या खुप आहे. खास करून कॅम्प नं. १ ,२ ,३ , मध्ये तर मी आपणांस एक विनंती करू इच्छितो की, मे, जुन पर्यंत आमच्या कॅम्प १ ,२ ,३ मध्ये पाहिले सात टॅकर भरले जात असत. आजच्या तारखेला ३५ टॅकर भरले जात आहेत. मागील वेळेस मागणी करणारे १०० होते आता ते २०० झाले आहेत. तर आमचे जे शहरवाले आहेत जे पाणी बिल भरतात ज्यांना आपण नळ जोडणी देवू शकत नाही. टॅकरसाठी ते चार-चार, सहा -सहा तास ठेवतात. परंतु जसे की कॅम्प नं. ४ व ५ साठी सहजासहजी टॅकर दिले जातात. तर माझी आपणांस विनंती आहे की, जोपर्यंत आमची पाण्याची समस्या दुर होत नाही तोपर्यंत कॅम्प १ ,२ ,३ मध्ये मेहरबानी करून कमीत कमी ४०-५० टॅकर पाणी वाढविण्याचे प्रयत्न केले जावे. व आमचे एम.आय.डी.सी जे नागवे साहेब आहेत त्यांच्या बाबत सुध्दा आपल्या महापालिकेच्या वतीने लिहुन पाठविले जावे की यांच्यामुळे आम्हाला पाण्याचा त्रास होत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-मी आपल्या वतीने श्री. नागवे यांच्या विरोधात मंत्री महोदयांचे लक्ष वेधले आहे. व त्याबाबत मी त्यांच्याशी वैयक्तिकपणे बोलेनही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-आयुक्त महोदय, जसे की श्री. मोहन बेहरानी यांनी आता सांगीतले की दहा टक्के पाण्याची कपात झाल्यामुळे पाण्याचा दाब कमी होतो म्हणुन एक दिवस पाणी आले नाही तरी चालेल यास आम्ही मंजुरी देत होतो. व आतातर २० ते २२ टक्के पाणी कमी येत आहे. तर शुक्रवारी पाणी बंद होण्याचे जे मंजुर केले तसे झाले नाही पाहिजे. व यामध्ये कॉंग्रेस बरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस पण पुर्णपणे सहमत आहे. असे मी येथे व्यक्त करतो. धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८. ०१ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

<u>महानगरपालिका</u>

दिनांकः-१९/३/२००३

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/३/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दि. १९.३. २००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१ | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४३. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४४. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४८. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४९. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५०. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५१. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५२. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५४. | श्री. अंकुश म्हस्के |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५५. | श्री. चौधरी राजेंद |
| १८. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५६ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५७. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५८. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५९. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६०. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६१. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६२. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २५. | श्री. शांताराम निकम | ६३. | श्रीमती. किरण माखिजा |
| २६. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २७. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६५. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २८. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६६. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |

| | | | |
|---|---|---|---|
| २९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६७. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६८. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३१. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६९. | श्री. इंदु भठिजा |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | श्री. मोहन साधवानी | ७१. | श्री. बहरानी मोहन |
| ३४. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ७२. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७३. | श्री. बेहरानी ठाकुरदास |
| ३६. | श्रीमती. खिलनानी भावना | ७४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३७. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३८. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३९. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ७७. | श्री. वदरीया राजेश |
| ४०. | श्री. रमेश महादेव चव्हाण | | |



तर

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u>दि. १ एप्रिल २००३ पासून निवृत्त होणा-या स्थायी समितीचे ८ सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणुक करणे बाबत.

स्थायी समिती सदस्याची आठ पदे रिक्त आहेत, आपणांस आठ पदे भरायची आहेत व रिक्त असलेल्या जागा ही आठच आहेत. येथे दहा उमेदवार आठ पदांसाठी उभे आहेत त्या दहा उमेदवारांची नावे मी वाचुन दाखवितो. कृपया लक्ष दया.

१. श्री. उमाप रामदास राघोजी
२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
३. श्रीमती. छाबरिया भारती पहलाज
४. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
५. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
७. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
८. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन
९. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
१० श्री. रूपाणी चिमन अमरूमल

आपणांस आठ उमेदवार निवडायचे आहेत. परंतु प्रत्यक्षात दहा उमेदवार रिंगणात आहेत. गुप्त मतदानाची प्रक्रिया सुरू करण्यापुर्वी जर कोणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवू इच्छित असेल तर त्यासाठी पाच मिनिटाची वेळ दिली जात आहे. उमेदवारी मागे घेण्यास कुणी तयार आहे का?

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मी प्रमोद टाले स्थायी समिती सदस्य पदाची उमेदवारी मागे घेत आहे.

*मा. सदस्य श्री. रूपाणी चिमनः-मी रूपाणी चिमन अमरूमल, स्थायी समिती सदस्य पदाची उमेदवारी मागे घेत आहे.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-याबाबतचा फॉर्म भरून दया. कृपया लक्ष दया. रिक्त पदे आठ आहेत व उमेदवार सुध्दा आठ आहेत आता निवडणुकीची काही आवश्यकता नाही. उमेदवारी मागे घेतल्या नंतर जे उमेदवार शिल्लक राहीले आहेत त्यांना बिनविरोध निवडुन आल्याचे घोषित करता येईल.*

*मा. महापौरः-या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.*

*प्रस्तावनाः-*

*उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००२ नंतर महापालिकेच्या दि. ५.४.२००२ रोजीच्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तींची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणुन नेमणुक केली होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका*



*अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समितीमध्ये निवडुन आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य निवृत्त होतील हे स्थायी समितीने दि. ७.३.२००३ च्या सभेत ठराव क्र. ११५ अन्वये ठरविले त्याअर्थी त्या ८ पदाच्या रिक्त जागा भरणेकामी दि. १९.३.२००३ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असुन निवडणुक कार्यक्रमांच्या तरतुदीप्रमाणे दि. ११.३.२००३ रोजी ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले आणि ज्यांची नामनिर्देशनपत्र दि. १२.३.२००३ रोजी वैद्यरित्त्या घोषीत करण्यांत आली त्याची नावे येणे प्रमाणे.*

*१. श्री. उमाप रामदास राघोजी*
*२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)*
*३. श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज*
*४. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास*
*५. श्री. टाले प्रमोद नामदेवराव*
*६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम*
*७. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास*
*८. श्रीमती. बामनकर नंदीनी गजानन*
*९. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास*
*१० श्रीमती. भठिजा कोमल अमृत*
*११ श्री. रूपानी चिमन अमरूमल*

*वरील उमेदवरांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली.*

*१. श्रीमती. भठीजा कोमल अमृत*
*२. श्री. प्रमोद टाले*
*३. श्री. चिमन रूपानी*

*वरील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्या अंती भरावयाच्या जागांच्या संख्ये इतके उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले त्यामुळे नामनिर्देशित ८ उमेदवार येथोचितरित्त्या बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करावे असे प्रस्तावित आहे.*

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील ८ (आठ) उमेदवारांची स्थायी समिती सदस्य म्हणुन बिनविरोध नेमणुक करित आहे.

१. श्री. उमाप रामदास राघोजी
२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)
३. श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
४. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
६. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
७. श्रीमती. बामनकर नंदीनी गजानन
८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास

सर्वानुमते

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४--

मा. महापौरः- खालील उमेदवार स्थायी समिती सदस्य म्हणून निवडुन आल्याचे मी, घोषित करीत आहे.

१. श्री. उमाप रामदास राघोजी,
२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
३. श्रीमती. छाबरिया भारती पहलाज
४. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
६. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
७. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन
८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास

कृपया त्यांनी मंचावर यावे.

मा. महापौर , उप-महापौर, आयुक्त, व महापालिका सचिव यांनी त्यांना गूलाबपुष्प देऊन त्यांचे अभिनंदन केले.

मा. महापौर :-व जे दोन उमेदवार ज्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले त्यांना सुध्दा पुष्प देण्यात येत आहे कृपया त्यांनी मंचावर यावे. श्री. प्रमोद टाले यांनी कृपया मंचावर यावे. श्री. चिमन रूपाणीजी यांनी सुध्दा मंचावर यावे.

श्री. प्रमोद टाले व श्री. चिमण रुपानी यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे अभिनंदन करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सभा समाप्तीची घोषणा केली जावी?

कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(श्री. प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांक:-१९/४/२००३

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/४/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दि. १९.४.२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४० | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१ | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४२. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४५. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्री. अंकुश म्हस्के |
| १७. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन | ५१. | श्री. चौधरी राजेंद |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ५४. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५५. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५६ | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २४. | श्री. शांताराम निकम | ५८. | श्रीमती. किरण माखिजा |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |

| | | | |
|---|---|---|---|
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६४. | श्री. इंदु भठिजा |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३२. | श्री. मोहन साधवानी | ६६. | श्री. बहरानी मोहन |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३४. | श्रीमती. खिलनानी भावना | ६८. | श्री. बेहरानी ठाकुरदास |
| ३५. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६९. | श्री. हरदास माखिजा |
| ३६. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |



तर

मा. सदस्य श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर, श्री. जेसवानी सतराम पुनमदास, श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे, श्री. पाटील विश्वनाथ गौतम, श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, श्री. इदनानी राजु चंद्रभान,श्री. पंजाबी लाल देवनदास, श्री. बदरीया राजेश
हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

श्री. दत्ता भडकवाड उपायुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. ५६ हा श्री. देवेंद्रसिंग खेमाणी यांचा आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मा. महापौरजी, प्रश्नोत्तरे चालु करण्यापुर्वी मागच्यावेळी मी प्रश्न दिला होता. आता मला ६५ क्रमांकाचा प्रश्न दिला आहे. सर्वांच्या टेबलवर त्याची प्रत ठेवलेली आहे. व जो प्रश्न मी दिला आहे त्याचे उत्तर दिलेच नाही. हा ६५ क्रमांकाचा प्रश्न आहे. पुर्वीच्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-६५ क्रमांकाच्या प्रश्नाचे सुधारित उत्तर आहे. म्हणुन ते सर्वांना आता प्रस्तुत करण्यात आले आहे. हे अधिक उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-नगररचनाकारांबाबत मी जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर दिलेले नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तो प्रश्न दिलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-नगररचनाकारांबाबत जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर मला अदयाप मिळालेले नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-दिलेले आहे सर्वांना दिलेले आहे. आपणांस मिळाले नसेल तर त्याची प्रत दिली जाईल. यावेळी ४.४० मिनिटे झाली आहेत.

*<u>प्रश्न क्र. ५६:</u>-ऑन द रिसिप्ट ऑफ सच रिक्वेस्ट फॉर्म द आर्किटेक्टस व्हॉट वॉज द ॲक्शन टेकन बाय युअर डिपार्टमेंट?*

*<u>उत्तरः</u>-ऑन रिसिप्ट ऑफ फोर विथड्रावल ऑफ सुपरविझन ऑफ डेव्हलोप वर्क फॉर्म आर्किटेक्ट देअर लायसन्स हॅव नॉट बिन रिनिव्ह फॉर्म जानेवारी २००१.*

*<u>प्रश्न क्र ५७ :</u>-इन रिपोन्स टु युअर नोटिस, हाऊ मेनि आर्किटेक्टस केअर टु फरनिस द इनफोरमेशन रिक्वायर? प्लीज फरनिस लिस्ट ऑफ सच आर्किटेक्टस्.*

*<u>उत्तरः</u>-द आर्किटेक्ट / इंजिनिअर हु फेल टु कम्प्लाय दिस ऑफिस नोटिस फोर विथड्रावल आफ सुपरविझन वर्क आर नॉट इन्टायलेड टु सबमिट फेस प्रोपोजल ॲस देअर लायसेन्स हॅस नॉट बीन रिनीव्हड.*



*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः</u>-मा. महापौरजी हा जो मी वरील प्रमाणे ५६ क्रमांकाचा प्रश्न विचारला होता व या प्रश्नाला जोडुन दुसरा जो ५७ क्रमांकाचा प्रश्न विचारला होता. याबाबत सर्वात दुःखदायक गोष्ट ही आहे की आमचे जे अधिकारी आहेत ते प्रश्न समजुन न घेताच उत्तरे देतात हे योग्य नाही. माझा हा जो प्रश्न होता जसे की आर्कीटेक्ट यांनी विथड्राव्हल लेटर दिले आहे. ते पत्र प्राप्त झाल्यानंतर त्या पत्रानुसार काय कारवाई केली? या पत्रावरून असे स्पष्ट होते की, त्याठिकाणी नियमानुसार जेवढे काही काम व्हायचे होते. ते संपुष्ठात आले आहे व यापुढे बेकायदेशिर बांधकामाची सुरूवात होणार आहे. तर माझे हे म्हणणे आहे की अनाधिकृत बांधकाम होण्याची जी शक्यता आहे. ते थांबविण्यासाठी काय कार्यवाही केली? परंतु नगररचनाकार साहेबांनी असे उत्तर दिले आहे की, आर्कीटेक्टच्या अनुज्ञक्तींचे नुतनीकरण करण्यात येणार नाही. तर हे बरोबर असे उत्तर नाही. बरोबर उत्तर असे दयावयास पाहिजे होते की, जेवढी मला माहिती आहे त्यानुसार बिल्डर व आर्कीटेक्ट यांना आपल्या विभागाकडुन एक नोटीस दिली जाते. तर येथे आपण असे उत्तर दयावयास पाहिजे होते की विथड्राव्हल नोटीस बाबत आम्ही त्यांना नोटीस बजावली आहे. मला जी माहिती आहे त्यानुसार त्यात असे असते की, बिल्डरला काम बंद करायचे असते. व जोपर्यंत नविन आर्कीटेक्टची नेमणुक होत नाही. तोपर्यंत त्यांचे हे काम आहे की, तेथे कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत बांधकाम होता कामा नये. अशाप्रकारचे आपण उत्तर दयावयास पाहिजे होते. परंतु आपण कोणत्या विचारधारेमध्ये येवून अशाप्रकारचे उत्तर दिले आहे. ते समजुन येत नाही. त्यानंतर आपली नोटीस मिळाल्यानंतर बिल्डर व आर्कीटेक्ट कडुन आपणांस काय माहिती मिळते त्यासाठी माझा ५८ क्रमांकाचा तिसरा प्रश्न आहे.*

*<u>प्रश्न क्र ५८ :</u>-वॉट वाज द ॲक्शन टेकन ऑन आर्किटेक्अस, हु फेल टु कम्प्लाय विथ युअर नोटिस? प्लीज फर्निस द लिस्ट आफ सच आर्किटेक्टस?*

*<u>उत्तरः</u>-द लायसेन्स आफ द आर्किटेक्टस / इंजिनिअर आर नॉट इन्टीफायड टु सबमिट फेस प्रोपाझल टु कॉर्पोरेशन. द ॲक्शन अगेन्स्ट सच आर्किटेक्अ इज अंडर कान्सीडरेशन. द सेड लिस्ट इज इनक्लोजड.*

*<u>प्रश्न क्र ५९ :</u>-हु आर द आर्किटेक्टस, अगेन्स्टस हुम नो ॲक्शन वॉज टेकन, इवन थोदे फेलड टु कम्प्लाय विथ युअर नोटिस? प्लीज फर्निस द लिस्ट आफ सच आर्किटेक्ट.*

उत्तरः-ॲक्शन अगेंण्टस् ऑल द आर्किटेक्ट / इंजिनिअर हॅव बिन टेकन बाय दिस अपार्टमेंट. (२० नंबरर्स ऑफ आर्किटेक्ट लिस्ट इन्क्लोजड्)

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-आपण आपल्या नोटीस अन्वये जी माहिती मागविली आहे. त्यानुसार किती आर्कीटेक्टनी आपणांस माहिती दिली. या प्रश्नाबाबत सुध्दा आपण सारखेच उत्तर दिले आहे. ते मी वाचुन दाखवितो. (त्यांनी वरील प्रमाणे उत्तर वाचून दाखविले), हे उत्तर बरोबर नाही. आपण काही पण उत्तर देता. प्रश्न काय विचारला जातो उत्तर काय दिले जाते हे बरोबर नाही. त्यानंतर पुढील जो प्रश्न आहे तो सुध्दा त्याच्याशीच संबंधित आहे. असे आहे की, हा प्रश्न विचारण्याचा माझा असा हेतु होता की, विथड्रावल लेटर आल्यानंतर अनाधिकृत बांधकामास सुरवात होईल असे संकेत मिळाले होते. आपली नोटीस गेल्यानंतर त्यावर कार्यवाही झाली पाहिजे. काम ज्या स्तरावर आहे त्या स्तरावर ते बंद झाले पाहिजे. व ज्या आर्कीटेक्टने विथड्रावल लेटर दिले आहे त्याच्याजागी दुस-या आर्कीटेक्टची नेमणुक होत नाही तोपर्यंत पुढील काम चालू होता कामा नये. या दिशेने योग्य ते पाऊल उचलणे आवश्यक आहे. याबाबत काही दिवसापुर्वी आपण मला जी माहिती दिली आहे. यामध्ये आपण सांगितले आहे की, १२ फेब्रुवारी २००३ला आपण तीन आर्कीटेक्ट ज्यांची नावे आहेत श्री. भुषण रूपाणी, श्री. अमर जग्यासी व पठाई यांना आपण तीन वर्षासाठी निलंबित केले आहे. त्यांचा जो परवाना रदद केला आहे. काही

--४--

सतरा लोकांचे परवाने पाच वर्षासाठी निलंबित केले आहेत. आपण ही जी माहिती दिली ती चांगली गोष्ट आहे परंतु ही जी कार्यवाही आहे ती एका बाजुने केलेली कार्यवाही आहे. आपण फक्त आर्कीटेक्टवर कारवाई केली आहे. बिल्डर, ज्याने विथड्रावल लेटर दिल्यानंतर सुध्दा बांधकाम चालु ठेवले. बांधकाम पुर्ण केल्यानंतर सर्वसामान्य जनता आपल्या मेहनतीच्या पैशाने किंवा कर्ज घेवून आपली मिळकत विकुन फ्लॅट व अशामिळकती विकत घेतात. तर ही जी सर्वसामान्य जनता आहे ती फसता कामा नये. या दिशेने आपण पावले उचलणे मला वाटते आवश्यक आहे. कारण की बिल्डर लोक कसे तरी आपले बांधकाम पुर्ण करतात. सर्वसामान्य जनता त्यामध्ये फ्लॅट विकत घेवून फसते त्यासाठी काही करणे आवश्यक आहे. त्यासाठी माझ्या काही सूचना आहेत की जसे आपणांस विथड्रावल लेटर मिळते, ते मिळताच अतिक्रमण विभाग व क्षेत्र निरिक्षक यांनी दक्ष राहिले पाहिजे की त्याठिकाणी बांधकाम होता कामा नये. महापालिकेची दुसरी जी खाती आहेत जसे की कर विभाग आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण':-आपण नगररचना समितीचे सभापती आहात आपली समिति काय करते. आपल्या समितीशी संबंधित हा विषय आहे.

मा. सदस्य श्री. दर्शनासिंग खेमाणीः-कृपया हे सर्व मला सांगु नका. हे सर्व मला माहित आहे मी शिकलो आहे. मला बोलु दया आणि कृपा करून माझ्या बोलण्यामध्ये व्यत्त्यय आणु नका. कर विभागाने याकामी लक्ष दिले पाहिजे की, बेकायदेशिर आणि अनाधिकृत बांधकाम असलेल्या ज्या मिळकती आहेत. त्यांची कर आकारणी होता कामा नये. कारण की, असे पाहण्यात आले आहे की ज्या बेकायदेशिर व अनाधिकृत बांधकामाच्या मिळकती असतात त्यांची कर आकारणी केली जाते. त्यांना नळ जोडणी सुध्दा दिली जाते. वीज मंडळ त्यांना विद्युत जोडणीही देते. अशा मिळकती ज्यांना काही माहिती नाही असे लोक खरेदी करतात आणि नंतर दुःखी होतात. तर ही एक माझी सूचना आहे की कृपया आयुक्त साहेब आपण हे मुददे लिहुन घेतले तर बरे होईल व त्यावर योग्य ती कार्यवाही केली तर बरे होईल याच बरोबर मिळकतींच्या जेथे नोंदी होतात तेथे सुध्दा आपल्या महापालिकेच्या वतीने अशा अनाधिकृत बांधकामांची माहिती पाठविली पाहिजे. या मिळकतींची नोंदणी केली जावू नये असे त्यांना कळविले

पाहिजे. या माझ्या सूचना आहेत मी अपेक्षा व्यक्त करतो की त्यावर लवकरात लवकर कार्यवाही कराल धन्यवाद.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-मा. महापौर महोदया, श्री. दर्शनसिंग यांनी येथे अतिशय महत्त्वपुर्ण असे मुददे उपस्थित केले आहेत व दुर्भाग्याची गोष्ट आहे की, नगर नियोजन समितीचे सभापती असून सुध्दा त्यांना हा मुददा महासभेत उपस्थित करावा लागला. नगररचनाकार साहेबांना आमची विनंती आहे की त्यांनी कृपया मंचावर यावे.

मला हे सांगितले जावे की शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे चालु आहेत किंवा नाही?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-सचिव साहेब, हे जे आता चालु आहे ते सभागृहाच्या नियमानुसार आहे का? ज्या प्रश्नकर्तानी प्रश्न विचारला होता त्यास उत्तर मिळाले त्यात त्याचे समाधान झाले. त्यानंतर हे योग्य आहे का?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-त्यांना योग्य उत्तर मिळाले नाही.

मा. सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणीः-माझा प्रश्नच ते पुढे चालु ठेवत आहेत. संबंधित माहिती घेवू इच्छितात.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-'महापौर महोदया, असे चालु राहिले तर आम्ही सुध्दा मध्ये बोलु.

--७--

मा. सदस्य श्री. दिलीप लालावानीः-या प्रश्नाचे बरोबर उत्तर दिले गेले नाही. म्हणुन हा प्रश्न स्पष्ट झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-सचिव साहेब....

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-सचिव साहेब, उत्तर दिले आहे ते उत्तर बरोबर आहे किंवा नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-काय आम्ही गप्प बसुन अनाधिकृत बांधकामांना उत्तेजन दयावे? उपप्रश्न आहे व तो आम्हास विचारू दिला जावा. ही जी अनाधिकृत बांधकामे चालु आहेत असा श्री. दर्शनसिंग यांचा जो आरोप आहे तो बरोबर आहे की चुकीचा आहे? प्रशासन ते मान्य करत आहे किवा नाही?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा. महापौरांच्या आदेशानुसार मला आपणांस सूचना देणे आवश्यक आहे की नियम तर असा आहे की, जो सन्माननिय सदस्य प्रश्न विचारतो त्यानेच प्रश्न विचारायचा आहे. व जर उपप्रश्न विचारायचा असेल तर तोही त्यानेच विचारायचा आहे. दुस-या कुणाही सन्माननिय सदस्यांने तो विचारायचा नाही असा नियम आहे. प्रत्येक वेळा असे दिसून येते की, कुणी ना कुणी सन्माननिय सदस्य उभा राहतो व प्रश्न विचारतो. नियम असा आहे की, प्रश्नावर चर्चा सुध्दा होत नाही. चर्चा सुध्दा आपण करू शकत नाहीत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-भलेही प्रश्नाचे उत्तर योग्य वाटले नाही तरीही?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न विचारणे ही एक कला आहे. प्रश्न कशासाठी विचारला जातो? प्रशासनास घेरण्यासाठी. प्रश्नास जे लेखी उत्तर दिले जाते त्यातील चुक पकडुन दुसरा प्रश्न विचारला तर प्रशासन अडचणीत येत जाईल.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-जे उत्तर दिले आहे ते चुकीचेच दिले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-सचिव साहेब, सभागृह नेता या नात्याने मी एका गोष्टीचा खुलासा मागु इच्छितो. आजपर्यंत असे झाले आहे की नाही? की त्या सदस्याने प्रश्न विचारला आहे त्याच्या व्यतिरिक्त अन्य सदस्यांनी त्यावर उपप्रश्न विचारले आहेत की नाही, श्री. लाल पंजाबी, श्री. बच्चाराम रूपचंदानी, यांनी व इतरांनी असे प्रश्न विचारले आहेत की नाही?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-याबाबत मी आपणांस सांगितले आहेच ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तर श्री. दिलीप लालवानी यांना सुध्दा बोलु दिले पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-महापौर महोदया, एक तर प्रश्न विचारल्यानंतर तो सहा ते बारा महिन्यानंतर महासभेत चर्चेस येतो. व त्या प्रश्नाचे उत्तर त्यावेळीही जर बरोबर मिळाले नाही तर त्यावर प्रश्न विचारण्यासाठी दुसरा प्रश्न विचारला तर त्याचा नंबर वर्ष-दिडवर्षानी येईल. तर काय अशा प्रकारे गप्प बसुन आम्ही अनाधिकृत बांधकामे होत असल्याचे पाहात रहावे? तर काय ही आमची नैतिक जबाबदारी ठरत नाही का की, एखादया प्रश्नाच्या उत्तराशी संतुष्ठ नसेल तर उपप्रश्न विचारू नये. प्रशासनाचे लक्ष त्यावर वेधले जावू नये?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- सचिव साहेब, हे बरोबर आहे का? ठिक आहे? सभेचे कामकाज चालविणे हे आपले काम आहे. महापौर महोदया, ...........

--६--

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- खुलासा करु दिला जावा. नगररचनाकार साहेब खुलासा करा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः- एवढा महत्त्वपूर्ण प्रश्न आहे, आर्किटेक्ट लोक पत्र देतात की, आमची जबाबदारी नाही. त्यानंतर ते अनाधिकृत बांधकाम पूर्ण होते. ते बांधकाम थांबविले जात नाही. व अशा प्रकारचे अनाधिकृत बांधकाम वास्तव्याखाली येते. व ही समस्या दिवसेंदिवस वाढत जाते. अशा गंभीर प्रश्नांवर नियोजन समितीचे सभापती महासभेत प्रश्न उपस्थित करतात. त्याचे मोघम उत्तर देऊन आपण मोकळे झालात, आम्ही गप्प बसून रहायचे? काय याचाच अर्थ प्रश्नोत्तर आहे? जे प्रश्न विचारले आहेत त्यांची योग्य अशी उत्तरे दिली जावीत. समाधानकारक उत्तर दिले जावे. जबाबदारीची जाणीव होवो. अशी उत्तरे दिली जावीत.

मा. नगररचनाकार(सुर्यकांत शिंदे):- जेवढया काही आर्किटेक्टने विथड्रावल लेटर दिले आहे , ते ज्या स्टेपला अनाधिकृत बांधकाम केले जाते, त्यानंतर त्यांनी विथड्रावल लेटर दिले आहे. तर साईट मार्जिनमध्ये जेवढी काही अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. त्यासाठी सर्व्हे केल्यानंतर, कमीत-कमी १८६ अनाधिकृत बांधकामांचे प्रस्ताव आले होते. त्यासाठी अनाधिकृत बांधकाम विभागाकडुन नोटिसा पाठविण्यांत आल्या होत्त्या. होऊ शकते त्यांवर पोलिसांत पुन्हा गुन्हा दाखल केला जाऊ शकेल.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- नगररचनाकार साहेब, आता आपण जे १८६ अनाधिकृत बांधकामे निर्देशनास आल्याचे आपण सांगितले व त्यांना नोटिसासुध्दा बजाविल्या आहेत. ही जी अनाधिकृत बांधकामे झाली आहेत त्यास जबाबदार कोण? नगररचना विभाग आहे, नगररचनाकार आहेत की, अनाधिकृत बांधकाम विभाग आहे. कोण आहे? याची जबाबदारी कोणावर?

मा. नगररचनाकार(श्री. सुर्यकांत शिंदे):- संबंधित क्षेत्र निरिक्षक व प्राधिकृत अधिकारी म्हणून संबंधित उपायुक्त ......

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- संबंधित क्षेत्र निरिक्षक व उपायुक्त यांचीच जबाबदारी आहे?म्हणजेच नगररचनाकारांची काही जबाबदारी नाही?

मा. नगररचनाकार(श्री. सुर्यकांत शिंदे):- या कामी संबंधित विभाग म्हणून अनाधिकृत बांधकाम विभाग कार्यरत आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:- तर मग संबंधित उपायुक्तांना मंचावर बोलवा. एवढ्या मोठ्या प्रमाणावर चटईक्षेत्राचे उल्लंघन होते. अनाधिकृत बांधकामे होतात. तर यास जबाबदार कोण आहे?

मा. उप-आयुक्त(श्री. दत्ता भडकवाड):- मा. महापौरजी, सन्माननिय सदन , सन्माननिय सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणी यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो अतिशय चांगला प्रश्न आहे. व शहरामध्ये ती प्रथा सुध्दा राहिली आहे की जेव्हा अनाधिकृत बांधकामे सुरू होतात तेव्हा आर्कीटेक्ट विथड्रावलचे पत्र देतात. जसे की आपण येथे समन्वय मागविले आहे. तसे समन्वय विभागाने तयार केले नाही परंतु आम्ही आपल्या सूचनेचे स्वागत करतो. जसे कुणी विथड्रावल लेटर देईल त्याचवेळी नगररचनाकार कर विभागास अनाधिकृत बांधकाम विभागाच्या उपायुक्तांना रजिस्ट्रेशन कार्यालयास, विद्युत मंडळास या सर्वांना अनाधिकृत बांधकामांबाबतची माहिती कळवतील त्यात हे ही कळवतील की या बांधकामांमध्ये ऐवढे ऐवढे चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे. वाढलेल्या चटई क्षेत्राच्या बांधकामांवर तावडतोब योग्य ती कारवाई केली जाईल. १८६ अनाधिकृत बांधकामांचा जो मुददा येथे निघाला आहे



त्याबाबत मी सांगु इच्छितो की, ३१४ इमारतींची पहाणी केली आहे त्यामधील १८६ इमारतींमध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन झाल्याचे निर्दशनास आले आहे. त्यांना एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार नोटीस बजावण्यात आली आहे व त्या नोटीसचा कालावधीही पुर्ण झाला आहे. कित्येक लोकांनी प्रत्यक्ष तर काहीनी अप्रत्यक्षपणे त्यामध्ये वास्तव्य करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना ती बांधकामे खाली करण्या बाबत आम्ही नोटीस बजावली आहे. तसेच कॅम्प १ पासुन कार्यवाहीची मोहीमही सुरू केली होती. परंतु मध्येच आयुक्तांनी पुन्हा निर्देश दिले आहेत की, यासाठी फार मोठ्या प्रमाणावर इन्फॉस्ट्रक्चर लागणार असल्याने आजच्या तारखेला कोणतेही नविन बांधकाम सुरू होवू नये यासाठी यावर आम्ही लक्ष देत आहोत. जसे की आठ-दहा दिवसापुर्वीच मी या विभागाचा कार्यभार स्विकारला आहे. त्यावर आम्ही लक्ष केंद्रीत करत आहोत. त्यासाठी मा. महापौर महोदया मी सभागृहाच्या हे निर्देशनास आणु इच्छितो की अनाधिकृत बांधकाम विभाग काम करत आहे. अतिक्रमण अनाधिकृत बांधकामे होणे ही नियमित बाब आहे. तसेच ती तोडणे ही सुध्दा नियमित बाब आहे. मागील पाच दिवसात जेव्हा सुटटी होती तेव्हा त्या पाचही सुटटीच्या दिवसात आम्ही अनाधिकृत बांधकाम विभागाचे काम चालु ठेवले होते. सुटटीच्या दिवसात सुध्दा आम्ही अनाधिकृत बांधकामांवर कारवाई केली आहे.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी, श्रीमती. मीना सोंडे, श्री. विनोद ठाकुर व श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-माझे हेच म्हणणे आहे की, जी १८६ बांधकामे आहेत. त्यामध्ये बिल्डरने तर नळजोडणी ,विद्युत जोडणी करून ॲसेसमेंट करून रजिस्ट्रेशन करून त्यांची विक्री करून ते लोक निघुन गेले आहेत. आता आपण जी बांधकाम खाली करण्याची नोटीस देत आहात ती सर्वसामान्य लोकांना दिली जाईल. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना त्याचा त्रास होणार आहे. ही बांधकामे

खाली करून त्यांचे निष्कासन केले तर त्यांचा त्रास सर्वसामान्य जनतेला होणार आहे. त्यास जबाबदार कोण आहे? नगररचनाकार साहेबांनी तर सांगितले की, उपआयुक्त जबाबदार आहेत. तर माझे म्हणणे हे आहे की, जेवढया काही फ्लॅट-धारकांना या निष्कासनाच्या कारवाईमुळे त्रास होणार आहे त्या सर्वांना त्याची नुकसान भरपाई म्हणुन उपायुक्तांच्या खिशातुन पैसे दिले जावेत.

मा. उप-आयुक्त(श्री. दत्ता भडकवाड):-जबाबदारी कोणत्त्याही एकाच स्तरावर निश्चित होणार नाही, जबाबदारी बिल्डरची सुध्दा आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-बिल्डर तर बांधकामाची विक्रीकरून निघुन गेला.

मा. उप-आयुक्त(श्री. दत्ता भडकवाड):-महापालिका मुख्यालयाच्या समोर जो डिजिटल नोटीस बोर्ड लावला आहे. त्यावर रात्रंदिवस सलगपणे एक सूचना दिली जाते की, कोणत्त्याही अनाधिकृत इमारतीमध्ये आपण फ्लॅट खरेदी करू नका. जबाबदारी कारवाई न करणा-या कर्मचा-यांची सुध्दा आहे. जबाबदारी विभागाची सुध्दा आहे. परंतु जबाबदारी फक्त उपायुक्त (अनाधिकृत बांधकाम विभाग)यांची असणार नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-नगररचनाकार साहेब, यांनी सांगितले की, उपायुक्त यांची जबाबदारी आहे.

मा. उप-आयुक्त(श्री. दत्ता भडकवाड):-त्याचबरोबर खरेदी करणा-याची सुध्दा जबाबदारी आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-आयुक्त साहेब, पोलीस स्टेशन बाहेर जर अशाप्रकारचा डिजीटल बोर्ड लावला व त्यावर लिहिले की कुणी गुन्हा करू नये तर काय गुन्हे कमी होतील? आपण फलक लावला हे ठिक आहे. परंतु अनाधिकृत बांधकामे थांबविणे हे कुणाचे काम आहे? तर मग प्रत्येक पोलिस स्टेशन समोर असा एक डिजीटल फलक लावला की, मेहरबानी करून कुणी गुन्हा करू नये हा



कायदयाने गुन्हा आहे. तर काय गुन्हे थांबतील? तर काय वेळ काढुपणा करून बिल्डर लोकांना बांधकामे विकुन जावू दिले जावे? व त्यानंतर त्यामध्ये लोक राहण्यास आल्यानंतर त्यांना खाली करण्यास सांगितले जावे? ही जी पध्दत चालु आहे ती थांबेल केव्हा? बिल्डरांना ऐवढी वेळ का दिली जात आहे की त्यांनी बांधकाम पुर्ण करून ती विकुन निघुन जावे. आपण येथे सांगता की, डिजीटल नोटीस लावली आहे. याने आपली जबाबदारी पुर्ण झाली? व अशी कित्त्येक अनाधिकृत बांधकामे चालु आहेत की ज्यांनी कोणत्त्याही प्रकारची बांधकाम परवानगी मंजुर करून घेतलेली नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा.महापौरजी, येथे अतिक्रमण विभाग आपली जबाबदारी नगररचना विभागावर तर नगररचना विभाग आपली जबाबदारी अतिक्रमण विभागावर ढकलत आहे. येथे अशी पध्दत आहे की, बांधकाम नकाशा मंजुर झाल्यानंतर प्लीन्थ सर्टीफीकेट घेतले जाते. व नगररचना विभागाची जबाबदारी समाप्त होते. ते म्हणतात की प्लीन्थ सर्टीफीकेट आम्ही तपासुन पाहीले. कंम्प्लीशन सर्टीफीकेट पर्यंत आम्ही जाणार नाही. उल्हासनगरमध्ये स्लॅब सर्टीफीकेट पध्दत सुरू केली जावी. प्लीन्थ सर्टीफिकेट नंतर स्लॅब सर्टीफीकेट चालु केले पाहिजे. जर इमारत तीन माळयाची असेल तर प्रत्येक माळयाचे सर्टीफीकेट असले पाहिजे. स्लॅब बरोबर पडला आहे की नाही? यामुळे अतिक्रमण विभागास कोणत्त्याही प्रकारची अडचण येणार नाही. नगररचनाकांरांनी सांगावे की अशी काही प्रथा होवू शकते का? प्लीन्थ सर्टीफिकेट घेतल्यानंतर कम्प्लीऐशन सर्टीफिकेट पर्यंत नगररचना विभागाची जबाबदारी संपते. येथील जे इंजिनिअर

आहेत ते विथड्राव्हल लेटर देतात. जर प्रत्येक स्लॅबचे स्लॅब सर्टीफिकेट घेतले तर शेवट पर्यंत नगररचना विभाग बांधिल राहील अशी प्रथा सुरू होवू शकते का? याबाबत काही नियम आहेत का ?कृपया नगररचनाकार साहेबांनी सांगावे. सचिव साहेब, नगररचना विभागास याबाबत मी विचारणा केली आहे की, प्लीन्थ सर्टीफिकेट पासुन कंम्प्लीएशन सर्टीफिकेट पर्यंत फार मोठा कालावधी असतो. या कालावधीत नगररचना विभाग गुपचूप बसुन असतो व त्यांच्याकडुन सांगितले जाते की, आमचा काही संबंध नाही. हे अतिक्रमण विभागाने पहावे. तर कृपया याबाबत स्लॅब सर्टीफिकेट देवू शकत नाही का? बिल्डरने प्रत्येक स्लॅबचे सर्टीफीकेट घेतले पाहिजे. कृपया याबाबत महासभेस खुलासा केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:</u>-मा. महापौरजी, शहरामध्ये अशी चर्चा आहे की, प्रत्येक कॅम्पाचे बीट मुकादम प्रत्येक महिन्यास आठ हजार रूपये महापालिकेत पोचवितात. जर अनाधिकृत बांधकामे बंद झाली तर ते बिचारे ४० हजार रू. प्रतिमहा कुठून आणुन देतील?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>म्हणजे आपण अनाधिकृत बांधकामांचे समर्थन करत आहात?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>अनाधिकृत बांधकामांचे समर्थन करत नाही. ४० हजार रू. हप्ता वसुली बंद झाली पाहिजे त्यासाठी बोलत आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>सचिव साहेब माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आपल्या प्रश्नाचे नगररचनाकारांनी उत्तर दिले आहे की, बिल्डींग बायलॉजमध्ये याबाबतची तरतुद नाही.

मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के सोनवणे हे सायंकाळी ५. ०५ वाजता सभागृहातील आयुक्तांच्या स्थानावर आसनस्थ झाले.

--९--

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>अशी काही तरतुद आहे का? प्लीन्थ सर्टीफिकेट नंतर थेट कंम्प्लीशन सर्टीफिकेट च्या दरम्यान? आयुक्त साहेब आता सभागृहात आलेले आहेत. आयुक्त साहेब या शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे फार मोठया प्रमाणात चालु आहेत. प्लीन्थ सर्टीफिकेट दिल्यानंतर कंम्प्लीएशन सर्टीफिकेट देण्याच्या वेळी तेथे जातात. या दरम्यान जे अनाधिकृत बांधकाम होते त्याबाबत ते म्हणतात की ती आमची जबाबदारी नाही. तर प्लीन्थ सर्टीफिकेटच्या नंतर स्लॅब सर्टीफिकेट सुरू केले तर. जसे की दोन माळयाची इमारत असेल तर प्रत्येक स्लॅबचे त्याने सर्टीफिकेट घेतले पाहिजे. स्लॅब बरोबर पडला आहे कींवा नाही. अशी प्रथा जर या शहरात सुरू झाली तर अतिक्रमण विभागास जास्त त्रास होणार नाही. तळमजला अधिक दोन माळे असा नकाशा मंजुर असेल तर त्यास तीन स्लॅबचा सर्टीफिकेट घेतले पाहिजे. पहिला स्लॅब, दुसरा स्लॅब, तिसरा स्लॅब बरोबर आहे किंवा नाही. असा आपण नियम तयार केला पाहिजे. हि काही फार मोठी गोष्ट नाही. आमच्या शहरामध्ये जर अनाधिकृत बांधकामे कमी होत असतील तर अशी पध्दत चालु करण्यास काही हरकत नसावी. कृपया या गोष्टीचा आपण जर खुलासा केला तर मला वाटते की शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे पुर्णपणे बंद होतील.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा. आयुक्त साहेब, मी थोडक्यात आपणांस सांगु इच्छितो की,५६ ,५७ ,५८ या क्रमांकाचे माझे प्रश्न होते. व त्यांचा जो विषय

होता तो विथड्रावल लेटर संदर्भातील होता. जेव्हा आर्कीटेक्ट लोक विथड्रावल लेटर देतात. तेव्हा अनाधिकृत बांधकाम चालु होण्याचे संकेत मिळतात. आपल्या सुरक्षिततेसाठी ते लोक विथड्रावल लेटर देतात. तर नगररचनाकार साहेबांना माझा असा प्रश्न होता आर्कीटेक्ट कडुन विथड्राव्हल लेटर आल्यानंतर त्या विशिष्ठ बांधकामांबाबत आपल्याकडुन काय कार्यवाही केली जाते? तर त्यांनी मोघम असे उत्तर दिले आहे ज्याबाबत मी संतुष्ठ नाही. मी त्यांना सांगितले की विथड्रावल लेटर आल्यानंतर आपण त्यांना नोटीस इश्यु करता, बिल्डरला, आपण आपले बांधकाम ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत बंद ठेवले पाहिजे. आर्कीटेक्टला असे निर्देश असतात की जोपर्यंत दुस-या आर्कीटेक्टची नेमणुक होत नाही तोपर्यंत याजागी अनाधिकृत बांधकाम होवू नये याची काळजी घेतली पाहिजे. परंतु यांनी उत्तर दिले आहे की आम्ही आर्कीटेक्टचे परवाने निलंबित केले आहेत. त्यांचे नुतनीकरण आम्ही करणार नाही. माझा असा प्रश्न आहे की आपण आर्कीटेक्टवर कारवाई केली हे ठिक आहे. परंतु आपण बिल्डरवर कोणती कारवाई केली नाही. कारण की दरम्यानच्या कालावधीत त्यांनी आपला प्रकल्प / बांधकाम पुर्ण केले त्यामध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन सुध्दा केले. त्यामध्ये त्याने बेकायदेशिरपणा सुध्दा सर्व केला आहे. व हे सर्व केल्यानंतर त्या मिळकतीची कर आकारणी सुध्दा झाली आहे. त्यास नळजोडणी दिली आहे. वीज जोडणी दिली आहे. तळमजल्याला काही दुकाने आहेत त्यांना दुकाने निरिक्षकांकडुन परवाने सुध्दा देण्यात आले आहेत. अशा स्थितीत शहरातील नागरिक गैरसमजुतीत येवून अशी बांधकामे खरेदी करतात व पुढे जावून ते फसतात. बिल्डर बांधकामे विकुन पैसा गोळा करून निघुन जातात. आर्कीटेक्ट विथड्रावल लेटर देवून सुटका करून घेतो. व सर्वसामान्य जनता फसली जाते. व पुढे जी कारवाई होते ती फ्लॅटधारकावर होते. ज्याने आपली मिळकत विकुन दागिनें गहाण ठेवून किंवा कर्ज वगैरे काढुन फ्लॅट विकत घेतलेला असतो. त्याच्यावर आपल्याकडुन कारवाई होते. त्या गोष्टी लक्षात घेता मी दोन तीन सुचना केल्या आहेत. त्या सुचना अशा आहेत की, अशा मिळकतीच्या मिळकत पावतीवर हे अनाधिकृत बांधकाम आहे असा स्टॅम्प मारला गेला पाहिजे. व अशा कोणत्त्याही मिळकतीची कर आकारणी होता कामा नये. त्यास नळ जोडणी देता कामा नये. व विद्युत मंडळास असे कळविले पाहिजे की या बांधकामास विद्युत जोडणी देता कामा नये. व दुकाने निरिक्षक कार्यालयास कळविले पाहिजे की येथील दुकानदारांना दुकानाचा परवाना देता कामा नये. माझ्या या सूचना आहेत त्यांचा आपण विचार करावा. तसेच जे प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन ऑफीस आहे त्यांना सुध्दा अशी माहिती दिली पाहिजे की हे बांधकाम पुर्णपणे किंवा अंशतः अनाधिकृत असल्याने त्याचे रजिस्ट्रेशन करू नये. या माझ्या सूचना आहेत मला वाटते आपण त्यावर गंभीरतेने विचार



कराल व दुसरी गोष्ट आमच्या मा. श्री. बेहरानी साहेबांनी सांगितले की ४० हजार रू हप्ता दिला जातो वगैरे वगैरे त्यांना याबाबत अधिक माहिती आहे. याबाबत मी ऐवढेच म्हणु इच्छितो की, अनाधिकृत बांधकामे थांबविण्यासाठी किंवा त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आम्ही प्रश्न विचारत आहोत यापेक्षा अधिक काही बोलु इच्छित नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, मला अतिशय दुःख होत आहे की आमच्या शहराचे नियोजन समितीचे सभापती गेल्या वर्षभरापासुन काम पहात आहेत. परंतु ते ऐवढे नाकाम झाले आहेत की त्यांना महासभेमध्ये प्रश्न विचारावे लागत आहेत त्यांना एक वर्षापासुन सभापती म्हणुन बसविले आहेत. ते त्या विभागाचे काम पाहु शकत नाहीत म्हणुनच ते महासभेमध्ये असे प्रश्न विचारत आहेत. व आम्हाला विचारतात की ४० हजाराचा काय मुददा आहे?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आपणांस अधिक माहिती आहे ना? आपणांस हे सुध्दा माहित आहे की नाकामयाब कोण आहे?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-४० हजार रू. प्रत्येक महिन्यास बीट मुकादम कुणास देतात.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मेहरबानी करून हे पहा की प्रश्न कधी दिला होता. त्यास नंबर कधी लावला आहे. आठ महिन्यापुर्वी प्रश्न दिला आहे. कामयाबी व नाकामयाबी आपण काही बोलु नये. आपणांस काहीही अधिकार नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा.महापौरजी, व आयुक्त साहेब अनाधिकृत बांधकाम विभाग व नगररचना विभागा हे दोन्ही विभाग एक दुस-यावर जबाबदारी ढकलत आहेत. याबाबत मी ज्या सूचना केल्या आहेत की प्लीन्थ सर्टीफिकेट नंतर स्लॅब सर्टीफिकेट देण्याचा एक लहानसा कार्यक्रम अवलंबिला तर अनाधिकृत बांधकामे पुर्ण पणे बंद होतील. कारण की कोणताही इंजिनिअर स्लॅब सर्टीफिकेट दिल्यानंतर विथड्रावल लेटर देणार नाही व अनाधिकृत बांधकाम होणार नाही. महापालिकेचे सर्व सदस्य जर अनाधिकृत बांधकामे थांबवू इच्छित असतील तर हा छोटासा कार्यक्रम राबविण्यासाठी नियम तयार करू शकतात त्यामध्ये काही फार मोठी गोष्ट नाही धन्यवाद.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मा. आयुक्त साहेब कृपया त्या ४० हजाराच्या मुदयाची चौकशी झाली पाहिजे कारण की श्री. मोहन बेहरानी हे कॉंग्रेसचे अध्यक्ष आहेत एक जबाबदार व्यक्ती आहेत त्यांनी हा आरोप केला आहे त्याची ती चौकशी झाली पाहिजे की हे ४० हजार रूपये महापालिकेत कुणाला दिले जातात.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-साहेब, अनाधिकृत बांधकामासाठी नवनविन पध्दत अंमलात आणली जात आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-महासभेच्या व सदस्यांच्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो, मागील वर्षी मे महिन्यामध्ये मी सभापती पदाचा कार्यभार स्विकारला होता. व जुन महिन्यामध्ये मी हा प्रश्न विचारलेला आहे. जो आज यावर्षी एप्रिल मध्ये तो चर्चेस आला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. आयुक्त साहेब आता जी अनाधिकृत बांधकामे निष्कासित होत आहेत. ती अनाधिकृत बांधकामे का तयार झाली? कशी तयार झाली? चटई क्षेत्राचे उल्लंघन कधी झाले त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत तर त्यांच्यावर सुध्दा जबाबदारी आली पाहिजे. बिल्डरांचे तर नुकसान होत आहेच परंतु ज्या अधिका-यांनी त्यांना मदत केली त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे.



मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-४० हजार बाबत काही तरी बोलले गेले त्याबाबत चौकशी कराल का असे काहीतरी मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी मला विचारले. त्याबाबत मी उत्तर देवू इच्छितो की ज्यांनी या सभागृहात हा आरोप लावला ते श्री. मोहन बेहरानी यांनी काही पुरावे प्रशासनाला सादर केले तर याबाबत सुध्दा चौकशी केली जाईल. व दुसरा मुददा असा की, अनाधिकृत बांधकामे ज्यांच्या कालावधीमध्ये झाली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे हे सुध्दा प्रशासनाचे काम आहे. आता जवळ जवळ ३०० अनाधिकृत बांधकामांना नोटीसा बजावल्या होत्या त्यामधील जवळ जवळ १८२ मध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन झाल्याचे निर्दशनास आले होते. परंतु ना बिल्डर वर कारवाई झाली ना जमिन मालकावर कारवाई झाली ना संबंधित अधिका-यावर कारवाई झाली. अधिका-यावर कारवाई करण्यासाठी त्यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी करावी लागेल. प्रथम तर प्राथमिक चौकशी करावी लागेल. प्राथमिक चौकशी मध्ये जर

कुणी अधिकारी दोषी असल्याचे आढळुन आले तर त्यांच्या विरूध्द कारवाई केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>आणि जर सिध्द झाले नाही तर आपण म्हणालात ना आरोप लावले आहेत ते आरोप सिध्द झाले नाही तर? मला वाटते की ४० हजाराचा जो आरोप आहे तो सिध्द करून दाखविला जावा व तो जर सिध्द झाला नाही तर?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>तर काय श्री. दर्शनसिंग फासी देतील काय?

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>बरोबर आहे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>जसे की श्री. सोनवणे साहेबांनी सांगितले, ज्यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु आहे त्यांना सुध्दा बीट मुकादम म्हणुन आपण काम दिले आहे. असे आम्हास माहित पडले आहे की ज्याची खातेनिहाय चौकशी पुर्ण झालेली नाही त्यास पुन्हा आपण बिट मुकादम म्हणुन ठेवले आहे. हे खरे आहे का? नाही तर मी आपणांस नावे देतो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, खातेनिहाय चौकशी चालु असताना कुणाची बदली करू नये असा तर काही कायदा नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. आयुक्त साहेब, याच महासभेत आपल्या पुर्वीचे जे आयुक्त होते त्यांनी असे सांगितले होते की जोपर्यंत यांची चौकशी पुर्ण होत नाही तोपर्यंत आम्ही त्यांच्या जागी नविन बीट मुकादम ठेवू ज्यांनी अगोदर बीट मुकादम म्हणुन काम केले आहे त्या कुणालाही बीट मुकादम म्हणुन ठेवणार नाही. जोपर्यंत खातेनिहाय चौकशी पुर्ण होत नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>महापौर महोदया, असे काही आश्वासन येथे दिले होते हे बदली करताना माझ्या लक्षात आणुन दिले नाही. असे काही जर आश्वासन दिले असेल आणि त्यानंतर बदली केली असेल तर त्या कर्मचा-याची त्वरीत बदली रदद करून सभागृहात दिलेल्या आश्वासनाचे पालन करू.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u> सन्माननिय महापौरजी,आता आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की १८२ अनाधिकृत बांधकाम असलेल्या इमारती आहेत त्यांनी चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे. त्यांच्यावर नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत जर नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत तर कारवाई झालेली नाही. कारवाई का झालेली नाही. कारवाई करणारे पण आपणच आहात, कुणी नगरसेवक तेथे जावुन कारवाई करत नाही. तर कारवाई अदयाप पर्यंत का झाली नाही? व १८२ इमारतींची यादी



या सभागृहास दया म्हणजे सभागृहास हे माहित पडेल की कोणकोणत्त्या इमारतींमध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे व त्यांच्यावर महापालिका कारवाई करणार आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. ६० हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. त्यांनी तो मागे घेतला आहे.

प्रश्न क्र. ६१ ,६२ ,६३ ,६४ हे श्री. प्रमोद टाले यांचे आहेत.

प्रश्न क्र ६१ :-बॅरेक नं. ६२६/४, अमरधाम चौक, उल्हासनगर-२ येथे चालु असलेले बांधकाम महानगरपालिकेच्या नियमानुसार आहे का? नसल्यास काय कारवाई केली?

उत्तर:-बॅरेक क्र६२६/४ अमरधाम चोक, उल्हासनगर-२ येथिल बांधकामाच्या नकाशास दिनांक २१.३.२००२ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्याचे एकुण क्षेत्र ५९.०३ चौ.मी. आहे. परंतु जागेवर मंजुर नकाशाव्यतिरिक्त (६५.४१ चौ.मी.) ज्यादा बांधकाम चालू केलेले असल्याने दिनांक ६.७.२००२ रोजी उप-आयुक्त अ.बा.नि. विभागातर्फे नोटिस बजाविण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र ६२ :-सद्या चालु असलेले बांधकाम क्र. ६३/२०००/४१३, दिनांक २४.७.२००१ व क्र३६/०१/१०००, दिनांक १३.३.२००२ यामध्ये २०.५.२००२ पासुन २९ जुन, ०२ पर्यंत किती व्हायोलेशन झाले आहे?

उत्तर:-उप-आयुक्त अतिक्रमण व अनाधिककृत बांधकाम विभागातर्फे मंजुर नकाशा व्यतिरिक्त केलेल्या अनाधिकृत बांधकाम तोडणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५४ नुसार दिनांक ६.७.२००२ रोजी नोटिस बजावणेत आलेले आहे. (एकुण अतिरिक्त बांधकामाचे क्षेत्र ३३.७९ चौ.मी.)

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र ६३ :-सदर बांधकामाचा परवाना देतांना जागेचा एफ.एस.आय. वारला आहे? कृपया विस्तृत माहिती दयावी.

उत्तर:- अर्जदार यांनी सादर केलेल्या बांधकाम परवानगीच्या स्वत:च्या मालकीच्या हददीत असलेल्या क्षेत्रास अधिन राहून बांधकाम परवानगी दिलेली आहे. बांधकामाचे एकूण क्षेत्र ८९८.८० चौ.मी. एवढे आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र ६४:-सदर बांधकामाचा बांधकाम परवाना रदद करण्यात यावा अशी आमची मागणी आहे. तो रदद करावा किंवा रदद करु नये याबददल नगररचना नियमाप्रमाणे आपण काय स्पष्टीकरण कराल?

उत्तर:-अर्जदार यांनी जागेवर मंजुर नकाशा व्यतिरिक्त जागेवर बांधकाम केलेल्या असल्याने सदर बांधकाम तोडुन टाकण्याबाबत नगररचना विभागाचे उप-आयुक्त अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागास दिनांक ६.७.२००२रोजी कळविले आहे. तरी यांनी दिनांक ६.७.२००२ रोजी अनाधिकृत बांधकाम तोडण्यासाठी नोटिस बजाविली आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-उत्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र ६५ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र ६५:-उल्हासनगर महानगरपालिकेच्या एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत जे ३३ रस्ते विकसित करण्यात आले होते, त्यापैकी रोडक्र.२ उल्हासनगर-३ मधील मोहटादेवी माता मंदिर ते कल्याण-अंबरनाथ रोड पर्यंतच्या



रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत पडुन आहे तो रस्ता का पूर्ण करण्यात आलेला नाही?

सदरील रस्त्याचे काम पूर्ण कधी करण्यात येईल?

याबाबतची चर्चा येत्या महासभेत करण्यात यावी.

उत्तरः-उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थितीमुळे मोहटा देवी माता मंदिर ते कल्याण-अंबरनाथ रोड पर्यंतच्या रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत पडुन आहे. परंतु चोपडा कोट ते माता मंदिर पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर उर्वरित स्थितीत असलेल्या रस्त्याचे बांधकाम हाती घेण्यात येईल.

चोपडा कोट ते माता मंदिर पर्यंतचा रस्ता तयार करण्यात आलेला असून त्यापूढील काम महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असल्याने बंद होते. आता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती थोडी सुधारली असल्याने या रस्त्याचे उर्वरित काम माता मंदिर ते स्मशान भूमी चौक हे सुरु करण्यात आले असून एप्रिल अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा. महापौरजी, मी मागील बॉडीमध्ये सुध्दा होतो परंतु आजपर्यंत असे कधी झाले नाही ते आज या बॉडीमध्ये पाहण्यास मिळाले. माझा प्रश्न होता ६५ क्रमांकाचा तो मी विचारला होता २९.६. २००२ रोजी त्याबाबत उत्तर दिले होते की आर्थीक परिस्थिती खराब आहे. तो प्रश्न चर्चेस आला असताना त्याबाबतचे काम चालु झाले आहे. प्रत्यक्षात काम चालु झाले आहे. अशाप्रकारे काम चालु केले तर कुणालाही प्रश्न विचारण्याची गरज पडणार नाही. व ऐवढी चर्चा करण्याची आवश्यकता पडणार नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ६६ श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र ६६ :-उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात परवानगी प्राप्त कोणकोणत्त्या इमारतींच्या बाबतीत नगररचनाकारांनी, दोन किंवा त्याहून अधिका वेळा सुधारित बांधकाम आराखडा मंजुर केला आहे? बांधकामधारकांनी महापालिकेकडे सुधारित बांधकाम आराखडा सादर करण्यापूर्वीच आधीच्या मंजुर आराखडयाचे उल्लंघन करुन, जादा बांधकाम करु देण्याची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत आहे काय?

उत्तरः-फक्त एकच बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दोन पेक्षा अधिक वेळा मंजुर केलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलमांतर्गत महाराष्ट्र विकास योजना विषयक नियम १९७० उप नियम १० मध्ये नमुद केल्याप्रमाणे बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय होणा-या क्षेत्राल परवानगी देण्यात येते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-महापौर महोदया, या सभागृहात मागील एक तासापासुन अनाधिकृत बांधकामावर बरीच चर्चा झाली आहे. व अनाधिकृत बांधकामे तयार करण्याचे नविन नविन प्रकार येथे निर्दशनास आले आहेत. व त्यामधील एका प्रकाराबाबत माझा प्रश्न आधारीत आहे. याठिकाणी सदस्य जेव्हा प्रश्न विचारतात त्या प्रश्नाची उत्तर जर सरळ आणि स्पष्ट भाषेत दिली जसे श्री. चौधरी यांनी सांगितले तर याठिकाणी अधिक खुलासा विचारायची पाळी येत नाही. तर जे उत्तर मोघम असते आणि फिरवाफिरवी करणारे असते त्यावेळेला खुलासा विचारण्याची पाळी येते. मी या प्रश्नावर खुलासा करण्यासाठी नगररचनाकार यांना मंचावर बोलविण्याची मी विनंती करेन. एक तर मी प्रश्न असा विचारला होता की उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात परवानगी प्राप्त कोणकोणत्त्या इमारतींच्या बाबतीत नगररचनाकारांनी, दोन किंवा त्याहून अधिका वेळा सुधारित बांधकाम आराखडा मंजुर केला आहे? बांधकामधारकांनी महापालिकेकडे सुधारित बांधकाम आराखडा सादर करण्यापूर्वीच आधीच्या मंजुर आराखडयाचे उल्लंघन करुन, जादा

बांधकाम करु देण्याची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत आहे काय? माझा प्रश्न एकदम साधा सरळ होता की, परवानगी घेवून जी बांधकामे सुरू आहेत. अशा बांधकामांच्या बाबतीमध्ये दोन किंवा त्याच्या पेक्षा अधिक वेळा रिवाईज प्लान किती ठिकाणी मंजुर झालेला आहे. त्याच्यामध्ये उत्तर दिले आहे की दोन पेक्षा अधिक वेळा एकच बांधकाम परवानगीचा प्रस्ताव मंजुर केलेला आहे. पण दोन वेळा किती झाले त्याचे उत्तर दिले नाही. आणि नगररचनाकारांकडुन असा खुलासा पाहिजे की, रिवाईज्ड प्लान बिल्डर का  टाकतात? आणि अशी वारंवार त्यांच्यावर पाळी का येते? आणि एकाच वेळेला शहरामध्ये अनेक ठिकाणी आपण जेव्हा अनाधिकृत बांधकामांची चौकशी करतो आणि असे आढळुन येते की याठिकाणी अनाधिकृत बांधकाम झालेले आहे तर ब-याचशा तक्रारदारांना किंवा नगरसेवकांना सुध्दा ऐकायला मिळते की त्याचा रिवाईज्ड प्लान मंजुर आहे. तर हा एक काय प्रकार आहे? की एखादया बिल्डरने महापालिकेकडुन प्लान मंजुर करून घेतल्यानंतर त्या प्लान प्रमाणे बांधकाम न करता समजा त्याने अनाधिकृत बांधकाम केले असेल आणि ते अनाधिकृत बांधकाम वाचविण्यासाठी, नियमित करण्यासाठी त्यांनी तो रिवाईज्ड प्लान मंजुर करून घेतला असेल तर असा रिवाईज्ड प्लान मंजुर करणे हे कायदेशिरदृष्टया कितपत योग्य आहे असा साधा सरळ प्रश्न आहे त्याचा खुलासा झाला तर बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>मा महापौर महोदया, माझ्या लक्षात हे येत नाही, कारण की उत्तर जे दिले आहे ते बिल्कुल स्पष्ट आहे. त्यांचा पहिला प्रश्न हा आहे की किती प्रकरणे आहे की ज्यासाठी रिवाईज्ड परवानगी मागितली होती. त्याचे उत्तर आहे एक, व दुसरे असे करू शकतात का त्याचे सुध्दा उत्तर यांनी दिले आहे ते ही बिल्कुल स्पष्ट आहे. अशी कायदयात तरतुद आहे. जो नियम आहे. नियम १० मध्ये तरतुद आहे. तर यामध्ये पुढे खुलासा करण्याची जरूरत काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रश्न असा आहे की एखादा बिल्डींग प्लान मंजुर करून घेतल्या नंतर त्या प्लान प्रमाणे बांधकाम न करता अनाधिकृत बांधकाम करायचे आणि ते अनाधिकृत बांधकाम वाचविण्यासाठी रिवाईज्ड प्लान टाकायचा जर बांधकामामध्ये फेरफार होणार असतील तर तो वेगळा प्रश्न आहे. बांधकामामध्ये फेरफार करायचे असतील तर रिवाईज्ड प्लान टाकला आणि फेरफार केला हा एक भाग आहे परंतु अनाधिकृत बांधकाम जे केलेले आहे ते बांधकाम नियमित करण्यासाठी रिवाईज्ड प्लानच्या पध्दतीचा आपण उपयोग करू शकतो का असा प्रश्न आहे यावर उत्तर असे दिले आहे की, बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय होणा-या क्षेत्राला परवानगी देण्यात येते. हे उत्तर ठिक आहे  आपण अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रालाच आपण परवानगी देवू शकतो अनुज्ञेय नसेल तर देवू शकत नाही. माझा प्रश्न असा आहे की जर पहिल्या प्लान प्रमाणे बांधकाम न करता अनाधिकृत बांधकाम करायचे आणि ते वाचविण्यासाठी रिवाईज्ड प्लान टाकायचा ही पध्दत योग्य आहे का? जर योग्य असेल तर योग्य आहे ऐवढेच उत्तर हवे आहे मला.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>हा जो खुलासा आता विचारण्यात आला त्याबाबत मी बोलु इच्छितो की यामध्ये चुकीचे असे काहीच नाही. उदाहरण देतो ब-याचदा विकासकर्ता बांधकाम करत असताना बालकनीची तरतुद करतो परंतु जेव्हा इमारतीचे काम पुर्ण होते तेव्हा बाल्कनी बंदीस्त केली जाते. ती बाल्कनी ते बंदीस्त करू शकतात यामध्ये काही चुकीचे नाही आहे फक्त रिवाइज्ड प्लानच्या वेळेस परवानगी घेणे जरूरीचे असते. किंवा काही वेळा काम करताना काही अडचणी येताता त्यामुळे सुध्दा विकासकर्त्यास प्लानमध्ये काही बदल करावा लागतो. तर असे बदल करणे कायदयाने परवानगी पात्र आहे. व ते योग्य सुध्दा आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-बदला बाबत मी विचारलेले नाही . रीवाइज्ड प्लान ज्यासाठी टाकायचा ते बांधकाम आधीच करणे हे परवानगी पात्र आहे का? जे बांधकाम करण्यासाठी रिवाइज्ड प्लान टाकायचा आहे. ते बांधकाम रिवाइज्ड प्लान टाकण्याच्या आधीच मंजुर होण्याच्या आधी करायला परवानगी आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-एकदा जर कोणत्त्या कामासाठी परवानगी घेतली व त्यामध्ये तांत्रिक कारणाने किंवा कायदयानुसार करावे लागले तर आणि त्यासाठी रीवाइज्ड प्लान दयावा लागला तर ते परवानगी पात्र आहे. जर परवानगी पात्र नसते तर कायदयामध्ये याकामी तरतुदच केली गेली नसती.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ६७ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. ६७:- उल्हासनगनर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींची नियतकालिक पाहणी करण्यात येते काय? असल्यास, ती जबाबदारी कोणत्त्या विभागातील कोणता अधिकारी पार पाडतो? अलिकडच्या काळात अशी पाहणी केव्हा करण्यात आली आहे? तीत, किती इमारती धोकादायक स्थितीत आढळून आल्या आहेत? कृपया यादी दयावी अशा इमारतींच्या बाबतीत महापालिकेने काय कारवाई केली आहे?

उत्तरः- होय.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सर्व्हेक्षण केल्या जातात उप-आयुक्त (अतिक्रमण) मार्फत नोटिसा बजाविल्या जातात.

जुन २००२ मध्ये इमारतीची पहाणी करण्यात आली.

आतापर्यंत मोडलेल्या धोकादायम इमारती ३४ इतक्या आहे.

धोकादायक इमारतीची माहिती सार्वजनिक बांधकाम कार्यालयात उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार इमारत धारकाला उप-आयुक्त (अतिक्रमण) यांचेमार्फत वेळोवेळी नोटिसा बजाविण्यात येते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-एकेक वर्षांनी प्रश्न चर्चेस येतात त्यामुळे संदर्भ विसरायला होतात.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नाचे उत्तर तर आपणांस मिळाले आहेत आपण फक्त चर्चा करत आहात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-कोर्टात उभे राहुन वाचतात तसे वाचत आहे. हा तर गेल्या वर्षीचा प्रश्न आहे आणि यामध्ये उत्तर दिले आहे की जुन २००२ मध्ये इमारतींची पाहणी करण्यात आली. आढळलेल्या धोकादायक इमारती ३४ इतक्या आहेत. आणि धोकादायक इमारतींची माहिती सार्वजनिक बांधकाम कार्यालयात उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार इमारतधारकाला उपायुक्त (अतिक्रमण) यांचे मार्फत वेळोवेळी नोटीसा बजावण्यात येते. म्हणजे आपल्या शहरामध्ये जर पाहणी करत असताना धोकादायक इमारती आढळल्या की, महापालिकेची जबाबदारी ऐवढीच आहे का की फक्त उपायुक्तांच्या मार्फत त्यांना नोटीसा पाठवायच्या की तुमची इमारत धोकादायक आहे. की त्यापेक्षा अधिक आमची काही जबाबदारी नाही आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-महानगरपालिका क्षेत्रामध्ये जेवढया काही धोकादायक इमारती असतात त्यांचे सर्व्हेक्षण करणे त्यांना कलम २६८ नुसार नोटीसा देणे. ती बांधकामे खाली करणे. जर त्या जागा भोगवटाधारक

किंवा मालक खाली करत नसेल तर त्या खाली करून घेणे. नागरिकांच्या जिवित्त्वास होणारी संभाव्य जिवित हानी टाळणे हे महापालिकेचे कर्तव्य असते. व त्यानुसार मागील वर्षी सुध्दा महानगरपालिकेने सर्वे केला होता. त्यावेळेला जेवढया काही इमारती धोकादादयक आहेत असे आढळुन आले त्या सर्वांना नोटीसा वजावल्या



होत्त्या. भोगवटादार व मालक यांना त्या इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत निर्देश दिले जातात. जेणे करून त्या इमारतीतील धोका कमी होतो. जास्त धोका असेल तर ती इमारत खाली करण्यास सांगितले जाते. व इमारतीचे निष्कासन करून धोका नष्ट केला जावू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>३४ ज्या इमारती समोर आलेल्या आहेत. त्यांच्याबाबतीमध्ये असा काही अहवाल आपल्याकडे तयार आहे का की किती इमारती आपण खाली केल्या आहेत. किती धोकादायक इमारतींची दुरूस्ती आपण करून आणलीत? किती इमारती पाडल्या याचा अहवाल आपल्याकडे आहे का? त्याची आपण वर्तमानपत्रामध्ये यादी प्रसिध्द केली आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>मागील वर्षी ज्या ३८ इमारतींना ज्या नोटीसा दिल्या होत्त्या. त्यापैकी एक इमारत खाली केली होती. कायदयात अपेक्षित असल्या प्रमाणे कार्यवाही केली होती.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>धोकादायक इमारतींची यादी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द व्हावयास पाहिजे होती.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>या प्रश्नाच्या उत्तरा बरोबर आपण त्याची यादी सुध्दा मागितली होती. ती प्रस्तुत करण्यात आली नाही.ती यादी दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>यादी असती तर त्यावर अधिक प्रकाश पडला असता. नेमके उपप्रश्न विचारता आले असते आता हे कळायला मार्ग नाही की या ३४ धोकादायक इमारतींमध्ये महापालिकेची जी फायरब्रिग्रेडची कॅम्प ५ येथील इमारत आहे. तिचा समावेश आहे की नाही आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u> आहे. आहे. फायरब्रिगेडच्या इमारतीचा यामध्ये समावेश आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>एक इमारत रिकामी केली बाकीच्या इमारतींचे काय?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आता आपण निवेदन केले की एक इमारत खाली केली. एक इमारत आपण रिकामी केली ३३ इमारती रिकाम्या करू शकला नाहीत. फक्त फायर ब्रिगेडची इमारत रिकामी केली तर त्या व्यतिरिक्त आणखी दुसरी कुठली इमारत रिकामी केलीत. कोणती इमारत खाली केलीत?
<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>एक जी इमारत खाली केली ती महापालिकेची फायर ब्रिगेडची इमारत खाली केली. तिच्या दुरूस्तीचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>म्हणजे खाजगी इमारत एक सुध्दा आपण खाली केली नाहीत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-जेव्हा मी म्हणतो की, ३८ इमारतीमधील महापालिकेची एकच इमारत खाली केली याचा अर्थ खाजगी इमारत एक सुध्दा खाली केली नाही असाच होतो. आपण प्रश्न कसे विचारत आहात?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-त्याठिकाणी जे लोक राहातात त्यांच्या जीवाशी हा खेळ नाही आहे का? महापालिकेचे कर्तव्य नाही आहे का आपले जे कर्तव्य आहे ते पार पाडणे तुम्ही मघाशीच स्पष्टपणे या सभागृहास सांगितले की महापालिकेचे धोकादायक इमारतींच्या बाबतीत नेमके कर्तव्य काय आहे? ते पार पाडले गेलेले



नाही. अशा अधिका-यांवर आपण काय कार्यवाही करणार? जर ३४ मधील एकच इमारत ती सुध्दा महानगरपालिकेची म्हणजे याचा अर्थ खाजगी इमारतींबाबत एकही इमारत खाली केली नाही. एकही इमारत दुरूस्त करून घेतलेली नाही. किंवा तिच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई केली गेली नाही. आणि पुन्हा आता नविन वर्ष उजाडले आहे पुढल्या महिन्यात पावसाळा आहे. म्हणजे पुन्हा त्याचा नविन सर्वेक्षण सुरू झालेले असणार, नविन इमारतींची त्यामध्ये भर पडलेली असणार म्हणजे पुन्हा आपले ये रे माझ्या मागल्या आहेच? आणि हा माझा यावर्षीचा जो प्रश्न आहे तो पुढल्या वर्षी येणार. तोपर्यंत आपणांस काही माहिती नसणार की या ३४ इमारतींबाबत आपण काय केले? कार्यवाही कोणत्या स्तरावर आहे? त्याची यादी सुध्दा समोर नाही, किंवा वर्तमानपत्रामध्ये सुध्दा प्रसिध्द होत नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-महापौर महोदया, मागच्यावर्षी जो सर्व्हे केला होता. त्याप्रमाणे यावर्षी सुध्दा सर्वे केला जाईल व त्यामध्ये ज्या काही धोकादायक इमारती आहेत असे आढळुन येईल ती इमारत खाली सुध्दा करून घेतली जाईल व निष्कासित सुध्दा करून घेतली जाईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय उपमहापौर महोदया, सन्माननिय आयुक्त साहेब, आपले सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी धोकादायक इमारतींबाबत जे सांगितले आहे. मी आपल्या निर्देशनास आणु इच्छितो की गेल्या दोन ते तीन वर्षामध्ये माझ्या प्रभागातील सेंच्युरी कंपनीच्या समोर सेंच्युरी मार्केट ही इमारत पंधरा ते वीस वर्षापुर्वी तयार केलेली खंडीत खंडर होवून पडलेली आहे. व काही वर्षापुर्वी तोडफोड विभागाचे पदाधिकारी श्री. ढाकरे साहेब त्या ठिकाणी आले होते. आम्ही विनंती केल्यानंतर तोडण्यासाठी आले होते परंतु ती इमारत तोडु शकले नाहीत. इमारतीचा काही भागच तोडुन बाकी इमारत तशीच पडली आहे ती अदयाप उभी आहे. व ती इमारत अशा ठिकाणी आहे की सेंच्युरी कंपनीतील पहिल्या, दुस-या, तिस-या व जनरल शिफ्टचे कर्मचारी तेथुन ये-जा करतात. तेथे शेजारी भाजी मार्केट आहे, आजुबाजुला हॉटेल्स दुकाने आहेत. त्या इमारतीच्या पाठीमागे रहिवाशी राहतात त्याठिकाणी घरे सुध्दा आहेत. ती इमारत धोकादायक स्थितीत आहे. ती इमारत धोकादायक असल्याचे घोषित करून त्याबाबतचा फलक लावण्यात आलेला नाही. इमारत पुर्णपणे रिकामी आहे. खाली तळमजल्याला सात आठ दुकाने चालतात आणि ती इमारत जर ढासळली, पडली तर त्याठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. मी आपल्या हे निर्देशनास आणुन देवू इच्छितो की श्री. राजाराम साळवी यांनी मला पत्र दिले की ही इमारत धोकादायक आहे तर लवकरात लवकर महापालिकेला आपण पत्र देवून याबाबतची कारवाई करावी. त्याचबरोबर महानगरपालिकेशी सुध्दा याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. तरीही कुठेही काही कार्यवाही झालेली दिसत नाही. सेंच्युरी मार्केट ही धोकादायक इमारत लवकरात लवकर पाडण्यात यावी अशी मी आपणांस विनंती करतो.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्माः-माझा आपणांस एकच प्रश्न आहे डंम्पींग ग्राऊंड बाबतचा याबाबत तक्रार करून एक वर्ष झाले आहे. त्याठिकाणी काही घरे तयार

झाली आहेत. नाली तयार करायचे झाले तर ती घरे कशी तोडणार? आता सांगितले तर आपण कच्ची नाली काढाल पक्या नालीसाठी पाच वर्ष वाट पहात बसावे लागेल. दुसरे असे की ५८८ बॅरेक येथे ज्या काही चाळी, दुकाने तयार झाली आहेत त्याबाबत श्री. गुरव साहेबांना मी सांगितले होते त्यांनी म्हंटले की नोटीस बजावल्या आहेत आता म्हणतात की ती दुकाने कोणाची आहेत ते माहित पडत नाहीत. तर आपण त्याबाबत चौकशी करावी. व डंम्पींग ग्राऊंडवर पुर्ण शहराचा कचरा येतो तो नाल्यांमध्ये जमा होतो. त्यामुळे नाल्या तुंबून जातात. आणि त्यामुळे पाणी साठुन सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते.यास्तव मी आपणांस विंनती करते की, याठिकाणची असलेली नाली पक्या स्वरूपात बांधुन दिली जावी. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिका-यांना मी ही साईट दाखविली आहे. कुणीही काही काम करत नाही. अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांनी ज्या नोटीसा बजावल्या आहेत त्यांना एक महिना उलटुन गेला तरीही काही कारवाई केलेली नाही. आता आपणच सांगा आम्ही



काय करायचे? उत्तर दया यापुर्वी सुध्दा दोन तीन वेळा मी आपणांस सांगितले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>महापौर महोदया, मला प्रश्न काय आहे हेच माहित पडले नाही. काही तरी तक्रार आहे असे समजते प्रश्न काय आहे ते माहित पडले नाही. महापौर महोदया इथे जो प्रश्न विचारला आहे त्या संबंधित जर काही उपप्रश्न असतील तर तो आपण विचारलात तर मी आपणांस उत्तर देवू शकेन.

<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-</u>प्रश्नोत्तराचा तास आहे. त्यामुळे मी प्रश्न विचारत आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>प्रश्नोत्तराचा तासा ऐवजी हा तक्रारीचा तास ठेवला पाहिजे.

<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-</u>नोटीस देवून ही एक महिना उलटुन गेला तरीही त्यावर त्याबाबत काही कार्यवाही झालेली नाही. श्री. गुरव साहेबांना बोलावुन याबाबत विचारणा करा. त्यांना उत्तर विचारा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, येथे प्रश्न हा नाही की कुणी उत्तर दयायचे आहे. उत्तर भलेही माझ्या एखादया कनिष्ठ अधिकारी देईल किंवा मी देईन याबाबत प्रश्न नाही तर प्रश्न काय आहे ते तर प्रथम समजले पाहिजे. आपण जे काही म्हणालात त्यातुन असे दिसुन आले की आपली काहीतरी तक्रार आहे. या प्रश्ना संबंधित आपला प्रश्न काय आहे? महापौर महोदया, हा तक्रारींचा तास नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-</u>पहिले तर आम्ही कंम्पेंन्ट देतो त्यावर कारवाई करत नाही म्हणुन आम्ही येथे प्रश्न विचारतो. श्री. गुरव येथे बसले आहेत त्यांना बोलवा आणि विचारा त्यांच्या कार्यकालावधीतच तेथे अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. आणि त्यांनी सांगितले की आम्ही त्यांना नोटीसा बजावल्या आहेत. परंतु एक महिना झाला तरीही त्यावर काही कारवाई झालेली नाही.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त ):-</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय नगरसेविका श्रीमती. कमला शर्मा यांचा जो प्रश्न आहे. त्यांच्या प्रत्येक विभागाशी संबंधित अशा दोन दोन तीन तीन तक्रारी आहेत. आणि त्यांची समज अशी आहे की या तक्रारींची संबंधित विभागाकडुन उत्तरे मिळाली नाहीत म्हणुन त्याची उत्तरे येथे दिली जावीत. मी त्यांच्या भावनांचा आदर करून त्यांच्या ज्या काही दोन चार तक्रारी आहेत त्याबाबत उत्तर देतो. त्यांची एक तक्रार होती की एका नालीवर

बांधकाम होते ते गुरव साहेबांनी त्यांच्या कार्यकालात तोडले आहे. दुसरी तेथे चार दुकाने तयार झाली आहेत त्यांना नोटीस सुध्दा बजावली आहे. परंतु ती दुकाने १९९५ पुर्वी तयार झालेली आहेत की नंतर तयार झालेली आहेत ते अदयाप सिध्द झाले नाही. म्हणुन त्यावर अदयाप कारवाई केलेली नाही. जर ती बांधकामे ९५ नंतरची असतील तर त्यावर पण आम्ही कारवाई करू. दुसरी जी तक्रार होती ती डंम्पींग ग्राऊंड बाबतची होती. त्यांची ही मागणी होती की डंम्पींग ग्राऊंड येथे जो कचरा गोळा होता तेथे नाली नसल्यामुळे पावसाळयात दुर्गंधी पसरते व आरोग्यास धोका निर्माण होतो अशी त्यांची एक तक्रार होती. याबाबत आयुक्त साहेबांनी शहर अभियंता यांना परवाच निर्देश दिले आहेत. व कार्यकारी अभियंता श्री. सुखरामानी हे ते काम पहात आहेत व तेथे नाली तयार करण्यासाठी प्राकलन तयार करून या वर्षाच्या अर्थसंकल्पात जशी तरतुद असेल त्याप्रमाणे काम करण्यात येईल. तिसरी जी तक्रार होती ती त्यांच्या प्रभागात जे जुने शौचालय होते ते तोडण्याची त्यांनी विनंती केली होती. त्या शौचालयाबाबत आम्ही तेथे पुर्ण चौकशी केली व तेथील काही लोकांची ते शौचालय तेथे रहावे अशी मागणी आहे. तेथे जी गर्ल्स स्कुल आहे तिच्या प्राचार्याने आम्हाला



पत्र दिले आहे लेखी स्वरूपात की ते सार्वजनिक शौचालय राहिले पाहिजे. म्हणुन नगरसेविका श्रीमती. कमला शर्मा यांना पत्र दिले आहे की ते सार्वजनिक शौचालय तोडले जाणार नाही. त्या शौचालयाची जी दुरूस्ती करायची आहे ती आम्ही करू. माझ्या मते नगरसेविका श्रीमती. कमला शर्मा यांच्या ज्या दोन तीन तक्रारी होत्त्या त्यांची उत्तरे मी दिली आहेत.

<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-</u>मी ते विचारत नाही. ते काम पुर्ण झाले. माझे त्यामध्ये वैयक्तीक काही स्वारस्थ नाही. ५८८ बॅरेकच्या ठिकाणी जी दुकाने तयार झाली आहेत. त्यासाठी अनाधिकृत बांधकाम विभागाकडे मी कितीतरी वेळा तक्रारी केल्या आहेत फे-या मारल्या आहेत मला त्याबाबत उत्तर पाहिजे. अदयापर्यंत त्यांच्यावर कारवाई का केली नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>खरेच अतिशय दुःखाची व शरमेची सुध्दा गोष्ट आहे की ऐवढा मोठा मुददा आहे व अधिकारी लोक असे म्हणतात की, नगरसेविका श्रीमती. कमला शर्मा या काय बोलत आहे हे समजत नाही. व त्यांनी जे दोन तीन प्रश्न विचारले आहेत त्याचे अशाप्रकारे उत्तर देणे हे काही योग्य नाही. जेव्हापासुन दुकाने बांधण्याचे काम सुरू झाले तेव्हापासुन दादी श्रीमती. कमला शर्मा यांनी तक्रारी केल्या आहेत. आपणांपासुन आयुक्तांपर्यंत सर्वांकडे त्यांनी तक्रारी केल्या आहेत. व आपण म्हणता की आम्हाला माहित नाही. डंम्पींग ग्राऊंड पासुन ओटी सेक्शन पर्यंत नाल्याचे पाणी येते ते मध्येच बांधण्यात आलेल्या चार दुकानांच्या बांधकामामुळे अडले जाते. दादी कमला शर्मा तक्रार करत असते. आपण म्हणता की चौकशी करावी लागेल. १९९५ पुर्वीचे तर दुकाने नाहीत ना हे पहावे लागेल. श्री. गुरव साहेब होते त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही त्या दुकानांना नोटीसा बजावल्या आहेत. दादी आता विचारत आहेत की, त्यांना नोटीसा देवून तीन महिने झाले त्यावर आजपर्यंत काय कार्यवाही झाली. अनाधिकृत बांधकामे करून दुकाने बांधली जातात. तक्रारदार येतो त्याच्या तक्रारीची सुनावणी होत नाही. दुकाने बांधुन तयार होतात त्यांना कोर्टात जाण्यासाठी वेळ दिली जाते. आता जो अनाधिकृत बांधकामाच्या विषयासंबधी प्रश्न चालु आहे. त्याच्याशी संबंधित हा विषय आहे. त्याबाबत जर दादी प्रश्न विचारत आहे की मी जी चार महिन्यापासुन तक्रार दिली आहे. तर त्यावर उत्तर दिले जाते आपण काय म्हणत आहात हे समजुन येत नाही. व आपण म्हणता की त्याची चौकशी करावी लागेल. १९९५ पुर्वीचे तर बांधकाम नाही ना.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त ):-</u>मा. महापौर महोदया, १५ दिवसापुर्वी मी अतिक्रमण विभागाचा कार्यभार स्विकारला आहे. मला हे माहित नव्हते की नगरसेविका श्रीमती. कमला शर्मा हया प्रश्न विचारतील म्हणुन...

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-म्हणुनच दादी कमला शर्मा म्हणत होती श्री. गुरव साहेबांना मंचावर बोलवा. त्यांच्याशी संबंधित हा विषय आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त ):-मंचावर येण्याअगोदर मी श्री. गुरव साहेंबांना याप्रकरणाबाबत विचारले त्यांनीच मला हे सांगितले की त्यांना नोटीस दिली आहे परंतु नोटीस दिल्यानतंर, कालावधी संपल्यानंतर त्याचे निष्काशन करायचे होते परंतु ती दुकाने कधी बांधली गेली आहेत याची चौकशी पुर्ण झाली नाही म्हणुन. असे त्यांनी सांगितले तेच उत्तर मी सभागृहासमोर दिले आहे.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-ती दुकाने निवडणुकीच्या नंतर तयार झाली आहेत. त्या अगोदर तेथे कोणतीच बांधकामे नव्हती. राणा ट्रेडींग पर्यंत सर्व जागा मोकळी होती.



श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त ):-बेकायदेशिर असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-डंम्पींग ग्राऊंडच्या नाल्याच्या ठिकाणी घरांची बांधकामे होत आहेत. नाल्यांचे पाणी तेथे अडुन राहते. नाला सुरळीत होण्यासाठी आपण म्हणाल ती घरे कशी तोडायची.? सार्वजनिक शौचालयाबाबत त्यांनी सांगितले त्यावर मी म्हंटले ठिक आहे. ते तोडावे असे काही मी म्हणत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्त्तराची वेळ संपली.

येथे मा.महापौरांच्या निर्देशानुसार मला आपणांस सूचना दयायची आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने एक पत्र आले आहे. श्री. किशोर वनवारी यांना सभागृह नेता म्हणुन निवडण्यात आले आहे. व मा. महापौरांनी त्यास स्विकृती दिली आहे. व दुसरेही एक पत्र आले आहे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या गटनेत्त्याबाबत श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यास सुध्दा मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-मा.महापौरजी, ही गर्वाची गोष्ट आहे की आमचे श्री. नरेंद्रकुमार ठाकुर तीन वेळा गटनेता झालेले आहेत व श्री. किशोर वनवारी चौथ्यांदा सभागृह नेता झालेले आहेत. त्यांचे हार्दीक अभिनंदन करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-व एक लक्षवेधी सूचना आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-मा. महापौरजी, स्वागत करण्यासाठी पाच मिनिटांची वेळ दिली जावी.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-श्री. विनोद तलरेजा यांच्या प्रस्तावाचे मी अनुमोदन करतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कोण स्वागत करेल. आपण करणार?

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-श्री. किशोर वनवारी हे आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सभागृह नेता आहेत त्यांचे आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने स्वागत

करतो. तसेच श्री. नरेंदकुमार ठाकुर आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेता आहेत त्यांचे सुध्दा आम्ही स्वागत करतो.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कामकाज पुढे चालु केले जावे?

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>स्थायी समितीच्या ज्या अध्यक्षा आहेत. श्रीमती. ज्योती कालानी, महापौर श्रीमती. मालती करोतिया, उपमहापौर श्रीमती. जया साधवानी, या तिघींनीही एक-एक वर्षाचा आपला कार्यकाल पुर्ण केला आहे. त्या संबंधी कॉंग्रेस अध्यक्ष श्री. मोहन बेहरानी हे मा. महापौर, उपमहापौर यांचे तर मी स्थायी समिती अध्यक्षा यांचे अभिनंदन करू इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>आर.पी.आय. चे नगरसेवक श्री. प्रमोद टाले यांना यावर्षीच्या गटनेता या पदासाठी आम्ही शुभेच्छा देतो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के सोनवणे):-</u>मा. महापौर आणि सन्माननिय सदस्य, महापालिका प्रशासनाच्या वतीने मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती यांनी एक वर्षाचा कार्यकाल पुर्ण केल्याबाबत त्यांना शुभेच्छा देतो. व पुढच्या कालावधीसाठी सुध्दा हार्दिक शुभेच्छा देतो. तसेच सभागृह नेता पदी



पुन्हा निवडुन आल्याबददल श्री. किशोर वनवारी यांचे मी अभिनंदन करतो व आमचे श्री. नरेंदकुमार ठाकुर यांनाही मी हार्दीक शुभेच्छा देतो.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>महापौरजी, कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मी सभागृहास सूचना देवू इच्छितो कॉंग्रेस पक्षाचे मागील वर्षीचे आमचे जे गटनेते होते. पक्षाच्या वतीने पुन्हा एकदा त्यांना येणा-या वर्षासाठी गटनेता म्हणुन निवडले आहे. व आपणास ही विनंती आहे की, त्या निवडीस आपण सभागृहा समोर मान्यता दयावी. धन्यवाद.

<u>मा. महापौर:-</u>मान्यता देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मा. महापौरजी, सभेचे कामकाज सुरू होण्यापुर्वी मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, भारतीय जनता पार्टीच्या वतीने एक भव्य मोर्चा महापालिके समोर आणण्यांत आलेला आहे. कारण की पुर्ण शहरात पाण्याची समस्या आहे. या विषयाबाबत आयुक्तांनाही आमचे शिष्टमंडळ भेटले होते. मला वाटते की आपण प्रथम त्या विषयावर चर्चा करावी. व त्यानंतर सभेचे पुढील कामकाज चालु करावे. या शहरामध्ये पाण्याची जेवढी समस्या आहे मला वाटते पुर्ण महाराष्ट्रात ऐवढी पाण्याची समस्या कुठेच नसेल. व मोठमोठ्या वर्तमानपत्रामध्ये अशा बातम्या छापुन येतात की अमुक अमुक याठिकाणी आता नळाव्दारे पाणी येत आहे. अमुक एका ठिकाणी पाण्याची समस्या नाही. या विषयावर सभागृहात प्रथम चर्चा व्हावी असे मला वाटते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>लक्षवेधी सूचना जी आहे तीचे सूचक आहेत श्री. राज असरोंडकरजी...

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>पाण्याच्या विषयाचे काय झाले? त्यावर चर्चा होणार की नाही? आमची अशी विनंती आहे की प्रथम त्यावर चर्चा व्हावी.कारण की पुर्ण शहराची ही समस्या आहे.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>मा. महापौरजी, सर्वप्रथम मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांच्या एक वर्षाच्या कालावधीबाबत त्यांना शुभेच्छा देतो व जसे की विषय समित्त्यांच्या सभापतींचा एक वर्षाचा कार्यकाल समाप्त व्हावयास आला आहे त्यांना सुध्दा शुभेच्छा देतो. ते दोन तीन दिवसानंतर

आपला पदभार सोडतील जसा त्यांचा कार्यकाल पुर्ण होईल तसा. तर माझे वैयक्तिक मत असे आहे की, जसे की कल्याण मध्ये महापौर आणि उपमहापौर पदाचा कार्यकाल एक वर्षाचा असतो. आमचे महापौर पद अडीच वर्षासाठी आरक्षित आहे. अनुसूचित जातीच्या महिला प्रवर्गासाठी. उपमहापौर पद खुल्या संवर्गासाठी आहे. एक एक वर्षासाठी ही पदे ठेवली पाहिजेत असे मला वाटते. यामुळे काय होईल की, पाच सदस्यांना या पदावर काम करण्याची संधी मिळेल सेवा करण्याची संधी मिळेल. व दुस-यांना सुध्दा या पदावर काम करण्याची संधी मिळेल. आमच्या उपमहापौरांनी पुर्ण वर्षभरात खुपच चांगले काम केले आहे. मला असे वाटते की, त्यांनी सभागृहाचे मत लक्षात घेवून उपमहापौर पदाचा राजीनामा दयावा. व दुस-यांना संधी दयावी.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, शहरामध्ये पाण्याची समस्या आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u>पाणी प्रश्नावर आपण चर्चा करू शकता. परंतु अगोदर श्री. हरदास माखिजा यांना बोलु दया.



<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मा. महापौरजी व सन्माननिय सदन, माझे सहयोगी श्री. होशियारसिंग यांनी सभागृहामध्ये जी सूचना दिली त्याबाबत मला दुःख सुध्दा होत आहे व त्यावर हसु सुध्दा येत आहे. त्यांना हे माहित असले पाहिजे की महाराष्ट्र राज्य सरकारने महापौर व उपमहापौर पदाचा कालावधी एक वर्षाच्या ऐवजी वाढवून तो अडिच वर्षाचा केला आहे. त्यामध्ये हे सभागृह बदल करू शकत नाही. व जेव्हा आम्ही राष्ट्रवादी कॉग्रेस व कॉग्रेस आम्ही सत्ताधारी पक्षामध्ये बसलो आहोत. व मिळुन मिसळून या शहराचा कारभार चालवित आहोत. अशा परिस्थितीत अशा प्रकारची सूचना सभागृहात करणे हे कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेससाठी योग्य नाही. व जेव्हा कारभार योग्य पध्दतीने चालला आहे, मी सभागृहास आठवण करून देवू इच्छितो की मागील बॉडीमधील आमचा जो कारभार होता. त्यामध्ये कॉग्रेसचे महापौर बसलेले असायचे. व शिवसेनेचे उपमहापौर बसलेले असायचे तीन वर्षाच्या कार्यकालात कुणाला हे समजले नाही की श्री. हरदास माखिजा हे शिवसेनेचे आहेत की श्री. धनंजय बोडारे हे कॉग्रेसचे आहेत? ते कोणत्त्या पक्षाचे आहेत? अशाप्रकारचा कारभार या सभागृहामध्ये शहरामध्ये चालला होता. त्याचे हे एक उदाहरण नगरसेवक व नगरसेविकांनी घालुन दिले आहे. व आज अशी कोणती गोष्ट आली की आमच्या भगिनी श्रीमती. जया साधवानी या उपमहापौर आहेत. त्यांना राजीनामा देण्यासाठी आम्ही सूचना देत आहोत? अशी सूचना आमचे बंधु श्री. होशियारसिंग यांनी दिली आहे. नावाने तर ते बरेच हुशार आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>हा हरकतीचा मुददा आहे यावर चर्चा झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मला तर वाटले होते की, कोणती तरी चांगली सूचना करतील ज्यामुळे संपुर्ण सभागृह हुशार होईल.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. माखिजा साहेब.....

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मला बोलु दिले जावे. आपणासही बोलण्याची पुर्ण संधी दिली जाईल. अशा प्रकारची सूचना या सभागृहात मांडणे हे योग्य नाही. मी तर अशा प्रकारची सूचना देण्याच्याही विरोधात आहेही एक वेगळी

गोष्ट आहे की उपमहापौर राजीनामा देणार नाहीत. याबाबत त्यांच्यावर कुणी दबाव आणु शकत नाही. त्यांचा कालावधी अडीच वर्षाचा आहे. तो त्यांनी पुर्ण करावा. किंवा त्यावर त्यांनी अडीच दिवस रहावे ही त्यांची स्वइच्छा आहे. परंतु आम्ही त्यांना बोलु शकत नाही की आपण राजीनामा दया. अशा प्रकारची सूचना या महापालिकेचा कारभार चालविण्यास बाधा आणेल समस्या निर्माण करेल. विकास कामांच्या लोकांनी ज्या अपेक्षा ठेवलेल्या आहेत त्यांच्यावर पाणी फिरेल. महापालिका सभागृहात आम्ही अशाप्रकारे जर आपल्याच सदस्यांबाबत सूचना मांडल्या तर हे शहर विकासाकडे कसे वाटचाल करील? आमचे मा. आमदार व त्यांचा राष्ट्रवादी पक्ष ज्या पक्षाचे ऐवढया मोठया प्रमाणावर सदस्य निवडून आले आहेत. त्यांच्यामागे लोकांनी काहीतरी अपेक्षा तर ठेवल्या असतीलच ना? व त्या अपेक्षा केव्हा पुर्ण होतील जेव्हा आम्ही सर्वजण एकत्रपणे काम करू. व जोपर्यंत हातात हात मिळवुन या शहरामध्ये आम्ही चालणार नाही तोपर्यंत विकासाच्या कामांमध्ये अडचणी येतील. भविष्य काळाकडे पाहुन मी हे बोलत आहे. व माझ्या बंधु व भगिनींशी निवेदन करू इच्छितो की, मी आपल्या पक्षापेक्षा जास्त आपल्या सहयोगी पक्षाशी जास्त सन्मानाने व त्यांना उत्तेजन देवून काम केले आहे. तर अशाप्रकारे माझ्याच पक्षाच्या उपमहापौर किंवा महापौर यांच्याबाबत अशाप्रकारची सूचना आली तर मला जरूर दुःख होईल. असे होता कामा नये हे योग्य नाही. शहराचे भविष्य लक्षात घेतले तर, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस महाराष्ट्रात हातात हात मिळवुन चालु शकते. श्री. विलासराव देशमुख व श्री. छगन भुजबळ हे आपला तीन वर्षाचा कार्यकाल चांगल्याप्रकारे चालवु शकतात मा. सुशिलकुमार शिंदे व श्री. भुजबळ साहेब एकत्र बसु शकतात तर उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी व कॉंग्रेसला एकत्र बसण्यात काय अडचण आहे?



आम्ही तर पाण्यामधील एक छोटासा मासा आहोत. मोठ मोठे मगरमच्छ एकत्रित काम करतात. आम्हास काय अडचण आहे?

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>सर्वात प्रथम मगरमच्छ या शब्दावर मी हरकत घेतो. आमचे मा. नेता जे राज्यपातळीवर काम करतात आपण त्यांना मगरमच्छ म्हणता हा शब्द हरकत घेण्याजोगा आहे.

<u>मा. महापौरः-</u>एक मिनिट, श्री. हरदास माखिजा यांना बोलु दया.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>'ते आमच्या नेत्त्यांना मगरमच्छ कसे म्हणतात?

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>पाणी पाणी.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>पाण्याच्या समस्येवर....

<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-</u>श्री. हरदास माखिजा साहेब आपल्या अडीच वर्षाच्या कालावधीत पाण्याची समस्या का सुटली नाही? तर आता अडीच वर्ष बसुन हे लोक काय करणार आहेत?

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>यासाठी श्रीमती. ज्योती कालानी ज्या माझ्या भगिनी आहेत मी त्यांना अनेक वर्षापासुन भगिनी मानत आलो आहे. त्यांचा आदर आणि सत्त्कार करत आलो आहे. त्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षा आहेत. त्यांना माझे हात जोडुन निवेदन आहे त्यांनी आपल्या सदस्यास असे आदेश दयावेत जी सूचना त्यांनी दिली आहे ती त्यांनी मागे घ्यावी. हे शहरासाठी एक चांगले पाऊल असेल व त्याचे पुर्ण श्रेय श्रीमती. ज्योती कालानी व त्यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला जाईल असे मी येथे घोषित करीत आहे. मिळुन मिसळुन चालणे, खांदयास खांदा लावुन चालणे हे शहराच्या हिताचे आहे, आमच्या समाजाच्या हिताचे आहे. महापालिकेतील नोकरशाहीच्या हिताचे आहे असेही मी म्हणेन.

कर्मचा-यांच्या हिताचे आहे, जनतेच्या हिताचे आहे, आपल्या सर्वांच्या हिताचे आहे म्हणुन मी आमच्या भगिनी श्रीमती ज्योती कालानी यांना विनंती करतो की त्यांनी आपल्या सदस्यास आदेश दयावेत की त्यांनी जी सूचना दिली आहे ती त्यांनी मागे घेतली तर मी त्यांचा आभारी असेन. धन्यवाद.

<u>मा. महापौरः-</u>मी सर्व सभागृहास सांगु इच्छिते की, या पुर्वीसुध्दा पाच वर्ष मी आपल्या सोबत सभागृहात बसली आहे. आता सुध्दा मला आपल्या बरोबरच बसायचे आहे व राहायचे सुध्दा आहे. कारण की जेव्हा आमचे श्री. हरदास माखिजा साहेब महापौर झाले होते त्यावेळेस आमचे श्री. बोडारे साहेब उपमहापौर होते त्यांचा कार्यकाल सुध्दा अडीच वर्षाचा होता म्हणुन आता सुध्दा कार्यकाल अडीच वर्षाचाच राहिला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आमच्या मा. श्री. हरदास माखिजा यांनी श्री. होशियारसिंग यांनी दिलेल्या हरकतीच्या मुदयावरील सूचनेवरील श्री. होशियारसिंग यांच्या नावावर सुध्दा टिप्पणी केली. श्री. होशियारसिंग नाव आहे ते हुशार असतील असे काही ते बोलले अशा प्रकारे वैयक्तिक स्वरूपी चर्चा करणे योग्य नाही. थोडया वेळेपुर्वीच आमच्या सत्ताधारी पक्षातील एका सदस्यांनी ४० हजार, ५० हजारच्या गोष्टी केल्या. तर त्यावेळेस त्यांना अशा प्रकारची सूचना देणे हे सुध्दा जरूरीचे होते. आपण उदाहरण देता की, राज्यपातळीवर दोन्ही पक्ष एक होवून काम करत आहेत. तर सर्वात प्रथम सुरूवात आपल्याच कडुन होते. सत्तापक्षात आम्ही सुध्दा आहोत.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>आम्ही सत्ताधारी पक्षावर आरोप लावलेला नाही.



<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>तर कुणावर आरोप लावला होता.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>आपणांस समजलेच नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>तिच गोष्ट आहे ना? होशियारसिंग सुध्दा नासमज आहेत. मी सुध्दा नासमज आहे. आपणच... मला म्हणता की, बेकामयाब आहेत. तर अशी कशी सत्ता चालेल?

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>त्यांचा आरोप नोकरशाहीवर होता.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. सचिवजी, श्री. होशियारसिंग यांनी हरकतीचा मुददा उपस्थित केला आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>त्यांनी जो आरोप केला होता तो नोकरशाहीवर केला होता सत्ताधारी पक्षावर केला असता तर तो आमच्यावर सुध्दा झाला असता.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>नाही, म्हणतात सभापती अयशस्वी ठरला आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, आयुक्तजी, हा हरकतीचा मुददा कशाबाबतचा आहे?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>होशियारसिंग यांनी जो हरकतीचा मुददा मांडला आहे त्याबाबत सचिव साहेबांनी खुलासा करावा.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-उल्हासनगर शहर कॉंग्रेस अध्यक्षांनी आपल्यावर कोणतेही आरोप केलेले नाहीत. ना सत्ताधारी पक्षावर आरोप लावले आहेत. त्यांनी जे आरोप लावले आहेत ते नोकरशाही बददल कर्मचा-यांच्या विरूध्द आवाज उठविला आहे. व ज्याबाबत आयुक्तांनी सांगितले की मी चौकशी करेन.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-सन्माननिय सदस्य हो, मी महापालिका सचिवांना हे विचारू इच्छिते की, काय असा काही कायदा सरकारने पास केला आहे का की महापौर व उपमहापौर यांचा कालावधी अडीच अडीच वर्षाचा आहे. याबाबत मला सचिव साहेबांनी उत्तर दयावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-असा कायदा आहे की, महापौर व उपमहापौर पद जी व्यक्ती धारण करील त्या व्यक्तीचा अडीच वर्षाचा कार्यकाल असेल.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-असा काही स्पष्ट कायदा आहे काय?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-एकदम स्पष्ट कायदा आहे.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-ठिक आहे. स्पष्ट कायदा आहे तर मी आपणांस असे विचारते की, कल्याण महानगरपालिकेत महापौर, उपमहापौर पदाचा कार्यकाल एक वर्षाचा आहे हे कोणत्त्या कायदयानुसार आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कल्याण महानगरपालिकेत राजकीय पक्षांमध्ये राजकीय तडजोड केली जाते. उपमहापौर पदी जी व्यक्ती विराजमान होते ती एक वर्षानंतर राजीनामा देते. त्यांनतर ते पद भरावे लागते. ही एक राजकीय तडजोड आहे.



मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-कल्याण महानगरपालिकेत कोणत्त्याही एकाच पक्षाचे बहुमत नाही. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पुर्ण बहुमत आहे. त्यानंतरही महापौर पदासाठी अनुसूचित जातीचा आमच्याकडे उमेदवार नसल्यामुळे आर.पी. आय. च्या नगरसेविका आमच्या भगिनी श्रीमती. मालती करोतिया यांना महापौर पद ग्रहण करण्याची आम्ही अनुमती दिली. उपमहापौर पद हे खुल्या प्रवर्गासाठी असल्याने व आमचे पुर्ण बहुमत असल्याने दुस-या कुणाशी समजौता करण्याची आम्हास जरूरत नाही. आमच्या पक्षाकडे पुर्ण बहुमत असतानाही महापौर पदही त्याच पक्षाकडे आहे, उपमहापौर पदही त्याच पक्षाकडे आहे. तर मी हे निवेदन करेन की, आमच्याकडे पुर्ण बहुमत आहे. आमच्याकडें सुध्दा बरेचसे लोक आहेत. सर्वांचे म्हणणे आहे की, पाच वर्षाचा जो कालावधी आहे. जसे कल्याण महानगरपालिकेत आहे तसेच उल्हासनगर महानगरपालिकेत सुध्दा उपमहापौर पद एक-एक वर्षासाठी असले पाहिजे. सत्त्ताधारी पक्षामधील आमचे जे सहकारी आहेत त्यांना सुध्दा संधी दिली पाहिजे. त्यानुसार मी आमच्या उपमहापौरांना विनंती करेन की आपण आमच्या पक्षाच्या सदस्यांच्या भावनांचा विचार करून आपण आमच्या पक्षाला सुध्दा उपमहापौर पदाची संधी प्राप्त करून दयावी.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-जसे की आमचे सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांनी सांगितले की, कल्याण मध्ये याबाबत राजकीय पक्षामध्ये करार झाला होता. व येथे अशाकोणत्त्याही प्रकारचा राजकीय करार झालेला नाही. आपल्या श्री. होशियारसिंग यांनी निवेदन केले आहे. त्याबाबत मी श्रीमती. जया साधवानी ज्या आमच्या उपमहापौर आहेत त्यांना विचारू इच्छितो की, आपणांस त्यांचे निवेदन स्विकार्य आहे किंवा नाही. याचा खुलासा करा व हा मुददा संपवा.

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, श्रीमती. जया साधवानी यांच्या बाबतीत भारतीय जनता पार्टी व शिवसेनेच्या वतीने मी एक निवेदन मांडु इच्छितो की श्रीमती जया साधवानी कोणत्त्याही राजकीय पक्षाचा असोत, भलेही कॉंग्रेसच्या असोत, किंवा अन्य कोणत्त्याही पक्षाच्या असोत. त्यांनी एक वर्षाचा कालावधी पुर्ण केल्याबाबत मी त्यांच्या घरी जावून त्यांना पुष्पगुच्छ दिला परंतु त्यांनी तो स्विकारला नाही त्यांनी म्हंटले की, मी शहरासाठी काही कामे केली आहेत परंतु तरीही मी माझ्या एक वर्षाच्या कामकाजावर संतुष्ट नाही. त्यांच्या मनामध्ये शहरासाठी काम करण्याच्या ज्या भावना होत्त्या त्यांची मी कदर करून मी सुध्दा असे निवेदन करतो की, अडीच वर्षच नाही तर पुर्ण पाच वर्षासाठी त्या राहिल्या पाहिजेत. व ही गोष्ट सुध्दा चुकीची आहे की, श्रीमती. जया साधवानी यांनी उभे राहुन म्हणावे की मी पदावर कायम राहील तर ही आमच्यासाठी शरमेची व बुडून मरण्याची गोष्ट आहे. असे बोलण्यास सुध्दा त्यांना बाध्य करता कामा नये. ही आमच्यासाठी शरमेची गोष्ट आहे. त्या एक अशा हस्ती आहेत की ज्यांनी शहरासाठी खुपच कार्य केले आहे अशा व्यक्तींनी म्हणावे की, नाही मी राजीनामा देणार नाही. आम्ही त्यांच्याकडुन राजीनामा घेतलाच नाही पाहिजे.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>मी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने निवेदन करते की त्यांनी लवकरात लवकर राजीनामा दयावा. अन्यथा आम्ही अविश्वासाचा ठराव आणु. नैतिक मुदयावर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>सन्माननिय महापौरजी, सचिव साहेब, अशा प्रकारचा ठराव आणु शकतात का राजीनामा देण्यासाठी?*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>महापौर महोदया, महापौर व उपमहापौर पदाचा कार्यकाल अडीच वर्षाचा आहे याबाबत शंका नाही. आपण लोकांनी चांगले काम केले याबाबत पण शंका नाही. कॉंग्रेसशी आमची युती आहे व ही युती अखंडपणे चालु राहील याबाबत सुध्दा शंका नाही. जसे की, निवडणुकी पुर्वीच आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी बहीण जया साधवानी यांना आश्वासन दिले होते की उपमहापौर*



*पद आपणांस देवू त्यावेळी आम्हाला या गोष्टीचा अंदाज नव्हता की, महापौर पदाचा उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचा उमेदवार निवडुन येईल की नाही. वातावरण बदलले. कॉंग्रेस आमचा मित्र पक्ष आहे. कॉंग्रेसशी आमची युती आहे. यासाठी महापौर पद आम्ही कॉंग्रेसला देवूनही आमच्या पक्षाने आपले आश्वासन निभावले आहे. भगिनी जया साधवानी यांना उपमहापौर पदावर बसविले ऐवढेच नाही तर कॉंग्रेस पक्षाला एक सभापती पद सुध्दा दिले. व एक नामनिर्देशित सदस्याचे पद व स्थायी समितीवर एक सदस्याची उमेदवारी सुध्दा दिली. युति आम्ही बरोबर निभावली आहे. आम्ही कधीही असा आरोप लावू शकणार नाही की, आमच्या दोन्ही बहिणींबाबत आमची काही तक्रार आहे. आमची युती यापुढे सुध्दा चालु राहील, अतुट राहिल. महाराष्ट्रातच नाही तर पुर्ण देशभरात, अशा शुभेच्छा देवून या हरकतीच्या मुददयांचा विचार केला जावा अशी विनंती करतो.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>सचिव साहेब हे जे हरकतीच्या मुददयांचा उल्लेख करतात खरोखरच त्यांनी काही हरकतीचा मुददा दिला आहे का?*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>हरकतीचा मुददा आला आहे व त्यास मी अनुमोदन दिले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>त्याबाबतचे पत्र आम्हा कोणत्त्याही सदस्यांना वाटप केलेले नाही.*

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. होशियारसिंग यांनी जो हरकतीचा मुददा आणला आहे. उपमहापौर पदाचा राजीनामा, मागच्या वेळेसही मी बोललो होतो जेव्हा महापौरांविषयी अपशब्दाचा जो प्रकार झाला होता तेव्हासुध्दा मी बोललो होतो. कधीही सभागृहाचा मान ठेवणे हे सन्माननिय सदस्यांचे काम आहे. त्यादृष्टीकोनातुन सर्वात प्रथम तर हा मुददा याठिकाणी यावयास नको पाहिजे होता. आणि यायचा असता तर कॉंग्रेसचे महापौर आहेत कॉंग्रेसचे उपमहापौर आहेत. कॉंग्रेस पक्षाची युती आहे. कॉंग्रेस पक्षाने स्वतःहुन जर हा निर्ण घेतला असता की महापौर किंवा उपमहापौर पदाचा राजीनामा दयायचा आहे, चार माणसांना तेथे बसवायचे आहे कीवा नाही. हा मुददा त्या दोन्ही पक्षामध्ये निर्णायित काढावयास पाहिजे होता. तरीही आज श्री. होशियारसिंग यांनी जो मुददा आणलेला आहे. याबददल मी पहिल्यांदा सचिवांना सांगेन की यामध्ये कायदयाची बाजु काय काय आहे. भाभी श्रीमती. ज्योती कालानी या मघाशी बोलल्या, त्यांनी स्पष्टपणे सांगितले की उपमहापौर पदाचा एक वर्षाचा कालावधी आहे. हरकतीचा जो मुददा आहे. त्यामध्ये पुढे काय काय करणे शक्य आहे? याचा पण सचिवांनी खुलासा करायला पाहिजे. आणि जर मतदान घ्यायचे असेल. तर हा जो संदेश आपल्या शहरामध्ये जाणार आहे. युतीच्या उपमहापौर पदाचा राजीनामा युतीचेच लोक मागतात. हा जो संदेश शहरामध्ये जाणार आहे. तो संदेश टाळण्यासाठी मतदान होताच कामा नये. मतदान हे गुप्त व्हावयास पाहिजे. उघड मतदान होता कामा नये. जेणेकरुन त्याचा संदेश शहरामध्ये चुकीचा जाता कामा नये. आणि सचिवांनी सुध्दा याचा रितसर खुलासा केला पाहिजे. धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- हरकतीचा मुददा काय असतो? सभेमध्ये जेव्हा कामकाज चालते. त्या कामाकाजाबाबत जर काही हरकत असेल तर हरकतीचा मुददा उपस्थित केला जातो. त्यावर मा. महापौर निर्णय देतात. हा जो आपला प्रस्ताव आहे तो मुळ प्रस्ताव आहे. हा हरकतीचा मुददा होऊ शकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:- सचिव साहेब , वारंवार आपणांस आठवण करुन देऊ इच्छितो की, आपण या सभागृहाचे सचिव आहात, या महापालिकेचे सचिव आहात. सभागृहाचे कामकाज योग्य प्रकारे चालविणे महापौरांच्या एवढे आपले सुध्दा कर्तव्य आहे. तेवढीच जबाबदारी आहे. येथे जी एवढी चर्चा झाली, कमीत कमी अर्ध्या तासाची वेळ त्यात गेली. व ही पूर्ण चर्चा झाल्यानंतर आपण म्हणता



की, हरकतीचा मुददा अशा प्रकारे आणता येत नाही. हे आपण अगोदरच का सांगितले नाही?

मा. सचिव (श्री. प्रकाश पं. कुकरेजा):- मी स्वतःहून कधी बोलु शकतो का? जोपर्यंत विचारले जाऊ शकत नाही.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे:- आपण सचिव आहात.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:- सचिव साहेब, एक सेकंद, मी बोडारे साहेबांना सांगु इच्छितो की, श्री. होशियार सिंग यांनी जी सूचना दिली आहे, तो मुददा हरकतीचा मुददा होऊ शकत नाही. तर त्याबाबत ते बोलतील कसे? ते सर्व साधारणपणे मार्गदर्शन करु शकतात.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:- त्या सदस्यास सांगावयास पाहिजे होते की, हा मुददा हरकतीचा मुददा होऊ शकत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश प. कुकरेजा):- मी आपणांस काय सांगितले की, हा मुळ प्रस्ताव आहे. हरकतीचा मुददा नाही. हरकतीच्या मुददयाद्वारे हे ठरविले जाऊ शकत नाही. मी आपणांस पहिल्या सुचनेद्वारे सांगितले होते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- ही जी चर्चा झाली आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश प. कुकरेजा):-आपण आपल्या स्वइच्छेने चर्चा पुढे नेली. हरकतीचा मुददयान्वये याबाबत निर्णय घेता येवू शकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-म्हणजे ही चर्चा अर्धी रात्रभर चालली असती तरी त्यामध्ये आपण हस्तक्षेप केला नसता? महापालिका सचिव या नात्याने व महापौर या नात्याने ...जी नियमबाहय चर्चा चालु आहे त्याबाबत काहीही बंधन नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-सचिव साहेब, ही जी चर्चा झाली आहे ती इतिवृत्तांतातुन वगळली जावी.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-बाहेर लोक मोर्चा घेवून आले आहेत. पाण्यासाठी लोक त्रस्त झाले आहेत. आणि येथे बिनकामाची चर्चा चालु आहे. याचा अर्थ काय?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. महापौरजी, जो मुददा हरकतीचा मुददा होवू शकत नाही. त्यावर जी पण चर्चा या सभागृहात झाली त्याबाबत मी मा. महापौरांना विनंती करतो की, सर्व चर्चा इतिववृत्तांतुन वगळण्यात यावी.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-माझी त्यास हरकत आहे. मी नैतिक मुल्यांवर आधारित असा शब्द वापरला होता तो सन्मानानिय सदस्यांनी ऐकलेला दिसत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. महापौरजी, आपण आपला निर्णय देवू शकता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, उपमहापौरांबाबत ब-याच वेळे पासुन चर्चा झालेली आहे. आता पर्यंत सचिव साहेबांनी त्याबाबत पुर्णपणे खुलासा केलेला नाही. तर त्यांना जरा खुलासा करू दया. त्यानंतर आमच्या दोन सदस्यांनी जसे म्हंटले की ही चर्चा इतिवृत्तांतात ठेवली पाहिजे कींवा नाही हे सभागृहाचे मतानुसार होईल. तर मेहरबानी करून सचिव साहेब जे सांगत होते ते पुर्णपणे त्यांनी अदयाप सांगितलेले नाही. तरी कृपया हे कसे होवू शकते ते त्यांना सांगु दिले गेले नाही. तर सचिव साहेब त्याचा जरा खुलासा करा.



मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-म्हणजे सचिव साहेब, थोडक्यात उपमहापौरांना पदावरून उतरविण्यासाठी यांनी हरकतीचा मुददा आणला होता तो बरोबर नाही. तर त्यासाठी पर्यायी व्यवस्था काय आहे? हे ते विचारू इच्छितात. ते सांगा.

मा. सचिव (श्री. प्रकाश प. कुकरेजा):-मी एखादया काल्पनिक प्रश्नाचे उत्तर कसे देवू शकतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-बोडारे साहेब आपण फिरवून फिरवून बोलु नका मी रस्ता विचारलेला नाही, ते जे खुलासा करत होते तो अर्धवट राहिला होता. तो मुददा स्पष्ट व्हावयास पाहिजे होता. मी हे नाही म्हंटले की रस्ता सांगा.

मा. सचिव (श्री. प्रकाश प. कुकरेजा):-पहिली गोष्ट ही आहे की, जेव्हा पण कुणी एखादा सदस्य उभा राहुन आपले विचार मांडु इच्छितो त्याने मा. महापौरांची परवानगी घेतल्या नंतरच आपले विचार मांडता येतात. व जितक्या पण

सन्माननिय सदस्यांनी येथे चर्चेमध्ये भाग घेतला तर मा. महापौरांनी त्यांना मनाई केली नाही. म्हणजेच त्यांची परवानगी होती. तर त्यामध्ये मी येवू शकत नाही. यागोष्टीमध्ये हस्तक्षेप करणे हे माझे कार्यक्षेत्र नाही. कारण सभेच्या कामकाजावर किंवा चर्चेवर नियंत्रण ठेवणे हे मा. महापौरांच्या अधिकारात आहे. दुसरे असे की जी लक्षवेधी आहे......

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>पाण्याच्या विषयाचे काय झाले?
<u>मा. सचिव (श्री. प्रकाश प. कुकरेजा):-</u>सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी जो पाण्याचा विषय आणला आहे. त्यांना वाटते की, बाकीचे कामकाज सोडुन याविषयावर चर्चा केली जावी. सभेच्या कामकाजाच्या नियमानुसार जसे की आपण वांरवार म्हणता की मी सूचना देणे जरूरीचे आहे. त्यानुसार मी सूचना देत आहे की, जर त्यांना वाटत असेल की या विषयावर चर्चा झाली पाहिजे तर त्यांनी सभेपुर्वी दोन तास अगोदर प्रस्ताव दयावयास पाहिजे होता. व तो दोन तृतीयांश बहुमताने स्विकारला जातो. जर हे कामकाज सोडुन या विषयावर आलो तर ते सुध्दा कायदयाच्या विरोधात होईल म्हणुन आपणच निर्णय घ्या काय करायचे आहे ते?

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी,शहरामध्ये पाण्याची भिषण टंचाई निर्माण झालेली आहे. पुर्ण शहरातील जनता त्रस्त आहे. तर ही समस्या का निर्माण झाली व यावर मार्ग काढणे कुणाचे काम आहे? हे सर्वात महत्त्वाचे काम आहे त्यावर चर्चा केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आम्ही आपणांस आधीच सांगितले होते की आमचा मोर्चा येणार आहे. जे सर्वांना माहित आहे. ही ज्वलंत समस्या आहे.

<u>मा. महापौरः-</u>मी सगळयांचे ऐकले आहे, उपमहापौरांबाबत जी चर्चा चालु आहे ती योग्य नाही. ही चर्चा इतिवृत्तांतून वगळली जावी. योग्य प्रकारची गोष्ट ती असते जी आमच्या ऐकण्यात येते, जे आमच्या ऐकण्यांत आलेले नाही कारण की आम्हाला काय माहित कुणाला पदावरून उतरवायचे आहे आणि कुणाला बसवायचे आहे. तर ती चर्चा इतिवृत्तांतातुन वगळण्यांत यावी.
<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>ही चर्चा इतिवृत्तांतातुन बिल्कुल वगळली जाणार नाही. ही काही अनुचित गोष्ट नव्हती. आमची सूचना होती.
यावेळी काही सन्माननिय सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सचिव साहेबांनी उत्तर दयावे. असा काही नियम आहे का की बोललेली वाक्ये इतिवृत्तांतातुन वगळता येतात?



<u>मा. महापौरः-</u>आम्हाला अदयाप कोणत्त्याही गोष्टीची माहिती नाही तर आम्ही कसे बोलणार की, उपमहापौरांनी राजीनामा दयायचा की काय? मी नाही बोलु शकत.. ..

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>इतिवृत्तांतातून ती चर्चा वगळण्याची जरूरी काय आहे? आम्ही लोकांनी आमची मागणी केली आहे चर्चा इतिवृत्तांतातून वगळण्याची जरूरी का आहे आपण ती वगळु शकता का?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>कोणत्त्याही प्रकारची शिवीगाळी केलेली नाही. एक चांगला प्रस्ताव होता. यामध्ये कोणत्त्याही चुकीच्या शब्दाचा वापर केलेला नाही. चर्चा वगळण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सदस्य सत्ताधारी पक्षात आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. महापौरजी, मा. ज्योती भाभी, श्री. किशोर वनवारी सभागृह नेता व सभेतील सर्व सदस्य एका छोटयाशा गोष्टीसाठी सभागृहातील सर्व सदस्य आपसामध्ये भांडत आहेत. चर्चा इतिवृत्तांतातून वगळावी किंवा न वगळावी तसेच या हरकतीच्या मुददयावर मतदान घेणे उचित नाही. ही काही फार मोठी गोष्ट नाही. जर कोणताही असा प्रकारचा प्रस्ताव आणायचा असेल तर वेगळया पध्दतीने आणला जाऊ शकतो. ज्याबाबत हरकतीचा मुददा आणला जाऊ शकत नाही तो आणला गेला आहे. म्हणून त्यावर चर्चा करणे योग्य नव्हते.म्हणून ही चर्चा इतिवृत्तातातून वगळणे जरुरीचे आहे. हरकतीचा मुददा तो होतो सभागृहात / शहरात जे चुकीचे कामकाज चालु आहे, त्यावर हरकतीचा मुददा मांडता येऊ शकतो. हा हरकतीचा मुददा नाही. यावर चुकीची चर्चा झाली आहे म्हणून ती इतिवृत्तांतातून वगळणे आवश्यक आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्री. जमनुजी आपण निर्णय देत आहात की, सूचना देत आहात?*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>माझी सूचना आहे, बाकी आपणांस जसे करावयाचे आहे तसे आपण करु शकतो.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:-</u>कायद्यानुसार काय आहे? जी काही चर्चा झाली आहे, ती मा. महापौरांच्या परवानगीने झाली आहे ना?*

*<u>मा. उप-महापौर(श्रीमती जया साधवानी):-</u>किशोरजी , मी मा. महापौरांना निवेदन केले आहे की, ही सर्व चर्चा आपण इतिवृत्तांतात ठेवू शकता. त्याबाबत माझी काही हरकत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. यादव लालबिहारी:-</u>मा. महापौरजी , पूर्ण शहरामध्ये पाण्याची समस्या आहे, याबाबत बाहेर मोर्चा आणण्यात आलेला आहे. पूर्ण शहरात पाण्याची समस्या आहे, त्याबाबत सभागृहात चर्चा झाली पाहिजे. प्रत्येक प्रभाग असे आहे की, जेथे पाणी पुरवठा होत नाही. म्हणून येथे पाण्याविषयी चर्चा झाली पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-</u>मा. महापौरजी , मा. आयुक्त साहेब, उल्हासनगर शहरासाठी पाण्याचा जो कोटा आहे, तो ११२ एम.एल.डी.चा आहे. व मागील आठ-दहा दिवसामध्ये उल्हासनगर मध्ये किती पाणी आले आहे (पाणी पुरवठा झाला आहे). याची सभागृहास माहिती दिली जावी.*

*______मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी व मा. सदस्य श्री. मोहन साधवानी, श्री. मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर पडले.*



*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त, व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य जसे की, मागील सभेमध्ये एक पत्र वाटप केले होते शहरामध्ये पाण्याची जी कपात करण्यात येणार आहे, त्याबाबत त्यानुसार शुक्रवारी पूर्ण दिवस पाणी येणार नाही. व इतर दिवशी सुध्दा १०ते १५ टक्के पाण्याची कपात असते. पहिले प्रत्येक दिवशी १० टक्के पाणी कपात केली जात होती. शुक्रवारी पूर्ण दिवस पाणी बंद , त्याचबरोबर प्रत्येक दिवशी १० ते १५ टक्के पाण्याची कपात, शुक्रवारी पूर्ण दिवस पाणी बंद असल्याने शनिवारी इमारती व घरांमध्ये पाणी बिल्कुल नसते. जोपर्यंत टाक्यांमध्ये पाणी साठविलेले असते. तोपर्यंत लोक इमारतींमधुन खाली उतरून पाणी भरतात. टाकी मध्ये पाण्याचा साठा होत नसल्याने शनिवारी पाण्याची समस्या निर्माण होते.*

रविवारी लाईट बंद असते त्यामुळे पाणी टाकीमध्ये येवू शकत नाही. म्हणजे फक्त चार दिवस पाणी तेही अतिशय कमी शहरास मिळते. व ब-याच विभागात जसे की, गोल मैदान, ४ नंबर, ३ नंबर व ५ नंबर कॅम्प मधील काही भाग ज्याबाबात लेखी स्वरूपी आम्ही आयुक्त साहेबांना पत्र दिले आहे. याठिकाणी अजिबात पाणी नसते. तर मी निवेदन करेन की, हे जे वॉलमेन आहेत किंवा पाण्याची जी समस्या आहे तिचे निवारण कसे कराल. तांत्रिक पध्दतीने, तसेच शुक्रवारी जे पाणी बंद असते ही प्रथा बंद केली जावी. जसे नेहमी होत होते १० टक्के जी पाणी कपात होत होती ती रोज होत होती. शुक्रवारी पाणी बंद ठेवल्यामुळे ज्या विभागात पाण्याची समस्या नव्हती तेथे सुध्दा पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. यासाठी आमचे आयुक्त व पाणी पुरवठा विभागाचे जे अभियंते आहेत. त्यांनी यावर जर विचार केला तर, शुक्रवारी पाणी पुरवठा बदं असल्यामुळे ज्या विभागात पाणी येत होते त्त्या विभागात सुध्दा पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. तर कृपया शुक्रवारी पाणी पुरवठा बंद ठेवू नये व वॉल्चमेन जे आहेत त्यांच्यावर लक्ष दिले जावे. व जेथे अजिबात पाणी येत नाही अशा विभागात जलवाहिन्या टाकण्याचे काम हाती घेण्यात यावे. व जी टॅंकरची प्रथा आहे. आज आम्ही कमीत कमी दोन कोटी रू. टॅंकरच्या वाहतुकीवर खर्च करत आहोत. पाणी आमचेच आहे आमच्या शहराचे पाणी टॅंकरव्दारे घरोघरी पोहचविले जाते. ज्यावर दोन कोटी रू. खर्च होतात. जर आम्ही हे पाणी जलवाहिन्यांमध्ये सोडले व दोन कोटी रूपयाचे आणखी पाणी खरेदी केले, टॅंकर वाहतुक खर्चाकामीच्या दोन कोटी रूपयाचे पाणी व हे पाणी जलवाहिन्यांमध्ये सोडले तर मला वाटते की पाण्याची समस्या पुर्णपणे सुटेल. तर कृपया जे तांत्रिक ज्ञान असलेले लोक आहेत त्यांनी या विषयावर चर्चा केली तर , सूचना दिल्या तर शहराची पाण्याची समस्या सुटू शकेल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा</u>:-मा. महापौरजी ,व सन्माननिय सदन एक जुना पिक्चर आहे. त्यामध्ये एक गाणे आहे, मा. महापौरजी , जरा लक्ष दया.

<u>मा. सदस्य श्री. यादव लालबिहारी</u>:-गाणे नको पाणी पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा</u>:-पाणी नाही म्हणून गाणे गात आहे, एक जुना हिंदी सिनेमा आहे. मनोजकुमार यांचा, त्यामध्ये एक गाणे आहे. 'पाणी रे पाणी तेरा रंग कैसा, जिसमे मिलाओ उस जैसा' परंतु दुर्भाग्याने उल्हासनगरमधील पाण्याच्या समस्येस हे गाणे लागू होत नाही. पुर्ण विश्वास लागु होवू शकते. परंतु या शहराची पाण्याची जी समस्या आहे त्यास हे गाणे लागु नाही. त्याचे मी कारण सांगु इच्छितो एक तर हे कारण आहे की पाणी येतच नाही. लोकांना माहीत नाही पाणी काय असते? हे कोणत्त्या वस्तुचे नाव आहे? दुसरे, एखादया विभागात जर पाणी येत असेल तर त्यास ऐवढा घाणेरडा वास येतो व त्याचा रंग असा काही असतो की, कुणाला वाटावे की हे काही केमिकल तर नळाव्दारे येत नाही ना? तर कुणाला असे वाटते की, दुसरा असा काही द्रव आहे तो तर आमच्या नळाव्दारे आला नाही. ज्यास घाणेरडा वास सुध्दा आहे व ते हातावर घेतल्यावर असे नाही वाटत की हे पाणी आहे. अशा पाण्याने आपण स्नान करू शकत नाही. ज्याने आपण आपले कपडे



धुवू शकत नाही. ज्यास आपण पिवू शकत नाही. ही उल्हासनगरमधील पाणी पुरवठयाची स्थिती आहे. मी आयुक्त साहेब, श्री. सोनवणे साहेबांना आठवण करून देवू इच्छितो जेव्हा त्यांनी अतिरिक्त आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला होता तेव्हा त्यांचे अभिनंदन करताना मी म्हंटले होते की, आयुक्त साहेब आम्ही आपणांकडुन फार मोठया अपेक्षा ठेवल्या आहेत व आपण टाईम्स ऑफ इंडियाला जी मुलाखत दिली आहे. त्यामुळे आमच्या अपेक्षा आणखी वाढल्या आहेत. व असे वाटते की, एक सक्षम असा अधिकारी या शहरास मिळाला आहे. या शहराच्या ज्या काही समस्या आहेत त्यांचे ते निवारण करतील परंतु दुर्भाग्याने मला बोलावे

लागत आहे की,आपल्या शहराच्या आमदारांबरोबर मी, आयुक्त साहेब व इतर अधिकारीगण आम्ही महाराष्ट्र शासनाचे जेवढे काही मंत्रीमहोदय आहेत, मुख्यमंत्री महोदयांपासुन उदयोगमंत्री श्री. पतंगराव कदम यांचे बरोबर बैठका केल्या आहेत. या शहराचा १०२ एम.एल.डी. चा जो पाण्याचा कोटा होता. त्यामध्ये आमदारांच्या सांगण्यानुसार १० एम.एल.डी. आणखी वाढ करण्यात आली. की जेणेकरून शहरामध्ये पाणी पुरवठा योग्य प्रमाणात व्हावा. जी तुट आहे ती भरून काढली जाईल. त्या नंतरही जर पाण्याची समस्या शहराच्या प्रत्येक विभागात जाणवत असेल तर त्यानुसार हे सिध्द होते की या शहरातील वितरण व्यवस्था निकामी झाली आहे. ती सुधारणे हे आमचे कर्तव्य आहे. कारण की ११२ एम.एल.डी. पाणी या शहराच्या जनतेसाठी या शहरास पुरविले जाते. तर ते पाणी जाते कुठे? भुत प्रेत पित तर नाहीत? असे कधी कधी होते.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-</u>टॅंकर नको आहेत. बिल्कुल नको आहेत. टॅंकरचे पाणी कारखाने व हॉटेलवाल्यांना विकले जाते.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>दहा टॅंकर पाण्याचे ठेवले तरी ते केव्हा पिऊन जातील ते कळुन येणार नाही. तर या शहरात असे तर काही होत नाही? ही जी गोष्ट आहे ती गंभीरपणे विचार करण्याची गोष्ट आहे. शहराच्या प्रत्येक विभागातील प्रत्येक नागरिक पाण्याबाबत ओरड करत आहे व त्रस्त आहे. मी माझ्याच सोसायटीचे उदाहरण देतो. ज्या सोसायटीमध्ये मी रहातो त्या सोसायटीमध्ये कधीही पाण्याचा टॅंकर येत नव्हता. आज दिवसाला तीन टॅंकर मागवावे लागतात. सोसायटीच्या खर्चाने, महानगरपालिकेकडुन आम्ही कधीही टॅंकर मागविले नाही. पाण्याच्या टॅंकरचे पैसे भरण्याची सोसायटीची क्षमता नाही. सोसायटीच्या खर्चाने जेव्हा तीन टॅंकर पाण्याचे येतात तेव्हा कुठे आम्ही स्नान करून घरातुन बाहेर पडतो. व ही स्थिती केवळ आमचीच नाही तर पुर्ण शहराची आहे. अशा काही सोसायटीज आहेत ज्यांना पाण्याच्या टॅंकरचे पैसे भरण्याची क्षमता नाही. व महानगरपालिकेकडुन त्यांना पाण्याचे टॅंकर मिळत नाहीत. असे दोन तीन प्रसंग आले होते त्याबाबात मी आयुक्त साहेबांना पत्र लिहिले आहे. की सोसायटीची पाण्याच्या टॅंकरचे पैसे भरण्याची क्षमता नाही जोपर्यंत याविभागातील पाण्याची समस्या सुटत नाही तोपर्यंत येथील लोकांना टॅंकर व्दारे पाणी पुरवठा केला जावा. आयुक्त साहेबांनी त्यावर तात्काळ कार्यकारी अभियंत्यांना निर्देश दिले की जोपर्यंत त्या विभागातील पाण्याची समस्या सुटत नाही तोपर्यंत या सोसायटीसाठी दररोज एक टॅंकर पुरविला जावा. परंतु त्यांच्या आदेशाची पुर्तता होत नाही. हा माझा पाणी पुरवठा विभागावर आरोप आहे. या महापालिकेत आयुक्तांच्या आदेशाची जर पुर्तता होणार नसेल तर कुणाच्या आदेशाची पुर्तता होईल? निकम नावाचा इसम, कॅम्प ३ मध्ये जेथे पाण्याचे टॅंकर भरले जातात. ते आयुक्तांपेक्षा वरीष्ठ आहेत? ते म्हणतात आयुक्त कोण होतात. माजी महापौर कोण होतात?उपमहापौर कोण होतात? मीच वरीष्ठ आहे. मला जसे वाटेल तसे मी करेन.माझ्या मनाप्रमाणे ज्यांना वाटेल त्यांना मी टॅंकर देईन. इतरांना देणार नाही. टॅंकर घेण्यासाठी जे लोकप्रतिनिधी जातात त्यांना तेथील लोकांना कुणालाा पन्नास रूपये तर कुणाला दारूची बाटली दयावी लागते. कुणाला १०० तर कुणाला १५० रू. दयावे लागतात. तेव्हा कुठे टॅंकरव्दारे पाणी मिळते. ही महापालिकेची स्थिती आहे. मला अत्यंत दुःखाने म्हणावे लागत आहे की, आज जो भाजपाच्या वतीने मोर्चा आला आहे. मी कोणत्त्याही राजकीय पक्षात हस्तक्षेप करत नाही. परंतु ज्या शहराच्या ज्वलंत समस्या आहेत. त्या प्रत्येक पक्षाच्या सदस्यांनी



एकत्र येवून सोडविल्या पाहिजेत. जर भाजपा मोर्चा आणत असेल, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस , शिवसेना मोर्चा आणत असेल जर तो शहराचा मुददा असेल तर त्यासाठी आम्ही एक होवून लढु. कारण की पाणी हा या शहराची ज्वलंत समस्या आहे. ऐवढेच नाही तर शहरातील ऐवढया पाण्याच्या समस्येनंतरही मी मागील महासभांमध्ये जेव्हा श्री. सोनवणे साहेबांनी कार्यभार स्विकारलेला नव्हता.

श्री. पोखरकर साहेब जेव्हा इथे होते, श्री. दत्ता भडकवाड साहेब होते. मी डबल बिलींग बाबत महासभेमध्ये मुददा उपस्थित केला होता. पाण्याची डबल बिले लोकांना कशी पाठविली जात आहेत? एक बिल जात आहे फ्लॅट व दुकानाच्या हिशोबाने. दुसरे बिल, जे जुनी नळ जोडणी होती, इमारत तयार होण्या अगोदर, दहा वर्षापुर्वी इमारत तयार झाली परंतु जुने बिल अजुन सुध्दा लोकांना पाठविली जात आहेत. ऐवढेच नाही तर टॅक्स बाबत सुध्दा असेच डबल बिलींग चालु आहे. त्याबाबत सुध्दा मी महासभेत मुददा उपस्थित केला होता जुन्या ज्या मिळकती होत्त्या त्या विकसित करून त्याठिकाणी बहुमजली इमारती उभ्या राहील्या आहेत. त्यांच्या दुकानांना, फ्लॅटना बिले पाठविली जातात. व जुन्या मिळकतींची सुध्दा बिले चालु आहेत. हे सर्व बंद झाले पाहिजे आयुक्तांनी सभागृहात असे आश्वासन दिले पाहिजे की मी यासाठी काही तरी करेन. मी चौकशी केल्या नंतर मला असे सांगण्यात आले होते की डबल बिलाची पध्दत मी संपुष्ठात आणली आहे. पाणी व मिळकत कराचे डबल बिल पाठविले जाणार नाही. परंतु आजपर्यंत डबल बिले सलगपणे चालु आहेत. आज सुध्दा आपण सर्वसामान्य लोकांच्या तक्रारी पाहिल्या तर असे आढळुन येईल की, लोक भटकत आहेत. या नगरसेवकाकडुन त्या नगरसेवकाकडे, श्री. बोडारे, श्री. जमनु पुरस्वानी, श्री. बच्चाराम, श्री. लाल पंजाबी यांच्याकडे जावून सांगतील की शहरामध्ये आमची ही हालत आहे. हे सर्व संपुष्ठात आले पाहिजे. जेव्हा आम्हाला आश्वासन मिळाले होते व आयुक्तांनी स्वतः सांगितले होते. व स्थायी समितीमध्ये याबाबतचे प्रस्ताव पारीत झाले आहेत. त्यानंतरही त्यांची कार्यवाही का केली जात नाही? हे सर्व विचार करण्यासारखे आहे. शहरातील कारभार जर व्यवस्थित चालवायचा असेल तर ही सर्व कामे आपणांस लक्षात घ्यावी लागतील, श्री. सोनवणे साहेब. आपणाांस शहरवासियांना परिणाम दाखवुन दयावा लागेल. आम्ही सर्वजण आपल्या बरोबर आहोत. आमचा आपणास पाठिंबा आहे. त्यांनतरही जर आपले जे कनिष्ठ अधिकारी आहेत ते जर आपणासं अयशस्वि करण्यामागे लागले असतील तर आपणास त्यांची दखल घ्यावी लागेल. व बाकी सर्व आम्ही बघुन घेवू आम्ही आपल्या बरोबर आहोत. पाण्याची समस्या दुर करण्यासाठी जोपर्यंत शहरातील साठवणुक टाक्या तयार होतात. जोपर्यंत वितरण व्यवस्था पुर्व पदावर येत नाही. तोपर्यंत अशी काही व्यवस्था आपण तयार करा. जी आपल्या हातात असेल. पाण्याचा कोटा सुध्दा आपल्याकडे पुरेसा आहे. आज मार्च, एप्रिल महिन्यामध्ये ही स्थिती आहे. तर मे, जुन मध्ये पावसाळया पर्यंत या शहराची स्थिती काय असेल? त्याबाबत आपण जरा विचार करा. येणारे जे दुःखदायक दिवस येण्याअगोदर त्याबाबत काय व्यवस्था केली आहे. आणखी एक गोष्ट मी आपल्या लक्षात आणुन देवू इच्छितो की टॅक्सचा मुददा उपस्थित केला होता. ३१ मार्चच्या अगोदर या शहरामध्ये मिळकत कराच्या वसुलीची जी मोहीम चालु होती त्या वसुलीच्या दरम्यान शहरातील जे काही शिक्षीत नागरिक होते जे उपायुक्त, सहाय्यक आयुक्त या पदावर किंवा शासनाच्या वेगवेगळया विभागातील वरीष्ठ पदांवर आहेत. त्यांनी आपल्या टिव्हीवर केबल वर पाहिले होते की या शहरातील मिळकतकर वसुलीचे काम करणारे जे कर्मचारी आहेत ते कर वसुली करण्यासाठी जेव्हा कुणाच्या घरी जातात. तेव्हा ते त्यांचेकडील कर वसुली कसे करतात. हे रात्री टीव्हीवर थेट प्रक्षेपण करून दाखवितात. हे कोणत्त्या कायदयामध्ये आहे. मला नाही असे वाटत की महापालिकेच्या कुठल्या कायदयामध्ये असे आहे की, अशाप्रकारे कर वसुली आपण करा व त्या कुटूंबियांना अपमानित सुध्दा करा. हे सर्व थांबले पाहिजे. शहरवासियांची पिळवणुक आहे ती बंद झाली पाहिजे. शहरवासियांच्या हितासाठी ती तावडतोब बंद केली पाहिजे. नोकरशाहीच्या हीतासाठी. ही जी गोष्ट आहे ती कायदयाच्या विरूध्द असेल तर सचिव साहेब मी आपणांकडुन जाणुन घेवू इच्छितो हे कायदेशिर आहे की बेकायदेशिर. या सर्व गोष्टी आपण लक्षात घ्यायच्या आहेत. व शहरातील पाण्याच्या

समस्येस अग्रक्रम दिला पाहिजे. सभागृहाच्या मताकडे लक्ष दिले पाहिजे. अग्रक्रम देवून पाण्याची समस्या दूर करत असाल तर शहरवासी आपणांस आर्शिवाद देतील.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:</u>-महापौरजी, पाण्याच्या समस्येबाबत श्री. माखिजा साहेबांनी सांगितले की आमच्या शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे. मागील महासभेत सुध्दा मी प्रश्न विचारला होता की, महानगरपालिका एमआयडीसी ला वेळेवर बिलाची रक्कम देते कींवा नाही? इथे सांगितले गेले की, आपली महापालिका एमआयडीसी. ला जेवढी देयक रक्कम देय आहे तेवढी देते. त्याशिवाय सुध्दा एमआयडीसी आपल्यावर अन्याय का करते? दुसरी गोष्ट आमच्या माखिजा साहेबांनी हे सुध्दा सांगितले की आमचे आमदार, महापौर व आयुक्त साहेबांनी दिवसरात्र मेहनत केल्यानंतरही शहरात पाण्याची समस्या जाणवत आहे. त्याचे कारण काय आहे. याचा खोलवर विचार केला पाहिजे. आमचे पाणी पुरवठा समितीचे जे सभापती आहेत त्यांनी याबाबत सखोल अभ्यास केला आहे. हे पहा टॅकर बाबत सुध्दा बोलणार आहे. पुर्ण सभागृह सहमत असेल तर आम्ही सुध्दा टॅकर बंद करू इच्छितो. याबाबत ठराव करा.

यावेळी काही सदस्य टॅकर बंद केले पाहिजे, टॅकर बंद केले पाहिजे असे जोरजोरात ओरडत होते.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:</u>-पुर्ण सभागृह टॅकर बंद केले पाहिजे या मताशी सहमत असेल तर टॅकर बंद करण्यास काही अडचणीचे नाही. दुसरी गोष्ट अशी की एमआयडीसी. चे कार्यकारी अभियंता आहे श्री. नागे साहेब म्हणुन ते नागे आहेत की नाग आहेत? मी सभागृहास ही विंनती करतो की, श्री. नागे यांच्या विरोधात एक ठराव पारीत केला जावा. आमचे जे सभापती आहेत त्यांचे म्हणणे आहे की, श्री. नागे जाणीव पुर्वक आमच्या शहरास पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करत नाहीत. व जाणीवपुर्वक वॉल बंद करतो. व बरोबर पाणी पुरवठा करण्यास अडचण निर्माण करतो. आयुक्त साहेब या मताशी आपण सहमत आहात की नाही याचे उत्तर नंतर दयाल काय? एमआयडीसी. जी एक रक्कम घेवून सुध्दा एमआय. डी. सी. आम्हाला बरोबर पाणी पुरवठा करत नाही. त्यासाठी आपण काय विचार केला आहे. याचा खुलासा केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:</u>-महापौर महोदया, मारवीजा साहेबांनी सांगितले की पाण्याला रंग नसतो परंतु उल्हासनगर मध्ये पाण्याला रंग आहे. आहे उल्हासनगर मध्ये पाण्याला रंग आहे. श्री. मारवीजा साहेब म्हणतात की आम्ही सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष असा फरक करत नाही. परंतु जेव्हा महापौर व उपमहापौर यांच्या राजीनाम्याची गोष्ट आली त्यावेळेला त्यांनी युतीची गोष्ट केली. की आमची युती चांगली आहे, परंतु या पाण्याच्या प्रश्नावर मोर्चा आल्यानंतर प्रथम चर्चा व्हावयास पाहिजे होती. त्यानंतरही उपमहापौर पदाचा अंतर्गत मुददा जो त्यांनी आपापल्या दालनामध्ये करावयास पाहिजे होता तो त्यांनी येथे उपस्थित केला सभागृहाची वेळ वाया घालवीली यासाठी सत्ताधारी पक्षात उल्हासनगरमधील लोकांच्या बाबतीत समस्येबाबतीत त्यांची भावना काय आहे ती दिसुन येते. राहिली पाण्याच्या रंगाची गोष्ट तर जसे मागच्या वेळी आयुक्तांनी सांगितले होते की उल्हासनगरमध्ये पाण्यास सुध्दा रंग दिला जातो. आता माजी महापौर साहेबांनी सांगितले की, श्री. सोनवणे साहेबांना त्यांचे कनिष्ठ अधिकारी चुकीची माहिती देतात. म्हणुनच पाण्याची समस्या निर्माण होते. याच्या विपरित गोष्ट आहे मागच्या वेळी जेव्हा श्री. पोखरकर साहेब महासभेत बसले होते. त्यावेळी सर्व आरोप त्यांच्यावर थोपविण्यात आले होते की आपल्या मुळे शहरामध्ये पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे. ही सत्ताधारी पक्षाची व्दिधा अवस्था आहे. याचे कारण काय? एका आयुक्तांना शहरातील पाणी समस्येबाबत जबाबदार धरले जाते आयुक्त बदली झाल्यानंतर समस्या मांडण्याची आपली रिती पध्दत बदली झाल्याचे दिसते. या समस्येमुळेच तर तीन वेळा सभेचे कामकाज चालवु दिले नव्हते. ही सत्तापक्षाची

रित होती. समस्या आमच्यासमोर पण होती परंतु आम्ही ती लोकशाही पध्दतीने लोकशाहीच्या पाइंडयामध्ये राहुन सभागृहाचा



अपमान होणार नाही याची काळजी घेतली परंतु त्यावेळचा आपला दृष्टीकोन वेगळा होता आताचा दृष्टीकोन वेगळा आहे. ज्या पध्दतीने आपण ही समस्या मांडली ती पध्दत चुकीची होती. त्यावेळी सुध्दा आयुक्त होते यावेळी सुध्दा आयुक्त आहेत. आयुक्त कोण आहेत, त्यावेळेस पोखरकर साहेब होते आज श्री. सोनवणे साहेब आहेत. यामुळे आपल्या वागणुकीमध्ये बदल आला आहे. हे करणे चुकीचे आहे म्हणुनच उल्हासनगरमध्ये पाण्याला रंग आहे. आयुक्तांनी त्यावेळेला जे विधान केले होते ते पुर्णपणे बरोबर आहे. हे येथे सिध्द होत आहे. आता येथे सांगण्यात आले की ११२ एम.एल.डी. पाणी उल्हासनगर मध्ये येते आमच्या आमदारांनी ११२ एम.एल.डी. पाणी याठिकाणी दिले आहे. १० एम.एल. डी. पाणी वाढविले असे माखिजा साहेबांनी सांगितले हे खरे आहे का? ११२ एम.एल. डी. जर पाणी येत असेल उल्हासनगरची लोकसंख्या सन २००१च्या जनगणनेनुसार ५ ते साडेपाच लाख आहे. म्हणजे २०० लिटर प्रतिदिनी परमाणसी पाणीपुरवठा झाला पाहिजे. मुंबई, कल्याण, ठाणे या महानगरपालिकांच्या तुलनेने डबल पाणी उल्हासनगर वासियांना मिळते. तरी आम्ही एम.आय.डी.सीच्या नावाने ओरड करत असतो. एम. आय.डी.सी. पाणी कमी देते, एम.आय.डी.सी. पाणी कमी देते. यासाठी माझ्या विभागामध्ये पाण्याची दुर्भिक्ष आहे हे मी आपल्या निर्दशनास आणुन दिल्या नंतर आपण म्हंटलात की मी भेट देतो. परंतु ती भेट अजुन आपण दिलेली नाही. त्यानंतर विरोधी पक्ष नेता श्री. रमेश चव्हाण साहेब,श्री. राजेंद चौधरी, भाजपाचे काही नगरसेवक होते, श्री. सुनिल सुर्वे, श्रीमती. जयश्री. सुर्वे, श्रीमती. बामणकर, श्री. दिलीप गायकवाड होते. आम्ही तुम्हाला विचारल्यानंतर एम.आय.डी. सीच्या ऑफीसमध्ये गेल्यानंतर त्यांनी सांगितले की आम्ही आमच्याकडुन पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करतो. परंतु तुमची वितरण व्यवस्था बरोबर नाही परंतु ही वितरण व्यवस्था व्यवस्थित नाही म्हंटले तर पंधरा दिवसापुर्वी व्यवस्थित होते त्या विभागामध्ये अपुरा पाणी पुरवठा कशामुळे झाला? वितरण व्यवस्था ही परंपरेपासुन चालु आहे. परंतु येणे आणि जाणे हे वारंवार का होते. त्याची कारणे चुकीचे प्रशासन, वितरण व्यवस्था असुन सुध्दा त्याचा वापर व्यवस्थित होत नाही हे त्यामागचे मुख्य कारण आहे. श्री. नागे एम.आय.डी. सी. चे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांना भेटल्यानंतर त्यांनी सांगितले की आम्ही पाणी व्यवस्थित पुरवतो आहे. त्यानंतर आम्ही आपल्याकडे आलो. एम.आय.डी.सी ची जर चुकी असेल तर, एक जबाबदार व्यक्ती म्हणुन आम्ही आपणांकडे आलो आहे. बोलायचे आणि तुमच्या चुका दाखवायचे ऐवढेच आम्ही केले नाही. श्री. नागे एम. आय.डी.सी मध्ये बोलल्यानंतर व प्रशासनाचे प्रमुख म्हणुन आपल्याशी चर्चा केल्या नंतर जर एम.आय.डी.सी. चुकीची असेल तर आम्हाला दाखवुन दया. एम.आय.डी. सीच्या अधिका-यांना आम्ही तिथे बसुन देणार नाही. हे मी शिवसेना व भाजपाच्या वतीने आपणांस सांगितले होते. परंतु त्यांची चुक अदयापही आपण दाखवुन दिलेली नाही. हे एकदम चुकीचे आहे. खाली लोक ओरडत आहेत . पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. परंतु प्रशासनाला त्याचे काही नाही. सत्ताधारी पक्ष किती जबाबदारीने ही भुमिका बजावत आहे त्याच्याशी आम्हाला काही घेणे देणे नाही परंतु उल्हासनगरचे प्रतिनिधी म्हणुन असेच जर चालु राहीले तर शिवसेना भाजपा प्रखर आंदोलन करेल वाटल्यास त्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करू. यासाठी निवेदन करतो लवकरात लवकर पाण्याची समस्या सोडवाल ही आपल्या कडुन अपेक्षा करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>मा. महापौरजी, सचिव साहेब, आयुक्त साहेब, पाण्याच्या मुदयाबददल मागच्या महासभेमध्ये आयुक्त साहेबांनी बिलाच्या विषयावरून काही मुददे समोर ठेवले होते की, जनतेला बोअरवेलने पाणी मिळते. टॅकरने पाणी मिळते. झोपडपटटी धारकांना पाणी बिल माफीचा विषय जेव्हा आला त्यावेळेला कॉमन टॅपचा मुददा त्यांनी समोर ठेवला होता. आयुक्त साहेबांनी त्यावेळेला शहराचा परिपुर्ण अभ्यास केलेला नव्हता. कॉमन टॅब कधीच काढलेले आहेत. कॉमन टॅब कुठेच उपलब्ध नाहीत. राहिला मुददा टॅकरचा, टॅकरमध्ये

भयंकर मोठा घोटाळा आहे. या घोटाळयाबददल हजार वेळा हा विषय आयुक्त साहेबांच्या लक्षात आणुन दिला आहे. तरी पण त्या घोटाळयावर कुणी विचार करायला मागत नाही. शहरामध्ये पाण्याची ऐवढी टंचाई आहे की,कुठलाही नगरसेवक सुखी नाही. सुखी फक्त येथे अधिकारी दिसतात असा माझा त्यांच्यावर आरोप आहे. अधिका-यांकडे ओरड करायला जास्तीत



जास्त एकच माणुस असतो आणि असतो तो नगरसेवक असतो. परंतु आमच्या मागे पंधरा ते वीस हजार लोकसंख्या आहे. आणि हे लोक रोज शिवीगाळी करतात. आमचा पुढचा जन्म कोणता असेल याची शंका वाटायला लागलेली आहे. राहिला प्रश्न वितरण व्यवस्थेचा. मघाशी भाजपाचा मोर्चा आलेला होता त्यांनतर आयुक्त साहेबांनी आम्हाला काही विश्लेषण करून दाखविले. या शहरातील वितरण व्यवस्था मोडकळीस आलेली आहे. याविषयावर माझे सुध्दा हेच मत आहे की, फार वर्षापुर्वीची पाईप लाईन या शहरामध्ये आहे. आणि पाण्याच्या समस्येमुळे ठिकठिकाणी लोकांनी बोअर करून जलवाहिन्या फिरवून घेतल्या आहेत. पंक्चर सिस्टीम खरेखरोच धोकादायक या शहरामध्ये बनली आहे. परंतु या अगोदर सहा वर्ष या सभागृहामध्ये मी काही आयुक्त पाहिले परंतु आता जी परिस्थिती शहरातील पाणी वितरण व्यवस्थेची आहे अशी अवस्था कधीही पाहिलेली नाही. याला कारणीभुत जे आहे ते याठिकाणी जो व्यापार चालतो. तो व्यापर थांबविला पाहिजे. आणि या व्यापारामध्ये प्रशासनाचा सहभाग असल्याशिवाय हा व्यापार होवू शकत नाही असा आमचा आरोप आहे. कारण काय आहे की, पाणी टॅकरव्दारे विकले जाते किंवा महापालिका त्या
टॅकरचे शुल्क भरले जाते. किती त्याचे दर आहेत? एका टॅकरची नक्की किंमत किती आहे? हे अजुनही निश्चित झालेले दिसत नाही.माझा विनंतीचा मुददा हा आहे की, ही जनतेची तळमळ आहे, कळकळ आहे. आम्ही कुणाचाही विरोध करू इच्छित नाही पंरतु जनतेचे हाल लक्षात घेवून यावर पर्याय काढला गेला पाहिजे. आपले अधिकारी मस्त काम करतात. त्यांची शैक्षणिक अर्हता नकली आहे असे मला वाटते कारण काय आहे की या प्रभागात पाण्याची टंचाई असेल तर दुस-या प्रभागातील पाणी बंद करायचे आणि या प्रभागात चालु करायचे. त्या प्रभागातील लोक ओरड करत आले तर या प्रभागातील पाणी बंद करायचे आणि त्या प्रभागातील पाणी चालु करायचे. ऐवढी ऑपरेटिंग सिस्टीम शिकुन आलेले हे ऑपरेटर आहेत इंजिनिअर नाहीत. असे माझे मत आहे. त्यांनतर २८ ते ३० पत्र मी झोपडपटटीमध्ये टॅकरची मागणी करण्यासाठी दिली आहेत. टॅकर कुठे जातात हे मला माहित आहे. ज्याठिकाणी चार-चार , आठ-आठ दहा-दहा टॅकर पाणी साठवुन ठेवले जाईल अशा रिझर्व टॅकमध्ये पाणी साठविण्यासाठी पैसे घेवून टॅकर पाठविले जातात. झोपडपटटीमध्ये एक टॅकर पाठविण्याची विनंती केली तर ती पुर्ण केली जात नाही. असा प्रशासनाचा माझ्याकडे पुरावा आहे. पाच हजार लिटरची क्षमतेची टाकी माझ्या प्रभागात लावलेली आहे. ती टाकी जीप वर ठेवून त्यावर काही घोषणा लिहून तिची मिरवणुक काढण्याचे माझ्या मनात आहे. परंतु पाच हजार लिटर पाणी क्षमतेची टाकी महापालिकेने माझ्या प्रभागात जी बसवली ती सोडतीन वर्षात त्यामध्ये एक थेंब सुध्दा पाणी टॅकरचे त्यात गेले नाही. ही शरमेची गोष्ट आहे. त्यानंतर टेकडी, स्लम चा भाग हा दुर्लक्षित केला जातो. त्यांच्याकडे एक तर पाईप लाईन नाही. पाईप लाईनचे कनेक्शन अदयाप केलेले नाही. कुठून कुठून लावुन त्यांनी पाण्याच्या नळजोडण्या घेतल्या आहेत त्यालाही पाणी येत नाही. त्यांच्यावर बिले मारली जातात ती बिले जर भरली नाहीत तर लखेपती, करोडोपती ज्यांची बिले बाकी आहेत त्यांच्याकडे जप्तीची कारवाई होत नाही. बाकी गरीबांकडे थोडासा टॅक्स जर बाकी असेल तर जप्ती काढली जाते. टिव्ही उचलुन आणला जातो. कांदयाची पोती उचलुन आणल्याचे मी पाहिले आहे. त्यांनतर खुर्च्या उचलुन आणल्याच्या पाहिल्या आहेत. फर्निचर उचलुन आणल्याचे पाहिले आहे हे सगळे जे आतापर्यत आणलेले आहे ते गोरगरीबांचेच आणलेले आहे. ज्याच्याकडे दोन दोन, चार-चार, पाच-पाच, दहा-दहा लाख अशी ज्यांच्याकडे टॅक्सची रक्कम बाकी आहे त्यांच्याकडे आपले अधिकारी भटकत सुध्दा नाहीत. तर माझी अशी विनंती आहे की, आज आमचा भारतीय जनता पार्टीचा जो मोर्चा

आला होता. या मोर्चाचा गंभीरतेने प्रशासनाने विचार केला पाहिजे. हा जर विचार केला नाही आणि पाण्याची समस्या लवकरात लवकर सोडविण्यात आली नाही तर पुढच्या प्रखर आंदोलनाला तोंड देण्याची क्षमता अधिका-यांनी ठेवावी ऐवढी सूचना करून मी माझे दोन शब्द संपवतो.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब पाण्याच्या समस्येस जबाबदार श्री. नागे व एम.आय.डी.सी आहे ही वस्तुस्थिती आहे. पाणी



पुरवठा विभागाचे जेवढे अधिकारी आहेत ते दिवसरात्र एक करून शहरात पाण्याच्या
सुधारणेसाठी प्रयत्न करत आहेत. एम.आय.डी.सी च्या जाणीवपुर्वक हेतुमुळे उल्हासनगर शहरामध्ये पाण्याची टंचाई निर्माण होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब गेल्यावर्षी मी स्थायी समितीमध्ये सदस्य म्हणुन निवडुन आल्यानंतर टॅकरव्दारे जो पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यावेळी त्याठिकाणी चर्चा झाली त्यावेळेस स्थायी समितीमध्ये जो विषय आला. त्यावेळी सांगण्यात आले की, एक ते दीड कोटी रूपये टॅकरव्दारचे केलेल्या पाणी पुरवठयाचे बिल देण्यामध्ये खर्च होतो. त्यामध्येय आपले नुकसान होत आहे. तर माझी याठिकाणी अशी विनंती आहे की टॅकरव्दारे जे पाणी देण्यात येते त्यातील ७० टक्के पाणी सोसायटी व बंगल्यामध्ये जाते व ३० टक्के पाणी झोपडपटटयांमध्ये जाते. आताच आमच्या भारतीय जनता पार्टीचे सन्माननिय सदस्य श्री. रामदास उमाप यांनी सांगितले की, झोपडपटटीमध्ये सुध्दा पाणी मिळत नाही. यासाठी आपण टॅकरव्दारे जे पाणी आहे ते बंद करून टाकावे. व नळाव्दारे व पाईप लाईन व्दारे पुर्ण शहरास पाणी मिळेल अशी सोय करून दयावी.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उपस्थित पालिका सदस्य व त्या पक्षाचे इतर समर्थक पालिका सदस्य एक- एक करून सभागृहातुन बाहेर पडू लागले.

<u>काही सदस्य :-</u>सभेत गणपुर्ती बरोबर (कायम) आहे का?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सध्या तरी गणपुर्ती आहे. एक सदस्य सभेतुन निघुन गेला तर गणपुर्ती कमी होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आज इथे पाणी प्रश्नावर चर्चा चालु आहे मी त्याबाबत खुलासा करू इच्छितो. श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की पाण्याला सुध्दा रंग दिला जातो. आम्ही जेव्हा पाणी प्रश्नाबाबत ओरडत होतो तेव्हा बोलले जात होते की हे पाणी प्रश्नाबाबत राजकारण करत आहेत. तर आता काय होत आहे? मी येथे खुलासा करू इच्छितो की श्री. आर. के. सोनवणे साहेबांनी पदभार स्विकारल्यानंतर पुर्ण शहरात पाणी पुरवठयात जेवढी सुधारणा झाली आहे तेवढी सुधारणा...
<u>मा. सदस्य श्री धनंजय बोडारेः-</u>आपण समाधानी आहात का?

<u>मा. सदस्या श्रीमती. इंदु भठिजाः-</u>माझ्या प्रभागात....

यावेळी सभेत उपस्थित असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शेवटचे एकमेव सदस्य श्री. किशोर वनवारी हे सभागृहातुन बाहेर पडले. त्यामुळे मा. पिठासिन अधिकारी यांना धरून उपस्थित पालिका सदस्यांची संख्या एक तृतियांश पेक्षा कमी आहे असे मा. पिठासिन अधिकारी यांच्या निर्दशनास आणण्यात आले त्यावेळी खालील पालिका सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. श्रीमती. मालती करोतिया
२. श्री. अशोक ठाकुर
३. श्रीमती. इंदु भठिजा
४. श्री. भालेराव गौतम
५. श्रीमती. जावळे संगिता
६. श्रीमती. सीमा मोकल
७. श्री. रामदास उमाप
८. श्री. जमनादास पुरस्वानी
९. श्री. बच्चाराम रूपचंदानी
१०. श्रीमती. कृष्णानी रेखा
११. श्री. यादव लालबिहारी



१२. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
१३. श्री. नथु सोनावणे
१४. श्री. दिलीप गायकवाड
१५. श्रीमती. नंदिनी बामणकर
१६. श्रीमती. प्रेमा खांडेकर
१७. श्रीमती. किरण माने
१८. श्री. रमेश चव्हाण
१९. श्री. धनंजय बोडारे
२०. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे
२१. श्री. राजेंद्र चौधरी
२२. श्री. प्रमोद टाले
२३. श्री. राज असरोंडकर

<u>मा. महापौरः</u>-गणपुर्ती नसल्याने सभेचे कामकाज तहकुब करून पुढच्या सभेची तारीख व वेळ आपणांस लेखी कळविण्यात येईल व जे काम निकालात काढायचे राहिले आहे ते त्या सभेत निकालात काढण्यात येईल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ७. ०० वाजता सभेचे कामकाज स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर
महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१९/५/२००३

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/५/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.५.२००३ रोजी सांयकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४० | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ६. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४१. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४५. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ११. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६ | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १२ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १३. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १६. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५१. | श्री. नारायण पंजाबी |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्रीमती दिपा नारायण |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५४. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५५ | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५६. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २३. | श्री. शांताराम निकम | ५८. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २८. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६३. | श्रीमती. इंदु भठिजा |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. मोहन साधवानी | ६५. | श्री. बहरानी मोहन |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६६. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्री. बेहरानी ठाकुरदास |
| ३३. | श्रीमती. खिलनानी भावना | ६८. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७०. | श्री. हरदास माखिजा |
| ३६. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ७१. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७२ | श्री. वदरीया राजेश |

तर

मा.उप महापौर १ श्रीमती. जया साधवानी व मा. सदस्य / सदस्या २ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ३. श्रीमती मसंद माया घनश्यामदास, ४. श्री. बोडारे धनंजय बाबूराव ५. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास, ६. श्रीमती. किरण माखिजा हे सभेस अनुपस्थित होते/ होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्त्तरे.

प्रश्न क्र. ६८ ,६९ ,७० श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ६८:-उल्हासनगर महानगरपालिकाचे संणक छपाईचे काम गेल्या सहा वर्षापासून बिगर निविदा (टेंडर) काढुन आदित्त्य कॉम्प्युटर सर्व्हिस या खाजगी संस्थेस देण्यात येत आहे. त्याबाबत खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तर संबंधितांनी दयावेत.

महापालिकेच्या संबंधित विभागाने संगणक छपाईचे काम गेल्या सहा वर्षापासून आदित्त्य कॉम्प्युटर सर्व्हिस या खाजगी संस्थेस देण्यात येत आहे का? त्या कामाबाबत निविदा काढण्यात आली होती का? नसल्यास निविदा कर काढण्यात आली नाही? निविदा काढण्यासाठी संबंधित विभागाने दिर्घ (उशिर) का केला? सदर कामात संबंधीत अधिका-यांनी संगनमत केली आहे का? घोटाळा झाला असल्यास त्यांच्यावर कोणत्त्या प्रकारची कार्यवाही करण्यात आली?

त्याबाबत सविस्तर खुलासा व तपशिल द्यावा ही नम्र विनंती.

उत्तरः- होय,, उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ७५ दिनांक ६/७/१९९६ अन्वये मंजुर झाले असून कामाचे आदेश क्र. उमपा/पा.क्र.वि/५८ दिनांक १८.७.१९९६ नुसार देण्यात आले आहेत.

होय, या कामाबाबत निविदा काढण्यांत आली असून दिनांक १.८.९५ च्या दैनिक ''नवशक्ति'' मध्ये निविदा नोटिस-पसिध्द करण्यात आली होती. निविदा काढण्यासाठी उशिर झालेला नाही. तसेच सदर कामात संबंधीत अधिका-यांनी संगनमतही केलेले नाही. या कामात घोटाळा आल्याचे निर्देशनास आले नाही त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ठिक आहे.

प्रश्न क्र. ६९:- हॉली फॅमेली शाळा, उल्हासनगर कॅम्प-४ या खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या शाळेला (मान्यता)(परवानगी)देतेवेळी उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळ तसेच मुंबई महापालिका शिक्षणमंडळ प्राथमिक शिक्षण कायदयान्वये सदर शाळेने परवानगी घेण्यासाठी ठरलेल्या प्रकरण क्र. सात दिनांक ३१.३.१९५५ , दिनांक २४.१२.१९५६, दिनांक १९.५.१९६९, दिनांक २९.९.१९५६, दिनांक ८.१२.१९८३, दिनांक २९.७.१९५८, दिनांक १३.१०.१९६० च्या शासकिय अधिसुचनेद्वारे अटी व शर्तीनुसार सदर शाळेने सर्व दाखल्यांची पुर्तता केली आहे का? मान्यता देतेवेळी पायाभरणी दाखला व बांधकाम पुर्णताचा दाखला सादर केला होता का? सदर दाखले सादर केले नसल्यास शाळेला मान्यता का देण्यात आली? दाखल्याच्या पुर्तता अभावी मान्यता दिली असल्यास सदर शाळेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे? नसल्यास कारवाई का करण्यात आली नाही? या संबंधी सविस्तर माहिती व खुलासा संबंधित विभागातील अधिका-यांनी सुचक, समाधानकारक व योग्य उत्तरे दयावीत.

उत्तरः- हॉली फॅमेली कान्व्हेंट स्कूल, उल्हासनगर-४ या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस शासन पत्र क्र. व्ही. एल.एस. / १०९१/ प्रा.शि. उ. मुंबई १७.८. १९९१ अन्वये ९१-९२ पासून इयत्ता १ लीच्या वर्गास कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेली आहे. शिक्षण विभागामार्फत सदर शाळेस मान्यता देण्यापूर्वी तपासणी केली असून त्यांच्या अहवालानुसार व प्रशासन अधिकारी मनपा, शिक्षण मंडळ, उल्हासनगर यांच्या शिफारशी नुसार मे. शिक्षण मंडळाने ठराव क्र. ७५४ दिनांक ११.२.१९९२ नुसार मान्यता प्रदान केली आहे.

कार्यालयीन कागदपत्र पाहाता सदर शाळेस मान्यता देणेपूर्वी शिक्षण मंडळाच्या दिनांक ११.२.१९९२ च्या सर्व साधारण सभेत व्यापक चर्चा झालेली दिसून येते. तद्नंतरच सदर शाळेच्या इ. १ लीच्या इंग्रजी माध्यमाचा वर्गास जून ९१ पासून कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेली आहे. शिक्षण विस्तार

अधिका-यांच्या मूळ शाळा तपासणी अहवालात ६ वर्ग खोलयांच्या इमारतीच्या उल्लेख दिसून येतो. परवानगी मान्यता देतांना पाया भरणी दाखला देण्याची आवश्यकता नसेल व सदर पायाभरणी दाखला हे कार्यालय देत नसते. परवानगी मान्यता देते वेळी मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील प्रकरण ७ मधील तरतुदीतील बाबी विचारात घेऊनच कार्यवाही केली जाते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ठिक आहे.

प्रश्न क्र. ७०:- होली फॅमेली, उल्हासनगर-४ येथिल शाळेने बांधकाम केलेली जलागा व मोकळी (खुली) जागा किती चौरस फुट आहे? सदर शाळेची घरपट्टी कर घरगुती अगर बिगर घरगुती आकारणी केली जाते का? ती कर आकारणी कोणत्त्या वर्षापासून केली जाते? तसेच सदर शाळेवर पाणीपट्टी कर आकारणी घरगुती अगर बिगर घरगुती आकारणी केली जाते का? ती पाणीपट्टी कर आकारणी कोणत्त्या वर्षापासून केली जाते? सदर शाळेवर घरपट्टी अगर पाणपट!टी कर आकारणी केली जाते का? आकारणी होत नसल्यास कोणत्त्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे? त्यासंबंधी सविस्तर खुलासा व माहिती संबंधीत विभागातील अधिका-यांनी सुचक, समाधानकारक व योग्य उत्तरे दयावीत ही विनंती.

उत्तरः- होली फॅमेली शाळा उल्हासनगर-४ कर आकारणी बाबत तपशिल खालीलप्रमाणे .

१) ४०/४६२ निवासी २४८२ चौ.फु.
मोकळी १७९२ चौ.फु. जागा
२) ४०/६६७ निवासी १२८०९ चौ.फु.
मोकळी ७३०४ चौ.फु. जागा
३) ४०/६६९ निवासी २५३ चौ.फु.
मोकळी १६२६ चौ.फु. जागा
४) ४०/४६३० निवासी २८३ चौ.फु.
मोकळी १४७ चौ.फु. जागा

२) सदर जागेची घरपटटी निविासी वापरासाठी म्हणून देण्यात येते.
३) बिल क्र. ४०/४६२ बिल क्र. ४०/६६७, बिल क्र. ४०/६६९ ची बिल आकारणी १९८९-९० पासून करण्यात येत आहे व बिल क्र. ४०/४६३० ची आकारणी ९९-०० करण्यात आलेली आहे.
४) मालकत्ता कर विभागातून महापालिकेच्या निर्णयानुसार बिल क्र. ४०/४६२, ४०/६६९, ४०/४६३० यांना पाणीपटटी बिल मालमत्ता कर बिलासोबत निवासी वापर तत्त्वावर सन २०००-२००१ पासून देण्यात येते व पाणी पुरवठा विभागातून यु / ५/१७५३, यु /५/२२११ यु /५/३८२२, यु /५/४०००, यु /५/५३३३ अशी पाच देयके स्पेशल दराने २०.१२.९४ पासून देण्यात येत आहे.
५) सदर शाळेने मालमत्ता कर बिल २००१-२००२ व पाणीपटटी बिल ३१.३. २००२ पर्यंत सर्व खात्यात भरलेली असल्यामुळे त्यांच्यावर कोणत्त्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ७१ श्री. नथु सोनवणे यांचा असुन ते उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची कार्यवृत्तात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ७१:- उल्हासनगर कॅम्प-१ येथिल पोस्ट ऑफिस समोर जी इमारत बांधण्यात येत आहे ती किती मजल्यांची आहे? व प्लॅन (आराखडा) किती मजल्यांचा मंजुर करण्यात आलेला आहे? त्या इमारतीच्या मंजुर आराखडयानुसार त्यात किती दुकानांचे गाळे बांधण्याची (काढण्याची) व तसेच पार्किंगसाठी किती पॅसेज सोडण्यात आलेला आहे?

या इमारतीच्या बांधकामाविषयी वरील विचारलेल्या प्रश्नांची चर्चा येत्त्या महासभेत व्हावी ही विनंती.

उत्तरः- १) सदर जागेवरील बांधकाम झालेली इमारत पाच मजल्यांची आहे.
२) सदर इमारतीचा आराखडा पाच मजल्यांचा मंजुर करण्यांत आलेला आहे.
३) मंजुर नकाशा नुसार चार दुकानाचे गाळे बांधण्याची परवानगी दिलेली आहे व पार्किंगसाठी एकूण क्षेत्र १५५.०० चौ.मी. सोडण्यात आली आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. ७२ श्री. रामदास उमाप यांचा असून प्रश्न मागे घेतला असल्याने त्याची कार्यवृत्तांत नोंद करता येणार नाही.

प्रश्न क्र. ७३ ,७४ ,७५ ,७६ श्री. नारायण पंजाबी यांचा आहे.

प्रश्न क्र. ७३:- देअर आर अबाउट १०० टु १५० बिल्डींगस कंन्स्ट्रक्शटेड डयुरिंग द पिरिअड मि. पानपट्टे हॅव्हिंग वायोलेटेड द सेक्शनेंड प्लॉन्स. दिस इज द पॉझिशन ऑफ रेकॉर्ड अस पर टी.पी.डी. ॲण्ड इन्क्रोचमेंट इंजिनिअरर्स रिपोर्ट.

वॉय सच पार्टस् ऑफ वायोलेशन ॲण्ड वाय डिड ही फेल टु टेक ॲक्शन इन टाईम.

उत्तरः- द मास वर्क ऑफ डिलेक्टींग द वायोलेटेड पोर्शन इन ऑल सच बिल्डींगस् हॅस नाउ कम्पलेटेड बाय टी.पी.डी. ॲण्ड इन्क्रोचमेंट सेक्शन. द बिल्डर्स ॲण्ड ओव्हनर्स हु हॅव वायोलेटेड द सेक्शनेड प्लॉन विल बी सर्व्हेड विथ नोटिसर्स अंडर एमआरटीपी ॲक्ट १९७७ नेसेसरी ॲक्शन विल बी टेकन आफटर डयु प्रोसेस आफ सॉ.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-ठिक आहे.

प्रश्न क्र. ७४:- वेदर हिस ब्लाइंड आय टु वायोलेशान्स शुल्ड बी कंस्ट्रक्शटेड हिस सपोर्ट टु वायोलेशन ऑफ सेक्शनेड प्लॉन ॲण्ड शुल्ड बी नॉट पुनिशड फोर इट.

उत्तरः- वायोलेशन कम्पलेटेड बाय कन्र्सल बिल्डर हॅव बीन डिक्टेटेड ॲण्ड प्रोसेस आफॅ इशुइंग नोटिस टु कन्सर्न इज गोईंग ऑन द नेसेसरी स्टेप्स विल बी टेकन अंडर डयु प्रोसेस पीएफ :एडव्ल्यु.

डेप्यु. म्युनिसिपल कमिशनर (सीयुसी)हॅस इनिटेटेड ॲक्शन अगेण्टस् वायोलेटेड बिल्डींगस् ॲण्ड नो वेअर ॲक्शन हिस स्टोपेड. इट इज कंटिन्युअस प्रोसेस.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-ठिक आहे.

प्रश्न क्र. ७५:-वेन ही इज वेटनरी डॉक्टर (डॉक्टर ऑफ ॲनिमल) वाय ही हॅड बीन सिलेक्टेड ॲस डेप्यु. म्युनि. कमिशनर (इन्क्रो.)? वाय हिस सर्व्हिस आर नॉट बिंग युटिलाईज्ड फोर डिगनिसेस ऑफ डिसेस ऑफ ऐनिमल. वाय ऐनि ऑदर डेप्यु. म्युनि. कमिशनर इज नॉट पोस्टेड टु कंट्रोल लिगल बिल्डींगस्.

उत्तरः-स्टेट गर्व्हमेंट हॅस गिवन द सर्व्हिस ऑफ मि. पानपट्टे ऑन डेप्युटेशन ॲस डेप्यु. कमिशनर इन युएमसी गर्व्हमेंट हॅस ऑथरीटी टु डुप्युटी ऐनी गॅझेटेड ऑफिसर ऑन डेप्युटेशन.

देअर हिज नो पोस्ट ऑफ डेप्यु. कमिशनर फोर द वर्क ऑफ डिगनोसिस ऑफ डिसेस ऑफ ॲनिमल ऑन द इस्टॉब्लिसमेंट ऑफ अवर कार्पोरेशन. द चार्ज ऑफ डीएमसी (सीयुसी) वाज गिवन बाय एक्स.म्युनिसिपल कमिशनर इन हिस ऑथरिटी टु हिम.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-ठिक आहे.

प्रश्न क्र. ७६:- वाय ऑनली बिट इन्स्पेक्टर आर हेल्ड रिस्पोन्सीबल. वाय नॉट ही इज बिइंग हेल्ड रिस्पोसिंबल इन द कॉन्टेक्टस ऑफ देअर केसेस.

उत्तरः- इन ॲण्टी इन्क्रोचमेंट डिपार्टमेंट द जॉब चार्ट हिज फिक्सेड ॲट इच स्टेजेस आफ इस्टाब्लिसमेंट ॲण्ड हुवेअर फेलस टु डु हिस जॉब आफ हिस स्टेग हिस हेल्ड रिस्पोन्सीबल आफ डीएमसी कुल्ड फेल्ड ॲट हिस स्टेग हि विल बि गेट रिस्पोन्सिबल ऑन दॅट स्टेग.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ७७, ७८ श्री. नथु सोनवणे यांचे असुन ते उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ७७:- साधुबेला गर्ल्स स्कूल जवळ, द्वारका पॅलेस बिल्डींग समोर चार मजली इमारतीचे बांधकाम अनाधिकृतपणे सुरु असून ते किती मजल्यांचे आहे? व मंजुर केलेल्या आराखडयापासून ते करण्यात आलेले आहे का? शिवाय पार्किंगसाठी किती पॅसेजची जागा सोडण्यात आलेली आहे का?

उत्तरः- सदर इमारतीचे बांधकाम मंजूर आराखडयानुसार तीन मजल्यांचे आहे.

मंजुर केलेल्या आराखडयानुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करण्यात आलेले नाही. चौथ्या मजल्याचे अतिरिक्त बांधकाम केले असून नगररचनाकार यांनी सदरचे बांधकाम पाडण्यासाठी दिनांक १४.८.२००२ च्या पत्रान्वये अभिप्राय सादर केला असून पूढील कार्यवाही करण्यासाठी उपायुक्त अनाधिकृत बांधकाम विभाग यांना कळविण्यांत आलेले आहे.

पार्किंगसाठी मंजुर नकाशानुसार ३१.४२ चौ.मी. क्षेत्र प्रत्यक्ष जागेवर सोडण्यात आलेले आहे.

प्रश्न क्र. ७८:- जवाहर हॉटेलच्या वर खोल्या बांधलेल्या होत्त्या त्या पाडुन त्या ठिकाणी हॉल तयार करण्यात आलेला आहे. तो तयार करण्यास महापालिकेची पुर्ण परवानगी देण्यात आलेली आहे का?

उत्तरः-नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ७९, ८०,८१,८२ श्री. रामदास उमाप यांचा असून त्यांनी प्रश्न मागे घेतला असल्याने त्याची कार्यवृत्तात नोंद करता येणार नाही.

प्रश्न क्र. ८३ श्री. विनोद तलरेजा यांचा आहे. ते उपस्थित नसल्याने त्यांचा प्रश्न व उत्तराची कार्यवृत्तात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ८३:-सार्वजनिक बांधकाम विभागातील उप-अभियंता या पदावरुन कार्यकारी अभियंता म्हणून महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली होती व तसा नियुक्तीचा ठराव महानगरपालिकेने देखील एक वर्षासाठी केला होता. परंतु महाराष्ट्र शासनाने एक वर्षाचे पुढे कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची नियुक्ती केलेली नाही व महानगरपालिकेने देखील एक वर्षानंतर त्यांना महापालिकेत ठेवण्याचा ठराव केलेला नाही. मग त्यांना कुठल्या नियमान्वये कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहे इतके वर्ष का ठेवण्यात आलेले आहे.

उत्तरः- महाराष्ट शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.पी.ओ.जी. ११९९/सीआर २३५/ (९)/सेवा १ दिनांक २० नोव्हेंबर, १९९९ अन्वये कार्यकारी अभियंता या पदावर श्री. व्ही. डब्ल्यु. भिवापूरकर यांना अभावित एक वर्षाची पदोन्नती दिलेली आहे. त्यानुसार या महापालिकेत ते कार्यकारी अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. तथापि त्यांना एका वर्षाच्या पुढे कार्यकारी अभियंता म्हणून महापालिकेत नियुक्ती देवू नये अशा प्रकारच्या ठराव महापालिकेने केल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. तसेच श्री. भिवापूरकर यांना पदोन्नतीनंतर पुनश्च पदावनत केले बाबतही शासनाकडुन अदयाप महापालिकेस कळविलेले नाही.

या महापालिकेत कार्यकारी अभियंता पदनामाचे पद अस्तित्त्वात आहे व त्या पदाची आवश्यकता महापालिकेस असल्याने त्यांची सेवा आजपर्यंत त्या पदावर वापरण्यात येत आहे. तसेच महाराष्ट शासनाने देखील श्री. भिवापूरकर यांची सेवा मुळ विभागाकडे प्रत्यावर्तीत करणेबाबत अदयाप पर्यत कोणत्त्याही प्रकारचे आदेश या महापालिकेला दिलेले नाहीत. तथापि या कार्यालयाचे प्र. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे-२/१२४, दिनांक १२.८.२००२ अन्वये त्यांची पदोन्नती तसेच प्रतिनियुक्तीचा कालावधी किती समजण्यात यावा याबाबत महाराष्ट शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडुन मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरण शासन सतरावर प्रलंबित आहे. सबब श्री. भिवापुरकर हे कार्यकारी अभियंता या पदावर सदयस्थितीत कार्यरत आहेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ८४, ८५, ८६ श्री. प्रमोद टाले यांचा असून त्यांनी प्रश्न मागे घेतला असल्याने कार्यवृत्तात नोंद करता येणार नाही.

प्रश्न क्र. ८७ ,८८ ,८९ ,९० ,९१ श्री. शांताराम निकम यांचा आहे.

प्रश्न क्र. ८७:-पॅनल पध्दतीतील प्रभाग क्र. ९ मधील कुठल्या भागात सद्या पाणी नाही.

उत्तरः- साईबाबा नगर, आम्रपाली, पंचशील नगरचा काही भाग, भरतनगरचा शेवटचा भाग नागसेननगरचा काही भाग, डिफेंस कॉलनी शेवटचा भाग, महात्मा फुले कॉलनी शेवटचा भाग इत्त्यादी.

प्रश्न क्र. ८८:- भारतनगर, नागसेननगर, अचानक नगर, बुध्दकॉलनी, सुभाष टेकडी, डिफेन्स , भिमशक्ती वगैरे भागात किती वर्षापासून पाणी नाही? का? कारणे द्या?

उत्तरः- डिफेन्स कॉलनीच्या शेवटच्या भागास गेल्या सहा महिन्यापासून पाणी पुरवठा अपुरा होत आहे. इतर ठिकाणी कमी प्रमाणात पाणी पुरवठा होता.

प्रश्न क्र. ८९:- रमजी आंबेडकर नगर, अशोकवन, दहाचाळ वगैरे भागातील अर्ध्या नागरीकांना पाणी मिळते सगळयांना मिळण्यासाठी काही प्रयत्न होत आहे का?

उत्तरः- होय, तक्षशील जलकुंभावरुन पाणी वितरण करण्यांकरीता नविन जलवाहिन्या टाकण्याकरीता अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून त्यांना मंजुरी मिळाल्यानंतर सदरच्या जलवाहिन्या टाकल्यास पाणी समस्या सुटण्यास मदत होईल.

प्रश्न क्र. ९०:- गेल्या पाच वर्षापासून ज्या भागात पाणी नाही असे भाग कुठले? त्यांनाही पाण्याचे बील भरण्याची सक्ती करणे हा त्यांच्यावर अन्याय नाही का?

उत्तरः- प्रभाग ९ मध्ये असा एकही भाग नाही.

मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :- प्रश्न क्र. ९१ हा श्री. शांताराम निकम यांचा आहे.

प्रश्न क्र. ९१:- प्रभाग क. ९ मध्ये मागासवर्गीयांची संख्या ६० टक्के पेक्षा जास्त असल्यामुळे तेथे अपुरा पाणी पुरवठा होतो का?

कॅम्प क. ४ व ५ साठी ३० एम.एल.डी. वरुन ३५ एम.एल.डी. पाणी पुरवठा वाढविण्यात आला त्यामुळे प्रभाग क.९ ला फायदा झाला का? नसेल तर का नाही

उत्तरः-असा प्रकार होत नाही, अस्तित्त्वातील वितरण वाहिन्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अपु-या असून फारच जुन्या झालेल्या असल्यामुळे शेवटच्या भागाला पाणी पुरवठा करतांना अडथळा निर्माण होउन कमी प्रमाणात पाणी पुरवठा होतो.

होय, नागसेन नगर भागातील पाणी टंचाई दूर झाली असून तेथील ५-६ टॅंकर बंद करण्यात आले आहेत. तसेच इतर भागाला काही प्रमाणात फायदा झाला आहे. तसेच कॅम्प ४ व ५ ला सुध्दा फक्त ३२ ते ३३ एम.एल.डी. पाणी पुरवठा होतो.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-प्रश्न जरा वाचुन दाखवा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न तुम्हाला वाचायचा आहे तुमचा आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-एक वर्षानंतर प्रश्नाचा नंबर लागतो तर कोण घेवून येणार इकडे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न वाचणे हे तुमचे कर्तव्य आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मला तुम्ही वाचुन दाखवा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कायदयाने तुम्हाला प्रश्न वाचायचा आहे. तरी मी तुम्हाला वाचुन दाखवतो. (सचिवांनी वरील प्रमाणे प्रश्न वाचनु दाखविला)

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-पाणी अजुन आले नाही पण जाऊ दया खुप जुना झाला तो प्रश्न.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १२ श्री. रामदास उमाप यांचा असून तो त्यांनी मागे घेतला असल्याकारणाने कार्यवृत्तात त्याची नोंद करता येणार नाही.

प्रश्न क. १३ , १४ ,१५ ,१६ ,१७ श्री. चिमन रूपाणी यांचे असून ते उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्नांची व उत्तरांची कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. १३:-उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे उल्हासनगर शहरामध्ये दारिद्रय रेषेखाली कुटुंबाच्या सर्व्हेक्षण केव्हा घेण्यात आला व कोण-कोणत्त्या भागामध्ये घेण्यांत आला होता व सदर सर्व्हेक्षणाबाबत शहरातील जनतेला कळविण्यात आले होते काय?

उत्तरः- दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्व्हेक्षण करणेचा कार्यक्रम सदर कुटुंबांना शासन योजनेचा लाभ देण्याचे दृष्टीने सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनांतर्गत सन डिसेंबर १९९७ पासून शहर पातळीवर राबविणेत आलेला होता. प्रस्तुत सर्व्हेक्षणबाबत शहरातील जनतेला दैनिक नवभारत टाईम्स ७ ऑक्टोंबर, १९९९ लोकमत ८.१०.९८ अन्वये जाहिरपणे कळविले होते.

प्रश्न क्र. १४:- सदर सर्व्हेक्षण यादी मध्ये कोण-कोणते धर्म व जातीचे कुटुंबाच्या समावेश आहे कृपया वर्गवारीने तपशिल दयावेत.

उत्तरः-सर्व्हेक्षण संपूर्ण शहर पातळीवर करावयाचे होते. त्यामुळे सर्व्हेक्षणासाठी जात-धर्म-भाषा-वंश याबाबत भेद करण्यात आलेला नाही. सर्व जात-धर्म-भाषा-वंशाचे शासन निकषाप्रमाणे पात्र कुटूंबाचा समावेश सर्व्हेक्षणामध्ये होतो.

प्रश्न क्र. १५:- सदर योजने अंतर्गत लाभार्थींना प्रशिक्षणाचे लाभ देण्याबाबतची सुचना इतर प्रसार माध्यमातून जाहिर न करता व भाषिक दैनिक वृत्ताद्वारे निविदा न मागविता फक्त एकच हिंदी भाषिक पेपरमध्ये का जाहिरात देण्यात आली?

उत्तरः- लाभार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी दिनांक १५.२.२००२ रोजीच्या ''धनुष्यधारी'' या स्थानिक दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर सुचेनद्वारे संस्थाचे कडुन अर्ज मागविणेत आलेले होते. स्थानिक लाभार्थींना फक्त लाभ दयावयाचा असल्याने स्थानिक सर्वाधिक खपाचे असणा-या हिंदी भाषिक वर्तमानपत्रामध्ये पसिध्दी देण्यात आलेली असून हिंदी भाषा ही राष्ट भाषा असून सर्व नागरीक ही भाषा जाणतात अशी धारणा आहे.

प्रश्न क्र. १६:- सदर जाहिरात मध्ये कमीत कमी ३०० तास प्रशिक्षण दयावे लागेल असे नमुद केले आहे. सदर अट कायदयाच्या तरतुदीनुसार आहे किंवा महापालिकेने प्रस्तावित केल्याप्रमाणे आहे. कृपया सविस्तर खुलासा करावा.

उत्तरः- शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रत्येक लाभार्थी विदयार्थ्यांना कमीत कमी ३०० तास प्रशिक्षण दयावयाचे आहे.

प्रश्न क्र. १७:-सदर जाहिराती अन्वये महापालिकेमध्ये किती प्रशिक्षण देण्यात संस्थांनी कोण-कोणत्त्या वयवसायिक प्रशिक्षणासाठी अर्ज / निविदा सादर केल्या आहेत व त्यांचे अर्ज / निविदा मंजुर करण्यात आलेल्या आहेत किंवा काय?

उत्तरः- दिनांक १५.२.२००२ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या जाहिर सुचनेनुसार व प्राप्त अर्जानुसार पुढील संस्थांचे अर्ज प्राप्त होते.

१) कॉम्प्युसॉप्ट कॉम्प्युटर एज्युकेशन उल्हासनगर.
२) मास्टर प्रो कॉम्प्युटर ॲण्ड कमर्शियल इस्टिटयुट उल्हासनगर.
३) मेसर्स मानालीसा मेंहदी व ब्यूटी पार्लर, उल्हासनगर.
४) न्यू पॉप्यूलर मोटार ट्रेनिंग स्कूल, उल्हासनगर.
५) श्री. स्वामी समर्थ शिवणकला शिक्षण व बहूउददेशीय संस्था, उल्हासनगर.

वरील प्राप्त अर्जापैकी अनु. १ ते ४ हे अर्ज शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे व समक्ष ठिकाणांची पहाणी करून मंजुर करण्यात आलेले होते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. ९८ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ९८:-</u> एम.एस.ई.बी. हॅस इन्स्टॉलेड ट्रान्सफॉर्मर ॲण्ड इरेक्टेड द पोलस इन वोल टाउनशिप. वेदर दे हॅव ऑबटेनेड नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट / परमिशन फॉर्म यु.एम.सी.

वेदर एम.एस.ई.बी. पेड रेंट फोर द ट्रान्सफॉर्मर / पोल्स इरेक्टेड, इफ येस, हाउ मच अमाउंट रिवाईड / पेड बाय देम , इफ नॉट गिव रिझन्स.

<u>उत्तरः-</u> महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून ना हरकत दाखलासाठी विदयुत ट्रान्सफार्मरचे अर्ज नकाशासह या विभागास सादर केल्यानंतर जागेची पाहणी करुन तसा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठीसादर करण्यात येतो. सदर सभेची मंजुरी घेतल्यानंतर सदर विदयुत ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत ना हरकत दाखला देण्यात येतो. उदा. नंदा गार्डन क्र. ४४४ उल्हासनगर-१ येथे स्थायी समिती ठराव क्र. ६५ , दिनांक २९.१०.१९९९ च्या अन्वये मंजुरी घेऊन ना हरकत दाखला देण्यात आले आहे.

गेल्या तीन वर्षापूर्वी जेव्हा-जेव्हा एम.एस.ई.बी. ने ट्रान्सफार्मरसाठी विनंती केलेली आहे. तेव्हा वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेऊन ना हरकत दाखला दिलेला आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडुन रस्ता लगत बसविण्यात येणारे ''विद्युत खांबा'' बाबत कोणतेही भाडे या विभागाकडून घेतले जात नाही. कारण जेवढे भाडे त्यांचेवर लावण्यात येईल तेवढेच भाडे सरचार्ज म्हणून विद्युत बिलामार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ परत वसुल करणार, या कारणास्तव कोणतेही भाडे आकारण्याचे प्रश्न उदभवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला होता. साहेब उत्तर मराठीत आहे तुम्ही मला सांगा. मला मराठी कमी येते. आम्हाला समजत नाही मराठीमध्ये तुम्ही सांगा. आम्ही इंग्रजीत प्रश्न विचारला तुम्ही मराठीत उत्तर दिले आहे. म्हणुन आम्हाला अडचण येते. तुम्ही समजवा मग मी त्यावर चर्चा करतो. आमचा एक सुझाव आहे. आम्ही जर इंग्रजीत प्रश्न विचारतो त्याचे उत्तर तुम्ही इंग्रजीत दिले पाहिजे. आम्ही जर हिंदीत प्रश्न विचारला तर तुम्ही उत्तर मराठीत देता. माझा इंग्रजीत प्रश्न होता मला त्याच भाषेत उत्तर दया.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, सभागृहाच्या कामकाजाची भाषा मराठी आहे, म्हणुन मराठीत उत्तर दिले जाते. भलेही तुम्ही मराठीत, हिंदीत, इंग्रजीत प्रश्न विचारा. उत्तर मराठीत दिले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>माझी यावर हरकत आहे? मला एक गोष्ट सांगा तुम्ही कधी इंग्रजीत पत्रव्यवहार करीत नाही का?तुम्ही कधी इंग्रजीत टिप्पणी लिहित नाही का? आम्ही प्रश्न इंग्रजित विचारला तुम्ही पत्र इंग्रजीत लिहिता तर इंग्रजित उत्तर देण्यास काय हरकत आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी पुन्हा एकदा पुनरावृत्ती करतो. महापालिकेचे कामकाज, सभागृहाचे कामकाज मराठीत चालते. सदस्यांनी पण आपला प्रश्न मराठीतच विचारला पाहिजे. जरी इंग्रजी आणि हिंदीत प्रश्न विचारला तरी आम्ही उत्तर देतो परंतु मराठीतच.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-ठिक आहे. मला जरा हिंदीत सांगा. आम्हाला मराठी समजत नाही मग आम्ही कसा प्रश्न विचारणार? हे जरूरी नाही की आम्हाला मराठी आले पाहिजे. बाकी तुमचे कामकाज मराठीत चालते. आम्हाला उत्तर समजत नाही. तुम्ही हिंदीत समजवा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, आम्ही जे उत्तर दिले मराठीत सदस्याला समजावे म्हणुन इंग्रजीत भाषांतर करून सांगु शकतो. यात असे लिहिले आहे की स्थायी समितीच्या मान्यतेने एम.एस.ई.बी. ला वेळोवेळी ट्रान्सफरमरसाठी एन.ओ. सी. दिली जाते. असे उत्तर इथे दिले गेले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आम्ही विचारले की त्यांनी ना हरकत दाखला घेतला आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-द ॲन्सर शुड हॅव बीन इन आयदर एस ऑर नो इन धिस पर्टीक्युलर केस. इफ द टाऊन प्लानर इज ॲव्हीलेबल वीथ पीसी. त्यांना सभागृहात बोलावले जाईल. त्यांना उत्तर देण्यासाठी सांगितले जाईल. मला वाटले आज जास्तीत जास्त पंधरा-वीस प्रश्न होतील म्हणुन पीसी मी सोबत आणली नाही. या पर्टीक्युलर प्रकरणात एन.ओ.सी घेतली की नाही त्याचे उत्तर हो किंवा नाही मध्ये असेल मला वाटते इथे उत्तर दिले आहे. होय. देण्यात आले आहे. एन.ओ.सी. दिली गेली आहे असे इथे उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-प्रश्नास मान्यता मिळाली की नाही या रकान्यात होय म्हंटले आहे. उत्तरामध्ये नाही.

(इथे मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी प्रश्न पुन्हा वाचत असताना...)

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया मी सदनाला विनंती करेन की, माझ्याकडे इथे संचिका नसल्यामुळे मी विनंती करतो की, पुढील महासभेत मी याचे सविस्तर उत्तर देईन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-काही हरकत नाही. ठिक आहे.

**मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा व श्री. नथु सोनावणे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ९९ श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. ९९:-न्यायालयीन स्थगन आदेशाच्या आधारे नमेणूकीच्या अथवा पदोन्नतीच्या जागेवर एकण किती कर्मचारी उमापात कार्यरत आहेत? त्यांची नावे काय? ते कोणत्त्या पदांवर कार्यरत आहेत?

उत्तरः- कामगार / औद्योगिक न्यायालयीन स्थगन आदेशाच्या आधारे एकुण ७६९ कर्मचा-यांच्या नेमणूकी कार्यरत आहेत.

एक-एक कर्मचा-यांची माहिती दिल्यास लांबलचक यादी तयार होईल, सदर यादी विधी विभागात पाहणीसाठी उपलब्ध आहे. हया सर्व कर्मचा-यांना दिनांक २.११.१९९६ च्या प्रशासकिय ठरावान्वये कायम करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या स्थगती आदेशाच्या आधारे खालील अधिकारी /कर्मचारी पदोन्नतीच्या जागेवर कार्यरत होते.

श्री. राजु कुकरेजा, जकात निरिक्षक

श्री. गोपाल जेसवानी, करनिरिक्षक /भांडारपाल, (सदस्याचे पद)

श्री. प्रकाश कुकरेजा, विधी अधिकारी, महापालिका सचिव (सदस्याचे पद)

श्री. ईश्वर रामचंदानी, उप-लेखा अधिकारी, लेखा अधिकारी (सदस्याचे पद)

श्रीम. मनिषा धरमपाल, जकात निरिक्षक

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, या प्रश्नाचे उत्तर जे याठिकाणी दिलेले आहे की, कामगार औद्योगिक न्यायालय स्थगन आदेशाच्या आधारे एकुण ७६९ कर्मचा-यांच्या नेमणुकी कार्यरत आहेत. तर उत्तर जरी याठिकाणी छापील स्वरूपामध्ये दिलेले असले तरी पुन्हा एकदा मला या सभागृहामध्ये त्या उत्तराची खातरजमा करून घ्यायची आहे. हा आकडा आहे तो बरोबर आहे का की प्रीन्टींग मिस्टेक आहे.

मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>बरोबर आहे. यादी पण माझ्याकडे उपलब्ध आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, आपल्या माध्यमातुन मी आयुक्त महोदयांच्या निर्दशनास आणु इच्छितो की जर एखादया महापालिकेच्या प्रशासनामध्ये ७६९ ऐवढे कर्मचारी जर विविध न्यायालयाच्या स्थगन आदेशाच्या आधारे काम करत असतील तर ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने गंभीर नाही का?त्या प्रकरणामध्ये आपण नेमकी काय काय पावले उचलली. या न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आपण काय केले? आणि त्या प्रकरणामध्ये कुठलेही निकाल लागलेले आहेत का महापालिकेच्या बाजुने किंवा विरोधामध्ये? आणि लागले नसतील तर का आतापर्यंत ती प्रकरणे प्रलंबित आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा महापौर महोदया, कोर्टाच्या आदेशामुळे काम करणा-या कर्मचा-यांची संख्या जास्त दिसत आहे. त्याची काही कारणे आहेत. आधी तर ९६ पर्यंत आस्थापना सुची जी पाहिजे होती ती इथे नव्हती. महापालिका झाल्यानंतर प्रॉपर एस्टॅब्लीशमेंट शेडयुल तयार झाले. मंजुर पदापेक्षा जास्त कर्मचारी कामावर होते. त्यांना कामावरून काढले तर ते कर्मचारी कामगार न्यायालये किंवा औद्योगिक न्यायालयात जायचे. कामाची जरूरत होती पण मंजुर पदे नसल्यामुळे त्या कर्मचा-यांना कामावर नियमित करणे प्रशासनाला शक्य नव्हते. परंतु कोर्टाच्या आदेशामुळे त्या व्यक्तीस सेवेत नियमित करणे जरूरी होते म्हणुन ते लोक काम करत आहेत. परंतु त्यानंतर आता आस्थापना सुची मंजुर होवून आली आहे. असे जितके कर्मचारी आहेत. जे कोर्टाच्या आदेशान्वये काम करत आहेत. व ज्यांची सेवा नियमित केली जावू शकते. ज्यांची भरती पण कायदेशीर आहे. अशा लोकांना नियमित करण्याची कार्यवाही देखिल सुरू आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u> मा. महापौर महोदया, मागे झालेले ४०-४१ नंबरचे प्रश्नाच्या अनुषंगानेदेखील हा विषय महासभेत आला होता की, २.११. १९९६ चा जो प्रशासकिय ठराव आहे, या प्रशासकिय ठरावाच्या आधारे महापालिकेमध्ये ज्यांना गेल्या आधीच्या तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षामध्ये त्यांचे २४० दिवस पूर्ण झाले आहे. अशांना आणि ज्यांनी न्यायालयाचे आदेश आणले आहे, अशा कर्मचा-यांना कायम करुन घेण्याचा ठराव हा होता. २.११.१९९६ चा तर आपण जर मागच्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये जर गेलो तर २.११.१९९६ च्या ठरावान्वये कायम झालेले जे कर्मचारी आहेत, ती संख्या जर उप-आयुक्त ,

मुख्यालय यांनी सांगितली किती आहे? आणि या ठिकाणी असे म्हटले आहे, ७६९ कर्मचा-यांचे नेमणूका स्थगन आदेशाच्या आधारे कायम आहे, कार्यरत आहेत, या सर्व कर्मचा-यांना २.११.१९९६ च्या प्रशासकिय ठरावान्वये कायम करण्यात आलेले आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो, २.११.१९९६ चा जो प्रशासकिय ठराव होता, त्या ठरावाचा फायदा या उत्तराच्या दृष्टीने असे कळते की, ७६९ कर्मचा-यांना झालेला आहे. परंतु मला असे वाटते की, प्रत्यक्षात प्रशासनाची जी उपलब्ध आकडेवारी आहे, त्याच्यामध्ये हा आकडा कमी आहे, २.११.१९९६ च्या ठरावान्वये कायम झालेल्या कर्मचा-यांचा आकडा ७६९ पेक्षा कमी आहे, अशी माझी माहिती आहे, याच्यावरती जर मुख्यालयाने खुलासा केला तर बरे होईल.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उप-आयुक्त,मुख्यालय):-</u> कृपया परत प्रश्न विचारा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u> उल्हासनगर महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर या ठिकाणी ज्याच्याकडे प्रशासक पदाचा कार्यभार होता. त्या पृथ्वीराज बायस यांनी आपल्या प्रशासकिय अधिका-याचा वापर करुन ठराव संमत करुन घेतला होता. आणि त्या ठरावान्वये या नगरपालिकेमधील त्यांच्या आधी तीन वर्षे प्रत्येक वर्षे ज्यांना २४० दिवस पूर्ण झालेले आहे, आणि त्यांच्याकडे न्यायालयाचे आदेश आहेत, अशा कर्मचा-यांना सेवेमध्ये अस्थायी पदावर कायम करण्याचा ठराव होता, त्या ठरावाचा फायदा ज्यांना मिळाला आहे, अशा कर्मचा-यांची संख्या किती आहे, कारण ९९ क्रमांकाच्या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे, त्याच्यानुसार असे कळते की, जे ७६९ कर्मचारी न्यायालयाच्या स्थगन आदेशाद्वारे काम करत होते, त्या सर्व कर्मचा-यांना २.११.१९९६ च्या ठरावान्वये कायम करण्यात आलेले आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, त्या ठरावाचा फायदा किमान ७६९ कर्मचा-यांना झालेला आहे, माझी अशी माहिती आहे, त्या प्रशासकिय ठरावाचा प्रत्यक्ष फायदा ज्यांना मिळाला आहे, अशी कर्मचा-यांची संख्या कमी आहे. कारण तुम्ही ४०-४१-४२ जे प्रश्न आहेत, त्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये त्यांनी सांगितलेले आहे की, नगरपालिकेला महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर या महापालिकेत कायम नेमणुका झाल्या का? त्यावेळी तुमचे उत्तर आहे की, ५५८ कायम नेमणुका झालेल्या आहेत, आज या उत्तरामध्ये असे ऐकायला मिळते की ७६९ कर्मचा-यांना त्या ठरावामुळे कायम करण्यात आले. खरे उत्तर काय?

<u>श्री. दत्ता भडकवाड(उप-आयुक्त,मुख्यालय):-</u>मा. महापौर महोदया,सन्माननिय आयुक्त साहेब, आणि सन्माननिय सदन हे जे प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे, या उत्तराची जी आकडेवारी आहे न्यायालयाच्या आदेशानुसार हे कर्मचारी लागलेले आहे, आणि त्याच्यामध्ये स्थगन आदेश न्यायालयाचे व औद्योगिक न्यायालयाचे जे होते, त्याच्या आधारे ७६९ कर्मचारी कार्यरत होते असे उत्तर दिलेले आहेत, दि. २.११.९६ च्या प्रशासकीय ठरावानुसार जे कर्मचारी लागलेले आहेत त्यांची संख्या आणि या संख्येमध्ये तफावत असु शकते त्यांचे कारण असे आहे की, सर्वच प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या स्थगन आदेशाच्या आधारे २.११.९६ नंतर त्यांना कायम करण्याची कार्यवाही झालेली नाही कारण काही केसेसमध्ये महापालिका अपिलमध्ये गेलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>याठिकाणी उत्तर असे दिले आहे. उत्तर एकदम स्पष्ट आणि व्यवस्थित आहेत. यासर्व कर्मचा-यांना २.११.९६ च्या ठरावान्वये कायम करण्यात आलेले आहे असे उत्तर आहे. उत्तर काय दिलेले आहे तुम्ही ९९ च्या प्रश्नाला की, यासर्व कर्मचा-यांना म्हणजे ७६९ कर्मचा-यांना २.११.९६च्या ठरावान्वये कायम करण्यात आले आहे असे उत्तर आहे की नाही? माझ्याकडे ४३ क्रमांकाचा प्रश्न आहे तुमच्याकडे नसेल तर मी त्यांना असे विचारले होते. २० ऑक्टोबर ९६ नंतर ते आजपावेतो उल्हासनगर महानगरपालिकेत मंजुर नामंजुर पदांवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये किती नविन

नेमणुका झाल्या आहेत? त्यावेळेला आपण उत्तर दिलेले आहे. वर्ग ३ मध्ये ८१, वर्ग ४ मध्ये ४९७ असा ५७८चा आकडा आपण दिलेला आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो आपल्या उत्तराप्रमाणे की २० ऑक्टोबर ९६ नंबर म्हणजे महापालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर ५७८ नेमणुका झाल्या आहेत व या उत्तरात असे दिसते की तो आकडा ७६९ आहे. यामध्ये मला असा आरोप करायचा नाही की यामध्ये काही गडबड आहे परंतु या दोन उत्तरामध्ये विसंगती आहे. एकाच महासभेमध्ये विचारलेल्या दोन प्रश्नामध्ये उत्तरामध्ये विसंगती आहे. एकाठिकाणी आपण असे म्हंटले आहे की महापालिकेनंतर ५७८ नेमणुका झाल्या आहेत आणि ९९ क्रमांकाच्या प्रश्नामध्ये असे म्हंटले आहे की, ७६९ कर्मचारी कायम झाले आहेत. त्याचा नेमका प्रकार काय? मी ज्यावेळेला ४० ते ४५ क्रमांकाचे प्रश्न होते. त्यावेळेला मी या सभागृहामध्ये आरोप केला होता की त्यावेळेला नगरपालिकेच्या सेवेमध्ये जे कर्मचारी नव्हते. ते सुध्दा १.११.९६च्या ठरावान्वये कायम करण्यात आलेले आहेत असा मी आरोप केला होता. त्यावेळेला आयुक्तांनी सांगितले होते की, या प्रकाराची चौकशी करू. या महापालिकेमध्ये दुर्दैव असे होते की गंभीर प्रश्नाचा अभ्यास करायचा माहिती खोदुन काढायची, ती खोदुन काढल्यानंतर महासभेमध्ये आल्यानंतर ते मांडायचे आणि आयुक्तांनी दिलेल्या आश्वासनाचा पाठलाग पण आपणच करायचा. तर हा प्रकार गंभीर आहे. हा जो प्रश्न आहे तो प्रशासनाबद्दल आहे. खरे म्हणजे ही तुमची डोकेदुखी आहे. तुम्ही ती व्यवस्थीतपणे सोडविली पाहिजे. पुढे आणखी प्रश्न आहेत. त्यानंतरचा प्रश्न सुध्दा गुंतागुंतीचा आहे. १०० क्रमांकाचा प्रश्न परंतु आधी आपण यावर खुलासा करू या की २० ऑक्टोबर ९६ नंतर महापालिका झाल्यानंतर ५७८च नेमणुका झाल्या की ७६९.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उप-आयुक्त,मुख्यालय):-</u> मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी जो प्रश्न विचारला आहे. की पुर्वी या सभागृहामध्ये दिलेले उत्तर आणि आजच्या उत्तरामध्ये तफावत आहे. पुर्वीच्या प्रश्नामध्ये त्यांनी असा उल्लेख केलेला होता की महानगरपालिका झाल्यानंतर किती कर्मचा-यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे ५७८ चे उत्तर दिलेले आहे. नविन नियुक्त्या या प्रश्नामध्ये सर्व न्यायालयाच्या स्थगन आदेशाव्दारे असणारे ७६९ कर्मचा-यांचा उल्लेख आहे. महापालिकेच्या अगोदरचे सुध्दा त्यामध्ये समाविष्ट असु शकतात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>ते ५७८ आणि हे ७६९ हे वेगवेगळे आहेत की ५७८ हे ७६९ मध्ये समाविष्ट आहेत.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उप-आयुक्त,मुख्यालय):-</u> ७६९ मध्ये ५७८ समाविष्ट आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>७६९ नेमणुका तुम्ही कायम केल्या असणार. प्रशासकीय ठरावानुसार आपण यांना कायम केले. कायम केले म्हणजे त्यांच्या नेमणुका केल्या ना? का नेमणुकांशिवाय कायम झाली? आधी हे जे कर्मचारी होते ते रोजंदारीवर होते त्यांना न्यायालयाच्या स्थगन आदेशानंतर आपण कायम केले. कायम केले म्हणजे नेमणुका केल्या. पण माझ्या आधीच्या प्रश्नामध्ये यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे या महासभेमध्येच प्रश्न क्र. ४३ आणि प्रश्न क्र. ९९ या दोन प्रश्नाच्या उत्तरामध्ये तफावत आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापौर महोदया, मला वाटते की सन्माननिय सदस्यांना असे म्हणायचे आहे की, ९६ सालचा जो ठराव आहे त्यानुसार ज्यांना लाभ मिळायला पाहिजे होता त्या व्यतिरिक्त काही लोकांना फायदा दिला गेला जे पात्र नव्हते. ९६च्या ठरावाचे जे पण निकष होते. जे पात्र नव्हते त्यांना फायदा दिला गेला जर असे आहे तर दोन महिन्यापुर्वी इथे महासभेमध्ये आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते असे जर काही अपात्र

कर्मचारी असतील परंतु ज्यांना या ठरावाचा लाभ मिळाला आहे. त्याबद्दल चौकशी केली जाईल. मी पण असे आश्वासन पुन्हा देवू इच्छितो.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-याबाबतीत या सभागृहामध्ये मला कुठल्याही कर्मचा-यांवर वैयक्तिक हमला करायचा नाही. परंतु या सभागृहामध्ये मी एक उदाहरण मुददामहून देवू इच्छितो की,या महापालिकेमध्ये एका तात्पुरत्या नेमणुकीच्या प्रकरणात न्यायालयाचा असा आदेश आहे की कायदयाची प्रक्रिया पार पाडल्याशिवाय काढण्यास प्रतिबंध हा स्टे आहे का? तर इथे फक्त काढण्यास प्रतिबंध ऐवढेच केले गेले. आणि कायदयाची जी प्रक्रिया आहे ती मात्र इतर कर्मचा-यांच्या बाबतीत पार पाडली गेली आणि या कर्मचा-यांच्या बाबतीत पार पाडली गेली नाहीत. तर असे प्रकार खरे याठिकाणी व्हायला नको. जर एकच धोरण स्विकारले पाहिजे की जर आपल्याला या महापालिकेत तात्पुरते कर्मचारी ठेवायचे नाहीत तर मग आपण सगळेच कर्मचारी काढले पाहिजेत. जर आपल्याला तात्पुरते कर्मचारीना सेवेत सामावुन घ्यायचे असतील तर जर सात असतील तर सातही जणांना सामावुन घेतले पाहिजे. सहाच्या विरूध्द अपिल आणि दोघांच्या विरूध्द नाही. ही गोष्ट अनाकलनिय आहे. ही समतेच्या पलिकडील गोष्ट आहे. तुम्ही जर हे उत्तर बघितले तर मी महापौरांच्या परवानगीने १०० क्रमांकाचे उत्तर देखिल इथे जोडुन घेवू इच्छितो की, ९९ मध्ये असे म्हंटले आहे की, ७६९ कर्मचा-यांच्या नेमणुका त्यांना कायम केले आहे. आणि १०० क्रमांकाच्या उत्तरामध्ये असे म्हंटले आहे की, न्यायालयीन आदेश असतानाही केवळ महापालिकेने वरिष्ठ न्यायालयात अपिल केल्याने कार्यरत होवू न शकलेले किंवा कार्यरत करून न घेतलेले एकुण २१ कर्मचारी आहेत. ७६९ कर्मचारी या महापालिकेत कायम होतात आणि २१ कर्मचा-यांनी काय घोडे मारले महापालिकेचे? ७६९ हा आकडा मोठा आकडा आहे, त्यांना २.११.९६ च्या ठरावाचा फायदा देवून कायम करून घेतो या बिचा-या २१ कर्मचा-यांनी काय घोडे मारले आहे? त्यांची नावे सुध्दा आलेली आहेत आणि मी मघाशी जसे सांगितले की याठिकाणी असे कर्मचारी काम करत आहेत की कायदयाच्या प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय काढण्यास प्रतिबंध या वाक्याचा स्टे म्हणुन वापर करून इथे कर्मचारी काम करत आहेत. माझे इथे ठाम मत आहे की हा स्टे नाही. परंतु तो स्टे सारखा वापरला गेला हा कुणाचा दोष आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र.१०० हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. १००:- न्यायालयीन आदेश असतानाही केवळ महापालिकेने वरिष्ठ न्यायालयात अपील केले म्हणून कार्यरत होऊ न शकलेले किंवा कार्यरत करून न घेतलेले एकुण किती कर्मचारी आहेत? त्यांची नावे काय?

उत्तरः- न्यायालयीन आदेश असतांनाही केवळ महापालिकेने वरीष्ठ न्यायालयात अपील केल्याने कार्यरत होऊ न शकलेले किंवा कार्यरत करुन न घेतलेले एकूण -२१ कर्मचारी आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत :-१) श्री. दिपक दबाणे व इतर १७ कर्मचारी, विंधन विहिर देखभाल, पा.पु.वि. २) श्री. संजय पवार, शिपाई, अतिक्रमण ३) श्री. जगदीश टेंबे, लिपिक, साप्रवि ४) श्रीम. शैलजा क्षिरसागर, लिपिक, लेखा विभाग.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महापौर महोदया, आता जे म्हंटले आहे विदआऊट फॉलोव्हीग डयु प्रोसेस ऑफ लॉ रिट्रेचमेंट करण्यासाठी प्रतिबंध नाही. सन्माननिय सदस्य जे बोलत आहे त्यांच्याशी मी सहमत आहे. जर असे काही आदेश आहेत. की डयु प्रोसेस ऑफ लॉ फॉलो केल्याशिवाय त्यांना काढु शकत नाही. जर महापालिकेने त्यामध्ये डयु प्रोसेस फॉलोअप नाही केले त्या व्यक्तीला नियमित केले ते पण चुकीचे ठरेल. ती डयु प्रोसेस फॉलो केली जाईल

व अंतिम निर्णय घेतला जाईल. आणि हे जे २१ कर्मचारी आहेत त्यांच्याबाबत आम्ही अपिल दाखल केला आहे. त्यामुळे ते आता कामावर नाहीत. त्यांच्या प्रकरणांचा देखिल अभ्यास केला जाईल. व त्यामध्ये जो योग्य निर्णय वाटेल तो न्यायोचित असेल. इन द इंटरेस्ट ऑफ जस्टीस तो निर्णय घेतला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>साहेब आणखी एक गंभीर बाब मी निर्देशनास आणुन देवू इच्छितो की ज्यावेळेला सहा कर्मचा-यांच्या विरूध्द त्यांच्याकडे लेबर कोर्टाचा आदेश आहे की यांना एक तर कामावर घ्या किंवा यांना घरी बसवुन ८० टक्के पगार दया. त्याविरूध्द महापालिका औदयागिक न्यायालयात अपिलमध्ये जाते. औद्योगिक न्यायालयाने कोणत्त्याही प्रकारचा स्टे दिलेला नाही त्यामुळे लेबर कोर्टाचा जो आदेश आहे तो अजुनही चालु आहे. त्या सहा कर्मचा-यांपैकी दोन कर्मचारी जवळ जवळ ६-८ महिन्यानंतर लेबर कोर्टाचा आदेश घेवून त्याचा फायदा घेवून आतमध्ये येतात. आणि बाकीचे बिचारे चार लोक कोर्टात झगडत राहतात. तर एकच खरे म्हणजे पॉलिसी पाहिजे. श्री. शाम इसरानी नावाचा जो कर्मचारी आहे तुम्ही त्याचे प्रकरण तपासुन घ्या. की त्याच्या प्रकरणामध्ये त्याला जी ऑर्डर होती ती बाकीच्यांना पण होती परंतु सहा कर्मचा-यांना जी ऑर्डर आहे आपण एकाला घेतो तर सहांना का नाही? माझे असे म्हणणे आहे की या प्रकरणाचा आपण जर तपास केला तर आपणांस कळेल की, आता जे कर्मचारी कुठला मार्ग अवलंबला मला माहित नाही. परंतु ते आता कायम झालेले आहेत. कदाचित त्यांना काढण्यामध्ये अनेक अडचणी येतील. या २१ कर्मचा-यांवर अन्याय होवू नये त्याच्या बाबतीत आपण एकतर त्यांच्या न्यायालयीन प्रकरणांचा लवकर निपटारा करा. बाकीच्यांना पण तोच न्याय लावा. किंवा इथे जे कर्मचारी काम करतात त्यांना जो न्याय दिला यांना पण तोच न्याय दया. म्हणजे कुणाही बाबतीत विषमतेचे धोरण असु नये. ऐवढी सभागृहाला विनंती आहे.

<u>मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. १०० विषयी जी आपली शंका होती. तुमचे म्हणणे आहे की काही लोकांना कोर्टाचे आदेश असुन देखिल कामावर घेतले नाही. व अशी चार प्रकरणे आहेत. एक आहे श्री. दिपक दबाणे व इतर १७ लोक जे बोअरवेलमध्ये काम करत होते. त्यांना कनिष्ठ न्यायालयाकडुन आदेश मिळाले होते वरीष्ठ न्यायालयात ते रदद झाले. आम्ही अपिल मध्ये ते जिंकले. दुसरे जे श्री. संजय पवार आहेत त्याची नियुक्ती २.११.९६ नंतर केली गेली आहे. सहा महिने पेक्षा जास्त कालावधी नव्हता. त्यानंतर देखिल त्याला आदेश मिळाले म्हणुन अपिलमध्ये गेले. २४० दिवस पुर्ण नव्हते झाले म्हणुन त्या ठरावाचा फायदा त्यांना मिळु शकत नाही. श्री. जगदीश तांबेचे पण तसेच प्रकरण होते. २.११.९६ पुर्वी त्याला सहा महिने झाले होते. श्रीमती. शैलजा क्षीरसागर यांना देखिल २. ११.९६ पुर्वी कामावर ठेवले होते. त्यावेळेचे तत्त्कालिन आयुक्त श्री. शुळ साहेब होते. तीच्या आदेशात असे लिहिले होते की, वुई कॅन नॉट टर्मिनेट हर विदाउट ड्यु प्रोसेस ऑफ लॉ. तिला २४० दिवस पुर्ण नव्हते झाले. म्हणुन तत्त्कालिन आयुक्त यांनी तिचे टर्मिनेशन ऑर्डर सही केले होते. त्यानंतर ते कोर्टात गेले कामगार न्यायालयातुन जिंकुन आले. लेबर कोर्टात जिंकल्यानंतर ते प्रकरण अपिलमध्ये आहे. स्टे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>तुम्ही आता जे सांगितले शुळ साहेबांचा संदर्भ देवून त्यांनी टर्मिनेट केले. त्या दरम्यान असेच समान प्रकरण महापालिकेत होते. त्यांच्या बाबतीत मात्र असा निर्णय घेतला गेला नाही हे खरे आहे का? जसे मी आता सभागृहासमोर मांडले की, जर समजा ७-८ कर्मचारी आहेत. व ७-८ कर्मचा-यांना सहा महिन्यानंतर सेवा खंडीत करून त्यांना टर्मिनेट करायचे आहे. त्यातील काही लोकांना माहित पडले की आम्हाला काढणार आहेत. ते आधीच कोर्टात गेले. त्यांनी कोर्टात भिती व्यक्त केली की आम्हाला बहुतेक कामावरून काढले जात आहे. कोर्टाने आदेश दिले की तुम्ही प्रोसेस फॉलोअप केल्याशिवाय

त्यांना टर्मिनेट करू शकत नाही. ती जी प्रोसेस आहे ती सहा कर्मचा-यांपैकी काही कर्मचा-यांबाबतीत अंमलात आणली गेली हे खरे आहे की नाही?

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्ही कुणाबाबतीत बोलता ते स्पष्टपणे सांगा तर आम्ही व्यवस्थित खुलासा करू शकु.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-शर्मिला माने यांच्या प्रकरणात काय झाले?

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-शर्मिला माने एक वर्षापुर्वीच कामावर होती. त्यांना शुळ साहेबांनी कायम करण्याचे आदेश दिले होते. त्यांना काढण्याचे आदेश दिले नव्हते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-त्यांच्याकडे कामगार न्यायालयाचा जो आदेश आहे त्यामध्ये काय लिहिले आहे?

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-त्यांना काढण्यापुर्वीच त्यांनी आदेश आणले होते की आम्हाला कामावरून काढण्यात येवू नये. कामावरून काढुन टाकण्यापुर्वीच त्यांनी आदेश आणले होते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-त्यांना काढु नये असा आदेश नव्हता ना. त्यांचा आदेश पण इतरां सारखाच होता ना?

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-ती कामावर असतानाच आदेश घेवून आली. कामावरून काढुन टाकल्यावर नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-मी सहा कर्मचा-यांविषयी सांगत आहे त्या सर्वांचे आदेश समान होते. कायदयाची प्रोसेस फॉलोअप केल्याशिवाय त्यांना कामावरून काढु नये.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्ही ठिक म्हणत आहात ना. कायदयाची प्रोसेस फॉलोअप केली पाहिजे. त्यांनतर शुळ साहेबांनी.........

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-हे प्रकरण वेगळे ठेवले होते.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-नाही नाही. शुळ साहेबांनी सर्वांचे आदेश पाहिले आणि त्यांनतर निर्णय घेतला. शैलजा क्षिरसागर यांना एक चेक दिला नंतर टर्मिनेशन ऑर्डर दिले. त्यांनतर त्यांनी कोर्टात आव्हान केले. कोर्टातुन आदेश मिळाले की यांना कामावर घेतले जावे किंवा ८० टक्के पगार दिला जावा. त्यानंतर आम्ही अपिल दाखल केले जे अजुन पर्यंत प्रलंबित आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-महापौर महोदया, मी पुन्हा तिच विनंती करतो की, हे जे सर्व प्रकरण आहे यांची पुर्नतपासणी केली जावी. आणि या प्रकरणात कुणाविषयी काय निर्णय घेतले गेले ते पहावे. माझी एकच विनंती आहे की मी इथे कुणाला काढावे किंवा ठेवावे यासाठी प्रश्न नाही विचारला. यामागे जो उददेश आहे की सगळयांना समान न्याय मिळाला पाहिजे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र.१०१ हा श्री. राज असरोंडकर यांचा असून तो प्रशन नाकारण्यांत आला आहे.

प्रश्न क्र.१०२ ,१०३ , श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. १०२:-सदरच्या न्यायालयीन दाव्यांवर महापालिकेच्या आतापर्यंत किती खर्च झाला आहे?

उत्तर:-एकुण ७६९ कर्मचा-यांकरिता ९९ तक्रारी कामगार औद्योगिक न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. प्रत्येक तक्रारीसाठी न्यायालयीन खर्च प्रति तक्रार रू. ३,०००/- निकाल लागेपर्यंत असनू रू. १५,०० रक्कम अंतिम सुनावणी प्रलंबित प्रति तक्रार देण्यात आली आहे. सद्या या दाव्यांवर आतापर्यंत एकुण खर्च रू. १,४८,५००.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-ठिक आहे.

प्रश्न क्र. १०३:-महापालिकेच्या विधी विभागात कोण कोणती प्रत्येकी किती पदे मंजुर आहेत? त्यापैकी कोण कोणती पदे भरलेली आहेत?

उत्तर:-महापालिकेच्या विधी विभागात खालील पदे मंजुर व भरलेली आहेत

| | | |
|---|---|---|
| १. विधी अधिकारी | १ | रिक्त पद अतिरिक्त कार्यभार महापालिका सचिवांकडे |
| २. वरिष्ठ लिपिक | १ | ०१ |
| ३. क. लिपिक | १ | ०१ |
| ४. शिपाई | २ | ०२ |

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र.१०४, १०५ हा श्री. राज असरोंडकर यांचा असून ते प्रश्न नाकारण्यांत आलेले आहे.

प्रश्न क्र. १०६ हा श्रीमती. रेखा कारीरा यांचा आहे.

प्रश्न क्र. १०६:- सरकारी जागेवर सी.सी. पॅसेज तोडुन अनाधिकृत बांधकामाची महानगरपालिकेत कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता महाराष्ट्र कला उदयोग मंदिर चंद्रकांत बागडे यांचे आर.सी.सी. बांधकाम जागेत सुरु असल्याबददल बॅ. क्र.० १४०२ जवळ उल्हासनगर महानगरपालिका शौचालय बाजुची जागा अनाधिकृत बांधकाम करून वासु रेयरा यांनी जनतेला येण्या-जाण्याचा मार्ग बंद केल्याबददल...

१) महानगरपालिकेची कायदेशीर परवानगी आहे का?
२) रस्त्याचे काम झाल्यानंतर पाच वर्षांनी बांधकाम करण्यास का घेतले?

उत्तर:- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत महापालिकेने शहरातील ३३ मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते. त्यावेळी रोड क्र६ मध्ये श्री. चंद्रकांत बगाडे यांच्या दुकानाचा काही भाग रस्ता रुंदीकरणाने बाधित झाल्याचे नगररचना विभागाकडील नकाशा व पत्रावरुन दिसून येते. तत्कालीन महासभेने रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या व्यक्तींना भरपाई म्हणून जे बांधकाम रस्ता रुंदीकरणात निष्कासीत झाले आहे, तेथे तळमजला + २ मजले बांधावे अशी चर्चा महासभेत झाली होती. त्यानुसार श्री. चंद्रकांत बागडे यांनी सदरचे बांधकाम केले आहे.

१) रस्त्याचे बाजुने शौचालयाला जाण्याची जागा होती कि नाही याबाबत अभिप्राय शहर अभियंता यांच्याकडून मागविला आहे. त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२)३३ रस्त्यांच्या विकासाचे काम सन १९९९ या वर्षामध्ये सुरू केलेले आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामांना ५ वर्षे पुर्ण झालेली नाहीत. त्यामुळे सदर प्रश्नाचा अर्थबोध होत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कारीरा:-</u>ठीक आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र.१०७ श्री.यादव लालबिहारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १०७:-१)</u>आय.आर.डी.पी. के तहत ३३ रास्तों का कार्य सुरू किया गया था.
२)कुल कितने रास्तों का काम पुरा हो गया है और कितने रास्तों का काम बाकी है. इन रास्तों को पुरा करने की अवधि कब तक थी?
३)कुल कितने ठेकेदारों को ''वर्क कम्पलेशन सर्टिफिकेट'' दिया गया है व किन-किन रास्तों का?
४)क्या शहर अभियंता इन ३३ रास्तों के कामो कि ''क्वालिटी'' से संतुष्ठ है?

<u>उत्तर:-</u>हॉ.
१)पुर्णत्त्वका प्रमाणपत्र दिये हुअे पुरे काम ४.
२)अंतिम बील तयार करने का ५ पुरे काम. (उदा. चेकर्स टाईल्स, कर्ब स्टोन, गटारावरील कव्हर्स इ)१५
अपुर्ण काम ८
एकुण काम ३२ काम

३)हर काम का पुरा करने की अवधि अलग-अलग था. इसका विस्तारपुर्वक विवरण सा.बा. कार्यालय में उपलब्ध है, उल्हासनगर महानगरपालिका की आर्थिक स्थिती कमजोर होने के वजहसे संबंधित ठेकेदारोंका भुगतान समयपर किया गया नही था. आर्थिक स्थिती में सुधार होने के बाद काम पुरा किया जायेगा.
४)निचे के निम्नलिखित ४ रोस्तो कम्पलिशन सर्टिफिकेट दिये गये है. १. हरमन मेहता से शहाड स्टेशन तक. २. शहाड स्टेशन से सी ब्लॉक चौक तक. ३. नं २०५८ से महानगरपालिका की हदद तक. ४. बॅ. क्र. १९१९ से वॉटर सप्लाय कंपाऊंड तक मे, २००१ में रास्तों का डांबरीकरण पुरा किया गया था. अभी दो बारिश हो जाने के बाद भी रास्तों की स्थिती संतुष्ठ जनक है.

<u>मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव:-</u>मा. महापौर, आयुक्त साहेब व सभेतील सदस्य, हा प्रश्न एक वर्षापुर्वी विचारला होता. प्रश्न क्र. येईपर्यंत इतका कालावधी गेला की काय विचारायचे हे पण लक्षात नाही. मी ३३ रस्त्यांविषयी प्रश्न विचारला होता. मला उत्तर दिले की ४ रस्ते पुर्ण झाले आहेत परंतु त्या ४ रस्त्यांमध्ये योग्य पध्दतीने जसे काम व्हायला पाहिजे. शहराचा पैसा लागत आहे. त्याचा सदुपयोग होत नाही. दुरूपयोग होत आहे. साईडमध्ये जे चेकर टाईल्स लावले जातात. त्यांची क्वालिटी अशी आहे की दोन फुटावर...

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>शहर अभियंता यांना वर बोलवा, लाट साहेबांसारखे खाली बसले आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापौर महोदया, या प्रश्नाच्या उत्तरात थोडी दुरूस्ती आहे. आठ-दहा महिन्यापुर्वी उत्तर दिले गेले आहे त्या उत्तरात जरा सुधारणा करायची आहे त्याबददल मी सदनाला माहिती देतो. पुर्णत्त्वाचे प्रमाणपत्र दिले गेलेले चार कामे सांगितली आहेत ती आता ५ आहेत. अंतिम बिल तयार करण्याचे पुर्ण काम पाच सांगितले होते आता बारा आहेत. अंशत: पुर्ण काम संकीर्ण बाकी उदाहरणार्थ चेकर टाईल्स कर्व स्टोन, कवर ते

पंधरा ऐवजी बारा झाले आहेत. अपुर्ण काम आठ ऐवजी आता तीन झाले आहेत. या उत्तरात अशी दुरूस्ती आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-अपुर्ण कामे किती?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तीन.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-पंधरा ते बारा तुम्ही सांगितले ते काय होते? अंशतः पुर्ण काम.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-अंशतः पुर्ण काम परंतु संकीर्ण बाकी.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-याचा अर्थ काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-संकीर्ण म्हणजे चेकर स्टाईल्स बसविणे किंवा जे बसविले त्याची तपासणी करणे. ते पंधरा ऐवजी बारा आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-व तीन जी अपुर्ण कामे आहेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तीन मध्ये एक डॉलफिनचा रस्ता आहे दुसरा ४ नंबर मार्केटचा जो रस्ता आहे तो आहे. व तिसरा खेमाणी कंपाऊंडच्या पुढे जो रस्ता जातो तो आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-एक रस्ता शांतीनगर ते पंचवटी स्टील येथुन जातो तो पण आहे ना यात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-जे ३३ कामे होती त्यापैकी दोन कामे रदद केली गेली होती. कल्याण अंबरनाथ रोडचे वायडिंग व पंचवटी स्टील लेन आहे. कल्याण अंबरनाथ रोड पासुन विठ्ठलवाडी स्टेशनकडे जाणारी पंचवटी स्टीलची जी लॅन आहे ती ड्रॉप केली होती. दोन कामे ड्रॉप केली होती.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-टोटल ३२ होत आहेत. ३१ व्हायला पाहिजे ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-काही कामे दोनदा मोजली गेली. अंशतः संकीर्ण जी अपुर्ण आहेत. त्यात ते दोनदा मोजले गेले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-अंतिम बिल पुर्ण करायचे बारा काम.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-बरोबर आहे ना हे बघा पाच कामे पुर्ण झाली. अंतिम बिल पुर्ण करण्याची बारा कामे एकुण १७. बारामध्ये चेकर टाईल्स किंवा संकीर्ण काम जे बाकी आहे ११ व अपुर्ण कामे ३ प्रत्यक्षात ३१ रस्तेच हाती घेतले आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-मी तेच म्हणत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-हे जे सार्वजनिक बांधकाम विभागाचे ३३ रस्त्याचे जे काम होते यात निविदेत अट होती याची देखभाल दुरूस्ती काम पुर्ण झाल्यानंतर २ वर्षापर्यंत ठेकेदारास करावयाचे आहे. तर पुर्णत्त्वाचा दाखला दिल्यानंतर दोन वर्ष का काम चालु असताना दोन वर्ष धरणार? कारण की मला नाही वाटत की पाच वर्षात हे रोड पुर्ण होतील.

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>ॲज पर टेंडर कंन्डीशन, सी. सी. दिल्यानंतर दोन वर्ष त्यांना मेंन्टेन करायचे आहे.*

*<u>मा. सदस्य जमनादास पुरस्वानी:-</u>३१ रस्त्यांचे जे काम पुर्ण झाले किंवा होत आहे त्यावर डांबरीकरण केले गेले आहे का?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>जो पर्यंत ते काम डिफेक्ट लायबिलीटी मध्ये आहे तोपर्यंत त्याच ठेकेदाराला ते काम करावे लागेल.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>हे तीन रस्ते जे बाकी आहेत ते काम सुरू न होण्याचे कारण काय?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>एकात कोर्ट केस आहे. डॉलफिन बाबत त्याचा अजुन अंतिम निर्णय झाला नाही. दुसरे काम सुरू केले गेले आहे. त्यात ३५ की ४५ असा निर्णय घ्यायचा होता ४ नंबरचा ३५ फुट करायचा निर्णय घेवुन डीपी प्रमाणे काम सुरू केले गेले आहे. व एक काम अजुन सुरू नाही झाले ते पण लवकरात लवकर सुरू करण्यात येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सन्माननिय महापौरजी, मा. आयुक्तांनी असे सांगितले की, पंचवटी स्टीलचा रस्ता ड्रॉप केला गेला आहे. माझी अशी माहिती आहे की मागच्यावेळेस तो सभागृहासमोर आणला होता आणि सभागृहाने त्यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. डिफर केला आहे म्हणजे मग तो .....*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, बरोबर आहे मी ड्रॉप केले हा जो शब्द वापरला त्याऐवजी सदनाकडुन अजुन प्रलंबित आहे अशी दुरूस्ती करू इच्छितो.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>तिसरे काम तुम्ही म्हंटले की अजुन सुरू झाले नाही ते कुठले आणि कधी सुरू होणार? काय अडचण आहे का?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>तिसरे जे काम आहे ते खेमाणी कंपाऊंड पासुन पुढे जाणारा रस्ता त्याबाबतीत पुर्ण माहिती माझ्याकडे नाही परंतु ते काम डिमॉल्युशनमुळे थांबले गेले आहे असे मला सांगितले गेले. ते पण काम लवकरात लवकर सुरू केले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>शहाड स्टेशन ते १० नंबर नाका ते काम अजुन अपुर्ण आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):</u>तिकडचे डेमॉलेशन अजुन बाकी आहे आणि ते काम सुरू करण्यास ठेकेदारास सांगितले आहे. लवकर डेमॉलेशन करून ते काम सुरू करण्यात येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव:-</u>मला चेकर टाईल्स विषयी विचारायचे आहे शहर अभियंत्यांनी कधी ते चेक केले आहेत का? एक फुट वरून पाडले तर ते फुटतात की तशाच राहतात किंवा त्यावर जी लाल पावडर लावली जात आहे ती पावसाळयात किती दिवस चालेल. एक आठवडयापुर्वी लावले होते आता पाहिले तर जशीच्या तशी पुन्हा झाली जिकडे पाहु तिकडे तुटलेले आहे. जवाहर हॉटेल समोर बार-बारा फुट चेकर टाईल्स फुटलेले आहेत. व ती जी लाल पावडर लावली जात आहे ती किती दिवस टिकणार? याबाबत....*

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कृपया तुम्ही बसावे मा. आयुक्त साहेब तुम्हाला उत्तर देत आहेत.
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मला समजत नाही की उत्तर दयायचे आहे की नाही? त्यांना जे काही बोलायचे ते पुर्ण बोलावे नाही तर प्रश्नोत्त्तरासारखे होईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-एक गोष्ट बोलु इच्छितो साहेब, तुम्ही इथे आला आहात तुम्हाला या रस्त्यांविषयी भरपुर ज्ञान आहे. तुम्ही उत्तर देत आहात. परंतु या शहराचे शहर अभियंता जे ब-याच वर्षापासुन शहर अभियंताच आहेत. त्यांच्या समोर रोड मंजुर झाले त्यांच्या समोर रोडचे काम सुरू झाले परंतु ते कोणत्त्याही गोष्टीचे उत्तर देण्याची त्यांची क्षमता नाही. याचे कारण मला समजत नाही. प्रत्त्येक गोष्टीचे उत्तर आयुक्तांनी दिले पाहिजे त्यांनी माहिती ठेवली पाहिजे. मोठी गोष्ट आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तुम्हाला माहिती पाहिजे की, क्रिकेट टिममध्ये सर्वजण बॅटींग करत नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-प्रत्त्येक गोष्टीचे तुम्हीच उत्तर देत आहात. शहर अभियंता जर उत्तर देत नाही, ३३ रोड पुर्ण करू शकत नाही. ५ वर्ष झाले तरी रोड पुर्ण होतील असे मला वाटत नाही. आधी सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव कामात प्रथम असायचे आता सर्वात शेवटी आहे, तिथे ना उप-अभियंता भेटत, ना कनिष्ट अभियंता भेटत ,मला नाही वाटत ५ वर्षापर्यंत हे रोड पूर्ण होतील.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:- मा. महापौर तुम्हांला माहित आहे की, तुम्ही हे रोड किती मुश्किलीने आम्हाला पास करून देता, किती अडचणीने ते तयार होत आहे. ऐवढे करून सुध्दा जर ते रोड पुढे कामी येणार नसतील, ज्याचे आम्ही पैसे भरत आहोत ती वस्तु जर बरोबर नसेल तर आम्ही हे कसे सहन करणार? तुम्ही कधी जाऊन पाहिलेत चेकर टाईल्सची काय हालत आहे? चेकर टाईल्स आहे की माती आहे? कृपया तुम्ही जाऊन पहा आम्हांला तर पाहून खूप आश्चर्य वाटत आहे. आमचे जे डेप्युटी इंजिनिअर आहेत, जे. ई. आहेत, ते फिरत आहेत, पाहत आहेत, काय करत आहेत? मेहरबानी करून बांधकाम विभागाला जास्तीत जास्त जागृत करा. जागृततेची गरज आहे, नाहीतर हे रोड एक-दोन वर्षापेक्षा जास्त चालणार नाहीत, तुम्ही जे खात्री देत आहात ,त्याच्या दुरुस्तीचे काम ठेकेदारावर आहे. तो ठेकेदार दुरुस्ती काय करणार? एक-दोन वर्ष तर २५० रस्ता आपला टिकत नाही तर चेकर टाईल्स काय टिकणार? योग्य त-हेने याची पडताडणी झाली पाहिजे. नाल्या बनत आहेत, जे काय तयार होत आहेत, ते योग्य त-हेने तयार झाले पाहिजे. ते जे काम ठिक होत नाही, त्याची तपासणी कोणी केली पाहिजे नगरसेवकांनी? आमचे जे जेई. आहेत, डेप्युटी आहेत, शहर अभियंता कशासाठी आहेत? याची पडताळणी करा व योग्य ती कार्यवाही करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब ,शहर अभियंतांना बॅटींग करण्यासाठी तर येऊ दया ना? भले त्यांना आउट होउन जाउ दे. त्यांना दोन-तीन प्रश्न विचारायचे आहे, त्यांना बॅटिंग करायला वर येउ दया. नाहीतरी ते आउटच होणार आहेत, पहिल्या बॉलमध्ये आउट होतील, पण त्यांना वर तर येउ दया कधी कधी, लोकांना पाहू तर दे शहर अभियंता कोण आहेत, काही लोकांना हेच माहित नाही की, शहर अभियंता कोण आहेत? नेहमी आयुक्तच उत्तर देतात, शहर अभियंता यांना वर येवू दया.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, सिटी इंजिनिअरचे काम तांत्रिक स्वरूपाचे असते. त्यांना प्रशासकीय कामकाजाची ऐवढी

माहिती नसते होवू शकते ते तुमच्या प्रश्नाचे उत्तर देवू शकतील. परंतु जर उत्तर देताना काही चुक झाली तर मला वाटते त्यांनी त्यांचे तांत्रिक स्वरूपाचे काम करावे. प्रशासकीय काम आमचे आहे आम्ही त्याचे उत्तर देवू.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-चुक की बरोबर उत्तर तर देवु दया. त्यांना ज्ञान आहे की नाही थोडे उत्तर तर देवू दया.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यांना वर तर येवू दया. म्हणजे कळेल बॅटींग लायक आहेत की नाही?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तुम्हाला भागवत चंद्रशेखर माहित आहेत ना ते फक्त बॅट हातात धरायचे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-इथे प्रशासकीय किंवा तांत्रिक बाब हा मुददा नाही चालु आहे. इथे विषय आहे क्वालिटी कंन्ट्रोलचा जे काम तिथे चालु आहे. हु इज द रिस्पॉन्सीबल टू लुक आफ्टर दि क्वालिटी कंन्ट्रोल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-साहेब, माझे ऐरीयात जे रोड बनत आहेत टेलिफोन डिपार्टमेंटवाल्यांनी खोदाई केली आहे. मी इतक्यांदा सांगुन देखिल सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देत नाही. आणि ३३ रस्त्यांमध्ये जो रोड बनला आहे गोल मैदान ते टर्निंग पॉइंट पर्यंत त्याच्या साईटची जी मलमपटटी केली आहे की ती इतकी खराब केली आहे की तुम्ही पाहिले तर म्हणाल आताच्या आता ती काढा. शहर अभियंता व कार्यकारी अभियंता काय करत आहेत. तुमच्याकडुन एकदोन चुका झाल्या आहेत साहेब बाकीचे तुमचे सर्व काम चांगले आहे. कार्यकारी अभियंता चांगला आणा जो खास शहराकडे लक्ष देईल. माझ्या प्रभागात एक पंपिग स्टेशन बनत आहे. कार्यकारी अभियंता मला विचारत आहेत तुम्ही आयुक्तांची परवानगी घेतली आहे का? त्यांना इतके माहित नाही वर्क आर्डर झाले, एस्टीमेंट तयार आहे, आयुक्तांची त्यावर सही होते, तो रूम तयार झाला आहे त्यांनी तो बंद करून टाकला म्हणतात पुतळयाचे सुशोभिकरण खराब होईल. इतक्या दिवसापासुन खराब होते तेव्हा कुणाचे लक्ष नाही गेले. त्या रूमची पान टपरी बनवुन टाकली आहे. तिथे पंप बनणारच नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग सहयोग बरोबर देत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने एस्टीमेंट तयार केले आहे. लेखा विभागातुन आले आयुक्तांची सही झाली तरी मला विचारतात आहे की आयुक्तांची मान्यता घेतली आहे का? मला नाही मान्यता घ्यायची एस्टीमेंटमध्ये सगळेच आले. माझे काम थांबवुन खराब करून टाकले महापालिकेच्या बाहेर.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महापौर मॅडम मला वाटते की तांत्रिक बाबीचा जो विषय होता तो एका बाजुला राहिला यादवजी, म्हणाले होते की, चेकर टाईल्सची क्वालिटी चांगली नाही मी त्यांच्याशी सहमत आहे. आपल्या माहितीसाठी सांगतो की आमची जी टेक्नीकल ऐजन्सी आहे उत्तम इंजिनिअरींग त्यांना हे वेरीफाय करण्याचे काम दिले गेले आहे. ज्याचा दर्जा चांगला नाही. त्यांना टाईल्स बदलण्यासाठी लिखित सूचना दिल्या गेल्या आहेत. मी स्वतः ७ मे ला आमचा टक्नीकल स्टाफ शहर अभियंता व उत्तम कंनसल्टंन्सी यांच्या समवेत जे रोडचे काम चालु आहे तिथे निरिक्षण केले आम्ही स्वतः जावुन इन्स्पेक्शन केले. जिकडे पण चेकर टाईल्सची क्वालिटी चांगली नव्हती ते बदलण्यासाठी आदेश दिले आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-मा. महापौर महोदया, नेताजी ते शिवमंदीर हा जो आय.आर.डी.पी. मध्ये रस्ता होता. त्या रस्त्यावर एकाजागी गॅरेज आहे त्या गॅरेजमध्ये गाडया जावु शकाव्या म्हणुन फुटपाथवर टाईल्स लावल्या नाहीत. ही गोष्ट मी विभागाच्या लक्षात आणुन दिली पण त्यांनी लक्ष दिले नाही असे खुपशा

जागी झाले आहे हे लक्षात घ्यावे. काही ठिकाणी गटारांवर झाकणे नाही टाकली. यासर्व गोष्टींची पुर्तता झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>व्हीनस वरून लालचक्कीकडे येणारा जो रस्ता आहे. आपल्या डि.पी. मध्ये आहे. तिथेही मी शहर अभियंत्यांना दाखवुन दिले आहे. ठेकेदाराने तिथे नाली नाही बनविली. आता पावसाळा जवळ आलेला आहे, आणि तिथे त्यांनी नालीही बनविलेली नाही व फुटपाथही बनविला नाही. मी सांगुन जवळ जवळ दोन महिने झाली तरी त्यावर अजून काही कार्यवाही केलेली नाही. व्हिनस टॉकीज पासुन ते लालचक्की मार्गे स्टेशन.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापौर महोदया, ठेकेदारांना तसे आदेश दिले जातील.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>पावसाळयापुर्वी साहेब...

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>हो पावसाळयापुर्वी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. १०८ हा श्री. यादव लालबिहारी यांचा असुन तो नाकारण्यांत आला आहे.

प्रश्न क्र. १०९ श्री. यादव लालबिहारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १०९:-</u>व्ही.टी.सी. मैदान से मानेरा गॉव होकर विनस चौक रास्ते के डांबरीकरण के बारे में.
क)रास्ते के डांबरीकरण का काम बारीष आने से कितने दिन पहले करना चाहिए?
ख)बारीष के दौरान काम करने की अनुमति किस अधिकारी ने दिया औ क्यो?
ग)बारीष के समय किये गये रास्तों के डांबरीकरण का काम पुरी तरह से नष्ट हो चुका है, इसका जिम्मेदार कौन?

<u>उत्तरः-</u>क)बारीश सुरू होने के १५ दिन पहले करना चाहिए.
ख)बारीश के दौरान इस रास्ते का डांबरीकरण का काम हुआ नही है. इसलिए अनूमती देने का सवाल ही पैदा नही होता.
ग)बारीश के दौरान इस रास्ते का काम हुआ नही है तो डांबरीकरण का काम खराब या नष्ट होने का सवालहि पैदा नही होता.

<u>मा. सदस्य श्री. यादव लालबिहारीः-</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असुन मला वरील प्रमाणे उत्तर देण्यात आले. मला असे म्हणायचे आहे की जेव्हा पाऊस चालु होता तेव्हा माझे अचानक तिथे जाणे झाले मला तर तिथे कुठे डांबर दिसला नाही. तिथे मोठ मोठी दगडे दिसत होती. डांबर पुर्ण नदीत वाहुन गेले होते. तर असे डांबर किती पावसाळयात वाहणार यासाठी मी प्रश्न विचारला होता व त्या डांबराचा दर्जा देखिल चांगल्या प्रतीचा नव्हता. तर मी श्री. चिजवानी साहेबांना विचारू इच्छितो की, आपण कधी तिथे जावुन पाहिले का की पावसाळयापुर्वी हे काम सुरू झाले होते की नंतर. का पाऊसच नव्हता आला.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-</u>मा. महापौर, श्री. यादव लालबिहारी यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. व्ही.टी.सी. मैदान पासुन मानेरा गावाकडे जाणारा रस्ता तो रामेश्वर कॉम्प्लेक्सच्या पुढे आणखी अर्धवट आहे. त्याचे फायनल कोटेशन वगैरे बाकी आहे. आणि फुटपाथ मध्ये मध्ये अर्धवट बनवलेले आहे. आणि काही काही ठिकाणी फुटपाथ बनवलेले नाही. आणि त्या फुटपाथखाली ज्या नाल्या बनवलेल्या

आहेत त्याचे पण व्यवस्थित पाणी निचरण होत नाही. त्याच्या पण तक्रारी केल्या होत्त्या. गुरूराणी माता मंदीरा समोरच्या रोड क्रॉसिंग येथे कलवर्ट बनविले आहे त्यात पाणी भरलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात तक्रार केली होती. तर त्त्यांनी एक चौकोनी कलवर्टवर कट केले आहे. त्या कट केलेल्या भागातुन आतमध्ये तिथे पाहिले गेले. तर पुर्ण ती नाली भरली आहे. आणि चार-पाच महिने झाले ती तशीच भरली आहे. आणि त्याच्याबाजुला राहणा-या माणसांच्या घरात पाणी जात आहे. पावसाळयाअगोदर जर त्त्या पाण्याचा निचरा नाही झाला तर पुर्ण त्त्या लोकांच्या घरात पाणी जावून त्त्यांना त्रास होवू शकतो. सॅनिटरी विभागास पण याबाबतीत तक्रारी केल्या होत्त्या त्त्यांनी दोन-तीन वेळा साफसफाईचा प्रयत्त्न केला. परंतु त्त्यांचे पण म्हणणे असेच आहे की, रोड बनवताना पाणी जाण्याचा रस्ता व्यवस्थित त्यांनी मेंन्टेन केलेला नाही त्या कारणाने पाणी जात नाही. तर सॅनिटरी डिपार्टमेंट आणि पी.डब्लु डी. डीपार्टमेंट या दोघांनी मिळुन ते ठरवायचे आहे. की तो पाण्याचा निचरा कसा करायचा आहे दुसरी गोष्ट त्या फुटपाथवरच्या लादया. मघाशी बोलल्या प्रमाणे त्या कमी दर्जाच्या आहेत. ठिकठिकाणी फुटलेल्या आहेत. काही ठिकाणी तर लादयाच नाहीत. काही ठिकाणी तर फुटपाथच बनविलेला नाही. आणि महालक्ष्मी बार कडुन खाली गुरानी माता मंदीराकडे येणा-या रस्त्त्यालगत म्हणजे मेन रोडपासुन तिथे फुटपाथच नाही. तिथे ऐवढा पाण्याचा नाला साठलेला आहे गाडीवरून जाणा-या लोकांना पण त्रास सहन करावा लागतो. दुसरी गोष्ट त्या रस्त्त्यावर ठिकठिकाणी ड्रेनेजचे मेन होल आहेत. त्या मेन होलमध्ये अडकुन अनेक लोक तर तिथे जखमी झालेलेच आहेत परंतु प्रशासनाच्या माहितीसाठी मी सांगतो दोन तीन अपघातात माणसे सुध्दा दगावलेली आहेत. आताच दहा बारा दिवसापुर्वी व्ही.टी.सी. मैदानच्या जवळ वाल्मिकी नगरच्या स्पीड ब्रेकरवरती झेब्रा पटटे नसल्यामुळे रात्री बारा सोडबारा वाजता एक व्यक्ती तिथे त्या स्पीडब्रेकर वरून घसरून तो मरण पावला. तर त्त्या रस्त्त्यावरती आणि बहुतेक सर्वच रस्त्त्यावरती त्या स्पीड ब्रेकरवरती झेब्रा पटटे नाहीत. काही ठिकाणी मेन होल वरती झाकणे नाहीत. फुटपाथवरच्या नाल्यावरती त्यांनी जे होल ठेवलेले आहेत त्यांना पण झाकणे नाहीत. त्यामध्ये अनेक लोक पडुन जखमी होतात. आणि दोन तीन व्यक्तींचा तर त्यामध्ये अंत झाला आहे तरी त्या गोष्टींकडे आयुक्तांनी व संबंधीत अधिका-यांनी लक्ष देवून त्याची पुर्तता करावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>लोकांचा असा आरोप असतो महापालिकेवर की हे जे डांबरीकरणाचे काम चालते ते फक्त पावसाळयापुर्वी दहा पंधरा दिवस सुरू होते. आपण वर्षात दहा-अकरा महिने डांबरीकरणाचे काम करू शकत नाही का? मी हे का म्हणतो की प्रश्न असा विचारला आहे की, रस्त्त्याचे डांबरीकरणाचे काम पावसाळयापुर्वी किती दिवस आधी केले पाहिजे? तर उत्त्तर दिले आहे पंधरा दिवसापुर्वी . असे आहे का, पावसाळयापुवी पंधरा दिवस केले पाहिजे. अकरा साडे- अकरा महिने नाही केले पाहिजे. हे उत्त्तर आहे. आपण वाचु शकता. लोक म्हणतात पंधरा दिवस आधी करतात, पावसाळयापुर्वी करतात, पैशाची हेराफेरी करतात. हे उत्त्तर सिटी इंजिनिअर यांनी दिले आहे. हा तांत्रिक व्यक्ती आहे. प्रश्न पण तांत्रिक स्वरूपाचा आहे. त्यांना बोलावुन तुम्ही वाचारा तर? म्हणजे लोक खरे बोलतात. कुठे गेले ते लाट साहेब कुठे गेले? उठतच नाहीत. धिस पर्सन शुड बी रीमुव्हड.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापौर महोदया,डांबराच्या गुणवत्त्तेवर आधी असे होते की आम्ही पावसाळयापुवी डांबरीकरण नाही करू शकत त्यामुळे मे शेवट आणि १ ऑक्टोबर नंतर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम केले जाईल. परंतु आता ज्या दर्जाचा डांबर उपलब्ध आहे. त्यामध्ये पावसाळया दरम्यान, पाऊस पडत असतानाचा पिरेड सोडुन कधीही डांबरीकरणाचे काम करू शकतात. असे काही नाही. उत्त्तर माझ्या आधी दिले असल्यामुळे मी जास्त काही दुरूस्ती केली नाही. परंतु आजची सत्त्य परिस्थिती अशी आहे की, डयुरींग मान्सुन ऑल सो ॲसफॉल्टींग वर्क कॅन बी टेकन ओनली व्हन रेन इज ॲक्चुअली पोअरींग वई कॅन नॉट कॅरींग ऑन ॲसफॉल्टींग वर्क.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-डु यु ॲग्री क्नो, रिप्लाय इज रॉग. उत्तर तर चुकीचे आहे ना.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-सचिवजी, मला दोन शब्द बोलायचे आहेत. मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उपस्थित सर्व सदस्य अधिकारी वर्ग, गेल्या दोन तीन महासभांमध्ये पाहिले तर एक निश्चित इथे जाणवले की श्री. रामनाथ सोनवणे यांनी जेव्हापासुन आयुक्त म्हणुन इथे कार्यभार सांभाळला तेव्हा पासुन जेवढया महासभा झाल्या. त्यामला वाटते फार हसत खेळत अगदी खुशी खुशीत झाल्या आहेत. श्री. सोनवणे साहेबांनी कुठले कॅप्सुल या शहरातील नगरसेवकांना दिले हे काय कळत नाही. पंरतु कमीत कमी महासभेमध्ये या सभागृहात हे सर्व लोक हसत खेळत राहतात. परंतु सोनवणे साहेब आपण इथे हसत खेळत सभा घेतो आणि शहरामध्ये तिकडे आग लागते. ''आग लागे बस्तीमें हम हमारे मस्तीमें'' शहरामध्ये कुठे कुठे किती किती समस्या आहेत. आज इथे सभा हसत खेळत होत आहे आणि तिथे किती लोक बसले आहेत उपोषणाला पाण्यासाठी याची कोणालाही फिकीर नाही. माझा प्रभाग सोडा परंतु शहरामधील विविध प्रभागामध्ये आजही पाण्याचा प्रश्न तेवढाच गंभीर आहे. आपण इथे हसत खेळत बिसलरीचे पाणी पित आहे. हसत खेळत सभा करतो आहे. पण तिथे आजही तुम्हाला कदाचित कल्पना आहे की नाही माहित नाही, माझ्या प्रभागात आजही लोक उपोषणाला बसले आहेत. आठ दिवसापुर्वी पण उपोषणाला बसले होते. त्या अगोदर मी सुध्दा उपोषणाला बसण्याची नोटीस दिली होती. तुम्ही विनंती केली मी थांबविले उपोषण म्हणजे नेमका आम्ही याचा अर्थ काय समजायचा. श्री. सोनवणे साहेबांच्या राज्यामध्ये इथे सभागृहामध्ये अलबेल आहे. शहरामध्ये आलबेल आहे असे समजायचे का? शहरामध्ये कुठलेच प्रश्न नाही असे समजायचे का? शहरामध्ये तिथे जनता अगदी सुखी आहे असे समजायचे का? त्यांना पाण्याचे प्रश्न नाही असे समजायचे का? आज तुम्ही येवून सहा महिने झाले असतील जो काय कालावधी झाला असेल त्या कालावधीमध्ये शहरातील पाण्याचा प्रश्न किती सुटला? तुमच्या कालावधीमध्ये आम्ही तुम्हाला किती विंनती केली. कितीदा तुमच्याशी चर्चा केली आणि तुम्ही कितीदा त्याचा प्रत्यक्षात उपयोग करून दिला. आणि किती प्रश्न सुटले? हा मला वाटते श्री. सोनवणे साहेबांनी विचार करावा. मागच्या चार महिन्यापासुन गेल्या सहा महिन्यांपासुन आम्ही तुमच्या अधिका-यांना वांरवार सांगत आहे पाण्याच्या संदर्भात. प्रभागातील एखादा विभाग पाण्यावाचुन अडचणीत असेल तर समजु शकतो. एखादया विभागात पाणी पोहचत नसेल तर समजु शकतो. परंतु तुम्ही आल्यानंतर पुर्णच्या पुर्ण प्रभाग पाण्यावाचुन वंचित होतो तिथे नगरसेवकांना उभे राहणे मुश्किल होते. आणि तुम्हाला वारंवार विनंती करतो आहे तुमचे अधिकारी वर्ग वारंवार आश्वासने देत आहेत तरी आज आम्ही आमच्या जनतेने हे सहन करावे का? तुम्हाला कदाचित असे वाटते का की, आम्ही तुम्हाला विनंती केली की तुम्ही गप्प बसाल तुम्हाला चॉकलेट दिले. आमचे श्री.ढाकरे साहेब होते ते चॉकलेट दयायचे आणि आम्ही उपोषण सोडायचो परंतु आज ती परिस्थिती नाही. आजही आमच्या प्रभागामध्ये भारतनगर मधील लोक उपोषणाला बसले आहेत. म्हणजे वारंवार आम्ही उपोषण, आंदोलन करायचे का? वारंवार आम्ही तुमची विंनती करायची का? श्री. सोनवणे साहेब, तुम्ही कदाचित असे समजु नका की हा दलित वस्ती विभागातला मागास विभाग असेल तिथे पाणी नाही पोहचले तर लोक ऐकुन घेतील, सहन करतील परंतु तशी गोष्ट नाही. आमच्यातही तेवढी ताकद आहे, पाण्यातुन आग पेटविण्याची आमच्यातही ताकद आहे. फक्त आमचा अंत तिथे पाहु नका. आणि तुम्ही लवकरात लवकर याचा निर्णय घ्या.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महापौर महोदया, माझी हरकत आहे. मला बोलु दयावे. मी आल्यानंतर सभागृहात खेळीमेळीचे वातावरण आहे हे सांगताना नंतर जे सांगितले गेले त्यावर माझी हरकत आहे. त्यांनी हे जर स्पष्ट केले असते तर आम्ही येण्यापुर्वी कोणकोणत्त्या ठिकाणी पाण्याची गंभीर समस्या होती. व कोणत्त्या जागी प्रश्न सोडविले आहेत. त्याचा पण जर उल्लेख केला असता तर मला बरे वाटले असते. त्यांच्या प्रभागात रात्री ९ वाजता स्वत: त्यांच्या बरोबर इन्स्पेक्शन केले. जेथे कित्त्येक वर्षापासुन पाण्याची लाईनच नाही. तिथे तर मी दोन दिवसात चार दिवसात किंवा एक महिन्यात तर लाईन देवू शकत नाही. प्रयत्त्न नक्की करतो आणि मला वाटते मी तसा प्रयत्त्न देखिल केला आहे. जे टेंडर दिले गेले आहेत. त्या ठेकेदाराशी मी भर रस्त्त्यावर वाटाघाटी केल्या. ज्या वाटाघाटी मी माझ्या कार्यालयात करायला पाहिजे होत्त्या. ठेकेदारांनी मान्य केले मी उदया काम सुरू करतो. तो ठेकेदार काम सुरू नाही करू शकला कारण की पाईपचे दर जास्त आहेत. नंतर आम्ही पाईपसाठी टेंडर मागविले, निविदा फायनल करायला काही दिवस तर लागतील. ते टेंडर फायनल झाल्यावर पाईप येतील, नंतर काम सुरू होईल. परंतु सभागृहात सदस्यांनी काहीतरी संयम ठेवला पाहिजे. आमच्या टीका करा तुम्हाला पुर्ण अधिकार आहे परंतु आपण जे म्हणता त्याच्याशी आम्ही सहमत आहोत की जनता कधीही संयम नाही बाळगणार? जनता तिथे काय करत आहे आम्हाला माहित आहे. आम्हाला इथे काय करायचे आहे हे पण माहित आहे. परंतु संधी मिळाली आणि अधिकारींवर टिका करायची हे मला मान्य नाही. जर आम्ही प्रयत्त्न नसता केला किंवा काही केले नसते आपण जरूर सभागृहातच नाही तर सभागृहाबाहेर पण आमच्यावर टिका करा. माझी काही हरकत नसेल. परंतु आम्ही काय काय प्रयत्त्न केले. तुम्ही जर सभेत येण्यापुर्वी आमच्याकडनु माहिती घेतली असती तर मला वाटते इथे बोलण्याचा प्रसंग्र आपल्यावर आला नसता. माझी सभागृहातील प्रत्त्येक सदस्यास हिच विनंती आहे की, मागे पण मी हीच विनंती केली होती की अशी काही समस्या असो जिथे त्त्वरीत तोडगा निघेल आम्ही त्त्वरीत ते काम करू परंतु काही समस्या अशा आहेत. जिथे कित्त्येक वर्षापासुन पाण्याची लाईन नाही. तिथे काही महिने तरी आम्हाला दयावे लागतील. तुम्ही जितके बोललात त्याबाबत मी वाईट नाही वाटुन घेत. परंतु आपणांस मी पुन्हा विनंती करेन ही समस्या सोडविण्यासाठी काही दिवस तरी आम्हाला दयावे लागतील.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-मा. महापौर महोदया, मा. आयुक्त, सन्माननिय ....

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-श्री. सोनवणे साहेबांनी त्यादिवशी पण विझिट केल्यानंतर तुम्ही जे जे प्रश्न सोडविण्यासाठी टेक्नीकल बाबी दिल्या. त्या पुढच्या डेव्हलपमेंटच्या दिल्या आहेत परंतु जिथे आधी पाणी होते जिथे लाईन नाही तिथे तुम्हाला अजुनही विचारत नाही. आणि पाणी मागत नाही. ते आम्ही आमचे बघु. परंतु जिथे पाणी पोहचत होते. तिथे तुम्ही आल्यानंतरच्या कालावधी मध्ये पाणी गेले. पाणीच गायब झाले. असलेले पाणी गायब झाले. तर तुम्ही पाईप लाईन टाकणार कधी त्याचा आम्ही विचारही करत नाहीत. टाकी तयार होवून दोन महिने झाले प्रभागात पाणी नाही. आम्हाला नको आता टाकीचे पाणी तुम्ही जेव्हा पाणी वितरण लाईन टाकणार तेव्हा दया. परंतु असलेले पाणी तुम्ही वळवता किंवा बंद करता तेव्हा आमच्या लोकांनी काय करायचे? लोकांनी सहा सहा महिने विनापाण्याचे राहायचे. माझ्या स्वत:च्या घरी चार महिने झाले एक थेंब पाणी नाही. लोक काय म्हणतील नगरसेवकांच्या घरी पाणी नाही तर लोकांना काय पाणी देणार? याचे कोण उत्तर देणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महापौर महोदया, आमच्या येण्याने जर कुणा प्रभागाचे पाणी गायब होते तर तो न्याय सर्व शहराला लागु झाला

पाहिजे पुर्ण शहराचे पाणी गायब झाले पाहिजे. मला वाटते असे झाले नाही आहे. जर असे झाले आहे. आमच्या इन्स्पेक्शन नंतर पाणी गायब झाले असेल तर जरूर कुणा व्यक्तीने जाणुन बुजून कट करून काही केले असतील. सबोटेच केले असेल काही तरी ऑबजेक्शन निर्माण केले असेल. त्या व्यक्ती विरूध्द कडक कारवाई केली जाईल. आणि हे खात्री केली जाईल की जिथे आधी पाणी यायचे. तिथे पाणी जरूर येईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>आमची विनंती पण तेवढीच आहे. जे पाणी सुरळीत येत होते ते तरी नियमित ठेवा बाकीचे डेव्हलपमेंट नंतर करा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-</u>मा. महापौरजी, माझ्या प्रभागात गेले पाच वर्षापासुन कालीमाता मंदीर ते कुर्ला कॅम्पचा रोड आहे. मागच्या वीस दिवसापुर्वी स्वतः आयुक्त साहेबांनी आमच्या प्रभागात विझिट केली. त्याच्या वीस दिवसानंतर पुर्ण पाणी बंद झाले. एक थेंब सुध्दा पाणी येत नाही. आणि त्या अधिका-याने जाणुन बुजून ते पाणी बंद केले मी त्यांच्यावर आरोप करतो. त्या अधिका-याची त्वरीत इथुन बदली केली जावी ही मी विनंती करतो. मिस्टर डोईफोडें यांची.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, खरे म्हणजे नगरसेवक टाले साहेबांनी जी खंत याठिकाणी मांडली, जी समस्या मांडली ती जर आयुक्त साहेबांना टिका वाटत असेल तर ती दुर्दैवाची बाब आहे. आपण याठिकाणी कुणावर टिका करण्यासाठी आलो नाहीत. किंवा कुणाची टिका ऐकुन घेण्यासाठी सुध्दा आलेलो नाही. आम्हाला नगरसेवकांना याठिकाणी नागरिक सुविधा पुरविण्यासाठी इथे पाठविले आहे. आणि प्रशासनाचे काम आहे की त्यांनी सुध्दा आमच्या म्हणण्याप्रमाणे नागरी सुविधा आम्हाला दिल्या पाहिजेत. आयुक्त साहेबांनी मागच्या महासभेमध्ये असे म्हंटले होते की एक नगरसेवक जरी माझ्यकडे आला तरी माझ्याकडे दहा हजार-वीस हजार लोक आले असे मी समजेन. म्हणजे एक नगरसेवक दहा ते वीस हजार लोकांचे काम करतो हे आयुक्त साहेबांना मान्य आहे. म्हणजे आज इथे टाले साहेब जे काही बोलले ते दहा ते वीस हजार लोक बोलले आहेत असे आपण समजायला काही हरकत नाही. मा. आयुक्त साहेब, आपणांस माहितच असेल आताच टाले साहेबांनी सांगितले की आमच्या प्रभागामध्ये भारत नगर हा जो विभाग आहे. तो टे लॅण्ड आहे आपण याठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केलीत. जवळ जवळ तीन तास आपण आमच्या सोबत फिरलात. मी त्याबददल आपले अभिनंदन करतो परंतु त्या घटनेनंतर त्याला आज एक महिना आणि तीन दिवस झाले आहेत. १६ तारखेला आपण फिरलो होतो. आणि आज १९ तारीख आहे तरी सुध्दा त्याठिकाणी काही झालेले नाही. आम्ही आपल्या अडचणी समजु शकतो. की तांत्रिक बाबी, टेंडर वगैरे, जास्त आलेले आहेत. यासर्व अडचणी आम्ही समजु शकतो परंतु तात्पुरती व्यवस्था करायला काय हरकत आहे? ज्याठिकाणी बिल्कुल पाणीच येत नाही. त्याठिकाणी आपण आपल्या अधिकाराने थोडे पाणी दिले पाहिजे. आज चार-पाच दिवस झाले त्याठिकाणी पाणीच नाही. ज्याठिकाणी मिळते ते ही अतिशय थोडया प्रमाणात मिळते. टॅंकर जर पाठवायचे म्हंटले तर ते सुध्दा आम्ही पाठवु शकत नाही. कारण आमच्याकडे अतिशय अल्प प्रमाणात टॅंकर आहेत. या समस्या घेवून जर प्रभागात फिरलो तर प्रभागातील लोक आमच्याकडे बघत सुध्दा नाहीत. पुर्वी तरी शिव्या दयायचे. आता बघायचेच सोडले आहे. त्यांनी आम्हाला कोडगे समजले आहेत. त्यांना किती बोलले तरी हसण्यावारी टाळतात. हे कुठल्याही प्रकारचे आमचे काम करू शकत नाही. अशा प्रकारची प्रभागातील लोकांची आमच्या बददल मनोधारणा झाली असेल असे मला वाटते. मा. आयुक्त साहेब आपण रात्रंदिवस मेहनत करता आम्ही बघतो. रात्री आठ-आठ, दहा-दहा वाजेंपर्यंत कार्यालयात असता, विझिट देता, परंतु इतकी मेहनत करून सुध्दा जर त्याचे काही फळ मिळत नसेल तर आपली मेहनत ही बिनकामाची आहे असे म्हणण्यास हरकत नाही. मा. आयुक्त साहेब, आपण मागे सांगितले होते की टाक्या वगैरे सुरू झाल्या आहेत आणि मागे हे ही म्हंटले की त्या टाकीचे पाणी

जाते कुठे? आपण म्हटले होते मी चौकशी करून सांगेन आता त्याला एक महिना झालेला आहे. आपण निश्चितच चौकशी केली असेल त्या टाकीचे पाणी कुठे जाते. तर ती टाकी अर्थात भरतच नाही. चार फुट टाकी भरते. २८ फुटाची टाकी प्रत्यक्षात चार फुट भरते. आणि चार फुट भरल्यानंतर पाणी तो अधिकारी कुठे कुठे पोहचवणार? अधिका-याचे असे म्हणणे आहे की ९० टक्के पाणी हे पाच नंबर विभागामध्ये दाबले जाते. आणि दहा टक्के पाणी फक्त आमच्या इकडे येते. मग ते १० टक्के पाणी आम्ही कुठे कुठे पुरविणार? अशा प्रकारे अधिका-याचे म्हणणे आहे. अधिका-याने वरिष्ठ अधिकारींना तशी कल्पना दिली आहे परंतु त्यावर काही उपाय योजना होत नाही आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट अधिका-यांचे असे म्हणणे आहे की टाकी जर रात्री भरली तर ती पुर्ण भरली जाईल. आणि सकाळी आपण साडे पाच तास पाणी या सर्व विभागाला देवू शकतो मग ते श्री. विनोद ठाकुर यांच्या विभागात सुध्दा पाणी जाईल. लालचक्की पर्यंत पाणी जावु शकते या उपाययोजना तुम्ही का करत नाही आम्ही तुम्हाला उपाय सुचवतो परंतु तुम्ही ते सुध्दा उपाय ऐकायला तयार नाही. पाण्याची अतिशय भयानक परिस्थिती आमच्या विभागात आहे. पुर्वी आम्ही लोकांना सांगायचो की टाकी झाली की पाणी येईल पण आज अशी परिस्थिती नाही. आज लोक टाकीकडे बोट दाखवत आहेत. ऐवढे काय तर टाकीच्या बाजुच्या घरातही पाणी येत नाही. ही सगळी अशी भयानक परिस्थिती आपण कृपया प्रभाग क्र. ९ आणि १० मध्ये आपण जातीने लक्ष घालावे. इतर ठिकाणी लक्ष घालत आहेत. परंतु सुरवात इथुन करावी असे मला वाटते. आपण पाईप जर स्थायी समितीमध्ये पाठवले असेल ते पासही झाले असेल. तर लवकरात लवकर ते पाईप आल्यानंतर सर्वात सुरवातीला प्रभाग क्र. ९ मध्ये काम करावे अशी मी आपणांस विनंती करतो. आणि दुसरी एक विनंती करतो की, आपणांस माहितच असेल भारत नगरमध्ये आमचे काही कार्यकर्ते उपोषणास बसले आहेत. ३. ४ २००३ रोजी आपणांस त्यांनी नोटीस दिली होती. आपण त्यांची मनधरणी केली किंवा काय ते माहित नाही परंतु मला तरी वाटते की प्रशासनाचे कर्तव्य आहे की जर कुणी असे उपोषण आंदोलन करत असेल तर त्याला रोकणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आपण त्याबाबतीत काय प्रयत्न केले मला माहित नाही परंतु त्यांचे उपोषण जास्त लांबवु देवू नये अशा प्रकारची मी विनंती करून सध्या परिस्थितीमध्ये कशाप्रकारे पाणी त्या विभागात देता येईल. आजही पाणी देवू शकतात काही वेळेस पाणी तिथे नियमित येवू शकते. परंतु अधिका-यांच्या मनामध्ये जर नसेल तर पाणीच त्याठिकाणी येणार नाही. कृपया आपण अधिकारींना जर जरबेने सांगितले, जरब देवून सांगितले तर आमच्या पर्यंत पाणी येवू शकेल. कृपया आपण ही पध्दत थोडी वापरलीत तर आमचा विभाग सुखी होईल. आपण त्यासाठी प्रयत्न करावेत ही आपणांस विनंती करून मी याठिकाणी थांबतो जयहिंद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-</u>मा. महापौरजी, पाण्याचे जे ठेकेदार आहेत. नेताजी येथे त्याठिकाणी खाजगी टॅंकर भरले जातात. काही खाजगी टॅंकर तेथुन पाणी भरून घेवून जात आहेत. ते आमच्या निर्दशनास आले आहे. तुमच्या रजिस्टरच्या रेकॉर्डमध्ये सुध्दा त्या गाडयांचे नंबर आहेत तर मेहरबानी करून बाहेरचे पाण्याचे टॅंकर आहेत ते बंद करावेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. आयुक्त साहेब, मागील सभेत तुम्ही म्हणाला होतात की श्वेतपत्रिका सभागृहात सादर केली जाईल. ते कुठपर्यंत आले?

मा. सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानी सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>माझ्या पण दोन ओळी त्यात आहेत एकत्र उत्तर दया. मी एका नगरसेवकाची तक्रारीचा मागोवा घेत तुमच्या कार्यालयात आलो होतो. अवैध निर्माणांचा मुददा होता. इंदिरा गांधी मार्केट समोरील इमारतीची तक्रार त्यात होती. तुम्ही म्हणाला होतात की जर ते अवैध असेल तर निश्चित तोडेन. आणि या गोष्टीचा आम्हाला आनंद आहे की तुम्ही ४८ तासात निकाल

दिला होता. ते अवैध निर्माण तोडले गेले होते. परंतु त्या अवैध निर्माणचे काम पुन्हा सुरू झाले. या गोष्टीकडे मी तुमचे लक्ष वेधु इच्छितो. कारण अवैध निर्माण जे लगातार वाढत चालले आहे. त्यावर अंकुश लावण्यासाठी जे तोडलेले बांधकाम आहे ते पुन्हा सुरू होत आहे. अशी कार्यवाही नाही झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपानी:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आता मी पाण्या विषयी बोलु इच्छितो आताच तुम्ही सर्वांनी सांगितले की ज्या विभागात आधी पाणी येत होते ते अचानक गायब झाले. त्यात निश्चित कुणाचा ना कुणाचा तरी हात आहे. असे आपण म्हंटले. माझे पण हेच म्हणणे आहे की ज्या विभागात पाणी यायचे आता अचानक गायब झाले त्यात कुणाचा ना कुणाचा तरी हात असेल. आमच्या प्रभाग १२ मध्ये ओ.टी. सेक्शनमध्ये लोकांना पाणी बरोबर मिळायचे कुणाची तक्रार नसायची. कुणाला पाणी मिळायचे नाही तर मोटार लावुन पाणी मिळायचे. परंतु आज एक दिड महिन्यापासुन अशी परिस्थिती आहे मोटारीने पण पाणी येत नाही. मी स्वतः पण तुम्हाला वैयक्तिक विनंती केली आहे. पाणी कुठे गेले आहे. आमच्या जवांदे साहेबांना पण आम्ही विनंती केली आहे. की याचे सर्व्हे करा पाणी गेले कुठे असे ऐकले गेले की, क्रॉस कनेक्शन करून पाणी वळविले गेले आहे. त्यामुळे आम्हाला अडचण येत आहे. कृपया याकडे लक्ष दयावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागामध्ये पाण्याची वितरण व्यवस्था योग्य नाही. हे मान्य केलेले आहे. आणि मा. आयुक्त साहेबांनी हे सुध्दा मान्य केले आहे की कुणीतरी कर्मचारी त्याठिकाणी कर्तव्य पार पाडत नसेल आणि तशाच पध्दतीचे सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी एका कर्मचा-या बद्दल आजच्या सभेमध्ये सुध्दा तक्रार केलेली आहे. आणि गेल्या महासभेत सुध्दा तक्रार केली होती. तर हे सिध्द होते की त्याठिकाणी श्री. डोईफोडे त्यांच्या कर्तव्य पार पाडण्यामध्ये कसुर करत आहेत. आणि मग असा कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याकडुन वितरण व्यवस्थेमध्ये व्यत्यय येत असेल किंवा त्याची वागणुक बरोबर नसेल आणि महासभेने अशा अधिकारीला परत पाठविण्याचा प्रस्ताव पास केला असेल तर मग अशा अधिकारींना लवकरात लवकर कार्यमुक्त का करू नये उल्हासनगर महानगरपालिकेने? ही जी तक्रार आहे सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर यांची. यांच्या तक्रारीची दखल आपण घ्यावी ही आपणांस विशेष विनंती करत आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापौर महोदया ,मी सदनाला सांगु इच्छितो श्वेतपत्रिका तयार केली गेली आहे. व २७ तारखेच्या आधी मी महासभेसमोर ठेवेन. नंतर सदनाला मी विनंती करेन की यासाठी विशेष महासभा बोलवावी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विपक्षातर्फे मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांना विपक्ष नेता म्हणुन नियुक्त केले आहे अशी सूचना आली आहे. त्यास मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-</u>हार्दिक अभिनंदन.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>भाजपा गटातर्फे श्री. राज असरोंडकर यांना गटनेता नियुक्त केले आहे. त्यांना पण मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे हार्दिक अभिनंदन. शिवसेना गटातर्फे शिवसेना गटनेता श्री. दिलीप गायकवाड याची नियुक्ती झाली आहे. त्यांनाही मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. हार्दिक अभिनंदन.

श्री. राजेंद्र चौधरी व श्री. राज असरोंडकर, श्री. दिलीप गायकवाड यांचे स्वागत आयुक्त साहेबांतर्फे होईल कृपया मंचावर यावे. श्री. किशोर वनवारी यांनी कृपया मंचावर यावे विरोधी पक्ष नेता यांचे स्वागत करण्यासाठी.

इथे सर्वांचे मंचावर पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>एक लक्षवेधी सूचना श्री. सतरामदास जेसवानी व श्रीमती. भावना खिलनानी यांच्याकडुन प्राप्त झाली आहे. लक्षवेधी सूचना याप्रकारे आहे. शहराच्या साफसफाईसाठी अधिकतम सफाई कामगार नियुक्त झाले पाहिजे. २६७ सफाई कामगारांची पदे शासनाने मंजुर केली आहे. त्यावर नियुक्ती झाली पाहिजे. यासाठी त्यांची लक्षवेधी सूचना आहे.

<u>लक्षवेधी सूचना</u>

सचुक :-श्री. सतरामदास जेसवानी.

अनुमोदक :- श्रीमती. भावना खिलनानी

२६७ सफाई कामगार की नई भर्ती का क्या हुआ? जो भर्ती शासन अथवा न्यायालय ने आदेश दिया हुआ है, इसके लिये महासभा में चर्चा हो, शहर में लोक संख्या में बढोतरी होती जा रही है । रखे सफाई कामगार हर रोज २५ प्रतिशत छुट्टी पर रहने से शहर में सफाई काम बाकी रह जाता है ।

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>सचिव साहेब, तुम्ही बहुधा लक्षवेधी सरक्युलेट करता यावेळी केली नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>फक्त तीन वाक्यांची आहे. जेवढे मी सांगितले.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>पुन्हा वाचुन दाखवा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>एक लक्षवेधी सूचना श्री. सतरामदास जेसवानी व श्रीमती. भावना खिलनानी यांच्याकडुन प्राप्त झाली आहे. लक्षवेधी सूचना याप्रकारे आहे. शहराच्या साफसफाईसाठी अधिकतम सफाई कामगार नियुक्त झाले पाहिजे. २६७ सफाई कामगारांची पदे शासनाने मंजुर केली आहे. त्यावर नियुक्ती झाली पाहिजे. यासाठी त्यांची लक्षवेधी सूचना आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>महापौर साहेबा, चार महिने अगोदर अशाच एका महासभेत याच आयुक्तांना आदेश दिले होते की, उल्हासनगरमध्ये साफ सफाई चांगली होवो. यासाठी जे २६७ सफाई कामगार नेमणे जरूरी आहे ते ठेवावे. परंतु दुःखाने म्हणावे लागते की, सफाई विभागाकडुन आजच्या पण मिळालेल्या माहितीनुसार दररोज २५ ते ३० टक्के सफाई कामगार सुटटीवर असतात. ऐवढे सफाइ कामगार सुटटीवर असुन सुध्दा आमचे आयुक्त साहेबांनी आमच्या शहरासाठी ही जी जरूरी समस्या आहे. ती दूर करण्यासाठी हे २६७ सफाई कामगार जे चार महिन्यापुर्वी ठेवायला पाहिजे होते ते अजुन पर्यंत ठेवले नाही. म्हणुन आमच्या शहरवासियांना व आम्हाला अत्त्यंत दुःख होत आहे. आयुक्तांच्या कामाने आम्ही सर्व खुश आहोत. हे आयुक्त खुप मेहनत करत आहेत, धावपळ करत आहेत. परंतु याबाबतीत का मागे आहेत? याचे कारण काय? ते त्यांच्या तोंडुन ऐकु इच्छितो कृपया आम्हाला ही माहिती दया.

मा. महापौरः-मी आयुक्तांना आधी पण निवेदन दिले होते व आता पण देते. हे जे २६७ कर्मचारी आहेत. त्यांना लवकरात लवकर कामावर घेतले जावे. कारण खुप जण बेरोजगार आहेत. मी आधी पण आयुक्तांबरोबर चर्चा करून सांगितले होते. सभागृहात त्यांनी याबाबतीत निवेदन करावे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-मी मागच्या वेळेस पण तुम्हाला याविषयावर धन्यवाद दिले. आता पण देतो कारण हे खुप जरूरी आहे. याची लवकरात लवकर अंमलबजावणी केली जावी. माझी दुसरी विंनती आपल्याशी राहिल की कृपया सफाई विभागासाठी जे काही जरूरी आहे. डि.डी.टी. पावडर जरूरी आहे. तुम्ही पहात आहात किती आजार पसरत आहेत. आणि आमच्या सफाई विभागात डि.डी.टी. पावडर, फिनेल नाही. आमच्या सफाई विभागात चार महिन्यापासुन झाडु नाही दिले गेले. याची माहिती आमच्या आयुक्तांना आहे की नाही याचा पण कृपया खुलासा करावा व आमच्या सफाई विभागात जो कचरा बाहेरून जमा करतो. कच-याचे ढिग पोहचवायचे आहेत त्या गाडया तुटलेल्या आहेत. जो कचरा मोठ्या नाल्यामधुन काढत आहोत. तो कचरा कसा पोहचणार? आमच्या सफाई विभागात बादल्या, गमबुट नाहीत. नाल्यामध्ये सफाई कामगार उतरणार कसे? नाल्यात ते तसेच उतरतात तर काचा लागतात, खिळे लागतात. ते लागल्यामुळे ते एकेक तास कामावरून निघुन जातात. नाले साफ करणारे कर्मचारी डॉक्टरकडे जावुन बसतात इंजेक्शन घ्यायला. सफाई विभगासाठी जी पण आवश्यक साहित्य आहेत त्या जरूरी गोष्टी लवकरात लवकर प्राप्त करून घ्याव्यात धन्यवाद.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. आयुक्त साहेब, सफाई कामगारांसाठी जी लक्षवेधी आणली आहे. त्या बाबतीत मी बोलतो. आयुक्त साहेबांना माहित आहे की, मागे आयुक्त साहेबांना मी एक पत्र दिले होते त्यामध्ये विषय होता आपणांस माहित आहे का? त्या विषयामध्ये सफाई बाबतच मी लिहिले होते. माझ्या प्रभागात जर २२ सफाई कामगार असतील, त्यापैकी ११ तरी कर्मचारी रोज गैरहजर असतात. आणि त्यामुळे हे २५० कर्मचारी जर परत घेतले तर त्या ११ च्या ऐवजी २० लोक परत गैरहजर राहणे सुरु होईल कारण आता नविन कर्मचारी आलेले असतील. मध्यंतरी मी असेही ऐकलेले होते की, खाडा बदलीवर काही कर्मचारी घ्यायचे आहेत,

मा. महापौर :-मी मा. आयुक्तांना आदेश दिले आहेत. तुम्ही आता बोलणे बरोबर नाही, एकाच मुददयावर सर्व सदस्य बोलु लागले तर कसे होणार?

मा. सचिव :- मा. महापौरांनी मा. आयुक्तांना आदेश दिले आहेत, ते आपले निवेदन देतील.

मा. सदस्या श्रीमती कमला शर्माः- मा. महापौरजी आमच्या पॅनेल नं. ५ मध्ये ..

मा. महापौर :- मी आताच मा. सदस्य श्री. निकम यांना बसायला सांगितले ना? आता तूम्ही कसे बोलता?

मा. आयुक्त (श्री. आर.के.सोनावणे):- मा. महापौर महोदया,आपल्या शहराची लोकसंख्या ४ लाख ७२ हजार आहे, एरिया १३ चौ. किलो मीटर आहे. नॉर्म्स च्या हिशोबाने जी सफाई कामगाराची संख्या असणे गरजेचे आहेव त्या सफाई कामगारांची संख्या जवळ-जवळ १२०० पर्यंत आली आहे. ती आमच्याकडे आहे. परंतु सफाई कामगारांचे गैरहजेरीचे जे प्रमाण आहे,ते सर्वात जास्त आहे. तीस टक्के पर्यंत आहे. त्यामुळे आम्हांला लीव रिजर्व करून खाडाबदली करून काही सफाई कामगारांना नियुक्त करावे लागेल. मी मागच्या वेळी जेव्हा तुम्ही ओदश दिले होते. २६७ सफाई कामगारांना कायम करुन वेतनश्रेणी ने नियुक्त करायचे त्यावेळी पण मी निवेदन दिले होते,जरूरत गरज पाहून नियुक्ती करावे

लागेल. जितकी पदे मंजुर आहेत त्यात लिव्ह रिजर्व इन्क्ल्युड असते. जो खाडा बदली जी होते, ती इन्क्ल्युड करुन पद मंजुर होते. आमच्याकडे जवळ-जवळ १५०० पदे मंजुर आहेत. त्यात जवळ जवळ ३० टक्के लिव रिजर्व पदे मंजुर होते. खाडा बदली करुन जे कामगार घ्यायचे आहेत, ते कामगार लवकरात लवकर घेतले जातील. परंतु त्यांना नियमित वेतनश्रेणीत नियुक्त करणे मला वाटते की, महापालिकेची आर्थिक परिस्थिती आणि इथली गरज पाहून ते संभव नाही. खाडा बदली करुन घेणे जरूरी आहे. खाडा बदली कामगार म्हणून २६७ लोकांना घेतलेले जाईल.

**श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी, श्रीमती दिपा पंजाबी हे सभागृहातून बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>किती दिवसात घेतले जाईल?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>बरोबर आहे. दादा विचारत आहे किती दिवसात ते कारण असे आहे आमच्या प्रभागात दहा सफाई कामगार आहेत. त्यापैकी चार पाच लोक गैरहजर असतात. पाच लोकांकडुन जर सफाईचे काम होत असेल तुम्ही जो निर्णय घेतला तो खुप चांगला निर्णय आहे. दादांनी विचारले किती दिवसात ते बरोबर आहे.

<u>मा. महापौरः-</u>आता आयुक्तांनी निवदेन दिले आहे ना तुम्ही खाली बसा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.
( दि. १९.४.२००३ त्यात २५.४.२००३)

<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा :-</u>पान नं. १८ वर मी मागच्या वेळेस पण हा प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर मला मिळाले आहे की ही जी चार दुकाने बांधली होती. ९५ पुर्वीचे आहे. ९५ सालामध्ये तर मी पण नगरसेविका होती. तेव्हा तर तिथे काही नव्हते. ही अनाधिकृत जागा होती जिथे घर बांधले आहे. त्यादिवशी मी श्री. गर्जे यांना स्वतः बरोबर घेवून गेले होते. ते दाखवायला. जो भुखंड रिकामा होता तिथे दगडे ठेवून दिली होती. ती दगडे हटवुन तिथे जागा बांधुन टाकली ते गर्जे साहेब स्वतः पाहुन आले आहेत. तरी पण तुम्ही सांगत आहात ते ९५ साला आधीचे ते बांधकाम आहे. मी तिकडे ५० वर्षापासुन रहाते. हे सर्व कसे झाले? मी तर म्हणते ते बांधकाम आताच तयार झाले आहे. उत्तरात लिहिले आहे की ९५ पुर्वीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता पर्यंत जी पण चर्चा झाली. मला वाटते उत्तरे बरोबर दिली जात नाहीत. मी तीन चार स्पेसिफिक प्रश्न सांगतो. जसे आमचे बंधु श्री. लाल पंजाबी म्हणाले की पावसाळयाच्या पंधरा दिवसापुर्वी डांबरीकरण करू शकतो ते चुकीचे आहे. त्याचा मुददा दहा मे पर्यंत असतो. ते चुकीचे उत्तर होते. नंबर २ आताच श्री. सतरामदास यांनी खाडा बदलीचा जो विषय मांडला त्यांनी म्हंटले काही सामान मिळत नाही तर त्याबददल काही उत्तर दिले नाही. आम्हाला ३१ मार्चच्या आतमध्ये खाडा बदली कामगार भरती केले जातील असे सांगितले जाते. अर्धा मे महिना निघुन गेला काही झाले नाही. आजपण आश्वासन दिले नाही किती दिवसात खाडा बदली कामगार भरती केले जातील. दादी श्रीमती. कमला शर्मा म्हणाल्या माझ्या प्रभागात अनाधिकृत दुकाने बनली आहेत. हे उत्तर कुठपर्यंत योग्य आहे की ९५ सालापुर्वीचे ते बांधकाम आहे. तुम्ही तर वीस-पंधरा वर्षापुवीचे पण बांधकाम तोडले आहे. ज्यांना परवानगी नाही प्लान नाही. आपण त्यात हे लिहिले आहे का की त्यांना परवानगी दिली आहे की नाही? ते तुम्ही दयायला पाहिजे. तुम्ही सभागृहाची दिशाभुल करत

आहात. आम्ही इथे वेळ घालवायला येत नाहीत. जर तुम्ही सक्षम नाही काम नाही करू शकत तर दिशाभुल तरी करू नका. कोणी अधिकारी जबाबदारी घ्यायला तयार नसतो. आयुक्त उत्तर देत आहेत, उलट सुलट उत्तरे देवून महासभेची दिशाभुल करून महासभा समाप्त करतात. हे खुप चुकीचे आहे. इथे कायदयाने उत्तर दिले पाहिजे. कोणताही नगरसेवक असो, कोणत्त्या पक्षाचा असो त्याचे समाधान झाले पाहिजे. मेहरबानी करून नगरसेवक जे पण प्रश्न उपस्थित करतात. आज श्री. सतरामदास यांनी दोनदा लक्षवेधी आणली आहे. आज मी आयुक्तांच्या म्हणण्याला सहमत आहे. आम्ही परमनंट लोक भरती करणार नाही. खाडा बदली कामगार घेतले तर पगार देखिल पन्नास रूपयांनी दयावा लागेल. परमनंट कामगार जे गैरहजर असतात त्यांचा रोजचा पगार दिडशे रूपये असतो. खाडा बदली कामगार भरती केले तर पन्नास रूपये दयावे लागतील त्यामुळे महापालिकेचे पैसे देखिल शिल्लक राहतील. आणि महापालिकेची आर्थीक स्थिती नाही कायम स्वरूपी भरती करण्याची. परंतु हे कधी पर्यंत होणार. त्या दिवशी माझ्या समोरच आयुक्त साहेब श्री. भडकवाड साहेबांना विचारत होते की तुम्ही कधी मागवणार महापालिकेकडुन यादी. इकडे फक्त महिन्यातुन एकदा महासभेत बसायचे बाकी स्वतःची मनमानी करावी. मेहरबानी करून सदनाची दिशाभुल न करता दार्दीनी जो प्रश्न विचारला आहे. त्या ९५ मध्ये पण नगरसेविका होत्त्या. त्यांच्या कालावधीत ते काम झाले नाही आता ते काम झाले आहे. त्यांची दिशाभुल करून प्रश्नाचे उत्तर दिले जाते. ते दुकान का तोडले जात नाही. त्यावर कार्यवाही केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. आयुक्त साहेब मी ९७ सालामध्ये आरोग्य समितीचा सभापती होतो. तिथे डंम्पींग ग्राऊंड करावे म्हणुन शुळ साहेबांना राजी केले त्यावेळी तो भुखंड पुर्ण रिकामा होता. आता ९८-९९ मध्ये तिथे बांधकाम झाले आहे. तिथे ९८-९९ नंतर राणा ट्रेडींगची दुकाने उभारली आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, आता जी अनाधिकृत बांधकामाविषयी चर्चा चालु आहे. मी सदनाला सांगु इच्छितो की, ३१ मे पुर्वी दुकाने तोडली जातील. दुसरे निवेदन करताना माझे बोलायचे राहुन गेले. सफाई कामगारांकडे काही साहित्त्य नाही. ते साहित्त्य पण पुरविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, पान नं. ८३ वर तिसरी ओळ ३ . ७ २००० असे लिहिले आहे तिथे २००१ असे वाचले पाहिजे. व पान नं. ८९ वर १२ वी ओळ विश्वास फंग झाले आहे तिथे विश्वास भंग असे वाचले गेले पाहिजे.

श्रीमती निना नाथानी, श्रीमती कोमल भठिजा ह्या सभागृहातून बाहेर पडल्या.

<u>मा. महापौरः-</u>सदरचे इतिवृत्त वरील सुधारणांसह सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय :- दिनांक २८.४.२००३ स्थायी समिती ठराव क्र. ३ कायम करणे बाबत.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय :- दिनांक २८.४.२००३ स्थायी समिती ठराव क्र. ३ कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयानव्ये सादर करण्यात येत आहे की महानगरपालिकेच्या महासभेने महापालिका ठराव कमांक - ९ दिनांक २०/६/९७ अनव्ये स्वामी शांतीप्रकाश महाराज यांचा पुतळा भाटीया हॉस्पीटल जवळ बसविण्याचे ठराव पारित केला.

प्रशासनाने स्वामी शांतीप्रकाश महाराज ट्रस्ट कडून हमी पत्र घेवुन जिल्हाधिकारी ठाणे यांस ट्रस्टद्वारे स्वामी शांतीप्रकाश यांच्या पुतळा बसविणेस ना हारकत दाखला दिला. ट्रस्टनी दिलेल्या हमीपत्रातील काही ठळकबाबी खालील प्रमाणे आहेत.

1) That we shall install the aforesaid Statue ie. (i) “SWAMI SHANTI PRAKASH MAHARAJ” at Bhatia Road & (ii) “SWAMI TEORAM MAHARAJ” at Dudh Naka, Ulhasnagar-5, from the funds of our trust.
2) That forever we (Trustees of Swami Shanti Prakash Ashram Trust), shall supervise & maintain the same at our own risk and cost. The Corporation will not be responsible for the same.
3) That we (Trustees of Swami Shanti Prakash Ashram Trust), hereby declare that the proposed land (To be granted for the aforesaid Statue) is not falling in any Reservation or the same is not affected by the Road, etc. We hereby Declare and Undertake, that in future the aforesaid land (To be granted for the aforesaid Statue) will require by Ulhasnagar Municipal Corporation, then we shall remove the aforesaid Statue to another place as deemed fit by the Ulhasnagar Municipal Corporation & other concerned authority. We hereby further undertake, that we shall remove and install the aforesaid Statue at our own risk and cost, without making any argument or correspondence, if the land (To be granted for the aforesaid Statue) required by the Ulhasnagar Municipal Corporation.

शासनाने सदर पुतळा बसविण्याची मंजुरी ट्रस्टला दिली. तदनंतर महानगरपालिकेने शासनाच्या मंजुरीनुसार पुतळा बसविण्याची मान्यता दिली.

काही समाजसेवक व ट्रस्टने मा. सभापती स्थायी समिती यांच्याकडे सदर स्मारक व चौकाचे सुशोभिकरण करण्याचे विद्युत देयक महापालिके तर्फे भरणा करण्याची विनंती केलेली आहे. तसेच यासाठी ट्रस्टच्या नावे असलेले विद्युत कनेक्शन महापालिकेच्या नावाने हस्तांतरण करणेस लेखी समंती दिली आहे. परंतु ट्रस्टने दिलेल्या हमी पत्रानुसार विद्युत देयकाचा खर्च ट्रस्टने वहन करावयाचे आहे.

सध्याच्या दरानुसार विद्युत देयक अंदाजित रुपये ८४,००० दर वर्षी येतो. यापुढे प्रति वर्षी त्यात वाढ होण्याची शक्यता आहे. ट्रस्टची विनंती मान्य केल्यास प्रति वर्षी महापालिकेला अंदाजे रु. ८४०००/- इतका आर्थिक भार सहन करावा लागेल. मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ नुसार यासाठी महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता सदर ट्रस्टची विनंती बाबत महासभेपुढे योग्य त्या शिफारीशी करण्याकरीता स्थायी समितीपुढे सादर.



<u>स्थायी समिती ठराव क्र. ३</u> <u>दिनांक:- २८.४.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. जेसवानी सतरामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-५ येथील कुर्ला कॅम्प रोड चौकावरील उभारलेल्या स्वामी शांतीप्रकाश महाराज स्मारक व चौकांचे सुशोभिकरणाचा विद्युत देयकाचा खर्च महानगरपालिकेतर्फे सोसणेस महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र. १३ दिनांक:-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी.

ही महासभा दिनांक २८.४.२००३ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. ३ मध्ये अंर्तभाव असलेला निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय:- मुंबई महानगर मुलभूत सुविधा प्रकल्पांतर्गत उल्हासनगर शहर महापालिका हददीतील विशेष रस्ते व पार्कींग विकास योजनेकामी मान्यता देणे बाबत.

*<u>काही सदस्य :-</u>पास. पास.*

*मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी व श्री. ठाकुर बेहरानी यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, विषय क्र. ४ मध्ये रिंग रोडच्या विषयासाठी म्हणजे नवीन रस्ता बनविण्यासंदर्भामध्ये जो साडे पाच कि.मी. चा रस्ता याठिकाणी प्रस्तावित केलेला आहे. मा. आयुक्त साहेबांच्यावतीने तर हा जो रिंग रोड आहे क्र. १ या रिंग रोडची आवश्यकता नाही. असे माझे मत आहे. उल्हासनगर शहराचे जे क्षेत्रफळ आहे. १३ चौ.कि.मी. आहे आणि एवढयाशा या क्षेत्रफळामध्ये साडे पाच कि.मी. चा जो रस्ता नविन बनविण्या संदर्भामध्ये याठिकाणी प्रस्तावित केला आहे. आणि त्यात साडे पाच कि.मी. पैकी कुठेही रस्ता बनविण्यासाठी मोकळी जागा नाही. आणि या संपुर्ण जागेवर वसाहती वसलेल्या आहेत. झोपडपटटया वसलेल्या आहेत. कारखाने वसलेले आहेत. दुकाने वसलेली आहेत. आणि ऐवढा मोठा हा जो परिसर आहे हा परिसर उध्वस्त करून त्याठिकाणी रस्ता बनविणे हे मला योग्य वाटत नाही. याठिकाणी मी जे पाहिले की कोणकोणत्या झोपडपटटया आणि कोणकोणता परिसर या रस्त्याच्या नावाने उठवल्या जाणार आहेत. म्हारळ नाक्यापासुन सुरूवात कमला नेहरू नगर, किर्ती पथ, फक्कड मंडली, दुर्गामाता मंदीर त्याठिकाणचा असलेला पॉवरलुन परीसर शाळा क्र. २४ आझाद सोप फॅक्टरी जवळील आझाद नगर, बुध्द नगर, शास्त्री नगर, महात्मा गांधी कॉलनी, गणेश कॉलनी, सुभाष नगर, फस्ट गेट पासुन नाका नंबर ८ साईबाबा मंदीर पासुन असलेला औद्योगिक परिसर, सम्राट अशोक नगर, वडोल गाव, आम्रपाली नगर, साईबाबा नगर, भरत नगर, हनुमान नगर, समता नगर, मी जे या विकास आराखडयावर नजर मारली तरी हा ऐवढा मोठा शहराचा परिसर आणि या परिसरातील लोकांना आपण त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहोत. तर हे चुकीचे आहे. आणि रिंग रोड बददल हा प्रस्ताव आहे. काय गरज आहे. रिंग रोडची आपल्याकडे कल्याणकडुन येताना शांतीनगर जवळ शहाड फाटक साठी एक रस्ता तयार आहे. आणि तो रस्ता मुरबाड रोडला जोडला जावु शकतो. तशाच पध्दतीने दुसरा रस्ता, शांतीनगर पासुन श्रीराम टॉकीज पासुन व्हाया मानेरा गाव, आणि मानेरा गाव पासुन प्रभात चौक ते शिवमंदीर असा सुध्दा रस्ता त्याठिकाणी तयार आहे. चांगला रस्ता आहे मोठा रस्ता आहे. आणि मग असे दोन योग्य रस्ते सध्या कार्यरत असताना देखिल हा साडे पाच कि.मी. चा रस्ता बनुन शहरातील हजारो घरांना बेघर करणारा हे कितपत योग्य आहे?याठिकाणी विकासाची भावना जर का प्रशासनाच्या मनामध्ये असेल तर शहराचा विकास करण्यासाठी अनेक बाबी आहेत अनेक विषय आपल्याकडे आहेत. याठिकाणी आता शाळा आणि कॉलेजच्या प्रवेशाचे पिरेड चालु आहे आणि सर्व सदस्यांना माहित आहे की उल्हासनगर मध्ये कॉलेज महाविद्यालय नसल्याकारणाने खुप अडचण निर्माण होते. याठिकाणी जे कॉलेज आहेत याठिकाणी जे महाविद्यालये आहेत ते अपुरे आहेत. त्याची क्षमता कमी आहे. तर शहराच्या जनतेला आपण जर का एक महाविद्यालय देवू शकलो तर किती चांगली गोष्ट होईल. त्याचप्रमाणे दरवर्षी या शहरामध्ये पावसाळयात मोठया प्रमाणात पुर परिस्थिती निर्माण होते. आणि त्या पुर परिस्थितीमधुन संबंधित परिसरामध्ये अनेक आजाराचे रूग्ण आढळतात. उल्हासनगरमध्ये कॉलरासारख्या रोगाची लागण झालेली होती वर्षा अगोदर. मलेरिया आणि काविळची साथ सतत आढळते. आणि मग विकास करायचाच असेल तर त्या वालधुनी नाल्याचा विकास का करू नये. वालधुनी नाल्याचा विकास जर का केला तर खरोखर ते जनतेच्या हिताचे काम होईल, आणि कोणत्त्याही प्रकारचे नियोजन नाही कोणत्त्याही प्रकारचे अंदाज नाहीत. आणि डायरेक्टली हा रोड साडे पाच कि.मी. चा हा जो रोड याठिकाणी प्रस्तावित केलेला आहे, हा रस्ता एकदम चुकीचा आहे, यापासुन शहराच्या जनतेला आपण काही देत आहोत, शहराच्या जनतेसाठी काही करत आहोत हे सिध्द होत नाही.*

महासभेला मी याठिकाणी विनंती करतो की, हा जो रिंग रोडचा प्रस्ताव आहे. तो प्रस्ताव रदद करावा, हा प्रस्ताव जर का पास झाला. आणि उदया भविष्यामध्ये ही सगळी हजारो घरे उध्वस्त करण्याचा जर प्रयत्न झाला तर या शहरामध्ये शांतता आणि सुव्यवस्था बिघडल्याशिवाय राहणार नाही याची सुध्दा नोंद सर्वांनी घ्यायची आहे. आणि हा प्रस्ताव पुर्णपणे रदद करण्यात यावा अशी विनंती मी या सभागृहामध्ये करतो. आणि मा. आयुक्त साहेबांना सुध्दा विनंती करतो की त्यांनी हा जो प्रस्ताव आहे हा प्रस्ताव रेटुन धरू नये. सभागृहाला काहीतरी पटविण्याचा प्रयत्न करू नये. मा. आयुक्त साहेब बोलण्यामध्ये खुप पटाईत आहेत, एखादया वेळेला मी जे बोललो आहे, त्या बोलण्याला पध्दतशीरपणे काटछाट करतील परंतु आम्हाला बोलण्यापेक्षा या शहरातील जनतेचा विकास आणि त्यांचे प्रश्न सोडविणे अत्यंत आवश्यक आहे. मा. महापौर साहेबांना पण मी विनंती करतो की महासभेसमोर विषय ठेवत असताना कोणता विषय कुठे कधी ठेवावा मी त्यांना विनंती करतो की आपण सुध्दा येणा-या प्रत्येक विषयावर लक्ष दयावे. महासभेमध्ये विषय यायच्या अगोदर जर का आपण लक्ष दिले तर कुणाला टिका टिप्पणी करण्याची संधी मिळणार नाही. योग्य विषय आपण जरूर आणावा परंतु अनेकवेळा आम्ही महासभेमध्ये अनेक विषय पाहतो की ते विषय महासभेत आले पाहिजे असे वाटत नाही. तरी सुध्दा असे विषय येतात तर महापौरांना सुध्दा मी विंनती करतो की त्यांनी सुध्दा हा जो विषय आहे. हा विषय याठिकाणी रदद करावा. ऐवढे बोलुन मी माझे बोलणे संपवतो. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. नथ्थू सोनावणे, श्रीम. जयश्री सुर्वे सभागृहातून बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, महासभेमध्ये विषय क्र. ४ हा जो एम.एम.आर.डी. ए. चा जो विषय आणला आहे. उल्हासनगरमध्ये रिंग रोड बनविण्याच्या संदर्भात प्रथमतः या आपल्या स्वायत्त संस्थेमध्ये हा विषय रिंगरोड बनवावा की न बनवावा हा पुर्णपणे मला वाटते आपल्या स्वायत्त संस्थेत आपल्या अधिकारातली बाब आहे असे मला वाटते. एम. एम.आर.डी. ए. तर्फे हा जो पहिला विषय आहे. कल्याण मुरबाड रोड, शिवमंदीर चौक, तिथे स्पेसिफीक असे काही सुचविलेले नाही की शिवमंदीर चौक नेमका कुठे आहे. शिवमंदीर पाच नंबर साईडला आहे की ३ नंबर साईडला आहे की अजुन कुठे आहे? तर नेमके त्याचे लोकेशन तुम्ही निश्चित सांगितलेले नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, जेव्हा आपण एखादया शहराचा विकास करतो . जेव्हा एखादया शहराच्या विकासामध्ये जेव्हा आपण कुठल्याही सुधारणेचे कार्यक्रम घेतो तेव्हा ती सुधारणा त्या शहरातील लोकांसाठी असली पाहिजे. लोकांना उध्वस्त करून ती सुधारणा करण्यामध्ये मला तरी वाटते काही अर्थ नाही. शहरातील तमाम जनता उध्वस्त करून तिथे जर तुम्ही विकासाचा कार्यक्रम राबविला तर ते शहर शहर राहणार नाही. या दृष्टीकोनातुन हा जो पहिला विषय आहे. साडे पाच कि.मी. चा यामध्ये मला वाटते बराचसा उल्हासनगरचा परिसर उध्वस्त होणार आहे. आणि त्या दृष्टीकोनातुन हा विषय तुम्ही रदद करावा या विषयामध्ये आमचा विरोध राहिल अशी भुमिका घेवून मी दोन शब्द संपवतो.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, विषय क्र. ४ नुसार उल्हासनगर शहर महानगरपालिका हददीतील विशेष पार्कींग योजनेबाबत विषय आहे त्यामधील जो पहिला भाग आहे त्या पहिल्या भागामध्ये कल्याण मुरबाड रोड पुर्वेकडील ते शिवमंदीर चौक पर्यंत रस्त्त्याचे रिंग रोड अशाप्रकारचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. हा जो रस्ता आहे. हा ३० मी. रूंदीचा आणि साडे पाच कि.मी. लांबीचा इतका असुन ३० मी म्हणजे १०० फुट आणि साडे पाच कि.मी. लांबीचा आणि त्याचबरोबर ३१८० लाख रू. किंमतीचा इतका मोठा प्रस्तावित करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे विकास आराखडयात हा रोड दाखवत असताना तो रोड साईबाबा मंदीरापासुन आतमध्ये टर्न होवून सम्राट अशोक नगर मधील हजारो झोपडया हया उध्वस्त करून रेल्वे लाईन क्रॉस करून, मुंबई पुणे रेल्वे लाईन आहे ती क्रॉस करून आम्रपाली नगर, साईबाबा

नगर, भारत नगर, प्रज्ञाशिलकरूणा नगर, हनुमान मंदीर, साईनाथ कॉलनी, भारत नगर २, समता नगर, यासगळया मागासवर्गीय लोक त्याठिकाणी जास्त प्रमाणात रहातात अशाठिकाणच्या गरीब लोकांची वस्ती असलेल्या लोकांच्या घरादारावर नांगर टाकुन हा रोड शिवमंदीर याठिकाणी जावुन मिळत आहे. खरे म्हणजे शिवमंदीर याठिकाणी हा रोड नेण्याचे कारण या प्रस्तावनेमध्ये असे म्हंटले गेले आहे की, उल्हासनगर महानगरपालिका हददीतून कल्याण मुरबाड रोड राज्य महामार्ग २, व राज्य मार्ग कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर मार्गे कर्जत पर्यंत आहे. अशा प्रकारचे प्रस्तावनेत लिहिले आहे त्यात पुढे असे म्हंटले आहे की, उल्हासनगर अंबरनाथ, बदलापुर ही सगळी शहरे या रस्त्याने एकमेंकांना जोडलेली आहेत. या रस्त्यावरून जड आणि हलक्या वाहनांची वर्दळ नेहमीच जास्त प्रमाणात असते. असे म्हंटले आहे. त्याचा परिणाम शहरतील वाहतुकीवर होतो. आणि तो कुठे होतो तर विशेषतः कल्याण कर्जत रस्ता शहराच्या मध्यभागातुन जात असल्याने या रस्त्यावरील वाहतुकीचा परिणाम शहरामधील रस्त्यांवर होत असुन त्यामुळे १७ सेक्शन शास्त्री चौक शिवाजी चौक, अशोक सिनेमा चौक, प्रेमरामचंदानी चौक या चौकावर व त्या दरम्यान नेहमी वाहतुक कोंडी होत असते. महोदय मला असे सांगायचे आहे की, या प्रस्तावनेत असे म्हंटले आहे की कर्जतला जाणारी जी वाहने असतात त्या वाहनांमुळे यासगळया ठिकाणी ही कोंडी होते. परंतु माझा या गोष्टीवर आक्षेप आहे. तो आक्षेप यासाठी आहे. की कर्जतला जाण्यासाठी मुंबई वरून जर वाहने आली तर तीस गाव वरून एक वेगळाच रस्ता हायवे रस्ता तिथुन आहे. आणि मग या रस्त्याचा उपयोग होतो हे म्हणणे हे याठिकाणी खरे वाटत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट की हा जो सध्य स्थितीचा रस्ता आहे. तो टर्न करून म्हणजे सम्राट अशोक नगर मधुन घेण्याची काहीही गरज नाही. त्यापुढे थोडे आणखी गेले तर धरमसी मोरारजी कंपनी कडे जाण्यासाठी एक रस्ता टर्न म्हणजे २००-३०० फुटावरून एक रस्ता आणखी क्रॉस होतो. तो अंबरनाथमध्ये येतो. तो जरी रस्ता आपण वाहतुकीसाठी घेतला रेल्वे क्रॉस करून तरीसुध्दा आपण खुप मोठया प्रमाणात हानी करणार आहात. त्याचबरोबर आमचे सन्माननिय नगरसेवक श्री. नाना पवार यांनी सांगितले की वाको कंम्पाऊंड आहे श्रीराम टॉकीजच्या पाठीमागुन त्याठिकाणाहुन एक मोठा रस्ता हा गेलेला आहे. आणि हा जो रस्ता आहे हा नेताजी चौकात जावून मिळतो. नेताजी चौकाचा रस्ता खुप मोठा झाला आहे. डी. पी. रोड प्रमाणे झालेला आहे. आणि हा श्रीराम टॉकीजच्या पाठीमागचा रस्ता हा सुध्दा डिपी रोड प्रमाणे झालेला आहे. हाच रस्ता जर आपण पुढे गेलो तर कर्जत रोड साठी मिळणार. जो रस्ता १०० फुटाचा हा शिवमंदीरला जोडणार आहे. नेताजीचा जो रस्ता आहे तो सुध्दा शिवमंदीरला जोडला जातो. आणि त्यामुळे नविन रस्त्यांमध्ये आपण ३१८० लाख रू. खर्च करणे हे आपल्या सारख्या आर्थीक परिस्थीती कमकुवत असणा-या नगरपालिकेला झेपवणार नाही. तेवढया पैशाचे जर आपण पाण्यासाठी काही केले तर आपल्या १७ पिढया त्या सगळया उध्दार होईल असे मला याठिकाणी वाटते. त्याचबरोबर आपल्याला एक जाणीव करून देतो की आपले सभागृह हे फार दयाळु सभागृह आहे. हे दयाळु सदन माझ्या विनंतीचा मान राखील व हा जो प्रस्ताव आहे. १ नंबरचा प्रस्ताव याठिकाणी रदद करण्याची शिफारस करतील. आणखी एक महत्त्वाची गोष्ट की दुसरा दोन नंबरचा जो प्रस्ताव आहे. याच्यानंतरचा लगेच दुस-या नंबरचा जो प्रस्ताव आहे तो सुध्दा, जो रस्ता कर्जत रोडला मिळणार आहे. कारण की उल्हासनगर रेल्वे लाईनच्या बाजुने जावून कर्जत रोडला मिळणार आहे. त्यामुळे डबल पैसे घालविणे हे काही बरोबर नाही. तरी कृपया श्री. नाना पवार यांनी सांगितले की हा रस्ता रदद झाला पाहिजे. श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले त्याचप्रमाणे मी सुध्दा सदनास विनंती करतो की हा रस्ता होवू नये यासाठी आपण सर्वांनी आपल्या भाषणातुन शिफारस करावी. जयहिंद.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:</u>महापौरजी, आयुक्त साहेब, आताच या रस्त्याबददलची चर्चा मी ऐकली. या रस्त्यामुळे मुरबाड रोड ते शिवमंदीर

याठिकाणाहुन हा रस्ता जातो या सर्व ठिकाणावरून आसपास ९० टक्केच्या पुढे झोपडपटटी वसलेली आहे. ज्या झोपडपटटीमध्ये सेंच्युरी रेयॉन, आय.डी. आय. अमरडाय अशा कंपन्यामध्ये नोक-या करण्यासाठी आलेले लोक याठिकाणी वास्तव्य करून रहात आहेत. आणि आपल्या आयुष्याची कमाई लावुन त्यांनी आपली छोटी छोटी घरे तेथे बांधलेली आहेत. तर ऐवढा मोठा जुलूम , ऐवढा मोठा अन्याय, ऐवढा मोठा अत्याचार, या रस्त्यामुळे या शहरात निर्माण होणार आहे. आणि गरीब जनतेची याठिकाणी पायमल्ली होणार आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे की हा जो आकडा आहे खर्चाचा ऐवढा आकडा जर पाण्याच्या विषयाबाबत आपण फिरवला तर शहराकरता एक पंप हाऊस किंवा जलशुध्दीकरण केंद्राचा विषय आपण या सभागृहापुढे आणला तर या शहराचा कायम स्वरूपी पाण्याचा प्रश्न सुटणार आहे याचे एक जिवंत उदाहरण मी आपणांसमोर आणु इच्छितो की, कुळगाव बदलापुर सारखी एक छोटीशी नगरपालिका त्याठिकाणी आमचे मा. अध्यक्ष श्री. राम पातकरजी यांनी सुंदर प्लॅन्ट तयार करून त्याच नदीवर स्वतःचे एक प्रोजेक्ट तयार करून पाणी वितरण व्यवस्था इतकी सुंदर तयार केली आहे. ज्यावेळेला मी ती पाहिली मला त्यावेळेस आपल्या शहराची आठवण आली की, इतर ठिकाणी विकास कार्य करण्यापेक्षा शहराला ज्या गोष्टीचा त्रास अतोनात आहे, तो सोडविण्याकरिता या पैशाचा उपयोग व्हायला पाहिजे असे माझे मत आहे. दुसरी गोष्ट अशी की हा विषय एक आंदोलनाचा भाग ठरला जाईल जर हा रस्ता आपण जर सभागृहानी मान्यता देवून हाती घेतला तर या ठिकाणी शहराचा विकास करण्याऐवजी शहराचा सत्यानास कसा केला जाईल असेच शहरातील जनतेसमोर एक मोठे उदाहरण उभे राहिल. त्यामुळे माझी आयुक्त साहेबांना व सभागृहाला विनंती आहे की याठिकाणी सत्तापक्षामधुन जे आवाज उठले तेच आवाज विरोधी पक्षामधुन सुध्दा निघत आहेत. हा रस्ता जो आहे तो कृपा करून रदद करण्यात यावा ही माझी विनंती आहे.

**मा. सदस्या श्रीमती भारती छाब्रिया सभागृहा बाहेर पडल्या.**

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, विषय क्र. ४ जो आहे. त्यामध्ये दिले आहे की, प्रारूप विकास आराखडयामध्ये समाविष्ट असलेला रस्ता प्रस्तावित आहे. याच महासभेत,जो प्रारूप विकास आराखडा होता. त्यास रदद करून तो राज्य शासनाकडे पाठविलेला आहे. परत यांनी संदर्भ दिला आहे की, प्रारूप विकास आराखडयाच्या हिशोबाने जे रस्ते तयार होत आहेत. त्यांना रदद समजायचे की, त्याच प्रारूप विकास आराखडयानुसार चालायचे आहे की जुन्या विकास आराखडयानुसार चालायचे आहे. एका बाजुने तर आपण असे म्हणत आहोत की आमचा जो प्रारूप विकास आराखडा आहे तो बरोबर नाही. तो महासभेमध्ये रदद करण्यात आला आहे. दुसरी गोष्ट अशी की त्याचा संदर्भ देवून रस्ते मंजुरीसाठी महासभेत आणले जातात. तर मला ही गोष्ट समजुन येत नाही की प्रारूप विकास आराखडा जो आहे तो रदद केल्यानंतरही त्याचा संदर्भ का दिला जात आहे. व ऐवढे जे रस्ते आणलेले आहेत. या अगोदर आम्ही जे ३३ रस्ते मंजुर केले होते व दोन रस्ते मंजुर केले होते त्याचे मुख्य कारण हेच होते की, रस्ता रूंदीकरणामध्ये लोकांची घरे व दुकाने येत होती ते पहाता आम्ही शांतीनगर ते साईबाबा मंदीरापर्यंतचा जो रस्ता आहे. तो रदद केला होता. ऐवढया छोटयाशा रस्त्याचे आम्ही काम करू शकलो नाही व जुन्या ज्या ३३ रस्त्यांची आता चर्चा झाली त्यामधील तीन रोड अदयाप सुरू झालेले नाहीत. त्याचे मुख्य कारण हे आहे की रस्ता रूंदीकरण व आज ऐवढे मोठे रोड व ८२ कोटीचे काम जे आम्ही करणार त्यामध्ये किती घरे बाधित होतील किती लोक बाधित होतील किती नुकसान होईल याबाबत ना काही चर्चा केली आहे. ना काही लक्ष दिले आहे. त्यांचे काय होईल? हे शहराच्या हिताचे नाही. धन्यवाद.

**मा. सदस्यां सदस्या श्रीमती इंदु भठिजा व श्री. अशोक ठाकुर हे सभागृहातुन बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>मा. महापौरजी, हा जो ४ क्रमांकाचा प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यात असे दर्शविले आहे की, यामुळे शहराचा विकास होईल मी,

आमचे सदस्य श्री. नाना पवार व इतरांच्या मताशी सहमत आहे. या शहराचा विकास होणार नाही तर या शहराचा सर्वात मोठा विनाश होईल. श्री. जमनु पुरस्वानी यांनी म्हंटले की विकास आराखडा रदद करण्याचा प्रयत्न चालु आहे. त्याच आराखडयाच्या हिशोबाने हा जो रोड तयार केला जात आहे. तर त्या आराखडयास आम्ही कायम समजायचे की रदद केल्याचे समजायचे. आधी तर हे आम्हाला समजत नाही. दुसरी गोष्ट हा जो इतका मोठा विनाश होईल झोपडपटटीयांचा त्यासाठी तुमच्याकडे काय योजना आहे? तुम्ही त्यांना कुठे जागा देणार? त्याचा उल्लेख नाही. इतका मोठा विनाश शहरात करायचा जसे आमचे मा. सदस्य म्हणाले की, तुम्हाला याआधी हा विचार करायला पाहिजे होता. आपण एम.यु.आय.पी.कडुन दुसरे काही घेवू शकतो. एम.एम.आर.डी. ए. कडुन दुसरे काही घेवू शकत नाही का? आम्ही शहरात उरलेल्या रस्त्यांचे सिमेंटीकरण करू शकतो. एक पण रस्ता शिल्लक राहणार नाही. आपल्या शहरात पाण्याची समस्या आहे. एम.आय.डी.सी. वाले आपल्याला इतका त्रास देतात. शहरासाठी पंपिग स्टेशन बनवुन आपली टाकी बनवुन आपल्या शहराला पुरेसे पाणी देवू शकतो. रोजचे करोड रूपये जे बिल जाते त्यास आपण थांबवु शकतो. अशा खुपशा चांगल्या योजना शहराला देवू शकतो. शहराचे त्यात नुकसान नाही झाले पाहिजे. आमचे सर्वांचे असे मत आहे की, या प्रस्तावास इथे पारीत करू नये. ते शहरासाठी विनाशकारी ठरेल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, सभागृहासमोर ८२ कोटीचा विकासाचा प्रस्ताव आहे. आणि ८२ कोटीचा विकासाचा प्रस्ताव दिड पानामध्ये प्रशासनाने उरकला आहे. दिड पानांमध्ये अगदी सरळ लिहिले आहे हे पाच रस्ते बनवायचे आहे. आणि या पाच रस्त्यांना ऐवढा खर्च व्हायचा आहे. आणि मान्यतेसाठी सभागृहासमोर ठेवलेले आहे. मला तर वाटते की हा जो गोषवारा आहे तो अपुर्ण आहे. हा गोषवारा परिपुर्ण नाही. मुळातच मुंबई महानगरपालिका मुलभुत सुविधा प्रकल्पांतर्गत जर प्रस्ताव घेतो आहे. जो खर्च होणार आहे ते अनुदान आहे की कर्ज आहे हे इथे स्पष्ट झालेले नाही. दुसरे याठिकाणी मुददा प्रशासनाने काही उपस्थित केला की प्रारूप विकास आराखडयाचा संदर्भ इथे देण्यात आला आहे. याच सभागृहामध्ये प्रारूप विकास आराखडा हा सदोष आहे आणि तो रदद करण्यात यावा असा प्रस्ताव शासनाने संमत करून प्रशासनाकडे पाठविला आहे. तो कुठल्या टप्प्यावरती आहे. याची या सभागृहाला कल्पना नाही की ज्यावेळेला आयुक्त निवेदन करतील तर त्यावेळेला त्याचे ते स्पष्टीकरण करतील जो आपण ठराव करून शासनाकडे पाठविला प्रारूप विकास आराखडा रदद करण्याचा तो कुठल्या टप्प्यावरती आहे. दुसरे हे स्पष्ट नाही झाले आहे की हा ८२ कोटीचा जो खर्च आहे. हा खर्च केवळ रोड बनविण्या पुरता आहे की त्या रोडमुळे जेवढी कुटूंब बाधित होणार आहे. त्यांचे पुर्नवसन होणार का? त्याचा सुध्दा खर्च यामध्ये समाविष्ट आहे की नाही हे स्पष्ट झालेले नाही. त्यानंतर आपण जे पुर्नवसन करू ते पुर्नवसन कुठल्या जागांवरती करू ते सुध्दा या गोषवा-यामध्ये स्पष्ट झालेले नाही. मला असे वाटते की ज्यावेळेला फक्त ३३ रस्त्यांचा प्रोजेक्ट याठिकाणी राबविला. तर तो प्रोजेक्ट राबविताना सुध्दा आपल्या महापालिकेची दमछाक झाली, ती दमछाक अजुन सुध्दा या सभागृहामध्ये जेव्हा अधिकारी येवून स्पष्टीकरण करतात. तर त्यामध्ये दिसुन येते की ३३ रस्त्यांचा प्रकल्प राबविताना सुध्दा आज ४ वर्षानंतर सांगावे लागते की आज इथे थोडेसे बांधकाम तोडायचे आहे. तर या पध्दतीने आपण इथे काम करतो. गटारांवरती झाकणे लावलेली नाहीत. रस्त्यांचे फुटपाथ पुर्ण झालेले नाहीत. जिथे फुटपाथ पुर्ण आहेत तिथे टाईल्स लावलेले नाहीत. आणि आधीच्या प्रोजेक्टमध्ये आपण धडपडत, चाचपडत असताना, आधीच्या प्रोजेक्टमध्ये आपले थोबाड चांगले फुटले असताना आपण पुन्हा एकदा नविन ८२ कोटींच्या प्रोजेक्टला हात घालण्याचे धाडस करतो. मला असे वाटते की या प्रोजेक्टमध्ये केवळ उल्हासनगरच्या लोकांसमोर स्वप्नांची इमले उभे करण्याचा प्रयत्न आहे. की आम्ही हे करणार आहोत आम्ही ते करणार आहोत. जो प्रस्ताव तुम्ही या सभागृहासमोर आणाल तो खरे म्हणजे प्रात्त्यक्षिक असला पाहिजे. आणि

मागच्यावेळी सुध्दा या सभागृहात वारंवार चर्चा झाली की, जो कुणी हा विकास प्रकल्प याठिकाणी राबवु त्या विकास प्रकल्पामध्ये सर्व प्रथम आपण शहराच्या नागरिकांचा विचार केला पाहिजे. त्या नागरिकांची बाधित होणारी कुटूंब आहेत. ती किती आहेत. कुठल्या ऐरीयामधुन हा रस्ता जाणार आहे. कुठली कुठली कुटूंब बाधित होणार आहेत. त्याचे पुर्नवसन आपण कुठे करणार आहोत. जागा उपलब्ध आहे की नाही?त्यासाठी किती खर्च येणार आहे. हा जो खर्च तुम्ही दाखविलेला आहे. तो सुपंर्ण खर्च  आहे की पुर्नवसनाचा खर्च अजुन बाकी आहे तो कुठून करणार? या सगळया प्रश्नांची उत्तरे देणारा जो गोषवारा आहे. तो तुम्ही या सभागृहासमोर आणाल तुर्त हा विषय तुम्ही मागे ठेवाल अशी या सभागृहाला विनंती करतो धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. रजेंद्र चौधरी:-</u>सन्माननिय महापौरजी, आजच्या या सभेमध्ये विषय क्र. ४ हा विषय चर्चेला आला. आणि ज्या ज्या सदस्यांनी या विषयावर चर्चा केली त्या सदस्यांशी आम्ही सहमत आहोत. आणि विरोधी पक्षातर्फे या ठरावाला आमचा विरोध आहे धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज हा जो विषय आपल्या समोर आला आहे. त्या विषयाबाबत आमच्या सदस्यांनी जी पण चर्चा केली. सर्वांनी मी समजतो सारखीच चर्चा केली. यांनी पण तेच म्हंटले त्यांनी पण तेच म्हंटले. प्रथम शहर अभियंता आणि आयुक्त साहेबांचे म्हणणे ऐकायला पाहिजे होते.  त्यांनतर जर आपण त्यावर चर्चा केली असती प्रशासनाचे म्हणणे ऐकल्यावर तर खुप चांगले झाले असते. आज आमचे बंधु श्री. नाना पवार यांनी म्हंटले, श्री. शांतारामजी बोलले त्यामध्ये नंबर १ व नंबर २ जे रस्ते आहेत. त्यावर होवु शकते कुणाचे घर, दुकान जाईल. त्याचे विवरण प्रशासनाकडुन घ्यायला पाहिजे होते. परंतु तुम्ही इतर खोलपणे विचार केला नाही. १ नंबर पासुन ५ नंबर पर्यंत जितके पण रस्ते आहेत ते सिमेंटचे असले पाहिजे. त्यामध्ये कोणता कोणता सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता राहिला आहे. १७ सेक्शन पासुन पवई पर्यंतचा, पवई पासुन ४ नंबर ओ.टी. पर्यंत, २५ सेक्शन पासुन प्रभाराम मंदीरा पर्यंत हे जे डांबरी रस्ते आहेत त्यांचे सिमेंटीकरण केले जावे. मागच्या वर्षी आम्ही विठ्ठलवाडी, उल्हासस्टेशन व शहाड स्टेशन येथे पे ॲन्ड पार्कसाठी निविदा मागविली होती.  मला असे वाटते की मुंबई येथील एका पार्टीने तीन टेंडर भरले होते पाच पाच लाखाचे दोन टेंडर भरले होते.  व एक टेंडर साडे चार लाखाचा भरला होता. तर त्यांनी आजपर्यंत स्विकृतीपत्र घेतलेले नाही. व तो ठेकेदार याकामासाठी पुढे आला नाही.  जेणेकरून विठ्ठलवाडी उल्हासस्टेशन आणि शहाड येथे लोकांच्या सोयी सवलतीसाठी पे ॲन्ड पार्क आम्ही तयार करू शकु.  आज महापालिकेस लोन मिळाले तर हे काम करू शकते. या प्रस्तावातील नबंर १ व नंबर २ च्या रस्त्त्यांबाबत ज्या हरकती घेण्यात आल्या आहेत. त्याबाबत मी सांगु इच्छितो की आमच्या आयुक्त व शहर अभियंता यांनी खुलासा करावा. यामध्ये किती नुकसान होणार आहे? म्हणजे या दोन रस्त्त्यांबाबत आम्ही निर्णय घेवू शकु. जर शहरासाठी जे रस्ते जरूरीचे वाटतील ते हाती घेवू. जे दोन रस्ते राहिले आहेत ते सोडुन जे बाकीचे रस्ते आहेत. १७ सेक्शन पासुन पवई पर्यंत, पवई पासुन ४ नंबर ओटी पर्यंत, २५ सेक्शनपासुन ५ नंबर पर्यंत या रस्त्त्यांचे सिमेंटीकरण करण्यासाठी मला वाटते सर्व सहमत होतील. एक नंबर पासुन ५ नंबर पर्यंत पुर्ण उल्हासनगरमध्ये सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार होतील. तर मला असे वाटते आमच्या प्रशासनाचे यावर काय म्हणणे आहे? १ नंबर व २ नंबरच्या रस्त्त्यावर किती नुकसान होत आहे. यामध्ये त्यांनी एक दोन नविन रस्ते सुध्दा आम्हाला दिले आहेत. पवई पुलापासुन उल्हासस्टेशन पर्यंत तो एक नविन रस्ता यांनी सुचविला आहे. मला वाटते तो रस्ता सुध्दा खुपच चांगला आहे. पवई पासुन सरळ उल्हासस्टेशनला पोहचतो.  तर मेहरबानी करून याबाबतीत प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेवून त्यानंतरच निर्णय घेतला तर मला वाटते खुप चांगले होईल.

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>सभागृह नेत्त्यांची जी सूचना आहे की शहर अभियंता स्पष्टीकरण करतील तर शहर अभियंत्त्यांना खुलासा करण्याकामी बोलाविले जावे. या रस्त्त्यांमुळे किती नुकसान होणार आहे ते त्त्यांनी सांगावे. त्यासाठी जरा मैदानात यावे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी म्हंटले की, आयुक्त साहेब किंवा शहर अभियंता, आता आयुक्त साहेबांनी ठरवायचे आहे उत्त्तर कोणी दयायचे.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u> शहर अभियंता उत्त्तर देवू शकत नाहीत का? ते सक्षम नाहीत का? नाहीतर त्त्यांना हटविले जावे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया ,सभागृहात उत्त्तर देण्याची आमची जबाबदारी आहे आम्हीच उत्त्तर देवू. मा. महापौर महोदया, जो प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. मला वाटते या प्रस्तावास विरोध करण्याचे मुख्य कारण आपल्या मनामध्ये जी आशंका आहे की जे लोक बेघर होतील. त्यांचे काय? हा जो प्रकल्प आहे, तो मुंबई अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट ज्याच्या माध्यमातुन आला. याबाबत सर्वांना माहित असेलच की काही दिवसापुर्वी मुंबईत सुध्दा २ ,६०० कोटीचा एक प्रकल्प हाती घेण्यांत आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईतील जेवढे काही मुख्य रस्ते होते. विकास आराखडयामध्ये जेवढे काही रोड आहेत. त्या रस्त्त्यांचे रूंदीकरण करण्याचा प्रकल्प आहे. त्यामध्ये जे लोक विस्थापित होतील त्यांचे पुर्नवसन करण्याचा देखिल त्यात समावेश आहे. मुंबई , ठाणे, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, कुळगाव, बदलापुर पर्यंत हा सर्व जो विभाग आहे. तो एम.एम. आर.डी. ए. मध्ये येतो. एम.एम.आर.डी.ए. मध्ये जो निधी उपलब्ध आहे तो विकास कार्यासाठी उपलब्ध होवू शकतो. याचा विचार करून विकास आराखडयामध्ये जे रस्ते आहेत, येथे सांगण्यात आले की, विकास आराखडयामध्ये १०० फुट रूंदीचा रस्ता आहे. तो मंजुर विकास आराखडयामध्ये सुध्दा आहे व सुधारित विकास आराखडयामध्ये सुध्दा आहे. सुधारित विकास आराखडयाची जी गोष्ट केली जात आहे. त्यामध्ये सभागृहाने जी स्थगिती दिली आहे त्याचे काय? मंजुर आराखडयामध्ये सुध्दा आहे? आम्ही सभागृहासमोर हे आणण्याचे प्रयत्न केले आहे की मंजुर विकास आराखडयामध्ये हा रस्ता आहे व सुधारित विकास आराखडयामध्ये सुध्दा आहे. तर हा रस्ता घेतल्यानंतर कुणाचा विनाश होणार नाही. मला पुर्ण खात्री आहे की, झाले तर या शहराचा विकासच होईल. आपल्या मनामध्ये जी आशंका आहे. त्यामुळे जर आपण विरोध करत असाल तर मी सभागृहास सांगु इच्छितो एम.यु.आय.पी. च्या फंडामधुन जितके काही प्रकल्प हाती घेतले आहेत त्यामध्ये सर्वात जास्त तरतुद जी केली आहे. ती आहे बाधित झालेल्या लोकांच्या पुर्नवसनासाठीची तरतुद. मुंबईमध्ये ३० हजार पेक्षा जास्त कुटूंबियांचे पुर्नवसन या योजनेव्दारे केले जात आहे. व मला वाटते की, या रस्त्त्यांचा अदयाप सर्व्हे केलेला नाही. त्यामुळे पुर्ण माहिती आपल्या समोर ठेवू शकलो नाही. आधी तर आपल्याकडुन या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता पाहिजे होती. नंतर आम्ही हा प्रस्ताव एम.यु.आय.पी.ला सादर करू. एम.यु.आय.पी.मध्ये जर मंजुर झाला तर या कामाचे सविस्तर सर्व्हेक्षण केले जाईल. सविस्तर सर्व्हे केल्यानंतर हे माहित पडेल की किती कुटुंबिय किंवा किती लोक विस्थापित होत आहेत. व त्त्यांचे पुर्नवसन कसे केले जाईल? पुर्नवसन केल्याशिवाय हा प्रकल्प होणार नाही. तर मला वाटते की, या प्रकल्पास विरोध करणे म्हणजे भविष्यामध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातुन जी विकास कामे झाली पाहिजे. ज्याची जबाबदारी या शहरातील लोकांनी आपल्यावर सोपविली आहे. त्यास आपण विरोध करत आहात. असे होईल. या प्रकल्पाबाबत आपल्या मनामध्ये जी काही आशंका असेल, प्रकल्पाची सविस्तर आखणी होईपर्यंत आपण विरोध करू नका. कारण की, निधीच्या उपलब्धतेचा पॅटन सुध्दा अदयाप निश्चित नाही. याकामासाठी अधिकतर निधी एम.यु.आय.पी. कडुन उपलब्ध होईल. महानगरपालिकेकडुन या कामासाठी जास्त काही निधी उपलब्ध करून*

दयावा लागणार नाही. जेवढा काही निधी उपलब्ध होईल तो एम.यु.आय.पी. कडुन उपलब्ध होईल. एक तर अनुदानाच्या स्वरूपात किंवा दिर्घ मुदतीच्या कर्जाच्या स्वरूपात कमी व्याजाच्या रक्कमेवर उपलब्ध होईल. मुंबईमध्ये असे प्रोजेक्ट चालु आहेत. कल्याण, ठाणे, डोंबिवली, मीरा-भाईंदर यासर्व महानगरपालिका ज्या आपल्या स्वतःच्या निधीतुन विकास आराखडयाप्रमाणे विकास कामे करू शकल्या नाहीत. यासाठी त्यांनी आपले प्रकल्प एम.यु.आय.पी. कडे सादर केले आहेत. आपण जर प्रकल्प सादर केला नाही तर एम.यु.आय.पी.कडुन आपणांस जो निधी उपलब्ध व्हायचा तो होणार नाही या शहरासाठी तो कधीही मिळणार नाही. व तो निधी जर दुस-या कोणत्त्या शहरास मिळाला तर मला वाटते ती आपली सर्वांत मोठी चुक होईल. माझी सभागृहास विनंती आहे की, या प्रकल्पास आपण तत्त्वतः मंजुरी दिली तर आम्ही तो एम.एम.आर.डी.ए.कडे सादर करू. नंतर सविस्तर प्रकल्प तयार करून आपल्या समोर येवू व त्यावेळेस आपणांस असे वाटले की शहरामध्ये जास्त तोडफोड होत आहे. किंवा जास्त लोक बेघर होत आहेत व त्यांच्या भविष्याबाबतीत प्रशासन काहीच करत नाही तर त्यावेळेस आपण विरोध करू शकता हे मी समजु शकतो. इथे सांगितले गेले की, पाण्यासाठी तरतुद केली पाहिजे, पाण्याबाबतीत श्वेतपत्रिका तयार केली आहे. याकामी निधी कुठून उपलब्ध होईल याबाबतीचा प्रस्ताव घेवून आम्ही आपणांसमोर येत आहोतच. परंतु हा जो विकास आराखडा मला वाटते की विकास आराखडा तयार होवून २० वर्ष झाली आहेत. त्यातील १५ टक्के सुध्दा आम्ही विकास कामे करू शकलो नाही. ज्यासाठी आरक्षण ठेवले आहे. ते आरक्षण रस्त्त्यासाठी असेल, उद्यानासाठी असेल, टाऊन हॉलसाठी असेल, शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी असेल, जेवढी काही आरक्षणे ठेवली आहेत. त्यापैकी १५ टक्के सुध्दा मागील २० वर्षामध्ये आम्ही विकसित करू शकलो नाहीत. कारण की निधीची उपलब्धता नाही. इथे एम.एम.आर.डी.ए. कडे निधी उपलब्ध आहे. जर आम्ही मागे हटलो तर हा निधी आपल्यासाठी कधीही मिळणार नाही. व विकास आराखडयामध्ये जसा विचार केला आहे तसा विकास कधीही होणार नाही. मला हे माहित आहे की यामुळे कित्त्येक कुटूंबे बेघर होतील परंतु जसे की एम.यु.आय.टी कडुन मार्गदर्शक सूचना आहेत. त्यानुसार या लोकांच्या पुर्नवसनाचा कार्यक्रम यामध्येच पहिले अंर्तभुत असेल होवू शकते ८२ कोटीचा आम्ही जो अंदाज दर्शविला आहे त्यामध्ये वाढ होवू शकते. किंवा कमी सुध्दा होवू शकते. आमचा हा प्रस्ताव जसा आहे तसाच स्विकारला जावू शकत नाही. परंतु या शहराची सर्वात मोठी समस्या ही आहे जी आपणांस माहित आहेच. ती समस्या आहे वाहतुकीची, पार्कींगची, हॉकींगची आहे. इथे पार्कींगसाठी जेवढी पण जागा आरक्षित आहे. मागील वीस वर्षापासुन आजपर्यंत एक सुध्दा पार्कींगसाठीची जागा आपण विकसित करू शकलो नाही. जो रस्ता १०० फुट रूंदीचा पाहिजे होता तो रस्ता आपण ५० ते ४० फुट रूंदीचा ठेवला आहे. तर मला वाटते की विकास आराखडयानुसार या शहराचा जर विकास करायचा असेल तर या प्रस्तावास मंजुरी देणे किंवा या प्रस्तावाबाबत पुर्नविचार करणे आवश्यक आहे. आपल्या मनामध्ये जी भिती आहे आशंका आहे ती मी बिल्कुल स्पष्टपणे दुर करू इच्छितो की जर प्रकल्पात विस्थापित होणा-या लोकांचे पुर्नवसन करता येत असेल तरच प्रशासन हा प्रकल्प हाती घेईल. ही जर आपल्या मनामध्ये शंका असेल तर ती आपण दूर करा. आज आपण विचार करा की त्या रस्त्यांवर जे कुणी लोक आहेत त्यांची आजची स्थिती काय आहे? त्यांची आज कायदेशिर स्थिती काय आहे? तो रस्ता १०० फुट रूंदीचा आहे त्यासाठी इअरमार्क केले आहे आज ना उदया त्यारस्त्त्यासाठी जमिन संपादन केली जाईल. त्याची आजची जी स्थिती आहे ती अतिक्रमणदार म्हणुन, त्याच्याकडे आज जितकी काही जमिन आहे त्याबाबतीत तो खुश आहे. परंतु त्याच्याकडे त्याचे टायटल (मालकी हक्क)नाही. तो जर विकास कामासाठी आमच्याकडे आला तर त्यास घर बांधणीसाठी आम्ही परवानगी देवू शकत नाही. घर दुरूस्तीसाठी सुध्दा परवानगी देवू शकत नाही. परंतु तेथुन त्याचे जर पुर्नवसन झाले तर त्याची जी कायदेशिर स्थिती असेल ती ही असेल की तो त्या जागेचा कायदेशिर मालक असेल महाराष्ट्र शासनाचे जे धोरण आहे की प्रत्त्येक पुर्नवसित व्यक्तीस २२५ चौ.फुटाचे घर दिले पाहिजे. त्यानुसार हे सर्व प्रकल्प विस्थापित लोक त्यास पात्र

राहतील. व त्यांची स्थिती त्यावेळेस मालकाची असेल अतिक्रमणदाराची नसेल तर याचा सुध्दा आपण जरा विचार करा. की आपण जे बोलत आहात आम्ही त्यांना बेघर करत आहोत. आम्ही त्यांना बेघर करत आहोत? त्यांच्या मिळकतीपासुन बेदखल करत आहोत? किंवा त्यांना राज्यशासनाच्या धोरणानुसार योग्य त्या पध्दतीने पुर्नवसित करून मालकी हक्क देत आहोत. मला वाटते की आता विचार करावयास पाहिजे. या प्रकल्पाच्या बाबतीत तांत्रिक माहिती आपणांस दयायची आहे. ही जी रक्कम आहे ती पुर्णपणे अंदाजित रक्कम आहे. यामध्ये निश्चित अशी रक्कम लिहिलेली नाही. त्याचे तपशिल सुध्दा आम्ही येथे विशद केलेले नाहीत. जी काही तरतुद विकास आराखडयामध्ये आहे. सुधारित विकास आराखडयामध्ये आहे. त्यानुसार एक रफ प्राकलन तयार करून, सर्वात प्रथम आपले प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. कडे जावेत म्हणुन आम्ही हे प्रस्ताव तयार केले याच एका चांगल्या उददेशाने आम्ही हा प्रस्ताव घेवून आपल्या समोर आलो आहोत. मला वाटते की कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या येत्त्या एक दोन दिवसामध्ये याबाबतीत ठराव होईल. भिवंडीचा होईल, मीरा-भाईंदरचा होईल व आपण जर या प्रस्तावास विरोध केला तर आपणच या प्रकरणात मागे राहु. मला वाटते आपण हा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. समोर ठेवुन त्यांच्याकडुन जो निधी उपलब्ध होईल त्यातुन प्रकल्प विस्थापितांचे योग्य प्रकारे पुर्नवसन केले जाईल तर या प्रकल्पास विरोध करून आपण फार मोठी चुक करू म्हणुन आपण ती चुक करू नये हीच प्रार्थना मी आपणांस करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:</u>-आमच्या ज्या शंका होत्त्या मला वाटते की आपण त्यांचे समर्थनच दिले आहे. पुर्ण अभ्यास झालेला नाही. सर्व्हे झालेला नाही. याच गोष्टी आम्ही म्हणत होतो. किती लोक बेघर होतील त्यांच्या पुर्नवसनाची योजना काय आहे. ती योजना आणल्यानंतर जर करत असाल तर त्यास आमचा काही विरोध नाही. व मला वाटते आपण सुध्दा अप्रत्त्यक्षपणे आम्हास समर्थन दिले आहे. जसे की घोडागाडीच्या पुढे घोडा पुढे असतो गाडी मागे असते येथे तर आपण गाडीच्या मागे घोडा जोडला आहे. अदयाप पर्यंत सर्व्हेक्षण झालेले नाही. काही अभ्यास झालेला नाही. म्हणुन सर्व अभ्यास करून नंतरच हा प्रस्ताव यावयास पाहिजे त्यावेळी आम्ही आपणांस समर्थन करण्यास तयार असु.

<u>मा. महापौर:</u>-मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छिते......

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> एक मिनिट, मा. महापौर महोदया, ना आमची गाडी घोडयाच्या पुढे आहे ना घोडा गाडीच्या पुढे आहे. आम्ही अदयाप गाडीस घोडा जोडलाच नाही. आम्ही आपणांस विचारत आहोत की घोडा गाडीस जोडायचा की नाही? व जर आपण घोडा जोडण्याची परवानगी दिलीत तर नंतर आम्ही विचार करू त्याचे काय करायचे? मी पहिल्यापासुनच सांगितले की या प्रकल्पाचा सविस्तर सर्व्हे व्हायचा बाकी आहे. जर तत्त्वत: एम.एम.आर.डी.ए. ने प्रस्ताव मान्य केला तरच सर्व्हे करण्यामध्ये फायदयाचे आहे. सविस्तर सर्व्हे करण्यासाठी सुध्दा काही पैसा लागेल तो जर आम्ही आता खर्च केला आणि एम. एम. आर.डी.ए. ने प्रस्ताव स्विकृत केला नाही तर खर्च केलेला पैसा फुकट जाईल. तर आम्ही आपणांस विनंती यासाठी करत आहोत. की जर तत्त्वत: प्रस्ताव स्विकृत केला तर नंतर आम्ही सर्व्हे करून पुन्हा सभागृहासमोर येवू. त्यावेळेस जर आपण काही ठरविले तर योग्य होईल. तत्त्वत: मान्य करण्यामध्ये मला तरी काही अडचण वाटत नाही. व एम.एम.आर.डी.ए. कडुन निधी मिळाल्यानंतर पुढल्या कामाबददल आम्ही विचार करू शकतो.

<u>मा.महापौर:</u>-मी आयुक्त साहेबांना सांगू इच्छिते की, कारण की यापुर्वी सुध्दा काही लोक बेघर झाले होते. त्यांना आजपर्यंत पर्यायी जागा मिळालेली नाही. ते रस्त्यावर मुलाबाळांना सांभाळत आहेत. व ते कसेतरी दिवस काढत आहेत. म्हणुन या प्रस्तावास आमच्या सभागृहाचा विरोध आहे. झोपडपटटीवाल्यांविषयी जेव्हा एखादा प्रस्ताव येतो तेव्हा झोपडपटटीवाल्यांबाबत आमच्या मनामध्ये

आत्मियता असते कारण की, प्रत्येक वेळी त्यांच्याकडे मत मागण्यासाठी जात असतो. झोपडपट्टीवासि राहिले नाहीत तर आम्हाला मते कोण देणार? कुण्या इमारतीतील लोक मते देण्यासाठी येणार नाहीत, आम्हाला मते देतील ते झोपडपट्टीवासियच. म्हणुन मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छिते की या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-</u>मा.महापौरजी, आयुक्त साहेब.....

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मा. महापौर महोदया, ज्या आहेत आमच्या भगिनी त्यांच्या मताशी मी १०० टक्के सहमत आहे. त्या ज्या म्हणत आहेत, त्या बरोबर म्हणत आहेत. सभागृह त्यांच्या भावनांचा आदर करतो. आयुक्त साहेबांनी सभागृहामध्ये जी एक खास गोष्ट सांगितली आहे. मला वाटते की, त्या गोष्टीकडे सभागृहातील कुण्या सदस्याने जास्त लक्ष दिले नाही. आयुक्त साहेबांचे म्हणणे होते, मा. महापौर महोदया, आपणांसही मी ही बाब निर्दशनास आणु इच्छितो. आयुक्त साहेबांचे म्हणणे होते की, जे लोक विस्थापित होतील. या प्रकल्पा अंतर्गत जे रस्ते तयार होतील. व त्यामध्ये जेवढी कुटूंबे विस्थापित होतील त्यांचे जोपर्यंत पुर्नवसन केले जाणार नाही. तोपर्यंत हा प्रकल्प आम्ही राबविणार नाही. ही सभागृहामध्ये आयुक्त साहेबांनी दिलेली ग्वाही आहे. या अन्वये ते सभागृहास खात्री देवू इच्छितात तर मी समजतो की शहराच्या विकासासाठी हे करणे आवश्यक आहे. जर आम्ही विस्थापितांना पर्नुवसित करू शकतो तर मग आम्ही शहरांचा विकास का करू नये? काय आपण विकासाच्या विरोधात आहोत? व जर ८२ कोटी रू. आम्हाला याकामी एम.एम.आर.डी. ए. कडुन मिळत असतील शहरातील जे प्रमुख रस्ते आहेत, हिराघाटपासुन ५ नंबर पर्यंत जो रोड जातो तो तर प्रमुख रस्ता आहे. त्यामध्ये काही जास्त लोक बाधीत होणार नाहीत. चार-पाच दहा-बारा दुकाने जातील. दुसरा रस्ता जो पवई पासुन उल्हासस्टेशनकडे जाणारा रेल्वे लाईनला समांतर असा जो रस्ता जातो. तसेच मुख्य जो रस्ता आहे जो रिंग रोड आहे. रिंग रोडमध्ये होवू शकते जास्तीत जास्त लोक बाधीत होवू शकतात. व हे लोक आज जे अतिक्रमणदार म्हणुन आहेत उदया आपण त्यांना मालक बनवु जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की राज्य सरकारचे हे धोरण आहे. २२५ चौ.फुटाची जागा देवून आम्ही त्यांना मालक बनवु तर का नाही आपण ते करावे? हा जो प्रस्ताव सभागृहासमोर आला आहे. तो शहराची कायापालट करणारा आहे. शहराचा नकाशा बदलेल आज ठाणे शहर जसे दिसते तसे उदया उल्हासनगर शहर ठाण्याच्या बरोबरीस येईल. म्हणुन हा प्रस्ताव या सभागृहात पारीत होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणुन मी विरोधी पक्षांना सुध्दा जोरदार निवेदन करतो. आमचे कॉग्रेस व राष्ट्रवादीचे सदस्य आहेत. या सर्वांनी विचार करून हा ठराव सर्व संमतीने पारीत केला पाहिजे. कारण की हा प्रस्ताव शहराच्या हिताचा आहे. व जेव्हा आपण आपल्या लोकांचे संरक्षण करण्याची हिंम्मत ठेवतो. म्हणुन तोपर्यंत हा प्रकल्प अंमलात आणला जाणार नाही जोपर्यंत या लोकांचे पुर्नवसन होणार नाही. ही सभागृहामध्ये आयुक्तांनी दिलेली ग्वाही आहे. आमच्या सर्वांचे धोरण आहे आश्वासन आहे. या शहरातील लोकांबाबत मी माझ्या भगिनी मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांना निवेदन करेन की, आपल्या भावनांचे संपुर्ण सभागृह आदर करत असुन अशी खात्री देतो की, या शहरामध्ये कुणीही कुटूंब बेघर होणार नाही. सर्वांचे योग्य ते पुर्नवसन होईल व त्यानंतरच रस्ते तयार होतील. म्हणुन पुर्ण सभागृहास हे निवेदन आहे की, या प्रस्तावास सर्व संमतीने पारीत करून शहरास विकासाकडे घेवून जाण्यासाठी आयुक्तांना मदत करू. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहामध्ये आयुक्त साहेबांनी सांगितले की, विकास आराखडयामध्ये भलेही तो जुना विकास आराखडा असो किंवा नविन विकास आराखडा असो. त्यामध्ये जे रस्ते दर्शविले आहेत. त्या हिशोबाने रस्ते घेतलेले आहेत १०० फुट रूंदीचे. जे लोक रस्ता रूंदीकरणामध्ये आज बाधित होणार आहेत ते उदया सुध्दा जरूर

बाधित होतीलच. रस्ता १०० फुट रूंदीचा होईलच होईल. अशा प्रकारचे निवेदन आयुक्त साहेबांनी महासभेमध्ये केलेले आहे. आधी सुध्दा या शहराने या गोष्टी अनुभवल्या आहेत. गोल मैदान ते नेहरू चौकापर्यंतचा रस्ता एकदा नाही दोनदा नाही तर तीन चार वेळा रूंद करण्यात आला. तरी सुध्दा शहरामध्ये असे काही रस्ते आहेत जे विकास आराखडयामध्ये ६० फुट, ४५ फुट, ३५ फुट अशा रूंदीचे दर्शविलेले आहेत. त्यांना कमी रूंदीचे म्हणजे ५० फुट, ४० फुट, ३० फुट रूंदीचे तयार केले जात आहेत. दुकानदारांना रोड कटींगची मार्कींग दिली जात आहे. व दुसरीकडे अनाधिकृत बांधकामे तयार होत आहेत.त्या लोकांना शहरामध्ये गुमराह केले जात आहेत. आपण ३० फुट रूंदीचा रस्ता तयार करा जो प्रत्यक्षात विकास आराखडयामध्ये ४५ फुट रूंदीचा आहे. मी विचारू इच्छितो आपल्या शहरामध्ये आज हे जे आयुक्त आहेत. उदया दुसरा कुणी आयुक्त म्हणुन येईल. त्यांनी जर तो रस्ता ३० फुटा ऐवजी विकास आराखडयानुसार ४५ फुटाचा केला तर आज जी अनाधिकृत बांधकामे होत आहेत. काय ती पुन्हा तोडली जातील? आज हे जे रस्ते महासभेसमोर मंजुरीस आणले आहेत. ते १०० फुट रूंदीपेक्षा कमी रूंदीचे होणार नाहीत. कधीच होणार नाहीत. आज नाही तर उदया १०० फुट रूंदीच्या हिशोबाने कटींग होईल. तर ४५ फुटाचे रस्ते ३० फुट रूंदीचे कसे होत आहेत. आज जो सिरू चौकचा रस्ता होत आहे. त्याची कटींग ३० फुट रूंदीच्या हिशोबाने कशी होत आहे? किंवा जे दुसरे असे काही रस्ते आहेत. दुकानदारांना मिसगाईड का केले जात आहे? आज ३० फुट रूंदीचे रस्ते तयार होतील. उदया दुसरे आयुक्त आल्यानंतर त्यांनी विकास आराखडयानुसार ४५ फुट रूंदीच्या रस्त्त्याचा प्रस्ताव ठेवला तर आपण काय करणार? याचा खुलासा महासभेत आपण करावा.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मी माझे सहकारी श्री. जमनादास पुरस्वानी यांचे लक्ष वेधु इच्छितो की या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती इतकी दुर्बल आहे की आज सिरू चौक पासुन ई.एस.आय. हॉस्पीटल पर्यंतचा ४० लाख रूपये खर्चाचा रस्ता जर ५ फुट कमी रूंदीचा करून जर तयार केला तर यानंतर दुसरे आयुक्त आले तर त्यांना त्या रस्त्त्याची रूंदी वाढविण्यासाठी ५० वेळा विचार करावा लागेल. कारण की अशी आर्थीक परिस्थिती या महापालिकेची नाही. जे सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते तयार होत आहे त्या रस्त्त्यांचे पुन्हा रूंदीकरण करण्यासाठी कमीत कमी ५० ते ६० वर्षाचा कालावधी लागेल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>जे रस्ते १०० फुट रूंदीचे दर्शविले आहेत ते रस्ते आपण ८० फुट, ७० फुट रूंदीचे करू ना? जर अशी व्यवस्था असेल तर आपण त्यांची रूंदी कमी करूआपण शहरातील लोकांची दिशाभुल करत आहोत. मा. हरदास माखिजा हे या शहराचे माजी महापौर आहेत. त्यांना आदर्श नागरिक म्हणुन सर्वजण ओळखतात त्यांनी पाहिले आहे गोलमैदान येथे, मी त्यांच्या बरोबर होतो. पी.डब्लु. डी. चा सभापती होतो. लोकांची घरे उध्वस्त झाली होती. लोक ओरडत होते, रडत होते, महापौर स्वतः चंद्रशेखर यांच्याशी फोनवरून बोलत होते. परंतु काही ऐकुन न घेता आयुक्त साहेबांनी त्याठिकाणी रोड कटींग करून घेतली. जनतेचे ऐवढे मोठे नुकसान झाले. शहरातील लोकांच्या भावना आपण लक्षात घेतल्या पाहिजेत ना केवळ आपला स्वार्थ पाहिला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मी या गोष्टीचा खुलासा करू इच्छितो, माझ्या महापौर पदाच्या कालावधीत ज्या रस्त्त्यांचे रूंदीकरण झाले. श्री. चंद्रशेखर साहेबांनी जे जे प्लान तयार केले शहरातील रस्त्त्यांचे रूंदीकरण करण्यासाठी, जेथे जेथे लोकांचे नुकसान झाले तेथे तेथे लोकांच्या नुकसानीची बरोबर भरपाई या महापालिकेत, भलेही ते प्रशासनाने असो किंवा निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधींनी असो. बरोबर भरपाई केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आता आता महापौरांनी सांगितले की, भरपाई झालेली नाही. शहरामध्ये जे नुकसान झाले त्याची नुकसान भरपाई झाली

नाही असे आताच महापौरांनी सांगितले आहे. व नेहरू चौकापासुन गोल मैदानच्या रस्त्याचे तीन वेळा रूंदीकरण झाले. परंतु त्याची काही नुकसान भरपाई झाली नाही.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>रस्ता रूंदीकरणामध्ये ज्या लोकांची घरे तुटली किंवा दुकाने तुटली त्यांना तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्याची महानगरपालिकेच्या वतीने त्यांना पुर्णपणे मोकळीक देण्यात आली होती. जेणेकरून त्यांनी आपली घरे दुकाने तयार करावीत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>ती सुट अदयापही चालु आहे. श्रीराम सिनेमा येथे खुपच चांगल्या प्रकारची दुकाने तयार झाली आहेत.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>ज्यांची पुर्णच्या पुर्ण बांधकामे या कामी गेली त्यांना तेथुन उठवुन दुस-या जागी पर्यायी जागा देण्यात आली आहे. येथ पर्यंत की दिल्ली येथुन एम. विठ्ठल यांची जी चौकशी समिती आली त्या चौकशी समितीला सुध्दा आम्ही थोपवुन धरले. महाराष्ट्राचे तत्त्कालिन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्यावतीने ही चौकशी थांबविण्यात आली. व याची खात्री देण्यात आली की, त्या लोकांना तेथुन हटविले जाणार नाही. येथपर्यंत आम्ही केले आहे. होवू शकते एखाद दुसरी व्यक्ती राहिलेली असेल काही दोन चार केसेस राहिल्या असतील त्यांना सुध्दा आम्ही पर्यायी जागा किंवा अन्य मार्गाने नुकसान भरपाई देवू मला वाटते की मागील तीन वर्षामध्ये ज्या लोकांचे नुकसान झाले आहे त्यांना बरोबर भरपाइ मिळाली आहे. व आज सुध्दा ज्या पध्दतीने आयुक्तांनी सभागृहाला आश्वस्थ केले आहे त्यानुसार मला वाटते की, या शहराचा विकास होईल. आपण पुढे येवून शहर विकासासाठी त्यांचे हात मजबुत करावेत. ते शहराचा विकास करण्यास तयार आहेत. ते एम.एम.आर.डी.ए. कडे जो प्रस्ताव पाठवु इच्छितात त्यास आपण पाठिंबा दयावा. आपण त्यांची ताकद वाढवा शक्ती वाढवा. व शहर विकासासाठी आयुक्तांना पुर्णपणे सहकार्य दया. जेणेकरून ते शहराचा विकास करू शकतील. कुण्या दुकानदारांचे कुटूंबियांचे नुकसान होईल त्याची भरपाई आम्ही करू असे आयुक्तांनी सांगितले आहे. तोपर्यंत आम्ही त्या रस्त्याचे काम हाती घेणार नाही. याचे एक उदाहरण मी आपणांस सांगु इच्छितो की, जसे आमच्या एका सहका-याने सांगितले की, पंचवटी स्टिल येथील जो रस्ता होता. शांतीनगर पासुन राजीव गांधी चौकापर्यंत जाणारा जो रस्ता होता तो आम्ही वगळला आहे. हे श्री. चौधरी साहेब आपणांस माहित आहेच. कारण की, तेथे लोक वसलेले आहेत. एक अशी मोठी इमारत जी पुर्णच्या पुर्ण त्या रस्ता रूंदीकरणामध्ये जात होती. त्या रस्त्याची आवश्यकता नव्हती. म्हणुन तो रस्ता वगळण्यांत आला. तेथे काही शासकीय कर्मचारी कित्त्येक वर्षापासुन रहात आहेत. म्हणुन अशा प्रकारचे निर्णय या महानगरपालिकेने घेतलेले आहेत. म्हणुन जेव्हा आपण सोबत आहोत तर आपण हे सुध्दा पाहु की, कुण्या व्यक्तीचे नुकसान होवू नये. म्हणुन आपणांस निवेदन आहे की, हा ठराव सर्व संमतीने पारीत केला जावा.

<u>मा. महापौर:-</u>माखिजा साहेबांना सांगु इच्छिते की ठिक आहे. आम्ही आयुक्त साहेबांचा आदर करतो. जी झोपडपट्टी तुटली जाईल तेथील लोकांना सरकारकडुन घरे बांधुन दिली जातील का? उल्हासनगरमध्ये तर ती दिलीच पाहिजेत. व गरीब लोक त्रस्त होतील. त्यांच्याकडे एक वेळच्या जेवणासाठी पैसे नाहीत तर ते घरे कुठून तयार करतील? मला वाटते श्री. माखिजा साहेबांना झोपडपट्टयांबाबत आत्मियता नाही.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मी तर आपल्या भावनांचा आदर करतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>हरदास माखिजा हे झोपडपट्टी विरोधी आहेत.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-महापौरजी, पंतनगर येथील जी झोपडपट्टी हटविली त्या लोकांना काय सुविधा दिल्या आहेत? तेथील सर्व लोक बेघर झाले आहेत. अमरडाय केमिकल कंपनीच्या समोरील.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-आमच्या शहाड फाटक येथील रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित झालेल्या लोकांना एक इंच सुध्दा जागा मिळालेली नाही आपण म्हंणता की भरपाई दिली आहे.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-पंतनगर येथील जी झोपडपट्टी उठविली त्या लोकांना आपण काय सुविधा दिल्या?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-पंतनगर येथील?

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-होय. अमरडाय केमिकल कंपनीच्या समोरील....

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-पंतनगर येथील झोपडपट्टी उठविली आहे त्यामध्ये महानगरपालिकेचा काहीही हात नाही.उल्हासनगर महानगरपालिकेने त्या झोपडपट्टीत एकही निष्काशन केलेले नाही हे मी आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो. तेथे जे निष्काशन झालेले आहे ते रेल्वे प्राधिकरणाने केलेले आहे. भारत सरकारच्या वतीने निष्काशन झालेले आहे.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-परंतु त्या लोकांनी टॅक्स वगैरे तर भरला आहे ना?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-मी आपणांस सांगु इच्छितो की ती जमिन रेल्वेची आहे. ना उल्हासनगर महानगरपालिकेची, ना उपविभागीय अधिकारी (शहर वसाहत) यांचे कार्यालयाची, ना महाराष्ट्र सरकारची ती जमिन आहे.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-त्या लोकांकडे टॅक्स भरल्याच्या पावत्त्या सुध्दा आहेत.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-टॅक्स भरणे म्हणजे जमिनीचा मालक होणे असे नाही.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-तर आपल्या महानगरपालिकेने टॅक्स तर घेतला आहे ना? सनद पण दिली आहे त्यांना.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-मी आपणांस उत्त्तर देत आहे. त्यानंतर सुध्दा उल्हासनगर महानगरपालिकेचा महापौर या नात्त्याने मी सेंट्रल रेल्वेच्या जनरल मॅनेजर पासुन मंत्री महोदयांपर्यंत सर्वांच्या संपर्कात आहे. या प्रकरणाची मी पुर्ण फाईल तयार केलेली आहे. आज सुध्दा मी त्यांच्या संपर्कात आहे. व त्या लोकांना, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, पंतनगर व शहाड येथील ज्या ज्या लोकांची बांधकामे निष्कासित झाली आहेत. त्यांना बदलापुरच्या जवळ जमिन मिळेल. भारत सरकारकडे याबाबतचे प्रकरण प्रलंबित आहे. लवकरच याबाबतीत निर्णय होईल.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-जमिन कधी मिळेल? त्यांच्या घरातील अर्धे सदस्य मरण पावल्यानंतर मिळेल का?

यावेळी काही सन्मानिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. नाना पवार:-मा. महापौरजी..........

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी,

मा. सदस्य श्री. नाना पवारः-सभागृह नेत्त्यांनी नंतर बोलावे. मला बोलुच दिले जात नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आपण प्रथम बसुन घ्या मी बोलत आहे मला बोलु दया.

मा. सदस्य श्री. नाना पवारः-मा. महापौरांनी मला बोलण्यास परवानगी दिली आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आयुक्त साहेब, पैसे परत दयायचे नाहीत का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आता जी चर्चा चालु आहे त्यामध्ये एका मुदयाचा आमच्या सन्माननिय सदस्यांनी विचार केलेला नाही. आमच्या आयुक्त साहेबांनी सांगितले की, हा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी आहे. हा ठराव एम.एम.आर.डी.ए.कडे पाठविला जाईल त्यानंतर सविस्तर सर्व्हे केला जाईल. कोणत्त्या रस्त्त्यावर किती नुकसान होते त्या हिशोबाने तो रस्ता तयार झाला पाहिजे किंवा नाही. याबाबतचा प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे आणला जाईल. त्या अगोदर एका सुध्दा रस्त्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही. आजचा जो विषय आहे तो ठराव पारीत करून एम.एम.आर.डी.ए. कडे पाठविण्याबाबतचा आहे. त्यानंतर प्रत्त्येक रस्त्त्याचे सविस्तर प्राकलन तयार केले जाईल. व ते त्त्यांनी सांगितले आहे की, ते महासभेसमोर आणले जाईल. आज भलेही ती इमारत असो की झोपडपट्टी आम्ही लोक इमारती व झोपडपट्टी अशा दोन्ही विभागातुन निवडुन आलो आहोत. माझ्या प्रभागात १०-१५ झोपडपट्ट्या आहेत हे आपणांस माहित नाही ना? गायकवाड पाडा, आकाशचाळ, झोपडपट्ट्या आमच्या प्रभागात सुध्दा आहेत. शिवमंदीर येथील कैलास कॉलनी ही झोपडपट्टी माझ्या प्रभागात आहे. तर झोपडपट्टीचे नुकसान आमचा एकही सदस्य होऊ देणार नाही. परंतु आजचा जो विषय आहे.तो ठराव पारीत करून एम.एम.आर.डी.ए.कडे पाठवुन ८३ कोटी रूपये कर्ज घेण्याबाबतचा आहे. त्यानंतर महासभेपुढे हा प्रस्ताव पुन्हा येईल. जर १० रस्ते असतील व त्यातील चार रस्ते जर नुकसानीचे वाटत असतील तर आम्ही चार रस्ते नाकारून सहा रस्ते मंजुर करू. त्याबाबत जास्तीत जास्त काय होईल की, कर्ज मिळणार नाही, मला वाटते की, आज जो प्रत्त्येक सदस्य बोलत आहे की, झोपडपट्ट्यांचे जास्त नुकसान होईल, काय आम्ही झोपडपट्ट्यांमधुन निवडुन येत नाही? आज जे रस्ते तयार होत आहेत ते फक्त फक्त झोपडपट्टी पुरती मर्यादित नाही. १ नंबर पासुन ५ नंबर पर्यंत सर्व सिमेंट कॉक्रिटचे रस्ते आहेत. जे जे रस्ते कॉक्रिटचे तयार केले आहेत ते सोडुन इतर जे डांबरीरस्ते आहेत ते सिमेंट कॉक्रिटचे केले जातील तर मला वाटते की सविस्तर प्राकलन तयार करून सविस्तर रस्त्त्यांची माहिती पुन्हा महासभेपुढे आणली जाईल. जसे आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले आहे. त्यावेळेला जर आम्हाला वाटले की या रस्त्त्यामध्ये जास्त नुकसान होणार आहे. तर तो रस्ता आम्ही मंजुर करणार नाही. तर ही गोष्ट लक्षात घेवून आज ठराव पारीत करून तो एम.एम.आर.डी.ए. कडे कर्ज मिळविण्यासाठी पाठवायचा आहे. असे नाही की रस्त्त्यांना मंजुरी देत आहोत. तर कृपाकरून यावर जास्त चर्चा न करता जसे आयुक्त साहेब म्हणतात की प्रशासकीय मंजुरी दया. वित्तिय मंजुरी तर ते मागत नाहीत. वित्तिय मंजुरी देईल एम.एम.आर.डी.ए. त्यांनी कर्ज मंजुर केल्यानंतर हा प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे येईल.

मा. सदस्य श्री. नाना पवारः-मा. महापौरजी, याठिकाणी विशेषतः विकास आराखडयावर मा. आयुक्त साहेबांनी जोर दिलेला आहे. मा. आयुक्त साहेबांच्या एक निर्दशनास आणु इच्छितो की उल्हासनगर शहराचा विकास आराखडा १९७२ आणि ७४ च्या दरम्यान बनलेला आहे. आणि १९७२-७४च्या पुर्वी या शहरामध्ये

मोठ्या प्रमाणामध्ये झोपडपट्टयांची संख्या आढळुन येते. झोपडपट्टयांची संख्या, १९६० च्या दरम्यान झोपडपट्टया वसलेल्या आहेत, १९६० मध्ये वसलेल्या झोपडपट्टयाद १९७२-७४ च्या विकास आराखडयामध्ये एकही झोपडपट्टी त्याठिकाणी दाखविण्यात आली नाही. आज परिस्थिती अशी आहे की, १९७२-७४ चा विकास आराखडा आणि प्रारुप विकास आराखडा दोन्ही विकास आराखडयामध्ये झोपडपट्टयांवर पध्दतशीरपणे अन्याय झालेला आहे. या सगळया सदनाला माहित आहे आपणाला ही माहित आहे की, या संपूर्ण विकास आराखडयामध्ये कोणती झोपडपट्टी दाखविण्यात आलेली आहे. आणि मग विकास अराखडयाचा सहारा घेऊन जर का विकासाची भाषा करण्यात येत असेल तर मग या सगळया झोपडपट्टयांवर वेगवेगळया प्रकारची जी आरक्षणे आहेत तर मग आपण या सर्व झोपडपट्टयांना उठवणार आहात का? हा विकास आराखडयाच आम्हांला मान्य नाही. हा चुकीचा विकास आराखडा आहे. आणि विकास आराखडयाच्या आधारे घेतलेला हा रोड अत्त्यंत चुकीचा आहे. या ठिकाणी श्री. हरदास माखिजा यांनी गोडसरपणे वक्त्यव्य केले. मी त्यांना एक गोष्ट आठवून देतो, ते महापौर असतांना अंबरनाथ -कल्याणचा हा जो रोड आहे, हा रोड १०० फुट रुंदीचा आहे. विकास आराखडयावर सुध्दा , आणि या रोडचे काम जेव्हा या महानगरपालिकेच्यावतीने हाती घेण्यात आले, त्यावेळेस तत्त्कालिन महापौरांनी तेथे उपस्थित राहुन त्या रस्त्त्यांचे काम थांबविण्याचा प्रयत्त्न केला. आणि त्यावेळेला १०० फुट रूंदीच्या रस्त्त्याची गरज नव्हती. आणि आज झोपडपट्टयांवर असलेला हा जो रोड आहे. हा रोड तयार करा म्हणे यामध्ये शहराचा विकास आहे. माणसे येतात आणि जातात. कुणी माणुस कायम नाही. त्यांची काही गॅरेन्टी नाही. नाना पवार पुढल्या वेळेस नगरसेवक असतील याची गॅरेन्टी नाही. आणि मग याठिकाणी आपण हा जो प्रस्ताव पारीत करून घेणार आहात. भविष्यामध्ये येणारी माणसे, येणारा अधिकारी तुम्ही जे आश्वासन आज देत आहात. ते पाळतील. याची खात्री आहे का आपल्याला? मला तरी नाही. याठिकाणी अनेक प्रकारची आश्वासने देण्यात आली आहेत. आणि माणुस गेला की आश्वासन सुध्दा गेले. आणि आश्वासनावर जर का सभागृहाला मान्य करून घेण्याचा प्रयत्त्न करत असाल कोणत्त्याही पध्दतीने, लिखित काहीही नाही. गोषवा-यामध्ये काहीही नाही. माझे असे म्हणणे आहे की जर का झोपडपट्टीयांन बाबत ऐवढी आत्मियता व काळजी आहे. तर मग पध्दतशीरपणे सर्व्हे करून तसा प्रस्ताव आणावा. आणि त्यानंतर सदनासमोर ठेवावा. आणि असे जर का असेल की कोणत्त्याही प्रकारचा विचार विनिमय न करता. हुंदो रे हुंदो असा प्रकार जर का होत असेल तर या अशा प्रकाराला आम्ही सक्त विरोध करणार आहोत. मी परत एकदा महापौरांना विनंती करतो की, विषय क्र. ४ मधील क्रमांक १ चा रोड आहे. तो रोड आजच्या सभेमध्ये पास करू नये. आणि जर का आपण पास केलात, आपण सुध्दा झोपडपट्टीमधील प्रतिनिधी आहात हे लक्षात ठेवा. झोपडपट्टीचे नागरिक आपल्यास क्षमा करणार नाहीत. आपल्या कार्यकालामध्ये झोपडपट्टीच्या नागरिकांचा विकास झाला पाहिजे. ही सर्वसाधारण जी समज आहे नागरिकांची आणि आपण विकास कराल ही सुध्दा आम्हाला अपेक्षा आहे. आणि खात्री सुध्दा आहे म्हणुन परत एकदा विनंती करतो की, हा एक नंबरचा प्रस्ताव याठिकाणी रदद करावा. मी महापौरांना सुध्दा विनंती करतो की, हा जो विषय क्रमांक ४ मधील पहिल्या क्रमांकाचा जो रोड आहे तो रदद करावा.

<u>मा. सदस्य श्रीच राजेंदसिंह भुल्लरः-</u>मा.महापौरजी, आयुक्त साहेब, शहाड फाटक येथे सुरवातिस जे रस्ता रूंदीकरणाचे काम झाले होते. त्यावेळेस ४०-५० घरे तुटली होती. त्यातील एकास सुध्दा पर्यायी जागा दिलेली नाही. ज्यांची परिस्थिती होती. त्यांनी इकडे तिकडे घरे घेतली. काही परिवार असे आहेत. जे पुलाखाली राहतात. आज त्यांना सुध्दा उठविण्यासाठी महापालिकेचे अधिकारी तिथे पोहचले होते. तर हे रस्ते कोणत्त्या आधारावर तयार करत आहात. पहिल्या रस्ते रूंदीकरणात बाधित झालेल्या लोकांना अदयाप पर्यायी जागा दिलेली नसताना काही परिवार आज सुध्दा पुलाखाली राहतात. माजी महापौर म्हणतात की सर्वांना पर्यायी जागा दिल्या आहेत शहाड फाटक वाल्यांना एक रूम सुध्दा दिलेला नाही.

५० कुटूंबापैकी ५ कुटूंबे पुलाखाली रहात आहेत. ताडपत्री सुध्दा खरेदी करण्याची त्यांची परिस्थिती नाही. त्या लोकंना तेथुन उठविण्यासाठी महापालिकेचे अधिकारी तेथे पोहचले.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-मा. महापौरजी, व उपस्थित सहकारी हो, मला वाटते की, या प्रस्तावाबाबत व या शहराबाबत, या शहरास झोपडपट्टी व हाय सोसायटी ज्यास म्हंटले जाते त्यामध्ये विभागणे हे बरोबर नाही. मी माझा मित्र श्री. नाना पवार यांना सांगु इच्छितो की, झोपडपट्टयांचे संरक्षण जे आहे ते सर्वांना प्रिय आहे. व झोपडपट्टीयांच्या संरक्षणासाठी मी चंद्रशेखर सारख्या व्यक्तीशी फाइट केली होती. व त्यांना फोन वरून बोललो होतो की, शहाड येथे जे निष्काशनाचे काम चालु आहे ते पहाता आपला कर्मचारी वर्ग जर अशाप्रकारची गुंडागर्दी करत असेल तर मी महापौर पदाचा विचार न करता या पदाचा मी राजीनामा देईन व आपणांस सबक शिकविण्यास मी सक्षम आहे. जेव्हा झोपडपट्टयांवर अशा प्रकारची कारवाई झाली होती. झोपडपट्टयांचे संरक्षण हे आम्हाला सर्वात प्रिय आहे. आम्हाला नाही वाटत की शहर विकासाच्या नावाने या शहरास दोन भागामध्ये विभागले जावे. हे आपणांवर अवलंबुन आहे. सभागृहावर अवलंबुन आहे. प्रस्ताव समोर आहे जर सभागृहास असे वाटत असेल की आयुक्त व प्रशासनाने काही चुकीचा प्रस्ताव आणला आहे. तर भलेही आपण तो पारीत करू नका. परंतु त्याचबरोबर एक गोष्ट लक्षात घ्यायची आहे की, शहरातील लोकांना आपणांस उत्तर दयायचे आहे. आम्हाला उत्तर दयायचे आहे. आम्हां सर्वांना मिळुन उत्तर दयायचे आहे. पाच वर्षानंतर जेव्हा आम्ही निवडणुकीच्यावेळी नागरिकांमध्ये जावू त्यावेळी शहरातील कुण्या नागरीकाने असे म्हणु नये की, आपण शहर विकासामध्ये अडथळा आणला होता. यागोष्टीचे श्री. नाना पवार आपणांस लक्ष ठेवायचे आहे. तर हा प्रस्ताव जो आहे तो आपल्या समोर आहे. जर सभागृहास वाटत असेल की हा प्रस्ताव पारीत झाल्याने शहराचा विकास नाही विनाश होणार आहे. तर मेहरबानी करून प्रस्ताव पारीत करू नका. जर असे वाटत असेल की हा प्रस्ताव पारीत केल्यानंतर शहराची कायापालट होणार आहे. हे शहर मुंबई ठाणे यासारखे दिसेल, कल्याण डोंबीवली सारखे दिसेल, पुणे, नाशिक सारखे दिसेल. तर कृपया आपण प्रस्तावाच्या बाजुने आपले मत दया. पाहिजे तर हे दोन प्रस्ताव मागे ठेवू या. उर्वरित दोन तीन विषय निकालात काढुन या विषयाबाबत नंतर विचार करू. शक्य असेल तर वेगवेगळया राजकीय पक्षांचे जे नेते आहेत. त्यांनी एकत्र बसुन या विषयावर विचार करू काही झोपडपट्टयांचे जे नेते मंडळी आहेत. त्यांनी आपसात बसुन विचार विनिमय करून त्यानंतरच हा प्रस्ताव पारीत करावा. परंतु जो काही निर्णय घेतला जाईल. तो विचार पुर्वक घेतला पाहिजे. शहराचा विकास झाला पाहिजे. व कुण्याही झोपडपट्टीवासियांस आम्ही बेघर करू इच्छित नाही. हे आमचे स्पष्ट धोरण आहे. यासर्व बाबी लक्षात घेवून आपणांस निर्णय घ्यायचा आहे.

मा. सदस्य श्री. देंवेद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, माजी महापौर सर्वांना समजावत आहेत की हा जो प्रस्ताव आहे तो फक्त प्रशासकीय मान्यतेसाठी आहे. बाकी सविस्तर कार्यक्रम नंतर येईल. त्याचबरोबर एक सूचना ही सुध्दा देत आहेत. कुठल्याही झोपडपट्टीवासियास नुकसान पोहचु दिले जाणार नाही. पुर्नवसनाचा पुर्ण बंदोबस्त केला जाईल. त्यानंतरही झोपडपट्टी, झोपडपट्टी असे म्हणुन चुकीच्या दिशेने विचार करणे बरोबर नाही. आता तर हे असे नाही ना की, आज ठराव पारीत झाला म्हणजे उदया पासुन रस्ते तयार करण्याचे काम चालु झाले व झोपडपट्टी हटविण्यास सुरूवात झाली असे तर नाही ना? आमच्या आयुक्त साहेबांनी संपुर्ण कार्यक्रम सर्वांसमोर ठेवला आहे. त्यावर विचार विनिमय करूनच त्यास मंजुर केले जावे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. महापौरजी, मी सभागृहास हे सांगु इच्छितो, इतर ठिकाणी झोपडपट्टयांची जी जागा रस्ता रूंदीकरणामध्ये गेली आहे. तेथे

काही झाले नाही. त्या गोष्टीत आणि या गोष्टीत फार मोठ फरक आहे. कारण की एमएमआरडीए. ची जी योजना आहे. त्याबाबत जसे आयुक्त साहेबांनी आपणांस सांगितले की, शासनाचा नियम आहे त्यास स्वतः बांधकाम करावे लागणार नाही. त्यास २२५ चौ. मिटरची बांधकाम केलेली जागा दिली जाईल.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-हरकतीचा मुददा. महापौरजी, हरकतीचा मुददा. मला बोलु दया.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-झोपडपटटयांचे नुकसान होणार नाही. यावर सभागृहाने लक्ष दिले पाहिजे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-हरकतीचा मुददा, आमचे सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी म्हटले की, २२५ चौ. मिटरची जागा तर मी सांगु इच्छितो की, मिटर नाही फुट, मिटरची जागा फार होते.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः- मा. महापौरजी , ज्याप्रकारे झोपडपटटी विकासासाठी शासनाकडून निधी मिळतो,वाल्मीकी आंबेडकर योजना, सुवर्ण जयंती योजना तो निधी आपण उपलब्ध करु शकत नाहीत. त्याचा आपण उपयोग करु शकत नाहीत, झोपडपटटी उदवस्त करण्याचा निधी आपण उल्हासनगर मध्ये आणत आहात? विकास आराखडयाच्या हिशोबाने जो शंभर फुट रुंदीचा रस्ता आहे, तो रस्ता आपण १०० फुट रुंदीचा तयार करु शकत नाहीत. व हजारो घरे उदवस्त करुन , तोडुन आपण हा रस्ता तयार करु इच्छित आहात, हे कुठ पर्यंत योग्य आहे?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :- मा. महापौरजी ,रोडचा हा जो विषय आहे, तो फार गंभीर विषय आहे. आमचे आयुक्त साहेबांनी सुध्दा या शहरात फिरुन या शहराची परिस्थीती पाहिली आहे. या शहराच्या चारी बाजुंनी उदा. एक बाजु कल्याण महानगरपालिकेने बंद केली आहे. दुस-या बाजुने अंबरनाथ नगरपालिकेने एक बाजु बंद केली आहे. तिसरी बाजु जी आहे, ..............

मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणी :- पुन्हा-पुन्हा तीच चर्चा केली जात आहे. कितीवेळ बसणार आहात? ९ वाजेपर्यंत, १० वाजेपर्यंत बसणार आहात काय?शुगर पेसेंट आहेत, .........

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :- विषय एवढा गंभीर आहे, त्यात काय?

मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणी :- पुन्हा-पुन्हा तीच चर्चा , पुन्हा-पून्हा तेच सदस्य उठतात, तीच चर्चा करतात. मुददा निर्णयात तर काढा ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- श्री. रामदास उमाप दोन-तीन वेळा या विषयावर बोलले आहेत. प्रत्येक वेळेला तीच चर्चा प्रत्येक सदस्यांनी एक वेळच बोलावे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः- काय करणार? आम्हांला तर बोलावेच लागणार ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- आम्ही आपल्या भावना समजलो.

मा. सदस्य श्री. देवेदसिंह खेमाणीः- माझी स्वतःची लक्षवेधी असून मला बोलू दिले जात नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- श्री. रमेश चव्हाण हे पहिल्यांदाच बोलण्यासाठी चार वेळा उभे राहिले त्यांना बोलु दिले नाही.

काही सदस्य दोन-दोन, तीन-तीन वेळा बोलले.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा. महापौरजींना माझी विनंती आहे की, या विषयावर सर्व पक्ष व सर्व गटनेत्त्यांशी चर्चा करून पुढल्या महासभेत हा विषय आणावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, कुणीही बेघर होणार नाही. रस्त्यांचे काम हाती घेण्यापुर्वी महासभेपुढे प्रस्ताव मंजुरीस आणला जाईल. आजचा हा ठराव फक्त एम.एम.आर.डी.ए. करिता आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. आयुक्त साहेब, मा. महापौरांनी एकदा विषय वगळण्यानंतर त्यावर चर्चा करण्यात फायदा काय? महापौरांनी त्याचा एक वेळ विरोध केला आहे. विषय डिफर केला आहे तर वारंवार चर्चा करण्याची गरज काय?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-मा. आयुक्त साहेब, आपण कर्ज रूपाने हे जे पैसे घेणार आहोत ते आपण कसे फेडणार आहोत?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-महापौरजी, पुढच्या सभेत हा विषय ठेवला जावा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आपली परिस्थिती आहे का? आपल्याकडे आता सध्या गहाण ठेवण्यासाठी सुध्दा काही नाही. तो टाऊन हॉल गेला आता बोट क्लब आणला आहे. आपली परिस्थिती काय आहे? आपण आपल्या परिस्थितीप्रमाणे वागा ना? घर जाळुन दिवाळी करायची याला काय अर्थ आहे?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-महापौरजी, पुढच्या सभेत हा विषय ठेवला जावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौरजी, जर या विषयावर आपण सहमत नसाल तर हा विषय डिफर करण्याचा आपणांस अधिकार आहे आपण तो डिफर करू शकता आपण तो डिफर करावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-ज्या मुदयांवर चर्चा होते. त्याबाबत सचिव साहेब सांगतिल कायदा काय आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-बहुसंख्येने निर्णय घ्यायचा आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-मा. सचिव साहेब, महापौरांची जर इच्छा असेल डिफर करायची तर डिफर करू शकत नाहीत का?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, आयुक्त साहेब बोलल्यानंतर पहिल्यांदाच मी बोलत आहे. इथे हे दाखविले जात आहे की, जे सदस्य प्रस्तावास विरोध करत आहेत ते सदस्य विकासाच्या विरोधात आहेत. असे चित्र येथे उभे केले जात आहे. जर सत्ताधारी सदस्यांनी जर लक्ष देवून सर्वांची भाषणे ऐकली असतील तर त्या सर्वांनी हाच मुददा ठेवला आहे. व आयुक्त साहेबांनी पण मान्य केले आहे की, प्रस्ताव तयार करण्या अगोदर सर्व्हे झालेला नाही. आम्ही पण हाच मुददा ठेवला होता व आमची सुध्दा हीच मागणी आहे. की कमीत कमी पुढच्या महासभेत हा जो प्रस्ताव आहे जो रफ प्रस्ताव आपण तयार केला आहे. तर हा रस्ता कोणत्त्या झोपडपटटीमधुन कोणत्त्या इमारतीवरून जाणार आहे. किती लोक बाधित होणार आहेत याचा अंदाजित आकडा आम्हास दयावयास पाहिजे होता. कोणत्त्या विभागातुन रस्ता जाईल त्या विभागाचे नाव तरी देवू शकता की नाही? जी सविस्तर माहिती आहे जिच्यासाठी खर्च येणार आहे ती

नंतरची गोष्ट आहे. परंतु कोणत्त्या विभागातुन, कोणत्त्या वस्त्त्यांतुन, कोणत्त्या इमारतींवरून हे रस्ते जाणार आहेत. किती घरे बाधित होणार आहेत याचा अंदाजित आकडा देवु शकता ना? ऐवढी मागणी करण्यामध्ये काही चुकीचे आहे का? व हा प्रस्ताव आणण्यामध्ये काय हरकत आहे की, एक महिना थांबण्यामध्ये मला नाही वाटत की, काही नुकसान आहे. पुढल्या महासभेत आम्ही या प्रस्तावास पाठिंबा देवु ही आमची भावना आहे.

मा. महापौरः-मी सदरचा प्रस्ताव मतदानास टाकत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.
श्री. प्रभुनाथ गुप्ता आपले काय?
श्री. प्रमोद टाले आपले काय?

प्रस्तावाच्या बाजुने :- ३२ मते

१. श्री. टेकचंदानी राजु
२. श्रीमती. भावना रामचंदानी
३. श्री. लिंगे सुर्यकांत
४. श्री. ऐडके गणपत
५. श्रीमती. कमला शर्मा
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्री. रोहडा श्यामसुंदर
८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्रीमती. आहुजा नीता
१०. श्री. रूपाणी चिमन
११. श्री. ठाकुर विनोद
१२. श्री. गायकवाड सुरेश
१३. श्री. वनवारी किशोर
१४. श्री. जेसवानी सतरामदास
१५. श्री. लुंड गोविंदराम
१६. श्रीमती. भावना खिलनानी
१७. श्री. खेमाणी दर्शनसिंग
१८. श्रीमती. कारीरा रेखा
१९. श्री. पमनानी ईश्वर
२०. श्री. पंजाबी नारायण
२१. श्री. रामरख्यानी मोहनदास
२२. श्री. लबाना होशियारसिंग
२३. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२४. श्री. तलरेजा विनोद
२५. श्रीमती. रिझवानी सुजाता
२६. श्रीमती. दासानी मिनु
२७. श्री. जाधव प्रशांत
२८. श्री. जाधव सुरेश
२९. श्री. भालेराव गौतम
३०. श्री. बेहरानी मोहन
३१. श्रीमती. करोतिया मालती
३२. श्री. बेहरानी ठाकुरदास

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

श्री. नाना पवार , श्री. शांताराम निकम आपल्या दोघांचे काय? तटस्थ आहात?

<u>प्रस्तावाच्या विरोधात :-१७ मते</u>

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती. मोकल सीमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. असरोंडकर राज
६. श्रीमती. कृष्णानी रेखा
७. श्री. यादव लालबिहारी
८. श्री. भुल्लर राजेंदसिंह
९. श्री. गायकवाड दिलीप
१०. श्रीमती. बामणकर नंदीनी
११. श्रीमती. खांडेकर प्रेमा
१२. श्रीमती. माने किरण
१३. श्री. चव्हाण रमेश
१४. श्री. पाटील विश्वनाथ
१५. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१६. श्री. चौधरी राजेंद्र
१७. श्री. टाले प्रमोद

<u>तटस्थः-</u>

१. श्री. शांताराम निकम
२. श्री. नाना पवार

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>सचिव साहेब, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत जाधव, श्री. विनोद ठाकुर यांनी कोणत्त्या बाजुने मतदान केले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>त्यांनी प्रस्तावाच्या बाजुने मते मांडली. ठिक आहे?

<u>मा.महापौरः-</u>या प्रस्तावाबाबत बहुमताने पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषयः- मुंबई महानगर मुलभूत सुविधा प्रकल्पांतर्गत उल्हासनगर
शहर महापालिका हददीतील विशेष रस्ते व पार्कींग
विकास योजनेकामी मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेशाच्या हददीतील रस्ते सुधारणा कार्यक्रम मुंबई महानगर मुलभुत सुविधा प्रकल्प (MUIP Project) हाती घेतला आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळा (M.M.R.D.A.) च्या अखत्त्यारित राबविण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या हददीत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र येते. या महानगरपालिकेच्या क्षेत्रात वाहतूकीच्या

समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतुन कल्याण-मुरबाड रोड (राज्य महामार्ग क्रमांक २वसई, सातिवली, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, मार्गे, अहमदनगर) व राज्य मार्ग कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर मार्गे कर्जत पर्यंत आहे. अशा प्रकारे उपरोक्त शहरे एकमेकांना या महामार्गानी जोडली असल्याने व ही सर्व शहरे राज्यामधील प्रमुख शहरे असल्याने उपरोक्त दोनही मार्गावरून जड व हलक्या वाहनांची वर्दळ जास्त आहे. त्याचा परिणाम शहरामधील वाहतुकीवर होतो. विशेषतः कल्याण-कर्जत रस्ता शहराच्या मध्यभागातून जात असल्याने या रस्त्त्यावरील वाहतुकीचा परिणाम शहरामधील रस्त्त्यांवर होत असून त्यामुळे १७ सेक्शन "शास्त्री चौक, शिवाजी चौक, अशोक सिनेमा चौक, प्रेम रामचंदानी चौक या चौकांवर व त्या दरम्यान नेहमी वाहतूक कोंडी असते.

विकास आराखडयामध्ये शहराच्या सभोवताली १०० फुट रूंदीचा रिंग रोड प्रस्तावित आहे. शहरामधून जाणा-या मुंबई-पुणे रेल्वेमार्गाला समांतर विनस चौक ते प्रभाराम चौक, हिराघाट ते पवई चौक, वाको जंक्शन ते ओटी चौक असे प्रारूप विकास आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या रस्ता प्रस्तावित आहे. तसेच प्रारूप विकास आराखडयामध्ये उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळ पार्किंगची जागा राखीव आहे व या सर्वांचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. या सर्वांचा विकास केल्यास शहरामध्ये होणारी वाहतुकीची कोंडी व पार्कींगची समस्या टाळता येऊ शकते.

उपरोक्त नमुद केलेल्या रस्त्त्यांचे तसेच उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी स्टेशनजवळील पार्कींगचे काम करण्याकरिता प्रस्ताव तयार केला असून तो खालील प्रमाणे संक्षिप्तपणे नमुद केला आहे.

| अ. क्र. | रस्त्त्याचे नांव | लांबी | विकास योजना प्रमाणे रूंदी | अस्तित्त्वातील रूंदी | कामाची किंमममत (रू. लक्षमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कल्याण मुरबाड रोड पुर्वेकडील ते शिवमंदीर चौक पर्यंत रस्त्त्याचे (रिंग रोड) वरील रस्त्त्याचे काम | ५.३० किमी | ३० मी. | नवीन रस्ता | ३१८० |
| | त्यात आर.ओ.बी. आणि संरक्षण भिंत | - | - | - | १००० |
| | | | | एकुण | ४१८० |
| २ | पवई आर ओ बी उल्हास स्टेशन मार्गे सी.एच.एम. कॉलेज ते वडोल गांव रेल्वे ट्रकच्या बाजूने रस्त्त्याचे काम | २.४० किमी | २४ मी. | नवीन रस्ता | १२०० |
| | नदीवरील पुल आणि संरक्षण भिंत | - | - | - | ५०० |
| | | | | एकुण | १७०० |
| ३ | विनस चौक ते प्रभात चौक मार्गे नेताजी शाळा ते गांधी रोड मार्गे निजधाम ते प्रभाराम चौक | १.५० किमी | ३० मी. | १८ ते २० मी. | ९०० |
| | अतिरिक्त जोडरस्ता | ०.२० कि. मी. | १८ मी. | १३ मी. | ७० |
| | | | | एकुण | ९७० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | हिराघाट ते पवई चौक | ०.४२ किमी | ३० मी. | २० मी. | २५२ |
| ५ | वाको जंक्शन ते ओ. टी. चौक उल्हासनगर-४ | ०६० कि. | ३० मी. | १८ ते २० मी. | ३६० |
| ६. | उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळ थी स्टोरीड पार्किंग | - | - | - | ८०० |
| | | | | एकुण | ८२६२ |

उपरोक्त प्रस्तावावरील एकंदर अंदाजित खर्च ८२६२ लक्ष इतका अपेक्षित आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळामार्फत राबविण्यात येणा-या मुंबई महानगर मुलभुत सुविधा प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेने उल्हासनगर शहराकरिता प्रस्तावित केलेल्या रू. ८२६२लक्ष खर्चाच्या उपरोक्त योजना शासन मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे निर्देशित करण्यात येत असलेल्या आकृतिबंधाप्रमाणे राबविण्याकरिता शासनाकडे व मा. सभापती / मा. आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळ (एम एम आर डी. ए)कडे पाठविण्याकरिता सदर प्रस्तावास महासभेकडुन प्रशासकीय मान्यता मिळण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. १४ दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उपरोक्त नमूद केलेल्या रस्त्यांचे तसेच उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी स्टेशनाजवळील पार्किंग करीता एकंदर अंदाजित खर्च रू. ८२६२ लक्ष खर्चाच्या कामी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण मंडळामार्फत राबविण्यात येणा-या मुंबई महानगर मुलभुत सुविधा प्रकल्पांतर्गत सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

तसेच सदर प्रस्ताव शासनाकडे व मा. सभापती / मा. आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळाकडे पाठविणेस निर्देश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी, श्री. अंकुश म्हस्के, श्रीमती. मीना सोंडे, श्रीमती. मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या वुडलॅंड रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास '' स्वर्गीय श्री. थारूमल बी रोहडा'' असे नामकरण करणे बाबत.

काही सदस्य :-पास. पास.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आम्ही पास करीत आहोत काही ऐकुन घेण्याची आम्हाला आवश्यकता नाही. श्री. चौधरी साहेबांचा प्रस्ताव आहे आम्ही तो पारीत करू इच्छितो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आमच्या विरोधी पक्ष नेत्त्याकडुन प्रस्ताव आलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-माझ्या बोलण्याचा विषय वेगळा आहे. मी आपणांबाबत काही बोलणार नाही. आपण ऐकुन घ्या. मी आपणांबाबत बोलणार नाही. मा. महापौरजी, आयुक्त साहेब मी या चौकाचे नामकरण करण्यासाठी आपणांस पत्र दिले होते. आपण तो प्रस्ताव तयार करून महासभेत आणल्याबददल धन्यवाद. ज्या संस्थेचे नाव या चौकाला दिले जाणार आहे. त्या संस्थेने आपणांस एक पत्र दिले होते. तो चौक सुशोभिकरणासाठी जो काही खर्च लागेल तो खर्च ती संस्था करेल. परंतु त्या प्रस्तावामध्ये तसे काही आलेले नाही. पुन्हा त्यांना परवानगी घेण्यासाठी आपणांकडे यावे लागेल. ते पुन्हा यावे लागु नये म्हणुन या प्रस्तावामध्ये दुरूस्ती करण्यात यावी. आणि ती परवानगी त्यांना त्या प्रस्तावामध्ये देण्यात यावी.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सुशोभिकरण सुध्दा करायचे आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-मला एक शंका आहे. आपण हे जे नामकरण करत आहात. मागे श्री. हरदास माखिजा हे महापौर असताना असे ठरले आहे की,

चौक व रस्त्यांना राष्ट्रीय नेत्त्यांची नावे देण्यांत यावीत. याबाबत मी मागच्या महासभेत सुध्दा बोललो. असे एक प्रकरण झाले की चंदर रोहडा म्हणुन एक इसम आहे. जो गांधी रोडला राहतो. त्याचे वडील पाकीस्तानमध्ये राहतात. ते पाकिस्तानमध्ये जन्माला आले आणि तेथेच निधन पावले. त्यांच्या वडीलांचे नाव इथे ठेवले आहे. तुम्ही याची शहनिशा करा. खरोखरच ते काय आहे? त्यांचा पुर्व इतिहास काय आहे? आणि दुसरी गोष्ट अशी की चंदर रोहडाचे वडील जे होते त्यांना तिथली एक स्थानिक महिला कृष्णाबाई म्हणुन आहे तिने त्यांना विरोध केला. तिने विरोध केला त्यामुळे तेथील लोकांनी अशी तडजोड केली की त्यांच्या आईचे नाव तेथील चौकास देण्यांत आले. त्यामुळे तेथे बाजुबाजूला दोन नावे देण्यात आली आहेत. श्री. चंदर रेहडा यांच्या वडिलांचे नाव की जे येथे जन्मले सुध्दा नाही. व निधन सुध्दा येथे पावलेले नाहीत. ते पाकीस्तानातच होते आणि पाकिस्तानातच वारले. त्यांचे नाव इथे दिले जाते. तुम्ही कोणतेही नाव देण्याअगोदर त्याची शहानिशा करा. आणि नंतरच नाव दया.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले सभागृहातुन बाहेर पडले.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या वुडलॅंड रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास '' स्वर्गीय श्री. थारूमल डी रोहडा'' असे नामकरण करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास स्वर्गीय श्री. थारूमल डी. रोहडा'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही काणेत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला ''स्वर्गीय श्री. थारूमल डी. रोहडा'' असे नामकरण करणेबाबतचा महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. १५ दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. अंकुश म्हस्के.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास ''स्वर्गीय श्री. थारूमल डी. रोहडा'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे. तसेच पुज्य पंचायत विठ्ठलवाडी दुकानदार / कारखानदार यांना त्यांचे स्वखर्चाने चौक सुशोभिकरण फलक लावणे आणि त्याची देखभाल दुरूस्तीसाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर ५ येथील महात्माफुले नगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफीस समोरील चौकास ''भारतरत्न डॉ.

बाबासाहेब आंबेडकर चौक" असे नाव देणे बाबत.

<u>*काही सदस्य :-*</u> पास. पास.

<u>*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-*</u>*नाही नाही, मी दोन मिनिटे बोलु इच्छितो. हा जो सहाव्या क्रमांकाचा विषय आहे. त्याबाबत मला अशी माहिती आहे की, कुण्या एकेकाळी त्यास स्वामी शांतीप्रकाश चौक असे नाव देण्यात आले होते. दुसरे आता आमचे श्री. रमेश चव्हाण म्हणाले त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो आम्ही लोकांनी यावेळेस जे निवडुन आलेले नगरसेवक आहेत. या सर्वां मिळुन एक पध्दत ठरविली होती की, कुणीही एक स्थानिक नगरसेवक आपल्या पॅनल मधील एखादे नाव सुचवत असेल तर अशी नावे आम्ही गेल्या एक वर्षापासुन मंजुर करत आलो आहोत. हा जो सहाव्या क्रमांकाचा विषय आहे त्याबाबत आमच्या नगरसेवकाचे असे म्हणणे आहे की, मी पत्र दिलेले नाही. जो सहाव्या क्रमांकाचा विषय आहे तो कुणी दिला आहे? नगरसेवक आपल्या पुर्ण पॅनलमध्ये एखादे नाव देणेस सुचवू शकतो. तर हे जे नाव देण्याचा प्रस्ताव येथे आणण्यात आला आहे तो त्या पॅनलच्या नगरसेवकाने आणलेला नाही. तिसरे असे की, श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, कोणीही व्यक्ती जो इथला नसेल, आम्ही सर्व लोक पाकिस्तानमधुन आलो आहोत. परंतु इथे उल्हासनगरमध्ये कुणी मुंबईमध्ये राहणारा, कुणी महाराष्ट्रात राहणारा अशा व्यक्तींची नावे देण्यांत आली आहेत. अशावेळी आम्ही कधीही हरकत घेत नाही की, हा महाराष्ट्राचा नेता आहे. भारताचा नेता आहे. कुठेही कुठल्याही नगरसेवकाने आपल्या पॅनलमध्ये नाव दिले असेल तर ते आम्ही मंजुर केले आहे तर हा जो सहाव्या क्रमांकाचा विषय आहे त्यासाठी मला असे वाटते की, यावर सार्वजनिका बांधकाम विभागाकडुन खुलासा झाला पाहिजे. माझे असे निर्दशनास आणुन देण्यात आले आहे की या अगोदर या चौकास स्वामी शांतीप्रकाश चौक असे नाव देण्यात आले आहे. त्या पॅनलच्या नगरसेवकांनी हे नाव देण्यासाठी पत्र दिले आहे की नाही किंवा कुणी दिले आहे. याचा जरा खुलासा व्हावा.*

<u>*मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-*</u>*आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी जे म्हंटले की, त्या पॅनलच्या नगरसेवकांनी प्रस्ताव आणला पाहिजे. तर मी सभागृह नेत्यांना ही आठवण करून देवू इच्छितो की, मास्टर चंदर हे पुलाला जे नाव देण्यात आले आहे. तर तो पुल ज्या प्रभागात येतो त्या प्रभागातील नगरसेवकाने हे नाव सुचविले आहे का? त्यावेळेस आपणांस पॅनल बाहेरील नगरसेवक चालतो. परंतु जेव्हा कुणाच्या भावनांशी जुडलेला प्रश्न येतो. मला बोलु दया कृपया. ज्यावेळेस भावनांशी निगडीत असा प्रस्ताव येतो. त्यावेळेस त्याच पॅनलच्या नगरसेवकाचे पत्र पाहिजे असा तुम्ही नियम दाखविता हे चुकीचे आहे. जर असा नियम असेल तर मास्टर चंदर जे पुलास दिले आहे. त्यासाठी श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत जाधव आमची बहिण श्रीमती. जयश्री सुर्वे यांचे पत्र आले पाहिजे होते. त्यावेळी आपण कसे मंजुर केले? दुसरी गोष्ट अशी की, सार्वजनिक बांधकाम विभागाने येथे गोषवारा दिला आहे की तेथे कोणतेही नाव दिलेले नाही. तेथे त्यांना कोणतेही नाव दिसले नाही. म्हणजेच तेथे आजपर्यंत कोणतेही नाव दिलेले नाही. तर त्या चौकाचे नाव स्वामी शांतीप्रकाश चौक असे मी आजपर्यंत कधीच ऐकलेले नाही. तर आपण जे म्हणता तसे मला माहित नाही व सार्वजनिक बांधकाम विभागालाही माहित नाही. तर कृपया हा जो प्रस्ताव मी आणला आहे तो कृपया पारीत केला जावा. अशी मी विनंती करतो.*

<u>*मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-*</u>*मा. महापौरजी, व उपस्थित सहाकारी हो, मी आमचे सभागृह नेताजी आहेत त्यांची थोडी गैरसमजुत झाली आहे ती दुर करू इच्छितो. सभागृह नेत्यांना असे वाटते की त्या चौकाचे नाव स्वामी शांतीप्रकाश चौक असे देण्यात आलेले आहे. तो स्वामी शांतीप्रकाश मार्ग आहे. मागच्यावेळी सुध्दा श्री. नाना पवार यांनी या प्रस्तावाबाबत मला विनंती केली होती. माझी पण अशी धारणा होती की त्या चौकाचे स्वामी शांतीप्रकाश चौक असे नाव आहे*

परंतु प्रत्यक्षात असे नाही. त्या मार्गाचे नाव आहे. यासाठी आपण जो प्रस्ताव दिला आहे. तो बरोबर आहे. व दुसरे असेही मी सभागृहासमोर सांगु इच्छितो हे जरूरी नाही की, त्या पॅनलच्या किंवा त्या प्रभागाच्या नगरसेवकाने त्या ठिकाणच्या नामकरणाचा प्रस्ताव दिला पाहिजे. शहराचा कुणीही नागरिक, कुणीही नगरसेवक महापालिकेस कुठल्याही नामकरणाचा प्रस्ताव देवू शकतो. जर सभागृहास तो योग्य वाटला तर सभागृह त्यास पारीत करू शकते. हे जरूरी नाही की त्याच पॅनलच्या नगरसेवकानी किंवा त्या प्रभागाच्या नगरसेवकाने पत्र दिले पाहिजे. किंवा त्याच प्रभागातील नागरिकांनी पत्र दिले पाहिजे याची काही आवश्यकता नाही. यासाठी हा जो प्रस्ताव आला आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा प्रस्ताव आहे. तो सर्वसंमतीने पारीत केला पाहिजे.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता मी जो विषय मांडला होता. माहिती शहर अभियंत्यांकडुन पाहिजे होती. तर ती श्री. शांताराम निकम यांनी दिली. एक तर हे चुकीचे आहे. मी शहर अभियंत्यांकडुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जर मला समाधानकारक उत्तर दिले असते तर श्री. शांताराम निकम यांनी खुलासा करण्याची काही आवश्यकता नव्हती. त्यांनी जी पॅनल सिस्टीमची गोष्ट सांगितली त्याचा पण मी खुलासा करू इच्छितो की उड्डाण पुलाबाबत कोर्टाने ऑबजेक्शन घेतले आहे. आपण येथे काय सांगत आहात. तर मेहरबानी करून फक्त याचा खुलासा करा आज आमच्या पक्षाचे नगरसेवक आहेत श्री. सतरामदास जेसवानीजी यांनी सांगितले की हा पॅनल माझा आहे. जर कुणी सदस्य सभागृह नेता या नात्याने मला काही सांगत असेल की मी त्या पॅनलमधील रस्ते, चौक, उद्यान किंवा समाज मंदीरचे नाव दयावे. पहिले नाव जर असेल तर दुसरे नाव देता कामा नये. हे चुकीचे होईल.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>महापौर साहेबा, श्री. किशोर वनवारी यांनी आपल्या मताने कोणतीही गोष्ट तयार करून महासभेसमोर ठेवलेली नाही. कृपया सर्व सदस्यांना माझी ही विनंती आहे. उल्हासनगरमधील कोणत्याही विभागातील आम्ही नागरिक डॉ.बाबासाहेबांचा श्रध्दांपुर्वक मान ठेवतो. बाबासाहेबांसाठी जो जो कार्यक्रम जो कुठेही होतो. आम्ही श्रध्दापुर्वक तेथे जावुन, परमेश्वराला जसा मान देतो. तसाच मान आम्ही त्यांना देतो. व देत आलो आहोत. यापुढेही देवू. कुण्या एका इसमाने आम्हास असे सांगितले होते की या चौकास यापुर्वी नाव दिलेले आहे. आमची महापालिका अधिका-यांशी हीच विनंती आहे की, कृपया तेथे जर आधि कुठले नाव दिले असेल तर त्याची चौकशी करावी. जर तेथे कोणते नाव दिलेले नसेल तर आमची सर्व सदस्यांस विनंती असेल की, जर तेथे कोणतेही नाव दिले नसेल तर या प्रस्तावास सर्वात प्रथम मी अनुमोदन देईन. की त्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेच नाव दिले जावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, आता आमचे सन्माननिय सभागृह नेता यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन माहिती घेतली पाहिजे. परंतु मी त्यांना सांगु इच्छितो की, नामकरणाचा जो कोणताही प्रस्ताव येतो तो सार्वजनिक बांधकाम विभागाकडुनच येतो. तर हा जो प्रस्ताव आहे तो तेथील लोकांच्या भावना लक्षात घेवून मी ठेवला आहे. माझ्या काही असे स्वप्नात आले नाही की तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दयायचे आहे. तेथील जनतेची मागणी आहे. १० वर्षापासुन तेथील जनतेची मागणी आहे. तेथे आमचे नेते श्री. रामदास आठवले यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करण्यात आले होते. आमचे सन्माननिय जेष्ठ सदस्य श्री. हरदास माखिजा यांनी सुध्दा सांगितले आहे की, तेथे स्वामी शांतीप्रकाश चौक असे नाव नाही. तर शांतीप्रकाश मार्ग असे नाव आहे. तरी कृपया त्या चौकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नाव देण्यात यावे. अशी मी विनंती करतो.

काही सदस्य :-पास.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर ५ येथील महात्त्माफुले नगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफीस समोरील चौकास ''भारतरत्त्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील महात्त्मा फुलेनगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफिस समोर चौकास '' भारतत्त्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकात चबुतरा बनविलेला असुन सदर चबुत-यावर ''भारतरत्त्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर चौक'' असे नांव दर्शविलेले आढळले आहे. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकास ''भारतरत्त्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. १६ दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. शांताराम निकम.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नाना पवार.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील महात्त्मा फुलेनगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफिस समोर चौकास '' भारतत्त्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर -२ मधील स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन पी. शाह'' असे नांव देणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-डिफर.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर -२ मधील स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन पी. शाह'' असे नांव देणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर-२ येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक, ए-वन दुध, आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नाव देणे बाबत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-पास. पास.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौर, सातव्या क्रमांकाच्या विषयाचे काय केले?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढे ढकलला ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्चानीः-चर्चा न करता विषय पुढे कसा ढकलला.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आपण हरकत घेतली नाहीत. त्यांनी होय म्हंटले गोष्ट समाप्त झाली.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- सभागृहामध्ये नवव्या क्रमांकाचा विषय आला आहे. त्याचे दोनदा नामकरण होत आहे. ही किती मोठी मानहानी आहे. तेजुमल चक्की मार्ग असे नाव ठेवले त्यांनी बोर्ड लावला त्याचे उदघाटन केल्यानंतर त्याचे नाव बदली होत आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-नवव्या क्रमांकाचा विषय येवू तर दया.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-सातव्या क्रमांकाचा विषय डिफर का केला? ७ नंबरवर प्रथम चर्चा करा तो विषय डिफर का केला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-शहर अभियंत्यांनी प्रस्ताव दिला होता.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-७ व्या क्रमांकाचा विषय डिफर का केला. सहाव्या क्रमांकाच्या विषयात स्पष्टपणे लिहिले आहे की, उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत

नाही. माहित नाही तरी पण चर्चा होत आहे. नावे दोन-दोन आहेत, तीन-तीन आहेत. हे काय करत आहे सार्वजनिक बांधकाम विभाग मला समजुन येत नाही. एकेका रस्त्याचे नाव दोन दोन, दोन-दोन रस्त्याची चार-चार नावे आता प्रस्ताव आणत आहात डिफर करत आहात. मग आणता कशाला असे प्रस्ताव. आता चर्चा करा प्रथम हा प्रस्ताव डिफर का होत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ठिक आहे. विषय क्र. ८ पास?

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

*विषयः-* उल्हासनगर-२ येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक, ए-वन दुध, आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नाव देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक ए-१ दूध आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला ''स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे कोणतेही नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग '' असे नामकरण करणेकरिता महासभेची मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. १७</u> <u>दिनांकः-१९ ५ २००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. होशियारसिंग लबाना.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक ए-१ दूध आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.*

*विषयः- उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र. ४ मधील चंचलानी निवास ते विजय किराणा स्टोअर्स, उत्तम अपार्टमेंट मार्गेच्या नामकरणाबाबत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>मा. महापौरजी, मला बोलु दिले जाणार नाही असे वाटते?*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मा. महापौरजी, एक मिनिट एक छोटीशी चुक झाली आहे. पहिली जी पुर्व नगरपालिका होती. ८६ पासुन ९२ पर्यंत त्या नगरपालिकेच्या दरम्यान एक प्रस्ताव पारीत झाला होता. ज्यामध्ये माता मजनीबाई मार्ग व चौक असे नाव देण्यात आले होते. चंचलानी निवास पासुन सुरू होत होता, उत्तम अपार्टमेंट मार्गे व विजय किराणा स्टोअर्स पर्यंत संपत होता. त्या रस्त्यास आमच्या मागील बॉडीच्या महासभेने एक असा प्रस्ताव आणला होता तेजुमल वासवानी मार्गया नावाने त्याच रस्त्यात, चुकीने हा प्रस्ताव आला आहे तर मी त्याबाबत एक सूचना देवू इच्छितो की, बॅरेक नं. १८२ व बॅरेक नं.१७१ च्या आसपास एक चौक आहे. ज्यास धोबीघाट चौक असे म्हंटले जाते तेथेच त्यांनी तेजुमल वासवानी मार्ग नावाचा एक फलक लावलेला आहे तो मार्ग या नावाने नाव न देता तो चौक असे नाव देण्यात यावे. व हा प्रस्ताव पारीत केला जावा.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:</u>मा. महापौरजी, या प्रस्तावाबाबत मला काही म्हणायचे आहे. सर्वात पहिली गोष्ट तर ही आहे की, एक नाव असताना दुस-या नावाचा प्रस्ताव येतो. शेवटी महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागात कुणी जबाबदार व्यक्ती आहे की नाही? कधी सांगितले जाते शांतीनगरच्या गेटला डबल नाव देण्यात आले आहे. चंदर रोहडा यांच्या वडीलांबाबत सांगण्यांत आले की, ज्यांचा इतिहास माहित नाही. त्यांच्या नावाचा प्रस्ताव येतो. कधी माता मजनीबाई मार्ग हे नाव असताना तेथे तेजुमलचे नाव लावले व त्याचे नामकरण आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी व श्रीमती. ज्योती कालानी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिका-यांनी नारळ फोडुन केले आहे. आज या चौकाचे हे नाव आहे याबाबत पत्र लिहिणार, पत्र पोहचे पर्यंत त्या चौकाचे चौथे नाव ठेवले जाते. असे आहे का? व दुसरी गोष्ट अशी की श्री. हरदास माखिजा यांनी जसे सांगितले की, बाजुला जे चौक आहे त्याचे नाव देवू परंतु तेथे चौक नाही. धोबीघाट आहे. तेथुन तीन रस्ते निघतात. परंतु पहिले दोन रस्त्यांमधुन निघुन चौकापर्यंत पोहचण्यास....*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मी जी सूचना दिली आहे. त्याबाबत मी चौकशी केली आहे. त्या भागास धोबीघाट चौक असे म्हंटले जाते. त्यासच आम्ही नामकरण करू इच्छितो तेजूमल वासवानी चौक तेथील लोकांची संमती सुध्दा आम्ही घेतली आहे. तेथे ज्यांचा सहभाग आहे. ज्यांचे नाव कॉन्ट्रवरसी मध्ये आले आहेत त्या सर्वांशी सल्ला मसलत करून मी हा प्रस्ताव दिला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तेजुमलच्या आसपासचे जे कुटूंबिय आहेत जे शुभचिंतक आहेत ज्यांच्या सांगण्यावरून आपण हा प्रस्ताव पारीत करणार असाल तर आपण त्यांना विश्वासात घेतले आहे? कमीत कमी या महानगरपालिकेच्या महासभेकडुन मी अशी अपेक्षा करतो की, मोठ्याप्रमाणावर जे नामकरणाचे प्रस्ताव पारीत केले जातात तसे न करता त्यांची चौकशी केली जावी. की तेथे या अगोदर दुसरे काही नाव तर दिलेले नाही. व ज्याचे नाव दिले जात आहे. त्यांचे महत्त्व काय आहे? नामकरण केले पाहिजे किंवा नाही केले पाहिजे कारण*

याच्यामुळे काय होते की, एकाचे नाव दिल्यानंतर मग तो कुणी का असेना त्याठिकाणी दुस-याचे नाव दिल्यानंतर त्यांच्या भावना दुखावतात. तर मेहरबानी करून असे काम केले जावू नये.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, व मा आयुक्त साहेब विषय क्र. ९ वर मी पहिले सुध्दा बोलु इच्छित होतो. तेजुमल चिमनदास वासवानी तेजुमल चक्कीच्या नावाने तेथील विभाग प्रसिध्द आहे. या अगोदर जेव्हा हा प्रस्ताव आला. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे गोषवा-यामध्ये लिहिले होते की, तेथे कुठलेही नाव दिलेले नाही. इतकी मोठी चुक केल्यानंतर तेथे नामकरण झाले त्यांच्या कुटूंबियांना तेथे बोलावले गेले. शहराचे मा. आमदार तिथे आले व फलकाचे उदघाटन झाले आता जेव्हा आपण तो बोर्ड उतरवाल तेव्हा किती मोठी मानहानी होईल. ज्यांच्या नावाने तेथे एक मंदीर आहे. महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम असे बिघडत चालले आहे. फक्त एक पत्र आले की चौकास हे नाव दयायचे आहे. व त्यावर अहवाल लिहितात की तेथे नाव नाही आहे. हा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाही की, त्याबाबत आपण एकवेळ दुरूस्ती करत आहोत परंतु अशी दुरूस्ती वारंवार होवू नये म्हणुन भारतीय जनता पार्टी व शिवसेनेच्या वतीने वारंवार याचा पुर्नउच्चार केला जात आहे. की कोणतेही नामकरण करायचे असेल तर त्या विषयावर अभ्यास करूनच प्रस्ताव पारीत केला पाहिजे. नामकरणाच्या विषयावर शहरात चर्चा होणे हे योग्य नाही. गोषवा-यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग असे लिहित आहे की तेथे कोणतेही नाव नाही. व आज म्हणतात की दोन दोन नावे आहेत. जी व्यक्ती की जिचे नाव त्या पुर्ण विभागात प्रसिध्द आहे अशा व्यक्तीच्या नावाचा फलक उतरवुन तेथे दुसरा फलक लावणे ही किती शरमेची गोष्ट आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>बोर्ड उतरविला जाणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>बोर्ड तिथेच राहिल. मार्गचा बोर्ड हटवुन तेथे चौकाचा बोर्ड लावला जाईल. मी म्हणतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अशा अधिका-यास सेवेतुन निलंबित केले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आयुक्त साहेब आम्ही हा विषय तेवढया गंभीरतेने घेत नाही. हे नामकरणाचे प्रस्ताव अतिशय संवेदनाशिल विषय आहेत. ही दुःखाची गोष्ट आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने लिहुन दिले आहे की, त्या रस्त्यावर दुसरे नाव दिलेले नाही. तर अशी चुक, हा अतिशय गंभीर विषय आहे. कधी कधी ..... हे तर स्थानिक लोक आहेत. कधी कधी जर मोठ्या राष्ट्रीय पुरषांबाबत यांनी अशा चुका केल्या तर? अशी माणसे शहरामध्ये जातीय दंगली माजवतील?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>त्या दोन्ही व्यक्ती स्वर्गवासी आहेत. दोन्ही आदरणिय आहेत, पुज्यनिय आहेत आमच्यासाठी.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हरकतीच्या मुदयांन्वये मी या चर्चेमध्ये हस्तक्षेप करू इच्छितो. जरा याविषयाबाबतचा गोषवारा आपण काळजीपुर्वक वाचलात तर आपल्या लक्षात येईल. आधी जे नामकरण झाले होते ते १९९० मध्ये झाले होते. दुसरे नामकरण १९९६ मध्ये झाले आहे. म्हणजे सहा-सात वर्षानंतर ते नामकरण झाले आहे. व ही चुक लक्षात आली आहे एप्रिल २००३मध्ये ७ वर्षानंतर व आपण आमच्या बिचा-या शहर अभियंत्यांबाबत इतके बोलत आहात. ते पण एक व्यक्ती आहेत, माणसाकडुन चुक होते. १९९०चा नगरपालिका कालावधीचा जो दस्तऎवज होता तो होवू शकते मिळु शकला नसेल.रस्त्याचे जे नामकरण झाले आहे. होवू शकते रस्ता रूंदीकरणामध्ये तो बोर्ड कुठे गेला असेल व कुणी मागणी केली की त्यास अमुक अमुक असे नाव दिले जावे. १९९६मध्ये कुणी नगरसेवकानी मागणी केली असेल त्या

सदस्याच्या सांगण्यानुसार दस्तऐवजाची पडताळणी करून किंवा दस्तऐवज न मिळाल्याने अशीच चुक होवू शकते नोट आली असेल. मला माझ्या अधिका-यांवर विसंबुन रहायचे नाही परंतु त्याचवेळी.....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-माता मजनीबाईचा बोर्ड आजपर्यंत तेथे लावलेला आहे. हे लोक तेथे गेलेच नाहीत. आपण याची तरफदारी करत आहात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मला सभागृहाच्या लक्षात एकच गोष्ट आणायची आहे. ९० मध्ये जे नामकरण झाले होते. ९६ मध्ये तेथे दुसरे नामकरण झाले. हा विचार करून की तेथे नामकरण झालेले नाही. व हे झाल्यानंतर सुध्दा ते लक्षात आले आहे. ७ वर्षानंतर म्हणजेच एप्रिल २००३ रोजी तर मला वाटते की यामध्ये फार मोठी काही चुक नाही. दस्तऐवज उपलब्ध नसतील किंवा रस्ता रूंदीरकणामध्ये तो बोर्ड तेथे नसेल. किंवा कुण्या सदस्याच्या प्रस्तावामुळे कधी कधी असे होते की, घाईघाईमध्ये सकाळी लोकप्रतिनधी आमच्याकडे येतात व म्हणतात की आज संध्याकाही महासभा आहे. महासभेमध्ये हा प्रस्ताव आला पाहिजे. त्या बोनाफाईड इन्टेंन्शन नुसार हा प्रस्ताव आला असेल तर त्यास ऐवढया गंभीरतेने घेण्याची काही आवश्यकता नाही असे मला वाटते. चुक आहे , ती मान्य करतो. परंतु असे नेहमी म्हंटले जाते की, "सुबह का भुला शाम को लौटे तो उसको भुला नही कहॉ जाते". २००३मध्ये चुक लक्षात आली ती आम्ही सुधारली ऐवढेच पुरेसे आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया,....

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरजी, एका महासभेत दोन-दोन चुका?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आपल्या माहितीसाठी आणखी सांगु इच्छितो की, १९९६मध्ये जे नामकरण झाले आहे त्याचा प्रस्ताव आमच्या शहर अभियंता किंवा तत्त्कालिन नगरपालिका अभियंता यांच्या कार्यालयाकडुन गेलेला नव्हता असा प्रस्ताव आहे आमच्यासमोर. तर चुक सुधारणे येवढाच आपण विचार करायचा आहे. सभागृहाने ऐवढाच विचार करायचा आहे की, चुक सुधारणे...

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी येथे निवेदन करताना आपल्या शहर अभियंत्त्यावर विसंबुन असे निवेदन केले की असे झाले असेल, केले असेल परंतु जर थोडया वेळेपुर्वी येथे नामकरणाचा एक असा प्रस्ताव आला होता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचा प्रस्ताव व येथे अशी माहिती समोर आली की तेथे स्वामी शांतीप्रकाश चौक असे नामकरण केले होते. तो विषय मला वाटते आता बाजुला ठेवला आहे. असा विचार करू या की, जर या सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रस्ताव पारीत झाला असता व पुढच्या सभेमध्ये आपण प्रस्ताव आणला असता की, येथे स्वामी शांतीप्रकाश चौक असे नाव दयायचे आहे की डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक असे नाव दयायचे आहे?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-हरकतीचा मुददा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या नावाचा जो प्रस्ताव आहे तो पारीत झालेला आहे. तो बाजुला ठेवलेला नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-नाही. पण आता जो विषय चाललेला आहे. समजा माता मजनीबाई व तेजुमल यांच्यामध्ये चालला आहे. परंतु चुकीने असे प्रस्ताव जर महासभेत आले तर सभागृहात काय होवू शकते याची सुध्दा दखल घेतली पाहिजे. झाले असेल, केले असेल याने प्रश्न सुटणार नाही. आणखी एक गोष्ट मी आपणांस सांगु इच्छितो की आपण वारंवार उठुन आपल्या अधिका-यांची

जी बाजु घेता हरकतीचा मुददा उपस्थित करत आहात. उदया आपणांवर अशी वेळ येवू नये की, पॉइंट ऑफ डिसऑर्डर घेण्याची वेळ आपणांवर येवू नये.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-सचिव साहेब, विषय क्र. ९ बाबत आपण जरा खुलासा करावा.

मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजा):-माता मजनीबाई रोड जो आहे तो कायम राहिल. तेजुमल चक्की समोर जो चौक आहे....

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-तेथे चौक नाहीच आहे. जी वस्तु नाही ती आहे म्हणुन कसे लिहिणार? चौक कुठे आहे? चौक म्हणजे चार रस्ते , ते आहेत का तिथे ते पहिले पहा, त्यांची पाहणी करा. तेथे दोन मोठे रस्ते आणि एक छोटी गल्ली आहे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः- चंचलानी निवास पासून उत्तम अपार्टमेंट मार्गे उजवीकडे विजय किराणा स्टोअर्स पर्यंत बाबत जो १९९० चा मुळ ठराव आहे.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवाणी :-येथे एकाच रस्त्याच्या येण्याच्या व जाण्याच्या अशा दोन्ही भागास वेगवेगळी नावे दयायची?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :- १९९० चा जो ठराव आहे, तो कायम ठेवला जावा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- येणा-या व जाणा-या बाजूस वेगवेगळी नावे?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :- बॅरेक क्र. १२२ व १५१ च्या आजुबाजुचा जो विभाग आहे त्यास चौक असे नामकरण केले जावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- सचिव साहेब, हा जो नवव्या क्रमांकाचा विषय आला आहे, त्याच्या गोषवा-यात शेवटी लिहिले आहे, दोन नावे दिली आहेत, त्यातील कोणते नाव आपणांस ठेवायचे आहे. विषयामध्ये सरळ-सरळ लिहिले आहे, उपरोक्त दोन्ही नावे एकाच रस्त्याची आहेत. तरी सदर रस्त्याचे कोणते नाव ठेवायचे? हा निर्णय आपणांस घ्यावयाचा आहे. असे नाही की, मार्ग बदलून चौक करायचा आहे. चौक करायचा असेल तर दुस-या महासभेत आणावा. आता आपणांस या दोन नावापैकी कोणते नाव ठेवायचे आहे? प्रस्ताव काय आहे?प्रस्ताव असा आहे की, कोणते नाव ठेवायचे? येथे हा प्रस्ताव नाही की, मार्ग करायचा आहे की चौक करायचा? किंवा उड्डान पूल करायचा आहे. आपण यापैकी कोणतीही एक नाव ठेवा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ठिक आहे.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र. ४ मधील चंचलानी निवास ते विजय किराणा स्टोअर्स, उत्तम अपार्टमेंट मार्गेच्या नामकरणाबाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार माता मजनीबाई सत्त्कार समिती यांनी त्यांचे दिनांक १९ एप्रिल, २००३ चे पत्रानुसार तक्रार केली आहे. सदर

रस्त्याला ''माता मजनीबाई बालमंदिर मार्ग'' असे नांव असतांना दुसरे नांव का दिले? तरी सदर रस्त्यास ''माता मजनीबाई बालमंदिर मार्ग'' असे एकच नामकरण असावे अशी विनंती केली आहे.

उल्हासनगर-१ येथील प्रभाग क्र. ४ मधील चंचलानी निवास ते विजय किराणा स्टोर उत्तम अपार्टमेंट मार्गेच्या रस्त्यास सर्वसाधारण सभेमध्ये ''माता मजनीबाई बालमंदिर मार्ग'' असे नामकरण ठराव क्र. ५४८ दिनांक २७८१९९० नुसार मंजुर झालेले आहे.

त्यानंतर उल्हासनगर-१ येथील गव्हर्नमेंट हॉस्पिटल ते तेजुमल चक्की पर्यंतच्या रस्त्यास ''तेजुमल चिमणदास वासवानी मार्ग'' असे नामकरण सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रमांक १३१ (९) दिनांक ३६१९९६ मध्ये मंजुर केलेले आहे.

उपरोक्त दोनही नावे एकाच रस्त्याचे आहे. तरी सदर रस्त्याला कोणते नांव ठेवायचे याबददल सर्वसाधारण सभेपुढे निर्णय होणेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १८</u> <u>दिनांकः-१९५२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंदकुमार ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता ''माता मजनीबाई बालमंदिर मार्ग'' रस्त्याला दिलेले नाव कायम ठेवून ''तेजुमल चिमनदास वासवानी मार्ग'' ऐवजी तेजुमल चक्की समोरील दोन रस्त्यांचे संगमस्थानक भागास ''तेजुमल चिमणदास वासवानी चौक'' असे नाव देणेस मान्यता देत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. १३१ (९) दि. ३६१९९६ मध्ये अंशतः बदल मानण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>विषय क्र. ९ चे काय केले? कोणते नाव दिले?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सन्माननिय सदस्य श्री. हरदास माखीजा यांनी जो प्रस्ताव दिला होता. तो मान्य केला आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आम्हाला सांगा लोकांनी विचारले तर आम्ही काय सांगायचे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-माता मजनीबाई मार्ग आहे तो कायम राहील दुसरा त्याच्या बाजुच्या दोन रस्त्यांचे संगम स्थानकास चौक असे नाव देण्याचा श्री. हरदास माखीजा यांनी जो प्रस्ताव दिला. त्याचे नाव चौक असे केले जाईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-तो बोर्ड उतरविला जाणार नाही ज्याचे उदघाटन आमचे आमदार मा. पप्पु कालानी यांनी केले आहे. भलेही आपण त्यामध्ये दुरूस्ती करा परंतु तो बोर्ड तेथुन हलविला जाणार नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-चौक असेच नामकरण केले आहे ना?
विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय:- उल्हासनगर ५ येथील प्रभाग क्र. ११ मधील, बॅरेक नं. १९६८ व नेहरू नगर समोरील महापालिकेच्या उद्यानास '' जय झुलेलाल उद्यान'' असे नाव देणे बाबत.

काही सदस्य :-पास.

मा. महापौर:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय:- उल्हासनगर ५ येथील प्रभाग क्र. ११ मधील, बॅरेक नं.
१९६८ व नेहरू नगर समोरील महापालिकेच्या उद्यानास '' जय झुलेलाल उद्यान'' असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मधील बॅ. नं. १९६८ व नेहरूनगर समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास ''जय झुलेलाल उद्यान'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त उद्यानास नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त उद्यानाला कोणताही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर उद्यानाचे ''जय झुलेलाल उद्यान'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. १९ दिनांक:-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. सुरेश गायकवाड.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मधील बॅ. नं. १९६८ व नेहरूनगर समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास ''जय झुलेलाल उद्यान'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. ८ मधील ओ.टी. सेक्शन या क्षेत्रास "स्वामी धर्मदास नगर" असे नाव देणे बाबत.

काही सदस्य :-पास.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. ८ मधील ओ.टी. सेक्शन या क्षेत्रास "स्वामी धर्मदास नगर" असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-३ या क्षेत्रास स्वामी धर्मदासनगर नांव देण्याकरिता व स्वामी धर्मदास साहेब दरबार/ पुज्य धर्मवाडी पंचायत यांना त्यांचे खर्चाने अशा नावाचे फलक या क्षेत्राकडे जाणा-या ४ रस्त्यांमध्ये कमानी उभारून लावणेकरिता परवानगी देण्याकरिता प्रस्ताव आलेला आहे. सदर क्षेत्रपुर्वीपासुन उल्हासनगर-३ येथील ओ.टी. सेक्शन क्षेत्र तसेच धर्म दरबारचे आजूबाजूचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रास प्रस्तावित केलेले स्वामी धर्मदासनगर हे नांव त्यास सुसंगत असून या क्षेत्रास यापूर्वी अन्य दुसरे कोणतेही नामकरण या महानगरपालिकेने केल्याचे तसेच जागेवर फलकही आढळत नाही.

तरी प्रस्तावित केल्यानुसार उल्हासनगर-३ येथील ओ.टी. सेक्शन या क्षेत्रास स्वामी धर्मदासनगर असे नामकरण होणेस तसेच उक्त नामकरणाचे फलक प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वामी धर्मदास साहेब दरबार /पुज्य धर्मवाडी पंचायत यांना त्यांचे खर्चाचे या क्षेत्राकडे जाणा-या ४ रस्त्यावर कमानी उभारने त्यावर फलक लावणे व त्यांची देखभाल दुरूस्ती त्यांच्या स्वखर्चाने करणे करिता महासभेकडून निर्णय होणेकरिता महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. २० दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. चिमन रूपानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. नीता आहुजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील प्र. क्र. ८ मधील ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-३ या क्षेत्रास "स्वामी धर्मदास नगर" असे नाव देणेस मान्यता देत आहे. तसेच स्वामी धर्मदास साहेब दरबार / पूज्य धर्मवाडी पंचायत यांना त्यांचे स्वखर्चाने या क्षेत्राकडे जाणा-या ४ रस्त्यावर कमानी उभारणेस त्यावर फलक लावणे आणि त्याची देखभाल दुरूस्ती करणेसाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविणेस मान्यता देणे बाबत.

<u>काही सदस्य :-</u>डिफर

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>विषय क्र. १२ चे काय केले?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>डिफर. डिफर.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आयुक्त साहेबांना निवेदन करू दया ना.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, या विषयावर निर्णय घेण्या अगोदर कमीत कमी येवढा तरी विचार केला पाहिजे की प्रस्ताव का आणला आहे? मा. महापौर महोदया, आपण उल्हासनगरमध्ये रेल्वे उड्डाण पुल तयार करत आहोत. जेथे पण सरकारने, तो राज्य मार्ग असो किंवा राष्ट्रीय महामार्ग असो. त्यांवर पुल तयार केले आहेत किंवा त्यांना ॲप्रोच रोड तयार केले आहेत. बॉम्बे मोटर व्हेईकल टॅक्स ॲक्टनुसार वसुली करून जो भांडवली खर्च झाला आहे. तो वसुल करण्याचा एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे. उल्हासनगरमध्ये सुध्दा पहिल्यांदा असे आर.ओ.बी. तयार होत आहेत. आमच्या महानगरपालिका कायदयामध्ये एक अशी तरतुद आहे की, जो टॅक्स राज्य सरकारला वसुल करण्याचा अधिकार आहे. तोच टॅक्स महानगरपालिकेला सुध्दा राज्य सरकारच्या मंजुरीने वसुल करता येवू शकतो. हे जे पुल तयार होत आहेत त्यासाठी अंदाजे पाच कोटी रूपयांचा खर्च आला आहे. व या ब्रीज वर जर टोल टॅक्स लावण्यात आला. जी वाहने या पुलाचा वापर करतील त्यावर दहा रूपये किंवा १५ रू. जो वाजवी असेल तो टॅक्स जर लावला तर मला वाटते की प्रतिवर्षी एक दिड कोटीचा महसुल महापालिकेस मिळु शकेल. व हा जो मिळणारा महसुल आहे. त्याचा उपयोग दुस-या विकास कामांसाठी केला जावू शकतो. महानगरपालिका प्रशासनाचे काम असते की जे कर आपण आकारलेले नाहीत किंवा जे कर आपण आकारू शकतो. अशा करांपासुन जर महसुल मिळू शकत असेल तर असे कर आकारायचे आहेत त्याचा परिणाम महानगरपालिका क्षेत्रात राहणा-या सर्व लोकांवर होणार नाही. जे पण लोक त्या पुलाचा वापर करतील त्यांच्याकडुन त्याबाबत पैसे वसुल करणे मला वाटते काही चुकीचे नाही. आज जर त्यांना जायचे असेल तर, पुल नसेल तर त्यांना फाटकाजवळ थांबावे लागेल. त्यामध्ये वीस मीनीट किंवा अर्ध्या तासाची वेळ खर्ची होते. लांबुन जायचे झाले तर इंधन खर्च होते. ही जी त्यांची बचत होते. त्या बचतीतुन काही पैसे भांडवली खर्चासाठी जर दिले तर त्यात काही चुकीची गोष्ट मला वाटत नाही. माझी सभागृहाला विनंती आहे. या प्रस्तावावर विचार न करता तो डिफर करू नका किंवा नामंजुर करू नका. या प्रस्तावामुळे महानगरपालिकेचा महसुल वाढणार आहे. व अशा प्रस्तावावर महापालिकेने नेहमी सकारात्मक भुमिका घेतली पाहिजे. प्रस्ताव त्वरीत लागु होणार नाही. त्यासाठी आम्हाला राज्य सरकारकडुन मंजुरी घ्यावी लागेल. नियम बनवावे लागतील व त्यानंतर तो लागु होईल. तर माझी पुन्हा सभागृहास विनंती आहे. याबाबत जरा विचार करावा. चर्चा करावी.

आपणांस जर शंका असेल तर त्याबाबत सुध्दा आम्ही उत्तर देवू परंतु चर्चा न करता प्रस्ताव नामंजुर करू नका.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, येथे असे लिहिले आहे की, प्रवेश करणारी जनावरे तर, शहरात येणारी जी जनावरे आहेत. त्यांच्यावर जर टोल टॅक्स लावला जात असेल तर त्याबाबत मी आपणांस सूचित करू इच्छितो की, आमचा जो लबाना शीख समाज आहे. त्यामधील बहुसंख्य लोक मटण विक्रिचे काम करतात. व त्यांवर जर टोल टॅक्स लावला तर, अगोदरच आमचा समाज अतिशय मागसलेला आहे. तर माझ्यावतीने जनावरांवरील टोल टॅक्सचा मी विरोध करतो. व हा मुददा इथेच संपवावा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-मी सुध्दा जनावरे व माणसांवरती टोल टॅक्सचा विरोध करतो. आमच्या उल्हासनगरमध्ये टोल टॅक्स असताच कामानये कारण उल्हासनगर हे काही हिल स्टेशन नाही. आम्ही काय दाखवणार आहोत. उल्हासनगरमध्ये प्रवेश केल्यानंतर, उल्हासनगर स्टेशन येथे उड्डाण पुल तयार होत आहे तेथील नाल्याला दरवर्षी पुर येतो त्यामुळे ऐवढी दुर्गंधी पसरते, सफाई सुध्दा होत नाही आम्ही सर्वसामान्य जनतेला काय दाखविणार आहोत. मेहरबानी करून टोल टॅक्सचा प्रस्ताव मागे घेण्यांत यावा. आमच्या उल्हासनगर शहरामध्ये टोल टॅक्स सुरु केला जाऊ नये.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- आयुक्त साहेब पाच कोटी जे मिळाले आहेत, ते रेल्वे कडून मिळाले आहेत. श्री. राम नाईक जेव्हा रेल्वे मंत्री होते, तेव्हा मिळाले आहेत. महापालिकेने एक नया पैसा सुध्दा खर्च केलेला नाही.

मा. सचिव :- या प्रस्तावाचे काय करत आहात? डिफर..?

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूची वरून वगळण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविणेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्या श्रीमती. मीना सोंडे या सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा. सचिव :- विषय क्र. १३ वाचून दाखवितात.

विषय :-महापालिकेचे बोटक्लब, उद्यान बांधा, वापरा व हस्तांतरण पध्दतीने देणे बाबत.

मा. सचिवः-पास?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- प्रथम आयुक्त साहेबांनी बोलावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):- मा. महापौर महोदया, या महापालिका क्षेत्रामध्ये महापालिकेच्या काही मिळकती आहेत, प्रत्येक मिळकती पासून महापालिकेला महसूल मिळावा असे आम्ही तर कधी बोलणार नाही. काही मिळकती ज्या अशा आहेत, त्यांच्यापासून जो महसूल मिळेल त्याचा वापर भांडवली खर्चासाठी, काही चांगल्या विकास कामासाठी होऊ शकेल. टाऊन हॉल बाबत या महापालिकेने असाच निर्णय घेतला , त्याबाबत महानगरपालिकेला काही महसूल मिळत आहे. बोटक्लबची जी निगा राखली पाहिजे तेवढी निगा महानगरपालिका काही वर्षापासून राखू शकत नाही. म्हणून या मिळकतीचा जर

बांधा, वापरा वा हस्तांतर करा. या तत्त्वावर केला जावा. व खाजगी संस्थेच्या सहभागाने विकसित केला तर या शहरातील नागरीकांना सुविधा मिळेल. आज जो बोट क्लब आहे, त्याची सुविधा नागरीक घेऊ शकत नाहीत. बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा असा जर धोरणात्मक निर्णय महासभेने घेतला तर या बाबत खुल्या निविदा मागविल्या जातील. जो सर्वात जास्त महसूल देण्यास तयार होईल अशा अधिकर्त्यास बोट क्लब दिला जाईल. व जो सर्वात जास्त गुंतवणूक करुन चांगल्यात चांगल्या सुविधा या महापालिकेच्या नागरीकांना वाजवी दरात उपलब्ध करुन देण्यास तयार झाल्यास अशा अभिकर्त्यास हे काम दिले जाईल. त्यातील प्रमुख अटी व शर्ती येथे नमूद केल्या आहेत. काही गोष्टींवर मी प्रकाश टाकु इच्छितो. एक तर ज्या एजन्सीची नेमणूक केली जाईल त्या एजन्सीने हे काम सहा महिन्याच्या आत करायचे आहेत. त्यामध्ये एक थोडीशी सुधारणा मी करु इच्छितो. जर सहा महिन्याच्या आत जर काम झाले नाही तर जसे की, टाऊन हॉलचे काम आता होतांना दिसत नाहीत त्यामुळे मुदत वाढ दयावी लागते. एक महिन्याची किंवा तीन महिन्याची मुदत वाढ देण्याची तरतूद त्यामध्ये असावी. फीचा आराखडा जो आम्ही येथे प्रस्तावित केला आहे. त्यामध्ये १० वर्षासाठी एकच आराखडा तयार केला आहे. मला वाटते की, प्रत्येक तीन वर्षानंतर किंवा पाच वर्षानंतर ठराविक टक्के वाढ करुन त्याचाही आराखडा आज येथे निश्चित करुन १० टक्के किंवा १५ टक्के फी प्रत्येक ३ वर्षानंतर किंवा ५ वर्षानंतर जर करु शकत असाल तर याची सुध्दा त्यात सुधारणा झाली पाहिजे. हा प्रस्ताव या अगोदर सुध्दा येथे आला होता. बाकी ज्या सर्व साधारण अटी शर्ती आहेत त्या निविदा दस्तऐवजांमध्ये राहतीलच. परंतु ज्या मुख्य अटी शर्ती आहेत त्यांमध्ये या दोन बाबी मी समाविष्ट करु इच्छितो. यासाठी मी सभागृहाची परवानगी मागतो.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सर्वात प्रथम तर मी मा. आयुक्त साहेबांचे अभिनंदन करु इच्छितो, त्यांनी असे प्रस्ताव महासभेत आणले, या अगोदर हा प्रस्ताव आला होता. त्यावेळेसच जर हा प्रस्ताव पारीत केला असता तर महापालिकेस आजपर्यंत चार-पाच लाख रुपये मिळाले असते. परंतु या प्रस्तावामध्ये काही चूका आहेत, त्यांची दुरुस्ती करणे अतिशय आवश्यक आहे कारण जेणेकरुन शहरवासियांना एक चांगल्या प्रकारची सुविधा बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा. या तत्त्वानुसार मिळू शकेल. पहिली गोष्ट ही की १० वर्षाची जी मुदत आहे ती माझ्या मते अतिशय कमी आहे. कमीत कमी १५ वर्षाचा कालावधी असला पाहिजे. व ठेकेदाराने काय काय काम करायचे आहे, हे सुध्दा त्यात नमुद असले पाहिजे, कोण-कोणत्त्या गोष्टी केल्या पाहिजे. त्याचा नकाशा त्या सोबत लावला पाहिजे. नकाशा नसल्यामुळे काम बरोबर होणार नाही. यासाठी महानगरपालिकेच्या वतीने या प्रस्तावाच्या निविदा सोबत करावयांच्या कामाचा नकाशा जोडला पाहिजे. व कालमर्यादा अधिक असली पाहिजे. व हे जे भाडे दर्शाविले आहे ते अतिशय कमी आहे. ते सुध्दा वाढविले पाहिजे. जेणेकरुन आज उल्हासनगरमध्ये जे लग्नाचे हॉल आहेत, जे २० हजार चौ. फुटाचे हॉल आहेत ते १५-१५ लाख रुपये भाडयाने दिले जात आहेत. बोट-क्लब साडेतीन एकर जागेवर वसलेला आहे. त्यामध्ये लग्नाचे तीन-चार हॉल तयार होऊ शकतात. म्हणून दोन लाख रुपये भाडे असले पाहिजे. अशा प्रकारचे प्रस्ताव जर आपण तयार करुन पाठविले तर महानगरपालिकेला जास्त फायदा होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> महापौरजी, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे की, या प्रस्तावाबाबत श्री. जमनादास पुरस्वानी हे अतिशय खूष आहेत, नाही तर नेहमी म्हणतात की, हा प्रस्ताव पाहुन मला अतिशय दुःख झाले, त्यांना खुशी झाली ही आनंदाची गोष्ट आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. आयुक्त साहेब, मागील दोन वर्षापासुन आम्ही पाठपुरावा करतो आहे. उल्हासनगर मधील सार्वजनिक मंडळे आणि स्वतः मी,

आम्हाला गणपती विर्सजनासाठी एकही जागा नाही. मागच्या वेळेस आम्ही हा प्रस्ताव चिजवानी साहेबांसमोर ठेवलेला आहे. गणपती विर्सजनासाठी आम्हाला उल्हासनगर बाहेर जावे लागते. त्यासाठी आमचे हे म्हणणे आहे की ती जागा गणपती विर्सजनासाठी आरक्षित ठेवली जावी. उल्हासनगरमध्ये गणपती विर्सजनासाठी कुठेही जागा नाही त्यामुळे गटारामध्ये गणपती विर्सजन करावे लागतात त्यामुळे गणपतीची विटंबना होते. त्यासाठी माझा तरी असा प्रस्ताव आहे की, त्याठिकाणी तुम्ही गणपती विर्सजनासाठी घाट बनवावा.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>मा. महापौर साहेब, गणपती विर्सजनाबाबत आमच्या श्री. रमेश चव्हाण यांनी जे सांगितले की सर्व विभागांमध्ये अंबरनाथ, कल्याण,बदलापुर सर्व ठिकाणी गणपती विर्सजनासाठी चांगल्यात चांगल्या सुविधा आहेत. मला असे वाटते की, आमच्यावर जे काही कमी जास्त होते त्यात गणपतीच आमच्यावर नाराज आहे. कारण की आम्ही ही सुविधा येथील जनतेला दिली नाही. आमची आयुक्त साहेबांना विनंती आहे की, सर्वात प्रथम आमच्या जनतेची ही मागणी पुर्ण करावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सन्माननिय महापौरजी, आताच श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, गणपती विर्सजनासाठी उल्हासनगरमध्ये एकही जागा नाही. घाणेरड्या नाल्यामध्ये गणपती विर्सजन करावे लागते. व गणपतीची विटंबना होते. तर मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की जर हा प्रस्ताव आपण आणला आहे तर त्यात काही बदल करू शकत असाल तर जसे की विर्सजनासाठी आपणांस तेथे जागा मिळु शकत असेल, किवा विर्सजनासाठी काही व्यवस्था करत असतील तर याबाबत विचार केला जावा. नाहीतर गणपती विर्सजनासाठी शहरात जेथे कुठे एखादी मोकळी जागा असेल तेथे गणपती विर्सजनासाठी घाट तयार केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, बोट क्लब ठेकेदारी पध्दतीने देण्याचा जो विषय आज महासभेपुढे आला आहे. सर्वात प्रथम मी आभार मानतो श्री. जमनादास पुरस्वानी यांचे जे अशा प्रकल्पामध्ये आम्हाला नेहमीच मदत करतात. मग भलेही तो टाऊन हॉल असो, स्विमिंग पुल असो किंवा बोट क्लब असो. जसे आमच्या श्री. विनोद तलरेजा यांनी सांगितले की, ते नेहमी म्हणतात की, हा प्रस्ताव पाहुन मला अतिशय दुःख झाले. कोणत्याही प्रस्तावाबाबत यांना दुःखच होते. आनंद यांना आज पहिल्यांदाच झाला आहे.

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेबांना धन्यवादही दिले आहे मी सुध्दा खुश आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>दुसरे असे की, त्यांनी सांगितले की, पंधरा वर्षाची मुदत असली पाहिजे. मला वाटते त्यांनी ३० वर्ष म्हणायला पाहिजे होते. पंधरा वर्ष कसे म्हणाले? हा मुदत टाऊन हॉल सारखा ३० वर्षासाठीचा असला पाहिजे. तिसरे असे की, प्रशासनाने जे एक लाख २८ हजार रूपयाचे भाडे दर्शविले आहे. मला वाटते खुपच चांगले आहे. याची मुदत ३० वर्षाची असली पाहिजे. व टाऊन हॉल साठीच्या ज्या अटी शर्ती आहेत. व सवलती आहेत त्यासर्व यांना मिळाल्या पाहिजेत. नाहीतर श्री. जमनुजी नाराज होतील. जी टाऊन हॉलमध्ये सवलत आहे ती बोटक्लबमध्ये पण असली पाहिजे. म्हणजे बीअरबार तर ही सवलत सुध्दा बोटक्लबमध्ये असली पाहिजे. आता आमच्या सदस्यांनी जसे म्हंटले की, गणपती विर्सजनासाठी सर्वांना अडचणीचे होते. म्हणुन माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, उल्हासनगरमध्ये एक नविन नदी तयार केली जावी. कारण गणपतीचे जे विर्सजन आम्ही करतो ते दुर्गंधीयुक्त नाल्यामध्ये करतो. तर दुर्गंधीयुक्त नाल्यांमध्ये गणेश विर्सजन न करता विर्सजनासाठी एक नविन नदी तयार केली जावी. उल्हासनगरमध्ये कुठे अशी जागा असेल की जेथे नदी तयार केली जावू शकेल. व तेथे गणेश विर्सजनाचा कार्यक्रम पार पाडता येवू शकेल.

<u>काही सदस्यः-</u>तलाव म्हणा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-होय. क्षमा करा. तलाव तयार करा. परंतु बोटक्लबच्या प्रस्तावाबाबत मी थोडासा खुलासा करू इच्छितो, वीस वर्षापासुन कोणत्त्याही आयुक्तांनी बोट क्लबकडे लक्ष दिले नाही. तो बेवारिस पडला आहे. फक्त मेटाडोअर वाले तेथे जातात. हिराघाट येथे जे मेटाडोअर लावतात या मेटाडोअरचे ड्रायव्हर बोट क्लबमध्ये जावुन झोपतात. पत्ते खेळतात, चरस पितात म्हणुन मेहरबानी करून हा जो प्रायव्हेटायझेशनचा मुददा आपल्या समोर आला आहे याबाबत आम्ही आयुक्तांना धन्यवाद देतो. व यामध्ये आयुक्त साहेबांनी दोन सुधारणा सूचविल्या त्याबाबत मी सुध्दा दोन सुधारणा करू इच्छितो की, मुदत ३० वर्षाची असली पाहिजे. व श्री. जमनादास यांना टाऊन हॉलमध्ये जी सवलत आहे ती सवलत येथे सुध्दा असली पाहिजे. व हा जो प्रस्ताव आहे या प्रस्तावामुळे महापालिकेला उत्पन्न मिळणार आहे. म्हणुन हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत केला जावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. आयुक्त साहेब, श्री. किशोर वनवारी जे वारंवार म्हणत आहेत की, श्री. जमनादास यांना टाऊन हॉलमध्ये ही सवलत आहे का? याबाबत मी हरकत घेतो. वारंवार हे जे म्हणत आहेत की, टाऊन हॉलची सवलत पाहिजे तर ती कोणती सवलत आहे ती त्यांनी स्पष्टपणे सांगावे. बोटक्लबमध्ये कोणती सवलत पाहिजे. वारंवार ते म्हणत आहेत. श्री. जमनुजी यांना टाऊन हॉलमध्ये जी सवलत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-बोटक्लब घेणारे पण आपणच आहात.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-बोटक्लबमध्ये काय काय असले पाहिजे. ते आपण सांगा.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव सभागृहासमोर आला आहे. अतिशय चांगला प्रस्ताव आहे. मी आयुक्तांचे अभिनंदन करतो त्यांना धन्यवाद सुध्दा देतो. आज खाजगीकरणाचा जमाना आहे. भारतसरकार एकामागुन एक डिसइन्व्हेसमेंट च्या मागे लागले आहे. परंतु उल्हासनगर महानगरपालिका डिसइन्व्हेसमेंट करत नाही. ही एक चांगली गोष्ट आहे. भारत सरकार आपली प्रॉपर्टी खाजगी संस्थाना विकत आहे. आपण कमीत कमी आपली प्रॉपर्टी न विकता आपल्याजवळ ठेवत आहोत. या प्रस्तावाबाबत सभागृह नेत्त्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या अतिशय चांगल्या सूचना आहेत. याचा जो कालावधी आहे. तो दहा वर्षाचा कालावधी अतिशय कमी आहे. जेव्हा आपण टाऊन हॉल तीस वर्षासाठी देवू शकतो तर बोटक्लब का नाही. बोट क्लब सुध्दा दिर्घ मुदतीच्या कालावधीसाठी दिला पाहिजे. व त्याठिकाणी टाऊन हॉलमध्ये ज्याप्रमाणे आकर्षक सोयी आहेत तशा आकर्षक सोयी येथे उपलब्ध करून दिल्या जाव्यात की जेणेकरून शहरातील सर्वसामान्य माणुस तेथे जावा. व प्रस्ताव असा व्हायेबल तयार केला जावा की ठेकेदारांना सुध्दा फायदयाचे व्हावे. असे नाही की त्यांनी मध्ये सोडुन जावे. म्हणुन ठेकेदाराला सुध्दा कमावता यावे व महापालिकेला सुध्दा महसुल मिळावा म्हणुन योग्य प्रकारचा प्रस्ताव असावा.

मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, गणपती विर्सजनाबाबतचा मुददा येथे उपस्थित करण्यात आला त्याबाबत मी एक प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करून १४.१०.२००१ रोजी तो सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे. त्यात उल्हासनदीचा जो नाला आहे. जो नेहमी बारा महिने घाण पाण्याने भरलेला असतो. व तो शहरास बदनामीकारक आहे. तो कशाप्रकारे साफ करता येईल आणि घाणेरडे पाणी कसे अलग करता येईल. त्यास कॅनल तयार केला जावा. व तेथे गणेश विर्सजनासाठी घाट तयार केला जावा. अशा प्रकारे सविस्तर अहवाल तयार करून दिलेला आहे. तो सार्वजनिक बांधकाम विभागात आहे कृपया त्यावर विचार केला जावा. तो प्रस्ताव मी मा. आमदार साहेबांना सुध्दा दाखविला आहे. त्यांनी पण म्हंटले आहे की हा प्रस्ताव विचार करण्या योग्य आहे. तर यावर माझी सभागृहास विनंती आहे की,

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-एखादया खाजगी संस्थेला त्याची सजावट पाहण्याचे काम दिले जावे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आतापर्यंत आपल्या जेवढया मिळकती होत्त्या त्या सर्व आपण खाजगीकरणास दिल्या आहेत. लोकांच्या काही भावना, संस्कृती आहे ती ही जरा लक्षात घ्या. तुम्ही म्हणता तीस वर्षासाठी ठेकेदाराला दिले जाईल. आता तेथे लोक चरस पित बसतात. त्यांना चरस पिण्यासाठी भाडयाने दयाल? गणपती विर्सजनासाठी ती जागा ठेवली जावी. सगळीकडे धंदेवाईकदृष्टीने पाहु नका. माझी अशी सूचना आहे की तिथे गणेश घाट तयार करण्यात यावा.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी जो मुददा मांडलेला आहे गणपती विर्सजनासाठी बोट क्लबची जागा देण्यात यावी. त्या सूचनेचा सुध्दा आदर केला जावा. आपण जो बोट क्लब भाडयाने देणार आहात. मा. आयुक्त साहेब बोटक्लब जो आपण भाडयाने देणार आहात. तो ३० वर्षाकरिता देण्याचे ठरविले आहे. म्हणजे ३० वर्ष आपल्याला गणपती विर्सजनासाठी जागा मिळणार नाही हे निश्चितपणे समजायला हरकत नाही. परंतु त्यामध्ये आपल्याला एक सुधारणा करता आली तर बोटक्लब हा वर्षभर चालणार असणार आहे. आणि गणपती उत्त्सव हा फक्त वर्षातुन ११ दिवस असतो. त्या टेंडरमध्ये असे बंधनकारक केले की, ११ दिवस बोटक्लब बंद करून तो गणेश विर्सजनासाठी उपलब्ध करून दिला तर दोन्ही प्रश्न इथे मिटू शकतील. असा काही विचार करावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-येथे जेवढया काही सूचना करण्यात आल्या त्यातील एका सूचनेबाबत मी सांगु इच्छितो, मा. महापौर महोदया, सन्माननिय सभागृह नेता यांनी एक सूचना केली की जसे टाऊन हॉलमध्ये बारची परवानगी दिली गेली तशी तेथेही दिली पाहिजे. व मला वाटते प्रशासनातर्फे या सूचनेवर हरकत घेतली पाहिजे जर बीअर बारची परवानगी तेथे दिली गेली. तेथे जे लोक दररोज येतात त्यांच्यावर परिणाम होईल. ज्या लोकांना आम्ही सुविधा देवू इच्छितो त्या लोकांसाठी ती सुविधा नसेल. खाजगीकरणातुन बोटक्लब विकसित करण्याचा आमचा जो उददेश आहे तो हा आहे की शहरातील सर्वसामान्य जनतेला ही सुविधा मिळावी हा उददेश सफल होणार नाही. म्हणुन मला वाटते की बीअर बार बाबत जी सूचना करण्यात आली ती सूचना ठराव तयार करताना आपण लक्षात ठेवली पाहिजे. ही जर आपली उपसूचना असेल तर व ती जर आपण मागे घेत असाल तर त्यावर विचार झाला पाहिजे. मला इथे जास्त बोलणे बरोबर वाटत नाही. शहराच्या हितासाठी आम्ही जो बोटक्लब विकसित करीत आहोत. त्यामध्ये असा प्रस्ताव येता कामा नये. गणेश घाट बाबत काही सुविधा उपलब्ध केली जावू शकते का? त्याबाबत पुन्हा सर्व्हे केला जाईल. जागा उपलब्ध नसेल तर पुर्ण शहरामध्ये १३ चौ.कि.मी. क्षेत्रामध्ये जेथे कुठेही जागा असेल तेथे गणेश घाट विकसित करण्याबाबत मी आपणांसमोर प्रस्ताव आणेन.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मंजुर?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी सांगु इच्छितो की, टाऊन हॉलचा वापर जो आहे तो मर्यादित आहे. बोट क्लबचा वापर सर्वसामान्य गरीब जनता करेल. व त्यानंतर बीअर बार सारखी परवानगी दिली तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्नही तेथे निर्माण होवू शकतो. तो बोटक्लब राहणार नाही फक्त क्लब तयार होईल. माझी येथे ही हरकत आहे आपल्या ज्या काही सूचना असतील त्यामध्ये माझी ही हरकत इतिवृत्तांतात नोंदविली जावी.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मा. आयुक्त साहेब, मी आपणांस हे सांगु इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेचा शिवाजी पार्क तेथे क्लब दिला आहे तेथे बार रूम आहे. परमिट रूम आहे. त्यांना महानगरपालिकेकडुन ऑफीशियली मिळालेले आहे. शिवाजी पार्क दादर येथे. तर मग येथे का नाही?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-तेथे चुक झाली असेल ना?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-भलेही आपण मुंबई महापालिकेकडे याबाबत चौकशी करावी. बीअर बारची परवानगी दिली नाही तर स्पर्धा होणार नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-मा. महापौर महोदया....

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-सन्माननिय महापौर महोदया व आयुक्त साहेब बोट क्लब मध्ये ब-याचशा महापुरूषांचे पुतळे लावलेले आहेत. त्यांचे काय केले जाईल?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-महापौर साहेब ते म्हणतात की, तेथे महापुरूषांचे पुतळे आहेत.....

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-पुतळे तेथुन हलविले जाणार नाहीत. एका सुध्दा महापुरूषाचा पुतळा तेथुन हलविला जाणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-दारूसाठी तुम्ही तेथील पुतळे हलविणार काय?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मा. महापौरजी, मी एक गोष्ट बोलु इच्छितो, बिअरबार परमिट रूमची पुर्ण गार्डनमध्ये परवानगी नसते. काही हिश्यासाठी परवानगी दिली जाते. ती सुध्दा एक्साईज डिपार्टमेंट देत असते.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:-तेथे बीअर बार काढणार काय? ही मुंबई नाही आहे. श्री. नारायण पंजाबी, हे उल्हासनगर आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-बिअर बार नको आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौरजी, हे आपले सदस्य म्हणतात की, आपले सदस्य वारंवार म्हणतात की, तेथे बिअर बार पाहिजे. त्यास आमचा विरोध आहे. मी श्री. नारायण पंजाबी यांना विचारू इच्छितो की.....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-या प्रस्तावावर बरीच चर्चा झाली आहे. आमचे श्री. मोहन बेहरानी , श्री. ठाकुर बेहरानी यांनी जे म्हंटले आहे. ठिक आहे. बिअर बार सोडुन आम्ही परवानगी देत आहोत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-महापुरूषांचे पुतळे तेथुन हलविले जाणार नाहीत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-बिअरबारसाठी आमचा विरोध आहे. किती वर्षासाठी ठेका देत आहात?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-महापौर महोदया, तेथील महापुरूषांचे पुतळे हलविता कामा नये. त्यांचा आदर ठेवून तेथे सुशोभिकरण झाले पाहिजे.

मा. महापौर:-सदरच्या प्रस्तावाबाबत आयुक्तांनी सुचविलेल्या सूचना प्रमाणे तसेच सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी कालावधीबाबत सुचविलेल्या उपसूचना प्रमाणे सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

विषयः- महापालिकेचे बोटक्लब, उद्यान बांधा, वापरा व

हस्तांतरण पध्दतीने देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनर शहर हद्दीतील कॅम्प नंबर ३ मध्ये हिराघा मंदीराजवळ महानरपालिकेचे बोट क्लब नावाने एकूण ३.७ एकर क्षेत्रफळाचे उद्यान आहे. अंदाजे २० वर्षापुर्वी सदर उद्यान तयार करण्यात आलेल्या तलावामध्ये बोटींगची व्यवस्था केलेली होती. त्यावेळी सदर बोटींग व उद्यानाच्या सौंदर्याचा जनतेस लाभ होत होता. गेल्या काही वर्षापासून सदरचे बोटींग तलाव बंद पडले आहे. तसेच उद्यानाची दैनंदीन देखभाल व्यवस्थित होत नसल्यामुळे उद्यानाच्या सौंदर्यकरणाचा लाभ जनतेस होत नाही. उद्यानाचा जनतेस लाभ मिळवून देण्यासाठी बोटींग व्यवस्था हे प्रथमत दुरूस्त करून घ्यावी लागेल. सदर व्यवस्थेवर तसेच दैनंदिन देखभाल व दुरूस्तीवर महानगरपालिकेस फार मोठ्या प्रमाणात निधी उभारावा लागणार आहे. महानगरपालिकेची सद्याची वित्तिय स्थिती लक्षात घेता प्रशासनातर्फे वरील योजना बांधा, वापरा व हस्तांतरण करा (बी.ओ.टी)तत्त्वावर देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. ठेकेदारास बोटींगचे व्यवस्था करणेसाठी सद्याची उपलब्ध असलेल्या तलावाची दुरूस्ती स्वखर्चाने करणे बंधनकारक राहिल.
२. ठेकेदारास बोटींगसाठी आवश्यक त्या बोटींची व्यवस्था स्वतरूच्या खर्चाने करणे बंधनकारक राहिल.
३. ठेकेदारा सदर जागेत व्यायामशाळा व त्यात आवश्यक त्या साधनसामुग्रीची व्यवस्था स्वतरूच्या खर्चाने करणे बंधनकारक राहिल.
४. ठेकेदारास उद्यानात आवश्यक त्या दिवा बत्तीची व्यवस्था स्वतरूच्या खर्चाने करणे बंधनकारक राहिल.
५. ठेकेदारास संपूर्ण उद्यानाच्या परिसरातील सुरक्षा भिंत स्वतरूच्या खर्चाने बांधणे बंधनकारक राहिल.
६. ठेकेदारास विद्युत, टेलिफोन, पाणी , कर्मचारी व त्यांचा पगार, विमा, सुशोभिकरण, देखभाल व दुरूस्ती इत्त्यादी प्रकारचा दैनंदिन खर्च स्वतरू करावयाचा आहे.
७. ठेकेदारास सदर योजना सहा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित करणे बंधनकारक राहिल. आणि आयुक्तांचे विवेकाधिराअनुसार ठेकेदारास ३ महिन्यापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी मुदत वाढ देता येईल.
८. योजना, कार्यान्वित झाल्यानंतर बांधा, वापरा व हस्तांतरण पध्दतीने पुढील ३० वर्षासाठी ठेकेदाराचे ताब्यात राहिल.
९. ठेकेदारास प्रवेश, बोटींग व व्यायामशाळा करीता महानगरपालिकेने ठरविलेल्या दराप्रमाणे आकारणी करणे बंधनकारक राहील. (तक्ता सोबत जोडला आहे)
१०. बोटींग क्लब करीता प्रत्येक महिन्यासाठी परवाना फी म्हणून रू. १,२८,९०६/- (रूपये एक लाख अठ्ठावीस हजार नऊशे सहा मात्र) किमान देयक आकार निश्चित करण्यात आलेला आहे. जे ठेकेदार जास्तीत जास्त परवाना फी देण्यास तयार असतील त्यांची निविदा स्विकारण्यात येईल. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर प्रत्येक ५ वर्षाचे टप्प्यात निश्चित केलेल्या परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करून रक्कम महानगरपालिकेला अदा करणे बंधनकारक राहील.
११. ठेकेदार सदर जागेचा उपयोग जाहिरात, लग्न समारंभ इत्त्यादीसाठी करू शकतो. तसेच ठेकेदार कॅन्टीनमध्ये सर्व प्रकारचे शाकाहारी व मांसाहारी पदार्थ ठेवू शकेल पंरतु सदर जागेत कोणत्त्याही प्रकारचे मद्यपान करण्यास बंदी राहिल.

१२. ३० वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर सदर योजना मालमत्ता, मशिनरी व इतर साधन सामुग्रीसह सुस्थितीत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.

१३. योजना राबविल्यानंतर जे ठेकेदार परवाना फी देण्यास दिरंगाई करीत असेल किंवा विहित केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असेल तर त्याचा करार रदद करण्यात येवून तयार करण्यात आलेल्या सर्व साधनसामुग्री महानगरपालिका ताब्यात घेईल.

१४. योजनेसाठी वरील प्रमाणे उल्लेख करण्यात आलेल्या मुख्य अटी व शर्ती व्यतिरिक्त योजनेचा उददेश लक्षात घेता अन्य काही अटी करारात समाविष्ट करण्यात येतील.

१५. मंजुर निविदाकारास ''भाडे करार'' नोंदणी खर्च व मुदांक शूल्क इत्त्यादीचा खर्च स्वत: करावा लागेल.

नौका-विहारासाठी व विविध प्रकारच्या फी दर्शविणारा तक्ता.

भाग-१ : उद्यान प्रवेश शुल्क

| अ. क्र | वयोगट | प्रवेश शुल्क |
|---|---|---|
| -१. | ५ वर्षाखालील व्यक्ती : स - | विना मुल्य |
| -२. | ५ वर्षावरील व्यक्ती : स- | रू. २.०० प्रतिदिन |

भाग-२: नौका विहार शुल्क

| | | |
|---|---|---|
| -१. | ३० मिनिटा पर्यंत | रू. ३०.०० |
| -२. | ३० मिनिटापेक्षा जास्त परंतु | रू. ६०.०० |
| ३. | १ तासानंतर प्रत्त्येक ३० मिनिटास | रू. ४०.०० |

भाग-३: व्यायाम शाळा शुल्क

| अ. क्र | विवरण | प्रवेश शुल्क | सभासद शुल्क |
|---|---|---|---|
| १. | तिमाही सभासदत्त्व किंवा त्यापेक्षा कमी | रू.२५.०० | रू. २५०.०० |
| २. | सहामाही सभासदत्त्वापेक्षा जास्त परंतु नऊ महिन्यापेक्षा कमी | रू.२५.०० | रू. ४००.०० |
| ३. | सहामाही सभासदत्त्वापेक्षा जास्त | | |

परंतु नऊ महिन्यापेक्षा कमी रू.२५.०० रू. ६००.००

---------------------------------------------------------------
-

४. नऊमाही सभासदत्त्वापेक्षा जास्त
परंतु १२ महिन्यापेक्षा कमी रू.२५.०० रू. ७५०.००

---------------------------------------------------------------
-

५. नैमिन्तिक / दैनिक टिकीट फी रू. निरंक रू. १५.००

---------------------------------------------------------------
-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार वरील उल्लेख करण्यात आलेल्या महानगरपालिकेचा बोटींग क्लब भाडयाने देण्याचा व परवाना फी निश्चित करण्यासंबधी प्रस्तावास मंजुरी मिळणेकरिता सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २१ <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर बनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार वर नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधावर व त्या व्यातिरिक्त आयुक्त ठरवतील अशा अतिरिक्त आवश्यक त्या अटी शर्तीवर महापालिकेचे उद्यान, बोट क्लब बांधा, वापरा व हस्तांतरण या पध्दतीने देणे कामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी, श्री. गोविंदराम लुंड, श्री. राजु टेकचंदानी हे सभागृहातुन बाहेर पडले.**

<u>मा. सचिव :- </u>विषय क्र. १४ वाचून दाखवितात.

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमातील आणखी
सुधारणेस अंतिम स्विकृती देणे बाबत.

<u>मा. सचिवः-</u>पास?

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महानगरपालिका जकात नियम जो आहे त्यामध्ये सुधारणा व दुरूस्तीचा प्रस्ताव याठिकाणी आहे. तो प्रस्ताव महानगरपालिकेसमोर ठेवण्यात आला होता. त्यामध्ये प्रमुख दोन बाबी आहेत. एक तर जकात नियम १७ जो आहे नियम १७ चा पोटनियम ७ त्यात एसकॉट फीची तरतुद आहे. ती वाढविण्यासाठी प्रस्ताव दिला होता. व अनुसूचि १ बाब नं. ८६ नुसार त्याचे दर जास्तीत जास्त दिड टक्का व कमीत कमी अर्धा टक्का होता. तो वाढवुन जास्तीत जास्त ४ टक्के करण्याचा प्रस्ताव दिला होता. महानगरपालिकेने तो प्रस्ताव मंजुर केला होता. त्यानंतर लोकांच्या सूचना, हरकती मागविल्या गेल्या. त्यांना सुनावणी दिली गेली. व अंतिम स्विकृतीसाठी महासभेसमोर हा प्रस्ताव ठेवला आहे. त्यानंतर राज्य सरकारच्या मंजुरीसाठी तो पाठविला जाईल. त्यानंतर त्यावर अंमलबजावणी होईल. बाकी वस्तुंचा जो दर आहे तो अर्धा टक्यापासुन चार टक्यापर्यंत आहे. हा एकच आयटम असा आहे की ज्याचा दर अर्धा टक्यापासुन दिड टक्यापर्यंत आहे. तर त्यामध्ये जकातीचा दर वाढल्यानंतर महसुल वाढेल.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>कोणती बाब आहे?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>बाब क्रमांक १ ते ८५ मध्ये ज्या वस्तु येत नाहीत. ज्या अशा काही संकीर्ण वस्तु आहेत. ज्या बाब क्र. १ ते ८५ मध्ये येत नाहीत. त्या बाब क्र. ८६ मध्ये येतात.*

***मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर, श्री. प्रशांत जाधव, श्री. नरेंद ठाकुर, श्री. होशियारसिंग लबाना सभागृहातुन बाहेर पडले.***

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>त्यावर जकातीचा दर वाढवून चार टक्के करणार आहात?*

*<u>मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:-</u>मा. महापौरजी, मी समजतो की, अगोदरच व्यापा-यांवर जकात वाल्यांचा जुलूम चालु आहे. व जकातीचे हे दर वाढविण्याचा प्रस्ताव येथे आला आहे. तो जरा स्पष्ट केला जावा. कोणत्त्या बाबीवर आपण जकातीचा दर वाढवित आहात किती दर वाढवित आहात? याची माहिती काहीच नाही. बाब क्र. १ ते ८५ मध्ये ज्या वस्तु नाहीत. त्या वस्तु पाहण्यासाठी आमच्याकडे त्यांची यादी थोडीच आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>पहिले जो प्रस्ताव दिला होता. त्यावेळेस सर्व आपल्या समोर होते.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>पहिले जेव्हा हा प्रस्ताव आला होता तेव्हा बहुसंख्य लोक सभागृहात नव्हते. बरेचसे सदस्य सभागृहातुन सभात्त्याग करून बाहेर गेले होते. फार थोडे लोक सभागृहात त्यावेळी होते. आम्ही जकात दर वाढविण्याच्या विरोधात आहोत. आम्ही स्पष्टपणे सांगत आहोत.*

***मा. सदस्या श्रीमती. मोना वनवारी, श्रीमती. भावना रामचंदानी, श्रीमती. भावना खिलनानी या सभागृहातुन बाहेर पडल्या.***

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया लक्ष दया. जकातीचे जे नियम आहेत. त्यामध्ये एक अनुसूची आहे. शहरात जी पण वस्तु येते त्यावर जकात भरावी लागते. व अनेक वस्तुंचे अनुसूचीत विवरण आहे. बाब क्र. १ ते ८६ पर्यंत बाब क्र. ८५ पर्यंत वेगवेगळया वस्तु आहेत. त्यांचा जकात दर त्यांच्या समोर दर्शविलेला आहे. या व्यतिरिक्त जर कोणती वस्तु येत असेल की जीचा उल्लेख बाब क्र. १ ते ८५ मध्ये नाही. तर तिची नोंद बाब क्र. ८६ मध्ये घेतली जाते. व त्याचा कमीत कमी जकात दर अर्धा टक्के आहे व जास्तीत जास्त दिड टक्का आहे. तो दर वाढवुन चार टक्यापर्यंत करू इच्छित आहोत. तो वाढविण्यासाठी आम्हाला नियमात सुधारणा करायची आहे. नियमात सुधारणा करण्यासाठी प्रथम*

मसुदा तयार करून प्रसिध्द करावा लागतो. जो मागील वेळी आम्ही केला महासभेची मंजुरी घेवून केला. त्यानंतर सूचना व हरकती मागविल्या होत्त्या. सूचना हरकती आल्यानंतर आम्हाला अंतिम स्विकृती घ्यायची आहे. त्यांनतर हा प्रस्ताव शासनाकडे जाईल. शासनाने मंजुरी दिली तर त्यानंतर हे शासन राजपत्रात प्रसिध्द होईल. राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर जर कधी दिड टक्यापासुन वाढवून दोन टक्के करायचे किंवा अडीच टक्के करायचे तर यामध्ये जास्तीत जास्त ४ टक्यापर्यंत वाढ करू शकतो. तो प्रस्ताव पुन्हा महासभेत येईल जर दर वाढवायचा असेल तर,

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>नाही. आमचा विरोध आहे यास. भारतीय जनता पार्टी व शिवसेनेचा यास विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे. जेव्हा मागच्या वेळी महासभेत आला होता. आमचे भाऊ श्री. ठाकुरदास वेहरानी जे व्यापारी महामंडळाचे अध्यक्ष आहेत. व आमचे बंधु श्री. मोहन वेहरानी यांनी हरकत घेतली होती की जकातीचे दर वाढत आहेत. त्यावेळेला आम्ही त्यांना महासभेत सांगितले होते की, जी ८६ नंबरची बाब आहे. आमची जी सेंच्युरी रेयॉन कंपनी आहे तिच्याकडुन सुध्दा आम्ही बाब नंबर ८६ नुसार जकात घेतो. अर्ध्या टक्यापासुन दिड टक्यापर्यंत जर आम्ही हा ठराव पारीत केला तर तो शासनाकडे पाठवु. परंतु त्या अगोदर तीन महिने त्यावर सूचना व हरकती मागविल्या जातील. आज आमच्या समोर जो मुददा आला आहे. त्याबाबत १३ लोकांनी सूचना हरकती घेतल्या आहेत. नाही ११ लोकांनी हरकती घेतल्या आहेत. त्याची यादी मागे लावण्यात आली आहे. ठराव आम्ही या अगोदरच केला आहे. त्यानंतर महासभेत पास झाल्यानंतर शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन, ठराव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला जाईल. त्यानंतर तो गॅझेटमध्ये येईल. जो आयटम अर्ध्या टक्यापासुन दिड टक्यापर्यंत आहे त्यावर चार टक्यापर्यंत जकात घेतली जावू शकेल. परंतु तो प्रस्ताव महासभेसमोर येईल. दरवर्षी बजेट पारीत केला जातो. त्यावेळेस ही बाब सुध्दा येईल. यावर्षी आली नाही. परंतु पुढल्या वर्षी जेव्हा येईल त्यावेळेस आम्ही शहरवासियांवर कुठल्याही प्रकारचे जकातीचे ओझे न वाढविता सेंच्युरी रेयॉन कंपनीकडुन जे अर्धा टक्याचे दिड टक्के वसुली करतो त्या ऐवजी दिड टक्या ते चार टक्याने वसुली केल्याने त्यापोटी सहा ते आठ कोटी रूपये आम्हाला सेंच्युरी रेयॉन कंपनीकडुन मिळतील. हा जो मुददा आहे. आम्ही कोणत्त्याही व्यापा-यावर अर्धा पैसा सुध्दा जकातीचा दर वाढविणार नाही. हा निर्णय महासभेसमोर येईल त्यावेळेस आम्ही सुध्दा आपल्या सारखेच वचनबध्द आहोत. तर मागच्या वेळेस जसा हा ठराव पारीत केला होता त्याप्रमाणे आता या प्रस्तावावर ११ हरकती आल्या आहेत. त्या सूचना फेटाळून ठराव पारीत करून शासनास पाठवले तर मला वाटते खुप चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आमचा यास विरोध आहे. जकात वाढविण्याची ही पहिली स्टेप आहे. अर्ध्या टक्यापासुन दिड टक्यापर्यंत आणि त्यानंतर दिड टक्यापासुन चार टक्के अर्ध्याच्या ठिकाणी आम्हाला दिड टक्के भरावे लागतील. कमीत कमी एक टक्याची वाढ होईल म्हणुन आम्ही त्यास विरोध करतो.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सध्या दिड टक्का तर आहे, आता सुध्दा प्रचलित दर दिड टक्का आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आमचा विरोध आहे त्यास.

<u>मा. महापौर:-</u>मी सदरचा प्रस्ताव मतास टाकते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>दिड ते चार टक्याच्या दरम्यान कधीही वाढवु शकता. काय करायचे पास? शिवसेना, भाजपाचा विरोध आहे. बाकी सर्व प्रस्तावाच्या बाजुने आहेत? कॉंग्रेसचा विरोध आहे?बाकी. पुर्ण कॉंग्रेस पक्षाचा

विरोध आहे का? महापौर महोदया आपला? आपल्या सर्वांमधील कोणाचा विरोध आहे का?

<u>प्रस्तावाच्या बाजुने :- २२ मते</u>

१. श्री. लिंगे सुर्यकांत
२. श्री. ऐडके गणपत
३. श्रीमती. कमला शर्मा
४. श्री. वलेचा पृथ्वी
५. श्री. रोहडा श्यामसुंदर
६. श्री. गुप्ता प्रभुनाथ
७. श्री. नाना पवार
८. श्रीमती. आहुजा नीता
९. श्री. रूपाणी चिमन
१०. श्री.शांताराम निकम
११. श्री. गायकवाड सुरेश
१२. श्री. वनवारी किशोर
१३. श्री. जेसवानी सतरामदास
१४. श्री. खेमाणी दर्शनसिंग
१५. श्रीमती. कारीरा रेखा
१६. श्री. पमनानी ईश्वर
१७. श्री. रामरख्यानी मोहनदास
१८. श्री. तलरेजा विनोद
१९. श्रीमती. रिझवानी सुजाता
२०. श्रीमती. दासानी मिनु
२१. श्री. म्हस्के अंकुश
२२. श्री. जाधव सुरेश

<u>प्रस्तावाच्या विरोधात:-२१ मते</u>

१. श्री. साधवानी मोहन
२. श्री. भालेराव गौतम
३. श्री. बेहरानी मोहन
४. श्रीमती. करोतिया मालती
५. श्री. बेहरानी ठाकुरदास
६. श्रीमती. संगिता जावळे
७. श्रीमती. मोकल सीमा
८. श्री. उमाप रामदास
९. श्री. पुरस्वानी जमनादास
१०. श्री. असरोंडकर राज
११. श्रीमती. कृष्णानी रेखा
१२. श्री. यादव लालबिहारी
१३. श्री. भुल्लर राजेंद्रसिह
१४. श्री. गायकवाड दिलीप
१५. श्रीमती. नंदीनी बामणकर
१६. श्रीमती. प्रेमा खांडेकर
१७. श्रीमती. माने किरण
१८. श्री. चव्हाण रमेश
१९. श्री. पाटील विश्वनाथ
२०. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२१. श्री. चौधरी राजेंद्र

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- प्रस्तावाच्या विरोधात?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रस्तावाच्या विरोधात २१ मते , प्रस्तावाच्या बाजूने २२ मते....

मा. महापौर :-सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमातील आणखी सुधारणेस अंतिम स्विकृती देणे बाबत.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ९७ दिनांक २८.१.२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधील नियम १७ (७)व अनुसूची I मधील बाब क्र. ८६ रकाना क्र. ३ मध्ये बदल करण्यास मान्यता दिलेली आहे.

सदर बदलामुळे / सुधारणेमुळे बाधीत होणा-या / परिणाम होणा-या लोकांच्या माहितीसाठी सदर बदल / सुधारणा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ४५५ अन्वये आवश्यक असलेप्रमाणे या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/जकात/३१४ दिनांक ५.३.२००३ व क्र. उमपा/ जकात/४७४/२००२ दिनांक २६.३.२००३ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करून सदर बदल / सुधारणेसंबंधि प्रस्ताव/ सुचना /हरकती दिनांक ७.४.२००३ पर्यंत मागविण्यात आलेल्या होत्त्या. त्यानुसार विहित मुदतीत एकूण ११ हरकती/ सुचना प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारीवर प्रशासनाचे अभिप्राय सोबतच्या जोडपत्रात दिलेले आहेत. सदर तक्रारीवर अंतीम निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. २२ दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधील नियम १७ ७)व अनुसूची-१ मधील बाब क्र. ८६ रकाना क्र. ३ मध्ये बदल करण्याच्या नियमास अंतिमरित्त्या मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौरं पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १५ वाचून दाखवितात.

विषयः- उल्हासनगर शहरातील थॅलेसिमिया फाऊंडेशन या संस्थाना अनुदान देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u> महापौरजी, व उपस्थित सहकारी हो, हा जो प्रस्ताव आला आहे, या बाबत तर प्रथम मी हे जाणून घेऊ इच्छितो की यात किती अनुदान दिले जात आहे. थॅलेसेमिया फाउंडेशनला , दुसरी गोष्ट अशी की, पूर्वीची जी नगरपालिका होती, व महापालिकेची मागील जी एक बॉडी गेली, शहरामध्ये असा कित्येक संस्था आहेत, ज्यांच्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करुन ठेवत होतो. ज्या स्वंयसेवी संस्था आहेत, शहरामध्ये चांगले काम करत आहेत, त्यातील कुणाला १० हजार, कुणाला १५ हजार, कुणाला २० हजार, कुणाला ५ हजार, दरवर्षी अनुदान दिले जात होते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>कृपया एक जरूरी सूचना दयायची आहे. मा. महापौरजींना बाहेर जायचे आहे. आपणांमधील एकास पिठासिन अधिकारी म्हणुन बसायचे आहे. तर आपण निवड करा कुणास पिठसिन अधिकारी म्हणुन बसवायचे.

मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया या रात्री ८. ४० वाजता सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>काही सदस्य :-</u>श्री. किशोर वनवारी यांना पिठासिन अधिकारी म्हणुन बसवा.

श्री. किशोर वनवारी यांची सर्वानुमते पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करण्यात आल्यानंतर ते पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>आता आता महापौरांच्या आसनावर आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी हे आसनस्थ आहेत. त्यांना हे निवेदन आहे की, हा प्रस्ताव जो आम्ही पारीत करत आहोत. त्याचबरोबर या गोष्टीचे लक्ष दिले जावे की, बाकीच्या ज्या संस्था आहेत ज्या शहरामध्ये चांगल्या प्रकारचे कार्य करत आहेत. त्यांच्यासाठी बजेटमध्ये आम्ही जी तरतुद करतो. अनुदानासाठी त्यांना सुध्दा प्रत्येक वर्षी काही ना काही रक्कम अनुदान म्हणुन मिळाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>माखीजा साहेबांच्या या मताशी आम्ही सहमत आहोत. ब-याचशा ज्या सामाजिक संस्था आहेत. ज्यांना आम्ही यापुर्वी अनुदाने देत होतो. परंतु गेल्या पाच सहा वर्षापासुन अनुदान देत नाहीत. त्यांना पुन्हा अनुदाने दिली पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानीः-</u>मी सुध्दा माखिजा साहेबांच्या मताशी सहमत आहे. यापुर्वी ब-याचशा धर्मदाय संस्थाना अनुदाने दिली जात होती. ती सर्व संस्थाना मिळाली पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>महापौरजी, आपण आयुक्त साहेबांना आदेश दयावेत की याबाबत त्यांनी आपली प्रतिक्रिया दयावी.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>स्मशानभुमीना सुध्दा अनुदाने दिली जात होती.

__मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-__जी पुर्व नगरपालिका होती. त्यामध्ये जे उपनगराध्यक्ष असायचे ते सक्तीने शिक्षण समितीचे सभापती असायचे. त्यावेळी शाळांना, स्मशानभुमीना ब-याचशा सामाजिक धर्मदाय संस्थाना अनुदाने दिली जात होती. आमचे माजी महापौर श्री. माखिजा साहेबांनी जे म्हंटले त्यानुसार मी आयुक्त साहेबांना आदेश देतो की त्यांनी सुधारित अर्थसंकल्पात याकामी तरतुद करावी. व आणखी ज्याकाही आमच्या सामाजिक धर्मदाय संस्था आहेत त्यांना ती मदत मिळाली पाहिजे.

__मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-__मा. महापौरजी, एक निवेदन आहे. मी स्वामी धर्मदास नगर, स्वामी धर्मदास दरबार साई बलरामजींच्या वतीने पुर्ण सभागृहाचे, सर्व अधिका-यांचे व सर्व राजकीय पक्षांचे हार्दिक अभिनंदन करतो. त्यांनी सर्वसंमतीने स्वामी धर्मदास नगरचा ठराव पारीत केला आहे. सर्वांचे अभिनंदन आहे. मी हे सुध्दा सांगु इच्छितो की पुर्ण धर्मदास नगरमध्ये आनंदाचे वातावरण आहे. व तेथील सर्व रहिवासी आनंदाने फटाके फोडत आहेत. आपणां सर्वांचे अभिनंदन धन्यवाद.

__मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-__महासभेचे कामकाज समाप्त होत आले आहे. आमचे काही सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचे व श्री. राज असरोंडकर यांचे हार्दिक स्वागत करू इच्छितात. महासभेचे कामकाज संपल्यानंतर त्यांनी पाच मिनिटे थांबावे आमचे श्री. विनोद तलरेजा, श्री. दिलीप लालवानी व श्री. दर्शनासिंगजी व श्री. जीवन इदनानी , श्री. सुरेश जाधव व श्री. सुरेश गायकवाड हे त्यांचे स्वागत करू इच्छितात. महासभा संपल्यानंतर दोन मिनिटात त्यांचे स्वागत केल्यानंतर सर्व सदस्य जावू शकतात.

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर शहरातील थॅलेसिमिया फाऊंडेशन या संस्थाना अनुदान देणे बाबत.

__प्रस्तावना :-__

थॅलेसेमिया फाऊडेशन, उल्हासनगर ही धर्मदार आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयात, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५९ खाली नोंदणीकृत संस्था आहे. सदर संस्थेचे मूळ उददेश खालील प्रमाणे आहे.

१. थॅलेसेमिया रोगा संबंधी प्रतिबंधनात्मक उपाययोजना.
२. लोकांमध्ये थॅलेसेमिया रोगा संबंधी जागृती निर्माण करणे.
३. रक्त चिकित्सा शिबीर आयोजीत करणे
४. जेनेटिक काऊन्सलिंग शिबीर आयोजित करणे

सदर संस्था वेळोवेळी वरील प्रकारचे शिबीर शहरामध्ये शहरातील लोकांसाठी आयोजित करीत असून सदर शिबीरात कमी दराने रक्त तपासणी करीत आहे तसेच गरीब व गरजु मुलांना थॅलेसेमिया रोगामुळे आवश्यक रक्त मिळणेसाठी आर्थिक सहाय्य करते. संस्थेने मागील तीन वर्षाचे आर्थिक ताळेबंद सादर केले असुन त्यांनी या तीन वर्षात विविध जागेत शिबीर लावुन खालील प्रमाणे लोकांची रक्त तपासणी केली आहे.

| अ. क्र. | वर्ष २०००-०१ | वर्ष २००१-०२ | वर्ष २००२-०३ |
|---|---|---|---|
| १ | ३२०६ | ३२७९ | ४२७१ |

थॅलेसेमिया फाउडेशन यांनी पुढील पाच वर्षात शहरातील दिड ते पावने दोन लाख नागरिकांची निशुल्क रक्त तपासणी करण्याची योजले आहे, याकामी संस्थेस ५० लाख रूपयांची आवश्यकता असुन त्यांनी महानगरपालिकेस रूपये १० लाख रक्कमेची आर्थिक मदत प्रतिवर्ष करणेची विनंती केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२५)व (४२)मधील तरतुदीनुसार महानगरपालिका शहरातील लोकांच्या दुःख निवारणासाठी किंवा सार्वजनिक कल्याणासाठी उभारलेल्या कोणत्त्याही सार्वजनिक निधीत अंशदान देवु शकते तसेच सार्वजनिक सुरक्षितता व आरोग्यासंबंधी कार्यक्रम राबवु शकते.

वरील अनुषंगाने थॅलेसेमिया फाउडेशन यांना उल्हासनगर थॅलेसेमिया रोगासंबंधी प्रतिबंधात्त्मक उपाययोजना व इतर कार्यक्रम राबविणेस मदत म्हणुन सध्या रूपये ५ लाख अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित रक्कम रूपये ५ सुधारित अंदाज पत्रक केल्यानंतर अदा करण्यात यावे. तसेच पुढील दोन वर्षात सुध्दा रूपये १० लाख प्रत्त्येकी अदा करण्यात यावे. महानगरपालिकेने वित्तिय वर्ष २००३-०४ च्या अंदाजपत्रकातील लेखाशीर्ष खाली धर्मदास संस्था अनुदान म्हणुन रूपये ५ लाखाची तरतुद केली आहे.

तरी सदर प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र. २३</u> <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. कमला शर्मा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००३-२००४च्या अंदाजपत्रकात पुर्नःसमायोजनाच्या अधीन राहुन थॅलेसिमिया फाऊंडेशन यांना उल्हासनगर थॅलेसिमिया रोगासंबंधी प्रतिबंधनात्त्मक उपाययोजना व इतर कार्यक्रम राबविणेस महानगरपालिकेतर्फे अर्थसहाय्य देणे कामी यावर्षी रू. १० लाख अनुदान देणेस मंजुरी देत आहे. तसेच पुढील दोन वर्षात सुध्दा प्रत्त्येकवर्षी रू. १० लाख अनुदान देणेस मान्य करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८.४५ वाजता सभेचे कामकाज स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>

<u>राज असरोंडकरः-</u>

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२०/६/२००३

इतिवृत्त

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/६/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. २०.६.२००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. उपमहापौर, श्रीमती. जया साधवानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ३९. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४०. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४३ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४५. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ५०. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५१. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेन्द | ५३. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५४. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५५. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५६. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५७. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६०. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २८. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३०. | श्री. मोहन साधवानी, | ६५. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६६. | श्री. इदनानी राजू चंद्रभान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६९. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३५. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | | |
| ३६. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | | |

तर

१. मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया, मा. सदस्य २. श्री. मुलचंदानी महेंद्र,३. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, ४ श्री. यादव लालबिहारी बुझारत ५. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ६. श्री. अंकुश म्हस्के, ७. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, ८. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण, ९. श्रीमती. मीनु राजकुमार दासानी, १०. श्री. माखिजा हरदास हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सायंकाळी ६.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्वेतपत्रिकेबाबत दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंतची जी सभा होती या सभेस बराच वेळ लागल्यामुळे आता दुसरी महासभा सूरू होत आहे. म्हणुन माझी विनंती आहे की, सभा सुचनेवर २८ विषय आहेत म्हणुन आज प्रश्नोत्त्तरे न चालविता ती पुढल्या सभेत चालवू व थेट सभा सूचनेवरील विषयांचे कामकाज चालविले तर बरे होईल असे मला वाटते.

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>ठिक आहे. पुढल्या सभेत घेवू या प्रश्नोत्त्तराचा विषय आपणा सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>काय करायचे? प्रश्नोत्त्तरे वगळायची?
विषय क्र. २च्या अगोदर एक लक्षवेधी सूचना आहे. ती श्री. राजेंद्रसिंग भुल्लर यांच्याकडून आलेली आहे, जयबाबा लॉन्स समोरील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>आयत्त्यावेळचे विषय आणण्याची गरज काय होती?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जयबाबा धाम समोर शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्याची झिज व पडझड झालेली आहे. या समोवतालच्या भागाचे सुशोभिकरण करण्यात यावे. व शिवाजी महाराजांचा पुतळा तेथे बसविण्यात यावा. अशा स्वरूपाची लक्षवेधी आहे.

**लक्षवेधी**

<u>सुचक :- राजेंद्रसिंह भुल्लर</u>

<u>अनुमोदक :- राजेंद्र चौधरी.</u>

विषय :-प्रभाग क्र. १३ मधील जयबाबाधाम आश्रमाजवळील चौकात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती पुतळयाच्या झालेल्या झीज, पडझड, विटंबना, मोडकळ, अवहेलना थांबवुन त्या जागी नविन पुतळा <u>बसवुन सदर चौकाचे सुशोभिकरण करण्याबाबत लक्षवेधी.</u>

उपरोक्त विषयान्वये सुमारे ३३० वर्षापुर्वी शतकाच्या यज्ञातुन एक केशरी ज्वाला उसळली आणि दशदिशांनी जणु अरूणोदय झाला हा अरूणोदय होता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, शिवरायांचा संघर्ष हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता त्यांच्या पराक्रमामुळे धर्म, संस्कृती व देश सुरक्षित आहे. त्यांची प्रचिती म्हणुन दिल्लीच्या संसदभवनाच्या आवारात शिवरायांचा अश्वआरूढ पुतळा सन्मानाने बसविला गेला. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक १३ मधील जयबाबाधाम या आश्रमाजवळील प्रमुख चौकात, मिथिला कुटीर व प्रिती पॅलेस इमारत रस्ताकडे जाणा-या मार्गे, सुरु असलेल्या नविन इमारतीच्या बांधकामाच्या कुपनभिंतीला लागुन छत्रपती शिवरायांचा पुर्णाकृती रूबाबदार पुतळा गेल्या ३० वर्षापासुन अस्तित्त्वात आहे. महापालिकेने या पुर्णाकृती शिवरायांच्या पुतळयाकडे संपुर्णतः दुर्लक्षित केले आहे. सदर पुतळा पाहून शरमेने माना खाली जातात. अशी दैयनिय अवस्था झालेली आहे. पुतळयाच्या बहुताःश भागाची पडझड झाली आहे. पडझड झालेल्या भागात सिमेंटचा लेप लावण्यात आला आहे. पूतळयाची झीज झाली असून कोणत्त्याही क्षणी मोडकळीस येईल. सदर पुतळा विद्रुप अवस्थेत असुन हाताची बोटे, पाठ, जिरे टोपाची मंदिल, समशेर, पायाकडच्या भागाची पडझड झालेली आहे. पुतळया लगत उंच नविन इमारतीचे बांधकाम सुरु असून त्या इमारतीचे मजूर वरूनच पुतळयालगत घाण टाकतात. त्या पुतळयाभोवती कचरा अस्थाव्यस्थ पडलेला आहे. त्या पुतळयाभोवती इमारतीचे मटेरियल पडले असून त्यामुळे शिवरायांच्या पुतळयाची घोर विटंबना झाली आहे. राष्ट्रपुरूषांच्या पुतळयांच्या विद्रुपीकरण, विटंबनामुळे महाराष्ट्रात अनेकदा दंगली घडलेल्या आहेत. ही पार्श्वभूमी लक्षात घेवून उल्हासनगर मध्ये असा अनर्थ व अप्रिय घटना घडण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. शिवरायांनी स्वराज्य स्वातंत्र्यासाठी मुघलशाहीचा नायनाट केला होता परंतु उल्हासनगर रुपी तालिबान शाही, मियॉ मुर्शरफ राजवटीत महाराष्ट्राच्या आराध्य दैवताचे घोर अपमान, विटंबना केली जात आहे ही अत्त्यंत लज्जास्पद, व संतप्त बाब आहे. समाजकंटकामार्फत कोणत्त्याही क्षणी सदर पुतळयाची विटंबना होऊ शकते. त्यामुळे शहरात ताणग्रस्त परिस्थिती निर्माण होऊन जातीय दंगड घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे कायदा, सुव्यवस्था व शांतता भंग होऊन परिस्थिती चिघळण्याची शक्यता आहे. याचा गांभीर्याने विचार करण्यात यावा, आम्ही सदर लक्षवेधी मार्फत आपणास सर्तक व दक्ष करु इच्छितो जणेकरून कोणत्त्याही प्रकारची अप्रिय घटना घडू नये. शहरातील वातावरण तंग होऊ नये. यापूर्वीच्या महासभेत बोट क्लबमधील थोर महापुरूषांच्या मुर्तीसंबंधी झालेल्या लक्षवेधी सुचनेच्या चर्चामध्ये तत्त्कालीन नगरसेवक मा. श्री. दर्शनसिंह व मा. श्री. प्रकाश महाडिक यांनी सदर पूतळयाविषयी आवाज उचलला होता. परंतु त्यावेळी फक्त कोरड्या आश्वासनाखेरीस कोणत्त्याही प्रकारे ठोस प्रक्रिया केली गेली नाही.

महापालिकेचे शहर अभियंता श्री. मोहन चिजवानी यांना भारतीय विद्यार्थी सेनेच्या ठाणे जिल्हा चिटणीस श्री. सुरेश मालवणकर यांनी सदर पुतळयासंबंधी वारंवार प्रत्यक्ष भेटून व पत्रव्यवहार करूनही त्यांना श्री. चिजवानी यांनी आश्वासन व उडवाउडवी उत्तरे देवून वेळ काढुपणा केला. छत्रपतीच्या पुतळयांची अवहेलना विरोधात भारतील विद्यार्थी सेनेच्या वतीने तसेच शिवसेनेचे वतीने तीव्र आंदोलन सरू करणार आहोत.

शिवरायांचे आठवावे रूप, प्रताप, साक्षेप, भुमंडळी परंतु उल्हासनगर प्रशासनाला या भूमंडळी रूप, प्रताप, साक्षेपाचा विसर पडला आहे असे दिसुन येते. आम्ही सदर पुतळयाची वस्तुस्थिती पाहिली आहे सोबत त्या पुर्णाकृती शिवरांयांच्या पूतळयाची छायाचित्रे जोडत आहे. त्यावरून आपणास पूतळयाच्या झालेल्या अवहेलनाची कल्पाना येईल. आमची प्रशासनाकडे अशी मागणी आहे की

सदर पूतळा विसर्जित करून त्या जयबाबाधाम आश्रमाजवळील प्रमुख चौकात नविन सुबह (पुर्णाकृती/अर्धाकृती) पूतळा बसवण्यात यावा. त्या चौकाचे सूशोभीकरण करण्यात यावे. शिवरायांच्या पुतळयाच्या झालेल्या अवमानाची जबाबदारी स्विकारून या विषयावर महासभेत सविस्तर चर्चा करून जयबाबाधाम आश्रमासमारे, उल्हासनगर-५ येथील सदर चौकात उभारलेल्या जुन्या विद्रुप अवस्थेत असलेल्या पुतळा हलवुन त्या ठिकाणी नविन देखीव, आकर्षक शिवरायांचा पुतळा
कायमस्वरूपी बसुन चौकाचे सुशोभिकरण करण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा पवित्रा घ्यावा लागेल याची खबरदारी घ्यावी ही नम्र विनंती.

या महासभेत सदर विषयासंबंधी चर्चा करून योग्य निर्णय दयावा हि विनंती.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. पिठासिन अधिका-यातर्फे लक्षवेधी स्विकृत करण्यात आली आहे. त्यावर आपण चर्चा करू शकता.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मा. महापौरजी, जयबाबा धाम आश्रम जवळ शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. आज त्याची अवस्था अशी आहे की, ती पहाताच आमची मान शरमेने खाली जाते. अशी स्थिती आहे. त्यास कोण जबाबदार आहे?

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>श्री. चिजवानी साहेब......,

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>चिजवानी साहेबच नेहमी पुढे येतात हे काय आहे?

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u> शहर अभियंता चिजवानी साहेबच आहेत ना?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>या, ना सांगा ना. पुतळयाबाबत. सन्माननिय आयुक्त साहेब त्यांना व्यासपिठावर बोलवा. नेहमी तुम्ही त्यांना सांभाळून घेता हे कसे चालेल? त्यांना पण उत्तरे देवू दया. काय उत्तर दिले त्यांनी. तेथे जो पुतळा आहे तो हटवून तेथे दुसरा नविन पुतळा बसविला जावा व चौकाचे सुशोभिकरण केले जावे अशी आमची मागणी आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया ,ही लक्षवेधी सूचना मला कालच प्राप्त झाली होती. आज सकाळीच मी त्या जागेवर स्वतः जावून आलो. तिथे मी चौकशी केली, मला असे माहित पडले की तो पुतळा कुण्या एका खाजगी इसमाने तिथे बसविला आहे. महानगरपालिकेने बसविलेला नाही. आणि जर महानगरपालिकेने बसविला असता तर त्याच्या देखभालीची पुर्ण जबाबदारी महापालिकेची असती, कुण्या एका इसमाने तो बसविला आणि त्यांनतर ती जागा रस्ता रूंदीकरणामध्ये आली. रस्त्याच्या बाजुलाच आता तो पुतळा आहे. आज तो पुतळा खुपच खराब स्थितीत आहे. कारण की आज मी जे पाहिले त्यावरून असे दिसते की, तो पुतळा छत्रपती शिवाजी महाराजांचा वाटतच नाही. त्याचा रंग बरोबर नाही. तो पुतळा कुणी बसविला, कधी बसविला त्याबाबत काहीच माहिती नाही. तर हे लक्षात घेता, ज्या खाजगी इसमाने तो पुतळा बसविला आहे. त्याच्याकडुन त्याची देखभाल करून घेणेस आम्ही त्यास बाध्य करू. नाही तर तो तेथुन हटवून तेथे दुसरी काही व्यवस्था, बंदोबस्त करावा लागेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आयुक्त साहेब ज्या व्यक्तीने तो पुतळा तेथे बसविला ती व्यक्ती तेथे आता रहात नाही. सध्या त्या पुतळयाची स्थिती

अतिशय खराब आहे. आपण जसे म्हणता की रस्ता रूंदीकरणामध्ये ती जागा गेली आहे. रस्ता रूंदीकरणामुळे तो खराब झालेला नाही तर तेथे इमारतीचे जे बांधकाम चालु आहे त्या इमारतीच्या बिल्डरने तो पुतळा खराब केला आहे. माझी आपणांस ही विनंती आहे की, महापालिकेच्या वतीने तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा नविन पुतळा बसविला जावा आणि त्या चौकाचे सुशोभिकरण करण्यात यावे. कारण की, तो पुतळा १९८० पासुनचा आहे. आजकालचा नाही. त्यास २३ , २४ वर्ष झाली आहेत तर माझी आपणांस अशी विनंती असेल की, तेथे एक चांगला पुतळा बसवून त्याची देखभाल पाहिली जावी.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया ,या शहरामध्ये दोन जागी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आहेत. एक आहे शिवाजी चौकात व दुसरा आहे महानगरपालिकेच्या कार्यालयात आज या शहराची स्थिती अशी आहे की, छत्रपती शिवाजी महाराज असोत, डॉ. बाबा साहेब आंबेडकर असोत किंवा कुणीही महान नेता असो. त्याचे एका शहरामध्ये किती पुतळे बसवायचे व ते सुध्दा महापालिकेच्या खर्चाने ते आधी निश्चित करावे लागेल. व आज ज्यास्थितीत तो पुतळा आहे. तो पहाता विधीवत पध्दतीने पुजापाठ करून तो तेथुन हटविणे योग्य होईल परंतु पुन्हा दुसरा पुतळा तेथे बसवायचाच आहे का? याबाबत सभागृहाने निर्णय घेतला पाहिजे.

<u>मा सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा. महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी असे सांगितले की शहरामध्ये दोन पुतळे बसविलेले आहेत. दोन्ही अर्धपुतळे आहेत. ही एक चांगली संधी आहे. तेथील तो पुतळा काढुन त्याजागी एक चांगला पुर्णाकृती पुतळा बसविला तर फार चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर  वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता आमच्या श्री. महाराज भुल्लर व श्री. राजेंद्र चौधरी यांनी जी लक्षवेधी दिली आहे. त्या बाबत आयुक्त साहेबांनी जे म्हंटले की त्याची स्थिती खुप खराब आहे. ही हकीकत आहे. आमच्या श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी सांगितले की  बिल्डरने त्या पुतळयाची ती स्थिती केलेली आहे म्हणुन मी असे म्हणेन की त्या बिल्डरला शिक्षा केली पाहिजे. पुतळा ज्या व्यक्तीने बसविला त्याच व्यक्तीने त्याची देखभाल केली पाहिजे. आज कुठेही नविन पुतळा बसविण्यास महाराष्ट्र शासनाने बंदी घातली आहे. त्यामुळे नविन पुतळा तर बसविता येणार नाही. परंतु तो बसविला आहे त्यास सुशोभिकरण करता येईल. म्हणुन मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की पुतळा बसविणारा जो कुठेही असेल त्यास शोधुन या पुतळयाची देखभाल दुरूस्ती त्याच्याकडुन करून घ्यावी. आमचे श्री. महाराज भुल्लरजी वेळोवेळी महापुरूषांच्या पुतळयांबाबत महासभेत आवाज उठवित आले आहेत. बोट क्लबच्या आतमध्ये जावून पुतळयांची स्थिती ते पाहुन आले होते.  व त्याबाबत त्यांनी आवाज उठवुन श्री. चिजवानी साहेबांना विचारणा केली होती. महानगरपालिकेस त्यांची देखभाल करावी लागली होती. श्री. भुल्लर महाराजांच्या या प्रयत्नांबाबत  मी त्यांना धन्यवाद देतो. शहरामध्ये कोणत्याही महापुरूषाचा पुतळा असो त्यावर ते लक्ष ठेवतात. यावेळची जी लक्षवेधी  आहे ती फारच चांगली आहे. पुतळा कुठल्याही महापुरूषाचा मग तो कुठल्याही जातीचा, धर्माचा असो जशी या पुतळयाची स्थिती आहे तशी त्यांची स्थिती होवू नये.  पुतळा बसविणा-या व्यक्तीने पुतळयाची निगा आणि देखभाल ठेवली पाहिजे. व ती त्याची जबाबदारी आहे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा.महापौरजी,  आताच श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की एका जागी पुतळा  आहे दुस-या ठिकाणी पुतळा बसविण्यास राज्यसरकार कडुन परवानगी दिली जाणार नाही.  माझी अशी माहिती आहे की, जेथे अगोदरच पुतळा बसविलेला आहे. तेथे नविन पुतळा बसविण्यास राज्य शासन परवानगी देते.  अशी माझी माहिती आहे.  आपण जर महापालिकेच्या खर्चाने तेथे पुतळा बसवू इच्छित असाल आणि तोही लवकरात लवकर तर ते फारच चांगले होईल.  कारण की आताच श्री. दर्शनसिंग यांनी त्यास सहमती

दर्शविली आहे. तर पूर्ण सभागृह सुध्दा त्यास सहमती देईल तर फारच चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> सन्माननिय महापौरजी, सर्वसंमतीने तेथे पुतळा.............

<u>मा. पिठासीन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u> नाही, मी आयुक्त साहेबांना सांगितले आहे. ते याबाबत खुलासा करत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मा. महापौर महोदया, ज्या व्यक्तीने तो पुतळा बसविला आहे त्यास अर्धांगवायुचा झटका आलेला आहे आणि या पुतळयाची देखभाल करण्याची त्याची कुवत नाही.
<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> मी माहिती घेत आहे आपण मध्ये का बोलतात?

<u>मा. पिठासीन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u> दोन मिनिट शांतता राखा.

<u>मा. श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर महोदया, आम्ही माहिती देत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> मी सचिव साहेबांना विचारु इच्छितो की, जुना पुतळा तेथुन हटवून तेथे नविन पुतळा आपण बसवू शकतो ना?

<u>मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजाः-</u> याबाबत हरकत काही नाही, परंतु शासनाकडुन कायदेशीर परवानगी घ्यावी लागेल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> म्हणूनच मी विचारले. आमच्याकडुन त्यास सहमती आहे.

<u>मा. सचिव श्री. प्रकाश पं. कुकरेजा :-</u> मा. आयुक्तांतर्फे तातडीचे विषय म्हणुन आयत्त्यावेळचे दोन विषय आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यासाठी कार्यसूचीवर आणले आहेत ते २६ व २७ क्रमांकावर घेता येतील. भुखंडांबाबत , विकास करण्यासाठी.... आणखी एक २८क्रमांकाचा विषय आहे तो घेत नाही , तो पुढच्या सभेत आणला जाईल. हे दोन्ही विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घ्यायचे की नाही? हे सभेपुढे आहे त्यास ¾ उपस्थित पालिका सदस्यांनी अनुमती दिली तर घेतले जातील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>२८ व्या क्रमांकाचा जो विषय आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> महापौर महोदया, हे जे २६ व २७ व्या क्रमांकाचे विषय आहेत, ते वाचल्यानंतर असे वाटते की, हे महत्त्वपूर्ण विषय आहेत. व ते आयत्त्यावेळचे विषय म्हणून आणण्याऐवजी नियमित सभासूचनेवर आणून पुढल्या सभेत आणले तर फारच चांगले होईल. तसेही आजच्या सभासुचनेवर २५ विषय आहेत. त्यामध्ये आणखी विषय जोडण्याची आवश्यकता नाही. असे मला वाटते. तर आपणांस विनंती आहे की, हे जे २६, २७, २८ क्रमांकाचे विषय आहेत ते यासभेत घेतले जाऊ नयेत.

<u>मा. सचिव श्री. प्रकाश पं. कुकरेजाः-</u> आपला विरोध आहे काय?
जे सन्माननिय सदस्य अनुक्रमांक २६ व २७ चे विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेण्याच्या बाजूने आहेत. त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>विषय सामावून घेण्याच्या बाजूने २७ मते.</u>

१. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
२. श्री. वाघे शामु बाबु
३. श्री. ऐडके गणपत
४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
५. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
६. श्री. गुप्ता प्रभुनाथ
७. श्री. पवार नाना आनंदा
८ श्रीमती. आहुजा नीता
९ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१० श्री. शांताराम निकम
११ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१२ श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१३ श्री. गायकवाड सुरेश
१४ श्रीमती. वनवारी मोना अशोक
१५ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१६ श्री. जेसवानी सतरामदास
१७. श्री. लुंड गोविंदराम
१८ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
१९ श्री. पमनानी ईश्वर
२० श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२१ श्री. साधवानी मनोज
२२ श्री. होशियारसिंग लबाना
२३. श्री. ठाकुर नरेंदकुमार केवलराम
२४. श्री. जाधव सुरेश
२५. श्री. जाधव प्रशांत
२६. श्री. साधवानी मोहन
२७ श्रीमती. साधवानी जया

जे सन्माननिय सदस्य अनुक्रमांक २६ व २७ चे विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेण्याच्या विरोधात आहेत. त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>विषय सामावुन घेण्याच्या विरोधात २३ मते</u>

१. श्री. टाले प्रमोद
२. श्री. भालेराव गौतम
३. श्री. ठाकुर अशोक
४. श्री. बेहरानी मोहन
५. श्री. बेहरानी ठाकुरदास
६. श्रीमती. जावळे संगिता
७. श्रीमती. मोकल सिमा चंदाराम
८. श्री. उमाप रामदास
९. श्री. पुरस्वानी जमनादास
१० श्री. रूपचंदानी बच्चाराम
११ श्री. असरोंडकर राज
१२. श्रीमती. कृष्णानी रेखा
१३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
१४. श्री. सोनावणे नथु
१५ श्री. गायकवाड दिलीप
१६ श्रीमती. बामणकर नंदिनी
१७ श्रीमती. माने किरण
१८ श्री. चव्हाण रमेश
१९. श्री. बोडारे धनंजय
२० श्री. पाटील विश्वनाथ
२१ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२२ श्री. चौधरी राजेंद
२३. श्रीमती. जयश्री. सुर्वे

मा. सचिव श्री. प्रकाश पं. कुकरेजा:- विषय सामावून घेण्यासाठी दोन तृतियांश पेक्षा जास्त बहुमत पाहिजे. ते नसल्याने हे विषय सभेच्या कामकाजात सामावून घेता येणार नाहीत.

मा. पिठासीन अधिकारी श्रीमती. जया साधवानी:- सदरचे विषय सामावुन घेण्यासाठी सभेत उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांपैकी आवश्यक त्या संख्येतील पालिका सदस्यांची अनुमती नसल्याने सदरचे विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येत नाहीत.

मा.सचिव श्री. प्रकाश कुकरेजा:-विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय क्र.२:- मागील सभेचे दि. १९ ५. २००३चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- मागच्या सभेत रिंगरुटचा जो प्रस्ताव आला होता. त्यास श्री. प्रमोद टाले यांनी विरोध केला होता.

मा.सचिव श्री. प्रकाश कुकरेजा:- नाही, मी त्यांना विचारले होते त्यांनी प्रस्तावाच्या बाजुने हात वर केला होता.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ते स्वत: म्हणतात.
मा.सचिव श्री. प्रकाश कुकरेजा:- तर ती आता अलग अशी गोष्ट होईल. त्यावेळेस मी त्यांचे नाव पुकारले होते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- श्री. नाना पवार यांचा सुध्दा विरोध होता.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- श्री. नाना पवार व श्री. शांताराम निकम हे तटस्थ होते. व मी विरोधात होतो.

मा. पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- ठिक आहे त्यांचा विरोध आहे अशी नोंद करुन मागील सभेचे दिनांक १९ ५.२००३ चे उर्वरित इतिवृत्त जसे आहे तेस सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा.सचिव श्री. प्रकाश कुकरेजा:-विषय क्र३ वाचून दाखवितात.

विषय क्र३ :-श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.

काही सदस्य:-पास. पास.
मा. पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र३ :-श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत

प्रस्तावना :-

श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे, लिपीक यांनी श्री. महेंद्र पंजाबी यांना युनियन बॅक ऑफ इंडिया, शाखा उल्हासनगर या बॅकेंतून कर्ज या बॅकेतून कर्ज मिळवून देणेकामी श्री. महेंद्र पंजाबी यांचेकडून रु. २५०० एवढया रक्कमेची लाचेची मागणी केल्यावरुन दि २८.५.२००२ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी श्री. लक्ष्मण दोंदे यांना रु. २५००/- पारितोषन रक्कम स्विकारताना रंगेहात पकडले. अशाप्रकारे श्री. दोंदे यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचे नोकर या नात्याने पदाचा व अधिकाराचा गैरवापर करुन स्वत:चा आर्थिक फायदा केलेला यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथील अधिकारी यांनी श्री. दोंदे यांचेविरुध्द सेंट्रल पोलीस स्टेशन, उल्हासनगर- ३ यांचेकडे गुन्हा रजि.नं.II

५८/२००२.ला.प्र.का. सन१९८८ चे कलम ८, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २८/५/२००२ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.विशेष न्यायालयात संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९(१)(क) अन्वये न्यायलयात खटला दाखल करणेकामी नियुक्ति प्राधिका-याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त/ पोलीस अधिक्षक(२) ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सीआर./१९०/ठाणे/२००२/२५१३ दि. २८/३/२००३ अन्वये श्री. श्री.लक्ष्मण भिमराव दोंदे, कनिष्ठ लिपीक यांच्यावर अभियोग दाखल करणेकामी महापालिकेकडे विनंती केली आहे.

श्री. श्री.लक्ष्मण भिमराव दोंदे हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार संबंधीताविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ति प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीताविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार खटला दाखल करणेकामी मंजूरी प्रदान करण्यात यावी, अशी शिफारस आहे.

महासभा ठराव क्र. २५ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, ज्याअर्थी महापालिकेकडुन सादर करण्यात आलेली हकिकत व श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे महानगरपालिका लिपिक यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन उल्हासनगर-३ यांचेकडे गुन्हा रजि. नं. II ५८/२००२ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ८,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. २८.५.२००२ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाची कागदपत्रे आणि गुन्हयाची सर्व हकीकत व निष्पन्न झालेली सर्व परिस्थिती याची पुर्ण तपासणी केल्यानंतर, सदरच्या आरोपीविरूध्द गुन्हा केला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा असल्याची महानगरपालिकेची खात्री झाल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने सदर आरोपी विरूध्द गुन्हा केल्याबाबत सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सदस्या श्रीमती. बेबी वसीटा यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*मा. सचिव श्री. प्रकाश पं. कुकरेजा :- विषय क्र. ४ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. ४ :-श्री. दिपक निरगुडे, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.*

*काही सदस्य :- पास....*

*मा. पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

**विषय क्र. ४:-** श्री. दिपक निरगुडे, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. दिपक निरगुडे, लिपीक यांनी श्री. यु.के. रामसिंघानी यांचेविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी कामी त्यांचे बाजूने साक्ष नोंदविणसाठी श्री. रामसिघांनी यांचेकडून रु. २००० ची लाचेची मागणी केल्यावरुन त्यांना दि. २८.८.२००२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी रक्कम रु. १५००/- एवढे स्विकारताना रंगेहात पकडले अशाप्रकारे श्री. निरगुडे यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचे नोकर या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिका-याचा दुरुपयोग करुन स्वत:चा आर्थिक फायदा केलेला आहे. यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथील अधिकारी यांनी सेंट्रल पोलीस स्टेशन, उल्हासनगर - ३ यांचेकडे गुन्हा रजि.नं.II ११७/२००२.ला.प्र.का. सन१९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २८/८/२००२ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.विशेष न्यायालयात संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९(१)(क) अन्वये न्यायलयात खटला दाखल करणेकामी नियुक्ति प्राधिका-याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त/ पोलीस अधिक्षक(२) अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सीआर./३२६/ठाणे/२००२/२७४३ दि. ४/४/२००३ अन्वये श्री. दिपक निरगुडे, कनिष्ठ लिपीक यांच्यावर अभियोग दाखल करणेकामी महापालिकेकडे विनंती केली आहे.

श्री. दिपक निरगुडे हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार संबंधीताविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ति प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीताविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार खटला दाखल करणेकामी मंजूरी प्रदान करण्यात यावी, अशी शिफारस आहे.

<u>महासभा ठराव क्र. २६</u> <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, ज्याअर्थी महापालिकेकडुन सादर करण्यात आलेली हकिकत व श्री. दिपक निरगुडे, महानगरपालिका लिपिक यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन उल्हासनगर-३ यांचेकडे गुन्हा रजि. नं. II ११७/२००२.लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २८. ८.२००२ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाची कागदपत्रे आणि गुन्हयाची सर्व हकीकत व निष्पन्न झालेली सर्व परिस्थिती याची पुर्ण तपासणी केल्यानंतर, सदरच्या आरोपीविरूध्द गुन्हा केला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा असल्याची महानगरपालिकेची खात्री झाल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने सदर आरोपी विरूध्द गुन्हा केल्याबाबत सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :-</u> विषय क्र. ५ वाचून दाखवितात.***

*विषय क्र. ५:-कुमारी राणी भाटीया, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.*

*परंतु यामध्ये दोन कर्मचा-यांचा समावेश आहे. फक्त राणी भाटियाच नाही तर तिच्या बरोबर बाबासाहेब साळुंके पण आहेत. गोषवा-यामध्ये याबाबतचा समावेश आहे. दोघांवर खटला भरण्यास आपणांस परवानगी दयायची आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> बाबासाहेब साळुंके यांना सुध्दा रंगेहात पकडले होते काय?*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> त्यांना आरोपी बनविले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री.राजेंद चौधरी :-</u> त्यांना आरोपी बनविले आहे का?*

*<u>मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

विषय क्र. ५:- कुमारी राणी भाटीया, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

श्रीम. राणी भाटीया, लिपीक यांनी श्री. अशोक नथ्थू बारी यांना त्यांचे भावाचे झोपडे वजा रुम खरेदी केल्यानंतर कराची आकारणी त्यांचे भावाचे नावे करण्यासाठी श्री. बारी यांचे कडून रुपये २०० एवढया रकमेची लाचेची मागणी केली होती. तसेच तक्रार दार यांनी श्री.बाबासाहेब साळुखे विरुध्द ही तक्रार केलेली होती. त्या अनुषंगाने दिनांक १५/३/२००२ रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी श्रीम. राणी भाटीया यांना रुपये २०० पारितोषण रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले अशा प्रकारे श्रीमती भाटीया यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचे नोकर या नात्याने पदाचा गैरवापर करुन स्वत:चा अर्थिक फायदा केलेला आहे. यास्तव लाच लुचपत प्रतिंबधक विभाग ठाणे येथील अधिकारी यांनी श्रीम. राणी भाटीया व तक्रार दार यांनी केलेल्या तक्रारीवरुन श्री. बाबासाहेब साळुंखे यांचे विरुध्द सेंट्रल पोलीस स्टेशन उल्हासनगर ३ येथे गुन्हा रजि.नं.ाा २६/२००२.ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) व भादवि कलम १०९ अन्वये दि. १५/३/२००२ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.विशेष न्यायालयात संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९(१)(क) अन्वये न्यायलयात खटला दाखल करणेकामी नियुक्ति प्राधिका-याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त/ पोलीस अधिक्षक(२) ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सीआर./१००/ठाणे/२००२/३३१९ दि. २४/४/२००३ अन्वये संबंधित कर्मचारी यांचेवर अभियोग दाखल करणेकामी महापालिकेकडे विनंती केली आहे.

श्रीम. राणी भाटीया व श्री. बाबासाहेब साळुंखे हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार संबंधीताविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ति प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीताविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार खटला दाखल करणेकामी मंजूरी प्रदान करण्यात यावी, अशी शिफारस आहे.

<u>महासभा ठराव क्र. २७</u> <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, ज्याअर्थी महापालिकेकडुन सादर करण्यात आलेली हकिकत कुमारी राणी भाटीया व श्री. बाबासाहेब साळुंखे महानगरपालिका लिपिक यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस

स्टेशन उल्हासनगर-३ यांचेकडे गुन्हा रजि. नं. II २६/२००२. लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) व भादवि कलम १०९ दि. १५/३/२००२ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाची कागदपत्रे आणि गुन्हयाची सर्व हकीकत व निष्पन्न झालेली सर्व परिस्थिती याची पुर्ण तपासणी केल्यानंतर, सदरच्या आरोपीविरूध्द गुन्हा केला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा असल्याची महानगरपालिकेची खात्री झाल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने सदर आरोपी विरूध्द गुन्हा केल्याबाबत सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.*

**fo"k; Ø- 6%&** egkuxjikfydk lsok izos'k fu;ekr 1½ojh"B lqj{kk j{kd] 2½ fyMhax Qk;jesu] 3½lax.kd pkyd ;k in ik=rslanHkhZ fu;ekr lq/kkj.kk dj.ks ckcr-

*या पदांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये काही बदल करायचे आहेत.*

*काही सदस्य :-पास.*

*मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

**fo"k; Ø- 6%&** egkuxjikfydk lsok izos'k fu;ekr 1½ojh"B lqj{kk j{kd] 2½ fyMhax Qk;jesu] 3½lax.kd pkyd ;k in ik=rslanHkhZ fu;ekr lq/kkj.kk dj.ks ckcr-

प्रस्तावना :-

उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर विविध पदांसाठी नव्याने प्रस्तावित सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली आहे व ती शासनाकडे मंजुरीकरीता पाठवलेली आहे. त्यामध्ये १) वरीष्ठ सुरक्षा रक्षक, २) लिडींग फायरमन व ३) संगणक चालक या पदांच्या सेवाप्रवेश नियमात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

१) वरीष्ठ सुरक्षा रक्षक:-

सदर पदावर पदोन्नती द्यावयाची असल्यास महापालिकेतील सुरक्षा अधिकारी यांचेमधुन पदोन्नती द्यावी लागेल असे नमुद केले आहे परंतु वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नती झाल्यास महापालिकेतील सुरक्षारक्षकांमधुन देण्यात यावी अशी दुरूस्ती करण्यात यावी.

२) लिडींग फायरमन :-

सदर पदाच्या सेवाप्रवेशनियमात फक्त पदोन्नतीनेच नियुक्ती करणेसंबंधी नियम दिलेले आहेत सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमात सरळसेवेने नियुक्ती करावयाची असल्यास खालिल शैक्षणिक पात्रता व अर्हता आवश्यक करण्यात येत आहेत.

१) शैक्षणिक पात्रता :- कोणत्याही शाखेतुन बारावी उत्तीर्ण व अग्निशामक संबंधी
प्राधिकृत संस्थेचा कोर्स पुर्ण.

२) वयोमर्यादा ३० वर्षापेक्षा जास्त नसावी.

उमेदवाराची उंची कमीतकमी १६५ से.मी. आणि छाती कमीतकमी ८१ से.मी.असावी व फुगवुन कमीतकमी ५ से.मी.ने जास्त, वजन ५० किलोपेक्षा कमी नसावे आणि दृष्टी साधारण असावी.

सरळसेवेने करावयाची नियुक्ती हि एकुण मंजुर पदाच्या २५ टक्क्यापेक्षा जास्त नसावी

३) <u>संगणक चालक</u> :-

संगणकचालक या पदावर सरळसेवेने नियुक्ती करावयाची झाल्यास उमेदवाराची शैक्षणिक पात्रता एच.एस.सी. (सायन्स) व मान्यताप्राप्त संस्थेतुन संगणक चालक पदाचा कोर्स पुर्ण केलेला असावा असे सेवानियमात नमुद केले आहे त्याऐवजी संगणकचालक या पदावर सरळसेवेने नियुक्ती द्यावयाची झाल्यास उमेदवाराची शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेतुन बारावी उत्तीर्ण व मान्यताप्राप्त संस्थेतुन (डी.ओ.ई.ए.सी. सोसायटीज यांचे ष्सी.सी.सी " किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचा ष्ओ "लेव्हल किंवा ष्ए "लेव्हल किंवा ष्बी " लेव्हल किंवा ष्सी " लेव्हल किंवा एम.एस.सी.आय.टी किंवा जी.इ.सी.टी प्रमाणपत्र) कोर्स पुर्ण केलेला असावा.

तरी वरील पदांच्या सेवाप्रवेश नियमात केलेली दुरुस्ती प्रस्तावित करुन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

<u>महासभा ठराव क्र. २८</u> दि. २०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सेवा प्रवेश नियमात १) वरीष्ठ सुरक्षा रक्षक, २) लिडींग फायरमन व ३) संगणक चालक या पदांच्या पात्रते संदर्भी वर सुचविलेल्या प्रमाणे सुधारणा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.*

**विषय** क्र. ७**:-** महानगरपालिका आस्थापना सूचीवरील करनिरिक्षक

पदाऐवजी अधिक्षक असे पदनामाचा अंर्तभाव करणे बाबत.

*या प्रस्तावामध्ये फक्त पदनाम बदलायचे आहे. वेतनश्रेणी तीच राहणार आहे.*

*<u>काही सदस्य :-</u>पास.*

*<u>मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

**विषय** क्र. ७:- महानगरपालिका आस्थापना सूचीवरील करनिरिक्षक पदाऐवजी अधिक्षक असे पदनामाचा अंर्तभाव करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर नव्याने पदनिर्मिती करून प्रस्तावित आस्थापना सुची तयार करून ती शासनाकडे मंजूरीकरीता पाठविलेली आहे यात अधिक्षक या पदनामाची १७ पदे शासनाकडे मंजुरीकरीता पाठविली होती त्यांस अद्याप मंजुरी मिळालेली नाही. उल्हासनगर नगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर कर निरीक्षक या पदनामाची दहा पदे मंजुर आहेत सदर पदनामाची वेतनश्रेणी रू.५५००-१७५-९००० अशी आहे. सद्यस्थितीत महापालिकेच्या आस्थापनेवर कर निरीक्षक या पदनामाची मंजुर सर्व पदे रिक्त आहेत. जकात निरीक्षक या पदनामाची एकुण २० पदे मंजुर आहेत त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत व ९ पदे रिक्त आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अधिक्षक या पदनामाची पदे भरणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात विभागाचे गेल्या चार-पाच वर्षापासुन खाजगीकरण करण्यात आलेले असल्याने जकात निरीक्षक या पदावर कार्यरत कर्मचारी हे करनिरीक्षक म्हणुनच कर विभागात काम पहातात. परंतु जकात निरीक्षक व कर निरीक्षक या पदांसाठीची वेतनश्रेणी अनुक्रमे रू. ४०००-१००-६००० व रू.५५००-१७५-९००० अशी आहे तसेच अधिक्षक या पदनामाची वेतनश्रेणी रू ५५००-१७५-९००० अशी असेल. जकात विभागाचे खाजगीकरण झाल्यामुळे जकात निरीक्षक या पदनामाची आवश्यकता भासत नाही परंतु सदर पदावरील नियुक्त कर्मचारी हे कर निरीक्षक म्हणुन काम पहात असल्यामुळे त्यांच्या पदनामात कर निरीक्षक असा बदल करण्यात यावा परंतु त्यांची वेतनश्रेणी ही जकात निरीक्षक या पदाचीच राहिल व महापालिकेच्या सेवाप्रवेश नियमावलीत देखील जकात निरीक्षक व कर निरीक्षक या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम एकत्रित दाखविण्यात आलेले आहेत.

शासनाने कर निरीक्षक या पदनामासाठी मंजुर केलेली १० पदे यांच्या पदनामात बदल करून त्यांस अधिक्षक असे संबोधण्यात यावे परंतु वेतनश्रेणी रू ५५००-१७५-९००० अशीच राहिल. सदर प्रभावामुळे केवळ पदनामात बदल होत असुन कोणताही वाढीव आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही व अधिक्षक हे वरिष्ठ पद पदोन्नतीसाठी उपलब्ध होणार आहे

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९मधील कलम ५१ मधील तरतुदीनुसार वरीलप्रमाणे बदल प्रस्तावित करून सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर

<u>महासभा ठराव क्र. २९</u> <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका आस्थापना सूचीवरील ''कर निरीक्षक'' पदाऐवजी ''अधिक्षक'' असे पदनामाचा अंर्तभाव करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.*

**विषय** क्र. ८:- महानगरपालिका सेवा प्रवेश नियमात सफाई मुकादम पद पात्रतेसंदर्भी नियमात सुधारणा करणे बाबत.

*या प्रस्तावामध्ये मुकादमची अर्हता बदलली आहे म्हणुन या नियमांमध्ये सुधारणा करायची आहे.*

*<u>काही सदस्य :-</u>पास.*

*<u>मा. पिठसीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

**विषय** क्र. ८:- महानगरपालिका सेवा प्रवेश नियमात सफाई मुकादम पद पात्रतेसंदर्भी नियमात सुधारणा करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील आस्थापनेवर सफाई मुकादमाची एकुण ७० पदे मंजुर आहेत. सद्या महापालिकेच्या आस्थापनेवर १२ मुकादम कार्यरत असुन ५८ पदे रिक्त आहेत.

सफाई कामगारांच्या सेवाज्येष्ठता यादीनुसार व महापालिका सेवाप्रवेश नियमावलीनुसार सफाई मुकादम या पदावर पदोन्नतीसाठी शैक्षणिक पात्रता ४ थी पास व १० वर्षे सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे त्यानुसार ३९ कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र होत आहेत व शासनाने निर्धारित केलेल्या नियमांनुसार सफाई मुकादम या पदाची शैक्षणिक पात्रता ७ वी पास व ५ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे त्यानुसार ३७ कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र आहेत.

महापालिकेच्या सफाई मुकादम या पदासाठी शासनाने निर्धारित केलेली शैक्षणिक अर्हता ७ वी पास ही किमान अर्हता असणे आवश्यक आहे परंतु महापालिका सेवाप्रवेश नियमावलीनुसार सद्याच्या अर्हतेमधील अनुभवाची अट ही १० वर्षावरून ५ वर्षे अशी शिथिल केल्यास ब-याच सफाई कामगार यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध होवु शकेल तसेच ते मुकादम या पदावर पदोन्नतीस पात्र होवु शकतील

तरी सफाई मुकादम या पदाच्या सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता ७ वी पास व ५ वर्षे सफाई कामगार या पदावरील सेवेचा अनुभव असणे आवश्यक याप्रमाणे दुरूस्ती करणेसाठीचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र.</u> ३० <u>दिनांक:-२०.६.</u>
<u>२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका सेवाप्रवेश नियमात सफाई मुकादम पदी, पात्रते संदर्भी वर सुचविल्याप्रमाणे सुधारणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ९:- श्री. जी. व्ही. मोरे स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणे बाबत.

*काही सदस्य :-पास.*

*मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

विषय क्र. ९:- श्री. जी. व्ही. मोरे स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महापालिकेच्या मंजुर आस्थापनेवर मुख्य बाजार निरीक्षक या पदनामाच्या एका पदाला नव्याने मंजुरी मिळालेली आहे व सदरचे पद रिक्त आहे सदर पदावर पदोन्नती देणेसाठी शैक्षणिक पात्रता एस. एस.सी पास आणि अ.भा.स्था.स्व.संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचा कोर्स पास असला पाहिजे तसेच स्वच्छता निरीक्षक या पदावरील सात वर्षाचा अनुभव आवश्यक असे सेवाप्रवेश नियम आहेत.

महापालिकेच्या आस्थापनेवर मुख्य बाजार निरीक्षक हे पद भरणे आवश्यक आहे. मुख्य बाजार निरीक्षक हे एकाकी पद असल्यामुळे सदर पद हे एकतर खुल्या प्रवर्गातुन किंवा अनु.जातीच्या उमेदवारातुन भरावयाचे आहे.

मुख्य बाजार निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना आरक्षण, सेवाज्येष्ठता व कामाचा अनुभव लक्षात घेतला असता स्वच्छता निरीक्षक या संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीत श्री. जी.व्ही.मोरे, स्व. निरीक्षक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी आढळुन आले व ते विमुक्त जाती प्रवर्गात मोडत आहेत

मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव निवड समितीपुढे ठेवला असता निवड समितीने मुख्य बाजार निरीक्षक या पदावर पदोन्नती देणेसाठी श्री. जी.व्ही.मोरे, स्व. निरीक्षक यांची निवड केलेली आहे

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ३१ — दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. जी. व्ही. मोरे, स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १० वाचुन दाखवितात.*

**विषय** क्र. १०:- श्री. के. एन. म्हात्रे स्वच्छता निरिक्षक यांना मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणे बाबत.

*काही सदस्य :-पास.*

*मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

**विषय** क्र. १०:- श्री. के. एन. म्हात्रे स्वच्छता निरिक्षक यांना मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदनामाचे एकाकी पद मंजुर आहे. सदरचे पद हे दिनांक ३०.६.९९ रोजी पासुन यापुर्वीचे सदर पदावर कार्यरत असलेले श्री.व्ही.आर.भागवत ,मुख्य स्वच्छता निरीक्षक हे सेवानिवृत्त झाल्यामुळे रिक्त झाले होते. सदर पदावर पदोन्नती देणेसाठी शैक्षणिक पात्रता एस.एस.सी पास आणि अ.भा.स्था.स्व.संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचा कोर्स पास असला पाहिजे तसेच स्वच्छता निरीक्षक या पदावरील सात वर्षाचा अनुभव आवश्यक असे सेवाप्रवेश नियम आहेत.

मुख्य स्वच्छता निरीक्षक हे एकाकी पद असल्यामुळे सदर पद हे एकतर खुल्या प्रवर्गातुन किंवा आरक्षित उमेदवारातुन भरावयाचे आहे. मुख्य स्वच्छता निरीक्षक हे पद पुर्वी खुल्या प्रवर्गातुन भरले होते त्यामुळे आता हे पद आरक्षणानुसार भरावयाचे आहे.

मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना आरक्षण, सेवाज्येष्ठता व कामाचा अनुभव लक्षात घेतला असता स्वच्छता निरीक्षक या संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीत श्री. के.एन.म्हात्रे , स्व. निरीक्षक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी आढळुन आले व ते इ.मा.प्रवर्गात मोडत आहेत

मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव निवड समितीपुढे ठेवला असता निवड समितीने मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देणेसाठी श्री. के.एन.म्हात्रे , स्व. निरीक्षक यांची निवड केलेली आहे

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ३२ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. के. एन. म्हात्रे, स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने
उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ११:- श्री. एम. अे. खियाणी, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

काही सदस्य :-पास.

मा. पिठसीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ११:- श्री. एम. अे. खियाणी, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

अधिक्षक अभियंता, मजीप्रा/ठाणे जा. क्र. मजीप्रा/ठाणे/आस्था/१/१३८/२००१ दि. १०/१/२००१अन्वये श्री. अेम.अे. खियानी यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीवर एक वर्षाच्या कालावधीकरिता ते दि. २२/१/०१ रोजी महापालिका सेवेत हजर झालेले आहेत.

श्री. अे. अे. खियानी, शाखा अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २१/१/२००२ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्या कारणाने त्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही तरी त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी यापुढेही एक वर्षानी वाढवणेसाठी मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

महासभा ठराव क्र. ३३ दिनांक:-२० ६ २००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अेम. अे. खियानी, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १२:- श्री. डी.बी. चौधरी , उपविभागीय अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

काही सदस्य :-पास.

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १२:- श्री. डी.बी. चौधरी , उपविभागीय अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता, कोकण विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे जा.क्र. मजीप्रा / मु.अ/को.वि/आस्था-२ के.क्र.३२६/२००२ दि. ४/५/२००२ अन्वये श्री. डी. बी. चौधरी उपविभागिय अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन एक वर्षाच्या कालावधीकरिता प्रति नियुक्तीवर नेमणुक केलेली आहे.

श्री. डी. बी. चौधरी, उपविभागीय अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि. १०.५.२००२ रोजी मध्यानपुर्व रूजु झालेले आहेत व त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. ९.५.२००३ रोजी संपुष्टात आला आहे.

श्री. डी. बी. चौधरी, उपविभागीय अभियंता यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने वाढविण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र. ३४ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. डी. बी. चौधरी, उपविभागीय अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १३:- श्री.व्ही. डी. कांबळे, उपविभागीय अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

काही सदस्य :-पास.

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १३:- श्री.व्ही. डी. कांबळे, उपविभागीय अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता, कोकण विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे, जा. क्र.मजीप्रा/मु.अ/को. वि/आस्था-२ के.क्र.३२६/३०१२ दि. १०.५.२००२ अन्वये श्री. व्ही.डी. कांबळे उपविभागीय अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन एक वर्षाच्या कालावधीकरिता प्रति नियुक्तीवर नेमणुक केलेली आहे.

श्री. व्ही.डी. कांबळे, उपविभागीय अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि. १६.५.२००२ रोजी मध्यानपुर्व रूजु झालेले आहेत व त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. १५.५.२००३ रोजी संपुष्टात आला आहे.

श्री. व्ही.डी. कांबळे, उपविभागीय अभियंता यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने वाढविण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र. ३५ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. व्ही. डी. कांबळे, उपविभागीय अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवादीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १४:- पुर्वीचा दिनांक २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८१ रदद करून श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-पास. पास.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-डिसेंबर महिन्यामध्ये जो ठराव पारीत झाला होता. त्यानंतर सहा महिन्यांनी हा ठराव पुन्हा का आला? डिसेंबरमध्ये हा प्रस्ताव पारीत झाला होता तेव्हा त्याची पुर्तता केली नाही. तर जुन महिन्यामध्ये हा प्रस्ताव पुन्हा का आणला? हा विषय दप्तरी दाखल केला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, असे दोन प्रस्ताव आम्ही येथे आणले आहेत. डिसेंबरमध्ये जो ठराव पारीत झाला होता. परंतु हे जे अधिकारी आहेत. त्यांच्या सेवेची महानगरपालिकेस सक्त जरूरत होती. हा जो विषय येथे आणला आहे तो जनतेच्या हिताचा विचार करून आणलेला आहे. श्री. कोतकर, पाणी पुरवठयाच्या देयकांच्या वसुलीबाबत चांगले काम करत आहेत. व पुढे दुसरा एक विषय आहे श्री. डोईफोडे यांच्या नावाने, ते सुध्दा प्रभागामध्ये चांगले काम करत आहेत. जनतेच्या हिताचा विचार करून हे विषय आणलेले आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-डिसेंबरमध्ये ठराव पारीत झाला होता त्याबाबत सहा महिन्यानंतर आपण तोच प्रस्ताव पुन्हा का आणला. जर आपणांस वाटत होते की ते चांगले काम करत आहेत तर आधी का नाही आणला? त्यावेळेस आम्ही म्हणत होतो की राहिले पाहिजे आणि सत्ताधारी पक्षावाले म्हणत होते की गेले पाहिजे. आता सहा महिन्यामध्ये काय झाले? जर आपणांस वाटत होते की हे खुपच चांगले काम करत आहेत तर आपण सहा महिने वाट का पाहीली?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आमच्या समोर हा जो विषय आला आहे. श्री. कोतकर यांचा, त्यानंतरचा जो विषय आहे तो श्री. डोईफोडे यांच्या बाबतचा, त्याबाबत आयुक्तांनी सांगितले की तो पण या विषयासारखाच आहे. प्रत्यक्षात आम्ही ज्यांना परत पाठवू इच्छितो त्याबाबतच्या महासभेच्या ठरावाची कार्यवाही झाली पाहिजे. हेच नाही तर आणखी काही अधिकारी आहेत ज्यांना आम्ही परत पाठविण्याबाबत ठराव पारीत केला आहे. ते पण येथे आहेत. हा महासभेचा अपमान आहे. मला वाटते की जे आमचे श्री. कोतकर होते त्यांच्यासाठी आमचे मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी म्हंटले होते की, यांना परत पाठविले पाहिजे. त्यावेळेस आम्ही त्यास सहमती दर्शविली होती. आज आम्हास असे वाटते की आयुक्तांनी जे दोन प्रस्ताव दिले आहेत. कारण की कोतकर यांच्या जागी, उपविभागीय अधिकारी, देयके, या जागी दुसरा अधिकारी आलेला नाही. म्हणुन यांना जर आपण परत पाठविले आणि त्यांच्या जागी जर सहा महिन्यापर्यंत किंवा १२ महिन्यापर्यंत कुणी आले नाही. तर ते पद रिक्त राहील. व यानंतरचा जो विषय आहे श्री. डोईफोडे यांच्या बाबतचा ते शाखा अभियंता आहेत त्यांचा कार्यभार दुसरा कुणालाही दिला जावू शकतो. तो प्रस्ताव आम्ही मान्य करणार नाही. मी आमचे सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी

यांना विनंती करेन की, श्री. कोतकर यांच्या जागी जोपर्यंत दुसरा कुणी येत नाही तोपर्यंत एकास कायम ठेवू. बाकी यानंतरचा जो प्रस्ताव आहे तो आम्ही मान्य करणार नाही. व या अगोदर व या नंतर ज्यांना पण महासभा परत पाठवेल त्या ठरावाची कार्यवाही झाली पाहिजे. श्री. कोतकर साहेबांना एक वर्षासाठी आम्ही ठेवू इच्छितो त्यास सर्वांनी संमती दयावी. एक वर्षाच्या आत जर त्यांच्या जागी दुसरा कुणी उपविभागीय अधिकारी आला तर श्री. कोतकर यांना कार्यमुक्त करून पाठविले जाईल. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-एक वर्ष जानेवारी पासुन मोजले जाईल की आजपासुन?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-श्री. कोतकरांना ठेवायचे आहे?

काही सदस्य :-होय.

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १४:- पुर्वीचा दिनांक २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८१ रदद करून श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

अधिक्षक अभियंता, मजीप्रा ठाणे जा. क्र. मजीप्रा/ठाणे/आस्था/१/१६८/२००१ दि. १०/१/२००१ अन्वये श्री.अे. पी. कोतकर, शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीवर एक वर्षाच्या कालावधीकरिता ते दि. २१.३.०१ रोजी महापालिका सेवेत हजर झालेले आहेत.

श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २०.३.०२ रोजी संपुष्टात आला आहे. सदर प्रकरणी दि. २६.१२.०२ रोजीच्या महासभेत मुदत वाढीचा प्रस्ताव प्रस्तावीत केला होता. परंतु महासभा ठराव क्रमांक ८१ दिनांक २६.१२.२००२ अन्वये तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याकारणाने त्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही. तरी दिनांक २६.१२.२००२ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ८१ रदद करून त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी यापुढेही एक वर्षानी वाढवणे बाबतचा प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र. ३६ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार पूर्वीचा दि. २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८१ रदद करून वरील प्रस्तावनेनुसार श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र१५:- पुर्वीचा दिनांक २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८० रद्द करून श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-श्री. डोईफोडेंचे काय करायचे?

काही सदस्य :-परत पाठवा, लवकर पाठवा.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः- परत पाठवा.

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :- कृपया शांतता राखा.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-४ व ५ नंबरचे जे उप अभियंता आहेत ते नविन आहेत त्यांना माहिती कमी आहे. तर माझा एक सुझाव होता की, एक वर्षासाठी श्री. डोईफोडे यांना ठेवले जावे. नाहीतर काय आहे की पाण्याची जास्तीत जास्त समस्या कॅम्प ४ व ५ मध्ये आहे.

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी) :-सचिव साहेब मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-महापौर महोदया, आयुक्त साहेब याविषयावर मला काही बोलायचे आहे. श्री. बच्चाराम यांनी जे म्हंटले मागच्यावर्षी जो प्रस्ताव आणला होता श्री. डोईफोडे व श्री. कोतकर यांना परत पाठविण्यास त्यांनी संमती दर्शविली नव्हती असे त्यांचे म्हणणे आहे. दुसरी गोष्ट उल्हासनगर ४ व ५ मध्ये इतकी मोठी समस्या आहे की जेव्हा नगरसेवक लोक पाणी पुरवठा विभागाचे कार्यालयात जातात तेव्हा तिथे कोणताही सक्षम असा अधिकारी नसतो म्हणुन आताच्या या संकट काळात येथील अनुभवी अधिकारी परत पाठविणे बरोबर नाही जोपर्यंत त्यांच्या जागी पर्यायी अधिकारी येत नाही. तोपर्यंत त्यांना परत पाठवणे हे योग्य नाही. असलेली समस्या आणखी वाढविण्यास ते एक कारण होवू शकते. म्हणुन आम्ही आयुक्त साहेबांना विनंती करतो की त्यांना परत पाठविणे योग्य होईल किंवा नाही तसेच श्री. डोईफोडे यांची आवश्यकता आहे कींवा नाही? याबाबत आपण सांगाल तर आम्ही त्यावर निर्णय घेवू.

मा. सदस्य श्री. नाना पवारः-मा. महापौरजी, मी सभागृहास एक विंनती करतो की, सभागृह जो निर्णय घेतो कुठल्याही विषयावर तर त्या निर्णयाचा प्रशासनाने सन्मान ठेवला पाहिजे. महासभा कधी कधी निर्णय घेते की, प्रतिनियुक्तीवर जे लोक आले आहेत त्यांना परत पाठवा व त्यानंतर पुन्हा महासभेत विषय येतो की, तो प्रस्ताव रद्द करून त्यांना ठेवले जावे तर हे बरोबर वाटत नाही. राहिली गोष्ट श्री. डोईफोडे यांची तर श्री. डोईफोडे बाबत मला वाटते ही तिसरी सभा आहे प्रत्येक सदस्य त्यांच्याबाबतीत नाराज आहेत. व सभागृहात कुण्या अधिका-यावर सदस्य नाराज होतात अशा सदस्याकडुन पुन्हा सभागृहात शिफारस येते तर ती चांगली गोष्ट नाही. सभागृहात मोठ्या प्रमाणावर कुण्या अधिका-याविषयी सदस्य नाराज असतील तर त्या अधिका-याने परत गेलेच पाहिजे. हे मत मी व्यक्त करतो.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. महापौरजी, बोलु शकतो का?

मा. पिठसीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):- त्यावेळेस आपणांस उशिर झाला होता.
मा. सदस्य श्री. शांताराम निकमः- आता नाही झाला का?

मा. पिठसीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):- नाही-नाही , बोला- बोला, जोराने बोला.
मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- तर ठिक आहे, आपली परवानगी घ्यावी लागते ना? तर आता श्री. डोईफोडे यांच्याबाबतचा विषय चालू आहे. डोईफोडे हे एक हुशार अधिकारी आहेत. हुशार अभियंते आहेत. परंतु त्यांच्यामध्ये एक वाईट गोष्ट आहे, ते कुणाच्याही बरोबर चांगले वागत नाहीत. ते खुपच काम करतात परंतु जो जनसंपर्क आहे, तो त्यांनी, जनसंपर्क व्यवस्थित साधलेला नाही. दुसरी गोष्ट अशी की, सर्वजण म्हणतात की, जंवादे साहेब खुपच चांगले काम करतात. परंतु जर आम्ही श्री. डोईफोडे यांना पाठविले तर श्री. जवांदे यांचा एक हात जाईल. असे होऊ शकते. कॅम्प नं. ४ , ५ च्या विभागात खुपच पाण्याची टंचाई आहे. तेथे श्री. डोईफोडे अतिशय तळमळीने काम करीत आहेत. फक्त त्यांच्यामध्ये एकच वाईट गोष्ट आहे की, ते कुणाचेही ऐकुन घेत नाहीत. नगरसेवकांचेही ते ऐकुन घेत नाहीत. परंतु रात्री दोन-दोन वाजेपर्यंत त्यांनी काम केले आहे. काही जागी, नागसेन नगरचा जो विभाग आहे. त्याठिकाणी गेल्या पाच-सहा वर्षापासुन पाणी येत नव्हते. त्यांच्या प्रयत्नामुळे तेथे आता पाणी येवू लागले आहे. टॅकरची समस्या सुटली पाहिजे. त्यांचे म्हणणे आहे की आमच्या प्रभागात टॅकर आलाच नाही पाहिजे. आज ४०-४० टॅकर पाठविले जात आहेत. परंतु आमच्या प्रभागात दहा टॅकर सुध्दा ते देत नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की दहाच्या वरती टॅकर देणार नाही आपणांस नळाव्दारे पाणी दिले जाईल. तर असे हे जे सक्षम अधिकारी आहेत त्यांना इथे ठेवले पाहिजे. व इथे ही जी श्वेतपत्रिका आणली आहे. व असे सक्षम अधिकारी आम्ही जर पाठविले त्यांच्याबाबत पर्यायी अधिकारी जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यंत त्यांना इथे ठेवले जावेत. त्यांना पाठविले तर श्वेतपत्रिका कशी पुर्ण होईल. यांनी सांगितले की वर्षभरामध्ये काही जलवाहिन्या टाकायच्या आहेत. आता म्हाडाचे काही प्रस्ताव आहेत ज्यांची प्राकलने श्री. डोईफोडे यांनी तयार केली होती. नविन माणुस आला तर त्याला समजणार नाही. यासाठी मी सर्वांना अनुरोध करेन की, आमचे जे नाराज नगरसेवक आहेत त्यांना सुध्दा अनुरोध करेन की श्री. डोईफोडे यांना यावर्षी राहु दिले जावे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-मा महापौरजी, ज्या अधिका-यास जनतेशी बातचित करण्याची पध्दत नाही. त्या अधिका-याला एक सेकंद सुध्दा येथे राहण्याचा अधिकार नाही. हा अधिकारी एका प्रभागात ४० टॅकर पाठवतो तर एका प्रभागात दहा टॅकर पाठवतो. माझा १० नंबर प्रभाग कुर्ला कॅम्प विभाग येथे पाण्याची टंचाई नव्हती. श्री. डोईफोडे यांनी जाणीव पुर्वक त्या विभागातील पाणी पुरवठा बंद केला आहे. आयुक्त साहेबांनी स्वतः त्या विभागाची पहाणी केली आहे. तरीही ती समस्या सोडविलेली नाही. तर मेहरबानी करून श्री. डोईफोडे यांना परत पाठविले जावे. महासभेचा अपमान न करता श्री. डोईफोडे यांना परत पाठविले जावे.

**मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानी व डॉ. नीना नाथानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मला वाटते काही गोष्टी सभागृहासमोर स्पष्टपणे ठेवल्या पाहिजेत. कोणीही अधिकारी आहे. त्या अधिका-याच्या काम करण्याच्या पध्दतीमध्ये काही कमतरता काही चुका असु शकतात. परंतु कोणत्त्या अधिका-याला इथे ठेवायचे आहे कुणाला ठेवायचे नाही याची एकच निती असली पाहिजे आणि ती आहे त्या अधिका-याची कार्यक्षमता मी स्वतः हे मान्य करतो की त्यांच्याबाबत माझ्याकडे काही

नगरसेवकांच्या काही नागरिकांच्या तक्रारी आल्या आहेत की, त्यांचे नगरसेवकांशी, नागरिकांशी वागणे बरोबर नाही. तर त्याबाबत त्यांना समज दिली जाऊ शकते. ताकिद दिली जाऊ शकते. व त्यामध्ये सुधारणा आणली जाऊ शकते. परंतु एक कार्यक्षम अधिका-यास आपण जर परत पाठविले तर ..... मी माझा स्वत:चा अनुभव सांगतो की, रात्री २ वाजता एक तक्रार आली. रात्री २ वाजता फोन करुन त्यांना सांगितले की, अमुक-अमुक या ठिकाणी अशी अशी अडचण आहे आपण जा तर ते रात्री २ वाजता सुध्दा जातात. पहाटे ६ वाजता जातात, व मी ज्या डेडलाईनवरचे त्यांना काम सांगितले, त्यांनी त्या डेडलाईनवरचे काम पूर्ण केले आहे. प्रशासनाचा प्रमुख म्हणून माझे हे कर्तव्य ठरते की, अशा अधिका-यांच्या पाठीशी उभे राहणे. जर मी सभागृहासमोर ही सत्यस्थिती ठेवली नाही तर मी माझ्या कर्तव्यात कसूर केली आहे असे ठरेल. होऊ शकते आपणांस असे वाटत असेल की हा माणूस बरोबर काम करीत नाही, जनतेशी बरोबर वागत नाही, तर त्या सेक्शनमधुन त्यांना हटविले जाऊ शकते. किंवा त्यांना असे काम दिले जाऊ शकते की जिथे जनतेशी संपर्क नाही. मला पूर्णपणे खात्री आहे व जसे मा. सदस्य श्री. शांताराम निकम यांनी सांगितले की, त्यांच्या कार्यक्षमतेबाबत काही शंका नाही. व आपण अशा कार्यक्षम अधिका-याला सोडले तर बरोबर होणार नाही. म्हणुन माझी सभागृहास विनंती आहे. व खास करुन सत्ताधारी पक्षास विनंती करतो की, आपणांस असे वाटत असेल की, ते तेथे बरोबर काम करत नाहीत. तर मी तिथुन त्यांची बदली करेन. परंतु महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाची जी स्थिती आहे. ती पाहता असा कार्यक्षम अधिकारी येथे असणे आवश्यक आहे. आपण पुन्हा यावर विचार करावा. व हा प्रस्ताव मान्य करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> आयुक्त साहेबांच्या मताशी आम्ही सहमत आहोत. अशा अधिका-यास येथे ठेवले पाहिजे. एक वर्ष नाही दोन वर्ष ठेवले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब ही एक वस्तुस्थिती आहे जी आपण सांगितली. हे जे श्री. डोईफोडे साहेब, श्री. जवांदे साहेब आहेत ते दिवसाला २० तास काम करणारे अधिकारी आहेत. ते कार्यक्षम अधिकारी आहेत. व ज्या जलवाहिन्या आहेत त्यांची त्यांना पुर्ण माहिती आहे. माझा असा सुझाव आहे की, जोपर्यंत जलकुंभ पुर्ण होत नाहीत व त्या व्दारे पाणी पुरवठा सुरू होऊन पाणी पुरवठा नॉर्मल स्थितीत येत नाही तोपर्यंत या अधिका-यांना येथे ठेवले जावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे त्यांना येथे ठेवण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. कॉग्रेसचे सर्व सदस्य त्यांना ठेवण्याच्या बाजुने आहेत की अर्धे सदस्य त्यांना ठेवण्याच्या बाजुने आहेत? कॉग्रेसची भुमिका स्पष्ट होत नाही, दोनच लोक आहेत ना? मी पुन्हा पुन्हा विचारत आहे, श्री. ठाकुरदास बेहरानीजी आपण त्यांना येथे ठेवण्याच्या बाजुने आहात की नाही?
१९ + ३ = २२ + १ श्री. नारायण पंजाबी एकुण २३ मते .

<u>मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):-</u>कृपया दोन मिनिटासाठी शांत रहा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. प्रमोद टालेजी आपले मत? तटस्थ आहात. ?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौरजी, आपण प्रस्ताव मतदानास टाकल्यानंतर मतदान सुरू झाले...... जे त्यांना ठेवण्याच्या बाजुने आहेत कृपया त्यांनी हात वर करावेत. मतदान घेण्याची घाई आपण करता, हात वर करावयास लावता. पुढे काय?

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):-कृपया आपण शांत रहा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-सचिव साहेब, तुम्ही वेळ घालवत आहात.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे श्री. डोईफोडे यांना ठेवू इच्छित नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

न ठेवण्याच्या बाजुने ३३ मते.

१. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
२. श्री. वाघे शामु बाबु
३. श्री. ऐडके गणपत
४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
५. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
६. श्री. गुप्ता प्रभुनाथ
७. श्रीमती गुप्ता अनिता
८. श्री. पवार नाना आनंदा
९ श्रीमती. आहुजा नीता
१० श्री. रूपाणी चिमन अमरूमल
११ श्री. शांताराम निकम
१२ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१३ श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१४ श्रीमती. मसंद माया
१५ श्री. गायकवाड सुरेश
१६ श्रीमती. वनवारी मोना अशोक
१७ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८ श्री. जेसवानी सतरामदास
१९. श्री. लुंड गोविंदराम
२० श्रीमती. खिलनानी भावना
२१ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२२ श्री. पमनानी ईश्वर
२३ श्री. साधवानी मनोज
२४ श्री. होशियारसिंग लबाना
२५. श्री. ठाकुर नरेंदकुमार केवलराम
२६ श्री. तलरेजा विनोद
२७ डॉ. नाथानी निना
२८. श्री. जाधव सुरेश
२९. श्री. जाधव प्रशांत
३० श्री. टाले प्रमोद
३१. श्री. साधवानी मोहन
३२ श्रीमती. साधवानी जया
३३ श्री. नारायण पंजाबी

श्री. डोईफोडे यांना ठेवण्याच्या बाजुने २३ मते.

१. श्री. भालेराव गौतम
२. श्रीमती. वसिटा बेबी
३. श्री. ठाकुर अशोक
४. श्री. बेहरानी मोहन
५. श्री. बेहरानी ठाकुरदास

६ . श्रीमती. जावळे संगिता
७ . श्रीमती. मोकल सिमा चंदाराम
८ . श्री. उमाप रामदास
९ श्री. पुरस्वानी जमनादास
१० श्री. रूपचंदानी बच्चाराम
११ श्री. असरोंडकर राज
१२ . श्रीमती. कृष्णानी रेखा
१३ . श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
१४ .श्री. सोनावणे नथु
१५ श्री. गायकवाड दिलीप
१६ श्रीमती. बामणकर नंदिनी
१७ श्रीमती. माने किरण
१८ श्री. चव्हाण रमेश
१९ . श्री. बोडारे धनंजय
२० श्री. पाटील विश्वनाथ
२१ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२२ श्री. चौधरी राजेंद्र
२३ . श्रीमती. जयश्री. सुर्वे

ठिक आहे. पास?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-सचिव साहेब ३३ मते कशी मोजली?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कॉग्रेसचे दोन सदस्य समाविष्ट करून. मी पुन्हा मोजुन दाखवितो. एकुण ३२ होतात. एक कुणी तरी बाहेर गेला असेल. असे एकुण ३३ होतात.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम हे मतदानानंतर बाहेर गेले व परत सभागृहात आले.**

मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):-सदर प्रस्तावाबाबत बहुमताने खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय क्र१५:- पुर्वीचा दिनांक २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८० रद्द करून श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

अधिक्षक अभियंता, मजीप्रा ठाणे जा. क्र. मजीप्रा/ठाणे/आस्था/१/१६८/२००१ दि. १०/१/२००१अन्वये श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीवर एक वर्षाच्या कालावधीकरिता ते दि. २५. १.०१ रोजी महापालिका सेवेत हजर झालेले आहेत.

श्री.पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २४.१.०२ रोजी संपुष्टात आला आहे. सदर प्रकरणी दि. २६.१२.०२ रोजीच्या महासभेत मुदत वाढीचा प्रस्ताव प्रस्तावीत केला होता. परंतु महासभा ठराव क्रमांक ८० दिनांक २६.१२.२००२ अन्वये मुदत वाढीच्या प्रस्तावास मान्यता मिळाली नाही. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याकारणाने त्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही. तरी दिनांक

२६.१२.२००२ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ८० रद्द करून त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी यापुढेही एक वर्षानी वाढवणे बाबतचा प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ३७</u>                                   <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह १ वर्षाची मुदत वाढ देणेस मान्य करीत नाही आणि पूर्वीचा दि. २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८० प्रमाणे त्यांना महानगरपालिका सेवेतुन तावडतोब कार्यमुक्त करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १६:- मागासवर्गीय अनुशेष भरणे कामी महापालिकेच्या सेवेत विविध पदासाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारास नियुक्ती देणे बाबत.

मागासवर्गीय कर्मचा-यांची भरती करावयाची आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>ही जी १६ पदे भरली आहेत प्रशासनाने त्याची आम्हास माहिती दयावयास पाहिजे होती.

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):-</u> विषय क्र. १६ बाबत खुलासा करत आहे, महाराष्ट्र शासनाने अशासकीय कार्यालयामध्ये असलेला मागासवर्गीयांचा अनुषेश भरण्यासाठी ३० जुन ही शेवटची तारीख निश्चित करून दिली आहे. त्यानुसार आपल्या महापालिकेत मागासवर्गीयांच्या अनुशेषाबाबतची जी पदे रिक्त आहेत. त्याचे बाबत आम्ही अनुशेष काढला त्यानुसार सेवायोजन कार्यालयातुन आम्ही उमेदवारांची यादी मागविली. त्यानंतर २,३,४ तारखेस मुलाखती घेतल्या भरतीची ही जी कार्यवाही आहे. त्यामध्ये महासभेला कळविणे आवश्यक आहे. वैयक्तिक स्वरूपाची माहिती सन्माननिय सदस्यांना कळविणे आवश्यक नाही. परंतु जी नेमणुक केली जाते. तिला महासभेची अंतिम मंजुरी घेणे आवश्यक आहे म्हणुन हा ठराव आपल्या समोर ठेवला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>एकुण किती पदे आहेत? किती पदे आपण भरली आहेत?

श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):-सांगतो मी ते आपणांस संवर्ग ३ मध्ये १११ पदे आहेत. संवर्ग २ मध्ये ६५ पदे आहेत. एकुण १७६ पदे आहेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,आमच्या आस्थापना सूचीनुसार जेवढी काही मंजुर पदे आहेत त्या मंजुर पदांनुसार प्रत्येक संवर्गात काही टक्के अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय इत्त्यादींसाठी आरक्षित आहेत. आमच्या आस्थापना सूचीमध्ये जेवढी काही मंजुर पदे आहेत. त्यातील संवर्ग ३ मध्ये हा अनुशेष १५८ पदांचा आहे. व संवर्ग ४ मध्ये अनुशेष ३०८ पदांचा आहे. हा सर्व अनुशेष भरण्यासाठी राज्य सरकार दरवर्षी विशेष सूचना देते. व या सूचना १९८९ पासुन सुरू असून आजपर्यंत कधीच हा अनुशेष पुर्णपणे भरण्यात आला नाही. मागच्यावर्षी नॅशनल कमिशन ऑफ शेडयुल कास्ट ॲन्ड शेडयुल ट्राईब चा जो अहवाल आहे. त्यामध्ये राज्य सरकारने जो अनुशेष भरलेला नाही. महाराष्ट्र शासना अंतर्गतच्या विविध कार्यालयानी जो अनुशेष भरलेला नाही. त्याबाबत गंभीर स्वरूपाचा आक्षेप घेतला आहे. व महाराष्ट्र शासनास निर्देश दिले आहेत की, त्यांच्या अंतर्गत जेवढी काही कार्यालये आहेत त्यासर्व कार्यालयामध्ये अनुशेष भरला पाहिजे. त्यानुसार आम्हास प्रथम जी वेळ दिली होती ती ३१ डिसेंबरची होती. त्यानंतर देखिल वेळ वाढविण्यात आली. व ३१ मार्च पर्यंतची वेळ देण्यात आली. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठामध्ये एक याचिका दाखल झाली व त्यामुळे काही वेळेपर्यंत भरतीमध्ये स्थगिती आली होती. ती स्थगिती असल्यामुळे आता ३० जुनची अंतिम वेळ निश्चित करण्यात आली. ती सर्व कार्यालयासाठी देण्यात आली आहे. ३० जूनच्या आत हा सर्व अनुशेष भरला पाहिजे. आमच्याकडे जी १५८ पदे आहेत. त्यापैकी १११ पदे अशी आहेत की ज्यांचा अनुशेष त्वरीत भरला जावु शकता. तो अनुशेष भरण्यासाठी आम्ही सेवायोजन कार्यालय व ट्रायबल वेलफेअर ऑफीसर यांचे कार्यालयाकडुन यादी मागिवली होती. व आमच्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये जी निवड समिती अपेक्षित आहे ती निवड समिती नेमुन या उमेदवारांची निवड केली आहे. व ती निवड केल्यानंतर ही यादी आपल्या समोर ठेवली आहे कारण की, कलम ५३ नुसार सक्षम प्राधिकरणाची मंजुरी त्यास लागते. हा जो अनुशेष आहे तो भरण्यासाठी पहिल्या टप्पात १११ पदांसाठी आम्ही यादी मागविली होती. त्यामधील संवर्ग ३ मधील अनुशेष १११ पेक्षा कमी असेल. ३७ पदे आम्ही भरू शकतो त्याचे कारण असे की, आमच्याकडे जी रिक्त पदे आहेत ती कमी आहेत. मंजुर पदे जी आहेत त्यामध्ये खुल्या प्रवर्गामधील काही लोक काम करत आहेत. व ४७ पदे आम्ही आता भरू शकत नाही त्याचे कारण हे आहे की, पदे रिक्त नाहीत. तसेच जकातीचे खाजगीकरण झाल्यामुळे कर्मचा-यांची जी आवश्यकता आहे ती कमी झाली. परंतु संवर्ग ३ मधील १५८ पदांचा जो अनुशेष आहे त्यामधील १११ पदे आम्ही भरू शकतो. संवर्ग ४ मधील ३०८ पदांचा जो अनुशेष आहे तो भरण्याचे आम्ही प्रयत्न केले. त्यापैकी ८५ आम्हाला मिळु शकतात. २२३ पदे अशी आहेत. की त्यांच्यावर दुसरे लोक काम करत आहेत. मंजुर पदांपेक्षा जास्त लोक काम करत आहेत. म्हणुन २२३ पदांवर आम्ही भरती करत नाही. फक्त ८५ पदे भरून आम्ही अनुशेष कमी करत आहोत. संवर्ग ३ मधील अनुशेष पदोन्नतीनेही भरावयाचा आहे. ती ५५ पदे आहेत. या ५५ पदांमध्ये जेवढे काही लायक उमेदवार मिळतील. निम्नस्तरावर जेथे सुध्दा लायक असे उमेदवार मिळतील. त्यांच्याही पदोन्नतीचा प्रस्ताव आम्ही सभागृहासमोर आणला आहे. कारण की आमच्यावर ते बंधनकारक ठरले आहे. जो विभाग, अधिकारी अनुशेष भरणार नाही. त्यांच्याविरूध्द राज्य सरकार सक्त कारवाई करेल. असे शासन निर्णयामध्ये नमुद केले आहे. संवर्ग ४ मध्ये पदोन्नतीने एका जागेचा अनुशेष शिल्लक आहे. एकुण अनुशेष भरण्याचा जो कालावधी आहे त्यानुसार आम्ही हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. बाकी पदे भरण्यासाठी जुनच्या शेवटच्या आठवडयामध्ये आम्ही मुलाखती ठेवल्या आहेत. त्याबाबतचा प्रस्ताव घेवून आम्ही जुलै महिन्यामध्ये आपल्यासमोर येवू. परंतु अनुशेष भरण्याचा

जो कालावधी आहे. त्यानुसार हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. त्यास मंजुरी देण्याची मी आपणांस विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या विषयासंदर्भात मी आपणांस एक पत्र दिले होते की ही जी भरती आपण केली आहे. जी अनुशेषाबाबतची आहे. तुम्ही असताना हा अनुशेष भरून निघतो आहे. याबाबत आम्हाला ही खुप आनंद झाला आहे. परंतु थोडीशी शंका अशी होती की, स्थानिक रहिवाश्यांना या भरतीमध्ये प्राधान्य दयायला पाहिजे होते. ते प्राधान्य न देता बाहेरच्या लोकांना येथे रोजी रोटी देण्यात आली आहे. ती देवू नये असे आमचे म्हणणे होते. तर येथुन पुढे भरती करताना आपल्याकडे या शहरामध्ये सर्व संवर्गाचे उमेदवार जसे पाहिजेत तसे मिळु शकले असते. माझी विनंती आहे की या विषयावर आयुक्त साहेबांनी यामध्ये थोडेसे लक्ष घालुन यापुढे इथुन पुढच्या भरतीमध्ये अथवा निवडीमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य दयावे. अशी मी विनंती करतो. नाशिकला अशा प्रकारचा ठराव सुध्दा मंजुर करण्यात आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सन्माननिय महापौरजी, ही भरती कायदयाच्या तरतुदी अनुसार व शासनाच्या जीआर. अनुसार केली असली तरी पब्लिक गॅलरीमध्ये चर्चा आहे की, या भरतीमध्ये काही तरी भ्रष्टाचार झालेला आहे. याची पण चौकशी व्हावी.दुसरी गोष्ट अशी की हा अनुशेष भरताना महापालिकेमध्ये सध्या कार्यरत असलेले कर्मचारी सुध्दा या अनुशेषामध्ये भरले गेले पाहिजे होते. त्यांनाही पदोन्नती दिली पाहिजे होती. ती दिली गेली नाही याची कारण काय?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जर सभागृह नेता व विरोधी पक्षनेता यांचे बोलणे पुर्ण झाले असेल तर मी सुध्दा काही बोलु इच्छितो. मा. महापौर महोदया, सर्वात प्रथम सदनातील सदस्य श्री. रामदास उमाप यांनी जे म्हंटले आहे त्याबददल मी सांगु इच्छितो की जी भरती होते त्यामध्ये स्थानिक उमेदवारांना संधी मिळावी यासाठीच जिल्हा पातळीवर सेवायोजन कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. आम्ही जी यादी मागविली आहे ती ठाणे येथील सेवायोजन कार्यालयातुन मागविली आहे. किंवा ट्रायबल वेलफेअर ऑफीसर ठाणे जिल्हा यांच्याकडुन मागविली आहे. उल्हासनगरमधील कुठल्याही बेरोजगार युवकाचे नाव जर या यादीमध्ये येत असेल व तो जर आमच्या भरतीची शैक्षणिक पात्रता धारण करत असेल तर त्यास प्राधान्य दिले जावू शकते. परंतु सेवायोजन कार्यालयामध्ये ज्याचे नाव नोंदणी झालेली नाही तो व्यक्ती भले स्थानिक रहिवाशी असो त्याचा विचार केला जावू शकत नाही. ही भरती पुर्णपणे मोकळया पध्दतीने झाली आहे. जर सदनास असे वाटत असेल की यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे तर मी तर सदनास विनंती करेन की यावर आपण आपल्यामधुन एक समिती स्थापन करा. प्रत्येक जो उमेदवार आम्ही निवडला आहे त्याची मुलाखत नंतर आपण घ्या. त्यास विचारा आपण कुणास पैसे दिले आहेत का? किंवा आपली निवड कुणाच्या वशील्याने झाली आहे का? विचारा. आपणांस माहित पडेलच आम्ही निवड केली आहे. असा कुणीही व्यक्ती जर बोलत असेल की आम्ही कुणाला पैसे दिले आहे तर त्वरीत त्याच्याविरूध्द कायदेशिर कारवाई करेन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>आयुक्त साहेब, भ्रष्टाचार कुठे झाला हे त्यांनी सांगितलेले नाही. आता त्याचे उदाहरण दयायचे झाले तर जसे सभागृह नेता व विरोधी पक्षनेता या दोघांनी सांगितले की भ्रष्टाचार झाला आहे त्याची चौकशी व्हावी. भ्रष्टाचार महापालिका स्तरावर झाला की, सेवायोजन कार्यालय स्तरावर झाला. कुठे झाला हे महत्त्वाचे आहे. आणि त्यांनी केला असेल भ्रष्टाचार तर आम्ही त्याला मान्यता देतो? त्याचे उदाहरण म्हणजे आमच्याकडिल भरतीमध्ये एखादया पदाची पात्रता १२ वी सायन्स असेल तर सेवायोजन कार्यालयाने १२वी सायन्सचे उमेदवार न पाठविता. दुस-या कुठल्या शाखेतला पाठविला आहे. असे तुम्ही दिले

आहे का लिहुन? १२ वी सायन्स ऐवजी, १२ वी कॉमर्स, १२वी आर्टसचे उमेदवार पाठविले आणि ते आपण घेतलेले आहेत. १२ वी सायन्सवाले सेवायोजन कार्यालयामध्ये उमेदवार नव्हते का? पदे किती होती? म्हणजे १२ वी सायन्सचे उमेदवार असतानाही त्यांनी आर्टस् आणि कॉमर्स चे उमेदवार जे तुम्ही मागितले नव्हते ते त्यांनी पाठविले. आणि त्यांनी पाठविले ते आपण स्विकृत करतो. आणि पुन्हा शैक्षणिक पात्रता शिथील करण्यासाठी येथे प्रस्ताव आणतो. म्हणजे त्यांनी केला असेल भ्रष्टाचार, केला असेल नसेल देवाला माहित. परंतु जर केला असेल तर आपण त्याला खतपाणी घालतो. त्यापेक्षा सरळ १२ वी सायन्स ही आमची अट आहे. त्यानुसार पहिल्या यादीमध्ये उमेदवार आले नसतील तर दुस-या यादीमध्ये पाठवा. परंतु ही जी कॉमर्स आणि आर्टसचे उमेदवार आहेत ते आम्ही घेणार नाही. सेवायोजन कार्यालय म्हणजे काही देवाने निर्माण केलेले नाही. तेथे सुध्दा लोकच आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार हा महापालिकेमध्ये झालेला नसेल तरी सेवायोजन कार्यालयाकडुन झालाच नसेल हे तुम्ही खात्रीपुर्वक सांगु शकत नाही. तर ती जी अट शिथील करण्याची परिस्थिती आहे ती शक्य तो तुम्ही टाळा. ज्यामध्ये संशयास्पद असे वातावरण आहे. संशय येतो आहे की १२ वी सायन्सचे उमेदवार असताना सुध्दा त्यांनी सायन्सचे उमेदवार न पाठविता, कला आणि वाणिज्य शाखेतील उमेदवार पाठविले असतील आणि आमची मागणी होती सायन्स मधील तर त्यांनी का पाठविले नाहीत याची चौकशी करणे गरजेचे आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त):-</u>मा. महापौर महोदया, आणि सन्माननिय सदन सेवायोजन कार्यालयात प्रकल्प अधिकारी म्हणुन जो अधिकारी बसतो त्यांच्यावर जबाबदारी असते की बेरोजगार जे विद्यार्थी आहेत त्यांना एक ना एक कॉल दयायचाच आहे. जोपर्यंत त्याची वयोमर्यादा आहे ३० किंवा ३५ वयाची तोपर्यंत त्यास कॉल दयायचा आहे. असे बरेचसे विद्यार्थी आहेत की ज्यांना पुढल्यावर्षी ३५ वर्षे वयाची मर्यादा पुर्ण होणार आहे. त्यांना आजपर्यंत एक सुध्दा कॉल दिलेला नाही. म्हणुन सेवायोजन कार्यालय जेष्ठतेनुसार कॉल देते. महानगरपालिकेने कॉल मागविताना १२ वी सायन्सचे उमेदवार कॉम्प्युटर ऑपरेटरसाठी मागविले होते. त्याठिकाणी १२ सायन्सपेक्षा जास्त पात्रतेचे म्हणजे बी.ए, एम.ए चे उमेदवार मिळत आहेत. संगणक हाताळणी प्रशिक्षण पुर्ण केलेले उमेदवार मिळत आहेत. तर आम्ही एक प्रस्ताव आपणांसमोर हा पण आणला आहे की, संगणक चालकासाठी पात्रतेमध्ये १२ वी सायन्स लिहिले आहे परंतु दुस-या शाखेचा जर पदवीधर मिळत असेल तर तो का घेतला जावू नये. म्हणुन सेवा भरतीच्या नियमामध्ये असा बदल करण्याचा प्रस्ताव सुध्दा आणला होता हे प्रशासनास माहित होते. व ती गोष्ट लक्षात घेता निवड समितीने फेर आणि प्रत्यक्ष निवड केली आहे. त्यामध्ये मला वाटते की काही चुकीचे नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>पात्रता ठरविताना त्यामध्ये काही निकष असतात. कुठल्याही शाखेचा उमेदवार कुठेही पाठविला तर चालणार नाही. डॉक्टर पेशा असलेल्या ठिकाणी डॉक्टरसाठी आपण कॉल लेटर काढले आहेत तेथे इंजिनिअर माणुस पाठविला तर चालेल का? तो तेथे पाना घेवून जाईल आणि पेशंट मरेल. म्हणुन सायन्सही अर्हता ठेवली आहे त्यामागे काही तरी कारण असेल. नाही तर ग्रॅज्युएट किंवा पोस्ट ग्रॅज्युएट असा प्रस्ताव त्यावेळी पाहिजे होता, इतर कोणत्याही शाखेतील १२वी उतीर्ण असा असावा. हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u> उल्हासनगर मध्ये राहणा-या लोकांचा विषय निघाला स्थानिक लोकांना प्राधान्य मिळाले पाहिजे. त्याबाबत आपण उत्तर दिले की आम्ही सेवायोजन कार्यालयातून नावे मागविली. तर स्वाभाविकच आहे की, आपण सेवायोजन कार्यालयातून नावे मागविता तर ती त्यांच्याकडील यादी तर होऊ शकते त्यांच्या स्तरावर भ्रष्टाचार होऊ शकतो. त्यांनी अशा लोकांची यादी पाठविली असेल की जे उल्हासनगरच्या बाहेर राहणारे असतील. किंवा उल्हासनगर मध्ये राहून सुध्दा त्यांना कॉल लेटर मिळाले नसेल. यास्तव माझी अशी सूचना आहे की, भलेही आपण सेवायोजन कार्यालयातून यादी मागवा. यापुढच्या

भरतीसाठी परंतु स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली पाहिजे आणि त्यामध्ये अशी एक अट असली पाहिजे की त्याने ठाणे येथील सेवायोजन कार्यालयामध्ये नाव नोंदणी केलेली असली पाहिजे. तर त्यानुसार आपणांस हा एक फायदा होईल की आपण केवळ त्यांच्या यादीवर विसंबुन न राहता. स्थानिक स्तरावर उल्हासनगरमध्ये राहणारे जे लोक आहेत ते सुध्दा अर्ज करू शकतील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौरजी, उपायुक्त भडकवाड साहेब आपल्याला सेवायोजन कार्यालयाबददल सांगतो. सेवायोजन कार्यालयाकडुन एकेका व्यक्तीला दहा दहा कॉल येतात. पाहिजे तर त्याची झेरॉक्स मी तुम्हांला दाखवितो. एकेक माणसाला दहा दहा कॉल येतात आणि ते कसे येतात का येतात ते मी तुम्हाला दाखवितो. तिथे २००० रूपये जो देईल. त्याचा पहिला कॉल येतो. आपण त्यांची बाजु पण नका इथे मांडु.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, आता हा जो मुददा याठिकाणी उपस्थित केलेला आहे. भ्रष्टाचारच्या बाबतीत, आमच्या सन्माननिय सदस्यांनी परिस्थिती आपल्यापुढे ठेवली आहे. भ्रष्टाचार झालाच नसेल असे आपणांस म्हणता येणार नाही. जरी इथे झाला नसेल तरी तो सेवायोजन कार्यालयामध्ये होवू शकतो. कारण माझ्या माहिती प्रमाणे त्याठिकाणी कॉलचे कमीत कमी ५०० ते ५००० रू पर्यंत कॉलचे घेतले जातात. आणि आपण जी यादी मागवतो ती वेळेवर येत नाही. त्याचे कारण हे असते की ते कर्मचारी वाट बघत बसतात. कुणी तरी पैसे घेवून येईल. आणि मग यादीमध्ये नावे टाकली जातील. मा. आयुक्त साहेब, दुसरी गोष्ट अशी की, १२ वी सायन्सचे उमेदवार पाहिजे होते त्याठिकाणी सायन्सचे उमेदवार भरले पाहिजेत. उदाहरणार्थ सांगायचे झाले तर डी.एड च्या जर आपणांस जागा भरायच्या असतील आणि त्याठिकाणी जर आमच्या श्री. भडकवाड साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे जर बी.एड चा उमेदवार आला तर तो जास्त शिकलेला आहे. तर त्याठिकाणी आपण त्याला घेवू शकत नाही. आणि त्याचे दोन प्रकारे आपण नुकसान करतो. तो बी.एडचा उमेदवार कुठेतरी अधिकारी म्हणुन जावू शकतो. याठिकाणी तुम्हाला त्याला कॉम्प्युटरवर बसवावा लागेल त्याच्यावर अन्याय करू नका. सायन्सचे उमेदवार आहेत ज्याप्रमाणे आपण पात्रता मागविलेली आहे. त्याच प्रकारचे उमेदवार येथे घेतले पाहिजे. त्यासाठी पुन्हा मुलाखत घेतली पाहिजे. अशी मी विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता १६ व्या क्रमांकाच्या विषयावर जी चर्चा चालु आहे. त्याबाबत सर्व सदस्यांनी जे विचार मांडले. त्यानंतर याविषयावर सविस्तर चर्चा करण्याकामी मी आयुक्त साहेबांना सांगितले होते. त्यांनी सांगितले की ज्या नेमणुका उशिरा झाल्या आहेत. त्या डिसेंबर मध्ये व्हावयास पाहिजे होते त्यानंतर मार्चमध्ये व्हावयास पाहिजे होत्त्या. त्या न होता आता त्या जुनमध्ये होत आहेत. महाराष्ट्र शासनाचे असे आदेश आहेत की अनुशेषाबाबतच्या नेमणुका झाल्या पाहिजेत. मला वाटते की या नेमणुका उशिरा होत आहेत. व आमचे विरोधी पक्ष नेता श्री. राजेंद्र चौधरी यांनी जो मुददा उपस्थित केला ती गोष्ट मी सुध्दा ऐकली आहे. त्यासाठी मी त्यांना सांगितले की आपण सुचक व्हा मी अनुमोदक होतो. नेमणुकांमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. त्याची चौकशी झाली पाहिजे. त्यामध्ये जर कुणी सहभागी असेल तर त्याच्यावर कायदयाच्या चौकटीत कारवाई झाली पाहिजे. व या नेमणुका ज्या उशिरा होत आहेत त्याबाबत जो जबाबदार असेल त्याच्यावरही कारवाई झाली पाहिजे. ही जी १६ पदे आहेत. महाराष्ट्र शासनाचे आपणांस असे आदेश आहेत की, ३० जून पर्यंत अनुशेषाच्या नेमणुका झाल्याच पाहिजेत. तर माझी सभागृहास विनंती आहे की, जसे श्री. शांताराम निकम यांनी म्हंटले की पुन्हा मुलाखती घ्याव्यात तर मुलाखती घेण्यामध्ये बरीच वेळ जाईल. म्हणुन ज्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. त्यांना मंजुरी दिली पाहिजे. जेव्हा अनुकंपा तत्त्वावर नेमणुका व्हायच्या आहेत असे मला समजले तेव्हा मी पत्र दिले असता. मला उपायुक्त मुख्यालय यांच्याकडुन पत्र पाठवुन उत्तर देण्यात आले की, यामध्ये आपला काही वास्ता नाही. आम्ही

नेमणुका करू शकतो. आज जर आमचा वास्ता नाही तर आज हा मुददा महासभेसमोर कसा आला? तर ती गोष्ट त्याच वेळेला माझ्या कानावर आली होती. म्हणुन मी पत्र दिले होते तर मला चुकीची माहिती देणारे पत्र देण्यात आले. मला उपायुक्त मुख्यालय यांच्याकडुन पत्र पाठवुन उत्तर देण्यात आले की, यामध्ये आपला काही वास्ता नाही. आम्ही नेमणुका करू शकतो. आज सुध्दा यांनी मंचावर येवून जे उत्तर दिले. ते उत्तर उपायुक्त मुख्यालय यांनी दयावयास पाहिजे होते. परंतु यांनी मंचावर येवून उत्तर दिले. तर मी या गोष्टीशी सहमत आहे की आम्ही विचारले होते, आमचे जेवढे सदस्य आहेत, जेवढे गटनेते आहेत त्यांना हे माहित व्हावयास पाहिजे होते तसेच आयुक्त साहेबांनी जेवढी काही आश्वासने दिली की, ८५ पदे भरू, अमुक ऐवढी पदे भरू, आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी योग्य त्या पध्दतीने जसे नेमणुका व्हायच्या अगोदर मी एक पत्र लिहिले होते किती लोकांच्या नेमणुका केल्या आहेत. हे म्हणतात की आम्ही वर्तमानपत्रामध्ये बातमी दिली आहे परंतु कमीत कमी आम्हाला सांगितले असते तर आम्ही आमच्या प्रभागात सांगितले असते की, जे जे लोक या पदांसाठी इंटरेस्टेड आहेत. किंवा ज्यांनी सेवायोजन कार्यालयामध्ये नाव नोंदविले आहे. त्यांनी आपले कॉल घेवून यावेत जसे श्री राजेंद्र चौधरी यांनी सांगितले की तेथे कुणालाही २००० रू. दिले की कॉल लेटर मिळते. तर आम्ही सुध्दा त्यामध्ये इंटरेस्ट घेतला असता. आम्ही आमच्या प्रभागवासियांना बोललो असतो. की ज्यांनी सेवायोजन कार्यालयात नाव नोंदविले आहे त्यांनी तेथे जावुन कॉल लेटर घेवून यावे. आम्हाला चुकीची माहिती देवून कुण्याही सदस्यांला माहिती न देता. तसेच मला लेखी उत्तर पाठविले की अनुकंपा पध्दतीतील भरतीमध्ये आपला काही वास्ता नाही. हे अतिशय चुकीचे आहे. आता हा जो विषय आहे तो मंजुर केला जावा यानंतर सर्व गटनेत्त्यांना, सत्ताधारी पक्षाच्या, विरोधी पक्षाच्या, गटनेत्त्यांना,विश्वासात घेवून किवा ७६ नगरसेवकांना पत्र पाठविले पाहिजे. जसे वर्तमानपत्रामध्ये छापले जाते. त्याप्रमाणे नगरसेवकांना पत्र देवू शकतात की, या तारखेपासुन या तारखेपर्यंत भरती आहे. आपण आपल्या प्रभागातील लोकांनाही याबाबत सांगु शकता. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सेवायोजन कार्यालयावर आता जी चर्चा झाली आहे. म्हणजे त्यांनी पाठविलेले उमेदवार १०० टक्के बरोबर आहेत. आणि खात्रीशिर आहेत. यामध्ये संशय निर्माण झालेला आहे. त्याची कारणे आहेत आणि दुस-या बाजुला, याचाही विचार व्हावा, १९९६ साली नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर याठिकाणी नोकर भरती झाली. लोकांना स्थायी अस्थायी पदावर भरती करण्यात आले.आणि सहा महिन्यानंतर किंवा त्यानंतर त्यांना थोडा ब्रेक देवून त्यावेळी आयुक्तांनी असे उत्तर दिले होते की, नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर आस्थापना सूची मंजुरीसाठी पाठविलेली आहे ती मंजुर होईल या अपेक्षेने पाठविले होते. परंतु ती मंजुरी होण्यासाठी वेळ लागणार आहे. ती जोपर्यंत मंजुर होत नाही. तोपर्यंत भरती करण्याचे आयुक्तांना अधिकार नाहीत. भविष्यात जेव्हा कधी आस्थापना सूची मंजुर झाल्यांनतर, (श्री. भडकवाड साहेब याबाबतचे पत्र तुमच्याकडे असेल)जेव्हा भरती होईल तेव्हा तुम्हा लोकांना प्राधान्य देण्यात येईल. तेव्हा माझी एक सूचना आहे की, आपण सेवायोजन कार्यालयावर विसंबून राहण्याऐवजी त्यावेळी जी भरती केली होती व त्यांना आपण जे पत्र दिले आहे. आयुक्तांनी एक पत्र दिले आहे ते दुस-या आयुक्तांनी स्विकारले पाहिजे. एक आयुक्त बदलला म्हणजे कायदा बदलला असे नाही. एका आयुक्तांनी म्हणजे प्रशासनाच्या एका अधिका-याने दिलेले पत्र हे शेवट पर्यंत लागु असते. तर ते त्यांचे आयुक्तांनी जे पत्र दिले आहे त्यानुसार त्यांना प्राधान्य देण्यात यावे. त्यानुसार काही लोक आपल्याकडे आहेत परंतु ते अस्थायी पदावर आहेत. ते अजुन टेंपररी आहेत ते अजुन कायम नाहीत. तर त्यांनाही कायम करून त्या त्या संवर्गामध्ये घेण्यात यावे. एका आयुक्तांनी दिलेले पत्र दुस-या आयुक्तांनी ग्राहय धरून त्यावर विचार करून त्यांना प्राधान्य देण्यात यावे.असा याठिकाणी ठराव करण्यात यावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आयुक्त साहेब, अनुशेष भरण्यामध्ये येथील कर्मचा-यांचा विचार व्हावयास पाहिजे होता. तो का केला गेला नाही?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-आयुक्त साहेब ही भावना आहे सर्वांची.
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, अनुशेष भरती करताना या महानगरपालिकेतील कर्मचा-यांचा विचार करण्यांत यावा. असे येथे सांगण्यात आले. अनुशेष भरती करतेवेळी किंवा कोणतीही भरती करताना दोन पध्दतीने भरती केली जाते. एक सरळ सेवा प्रवेश आणि दुसरी पदोन्नती, जेव्हा पदोन्नतीने आम्ही अनुशेष भरण्याचा प्रयत्न करतो. आमच्या येथील जे कर्मचारी काम करतात त्यांच्यातुन भरती केली जाते. जेव्हा थेट भरती होते तेव्हा सेवायोजन कार्यालय व प्रकल्प अधिकारी ट्रायबल वेलफेअर ऑफीस यांच्याकडुन नावे मागवावी लागतात. राहिली गोष्ट अशा कर्मचा-यांची की ज्यांनी अगोदर येथे काम केले आहे परंतु त्यांच्या सेवा खंडीत केल्या आहेत. त्यांच्याबाबत व जसे आपण सांगितले, जसे पत्र दिले आहे की, भविष्यात जर भरती झाली तर या कर्मचा-यांचा विचार केला जावा. त्यांना प्राधान्य दिले जाईल असे जर त्यात लिहिले असेल त्याबाबत कोर्टात ज्याकाही केसेस असतील त्यांचा अभ्यास करून आपणांस सांगु.

**मा. सदस्या श्रीमती. भारती छाबिया, श्रीमती. सुजाता रिझवानी, श्रीमती. मारवीजा किरण, श्रीमती. बठीजा कोमल यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-ते लोक कोर्टात गेलेले नाहीत. परंतु त्यांना पत्र दिलेले आहे. त्यांचा विचार केला पाहिजे.

**मा. सदस्या श्रीमती. पंजाबी दिपा, श्रीमती. कारीरा रेखा, श्रीमती. कमला शर्मा, श्रीमती. ज्योती कालानी, श्रीमती. भावना रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी आपल्याशी सहमत आहे. व औद्योगिक कलह कायदयाचे कलम २५ नुसार जर कोणी व्यक्ती एखादया आस्थापनेवर काम करत असेल व नंतर त्यास काढुन टाकले जात असेल त्यानंतर जर पुन्हा भरती होत असेल तर ज्यांची भरती केली व कामावरून कमी केले त्यांची भरती केली पाहिजे. ही कायदेशिर तरतुद आहे औद्योगिक कलह कायदयाच्या कलमामध्ये तरतुद आहे. परंतु हे जे लोक भरती केले होते. व त्यांना नंतर जे काढुन टाकण्यात आले. त्यांची नेमणुक कशी झाली? काढुन कसे टाकले? याचा अभ्यास करून जर ते पात्र असतील तर त्यांना पण आम्ही प्राधान्य देवू.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-एका आयुक्तांने लिहुन दिले आहे की, भरतीच्या वेळी आपणांस प्राधान्य दिले जाईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास. सर्व संमतीने?

मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १६:- मागासवर्गीय अनुशेष भरणे कामी महापालिकेच्या सेवेत विविध पदासाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारास नियुक्ती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००२/१३०६/१६-ब दिनांक २६ मार्च,२००३ अन्वये मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दि.३० जुन, २००३ पर्यत मुदत दिलेली आहे. त्यानुसार मागासवर्गीयांचा सरळसेवाभरती मधील अनुशेष भरून काढणेसाठी

शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर तसेच विद्यार्थी रोजगार मार्गदर्शन व माहिती संचालनालय, मुंबई यांचेकडुन उमेदवारांची मागणी केली होती मागणीनुसार प्राप्त झालेल्या उमेदवारांना दिनांक ३,४ व ५ जुन रोजी मुलाखतीस बोलाविण्यात आले होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत करणेत आलेल्या निवड समितीमार्फत सदर उमेदवरांच्या मुलाखती घेवून पात्र उमेदवारांची निवड करून नियुक्तीबाबत शिफारस केलेली आहे सोबत पदनिहाय निवड झालेल्या उमेदवारांचा व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

पदाचे नांव :- **कनिष्ठ अभियंता (विद्युत)**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | हनुमंत आर. खरात | आरती अशोक लांमतुरे |
| अनु.जमाती | १ | दिनेश सोनाजी गावीत | महेंद्र व्ही धिडे |
| विमुक्त जाती – अ | १ | गणेश एम. माने | अविनाश वी. उमाळकर |

पदाचे नांव :- **कनिष्ठ अभियंता (सा.बां.विभाग )**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | राजू एन. शेलार | प्रविन टी. काळे. |
| अनु.जमाती | २ | अशोक भास्कर भोये<br>योगेश विक्रम सोनवणे | अरुण बालू चौधरी<br>चौधरी अंबादास राघो |
| विमुक्त जाती – अ | १ | संदिप जाधव | विशाल जे राठोड |
| भ.ज.-क | १ | दिपक रामचंद्र ढोले | वैभव डी. माने |

पदाचे नांव :- **संगणकचालक**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | प्रशांत बाबुराव तुपे | सतीश मुकुंद शिंदें |
| अनु.जमाती | १ | गणेश दि. पवार | अशोक के.लहांगे |
| विमुक्त जाती – अ | १ | अलका सतिश पवार | सतीश महादेव राठोड |
| इ.मा.व | १ | रुपाली ए म्हात्रे | नामदेव बाळू देसले |

पदाचे नांव :- **वायरमन**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | २ | श्री.विनोद एस.जाधव<br>श्री.प्रमोद बी.गजभिये | नारायणकर देवराज जनार्दन<br>जयराज एस जॉन |
| अनु.जमाती | ४ | अनंत एस. काटकरे<br>सुनिल बी वावरे<br>चव्हाण धनराज अंकुंशराव<br>तानाजी डी कोकणी | विजय अभि राऊत<br>सदुराम नारायण चौधरी<br>शंकर यशवंत कागडी<br>म्हादु सोम्पा गावीत |

| | | | |
|---|---|---|---|
| विमुक्त जाती - अ | १ | अविनाश भिमसिंग पुछवई | आव्हाड शशिकांत डी |
| भ.ज.-क | १ | आनंदराव ए. येले | जमदाडे उमेश शिवाजी |
| वि.मा.प्र | १ | जितेंद्र के. कोळी | केतन प्रकाश मेहर |
| इ.मा.व | २ | अविनाश एस.दुसाने<br>जितेंद्र प्रकाश राऊत | चित्तरांजन भंगाळे<br>आदिश के. पाटील |

| पदाचे नांव :- **आरोग्य निरीक्षक** | | | |
|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अनुशेषानुसार पदसंख्या** | **निवड झालेल्या उमेदवाराचे नांव** | **प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव** |
| अनु.जमाती | ३ | लहानू जन्या वाळवी<br>विजय लक्ष्मण गावीत<br>दिपक हरिशचंद्र भोये | युवराज एल वरणीक<br>महेश भास्कर गायकवाड<br>अर्जुन धाकल्या भोईर |
| विमुक्त जाती - अ | १ | एकनाथ यु पवार | राठोड दरबार सी |
| भ.ज.-ब | १ | राजेश डी. थिटे | दिनेश गिरजु गोसावी |

| पदाचे नांव :- **बाजार निरीक्षक** | | | |
|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अनुशेषानुसार पदसंख्या** | **निवड झालेल्या उमेदवाराचे नांव** | **प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव** |
| अनु.जाती | १ | मनिष जगन्नाथ हिवरे | प्रशांत काशिनाथ धिवरे |

| पदाचे नांव :- **विजतंत्री** | | | |
|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अनुशेषानुसार पदसंख्या** | **निवड झालेल्या उमेदवाराचे नांव** | **प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव** |
| अनु.जमाती | १ | विजयकुमार कृष्णाजी भांगरे | चंद्रकांत जी गावित |

| पदाचे नांव :- **फायरमन** | | | |
|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अनुशेषानुसार पदसंख्या** | **निवड झालेल्या उमेदवाराचे नांव** | **प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव** |
| अनु.जमाती | १३ | चेतन जे चौलकर<br>अनिल सी गायकवाड<br>शैलेश बी देवरे | - |
| विमुक्त जाती - अ | २ | - | - |
| भ.ज.-ब | १ | - | - |
| भ.ज.-क | २ | - | - |
| भ.ज.-ड | १ | - | - |
| वि.मा.प्र | १ | - | - |
| | ४ | पंकज ए. पवार<br>सुरेश पी. बोंबें<br>राजेंद्र डी. राजम<br>आसेकर संदिप धरमराज | जयवंत जे. गायकर<br>चेतन दत्तात्रय झडे<br>गवंडे राजीव जनार्दन<br>दिपक किसन गाडेकर, |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५४(अ) आर/डब्ल्यु, ४५७(३) (ए) आणि (बी) अन्वये सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली आहे यातील शेडयुल ए मध्ये दर्शविल्याप्रमाणे कोणत्याही पदासाठीच्या शैक्षणिक अर्हता/ अनुभव याबाबतच्या अटी शिथील करण्याचे अधिकार आयुक्ताना आहेत त्यानुसार संगणकचालक या पदासाठीचे सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता बारावी सायन्स अशी होती परंतु संगणकचालक यापदासाठी सेवायोजन कार्यालयांकडुन प्राप्त झालेल्या उमेदवारांमध्ये काही इतर शाखेतुन बारावी उत्तीर्ण झालेले उमेदवार प्राप्त झाले होते व त्यांची निवड समितीने सदर पदासाठी निवड केलेली आहे तरी संगणकचालक यापदासाठीचे सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेत मान्यताप्राप्त संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन बारावी उत्तीर्ण अशा दुरूस्तीचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवलेला आहे यांस मंजुरी मिळणेच्या अटीस अधिन राहुन तसेच फायरमन यापदासाठी अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण अशी अर्हता सेवानियमात दिलेली आहे. परंतु निवड समितीने निवड केलेल्या एका उमेदवार सदरची अर्हता धारण करीत नाही. परंतु सदर कर्मचारी यांना नियुक्ती दिल्यानंतर महापालिकेतर्फे त्यांना सदरचे प्रशिक्षण पुर्ण करणेसाठी पाठविले जाईल.

तरी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात यावी.

महासभा ठराव क्र. ३८ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार निवड समितीने शिफारस केलेल्या उक्त उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची
सही/-

अनुमोदकाची
सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १७ वाचून दाखवितात.***

विषय क्र. १७:- राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी सुधारणांकामी महापालिका निधीतुन अतिरिक्त फरकाचे रक्कमेस मान्यता देणे बाबत.

***मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-मा. महापौर, गलिच्छ वस्ती निर्मुलन या शिर्षातुन या अगोदर दिड दिड लाखाचा निधी मिळण्यासाठी आम्ही जो अर्ज दिला होता तो अदयाप पास झालेला नाही. २००२-२००३साठी आणि आपल्या अधिका-यांनी त्या प्रभागामध्ये पहाणी सुध्दा केली आहे व आपल्याला अहवाल सुध्दा दिलेला आहे किंवा नाही. हे मला माहित नाही. आमची कामे अदयाप सुरू झालेली नाहीत. ते जरा आपल्या लक्षात मागे मी आणुन दिलेले आहे. त्याबददल काय झाले याचा खुलासा करण्यात यावा. धन्यवाद.***

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-याचे पण उत्तर दया ना. हा प्रस्ताव पारीत करण्यामध्ये आमची काही हरकत नाही परंतु याआधीचे जे प्रस्ताव आपणांकडे प्रलंबित आहेत.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-एका गोष्टीचे आश्चर्य आहे की, दोन कोटी ३५ लाखाचे काम मंजुरीस पाठविले होते. त्यापैकी जवळ जवळ दिड कोटीच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. त्यावर जर नजर टाकली तर त्यामध्ये कॅम्प नं. २ मधील एक सुध्दा काम नाही. त्याचे काही मुख्य कारण आहे का? याबाबत आम्हाला समाधानकारक उत्तर मिळाले पाहिजे. तो प्रस्ताव तर म्हाडा कडुनच मंजुर होवून आलेला आहे त्यामध्ये काही संशय नाही. परंतु तरीही आश्चर्याची गोष्ट आहे की, कॅम्प नं. २ मधील एक सुध्दा काम मंजुर झालेले नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-महापौर महोदया, ते दिड दिड लाखाचे पत्र दया म्हणुन तुम्ही सांगितले होते, आयुक्त साहेबांना सांगतो ना मी. त्यांनी आमच्याकडुन पत्र घेतलेले आहे. मग ते कसले पत्र घेतले? आमच्या प्रभागामध्ये कामे झालेली नाहीत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-शहर अभियंत्यांनी ३ वेळा लिहुन घेतले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-ती दिड दिड लाखाची कामे सर्वांची प्रलंबित आहेत.

**मा. सदस्या श्रीमती. माया मसंद व श्रीमती. मिना सोनेजी (सोंडे) सभागृहातुन बाहेर पडल्या.**

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-कामे प्रलंबित आहेत. आयुक्त साहेबांनी त्यावर स्वाक्षरी केलेली नाही. आयुक्त साहेब तुम्ही आश्वासन दिले आहे की ती कामे करणार म्हणुन.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, आम्ही जेव्हा वार्षिक अर्थसंकल्प तयार करतो. तेव्हा बंधनकारक खर्च वजा जाता जो निधी शिल्लक राहतो त्यापैकी ५ टक्के रक्कम दुर्बल घटकांसाठी आरक्षित ठेवावी लागते. त्यातील काही कामाच्या सूचना आमच्याकडे आल्या आहेत. त्या ज्या सूचना आहेत. त्यांचा अग्रक्रम आम्ही पाहिला तर त्यातील अधिकतर कामे अशी आहेत की, नाली दुरूस्त करणे किंवा नविन नाली बांधणे किंवा गलिच्छ वस्तीमध्ये रस्ता तयार करणे किंवा सी.सी. पॅसेज तयार करणे अशा प्रकारची कामे आली आहेत. व पहिल्या दिवसापासुन मी सर्व सदस्यांना बोलत आलो आहे. की जर त्या झोपडपट्टीमध्ये आज पाणी मिळत नसेल. तर नाली दुरूस्त करून आपण काय करणार? पाणी पुरवठ्याला अग्रक्रम दिला पाहिजे. व अशी कामे माझ्याकडे जवळ जवळ १ कोटी रूपयांची आली होती. त्या कामांसाठी मी एक समिती नेमली आहे. त्यांनी जावून त्याठिकाणी पहाणी करून यायचे आहे. व सूचविलेले काम खरेच आवश्यक आहे का? तेथे पाण्याची व्यवस्था आहे का? जर त्या झोपडपट्टीमध्ये पाण्याची व्यवस्था आहे व नंतर तेथे नालीचे काम करावे लागत असेल तर मी ते काम करण्यास तयार आहे परंतु जेथे पाणी मिळत नाही. तेथे जर तुम्ही सी.सी. पॅसेज तयार करण्याची शिफारस कराल तर त्या दुर्बल घटकांसाठी जो निधी आरक्षित केला आहे त्याचा दुरूपयोग होईल असे माझे स्वतःचे मत आहे. व हा दुरूपयोग होवू नये म्हणुन त्यास आजपर्यंत मंजुरी दिलेली नाही. जसाही त्या समितीचा अहवाल माझ्याकडे येईल. त्यावर आम्ही विचार करू.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-मा. महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, जेथे झोपडी आहे तेथे पाणी नाही. तर तेथे नाली तयार करून काय फायदा आहे. परंतु काही अशा झोपडपट्टया आहेत की जेथे नाल्यांची सक्त

*जरूरत आहे. तर तिथे तर नाल्या बनल्या पाहिजेत ना? तेथे पाणी नाही परंतु तरीही नाल्यांची सक्त जरूरत आहे. तर आपण तेथे आपले अधिकारी पाठवुन सर्व्हे करून नाली तयार केली पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानी:-</u>पाणी पुरवठा स ुधारण्यासाठी पैसे देतात का?*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>पास?*

*<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

<u>विषय क्र. १७:-</u> राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी सुधारणांकामी महापालिका निधीतुन अतिरिक्त फरकाचे रक्कमेस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ (म्हाडा)कडे उल्हासनगर महानगरपालिके तर्फे रू. २,३३,०९,५८४/- इतक्या रक्कमेची अंदाजपत्रके प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता सादर करण्यात आलेली होती. सादर केलेल्या कामांपैकी म्हाडाने शासनाच्या मानकानुसार रूपये १,४१,०५,०३७/- इतक्या रक्कमेच्या कामांना मंजुरी दिलेली आहे. तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणेत आलेली आहे. परंतु म्हाडा कडून निधी उपलब्ध होणे बाकी आहे.

| अ. क्र. | वस्तीचे नांव | लोकसंख्या | अंदाजित किंमत | मंजुर किंमत | फरक |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्ही.पी. नाईक कॉलनी, शहाड फाटक, उल्हासनगर-१ | ६,५७८ | ६,३२,७२० | ४,२०,९९२ | २,११,७२८ |
| २. | भिमनगर कॉलनी बॅ. नं. ३९, उल्हासनगर-१ | ५,८१० | ६,२३,८५० | ३,७१,८४० | २,५२,०१० |
| ३. | विठ्ठलवाडी गलिच्छवस्ती उल्हासनगर-३ | १,१५३ | ७,३४,२५३ | ७३,७९२ | ६,६०४६१ |
| ४. | सुभाषनगर उल्हासनगर-३ | ६,०९८ | ५,३३,११५ | ३,९०,२७२ | १,४२,८४३ |
| ५. | सहयाद्रीनगर, श्रीराम नगर, ज्योतिबाफुले नगर, पटेलनगर, उल्हासनगर-५ | २०,००० | २२,५६,८०० | १२,८०,००० | ९,७६,८०० |
| ६. | खुनी खडा व मुतूनगर | ३,८०० | ७,१७,०२५ | २,८३,२०० | ४,७३,८२५ |
| ७. | तानाजी नगर उल्हासनगर-१ | ३,६७० | ४,५२,८९५ | २,३४,८८० | २,१८,०१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | हनुमाननगर, उल्हासनगर-१ | ४,००० | ४,१३,५८१ | २,५६,००० | १,५७,५८१ |
| ९. | महात्माफुले नगर कौशल्यनगर, बुध्दनगर, उल्हासनगर-३ | ९,५,७५ | ७,६८,४०० | ६,१२,८०० | १,५५,६०० |
| १०. | गुरूतेज बहादुरनगर उल्हासनगर-३ | १,५०५ | १,५४,७७६ | ९६,३२० | ५८,४५६ |



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | सतनाम कॉलनी उल्हासनगर-३ | १,८,५५ | १,८७,८४४ | १,१८,७२० | ६९,१२४ |
| १२. | गणेशनगर, शिवाजी नगर, अयोध्या नगर, उल्हासनगर-३ | ९,९५८ | ८,१९,९७२ | ६,३७,३१२ | १,८२,६६० |
| १३. | सरस्वतीनगर, पवई चौक उल्हासनगर-३ | २,६८८ | २,००,४४१ | १,७२,०३२ | २८,४०९ |
| १४. | शिवशक्ती कॉलनी भिमनगर, इंदिरानगर, उल्हासनगर-४ | ६,९८७ | ११,७७,९०० | ४,४७,१६८ | ७३,७३२ |
| १५. | महादेवनगर, उल्हासनगर-४ | ६,९८७ | ११,७७,९०० | ४,४७,१६८ | ७,३०,७३२ |
| १६. | सुभाषटेकडी, उल्हासनगर-४ | ४,५०० | ६,०२,७७६ | २,८८,००० | ३,१४,७७६ |
| १७. | लक्ष्मीनगर, उल्हासनगर-४ | ३,५०० | ४,७३,२०० | २२,४०,००० | २,४९,२०० |
| १८. | सितारामनगर उल्हासनगर-४ | ३,४१० | ४,५०,३०० | २,१८,२४० | २,३२,०६० |
| १९. | सिध्दार्थनगर उल्हासनगर-४ | ५,७०० | ३,८१,७७६ | ३,६४,८०० | १६,९७६ |
| २०. | कैलासनगर, उल्हासनगर-४ | २,२०० | ६,५४,५४० | १,४०,८०० | ५,१३,७४० |
| २१. | राहूल नगर, उल्हासनगर-४ | ३,९०० | ९,९०५०० | २,४९,६०० | ७,४०,९०० |
| २२. | कैलासनगर उल्हासनगर-५ | ६,००० | १७,३५,२४० | ३,८४,००० | १३,५१,२४० |
| २३. | गणेश नगर, उल्हासनगर-५ | २,७०० | ४,३८,६०० | १,७२,८०० | २,६५,८०० |
| २४. | जयजनता कॉलनी, उल्हासनगर-५ | ५,७२४ | ९,३०,१०० | ३,६६,३३६ | ५,६३,७६४ |
| २५. | वडारी कॉलनी उल्हासनगर-३ | ३,५०० | ३,५९,३०९ | २,२४,००० | १,३५,३०९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकुण | १,३६,२३९ | १,७९,२३,८१३ | ८७,१९,२९६ | ९२,०४,५१७ |

उर्वरित रूपये ९२,०४,५१७ निधी मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तथापि म्हाडाने या प्रस्तावास मंजुरी न दिल्यास सदर खर्च कृपया महानगरपालिका निधीतून करावा लागेल. घोषित झोपडपट्टी मधील पाणी टंचाई दुर करण्या करिता उक्त कामे युध्दपातळीवर पुर्ण करण्यासाठी फरकाची रक्कम रूपये ९२,०४,५१७ करण्यास मंजुरी देण्याची शिफारस आहे.

सबब सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ३९ दिनांकः-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी सुधारणा कामी महानगरपालिका निधीतून अतिरिक्त फरकाचे खर्च रू. ९२,०४,५१७/- या रक्कमेस महानगरपालिका अंदाजपत्रकात पुर्नसमायोजनेच्या अधीन रहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १८:- उल्हासनगर शहरातील महापालिका शाळेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिक्षण अधिका-यांमार्फत रेनकोट वाटप करणेस मान्यता देणे बाबत.

*मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-महापौर महोदया, रेनकोट आहेत का? रेनकोट कुठे आहेत?*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-भांडार विभागात.*

*मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-एखादा आणुन दाखवा आता आहेत का?फाटलेले आहेत सगळे. ते मुलांना देण्याच्या लायकीचे नाहीत.*

*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, दहा लाखाचे जे रेनकोट स्थायी समितीमध्ये मंजुर करून घेतले. ते गेल्या वर्षाचे रेनकोट अदयाप पर्यंत विद्यार्थ्यांना दिलेले नाहीत. शहरामध्ये रेनकोटच्या बाबतीत अशी चर्चा आहे की जे रेनकोट आणले होते ते रेनकोट चोरीला जावून त्याठिकाणी जुने पुराने रेनकोट मार्केटमधुन आणले गेले आहेत. खरोखरच ते*

नविन रेनकोट आहेत की नाहीत? ते दाखवावेत आणि नंतर त्याचा वापर करण्यात यावा. धन्यवाद.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, ७,६०० रेनकोट खरेदी केले होते त्यामधील फक्त १२५ रेनकोटचे वाटप झाले. ७४७५ रेनकोट आहेत. वाटप कसे केले जावे त्याबाबत काही मतभेद होते. व त्या मतभेदामुळेच एक पावसाळा तर निघुन गेला. आणखी मतभेद चालु राहिले तर हे वर्ष सुध्दा निघुन जाईल.

<u>मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:-</u>रेनकोट डिसेंबरमध्ये वाटणार का? मागील वर्षाचे जे रेनकोट आहेत ते काय डिसेंबरमध्ये वाटणार का? या सिझनमध्ये दिले पाहिजेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जेथपर्यंत माझी माहिती आहे. मागणी नोंदविण्यामध्ये विलंब झाला, वाटपामध्ये विलंब झाला, रेनकोट तर आले आहेत आता वाटप झाले पाहिजेत. व हे वाद कायमचे मिटविण्यासाठी हा प्रस्ताव आणला आहे की ते रेनकोट योग्य त्या माणसाला/ विद्यार्थ्याला वाटप होवेत. व योग्य त्या प्रकारे होवोत. ज्या पण शाळेमध्ये रेनकोट वाटप करायचे आहेत त्या शाळेमधील दुर्बल घटकामधील विद्यार्थ्यांची ओळख पटवून त्यांना रेनकोट वाटप केले जातील. त्या शाळेचे मुख्याध्यापक व आमचे प्रशासनाधिकारी हे दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची ओळख पटवून त्यांना ते रेनकोट वाटत करतील.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>रेनकोट कसे आहेत ते आपण पाहिले आहेत का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मी ते रेनकोट पाहिलेले नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>त्यांची स्थिती काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब.....

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>आयुक्त साहेब, रेनकोट ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीतच ते दयायचे का?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता रेनकोटवर जी चर्चा चालु आहे. मागच्यावेळी हे रेनकोट येता येता पावसाळा समाप्त झाला होता. त्यांनतर ते आले होते. पावसाळा पुर्ण झाल्यानंतर रेनकोट आले होते. ठेकेदाराने ते पुरविले होते. त्यानंतर जे गरजु विद्यार्थी होते गांधीरोड येथील त्यांना आमचे तत्त्कालिन आयुक्त श्री. पोखरकर साहेब, सभापती श्रीमती. नीना नाथानी मी व इतर सर्व लोक उपस्थित होतो. १२५ रेनकोट त्यावेळी गरीब विद्यार्थ्यांना वाटप केले होते त्यानंतर असा निर्णय झाला होता की, प्रभाग समिती मार्फत ते वाटत केले जातील. परंतु जेथे जेथे सभा होत होत्या तेथील नगरसेवक म्हणत होते की आम्हाला आता रेनकोट नकोत पावसाळा संपला आहे. तर ते रेनकोट वर्षभर पडुन राहीले आज १ नं. पासुन ५ नंबर कॅम्पापर्यंत नगरपालिकेच्या ज्या काही शाळा आहेत त्यामध्ये जेवढे काही विद्यार्थी शिकत आहेत ते सर्व गरीबच आहेत. तर त्यांनी आमचे जे सभापती आहेत शिक्षण मंडळाचे त्यांनी मागणी केली आहे की, ७४७५ रेनकोट जर आपण आम्हाला दिलेत त्यांनतरही ३००० रेनकोट त्यांना स्वत: खरेदी करावे लागणार आहेत जर आम्ही त्यांना रेनकोट दिले तर प्रत्येक शाळेमध्ये मग ती कोणतीही शाळा असो. त्या शाळेमध्ये रेनकोट देताना त्या प्रभागातील जो नगरसेवक असेल त्यासही बोलावले जावे. व मुख्य समस्या ही होती की, पोखरकर साहेबांच्या काळात असे सांगितले जात होते

*की, ज्यास रेनकोट वाटप केले जातील त्यांची यादी आणली जावी. कोणत्त्या मुलांना रेनकोट दिले त्यांच्या सहया आणा म्हणुन महापालिकेच्या शाळेमध्ये रेनकोट वाटप केल्याने हे झंझट राहणार नाही. ते लोक स्वतः यादी तयार करून देतील की या या लोकांना रेनकोट वाटप केले.व काही सदस्य म्हणत आहेत की, रेनकोटची स्थिती चांगली नाही. मला वाटते की आणखी चार महिने ते पडुन राहिले तर सर्वांची स्थिती खराब होईल. म्हणुन मेहरबानी करून शिक्षण मंडळाने जी मागणी केली आहे त्याप्रमाणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे शाळांमधील मुलांना हे रेनकोट दिले जावेत. सर्व सदस्यांना विनंती आहे हा ठराव सर्वसंमतीने पारीत केला जावा.*

*<u>काही सदस्य :-</u>पास. पास.*

*<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय क्र. १८:- उल्हासनगर शहरातील महापालिका शाळेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिक्षण अधिका-यांमार्फत रेनकोट वाटप करणेस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीमार्फत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उल्हासनगर महापालिकेच्या प्रत्येक प्रभागासाठी १०० रेनकोट याप्रमाणे ७५०० रेनकोट खरेदी करण्यात आले आहेत. सदर रेनकोट शाळेतील शिक्षण घेणा-या ६ ते ९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना वाटप करण्यात येणार आहेत. महासभा ठराव क्र.२ दिनांक २५.६.२००२ अन्वये लाभार्थींना निकष यादी तयार करण्यासाठी मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात आले होते. सदर प्रस्तावास सर्वसाधारण महासभेने ठराव क्र. १७ दिनांक १९.७.२००२ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे (स्थायी समिती ठराव क्र.४५ दिनांक २३.८. २००२ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती.) त्यानुसार मे.नोव्हेल्टी फुटवेअर, मुंबई यांचेकडुन न्युनतम दराची निविदा प्राप्त झाल्यामूळे त्यांच्याकडुन ७६०० रेनकोट खरेदी करण्यात आले होते.

सर्व प्रभाग अधिका-यांना क्र.उमपा/भांडार/१२३ दिनांक ७/११/२००२ च्या आदेशान्वये मा.आयुक्त यांनी मान्य केलेल्या खाालिल निकषानुसार रेनकोट वाटप करण्यासाठी आदेश देण्यात आले होते.

१) दारिद्रय रेषेखालिल कूटुंबातील मुले
२) विधवा/विधुर पालकांची मुले
३) शारिरीक दृष्टया अपंग मुले
४) प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, पुरग्रस्त यांची मुले
५) मागासवर्गीयांची मुले
६) आर्थिकदृष्टया अपंग पालकांची मुले
७) शारिरीकदृष्टया अपंग पालकांची मुले

तत्कालीन सभापती,महिला व बालकल्याण समिती व मा.आयुक्त, यांच्या हस्ते शासकिय बालगृह आणि आनंदाश्रम बालगृह येथील गरीब आणि गरजु अशा पालकांच्या १२३ विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करण्यात आले व उर्वरित रेनकोट प्रभाग अधिकारी यांना मा. आयुक्त सो. यांनी विर्निदिष्ट केलेल्या निकषास अनुलक्षुन पात्र लाभार्थींची यादी संबंधित प्रभाग समिती , सभापती यांच्याशी विचारविनिमय करून निश्चित करणेबाबत व त्याव्दारे रेनकोट वाटप करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप रेनकोटचे वाटप पुर्ण होवु शकले नाही.

उपरोलिखीत वस्तुस्थिती लक्षात घेता महापालिका प्रशासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका शाळेतील पात्र लाभार्थींना सदर रेनकोटचे वाटप करण्याची जबाबदारी शिक्षण अधिका-यांवर सोपविण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे ज्यामुळे रेनकोटचे वाटप जलद होईल व ते खराब होणार नाही. सदर बाब मंजुरीसाठी महासभेपुढें प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र. ४० दिनांकः-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील महानगरपालिका शाळेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिक्षण अधिका-यामार्फत रितसर रेनकोट वाटप करणेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. १९:- महापालिका शिक्षण मंडळाचे दिनांक २१.२.२००३ चा ठराव क्र. ११ प्रमाणे प्रस्तावित केलेल्या ३३ पदास मंजुरी देणे बाबत.

***शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन.***

***काही सदस्य :-पास. पास.***

***मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.***

विषय क्र. १९:- महापालिका शिक्षण मंडळाचे दिनांक २१.२.२००३ चा ठराव क्र. ११ प्रमाणे प्रस्तावित केलेल्या ३३ पदास मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले शिक्षण मंडळाने खाजगी मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेचा कारभार सुरळीतपणे चालविणेसाठी सध्या शिक्षण मंडळात अस्तित्वात असलेल्या पदाव्यतिरिक्त खालील नमुद केलेली पदे नव्याने निर्माण करणेस शिक्षण मंडळाने त्यांचे कडील ठराव क्र. ११ दिनांक-२१/२/२००३ ने मान्यता दिलेली आहे. (सोबत त्याची प्रत जोडली आहे).

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन अधिक्षक | ०१ | रु. ५५००-१७५-९००० |
| २ | मुख्य लिपिक | ०१ | रु. ५५००-१७५-९००० |
| ३ | पर्यविक्षक | ०६ | रु. ४०००-१००-६००० |
| ४ | शिपाई कम वाचमेन | ०६ | रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ५ | लिपिक | १९ | रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ चे कलम २० व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम ३६(२) मधील तरतूदीनुसार मंडळाचे प्रशासकीय कामकाज चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी प्राधिकृत नगरपालिकेने द्यावयाचे आहेत व त्यासाठी शिक्षण मंडळाने आस्थापना सूची तयार करुन त्यात आवश्यक पदनामे व वेतनश्रेणी नमुद करावयाची आहे. त्यानुसार शिक्षण मंडळाने ठराव पारित करुन उक्त पदांची मागणी केली आहे. शिक्षण मंडळाने प्रस्तावित केलेल्या आस्थापना सूचिस मंजुरी देऊन शासनाकडे पद मंजुरीचा प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात यावी.

महासभा ठराव क्र. ४१ दिनांकः-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका शिक्षण मंडळ दि. 21.2.2003 चा ठराव क्र. 11 अनुषंगाने प्रस्तावित केलेल्या 33 विविध पदास शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २० वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २०:- श्री. अभिजित जयवंत महामुलकर यांची प्रोग्रामर (संगणक) या पदावर नियुक्तीस मान्यता देणे बाबत.

*काही सदस्य :-पास. पास.*

*मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय क्र. २०:- श्री. अभिजित जयवंत महामुलकर यांची प्रोग्रामर (संगणक) या पदावर नियुक्तीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रोगामर(संगणक) या पदनामाच्या एका पदाला मंजुरी मिळालेली आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अविसां-१०२००३/प्र.क्र.२७/०३/नवि-४, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २७/२/२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व विभागाचे संगणकीकरण करावयाचे असल्याने प्रोगामर (संगणक) हे पद भरणे आवश्यक होते त्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवुन उमेदवारांची चालती मुलाखत दि.२२/५/२००३ रोजी महापालिका निवड समितीपुढे घेण्यात आली होती यात एकुण १३ उमेदवार उपस्थित होते त्यापैकी श्री अभिजीत जयवंत महामुलकर याची प्रोगामर या पदासाठी निवड केलेली आहे. कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.३/२८१, दिनांक २९ मे,२००३ नुसार श्री. अभिजीत जयवंत महामुलकर यांची प्रोगामर (संगणक) या पदावर नियुक्ती केलेली आहे. तरी सदर नियुक्ती आदेशाला महासभेची मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव महासभेपुढे सादर करीत आहे.

महासभा ठराव क्र. ४२ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अभिजित जयवंत महामुलकर यांची निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे वय पात्रतेसंदर्भी अट शिथिल करुन त्यांना प्रोग्रामर (संगणक) या पदावर नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २१ वाचुन दाखवितात.*

*विषय क्र. २१:-उल्हासनगर शहरात जैविक घनकच-याची विल्हेवाट लावणे कामी अभिकर्ता नेमणे बाबत.*

*मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मा. महापौरजी, या विषय क्र. २१ची अंमलबजावणी केव्हा होईल?*

*मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-आयुक्त साहेब विषय क्र. २१ बाबत एक मुददा आहे. हे जे तुमचे ॲग्रीमेंन्ट होणार त्यात नक्की महापालिकेची भुमिका काय असणार? ती अंमलबजावणी करताना महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका आणि ती जी पार्टी आहे म्हणजे जी ठेका घेणार आहे. त्यांच्यामध्ये ॲग्रीमेंट कसे करणार. आपण कोणाशी ॲग्रीमेंन्ट करणार? त्या पार्टीशी करणार की कल्याण*

डोंबिवली महानगरपालिकेशी करणार.? हे जरा स्पष्ट होणे इथे गरजेचे आहे. कार्यवाही लवकर व्हावी ही अपेक्षा आहे. तर ती मुदत जरा....

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया,आपणां सर्वांना आठवत असेल की असाच एक प्रस्ताव भिवंडी महानगरपालिकेचा जो अभिकर्ता आहे. त्याच्या नेमणुकीचा प्रस्ताव येथे आला होता. त्यावर सभागृहातील सर्व सदस्यांनी एक हरकत घेतली होती. त्यानंतर आम्ही आय.एम.आय. च्या बरोबर एक बैठक घेतली. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा जो अभिकर्ता आहे त्याच्याशी बैठक केली. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त साहेबांशी बैठक घेतली. त्यानंतर हा प्रस्ताव आपल्या समोर आणला आहे. आमचे जे ॲग्रीमेंट होईल ते कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा जो अभिकर्ता आहे त्याच्या बरोबर होईल. परंतु कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सहमतीने होईल. व ती सहमती त्यांच्या आयुक्त साहेबांनी आम्हास एन.ओ. सीच्या रूपाने दिलेली आहे. व हा जो प्रस्ताव आहे त्यावर त्वरीत अंमलबजावणी होईल. हे जे बायो मेडिकल वेस्ट हॅंडलिंग ॲण्ड डिस्पोजल रूल्स आहेत १९९८ चे त्यानुसार पहिले ही जबाबदारी जनरेट ॲण्ड डिस्पोजल ऑफ वेस्ट जे आहेत म्हणजेच हॉस्पीटल,मेटर्निटी होम्स इत्यादी यांची होती त्यामध्ये सुध्दा आता सुधारणा केली आहे. व आता ही जबाबदारी महानगरपालिकेवर सोपविली आहे. तर या हिशोबाने उल्हासनगर महानगरपालिकेने ही जबाबदारी घेऊन उल्हासनगर शहरामध्ये जेवढे काही बायो मेडिकल वेस्ट निर्माण होते, त्याच्या डिस्पोजलसाठी एजेन्सीची नेमणूक करणे जरूरीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> म्हणजे कलेक्शन एजेन्सी ती राहिल ना? जर ते तो गोळा करण्यामध्ये अयशस्वी झाले तर त्यांच्यावर कार्यवाही करण्याची काही तरतूद आहे का ?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> ती जी एजेन्सी आहे, तिच्या बाबत दंडात्मक कारवाई काय? एजेन्सी अयशस्वी ठरली तर काय? ह्या ज्या कराराच्या अटी व शर्ती आहेत कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेच्या त्याच सर्व येथे असतील. व तो प्लीनल क्लॉज सुध्दा असेल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>नाही प्लीनल क्लॉज असला पाहिजे. माझ म्हणण असं आहे की, जर ते तो कचरा उचलण्यामध्ये अयशस्वी झाले तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> जी फी गोळा केली जाईल ती महानगरपालिका जमा करेल. १५ रुपये प्रति किलोच्या हिशोबाने , त्यातील १२ रुपये ऐजन्सीला मिळतील. १ रुपये ५० पैसे उल्हासनगर महानगरपालिकेला मिळेल. व १रुपये ५० पैसे कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेला मिळतील. हा एक त्रिपक्षीय करार होईल. व ज्या या अगोदरच्या करारातील अटी व शर्ती आहेत, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निविदे मधील त्याच अटी व शर्तीवर हा करार केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> त्याच्यामध्ये उल्हासनगर मेडिकल असोसिएशनचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्याशी करार होणार का?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> पास?

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. २१:-उल्हासनगर शहरात जैविक घनकच-याची विल्हेवाट
लावणे कामी अभिकर्ता नेमणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयाबाबत २०.२.२००३ रोजी महासभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा होवून प्रस्ताव फेरविचारासाठी प्रशासनाकडे पाठविण्यात आलेला होता. तदनंतर प्रशासनाने भिवंडी-निजामपुर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यांचा प्रस्ताव व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यांच्या प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्याच बरोबर उल्हासनगर मेडिकल असोसिएशन व इंडियन मेडिकल असोसिएशन उल्हासनगर शाखेचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा केली. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यांचा प्रकल्प कार्यान्वित झालेला असून सदर अभिकर्त्यांचे दर वाजवी आहेत. त्यामुळे मुळ प्रस्ताव रद्द करून कल्याण महापालिकेने नियुक्त केलेला अभिकर्त्ता मे.पी.आर.एस. एंटरप्रायजेस, नासिक यांचा प्रस्ताव स्विकृत करण्याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेने मे. पी. आर.एस. एंटरप्रायजेस नासिक यांचेशी खालील प्रमुख अटी व शर्तीस अधिन राहुन संविदा केलेली आहे.

१. बायो मेडीकल वेस्ट प्रकल्पासाठी लागणारी जमीन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने रू. १ प्रति चौरस मीटर प्रति वर्ष दराने अभिकर्त्यास उपलब्ध करून दिली आहे.
२. सदरच्या प्रकल्पासाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री ठेकेदाराने उपलब्ध करून दिली आहे.
३. शहरातील रूग्णालये, पॅथोलॉजीकल लॅब, रक्तपेढी, दवाखाना व इतर जागेतील बायोमेडीकल वेस्ट गोळा करण्याची व वाहून नेण्याची जबाबदारी अभिकर्त्यांवर सोपविण्यात आली आहे.
४. प्रकल्पासाठी लागणारे आवश्यक कर्मचारी वर्ग अभिकर्त्याने उपलब्ध करावयाचा असुन त्यांचे वेतन ठेकेदारानेच दयावयाचे आहे.
५. जैविक कचरा वाहतुक करून प्रक्रिया करणेसाठी खालीलप्रमाणे शुल्क रूग्णालये, पॅथालॉजीकल लॅब, नर्सिंग होम, रक्तपेढी इत्त्यादीच्या चालकाकडुन आकरण्यात येईल.
रू. १५/- प्रतिकिलो पहिल्या ३ वर्षाकरिता प्रतिवर्षी ५ टक्के वाढ उर्वरित ७ वर्षाकरिता
६. वसुल करण्यात येणा-या शुल्कातून अभिकर्त्यास देय रक्कम खालील प्रमाणे आहे. रू. १२ पहिल्या ३ वर्षाकरिता
२टक्के वाढ पुढील ३ वर्षाकरीता (४,५, व ६ वर्षाकरिता)
४ टक्के शेवटच्या ४ वर्षाकरीता (७,८,९ व १० वर्षाकरिता)
उर्वरीत रक्कम महापालिकेस प्रशासकीय शुल्क म्हणुन दये असेल.
७. सदरचा करार १० वर्षासाठी करण्यात आलेला आहे.

mYgkluxj egkuxjikfydsus ck;ksesMhdy osLV fVªVesaV vW.M fMLiksty djhrk Lora= izdYi mHkkjko;kpk >kY;kl izdYikl ykx.kkjh tehu miyC/k d:u n;koh ykxsy rlsp izdYi mHkkj.khlkBh cjkp dkyko/kh ykx.;kph 'kD;rk vkgs- R;keqGs dY;k.k Mksafcoyh egkuxjikfyds'kh laidZ lk/kyk vlrk R;kauh es- ih-vkj-,l- bUVjizk;tsl ukf'kd ;kauh mHkkjysY;k dY;k.k ;sFkhy izdYike/;s tSfod dp&;kph foYgsokV yko.;klkBh uk gjdr izek.ki= fnys vkgs- es- ih-vkj-,l- ,UVjizk;tsl ;kaP;k izLrkokuqlkj---------

१. उल्हासननगर महानगरपालिका क्षेत्रातील जैविक कचरा गोळा करून वाहतुक करण्याची जबाबदारी मे. पी. आर.एस. इन्टरप्रायजेस यांची राहील.

२. उल्हासनगर शहरातील रूग्णालये, पॅथॉलॉजिकल, लॅब, नर्सिंग होम, रक्तपेढी इत्त्यादी यांचेकडुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेप्रमाणेच शुल्क आकरण्यात येईल.

३. वसुल केलेल्या शुल्कापैकी अभिकर्त्यास कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ठरावाप्रमाणे
रू. १२ पहिल्या ३ वर्षाकरीता
२ टक्के वाढ पुढील ३ वर्षाकरीता (४ ,५ , व ६ वर्षाकरिता)
४ टक्के शेवटच्या ४ वर्षाकरीता (७ ,८ ,९ व १० वर्षाकरिता) देय असेल.

४. उर्वरित रक्कमेपैकी उल्हासनगर महानगरपालिका ५० टक्के रक्कम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस प्रशासकीय खर्च / स्वामीत्त्व हक्क म्हणुन देईल.

५. उल्हासनगर महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिका व पी. आर.एस. एंटरप्रायजेस यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करण्यात येईल.

६. सदरच्या कराराची मुदत १० वर्षे असेल.

प्रशासनाने उल्हासनगर मेडिकल असोसिएशन व इंडियन मेडिकल असोसिएशन, उल्हासनगर शाखा यांचेशी सदर विषयावर दिनांक २६ , मे व २८ मे २००३ रोजी बैठक घेवून त्यांना याबददल सविस्तर माहिती दिलेली आहे, त्यांनीही सदर प्रस्तावाशी सहमती दर्शविलेली आहे.

सबब, बायो मेडीकल वेस्ट (मॅनेजमेंट हॅण्डलींग) रूल्स १९९८ मधील तरतुदी ची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता उल्हासनगर शहरातील जैविक कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी मे. पी. आर. एस. इन्टरप्रायजेस, नाशिक यांच्याशी वरील अटी व शर्तींच्या आधिन राहून निविदा न मागविता संविदा करण्यासाठी मंजुरी प्रदान करण्यात यावी.

<u>महासभा ठराव क्र. ४३</u>                    <u>दिनांकः-२० ६ २००३</u>

सुचकाचे नाव :-डॉ. नीना नाथानी
अनुमोदकाचे नाव :-श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्ताव व परिस्थिती विचारात घेता उल्हासनगर शहरातील जैविक घनकचरा / व्यवस्थापन विल्हेवाट लावणेचे काम मे. पी. आर. एस. एन्टरप्रायझेस नाशिक, या अभिकर्त्यांकरवी पार पाडणेसाठी वर नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून आयुक्तांस त्याच्याशी संविदेस प्राधिकृत करीत आहे. आणि प्रस्तावित शुल्कास व कल्याण डोंबिवली महानगरपालिका या प्राधिकरणाबरोबर सुचविलेल्या व्यवहारास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>
उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २२:- उल्हासनगर -२ मधील स्नेहा अपार्टमेंट ते दादी

मोरबाई रोड रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन
पी. शाह'' असे नांव देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी,या विषयाला या अगोदरपण आणले होते. मागील महासभेत तो पुढे ढकलण्यांत आला होता. मला असे वाटते की, हा जो प्रस्ताव आहे ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन पी. शाह'' या रस्त्याबाबत तो आज पुढे ढकलून पुढच्या महिन्यामध्ये या प्रस्तावाबाबतचा पूर्ण इतिहास मांडला जावा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u>ठिक आहे , आम्ही सहमत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>ज्या प्रभागामधील रस्त्याला हे नाव दिले जाणार आहे. त्या प्रभागातील नगरसेवक त्यास सहमत आहे का?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मी आपणांस हे सांगु इच्छितो की, स्थानिक नगरसेवकाने पत्र दिलेले नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):</u>-ठिक आहे? प्रस्ताव पुढे ढकलायचा?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>याच्यापुढे कोणत्त्याही रोडला किंवा चौकाला नाव दयायचे असेल, त्या प्रस्तावात संबंधिताचा इतिहासपण आणला जावा. त्यांनी शहरासाठी केलेले काम , देशासाठी केलेले काम , राष्ट्रासाठी केलेले काम याचा पूर्ण इतिहास दिला जावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> या प्रस्तावाबाबतचा इतिहास मागविला जावा. यानंतर बाकीचे जे प्रस्ताव येतील त्यामध्ये त्यांचा इतिहास आणला जावा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>हा धोरणात्त्मक निर्णय आहे. आणि बहुतांश राष्ट्रीय नेत्त्यांचीच नावे दिली पाहिजेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, या प्रस्तावाबाबत प्रशासनाचे मत असे आहे की, कोणत्त्याही रस्त्याचे किंवा चौकाचे नामकरणाचा जेव्हा प्रस्ताव येतो, तर ज्या सदस्याचा जो प्रस्ताव आहे, त्या सदस्याने ती माहिती दिली पाहीजे. कि ज्यांचे नाव ते सुचवित आहेत, त्यांच्याबाबत त्यांचा इतिहास , त्यांचा तपशिल त्याच सदस्याने दिला पाहिजे. हा जो प्रस्ताव आमच्यासमोर आला आहे तो ज्या सदस्यांकडुन आला तसाच्या तसा आपल्या समोर ठेवला आहे. व माझी याबाबत सभागृहास अशी विनंती राहिल की, नामकरणाचा हा जो मुददा आहे. याबाबत सभागृहाची आपण एक समिती नेमा त्यामध्ये सभागृह नेता विरोधी पक्ष नेता विविध पक्षाचे गटनेते हे असु दयात. त्यांनी प्रथम ठरवावे कोणत्त्या रस्त्यास कोणते नाव दयायचे आहे. त्या समितीच्या शिफारशीनंतर जर प्रस्ताव सभागृहासमोर आणला तर त्यामध्ये मतभेद होणार नाहीत. तर अशी समिती जर आपण स्थापन केलीत. तर आमचे काम सुध्दा सुलभ होईल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब हा जो २२ क्रमांकाचा विषय येथे आणला आहे. या विषयावर मी चर्चा करू इच्छितो. त्यामध्ये आधीच असे लिहिले आहे की स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड या रस्त्याचे नाव तर अगोदरच आहे. तर दुसरे नाव आपण का देत आहात? सभा सूचनेवरही दिले आहे.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-मी आपणांस मागील दोन सभांपर्यंत घेवून जावू इच्छिते की एका रस्त्याचे नाव वासवानी रोड असे सुचविले होते. त्यानंतर वर्तमानपत्रामध्ये दररोज लेख छापुन येत होते की माता मजनीबाई चौक, माता मजनीबाई चौक त्यास प्रथम अगोदरच नाव दिले आहे त्यास पुन्हा दुसरे नाव आले नाही पाहिजे. तर माझी आपणांस ही विनंती आहे की, संबंधित विभागाने याबाबत सविस्तरपणे चौकशी करावी, कुणाचेही नाव देण्या अगोदर कारण की शहरामध्ये हा वादाचा विषय निर्माण होतो. व त्यामध्ये सर्व राजकीय पक्ष सहभागी होतात. म्हणुन याबाबत गंभीरतेने विचार करून असे जे प्रस्ताव येतात त्यांची प्रथम सविस्तर चौकशी केली जावी. मला असे वाटते की दहा पंधरा मिनिटांची वेळ देवून ही गोष्ट सुध्दा स्पष्ट केली पाहिजे की रस्ते किंवा चौकांची नावे कुणासाठी पास केली पाहिजेत. असे दिसुन आले आहे की, बरेचसे लोक कुण्या ना कुणा नगरसेवकाच्या मार्फत असे प्रस्ताव आणत असतात. माझ्या आईचे, वडीलांचे, सास-याचे किंवा सासुचे नाव दिले जावे. अशा प्रकारचे प्रस्ताव असतात. अशा प्रस्तावाची बारीकपणे छाननी केली जावी. याबाबत ५-१० मिनिटांचा मध्ये लेक्चर ठेवला जावा. जेणेकरून सर्वांना सविस्तर माहिती मिळेल की, चौकांना, रस्त्यांना कुणाचे नाव दिले आहे व त्यांचे काय योगदान आहे. व कोणकोणत्या व्यक्तींची नावे रस्ते चौकांना दिली पाहिजेत. हे सर्व झाल्यानंतरच नावांचा प्रस्ताव आणला जावा.

काही सदस्य :-पास. पास.

मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्यांत येत आहे.

विषय क्र. २२:- उल्हासनगर -२ मधील स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन पी. शाह'' असे नांव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-२ मधील स्नेहा अपार्टमेंटते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) रस्त्याला '' स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त यात्री निवास व बगीच्याचे कोणतेही नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) पर्यंतच्या रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ४४ दिनांक:-२० ६ २००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील विषय या सभेच्या कार्यसूचीवरून वगळीत आहे.

कारण ____

सदर व्यक्तीचा पुर्व इतिहास व समाजकार्यासाठी योगदानाचा गोषवा-यात उल्लेख नाही म्हणुन त्यांच्या कार्याबाबतीत सविस्तर उल्लेख करून हा विषय कार्यसूचीवर आणला पाहिजे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २३:- ३९ सफाई कामगारांना मुकादम पदावर पदोन्नती देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज ही जी ३९ मुकादमांची पदे भरली जात आहेत. जे सेवाजेष्ठ आहेत. सेवाजेष्ठतेनुसार आहेत. म्हणुन त्यांना दिली जात आहेत. त्यामध्ये आमची काही हरकत नाही. परंतु मागच्यावेळी ३९ मुकादमांचा मुददा यासाठीच पुढे ढकलला होता. ७६ मुकादमांचाच प्रस्ताव महासभेसमोर आला पाहिजे. तर आमचे जे उपायुक्त आहेत श्री. भडकवाड साहेब त्यांनी त्यावेळी हे उत्तर दिले होते की, १० वर्षाचा अनुभव व सातवी पास जो असेल त्यास मुकादमाचे पद दिले जाईल. त्यामध्ये फक्त ३९ लोकच बसतात. तर आम्ही म्हंटले होते की यामध्ये काहीतरी बदल करा. तर आज आम्ही जो ७ व्या क्रमांकाचा विषय पारीत केला. त्यामध्ये त्यांनी ५ वर्षाचा अनुभव व इयत्ता ४ थी पास असेल त्यास मुकादम बनविले जाईल . ७ व्या क्रमांकाचा विषय आम्ही पारीत केला आहे. त्यानुसार ७६ मुकादम बसतील. परंतु आता आम्ही हा जो ठराव पारीत करणार आहोत. याबरोबर पुढील महिन्यामध्ये, आता आम्ही जे बदल करत आहोत. त्या हिशोबाने इतरांनाही मुकादमांची पदोन्नती मिळाली पाहिजे. नाहीतर महापालिकेच्या वतीने त्यांना असे बोलले जाईल की, आपण बिना आदेशाचे मुकादम आहात. यासाठी आपण आता सफाई करण्यासाठी जा. तर अशाप्रकारचा अन्याय त्यांच्यावर होता कामा नये. येणा-या महासभेत इतरांचाही मुकादमाबाबतचा प्रस्ताव आला पाहिजे. व हा प्रस्ताव आता पारीत केला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौरजी, ३९ मुकादमांचा जो प्रस्ताव येथे आणला आहे. त्यामध्ये कित्येक लोकांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे. त्याची सुध्दा छाननी झाली पाहिजे. व ....

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>आणि आयुक्त साहेब काही काही ठिकाणी असे आहे. की सफाई कामगार चार आणि मुकादम दोन. भरपुर ठिकाणी अशी परिस्थिती आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त ):-</u>मा. महापौरजी, या विषयाबाबत सभागृहास मी माहिती देणे उचित समजतो. हा जो विषय आहे तो. पदोन्नतीचे जे नियमित विषय आहेत त्यामधील नाही. मुकादमांचा जो विषय आहे तो असा आहे की, काही सफाई कामगार कोर्टात गेले होते. व औद्योगिक न्यायालयाने आदेश दिले होते की, आपल्याकडे जी पदे आहेत त्या पदांवर या लोकांना सेवाजेष्ठतेच्या हिशोबाने पदोन्नती दिली जावी. सन २००० चा तो आदेश होता. पंधरा दिवसामध्ये त्यांना पदोन्नती दिली जावी. त्यावेळच्या निवड समितीने जी अर्हता आपण/ महापालिकेने

*ठरविली आहे. त्यानुसार ३९ लोक बसत होते त्यांना पदोन्नती दिली होती. त्यांना आदेश दिले आहेत. त्या आदेशामध्ये एक अट घातली होती की, यांचा परिविक्षाधीन कालावधी सहा महिन्यापर्यंत मोजला जाईल व तो जर समाधानकारक नसेल तर त्यांना पदोन्नती दिली जाणार नाही. व त्यासाठी मागील वर्षी जेव्हा हा विषय आणला होता. तेव्हा सर्व आरोग्य निरिक्षकांकडुन आम्ही त्यांच्या कामाबाबतचे प्रमाणपत्र घेतले होते की ज्यांचे काम समाधानकारक आहे व त्या हिशोबाने मागील वर्षी त्यांचा प्रस्ताव आणला होता. या नेमणुका केलेल्या आहेत. पदोन्नती दिलेली आहे. ती कायम करण्यासाठी हा विषय आणला होता. मागील वर्षी या विषयावर न्यायालयाचा अवमान होवू नये म्हणुन मी बोलु इच्छित होतो परंतु सभागृहाने तो प्रस्ताव पुढे ढकलला मला बोलु दिले नाही. हा विषय त्या पदोन्नतीमध्ये नाही. हा विषय कोर्टाच्या आदेशानुसारचा आहे. म्हणुन तो पारीत होणे जरूरीचे आहे. पहिला जो सातव्या क्रमांकाचा विषय आला होता त्या विषयामध्ये सभागृहाचे असे मत आले होते की, ती जी शैक्षणिक अहर्ता आहे त्यामध्ये बदल करून सातवी पास व पाच वर्षाचा अनुभव असला पाहिजे तरीही आता ७० पदांमधुन आताची ही ३९ पदे व या आधीची १२ ही सोडुन जी शिल्लक रहतात त्या हिशोबाने पदोन्नती दिली जाईल.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>पास. पास?*

*<u>काही सदस्य :-</u>पास. पास.*

*<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय क्र. २३:- ३९ सफाई कामगारांना मुकादम पदावर पदोन्नती देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. उमपा/ २२९८/२०३०/प्र. क्र. २५० /९८/नवि-२३ मंत्रालय मुंबई -३२ दिनांक २८ सप्टेंबर,१९९९ अन्वये ४४ मुकादम पदावर मंजूर झालेली होती. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/आवि/आस्था/२४५ ते२८३ दिनांक २२.२. २००१ अन्वये खालील ३९ सफाई कामगारांना ६ महिन्याच्या परिक्षावधीन कालावधीकरीता त्यांचे परीक्षाविधीन कामाचा समाधानकारक अहवाल जोपर्यंत प्राप्त होत नाही. तोपर्यंत त्यांची केलेली नेमणुक तात्पुरत्या स्वरूपाची राहील. जर परिक्षाविधीन कालावधीमध्ये त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल अशा अटीवर मुकादम पदावर पदोन्नती करण्यात आली होती.

| अ. क्र. | सफाई कामगारांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. भगवानजी मोहन चव्हाण |
| २. | श्री. राजू शंकर हरीजन |
| ३. | श्री. जेठा काना मकवाना |
| ४. | श्री. मदनलाल अंगना चटोले |
| ५. | श्री. सखाराम कचरू मगरे |
| ६. | श्री. मनीराम ननुराम वाल्मीकी |
| ७. | श्री. रजनिस रामनिवास वाल्मीकी |
| ८ | श्री. कालीदास बालू चव्हाण |
| ९. | श्री. कांजी पुजा वाघेला |
| १०. | श्री. मुलजी विश्राम वाघेला |
| ११. | श्री. समुन लक्ष्मण शेलार |

| | |
|---|---|
| १२. | श्री. एकनाथ महादेव देवकर |
| १३. | श्री. भगवान रामभाऊ कसारे |
| १४. | श्री. रमेश सुखराम चव्हाण |
| १५. | श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडेराव |
| १६. | श्री. शशी रामप्रसाद चव्हाण |
| १७. | श्री. रामकिशन ताराचंद वाल्मीकी |
| १८. | श्री. रमेश सुमेरा वाल्मीकी |
| १९. | श्री. रमेश मख्खन चव्हाण |
| २०. | श्री. नामदेव केरू पाखरे |
| २१. | श्री. शालीक बळीराम मडवी |
| २२. | श्री. अशोक एस. खंडागळे |
| २३. | श्री. रामजी नारायण हरीजन |
| २४. | श्री. टील्लु रामभाऊ सोनवणे |
| २५. | श्री. दादू विठ्ठल गायकवाड |
| २६. | श्री. रामधारी सोरणदास हरीजन |
| २७. | श्री. सुरेश रामलाल हरीजन |
| २८. | श्री. इकबाल अहमद शेख |
| २९. | श्री. दिलीप प्रभाकर ससाणे |
| ३०. | श्री. देविदास त्रंबक केदार |
| ३१. | श्री. गौतम भाऊराव घोडेराव |
| ३२. | श्री. मनोहर भिमा भालेराव |
| ३३. | श्री. विलास शिवराम कांबळे |
| ३४. | श्री. राजेंद्र मख्खन चव्हाण |
| ३५. | श्री. फत्तुमल थावरदास कारा |
| ३६. | श्री. वासू टिकमदास फेरवानी |
| ३७. | श्री. राजेश मनविर बाळगुजर |
| ३८. | श्री. छिद्दी कन्हैया वाल्मीकी |
| ३९. | श्री. किशोर हिरालाल चव्हाण |

वरील मुकादम पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचा-यांचा परिक्षाविधीन कालावधी कामाचा समाधानकारक अहवाल संबंधित आरोग्य निरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेला आहे.

तरी वरील कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेण्याबाबत महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ४५ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मुकादम पदोन्नती देण्यांत आलेल्या ३९ कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेणेस मान्यता देत आहे.

*सुचकाची सही-*

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर /पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २४ वाचुन दाखवितात.*

**विषय** क्र. २४:- महापालिकेचे पात्र कर्मचा-यांना निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे पदोन्नती देणे बाबत.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, हा जो २४ व्या क्रमांकाचा विषय चर्चेस आला आहे. त्यामध्ये आमच्या महापालिकेच्या कर्मचा-यांना पदोन्नती दिली जात आहे. त्यासाठी आम्हाला अतिशय आनंद होत आहे. परंतु जेवढी काही पदे भरली जात आहेत. त्यांचा एकच गोषवारा तयार करून आमच्या समोर ठेवला आहे. त्यामध्ये प्रत्येक कर्मचा-याचे पद त्याचा इतिहास इत्यादीचा तपशिल जर स्वतंत्रपणे जर दिला तर आम्हाला त्यावर अभ्यास करणे सवलतीचे होईल. व ही जी २१, २२ पदे भरत आहात. निवड समितीने जो निर्णय दिला आहे. मला असे वाटते की, हा प्रस्ताव पुढे ढकलुन पुढच्या सभेत आणुन त्यामध्ये प्रत्येकाचा इतिहास असेल सेवाजेष्ठतेची माहिती असेल व जर या अगोदरच निवड समितीने कुणाचा प्रस्ताव नाकारला असेल किंवा निवड समितीने कुणाचा प्रस्ताव कधी कधी दिला आहे. त्याचा जर इतिहास माहित असेल तर आता आम्ही ही जी पदे भरणार आहोत त्यामध्ये प्रत्येकाला पदोन्नती ही पाहिजे. तीन तीन लोक तक्रारी घेवून फिरत आहेत. ते म्हणतात की आमच्यावर अन्याय झाला आहे. आमच्या पेक्षा कनिष्ठांना पदोन्नती दिली जात आहे. सेवाजेष्ठ असलेल्या दिली जात नाही. हा जो गैरसमज होत आहे. हा जो प्रस्ताव आणला आहे त्याबाबत माझी अशी विनंती आहे. की पुढील महासभेत या सर्वांचा अलग अलग गोषवारा आणुन त्यामध्ये त्यांचा इतिहास त्यांची सेवाजेष्ठता निवड समितीने त्यांची कधी कधी निवड केली आहे. ही सर्व माहिती असलेला तपशिल आणला तर चांगले होईल. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब आताच सभागृह नेत्यांनी सांगितले त्यावर आपण खुलासा केला तर बरे होईल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, अगोदर मागासवर्गीयांच्या अनुशेषाच्या भरती बाबत बोलताना मी भाष्य केले होते की, पदोन्नतीने नेमणुक करण्याची एक पध्दत इथे उपलब्ध आहे. जी पण व्यक्ती महानगरपालिकेमध्ये कामासाठी नेमली जाते. त्यास वेळेच्या आत पदोन्नती मिळाली पाहिजेआपण जर पाहिले तर महानगरपालिकेमध्ये प्रमोशनची पदोन्नतीची योजना व्यवस्थितपणे कार्यरत नाही. संवर्ग १ व संवर्ग २ च्या अधिका-यांच्या पदोन्नतीबाबत आपण पाहिले तर किंवा महसुल विभागाच्या किंवा भारतीय प्रशासकीय सेवेच्या पदोन्नतीबाबत पाहिले तर त्यांना विहित वेळेच्या*

*आत पदोन्नती मिळते. महानगरपालिकेमध्ये प्रत्यक्षात असे होते की कुणी व्यक्ती क्लार्क म्हणुन नियुक्त झाली तर ती क्लार्क म्हणुनच सेवानिवृत्त होते. असे होत असल्याने त्या व्यक्तीची कार्यक्षमता कमी होते. त्या व्यक्तीस काम करण्याची*

जी प्रेरणा पाहिजे ती मिळत नाही. यासाठी आस्थापना सूचीवर जी एकुण पदे आहेत. त्यातील काही टक्के नेहमी पदोन्नतीने भरली जातात. व पदोन्नतीसाठी जी पात्रता आहे त्यातील सर्वोच्च पात्रता आहे सेवाजेष्ठता आणि दुसरी जी पात्रता आहे ती त्याची शैक्षणिक पात्रता अनुभव सेवाजेष्ठतेनुसार जो पण व्यक्ती पात्र ठरतो किंवा वरीष्ठ पदासाठी जी शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. त्या हिशोबाने तो पात्र ठरत असेल तर त्यास पद रिक्त झाल्यानंतर पदोन्नती दिली पाहिजे. अशी काही पदे आमच्याकडे रिक्त आहेत. व त्या रिक्त पदावर कित्त्येक वर्षापासुन नेमणुका केलेल्या नाहीत. मला वाटते की, प्रशासनामध्ये गती येण्यासाठी, जे लोक येथे काम करत आहेत त्यांच्यामध्ये विश्वास येण्यासाठी असे पदोन्नतीचे प्रस्ताव आणले पाहिजेत. व ते सर्व अभ्यास करून, सेवाजेष्ठतेचा अभ्यास करून त्यांची छाननी करून जसे थेट भरतीसाठी एक निवड समिती आहे तशी एक समिती आम्ही नेमली होती. त्या समितीमध्ये मी स्वतः सुध्दा होतो. कारण की, हे अगोदर झाले आहे. तेव्हा अतिरिक्त आयुक्त म्हणुन मी स्वतः या समितीत होतो. आम्ही प्रत्त्येक प्रकरणाची छाननी केली आहे. आज जे लोक आपल्याकडे तक्रार घेवून आले आहेत की, आमची सेवाजेष्ठता गृहीत धरण्यात आलेली नाही. किंवा ते पात्र असताना सुध्दा त्यांची नियुक्ती केली नाही. किंवा त्यांना पदोन्नत केले नाही तर हे माझ्यामते चुकीचे आहे. जे लोक पात्र आहेत त्याच लोकांची आम्ही येथे शिफारस केली आहे. व अशा पात्र लोकांना सभागृहाने सुध्दा पदोन्नती दिली पाहिजे. अशी माझी स्वतःची आपणांस विनंती आहे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी व श्री. शांताराम निकम हे सभागृहातुन बाहेर पडले.**

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>सचिव साहेब या प्रस्तावावर मतदान घ्या.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u> :- जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावावर निर्णय करण्याचे बाजुने व आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्याच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>२३ मते</u>

१.श्री. भालेराव गौतम
२.श्रीमती. वसिटा बेबी
३.श्री. ठाकुर अशोक
४.श्री. बेहरानी ठाकुरदास
५.श्रीमती. जावळे संगिता
६.श्रीमती. मोकल सिमा चंदाराम
७.श्री. उमाप रामदास
८ श्री. पुरस्वानी जमनादास
९ श्री. रूपचंदानी बच्चाराम

१० श्री. असरोंडकर राज
११. श्रीमती. कृष्णानी रेखा
१२. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
१३ श्री. सोनावणे नथु
१४ श्री. गायकवाड दिलीप

१५ श्रीमती. बामणकर नंदिनी
१६ श्रीमती. माने किरण
१७ श्री. चव्हाण रमेश
१८. श्री. बोडारे धनंजय
१९ श्री. पाटील विश्वनाथ
२० श्रीमती. ससाणे लक्ष्मी
२१ श्री. चौधरी राजेंद्र
२२. श्रीमती. जयश्री. सुर्वे
२३. श्री. टाले प्रमोद

जे सन्माननिय सदस्य सदरचा विषय आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्याचे बाजूने, व सद्या प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या बाजुने नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>३७ मते</u>

१. श्रीमती. रामचंदानी भावना
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३ श्रीमती. कालानी ज्योती
४ श्री. वाघे शामु बाबु
५ श्री. ऐडके गणपत
६ श्रीमती. शर्मा कमला
७ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९ श्री. गुप्ता प्रभुनाथ
१० श्रीमती गुप्ता अनिता
११ श्री. पवार नाना आनंदा
१२ श्रीमती. आहुजा नीता
१३ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१४ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१५ श्री. गायकवाड सुरेश
१६ श्रीमती. वनवारी मोना
१७ श्री. वनवारी किशोर
१८ श्री. जेसवानी सतराम
१९ श्री. लुंड गोविंदराम
२० श्रीमती. खिलनानी भावना
२१ श्री. खेमाणी दर्शनसिंग
२२ श्रीमती. कारीरा रेखा
२३ श्री. पमनानी ईश्वर
२४ श्री. पंजाबी नारायण
२५ श्रीमती. पंजाबी दिपा
२६ श्री. साधवानी मनोज
२७ श्रीमती. भठिजा कोमल
२८ श्रीमती. माखिजा किरण
२९ श्री. होशियारसिंग लबाना
३०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३१ श्री. तलरेजा विनोद
३२ डॉ. नाथानी निना
३३ श्रीमती. रिझवानी सुजाता
३४ श्रीमती. भारती छाब्रिया
३५ श्री. जाधव सुरेश
३६ श्री. जाधव प्रशांत
३७ श्रीमती. साधवानी जया

***श्री. मोहन साधवानी :- तटस्थ***

***मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):-*** *सदरच्या प्रस्तावाबाबत बहूमताने पूढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.*

**विषय क्र. २४ :-** महापालिकेचे पात्र कर्मचा-यांना निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

सहा.आयुक्त/प्रभाग क्षेत्र अधिकारी

सहा.आयुक्त/प्रभाग क्षेत्र अधिकारी या पदनामाची एकुण ६ पदे मंजुर आहेत त्यापैकी ५ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सहा.आयुक्त व प्रभागक्षेत्र अधिकारी या पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता महापालिकेच्या सेवेत अधिक्षक किंवा त्यांस समकक्ष असलेल्या पदावरील सात वर्षे काम केल्याचा अनुभव अशी आहे. परंतु महापालिकेच्या आस्थापनेवर अधिक्षक या पदनामाचे पद मंजुर नाही परंतु त्यांस समकक्ष असलेल्या पदाची वेतनश्रेणी घेत असलेल्या कर्मचा-यांमधुन श्री.व्ही.आर.गर्जे हे पात्र कर्मचारी उपलब्ध झाल्यामुळे निवड समितीने सहा.आयुक्त व प्रभागक्षेत्र अधिकारी या पदावर श्री. व्ही. आर.गर्जे यांना पदोन्नतीने नेमणुक करणेबाबत शिफारस केलेली आहे.

वाहन व्यवस्थापक:-

वाहन व्यवस्थापक या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व कनिष्ठ अभियंता (वाहन/मेकॅनिक) या पदावरील ३ वर्षाचा अनुभव अशी आहे.

वाहन व्यवस्थापक या पदासाठी श्री.व्ही.एस.ठाणेकर ,प्लान्ट ऑपरेटर हे अनु. जातीचे उमेदवार आवश्यक पात्रता धारण करीत आहेत त्यामुळे श्री.व्ही.एस.ठाणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

९) वरिष्ठ लिपीक :-

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद<br>
अनु.जमाती -१ पद<br>
वि.जा.(अ) -१ पद<br>
खुले -९ पदे

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता

१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण<br>
२) महापालिका सेवेत लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव अशी आहे.

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देणेकरिता गोपनिय अभिलेखांची पडताळणी केली असता त्यांच्या गोपनिय अभिलेखात

कोणत्याही प्रकारचे नकारात्मक शेरे आढळुन आलेले नाही तसेच त्यांची योग्यता पाहिली असता श्री. अशोक चव्हाण हे वि.जा.(अ) या आरक्षित पदावर पदोन्नती देणेस पात्र आहेत अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री.मधुकर कनोजे ,लिपीक,कर विभाग हे होते परंतु ते सद्या निलंबीत आहेत तरी सद्यस्थितीत त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही त्यांचेनंतर सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री. बिनुकुमार बिहारीलाल हे

आहेत त्यांना अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नाही तसेच खुल्या प्रवर्गातुन पदोन्नतीसाठी खालिल नऊ पात्र कर्मचा-यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्रीम. कोशी खेमाणी, लिपीका, सामान्य प्रशासन विभाग
२) श्रीम. सुशिला मेठवाणी, लिपीका, कर विभाग
३) श्रीम. शोभा आर. अहुजा, लिपीका,लेखा विभाग
४) श्री. उमाशंकर मिश्रा, लिपीक, कर विभाग
५) श्री. मनवाणी मनोहर, लिपीक, जकात विभाग
६) श्री. राजकुमार पंजाबी, लिपीक, जकात विभाग
७) श्री. एस.जे. मिरचंदानी, लिपीक, जकात विभाग
८) श्री. लखो जी. पंजाबी, लिपीक, जकात विभाग
९) श्री. शिवकुमार मंगलानी, लिपीक, लेखा परिक्षण विभाग

लिपीक संवर्गातुन पदोन्नतीसाठी निवड केलेले उपरोक्त कर्मचारी हे पदोन्नतीची वेतनश्रेणी घेत आहेत आता त्यांची फक्त पदोन्नतीच्या पदावर पदस्थापना करावयाची आहे.

१०) उपलेखापाल

उपलेखापाल या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु.जाती - १ पद

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेतील वरिष्ठ लिपीक किंवा त्यांस समकक्ष अशा पदावरील सेवेचा अनुभव.

उपलेखापाल या पदासाठी जकात निरीक्षक तसेच वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचा-यांमधुन श्री. तुकाराम तारदाळकर , जकात निरीक्षक या पदावर दिनांक ७/४/१९८६ पासुन कार्यरत आहेत व ते सेवाज्येष्ठ पात्र कर्मचारी असल्याने श्री. तुकाराम तारदाळकर यांना उपलेखापाल या पदावर पदोन्नती देणेस निवड समिती शिफारस करीत आहे.

११) स्वच्छता निरीक्षक:-

स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेंकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचे प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे.
२) महापालिकेच्या सेवेतील स्वच्छता निरीक्षक या पदावर कमीत कमी दहा वर्ष काम केल्याचा अनुभव.

सेवाप्रवेश नियमावलीनुसार स्व. निरीक्षक या पदासाठीचे गुणोत्तर प्रमाणानुसार एकुण पदाच्या २५ टक्के म्हणजे एकुण १८ पदापैकी ४ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यापैकी २ पदे यापुर्वीच भरली होती व आता २ पदे भरावयाची होती पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु. जमाती- १ पद
खुले - १ पद

महापालिकेच्या मंजुर आस्थापनेवरील खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर श्री. एम.के.पाटील ,लिपीक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी असुन ते इ.मा.प्रवर्गात मोडतात तसेच त्यांनी सदर पदासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे तरी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर पदोन्नतीस पात्र आहेत.

१२) वरिष्ठ सुरक्षारक्षक:-

वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद
खुले - १ पद

सदर पदावर सुरक्षारक्षक या पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती द्यावयाची असल्याने श्री. बी. आर. बुरूड ,सुरक्षारक्षक हे खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर
पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत व सद्या ते पाणीपुरवठा विभागात कार्यरत आहेत. तसेच श्री. बिल्लु शंकर हे अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत परंतु संबंधित दोन्ही कर्मचारी हे सतत गैरहजर असतात त्यामुळे त्यांची सदर पदावर पदोन्नती देणेसाठी पात्रता नाही असे उपायुक्त (मुख्यालय) यांनी सुचित केले त्यामुळे त्यांच्या नावांचा विचार न करता पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु.जातीसाठी श्री.पी.डी.गुरखा,सुरक्षारक्षक हे आहेत परंतु ते मे महिन्यात सेवानिवृत्त होत असल्याने त्या पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु.जातीसाठी श्री. राजन खरात हे आहेत तसेच खुल्या प्रवर्गासाठी श्री. पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक हे पात्र उमेदवार आहेत

तरी श्री.राजन खरात व श्री.पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक यांची वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीस पात्र उमेदवार म्हणुन निवडसमितीने निवड केली आहे.

<u>लिडींग फायरमन:-</u>

लिडींग फायरमन या पदनामाची पदे हि पदोन्नतीने भरावयाची आहेत त्यापैकी पाच पदे यापुर्वीच पदोन्नतीने भरलेली आहेत व आता नऊ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) महापालिकेच्या सेवेतील फायरमन या पदावरील पाच वर्षाचा अनुभव तसेच शारिरीक दृष्टया पात्र.

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जमाती - २ पदे
वि.जा(अ) - १ पद
भ.ज.(क) - १ पद
खुले -७ पदे

फायरमन या पदासाठी आवश्यक प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण केलेल्या ज्या कर्मचा-यांची फायरमन या पदावर पाच वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे व लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीसाठी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या सात पदांवर खालिल पात्र कर्मचारी यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्री. व्ही.टी.पगारे, फायरमन, अनु.जाती
२) श्री. यशवंत एस. वाघ, फायरमन, इ.मा.व
३) श्री. बी.एम.जोशी, फायरमन, खुला
४) श्री. भिमराव खैरे, फायरमन, अनु.जाती
५) श्री. भागवत ए. पाटील, फायरमन, इ.मा.व
६) श्री. भास्कर टी. मिरपगारे,फायरमन, अनु.जाती
७) श्री. बी.बी.नेटके, फायरमन, अनु.जाती

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नती देण्यासाठी अनु. जमातीसाठी तसेच वि.जा.(अ) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदासाठी उमेदवार उपलब्ध नाहीत भ.ज. (क) या पदावर पदोन्नतीसाठी सुरेश मराळे हे उमेदवार उपलब्ध होत आहेत व ते लिडींग फायरमन या पदासाठी आवश्यक असलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार पात्र असल्यामुळे त्यांना सदर पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. ४६</u> <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार निवड समितीने सुचविल्याप्रमाणे विविध पदावर वर उल्लेखिलेल्या पात्र कर्मचा-यांना पदोन्नती बाबत विषय या सभेच्या कार्यसूचीवरून वगळीत आहे.

कारण ——

१. विविध पदांच्या एकत्रित गोषवा-यामधून समजून येत नाही की कुठल्या पदासाठी निवड समितीचा काय सविस्तर अहवाल आहे.
२. प्रत्येक पदासाठी निवड समितीच्या सविस्तर अहवालासह स्वतंत्रपणे विषय कार्यसूचीवर आणले पाहिजे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-विषय क्र. २५ वाचून दाखवितात.*

विषय क्र.२५:- खाडाबदली पध्दतीने १८७ सफाई कामगार नेमणे बाबत.

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-पास?*

***मा. सदस्य श्री. शांताराम निकम हे पुन्हा सभागृहात उपस्थित झाले.***

*मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- कोणत्त्या लोकांना घेणार? नाहीतर पून्हा ठाणे-मुंबई येथिल लोक काम करण्यासाठी येतील. कोणाला घेणाार, कधी घेणार, त्यांना वैयक्तीकपणे कळविणार की काय? हे सुध्दा स्पष्ट झाले पाहिजे. ठाणे मुंबई येथिल लोक येतील, ते चालेल का?*

*मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- स्थानिक लोकांना घ्या.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :- याबाबत मी एक सूचना देवु इच्छितो.*

*मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंडः-मा. महापौर महोदया, व मा. आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो की त्यांनी खाडाबदली कामगार कामावर घ्यावेत त्याचबरोबर १६७ नविन सफाई कामगारांची नेमणुक केल्याने उल्हासनगर शहरातील सार्वजनिक साफसफाईचे काम अधिक चांगल्या प्रकारे होईल त्याबाबत मी आपले अभिनंदन करून आपणांस धन्यवाद देतो.*

*मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सचिव साहेब कुणाला घेतले जाईल काय? ते नाही सांगितले.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-तीच तर सूचना देत आहे. औद्योगिक न्यायालयामध्ये युनियनवाल्यांनी एक तक्रार दाखल केली होती. त्यात असा आदेश*

झाला होता की जे अगोदर खाडाबदलीसाठी कामगार नेमले होते. १९८६ पासुन १०-१२ वर्षा पर्यंत मध्ये मध्ये त्याच लोकांना प्राधान्य देण्यात यावे. त्यांच्यासाठी त्यांचा एक अधिकारी नियुक्त केला होता. त्यांच्याकडुन एक सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात आली होती. ती आम्ही कोर्टामध्ये सादर केली होती त्यानुसारच आम्हाला प्राधान्य दयावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आयुक्त साहेब, नाले सफाईचे काय झाले? ज्यासाठी कामगार नेमायचे होते. जे आपण म्हंटले होते दोन महिन्यासाठी कामगार नेमु.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>यांना वेळोवेळी ब्रेक देण्यात यावा. जेणेकरून ते कायम सेवेची मागणी करू शकणार नाहीत. व दुसरे असे की, आपण जे आश्वासन दिले होते नाले सफाईसाठी दहा-दहा कामगार......

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>आयुक्त साहेब, प्रथम दहा दहा कामगार नेमण्याबाबत खुलासा करा.
<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहा....

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>आता राष्ट्रगीतासाठी उभे राहण्याचा मा. महापौरांचा आदेश आहे.

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>नाही, नाही. आपण खुलासा करा. त्यानंतर राष्ट्रगीत म्हंटले जाईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>सभागृहात जेव्हा कुणी सदस्य उभा राहतो तेव्हा दुस-यास बोलण्याची अनुमती नसते ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आपण म्हणत असाल तर आम्ही बसुन घेतो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>खाडा बदली कामगारांच्या नेमणुकीची पध्दत जी सचिव साहेबांनी सांगितली. याबाबत पहिले युनियन कोर्टामध्ये गेली होती. जी सेवाजेष्ठता यादी तयार केलेली आहे. त्यामधील जे सर्वात जास्त सेवाजेष्ठ आहेत असे १८७ कामगार घेतले जातील. व नाले सफाईसाठी या अगोदर जसे प्रत्येक वर्षी दोन महिन्यासाठी दहा-दहा कामगार घेतले जात होते त्यानुसार पहिल्या टप्यामध्ये आम्ही सफाई करून घेतलेली आहे. त्याचा परिणामही आपणांस माहित आहे. पावसाळा आता सुरू झाला आहे. तर एक महिन्यासाठी आणखी त्यांना मुदतवाढ दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>धन्यवाद.

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय क्र.२५:- खाडाबदली पध्दतीने १८७ सफाई कामगार नेमणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण १५५० सफाई कामगारांची पदे मंजूर आहेत. सदर पदांना खालील प्रमाणे मंजूरी प्राप्त झालेली आहे.

विभागीय आयुक्त, मुंबई यांचेकडील दिनांक २९/९/१९६०, २९/१२/१९६२, ५/१/१९६३ अन्वये अनुक्रमे ४११, २४, ३९, १० या पदांना तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक ३०/७/१९७६ अन्वये ११०, ९० पदांना, प्रादेशिक संचालक, न.पा.प्रशासन, कोकण भवन यांचेकडील १३/४/१९८३ अन्वये ५५ पदांना, संचालक, न.पा. मुंबई २९/७/१९८९ अन्वये ३०५ पदे, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील ११/६/१९९९ व २८/९/१९९९ अन्वये अनुक्रमे २०० व ३०६ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे उल्हासनगर महानगरपालिकेतील सफाई कामगार या पदनामाची एकूण १५५० पदे मंजूर आहे.

सद्यस्थितीत १५५० मंजूर पदापैकी १२८३ पदे यापूर्वी स्थायी आस्थापनेवर भरलेली आहेत व २६७ पदे रिक्त आहेत.

बर्मन समितीच्या शिफारशीप्रमाणे खालीलप्रमाणे प्रत्यक्ष कामगारांची आवश्यकता आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण प्रमुख रस्त्यांची लांबी १२५.१०किमी म्हणजेच १,२५,१०० मी. इतकी आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमधील २५० लांबीचा रस्ता प्रति सफाई कामगारास स्वच्छतेसाठी दिल्यास एकूण ५०० सफाई कामगारांची आवश्यकता भासते व ३५० मी. रस्ता साफसाफईसाठी १ सफाई कामगारास दिल्यास एकूण ४१७ सफाई कामगार यांची आवश्यकता भासते. म्हणजेच सदरचे कर्मचारी वगळता अन्य सफाई कामगार यांच्या सेवा गटारे, शौचालये, गल्लीबोळे साफसफाई करण्यासाठी प्रभावीपणे वापरण्यात येतात. तथापी सद्यस्थितीत भरती करणेत आलेल्या सफाई कामगारांची संख्या ही उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ, रस्त्यांची लांबी, गटारे, शौचालये, गल्ली बोळे लक्षात घेता पुरेशी आहे. परंतु ऑक्टोंबर/नोव्हेंबर महिन्यामध्ये शालांत सुट्टीच्या कालावधीत व दिपावलीच्या सुट्टीच्या कालावधीत तसेच मार्च, एप्रिल व मे महिन्याच्या शालेय सुट्टयांच्या कालावधीत सफाई कामगारांची उपस्थिती कमी असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे. व त्यामुळे सफाई कामावर विपरीत परिणाम होवुन नागरी आरोग्य धोक्यात येण्याची संभावनाही लक्षात आलेली आहे. त्या अनुशंगाने महासभेमध्ये गैरहजर कर्मचा-यांच्या बदल्यात खाडाबदली किंवा बदली कामगार घेणेबाबत वेळोवेळी चर्चा झाली आहे.

मुंबई महानगरपालिकेत सदर बदली कामगारांना भरती करणे संबंधी निकष ठरविले गेलेले आहे. त्यामुध्ये एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के कर्मचारी खाडाबदली किंवा रजेच्या कालावधीसाठी बदली कामगार म्हणून भरणेबाबत निकष कायम करण्यात आलेले आहेत. वास्तविक पाहता एकूण मंजूर पदाच्या ३० टक्के बदली कामगार भरणे ही बाब लक्षात घेतली असता एकूण भरती केलेल्या कर्मचा-यांपैकी ३० टक्के कर्मचारी हे वेगवेगळया कारणामुळे गैरहजर राहतील व त्यांच्या बदल्यात ३० टक्के कर्मचारी हे खाडाबदली किंवा बदली कर्मचारी म्हणून नियुक्त करुन गैरहजर कर्मचा-यांच्या बदल्यात सफाईचे काम पुर्ण करुन घेता येईल अशी धारणा ठेवल्यास एकूण मंजूर पदापैकी ३० टक्के पदे म्हणजेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एकूण १५५० मंजूर पदांपैकी ३० टक्के पदे म्हणजेच ४६५ पदे ही बदली कामगारांने भरने आवश्यकता आहे. असे गृहीत धरले तरी प्रत्यक्ष १०८५ कर्मचारी (१५५०-४६५) हे स्थायी पदावर भरती करणे आवश्यक होते. मात्र सद्यस्थितीत १२८३ कर्मचारी हे स्थायी आस्थापनेवर भरती करणेत आलेले आहे. म्हणजेच सद्यस्थितीत भरलेले १९८ कर्मचारी हे जास्तीचे भरती केलेले आहे असे दिसते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. ५४१/१९९९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार मा.श्री. बर्मन यांचे अध्यक्षतेखाली समितीस सफाईकामाचे बाबत अहवाल सादर करणेबाबत सुचित केल्यानुसार बर्मन समितीने सादर केलेल्या अहवालाचे निकष लक्षात घेता सद्यस्थितीत भरती केलेले कर्मचारी १२८३ यांची संख्या लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे एकूण १३ चौ.किमी क्षेत्रफळ व रस्त्यांची लांबी (१२५ Running Meter) लक्षात घेता भरती केलेल्या कर्मचा-यांची संख्या जास्तीची दिसते. एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के पदे मुंबई महानगरपालिकेच्या निकषांच्या आधारे खाडाबदलीसाठी भरती करणे ठरविल्यास एकूण ४६५ पदे खाडाबदलीसाठी भरणे अभिप्रेत आहे. म्हणजेच १५५० पैकी ७० टक्के पदे म्हणजेच १०८५ पदे स्थायी आस्थापनेवर व ४६५ पदे खाडाबदलीने अस्थायी आस्थापनेवर ठेवले असते तर ते महानगरपालिकेच्या हिताचे ठरले असते. मात्र सध्या स्थायी पदावर १२८३ पदे भरलेली असल्याने १९८ पदे स्थायी आस्थापनेवर जास्तीची भरलेली आहेत. तथापि बर्मन समितीच्या अहवालाचा विचार करता भरलेले १२८३ कर्मचारी हे ही

जास्तीचे असून त्यापैकी गैरहजर राहणा-या कर्मचा-यामुळेच स्वच्छतेच्या कामावरती परिणाम होत आहे असे निदर्शनास आले आहे. व सर्व १२८३ कर्मचारी हे हजर असल्यास सफाई कामामध्ये सुधारणा होईल अशी धारणा आहे. त्यामुळे स्थायी आस्थापनेवर भरती केलेल्या १२८३ पदांच्या ३० टक्के पदे म्हणजेच ३८५ पदे खाडाबदलीने भरती केल्यास स्वच्छतेत सुधारणा होवू शकते व पैकी १९८ पदे ही आगोदरचं जास्तीची भरलेली आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेवर स्थायी आस्थापनेवर भरलेल्या कर्मचा-यांच्या ३० टक्के कर्मचारी म्हणजे ३८५ कर्मचारी व त्यामधून पूर्वी जास्तीचे भरलेले १९८ कर्मचारी वगळले असता १८७ कर्मचारी यांची खाडाबदलीने भरती केल्यास साईस्कर होईल. अशी प्रशासनाची धारणा आहे.

महाराष्ट्र शासन राज्य पत्र दि. २७ डिसेंबर,२००१ अन्वये महाराष्ट्र राज्य उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२, दि. २७.१२.२००१ ची अधिसूचना प्रसिध्द झालेली असून सदर अधिसूचनेमध्ये किमान वेतन अधिनियम -१९४८मधील तरतूदीनुसार परिमंडळ ३ साठी प्रतिमहा रक्कम रु. ३०००/- एवढे वेतन निश्चित करण्यात करण्यात आलेले आहे. उल्हासनगर महानगरपालिका ही परिमंडळ - ३ मध्ये समाविष्ठ होते. खाडाबदली कर्मचारी यांना त्यामुळे प्रत्येकी किमान १००/- रु. प्रतिदिन वेतन दयावे लागेल म्हणजेच १८७ खाडाबदली कर्मचारी यांना रक्कम रु. १८,७००/- प्रतिदिन व रक्कम रु. ५,७९,७००/- प्रतिमहा व रक्कम रु. ६९,५६,४००/- प्रति वर्ष वेतनावर खर्च होण्याची शक्यता आहे. याशिवाय प्रवास भत्यावर अंदाजे १ लाख रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे अंदाजपत्रकात सदर रकमांची तरतूद करणे आवश्यक आहे.

सबब खाडाबदलीने १८७ कर्मचारी भरती करणे, अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाची तरतूद करणे व खाडाबदलीची योजना अंमलबजावणी करणेसाठी प्रशासकीय कामकाज पूर्ण करणेसाठी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना प्रधिकृत करणेस्तव प्रस्ताव मा. महासभेपूढे सादर.

<u>महासभा ठराव क्र. ४७</u> <u>दिनांकः-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाचे समायोजनाच्या अधीन राहून उपलब्ध अधिकृत सेवाजेष्ठता यादी प्रमाणे रितसर खाडाबदलीने १८७ सफाई कर्मचारी नेमणूक करणेस आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u> :-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.***

जन गन मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ७. ५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१८/७/२००३

**इतिवृत्त**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८/७/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. १८.७. २००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१)मा. महापौरः- श्रीमती. मालती करोतिया
२)मा. उपमहापौरः-श्रीमती जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३६. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३७. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३८ | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ४०. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४१. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४३. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. यादव लालबिहारी | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेन्द | ५२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ५३. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५५. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ५६. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) |
| २४. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २८. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३०. | श्री. मोहन साधवानी, | ६३. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६४. | श्री. इदनानी राजू चंद्रभान |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६७. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३५. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | | |

तर

१)मा. सदस्य श्री. सोनावणे नथु काशिराम २)मा. सदस्य श्री. टेकचंदानी राजु मथुरदास, ३)मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड ४)मा. सदस्या श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) ५)मा. सदस्य श्री. सुरेश नामदेव गायकवाड ६)मा. सदस्या श्रीमती. माने किरण बाळकृष्ण ७)मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे ८)मा. सदस्य श्री. साधवानी मनोज लालचंद ९)मा. सदस्या श्रीमती. किरण लखी माखीजा १०)मा. सदस्या श्रीमती मिनु राज दासानी ११) मा. सदस्या डॉ. निना प्रकाश नाथानी १२)मा. सदस्य श्री. हरदास माखिजा हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्वप्रथम वंदेमातरम म्हणून सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्त्तरे.

प्रश्न क्र. ९८ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे. मागच्या वेळी अर्धवट राहिला होता.

<u>प्रश्न क्र. ९८:-</u> एम.एस.ई.बी. हॅस इन्स्टॉलेड ट्रान्सफॉर्मर ॲण्ड इरेक्टेड द पोलस इनवॉल्व टाउनशिप. वेदर दे हॅव ऑबटेनेड नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट / परमिशन फॉर्म यु.एम.सी.

वेदर एम.एस.ई.बी. पेड रेंट फोर द ट्रान्सफॉर्मर / पोल्स इरेक्टेड, इफ येस, हाउ मच अमाउंट रिवाईड / पेड बाय देम , इफ नॉट गिव रिझन्स.

<u>उत्तरः-</u> महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून ना हरकत दाखलासाठी विदयुत ट्रान्सफार्मरचे अर्ज नकाशासह या विभागास सादर केल्यानंतर जागेची पाहणी करून तसा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठीसादर करण्यात येतो. सदर सभेची मंजुरी घेतल्यानंतर सदर विदयुत ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत ना हरकत दाखला देण्यात येतो. उदा. नंदा गार्डन क्र. ४४४ उल्हासनगर-१ येथे स्थायी समिती ठराव क्र. ६५ , दिनांक २९.१०.१९९९ च्या अन्वये मंजुरी घेऊन ना हरकत दाखला देण्यात आले आहे.

गेल्या तीन वर्षापूर्वी जेव्हा-जेव्हा एम.एस.ई.बी. ने ट्रान्सफार्मरसाठी विनंती केलेली आहे. तेव्हा वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेऊन ना हरकत दाखला दिलेला आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडुन रस्ता लगत बसविण्यात येणारे ''विद्युत खांबा'' बाबत कोणतेही भाडे या विभागाकडून घेतले जात नाही. कारण जेवढे भाडे त्यांचेवर लावण्यात येईल तेवढेच भाडे सरचार्ज म्हणून विद्युत बिलामार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ परत वसुल करणार, या कारणास्तव कोणतेही भाडे आकारण्याचे प्रश्न उदभवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मा. महापौर, आयुक्त व सन्माननिय सदस्य माझा एक सुझाव आहे. आमच्याकडे जे प्रश्नोत्त्तरे येतात. आज ११० प्रश्न क्र. सुरू होत आहे. तो मागच्या वर्षीचा ३ ऑगस्टचा प्रश्न आहे, २००२ सालचा. म्हणजे एकेका वर्षाने प्रश्नाचा नंबर येतो. त्यादिवशी माझे सभागृह नेत्त्यांशी पण बोलणे झाले की ऐकेक वर्षानंतर प्रश्न येतात. आणि जे प्रश्न असतात ते प्रशासनाच्या कार्यात गतिमानता आणण्यासाठी असतात. माझा असा एक सुझाव आहे की,

प्रश्न दिल्यावर प्रशासनाने उत्तर देण्यासाठी तयार असले पाहिजे. जेणेकरून प्रश्न लवकर संपतील. व माझा आणखी एक सुझाव आहे की एक तास तर आपण प्रश्न घेतोच एखादया सभेत दोन तास फक्त प्रश्नोत्तरेच घ्यावीत. किंवा एखादया सभेत सर्व प्रश्न पुर्ण करण्याचा प्रयत्न करावा. नाही तर एकेक वर्षाने जेव्हा उत्तर येते. तेव्हा उत्तर देण्यात काही अर्थ नसतो. खुप सारे प्रश्न असे असतात ज्यांना नंतर काही अर्थ रहात नाही व प्रशासनाला गतिमान करण्याचा जो हेतु असतो तो देखिल साध्य होत नाही. यावर काही तरी मार्ग काढला पाहिजे. तुम्ही उत्तर दया यावर.

**मा. सदस्य श्री. आनिल जयसिंघानी व श्रीमती. आनिता गुप्ता हे सभागृहातुन बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>मा. महापौर महोदया, मी भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक श्री. लाल पंजाबी यांच्याशी पुर्णपणे सहमत आहे. आपण नेहमीच असे म्हणत आलो की प्रश्नाचे उत्तर योग्य दयावे. समाधानकारक दिले जावे. व उपप्रश्नासाठी आमच्या अधिकारींनी तयारीने यावे. परंतु खुप दुर्दैवाने म्हणावे लागते की असे होत नाही. आम्ही कित्येक वेळा वृतपत्र प्रसारच्या माध्यमाव्दारे पण ही गोष्ट सांगितली आहे. की शहरामध्ये कित्येक जागी स्वयपाक घरात लागणा-या गॅसचे केरोसिनचे फटाके आहेत. परंतु लक्ष नाही दिले गेले. श्री. राजेंद्र चौधरी यांनी प्रश्न क्र. १९६ याबाबतीत विचारला आहे. त्यामध्ये ही चिंता व्यक्त केली गेली आहे. व आपण काल टिव्हीमध्ये पाहिले असेल की कशाप्रकारे गोदामात रसोई गॅसमुळे कशात-हेने नुकसान झाले आहे. किती लोक मेले, किती करोडो लोकांची जनहानी झाली आहे. देशामध्ये अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. हे सिध्द होते की आपल्या शहरात आपण अशी घटना घडु नये यासाठी जागृत असले पाहिजे. वारंवार विचारणाा-या प्रश्नाचे उत्तर दिले जावे. कित्येकदा असे होते की, आमच्या प्रश्नाची उत्तरे एक दिड वर्षानी येतात. तोपर्यंत त्यांचे उत्तर समाधानकारक नसते. आणि उपप्रश्न जर विचारला तर अधिकारी उत्तर दयायला तयार नसतात. म्हणुन सदस्यांची भावना लक्षात घेवून एकतर उत्तर बरोबर दिले जावे. जसे याच महासभेमध्ये एका जागेचा उल्लेख होता. त्या उत्तरात असे लिहिले लोकेशन समजत नाही. त्यामध्ये पुर्णपणे सविस्तर वर्णन दिले होते. जर प्रश्न समजत नसेल तर फोन करून नगरसेवकांना विचारले जावू शकते की आपला प्रश्न काय आहे व त्याचे योग्य उत्तर दिले गेले पाहिजे. सदस्य शहराच्या हितासाठी प्रश्न विचारतात. त्यांना योग्य उत्तर दयावे. संबंधित अधिकारीने पुर्ण जबाबदारीने सदनाची दिशाभुल न करता उत्तर दयावे. जयहिंद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आयुक्त साहेब, तुम्ही आधी माझ्या प्रश्नाचे उत्तर देणार का की श्री. लाल पंजाबी साहेबांनी विचारले त्या प्रश्नाचे उत्तर देणार. मी नंतर बोलतो.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौर महोदया, कुणी सन्मानानिय सदस्य जेव्हा प्रश्न विचारतो नियमानुसारच विचारतो. त्यांना अधिनियमानुसार अधिकार आहे प्रश्न विचारण्याचे म्हणुन ते विचारतात. नियमात असे देखिल आहे की अर्धा तास जो प्रश्नोत्तराचा कालावधी असला पाहिजे. प्रश्न देण्याआधी सात दिवस अगोदर कळविले पाहिजे. आपणा सर्वांना हे माहित आहे की जेव्हा तुम्ही प्रश्नाची सूचना देता. तेव्हा पहिल्याच सभेत तुम्हाला लेखी उत्तर मिळालेले असते. चर्चा करणे हे कायदयात नाही आहे. तरीही पण तुम्ही चर्चा करता. कायदयाच्या बाहेर जावुन. तर ते तसे पण मंजुर नाही. तुम्हाला लेखी उत्तर पहिल्याच सभेत मिळते. फक्त प्रश्नाचा नंबर चार पाच सभेनंतर येतो. परंतु उत्तर मात्र पहिल्याच सभेत दिले जाते.

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तुम्ही जसे म्हणता. समजा आम्हाला प्रश्नाचे उत्तर समजले नाही तर आम्ही कुणाशी बोलणार? आपण उत्तर दिले ते चुकीचे असेल तर आम्ही चर्चा करणार ना? याचा अर्थ असा नाही की अधिकारींनी जे उत्तर दिले ते बरोबर आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, नियमानुसार प्रश्नाचे उत्तर पहिल्या महासभेतच दिले जाते. आपल्या इथे प्रत्येक प्रश्नावर चर्चा होते त्यामुळे २,३ प्रश्न होतात. नियमानुसार आपण ज्या सभेमध्ये प्रश्न विचारण्याची सूचना देता. त्या सभेपुर्वी आपणांस लेखी प्रश्नाचे उत्तर प्रस्तुत करण्यात येते. आपल्या इथे प्रत्येक प्रश्नावर बरीच चर्चा होते. म्हणुन २,३ प्रश्नापेक्षा जास्त प्रश्न होत नाही. लोकसभा, विधानसभेमध्ये प्रश्न विचारण्याच्या पध्दतीप्रमाणे जितके सन्माननिय सदस्य प्रश्न विचारतात तितके प्रश्नाचे लेखी उत्तर दयायचे व सभेत प्रश्नांच्या संख्येपैकी कुठले प्रश्न विचारायचे हे चिठ्ठी काढुन किंवा अन्य पध्दतीने ठरवुन प्रश्नाला अग्रक्रम असतो जर एखादा प्रश्न त्यासभेत विचारता आला नाही. तो सभेतुन वगळले असे समजता येते पण त्यांना दिलेले लेखी उत्तर प्रश्नाचे उत्तर मानण्यात येते. ते प्रश्न पुढे ढकलण्यात येत नाही. या महानगरपालिका नियमात होत नसलेले प्रश्न पुढच्या सभेत ढकलता येतात. त्यामुळे आपल्यास इष्ट वाटेल तर लोकसभा , विधानसभा समांतर पध्दती वापरता येईल परंतु आपणांसमोर नियमात सुधारणेसाठी प्रस्ताव आणावा लागेल. आपणांस स्विकृत असेल तर आपण संशोधन करू.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>महापौर महोदया, एक मिनिट खुप चांगला प्रश्न आहे. मी उदाहरणासाठी एक प्रश्न देत आहे. रसोई गॅसचे जे गोदाम भरलेले आहे. त्यासाठी महापालिकेने परवानगी दिली आहे का असा श्री. राजेंद्र चौधरी यांनी प्रश्न विचारला आहे. उत्तर देण्यात आले. नाही दिली. ठिक आहे उत्तर दिले. परंतु त्याबाबतीत अधिकारींनी जी तत्परता नाही दाखवली. लक्ष तुमचे तिकडे वेधले परंतु त्याबाबतीत कारवाई काय केली? फक्त उत्तर दिले त्यांची जबाबदारी पुर्ण झाली. असे नाही झाले पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आयुक्त साहेब, मागच्या वेळी मी हा प्रश्न विचारला होता त्यावेळी तुमच्याकडे माहिती नव्हती. पुन्हा विचारत आहे. एम.एस.ई. बी. ने जे पोल व ट्रान्सफार्मरमर लावलेले आहेत त्याची परवानगी घेतली आहे की नाही? यात उत्तर दिले आहे की दोन ठिकाणाची त्यांनी परवानगी मागितली आहे. परंतु मी हे म्हणु इच्छितो की हे जे पोल महापालिकेतर्फे हलविले जातात. त्याचा १०० टक्के खर्च एम.एस.ई.बी घेते. जेव्हा त्यांनी लावले तेव्हा त्यांनी महापालिकेची परवानगी घेतली होती का? कारण अजुन पर्यंत ७४ सालचा मंजुर विकास आराखडा योजना तसाच आहे. तुम्ही वरील प्रमाणे उत्तर दिले असुन माझा हा प्रश्न २००२ सालचा आहे. १ वर्षापेक्षा जास्त दिवस झाले आहेत. यापुर्वी तुम्ही जर परवानगी दिली नसेल तर या एक वर्षात तुम्ही दिली आहे का? ट्रान्सफार्मरमर कसा लावला पाहिजे कुठे लावला पाहिजे. त्यांनी आपल्या मर्जीने लावला. जेव्हा आपण आपले रोड वायडिंगचे काम सुरू होते तेव्हा त्याबाबतीत त्यांनी खर्च मागितला.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जेव्हा हा प्रश्न आला होता तेव्हा माझ्याकडे माहिती नसल्याने मी नंतर उत्तर देईन म्हंटले होते त्यानुसार सचिवांकडे मी सुधारित उत्तर दिले आहे. परंतु ते जर देण्यात आले नाही. ते उत्तर मी देतो. आजपर्यंत एम.एस.ई.बी. ने महापालिकेचे ट्रान्सफार्मरमर हलविण्यासाठी परवानगी घेतली नाही.इथे जे लिहिले आहे दोन प्रकरणात परवानगी घेतली आहे ते चुकीचे उत्तर आहे. आजपर्यंत एम.एस.ई.बी. ने कधी परवानगी मागितली नाही.*

मा. सदस्य श्री. महेंद मुलचदांनी व श्री. वाघे शामु हे सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मग एम.एस.ई.बी. वर महापालिकेने काय कारवाई केली. आपण एम.एस.ई.बी ला करोडो रूपये देतो त्यासाठी महापालिकेची काय पॉलिसी आहे. यापुर्वी तर नाही केले पण यापुढे पण असेच चालणार का? महापालिकेने पॉलीसी तरी सांगावी की काय करू इच्छितात. परवानगी देवू इच्छितात. एम.एस.ई.बी.ला नोटीस देवू इच्छितात की तुम्ही परवानगी घ्या. का आधी जसे चालायचे तसेच चालणार. पॉलिसी निश्चित झाली पाहिजे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>एम.एस.ई.बी. चे ट्रान्सफार्मर असो वा टेलिफोन लाईन ते एम.एस.ई.बी व टेलिग्राफ ॲक्ट नुसार कारवाई होते. जर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असेल तरच परवानगी घ्यावी लागते नाहीतर गरज नाही पडत. ट्रान्सफार्मर लावला गेला, लाईन टाकली गेली तर वाहतुकीस जर अडथळा येत असेल. त्यांना डायरेक्ट लाईन टाकण्याचा अधिकार आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>नाही. नाही जसे आता समजा पुर्ण रोडवर लावायचे. समजा पवई रोड आहे. तो डी.पी.मध्ये ७४ साली देखिल ६० फुट होता. आजपण ६० फुट आहे परंतु लाखो रूपये एम.एस.ई.बी. ला दयावे लागले शिफ्टींग साठी त्यासाठी महापालिकेने काय केले? त्यासाठी धोरण निश्चित केले पाहिजे. ट्रान्सफार्मरमर त्यांनी लावले समजा ३० किंवा ४० फुट रोड करायचा आहे. डी.पी मध्ये ४० फुट आहे परंतु त्यांनी ३० फुटाच्या आत ट्रान्सफार्मरमर लावला. आपण त्यांना लाखो रूपये देतो. हे जे नुकसान होते याला जबाबदार कोण? यापुढे काय होणार? मी आपणांस विचारू इच्छितो महापालिका काय धोरण आखणार आहे. त्यांनी काल पर्यंत परवानगी मागितली नाही पण यानंतर तुम्ही काय करणार. जसे चालु आहे तसेच राहणार का? लाखो रूपये त्यांना आपण दिले आहेत. ट्रान्सफार्मरमर लावण्याचे आणि काढण्याचे देखिल. आता या महापालिकेचे धोरण काय आहे याबाबतीत. यांनतर काय होईल? आजच्या उत्तरानंतर महापालिका काय करू इच्छिते की महापालिका त्यांच्याकडुन पैसे घेईल, परवानगी देईल का जसे त्यांना हवे तसे त्यांना करू दयाल. माझा विचारण्याचा उददेश हा आहे कारण की, महापालिकेचे लाखो रूपये. एम.एस.ईबी ने घेतले आहेत. आपले काम असते तर ते म्हणतात पैसे दया. आणि जेव्हा स्वतःची त्यांची चुकी असते तेव्हा काही नाही. मला हे सांगा आजच्या नंतर महापालिकेचे याबाबतीत धोरण काय असणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हे खरे, एम. एस.ई.बी. ने महानगरपालिकेची परवानगी न घेता लाईन टाकली किंवा पोल उभे केले त्यामुळे रस्ते खराब होतात. सप्टेंबर १९८५ साली परीपत्रक काढले त्यामध्ये ट्रान्सफार्मर व पोल हलविणेकामी ५० टक्के खर्चाचे ओझे महानगरपालिकेने सोसावे असे निर्देश होते. आता त्यांनी भुमिका बदलली. आता जो काही खर्च ट्रान्सफार्मर हलविण्यासाठी १०० टक्के खर्च महानगरपालिका करते. मध्यंतरी रस्त्यांचे रूंदीकरण करण्यात आले. त्यामुळे अगोदरचे पोल रस्त्याच्या मध्ये आलेत. ते हलवावे लागतील नाहीतर अपघात होतील. म्हणुन महानगरपालिकेने हा खर्च केला. एम.एस.ई.बी. कडुन वसुल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. नगरपालिकेची परवानगी घेतल्याशिवाय थेट ट्रान्सफार्मर लावु नये असे एम.एस.ई.बी ला सांगितले जाईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ११० श्री. रमेश चव्हाण यांचा असून त्यांनी मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांना प्राधिकृत केल्याने ते प्रश्न विचारु शकतात.

प्रश्न क्र. ११०:- उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयातील सीट नं. २८ मध्ये बॅ. नं. १६२२ समोर, से. २६, उल्हासनगर-४ प्राथमिक शाळेसाठी आरक्षण आहे का?

उत्तर :- होय.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- महापौर महोदया, मी आपल्या माध्यमातून आयुक्तांना विचारु इच्छितो की, या प्रश्नाचे जे उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरावरती ते ठाम आहेत की यावर सुध्दा सुधारित उत्तर दयायचे आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- तिन्ही प्रश्न एकत्र ना? ११० , १११ ,११२ ....
.

प्रश्न क्र. १११ :- सदरील आरक्षित जागेवर महालक्ष्मी रेस्टारंट ॲण्ड बारचे बांधकाम उभे राहिलेले आहे का?

उत्तर :- प्रत्यक्ष जागेवर महालक्ष्मी रेस्टारंट ॲण्ड बारचे बांधकाम उभे राहिलेले आहे.

प्रश्न क्र. ११२ :- सदरच्या बांधकामास महापालिकेने नगररचना कायदयाअंतर्गत अनाधिकृत बांधकाम केल्याप्रमाणे नोटिस बजावलेली आहे का? असल्यास कोणत्त्या तारखेस?

उत्तर :- कार्यालयीन अभिलेखावरुन सदर बांधकामाबाबत कोणतीही नोटिस दिल्याचे आढळून येत नाही.

प्रश्न क्र. ११३ :- सदरच्या बांधकामावर महापालिकेने कारवाई का केलेली नाही?

उत्तर :- सदरचे बांधकाम हे १९९५ पूर्वीचे असल्याचे मालमत्ता कर पावती करुन दिसून येते. महाराष्ट्र शासनाने ठरविलेल्या धोरणावरुन १/१/९५ नंतरच्या अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करणेचे शासनाचे धोरण आहे. उपरोक्त बांधकाम हे १९९५ पूर्वीचे असल्याचे उपलब्ध कागदांवरुन दिसून येते. त्यामुळे सदर बांधकामावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- ११० क्रमांकापासून ते ११३ क्रमांकाचे प्रश्न हे एकाच मुददयाशी संबंधित आहेत. तर या प्रश्नांची जी उत्तरे दिली आहेत. ती उत्तरे तशीच ठेवुन चर्चा करायची की त्याच्यामध्ये बदल आहे? त्याचे कारण असे आहे की, ११२ क्रमांकाचा जो प्रश्न आहे, त्याच्या उत्तरात तुम्ही असे म्हटले आहे की, कार्यालयीन अभिलेखा वरुन सदर बांधकामाबाबत कोणतीही नोटिस दिल्याचे आढळून येत नाही व माझ्या हातात नोटिस आहे दि.७/४/१९९३ ची नोटिस आहे. त्या बांधकामाला बजावलेली. पण उत्तर असे दिले आहे की, नोटिस दिल्याचे आढळून येत नाही. त्यानंतर पुढचा प्रश्न आहे की, त्याच्यामध्ये विचारले आहे कारवाई का केली नाही? तर उत्तर असे दिले आहे की, सदरचे बांधकाम हे १९९५ पूर्वीचे असल्याचे मालमत्ता कर पावती वरुन दिसून येते. पॉलिसी ठरलेली आहे का? हा एक प्रश्न दुसरे असे की, पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतांना तुम्ही मान्य केले आहे. बांधकाम रिझर्व प्लॉटवरच आहे. आरक्षित भुखंडावर बांधकाम असेल आणि जर ते १९९५ पूर्वीचे असेल तर ते पाडू नये.

अशी काही पॉलिसी ठरलेली आहे का? तर हा सुध्दा त्यामध्ये मुददा आहे. मी या प्रश्नावरती महापौरांच्या अनुमतीने थोडीशी आणखी सविस्तर चर्चा करणाचे कारण असे आहे की, प्रकरण अतिशय गंभीर आहे या प्रकरणातील जे अनेक मुददे आहे ते मुददे जर एकेक बघितले तर त्यातून अनाधिकृत बांधकामाच्या समस्येला प्रशासनाकडुन कसे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रित्या संरक्षण मिळते त्याचे एक चांगले उदाहरण आहे. उत्तर तेच आहे की,बदलणार आहेत.

( इथे मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात प्रवेश केला )

साहेब प्रश्नातल्या काही गोष्टी यात काही गंभीर बाबी आहेत त्या सभागृहासमोर मी मुददाम ठेवू इच्छितो, त्यातली पहिली गोष्ट ही आहे की, हे जे बांधकाम आहे ते साईड नंबर २०१ प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेला भुखंडाचे आहे. आणि तिथे जे बांधकाम आहे ते बियर बार आहे. त्या बियर बारच्या लायसन्ससाठी जी परमिशन घेतली आहे ती यु.नं. १६ च्या जागेवरची आहे. त्या बियर बारच्या बांधकामासाठी जे परमिट घेतले आहे. ते यु.नं. १६ वर घेतले आहे. महापालिकेचे जे लिगल कन्स्ट्रक्शनचे सर्टिफिकेट आहे. ते १६ वरती घेतलेले आहे. परंतु बांधकाम मात्र २०१ वर केलेले आहे. ते यु.नं. १६ वर नाही आहे. असे असतांना सुध्दा ज्यावेळेला हे प्रकरण कोर्टामध्ये गेले त्यावेळेला कोर्टामध्ये नगरपालिकेने हे एक्सेप्ट केले की ते बांधकाम यु.न. १६ वर आहे.

<u>मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> मा. महापौर महोदया, प्रश्न क्र. ११०,१११,११२,११३ याबाबतीत मी सदनाचे लक्ष वेधू इच्छितो की, या प्रश्नाचे उत्तर आमचे तत्त्कालीन उपायुक्त श्री. कारचे साहेबांनी दिले आहे. यात प्रश्न क्र.११० जो आहे, त्याचे उत्तर जे दिले आहे ते बरोबर आहे. १११ क्रमांकाचे उत्तर देखील बरोबर आहे. ११२ नंबरचा जो प्रश्न आहे, त्यात जे लिहिले होते कार्यालयीन अभिलेखावरुन सदर बांधकामाबाबत कोणतीही नोटिस दिल्याचे आढळून येत नाही. मी दिलगीरी व्यक्त करतो, हे जे उत्तर दिले गेले आहे ते चुकीचे आहे. याचे योग्य उत्तर हे आहे की, या बांधकामाला <u>७/४/९३</u> रोजी नोटिस दिली होती. त्यानंतर या बांधकामाचा इतिहास असा आहे की, जेव्हा हे बांधकाम सुरु झाले त्यावेळी तात्त्कालीन ज्यु.इंजिनिअर श्री. गोसावी जे नगररचना विभागात होते. त्यांनी ४ डिसेंबर, ९२ मध्ये या बांधकामाला भेट दिली होती. हे बांधकाम अवैद्य आहे यांना तोडले जावे अशी तोंडी सुचना दिली त्यानंतर ७ एप्रिल ९३ रोजी एमआरटीपी ॲक्ट अन्वये नोटिस दिली गेली.
त्या नोटिसीच्या विरुध्द जो संबंधित विकासकर्ता आहे तो ठाणे कोर्टात सिव्हील सुट नं. <u>१७/९३</u> अन्वये स्टे ऑर्डर घेउन आला होता. तो स्टे ऑर्डर मार्च ९४ पर्यंत कन्टिन्यू होते. ११ मार्च ९४ रोजी तोच स्टे ऑर्डर डिसमिस झाला. त्या आदेशाविरुध्द त्यांनी पुन्हा मिसिलिनिअस सिव्हिल अपिल नं. <u>१०२/९६</u> दाखल केले. त्या अर्जाचा अंतिम रिझल्ट २६ एप्रिल, २००१ मध्ये आला आहे. त्यामुळे २००१ पर्यंत त्यावर कारवाई झाली नाही. त्यानंतर २१ जानेवारी , २००२ मध्ये पुन्हा त्याच्या विरुध्द तक्रार येणे सुरु झाले तर त्यावर डाक्युमेंटरी कॉल लेटर दिले गेले. त्यांनी जी कागदपत्रे आमच्याकडे दिली त्यांना जे परमिट दिले गेले, महापालिकेकडुन त्यांना <u>२१/७/९९</u> रोजी सर्टिफिकेट पण दिले आहे. ते असे की,आपला दिनांक <u>१७/७/९९</u> च्या अर्जानुसार आपणांस कळविण्यांत येते की, आपला प्लॉट नं. २०१ शिट नं. २८ , बॅरेक नं. १६२० च्या समोरिल बांधकामास कर आकारणी झाली असून संपूर्ण बांधकाम जूने असून अधिकृत आहे. परंतु बांधकाम पूर्णत्त्वाचा दाखला दिलेला नाही. हे जे डॉक्युमेंट आमच्यासमोर आहे, हे खुप जुने बांधकाम आहे. एक दुसरे विरुध्द कागद प्रस्तुत केल्यामुळे आजपर्यंत त्या बांधकामावर कारवाई होऊ शकली नाही. परंतु मला वाटते की, मागे काही दिवसापूर्वी विशेष महासभा अनाधिकृत बांधकामाविषयी बोलावली होती. त्या महासभेमध्ये आमच्या आयुक्त साहेबांनी स्पष्टपणे सांगितले होते की, जे पण अनाधिकृत बांधकाम असेल त्याच्यावर आम्ही कारवाई सुरू केली आहे. तर मला असे वाटते की, ती जी कारवाई सुरू केली आहे.

याबाबतीत न्यायालयीन जेवढी प्रकरणे होती ५९८ त्यामध्ये याचा देखिल उल्लेख आहे. त्यावर नक्कीच कारवाई केली जाईल.

<u>मा.सदस्य श्री. राज असरोंडकरः</u>-सभागृहाने ऐकले की प्रकरण कनिष्ठ न्यायालयात गेले. तिथे तो केस हरला. आपण बांधकाम तोडायला पाहिजे होते. अपिलामध्ये गेला. अपिलामध्ये गेल्यामुळे कारवाई झाली नाही. अपिलामधली केस सुध्दा तो हरला त्यानंतर आपण त्याला डॉक्युमेंट कॉल केले? कोर्टमध्ये हे अनाधिकृत बांधकाम करणारा व्यक्ती न्यायालयामध्ये दोनदा हरला. दोनदा हरल्यानंतर आपण त्याच्याकडे डॉक्युमेंट कॉल केले कारवाई नाही केली. आता तो पुन्हा कोर्टात गेला आहे. तुम्ही आज पुन्हा सांगाल तो कोर्टमध्ये आहे. आता कोर्टात नाही. दुसरा त्यामध्ये मी हा मुददा मांडला की आपल्या नगरपालिकेने हे मान्य केले आहे की सदरचे बांधकाम यु नं. १६ वर आहे परंतु प्रत्यक्षात तसे नाही. मग आपण कोर्टमध्ये सुध्दा असे ॲफीडेव्हीट सादर करतो का? त्याचे लिगल कंन्स्ट्रक्शन सर्टीफीकीट आहे ते फेक आणि बोगस आहे. ही माहिती तरी आपल्याकडे आहे की नाही? आयुक्त महोदय त्या बारवाल्याने त्याच्या बारसाठी वापरलेले परमिट लिगल कंन्स्ट्रक्शन सर्टीफीकीट फेक आणि बोगस आहे. ते महापालिकेचे खोटे शिक्के सहया करून बनविले आहे. त्यावर एक माणुस परमिट काढतो बार उघडतो. शाळेसाठी आरक्षित भुखंडावर बांधकाम करतो आणि बिनधास्तपणे दहा वर्ष बार चालवतो. म्हणजे कोर्टमध्ये दोनदा हरूनही आपण कारवाई करत नाही. म्हणजे याच मोठया शिताफिने आपण बांधकामे वाचवली ना? अशी शेकडो उदाहरणे आमच्याकडे आहेत. आम्हाला तुमच्याकडुन हे आश्वासन पाहिजे. थातुरमातुर उत्तर नको आहेत. सदरचे बांधकाम आपण कधी निष्कासित करणार आहात?

<u>मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> मा. महापौर महोदया ,मा. सदस्यांनी विचारले आहे की, कोर्टमध्ये हारून देखिल त्यांना डॉक्युमेंटरी कॉल केले आहे. मला असे वाटते की तत्त्कालिन उपायुक्त यांनी प्रथम असे करतात की, यु शुड डिमॉलिश स्ट्रक्चर बाय फालोइंग डयू प्रोसेस ऑफ लॉ. तत्त्कालिन उपायुक्त यांनी जे डॉक्युमेंटरी कॉल लेटर दिले असेल प्रशासनातर्फे काही चुक होऊ नये म्हणुन दिले असेल यात काही चुक नाही. हे बांधकाम अवैध आहे. निश्चित त्यावर कारवाई केली जाईल. ते डेमॉलिश केले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-डॉक्युमेंटरी कॉल तुम्ही केव्हा केले? कोर्टाचा निर्णय काय लागला होता ते जरा सांगा. कोर्टाने काय निर्णय दुस-यांदा जेव्हा दिला.

<u>मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> अपिल डिसमीस केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-त्यांनी अपिल कशासाठी केले होते?

<u>मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> लिगल आहे माझे तोडु नये म्हणुन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-ते डिसमिस केले म्हणजे तोडा. म्हणजेच कोर्टाने आदेश दिले. त्याच्यानंतर देखिल प्रशासन त्याला डॉक्युमेटरी कॉल कशाला करतात. म्हणजे हे २००१ सालीच तोडायला पाहिजे होते. २००१ साली जो कोर्टाने निकाल दिला की तोडा त्याचे २००३ साली आम्ही उत्तर देतो की ते ९५ पुर्वीचे आहे. हे काय आहे? आणि तरी एकेक तास चर्चा होवू नये अशी तुमच्या प्रशासनाची अपेक्षा आहे. उत्तर सरळ सरळ चुकीचे दिले आहे. नोटीस दिली आहे म्हणुन आता सांगता. अगोदर सांगता नोटीस दिलेली नाही. का चर्चा होणार नाही? मग एक प्रश्न एक तास काय दोन दोन दिवस जातील. जर तुमच्या प्रशासनात पारदर्शकता नसेल तर? प्रशासन जर पारदर्शक असेल तर आणि तरच एका ओळीचे उत्तर समर्पक होईल. समाधानकारक होईल. परंतु कोर्टाचा

निर्णय देखिल तुम्ही धाब्यावर बसवता. अशा प्रकारचे प्रशासन तुम्ही चालवता. काय होणार? लाकांनी, सदस्यांनी या महासभेमध्ये प्रश्न विचारायचे विविध ठराव आणायचे, लोकांच्या भावना मांडायच्या त्याचा तुमच्यावर काही परीणाम होणार नाही. जर कोर्टाचा अपमान करत असाल अशाप्रकारे तर लोकांचा तुम्ही काय आदर ठेवणार? २००१ साली जे बांधकाम तोडायचे होते ते बांधकाम २००३साली ९५ चा दाखला देता की शासनाचा नियम ९५ चा आहे. ही कुठली पध्दत आहे? अपिल डिसमिस केले म्हणजेच तोडायला सांगितले हा कोर्टाचा निर्णय आहे. कधी तोडणार तुम्ही बेकायदेशिर आहे हे लक्षात आल्यानंतर देखिल प्रशासनाकडुन कार्यवाही होत नाही. एक जबाबदार नागरिकाने तुमच्या लक्षात आणुन दिल्यानंतर की प्लॉट नं. १६ वर आहे तरी तुम्ही त्यांचे समर्थन करता. अगोदर डॉक्युमेंट तुमच्याकडे आहे ना? कुठल्या आधारे तुम्ही कोर्टात गेला होता. कोर्टाने महापालिकेला प्रतिवादी केलेच होते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>ते डॉक्युमेंट बोगस आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>ते डॉक्युमेंट बोगस आहेत तर तुम्ही एफ.आय.आर दाखल केला पाहिजे ना?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>यामध्ये बरेच प्रकार उघडकीस येत आहेत. जसे की, त्या बांधकाम धारकाने महापालिकेची कागदपत्र तयार केली आहेत. बोगस तयार केली आहेत. ती कोणी दिलेली आहेत. तर त्याच्यावर सुध्दा ती कारवाई व्हावी ज्यांनी दिलेले आहे ते कर्मचारी अजुन असतील कुठे तरी हा पायंडा बंद करा. त्यासाठी कुठेतरी कठोर निर्णय घ्या.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापालिकेने एक्साईजला कळविले पाहिजे. त्यांनी जे लिगल कंन्स्ट्रक्शन सर्टीफीकेट प्रोडयुस केले आहे. ते फेक आहे ते महापालिकेने दिलेले नाही आहे. त्यावर जो बांधकाम धारक आहे त्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे.फेक डॉक्युमेंट प्रकरणी.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया,सन्माननिय सदस्य श्री. बोडारे व श्री. असरोंडकर यांच्या भावनेशी मी सहमत आहे. तिथे महालक्ष्मी बारचे कंन्स्ट्रक्शन झाले आहे. व इतर लायसन्ससाठी शासनाकडे त्यांनी फेक डॉक्युमेंट दिले आहे. त्याची पण चौकशी केली जाईल. व ते डॉक्युमेंट फेक आहेत. असे जर असले तर त्यांच्याविरूध्द कायदेशिर कारवाई केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री रमेश चव्हाणः-</u>साहेब, ते बांधकाम तोडणार किती दिवसात अंदाजे?

<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u>किमान ४५ दिवस.

<u>मा. सदस्य श्री रमेश चव्हाणः-</u>म्हणजे तुम्ही त्याला कोर्टात जायला वेळ देणार.

<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u>त्यात असे आहे की, जर डयु प्रोसेस फॉलो करणार त्यासाठी जी नोटीस देणे गरजेचे आहे ती दिली आहे. परंतु त्यानंतर हिअरींग किंवा वेकेशन ऑफ प्रिमायसेस करणेसाठी नोटीस दयावी लागेल. त्यासाठी आमच्या आयुक्त साहेबांनी जे आता सर्व न्यायालयीन प्रकरणे दिली आहेत. त्यास किमान ४५ दिवस तर लागणारच. माझ्याकडे ६०९ प्रकरणे कोर्टाची आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः- त्या बांधकामाला एम.आर.टी.पी. ॲक्ट अन्वये नोटीस बजावली आहे ९४ साली ३० दिवस कधीच पुर्ण झाले आहेत.

मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-सध्या ५९८ कोर्टाने निकाल दिलेल्या केसेस डिमॉलेशनसाठी आलेल्या आहेत. त्यावर हिअरींग घ्यायच्या आहेत. त्यासाठी अजुन चार उपायुक्त लागतील. आणि त्याप्रमाणे वर्क लोड असते. एका उपायुक्तांना करणे शक्य नाही. नगररचनाकारांनी ३१ केसेस दिलेल्या आहेत. दुस-या ७८ केसेसचे निकाल आलेले आहेत. श्री. पोखरकर साहेबांच्या पिरेडमधले १०१ प्रकरणे आहेत. ऐवढया सगळया केसेस एका उपायुक्तांना हिअरींग देवून डेमॉलिश करून देण्यासाठी वेळ लागेल. किमान ४५ दिवस मला अपेक्षित आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आयुक्त महोदय, या बांधकामाना ७ एप्रिल ९४ या दिवशी एम.आर.टी.पी. अंतर्गत ५३ ची नोटीस दिलेली आहे. त्याची मुदत संपली ना ३० दिवसामध्ये त्याच वेळेला मग पुन्हा नोटीस? माझी महापौर महोदयांना विनंती आहे की यावर विधी अधिकारींनी पण प्रकाश टाकावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, जर नोटीस दिली असेल तर त्याचे हिअरींग घ्यावे लागेल. स्पीकींग ऑर्डर पास करावे लागेल. नोटीस जर दिली आहे तर ३० दिवस ते मोजण्यात येतील. ते १५-२० दिवसातच होईल. परंतु हिअरींग घेवून स्पीकींग ऑर्डर पास करून. महानगरपालिका कार्यवाही करू शकते. त्याशिवाय जर काही हरकत घेतली तर कायदयाच्या मर्यादेत येवून आपल्या कार्यवाहीला स्टे मिळु शकतो. आपण कार्यवाही करू नाही शकणार. व मला वाटते जे बांधकाम आठ वर्षापासुन तिथे उभे आहे. ९५ च्या अगोदरचे ते डिमॉलीश करण्यासाठी काही दिवस जर आम्हाला पाहिजेत तर सदनाने दिल पाहिजेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-लिगल ओपिनियन काय आहे याबाबत. महापौर महोदया, माझी आपणांस विनंती आहे की या विषयावर आयुक्तांनी तर स्पष्टीकरण दिले आहे. पण मला असे म्हणायचे आहे की सभागृहासमोर याचे जे लीगल ॲस्पेक्ट आहे. एकदा जर एका बांधकामाला एम.आर.टी.पी. अन्वये नोटीस दिल्यावर काय त्यांना वारंवार नोटीस दयायची गरज आहे का? यावर कायदेशिर मत देखिल सभागृहासमोर आले पाहिजे. तर मी सचिव साहेबांना जे विधी अधिकारी देखिल आहेत त्यांना विनंती करतो की, यावर त्यांनी प्रकाश टाकावा.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-अधिकतः लोक कोर्टात का जातात जेव्हा महानगरपालिका त्यांना नोटीस देते. त्या नोटीसला आव्हान देण्यासाठी कोर्टात जातात. एकदा नोटीस दिल्यावर दुस-यांदा नोटीस काढत नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,मी पण स्पष्टपणे सांगितले होते की, त्यांना दुस-यांदा नोटीस नाही दिली जाणार फक्त सुनावणी करून स्पीकींग ऑर्डर पास करून पुढची कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-न्यायालयाच्या निर्णयानंतर देखिल आपण सुनावणी घेणार का हे कितपत योग्य आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,जेव्हा न्यायालयानी स्पष्टपणे सांगितले आहे. महानगरपालिका डयु प्रोसेस ऑफ लॉ फॉलोअप करून या स्ट्रक्चरवर कारवाई करू शकते याचा अर्थ आहे डयु प्रोसेस ऑफ लॉ फॉलोअप करून म्हणजे नोटीस देवून हीअरींगला बोलावुन स्पिकींग ऑर्डर पास करणे व त्यानंतर त्या व्यक्तीस स्वतः बांधकाम तोडण्याची संधी

देणे.जर त्याने नाही केले तर महापालिकेने डेमॉलिश करायचे आहे. व त्याचा खर्च त्या व्यक्तीकडुन वसुल करणे आणि इतकेच नाही तर एम.आर.टी.पी. ॲक्ट ५३ अन्वये त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करणे हे सर्व महापालिकेला अधिकार आहे. आणि त्याचा उपयोग केला जावू शकतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ११४ व ११५ हा श्री. राज असरोंडकर यांचा असून तो प्रश्न नाकारण्यांत आला आहे. म्हणुन या सभेत घेता येत नाही. प्रश्न क्र. ११६ श्री. शांताराम निकम यांचा आहे.

प्रश्न क्र. ११६:- प्रभाग क्र. ९ (जुने १४, १५, १६)मधील रामजी आंबेडकर नगर, दहाचाळ, महात्त्मा फुले, डिफेन्स कॉलनी, सुभाष टेकडी, भारत नगर, पंचशील नगर, साईबाबा नगर, हनुमान मंडळ, नागसेन नगर, कानसई रोड, सरदार पाडा, वगैरे भागात पाणी कुठून पोहचवले जाते? किती ईंचाच्या पाईप लाईन आहेत?प्रत्त्येक विभागात किती वेळ पाणी मिळते? कृपया माहिती दयावी.

उत्त्तर :- सुभाष टेकडी, भारत नगर, पंचशील नगर, साईबाबा नगर, हनुमान मंडळ, नागसेन नगर, कानसई रोड, सरदार पाडा, इत्त्यादी भागांना लालचक्की येथुन बुस्टर पंपाद्वारे पाणी पुरवठा करण्यांत येतो. या ठिकाणी १५० मिमि. व्यासाच्या दोन मुख्य जलवाहिन्या असून १०० मिमि. ते ५० मिमि. व्यासाच्या इतर वितरण वाहिन्या आहेत. तसेच रामजी आंबेडकर नगर, दहाचाळ, महात्त्मा फुले, डिफेन्स कॉलनी इत्त्यादी भागाला पाणी पुरवठा कार्यालयाजवळील जलकुंभाद्वारे पंपाद्वारे व काही भागाला पोलादी जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा करण्यांत येतो. या ठिकाणीही १०० मिमि. ते ५० मिमि. व्यासाच्या वितरण वाहिन्या आहेत. प्रत्त्येक विभागात किमान अर्धा तास व कमाल दोन तास पाणी पुरवठा करण्यांत येतो.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मी पुन्हा आपली क्षमा मागतो हा प्रश्न विचारून एक वर्ष झाले. त्यावेळी पाण्याची तीव्रता आमच्या प्रभागात बरीच होती. आता ब-याच प्रमाणात कमी आहे परंतु यापुढे आपण काय कार्यवाही केली आहे. आपण त्यावेळेस जे उत्त्तर दिले होते त्याची कार्यवाही आपण कुठपर्यंत आणली आहे. ते कृपया सदनास सांगावे.

श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-मा. महापौर महोदया, ११६ क्रमांकाचा जो प्रश्न श्री. शांताराम निकम यांनी विचारला आहे. तर या प्रभागात ऑगस्ट २००२मध्ये जी स्थिती होती. आज त्यामध्ये खुप बदल झाले आहे. बाकीच्या विभागात तक्षशिला येथे जो जलकुंभ आहे त्यातुन पाणी देण्याचे प्रस्तावित आहे. त्यातुन काही भाग असे आहेत जसे की रामजी आंबेडकर नगर, दहा चाळ ,महात्त्माफुले कॉलनी, डीफेन्स कॉलनी इत्त्यादी भागांना तक्षशिलाच्या जलकुंभाव्दारे पाणीपुरवठा केला जातो व जे उर्वरीत भाग आहेत. जसे सुभाष टेकडी, भरत नगर, पंचशिल नगर, साईबाबा नगर, हनुमान नगर, नागसेन नगर, कानसई रोड, सरदार पाडा इत्त्यादी भागांसाठी १४ इंचाची पाईप लाईन टाकण्याचे काम प्रगती पथावर आहेत. व येणा-या दहा-पंधरा दिवसात ते काम पुर्ण झाल्यास तक्षशिला जलकुंभाव्दारे पाणी पुरवठा सुरू केला जाईल.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. महापौरजी, जे दहा लाखाचे काम चालु आहे ते याच योजनेत होते परंतु ते काम अदयाप पर्यंत बंद आहे. व आपणांस माहित आहे की, ३ नंबरहुन जे पाणी मिळते सुभाषटेकडी, साईबाबा नगर किंवा पुर्ण विभागात तर ३ नंबरहुन मिळणारे पाणी कमीत कमी ३ महिन्यापासुन बंद झाले आहे. तर आपण ते लवकरात लवकर सुरू का नाही करत? काम का थांबले आहे ते?

श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):- पाईप लाईन लेयींगचे काम पुर्ण झाले आहे. जॉइडींग मटेरियल जे लागते स्वीस वॉल चे ऑर्डर दिले आहेत. संबंधित ऐजन्सीने

ते मटेरियल प्रोक्युअर झाल्यावर काम सुरू केले जाईल. आणि येणा-या दहा पंधरा दिवसात ते काम पुर्ण करून तक्षशिला येथुन पाणी पुरवठा सूरू केला जाईल.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-आपण जे उत्तर दिले ते उत्तर मी मान्य करून आपल्यावर पुर्ण विश्वास ठेवून मी समाधान मानतो. धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ११७ श्री. शांताराम निकम यांचा आहे.

प्रश्न क्र. ११७:- प्र.क्र. ९ मधील भारतनगर, साईबाबानगर, येथे पाणी मिळण्यासाठी काही प्रयोजन आहे काय? असल्यास माहिती दयावी.

उत्तर :-सुभाष टेकडी, भारतनगर, साईबाबानगर येथे पाणी देण्याकरीता अंदाजपत्रके तयार करण्यांत आली असून, सदर भागाला तक्षशिला जलकुंभाद्वारे पाणी देणे प्रस्तावित आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ११८ श्री.राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र११८ :- कल्याण-अंबरनाथ रोडवर शांतीनगर येथे उल्हासनगर महानगरपालिकेने उभारलेल्या प्रवेशद्वाराचे नाव ''श्रीमंत छत्रपती महाराज'' प्रवेशद्वार असे असतांना प्रवेशद्वाराच्या कोनशिलेवर मात्र ''शहिद दुनिचंद कालानी'' प्रवेशद्वार असे कोरलेले आहे हा काय प्रकार आहे? या संतापजनक प्रकाराला कोण जबाबदार आहे? तत्संदर्भात महापालिका काय कार्यवाही / कारवाई करणार आहे?

उत्तर :- कल्याण-अंबरनाथ रोडवर शांतीनगर येथे महानगरपालिकेने उभारलेल्या प्रवेशद्वाराचे नाव ''श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज'' प्रवेशद्वार महासभा ठराव क्र. ७, दिनांक २०/६/२००१ अन्वये देण्यांत आले आहे, हे खरे आहे.

प्रवेशद्वाराच्या कोनशिलेवर ''शहिद दुनिचंद टी. कालानी इंटरन्स गेट'' असे नाव कोरलेले आहे. हे ही खरे आहे. पूर्वी महासभेचे ठराव क्र. ३८७, दिनांक १७/४/१९८९ अन्वये कल्याण-अंबरनाथ रस्त्याला ''शहिद दुनिचंद कालानी रोड'' असे नाव देण्यांत आलेले आहे.

पूर्वी झालेली चुक दुरुस्ती करण्यासाठी ''शहिद दुनिचंद कालानी रोड'' हे नांव कोरण्यासाठी मा. महासभेने मान्यता देण्यासाठी स्वतंत्ररित्त्या प्रस्तावित करण्यांत येत आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. ११९ श्री.राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. ११९:- महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने २२ नोव्हेंबर, २००१ रोजी जारी केलेल्या परिपत्रक क्र. संकिर्ण १०/२००१/६६/प्र.क्र.२२/नवि/२७ नुसार महानगरपालिकांनी महिला केंद्रस्थानी मानुन नियोजन करणे, तसेच वार्षिक/ पंचवार्षिक ''महिला सक्षमीकरण योजना'' तयार करणे अपेक्षित आहे. अशी योजना उल्हासनगर महानगरपालिकेने तयार केली आहे काय?

*<u>उत्तर :-</u>महिला सक्षमीकरण योजना अदयाप तयार करण्यात आलेली नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, हा असा प्रश्न आहे, आपल्या महापालिकेत महापौर महीला आहे, उपमहापौर महिला आहे, स्थायी समिती सभापती महिला आहे याचा अर्थ आपल्या महापालिकेत एकात-हेने महिलांचेच राज्य आहे. परंतु त्यानंतर देखिल मी वरीलप्रमाणे प्रश्न विचारला असुन त्यानुसार महिला सक्षमीकरण योजना तयार करायला पाहिजे होती.*

*<u>काही सदस्य :-</u>तिघीही सक्षम आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>बाकीच्यांना सक्षम बनवायचे आहे. तर ही योजना बनवायला पाहिजे होती परंतु असे उत्तर देण्यात आले की अशा प्रकारची कोणतीही योजना महापालिकेत नाही. एका साध्या ओळीने उत्तर देवून महाराष्ट्र शासनाचे उल्लंघन केले जाते तर त्याचा आम्ही स्विकार करायचा का? हा इथे मुददा आहे. २० नोव्हेंबर २००१च्या शासन पत्रकात स्पष्टपणे म्हंटले आहे की, महापालिकेमध्ये जर कोणती योजना आखायची आहे किंवा कार्यक्रम आखायचा आहे तर त्यामध्ये महिलांचा सहभाग असणे आवश्यक आहे. दुसरे असे म्हंटले आहे की, महापालिकेचे जे बजेट आहे. ते बजेट तयार करताना देखिल महिलांना विश्वासात घेवून संघटनांशी बोलणे जरूरी आहे. तर हे सर्व या महापालिकेत केले जाते का? महिला बोलत नाही म्हणुन मला बोलावे लागते.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया,सदनासमोर जे उत्तर दिले गेले आहे ते सप्टेंबर २००२ मध्ये दिले होते. त्यावेळी दिलेले उत्तर देखिल चुकीचे होते. मला माहित नाही मला कित्त्येकदा सांगावे लागेल की चुकीचे उत्तर दिले आहे. परंतु असे झाले आहे. आधी जे उत्तर दिले ते चुकीचे होते. २२ नोव्हेंबर २००१चे जे शासन परिपत्रक होते. त्याआधीच इकडे महिलांसाठी काही योजना कार्यान्वित आहेत. त्यातुन एक योजना आहे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या परिपत्रकात देखिल त्याचा उल्लेख आहे आणि मी सदनाला सांगु इच्छितो की या योजने अंतर्गत आम्ही महिलांचे ४५ बचत गट स्थापन केले आहेत. व आजपर्यंत ३०९ महिलांना कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामध्ये १३२ महिलांना ब्युटीपार्लरचा कोर्स, ४५ महिलांना टेलरिंगचा कोर्स, ४६ महिलांना इमिटेशन ज्वेलरी बनविण्याचे काम त्याचे कोर्स , ५ महिलांना ड्रायव्हींगचे प्रशिक्षण दिले आहे. व ८० महिलांना कॉम्प्युटर ऑपरेटरचे प्रशिक्षण दिले आहे. अशा ३०९ महिलांना प्रशिक्षण दिले आहे. महिला सक्षमीकरण योजने अंतर्गत जी योजना महिलांसाठी आहे त्याचा योग्य त-हेने उपयोग येथे होत आहे परंतु उत्तर चुकीचे होते. त्या चुकीच्या उत्तरासाठी मी सदनाची माफी मागतो.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात स्वतंत्र तरतुद केली आहे का? यामध्ये असे म्हंटले आहे की, महिलांना सक्षम करण्यासाठी कोणती धोरणे योजना, कार्यक्रम राबविण्यात येणार? त्याकरिता किती निधी देण्यात येणार? त्यांचा महिलांवर परिणाम प्रत्त्येक नगरपालिका, महापालिका विभाग त्यांच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात महिलांचे सक्षमीकरण या प्रकरणात स्पष्ट करेल. आपल्या बजेटमध्ये महिलांचे सक्षमीकरण असा काही प्रकरण आहे का? आपण स्वतंत्रपणे त्यावर विचार केला आहे का? निधी ठेवलेला आहे का? आपण महिलांचे सक्षमीकरण या योजनेमध्ये महिलांसाठी काही योजना आखलेल्या आहेत का? आणि दुसरे महत्त्वाचे असे आहे त्यामध्ये की, त्यात असे म्हंटले आहे की महिला व त्यांच्या गटांसाठी म्हणजे सुवर्ण जयंती योजने अंतर्गत जे स्वयंसहाय्यकाचे जे गट बनविणार आहोत तर त्या गटांसाठी नगरपालिका, नगरपरिषदा यांच्यातर्फे निर्माण करण्यात येणा-या व्यापारी संकुलातील वितरीत होणा-या गाळयांपैकी ३० टक्के गाळे महिलांच्या स्वयंसाहाय्यिका गटांसाठी राखुन ठेवण्यात यावे. त्यांचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घ्यावी. म्हणजे*

इतका महत्त्वपुर्ण निर्णय आपण सर्वांनी यावर अंमल केला आहे का?महापालिकेचे जे पण कॉम्प्लेक्स आहेत. तिथे महापालिकेचे कमर्शिअल गाळे आहेत. तिथे ३० टक्के आरक्षण महिला स्वयंसहसय्यिका गटाला घ्यायचे आहे. त्याचा लाभ इथे दिला गेला आहे का? आणि जर नसेल दिला लाभ तर तो देणे सुरू करणार का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापालिकेने जिथे कमर्शिअल सेंटर विकसित केले आहेत. त्यामध्ये ३० टक्के दुकान महिलांना दिले पाहिजे. हा निर्णय आधी झाला होता. आजपर्यंत जितके दिले गेले त्यामध्ये महिलांना दुकाने तर दिली गेली परंतु ते ३० टक्याच्या हिशोबाने नाही. खुप कमी संख्येने महिलांना दुकाने दिली आहेत. परतु आता महानगरपालिकेमध्ये जितके पण दुकाने आहेत. व ऑकमडेशन रिझर्व्हेशन अंतर्गत जितकी पण दुकाने आम्ही मिळवली त्यामध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>फक्त एक छोटीशी बाब निर्दशनास आणु इच्छितो, मी एक प्रश्न विचारला होता १२० क्र. की महिला आणि बालकल्याण समितीची कर्तव्ये काय असतील असा प्रश्न होता तो माझा प्रश्न नाकारण्यात आला. पण या शासन निर्णयात याचे पण उत्तर आहे की, ही जी महिला सक्षमीकरण योजना आपल्याला स्वतंत्रपणे बनवायची आहे तर त्याचे समन्वय महिला व बालकल्याण समितीकडुन करण्यात यावे. असे जी. आर. मध्ये म्हंटले आहे. माझी आयुक्त महोदयांना विनंती आहे की, ही जी समिती महत्त्वपुर्ण आपल्या महापालिकेत बनली आहे. त्यामध्ये केवळ हे विकत आणले, वाटले वगैरे तेवढीच कामे न करता या समितीच्या माध्यमातुन महिला सक्षमीकरण योजना जर परिणामकारकपणे राबविली तर त्यातुन आपल्याला काहीतरी रिझल्ट मिळेल असे मला वाटते. तर त्यादृष्टीने सुध्दा लक्ष देण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. १२० हा श्री. राज असरोंडकर यांचा असून तो प्रश्न नाकारण्यांत आला असल्याने तो सभेत घेता येणार नाही.

प्रश्न क्र. १२१ ,१२२ ,१२३ ,१२४ ,१२५ श्रीमती. संगिता जावळे यांचा आहे.
सध्या सदस्या उपस्थित नसल्याने त्याची कार्यवृत्तात नोद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र.१२१:-</u> प्रभाग क्र.१ मध्ये हॅपी होम बिल्डींगमध्ये यु.एम.सी. / टी.पी.डी. /बी.पी. १५१ सीट नं. ७५-९९-१६४ च्या इमारतीचे बांधकाम मंजूर आराखड्यानुसार आहे का? नसल्यास त्या इमारतीचे वाढीव बांधकाम केले आहे का? व किती?

<u>उत्तरः-</u>दिनांक <u>७/९/२००२</u> रोजी जागा पाहणी केली असता सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशानुसार चालु आहे. हया पुढे वाढीव बांधकाम केल्यास ते पाडुन टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

<u>प्रश्न क्र.१२२:-</u> प्रभाग १ मध्ये सीट नं. ७५ शेजारी बीपी/ युएमसी/२३-००/१६३ च्या इमारतीचे बांधकाम मंजूर आराखड्यानुसार आहे का? तसेच इमारतीचे वाढीव बांधकाम केले आहे का? व किती?

<u>उत्तरः-</u> दिनांक ७.९.२००२ रोजी जागा पाहणी केली असता सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशानुसार सुरु आहे. या पूढे वाढीव बांधकाम केल्यास पाडुन टाकण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

प्रश्न क्र.१२३:- प्रभाग क्र. १ मध्ये युएमसी / बीपीटीपीडी/१८३/०१/६६ मधुवन हॉटेल समोर सुरु असलेल्या इमारतीचे बांधकाम मंजूर आराखड्यानुसार आहे का? तसेच इमारतीचे वाढीव बांधकाम केले आहे का? व किती?

उत्तरः- दिनांक ७.९.२००२ रोजी जागा पाहणी केली असता सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशानुसार सुरु आहे. या पुढे वाढीव बांधकाम केल्यास ते पाडुन टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

प्रश्न क्र.१२४:- प्रभाग क्र. १ मध्ये युएमसी/बीपी/टीपीडी/१०-०२ मयुर अपार्टमेंट समोर सी.ब्लॉक रोड, उल्हासनगर-१ येथिल सुरु असलेल्या इमारतीचे बांधकाम मंजुर आराखड्यानुसार आहे का? तसेच इमारतीचे वाढीव बांधकाम केले आहे का? व किती?

उत्तरः- दिनांक ७/९/२००२ रोजी जागा पाहणी केली असता सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे. यापूढे वाढीव बांधकाम केल्यास ते पाडुन टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

प्रश्न क्र.१२५:- प्रभाग क्र. १ मध्ये सचदेवनगर बीपी /३/०१/४७१ येथे सुरु इमारतीने सचदेवनगर सोसायटीचे एन.ओ.सी. (ना हरकत दाखला)घेतला आहे का? त्यालगत १२० फुट रस्त्याच्या रुंदीकरणात येतो का? तसेच त्या इमारतीच्या वाढीव बांधकाम केले आहे का? असल्यास किती?

उत्तरः- दिनांक ७/९/२००२ रोजी जागा पाहणी केली असता सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे. सदरची इमारत मालकी हक्कांच्या जागेवर बांधली असून सचदेव नगर सोसायटीचे एन.ओ.सी. (ना हरकत दाखला) प्राप्त करुन घेण्याबाबत अर्जदार यांना सक्ती करता येत नाही. लगतचा रस्ता ६०' रुंदीचा असून रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १२६ व १२७ श्री. राजेंद चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र.१२६:- विठ्ठलवाडी येथिल अपार लिमिटेड कंपनीच्या जागी जे बांधकाम करण्यात येत असून त्यास महापालिकेने जी त्यांस मंजुरी दिली आहे ती शहर प्रारुप आराखड्यानुसार देण्यात आलेली आहे की, महापालिकेच्या शहर नियोजन आराखड्यानुसार देण्यात आलेली आहे?

उत्तरः- महानगरपालिकेने विठ्ठलवाडी येथिल अपार लिमिटेड कंपनीच्या जागी जे बांधकाम करण्यात येत आहे ते शहर प्रारुप विकास नियोजन आराखड्यानुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये पडत आहे. या बाबतचा विचार करुन पत्र क्र. उमपा/नरवि/बाप/२५९/००/२८१ दिनांक १३/६/२००१ रोजी परवानगी देण्यांत आलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा. महापौरजी, नगररचना विभागाशी संबंधित प्रश्न आहे. नगररचनाकार जर मंचावर आले तर बरे होईल. माझा प्रश्न वरील प्रमाणे आहे. उत्तर दिलेले आहे परवानगी दिली आहे. मंजुर विकास आराखड्यानुसार ६० फुटाचा रस्ता आहे. आणि प्रारूप विकास आराखड्यामध्ये तो ८० फुटाचा रस्ता आहे तर आपण कुठल्या विकास आराखड्यानुसार ती परवानगी दिली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

*श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-*सदर ठिकाणी रोड ६० फुटाचा आहे. कंन्स्ट्रक्टीव्ह असुन परवानगी दिली आहे.

*मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-*प्रारूप विकास आराखडा मंजूर होण्याअगोदर आपल्या महासभेमध्ये ज्याठिकाणी प्रारूप विकास आराखड्यामध्ये आरक्षित दाखविलेले आहे. त्यांची जी परवानगी दिली आहे महानगरपालिकेने ती रद्द करायची. असा एक प्रकार शांतीनगर येथील साईबाबा मंदीराच्या बाबतीत झाला आहे. श्री. भगवानदास अगिचाच्या जागेमध्ये. ते कोर्टात गेल्यानंतर आपण त्यांची परवानगी रद्द केली होती. नव्या डिपीनुसार. मग ही परवानगी का दिली तुम्ही. प्रारूप विकास आराखडा मंजुर झाल्यानंतर परवानगी दिली ती का दिली?ती रद्द का नाही केली?

*श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-*१०.५.२००१ला परवानगी दिली होती. म्हणजे प्रारूप विकास आराखडा १०.५.२००१ला प्रसिध्द झाला होता. त्यानंतर १३.६.२००१ला परवानगी दिलेली आहे. तर सदर बांधकाम चालु केल्यानंतर प्लीन्थ सर्टीफिकेट त्यांना दिलेले होते. जोपर्यंत समाज मंदीराची जागा ८० फुटा पर्यंत करत नाही तोपर्यंत त्याला बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला दिला जाणार नाही. त्याने बांधकाम पुर्णत्त्वाचा प्रस्ताव दिला आहे त्याला परवानगी नाकारण्यात आलेली आहे या कारणास्तव.

*मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-*पुढचा रोड तो आपल्याला देईल तापर्यंत बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला देणार नाही.

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-*पुढचा प्रश्न पण तुमचाच आहे.

*प्रश्न क्र.१२७:-* शांतीनगर जकात नाका क्र. १ समोरील त्यामध्ये मिरा हॉस्पीटल असलेली चार मजली इमारत बनवितांना त्या वेळच्या नगरपालिकेची परवानगी घेण्यांत आली होती की नाही?

सद्या त्या इमारतीवर तिस-या मजल्यावर दुरुस्तीचे काम जोरदारपणे चालु असून ते काम दुरुस्त करण्याची महापालिकेकडून कुठली परवानगी देण्यात आली आहे का?

*उत्तर:-* तत्कालीन नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. नरवि/बाप/१२७/८९, दिनांक १९/३/९० अन्वये इमारतीच्या नकाशाला मंजूरी प्रदान केलेली होती.

महानगरपालिकेमार्फत दुरुस्तीच्या संदर्भात परवानगी दिलेली नाही.

*मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-*संबंधित प्रश्न आहे. मा. महापौरजी, १२७ प्रश्न क्रमांक आहे. सध्याच श्री. नथुराम सोनावणे यांनी २०० नंबरचा प्रश्न विचारला आहे. प्रश्न मला वाटते एकच आहे. प्रश्न क्र. १२७ आणि २०० एकच प्रश्न आहे. प्रश्न क्र. १२७ मध्ये आपण सांगत आहात नगरपालिकेने परवानगी दिली आहे. आणि २०० मध्ये सांगत आहात की महापालिकेने असली कुठलीही परवानगी दिली नाही.

*श्री. सुर्यकांत शिंदे (नगररचनाकार):-*याच्यामध्ये असे म्हंटलेले आहे १९९० मध्ये इमारतीच्या नकाशाला मंजुरी दिली आहे. म्हणजे मुळ इमारतीच्या नकाशाला आणि आपण प्रश्न विचारला की, अंतर्गत जे काम चालु आहे त्याला परवानगी दिली आहे का? तर उत्तर दिले आहे की, अंतर्गत दुरूस्तीसाठी कोणत्त्याही प्रकारची परवानगी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-दिलेली नाही. त्यावर कारवाई होवू शकते. किती दिवस झाले २००३. दि. १७. ला प्रश्न विचारला आहे. अजुन कारवाई झालेली नाही. कारवाई तुमच्या डिपार्टमेंट कडुन केली जाते का? उत्तरे तुम्ही देता. चुकीची उत्तरे देता. कधी रिपेअरचे परमिशन देता कधी रद्द करता. मग डेमॉलिशन होते. मी प्रश्न विचारला आहे मा. आयुक्त साहेब. ९.९.२००१ ला महापालिकेच्या लक्षात आणुन दिलेले आहे. तरी पण महापालिकेतर्फे कुठलीही कारवाई झालेली नाही.

मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मा. महापौर महोदया, मी दोन महिन्यापुर्वी अतिक्रमण विभागाचा कार्यभार हाती घेतला. व महासभेसमोर ठेवायचे होते त्यावेळी मी ही साईट पाहुन आलो होतो. मी पाहिले की, ९० साली परवानगी दिलेली जी इमारत आहे. त्या इमारतीत काही बदल नाही. जो बदल मी स्वत: जावून पाहीला होता. तिथे प्लास्टर ऑफ पॅरीसचे काम चालु होते. टाईल्सचे काम चालु होते. फ्लोअरींगचे काम चालु होते. व माझ्या मते हे जे काम चालु होते त्यासाठी परवानगीची गरज आहे की नाही ते नगररचनाकार यांनी सांगावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आमच्या माहिती प्रमाणे आता काम सुरू झाले आहे. तुम्ही बघितले तेव्हा नव्हते आता काम सुरू झाले आहे.

मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मी दोन महिन्यापुर्वी विझीट दिली होती.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मग आता कसे काम सुरू आहे?

मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मी स्वत: डोळयाने पाहिले आहे पी.ओ.पी. चे काम चालु आहे. फर्निचरचे काम चालु आहे. अंतर्गत सजावटीचे काम चालु आहे. व प्लास्टर कलरचे काम चालु आहे. अंतर्गत बदलासाठी परवानगीची गरज नाही असे मला वाटते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय आयुक्त साहेब, तुम्हाला दोन-दोन सदस्य प्रश्न विचारतात. त्या दोन्ही सदस्यांची चुकी आहे आणि तुमचे सत्य आहे असे समजायचे का सभागृहाने.

मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मा. महापौर महोदया, मी पुन्हा सांगतो दोन महिन्यापुर्वी हा प्रश्न आल्यावर मी जेव्हा त्याठिकाणाला विझीट दिली आणि पाहिले की काय काम सुरू आहे. तिथे फ्लोरींगचे काम चालु आहे. फर्निचरचे काम सुरू आहे. पी.ओ.पीचे काम सुरू आहे. टाईल्स बसवायचे काम चालु आहे. त्याशिवाय इतर काही काम सुरू नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-साहेब तिथे लॉजिंग बोर्डींगसाठी काम चालु आहे महापालिकेकडुन परवानगीसाठी पत्र लिहिले आहे. अनाधिकृत काम केलेच केले महापालिकेची परवानगी घेण्याची प्रक्रिया त्यांची सुरू झाली आहे. हे मी तुमच्या माहितीसाठी सांगतो. तिथे बाजुला साईबाबा मंदीर आहे.

मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. उपायुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मा. महापौर, मी पुन्हा सदनाला आश्वासित करू इच्छितो की जे मी बदल पाहिले आहेत तेच बदल आहेत. ते बदल जर अनुज्ञेय आहेत तर त्यावर कारवाई केली जाणार नाही. आणि अनुज्ञेय नसतील तर नक्कीच त्याच्यावर कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-नोटीस वगैरे दयायची गरज भासणार नाही ना?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-किती दिवसात?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १२८ ते १३२ हा श्री. कनहेयालाल नाथानी यांचे असून त्यांनी ते मागे घेतले असल्याने व सध्या ते पालिका सदस्य नसून ते सभेत घेता येणार नाही.

तसेच प्रश्न क्र. १३३ ते १३४ श्री. रामदास उमाप यांचे असून त्यांनी ते मागे घेतल्याने इतिवृत्तांतात त्याची नोंद घेता येत नाही.

प्रश्न क्र. १३५, १३६,१३७, १३८ श्री. रामदास उमाप यांचा आहे.

प्रश्न क्र१३५:-सन २००० ते २००१ व २००१ ते २००२ या दोन वर्षात पाणी पुरवठा टॅकरवर प्रत्येक वर्षात किती खर्च झालेला आहे?

जुना प्रभाग क्र. ८ वडार कॉलनी आजादनगर याठिकाणी पाण्याचे टॅकर मागणी पत्र गेली तीन वर्षापासून २३ विनंती पत्र मी लिहीले आहेत ते आपल्याला किती मिळाले आहेत.

उत्तर:- होय. सन २०००-२००१ करीता रूपये १,११,९१,३९०/-, सन २००१-२००२ करिता रूपये १,०८,५५,४२५/- इतका टॅकरवर खर्च झाला आहे.

सदर बाबतीत चार पत्र मिळाले आहेत.

प्रश्न क्र१३६:-त्यानुसार वडार कॉलनी येथे महापालिकेने बसविलेल्या ५००० लि. ची प्लॅस्टीक टॅक भरणे कामी २३ पत्रानुसार किती टॅकर देण्यात आले. त्याची वार्षिक दैनंदिनी आकडेवारी दयावी, नसेल पाठविले तर का नाही?

पाणी टॅकर खर्चाबाबत आपल्याला टॅकर घोटाळा झाला आहे का वाटत नाही खरे आहे काय? झालेला असल्यास त्यावर काय कार्यवाही केली आहे?

उत्तर:- वडार कॉलनी आझादनगर करिता पाणी पुरवठा सुरळीत करण्याकरीता तात्त्कालीन कार्यकारी अभियंता तथा उप विभागीय अभियंता यांनी वेळोवेळी आपणांशी चर्चा करून वितरण व्यवस्थेत बदल करून पाणी पुरवठा सुरळीत केला होता व त्यानंतर ५००० लि. पाण्याची टाकी (पी. व्ही. सी) बसविण्यांत आली होती. पाण्याचा प्रश्न सुरळीत झाल्याने टाकीत टॅकरने पाणी पुरवठा करण्यात आला नाही. पाणी टॅकर खर्चाबाबत टॅकर घोटाळा झालेला नाही.

प्रश्न क्र१३७:- उल्हासनगर महानगरपालिकेने मे. ब्लाझी ॲडर्व्हर टायपिंग यांना ५० चौ.मी. जाहिरात लावणेसाठी परवानगी दिली असता त्यांनी अतिरिक्त किती चौ.मी. जास्त वापर केलेला आहे? तसे आढळल्यास आपण त्यांचेवर कधी व काय कार्यवाही केलेली आहे?

यांचीही सविस्तर अहवाल एक महिनेचे आत उपलब्ध करणार होता, दिनांक ४.५.२००२ चे प्रश्न उत्तराप्रमाणे अहवाल प्राप्त झाला का? व त्यावर कार्यवाही कधी व काय करण्यात आलेली आहे?

उत्तर:- मे. ब्लाझी ॲडव्हरटाझिंग यांनी त्यांना दिलेल्या २५० चौ.मी. पैकी फक्त १५१चौ.मि. जागेचा वार जाहिरात लावणेसाठी केलेला आहे. त्यामुळे त्यांनी अधिक जागेचा जाहिरात लावणेसाठी वापर केलेला नाही. या बाबतचा अहवाल दिनांक २७. ५. २००२ रोजी कर निर्धारक व संकलक यांना प्राप्त झालेला आहे.

प्रश्न क्र१३८:- उल्हासनगर महानगरपालिकेने क्रिटिझा ॲडर्व्हर टायझिंग यांना ४०० चौ.मी. जाहिरात लावणेस सांगितले असता त्यांनी किती चौ.मी. जाहिरात लावणे कामी बेकायदेशीर वापर केला आहे.

आपण दिलेल्या ४.५.२००२ चे प्रश्न क्र. १७ चे उत्तराप्रमाणे १ महिनेचे आत उपलब्ध करून सादर करणेत येईल त्याप्रमाणे अहवाल तयार झालेला आहे का? व किती चौ.मी. जाहिरात कामी वापर झाला आहे?

जास्त चौ.मी. वापर असल्यास त्यावर आपण कधी व काय कार्यवाही केली आहे?

उत्तरः- मे. क्रिटिझा ॲडर्व्हर टायझिंग यांनी त्यांच्या दिलेल्या ४०० चौ.मि. जागेपक्षा ३४ चौ.मी. अधिक जागेचा जाहिरात लावणेसाठी वार केलेला आहे. या बाबतचा अहवाल दिनांक २७.५.२००२ रोजी कर निर्धारक व संकलक यांना प्राप्त झालेला आहे. करारानुसार मंजूर जागेपेक्षा ३४ चौ.मी. अधिक जागेचा वापर केल्याबददल मे. क्रिटिझा ॲडर्व्हर टायझिंग यांचेकडुन माहे मार्च २००२ पर्यंत रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १३९ श्री.गणपत ऐडके यांचा आहे.

प्रश्न क्र.१३९:-गुरूवार दिनांक ५ सप्टेंबर, २००२ च्या पुण्यनगरी या वर्तमानपत्रात झोपडी धारक कुटूंबाना वाल्मीकी आंबेडकर आवास योजनामधुन राज्यशासन या वर्षी २० हजार घरे बांधणार.

त्याकरिता त्यांनी १ जानेवारी १९९५ च्या मतदार यादीत नाव असेन व ते त्याचठिकाणी वास्तव्य करत आहेत असा दारिद्य रेषखालील लाभार्थिंना या योजनेचा लाभ मिळणार आहे. अशा आशयाची बातमी आली होती. याबाबत आपल्या महानगरपालिकेतर्फे या योजनेबाबत कोणती उपाय योजना व्यवस्था करणार आहेत? अशा प्रकारचे प्रयोजन शासनाकडे पाठविणार आहेत का?

उत्तरः-होय.

केंद्र शासन पुरस्कृत वाल्मिकी आंबेडकर आवास योजना महाराष्ट्र राज्यामध्ये राबविणेसाठी शासन निर्णय क्र.एच.एस.जी. २००२/प्र. क्र.४/ग्रामियो/-१, दिनांक १९.९.२००२ अन्वये आदेश प्राप्त झाले आहेत.

घोषित, अघोषित झोपडपट्टी किंवा रहिवास करण्यासाठी अयोग्य असलेल्या व दाटीवाटीने राहणा-या सुमारे ३०० लोकसंख्या असलेल्या किमान ६० ते ७० घराच्या वसाहतीसाठी तसेच आरक्षणाने बाधीत होत नसलेल्या क्षेत्रासाठी सदर योजना कार्यान्वीत राहणार आहे. यासाठी सर्व्हेक्षण करून शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत येतील.

मा. सदस्य श्री. गणपत ऐडकेः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १४० श्री. विनोद तलरेजा यांचा आहे.

प्रश्न क्र.१४०:-माझ्या प्रभागामध्ये खालील चार नगरमध्ये असल्यामुळे सफाई व्यवस्थित होत नाही तरी या ठिकाणी किती सफाई कामगार कार्यरत आहेत. याचा खुलासा येत्या महासभेत व्हावा व कार्यरत सफाई कामगारांची नावे दयावीत.

१. महेंद्र नगर
२. साईबाबा कॉलनी
३. गौतमबुध्द नगर
४. गुरूतेब बहाददुर नगर

तरी या चार नगरमधील प्रत्येकी सफाई कामगारांची संख्या किती आहे. याबाबत खुलासा व्हावा व कार्यरत सफाई कामगारांची नावे देण्यांत यावीत.

उत्तरः-होय.

प्रभाग क्र. ३१ (जुना)मधील महेंद्र नगर, साईबाबा कॉलनी, गौतमबुध्द नगर, हा भाग तेगबहादुर कॉलनी नावाने ओळखले जाणारी झोपडपट्टी आहे.

सदर ठिकाणची सफाई कामासाठी उपलब्ध कामगारानुसार दोन सफाई कामगार आहेत. त्यांची नावे १. श्रीमती. मंगळी श्रीराम साळवे, २. श्री. देवशी सन्ना असे आहेत.

तसेच सदर झोपडपट्टीतील गटार सफाईचे काम वेळोवेळी दुसरे कामगार पाठवून करून घेतले जाते.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>हा प्रश्न मी दिड वर्षापुर्वी विचारला होता. परंतु आज नंबर आला आहे. व याचे उत्तर दिले आहे डॉ. पानपट्टे जे आता इथे कार्यरत नाही. आता आरोग्य विभागाचा कार्यभार श्री. भडकवाड साहेबांकडे आहे. माझा वरील प्रमाणे प्रश्न होता.....

<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u>सन्माननिय सदस्यांनी वरील प्रमाणे प्रश्न विचारला होता त्यावेळी तिथे दोन सफाई कामगार होते आता आयुक्त साहेबांनी जे नविन शेडयुल तयार केले आहे त्यानुसार तेथे रामप्यारी अमीरचंद मंगला भाऊराव राजेश, कांची हे तीन सफाई कामगार आहे. आणि शौचालय साफ करण्यासाठी मलकंद कचरू हा एक सफाई कामगार आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>जी मंगलाबाई आहे आणि दुसरी रामप्यारी ते फक्त अर्धा दिवस माझ्या प्रभागात येतात. अर्ध्या दिवसात काम होत नाही. नाले सर्व चोकअप असतात. नाल्यावर कोणी माणुस नाही.

<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u>जसे की आयुक्त साहेबांनी दुपारी १२ वाजेपर्यंत मेनरोड साफ करण्यासाठी ग्रुप केला आहे त्यामध्ये ती अर्धा दिवस असते. ते झोपडपट्टीच्या ऐरीयात असते.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>ती फक्त अर्धा दिवसच माझ्या प्रभागात येते.

<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u>त्यामध्ये सुधारणा केली जाईल.
<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १४१ व १४२ हा श्री. यादव लालबिहारी यांचा असून त्यांनी प्रश्न मागे घेतल्याने त्याची इतिवृत्तांतात नोंद घेता येत नाही.

प्रश्न क्र. १४३ ते १४६ श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते उपस्थितीत नसल्याने कार्यसुचीत त्यांचा प्रश्नाचा समावेश करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १४३:-</u>राखीव भुखंड क्र. १४८, सीट नं. ४९ प्लॉट नं. <u>१४/१२</u> व <u>१४/१३</u> हा भुखंड ''शॉपिंग फॉर डिसहाऊस शॉपस'' करिता आरक्षित असून श्री. सुनिल राजवानी व दिलीप व अनिल यांनी सदर भुखंडाची खात्रीदायक माहितीनुसार बनावट कागदपत्रे बनवुन आराखडा मंजुरी करिता पाठविला आहे. त्यावेळी दि. १८.१२.९७ व ९.५.२००० च्या पत्राकाने सदर भुखंडावरील अतिक्रमण तोडण्यासाठी तत्कालीन मा. आयुक्त श्री. शुळ यांना निवेदन केले होते. त्यावेळी मा. आयुक्त श्री. शुळ यांनी बांधकाम जमिनदोस्त करून तेथे आरक्षित भुखंडाचे नामफलक लावण्याचे आदेश दिले होते त्या संबंधी विचारलेल्या खालील प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे दयावीत.

उपरोक्त विषयान्वये राखीव भुखंड क्र. १४८ सीट नं. ४९, प्लॉट <u>नं. १४/१२</u>, व <u>१४/१३</u> या भुखंडावर महापालिकेचे संबंधित अधिकारी राखीव भुखंडाचे नामफलक कधी लावण्यात येणार आहे? तसेच त्या भुखंडावर आजतागायत महापालिकेने संबंधित विभागाने नामफलक लावण्यास उशीर (दिरंगाई) का केली आहे?

उत्तरः-सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र १२. ७०० चौ.मी. असून त्यापैकी फक्त २७००.०० चौ.मी. चा भुखंड खुला आहे. खुल्या असलेल्या जागेची मालकी खाजगी आहे. तसेच उर्वरित क्षेत्र १०,०००. ०० चौ.मी. खालील जागा अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम खाली येते. सदर बांधकाम सन १९९५ च्या पुर्वीचे आहे. महसुली अभिलेखामध्ये महानगरपालिकेच्या नावांची नोंद केल्यानंतर नामफलक लावण्यात येणार आहे. अदयापही जागा महानगरपालिकेच्या नावावर झालेली नाही. त्यामुळे उशिर होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

प्रश्न क्र. १४४:-खात्रीदायक माहितीनुसार त्या भुखंडावर भुमाफियांनी आराखडा मंजुरीसाठी टाकण्यात आला आहे का? आराखडा मंजुरीसाठी टाकण्यात आला असल्यास महापालिकेने तो मंजुर करण्यात आला आहे का?

उत्तरः-होय.

सदर भुखंडामध्ये जागेच्या सीडी. ची पडताळणी करून श्री. अनिल हिरानंद राजवाणी व इतर नावाने प्लॉट नं. १४/२५, शिट नं. ४९, दि. २६.८.२००२ रोजी देण्यात आलेली आहे. दि. ७ एप्रिल, १९९४ च्या शासन निर्णयानुसार अर्जदार यांनी एकुण क्षेत्राच्या २५ टक्के बांधकाम खालील क्षेत्र महानगरपालिकेस देणे बाबत दि. ६.८.२००२ रोजी करारनामा केलेला असुन ती नोंदणी करून घेतलेला आहे.

प्रश्न क्र. १४५:-उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यानुसार प्लॉट नं. १०८/३ ए या जागचा आरक्षित भुखंड क्र. १३६ "दवाखाना व प्रसुती गृह" व प्रसिध्द सुधारित विकास आराखड्यामध्ये आरक्षण भुखंड क्र. १५६ "वैदयकीय सुविधा" या प्रयोजनासाठी राखीव आहे. त्यासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची सुचक, योग्य व समाधानकारक उत्तरे संबंधित विभागाने दयावीत ही विनंती.

१. भुखंड क्र. १०८/३/ए सीट. क्र. १८ उल्हासनगर ४ येथील प्रसिध्द सुधारित विकास आराखड्यामध्ये आरक्षण भुखंड क्र. १५६ "वैदयकीय सुविधा" या प्रयोजनासाठी राखीव असलेल्या ५३०० चौ. मी. भुखंडाची सध्या या प्लॉट ची परिस्थिती काय आहे?

उत्तरः-उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास आराखड्यानुसार आरक्षण क्रमांक १२६ डिस्पेंसरी व मेटेनिटी होमसाठी (प्रारूप विकास आराखड्यानुसार आरक्षण क्र. १५६ वैद्यकीय सुविधा) राखीव असलेल्या प्लॉटपैकी काही जागेसाठी उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाने दिनांक १९.९.९९ रोजीच्या पत्रान्वये सदर भुखंडास सनद देण्यात आली आहे. अर्जदार मिराबाई निर्मलसिंग यांचे जागेवर लाकडाची वखार अस्तित्त्वात आहे.

प्रश्न क्र. १४६:-भुखंड क्र. १०८/३/ए सीट नं. १८, उल्हासनगर-४ येथिल प्रसिध्द सुधारित विकास आराखड्यामध्ये आरक्षण भुखंड (जुना -१३३) व नवा भुखंड क्र. १५६ ''वैद्यकीय सुविधा'' या प्रयोजनासाठी राखीव असलेले तसेच महापालिकेचा ताबा असल्याचा नामफलक लावण्यात आला आहे का? नसल्यास का लावण्यात आला नाही? इतका उशिर का लावण्यात आला आहे? याबाबत खुलासा संबंधित विभागाने करावा ही विनंती.

उत्तरः- सदर जागेवर सद्या फलक लावण्यात आलेला नाही. कारण महसुली अभिलेखात महापालिकेची नोंद झालेली नाही. महानगरपालिकेस मालकी हक्क प्राप्त झालेला नसल्याने विलंब होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

मा. सचिव ( श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र१४७ श्री. राजेंद चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. १४७:- उल्हासनगर महानगरपालिका हददीतील वाको कंपनी रोडवर, पेट्रोल पंपाच्या बाजुला श्री. रतिलाल नठाकूर नावाच्या व्यक्तीने बनविलेले अनाधिकत बांधकाम हे महापालिकेच्या अनाधिकत विभागातर्फे दोन वेळेस तोडण्यात आले होते.

सदरील बांधकाम हे पुन्हा बनविण्यात आले आहे. तरी सदरील व्यक्तीला त्या बांधकामाची परवानगी देण्यात आली आहे का? याचा खुलासा येत्त्या महासभेत करण्यात यावा ही विनंती.

उत्तरः-विद्यमान बांधकाम दुरुस्तीसाठी परवानगी दिली होती. परंतु जागेवर पुर्णतः नव्याने अनाधिकृत बांधकाम चालु केल्याने ती रदद करण्यात आली.

बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- इथे पण दिड वर्षापूर्वी प्रश्न विचारला आहे. दुरुस्तीसाठी परवानगी दिलेली नाही. आता तिथे लोक राहतात. म्हणून आम्ही सांगत होतो की, एक विशेष सभा प्रश्नोत्त्तरासाठी घ्यावी.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १४८ हा श्री. प्रमोद टाले यांचा असून त्यांनी तो प्रश्न मागे घेतल्याने इतिवृत्तांतात त्याची नोंद घेता येत नाही.

तसेच प्रश्न क्र. १४९ हा श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे. ते पण उपस्थित नाही आहेत. त्यांचा प्रश्न उत्त्तराच्या आजच्या कार्यसूचीत समावेश करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. १४९:- अ) हाउ मेनी बोरवेलस् आर इन उल्हासनगर.

ब) हाउ मेनी बोरवेलस् आर इन वर्किंग कंडिशन.

क) वॅाट इज द एक्सपेंडिचर इनक्युरेड इन अ इअर.

ड) वेदर द कन्सरड ऑफिसर इज क्नोइंग द स्पोटस् ॲण्ड मेड इन्स्पेक्शन ऑफटर रिपेअर ऑफ बोअरवेलस्.

उत्तरः- अ) देअर आर ६३५ बोअरवेल ॲट वेरिअस प्लॅस इन उल्हासनगर कॅम्प नं. १ टु ५.

ब) देअर अबाउट ४६५ बोअरवेलस् आर इन वर्किंग कंडिशन विथ वेदर रिपेअर्स.

क) द टोटल एक्पेंडिचर इनक्युरड इन लास्ट इअर हिज रेस ९ ,६१ ,२९४ .

ड) मोस्ट ऑफ द स्पोटस् आफॅ दिस बोअरवेलउ आर क्नाउ टु अवर आफिसर.

-- रिपेअरींग ऑफ पर्टिक्युलर बोअरवेलस् आर केरिड आउट इन द प्रिसेस ऑफ अवर युएमसी स्टॅाफ.

-- द स्टॅाफ ऑन ड्युटिस अलवेज गो टु चेक द पोझिशन ऑफ बोअरवेलस् फॉर्म टाईम टु टाईम ॲण्ड रिपोर्ट द स्पोटस् ऑफ बोअरवेलस् अंडर रिपेअर इन कम्पलेंट रजिस्टर.

-- अवर ऑफिसर आर अल्सो गोईंग टु चेक द रिपेअर वर्क ड्युरिंग द साईट इन्स्पेक्शन.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्रमांक १५० हा श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा असून त्यांनी ते मागे घेतल्याने इतिवृत्तांतात त्याची नोंद घेता येत नाही.

प्रश्न क्र. १५१ श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. १५१:- १जानेवारी, २००१ ते ३१ डिसेंबर, २००१ या कालावधीत बांधकाम आराखडयास मंजुरी मिळालेल्या किती इमारतीपैकी कोणत्त्या इमारतींमधील अनाधिकृत बांधकामे झाल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले आहे?

उत्तरः- १ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २००१ या कालावधीमध्ये एकुण ३० एवढयो बांधकाम आराखडयांना मंजूरी मिळालेली असून यापैकी सुमारे ११० बांधकामामध्ये वाढीव बांधकामे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- ठिक आहे, मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असून मला वरील उत्तर देण्यात आले. हा प्रश्न मी गेल्या वर्षीच्या ऑक्टोंबर मध्ये विचारला होता. तर माझी पूर्णपणे खात्री आहे की, प्रशासनाने नक्कीच या बांधकामांना नोटिस वगैरे देणे सुरु केले असेल. ११० कामे ही बहूतेक निष्कासीत झाली असतील. बरोबर आहे ना? ऑक्टोंबर २००२ मध्ये विचारलेला प्रश्न आहे. आणि प्रश्न २००१ सालामधल्या बांधकामाबद्दल आहे. त्यामध्ये प्रशासनाने हे कबुल केले आहे की, १०८ बांधकामांपैकी ११० बांधकामामध्ये अनाधिकृत बांधकाम आढळून आले आहे. तर मला स्वतःला पण अशी खात्री वाटते की, बहूतेक बांधकामे निष्कासित झाले असणार. फक्त एकदा त्यांनी खात्री दिली की मी खाली बसायला मोकळा होईल.

मा. उप-आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड, अं.बां.वि.):- मा. महापौर महोदया, विशेष सभा बोलावली होती, त्यामध्ये या सर्व प्रश्नाचे उत्तर दिले गेले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मी हा प्रश्न विशेष महासभेत विचारलाच नव्हता.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-पुन्हा विशेष महासभेचा विषय काढतात. ती सभा होऊन ८ दिवस झाले, १५ दिवस झाले काय कारवाई झाली आपणाकडुन आता सद्यस्थितीत किती कामे चालू आहेत. काही डेमोलेशन केले का उपायुक्त साहेब?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- उपायुक्त सांगतात की, मला चार उपायुक्त अजून पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आणखीण चार उपायुक्त पाहिजे.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकरः- साहेब यामध्ये काय झाले की, अनाधिकृत बांधकामाचा कुठलाही प्रश्न आला की, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, चर्चा करायला आम्हांलाच लाज वाटते. पुन्हा पुन्हा तेच प्रश्न विचारायचे, पुन्हा पुन्हा तीच चर्चा. नोटिसा पाठविल्या आहेत बघू. होईल कारवाई. प्रगती पथावरती आहे.

मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):- जानेवारी २००१ ते ३० डिसेंबर २००१ या कालावधीमध्ये १०४ बांधकामांना मंजुरी दिली होती.

*<u>मा. सदस्य श्री.राज असरेंडकरः-</u> साहेब, मी काय म्हणतो की, ऑक्टोंबर २००२ मध्ये प्रश्न विचारलेला आहे. किमान प्रश्न विचारलेच्या तारखेपासून तरी तुम्ही कारवाई सुरु केली असणार? आता जाऊ दया या सर्व विशेष महासभा आता झाली ७ जुलै ला. पण मी प्रश्न ऑक्टोंबर २००२ मध्ये विचारलेला आहे. त्याच्या आधी कदाचित तुम्ही केले नसेल. प्रश्न विचारल्या नंतर तरी कारवाई सुरु झाली असेल ना? ११० बांधकामापैकी किती बांधकामे निष्कासित केली आहेत. १-२ तरी केली आहेत का? एवढया वर्षभरात काही तरी केले असेल ना?*

*<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> या सर्व बांधकामांना एम.आर.टी.पी. अंतर्गत ३० दिवसाची नोटिस दिली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री.राज असरेंडकरः-</u>३० दिवस संपलेले आहे.*

*<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> मुदत संपल्यानंतर त्यांना जागा रिकामी करणेच्या नोटिस दिल्या आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> साहेब चुकीने तुम्ही ३६० दिवसाची नोटिस दिली आहे. यांचा प्रश्न ३६० दिवसापूर्वीचा आहे.*

*<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> मला मान्य आहे, प्रोसेस मध्ये डिले झाला आहे. परंतु मा. सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर देत आहे. या सर्व बांधकामांना एम.आर.टी.पी. अंतर्गत ३० दिवसाची नोटिस दिली होती. त्याची मुदत संपली मुदत संपल्यानंतर पुन्हा वेकेशन ऑफ प्रिमायसेसची नोटिस दिली होती. तीही मुदत संपली आहे. परंतु माझ्याकडे दोन महिन्यापूर्वी कार्यभार आला त्यावेस मी असे बघितले आहे की, कुठल्याही बांधकामावरती सुनावणी घेऊन त्याच्यावरती डिमोलेशनचे ऑर्डर पास केलेले नाही. त्या सर्व बांधकामावरच्या सुनावणी लावण्यात आले आहे. येणा-या कालावधीमध्ये त्याचे डिमोलेशन होईल.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरेंडकर :-</u> इथे महासभेमध्ये आमच्या सुनावणीला काही अर्थ नाही आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> आयुक्त साहेब, प्रशासनाचे प्रमुख म्हणून ही तुमची जबाबदारी आहे. भडकवाड साहेब म्हणाले की, मी जेव्हापासून आलो आहे तेव्हापासून ही कारवाई सुरु केली आहे. या अगोदरजी कार्यवाही झाली त्याच्यावर काय कारवाई झाली? हे जे उत्तर दिले आहे त्याच्यावर काय कारवाई झाली? त्याचा आढावा तुम्ही घेत असतात. आढावा घेतल्यानंतर तुम्ही सुध्दा अशा पध्दतीने वागला असेल. प्रत्त्येक वेळी उपायुक्त बदलेल भडकवाड साहेबांच्या ऐवजी दुसरे येतील. तेव्हा वेगळेच काही तरी निघेल. एक प्रमुख म्हणून, आयुक्त म्हणून याची जबाबदारी काय? त्यांनी अशा प्रकारची उत्तरे देतांना तयारी करुन यायला पाहिजे होते. ११० बांधकामे कोणती आहेत याची माहिती तुम्हांला असणार. त्यानंतर त्या बांधकामावर किती लोकांवर कारवाई केली याचे पण उत्तर नाही. ३० दिवसाची नोटिस दिली आहे, दिड वर्षापूर्वी उत्तराची तयारी केली होती ३० दिवसाची नोटिस आता देतात? आयुक्त कोणीही असो, श्री. सोनवणे साहेबांच्या अगोदर श्री. पोखरकर साहेब होते. पण अशा पध्दतीचे उपायुक्त बदलले म्हणजे नविन प्रक्रिया सुरू होते. हे विचित्रच आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरेंडकरः-</u>खोटारडेपणाच आहे ना हा? नविन प्रक्रिया कसली नविन प्रक्रिया. नविन प्रक्रिया हा एक अनाधिकृत बांधकाम वाचवण्याचा एक चांगला मार्ग आहे. कायदेशिर मार्गाने अनाधिकृत बांधकामांना संरक्षण दिले जाते असा आमचा आरोप आहे. आणि हे सर्व उघड होते. समोर आहे ना सगळे. मी असे विचारले की ऑक्टोबर २००२ मध्ये मी प्रश्न विचारला त्याच्या पुर्वी*

तुम्ही कदाचित कारवाई केली नसेल. प्रश्न विचारल्यानंतर तर कार्यवाही सुरू केली असेल. काही बांधकामांना नोटीसा दिल्या असतील सुनावणी घेतली असेल. ११० मधली दहा तरी बांधकामे तोडली असणार की नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, सदनात उपस्थित सदस्यांची भावना मी समजु शकतो. अनाधिकृत बांधकामाबाबत अधिका-यांच्या बदली नंतर परत कारवाई सुरू केली जाते. आधी जे काही केले ते लक्षात घेतले जात नाही. वारंवार कारवाई केली जाते. फक्त कागदावर कागद वाढविले जातात. परंतु फायनल आणि कंनक्लुझिव्ह ॲक्शन होत नाही. आपणांस माहित आहे १८१ बांधकाम परवानगी शिवाय अनाधिकृतपण वाढविले गेले त्यात पण फक्त आर्कीटेक्टवर कार्यवाही केली गेली व जे प्राथमिक रूपाने जबाबदार आहेत अतिक्रमणसाठी ते बिल्डर ते जागेचे मालक त्यांच्या विरूध्द काही कार्यवाही केली गेली नाही. एम.आर.टी.पी. अंतर्गत सेक्शन ५२ अन्वये नोटीस दिली जाते. त्यानंतर सुनवाई होत नाही. सुनवाई झाल्यानंतर फायनल ऑर्डर दिली जात नाही. जर फायनल ऑर्डर दिले तरी ते बांधकाम तोडले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. सदनामध्ये मान्य करताना......

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>वस्तुस्थिती आहे मान्य आहे परंतु जबाबदारी निश्चित करा. आम्ही आरोप करतो तुम्ही मान्य करता, जबाबदारी निश्चित करा ना?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>याबाबतीत जबाबदारी निश्चित केली जाईल. मी यापुर्वीपण विशेष महासभेत सदनाला आश्वस्त केले आहे, आजपण मी पुन्हा आश्वस्थ करतो की यानंतर जी पण कार्यवाही करू ती फायनल आणि कंन्स्क्लुझिव्ह असेल. व अनाधिकृत बांधकाम करणारे काही निवडक लोक आहेत त्यांच्याविरूध्द देखिल एम.आर.टी.पी अंतर्गत कडक कारवाई केली जाईल. आज जितकी प्रकरणे इथे आहेत. मी आधीच सांगितले ५९८ केस अशा आहेत. त्यात कोर्टाचा निर्णय असुन कार्यवाही झाली नाही. ३१ नविन केसेस आमच्या समोर अशा आल्या आहेत. जिथे बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला देवून सुध्दा अनाधिकृत बांधकाम अजुन केले गेले. अशा सर्व बांधकामांवर एम.आर.टी.पी अंतर्गत कारवाई केली जाईल. आमच्या कर्मचा-यांना आम्ही स्पष्टपणे निर्देश दिले आहेत. तुम्ही जर पाहिले तर त्यांनी काय काय पाऊल उचलायचे. नोटीस कोणत्त्या प्रकारे दयायची हिअरींग कसे घेतले पाहिजे त्यानंतर ऑर्डर कशा दिल्या पाहिजेत. ऑर्डर नंतर पुढे कोर्टात त्यांना स्टे मिळु नये म्हणुन कॅवेट कसा दाखल केला पाहिजे याबाबतीत लिखित स्वरूपात स्पष्ट सुचना स्पष्ट आदेश दिले आहेत. त्याचे पुर्नवलोकन महिन्यातुन एकदा करून सदनाला त्याबाबत झालेल्या प्रगतीचा अहवाल दिला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>साहेब याला किती दिवस आणि किती उपायुक्त लागणार आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी सदनाला सांगु इच्छितो की आमचे उपायुक्त श्री. भडकवाड साहेबांनी आवेशात येवून म्हंटले की, ४ उपायुक्तांची गरज आहे. तर इथे ४ उपायुक्तांची गरज नाही इथे वील पॉवरची गरज आहे. व मला वाटते की श्री. भडकवाड साहेबांमध्ये तेवढी वील पॉवर आहे. व ते करू शकतात त्यांच्या योग्यतेवर मला विश्वास आहे. तर ते करू शकतील असे मला वाटते. चारची गरज नाही ते एकटेच पुरेसे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>श्री. भडकवाड साहेबांबरोबर तुमची पण तेवढी इच्छाशक्ती असली पाहिजे. भडकवाड साहेब असुन उपयोग नाही कारण श्री. भडकवाड साहेब आज आहेत उदया नसतील पण ही जबाबदारी सर्वस्वी तुमची आहे आयुक्त म्हणुन.

__मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-__ मा. महापौर महोदया, सन्माननिय बोडारे साहेबांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. परंतु फक्त माझ्या इच्छा शक्तीचा जर आपणांस परीचय दयायचा असेल या गोष्टीचा मी आजपर्यंत कधी उल्लेख केला नाही. माझ्या इच्छा शक्तीचा जर तुम्हाला परिचय हवा असेल तर जेव्हा पहिल्यांदा महापालिका स्थापन झाली. ९६ साली तर २ महिन्यात आम्ही किती बांधकाम तोडले ते त्यानंतर ७ वर्षात कुणीही तोडले नाही. हे तर कमीत कमी सदनाने मानले पाहिजे. त्या दोन महिन्यात अतिक्रमण तोडण्याचे सर्वात जास्त काम आम्ही केले होते. न घाबरता, न कुणाच्या बोलण्यात येवून ते काम आम्ही केले आहे आमच्यात इच्छा शक्ती आहे हे या गोष्टीवरून सिध्द होते असे मला वाटते.

__मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-__ आम्ही आयुक्त पदाच्या खुर्चीवर बसलेल्या व्यक्तीकडे बघत असताना त्याच प्रमाणांची आठवण करतो की ज्यांनी ९७ साली याठिकाणी कार्यभार सांभाळल्यानंतर धडाक्याने काम केले होते आणि कशी बांधकामे तोडली होती. तेव्हा कुठल्या नोटीसा, कुठल्या फॉर्मलिटीज एम.आर.टी.पी. च्या नोटीसा किंवा त्याची सुनावणी वगैरे काही नव्हते. चार्ज घेतल्यानंतर तुम्ही १७ इमारती तोडल्या त्यांना कुठल्या नोटीसा दिल्या होत्त्या. कुठली सुनावणी केली होती त्यावेळेला? ज्यादिवशी चार्ज घेतला त्यादिवशी दोन दिवसामध्ये १७ बिल्डींगी तुटल्या गेल्या त्यावेळी कुठली फार्मलिटी नव्हती, कुठली सुनावणी नव्हती. पुर्ण चार्ज आता तुमच्याकडे असताना याठिकाणी त्याची गरज का भासते? ज्यावेळी तुम्ही आलात त्यावेळेला आम्ही तेच सोनवणे तुमच्यामध्ये बघितले.

__मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-__ मा. महापौर महोदया, मी मान्य करतो की, त्यावेळी डयु प्रोसेस ऑफ लॉ जे आधी केले होते. नगरपालिकेच्या वेळेसच काही प्रोसेस पुर्ण झाल्या होत्त्या. त्यानंतरच कार्यवाही केली. परंतु आता असे का त्याचे उत्त्तर हे आहे की, सोपान मारूती थोपटे विरूध्द पुणे महानगरपालिकेमध्ये हायकोर्टाने काही निर्देश दिले की अतिक्रमण तोडण्यापुर्वी कायदेशिर कार्यवाही करण्यासाठी काय काय केले पाहिजे. ते निर्देश पाळणे आज महापालिका प्रशासनावर बंधनकारक आहे. आणि ते निर्देश लक्षात घेवून आता कायदेशिर कार्यवाही पुर्ण करूनच ते बांधकाम तोडु शकतो जर डयु प्रोसेस ऑफ लॉ फॉलोअप नाही केले तर त्या ऑफीसरची ती वैयक्तिक जबाबदारी ठरेल. डयु प्रोसेस ऑफ लॉ फॉलोअप केल्याशिवाय जे अनाधिकृत बांधकाम तोडले जाते तर ती त्या अधिका-याची वैयक्तिक जबाबदारी ठरेल. आणि ती भरपाई त्याच्या वेतनातुन वसुल केली जाईल ती होवू नये म्हणुन आम्ही जास्त काळजी घेत आहोत कारण की यात उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्देश दिले आहेत.

__मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-__ प्रोसेस जे तुम्ही सांगत आहात ते काय आहेत? काय काय फॉलोअप केले पाहिजे बांधकाम तोडण्याआधी?

__मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-__ मा. महापौर महोदया, अनाधिकृत बांधकाम जे आहे त्याचे काही गट तयार केले आहेत जे चालु बांधकाम आहे. म्हणजे जे आज चालु आहे ते बांधकाम जे बांधकाम आधी अनाधिकृत होते एकदा तोडले गेले पुन्हा बांधले गेले ते बांधकाम व जे अनाधिकृत बांधकाम आज उभे आहे ते बांधकाम असे काही गट केले आहेत. जे एकदा तोडले गेले त्यास पुन्हा दुस-यांदा कुणी बांधत असेल तर ते बांधकाम तोडण्यासाठी २४ तासाची नोटीस पुरेशी आहे. परंतु जे बांधकाम आधी बांधले आहे त्यास कमीत कमी १५ दिवसाची नोटीस दयावी लागते. १५ दिवसाच्या नोटीस नंतर नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार ते फॉलोअप करून अनाधिकृत बांधकाम करणा-या बिल्डरला किंवा जागेच्या मालकास सुनवाईसाठी बोलवावे लागते. सुनावणी नंतर स्पीकींग ऑर्डर पास केले जातात. व स्पीकींग ऑर्डर पास केल्यानंतर ते बांधकाम तोडले जावु शकते. हे सर्व केल्याशिवाय महापालिका प्रशासन ते बांधकाम तोडु शकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-म्हणजे चालु बांधकाम असेल अनाधिकृत असेल तर त्यांना नोटीस दयायचीही गरज नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-चालु असलेल्या बांधकामांना देखिल नोटीस दयावी लागते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-किती २४ तासाची?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-२४ तासाची.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आम्ही विशेष महासभेमध्ये जी लिस्ट दिलेली आहे बरेचसे बांधकाम चालु स्थितीत आहे. आणि अनाधिकृत आहे. त्याला आज जवळ जवळ दहा ते १२ दिवस झाले परंतु कुठेही तुटलेली किंवा काही कार्यवाही झालेली दिसत नाही. इच्छाशक्ती प्रबळ आहे पण कार्यवाही होत नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आणि साहेब त्यामध्ये जर अंडर टेकींग दिले समजा एखादा बिल्डर आहे. त्यांनी अंडरटेकींग लिहुन दिले तर ते तुम्ही घेणार का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, स्पीकींग ऑर्डर पास केल्यानंतर जर कुणी बिल्डरने अंडरटेकींग दिले. की ७ दिवसात १० दिवसात स्वतःहुन तोडु तर मला वाटते की त्याला ७-८ दिवस देण्यात काही हरकत नाही. परंतु तिथे अशी शक्यता असेते की, तो वेळ मागेल आणि कोर्टात जावुन महापालिकेच्या आदेशाविरूध्द स्टे आणला जावु शकतो ते लक्षात घेवून अंडरटेकींग बाबत त्यांना वेळ देण्याचा विचार आम्ही जास्त करणार नाही. ऑर्डर पास झाल्यावर जो कालावधी दिला आहे त्यानुसार त्यांना बांधकाम तोडावे लागेल. अंडरटेकींग बाबतीत आधी रिले केले गेले आहे परंतु अंडरटेकींगवर आम्ही जास्त विश्वास ठेवणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-अंडरटेकींग देवून सुध्दा जर त्यांनी तोडले नाही तर त्यांना काय दंड आकारणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, अंडरटेकींग नंतर जर तोडले गेले नाही किंवा महापालिकेच्या स्पीकींग ऑर्डर नंतर नाही तोडले गेले तर त्यांच्या विरूध्द एफ.आय. आर. दाखल करणे हाच एक मार्ग आहे आणि त्याच मार्गाचा आम्ही स्वीकार करू.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त. एक लक्षवेधी सुचना आहे. त्याचे सुचक आहेत श्री. धनंजय बोडारे, अनुमोदक आहेत श्री. राजेंद्र चौधरी. सुचना खालील प्रमाणे आहे.

## लक्षवेधी सूचना

सुचकः- श्री. धनंजय बोडारे.

अनुमोदकः- श्री. राजेंद्र चौधरी

आपले लक्ष लक्षवेधीने कांद्रित करू इच्छितो की, नजिकचे काळात गणेशोत्सव हा सण येत असुन उल्हासनगरातील नागरीकातर्फे तसेच सार्वजनिक मंडळातर्फे हा सण सालाबादाप्रमाणे मोठ्या प्रमाणावर साजरा करणेत येतो. उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील बहुतेक नागरीक व मंडळे आपल्या गणेशमुर्ती

विसर्जनासाठी उल्हासनगर-३ येथील हिराघाट येथे आणत आहेत परंतु हिराघाट येथील मंदिराची जागा ट्रस्टच्या ताब्यात असल्याने त्यांनी सदर ठिकाणी आता गेट लावले आहे. जर सबंधित ट्रस्टने गणपती विसर्जनाचे दिवशी घरगुती व सार्वजनिक गणेशमुर्ती विर्सजन करणेसाठी आडकाठी केली तर फार मोठी गणेशभक्तांची गैरसोय होवू शकते तरी याबाबत महासभेत चर्चा घडवून यावी व आवश्यक उपाययोजना व निर्णय घेणेत यावा.

<u>मा. महापौरः-</u>सदरची लक्षवेधी स्विकारण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>लक्षवेधी सूचनेव्दारे याठिकाणी येत्त्या ३१ ऑगस्टला संपुर्ण भारतभर गणेश चतुर्थी हा महोत्त्सव साजरा केला जातो. तो ३१ ऑगस्ट पासुन चालु होतो. दरवर्षी या उल्हासनगरमध्ये गणेश विसर्जनाचा फार मोठया प्रमाणात समस्या उभी राहते. आम्ही वर्षानुवर्ष त्याबाबतीत आवाज उचलतो परंतु मागच्या वर्षापर्यंत हिराघाट याठिकाणी गणेश विसर्जनाची व्यवस्था होती. कोणत्त्या शहरामध्ये प्रत्त्येक शहरामध्ये अंबरनाथ, बदलापुर, कल्याण असु दे. लोकांच्या गणपती मागच्या धार्मीक भावना लक्षात घेवून प्रत्त्येक ठिकाणी प्रशासनाच्या वतीने त्याठिकाणी विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात येते परंतु उल्हासनगरमध्येच यासाठी कुठलीही व्यवस्था आतापर्यंत करण्यात आलेली नाही. एक नैसर्गिक व्यवस्था हिराघाट याठिकाणी होती. परंतु तिकडेही प्रशासनाने डोळेझाक केली आणि ट्रस्ट ज्या आहेत त्या ट्रस्टला त्याठिकाणी गेट बांधुन त्यांच्या ताब्यात ती जागा देण्याचा प्रयत्न केला त्यासाठी आपल्या अधिका-यांना मी सांगितले की हे जे गेट तुम्ही लावत आहात तर त्यांना नोटीस तरी दया.ती जागा महापालिकेची आहे की ट्रस्टची आहे परंतु ते ही अजुनपर्यंत अनुत्तरीतच आहे पण त्या ट्रस्टने ते गेट लावलेले आहे. उदया ट्रस्टनी त्याठिकाणी गणपती विसर्जनासाठी परवानगी नाकारली तर त्याठिकाणी महापालिकेचे अधिकारी नसणार आहेत सरकारी अधिकारी नसणार आहेत, फक्त जे भाविक असतील त्यांचा आणि त्या ट्रस्टवाल्यांचे उगीचच नाहक भांडण होईल. त्यानंतर ती सुध्दा तात्त्पुरती व्यवस्था आहे. त्याठिकाणी येणारे पाणी हे स्वच्छ नसते. पाऊस असेल तर वाहते पाणी असते. पाऊस नसेल तर घाण केमिकलचे पाणी त्याठिकाणी असते आणि त्याठिकाणी गणपती बुडविणे म्हणजे अक्षरक्षः त्या देवाची विटंबना, कुचंबना आहे त्यासाठी बोट क्लबचा प्रस्ताव जेव्हा या महासभेमध्ये आला होता तेव्हा प्रशासनाच्या आणि सर्व सभागृहाच्या समोर आम्ही बोट क्लबच्या वेळेस या उल्हासनगर सभागृहामध्ये पर्यायी व्यवस्था म्हणुन गणेश विसर्जन आपण त्याठिकाणी करू शकतो असा पर्यायी प्रस्ताव आम्ही दिला होता त्यावर आयुक्त म्हणुन आम्ही उत्त्तर दिले होते की या बोटक्लबमध्ये गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात येईल की नाही त्याची आम्ही चौकशी करून व्यवस्था करू गणेश विसर्जनाच्या पुर्वी आता गणेश महोत्त्सवाला साधारणतः एक महिना आहे बाकी. आतापर्यंत तरी तुम्ही काही केली आहे का व्यवस्था. केली नसेल तर कशी करणार? कारण हे होणे गरजेचे आहे त्यासाठी संपुर्ण सभागृहाचे लक्ष याठिकाणी वेधण्यासाठी ही लक्षवेधी आज याठिकाणी मांडलेली आहे. आयुक्त साहेब मागच्या महासभेमध्ये आपण उत्त्तर दिले होते. २०५. ची सभा होती आणि २०५. च्या सभेमध्ये आपण उत्त्तर दिले होते की, गणेश विसर्जनाबाबत काही व्यवस्था केली जावू शकते का? त्याबाबत पुन्हा सर्वे केला जाईल. जागा उपलब्ध नसेल तर पुर्ण शहरामध्ये १३ चौ.कि.मी. क्षेत्रात कुठे जागा असेल तिथे गणेश घाट विकसित करण्याबाबत प्रस्ताव आपणांसमोर आणेल. आज २०.७.२००३ आहे. पुढच्या महिन्यात ३१ ऑगस्टला गणपती महोत्त्सव आहेत. अजुन तुम्ही प्रस्ताव आणलेला नाही तर याबाबतीत काय करणार आहात? कारण ३१ ऑगस्ट पुर्वी विसर्जनाची व्यवस्था करणे हे तुमचे आणि आमचे कर्तव्य आहे. त्यामागच्या लोकांच्या धार्मिक भावना बघुन आपण लवकरात लवकर याबाबत काही कराल हे जरा मला स्पष्ट करा. सर्व्हे केला आहे की नाही केला. किंवा काय उपाययोजना केली?

मा.सदस्य श्री. अशोक ठाकुरः-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब जसे की बोडारे साहेबांनी लक्षवेधी आणली आहे. हे एक गंभीर प्रकरण आहे व मी तुम्हाला विनंती करेन की, या विषयावर लवकरात लवकर लक्ष दिले जावे. कारण की यामध्ये धार्मिक भावना आहेत. उल्हासनगरची एक महत्त्वाची जागा आहे आणि तेथे गणपती विसर्जनासाठी जर काही अडचण आली तर पुर्ण शहरात काही अडचण येवू शकते त्या हिशोबाने.... हे सत्य आहे की या महत्त्वाच्या कामात महापालिकेने कधीही लक्ष दिलेले नाही. हे तर गणपती बाबा सगळयांचे रक्षण करतात की लोक आरामात जातात विसर्जन करतात. तिथे अशी परिस्थिती आहे की, कुणाचाही पाय घसरू शकतो. व कोणत्त्याही गोष्टीवर महापालिकेने लक्ष दिलेले नाही. तर त्यानुसार हे जे प्रकरण आहे ते गंभीरपणे पहावे धन्यवाद.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौर महोदया, हा जो त्रास झाला आहे, गणपती विसर्जनाबाबतीत. मागच्या वर्षापासुन जास्त त्रास झाला आहे. कारण की हिराघाट येथे विसर्जन व्हायचे जसे मागच्या वेळी श्री. बोडारे यांनी सांगितले की तिथे कुण्या ट्रस्टने एक गेट लावले आहे. त्यामुळे अचानक ते बंद करण्यात आले. व महापालिकेने त्याची पर्यायी व्यवस्था केली नाही. आम्ही मागच्या वर्षी पाहिले की, उल्हासनगरचे गणपती विसर्जन उल्हासनगर महानगरपालिका हद्दीबाहेर केले जात होते. खुपसे लोक कल्याण येथे जो घाट आहे तेथे जात होते, काही लोक सेच्युरी क्लबच्या मागे जी नदी आहे तिथे जात होते. व स्वाभाविक असते की जेव्हा तरूण मुले जातात विसर्जनासाठी एवढया लांब जेव्हा जातात तेव्हा त्यांचे पालक आहेत त्यांना पण अडचण होते. त्याचा परिणाम असा झाला होता की, उल्हासनगरचे मागच्या वर्षी तीन मुलांना मृत्यु आला होता. कल्याण येथे जो नविन घाट तयार झाला तिथे विसर्जन झाले होते. जर उल्हासनगरमध्ये जवळपास जर विसर्जन झाले तर आईवडील देखिल मुलांसोबत जातात.

**मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहनदास व श्री. होशियारसिंग लबाना हे सभागृहातुन बाहेर पडले.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- उल्हासनगर मधील तीन मुलांचा मृत्यु झाला होता. तर आम्हांला असे वाटते की अशा प्रकारची दुर्घटना या शहरातील मुलांच्या बाबतीत पुन्हा होऊ नये त्यासाठी महापालिकेने त्वरीत उपाययोजना केली पाहिजे. यासाठी आम्ही हा विषय मे महिन्याच्या महासभेत सुध्दा उपस्थित केला होता. आम्ही हा विषय यासाठी उपस्थित केला होता की महापालिकेने अगोदर पर्यायी व्यवस्था जी आहे ती केली पाहिजे. व आयुक्त साहेबांनी आश्वासन सुध्दा दिले होते की, पर्यायी व्यवस्था जी आहे ती केली जाईल. परंतु ती आजपर्यंत झालेली नाही. एकच जागा आता शिल्लक आहे ती, उल्हासनगर स्टेशन शेजारी, व तेथेही जसे की, श्री. बोडारे यांनी सांगितले की, तेथे पाणी खुपच कमी असते. व अधीकतर पाणी दुषीत असते त्यामध्ये त्रास हा सुध्दा आहे की, छोटे-छोटे जे घरगुती गणपती आहेत, त्यांचे विर्सजन तर तेथे होते. परंतु सार्वजनिक गणपती ज्यांच्या मुर्त्या मोठ-मोठया आकाराच्या असतात त्यांचे विर्सजन उल्हासनगर स्टेशजवळील नदीत बिल्कुल होऊ शकत नाही. त्यामध्ये खुपच अडचणी निर्माण होतात. उल्हासनगर स्टेशनजवळ जी गणपती विर्सजनाची जागा आहे, ती खुपच छोटी आहे. त्यामुळे सुध्दा ब-याच अडचणी निर्माण होतात. म्हणून या महासभेत आम्ही पुन्हा एकदा आयुक्त साहेबांना असा आग्रह करतो की, अजूनही दिड महिना बाकी आहे. एक तातडीचा विषय घेऊन या बाबतची व्यवस्था लवकरात लवकर केली तर योग्य होईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- मा. महापौरजी, आता आताच श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की, ट्रस्टला दिलेली जागा आहे. ट्रस्टने तिथे गेट लावले आहे. ती जागा आहे कुणाची? आपल्या महापालिकेची जागा आहे, तर महापालिकेने ट्रस्टला गेट लावण्याची परवानगी दिली आहे का? व गणेश

विर्सजनासाठी ते ती जागा मोकळी ठेवू शकतात का? त्याचबरोबर मी एक गोष्ट निदर्शनास आणून देवू इच्छितो की, बोट-क्लबची जी जागा आहे तिथे आम्ही सहा-सात महिने अगोदर तेथे उत्तर भारतीयांच्या एका सणाचे तेथे आयोजन केले होते. महापालिकेची परवानगी घेवून, व त्यावेळेस आम्ही तेथे थोडीसी दुरुस्ती करुन त्यामध्ये टॅकरने पाणी टाकून छत पुजा केली होती. त्यावेळी तिथे चांगली व्यवस्था झाली होती. तर प्रशासनाने बोटक्लबच्या येथे गणपती विर्सजनाची व्यवस्था केली तर चांगले होईल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, ही सभागृहासमोर जी लक्षवेधी सूचना आहे ती आज दुपारी एक वाजता आम्हांला मिळाली. व त्यानंतर त्वरीत ती जी झुलेलाल नावाची ट्रस्ट आहे तिच्या अध्यक्ष साहेबांबरोबर संपर्क साधण्यात आला. व त्यांचे जे पत्र आहे ते मी येथे आणले आहे. ते सुध्दा मी सभागृहासमोर ठेवू इच्छितो, त्यामध्ये त्यांनी खात्री दिली आहे की, हे जे गेट लावलेले आहे, त्यानंतरही तेथे गणेशविर्सजन करण्यासाठी त्यांच्या वतीने काही मनाई केली जाणार नाही. त्यांनी त्या पाय-या सुध्दा दुरुस्त केल्या आहेत. व या वर्षी सुध्दा तेथे गणेशविर्सजनासाठी परवानगी दिली जाईल. हे त्यांनी लेखी स्वरुपी आज आम्हांस दिले आहे. तर मला वाटते की, त्यांच्या आश्वासनावर जरुर अंमलबजावणी केली जाईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-साहेब, ती जागा उल्हासनगर महानगरपालिकेची आहे.......

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- त्याची नंतर चौकशी करु. आपण जे सांगितले की, जागा कुणाची आहे काय? त्याची नंतर चौकशी करु. परंतु आज जी आपली लक्षवेधी प्राप्त झाली. त्याच्यानंतर त्वरीत त्यांच्याशी संपर्क साधून गतिमान प्रशासनाचा परिचय देण्याचा मी प्रयत्न केला. बाकी गणेश विर्सजनासंबंधी आपण सर्वांनी ज्या काही सूचना केल्या त्यांची अंमलबजावणी केली जाईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- साहेब मागील महासभेत सुध्दा आपण सांगितले होते, त्या सभेच्या इतिवृत्तांतात त्याची नोंद आली आहे की, गणपती उत्त्सवापूर्वी त्याची व्यवस्था केली जाईल, गणेश घाटची, उल्हासनगर स्टेशन जवळ नदी नाही तो नाला आहे. तेथे गणेश विर्सजन केले तर गणपतीच्या मुर्तीची विटंबना होईल. आमची दुसरी एक सुचना आहे की, तुम्ही हिराघाट येथे गणेश विर्सजनाची व्यवस्था करा. जेणेकरुन कमी खर्चात तेथे गणेश घाट तयार होईल. या बाबत मागच्या सभेत सुध्दा तुम्ही बोलला होता.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-हिरा घाटचेच आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- हिराघाट आणि उल्हास स्टेशन जवळील नदी ही वेगवेगळी ठिकाणे आहेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-ही जी लक्षवेधी येथे मांडण्यात आली आहे, ती हिराघाटची आहे. झुलेलाल ट्रस्टबाबत आहे. त्याबाबत मी आता निवेदन केले.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आमची दुसरी सूचना आहे की, बोटक्लब मध्ये आपण गणेश घाटची व्यवस्था करावी

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- ते सुध्दा करु शकतो, परंतु लक्षवेधी ज्या बाबत होती , त्याबाबत त्वरीत कार्यवाही केली.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- त्याबाबत आमची दुसरी सूचना आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः- साहेब, आपण ते करा. परंतु ते गणेशोत्सवा अगोदर करा. मागच्या वेळेस आपण म्हणालात की, गणेशोत्सवापुर्वी करु. परंतु त्याबाबत आपण अद्याप काही कार्यवाही केली नाहीत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :- मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी आता सांगितले की, हिराघाट येथे गणेशविर्सजनासाठी परवानगी देण्यात आली आहे. हे खुप चांगले आहे. परंतु यांचे असे म्हणणे आहे की, बोटक्लब येथे सुध्दा एक गणेश घाट तयार केला पाहिजे. त्याचबरोबर माझे असेही निवेदन आहे की, उल्हासनगर रेल्वे स्टेशन शेजारी जो आमचा गणेश घाट आहे, त्याची सुध्दा फार मोठी दुर्दशा आहे. तेथे सुध्दा दुरुस्तीची अतिशय जरूरत आहे. तेथे सुध्दा खुपच कचरा असतो. तेथे सुध्दा व्यवस्था केली तर फारच चांगले होईल.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः- मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझी एक सूचना आहे की, जेथे गणपती विर्सजन केले जाते, ती जी जागा आहे, त्या जागेची आपण पहाणी करा. तेथे ज्या-ज्या अडचणी आहेत, त्या दूर करण्याचे आपण जर प्रयत्न केले तर फारच चांगले होईल. धन्यवाद.

मा. महापौर (श्रीमती मालती करोतिया):- गणेश विर्सजनाविषयीच्या लक्षवेधीवर बरीच चर्चा झाली आहे, तर मी आयुक्त साहेबांना निर्देश देते की, हिराघाट व उल्हास स्टेशन जवळील नदीत साफसफाई करुन गणेश विर्सजनासाठी चांगली जागा उपलब्ध करुन दिली तर चांगले होईल. गणेश विर्सजना अगोदर कचरा वगैरे हटविला जावा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- थोडा उशिर झाला आहे, उल्हासनगर भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष श्री. माधवदास यांचे आजच सकाळी निधन झाले आहे. व पाच-साडेपाच वाजता त्यांची प्रेत यात्रा निघणार आहे. तर मला असे वाटते की, त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी या प्रस्तावाचे अनुमोदन करतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी कृपया मौन धारण करावे.

सुचकाचे नाव :- श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

शोक प्रस्ताव :-

उल्हासनगर भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष श्री. माधवदास रोचलानी यांचे दि. १८.७.२००३ रोजी निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ४७ क दिनांक:-१८.७.
२००३.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. माधवदास रोचलानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

एकमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सभागृहामध्ये नविन आरोग्य अधिकारी श्री. खरात हे उपस्थित आहेत. ते सभागृहास आपला परिचय करून देतील.

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-मा. महापौर महोदया व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य मी डॉ. के. आर. खरात इथे वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन आताच रूजु झालो आहे. या अगोदर मी जे.जे. हॉस्पीटल येथे तीन वर्ष, के. ई.एम. हॉस्पीटल येथे ३ वर्ष व जिल्हा परिषदेत दहा वर्ष अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणुन काम केले आहे. जे.जे. हॉस्पीटल मधुन एम.डी. इन कम्युनिटी मेडीसीन व के.ई.एम. हॉस्पीटलमधुन सार्वजनिक आरोग्याची पदविका उतीर्ण केली आहे. धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २:-मागील सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.
(विशेष महासभा दि. २०.६.२००३, सर्वसाधारण महासभा दि. २०.६.२००३ व विशेष महासभा दि. ७.७.२००३)

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-मा. महापौर महोदया, इतिवृत्तांतील पृष्ठ क्र. ३ वर आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांच्या वक्तव्याची अशा प्रकारे नोंद आली आहे. की कभी सास भी बहु थी म्हणा किंवा इंदीरा गांधींचे राज्य जावुन सोनिया गांधीचे राज्य आले. त्यांचे पण आम्ही स्वागत करतो. तर आमचे असे म्हणणे आहे की, राष्ट्रवादी कॉंग्रेसचा जन्म यासाठी झाला आहे की, सोनिया गांधीचे राज्य येवू नये. तर आमच्या सभागृह नेत्त्यांनी असे शब्द म्हंटले नसतील कॉंगेस अध्यक्ष पदावर इंदिरा गांधी नंतर सोनिया गांधी आल्या आहेत.

म्हणुन मी अशी दुरूस्ती करू इच्छितो की, सभागृह नेत्त्यांनी येथे म्हणावे की, सोनिया गांधीचे इथे राज्य आलेले नाही म्हणुन त्यांचे स्वागत करण्याचे प्रश्नच उदभवत नाही. व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तसेही सोनिया गांधीना पंतप्रधान पदावर पाहु इच्छित नाही. हा दोन्ही पक्षांच्या तत्त्वांमधील फरक आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रस हे आम्ही दोन्ही येथे सहयोगी पक्ष आहेत. दुसरी गोष्ट पृष्ठ क्र. ४७ वर आपले लक्ष वेधु इच्छितो जेथे माझ्या वक्तव्यामध्ये श्री. जमनु पुरस्वानी यांच्याबाबत लिहिले आहे की हे वर्ष सोडुन इतर वर्षी तुम्ही आमच्या सोबत होता, आमच्या सोबत नाही, सत्त्तापक्षात होतात. अशी दुरूस्ती मी करू इच्छितो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, इतिवृत्तांतात दुरूस्ती करण्याबाबत आम्ही थोडीच चर्चा करत आहोत? ज्या व्यक्तीने जे शब्द बोलले आहेत. ती व्यक्ती असे म्हणते का की मी असे बोललो नाही. इतिवृत्तातामध्ये संशोधन, असे नाही असे झाले पाहिजे. यासाठी थोडी ही सभा आहे. हे जे आम्ही इतिवृत्त कायम करत आहोत ते काय करत आहोत. जे इतिवृत्त आहे ते आम्ही कायम करीत आहोत. असे थोडे आहे की त्यांनी असे म्हंटले होते ते बरोबर नाही त्यामध्ये असे लिहिले पाहिजे. असे थोडे आहे, त्यांनी असे बोलले होते किंवा नाही. बोलले असेल तर त्यावर काही प्रश्न उपस्थित होता कामा नये.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, हे शब्द जेव्हा मी म्हंटले होते. त्यावेळी आमच्या श्रीमती. गुप्ता मॅडम नव्यानेच निवडुन आल्या होत्त्या. त्यावेळेस मी उदाहरणादाखल म्हंटले होते की, सासु नंतर सुन, महाराष्ट्रात किंवा भारतात कॉंग्रेसचे राज्य सोडुन कुणाचे राज्य आले. हे मी म्हंटले नव्हते. मी म्हंटले होते की, जेव्हा इंदिरा गांधी कॉंग्रेस अध्यक्षा होत्त्या. त्यानंतर त्यांचे कामकाज श्रीमती. सोनिया गांधी यांनी सांभाळले. त्याच हिशोबाने जशा श्रीमती. आशा गुप्ता नगरसेविका होत्त्या त्यांच्या नंतर त्यांची सुन निवडुन आली. म्हणजेच जागा राष्टवादी कॉंग्रेसची आली. तर त्यावेळेस आम्ही सर्वांचे तोंड गोड केले होते. त्या विषयावर मी म्हंटले होते की, मला वाटते श्री. दिलीप लालवानी हा विषय दुसरीकडे घेवून जात आहेत. त्यांनी हा विषय दुसरीकडे घेवून न जाता असा विचार केला पाहिजे. पहिले ती जागा राष्ट्रवादीची होती. पहिले सासु त्या जागेवरून निवडुन आली होती आता सुन त्या जागेवरून निवडुन आली आहे. यासाठी मी त्यांचे अभिनंदन केले होते. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब या विषयावर चुकीची चर्चा होत आहे. आमच्या कॉंग्रेस अध्यक्षा श्रीमती. सोनिया गांधी यांचा अपमान केला जात आहे. तो आम्ही कधीही सहन करणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>अपमानाची काही गोष्ट नाही. त्या कॉंग्रेस अध्यक्षा आहेत आम्ही त्यांचा सन्मान करतो. परंतु ही जी अक्षरे आहेत ना की राज्य आले. त्याबाबत श्री. दिलीप लालवानी हे दुरूस्ती करू इच्छित होते.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>महापौर महोदया, मागच्या सभेत श्री. दिलीप लालवानी हे उपस्थित नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>हे चुकीचे होत आहे. आम्ही ते कधीही सहन करणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>जसे श्री. रमेश चव्हाण यांनी म्हंटले की मागच्या सभेत श्री. दिलीप लालवानी हे उपस्थित नव्हते. ही गोष्ट बरोबर आहे

परंतु राष्ट्रवादी, कॉग्रेंस बाबत देशाच्या पातळीवर मा. श्री. शरद पवार जो काही निर्णय देतील त्याचे आम्ही स्वागत करू. व तो आम्हाला स्विकार असेल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आजच श्री. शरद पवार यांनी जे म्हंटले आहे त्याच्या आधारावर बोलत आहात? ते राष्ट्रवादी व परराष्ट्रवादीचा मुददा उपस्थित करत होते. परंतु ते इतिवृत्तांतात नाही. उल्हासनगरमध्ये उल्हासनगरच राहु दया.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. महापौरजी, सदस्यांना हे सांगावयास पाहिजे की आम्ही इतिवृत्त कायम करीत आहोत. इतिवृत्तांतात त्यांनी असे बोलले असे बोलावयास नको होते. तसे बोलावयास पाहिजे होते. असे संशोधन व्हावयास पाहिजे होते. यासाठीचा हा विषय नाही. हा विषय असा आहे की त्यांनी असे म्हंटले होते की नव्हते. जर ते म्हणत आहेत की, मी असे म्हंटले आहे. तर त्यावर चर्चा व्हावयास नको होती.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-आता आमच्या सभागृह नेत्त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या जागेवर आल्या आहेत. राज्य आले असे म्हंटले नाही. असे त्यांनी स्पष्ट केले आहे. म्हणुन इतिवृत्तातातमध्ये आपण अशी दुरूस्ती केली तर बरे होईल. अतिउत्तम होईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आयुक्त साहेब, सर्वांनी कॅसेट ऐका आणि त्यानंतर दुरूस्ती करायची की नाही ते ठरवा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे कॅसेट मध्ये आले असेल तेच ठेवले जाईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-सचिव साहेब, पान नं. ३९ वर एक छोटीशी चुक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कोणत्त्या सभेच्या?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-पहिल्या सभेच्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पान नं. ३९ ?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-एम.जे.पी. सुध्दा कान हलवत आहे. तर कान हलवत नाही असे मला म्हणायचे आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ठिक आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-छोटया छोटया चुका आहेत. तीन वर्ष पुर्व योजना. तीन वर्ष पुर्ण योजना.

__मा. महापौरः-__दि. २०.६.२००३ रोजीच्या इतिवृत्ताताच्या पृष्ठ क्र. ३९ वर मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेली दुरूस्ती करून उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

__मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-__विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

__विषय क्र.३:-__ विद्युत विभागातील निरूपयोगी सामानांची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देणे बाबत.

पास ?

__मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-__मा. महापौरजी, ही जी निविदा मागविण्यात आलेली होती. ती अतिशय कमी दराची आली आहे. तर पुन्हा निविदा का मागविली नाही प्रशासनातर्फे ही शंका आमच्या मनामध्ये आहे. पुन्हा निविदा का मागविली नाही ? त्या मागवावयास पाहिजे होत्त्या. एकच निविदा आली होती आणि ती सुध्दा कमी दराने, तीचा दर अतिशय कमी आहे. निविदा एकच आहे.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__आयुक्त साहेब, याठिकाणी स्पष्टपणे असे म्हंटले आहे की, निविदा को-या घेवून जाताना ७ लोकांनी नेल्या आहेत, श्री. मुर्तूजा खान सनराज स्टील कार्पोरेशन, रामनारायण पांडे, मे. गुड्डु अटोमोबाईल्स, मे. समीर बैटी, मे. एम. के. ट्रेडर्स व हिंदुस्तान सॅकप हे को-या निविदा घेवून गेले आहेत.

सदर निविदा इशारा रक्कमेसह सादर करण्याची मुदत ३०.६.२००३ रोजी सायंकाळी ५ वाजे पर्यंत होती १ निविदा धारकांनी इशारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या व ते दिनांक १.७.२००३ रोजी ११ वाजता उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्त्मक तक्ता. ७ को-या निविदा गेल्या आणि त्यातील फक्त एकच निविदा येते. अशावेळी तिथे काही तरी घडलेले आहे. एक सर्वसामान्य लोकांना त्याची साशंका येते तर प्रशासनाला का येवू नये ही विशेष बाब आहे. त्यातला त्यात एक महत्त्वाची बाब म्हणजे बाब नं. १ त्यामध्ये प्रशाासनातर्फे हे दर कुणी ठरविले या नगाची किंमत ऐवढी आहे. हे आपल्या प्रशासनाच्या जाणकारांनी , तज्ञांनी ठरविले असेल. आणि ते कोणी कोणी ठरविले ते महत्त्वाचे आहे. त्यानंतर बाब नं. १ मध्येच जे १४०० नग आहेत. त्याचा महापालिकेच्या तज्ञ लोकांनी प्रशासनांनी ५६ रू. प्रतीनग असा दर ठरविला आहे. म्हणजे ५६ रू. प्रमाणे १४०० नगांची किंमत होते ७८,४००/- आणि त्या निविदा धारकांने फक्त १५ रू. प्रतीनग अशी किंमत भरली आहे. म्हणजे त्याची किंमत होते २१०००/- रू. म्हणजेच एकाच बाबीमध्ये जवळ जवळ ५७,०००/- रू. फरक आहे. मग एक निविदा फक्त आलेली आहे. मग फेरनिविदा का मागविली नाही ? प्रशासनाला काय एवढी घाई होती ? जर एका बाबीमध्ये ऐवढा फरक आहे तुम्ही ठरविलेल्या दरानुसार टेंडर काढताना अगोदर तुम्ही जे ५६ रू. दर निश्चित केला आहे. आणि याठिकाणी १५ रू. प्रती नग अशी निविदा आली आहे. आणि वाटाघाटीमध्ये तुम्ही १७ रू. चा प्रती नग दर मान्य करता आणि पुन्हा विक्रिसाठी परवानगी दया अशी महासभेपुढे परवागनी मागता.

__मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-__मा. महापौर महोदया, ही जी निविदा मागविली होती ती जे निरूपयोगी सामान आहे. त्याची विल्हेवाट लावण्याबाबत. व हे जे दर आहेत ते महासभा ठराव क्र. १४ दि. २०.९.२००१ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहेत. इथे

ब-याचशा लोकांनी को-या निविदा खरेदी केल्या परंतु एकाच व्यक्तीने निविदा सादर केली. व त्याचे दर सुध्दा कमी होते त्यास वाटाघाटीस बोलाविण्यात आले. व महासभा ठरावाअन्वये जे दर, कमीत कमी दर निश्चित केले होते. ते दर या निविदाकाराने दिले आहेत. की दोन बाबी अशा आहेत ज्यात महासभेने निश्चित केलेले जे दर आहेत ते लिहिलेले नाहीत. त्या दोन बाबी सोडुन बाकीच्या बाबी त्यास देण्याबाबत आम्ही प्रस्तावित केले आहे. म्हणजेच महासभेचे जे अंदाजित दर आहेत. त्यांच्यापेक्षा कमी दराने देण्यास आम्ही शिफारस केलेली नाही. जे कमीत कमी दर आहेत. त्यानुसार देण्याची आम्ही शिफारस केली आहे. दर कमी आले असते तर आम्ही स्वतःच फेरनिविदा मागविली असती. ज्या बाबींमध्ये दर कमी आले आहेत त्या बाबींबाबत फेरनिविदा मागविण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. जे कमीत कमी दरानुसार आले आहे. त्याबाबत आपल्या समोर प्रस्ताव ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-यामध्ये महासभेने ठरविलेले दर नमुद केलेले नाहीत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-ते नमुद नाही ते बरोबर आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहाता कायम करण्यात येईल असे नमुद करून पारीत करू इच्छित आहात. चालेल ना?

मा. महापौरः-सदर प्रस्तावाबाबत, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता निर्णय अंमलात आणता येईल अशा आशयाचा ठराव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४:- श्री.उत्तम लोणारे यांची महापालिका सेवेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

काही सदस्य :-पास, एका वर्षासाठी.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-किती वर्षासाठी?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,शासनातर्फे जी नियुक्ती झाली आहे. त्यामध्ये तर तीन वर्षासाठी आहे तर महानगरपालिकेने सुध्दा

तीन वर्षासाठी मंजुरी दिली पाहिजे. प्रत्येक वर्षी आपल्यासमोर येणे हे बरोबर नाही. जर आपणांस वाटत असेल की यांचे कामकाज बरोबर नाही. तर त्यांना परत पाठविले पाहिजे आपला तो अधिकार आहे. त्यावेळेस आपण बोलु शकता की यांना परत पाठवा. परंतु जर शासन आदेशामध्ये तीन वर्षाची मुदत आहे. तर मला वाटते की आपण सुध्दा तीन वर्षासाठी मंजुरी दिली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता आयुक्त साहेबांनी म्हंटले की जे अधिकारी सक्षम नाहीत. त्यांच्याबाबतीत महासभेला अधिकार आहेत. तर मला असे वाटते की आजपर्यंत जेवढया अधिका-यांना महासभेने परत पाठविण्याबाबत ठराव केले त्यांना आपण कार्यमुक्त केले आहे? आपण त्यांना कार्यमुक्त का केले नाही? आपण कायदयानुसार चालणारे अधिकारी आहात, आपल्यावर कायदा लागु होत नाही का? जसे आमचे विरोधी पक्षीयांनी (सदस्य) म्हंटले की, अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी आपणांस किती उपायुक्त पाहिजेत? त्यासाठी आपणास किती वेळ पाहिजे. जर महासभा कुणाच्याही कामाने समाधानी नसेल तर, म्हणुन त्यांचा प्रस्ताव एकेक वर्षाने येत राहिला तर महासभेस तो अधिकार आहे की जर ती व्यक्ती सक्षम नसेल तर त्यास कमीत कमी एक वर्षानंतर... आम्ही असा एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे तो महासभेचा अधिकार आहे. एकेक वर्ष त्यांना कार्यरत ठेवणे. किंवा त्यांना परत पाठविणे. आजपर्यंत आम्ही जे ठराव पारीत केले. ते एकेक वर्षासाठीच आहेत. व मी सर्व सदस्यांना विनंती करेन की, जो खेळ आहे तो आपल्या हातात असला पाहिजे. आज अधिकारी सक्षम बनुन काम करत असेल तर तीन वर्ष काय सहा वर्षापर्यंत सुध्दा ठेवु शकतो. श्री. ढाकरे साहेब सात वर्ष येथे होते. मला असे वाटते की कदाचित श्री. आर. के. सोनवणे साहेब सुध्दा येथे ६-७ वर्ष राहतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मला ढाकरे साहेब व्हायचे नाही. मी ३ वर्षापेक्षा जास्त काळ इथे राहु इच्छित नाही. मी तीन वर्षापेक्षा जास्त काळ इथे राहणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>जर ते सक्षम अधिकारी असतील तर आम्ही त्यांना सहा-सात वर्ष सुध्दा ठेवले आहेत. जर कुणी अधिकारी सक्षम नसेल तर त्याच्या बाबतचा प्रस्ताव जेव्हा महासभेपुढे येईल. जर तो अधिकारी सक्षम असेल तर जसे आमचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. लांजेवार होते त्यांना ३ वर्षासाठी ठेवले होते. श्री. भिवापुरकर यांना ठेवले होते. तर काही काही लोकांना आम्ही ३-३ वर्ष सुध्दा ठेवले आहे. यांना एक वर्षासाठी ठेवले जावे. हा आमचा धोरणात्मक निर्णय आहे. त्यानंतर पुन्हा यांचा प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>जसे मा. आयुक्त साहेबांनी म्हंटले आहे. की शासनाचा निर्णय आला आहे तीन वर्षासाठी तीन वर्ष नाही परंतु दोन वर्ष तरी केले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>पाहिजे तर आम्ही यावर काही तडजोड करू शकतो. दोन वर्षासाठी, नाहीतर विरोध करू.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>महापौर महोदया, इथे ही गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे की, शासनाने त्यांची येथे नियुक्ती करताना जो आदेश पाठविला आहे. काय त्यामध्ये आम्ही फेरफार करू शकतो का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, महानगरपालिकेत कोणत्याही अधिका-यास जेव्हा प्रतिनियुक्तीवर पाठविले जाते तर महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार प्रतिनियुक्तीच्या काही अटी व शर्ती असतात. व त्या अटी शर्ती नुसार पहिल्यांदा जी प्रतिनियुक्ती होते ती कमीत कमी तीन वर्षा करिता असते. त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या ज्या अटी शर्ती आहेत त्या अदयाप पर्यंत आमच्याकडे आलेल्या नाहीत. परंतु जी प्रतिनियुक्ती असते ती ३ वर्षासाठीच असते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आम्हाला वाटते ३ वर्षासाठी त्यांची प्रतिनियुक्ती असली पाहिजे. एक वर्षासाठी करत असाल तर त्यास आमचा विरोध आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-या प्रस्तावाबाबत मतदान घेतले जावे का?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-शासन निर्णयानुसार जे योग्य असेल त्या बाजुने आम्ही आहोत त्यामध्ये कुठलाही फेरफार होवू नये. ३ वर्ष असेल तर ३ वर्ष त्यांची कालमर्यादा बरोबर आहे. शासन निर्णयाच्या विरोधात आम्ही जावु इच्छित नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आमचे म्हणणे आहे की, शासनाचा जो निर्णय आहे. ३ वर्षासाठी, त्यानुसार चालले पाहिजे. यांचा कार्यकाल ३ वर्षासाठी असला पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-जेव्हा आम्ही श्री. जवांदे साहेब, श्री. कांबळे साहेब यांच्या बाबतचा ठराव सर्व संमतीने पारीत केला होता त्यावेळेस आपण का नाही असे म्हंटले? तेव्हा हे सर्व सदस्य कुठे गेले होते. जेव्हा आपण श्री. कोळेकर साहेबांचा एका वर्षासाठी ठराव पारीत केला तेव्हा कुठे होता कायदा? त्यावेळेस सर्वांनी एकमताने ठराव पारीत केला होता. एका वर्षासाठी सर्व अधिका-यांचा कार्यकाल आम्ही केला आहे. जेवढे काही १४ अधिका-यांचा प्रस्ताव महासभेपुढे आला होता. त्या सर्वाचा कार्यकाल आम्ही एक वर्षासाठी मंजुर केला होता. तर एकाचा कार्यकाल २ वर्ष करणे हा दुजाभाव होईल. सर्व सदस्यांना विनंती आहे की, असा प्रस्ताव एक वर्षानंतर पुन्हा महासभेपुढे आला पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-भलेही मतदान घ्या. आमचे म्हणणे आहे की, शासन निर्णयानुसार ३ वर्षाचा कार्यकाल असला पाहिजे. व शासनाच्या निर्णयाच्या विरूध्द जाता कामा नये.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-जर शासनाच्या निर्णयाच्या विरोधात महासभेने बहुमताच्या जोरावर जर तो निर्णय घेतला तर त्यावेळेस आयुक्त म्हणुन आपली काय भुमिका असेल?

मा. महापौर:-मी हा प्रस्ताव मतदानास टाकत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-या प्रस्तावाबाबत मतदान घेतले जात आहे.
मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-एकदम दोन प्रश्न इथे समोर आले आहेत. एकतर शासनाच्या निर्णयात आपण फेरफार करू शकतो का? हा एक प्रश्न आणि दुसरे त्यांनी विचारले की असा ठराव बहुमताच्या जोरावर इथे पारीत झाला तर आयुक्त म्हणुन त्यावर आपली काय भुमिका असेल?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, या सभागृहात कोणताही निर्णय शासनाच्या धोरणाच्या विरूध्द होत असेल तर तो निर्णय शासनाच्या समोर ठेवणे शासनाच्या निर्दशनास आणणे ते माझे शासनाचा प्रतिनिधी म्हणुन कर्तव्य आहे. ते मी करेन.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-महापौर महोदया, श्री. उत्तम लोणारे साहेब, खुप चांगले अधिकारी आहेत. व असे अधिकारी आमच्या महापालिकेमध्ये अवश्य पाहिजेत. आमच्या सभागृह नेत्त्यांनी जे म्हंटले की एकेक वर्षानी प्रस्ताव महासभेपुढे आला पाहिजे. असा धोरणात्त्मक निर्णय झाला होता. परंतु जसे की आपण म्हणत आहात. दोन वर्षासाठी आमची काही हरकत नाही. ६ वर्ष जरी राहिले, २ वर्ष ठेवले तरी काही चिंता नाही. आम्हाला त्यांची काही अडचण नाही. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जेसवानी सतरामदास व श्री. पंजाबी नारायण हे सभागृहातुन बाहेर गेले.
मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-दोन वर्षासाठी?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-प्रथम त्यांनी मान्य केले नाही. आता आमचे म्हणणे आहे तीन वर्षासाठी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आता आमच्या सदस्यांनी आमच्या अध्यक्षा श्रीमती. ज्योती कालानी यांच्याशी जी चर्चा केली. भाभी ज्योती कालानी यांनी आदेश दिले की, २ वर्षासाठीचा ठराव पारीत केला जावा. त्यासाठी मी भाभींच्या आदेशानुसार दोन वर्षाचा कालावधी ठेवण्याबाबत सांगितले. महासभे अगोदर आमच्या सत्त्ताधारी पक्षाची बैठक झाली होती त्यामध्ये या प्रस्तावाबाबत एक वर्षासाठी मंजुरी देण्याचा निर्णय झाला होता. आता आमच्या अध्यक्षा भाभी ज्योती कालानी यांनी आदेश दिला आहे की, २ वर्षासाठी ठराव केला जावा. त्यांनतर...

मा. सदस्या श्रीमती. भारती छाबिया या सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, शासनाचा जो आदेश आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- व ज्यांचे शासन महाराष्ट्र शासनात आहे, त्यांचे शासन येथे आहे. त्यांनी आपल्या शासनाचा निर्णय मानु नये. यापेक्षा मोठा अपमान सरकारचा कधी होऊच शकत नाही. तर यांना येथे बसण्याची काही आहेच नाही.

मा. सदस्य श्री. ठकुरास बेहरानी व श्री. मोहन साधवानी हे सभागृहातून बाहेर गेले.
मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- काय केले जावे?
मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- यामागे असा अर्थ आहे की, सभागृह नेत्त्याने जसे म्हटले की, आमच्या हातामध्ये खेळ असला पाहिजे. म्हणजे प्रशासनाला काहीपण पाहिजे. जसे मागच्यावेळेस श्री. डोईफोडेंच्या बाबतीत म्हटले होते की, कूणी सक्षम अधिकारी आहेत. त्यांच्या बाबतीत आपण उदाहरण दिले होते की, रात्री दोन वाजता बोलविले तरी येतात, सकाळी सहा वाजता बोलाविले तरी येतात. तरी महासभेच्या आग्रहाखातर तुम्ही त्यांना सोडले. म्हणजे फक्त काही लोकांच्या मर्जीनुसार काम करत नाहीत. म्हणून असे कर्तव्यदक्ष अधिकारी सुध्दा येथुन सोडुन दयावेत असा प्रवृतीस आमचा विरोध आहे. म्हणून शासन निर्णयानुसारच म्हणजे तीन वर्षासाठी मंजुरी दिली जावी.

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):- जे त्यांना एक वर्षासाठी ठेवू इच्छितात, त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- सचिव साहेब, प्रस्ताव काय आहे?

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-* त्यांना प्रतिनियुक्तीने येथे नेमणुक दयायची आहे.

*मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-* तीन वर्षासाठी , दोन वर्षासाठी, एक वर्षासाठी किती कालावधीसाठी?

*मा. सचिव ( श्री. प्रकाश कुकरेजा)* :- त्यांची उपसूचना आहे की, प्रतिनियुक्तीची कालमर्यादा निश्चित केली पाहिजे. आपणांस त्यावर मतदान करावे लागेल. ठिक आहे?

## ३६ मते

९. श्रीमती. रामचंदानी भावना
१०. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
११. श्रीमती. कालानी ज्योती
१२. श्री. ऐडके गणपत
१३. श्रीमती. शर्मा कमला
१४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१५. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१६. श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्री. पवार नाना आनंदा
१० श्रीमती. आहुजा नीता
११ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१२ श्री. शांताराम निकम
१३ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१४श्रीमती. मसंद माया
१५ श्रीमती. वनवारी मोना अशोक
१६ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१७ श्री. लुंड गोविंदराम
१८ श्रीमती. खिलनानी भावना
१९.श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंदसिंग
२० श्रीमती. कारीरा रेखा
२१ श्री. पमनानी ईश्वर
२२ श्रीमती. पंजाबी दिपा
२३ श्रीमती. भठिजा कोमल
२४ श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
२५ श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती. रिझवानी सुजाता
२७. श्री. म्हस्के अंकुश
२८. श्री. लालबिहारी यादव
२९ श्री. जाधव सुरेश
३०.श्री. टाले प्रमोद
३१ श्रीमती. साधवानी जया
३२. श्री. भालेराव गौतम
३३. श्रीमती. वसिटा बेबी
३४. श्री.ठाकुर अशोक
३५. श्री. बेहरानी मोहन
३६. श्रीमती. करोतिया मालती

*मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-* *जे त्यांना तीन वर्ष ठेवू इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.*

***१३ मते***

*९. श्रीमती. जावळे संगिता*
*१०. श्रीमती. मोकल सिमा*
*११. श्री. उमाप रामदास*
*४ श्री. पुरस्वानी जमनादास*
*५ श्री. असरोंडकर राज*
*६. श्रीमती. कृष्णानी रेखा*
*७.श्रीमती. वामणकर नंदिनी*
*८ श्रीमती. खांडेकर प्रेमा*
*९ श्री. चव्हाण रमेश*
*१० श्री. बोडारे धनंजय*
*११ श्री. पाटील विश्वनाथ*
*१२ श्रीमती. ससाणे लक्ष्मी*
*१३ श्री. चौधरी राजेंद्र*

*मा. महापौरः-* *सदर प्रस्तावाबाबत बहूमताने पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.*

विषय क्र. ४:- श्री.उत्तम लोणारे यांची महापालिका सेवेत उपायुक्त पदावर
प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक उमपा/२२९८/२०३०/प्र.क्र.२५९/९८/नवि-२३/ दिनांक १३/ /२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर एकूण चार उपायुक्त पदनामाची पदे मंजुर आहेत पैकी सद्यस्थितीत एकूण दोन अधिकारी उपायुक्त पदावर कार्यरत आहेत.

महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक एमडीई ०१०३/८०५/आस्थापना-२ दिनांक ३१ मे, २००३ अन्वये श्री. उत्तम लोणारे याची या महापालिकेत उपायुक्त पदावर शासनाने नमूद केलेल्या अटी व शक्तीच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीवर नेमणुक केली आहे. त्यानुसार श्री. उत्तम शि. लोणारे हे या महापालिकेत दिनांक २.६.२००३ रोजी मध्यान्हपूर्व रूजु झालेले आहेत.

शासनाच्या धोरणाप्रमाणे प्रतिनियुक्तीचा कालावधी कमीत कमी ३ वर्षाचा असता त्या पुढील कालावधीसाठी शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यामुळे श्री. लोणारे यांना ३ वर्षासाठी उप आयुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्याचा प्रस्ताव मुंबईत प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार मान्यतेसाठी महासभेपुढे प्रस्तावीत करणेत येत आहे.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. कोमल भठिजा

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. उत्तम लोणारे यांची महापालिका सेवेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीवरील एका वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-* *विषय क्र. ५ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. ५:-श्री. व्ही. एस. ठणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणे बाबत.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ठिक आहे?*

*मा. सदस्य श्री. चिमन रुपानी :- श्री. ठणेकर साहेबांना वाहन व्यवस्थापक म्हणून पदोन्नती दिली जात आहे. तर मी हे जाणून घेवू इच्छितो की,त्यांना वाहनाविषयी काही ज्ञान आहे का? ऑटोमोबाईल संबधी त्यांना काही ज्ञान आहे का? त्यांची पात्रता काय आहे? याबाबत जरा खुलासा केला जावा कारण की, कल्याण महानगरपालिकेमध्ये जेवढे काही कनिष्ठ अभियंता , वाहन व्यवस्थापक म्हणून नियुक्त केले आहेत, मला वाटते ऑटोमोबाईल इंजिनिअरींगची पदविका ही पात्रता त्यासाठी निश्चित केली होती. त्यानंतरच त्यांची नियुक्ती केली होती.*

*श्री. उत्तम लोणारे ( मा. उप-आयुक्त, मुख्यालय):- मा. महापौर महोदया, शासनाच्या आदेशाप्रमाणे आणि कार्यालयातील रिक्त जागा पदोन्नतीने भरण्याबाबत निवड समिती गठित करण्यात आली होती. वाहन व्यवस्थापक हे पद रिक्त होते. आणि एकाकी पद असल्यामुळे ते जेष्ठतेनुसार भरवयाचे असते. या पदासाठी काही आरक्षण लागु नाही. या पदासाठी जी पात्रता असते ती पॉलिटेकनिकल मॅकेनिकलचा डिप्लोमा पहिजे. व त्यास तीन वर्षाचा अनुभव पाहिजे. तर श्री. ठणेकर यांच्याकडे ही सर्व पात्रता होती. यासाठी आपल्या महापालिकेच्या निवडसमितीने ठराव पारीत केला, व आपल्यासमोर ठेवला आहे.*

*मा. सदस्य श्री. चिमन रुपानी:- मी हे जाणून घेवू इच्छितो जसे आपण सांगितले की, तीन वर्षाचा अनुभव असला पाहिजे. तीन वर्षाचा मॅकनिकलचा अनुभव*

*असला पाहिजे. ही पात्रता त्यांच्यामध्ये आहे का? त्यांच्याकडे शैक्षणिक पात्रता आहे का?*

*<u>श्री. उत्तम लोणारे ( मा. उप-आयुक्त, मुख्यालय):-</u> त्या पदासाठी जी शैक्षणिक अर्हता असते. समकक्ष पदाची जी अर्हता असते ती सुध्दा चालते. आणि त्यांची जी वाहन व्यवस्थापक म्हणून वेतनश्रेणी आहे व आता ते जे काम करतात त्याची जी वेतनश्रेणी आहे ती सारखीच आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपानीः-</u> मा. महापौरजी, मी वेतनश्रेणीची गोष्ट करत नाही. मी त्यांच्या पात्रतेची गोष्ट करत आहे. पद रिक्त आहे म्हणून कोणत्त्याही व्यक्तीस कोणत्त्याही पदावर बसवू शकतो असे काही आहे का?*

*<u>श्री. उत्तम लोणारे ( मा. उप-आयुक्त, मुख्यालय):-</u> नाही-नाही सेवाजेष्ठते नुसार त्यांना ते पद दिले आहे. त्यांच्याकडे शैक्षणिक पात्रता आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपानीः-</u>मी तेच जाणुन घेवू इच्छितो. त्यांच्याकडे शैक्षणिक पात्रता आहे का?*

*<u>श्री. उत्तम लोणारे ( मा. उप-आयुक्त, मुख्यालय):-</u> सेवा भरती नियमानुसार त्यांच्याकडे शैक्षणिक पात्रता आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपानीः-</u>तर ठिक आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>मा. महापौरजी एक मिनिट, आता श्री. लोणारे साहेबांनी जे श्री. ठणेकर यांच्या वेतनश्रेणी बाबत सांगितले आहे. त्यांची आताची जी वेतनश्रेणी आहे व पदोन्नती झाल्यानंतरची जी वेतनश्रेणी आहे ती एकच आहे. आज तुम्ही त्यांची बदली करत आहात की, त्यांना पदोन्नती देत आहात, हा एक पहिला मुददा आहे. श्री. ठणेकर हे पाणी पुरवठा विभागात ज्या पदावर कार्यरत आहेत. त्या पदाचा त्यांचा अनुभव त्याच्यानंतर यापुर्वी त्यांनी प्रभारी म्हणुन उपअभियंत्याची जी कामे केली असतील किंवा जो पदभार सांभाळला असेल तो अनुभव जर बघितला तर मला वाटते की आता तुम्ही प्रतिनियुक्तीवर जी बाहेरून माणसे मागविली आहेत. त्याऐवजी जर त्यांना त्याच जागी प्रमोशन दिले असते तर काहीतरी हा प्रमोशनचा विषय योग्य झाला असता. आज तुम्ही त्यांना त्याच वेतनश्रेणीवर तुम्ही फक्त विभाग बदली करून देत आहात. त्यांना प्रमोशन देत नाहीत. तुम्हाला जर त्यांना प्रमोशन दयायचे असेल तर त्याच विभागात तुम्ही जी बाहेरून माणसे मागवता त्याऐवजी यांना जर तेथे पदोन्नती दिली तर मला वाटते ते जास्त बरे होईल धन्यवाद.*

*<u>श्री. उत्तम लोणारे ( मा. उप-आयुक्त, मुख्यालय):-</u>पदोन्नतीने जास्त अधिकार प्राप्त होतात. त्यांच्याकडे तांत्रिक व शैक्षणिक अर्हता आहे आपल्याकडे दुसरा उमेदवार नाही. प्रतिनियुक्तीने अधिकारी मागवावा लागेल परंतु आपल्याकडील जे लोक आहेत त्यांना आपण संधी दिली पाहिजे. यांच्याकडे सर्व शैक्षणिक पात्रता आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>श्री. ठणेकर यांनी मागे अधिकारी नसताना प्रभारी उप अभियंता म्हणुन काम केलेले आहे. आणि त्यांना तेवढा अनुभव पण आहे. पाणी पुरवठा विभागात ते ब-याच वर्षापासुन काम करत आहेत. त्यांना तेथे पदोन्नती देण्याऐवजी आपण बाहेरून प्रतिनियुक्तीवर माणसे बोलवत आहात. ही प्रतिनियुक्तीवरील माणसे न बोलवता यांना जर त्याच विभागात पदोन्नती दिली तर मला वाटते त्याचा योग्य उपयोग होईल. आणि त्यांना पदोन्नती मिळाल्यासारखे होईल. आज त्यांना फक्त विभाग बदलुन देत आहात. वेतनश्रेणी तीच आहे. त्या माणसाला तुम्ही कुठे न्याय देत आहात?*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आज आमच्या ज्या अधिका-यांना पदोन्नती दिली जात आहे. मला वाटते पदोन्नतीसाठी ते अनेक वर्षापासुन वाट पहात होते. मी आज धन्यवाद देवू इच्छितो निवड समितीला जी कर्मचा-यांना पदोन्नती देत आहे. जी अनेक वर्षापुर्वी दयावयास पाहिजे होती. त्यानंतर प्रशासनाने जे कायदेशिर आहे त्यानुसारच महासभेपुढे प्रस्ताव आणला आहे. श्री. रूपाणी साहेबांनी जी विचारणा केली त्यांच्या मनामध्ये जो मुददा होता. त्याचे स्पष्टीकरण करून घेणे. ही एक चांगली बाब आहे. निवड समितीने महासभेपुढे पदोन्नतीचे जे काही प्रस्ताव आणायचे आहेत. ते कायदेशिर असले पाहिजेत. अन्यथा या पुढे जर कोणतीही चुकीची शिफारस महासभेपुढे आली, महासभा आपले कर्मचारी आहेत म्हणुन मंजुरी देईल. परंतु बेकायदेशिर प्रस्तावाची जबाबदारी निवड समितीवर व प्रशासनावर राहिल. त्यासाठी महासभा जबाबदार रहणार नाही. हे झाले एक दुसरे असे की, श्री. ठाणेकर यांना जी वेतनश्रेणी देत आहात ती जर कायदयानुसार असेल तर निवड समिती जर कायदयानुसार प्रस्ताव महासभेपुढे आणत असेल तर महासभेने तो सर्वसंमतीने पारीत केला पाहिजे अशी माझी सर्व सदस्यांना विनंती आहे धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>आयुक्त साहेब माझ्या प्रश्नाचे उत्तर दया ना.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, श्री. ठाणेकर यांची ही जी वाहन व्यवस्थापक म्हणुन पद स्थापना केली जात आहे. पदोन्नती देताना त्याबाबत त्यांचे मत जाणुन घेण्यात आले होते. व त्यांनी वाहन व्यवस्थापक म्हणुन काम करण्यास संमती दर्शविली म्हणुन ही पदस्थापना केली जात आहे. राहिली गोष्ट त्यांना उप अभियंता म्हणुन पदोन्नती देण्याबाबतची. आमच्या कडे उप अभियंत्यांची जी एकुण पदे आहेत त्यात ते ज्या जातीमध्ये मोडतात. त्या जातीसाठी एकच पद आरक्षित आहे. व त्या पदावर आज एक व्यक्ती कार्यरत आहे. त्यामुळे त्यांना उपअभियंता म्हणुन पदोन्नती दिली जावू शकत नाही. त्या पदावर अनुसूचित जातीचा व्यक्ती कार्यरत असल्यामुळे श्री. ठाणेकर यांना वाहन व्यवस्थापक म्हणुन काम करण्यास आम्ही संधी दिली आहे.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मंजुर?*

*<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

<u>विषय क्र. ५:-</u> श्री. व्ही. एस. ठाणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर
पदोन्नती देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

<u>वाहन व्यवस्थापकः-</u>

वाहन व्यवस्थापक या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व कनिष्ठ अभियंता (वाहन/मेकॅनिक) या पदावरील ३ वर्षाचा अनुभव अशी आहे. वाहन व्यवस्थापक या पदासाठी श्री.व्ही.एस.ठाणेकर ,प्लान्ट ऑपरेटर हे अनु. जातीचे उमेदवार आवश्यक पात्रता धारण करीत आहेत त्यामुळे श्री.व्ही.एस.ठाणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५० दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे श्री. व्ही.एस. ठाणेकर यांना वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.*

*विषय :- महानगरपालिका लिपिक संवर्गातुन सात कर्मचा-यांना वरीष्ठ लिपिक पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती देणे बाबत.*

*मंजुर ?*

*मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-किती कर्मचारी आहेत. ७ आहेत की ९ ?*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-९ आहेत, ९.*

*मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-तर तेवढी दुरूस्ती करा.*

*मा. महापौरः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

विषय क्र. ६:- महानगरपालिका लिपिक संवर्गातुन सात कर्मचा-यांना वरीष्ठ

लिपिक पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महापालिकेतील खुल्या प्रवर्गातील पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे आवश्यक आहे. त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

<u>वरिष्ठ लिपीक :-</u>

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु.जाती - १ पद
अनु.जमाती -१ पद
वि.जा.(अ) -१ पद
खुले -९ पदे

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता
१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेत लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव अशी आहे.

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देणेकरिता गोपनिय अभिलेखांची पडताळणी केली असता त्यांच्या गोपनिय अभिलेखात
कोणत्याही प्रकारचे नकारात्मक शेरे आढळुन आलेले नाही तसेच त्यांची योग्यता पाहिली असता श्री. अशोक चव्हाण हे वि.जा.(अ) या आरक्षित पदावर पदोन्नती देणेस पात्र आहेत अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री.मधुकर कनोजे ,लिपीक,कर विभाग हे होते परंतु ते सद्या निलंबीत आहेत तरी सद्यस्थितीत त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही त्यांचेनंतर सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री. बिनुकुमार बिहारीलाल हे आहेत त्यांना अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नाही तसेच खुल्या प्रवर्गातुन पदोन्नतीसाठी खालिल नऊ पात्र कर्मचा-यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्रीम. कोशी खेमाणी, लिपीका, सामान्य प्रशासन विभाग
२) श्रीम. सुशिला मेठवाणी, लिपीका, कर विभाग
३) श्रीम. शोभा आर. अहुजा, लिपीका,लेखा विभाग
४) श्री. उमाशंकर मिश्रा, लिपीक, कर विभाग
५) श्री. मनवाणी मनोहर, लिपीक, जकात विभाग
६) श्री. राजकुमार पंजाबी, लिपीक, जकात विभाग
७) श्री. एस.जे. मिरचंदानी, लिपीक, जकात विभाग

८) श्री. लखो जी. पंजाबी, लिपीक, जकात विभाग
९) श्री. शिवकुमार मंगलानी, लिपीक, लेखा परिक्षण विभाग

लिपीक संवर्गातुन पदोन्नतीसाठी निवड केलेले उपरोक्त कर्मचारी हे पदोन्नतीची वेतनश्रेणी घेत आहेत आता त्यांची फक्त पदोन्नतीच्या पदावर पदस्थापना करावयाची आहे. तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५१ दिनांकः-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे महापालिका लिपिक संवर्गातुन उपरोक्त ११ कर्मचा-यांना वरिष्ठ लिपिक पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सदस्य श्री. पंजाबी नारायण व मा. सदस्या श्रीमती. भारती छाबिया यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.*

*विषयः- श्री. राजन खरात व श्री. पी. बी. शिंदे यांना वरीष्ठ सुरक्षा रक्षक या पदावर पदोन्नती देणे बाबत.*

*मंजुर ?*

*मा. महापौरः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

विषय क्र. ७:- श्री. राजन खरात व श्री. पी. बी. शिंदे यांना वरीष्ठ सुरक्षा

रक्षक या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

वरिष्ठ सुरक्षारक्षक:-

वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद
खुले - १ पद

सदर पदावर सुरक्षारक्षक या पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती द्यावयाची असल्याने श्री. बी. आर. बुरूड ,सुरक्षारक्षक हे खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत व सद्या ते पाणीपुरवठा विभागात कार्यरत आहेत. तसेच श्री. बिल्लु शंकर हे अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत परंतु संबंधित दोन्ही कर्मचारी हे सतत गैरहजर असतात त्यामुळे त्यांची सदर पदावर पदोन्नती देणेसाठी पात्रता नाही असे उपायुक्त (मुख्यालय) यांनी सुचित केले त्यामुळे त्यांच्या नावांचा विचार न करता पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु.जातीसाठी श्री.पी.डी.गुरखा,सुरक्षारक्षक हे आहेत परंतु ते मे महिन्यात सेवानिवृत्त होत असल्याने त्या पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु. जातीसाठी श्री. राजन खरात हे आहेत तसेच खुल्या प्रवर्गासाठी श्री. पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक हे पात्र उमेदवार आहेत

तरी श्री.राजन खरात व श्री.पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक यांची वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीस पात्र उमेदवार म्हणुन निवडसमितीने निवड केली आहे.

महासभा ठराव क्र. ५२ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे श्री. राजन खरात व श्री. पी. व्ही. शिंदे महापालिका सुरक्षा रक्षक यांना वरिष्ठ सुरक्षा रक्षक या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.*

*विषय:- श्री. एम.के. पाटील लिपिक यांना स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देणे बाबत.*

*मंजुर ?*

*मा. महापौर:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

विषय क्र. ८:- श्री. एम.के. पाटील लिपिक यांना स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

स्वच्छता निरीक्षक:-

स्वच्छता निरीक्षक यापदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेंकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचे प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे.

२) महापालिकेच्या सेवेतील स्वच्छता निरीक्षक या पदावर कमीत कमी दहा वर्ष काम केल्याचा अनुभव.

सेवाप्रवेश नियमावलीनुसार स्व. निरीक्षक या पदासाठीचे गुणोत्तर प्रमाणानुसार एकुण पदाच्या २५ टक्के म्हणजे एकुण १८ पदापैकी ४ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यापैकी २ पदे यापुर्वीच भरली होती व आता २ पदे भरावयाची होती पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु. जमाती- १ पद
खुले - १ पद

महापालिकेच्या मंजुर आस्थापनेवरील खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर श्री. एम.के.पाटील ,लिपीक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी असुन ते इ.मा.प्रवर्गात मोडतात तसेच त्यांनी सदर पदासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे तरी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर पदोन्नतीस पात्र आहेत.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५३ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण

gh egklHkk ojhy izLrkousvuqlkj deZpkjh fuoM lferhP;k f'kQkj'khizek.ks Jh- ,e-ds- ikVhy fyfid ;kauk LoPNrk fujh{kd ;k inkoj inksUurh ns.ksl ekU;rk nsr vkgs-

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.*

*विषयः- **श्री. तुकाराम तारदाळकर जकात निरिक्षक यांना उप लेखापाल या पदावर पदोन्नती देणे बाबत.***

*मंजुर ,*

*मा. महापौरः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

विषय क्र. ९:- श्री. तुकाराम तारदाळकर जकात निरिक्षक यांना उप लेखापाल या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

उपलेखापाल

उपलेखापाल या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु.जाती - १ पद

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेतील वरिष्ठ लिपीक किंवा त्यांस समकक्ष अशा पदावरील सेवेचा अनुभव.

उपलेखापाल या पदासाठी जकात निरीक्षक तसेच वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचा-यांमधुन श्री. तुकाराम तारदाळकर , जकात निरीक्षक या पदावर दिनांक ७/४/१९८६ पासुन कार्यरत आहेत व ते सेवाज्येष्ठ पात्र कर्मचारी असल्याने श्री. तुकाराम तारदाळकर यांना उपलेखापाल या पदावर पदोन्नती देणेस निवड समिती शिफारस करीत आहे.

महासभा ठराव क्र. ५४ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

gh egklHkk ojhy izLrkousvuqlkj deZpkjh fuoM lferhP;k f'kQkj'khizek.ks Jh- rqdkjke rkjnkGdj tdkr fufj{kd ;kauk mi ys[kkiky ;k inkoj inksUurh ns.ksl ekU;rk nsr vkgs-

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

<u>विषयः-</u> **आठ पात्र कर्मचा-यांना लिडिंग फायरमन या पदावर पदोन्नती देणे बाबत.**

मंजुर ?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे लिडीग फायरमनचा, यासाठी मला असे वाटते हा जो प्रस्ताव महासभेसमोर आला आहे. त्याबाबत आमचे काही वरिष्ठ फायरमन सर्व पक्षाच्या नगरसेवकांकडे तक्रारी घेवून जात आहेत. व म्हणतात की, आमच्यावर अन्याय झाला आहे. आमच्यावर अन्याय झाला आहे तर मला असे वाटते की,पात्रता व जे सेवा भरती नियम आहेत. ज्याचा पृष्ठ क्र. १०९ आहे त्यावर असे स्पष्टपणे लिहिले आहे की, ज्या फायरमनला पाच वर्षाचा अनुभव आहे त्याला लिडिंग फायरमनची पदोन्नती दिली पाहिजे. परंतु येथे काय केले आहे. निवड समितीने निर्णय घेतला आहे. जे सेवाजेष्ठ आहेत. त्यांना पदोन्नती न देता कनिष्ठांना पदोन्नती दिली आहे. ज्यांनी सहा महिन्याचे प्रशिक्षण घेतले आहे. या प्रस्तावामध्ये लिहिले आहे की, त्यांनी प्रशिक्षण पुर्ण केले आहे. यांनी केले नाही. तर असे कायदयामध्ये आहे का? सेवाजेष्ठ कर्मचा-यांना सोडुन कनिष्ठ कर्मचा-यांना पदोन्नती दिली जात आहे. जर महासभेने ही अट टाकली की, एका वर्षाच्या आत त्यांनी सुध्दा प्रशिक्षण पुर्ण करावे. कारण की, प्रशिक्षण सहा महिन्याचे आहे. एक वर्षाच्या आत सहा महिन्याचे प्रशिक्षण त्यांनी पुर्ण केले तर त्या लोंकांना सुध्दा पदोन्नती दिली जावू शकते का? व ही जी कनिष्ठांना पदोन्नती दिली जात आहे ती कायदयानुसार आहे? असे ऐकण्यात आले आहे की या प्रस्तावाच्या विरोधात कुणी कर्मचारी न्यायालयात जाणार आहेत. तर महासभेचा हा जो ठराव आहे तो कायदयानुसार आहे का? याचा थोडा खुलासा केल्यानंतर भलेही ठराव पारीत करा.

<u>श्री. उत्तम लोणारे ( मा. उप-आयुक्त, मुख्यालय):-</u>मा. महापौर महोदया, लिडीग फायरमनची जी पदोन्नती देण्यात आली आहे. ती ज्या लोकांना देण्यात आली आहे. त्या खुल्या संवर्गातील कर्मचा-यास पदोन्नती देताना ज्यास फायरमनचा पाच वर्षाचा अनुभव आहे. त्यांनाच दिली जाते. आणि त्याच्याकडे फायरफायटीगचा डिप्लोमा असला पाहिजे. व तो दहावीनंतर आहे. म्हणुन त्यांना पदोन्नती दिली जाईल. ही पदोन्नती देताना त्याच्याकडे कमीत कमी १० वी पासची शैक्षणिक अर्हता असली पाहिजे. व फायरफायटींगचा डिप्लोमा पाहिजे. व जेव्हा आमच्या निवड समितीने यादी पाहिली तेव्हा सेवाजेष्ठता यादी पहिल्या क्रमांकापासुन पाहिली त्यानंतर ज्यांच्याकडे ही शैक्षणिक अर्हता होती. व पाच वर्षाचा अनुभव होता अशा सर्व कर्मचा-यास पदोन्नती दिली आहे. तर यामध्ये चार अनुसूचित जातीचे उमेदवार, दोन इतर मागासवर्गीय उमेदवार व एक खुल्या प्रवर्गातील उमेदवार आहे. प्रत्यक्षात इतर मागासवर्गीयांना पदोन्नतीसाठी आरक्षण नसते. चार लोकांना आरक्षणानुसार पदोन्नती मिळत आहे. तर कुणावरही अन्याय केलेला नाही. सभागृह नेता यांनी जे म्हंटले आहे की, महापालिका सेवेत आल्यानंतर त्यांना प्रशिक्षणाची संधी दिली पाहिजे. फायरमनची जेव्हा नेमणुक केली जाते. त्यावेळेसच ही संधी दिली जाते त्यांनतर दोन-चार,पाच वर्षानंतर अशी संधी नसते. आपण असे काही नियम तयार केलेले नाहीत. तर ज्याकाही पदोन्नत्त्या दिल्या आहेत त्या समितीने बरोबर दिल्या आहेत. त्यामध्ये काही चुकीचे नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, या विषयावर निर्णय तर झाला आहे. विषय क्र. ६ वर, परंतु आपल्यासमोर जो गोषवारा आला

आहे. या पदोन्नत्त्यांच्या गोषवा-यांचा पहिला परिच्छेद आपण वाचला तर आपल्या असे निर्दशनास येईल की, या ज्या काही पदोन्नत्त्या आहेत त्या सर्व अनुशेषाबाबतच्या आहेत. परंतु विषय क्र. ६ जो आहे. त्यामध्ये खुल्या प्रवर्गातीलही काही लोक आहेत. परंतु त्या गोषवा-याचा पहिला परिच्छेद असे दर्शावितो की यामध्ये फक्त अनुशेष आहे. त्याऐवजी अनुशेषा बरोबरच जे पात्र कर्मचारी आहेत. त्यांचाही यात उल्लेख आहे. असे समजले जावे. नाही तर सभागृहास आम्ही चुकीची माहिती दिली असे होईल हे होवू नये म्हणुन आपणांस विनंती आहे की अशी दुरूस्ती विषय क्र. ६ व १० या दोन्ही विषयांच्या परिच्छेदामध्ये करावयास पाहिजे.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता आयुक्त साहेबांनी जे सांगितले त्याबाबत मी सुध्दा खुलासा करू इच्छितो. मागच्या वेळेस आम्ही मुख्य स्वच्छता निरिक्षकांना पदे दिली होती. मुख्य बाजार निरीक्षकांची पदोन्नती दिली होती त्यावेळेस सुध्दा ते लोक आरक्षणामधील होते. परंतु ते लोक वरीष्ठ असल्यामुळे आम्ही त्यांना ती खुल्या प्रवर्गातील पदे दिली. परंतु भविष्यामध्ये आज जर एखादे वरीष्ठ पद आरक्षणातील असेल त्यास खुल्या प्रवर्गातील पद दिले जावू शकते. परंतु आज जे पद खुल्या प्रवर्गासाठी आहे ते भविष्यात सुध्दा खुल्या प्रवर्गासाठीच राहील. आज जर मुख्य स्वच्छता निरिक्षक सेवानिवृत्त झाला तर, या अगोदर मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचे जे पद होते ते खुल्या प्रवर्गातील होते. व तेथे आरक्षणातील कर्मचारी असुन सुध्दा सेवाजेष्ठ होते. परंतु आज जी पदे खुल्या प्रवर्गातील आहेत ती पदे भविष्यात सुध्दा खुल्या प्रवर्गासाठीच राहतील जी पदे आरक्षणातील आहेत ती आरक्षणातच राहतील. धन्यवाद.*

*<u>मा. महापौर:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

<u>विषय क्र. १० :-</u> आठ पात्र
कर्मचा-यांना लिडिंग फायरमन या पदावर
पदोन्नती देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महापालिकेतील खुल्या प्रवर्गातील पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे आवश्यक आहे. त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

<u>लिडींग फायरमन:-</u>

लिडींग फायरमन या पदनामाची पदे हि पदोन्नतीने भरावयाची आहेत त्यापैकी पाच पदे यापुंर्वीच पदोन्नतीने भरलेली आहेत व आता नऊ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) महापालिकेच्या सेवेतील फायरमन या पदावरील पाच वर्षाचा अनुभव तसेच शारिरीक दृष्टया

पात्र.

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जमाती - २ पदे
वि.जा(अ) - १ पद
भ.ज.(क) - १ पद
खुले -७ पदे

फायरमन या पदासाठी आवश्यक प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण केलेल्या ज्या कर्मचा-यांची फायरमन या पदावर पाच वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे व लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीसाठी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या सात पदांवर खालिल पात्र कर्मचारी यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्री. व्ही.टी.पगारे, फायरमन, अनु.जाती
२) श्री. यशवंत एस. वाघ, फायरमन, इ.मा.व
३) श्री. बी.एम.जोशी, फायरमन, खुला
४) श्री. भिमराव खैरे, फायरमन, अनु.जाती
५) श्री. भागवत ए. पाटील, फायरमन, इ.मा.व
६) श्री. भास्कर टी. मिरपगारे,फायरमन, अनु.जाती
७) श्री. बी.बी.नेटके, फायरमन, अनु.जाती

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नती देण्यासाठी अनु. जमातीसाठी तसेच वि.जा.(अ) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदासाठी उमेदवार उपलब्ध नाहीत भ.ज. (क) या पदावर पदोन्नतीसाठी सुरेश मराळे हे उमेदवार उपलब्ध होत आहेत व ते लिडींग फायरमन या पदासाठी आवश्यक असलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार पात्र असल्यामुळे त्यांना सदर पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५५ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

gh egklHkk ojhy izLrkousvuqlkj deZpkjh fuoM lferhP;k f'kQkj'khizek.ks mijksDr 8 ik= deZpk&;kauk fyMhax Qk;jeu ;k inkoj inksUurh ns.ksl ekU;rk nsr vkgs-

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ११:- उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखडयातील आरक्षण क्रमांक ४४ ते ४७ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे बाबत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-पास. पास.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-मा. महापौरजी, आमचे सभागृह नेता म्हणतात. पास? पास? हा जो विषय आहे तो कदाचित त्यांना माहित नाही की तो किती गंभीर आहे. काय लिहिले आहे या विषयामध्ये? कोणी आणला आहे हा प्रस्ताव? त्या विषयाशी संबंधित उपायुक्तांनी पुढे येवून आम्हास सांगितले पाहिजे की हा काय विषय आहे? ते काय करू इच्छितात. आयुक्त साहेबांनी आणला आहे तर त्यांनी सांगितले पाहिजे की त्यांच्या मनातील इच्छा काय आहेत? ते काय करू इच्छितात? आमचा नविन विकास आराखडा यायचा आहे. त्याच्या अनुसार आहे की मंजुर विकास आराखडयास अनुसरून आहे. कुणास अनुसरून आहे? काय करू इच्छिते प्रशासन हा प्रस्ताव का आणला आहे? आमच्या समोर याचा खुलासा केला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, प्रत्येक शहरासाठी विकास आराखडा असतो. विकास आराखडयामध्ये विविध प्रयोजनासाठी आरक्षणे ठेवली जातात. या शहराची स्थिती अशी आहे की, विकास आराखडयामध्ये जे भुखंड ठेवले होते. त्यामधील १५ टक्यांपेक्षाही कमी भुखंड विकसित केले आहेत. ५ क्रमांकाची जी साईट आहे. आरक्षण क्र. ४४ ,४५ ,४६ व ४७ ते कोणत्त्या प्रयोजनासाठी आरक्षित आहेत. ते सुध्दा आम्ही दिले आहेत. व त्यांचा कोणत्त्या प्रकारे विकास केला पाहिजे ते सुध्दा आम्ही आमच्या प्रस्तावामध्ये दिले आहे. हे जे आरक्षण आहे ते ज्या प्रयोजनासाठी आरक्षित आहे त्या प्रयोजनासाठीच त्यांचा विकास करू इच्छितो. विकास करण्याआधी त्यांचे प्लान व इस्टीमेंट स्पर्धात्त्मक नकाशे तयार करू इच्छितो. स्पर्धात्त्मक नकाशे तयार झाल्यानंतर त्या जागेचा योग्य प्रकारे उपयोग होवु शकतो. व त्यामुळे महापालिकेला काही उत्त्पन्नही मिळु शकते. त्यासाठी हा प्रस्ताव आणला आहे. आज जर प्रत्यक्षात पाहिले तर या आरक्षणावर दोन बहुमजली इमारती उभ्या आहेत. हया इमारती निष्कासित करून ती जागा ज्या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. त्या प्रयोजनासाठी विकास करणे हे नियोजन प्राधिकारण म्हणुन महापालिकेचे कर्तव्य ठरते. यासाठी आपल्या समोर प्रस्ताव आणला आहे. व मला वाटते यामध्ये सभागृहास काही हरकत असता कामा नये. कारण की शहराच्या विकासासाठी हा एक चांगला प्रकल्प येणा-या दिवसात बनु शकतो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरमहोदया, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य हा जो ११ व्या क्रमांकाचा विषय येथे आला आहे. तो प्रारूप विकास आराखडयाच्या हिशोबाने येथे आला आहे. या अगोदरही ब-याच वेळा मी म्हटले आहे की, प्रारुप विकास आराखडा महासभेने अगोदरच रदद केला आहे.

हीच महासभा ज्या आराखडयास रदद करुन सरकारकडे पाठविते. तर त्यावर विकास कसा केला जाऊ शकतो? महासभेचा ठराव प्रथम झाला आहे की, प्रारुप विकास आराखडा रदद केला जावा. व इथे या तीन-चार साईट दर्शविल्या आहेत. ४४ ,४५ , ४६व ४७ त्यातील ४४ व ४६ बाबत असे दर्शविण्यात आले आहे, सामाजिक सांस्कृतिक कल्याणकारी कामासाठी व मध्ये ४५ क्रमांकाचे जे आरक्षण आहे तेथे दुकान केंद्र दर्शविले आहे. दोन्ही बाजूला मोकळी जागा व मध्ये ईमारतींचे बांधकाम होणार तर कशाप्रकारे दिसेल? आम्ही जर त्यास विकसित केले तरी ४४ व ४६हया सामाजिक सांस्कृतिक कार्यासाठी व मधील ४५ क्रमांकाच्या साईटवर बांधकामे तयार होणार. जे की दिसायला बरोबर दिसणार नाही व शहराच्या हिशोबाने ठिक होणार नाही. व येथे जी ४७ क्रमांकाची साईट आहे ती मनोरंजनासाठी खुली जागा तेथे लिहिले आहे, ५७ पैकी ३००० , याचा अर्थ काय? ५७ पैकी ३००० काय तेथे अतिक्रमण झाले आहे? ती खाली केली जातील. किंवा फक्त ३००० जे येथे लिहिले आहे, याचा खुलासा केला जावा प्रारुप विकास आराखडयाबाबत महासभेचे जे मत होते, त्यावर कोणत्त्या प्रकारे विकास कामे केली जात आहेत, याचाही खुलासा केला जावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, आपल्या समोर हा जो प्रस्ताव आणला आहे. तो मंजुर विकास आराखडा व सुधारीत विकास आराखडा या दोघांनाही समोर ठेवून आणला आहे. व जेव्हा कुठल्या जमीनीचा विकास करायचा असतो तेव्हा मंजूर विकास आराखडा व सुधारीत विकास आराखडा यामध्ये जो विकास किंवा वापर अनुज्ञेय आहे ते लक्षात घेवून आणले जाते. या दोघांमधील सर्वात स्ट्रींन्गजन्ट जो आहे सर्वात कठोर जो आहे तो प्रस्ताव आणला जातो. जो सुधारीत विकास आराखडा आहे तो तयार होऊन शासनाकडे आहे. व त्यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. परंतु एम.आर.टी.पी.ॲक्ट च्या कलम ४६ नुसार एकदा का सुधारीत विकास आराखडा तयार झाला. तर त्यामध्ये जमिनीचा जो वापर अनुज्ञेय आहे, त्या हिशोबाने जमिनीचा वापर केला जाऊ शकतो यासाठी हा प्रस्ताव आपल्या समोर आहे. मंजूर विकास आराखडा व सुधारीत विकास आराखडा दोघांमधील कठोर जो आहे, तो पकडुन आपणासमोर प्रस्ताव आणला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> मा. महापौरजी, .........

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> महापौर महोदया, या शहरामध्ये जेवढे काही आरक्षित भुखंड आहेत ते हडप केले जात आहेत. या शहरात, या सभागृहात , या गोष्टी वारंवार उपस्थित झाल्या आहेत. व या सभागृहात वारंवार अशी मागणी करण्यात आली आहे की, महानगरपालिकेच्या प्रशासनाने याबाबत काहीना काही कठोर कार्यवाही केली पाहिजे. व या प्रकारची कोणतीही कठोर कारवाई करण्याचे महापालिका जेव्हा प्रयत्न करते तेव्हा या सभागृहाला त्याचे स्वागत केले पाहिजे व शहरात जेवढे काही आरक्षित भुखंड आहेत, जे वाचविले जाऊ शकतात. ज्यांच्यावर अतिक्रमणे झालेली नाहीत, ते तरी कमीत कमी वाचविले पाहिजेत. कारण की, ते आमच्या शहराची संपत्ती आहे. ही संपत्ती वाचविण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रशासनाने पुढे आले पाहिजे. व आम्ही या गोष्टीचे स्वागत करतो कारण की, आता फार थोडेच प्लॉट शिल्लक आहेत आणि ते वाचविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. शहरामध्ये जेवढे काही प्लॉट आहेत की ज्यांच्यावर अदयाप पर्यंत अतिक्रमणे झालेली नाहीत. तर त्यांना कोणत्त्याही परिस्थितीत वाचविले पाहिजे. महापालिका प्रशासनाने हा जो प्रस्ताव आणला आहे, त्याचा आम्ही सत्ताधारी पक्षाच्या वतीने स्वागत करतो.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> मा. महापौर महोदया, तूम्ही जे विकास आराखडयामध्ये जे प्लॉटस् दिलेले आहेत. खेळाचे मैदान डी.टी. कालानी कॉलेज समोरील, इंदिरा गांधी मार्केट जवळ, हे सर्व प्लॉटस् सद्या उपलब्ध आहेत का?

जे प्लॉटस् तुम्ही आता विकासीत करणार आहात, ते प्लॉटस् अस्तित्त्वात आहेत का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, जेथ पर्यंत माझी धारणा आहे, जमिनीची कुणी चोरी करु शकत नाही. तिच्यावर कुणी अतिक्रमण करु शकते. प्लॉटस् तेथे आहेत आणि म्हणूनच हा प्रस्ताव आपल्या समोर आणला आहे. जमिन आहे , प्लॉटस् आहेत. होऊ शकते कुठल्या जागेवर अतिक्रमण झाले आहे. परंतु काही प्लॉटस् आहेत म्हणून हा प्रस्ताव आपल्या समोर आणला आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> अनुक्रमांक ४ वर आरक्षण क्रमांक ४७ बाबत आपण सांगा ना? मनोरंजनासाठी खुली जागा ५७ पैकी ३००० हे काय आहे? याचा जरा खुलासा करा काय लिहिले आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, विकास आराखडयामध्ये हे जे आरक्षण क्र. ४७ आहे त्यामधील काही भाग रिक्रिएशन फॅसेलिटी साठी आरक्षित आहे. व मला वाटते की, श्री. जमनुजी रिक्रिएशन फॅसेलिटिज खुप चांगल्या प्रकारे ओळखतात, त्यांना माहित आहेत. तेथे स्विमिंग पूल तयार केला जाऊ शकतो. स्टेडियम तयार केले जाऊ शकते. स्विमिंगपुल जाणीवपुर्वक मी याअगोदर बोललो. नाहीतर नाटयगृह सुध्दा तयार केले जाऊ शकते. जसे की, समाजाचे मनोरंजन व्हावे, नागरीकांचे मनोरंजन व्हावे यासाठी ही जागा ठेवली आहे. ती जर सद्या मोकळी असेल तर तिच्यावर खेळाचे मैदान किंवा स्टेडियम तयार केले जाऊ शकते. जेणेकरुन नागरीक स्वत:चे मनोरंजन करु शकतील.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u> मी ज्या विषयाबाबत विचारत आहे, त्याचा खुलासा सभागृहात होत नाही. मनोरंजनासाठी आहे ते मी सुध्दा समजतो. परंतु येथे जे लिहिले आहे. ५७०० पैकी ३००० वापरत आहेत याचा अर्थ मी विचारत आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, याचा अर्थ एकच आहे की, जो ५७०० एकुण आरक्षित प्लॉट आहे, त्यातील फक्त महानगरपालिकेच्या कब्ज्यात ३००० आहे. व उर्वरित २७०० फुटावर कोणीतरी अतिक्रमण केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> जागा विकसित करण्यासाठी हा जो प्रस्ताव आला आहे. त्याचे आम्ही पूर्ण शक्तीनीशी विरोध करत आहोत. त्याची कारणे ही आहेत की, हा जो ७०५ नंबरचा प्लॉट आहे, त्याच्यामागे मोकळे मैदान असले पाहिजे. या बाबत आमच्या पक्षाने फार मोठे आंदोलन केले होते, व आम्हांला असे वाटत होते की, हा जो प्लॉट आहे, तो पूर्ण विकसित झाला पाहिजे. परंतु आम्ही पाहतो की, हा जो प्लॉट आहे पहिले याची साईट क्र. ६ होती ७०५ नं.चा प्लॉट तो आरक्षित होता. खेळाच्या मैदानासाठी ती जी जागा आहे ती मंजूर विकास आराखडयामध्ये खेळाचे मैदानासाठी आरक्षित आहे. परंतु आता जो सुधारीत विकास आराखडा आहे, त्यामध्ये या प्लॉटला काही हिस्सांमध्ये विभागला आहे. जसे आरक्षण क्र. ४४ , ४५ , ४७ , ४५चा भाग आहे. तर त्या जुन्या प्लॉटला ४ भागांमध्ये विभागले आहे. व जर आपण पाहिजे की, ४४ क्रमांकाचे जे आरक्षण आहे, ते सामाजिक सांस्कृतिक कल्याणकारी सुखसोयीसाठी आहे. तर मध्ये जे ४५ क्रमांकाचे आरक्षण आहे. ते शॉपिंग कॉम्पलेक्ससाठी आहे. जेव्हा आपण म्हणता की, स्टेडियम तयार केले जाईल. खेळाचे मैदान किंवा मनोरंजनाची व्यवस्था केली जाईल एक मोठया लांबलचक प्लॉटमधील एखादा प्लॉट शॉपिंग कॉम्पलेक्ससाठी येत असेल. तर मला वाटते

की, पूर्ण प्लॉटचा जो वापर आहे, तो तेथे संपुष्ठात येतो. व त्या प्लॉटला आपण जसे म्हणतात त्या प्रमाणे आपण विकसीत करु शकणार नाहीत. कारण त्या प्लॉटच्या मध्येच एक शॉपिंग कॉम्पलेक्स येते. तर मला असे वाटते की, ज्यांनी हा प्लॅन तयार केला त्यांनी जाणून बूजून त्यांनी यामध्ये शरारत केली आहे. व जेणेकरुन हा प्लॉट लोकांच्या कामास येऊ नये म्हणून सुधारीत विकास आराखडयामध्ये या प्लॉटच्या मधील भाग शॉपिंग कॉम्पलेक्ससाठी आरक्षित ठेवला आहे. यासाठी आम्हांला असे वाटते की, पूर्ण प्लॉट जो पहिले ७०५ नंबरचा प्लॉट होता, किंवा आता जे पूर्ण आरक्षण आहे, भलेही ते आरक्षण क्र. ४४ , ४५ , ४६ असो, ४७, किंवा ४५चा भाग असो. तो पूर्ण जर खेळाच्या मैदानासाठी ठेवला जात असेल त्यास विकसित करण्यासाठी मान्यता देण्यासाठी आम्ही तयार आहोत. परंतु हा पूर्ण प्लॉट खेळाच्या मैदानासाठी असला पाहिजे. याबाबत काही आकडेवारी मी आपणांस सांगू इच्छितो. या शहरामध्ये आमच्या उल्हासनगरमधील जी लहान मुले आहेत त्यांना खेळण्यासाठी पुरेसी जागा नाही. ब-याचश्या ठिकाणी आम्ही पाहतो की, मुले क्रिकेट खेळतात तर ती ब-याचश्या ठिकाणी रस्त्यावर खेळतात. जेव्हा आम्ही २२ सेक्शन किंवा २३ सेक्शनमधील मुलांना विचारतो की, आपण रस्त्यावर क्रिकेट का खेळतात? तर ते उलट आम्हांला विचारतात की, क्रिकेट खेळण्यासाठी या शहरामध्ये मैदान आहे का? तर बरेचशे लोक मुलांना या प्रश्नाचे उत्तर देवू शकत नाहीत. जर आम्ही मंजुर विकास आराखडा पाहिला तर जो आमच्या पुढे प्रारुप विकास आराखडा आला होता, त्यामध्ये असेही दर्शविले होते की, शहरामध्ये प्ले ग्राऊंडसाठी किती जागा असली पाहिजे? स्टॅन्डर्ड कोणते असते मी आपणास सांगतो प्रत्येक १०,००० लोकसंख्येमागे ४ हेक्टर जमिन खेळाच्या मैदानासाठी आरक्षित केली पाहिजे. आमच्या शहराची लोकसंख्या तर बरीच आहे. जर आम्ही १९९१ ची लोकसंख्या पाहिली तर त्या हिशोबाने आमच्याकडे १७७. २० हेक्टर जागा खेळाच्या मैदानासाठी पाहिजे. आम्ही आमच्या शहरातील मुलांना खेळासाठी मैदान देवू इच्छितो. त्यासाठी १७७. २० हेक्टर जागा दयावी लागेल. परंतु दुर्भाग्याची गोष्ट आहे की, या शहरामध्ये फक्त ४ हेक्टर जागा मुलांच्या खेळण्यासाठी उपलब्ध आहे. १७७ हेक्टरच्या ऐवजी फक्त ४ हेक्टर व आज आम्ही शहरातील मुलांना खेळण्यासाठी खेळाचे मैदान न देता ती जागा शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी देवुन प्लॉटचा सत्यानास करून हा जो पुर्ण प्लॉट आहे तो लोकांच्या कामास येवू नये अशी त्यामागे मनिषा असल्याचे आम्हाला दिसत आहे. म्हणुन यासाठी या भुखंडाच्या मध्येच जे शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी आरक्षण आहे, आमच्या शहरामध्ये मुलांना खेळण्यासाठी जागा नाही. नसल्यात जमा आहे. म्हणुन हा पुर्ण प्लॉट जर खेळाच्या मैदानासाठी आपण विकसित करू इच्छित असाल तर आम्ही जे लोक इथे बसलो आहोत ते आपणांस याकामी मान्यता देण्यास तयार आहोत. नाहीतर आमचा या प्रस्तावास पुर्णपणे विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-मा. महापौर महोदया, याठिकाणी श्री. लाल पंजाबी साहेबांनी जे मुददे उपस्थित केले आहेत. त्यात कुठेतरी शंका येते एकंदरात हा जो प्रस्ताव तयार केला आहे. स्पष्टीकरण व्हावे. शंकाचे निरसन व्हावे. गैरसमज असतील ते निघतील. त्याची कारणेही तशी आहेत याठिकाणी हा प्लॉट महापालिकेच्या ताब्यात आहे का? हे महत्त्वाचे आहे कारण या अगोदर एखादया आरक्षीत प्लॉटवर तुम्ही बांधकाम नकाशा मंजुर का केला असा प्रश्न होता त्यावर तुम्ही असे उत्तर दिले होते की काय करायचे? १९८७ साली उपविभागीय अधिका-यांनी पत्र दिले परंतु ते प्लॉट आम्ही ताब्यात घेतले नाहीत. आणि म्हणुन कुणीतरी क्ष नावाच्या व्यक्तीने त्या जागेची सनद मिळविली. आणि म्हणुन आम्ही त्याजागेवरील बांधकामाचा नकाशा मंजुर केला आणि अदयाप पर्यंतची ही महानगरपालिका प्रशासनाची उत्तरे, त्यामुळे हा जो ताबा तुम्ही सांगितला तो ताबा ख-या अर्थाने आहे का? त्याच्यानंतरचा पुढचा प्रस्ताव तुम्ही आणला आहे. तो योग्य होईल त्यानंतर याठिकाणी महापालिकेला दुकान केंद्र घेण्याची काय आवश्यकता वाटली? एकतर या अगोदर महापालिकेच्या ताब्यामध्ये अशाप्रकारच्या तरतुदीसाठी असलेले प्लॉट महापालिकेने दुस-या व्यक्तीला

विकसित करण्यासाठी दिले. त्यातील फक्त २५ टक्के आम्ही घेतले. ते घेतले की नाही त्याबाबत मागच्या सभेत उत्तर दिले ते ही आधांतरीत आहे. त्यानंतर महासभेने तुम्हाला परवानगी दिली. आणि तुम्ही विकास करायचा म्हंटले तर तुमची आर्थिक स्थिती आहे का? २१.५.२००३च्या महासभेत तुम्ही बोटक्लब बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा साठी प्रस्ताव आणता आणि त्यामध्ये असे स्पष्टपणे म्हणता की महापालिकेची सध्याची वित्तिय स्थिती लक्षात घेता प्रशासनाने वरील योजना बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्त्वावर देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. महापालिकेची आर्थीक स्थिती बरोबर नाही. मग तुम्ही बोटक्लब एखादया ठेकेदाराला देता. स्वीमींग पुल एका ठेकेदाराला देता, टाऊन हॉलची तीच परिस्थिती करता आणि पुन्हा याठिकाणी जी खेळाची मैदाने आहेत. ती सर्वसामान्यांना वापरता येतील. त्यासाठी उपाययोजना करण्याचे सोडुन तुम्ही शॉपिंग कॉम्प्लेक्स कल्याणकारी योजना मध्ये जसे टाऊन हॉलचे झाले आहे. तशाच पध्दतीने होणार आहे का? ही शंका याठिकाणी उपस्थित होते. त्याप्रकारचा घाट येथे रचला तर जात नाही? कारण एका वेळेला तुम्ही सांगता की आमची परिस्थीती नाही. त्यामुळे आम्ही खाजगी ठेकेदाराला देतो. आणि आता हे प्रयोजन इथे महासभेव्दारे करून पुन्हा दुस-या ठेकेदाराला देणार आहात का? हे याठिकाणी महत्त्वाचे आहे. तर दुकान केंद्र न ठेवता, तुम्ही खात्री दया की खाजगी ठेकेदाराला न देता सर्वसामान्यांसाठी उपयोगात येईल अशाच प्रकारचे प्रयोजन त्याठिकाणी करून दुकान केंद्र तिथे उभे न करता लोकांसाठी खेळाचे मैदान आणि सामाजिक केंद्र त्याठिकाणी उभे राहील आणि तर आणि तरच आमची त्यास संमती आहे. परंतु हे करताना कोणताही खाजगी ठेकेदार त्याठिकाणी बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वानुसार करणार नाही. महापालिकेची जेव्हा वित्तिय स्थिती होईल तेव्हा महापालिकाच तो विकसित करेल असे गोषवा-यामध्ये पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>मा. महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, मागील विकास आराखडयामध्ये खेळाचे मैदान होते. आता नविन विकास आराखडयानुसार तेथे चार आरक्षणे टाकली जात आहेत. मा. आयुक्त साहेबांना मी आठवण करून देवू इच्छितो की, आपण ज्या नविन विकास आराखडयाची येथे गोष्ट करत आहात. नविन विकास आराखडा या महासभेने रदद करण्याचा प्रस्ताव पारीत केला आहे. त्याहिशोबाने आपण नविन विकास आराखडयानुसार कोणताही प्रस्ताव इथे कसा आणु शकता व दुस-या ज्या दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्या या आहेत की, त्या प्लॉटमध्ये, आपण तर म्हणता की, १९८७मध्ये आम्हाला ताबा मिळाला होता. ८७ मध्ये आपणांस कागदोपत्री ताबा मिळाला होता. ताबा दोन प्रकारचा असतो. एक कागदोपत्री ताबा असतो तर दुसरा प्रत्यक्षातील ताबा असतो. आपणांस फक्त कागदोपत्री ताबा मिळाला होता. त्यानंतर महापालिकेच्या वतीने काहीही करण्यात आले नाही. तिसरा जो माझा प्रश्न आहे. तो हा आहे की, या भुखंडावर जेवढे काही लोक राहतात. जेवढया सहकारी सोसायटया आहेत. किती तेथे घरे आहेत. कित्त्येक दुकाने रस्त्त्याच्या बाजुने आहेत. आपण गोषवा-यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे. ती सर्व रस्त्त्याच्या बाजुची दुकाने तोडुन आपण तेथे कंपाऊंड वॉल बांधाल. ही जी गोष्ट आहे तिचा आम्ही विरोध करतो. तेथे काही लोक ३०-३०, ४०-४० वर्षापासुन दुकाने उघडुन बसले आहेत. १९६५ च्या अगोदर पासुन तेथे किती लोक राहतात. किती तरी लोकांना तेथील छोटया छोटया भुखंडाची सनद आहे. किती तरी तेथे सहकारी गृह निर्माण संस्था आहेत. बरेचसे लोक तेथे राहतात. ऐवढया पुर्वीचे त्यांचे जे वास्तव्य आहे. त्याबाबत आपण काय विचार केला आहात. ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. ५० वर्षापुर्वी बरेचसे शरणार्थी आमच्या उल्हासनगरमध्ये आले. त्यांना पुन्हा शरणार्थी बनविण्याची योजना तर नाही ना? ही जी गोष्ट आहे ती अतिशय महत्त्वाची आहे विचार करण्यासारखी आहे. आपण स्वत: लिहिले आहे की, रस्त्याच्या बाजुला जी दुकाने आहेत ती तोडुन आम्ही तेथे कंम्पाऊंड वॉल बांधु. ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. व तेथे जे लोक राहतात ते १९६५च्या अगोदरचे आहेत. १९९५ च्या अगोदरचे आहेत. जे तेथे गृहनिर्माण संस्था तयार

करून रहात आहेत. त्या लोकांचे आपण काय कराल. ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे त्याबाबत आपण जरा खुलासा केला तर बरे होईल व नविन विकास आराखडा रदद करण्यासाठी या सभागृहात आम्ही ठराव तयार करून पाठविला आहे. त्याच आरक्षणास आपण सभागृहात कसे आणत आहात? या ज्या गोष्टी आहेत त्या खुपच विरोधाभासी आहेत. येथे आम्ही असा प्रस्ताव पारीत केला होता की नविन विकास आराखडा झाला पाहिजे त्यानंतर याच महासभेने ठराव केला होता की नविन विकास आराखडा रदद झाला पाहिजे. व नविन विकास आराखड्यावर सूचना, हरकती मागविण्याचे आपण जे बोलत आहात. आपल्या माहितीसाठी मी सांगत आहे की सप्टेंबर २००२ मध्ये त्या नविन आराखड्यावर स्थगिती आदेश आणले आहेत. त्यावर हरकतींची सुनावणी झालेली नाही. हे सुध्दा आपणांस माहित असेल. तरी आपण त्या आरक्षणाबाबतचा प्रस्ताव येथे कसा आणता?

<u>मा. सदस्य श्री. राज असरेंडकरः-</u>महापौर महोदया,या सभागृहात या विषयावर चर्चा करताना आमचे सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व कॉग्रेसचे गटनेता सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी जे मुददे येथे उपस्थित केले. त्यांच्याशी मी सुध्दा सहमत आहे. मुददा चर्चेचा हाच आहे. व प्रमुख मुददा आहे, ही तर नंतरची गोष्ट आहे की तेथे काय विकसित होणार आहे. कसे करणार आहात. परंतु हा प्रमुख मुददा आहे त्याचे स्पष्टीकरण प्रशासनाने सभागृहामध्ये केले पाहिजे. कारण की मागील जो ठराव होता. ज्यामध्ये प्रारूप विकास आराखड्यास रदद करण्याबाबत शासनाकडे पाठविण्यात आला होता. तो अशासकीय प्रस्ताव नव्हता, अशासकीय ठराव नव्हता. हा प्रस्ताव स्वतः प्रशासनाने सभागृहात आणला होता. व एक वेळ प्रशासनाने एक प्लॅन रदद करण्यासाठी सभागृहासमोर प्रस्ताव आणल्यानंतर आज त्याच प्लॅनमध्ये जी आरक्षणे आहेत, त्यांना विकसित करण्याची गोष्ट प्रशासन करत आहे. तर त्याबाबत आमचा असा स्पष्ट आरोप आहे की, प्रशासनाची ही दुहेरी निती आहे. व हा जो विषय सभागृहासमोर आणला आहे त्यामागे जो हेतु आहे. तो हेतु येथे सांगण्याची जरूरत नाही. त्या प्लॉटमध्ये किती बांधकामे उभी आहेत. त्या प्लॉटचा इतिहास काय आहे हे सर्व शहरास माहित आहे. हा प्लॉट हडप करण्यासाठी या अगोदर जे प्रयत्न झाले आहेत त्याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागात गुन्हे दाखल झाले. तर हा जो प्लॉटचा हिस्सा आहे तो किती आहे काय आहे? व जो हिस्सा आहे तो ४४, ४५,४६, ४७ क्रमांकाचे आरक्षण दिले आहे. काय त्यामध्ये तो सुध्दा भाग आहे का? याचा पण खुलासा या सभागृहामध्ये प्रशासनाने केला पाहिजे. व येथे जो मुख्य मुददा आमचे सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी उपस्थित केला की, या शहरात जर कोणत्या गोष्टीची आवश्यकता असेल तर ती खेळाच्या मैदानांची आहे. जर काही चांगल्यात चांगले मनोरंजन जर काही असेल तर ते आहे मोकळया मैदानात श्वास घेण्यास मिळणे हीच चांगल्यात चांगली सोय व मनोरंजन आहे. व त्यासाठी येथे फक्त खेळाचे मैदान आणि खेळाचे मैदानच झाले पाहिजे अशी आमची भुमिका आहे व या भुमिकेचा आम्ही येथे पुर्नरूच्चार करत आहोत. याच भुमिकेवर आम्ही अडुन राहु. व ही जी प्रशासनाची दुहेरी निती आहे. तिचाही आम्ही विरोध करतो. व त्याचबरोबर ज्या वाईट हेतुने, वाईट हेतु मी यासाठी म्हणतो कारण की हा जो प्रस्ताव येथे सभागृहासमोर आहे याच्या नंतरचाही प्रस्ताव माझ्या डोळयासमोर आहे. याच्यानंतरचाही प्रस्ताव सभागृहासमोर येणार आहे. की असा असा ठराव या सभागृहाने पारीत केला होता विकसित करण्याचा. परंतु महापालिकेची आर्थीक स्थिती खराब आहे तर आता त्यास आम्ही बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वानुसार देण्यासाठी अमुक अमुक हे लोक याकामी तयारही आहेत. या शहरास आपणांस ब-याचशा सुखसोयीही होतील. यापुढचा जो प्रस्ताव आहे तो सुध्दा माझ्या डोळयासमोर आहे. पुढे जर आमच्या समोर धोका आहे. त्या धोक्याचा सामना, त्याचे स्वागत आज आम्ही करू शकत नाही. म्हणुन या प्रस्तावास आमचा पुर्णपणे विरोध आहे. व विरोध राहील.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी,....*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्त साहेब, मी जे विचारले की, मागच्या महासभेमध्ये तुम्ही बोट क्लब देताना महापालिकेची आर्थीक स्थिती बरोबर नसल्यामुळे आपण बोटक्लब बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर दिला आहे. स्विमींग पुल दिला आहे. टाऊन हॉलही दिला आहे. मी विचारले होते की... ब-याच वेळा असे झाले की, तुम्ही अर्धवट उत्तरे दिली आहेत पुर्ण उत्तरे दिली नाहीत.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी,आयुक्त साहेब, सचिव साहेब, आज इथे जो विषय चालु आहे. त्यासाठी आधी तर आम्ही आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो की, हे पहिले आयुक्त आहेत ज्यांनी आरक्षित भुखंडावर कंम्पाऊंड बांधण्याचा प्रस्ताव महासभेपुढे आणला. आज जो ४४ , ४७ त्यानंतर जे १ ,२ ,३ ,४ व ११८ आहे. आज हे जे दोन विषय आहेत. आमच्या समोर आहेत. परंतु आता विषय क्र. ११ वर चर्चा होत आहे. याविषयाबाबत दुपारी मी आयुक्त साहेबांशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, ज्यांच्याकडे सनद आहे. त्यास आम्ही कंम्पाऊंड वॉल लावणार नाही. त्यांनी म्हंटले होते की आज आम्ही महासभेकडुन परवानगी घेत आहोत. त्यासाठी आर्कीटेक्ट नेमुन याचे पुर्ण सर्वेक्षण करून त्यामध्ये आढळुन येईल की या जागेवर किती बांधकामे आहेत. किती कंम्पाऊंड वॉलवर खर्च येईल? किती लोकांकडे जुनी कागदपत्रे आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>मी सभागृह नेत्त्यांच्या हे निर्दशनास आणुन देवु इच्छितो. तो विषय पुढे आहे. पहिला जो विषय आहे त्यावर चर्चा करा नंतर या विषयावर करू. त्यांनी ६ आणले आहेत. मी म्हणतो अजुनही कुठे असे रिझर्व्ह प्लॉट रिकामे असतील. सगळयांवर त्यांनी बॉन्ड्री वॉल लावले आहेत. तो पुढचा विषय आहे आता जो विषय चालु आहे त्यावर चर्चा करा.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी सरळ सरळ बोलतो आपणांस ते आवडत नाही हा जो विषय आहे जो आयुक्तांनी आणला आहे. जसा प्रशासनाने प्रस्ताव आणला आहे तसा तो पारीत झाला पाहिजे. व पुढे जावुन त्यावर जे काही विकास कामे होतील ती आमच्या समोर होतील. व ज्या हेतुने हा विषय आणला आहे. आता जो प्लान चालु आहे. आमचे नगररचनाकार साहेब कधी कधी मंजुर विकास आराखडा पाहतात तर कधी सुधारित विकास आराखडा पाहतात. दोन्ही नकाशे लक्षात घेवून ते चालतात. जो सुधारित विकास आराखडा आहे. त्याबाबत शासनाकडुन काहीही निर्देश आलेले नाहीत की, तो रदद झाला आहे की महापालिका तयार करेल. जर महापालिका तयार करत असेल तर आज आम्ही इथे जो ठराव पारीत करून तसा ठराव करू शकतो. आमच्या श्री. लाल पंजाबींनी म्हंटले की, उल्हासनगरमध्ये १नंबर पासुन ५ नंबर पर्यंत मुलांना खेळण्यासाठी जागा नाही. पुर्ण उल्हासनगरमधील मुलांना खेळण्यासाठी हेच खेळाचे मैदान ठेवणे उचित नाही. प्रत्येक कॅम्पात खेळाचे मैदान ठेवु. व उल्हासनगरमध्ये २०० आरक्षित साईट आहेत. सर्व भरलेल्या आहेत. जे आमच्या ताब्यात मिळालेल्या आहेत. १९८७ मध्ये आम्हाला जो ताबा मिळाला आहे. तो काही ५० टक्के तर काही २० टक्के काही ८० तर काही ६० टक्के, सर्व आरक्षित भुखंड भरलेले आहेत. म्हणुन आज जेवढया काही आरक्षित भुखंडाचा प्रस्ताव इथे आणला आहे. त्याचा ठराव आपणांस पारीत केला पाहिजे. व येणा-या महासभांमध्ये आरक्षित भुखंडाचे विषय वेळोवेळी आणले जातील. व महासभा त्यांना परवानगी देईल. कारण की, आजपर्यंत आम्ही असे पाहात आलो आहोत की, कुणी ना कुणी या भुखंडाबाबत ओरड करत असताना दिसुन आला आहे. म्हणुन जर आरक्षित भुखंड महापालिका आपल्या ताब्यात घेत असेल व आरक्षित भुखंड एक नाही की जेथे बांधकाम झाले आहे. सर्व आरक्षित भुखंडावर बांधकामे झाली आहेत. सर्व बांधकामे जुनी आहेत. सनदची आहेत. आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की जर कोणते बांधकाम जुने*

असेल तर  त्यास तोडले जाणार नाही. म्हणुन मला असे वाटते की हा ठराव सर्व संमतीने पारीत केला तर खुपच चांगले होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना विचारले होते हा जो नविन विकास आराखडा आहे तो रदद करण्यासाठी महापालिकेच्या वतीने आम्ही शासनाकडे पत्र पाठविले आहे. नविन विकास आराखडयामध्ये काय आरक्षण आहे. म्हणुन पत्र पाठविण्याची गोष्ट माझ्या लक्षात आली नाही. दोन्ही गोष्टी कशा आहेत. नविन विकास आराखडा रदद करण्याची गोष्ट आम्ही करत आहोत. व त्याच नविन विकास आराखडयातील काही आरक्षणे आम्ही विकसित करू इच्छित आहोत. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कशा होत आहेत. या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधी आहेत. व दुसरा जो मी प्रश्न विचारला होता की, तेथे जे ५० वर्षापासुन लोक राहत आहेत. तेथे जी घरे व दुकाने आहेत. त्यांच्याबाबतीत आपण काय विचार करत आहात? प्लॉट नं. ७०५च्या चारही बाजुने जी दुकाने आहेत. जे आपण या गोषवा-यामध्ये लिहिले आहे. ती सर्व तोडल्यानंतर तेथे कंम्पाऊंड वॉल बांधली जाईल. तर ती दुकाने तोडण्याची आपली योजना कशी? जे ५० वर्षापासुन आपली घरे व दुकाने तेथे सांभाळुन बसले आहेत. ती तोडण्याचा आपण सरळ सरळ प्रस्ताव आणता व आम्ही लोक त्यांचे हा मध्ये हा मिळवणार? असे कसे करू शकता? आमच्या शहरातील हे लोक आहेत.  जे ५० वर्षापासुन तेथे आपला कामधंदा पहात आहे. त्याबाबत आपण काही ना काही विचार केला पाहिजे. व जुनी घरे व दुकाने सोडुन उर्वरीत जी आपणांस मोकळी जागा मिळते. त्याबाबत आपण विचार करू शकता त्यास आमची काही हरकत नाही. जी काही मोकळी जागा आपणांस तेथे मिळते त्याच्यावर आपण कंम्पाऊंड वॉल बांधु शकता परंतु ४०-५० वर्षापासुन जी घरे दुकाने तेथे आहेत  ज्यांच्याकडे त्यांचा सनदा आहेत. मोठमोठया इमारती तयार झाल्या आहेत त्या तोडुन आपण आरक्षण मोकळे कराल. यागोष्टीस आमची हरकत आहे. नाहीतर आपण खुलासा करा नविन विकास आराखडयाचा आपण येथे उल्लेख का करत आहात?

<u>मा. सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, जेथ पर्यंत मी समजतो. हे जे आमचे काही मित्र म्हणतात की विकास आराखडा रदद आहे. तर इथे जो संदर्भ दिला आहे विकास आराखडयाचा. मला असे वाटते की तो संदर्भासाठी आहे. विकास आराखडा रदद झाला आहे. त्याचा प्रस्ताव पाठविला आहे. परंतु प्लॉट तर रदद केला नाही ना? तर प्लॉटला कधी ना कधी विकसित करायचाच आहे ना?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया,मला अतिशय दुःख होते. हा प्रस्ताव शहराच्या विकासासाठी, भुखंडाच्या विकासासाठी आम्ही आणला होता. त्यास या सभागृहातील काही लोक संशयास्पदरित्त्या पहात आहेत. मी त्यांचा संशय दुर करणे हे माझे कर्तव्य समजतो. हा जो प्रस्ताव आणला आहे तो आपण जर लक्षपुर्वक वाचला तर आपल्या लक्षात येईल की हा जो आरक्षित भुखंड आहे. तो विकसित करण्यासाठी एखादया चांगल्या आर्कीटेक्ट कडुन, चांगल्या वास्तुविशारदाकडुन, इंजिनिअर कडुन एक प्लान तयार करू. जे प्लॉट महापालिकेच्या ताब्यात आहेत ते वाचविण्यासाठी त्यांच्या सभोवती कंम्पाऊंड वॉल बांधु. जर महापालिकेच्या ताब्यात प्लॉट आहे व त्यावर जर कुंपण नसेल तर दिवसेंदिवस त्याच्यावर अतिक्रमणे होत जातील. व त्याचे सर्वात चांगले उदाहरण माझ्या समोर येते ते नविन टेलिफोन एक्सचेंजच्या समोर शाळेसाठी आरक्षित जो प्लॉट आहे. त्याची मालकी महापालिकेकडे आहे पंरतु कंम्पाऊंड वॉल नसल्यामुळे दिवसेंदिवस तेथे अतिक्रमणे होत आहेत. तीच स्थिती पहिले जो आरक्षण क्रमांक ६ चा जो प्लॉट होता. तेथे सुध्दा बहुमजली इमारत बनविण्याचा प्रयत्न केला गेला. व आजही तीचे काही अवशेष तेथे बाकी आहेत. तर मी असा विचार केला होता की जेवढया काही प्लॉटची महापालिकेकडे मालकी आहे व टायटल आहे. अशा प्लॉटसना प्रथम संरक्षित केले जावे. व ते विकसित करून, जर महापालिकेला काही निधी उपलब्ध होत असेल तर तो उपलब्ध केला जावा.

मग ते बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने करायचे आहे की महापालिकेने स्वत: बांधकाम करायचे आहे ही पुढची गोष्ट आहे पंरतु जेव्हा मी नगररचनाकार यांच्याकडून याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला माहित पडले की, हे जे दोन -चार प्लॉटस् असे आहेत की ज्यांची मालकी महापालिकेकडे आहे. व त्याचा कागदोपत्री ताबा नाही. प्रत्यक्षातील ताबा महापालिकेकडे आहे. हे जे १९८७ चे पत्र आहे त्यामध्ये विशेष करून हे लिहिले आहे की, यांचा प्रत्यक्ष ताबा आपणांस दिला जात आहे. त्यानुसार या प्लॉटचा प्रत्यक्ष ताबा महापालिकेकडे आहे. महापालिकेकडे ताबा असुनही तेथे अतिक्रमणे होत होती. ती थांबविली गेली. व तो प्लॉट जर तसाच राहिला तर होवू शकते कुणी एखादी व्यक्ती एका रात्रीमध्ये त्या प्लॉटची सनद आणु शकते. ज्यांची कुणासही सनद दिली गेलेली नाही. असे जे प्लॉटस आहेत. त्या प्लॉटचा महापालिकेने प्रत्यक्ष ताबा घेवून त्यांना संरक्षित करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. हे आरक्षण क्रमांक अगोदरचे सहा व आताचे ४४ पासुन ४७ पर्यंत याबाबत मी माहिती घेतली त्यांचा ताबा आपल्याकडे आहे. व कुणाच्याही नावाने त्यांची आजपर्यंत सनद दिलेली नाही. हे झाले या विषयाबाबत यापुढे सुध्दा असाच एक विषय आहे. जेथे जमिन आरक्षित आहे. सनद कुणासही दिलेली नाही. ती जागा संरक्षित करण्यासाठी तिला कुंपण घालणे आणि नंतर ती विकसित करणे. यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे. जर कधी असे लक्षात आले की त्या जागेची कुणास सनद दिली आहे. तर त्या जागेस आज आम्ही कुंपण घालणार नाही. तिचे संपादन करू. तेथे कायदयानुसार जो मालक आहे. जसे श्री. मोहन वेहरानी साहेब सांगत आहेत की, ५० वर्षापासुन कुणी तिथे रहात आहेत. मला वाटते की ५० वर्षापासुन कुणी तेथे रहात असेल तर डिसप्लेस पर्सन ॲक्टनुसार तो जर १९६५ पुर्वीचा तेथील रहिवासी असेल तर त्यास सनद मिळेल. व त्यास जर सनद मिळाली तर तो त्या जागेचा मालक होईल. जर तो जागेचा मालक झाला तर त्याच्या बरोबर वाटाघाटी करून. त्यास टी.डी. आर. देवून किंवा त्यास नुकसान भरपाई देवून ती जागा महानगरपालिका संपादीत करू शकते. आज आम्हास तेथे कुंपण घालण्याचा काहीच अधिकार नाही. जर रिझर्व्ह जागेचीही सनद दिली असेल तरी आज तेथे कुंपण घालण्याचा अधिकार नाही पंरतु जेथे सनद दिलेली नाही. किंवा कुणाचाही मालकी हक्क नाही. व आज आमच्याकडे ताबा आहे. ती जागा प्रथम संरक्षित करणे आमचे कर्तव्य आहे. व जर आमच्याकडे ती जागा आहे. तर ती विकसित करणे हे सुध्दा आमचे कर्तव्य आहे. त्यासाठी आम्ही हे प्रस्ताव आणले आहेत. राहिली गोष्ट विकास आराखडयाबाबतची की जो रदद केला आहे असे आपण म्हणता तो विकास आराखडा रदद केला असे कोणतेही आदेश आज आमच्याकडे नाहीत. त्यावर स्थगिती आदेश सुध्दा आला होता. स्थगिती आदेश दिला याचा अर्थ तो रदद झाला नाही. जोपण विकास आराखडा शासनाकडे सादर केला जातो. त्या विकास आराखडयाचे आरक्षण सुध्दा विकास करताना विचारात घ्यावे लागतात. एक तर मंजुर विकास आराखडयानुसारची आरक्षणे नाही तर जो काही विकास आराखडा असेल सुधारित विकास आराखडा असेल जो सादर केला जातो. त्याची आरक्षणे कलम ४६ नुसार विचारात घेणे जरूरीचे ठरते. त्यामुळेच आम्ही हा प्रस्ताव आपल्यासमोर आणला आहे. या शहराचा विकास होवो असे जर आपणांस वाटत असेल तर माझी आपणांस विनंती आहे की, हा प्रस्ताव आपण स्विकृत करा. याबाबत जर आपल्या मनामध्ये ज्या काही शंका असतील. तर मी हा प्रस्ताव मागे घेण्यास तयार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आयुक्त महोदय, सभागृहामध्ये असे कुणीही म्हंटले नाही की हा प्लान रदद झाला आहे. सभागृहामध्ये असा मुददा मांडला गेला की प्रशासनाने या सभागृहासमोर विषय ठेवला होता की, हा प्लान रदद केला पाहिजे. हा मुददा इथे आला आहे. हे प्रशासन या शहराचा विकास आराखडा चुकीचा तयार झाला आहे. व चुकीचा तयार झाला आहे म्हणुन रदद केला पाहिजे असा प्रस्ताव ठेवते. तेच प्रशासन आज त्याच आराखडयातील आरक्षण विकसित करण्यासाठी प्रस्ताव ठेवते. त्याला आम्ही दुहेरी निती म्हणालो. आणि तो विषय आम्ही इथे ठेवला आहे त्याच्यावर तुम्ही स्पष्टीकरण करा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी ,कुणाचीही दुहेरी निती नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा. महापौर महोदया, आम्ही सुध्दा हे म्हंटले नाही की तो रदद केला आहे. हे आपण सभागृहात सांगितले की विकास आराखडा रदद करण्यासाठी सभागृहात ठराव पारीत केला आहे. त्यावर स्थगिती आदेश सुध्दा आणला आहे. याचा अर्थ हा नाही होत की, जोपर्यंत तो विकास आराखडा मंजुर होत नाही तोपर्यंत या शहरातील विकास कामे ठप्प करावीत. तसे होवू नये म्हणुन एम.आर.टी.पी. ॲक्टच्या सेक्शन ४६ नुसार तरतुद केली आहे. जर तो विकास आराखडा रददही झाला तर हे जे आम्ही आपल्या समोर प्रस्ताव आणले आहेत. ते मंजुर विकास आराखडयामध्ये ज्यासाठी आरक्षित आहेत त्यासाठी आम्ही विकसित करू शकतो. असे नाही की आज आम्ही दुकान केंद्र म्हंटले, आपण जसे म्हंटले की सुधारित विकास आराखडा राज्य शासनाने पुर्णच्या पुर्ण रदद केला. तर आम्ही तेथे दुकाने तयार करू. जर हा सुधारित विकास आराखडा राज्य शासनाने रदद केला तर मंजुर विकास आराखडयानुसार जे खेळाच्या मैदान आरक्षण आहे ते सुध्दा विकसित होवू शकते. असे नाही की तेथे दुकानच तयार करायचे आहे. परंतु तो जो आरक्षित भुखंड आमच्याकडे आहे. त्याचा विकास झाला पाहिजे यासाठी हा प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आयुक्त महोदय, प्रशासनाचा जो प्रस्ताव होता. तो या महासभेतल्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी त्यांच्याकडे बहुमत आहे. त्यांनी बहुमताच्या जोरावर हा ठराव पारीत करून शासनाकडे पाठविलेला आहे. शासन सुध्दा त्याच पक्षाचे आहे. आणि त्याच्यावर जलद गतीने निर्णय होवू शकतो. आपल्याला ऐवढी घाई का? शासनाकडे जर एखादा विषय प्रलंबित असेल, शासनाचा आदर राखणे आपले काही कर्तव्य आहे की नाही? हा प्लान जो आहे त्याबाबत आपण प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे की या शहराचा विकास आराखडा जो बी.एम.आर.डी.ए. ने तयार केला तो त्यांनी टेबलावर बसुन तयार केला. येथील वस्तुस्थिती लक्षात घेतली नाही तो चुकीचा बनलेला आहे. आणि चुकीचा बनलेला असल्यामुळे तो रदद करावा असा प्रशासनाचा प्रस्ताव होता. राजकीय प्रस्ताव नव्हता हे मी पुन्हा पुन्हा सांगतो की प्रशासनाचा प्रस्ताव होता व ज्या प्रशासनाचा प्रस्ताव होता तेच प्रशासन आज त्याच चुकीच्या आराखडयातील आरक्षणे विकसित करू पहाते. तो जर आराखडा निर्णयासाठी शासनाकडे प्रलंबित असेल तर शासन आपले आहे. यांचे शासन आहे. यांनी शासनाकडे पाठपुरावा करावा, एक तर रदद तरी करावा किंवा मंजुर तरी करावा. स्वतःचा ठराव खिंडीत करून त्यांनी स्वतःची पंचाईत तरी करून घ्यावी. काहीतरी निर्णय घ्यावा ना? शहराची तुम्ही किती फसवणुक करणार आहात. एका बाजुने तुम्ही शहराला सांगता की तुमची घरे जाणार आहेत. तुमच्या घरांवर आरक्षण आहे. अमुक आहे, तमुक आहे. लोकांना घाबरवुन सोडता. आणि दुस-या बाजुला पुन्हा तिच चुक शॉपिंग कॉम्प्लेक्स विकासाला तयार हे जे तुमचे येथे खेळ चालु आहेत. शहराची फसवणुक चालु आहे. त्या फसवणुकीला आमचा विरोध आहे. आणि आमची अशी इच्छा आहे की, राजकीय पक्षांच्या फसवणुकीमध्ये प्रशासनाने सामील होवू नये. अशी आमची इच्छा आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-मा. आयुक्त साहेब याठिकाणी तुम्ही नमुद केले की, मला दुःख होते की महापालिका विकास करू पहात आहे. हा विकास कुणासाठी असला पाहिजे सर्वसामान्यांसाठी असला पाहिजे. एका व्यक्तीसाठी नाही. दुकाने म्हणजे विकास नाही. टाऊन हॉल जरी झाला तरी तो सर्वांसाठी खुला झाला नाही. तो एक-दोन व्यक्तींसाठीच झाला. त्याचीच पुनरावृत्ती आपण याठिकाणी करू पहात आहात. असे आम्हाला वाटते याठिकाणी जागेचे नकाशे आपण मागविले आहेत. खेळाचे मैदान, ठिक आहे. प्लॉट वाचविण्यासाठी आपण

प्रयत्न करत आहात. असे तुम्ही याठिकाणी सांगितले आहे. मग हे ११ आणि १२असे वेगवेगळे विषय आले नसते. दोन्ही एकत्र आले असते. प्लॉट उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे आहेत. प्रत्यक्ष ताबा उल्हासनगर महानगरपालिकेकडे आहे. या प्लॉटविषयी आपण सांगता की प्रारूप विकास आराखडयामध्ये बदल व्हावा. तुम्हाला जर प्लॉट वाचवायचेच तर पहिले कुंपण घाला. वाचविण्यासाठी जसा तुमचा १२ नंबरचा विषय आला होता. त्याचप्रकारचा विषय तुम्ही याठिकाणी नमुद केला असता. पण याठिकाणी आपण प्रारूप विकास आराखडयामध्ये बदल करू इच्छिता. तो कशासाठी? एकीकडे तुमची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही आणि दुसरी कडे तुम्ही प्लॉटवर प्लॉट विकसित करण्याचे स्वप्न पाहता हेच श्री. राज असरोंडकरांनी सांगितले की दुहेरी निती वापरत आहेत. त्यातलाच हा प्रकार आहे.एक प्लॉटसाठी कुंपण घालु इच्छित आहात. आणि दुस-या प्लॉटबाबत तुम्ही प्रारूप विकास आराखडयामध्ये बदल करून. विकास करू इच्छिता. तसा प्रस्ताव येथे ठेवला आहे. एकीकडे दोन महिन्यांकरीता तुमची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. आणि दोन महिन्यानंतर ४-४ प्लॉट तुम्ही विकसित करू शकता का?हा ही प्रश्न अनुउत्तरीत आहे. तर ही जादुची कांडी आहे का? उल्हासनगर महानगरपालिकेची परिस्थिती सुधारली आणि दोन महिन्यात तुम्हाला भरपुर पैसा आला आणि तुम्ही प्लॉट विकसित करण्याची एक योजना तयार केली. तर ही जी शंका आम्हाला आहे ती शंका वारंवार आहे. दुसरी गोष्ट प्रारूप विकास आराखडा रदद करण्यासाठी आपण पाठविला आहे तो पर्यंत सरळ आणि साधे होते की, तुम्ही आपल्या मालकीचे असलेल्या प्लॉटमध्ये हाच प्लॉट नाही उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यात जेवढे प्लॉटस आहेत त्यांच्या भोवती सभोवताली कुंपण घालुन घ्या. ऐवढे सरळ आणि साधे होते. त्यासाठी ऐवढे फिरण्याची गरज नव्हती. असे वाटते की जर तुम्हाला प्लॉट वाचवायचे असतील तर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या सर्व प्लॉटस सभोवताली कुंपण घालण्याची काहीही हरकत नाही. त्यासाठी आम्ही परवानगी देत आहोत.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>हा जो विषय आला आहे. कुंपण घालण्याचे खुप चर्चा झाली. आम्ही निवडुन आलेले जनप्रतिनिधी आहोत. आपल्या नागरिकांच्या अधिकाराचे रक्षण करणे. त्यासाठीच तुम्ही आम्हाला पाठवले. काही दिवसापुर्वीच विपक्षांनी विशेष सभा बोलावली. अनाधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण याबाबत असे माहित पडले की, ४०० ची लिस्ट होती. त्याला कमी करण्यात आले. आणि विरोधी पक्षाने ९५ची यादी दिली. अनाधिकृत बांधकामावर कारवाई करणेसाठी आता मी मुदयावर येते की महापालिकेच्या भुखंडाचे संरक्षण झाले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>हा जो विषय चालला आहे तो प्रारूप विकास आराखडयाच्या योजनेत बदल करण्याबाबत चालला आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>दोन्ही विषय समान आहेत हेतु एकच आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>बोलु दिले जावे.

**मा. सदस्या श्रीमती. कोमल बठीजा, श्रीमती. संगिता जावळे, श्रीमती. सिमा मोकल, श्रीमती. कृष्णानी रेखा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>विपक्षांना धन्यवाद. पण मला वाटते की दोन्ही विषय एकच आहेत. भुखंड वेगळे असो परंतु संबध एकच आहे. त्यांचा कसा बचाव केला जावा. सन्माननिय सदस्यांचे खुप चर्चा झाली.९५ बांधकामांची यादी पण दिली होती. त्यामागे काय कारण होते, तिकडे पण लोक राहतात. तिकडे पण लोकांनी पैसा देवून घरदार घेतले आहे. पाकिस्तानमधुन आले आहेत निर्वासित म्हणुन. आणि इकडे येवून त्यांनी आपापली घरे बांधली. माझ्या म्हणण्याचा अर्थ हाच आहे ती जी सभा आठ दिवसापुर्वी बोलावली होती त्याचा

अर्थ काय होता? तेथे सुध्दा लोक राहतात. आम्ही लोक आमचा पैसा अडका जमा करून पाकीस्तानमधुन निर्वासित म्हणुन आलो व येथे येवून आपली आपली घरे बांधली. माझ्या म्हणण्याचा अर्थ हाच आहे की ती सभा जी आठ दिवसापुर्वी बोलावली होती. तीचा अर्थ काय होता. आता हा जो विषय आमच्या समोर आला आहे. त्यास विरोध करणे याचा अर्थ हाच होतो की, आम्हाला सर्वांच्या अधिकाराचे रक्षण करायचे आहे. जेव्हा आपण ९५ बांधकामांची यादी देता तर त्याचा अर्थ हा आहे की ती अनाधिकृत आहेत व ती तोडली जावीत. त्यांच्यावर कारवाई केली जावी. जर नगरपालिका आपले काही भुखंड वाचवु इच्छित असेल तर माझ्यामते त्यास विरोध नाही केला पाहिजे. व कायदेशिर बाब काय आहे. जसे १९९५ च्या अगोदरची ज्यांची बांधकामे आहेत. ती वाचविली जावीत. व जी आरक्षणांवर आहेत. भलेही मंजुर विकास आराखडयावरील असोत की सुधारीत विकास आराखडयावरील असोत. जी आरक्षणांवर बांधकामे आहेत त्यांना तर कोणत्त्याही परिस्थितीत वाचविले जावू शकत नाही. यापुढे जावुन जर असा काही फेरबदल आला. शासनाकडे आम्ही सर्वजण मिळुन फिर्याद घेवून जावू. त्यांना सांगु फेरबदल करा माझे सांगण्याचे कारण ऐवढेच आहे की, आम्ही सर्वजण मिळुन आमच्या आयुक्तांनी जो प्रस्ताव आणला आहे. तो आपल्या शहराच्या हिताचा आहे. ते आपल्या शहराचे वाईट करू इच्छित नाही. त्यात सुध्दा पुढे जावुन फेरबदल केले जावे. व चांगल्या हेतुसाठी सहकार्य दयावे धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, मोकळया भुखंडावर कुंपण घालुन त्यांना वाचविले पाहिजे. यासाठी कुणाचाही विरोध नाही. ती आमच्या शहराची मिळकत आहे. महापालिकेची मिळकत आहे. तिला वाचविले पाहिजे. आपण जो प्रस्ताव आणला आहे त्यास आमचा विरोध नाही हा विरोध यासाठी आहे की, आपण ११ क्रमांकाच्या विषयात असे लिहिले आहे की, रस्त्त्याच्या बाजुला जी पण दुकाने आहेत. ती सर्व तोडुन तेथे कंम्पाऊंड वॉल बांधु इच्छितात त्यास आमचा विरोध आहे. आमच्या आयुक्त साहेबांनी जेव्हा सांगितले की, ४० वर्षापुर्वीची जी दुकाने असतील त्यांना तेथील सनद मिळाली असेल. आयुक्त साहेब जरा लक्ष दया. ४०-५० वर्षापुर्वीची जी दुकाने असतील आपण म्हंटले की त्या सर्वांकडे सनद असेल मी आपणांस सांगु इच्छितो १९७५ पासुन आमचा विकास आराखडा आहे. त्यामध्ये ७०५ नंबरचा जो प्लॉट आहे. तो आरक्षित आहे. आरक्षित असल्यामुळे तिथे जी काही जुनी बांधकामे आहेत. ती आरक्षण टाकण्यापासुनची आहेत. १९७४ पासुन आरक्षणे आहेत. म्हणुन तेथे अजुन कुणालाही सनद मिळालेली नाही. माझे फक्त ऐवढेच निवेदन आहे , दुसरे काही निवेदन नाही की जुनी जी बांधकामे आहेत ती तोडली जावू नयेत. ते लोक ऐवढया दिवसापासुन तेथे काम करत आहेत. त्यांचा आपण रोजगार काढुन घेत आहात. असे नाही की, हा प्रस्ताव पारीत केल्यानंतर उदया सकाळ पासुन त्यांची घरे दुकाने तोडली जावीत. या गोष्टीस आमचा विरोध आहे. तेथे आपणांस जी काही मोकळी जागा मिळत असेल त्यावर कुंपण घालण्यास आमची काही हरकत नाही. ज्या जमिनीची कुणाकडे सनद नाही. त्या व्यतिरिक्त कुठे इमारत उभी राहिलेली नाही. रस्त्त्याच्या बाजुला जी दुकाने आहेत. ती तोडुन बाकी जागेवर आपण जे काही करू इच्छिता व हा जो आपण आरक्षणाचा मुददा आपण आणला आहात तो आरक्षणाचा मुददा बिल्कुल चुकीचा आहे. आता कुठला आराखडा कार्यरत आहे. त्यावर आपण विचार केला पाहिजे. आपण तेथे खेळाचे मैदान तयार करू इच्छिता. आपले प्लॉटस् वाचवु इच्छिता. त्याबाबत आमची काही हरकत नाही. आपण ते काम करा. काही लोक असे समजतात की, आरक्षित भुखंडांना आपण संरक्षण देवू इच्छित आहात. आरक्षित भुखंडांना संरक्षण देण्याचे आमचे काही काम नाही. महापालिकेने आपले भुखंडांना वाचविले पाहिजेत. महापालिकेची विकास कामे ठप्प झाली आहेत. महापालिकेने आपले भुखंड वाचविले नाहीत. १९८७ पासुन याबाबत विचार केला पाहिजे होता. आता त्यास खुपच उशिर झाला आहे परंतु उशिरा का होईना. महापालिका हे करत आहे. आता आपण जर विचार करत असाल तर आमचा त्यास पाठिंबा आहे. परंतु तेथे जी जुनी दुकाने आहेत. सोसायटया आहेत. तेथे जे लोक राहतात. १९९५च्या

पुर्वीपासुन लोक राहतात. त्यांच्याबाबत आपण सभागृहास आश्वासन दया की त्यांच्यावर काही चुकीची कारवाई करणार नाही. त्यांना योग्य ती पर्यायी जागा देवू. त्यानंतर तेथे काही विकास कामे केली तर त्यास आमचा काही विरोध नाही. आम्ही तेथील लोकांना वाचवु इच्छितो. प्लॉट वाचविले पाहिजेत. हे आम्हालाही कळते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, पास. पास. एकेक सदस्य पाच-पाच वेळा बोलतो हे काय चालले आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-आयुक्तांनी खुलासा केला आहे. यासाठी प्रस्ताव पारीत केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-आमच्यावर जो भ्रष्टाचाराचा आरोप केला त्याचा खुलासा आम्हाला करायला नको का?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, सन्माननिय स्थायी समिती सभापती यांनी आपल्या भाषणामध्ये हा मुददा उपस्थित केला त्याच बरोबर त्यांनी टिका टिप्पणी केली. तिचा खुलासा करण्याची आम्हाला संधी मिळाली पाहिजे. आम्ही हा मुददा वारंवार उपिस्थत केला आहे की १२ नंबरचा जो विषय......

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपण टिका टिप्पणी केली नाही का?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-काय टिका टीप्पणी केली?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-दुहेरी भुमिका म्हंटलात आपण. आयुक्तांनी पुर्णपणे स्पष्टीकरण केले आहे. पुर्ण इमानदारीने प्रस्ताव ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-श्री. राज असरोंडकर यांना बोलु दया. आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-१२ नंबरचा जो विषय आहे. त्या विषयाबाबत आम्ही प्रशासनाच्या बरोबर आहोत. परंतु येथे सत्ताधारी पक्ष हे करत आहेत की, १२ नंबर विषयाचा या विषयाशी संबंध लावुन ते ११ नंबरच्या विषयाचे १२ वाजविण्याच्या तयारीत आहेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कृपया सूचना आहे. आपली कदाचित नजरचुक होत आहे. ११ नंबरचा जो विषय आहे तो आरक्षण बदलण्यासाठी नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-आम्ही आरक्षण बदलण्याबाबत बोलत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कृपया आपण एक वेळ पाहुन घ्या.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-१२ नंबरचा विषय आहे तो, त्या भुखंडास सभोवती कुंपण घालुन त्यास संरक्षीत करण्याबाबतचा आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-११ नंबरचा विषय काय आहे तो जरा वाचुन दाखविला जावा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तेथे कुठे लिहिले आहे. आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव नाही आहे. आरक्षण दर्शविले आहे असे लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-सचिवजी आम्ही पहिलेच म्हंटले आहे, दुस-या हेतुसाठी आम्ही या प्लॉटला विकसित करू देणार नाही. आम्ही आरक्षणाची गोष्ट केलेली नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-प्लॉट हडप होवू नये यास तरी कदाचित आपण सहमत आहात ना? त्याबाबत सर्व संमती प्रदर्शित करा.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-प्लॉट सभोवताली कुंपण घालुन त्यास संरक्षित करण्याच्या आम्ही बाजुने आहोत. परंतु या शहराचा विकास आराखडा शासनाकडे सुनावणीसाठी प्रलंबित आहे. तर त्या अंतर्गतचे कोणतेही आरक्षण विकसित करण्याच्या बाजुने आम्ही नाही. हा आमचा खुलासा आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-सचिव साहेब, आम्ही असे म्हणु इच्छितो येथे असे स्पष्ट केले आहे की, प्रारूप विकास आराखड्यानुसार आता आपला कोणता विकास आराखडा चालु आहे. प्रारूप विकास आराखडा चालु आहे का? मंजुर विकास आराखड्यानुसार आमचा कारभार चालु आहे. त्यात आपली ऐवढी घाई का की प्रारूप विकास आराखड्यानुसार आम्ही फेरफार करावा. यासाठी आमचा विरोध आहे. तुमचे कामकाज सध्या मंजुर विकास आराखड्यानुसार चालु आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जो गैरसमज होता त्याबाबत मी आपणांस फक्त सुचना दिली.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-नाही आम्ही गैरसमजुतीत नव्हतो. यामध्येच का बदल? जर आपणांस प्लॉट वाचवायचा आहे तर जसे बाकी प्लॉटस् आहेत....

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला गेला की अनाधिकृत बांधकामांबाबत सभा बोलविण्याचा उद्देश काय होता? व या विषयास विरोध करण्यामध्ये अर्थ काय? हे सुध्दा प्रश्न इथे उपस्थित केले गेले. तर त्यामध्ये आमची अशी भुमिका आहे की, अनाधिकृत बांधकामांबाबत सभा बोलविण्यामागे आमचा जो हेतु होता तो प्रशासनास जागृत करणे हा होता. व या विषयास आम्ही जो विरोध करत आहोत. तो प्रशासनास दुहेरी भुमिकेपासुन थोपविण्याचा आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आता मी सुध्दा खुलासा करू इच्छितो, जेव्हा ते स्वतः टिका टिप्पणी करतात कदाचित त्यांना आठवत नसेल त्यांनी म्हंटले की सत्ताधारी पक्षांनी आपल्या बळावर हा ठराव ठेवला होता. आज यानंतर कोणता पिच्चर येणार आहे? तो मला आताच दिसत आहे. ही टिका टीप्पणी नाही का? जेव्हा एखादा सदस्य......

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-टिका नाही. भिती आहे, भिती.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-सहा वेळा आपण बोलला आहात. माझ्या बोलण्याचा उद्देश असा आहे की जेव्हा आपण स्वतः बोलता. तेव्हा स्वतः विचार केला पाहिजे. दुस-यावर टिका टिप्पणी करता. सत्ताधारी पक्षाने सत्तेचा दुरूपयोग केला. तो त्यांनी रद्द केला होता आम्ही त्यांच्या समक्ष नव्हतो. हे जे तुम्ही बोलता.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-तुम्ही मराठी चांगले बोलता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आमच्या भाभी जे बोलतात त्याचे तुम्ही उत्तर देता मग आमचे पण ऐकुन घ्या. जेव्हा आपण स्वतः टिका टिप्पणी करता तेव्हा विचार केला पाहिजे. जेव्हा भाभी म्हणते तेव्हा आपणास जिव्हारी लागते. जेव्हा आपण शाब्दीक हल्ला करता तेव्हा लागत नाही का? सत्ताधारी कोण आहे? म्हणुन सभागृहाची शिस्त राखुन मला दुस-यांदा यासाठी बोलावे लागले कारण की काही काही सदस्य पाच-पाच, सहा-सहा वेळा बोलतात. जसे त्यांना आठवण होते तसे तसे ते उठुन बोलतात. तर मेहरबानी करून आपली भावना एकदाच प्रकट करा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-सभागृह नेत्त्यांच्या निवेदनावर सर्वांनी टाळया वाजवु या.

मा. महापौरः-आयुक्त साहेबांना उत्तर देवू दया. आता आयुक्त साहेब खुलासा करतील.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्त साहेबांनी खुलासा केला की, या प्रस्तावाकडे कुणीही संशयास्पद नजरेने पाहु नये. सुधारित विकास आराखड्यात जसे आरक्षण आहे. तसे मंजुर झाले पाहिजे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-कृपया सभागृह नेत्त्याशी मी निवेदन करतो की, आपण पिठासिन अधिकारी होवू नका. कोणत्त्या सदस्याने कितीवेळा बोलायचे, बोलायचे की नाही बोलायचे हे ठरविण्याचा अधिकार महापौरांचा आहे. कृपया आपण सभागृहाची भावना काय आहे ती त्यांना सांगा. निर्णय घेण्याचा आपला अधिकार नाही. ते पिठासिन अधिकारी म्हणुन महापौरांचे काम आहे. कुणाला बोलु देणे किंवा न देणे हे आपले काम नाही. हे पुन्हा पुन्हा होत आहे व ही सभागृहाची शिस्त नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-सभागृहाचे मत काय आहे? याबाबत मतदान घेतले जावे. एकेक सदस्य सहा सहा वेळा बोलतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आपण ४ वेळा बोललात.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौरांच्या अधिकाराबाबत कधी मतदान होते का?

मा. महापौरः-हा प्रस्ताव मतास टाकला जावा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-हा प्रस्ताव मा. महापौरांच्या आदेशानुसार मतास टाकला जात आहे. जे सदस्य प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत. त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजुने ३६ मते व विरोधात १४ मते.

१. श्रीमती. रामचंदानी भावना
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्रीमती. कालानी ज्योती
४. श्री. ऐडके गणपत
५. श्रीमती. शर्मा कमला

६.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
७.श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
८.श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्री. पवार नाना आनंदा
१० श्रीमती. आहुजा नीता
११ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१२ श्री. शांताराम निकम
१३ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१४श्रीमती. मसंद माया
१५ श्रीमती. वनवारी मोना अशोक
१६ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१७ श्री. जेसवानी सतरामदास
१८.श्री. लुंड गोविंदराम
१९ श्रीमती. खिलनानी भावना
२० श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२१ श्रीमती. कारीरा रेखा
२२ श्री. पमनानी ईश्वर
२३ श्री. पंजाबी नारायण
२४ श्रीमती. पंजाबी दिपा
२५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
२६ श्री. तलरेजा विनोद
२७. श्रीमती. रिझवानी सुजाता
२८. श्रीमती. भारती पहलाज
२९. श्री. म्हस्के अंकुश
३०. श्री. लालबिहारी यादव
३१ श्री. जाधव सुरेश
३२.श्री. जाधव प्रशांत
३३ श्री. टाले प्रमोद
३४.श्री. साधवानी मोहन
३५ श्रीमती. साधवानी जया
३६ श्रीमती. करोतिया मालती

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-कसे झाले १४?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कॉंग्रेसचे मिळुन ४ आणि आपले १० असे एकुण १४.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-आम्ही तिघेजण तटस्थ आहोत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तीन सदस्य तटस्थ, मा. सदस्य श्री. मोहन वेहरानीजी आपण सुध्दा तटस्थ आहात का?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आपण मतदान घ्या ना?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-मतदान घ्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात ११ मतेः-

१ . श्री. बेहरानी मोहन
२ . श्री. उमाप रामदास
३ श्री. पुरस्वानी जमनादास
४ श्री. असरोंडकर राज
५ श्रीमती. बामणकर नंदिनी
६ श्रीमती. खांडेकर प्रेमा
७ श्री. चव्हाण रमेश
८ श्री. बोडारे धनंजय
९ श्री. पाटील विश्वनाथ
१० श्रीमती. ससाणे लक्ष्मी
११ श्री. चौधरी राजेंद्र

तटस्थः-

१ श्री. भालेराव गौतम
२ . श्रीमती. वसिटा बेबी
३ . श्री. ठाकुर अशोक

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यात येत आहे.

विषय क्र. ११:- उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखडयातील आरक्षण क्रमांक ४४ ते ४७ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना शासनाचे आदेश क्र टीपीएस/६०/८५/आरपीसी. दिनांक १.७.१९७४ अन्वये मंजुर झालेले आहे. मंजुर विकास योजनेत आ. क्र. ६ खेळाचे मैदान यासाठी जागा आरक्षित कलेली आहे. सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र १९५४०० चौ.मी. आहे. मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयाचे आदेश क्र. प्रशा/कॅम्प नं १ व २ प्रभुमापकर/राखीव जागा दिनांक २६.३.१९८७ रोजी आरक्षित जमिनीचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेस दिलेला ओ परंतु सध्या जागेवर मुख्य रस्त्यालगत काही अनाधिकृत बांधकामे झालेली असल्यामुळे ती पुर्णतः निष्कासित करून सदर आरक्षित भुखंडाचा विकास करणे प्रस्तावित आहे. मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ६ खेळाचे मैदान या आरक्षणाऐवजी खालील प्रमाणे सुधारित प्रारूप विकास योजनेत बदल दर्शविलेला आहे.

| अ. क्र | आ. क्र. | जागेचा वापर प्रारूप योजनेनुसार | एकुण क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ४४ | सामाजिक, सांस्कृतिक आणि कल्याणकारी सुखसोई | २०००.०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत, उल्हासनगर-३ |
| २ | ४५ | दुकान केंद | २५००.०० | न्यु टेलिफोन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | एक्सचेंज लगत, उल्हासनगर-३ |
| ३ | ४६ | सामाजिक, सांस्कृतिक आणि कल्याणकारी सुखसोई | ३००० .०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत उल्हासनगर-३ |
| ४ | ४७ (भाग) | मनोरंजनासाठी खुली जागा (५७०० पैकी ३००० ताब्यात आहे) | ३००० .०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत उल्हासनगर-३ |
| | एकुण | | १०५०० .०० | चौ.मी |

वरिष्ठ नियोजक उपप्रादेशिक कार्यालय, कल्याण संकुल, कल्याण यांनी दि. १०.५.२००१ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित विकास योजनेतील आरक्षणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे कारण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४६ चा विचार करता सुधारित विकास योजनेतील आरक्षणाचा विकास करणे अनुज्ञेय ठरते.

आरक्षित भुखंडाचा विकास करणेसाठी आरक्षित जागेचे नकाशे आणि अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असल्याने परवानाधारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत जाहिर प्रसिध्दीस स्पर्धात्मक नकाशे मागवुन घेणे आवश्यक आहे.

याबाबत धोरणात्मक निर्णयासाठी महासभेसमोर अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सबब उक्त प्रस्ताव मंजुरी मिळणेसाठी महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

**<u>महासभा ठराव क्र. ५६</u>** **<u>दिनांक:-१८.७.२००३.</u>**

सुचकाचे नाव :- श्री. देवेंदसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :- श्री. चिमन रूपाणी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार अर्थसंकल्पीय अंदाजात समायोजनाच्या अधिन राहून उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखडयातील आरक्षण क्र. ४४ ते ४७ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे, वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचे मार्फत जाहिर प्रसिध्दीस स्पर्धात्मक नकाशे मागवणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र.१२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १२ :- उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखडयातील आरक्षण क्रमांक १ ,२ ,३ ,४ ,३९ ,११८ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र१२ बाबत सुध्दा हाच निर्णय राहिल?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:- नाही, विषय क्र. १२ बाबत आमचा पाठिंबा आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र१२ सर्वसंमतीने मंजुर?

मा. महापौर:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १२ :- उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखडयातील आरक्षण क्रमांक १ ,२ ,३ ,४ ,३९ ,११८ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना शासनाचे आदेश क्र टीपीएस/६०/८५/आरपीसी. दिनांक १.७.१९७४ अन्वये मंजुर झालेले आहे. मंजुर विकास योजनेत खालील प्रमाणे जागा आरक्षित कलेली आहे. सदर आरक्षित जागेचे मा. उप विभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यालयाचे आदेश क्र. प्रशा/कॅम्प नं १ व २ प्रभुमापकरासखीव जागा दिनांक २६.३.१९८७ रोजी ताबा उल्हासनगर महानगरपालिकेस दिलेला आहे उपरोक्त आरक्षणाखालील जागा पुर्णत: मोकळी असल्याने उल्हासनगर शहराच्या सुधारित विकास योजनेत खालीलप्रमाणे आरक्षणाचा समावेश केलेला आहे.

| अ. क्र | आ. क्र | उल्हासनगर मंजुर विकास आराखडयानुसार जागेचा वापर | एकुण क्षेत्र (हेक्टर) | आ.क्र. | प्रारूप विकास आराखडयानुसार जागेचा वापर | एकुण क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ५ | खेळाचे मैदान | ४. ७५ | ३९ | मनोरंजनासाठी खुल्या जागा | २. २० | डी.डी. कालानी कॉलेज समोर उल्हासनगर-३ |
| २ | ९ | खेळाचे मैदान (पाण्याची टाकीचे बांधकाम सुरू आहे) | ०. ८९ | ११८ | मनोरंजनासाठी खुल्या जागा | ०. ८९ | इंदिरा गांधी मार्केट जवळील दसेहरा मैदान उल्हासनगर-३ |
| ३ | ५१ | प्राथमिक शाळा | ०. ७२ | १ | शैक्षणिक सुविधा | ०. ७२ | मुरबाड रोड नाक्या |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | जवळील जागा उल्हासनगर१ |
| ४ | १ | खेळाचे मैदान (शेतीचा वापर सुरू आहे) | २.६९ | ३ | खुली जागा | २.४४ | मुरबाड रोड नाकयाजवळील जागा उल्हासनगर-१ |
| ५ | १४१ | मार्केट | ०.२५ | २<br>४ | वाणिज्य सामाजिक व सांस्कृतिक व कल्याणकारी | ०.२५<br>०.२५ | मुरबाड रोड नाक्याजवळीज जागा उल्हासनगर-१ |

वरिष्ठ नियोजक उपप्रादेशिक कार्यालय, कल्याण संकुल, कल्याण यांनी दि. १०.५.२००१ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित विकास योजनेतील आरक्षणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे कारण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४६ चा विचार करता सुधारित विकास योजनेतील आरक्षणाचा विकास करणे अनुज्ञेय ठरते.

आरक्षित भुखंडाचा विकास करणेसाठी आरक्षित जागेचे नकाशे आणि अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असल्याने परवानाधारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत जाहिर प्रसिध्दीव्दारे स्पर्धात्मक नकाशे मागवुन घेणे आवश्यक आहे.

याबाबत धोरणात्मक निर्णयाठी महासभेसमोर अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सबब उक्त प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र.</u> ५७ <u>दिनांकः-१८.७.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सुजाता रिझवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार अर्थसंकल्पीय अंदाजात समायोजनाच्या अधिन राहून उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखड्यातील आरक्षण क्र. १,२,३,४,३९,११८ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे, वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचे मार्फत जाहिर प्रसिध्दीस स्पर्धात्मक नकाशे मागवणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र.१३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १३:- प्रकाश ऑटो समोरील चौकास व मार्गास नामकरण करणे बाबत.

काही सदस्य :-मंजुर.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-काय नामकरण आहे? पाहिले आहे का आपण? दुसरे आहे ना लोकमान्य टिळक, ज्याबाबत भाभींनी मागील सभेत म्हंटले होते. राष्ट्रीय नेत्त्यांचीच नावे दिली पाहिजेत. प्रकाश ऑटोच्या समोरील जो चौक आहे.....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपणच प्रस्ताव आणला आहात.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-मी प्रस्ताव आणला आहे पण त्यामध्ये सुध्दा दुरूस्ती करत आहे. श्री. गोविंदराम आहुजा असे रस्त्त्यास जे नाव दयायचे आहे. महापालिकेपासुन प्रकाश ऑटो पर्यंतच्या रस्त्त्यास ते नाव आपण दया मात्र चौकास लोकमान्य टिळक चौक असे नाव दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- सहमत आहात? ठिक आहे.

मा. महापौर:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १३:- प्रकाश ऑटो समोरील चौकास व मार्गास नामकरण करणे बाबत.

प्रस्तावना :-

प्रकाश ऑटो समोरील चौकास ''लोकमान्य बाळ गंगाधर टिळक'' असे नाव देण्याकरिता नगरसेविका सौ. लक्ष्मीबाई रोहीदास ससाणे यांचा प्रस्ताव आलेला आहे.

तसेच संदर्भाधिन विषयानुसार प्रकाश ऑटो समोरील दादा गोविंदराम आहुजा चौक, आणि प्रकाश ऑटो त युएमसी समोरील चौकापर्यंत ''दादा गोविंदराम आहुजा मार्ग'' असे नामकरण करणेबाबत मा. नगरसेवक श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के व श्री. राजेंद शांताराम चौधरी व श्रीमती निता आहुजा यांचे दि. १५.५.२००३ चे पत्र अनुसार प्रस्ताव आलेले आहे.

तरी सदर चौकास व मार्गाचे नाव देण्याकरिता महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ५८ दिनांकः-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. अंकुश म्हस्के.

अनुमोदकाचे नाव :- श्री. लक्ष्मीबाई ससाणे

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार कल्याण अंबरनाथ रोडवरील प्रकाश ऑटो समोरील चौकास ''लोकमान्य बाळगंगाधर टिळक चौक'' आणि प्रकाश ऑटो ते महापालिका मुख्यालयासमोरील चौकापर्यंत ''कैलासवासी श्री. गोविंदराम आहुजा मार्ग'' असे नाव देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र.१४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १४:- उल्हासनगर महानगरपालिकेत सरळ सेवा अनुशेषांतर्गत
विविध रिक्त पदावर निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे नेमणुक करणे बाबत.

काही सदस्य :-मंजुर.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- हा जो विषय आहे तो पारीत करण्यामध्ये आमची काही हरकत नाही. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांबाबत सर्वोच्च न्यायालयाचे जे निर्देश आहेत. ती ज्याची पण त्यापदावर नेमणुक होईल त्यास जात प्रमाणपत्र छाननीचा अहवाल अगोदर दयावा लागेल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ते सर्वांसाठी लागु होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-दुसरे असे की, बाकी ज्या लोकांना नेमणुका दिल्या आहेत. त्या लोकांनी सुध्दा आपल्या जात प्रमाणपत्राचे वैद्यता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत आणले पाहिजे. जसे प्रशासनाने त्यांना दोन वर्षासाठी असा आदेश दिला आहे की, जर त्यांच्यावर पोलिस केस असेल किंवा त्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी झाली नाही. किंवा काहीही त्यामध्ये चुका झाल्या तर त्यांना त्यावेळेस त्वरीत कामावरून काढु शकतो. म्हणुन जात प्रमाणपत्राची सहा महिन्याच्या आत पडताळणी झाली पाहिजे. आणि जसे अनुसूचित जमातीसाठी सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत ते लागु झाले पाहिजेत. धन्यवाद.

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १४:- उल्हासनगर महानगरपालिकेत सरळ सेवा अनुशेषांतर्गत विविध रिक्त पदावर निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे नेमणुक करणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००२/१३०६/१६-ब दिनांक २६ मार्च,२००३ अन्वये मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दि.३० जुन, २००३ पर्यंत मुदत दिलेली आहे. त्यानुसार मागासवर्गीयांचा सरळसेवाभरती मधील अनुशेष भरून काढणेसाठी शिल्लक अनुशेंषानुसार जिल्हा सेवायोजन कार्यालय, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, शहापुर तसेच विद्यार्थी रोजगार मार्गदर्शन व माहिती संचालनालय, मुंबई यांचेकडुन उमेदवारांची मागणी केली होती मागणीनुसार प्राप्त झालेल्या उमेदवारांना तसेच सन १९९६ मध्ये काम केलेले कर्मचारी व प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीसाठी अर्ज केलेले उमेदवार यांना दिनांक २६, २७, २८ व २९ जुन रोजी मुलाखतीस बोलाविण्यात आले होते.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सरळसेवा अनुशेषांतर्गत रिक्त पदांचा व निवड प्रक्रिया पूर्ण करुन भरलेल्या पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | संवर्ग | जातीचा प्रवर्ग | रिक्त अनुशेषाची संख्या | निवड केलेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कर निरीक्षक | अनु. जाती | १ | १ |
| २ | वरिष्ठ लिपिक | अनु.जाती | १ | १ |
| | | अजु. जमाती | १ | १ |
| | | विमुक्त जाती-अ | १ | १ |
| ३ | लघुलेखक निम्नश्रेणी | अनु.जाती | १ | १ |
| | | अनु.जमाती | १ | ० |
| | | इमाव | १ | १ |
| ४ | टेलिफोन ऑपरेटर | अनु.जाती | १ | १ |
| ५ | रोखपाल | अनु.जाती | १ | १ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | अ. जमाती | २१ | २१ |
| | | विजा-अ | ३ | ३ |
| | | भज-ब | २ | २ |
| | | भज-क | ३ | ३ |
| | | भज-ड | २ | २ |
| | | विमाप्र | २ | २ |
| | | इमाव | ५ | ५ |
| ७ | वाहन मदतनीस | अ. जमाती | १ | १ |
| ८ | सुरक्षा रक्षक | अनु. जाती | २ | २ |
| | | अनु. जमाती | २ | २ |
| | | विजा-अ | १ | १ |
| | | भज-ब | १ | १ |
| | | भज-क | १ | १ |
| | | भज-ड | १ | १ |
| | | विमाप्र | १ | १ |
| | | इमाव | १ | १ |
| ९ | विद्युत मदतनीस | अनु. जमाती | ११ | ११ |
| | | विजा-अ | २ | २ |
| | | भज-ब | १ | १ |
| | | भज-क | २ | २ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | भज-ड | १ | १ |
| | | विमाप्र | २ | २ |
| | | इमाव | ३ | ३ |
| | | एकुण | ८० | ७९ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत करणेत आलेल्या निवड समिती मार्फत सदर उमेदवारांच्या मुलाखती घेवुन पात्र उमेदवारांची निवड करुन नियुक्ती बाबत शिफारस केलेली आहे. सोबत पद निहाय व प्रवर्ग-निहाय निवड झालेल्या उमेदवारांचा व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा तपशिल परिशिष्टामध्ये दिला आहे.

तरी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस मा. महासभेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यांत येत आहे.

--परिशिष्ट--

पदाचे नांव :- **कर निरीक्षक**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | नितेश प्रकाश रंगारी | वंदना एस कांबळे |

पदाचे नांव :- **वरिष्ठ लिपीक**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | विशाल बी कदम | चारुशिला एम सोनावणे |
| अनु.जमाती | १ | अजित रत्ना गोवारी | केशव बाळकृष्ण भंडागे |
| विमुक्त जाती - अ | १ | अलका सतिश पवार | सखाराम गवा राठोड |

पदाचे नांव :- **लघुलेखक (निम्न श्रेणी)**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | अतुल आर कांबळे | रत्नाकर जी पुदले |
| अनु.जमाती | १ | - | - |
| इ.मा.व | १ | नितीन बी तिवरे | शेफाली व्ही फाळक |

पदाचे नांव :- **टेलिफोन ऑपरेटर**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | मोनिका सोपान तडके | राजश्री सोपान तडके |

पदाचे नांव :- **रोखपाल**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | नंदा जी संगारे | रुपेश जे उबाळे |

पदाचे नांव :- **कनिष्ठ लिपीक**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जमाती | २१ | १) विलास रामा खांदारे<br>२) विलास दशरथ गायकर<br>३) पार्वती निर्णक<br>४) भाऊ रामा हंबरि<br>५) केशव नारायण हंबीर<br>६) अनुप्रिया वसंत उशीरकर<br>७) उदय बाबुराव वानखेडे<br>८) भगवान कचरू पोटकुळे<br>९) सुशिला कृष्णा बाबळे<br>१०)कमल देऊ निकुळे<br>११)बाबु जानु मेंगाळ,<br>१२)संजय मुकणे<br>१३)बेबी नारायण माळी<br>१४)श्रीम. उषा आर खिरारी<br>१५)प्रकाश भिमसेन बोरसे<br>१६)लक्ष्मण काकडी,<br>१७)सुजाता काशिनाथ जाधव<br>१८)मिना साबळे<br>१९)दिपक रमेश वाडेकर<br>२०)जयराम धाकु खंडवी<br>२१)काळया लहानु | १)श्रीम. विदया तु.गवारी<br>२)श्रीम अर्चना बी कुलसंगे<br>३)संतोष निवृत्ती तळपाडे<br>४)भगवान आनंदा भांगरे<br>५)सुरेखा जयवंत कोपे<br>६)वेणु वझरे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उंबरसडा | |

| पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| विजा-अ | ३ | १)परशुराम जे गायकवाड | १)सुरेश पी पवार |
| | | २)संतोष के राठोड | |
| | | ३)रागिणी शरद पळशीकर | |

| पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| भज-ब | २ | १)शुभदा कृष्णा मोरे | १) मंजुषा रघुनाथ कसाणे |
| | | २)सचिन एल.जाधव | |

| पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| भज-क | ३ | १)संजीव गंगाराम परदेशी | १)विद्या डी घोलप |
| | | २)उत्तम नामदेव गडरी | |
| | | ३)वैभव डी ठोबंरे | |

| पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| भज-ड | २ | १)श्रीम.रुपा बा.संखे | १)शिवाजी एम वरदे |
| | | २)विनोद एम गुजेला | |

| पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| विमाप्र | २ | १) सुनिता आर.म्हात्रे | १)श्याम आर पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २)निलेश यु.वाघमारे | |

पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| इमाव | ५ | १) दिप्ती पी शिरसाठ | १) सुजाता पांडुरंग गोवेकर |
| | | २) मनिषा एच.जाधव | २) पष्टे किरण दामोदर |
| | | ३) विनोद अ. केणी | |
| | | ४) उमेश पी हजारे | |
| | | ५) नेहा नितीन चौधरी | |
| | | | |

पदाचे नांव :- वाहन मदतनीस

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जमाती | १ | वैजा विठ्ठल किसन | परशुराम एम.घाटळ |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जाती | २ | १)गणेश टी देवरुखकर | १) पिंताबर पोपट जाधव |
| | | २) सुरेश नाना ठेणगे | |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जमाती | २ | १)शांताराम धावलु दिघे | १)रविंद्र जानु सारसे |
| | | २)लक्ष्मण देवू वाघ | |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| विजा-अ | १ | विजय शंकर पवार | ज्ञानेश्वर हुना पवार |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| भज-ब | १ | विनोद आनंदा जोनवल | दिलीप एन.गिरे |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| भज-क | १ | कैलाश एल.अहिरे | सुदाम ए. परदेशी |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| भज-ड | १ | यशवंत आर.सगळे | संखे नारायण अजय |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| विमाप्र | १ | अमोल पी.केणी | हरेश विठोबा नागपुरे |

पदाचे नांव :- सुरक्षा रक्षक

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| इमाव | १ | संतोष एस कुशे | प्रकाश एम.राऊत |

पदाचे नांव :- विद्युत मदतनीस

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु.जमाती | ११ | १) दिपक दामु धोडी | १) युनुस गफुर तडवी |
| | | २) प्रल्हाद दत्तात्रय वाख | २) भाऊ तुकाराम घाटे |
| | | ३) बबन जिवा धोडग | ३) वसंत नपशत निसकोटे |
| | | ४) दिलीप चिमा खोडक | |
| | | ५) कृष्णा पांडूरंग चवर | |
| | | ६) शंकर रामा भोये | |
| | | ७) म्हादया शनवार | |
| | | ८) मारुती राघो कवटे | |
| | | ९) अनंता चिंतामण भोपी | |
| | | १०) किसन रामभाऊ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भगत | |
| | | ११) अम्रित देव मानकर | |

पदाचे नांव :- **विद्युत मदतनीस**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| विजा-अ | २ | १) राहुल सोनबा जाधव | १)राठोड अनिल प्रेमराज |
| | | २) अनिल बबन राठोड | |

पदाचे नांव :- **विद्युत मदतनीस**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| भज-ब | १ | निलेश महादेव भोईते | ज्ञानेश्वर कृष्णा सोनावणे |

पदाचे नांव :- **विद्युत मदतनीस**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| भज-क | २ | १) नारायण आर सांगर | १) बाळु बापु कोकरे |
| | | २) अरविंद खंडू जांभळे | |

पदाचे नांव :- **विद्युत मदतनीस**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| भज-ड | १ | सचिन रमेश संखे | दिपक व्ही सानप |

पदाचे नांव :- **विद्युत मदतनीस**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| विमाप्र | २ | १) किशोर वसंत राऊत | १) पागदरे मिलींद डी. |
| | | २) काळे अजय विष्णु | |

पदाचे नांव :- **विद्युत मदतनीस**

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| इमाव | ३ | १) प्रभाकर के.आयरेकर | १)भेरे अशोक जयराम |
| | | २) प्रशांत पी.हटकर | २)राजेश लक्ष्मण ठाकरे |
| | | ३) रघुनाथ च.देसले | |

महासभा ठराव क्र. ५९ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समिती शिफारशीप्रमाणे उल्हासनगर महापालिकेत सरळ सेवा अनुशेषा अंतर्गत उपरोक्त विविध रिक्त पदावर सुचविलेल्या उमेदवारास नेमणुक करणेस मान्यता देत आहे.

परंतु सदर उमेदवारांची नेमणुक कायम करता येणार नाही जोपर्यंत.

१. त्यांचा परिक्षाविधीन कालावधी समाधानकारक आढळेस्तोपर्यंत.

२. त्यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडुन वैध घोषित होईस्तोपर्यंत.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १५:- श्री. व्ही. आर. गर्जे यांना सहाय्यक आयुक्त व प्रभाग अधिकारी या पदावर पदोन्नती देणे बाबत.

*श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):-हा जो १५ व्या क्रमांकाचा विषय आहे. त्याच्यावर पुर्नविचार करायचा असल्याने आज तो विषय आम्ही मागे घेत आहोत.*

*मा. सदस्य श्री. नाना पवार:-मा. महापौरजी, आजच्या सभेचा हा जो शेवटचा विषय आहे. पदोन्नतीचा हा जो विषय आहे. त्याबाबत मी आयुक्तांकडुन काही स्पष्टीकरण मागवु इच्छितो पदोन्नतीबाबत महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमध्ये एक संभ्रम निर्माण झाला आहे. व तो असा आहे की महानगरपालिकेमध्ये बरेचसे कर्मचारी असे आहेत. जे चतुर्थ श्रेणीमध्ये काम करतात. त्यांची नेमणुक चतुर्थ श्रेणी मधील आहे. परंतु महानगरपालिका त्यांच्याकडुन संवर्ग ३ चे पदावरील काम करून घेत आहे. व अनेक वर्षापासुन त्यांच्याकडुन काम करून घेत आहे. जसे की स्वच्छता निरिक्षक आहेत. काही स्वच्छता निरिक्षक असे आहेत की जे चतुर्थ श्रेणीमध्ये आहेत. पंरतु महापालिका त्यांचेकडुन स्वच्छता निरिक्षकाचे काम करून घेत आहे. काही कर्मचारी चतुर्थ श्रेणीमध्ये आहेत परंतु महापालिका त्यांचेकडुन संवर्ग ३ च्या पदावरील काम करून घेत आहे. लिपिक, टायपिस्ट वगैरे, कॉम्प्युटर चालक वगैरे हे जे सर्व कर्मचारी आहेत. ज्यांच्या जवळ पात्रता आहे. पदवीधर आहेत. आज काम करत आहेत. त्यामध्ये बरेचसे मागासवर्गीय कर्मचारी सुध्दा आहेत. असे मागासवर्गीय कर्मचारी आहेत ज्यांच्याकडे संगणकाचे ज्ञान आहे, पदवीधर आहेत त्यानंतर देखील ते सफाई कामगार आहेत. किंवा शिपाई आहेत. तर महापालिकेचे असे जे कामगार आहेत. त्यांना पदोन्नतीसाठी काही रस्ता आहे का? महानगरपालिका असेच त्यांच्याकडुन संवर्ग ३ च्या पदावरील काम करून घेईल. तर आता आपण त्यांना काही पदोन्नती देणार आहात का? याचा जर आपण खुलासा केलात तर मला वाटते की, महानगरपालिकेचे जे*

कर्मचारी आहेत त्यांच्या मनात पदोन्नतीबाबत चा जो संभ्रम निर्माण झाला आहे. तो दुर होईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>या प्रस्तावामध्ये चुका काय आहेत?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>हा शेवटचा जो विषय आहे त्याबाबत मला असे सांगण्यात आले की त्यामध्ये काही त्रुटी आहेत. अनुभवाच्या बाबत किंवा मुळ जी नेमणुक आहे. तीच्या कनफरमेशन बाबत त्या सर्वांची छाननी करून हा प्रस्ताव आपल्या समोर पुन्हा आणला जाईल. जर तो योग्य असेल तर, दुसरे असे की या सभागृहाचे सदस्य श्री. नाना पवार यांनी सांगितले की, महानगरपालिकेमध्ये असे काही कर्मचारी आहेत. ज्यांची नेमणुक खालच्या स्तरावर करण्यात आली आहे परंतु ते कर्मचारी उच्च स्तरावरील म्हणजे संवर्ग ३ च्या पदावरील कर्मचा-याचे काम करतात. त्याबाबत मी असे सांगु इच्छितो की, जर अशी पदे रिक्त असतील, वरच्या संवर्गातील व निम्न स्तरातील व्यक्ती त्या पदासाठी शैक्षणिक दृष्टया पात्र आहे. अनुभवाची अट सुध्दा तो पुर्ण करतो. तर अशा कर्मचा-याचा पदोन्नतीसाठी विचार केला जाईल. परंतु जर तो अटी पुर्ण करत नसेल तर त्याचा विचार केला जावु शकत नाही. ऐवढेच नाही तर याव्यतिरिक्त ज्या पदावर त्याची नेमणुक केली आहे. त्या पदाव्यतिरिक्त त्याच्याकडुन काम करवुन घेतले जात असेल तर ते सुध्दा बंद केले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब हा विषय मागील महासभेत सुध्दा आला होता ना? तेव्हा आपल्या लक्षात आले नव्हते का काय चुका आहेत त्या? तेव्हा दुरूस्ती करूनच प्रस्ताव आणावयास पाहिजे होता ना? प्रस्ताव आणण्याची घाई पण आपण करता. पुन्हा सांगतात रदद करतो, मागे घेतो याच्यामध्ये काहीतरी मोठे कारण आहे असे आम्हाला वाटते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, काहीच कारण नाही. माझ्याकडे जी एक तक्रार करण्यात आली. त्यानुसार मला प्रथम दर्शनी असे वाटत आहे की, ही तक्रार खरी आहे. बाकी काहीच कारण नाही. ते जर पात्रता धारण करत असतील तर त्यांना ते पद मिळेल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>निवड समिती काय करत होती?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u> असे वाटते की, आयुक्त साहेबांना उशिरा तक्रार मिळाली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>बरोबर आहे.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा विषय प्रशासनाच्या विनंतीनुसार मागे घेण्यात येत आहे.

<u>विषय क्र. १५:-</u> श्री. व्ही. आर. गर्जे यांना सहाय्यक आयुक्त व प्रभाग अधिकारी या पदावर पदोन्नती देणे बाबत.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जन गन मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ७. ५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांकः-२०/८/२००३

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/८/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दि. २०८. २००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३६. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३७. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ३८. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३९. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४०. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४२. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १३. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५२ | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५४. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५५. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५६. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५८. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६०. | श्री. नरेंदकुमार केवलराम ठाकुर |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६१. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २९. | श्री. मोहन साधवानी, | ६२. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३०. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६३. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६५. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६६. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३४. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ६७. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३५. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| | | ६९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर

मा. सदस्य १. श्री. वाघे शामु बाबु २. श्री. मुलचंदानी महेंद ,३. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश ४. श्रीमती.गुप्ता आनिता धर्मेन्द ,५. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ६. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ७. श्री. इदनानी राजू चंद्रभान,८. श्री. माखिजा हरदास, ९ श्री. वदरीया राजेश नानिकराम, १०. श्रीमती. मोना वनवारी हे / ह्या सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी व श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातून बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. महापौरजी,मागील सभा अतिशय घाईघाईने झाली होती. देशातील काही प्रतिष्ठित व्यक्तींचे निधन झाले आहे. त्यांना आपणांस श्रध्दांजली वाहता आली नाही. त्यामुळे या सभेमध्ये त्यांना श्रध्दांजली वाहण्यांत यावी. त्यापैकी भारतातील प्रसिध्द अभिनेत्री श्रीमती. लीला चिटणिस, प्रसिध्द लेखक श्री. प्रकाश नारायण संत, उल्हासनगर भाजपाचे माजी अध्यक्ष श्री. माधवदास रेचलानी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक श्री. रज्जु भैया, हास्य अभिनेते श्री. जॉनी वॉकर भारतीय रिपाब्लिकन पार्टीचे उल्हासनगर जिल्हयाचे, ठाणे जिल्हयाचे अध्यक्ष, युवा अध्यक्ष श्री. शेखर भालेराव यांचे नुकतेच निधन झाले आहे. या सर्वांना आपण याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करावी. अशी मी विनंती करतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-श्री. प्रमोद टाले, श्री. किशोर वनवारी यांच्याकडुनही एक शोक प्रस्ताव आला आहे. श्री. चंद्रशेखर भालेराव आर.पी.आय. जिल्हाअध्यक्ष ठाणे यांचे सुध्दा नुकतेच निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली आर्पित करायची आहे.

कृपया सर्वांनी आपल्या आपल्या जागेवर उभे राहुन मौन धारण करावे.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले

श्री. नाना पवार

शोक प्रस्ताव :-

भारतातील प्रसिध्द अभिनेत्री श्रीमती. लीला चिटणिस, प्रसिध्द लेखक श्री. प्रकाश नारायण संत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक श्री. रज्जु भैया, हास्य अभिनेते श्री. जॉनी वॉकर भारतीय रिपब्लिकन पार्टीचे उल्हासनगर जिल्हयाचे, ठाणे जिल्हयाचे अध्यक्ष, युवा अध्यक्ष श्री. शेखर भालेराव यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ६० अ</u>　　　　　　<u>दिनांकः-२०.८.२००३.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्रीमती. लीला चिटणिस, श्री. प्रकाश नारायण संत, श्री. रज्जु भैया, श्री. जॉनी वॉकर, श्री. शेखर भालेराव यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौरजी, उल्हासनगर मध्ये तीन दिवसापासुन, कॅम्प ४ मध्ये तीन दिवसापासुन पाण्यासाठी हाहाकार माजला आहे. कॅम्प नं. ३ कडुन जे पाणी येते तेथुनही पाणी येत नाही व कॅम्प नं. ५ कडुन जो पाणी पुरवठा होतो. तोही होत नाही. याचे स्पष्टीकरण सभा सुरू होण्याअगोदर दिले जावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, एम.आय.डी. सीच्या पाणी साठवणुक टाकीमध्ये काही बिघाड झाल्यामुळे शहरात पाणी नाही, काल दिवसभर, परवा संध्याकाळी साठवणुक टाकीमध्ये अचानक बिघाड झाल्यामुळे रात्री बारा वाजेपासुन त्यांनी दुरूस्तीसाठी पाणी पुरवठा बंद ठेवला आहे. काल दिवसभर पाणी नव्हते व आज सकाळी साडे आठ वाजता दुरूस्तीचे काम पुर्ण झाले आहे. व पाणी पुरवठा सुरू झाला आहे परंतु तो कमी दाबाने होत आहे. तर एम.आय.डी.सी. वर आपण विसंबुन असल्यामुळे, एम.आय.डी.सी. च्या साठवणुक टाकीमध्ये काही बिघाड झाल्यामुळे शहरात पाणी नाही दुसरे कोणतेही कारण नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, हे जे तुम्ही सांगत आहात ते कॅम्प नं. ३ चे झाले. कॅम्प ४ मध्ये ५ नंबर मधुन जे पाणी येते त्यामध्ये काय बिघाड आहे ते तुम्ही सांगु शकाल का? तुम्हाला वारंवार सांगुन पण तुम्ही स्वतःची जबाबदारी झटकता व श्री. जवादे यांच्यावर तुम्ही सर्व जबाबदारी टाकता. आता हे सर्व मी श्री. जवादे यांच्यावर सोडले आहे, ते काय करतील ते करतील, ते माझ्याकडे आल्यानंतर मी एक मिनिट थांबणार नाही हे तुमचे उत्तर असते, पण श्री. जवादे काय करतात हे तुम्ही त्यांना विचारता का?

आजच्या परिस्थितीला तुम्ही जे आश्वासन दिले आहे, तुम्ही जे उपोषण उठविले आहे. जो मोर्चा आला होता त्यांना तुम्ही जे आश्वासन दिले होते ते तुम्ही पुर्ण केले आहे का? तुम्ही लेखी उत्तर दिले आहे की, पंधरा दिवसामध्ये तेथे पाण्याची नविन लाईन टाकुन देतो. तेथे टॅकर्स पुरवतो ते तुम्ही पुरविले आहेत का? उत्तर दिले आहे त्यास तुम्ही जागला आहात का? तुम्ही तेथे पाणी देत आहात का? नाही देत तर का देत नाही तुम्ही?कोणकोणत्त्या विभागात पाण्याची समस्या आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब आज हा जो पाण्याचा विषय येथे आला आहे त्यावर मी सुध्दा बोलु इच्छितो की दि. ९.७.२००३ रोजी माझ्या प्रभागात आयुक्त साहेबांचा एक जनता दरबार झाला होता. तेथे असे आश्वासन दिले होते की, आपल्या ज्या समस्या आहेत त्या तीन महिन्यापासुन तीन वर्षापर्यंत आम्ही पुर्ण करू. परंतु अत्त्यंत दुःखाने म्हणावे लागत आहे की, जेव्हापासुन हा जनता दरबार झाला आहे. आमच्या पुर्ण प्रभागास पाणी मिळत नाही. दुःख या गोष्टीचे आहे की जेव्हा आम्ही टॅकरची मागणी करतो तेव्हा टॅकर सुध्दा मिळत नाहीत. आम्ही आयुक्तांना असा अर्ज दिला होता की, आमच्या प्रभागामध्ये टॅकर दिले पाहिजेत. त्यांनी ते नाकारून असे सांगितले की आम्ही टॅकरने पाणी न देता नळाव्दारे पाणी देवू. माझ्या प्रभागातील जवळ जवळ दोन-तीनशे लोकांना तीन महिन्यापासुन बिल्कुल पाणी मिळत नाही. आम्ही अधिका-यांना सांगुन सांगुन थकतो, आयुक्त साहेबांना सकाळी फोन करतो. त्यांचे एकच उत्तर असते की, मी श्री. जवादे साहेबांना सांगतो. श्री. जवादे साहेब आपले हे काम करतील. श्री. जवादे साहेब म्हणतात की श्री. कांबळे साहेबांना सांगतो, श्री. कांबळे साहेब सांगतात की मी अमुक एकाला सांगतो. नगरसेवकांनी तक्रार केल्यानंतरही त्याची काही दखल घेतली जात नाही. जेथपर्यंत पाण्याचा प्रश्न आहे. चेलाराम मार्केट येथील माझ्याकडे एक तक्रार आली होती की, पुर्ण शहरामध्ये दुर्गंधीयुक्त पाणी येते. चेंबर तयार करायचे आहे, हे चेंबर एक तासामध्ये तयार केले जावु शकते. ते तीन महिन्यात तयार केले जाऊ शकत नाही. जेव्हापण आम्ही याबाबत अधिका-यांना भेटतो ते म्हणतात की आम्हाला हे भेटत नाही ते भेटत नाही. जेव्हा टॅकर बाबत बोलतो तेव्हा सांगतात की तो अमुक एका माणसाला दिला आहे. आयुक्त साहेबांनी आम्हाला आदेश दिले आहेत. शेवटी लोकांनी काय करायचे? ऐवढया समस्या आमच्या कॅम्प नं. ५ मध्ये आहेत. गेल्या पाच दिवसापासुन पाणी मिळत नाही. जेव्हा आम्ही याबाबत विचारणा करतो तेव्हा सांगतात की, वॉल खराब झाला हे झाले ते झाले, गेट पडले आहे. शेवटी हे गेट पडणे, वॉल खराब होणे हे कुठपर्यंत चालेल. व साहेब म्हणतात की आम्ही एम.आय.डी.सी. वर विसंबुन आहोत. पहिल्या दिवशी एम.आय.डी.सी. पाणी बंद करते दुस-या दिवशी गेट पडते, तिस-या दिवशी आमचे वॉल बंद पडतात, चौथ्या दिवशी वॉलमन येत नाहीत, पाचव्या दिवशी आमचे जे उप अभियंता आहेत ते सुट्टीवर जातात अशाप्रकारे स्थिती आहे. ज्याप्रमाणे सोमवार ते रविवार वीज बंद त्याप्रमाणे पाण्याची स्थिती झाली आहे. तर मी असे म्हणतो की आयुक्त साहेब महासभेत जे बोलतात त्याची कार्यवाही झाली पाहिजे. जर आपण दोन दिवस म्हणत असाल तर दोन दिवसांनंतर कार्यवाही झाली पाहिजे. आम्हाला फक्त आश्वासन मिळते कार्यवाही होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-</u>मा. महापौर, अशीच समस्या कॅम्प नं. ४ मध्ये अनेकवेळा उदभवते पाण्याच्या बाबतीत. पाणी हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक भाग असुन त्याकडे महानगरपालिकेचे पाणी पुरवठा अधिकारी अतिशय दुर्लक्ष करतात. माझ्या प्रभाग क्र. १७ मध्ये श्रीराम नगर विभाग आहे तेथे जवळ जवळ दिड वर्षापासुन घाण पाण्याची समस्या आहे. लेखी तक्रार करून सुध्दा, पाणी पुरवठा सभापती सुध्दा तेथे येवुन गेले आहेत. त्यांनी ती समस्या बघितली आहे. याअगोदर जेवढे पण अधिकारी उल्हासनगर कॅम्प ४ च्या विभागात आले त्या सर्वांनी मान्य केले आहे, सर्वांनी पाहिले आहे. दिड वर्ष झाले लेखी तक्रार करून

समस्येचे काहीही निराकरण होत नाही. फक्त आश्वासने दिली गेली जातात. आणि या गोष्टीबाबत दोन वेळा या महासभेमध्ये मी विषय काढला होता. तरी पण आजपर्यंत त्यावर काही उपाययोजना केलेली नाही. फक्त आश्वासने दिली जातात. आताच काही सदस्यांनी सांगितले की कॅम्प नं ४ च्या पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयात गेल्यानंतर फक्त तेथे तक्रारी केल्यानंतर फक्त त्यांना आश्वासने दिली जातात. अधिकारी येतात आणि फक्त पाहतात, काय परिस्थिती आहे हे कोणीही तेथे ढुंकून पाहत नाहीत. त्याकडे पाणी पुरवठ्याचे कर्मचारी पण लक्ष देत नाहीत. येतात खिशात हात घालुन उभे राहतात. गंमत बघतात, माणसे पाण्यासाठी कसे इकडे तिकडे धावतात. आणि त्यानंतर ते जातात व त्यावर काहीही कारवाई होत नाही. तर ही कारवाई कधी होईल? पाणी पुरवठा कधी सुरळीत होईल? आणि लोकांच्या समस्या कधी सुटतील? सध्या पावसाळयाचे दिवस आहेत घाण पाण्याची समस्या वाढलेली आहे. लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. दिड दिड वर्षापासुन तक्रारी करूनही घाण पाण्याच्या समस्या सुटलेल्या नाहीत. तर आज उल्हासनगर शहरातील नागरिक कसे तंदुरूस्त राहतील, आणि त्यांचे आरोग्य कसे अबाधित राहील त्याचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u> सन्माननिय महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, आम्हाला एम.आय.डी.सी. वर पाण्यासाठी विसंबुन रहावे लागते. एम.आय.डी.सी. तर्फे मागील आठ दिवसापासुन विठ्ठलवाडीच्या खन्ना कंम्पाऊंड येथे दुरूस्तीचे काम चालु होणार होते. ते काल सुरू झाले. काल रात्रभर ते काम चालले व सकाळी आठ वाजता ते पुर्ण झाले. परंतु या शहराचे पाणी बंद झाले त्यास जबाबदार कोण? एम.आय.डी.सी. जबाबदार आहे? तर एम.आय.डी. सी. ने आपणांस कळविले आहे का की आज पाणी बंद राहणार आहे. व आपण लोकांना सांगितले आहे का? ही जबाबदारी महापालिकेची आहे, आयुक्तांची आहे. जर आपण अशी जबाबदारी झटकत असाल तर ते चुकीचे आहे. आपण लोकांना सांगितले पाहिजे. आज हिंदुंचा मोठा सण आहे. व लोक रस्त्यावर पाण्यासाठी भटकत आहेत ही अतिशय शरमेची गोष्ट आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, माजी विरोधी पक्ष नेता श्री. रमेश चव्हाण साहेब, आताचे विरोधी पक्षनेता श्री. चौधरी साहेब व सदनातील सदस्य श्री. विश्वनाथ पाटील या तिघांचेही एक म्हणणे होते, मी ही एक गोष्ट कबुल करतो की, ते नेहमी त्यांच्या प्रभागातील पाण्याची समस्या घेवून आमच्याकडे येतात. त्यांच्याबरोबर चर्चा करून जी काही उपाययोजना करणे शक्य आहे ती उपाययोजना करून ती जर तांत्रिक दृष्ट्या स्विकारण्या योग्य असेल तर स्विकारून आम्ही आमच्या अभियंत्त्यांना सांगुन किंवा निर्देश देवून अंमलबजावणी करण्यास सांगु. आजपर्यंत असे झाले नाही की त्यांनी शिफारस केली आणि आम्ही आमच्या कनिष्ठांवर जबाबदारी ढकलली असे आजपर्यंत तरी झाले नाही. परंतु आज दोघांची भुमिका पाहुन मला आश्चर्य वाटु लागले आहे. सर्वांत जास्त तक्रारींची दखल त्यांची घेतली जाते. त्यांच्या ज्या शिफारशी असतात त्यांच्यावर कार्यवाही होते. यानंतरही त्यांना जर वाटत असेल की, मी माझी जबाबदारी कनिष्ठांवर सोपवितो तर हे दुर्दैव आहे असे मला वाटते. बाकी काही नाही. हा जो त्यांनी आरोप केला तो आम्हाला बिल्कुल मंजुर नाही. मी सभागृहाला सांगु इच्छितो की सर्वात जास्त तक्रारी ज्या विरोधी पक्षांकडुन येतात. त्यांना सर्वात जास्त प्राधान्य देवून आम्ही काम करतो.

**मा. उप-महापौर श्रीमती जया साधवानी यांनी ४.३२ वाजता सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>हरकतीचा मुददा, आयुक्त साहेब सत्ताधारी व विरोधी पक्ष असा उल्लेख करणे तुम्हाला शोभा देत नाही. तुम्ही कोण सत्ताधारी आणि विरोधी पक्षीय असा उल्लेख करणारे? तुम्ही पुर्ण उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासनाचे प्रमुख आहात. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी असे

वर्णन तुम्ही तरी करू नये. कृपया इथुन पुढे तरी लक्षात ठेवा. या अगोदर वर्तमानपत्रात तुमचे निवेदन आले आहे, राजकीय. याठिकाणी राजकीय हेतुने प्रेरीत असे आपले निवेदन असु नये. प्रशासनाचा प्रमुख म्हणुन आपण निपक्ष भुमिका ठेवावी. विरोधी पक्षीय आणि सत्ताधारी असा उल्लेख याठिकाणी करू नये.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी सभागृहास तेच सांगु इच्छित होतो. की आम्ही बिल्कुल निपक्षपणे काम करतो. व जेव्हा विरोधी पक्षातुन कोणताही सदस्य जेव्हा कोणतीही समस्या आमच्याकडे घेवून येतो. आम्ही ती लक्षपुर्वक ऐकुन घेवून त्यावर कार्यवाही करतो. हा आमचा स्वतःचा अनुभव आहे. आज आपण सभागृहात आमच्यावर असे काही आरोप केले आहेत की, आम्ही आमची जबाबदारी टाळत आहोत. ती आम्हांस मान्य नाही. आम्ही कधीही आमची जबाबदारी, प्रशासनाची जबाबदारी ना टाळली आहे. ना कनिष्ठांवर सोपविली आहे. आम्ही आपणांस हे जरूर सांगितले आहे की आपल्या ज्याकाही शिफारसी आहेत त्यावर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आमच्या कार्यकारी अभियंत्यांची राहील. त्यासाठी जी काही मंजुरी घ्यावी लागेल. निर्देश दयावे लागतील. त्यासाठी जर काही खर्चाची तरतुद करावी लागली तर ती जबाबदारी आमची आहे. व ती आम्ही नेहमी निभावली आहे. त्यानंतरही आज सभागृहामध्ये श्री. पाटील साहेब उठतात व बोलतात की, दिड वर्षापासुन आमच्या तक्रारी कुणी ऐकुन घेत नाही. आज मला येथे येवुन आठ महिने झाले. श्री. पाटील साहेबांनी कधीही माझ्याकडे एकसुध्दा तक्रार केली नाही.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u>लेखी तक्रार केली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>आम्ही पाहतो आपल्या काय काय तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. परंतु आज आपण सभागृहात म्हणता की, दिड वर्षापासुन माझ्या तक्रारींची सुनावणी होत नाही. कोणतीही कारवाई होत नाही. ही जी गोष्ट आहे ती चुकीची आहे असे मला वाटते. मी आपणांस पुढच्या सभेत सांगेन की यांच्याकडुन किती तक्रारी आल्या आहेत. व त्यावर काय काय अंमलबजावणी झाली आहे. मी हे मान्य करतो की, प्रत्येक प्रभागात पाण्याची थोडी फार समस्या आहे. परंतु जेथुनही तक्रार येते ती त्वरीत सोडविण्याचे आम्ही प्रयत्न करतो. व अधिक प्रमाणावर या तक्रारी सोडविण्यामध्ये आम्ही सफल होतो. मी या अगोदरच सांगितले की, आज सुध्दा आपण एम.आय.डी.सी. वर विसंबुन आहोत. त्यामुळे कधी कधी काही प्रभागात काही प्रमाणात पाणी येत नाही. पाणी कमी दाबाने मिळत असल्यानेही, तसेच नेहमी ज्या दाबाने पाणी येते त्या दाबामुळेही उंच ठिकाणच्या विभागात पाणी पोहचत नाही. मला असे वाटते की श्वेतपत्रिकेत पाण्या विषयी मी विस्तृतपणे लिहिले होते. व आज आपल्या प्रभागात पाण्याची जी काही समस्या आहे. पहिले असे असु शकते चार ठिकाणी पाण्याची समस्या होती. ती आज दोन ठिकाणी आहे. परंतु दोन ठिकाणच्या पाण्याची समस्या आम्ही दुर केली आहे. ती सुध्दा आपण मान्य केली पाहिजे. व दुःखाची गोष्ट आहे की ती आपण मान्य करत नाहीत. मी येण्या अगोदर आपल्या प्रभागात पाण्याची जी काही समस्या होती. त्यापेक्षा जर अधिक समस्या झाली असेल तर मी मान्य करेल. व आपण जी काही शिक्षा कराल ती मी मान्य करेन. परंतु आम्ही आपल्याबरोबर आपल्या प्रभागाची पहाणी करू. जेथे पण आम्ही काम केले आहे ते आपणांस दाखवु. व त्यानंतरही जर आपले असे मत तयार होत असेल की मी आल्यानंतर आपल्या प्रभागातील पाण्याची समस्या वाढली आहे. तर आपण जी शिक्षा दयाल ती मान्य करेन. परंतु आज मी आपणांस ऐवढेच आश्वासन देतो की, २२ तारखेला मी व आमचे पाणी पुरवठा विभागाचे अभियंते आपल्या प्रभागात जेथे पाण्याची समस्या आहे. तेथे आपल्या बरोबर येवू. व आम्ही मागील आठ महिन्यामध्ये जे काही काम केले आहे ते आपणांस दाखवु. व याने जर पाण्याची समस्या सुटली नाही तर ती सोडविण्यासाठी जे काही

करावे लागेल ते सुध्दा करू. ते सुध्दा आश्वासन आज देत आहे. आपण जी काही सुचना दयाल. त्यावर आम्ही अंमलबजावणी करू.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u> श्री. सोनवणे साहेब, कोणताही सदस्य इथे तुमच्यावर आरोप करण्यासाठी उभा रहत नाही. आरोप करायचे असतील तर मागे याठिकाणी अगोदरच्या आयुक्तांना कशा पध्दतीने वागविले आहे. या पाण्याच्या मुददयावरून ते प्रत्येक सदस्याला जमते परंतु आम्ही तसे वागत नाहीत. तो आमचा मोठेपणा आहे. आम्ही वारंवार हे करत आहे. आणि तुम्हाला सांगतो आहे त्याचा अर्थ तुम्ही आम्हांला आरोपीच्या पिंज-यात उभे केल्या सारखे तुम्ही करायचे? नाही तुम्ही चुकीचे सांगता आणि दिशाभुल करता. अशी भावना नाही. श्री. पाटील साहेबांनी इथे जो मुददा मांडला तुम्ही जर चौकशी केली. तर प्रदुषित पाण्याबाबत, पाणी व्यवस्थित येत नाही. घाण पाणी येते. म्हणुन किती दिवसापुर्वी अर्ज केला होता. त्याचे प्राकलन केव्हा मंजुर झाले. ते केव्हा चालु झाले? आणि आता पुर्ण झाले आहे का? याची चौकशी करा म्हणजे त्यांनी सांगितलेले तुम्हाला पटेल. असे असेल तर मी तुम्हाला तारखा निहाय सांगतो. त्यांनी सांगितलेला दिड वर्षाचा कालावधी तुम्हाला पटेल, तुम्हाला अमान्य होणार नाही. कारण झोपल्याचे सोंग करणा-या माणसाला काही बोलता येत नाही. झोपलेल्या माणसाला जागे करता येते. त्यापध्दतीने प्रदुषित पाण्याची समस्या गेल्या दिड वर्षापासुनच आहे. त्यासाठी अर्ज केलेला दिड वर्ष झाला आहे. सतत पाठपुरावा चालु आहे. आणि तुम्ही फक्त श्री. जवादे व पाणी पुरवठा विभागाच्या अधिका-यांना बोलवता. पण त्यानंतर शेवटी काय? जनतेला परिणाम पाहिजे आहे. यासाठी तुम्ही श्वेतपत्रिका काढली. श्वेतपत्रिकेमुळे पाणी मिळाले नाही. श्वेतपत्रिकेत तुम्ही सांगीतले ३ वर्षापर्यंत समस्या सुटेल. तीन वर्ष कुणी थांबणार नाही. शेवटी परिणाम काय हे महत्त्वाचे आहे. गेल्या दिड वर्षापासुन एक माणुस पाठपुरावा करतो. आणि दिड वर्षात त्याठिकाणच्या लोकांना प्रशासन चांगले पाणी देवू शकत नाही. अशा प्रशासनाचा उपयोग काय? आणि आम्ही काय शिक्षा देणार तुम्हाला? शिक्षा का दयायची, तुम्ही स्वतःच्या मनाने हे करा की, मी याठिकाणी लोकांना चांगल्या सोयी देण्यासाठी प्रशासनाचा प्रमुख आहे. लोकप्रतिनिधी सुध्दा त्यासाठीच आहेत. लोकप्रतिनिधी ज्या सूचना मांडतात त्याच्यावर अंमलबजावणी करणे. हे तुमचे काम आहे. आमच्या समाधानासाठी नाही तर लोकांच्या समाधानासाठी काम झाले पाहिजे. दिड वर्षापासुन काम लांबले आहे अजुनही ते काम झालेले नाही. आठ महिन्यापुर्वी त्याचा प्रस्ताव मंजुर झाला आहे. त्यानंतर ४ महिने तुमच्याकडे निधी उपलब्ध नाही. तुम्ही प्रस्ताव मंजुर केलात, या महापालिकेकडुन निधी मिळत नाही म्हणुन ठेकेदार काम करण्यास तयार नाही. त्यामुळे ४ महिने उशिर झाला आहे. ४ महिन्यानंतर काम सुरू झाले. आता त्याला सहा महिने झाले ती जलवाहिनी जोडलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u> मा. आयुक्त साहेब, मागच्या तीन -चार महिन्या अगोदर आमचा शिवसेनेचा मोर्चा आला होता त्यावेळेस श्री. भडकवाड साहेब होते. तुम्ही नव्हतात. आमचे खासदार साहेब आले होते. त्यावेळेस आश्वासन दिले होते की, पंधरा दिवसामध्ये तुमच्या जवळ जवळ निम्या समस्या आम्ही सोडवु. त्यातल्या किती समस्या तुम्ही सोडविल्या आहेत ते तुम्ही सांगा. तुम्ही सांगता आठ महिन्यापुर्वी काय समस्या होती. व आज काय आहे. ते आम्ही तुम्हाला दाखवुन देतो ना? आज ३ नंबरयेथे आठ महिन्या अगोदर २. १ केजी. पाणी येत होते. आज ०. ६ एमएल. डी. येत आहे. हे आम्ही तुम्हाला वारंवार सांगुन ही तुम्ही म्हणता की, यांना समाधान नाही. असे नाही आहे साहेब, आम्ही तुम्हाला तेथे घेवुन गेलो आहोत तुम्हाला दाखविले आहे. आणि आजही ही सभा संपल्यानंतर तुम्ही माझ्याबरोबर या. संध्याकाळी ७ नंतर पाणी पुरवठा सुरू होतो. चला तुम्हाला दाखवतो. तुमचे श्री. जवादे साहेब येतो येतो म्हणुन बोलतात, गोड बोलतात, मेहनत करतात आम्ही तुम्हाला सतत सांगतो की, तो माणुस मेहनती आहे. पण परिणाम काय? आम्ही लोकांना काय उत्तरे देणार? आम्ही सांगणार

ना की आयुक्त खुप चांगले बोलतात, गोड बोलतात. प्रस्ताव मंजुर करतात पण लोकांना याच्याशी काय देणेघेणे आहे. लोकांना तुम्ही पाणी दया. तुम्ही तर तिथे बोलता की, माझ्याकडे कोणताही प्रस्ताव आल्यानंतर मी त्यास मंजुरी देतो. तुमचे श्री. जवादे काय करतात हे तुम्ही त्यांना विचारत नाहीत. तुम्ही त्यांना विचारता का की तुम्ही काय केले? त्याच्यावर तुम्ही कार्यवाही काय केली त्यांचा परिणाम काय आला? तुम्ही जर इथे बसुन कनिष्ठांवर सोपवित असाल तर ते चुकीचे आहे. आम्ही तुम्हाला दुसरे काही मागत नाही फक्त पाणी दया. बस दुसरे काही नाही. भरत नगर येथील समस्या गेल्या पंधरा दिवसात तुम्ही सोडविणार होतात आज चार महिन्यापासुन रोज चार टॅंकर देत आहात. टॅंकरचा टाईम टेबल कुठे गेला? तुम्ही श्वेतपत्रिकेमध्ये टाईमटेबल दर्शविले होते. कुठे गेले तुमचे टाईम टेबल? कुठे जाते पाणी? तुम्ही सांगितल्यानंतर तुमचे ऐकत नाहीत ते? ४ टॅंकर जातात असे तुम्ही लेखी दिले आहे. जातात का रोज तेथे ४ टॅंकर? ते कोण बघणार. तिथे दुसरे कांबळे बसले आहेत त्यांना काही समजतच नाही. ते बघणे आमचे काम नाही आहे साहेब. आम्ही तुम्हाला सांगणार. आणि आम्ही तुम्हाला सांगतो हे जर तुम्हाला वाईट वाटत असेल की आम्ही तुम्हाला सांगतो तर ते चुकीचे आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी ज्या गोष्टी आमच्या समोर आणल्या आहेत त्याबाबत मला वाईट वाटले नाही. त्यांनी चर्चेस सुरूवात करताना असे म्हंटले की, मी माझी जबाबदारी टाळत आहे. व माझ्या कनिष्ठांवर मी जबाबदारी ढकलत आहे. या गोष्टीचे मला वाईट वाटले. व ऐवढेच नाही. काम केल्यानंतर सुध्दा, आपल्या प्रभागामध्ये पाणी पुरवठा सुरळीतपणे चालु राहण्यासाठी जे काही आम्ही प्रयत्न केले ते आम्हास माहित आहेत आपणांसही माहित आहेत. लोकांना माहित आहेत. यानंतरही मी आज आपणांस आश्वासन देवू इच्छित होतो की, या नंतरही मी आपल्या समोर येणार आहे. जे काम झाले आहे त्याच्यातुन काय परिणाम निष्पन्न झाले याचीही आम्ही शहानिशा करणार आहोत. व ज्याकाही आज तक्रारी आहेत त्या दुर करण्यासाठी जे काही करावे लागेल ते सुध्दा करू. हे सुध्दा आश्वासन दिले आहे. तर मला वाटते की ऐवढयाने आपले समाधान झाले पाहिजे. व श्वेतपत्रिकेबाबत सांगु इच्छितो की, श्वेतपत्रिका प्रसिध्द केल्यानंतर पाणी येईल असे मी कधी म्हंटले नव्हते. पाणी न येण्याची जी कारणे आहेत त्याबाबत आपण चर्चा केली होती. त्यासाठी दिर्घ मुदतीच्या काय योजना हाती घेतल्या पाहिजेत. व अल्प मुदतीच्या काय योजना हाती घेतल्या पाहिजेत हे आम्ही त्यावेळेस सांगितले होते. श्वेतपत्रिका प्रसिध्द करू व दुस-या दिवसापासुन पाणी येईल? असा दावा तर मी तरी केला नव्हता कमीत कमी. टॅंकरचे वेळापत्रक आम्ही केले आहे व त्यावर अंमलबजावणी सुध्दा केली जात आहे. आजही कॅम्प नं. ४ व ५ मध्ये १२ टॅंकर प्रती दिन १० फे-या या हिशोबाने १२० फे-या टॅंकरच्या होत आहेत. जर रोज १२० टॅंकर पाणी पुरविले जात आहे तर ते पाणी कुठे जात आहे? लोकांना पाणी मिळत आहे ते. मला वाटते मा. महापौर महोदया, मी जे सभागृहाला सांगितले त्यानुसार त्यांचे समाधान होईल. व आम्ही त्यांच्या बरोबर असु.

एम.आय.डी.सी ने आम्हाला मौखिक सुचना दिल्या होत्त्या, परवा संध्याकाळी, त्या हिशोबाने आम्ही काल दिवसभर लोकांना याबाबत अवगत केले आहे. कॅम्प नं. १ ,२ ,३ मध्ये लोकांना याबाबत अवगत केले आहे. व फिरत्त्या रिक्क्षाव्दारे याबाबत आम्ही लोकांना अवगत केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:-</u>फिरत्त्या रिक्क्षातुन याबाबत उदघोषणा देण्यात आल्या होत्त्या. लोकांना याबाबत अवगत करण्यात आले होते की उदयापासुन पाणी बंद राहील म्हणुन,

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ताः-माझ्या प्रभागात सुध्दा सांगितले गेले होते.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-कॅम्प नं. १ ,२ ,३ मध्येच पाण्याची समस्या होती. कॅम्प नं. ४ व ५ मध्ये एक छोटासा विभाग आहे. जेथे कॅम्प नं. ३ येथुन पाणीपुरवठा होतो, आनंद नगर बुस्टर येथुन, तेथे जर सांगितले गेले नसेल तर याबाबत मी चौकशी करेन.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-छोटाश्या विभागाला देखिल महत्त्व असते. आपणांस असे का वाटते की त्या छोट्याशा विभागाला अवगत नाही केले पाहिजे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-हे पहा आम्ही तर हे सांगितले नव्हते की, या विभागास अवगत करा व या विभागास अवगत करू नका? जसेही एम.आय.डी.सी. कडुन आम्हाला सूचना प्राप्त झाली. आम्ही त्याचवेळी आमच्या कार्यकारी अभियंत्यास बोलावुन सूचना दिली की पाणी येणार नसल्याने याबाबत लोकांना तसे सूचित करा. व त्या हिशोबाने लोकांना सुचित केले गेले. जर एखादया विभागास सूचित केले नसेल तर त्याबाबत आम्ही दिलगिर आहोत. आम्ही आमची चुक सुध्दा मान्य करतो. जर कुठल्या विभागास अवगत केले नसेल तर......

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-साहेब माझा जो प्रश्न होता की, प्रत्त्येक दहा दिवसानी गेट पडते किंवा वॉलमेन कामावर येत नाही. याबाबत ब-याचवेळा मी तक्रारी केल्या आहेत. सभेमध्ये सुध्दा बोललो आहे. व असे सांगितले जाते की, प्रत्त्येक आठवडयात गेट पडते किंवा वॉल खराब होतो यासाठी आपण काय केले आहे? एक वेळेस एम.आय.डी.सी. कडुन पाणी बंद केले जाते तर एकवेळेस आपणांकडुन पाणी बंद असते.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आपण ज्याकाही तक्रारी केल्या आहेत त्याबाबत माहिती घेईन. व त्यानंतर आपणांस त्याचे उत्तर दिले जाईल. हे जे गेट पडते वगैरे अशा ज्या लहान सहान तक्रारी आहेत त्या माझ्याकडे तर अदयाप आल्या नाहीत परंतु याबाबत मी चौकशी करेन. व जर त्यामध्ये सत्त्यता असेल तर त्यास जो कोणी जबाबदार असेल त्याच्या विरूध्द कार्यवाही करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-नगरसेवक तक्रार करतात, आपण म्हणता सत्त्यता असेल म्हणजे काय? म्हणजे आपण काय समजता नगरसेवक खोटे बोलतात?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव साहेब सर्वात प्रथम मी असे सांगु इच्छितो की, आपल्या आयुक्तांची प्रकृती थोडी नाजुक आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-प्रकृतीचे काही नाही ते जावु दया.

मा. सदस्य श्री. दिलीप लालावानीः-ते सर्व प्रश्नांची शेवटी उत्तरे देतील. आजच्या दिवशी तरी कमीत कमी अशी तडजोड सर्व सदस्यांनी करावी असे मी निवेदन माझ्या सदस्य मित्रांना करतो. कारण की आता आमचे सदस्य मित्र श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले की, पहिले जे आयुक्त होते त्यांच्याबाबत पाणी प्रश्नाबाबत जो प्रकार घडला तसा प्रकार आम्ही आपल्या बाबत केला नाही. तर महापौर

महोदया मी, याकडे आपले लक्ष वेधु इच्छितो आजपर्यंत उल्हासनगर महानगरपालिकेच्या इतिहासात कित्येकवेळा असे घडले की, आयुक्त महोदय महानगरपालिकेच्या मुख्यालयात असुन सुध्दा महासभेत येत नव्हते. म्हणत होते की, माझी प्रकृती ठिक नाही. ते आपल्या दालनामध्ये संध्याकाळ पर्यंत, रात्री उशिरा पर्यंत बसुन रहात असत. परंतु आज श्री. सोनवणे साहेबांची प्रकृती बरोबर नसताना सुध्दा महासभा असल्याने जबाबदारीची जाणीव ठेवुन आपण सभागृहात उपस्थित झालात याबाबत मी सत्ताधारी पक्षाच्या वतीने आपले अभिनंदन करतो. दुसरे असे की येथे उल्लेख करण्यात आला सत्ताधारी व विरोधी पक्ष असा. शहराच्या मुददयाबाबत आम्ही नेहमी एक असतो. व संघर्ष करत असतो. परंतु उल्लेख करण्यामध्ये सत्ताधारी व विरोधी असा उल्लेख केला जातो मला नाही वाटत त्यामध्ये काही चुकीचे आहे. पाण्याचा मुददा निघाला. पाण्याची समस्या आहे. ती सोडविण्यासाठी आपले जे प्रयत्न चालु आहेत. त्या आपल्या कार्यपध्दतीवर आमचा काही संशय नाही. व नगरसेवक निधी व आमदार निधी जास्तीत जास्त पाणी प्रश्नासाठी खर्च करण्याकामी आपण निवेदन केले आहे. यावरून असे सिध्द होते की, आपण शहरातील पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी कटीबध्द आहात. यासाठी या सभागृहात मी आपले अभिनंदन करतो. व त्याचबरोबर आपले लक्ष पुन्हा एका मुदयाकडे वेधु इच्छितो की, आमच्या उल्हासनगर शहराच्या हिश्याचे काही पाणी कल्याणच्या काही क्षेत्रात जात आहे. ही गोष्ट मी यापुर्वीच्या आयुक्तांसमोर मांडली होती. व ती आपल्या समोर सुध्दा मांडत आहे. की कल्याणच्या क्षेत्रामध्ये जे पाणी जाते ते आमच्या उल्हासनगरच्या कोटयामधील आहे. त्याबाबतचे पैसे उल्हासनगर महानगरपालिका खर्च करते. तर ते पाणी कल्याणच्या विभागास देण्याचे थांबविले जावे. कारण की आम्ही स्वत: पाण्यासाठी तहानलेलो आहोत. दुस-यांना आम्ही पाणी कसे देणार? व जे पाणी आजपर्यंत त्यांना पुरविण्यात आले त्याच्या बिलाची वसुली महानगरपालिकेने केली पाहिजे असे निवेदन मी पुन्हा एकदा आपणांस करतो.व पुन्हा एकदा सदस्यांना निवेदन करतो की आज आयुक्तांची प्रकृती नाजुक आहे. म्हणुन त्यांनी शेवटी संक्षिप्तपणे उत्तर दिले तर ते आपण मान्य केले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>साहेब तुम्ही बोलु शकता की नाही? ते तर तुमचे वकील पत्र घेतल्यासारखे बोलत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>याठिकाणी श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की, आपण संक्षिप्तपणे उत्तर दयावे. आणि याठिकाणी मी श्री. दिलीप गायकवाड असे सांगणार आहे की, सन्माननिय पोखरकर साहेब, जेव्हा याठिकाणी आयुक्त म्हणुन होते त्यावेळेस मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी तुमच्या बददल जी भावना व्यक्त केली आहे. त्या भावनेबरोबर तर आम्ही आहोत. त्याबददल काही शंका नाही. पण त्यावेळेस सन्माननिय पोखरकर साहेब आयुक्त असताना त्यांनी सांगितले की, " पाण्याची त्राही, त्राही माजली आहे" येथे पाणी मिळत नाही. अशा आयुक्तांनी येथे एक मिनिट सुध्दा थांबले नाही पाहिजे. त्वरीत उल्हासनगर शहर सोडुन जावयास पाहिजे. तुमची तब्येत थोडीशी नाजुक असेल त्याबददल शंका नाही. पण ज्या लोकांना पिण्याचे पाणी नाही त्यांची तब्येत कशी असेल याबाबत यांना सांगा तुम्ही त्यांच्या घरी जावुन पहा. त्यांची तब्येत काय झाली आहे? ज्यांना पिण्यास पाणी नाही, आमच्या हिंदु धर्माच्या दोन दिवसापासुन सण आहे. श्रावण महिना चालु आहे. त्या महिला हंडा डोक्यावर घेवून एक कि.मी. अंतरावरून पाणी घेवुन येत आहेत. उल्हासनगर १ ,२ ,३ मध्ये दोन दिवसापासुन पाणी नाही. गेल्या अनेक वर्षापासुन उल्हासनगर कॅम्प ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आहे. यांना त्यांचा प्रश्न नाही. नागरिकांना पिण्यास पाणी मिळत नाही त्यांच्या प्रकृतीचे यांना काही देणे घेणे नाही. हे काय आयुक्त श्री. सोनवणे साहेबांची वकीली करण्यासाठी इथे निवडुन आले आहेत. कशासाठी निवडुन आले आहात तुम्ही?

विरोधी पक्षाचे काही सदस्य शेम, शेम अशा घोषणा देत होते.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-ज्या नागरिकांनी तुम्हाला निवडुन दिले आहे. ज्या सदस्यांनी तुम्हाला इथे मानाचे पद दिले आहे. त्यांचा मान सन्मान करून तुम्ही याठिकाणी बोला. तुम्ही आयुक्तांना सांगता बोलु नका. आयुक्तांची तब्वेत बरी नसेल तर तुम्ही त्यांना सांगा की घरी जा.

मा. महापौर:-आमच्या विरोधी पक्षनेता यांच्यासह ब-याचशा सदस्यांनी पाणी प्रश्नाबाबत प्रदिर्घ चर्चा केली आहे. मी सुध्दा असे समजते की पुर्ण उल्हासनगर शहरामध्ये काल पासुन पाणी पुरवठा बंद आहे. तर आमच्या आयुक्त साहेबांनी आपणांस आश्वासन दिले आहे की पाण्याची समस्या दुर करू तेव्हा आपण त्यास सहमत व्हावयास पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी ब-याच वेळा तक्रारी केल्या आहेत. मोर्चा सुध्दा घेवून आले होते. परंतु आजपर्यंत दुर्गा नगर येथे पाणची जलवाहिनी टाकली गेली नाही. तिथे पाण्याचा एकही नळ नाही. ज्यांच्या घरात नळाव्दारे पाणी येत नाही तेथे मोटर लावा असे अधिका-यांनी सांगणे हे कायदयानुसार ठिक आहे का? अधिकारी जेव्हा साईटवर पहाणी करण्यास जातात तेव्हा नागरिक त्यांना सांगतात की नळास पाणी येत नाही त्यावर अधिकारी त्यांना सांगतात की आपण मोटार लावा. हे कायदयानुसार आहे का?

मा. महापौर:-मा. सदस्या श्रीमती. कमला शर्माजी आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, उदया संध्याकाळी पाणी पुरवठा सुरळीतपणे चालु होईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-साहेब तुम्ही बोललात का की उदयापासुन पाणी मिळेल म्हणुन?

मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.
प्रश्न क्र. १५२ हा श्रीमती. संगिता जावळे यांचा आहे.

प्रश्न क्र. १५२ :- माझ्या प्रभाग क्र. १ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, बुध्द विहाराजवळ, चोपडा , उल्हासनगर-३ परिसरातील बंद असलेला जेट पंप कधी चालु करण्यात येणार आहे. त्या जेट पंपावरील इलेक्ट्रीक कनेक्शन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळकडुन परवानगी घेऊन का बसवत नाही. त्याचा (इलेक्ट्रीक कनेक्शनचा) पाठपुरावा का केला जात नाही. पाठपुरावा केला असल्यास त्याचा पुरावा मिळेल का? कोणाकडे?

उत्तर :-१) सदर प्रभागातील जेटपंप आता नविन ठेकेदाराची सर्वात न्युनत्तम दराची देखभाल दुरुस्तीची वार्षिक निविदा मंजूर झाल्यानंतर प्रथम प्राधान्य देऊन दुरुस्त करण्यात येईल. कारण सदर कार्यवाही अंतिम टप्प्यात असून साधारणत: ७-८ दिवसात कामे सुरु होण्याची शक्यता आहे.
२) सदर जेटपंप अलिकडेच बदं पडलेला असून यापूर्वी दुरुस्तीची तक्रार नव्हती.
३) सदर जेटपंप १९८६८८ च्या काळातील विंधन विहिरीवर सन २००० साली बसवून तात्पुरती विद्युत जोडणी करून ठेकेदाराने कार्यान्वीत करून सुरु झालेला आहे.
४) रितसर विद्युत जोडणी व एनर्जी मिटर बसविण्यास दि. ६.३.२००० रोजी अर्ज पुरक कागदपत्रासह विहीत रक्कम उमपाने एम.एस.ई.बी. यॉ भरलेली आहे.
५)क्र. ४ मधील बाबीसाठी या कार्यालयाने दि. ३१.१२.२००१ रोजी एक पत्र पोष्टाने पाठविले असुन परत दि. २३.४.२००२ रोजी एक स्मरणपत्र पाठविले आहे आणि सदर जेटपंप लोकेशनचा ग्राहक क्र. ०२१५१०८४७९५ इ. पाणी पुरवठा विभागात यांत्रिकी शाखेत पाहण्यास उपलब्ध असून पाठपुरावा सुरूच आहे.

मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजा):-ठिक आहे?

मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-चर्चा करायची आहे. मा. महापौर आणि आयुक्त साहेब आता पाण्याच्या मुदयावर खुप चर्चा झाली आहे. तरीही माझा हा जो प्रश्न आहे तो पाण्याविषयीचाच आहे. जेटपंप बाबत. सन २००१ मध्ये मी हा प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर देण्यासाठी कोण संबंधित अधिकारी असेल त्यास मंचावर बोलाविले जावे. संबंधित अधिका-यास उत्तर देण्यासाठी बोलाविले जावे. किती वेळपासुन मी उभी आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-साहेब श्री. जवादे साहेब आले नाहीत. अतिशय दुःखाने म्हणावे लागते की, आज श्री. जवादे साहेब सभागृहात आले नाहीत मी आपणांस लेखी पत्र दिले आहे की, त्यांची तब्येत बरी नाही याची चौकशी करून त्यांना येथुन कार्यमुक्त करून येथील सक्षम अधिका-यास त्यांचा पदभार दिला जावा. त्यांची प्रकृती आजकाल बरोबर नसते. ११-११ वाजेपर्यंत घरीच बसुन असतात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-कॅम्प नं. ४ मध्ये पाण्याची काही समस्या आहे त्याकामी मी त्यांना पाठविले आहे. या प्रश्नाचे उत्तर तर आपणांस देण्यात आले आहे. तरीही आपली काय तक्रार आहे?

मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे:- हा प्रश्न टाकल्यानंतर किती जेटपंपावरील विजजोडण्या अनाधिकृत झाल्या?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-५०० पेक्षा जास्त विंधन विहीरी आहेत. त्यापैकी ४२ विंधन विहिरींवर आपण जेटपंप बसविले आहेत. आणि महानगरपालिकेच्या वतीने जे जेटपंप बसविले आहेत ते सर्व अधिकृत आहेत.

मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-अधिकृत आहेत का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महानगरपालिकेने ज्या विंधन विहिरी खोदल्या आणि त्यांच्यावर जेटपंप बसविले ते अधिकृत आहेत.

मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-आंबेडकर नगर, चोपडा कोर्ट येथील बुध्द विहारा शेजारी उल्हासनगर-३ येथील मी जो प्रश्न टाकला आहे. तेथे एम.एस.ई. बी. वाले का बरे विद्युत जोडणी कापुन जातात? तुम्ही म्हणता ना अधिकृत आहे म्हणुन?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-आयुक्त महोदय, जेटपंपावर विजेचे जे कनेक्शन आहे. ते अधिकृत आहे की अनाधिकृत असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-त्याची मला माहिती घ्यावी लागेल जर ते कनेक्शन अधिकृत नसेल तर ते अधिकृत करून घेण्यासाठी एम.एस.ई.बी. कडे पाठपुरावा केला जाईल.

मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-ठिक आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहा बाहेर गेले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १५३ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. १५३:-श्री. प्रकाश कुकरेजा यांची लिपिक या पदावरून विधी अधिकारी पदावर झालेली बढती श्री. शिवाजीराव बहिराव तत्कालीन प्रशासक उल्हासनगर नगरपालिका यांनी तत्कालिन जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशानुसार रद्द केली असताना कुकरेजा हे विधी अधिकारी पदावर कार्यरत कसे राहिले?

श्री. प्रकाश कुकरेजा यांची विधी अधिकारी पदी झालेली बढती वादग्रस्त असतांना, त्यांची महापालिका सचिव पदावर बढती कशी करण्यात आली?

मा. सुरेश शुळ, तत्कालीन आयुक्त, उल्हासनगर महापालिका यांनी श्री. कुकरेजा यांना सचिव पदावरून अवनत केले असताना ते अजुनही सचिव पदावर कार्यरत कसे राहिले?

उत्तर:-श्री. शिवाजीराव बहिरात, तत्कालीन प्रशासक उल्हासनगर नगरपालिका यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी ठाणे, यांचेकडील दि. १६.३.९३ च्या आदेशानुसार श्री. प्रकाश कुकरेजा यांना विधी अधिकारी या पदावरून दि. २०.३.९३ पासुन पदावनत केल्यामुळे श्री. प्रकाश कुकरेजा, यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. १२४०/ १९९३ अन्वये दाखल करून स्थगन आदेश प्राप्त केला आहे. करिता री. प्रकाश कुकरेजा हे विधी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

श्री. प्रकाश कुकरेजा यांना प्रशासकीय ठराव क्र. ४५ दि. १७.१२.९६ अन्वये कार्यालयीन दिनांक १८/१२/१९९६ च्या आदेशान्वये महापालिका सचिव या पदावर मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अधिन राहून महापालिका सचिव, पदावर पदोन्नतीने नेमणूक केलेली आहे.

तत्कालीन आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी त्यांच्याकडील दिनांक ९/५/१९९८ च्या आदेशाप्रमाणे श्री. कुकरेजा यांनी सचिव पदावरुन पदावनत करण्यात आले होते. त्या आदेशाविरुध्द श्री. कुकरेजा यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. २२९१/१९९८ दाखल केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा. न्यायालयाचे स्थगन आदेश प्राप्त झालेले आहेत. करीता श्री. कुकरेजा प्रकाश हे आजमितीस महापालिका सचिव या पदावर कार्यरत आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः- मा. महापौर महोदया, या प्रश्नावर महासभेत उत्तर देण्यासाठी कायदेशीर मत जे मागायचे आहे, ते कुणाकडे मागायचे? त्याची माहिती कोण देणार आहे? या प्रश्नाचे इतर जे उपप्रश्न आहेत, इतर जी माहिती पाहिजे त्याची उत्तरे कोण देणार? महापौर महोदया, या प्रश्नाच्या माध्यमातून प्रशासनामध्ये जी कार्यपध्दती आहे, ती सभागृहासमोर आणली आहे. येथे कशाप्रकारे कामकाज चालते? त्यावर प्रकाश टाकण्याचा मी प्रयत्न करेन. येथे आमचे जे सचिव साहेब आहेत, जे या अगोदर विधी अधिकारी होते व विधी अधिकारी होण्याअगोदर ते येथे लिपिकाचे काम करत होते. जेव्हा १९९३-९४ मध्ये त्यांची पदोन्नती झाली, तर ही जी पदोन्नती आहे ती पदोन्नती राजकिय ठरावाने झाली होती. तो जो ठराव आहे तो तत्कालीन जिल्हाधिका-यांनी रद्द केला होता. व रद्द केल्यानंतर त्या आदेशास या अधिका-याने त्यास न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयात आव्हान दिल्यानंतर त्या आदेशाच्या अंमलबजावणीवर स्थगिती आदेश आहे. व ते आपल्या पदावर काम करत होते. परंतु त्यानंतर यांचे प्रकरण कोर्टात न्याय प्रविष्ठ असताना सुध्दा त्यावर कोणताही अंतिम निर्णय झालेला नसताना सुध्दा त्यानंतर जो प्रशासकीय कालावधी आला त्या कालावधीत सबजेक्ट टु दी डिसीजन ऑफ हाय कोर्ट. पहिले प्रकरण न्यायालयात न्याय प्रविष्ठ होते. वादग्रस्त होते. त्यावर निर्णय व्हायचा होता. त्यानंतरही प्रशासक साहेबांनी त्यांना सचिव पदावर पदोन्नती दिली. पदोन्नती देताना कार्यालयीन आदेशामध्ये असे नमुद केले की, अंतिम जो निर्णय होईल तो उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार होईल त्यानंतर जेव्हा श्री. शुळ साहेबांकडे येथील आयुक्त पदाचा पदभार होता. तेव्हा त्यांनी त्यांना सचिव पदावरून पदावनत केले. त्यांनी आदेश काढला त्या आदेशाच्या विरूध्द सुध्दा हे न्यायालयात गेले.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-महापौरजी, यावर माझा एक हरकतीचा मुददा आहे. जसे की आमच्या सचिव साहेबांबाबत प्रकरण न्यायालयात चालु आहे. त्यावर या सभेत चर्चा होवू शकत नाही. हे जे बोलत आहेत ते पुर्णपणे सभागृहाची दिशाभुल करत आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, श्री. नारायण पंजाबी साहेबांना अदयाप पर्यंत विधी अधिकारी म्हणुन नियुक्त केलेले नाही. जेवढी माझी माहिती आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-महापौर महोदया, हरकतीच्या मुददयावर मला बोलु दिले जावे. जेव्हा प्रकरण कोर्टात आहे तर या मुददयावर येथे चर्चा केली जावु नये. व राहिला प्रश्न श्री. प्रकाश कुकरेजा यांचे सचिव पदाबाबतचा, तर ते एक सक्षम अधिकारी आहेत. व चांगले काम करत आहेत. त्यांच्या कामामध्ये कुठलीही कमतरता नसते. अशा प्रकारे चांगल्या प्रकारे काम करणा-या श्री. प्रकाश कुकरेजा यांच्याबाबत कोणत्त्याही प्रकारची अशी चर्चा करता कामा नये. व हे जे प्रकरण न्यायालयात आहे त्यावर महासभेत कोणत्त्याही प्रकारची चर्चा केली जावु नये. असे माझे निवेदन आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, जेव्हा कोणताही सदस्य महासभेमध्ये प्रश्न विचारतो तेव्हा आम्हाला जी प्रश्नोत्तरे प्रस्तुत केली जातात त्यामध्ये एक रकाना आहे.

मा. महापौर:-न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याने सभागृहात त्यावर चर्चा.....

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-एक मिनिट, माझे म्हणणे ऐकुन घ्या...

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-महापौर महोदयांनी म्हंटले, आता पुरे झाले.

मा. सदस्य श्री. मोहन रामरख्यानी सभागृहा बाहेर गेले.

मा. महापौर:-प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना त्यावर सभागृहात चर्चा केली जावु नये.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-एक मिनिट माझे ऐकुन घ्या. त्यांनतर जो काही निर्णय दयाल तो आम्हास मंजुर असेल. एक मिनिट आपण माझे बोलणे ऐकुन घ्या.

मा. महापौर:-हे न्यायालयीन प्रकरण आहे ते आपण इथे आणु नका.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-मी दुस-या विषयावर बोलत आहे. प्रश्नाशी संबंधित आहे कोणताही सदस्य या सभागृहात जेव्हा प्रश्न विचारतो, त्यास उत्तर दिले जाते. तर त्याचे रकाने आहेत. प्रश्न क्र., प्रश्न कोणता आहे? व त्यानंतर आहे प्रश्न विचारणा-यांचे नाव. प्रश्नाला मान्यता मिळाली आहे काय? प्रश्नाला जर मान्यता मिळाली असेल तरच त्या प्रश्नाचे उत्तर दिले जाते. जेव्हा प्रश्नाला मान्यता दिली आहे तेव्हाच प्रश्नाचे उत्तर दिले आहे. तर हे प्रकरण न्याय प्रविष्ठ होते. तर....

मा. महापौर:-या प्रश्नावर चर्चा करूच नये.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, यापुर्वी माझा एक प्रश्न प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे नाकारला गेला होता. तर हे प्रकरण न्याय

प्रविष्ठ आहे त्यामुळे आपणांस परवानगी दिली जावु शकत नाही. तर या प्रकरणी असे का केले?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>हरकतीचा मुददा आहे. मा. महापौर जो निर्णय देत आहे. तो मान्य केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, आपला अंतिम निर्णय काय आहे? कोणताही अधिकारी, कर्मचारी न्यायालयानंतर, न्यायालयानंतर, न्यायालयानंतर असे करत राहील.....

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>तर न्यायालय कशासाठी आहे?

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>प्रकरण न्यायालयात असल्यामुळे त्यावर येथे चर्चा व्हावयास नको हा मुददा इथेच संपला पाहिजे. कारण की, महापौर महोदया, जेव्हा सभागृहात अंतिम निर्णय देतात. व त्यानंतर त्यावर चर्चा केली जावु नये. ही सभागृहाची प्रतिष्ठा आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रश्नाला मान्यता कोण देते? प्रश्नाला मान्यता कुणी दिली आहे?

<u>मा. उपमहापौरः-</u>मा. महापौरांच्या आदेशाचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मी महापौरांच्या आदेशाचा आदर करूनच उभा आहे. त्यांनी माझ्या प्रश्नास मान्यता दिलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आणि आता महापौरांनी निर्णय दिला आहे की, त्यावर चर्चा होता कामा नये.

<u>मा. उपमहापौरः-</u>श्री. असरोंडकरजी, आपणांस बसण्यास सांगितले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदयांनी या प्रश्नाला मान्यता दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>त्यावेळेस त्यांना हे प्रकरण न्यायालयात असल्याचे माहित नव्हते. आता हरकतीचा मुददा आल्यानंतर त्यांना माहित पडले की, हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>महापौर बोलत असताना आपण मध्ये बोलले नाही पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>महापौरांनी सांगुन सुध्दा तुम्ही ऐकत नाहीत म्हणुन मध्ये मध्ये बोलावे लागते.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>त्यानंतर उपमहापौर महोदया समजावत असताना त्यांनी मध्ये बोलावयास नको होते.

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेब उत्तर देत आहेत कृपया ऐकुन घ्या.

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आपण प्रश्नास मंजुरी देता. व चर्चा करू देत नाहीत.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>आपल्या जिददीमुळे त्यांनी तसे म्हंटले ना.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>येथे जिददीची काय गोष्ट आहे.*

*मा. उपमहापौरांच्या बोलण्यावर आक्षेप घेवून मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे व विरोधी पक्षीय काही सन्माननिय सदस्य जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजत नव्हते.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>मी मा. महापौरांची परवानगी घेवून आपल्याशी बोलत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>महापौरांनी सांगितले आहे हे प्रकरण न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे त्यावर येथे चर्चा होता कामा नये.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>कृपया सभागृहात शांतता राखा.*

*<u>मा. महापौरः-</u>मी निर्देश देते तरीही आपण बोलतच राहता.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>आपण काय बोललात ते त्यांनी ऐकले नाही.*

*<u>मा. महापौरः-</u>कसे ऐकणार? एकाच वेळेस दोन-दोन चार-चार सदस्य उभे राहुन बोलु लागले तर कसे कुणाला ऐकु येणार?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदयया, या प्रश्नाबाबत सभागृहात जे काही झाले मला वाटते त्यासाठी प्रशासन जबाबदार आहे. त्याचे कारण हे आहे की, आम्ही सभेच्या कामकाजाचे जे नियम तयार केले आहेत. त्या नियमांमध्ये स्पष्टपणे तरतुद आहे की, जो प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे भारताच्या प्रदेशातील कोणत्त्याही भागातील कोणत्त्याही न्यायालयात किंवा कोणत्त्याही न्यायाधिकारणापुढे प्रलंबित असलेला कोणताही वाद किंवा कारवाई या संबंधी किंवा त्यांच्याशी संबधीत असेल कोणताही प्रश्न विचारता कामा नये. जर कोर्टात कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे. किंवा कोणतेही प्रोसेडिंग प्रलंबित आहे तर त्याबाबत प्रश्न विचारला जावू शकत नाही. हा प्रश्न जर विचारलाही गेला आहे, तर तो स्विकारावयास नको होता. तो स्विकृत झाल्यामुळे प्रशासनाने त्याचे उत्तर दिले आहे. उत्तर देणे हे सुध्दा प्रशासनावर बंधनकारक नाही. तर जे पण उत्तर दिले आहे ते मी मागे घेतो, व जो पर्यंत या प्रकरणी कोर्टाचा निर्णय होत नाही तोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर दिले जाणार नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u> एवढेच उत्तर दयायचे होते तर त्यासाठी यांची मदत कशाला घ्यायची?*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवाणीः-</u> शासन व प्रशासन हे एकच नाण्याच्या दोन बाजू असतात. शासन व प्रशासन जेव्हा एकाच गोष्टीशी सहमत होतात.*

*यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर-जोरात बोलत होते, त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे ते समजून येत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, आमचे बंधू श्री. बोडारे साहेबांनी जे म्हटले की, पाणी प्रश्नाबाबत सत्त्ताधारी व विरोधी पक्षीय, आम्ही सर्वजण एकत्र आहोत. आमची समस्या ती तुमची समस्या, तुमची समस्या ती आमची समस्या, आम्ही सुध्दा आपल्याबरोबर आहोत. आता आयुक्त साहेबांनी जो*

मुददा सांगितला मला वाटते तो स्पष्ट झाला आहे. यास्तव पूढील प्रश्न घेतला जावा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मी अशी सूचना करु इच्छितो की, प्रत्येक सभेत सांगतात की प्रशासनाची चूक आहे. हे जे उत्तर दिले गेले ते चुकीचे दिले गेले आहे. यास्तव माझी आपणांस सूचना आहे, आपला जो कर्मचारी वर्ग आहे त्यास प्रशिक्षण दिले जावे की, महासभेत कशाप्रकारे उत्तर दिले पाहिजे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, या प्रश्नाचे उत्तर मी येण्याअगोदर दिले आहे. आपण त्यावरील स्वाक्षरी पहा. ती आयुक्तांची स्वाक्षरी आहे. मी त्यावर अधिक भाष्य करु इच्छित नाही. मी एवढेच सांगू इच्छितो, प्रश्नाचे उत्तर देणे हे आमचे काम आहे ते आम्ही करु. आपण त्यावर उपप्रश्न विचारु शकता. ज्यांनी प्रश्न विचारला आहे त्याला उत्तर देण्याचा आपण प्रयत्न करु नका. उत्तर देण्यास प्रशासन सक्षम आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर-जोरात बोलत होते, त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे ते समजून येत नव्हते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १५४ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १५४:-</u> अनाधिकृत बांधकाम जमिनदोस्त करण्यासंबधी विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक उत्तरे देणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये प्र.क्र. १ मधील हॅपी होम बंगला व शिवकृपा अपार्टमेंट इमारती दरम्यान श्रीमती शारदा नथू सोनवणे महिलेचे तळमजला अधिक अनाधिकृत एंगल (लोखंडी) बांधकाम करण्यात आले आहे. तळमजल्यावर करण्यात आलेले लोखंडी एंगल बांधकाम अत्त्यंत धोकादायक आहे त्या अतिक्रमणापासून एक फुट अंतरावर हायटेंशन वायर असल्याने त्यामुळे कोणत्त्याही क्षणी अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अतिक्रमणाबाबत तत्त्कालीन मा. उप-आयुक्त श्री. पानपटटे साहेब यांचे लक्षवेधून ही राजकीय दबावाला बळी पडून व त्यांच्याशी संगनमत करुन सतत दूर्लक्ष केले आहे. त्यानंतर सदर अतिक्रमण जमिनदोस्त करण्याबाबत संबंधित विभागाने नोटिस काढली होती. (नोटिस क्र. २/२०००)

१) श्रीमती शारदा नथु सोनवणे यांच्या अनाधिकृत बांधकाम जमिनदोस्त करण्यास महापालिकेच्या संबंधित विभागाने नोटिस काढुन ही आजतागायत कारवाई का करण्यात आली नाही? नोटिस काढली असल्यास त्या अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यास विलंब का झाला?

<u>उत्तर :-</u> संबंधित अनाधिकृत बांधकाम करणा-या चेंबर जा.क्र. उमपा/अ.बां.वि. /१०/०२ , दिनांक २१/६/२००२ अन्वये मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २६० अन्वये नोटिस बजावनेनंतर तत्त्कालीन उप-आयुक्त यांचे समोर टेरेसवर टाकण्यात आलेले पत्राशेड श्री. सोनवणे यांनी स्वतःहून काढून घेतो असे कबूल केले त्याप्रमाणे त्यांनी पत्राशेड वरील टाकलेले पत्र अर्धवट स्थितीत काढून टाकले होते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> सन्माननिय महापौरजी, उप-महापौर व आयुक्त साहेब, आता जागेवर सद्यस्थिती काय आहे?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u> सन्माननिय महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव व सन्माननिय सदन, या प्रश्न क्रमांक १५४ चे जे उत्तर दिले

गेले आहे, दिनांक १३/११/२००२ रोजी पत्राची शेड तोडण्यात आली होती. सद्या तेथे तीच स्थिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> त्यांनी फुटपाथ सुध्दा काबिज केला आहे. ते आपण पाहिले का? आज तेथे जी परिस्थिती आहे तेथे फुटपाथ वर मुर्त्या ठेवल्या आहेत. व लोकांना येण्याजाण्यास त्रास होत आहे. आपण काय कारवाई केली त्यावर? आपण जी पऱ्याची शेड म्हणत आहात त्यावर आताही पत्रे आहेत.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u> जो प्रश्न आला होता, तो असा होता की, पूर्वीच्या बांधकामावर लोखंडी एंगल लावून जे पत्रे टाकले होते त्यावर कारवाई करण्यासाठी प्रश्न आला होता. त्यावर कारवाई केलेली आहे. आजच्या तारखेला सुध्दा तीच स्थिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> पत्रे तेथे लावलेले आहेत. व पूढे रस्त्यावर मुर्त्या ठेवल्या आहेत. त्यामुळे लोकांना येण्या-जाण्यास त्रास होत आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u> तेथे जे एंगल लावले होते, त्यावरील पत्रे................

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> आजसुध्दा तसेच आहेत पाहिजे तर मी आपणांस दाखवून देतो.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u> ते १३/११/२००२ रोजी काढण्यात आले आहेत. व आजच्या तारखेला सुध्दा तीच स्थिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेदसिंह भुल्लरः-</u> येथे आपण लिहिले आहे श्री. सोनावणे , श्री. सोनवणे म्हणजे कोण? आयुक्त साहेब का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u>हा प्रश्न जेव्हा आला होता त्यावेळेस सोनवणे साहेब आयुक्त म्हणून नव्हते. उत्तरामध्ये चूकीने श्रीमतीच्या ऐवजी श्री. लिहिले गेले आहे. तो लेखन दोष आहे. तेथे श्रीमती सोनावणे असे पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> श्रीमतीच्या ठिकाणी श्री. असे कसे?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u> तो लेखन दोष आहे. श्रीमतीच्या ठिकाणी श्री. लिहिले गेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> व आता त्यांनी जो फुटपाथ काबिज केला आहे त्यावर काय कारवाई करणार? आज तेथे काय परिस्थती आहे?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त, अ.बां.वि.):-</u>कालच मी त्या जागेची पाहणी केली आहे, शेडवर एंगल टाकून जे पत्रे टाकले होते, ते १३/११/२००२ रोजी काढले होते. व आज पण त्याच स्थितीत ते बांधकाम आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> म्हणजेच त्यांनी पूढे काहीच शेड वाढविली नाही?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १५५ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १५५:-</u> श्रीमती शारदा नथु सोनवणे यांच्या अनाधिकृत बांधकामासंबंधी एम.टी. आर.पी. कायदान्वये कारवाई झाली पाहिजे का नाही? कार्यवाही होत

असल्यास त्यांच्यावर एम.टी.आर.पी. कायदान्वये कारवाई का करण्यात आली नाही?

उत्तर :- सबब, दिनांक १३/११/२००२ रोजी उर्वरीत राहिलेले पत्रे काढुन टाकल्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १५६ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

प्रश्न क्र. १५६:- उल्हासनगर महानगरपालिकेचे पॅनल १ चे नगरसेवक श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या पत्नीच्या नावे चरंजित कौर व नातेवाईक यांनी त्यांच्या

ममता अपार्टमेंट हया बिल्डींगच्या टेरेसवर अनाधिकृत पत्राचे मोठे शेड बनविलेले आहेत ते अदयापकाळ तोडण्यात आलेले नाही व ते का तोडले जात नाही? न तोडण्यामागे कोणाचा हात आहे? ते त्वरीत तोडण्यात यावे यासाठी येत्या महासभेत मी प्रश्न टाकीत आहे. तरी तात्काळ येत्या महासभेत कृपया करुन तो प्रश्न घेण्यात यावा ही विनंती.

उत्तर :- दिनांक २०/५/२००२ रोजीच्या महासभेमध्ये तसेच दिनांक २०/११/२००० रोजीच्या झालेल्या महासभांमध्ये जूलै, ९९ पूर्वी झालेली अनाधिकृत बांधकामे पाडु नयेत अशी महासभेने चर्चा केलेली होती. तसेच याबाबत मा. महापौर यांनीही अशाप्रकारे भुमीका घेतलेली होती. तसेच अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत दिनांक १९/१०/२००२ रोजीच्या महासभेमध्ये ठरावान्वये शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून निर्णय झालेला आहे. यासर्व बाबीं लक्षात घेता व प्रश्नांतील बांधकाम हे जुलै, ९९ पूर्वीचे असल्याने ते निष्कासीत करणे बाबत प्राथम्य देण्यात आलेले नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-उत्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १५७ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. १५७:- महापालिकेच्या वर्ष १९९९ अखेरीस एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्प्या अंतर्गत ३३ रस्त्यांच्या प्रस्तावित एम.एम.आर.डी.ए. च्या कर्ज उभारणीतून करावयाच्या रस्त्यापैकी रस्ता क्र २ व ३ संबंधित विचारलेलया खाली प्रश्नांची उत्तरे योग्य व सुचक देवून महासभेत खुलासा करण्यात यावा.
१) रस्ता क्र. ३ च्या पंचवटी स्टील फर्निचर दुकानापासून कल्याण-अंबरनाथ चौक ते राजीवगांधी चौक, शांतीनगर ब्रीज पर्यंत नगररचना विभागाने विकास आराखडया नकाशाप्रमाणे रस्त्याच्या एका बाजूने काही इमारती व घरे बाधित होत आहेत त्या रस्त्यालगत कोणाची घरे व इमारतीबाधित (रस्ता रुंदीकरणात जात आहेत) होत आहे? त्या रस्ता रुंदीकरणात जाणा-या व इमारती व घरे कोणाच्या मालकीच्या आहेत व त्या घरे व इमारतींची संख्या किती? तसेच त्या रस्त्यांवरील घरे व इमारतीचे किती फुट रस्ता रुंदीकरणात जाणार आहे? रस्ता रुंदीकरणात जाणा-या नागरीकांच्या पुर्नवसनासाठी महापालिकेकडे पर्यायी जागा उपलब्ध आहे का?

उत्तर :- नगररचनाकार यांनी उक्त रस्त्याच्या प्लॉन टेबल सर्वे नकाशा नुसार दिलेल्या मार्किंगप्रमाणे कोणाचे किती इमारतीची जागा बाधीत होते. त्या मोजमाप घेवून यादी तयार करण्यात आली आहे. या रस्त्यामध्ये एकंदर २५ घरे बाधित

होतात, क्षेत्रफळाची मापे व कोणाची किती घरे आहेत ही माहिती लांबलचक व मोठी असल्याने नमुद केलेली नाही सदरची सविस्तर माहिती सार्वजनिक बांधकाम खात्त्याकडे पाहणीसाठी उपलब्ध आहे.

पुर्नर्वसनासाठी रस्त्यात बाधीत होणा-या नागरीकांची पर्यायी व्यवस्था करण्यासाठी अथवा त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी महानगरपालिकेच्या हददीत स्वत:च्या मालकीची जागा नाही. त्यामुळे रहिवास वापराखालील अथवा वाणिज्य वापराखालील रहिवासी धारकांना बाधीत झालेल्या / होणा-या नागरीकांची पर्यायी व्यवस्था करणे शक्य नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-उत्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- पुढचा प्रश्न सुध्दा आपलाच आहे. प्रश्न क्र. १५८ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. १५८:- रस्ता क्र. २ च्या जुन्या विकास आराखडयानुसार कांतीनगर मार्गे डॉल्फीन क्लब मागुन गौतमनगर, करोतिया नगर, प्रबुध्दनगर ते कल्याण अंबरनाथ रस्त्याकडे जाणा-या मार्गात कोणाची घरे व इमारती बाधित (रस्ता रुंदीकरणात जात आहेत)होत आहे त्या रस्ता रुंदीकरणात जाणा-या घरे व इमारती कोणाच्या मालकीच्या आहेत व त्या घरे व इमारतीची संख्या किती तसेच त्या रस्त्यांवरील घरे व इमारतींचे किती फुट रस्ता रुंदीकरणात अर्धे व पूर्ण तुटणार आहेत? रस्ता रुंदीकरणात जाणा-या नागरीकांच्या पूर्नवर्सनासाठी महापालिकेकडे पर्यायी जागा उपलब्ध आहे का?

उत्तर :- अ) प्रारुप नविन विकास आराखडयाप्रमाणे रस्ता हाती घ्यावयाच्या आहे किंवा कसे याबाबत अदयाप निर्णय आलेला नाही करीता नविन विकास आराखडयातील रस्त्याच्या आखणी प्रमाणे माहिती अदयाप संकलित केलेली नाही. ब)प्रारुप नविन विकास आराखडयाप्रमाणे रस्ता करण्याच्या निर्णय घेण्याचे वेळी पूर्नवर्सनासाठी पर्यायी जागा पाहिली जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-पंचवटी स्टील येथील रस्ता जरा तुम्ही जावुन बघा. तो रस्ता कुठे घेतला सभा सुचनेवर? अजुन सभा सूचनेवर आला नाही. तुम्ही आम्हाला xxx बनवता.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-सभागृहात कशा प्रकारे भाषा वापरली जात आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-असंसदीय भाषा आहे. इतिवृत्तांतातुन तो शब्द वगळला पाहिजे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १५९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तर याची इतिवृत्तात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र१५९:-रस्ता क्र. ३ च्या नविन विकास आराखडयानुसार क्रांतीनगर मार्के डॉल्फिन क्लबकडुन गौतमनगर, करोतिया नगर, प्रबुध्दनगर ते कल्याण अंबरनाथ रस्त्याकडे जाणा-या मार्गात कोणाची घरे व इमारती बाधित (रस्ता रुंदीकरणात जात आहेत) होत आहे त्या रस्ता रुंदीकरणात जाणा-या घरे व इमारती कोणाच्या मालकीच्या आहेत व त्या घरे व इमारतीची संख्या किती तसेच त्या रस्त्यांवरील घरे व इमारतींचे किती फुट रस्ता रुंदीकरणात जाणार आहे?

किती घरे व इमारतींचे रस्ता रुंदीकरणात अर्धे व पुर्ण तुटणार आहेत? रस्ता रुंदीकरणात जाणा-या नागरीकांच्या पुनर्वसनासाठी महापालिकेकडे पर्यायी जागा उपलब्ध आहे का?

उत्तर:-अ) प्रारुप नविन विकास आराखडयाप्रमाणे रस्ता हाती घ्यावयाचा आहे किंवा कसे याबाबत अदयाप निर्णय आलेला नाही. करीता नविन विकास आराखडयातील रस्त्याच्या आखणीप्रमाणे माहिती अदयाप संकलित केलेली नाही.

ब) प्रारुप नविन विकास आराखडयाप्रमाणे रस्ता करण्याचा निर्णय घेण्याचे वेळी पुनर्वसनासाठी पर्यायी जागा पाहिली जाईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १६० हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तर याची इतिवृत्तात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. १६०:- सन २००२ में टोटल कितने प्लान पास हुए है । उसमें से कितने प्लान पास बिल्डींगो ने कम्पालिशन सर्टीफिकेट लिया है । तथा कितनों ने अवैद्य निर्माण किया है । उनपर क्या कार्यवाही हुई? उनकी प्लान के साथ पुरी जानकारी महासभा को दी जाए ।

उत्तर :- १) सन २००२ मध्ये मंजूर केलेल्या नकाशांची संख्या-- १५९
२) सद्या चालु असलेली कामे (पायाचा दाखला दिलेले)-७८
३) सन २००२ मध्ये जे नकाशे मंजुर केलेले आहेत त्यापैकी ७८ इमारतीचे काम सुरु असून त्यांचे काम पूर्ण संपलेले नाहीत. तरी सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर व बांधकाम पुर्णतेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्या इमारतीची तपासणी करुन पुढील कार्यवाही करता येते. एकूण २८ इमारतींना बांधकाम पुर्णतेचा दाखला दिलेला आहे.
४) १८ इमारतीमध्ये अनाधिकृत बांधकाम असल्याचे आढळले.
५) महाराष्ट्र प्रोदशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ च्या नोटिसा बजाविलेल्या आहेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १६१ हा श्री.जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

प्रश्न क्र. १६१:- बॅरेक नं. ६४, रुम नं. १५ में बन रहे अवैद्य निर्माण पर एफ. एस.आय.की कितनी चोरी है, तथा उसका जवाबदार कौन है? बीट मुकादम जुनियर इंजिनियर या फिर उप-आयुक्त तथा उनपर बाप क्या कार्यवाही करेंगे।

उत्तर :- बॅरेक नं. ६४ रुम नं. १५ मध्ये मंजुर बांधकाम नकाशा व्यतिरिक्त एकणू ७९-१२ चौ.मी. चे जादा बांधकाम केल्याचे आढळून धरले आहे.
संबंधित विकास कर्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचनाकार अधिनियम १९६६ अन्वये दिनांक ४/१२/२००२ रोजी नोटिस देण्यात आलेले आहे. नोटिसची मुदत संपल्यानंतर निष्कासन न केले गेल्यास संबंधितांवर जबाबदारी कायम करणेत येईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:- ठिक आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १६२ हा श्री. यादव लालबिहारी यांचा आहे.

प्रश्न क्र. १६२:- क्या नगररचना विभाग गगनचुंबी इमारत (हाय राईस बिल्डींग) का प्लान पास करने से पहले फायर हाटंट (फायर हायड्रंट सिस्टम) को ध्यान

में रख कर प्लान पास किया जाता है क्या और यह कितने मंजीली इमारत में लागु जाती है?

<u>उत्तर :-</u> ज्या इमारतीची उंची १५.०० मीटर पेक्षा जास्त प्रस्तावित केली जाते अशा इमारतीचे नकाशे मंजुर करण्णपूर्वी इमारतीच्या नकाशांची छाननी केली जाते. छाननी करतांना फायर फायटींगची योजना केल्यानंतरच इमारतीच्या नकाशास मंजुरी प्रदान करण्यात येते.

<u>मा. सदस्य श्री. यादव लालबिहारीः-</u> ठिक आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १६३ हा श्री. यादव लालबिहारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १६३:-</u> फायर हायड्रेंट (फायर हेड्रंटट सिस्टम) का जॉच करने के बाद ही इमारतों को कंम्पलीशन सर्टीफिकेट दिया जाता है क्या?

<u>उत्तर :-</u> बांधकाम पूर्णतेचा दाखला देतांना फायर फायटींगची योजना केलेली असल्याची तपासणी करुनच दाखला देण्यांत येतो.

<u>मा. सदस्य श्री. यादव लालबिहारीः-</u> ठिक आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १६४ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १६४:-</u>शहरामध्ये कर न भरणारे व १९८७ पासून आजपर्यंत त्याचा टॅक्स १ लाख व अधिक आहे. त्याची अधिकृत यादी आपणाकडे आहे का? असल्यास विस्तृत माहिती दयावी. त्यावर आपणाकडून काय कारवाई झाली?

<u>उत्तर :-</u> अ) होय.
ब) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १,३९,३३१ मालमत्ता आहेत. त्यापैकी ज्या मिळकत धारकांकडे मालमत्ता कर एक लाख किंवा त्यापेक्षा अधिक थकबाकी असलेले मिळकत धारक ७८ आहेत.
क) थकबाकीवर मालमत्ता धारकांच्या मालमत्ता जप्त करुन त्यांच्या लिलावाची कार्यवाही सुरु करण्यांत आलेली आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १६५ हा श्रीप्रमोद टाले यांचा आहे. सध्या ते सभागृहात अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १६५:-</u>उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे ॲडव्हंरटायझिंगचे ठेकेदार कोण आहे? शहरामध्ये किती होर्डिंग अधिकृत आहे? सन २०००-२००१ व २००२ पर्यंत किती टॅक्स व कशा पध्दतीत भरला आहे?

<u>उत्तर :-</u> अ) उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे कॅम्प न. १,२,३ साठी मे. क्रिटिझा ॲडव्हरटायझिंग एजन्सी, उल्हासनगर व कॅम्प नं. ४, ५ साठी मे. ब्लॉझो ॲडव्हरटायझिंग एजन्सी उल्हासनगर हे ठेकेदार आहेत.
ब) शहरामध्ये एकूण ४२ + ९ = ५१ होर्डिंग लावलेले आहेत.
क) ठेकेदारांपैकी कॅम्प नं. १,२,३ यांनी मार्च २००२ पासून टॅक्स येणे आहे. कॅम्प नं. ४,५ या ठेकेदाराने ३०/६/२००१ पर्यंत टॅक्स चेकने भरला आहे.
संबंधितांविरुध्द करार शर्ती नुसार कार्यवाही सुरु आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १६६ हा श्री.रमेश चव्हाण यांचा आहे.

प्रश्न क्र. १६६:- उल्हासनगर शहरातील काही इमारतींवर ऐअरटेल, बीपीएल,एटीएनटी यांचे टॉवर उभारण्यात आलेले आहेत काय? व असल्यास त्या उभारणी साठीची परवानगी देण्यात आलेली आहे का? व अशा अनाधिकृतपणे उभारलेल्या टॉवरच्या कंपन्यांवर कोणती कारवाई महापालिकेने केलेली आहे का? या विषयांवर येत्या महासभेत चर्चा घडवून आणावी ही विनंती.

उत्तर :- १) उल्हासनगर शहरात बांधकाम पुर्णतेचा दाखला न घेतलेल्या इमारतींवर एअरटेल,बीपीएल, एटीएनटी यांचे टॉवर उभारण्यात आलेले आहेत.
२) त्या उभारणीसाठी नगररचना विभागामार्फत कोणत्त्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.
३) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असलेले टॉवर अनधिकृत इमारतींवर असल्याने अशांना परवानगी नाकारण्यात आली आहे. अनाधिकृत इमारतींवरील टॉवर धोकादायक आहेत. किंवा कसे त्याबददल शहर अभियंता यांचेकडून तपासणी करुन अभिप्राय देण्याचे आदेश दिले आहेत.
तसेच अधिकृत व अनाधिकृत इमारतींवर बिना-परवाना टॉवर उभारल्याबददल संबंधित कंपन्यांना अनधिकृत बांधकामाबददल उप-आयुक्त (अनाधिकृत बांधकाम) यांनी नोटिस काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-साहेब मी हा प्रश्न २००२ मध्ये विचारला आहे. आतापर्यंत त्यावर काय कारवाई केली ते सांगा? त्याच्यावर टॅक्स आकारण्यात यावा. इमारतीवर एअरटेल, बी.पी.एल., ए.टी.एन.टी यांचे जे टॉवर्स आहेत. ते पेलण्याची इमारतीची क्षमता आहे का? तसे प्रमाणपत्र तुमच्याकडे आहे का? या प्रश्नाचे उत्तर कोण देणार साहेब. उत्तर दया.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोबाईल कंपन्या जेवढया काही आहेत त्यांनी जे टॉवर्स उभारले आहेत ते बिना परवानगी आहेत. त्यांनी महानगरपालिकेकडुन त्याबाबत परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे ते टॉवर्स काढुन टाकण्याचे आदेश तत्त्कालिन आयुक्तांनी दिले होते व त्याचबरोबर ती बांधकामे जर अनाधिकृत असतील तरीही त्यांच्याकडुन मिळकत कर आकारण्याचा आदेश दिला होता. बांधकाम अनाधिकृत असले तरी मिळकत कर आकारला जावु शकतो परंतु हे जे अनाधिकृतपणे टॉवर्स उभारले आहेत. त्यावर अदयापपर्यंत काहीही कारवाई केली नाही.परंतु त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करावी लागेल. आज जितक्या पण इमारती आहेत, टॉवर्स उभारले आहेत. त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यासाठी आम्ही विधी विभागाकडुन अभिप्राय घेवून कारवाई करू.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मी २००१ पासुन पत्रव्यवहार करतो आहे. आम्ही सलगपणे पाठपुरावा करत आहोत. २००२ मध्ये मी हा प्रश्न विचारला आहे. २००१ पासुन आज २००३ आहे या दोन वर्षामध्ये किंवा आज उदया कधीही, भविष्यात, या आठ-दहा दिवसात, आठ-दहा महिन्यामध्ये ती इमारत जर पडली तर त्याची जबाबदारी कुणाची आहे? ती इमारत धोकादायक झाली आहे किंवा नाही त्याचे प्रमाणपत्र .......... आज सात-सात माळयाच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत त्याच्यावर ५० ते ६० फुटाचे कुठे कुठे १०० फुट उंचीचे टॉवर्स उभे आहेत. ती इमारत पुर्ण पणे धोकादायक झाली आहे. त्या इमारतीमध्ये आज शेकडो लोक राहातात. त्यांच्या जिवित्त्वास धोका आहे. त्याची जबाबदारी कुणाची आहे. तुम्ही त्यांच्यावर आजपर्यंत कारवाई केली नाही. म्हणजे याचा अर्थ काय? तुम्ही का कारवाइ केली नाहीत. आम्ही ऐवढया दिवसापासुन या प्रकरणाचा पाठपुरावा करतो तुम्ही जाणुन बुजुन दुर्लक्ष करता की तुम्हाला वेळ नाही की तुम्ही त्यास कोर्टात जाण्यासाठी वेळ देत

आहात? तुम्ही मालमत्ता कर आकारणार म्हणजे कोर्टात जाण्यासाठी वेळ देत आहात. यावर त्याला स्थगिती आदेश मिळेल. तुम्ही त्याला कोर्टात जाण्यासाठी वेळ देत आहात का?कारवाई न करण्याचे कारण काय? २००१ पासुन आज २००३ आहे. दोन वर्ष आम्ही पाठपुरावा करत आहोत. त्याच्यानंतर तुम्ही काहीच कारवाई करत नाहीत. एकानेच नाही तर पाच-सहा लोकांनी तक्रारी केल्या आहेत. श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे यांनीही तक्रार केली आहे. हे प्रकरण तुम्ही गांभीर्यपुर्वक घेत नाहीत. का घेत नाहीत? याच्या पाठीमागचे कारण काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,तत्कालिन आयुक्त महोदयांनी त्यांच्या विरूध्द कारवाई करण्याचे आदेश दिले होते हे खरे आहे. अदयाप पर्यंत कारवाई का झाली नाही याची माहिती घेवुन मी पुढील महासभेत निवेदन करेन. कारवाई अदयाप पर्यंत का झाली नाही?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-तुम्ही आदेश दिल्यानंतरही त्यांनी कारवाई केली नाही....

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-कारवाई आतापर्यंत का झाली नाही. याची कारणे जाणुन घेतल्यानंतरच कारवाई करायची किंवा नाही याबाबत निर्णय घेतला जाईल. व याबाबत मी पुढील महासभेत निवेदन करेन.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आयुक्त साहेब, एक उपप्रश्न आहे. मला वाटते आपण त्या प्रश्नाच्या उत्तरात असे लिहिले आहे की अनाधिकृत इमारतींवर टॉवर्स धोकादायक आहेत किंवा कसे त्याबददल शहर अभियंता यांचेकडुन तपासणी करून अभिप्राय देण्याचे आदेश दिले आहेत. म्हणजे ज्या इमारतींवर टॉवर्स उभारले आहेत त्यांचा त्या इमारतींवर काय परिणाम होतो. ती इमारत धोकादायक आहे किंवा नाही याचा शहर अभियंता यांनी अदयाप अहवाल दिला नाही का? असे आहे का? त्याबाबत सुध्दा, पुढच्या महासभेत निवेदन दयाल तर बरे होईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १६७ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे. तीन प्रश्न आहेत आपले, सर्वांची उत्तरे ठिक आहेत?

प्रश्न क्र. १६७ :-शासनाने जाहिर केलेल्या गलिच्छ वस्त्या व दलित वस्त्यांव्यतिरिक्त उल्हासनगर महानगरपालिका परिसरामध्ये आणखी किती झोपडपट्टया अस्तित्त्वात आहेत.

उत्तर :- घोषित केलेल्या झोपडपट्टयाखेरीज अघोषित ६२ झोपडपट्टया महापालिका क्षेत्रात अस्तित्त्वात आहेत.

प्रश्न क्र. १६८:- अस्तित्त्वात असलेल्या झोपडपट्टया दलित वस्त्या व गलिच्छ वस्त्या घोषित करण्याकरीता आपल्या कार्यालयाकडून आजपर्यंत काही पाठपुरावा करण्यात आला आहे की अथवा घोषित करण्याकरीता शासनाकडे तशी मागणी केली आहे का? मागणी केली असल्यास त्यामध्ये कोण-कोणत्या झोपडपट्टयांचा समावेश नव्याने केला आहे.

उत्तर :- झोपडपट्टया घोषित करण्याची प्राथमिक कारवाई सुरु आहे. प्रस्तावित झोपडपट्टीचा तपशिल कार्यालयात उपलब्ध आहे.

प्रश्न क्र. १६९:- ज्या वस्त्यांमध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मागासवर्गीय प्रभागामध्ये विकास कामे झालेली आहेत त्या झोपडपट्टयांना दलित वस्त्या म्हणून शासनाने घोषित केले आहे की, केले नसल्यास आपल्या

कार्यालयाकडून तशी मागणी केली आहे का? वरील सर्व प्रश्नांची सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

उत्तर :- वरील प्रश्न दोन मध्ये माहिती दिली आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १७० हा श्री. प्रशांत जाधव यांचा आहे.

प्रश्न क्र. १७०:- उल्हासनगर महानगरपालिके / नगरपालिकेतर्फे नेताजी चौक, उल्हासनगर-५ येथे बांधण्यात अग्निशामन दलाची इमारत केव्हा बांधण्यात आली?

कोणत्त्या ठेकेदारास बांधकाम देण्यात आले होते?

सदर इमसात बांधण्यासाठी किती खर्च झाला?

सदर इमारतीचे बांधकाम कोण-कोणत्त्या अभियंताच्या व शहर अभियंता देखीरेखीखाली करण्यात आले?

इमारतीमध्ये राहणा-या कर्मचारी यांना घरखाली करण्यास सांगितले त्यावेळेस इमारतीची अवस्था काय होती?

तसेच संबंधित ठेकेदार व महापालिकेचे शहर अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे का?

उत्तर :- अ) उल्हासनगर महानगर / नगरपालिकेतर्फे नेताजी चौक, उल्हासनगर-५ येथे बांधण्यात आलेली अग्निशामन दलाची इमारत सन १९८७ मध्ये हाती घेण्यात आली होती व दिनांक ३०/६/१९९७ साली पूर्ण करण्यात आली होती.

ब) सदर बांधकाम १) मे. रविंद मजूर कामगार सोसायटी २) मे. साईनाथ मजूर कामगार सोसायटी ३) मे. संध्या कंस्ट्रक्शन यांना देण्यात आले होते.

क) सदर इमारत बांधण्यासाठी एकूण रुपये २१,५००००/- इतका खर्च झाला होता.

ड) सदर इमारतीचे बांधकाम कनिष्ठ अभियंता सर्व / श्री. बशीर शेख (मृतक), पारेख, शिर्के, जग्याशी, जितु चौईथानी, सितलानी, उप-अभियंता (सर्व) श्री. सुखरामनी, डिंगरेजा आणि शहर अभियंता श्री. चिजवानी यांच्या देखरेखी खाली करण्यात आले.

इ) इमारतीमध्ये पावसाळयात गळती सुरु झाल्याने सन २००० मध्ये लेखी तक्रार केल्यानुसार सदर इमारतीची पहाणी करण्यांत आल्यानंतर सदरची इमारत धोकादायक आहे असे घोषित करण्यात आले होते. त्यानुसार आयुक्तांनी मंजूरी दिल्यानुसार सदरची इमारत उप-आयुक्त (अतिक्रमण) यांनी दिलेल्या सुचनेनुसार इमारत खाली केली इमारत खाली त्यावेळी सदर इमारतीमध्ये खालील त्रुटया आढळून आल्या होत्त्या. १) इमारतीचे छप्पर (स्लॅब) गळत होता. २) भिंतीचे प्लास्टर खराब झाले होते. ३) बाथरुम व शौचालयाची दुरुस्ती आवश्यक होती. ४) कॉलम मध्ये लहान भेगा आढळून आले.

ई)सदर इमारतीचे बांधकाम १९४७ साली सुरु करण्यांत आले होते. इमारतीचे काम टप्या-टप्याने पूर्णकरण्यांत आले होते. सदर इमारतीचे बांधकाम तांत्रिक सल्लागार श्री. बुलचंद सोनेसर त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले सदरच्या त्रुटीस कोण जबाबदार आहे. त्याची संपुर्ण चौकशी केल्यावरच जबाबदारी कायम करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधवः- ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १७१ हा श्रीमती. संगिता जावळे यांचा आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सायंकाळी ५.२० वाजता पुन्हा सभागृहात आले.

प्रश्न क्र. १७१:- संपुर्ण उल्हासनगर शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचे प्रमाणे वाढले असून विचारलेल्या प्रश्नांची सुचक व योग्य उत्तरे संबंधित विभागातील अधिका-यांनी दयावीत.

संपुर्ण शहरामध्ये अशा भटक्या कुत्र्यांमुळे सर्वसामान्य नागरीकांना आणि दुचाकी वाहनस्वारांना सतत उपद्रव होत असतो. त्यामुळे त्या कुत्र्यांविषयी बंदोबस्त करण्यासाठी महापालिकेने कोणती व्यवस्था केली आहे? केल्यास आतापर्यंत किती कुत्र्यांचा बंदोबस्त केला आहे.

अशा कुत्र्यांची संख्या आटोक्यात आणण्यासाठी महापालिकेने कोणती व्यवस्था केली आहे?

उत्तर :- मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी वेगळे असे पथक सद्या अस्तित्त्वात नाही. (प्रिव्हेशन आफॅ कर्टी टुवर्डस ॲनिमल ॲक्ट १९७६) नुसार कुत्र्यांना विष देऊन मारण्याबाबत बंदी आहे.

शहरातील मोकाट जनावरे पकडणा-या पथकामार्फत श्वान नियंत्रण करण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी तजविज ठेवली आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- उत्तर ठिक आहे?

मा.सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-मा. महापौर, मा. आयुक्त साहेब इथे मी जो प्रश्न विचारला आहे शहरामधील भटक्या कुत्र्यांचा आणि मोकाट जनावरांचा. तर तुम्ही जी तजवीज ठेवली आहे ती काय तजवीज आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-या प्रश्नावर मी एक उपप्रश्न विचारू इच्छितो.

मा.सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-काय तजवीज ठेवली आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-महापौर महोदया, हा जो १७१ क्रमांकाचा वरील प्रमाणे प्रश्न विचारला आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका गेली होती प्रिव्हेंन्शन ऑफ क्रुएल्टी टु ॲनिमल्स ॲक्ट १९७६ नुसार सर्वोच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहेत त्यानुसार कुणीही पाळीव व भटक्या कुत्र्यास मारू शकत नाही. त्यामध्ये बरेचशे निर्देश दिलेले आहेत. व उल्हासनगर महानगरपालिकेत आजच्या तारखेला अशी कोणतीही यंत्रणा नाही.

मा.सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-नाही, मारण्यास बंदी आहे. परंतु....

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-कृपया माझे बोलणे पुर्ण होवू दया. भारत सरकारने याबाबत दुसरा एक स्वतंत्र कायदा तयार केला आहे. नियम आहेत. ॲनिमल बर्थ कंन्ट्रोल (डॉग्स रूल्स २००१) याची नुकतीच आमच्याकडे प्रत प्राप्त झाली आहे. त्यानुसार जिल्हाधिका-यांनी सुध्दा मागील महिन्यात याबाबत एक बैठक घेतली होती. त्यानुसार मी आयुक्त साहेबांपुढे हा प्रस्ताव ठेवुन भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या जन्मावर नियंत्रण ठेवण्यासाठी अंमलबजावणीची काय जरूरत आहे. याबाबतच्या टिप्पणीस मान्यता घेतली आहे. व याबाबत नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने काय काय व्यवस्था केली आहे त्याचा अभ्यास करून महासभेपुढे प्रस्ताव आणावा लागेल. तरी दोन चार मुद्दे आपणांसमोर मांडणे जरूरीचे आहे. सनियंत्रण समितीची नेमणुक करावी लागेल. पशु वैद्यकीय अधिका-याची येथील आस्थापनेवर नेमणुक करावी लागेल. ते पद मंजुर नाही ते पद शासनाकडुन मंजुर करून घ्यावे लागेल. त्यानंतर शहरामध्ये किती कुत्री

आहेत त्यामध्ये भटकी किती पाळीव किती याचे सर्वेक्षण करावे लागेल. व त्यासाठी जी कुत्र्यांची गाडी आवश्यक आहे, त्यासाठी जी शेड आवश्यक आहे. या सर्व कामी अर्थसंकल्पात तरतुद करावी लागेल. त्यासाठी थोडासा वेळ आवश्यक आहे. परंतु आम्ही त्याची अंमलबजावणी सुरु केलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री लाल पंजाबी:-</u> आयुक्त साहेब हा जो विषय आहे, जरी कुत्र्यांचा विषय असला तरी लोकांवर याचा किती प्रभाव पडतो हे मी विस्तृतपणे सांगु इच्छितो. टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात दोन तिन महिन्यांपूर्वी यावर एक चांगले वृत्त प्रसिध्द झाले होते, आम्ही जे निवडुन येतो, आम्ही अधिकतर आपल्या

प्रभागातील समस्यांकडे लक्ष देतो, परंतु हा सुध्दा शहराच्या आरोग्यासाठीचा एक अतिशय महत्त्वाचा व चांगला प्रश्न आहे. टाईम्स ऑफ इंडियामध्ये याबाबतची उल्हासनगर शहराची आकडेवारी प्रसिध्द झाली होती. दरवर्षी, प्रत्येक महिन्याची माहिती मी सांगतो, प्रत्येक महिन्यामध्ये श्वानदंशाच्या १००० पेक्षा जास्त केसेस उल्हासनगर मध्ये होतात. प्रत्यक्षात महापालिकेचे जे आरोग्य अधिकारी आहेत, आयुक्त आहेत त्यांचे हे कर्तव्य ठरते की, या संबधीच्या आजारांची चौकशी केली पाहिजे. याबाबत मध्यवर्ती रुग्णालयामधुन किंवा खाजगी रुग्णालयांमधुन लोकांना औषधोपचार घ्यावा लागतो. तर यामध्ये आयुक्त साहेबांचे एक आश्वासन सुध्दा होते, हे खरे आहे की, नवीन कायद्यानुसार आपण या भटक्या व पाळीव कुत्र्यांना मारु शकत नाही. परंतु याबाबत दोन गोष्टी आहेत एकतर या कुत्र्यांना पकडुन बंद करु शकतो. अथवा दुसरी गोष्ट म्हणजे त्यांची नसबंदी करु शकतो. व याबाबत आयुक्त साहेबांनी टाईम्स ऑफ इंडियामध्ये एक खुलासा प्रसिध्द केला होता की एक महिन्यामध्ये यावर आम्ही उपाययोजना करु. तर त्यावर आपण काय उपाययोजना केलेली आहे. हे आम्हाला सांगावे.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी व श्री. सतरामदास जेसवानी हे सायंकाळी ५.२५ वाजता सभागृहा बाहेर गेले.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे)</u> :- मा. महापौर महोदया दोन महिन्यांपूर्वी या शहरामध्ये श्वानदंशामुळे एका मुलाचा मृत्यु झाला होता. त्यामुळे टाईम्स ऑफ इंडिया मध्ये एक लेख आला होता. त्यानंतर आम्ही श्वानदंशाच्या सर्व प्रकरणांची माहिती मध्यवर्ती रुग्णालयाकडुन घेतली होती. जर आपण कायदा बघितला तर श्वानदंशावर लस उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी हे महापालिकेचे कर्तव्य आहे. परंतु प्रिव्हेनशन ऑफ कुएल्टी टु ॲनिमल्स ॲक्ट च्या कायद्यातील तरतुदी नुसार आम्ही कुत्र्यांना मारु शकत नव्हतो. कुत्रे पकडुन त्यांची नसबंदी देखिल करु शकत नाही. कारण काही प्राणिमित्र संघटना इतर महापालिकांच्या विरोधात न्यायालयात गेल्या होत्या व कुत्री पकडण्याची जी पध्दत आहे ती देखिल कुर आहे त्यामुळे त्यांनी काही अधिका-यांच्या विरुध्द काही केसेस दाखल केलेल्या आहेत. ते लक्षात घेता आम्ही ज्या काही सेवाभावी संस्था या क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांच्या कडुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. व मुंबईमध्ये जशा काही सेवाभावी संस्था काम करीत आहेत. कुत्रे पकडुन त्यांना कॅस्ट्रेड करणे किंवा त्यांची नसबंदी करणे त्यासाठी प्रथमतर आम्ही जागा शोधत आहोत. एक पशुवैद्यकिय अधिकारी यांचे पद निर्माण करणे, यासाठीचा प्रस्ताव महासभेपुढे आणत आहोत. आज आमच्या अर्थसंकल्पात यासाठी काही एक तरतुद केलेली नाही. सुधारित अर्थसंकल्पामध्ये याबाबतची तरतुद केली जाईल. त्यानंतर ज्या काही प्राथमिक बाबी आहेत त्या करण्यास आम्ही सुरुवात केलेली आहे. कर्मचारी वर्ग व जागा निश्चित करुन काही संस्था निश्चित करुन त्यांच्या माध्यमातुन काम करणेचे आम्ही सुरु केलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री राज असरोंडकर</u>:- मा. महापौर महोदया महापालिका कायद्यामधील जे सेक्शन ६४ आहे तर त्यानुसार कुत्र्याच्या दंशावरती औषधोपचार करणेसाठी महापालिकेने गरीब व्यक्तिंना खर्च पुरवायचा आहे. तशाप्रकारची काही तरतुद

आपण किंवा तसा काही सेल आपण सुरु केलेला आहे का? आणि त्या माध्यमातुन कोणी गरीब व्यक्ति ज्यास कुत्र्याचा दंश झाला तर त्याच्या औषधोपचाराचा खर्च त्यास मिळेल अशा प्रकारची काही तरतुद महापालिकेने केलेली आहे काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे) :- मा. महापौर महोदया जर आपण आपला अर्थसंकल्प पाहिला तर अर्थसंकल्पात आम्ही या करिता काही एक तरतुद आजपर्यंत केलेली नाही. १९९६ मध्ये महापालिकेची स्थापना झाली परंतु तेव्हा पासुन दोन बाबींकरिता, जे आपले सक्तीचे/ अनिवार्य कर्तव्य आहे त्याकरिता आपण काही

एक तरतुद केलेली नाही. एक म्हणजे अॅन्टी रॅबिज व्हॅक्सीन उपलब्ध करुन देण्यासाठीची तरतुद व दुसरी म्हणजे कुष्ठरोग जो आहे त्यासाठी तरतुद सेक्शन ६४ व ६७ हे दोन्ही सेक्शन जर आपण वाचुन पाहिले तर हे आपले अनिवार्य /सक्तीचे कर्तव्य आहे परंतु आज पर्यंत यासाठी तरतुद केलेली नाही. आता आम्ही नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये सुधारित अर्थसंकल्प महापालिकेसमोर सादर करु त्यावेळी त्यामध्ये आम्ही हा प्रस्ताव ठेवु व त्यासाठी तरतुद देखिल करु.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-मा. महापौरजी, प्राणी मित्र संघटना यांचे असे म्हणणे आहे का की माणसे मेली तरी चालतील पण कुत्र्यांना त्रास होता कामा नये? असे असेल तर सगळे कुत्रे नेवून प्राणी मित्र संघटनेलाच दान करून टाका ना? कारण शहरातील लोक कुत्रे चावल्यामुळे मरत आहेत. आणि त्या संघटनाना कुत्र्यांबद्दल प्रेम आहे. त्यांनी सर्व कुत्रे घेवून जावेत. मागे असेच उल्हासनगरमध्ये डुकरे जास्त झाली होती. त्यावेळेस आपल्या महानगरपालिकेने त्यांना महापालिका क्षेत्राबाहेर सोडण्याची व्यवस्था केली होती. तर कुत्र्यांविषयी का करू शकत नाही?

मा.सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-मा. आयुक्त साहेब, कुत्र्यांना विष देवून मारण्यास बंदी आहे परंतु याबाबत आपण दुसरी काही तरी कार्यवाही करू शकता. मी हा प्रश्न विचारल्या नंतर काही सदस्य खुप हसायला लागले. तर हा काही माझ्या प्रभागापुरता मर्यादित प्रश्न नाही. तर संपुर्ण उल्हासनगर शहरासाठीचा प्रश्न आहे. खुप शरमेची गोष्ट आहे ही.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-मा. महापौर महोदया, आता जो श्री. पाटील साहेबांनी प्रश्न विचारला आहे. माझा एक अनुभव मी सभागृहाच्या निर्दशनास आणुन देवू इच्छितो. जेव्हा १९९९-२००० मध्ये माझ्याकडे जालना येथिल मुख्याधिका-यांचा माझ्याकडे अतिरिक्त कार्यभार होता. तेथे एक कुत्रा असाच एका मुलास चावला होता. व खुप मोठा मोर्चा आला होता नगराध्यक्ष म्हणुन जे होते त्यांचे आता मला नाव आठवत नाही. ते होते. त्या मोर्चासमोर प्राणी मित्र संघटनेची एक महिला कार्यकर्ती आली होती. नगराध्यक्षांना तिने आव्हान दिले होते की, आपण कुत्र्याला मारून दाखवा मी तुम्हाला जेलमध्ये पाठवेन. त्यावेळेस जालनाच्या नगराध्यक्षांनी तिला प्रश्न विचारला होता की या मुलाच्या जखमेतुन रक्त वाहत आहे तुम्हाला मुलाबद्दल जास्त प्रेम आहे की कुत्र्याबद्दल? तेव्हा त्या महिलेने उत्तर दिले होते की मला कुत्र्याबद्दल जास्त प्रेम आहे. प्राणी मित्र संघटना जेवढया काही आहेत त्यांचा याबाबत स्पष्टपणे कठोर विरोध आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-साहेब मागच्या वेळेस माझ्या प्रभागामध्ये एका माणसाला कुत्रा चावला आणि एक दिवसानंतर लगेच तो मरण पावला. त्यावेळेस मी एक पत्र दिले होते. त्यावर आजपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. करतो, करतो म्हणता. पण करत काही नाही. करतो, बघु, करू.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे)</u> :-चव्हाण साहेब, आपण मागील वर्षी पत्र दिले होते आता कार्यवाही होत आहे. व यापुढे करू.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मागे मी जे पत्र दिले ते चुकीचे केले का? त्यांनी दिड वर्षापुर्वी प्रश्न विचारला होता. आपण आठ महिन्यापुर्वी आला आहात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे)</u> :-तेच तर आम्ही आपल्या समोर ठेवु इच्छित आहोत. एक वर्षापुर्वी आपण ज्या काही सुचना दिल्या त्यावर अदयाप अंमलबजावणी झाली नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>साहेब, आठ महिने खुप मोठा कालावधी असतो साहेब. एका महिन्याला तीस दिवस असतात. आठ महिने कालावधी खुप मोठा असतो. २४० दिवस होतात, साहेब.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>मा. महापौरजी, माझ्या प्रभागात झुलेलाल ट्रस्टची खुप मोठी शाळा आहे. त्याबाबत मी काही पत्र दिली होती. माझ्या प्रभागात सर्वात जास्त गायी उभ्या असतात. व लहान मुले तेथुन जा-ये करत असतात. मी जवळ जवळ दहा-बारा पत्र दिली आहेत. फार मोठा अपघात होवू शकतो. जास्तीत जास्त गायी पुर्ण उल्हासनगरमध्ये माझ्याच प्रभागात आहेत. तरी कृपया याकडे लक्ष दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, जसे की आता चर्चा चालु आहे. कुत्र्यास मारू शकत नाही. तर जसे आता श्री. भडकवाड साहेब यांनी सांगितले की कुत्र्यांना पकडुन कुठे तरी सोडायचे किंवा त्यांना पकडुन त्यांची नसबंदी करायची. याकामी अर्थसंकल्पात तरतुद करू. जोपर्यंत अर्थसंकल्पात तरतुद होत नाही तोपर्यंतच्या कालावधीत माझी अशी एक सूचना आहे की, काही तातडीचा निधी स्वतंत्रपणे उपलब्ध केला जावा. कारण की काय आहे की,कुत्रा कधीही कुणास चावेल. त्यावेळेस कुणी विचारणार नाही की, याकामी अर्थसंकल्पात तरतुद आहे कींवा नाही. त्यासाठी काही निधी स्वतंत्रपणे वेगळा ठेवुन याकामी काहीतरी उपाययोजना केली जावी की अशी एखादी विशेष केस आली तर तिचे निवारण केले जावु शकेल.

<u>मा. सदस्य श्री. वलेचा पृथ्वीः-</u>साहेब पुर्ण उल्हासनगर शहरामध्ये उंदीर खुप झाले आहेत. त्यासाठी तुम्ही काय करणार?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता ज्या प्रश्नावर चर्चा चालु आहे. ब-याचशा कालावधी पुर्वी मी सुध्दा प्रश्न विचारला आहे. त्याबाबत मी जरा खुलासा मागु इच्छितो. महानगरपालिका कुत्र्यांची गाडी घेवू शकते. कमीत कमी तिचा तरी बंदोबस्त केला जावा. दुसरे असे की, कुणा एका अधिका-याच्या नेमणुकीची काय जरूरत आहे. भडकवाड साहेब आहेत. ते सक्षम आहेत. कुत्रे पकडण्याचे काम जे आहे ते कोणत्त्या पध्दतीने करायचे आहे. मला वाटते की, श्री. विनोद तलरेजा यांनी सांगितले प्रश्न फक्त कुत्र्यांचाच नाही. प्रश्न डुकरांचाही आहे. सांगा डुकरे किती झाली आहेत. प्रश्न गायींचा आहे, गायी किती आहेत. जसे उंदराबाबत श्री. पृथ्वी वलेचा यांनी सांगितले सर्व प्राण्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाचे आदेश नाहीत. गायी पण यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत येतात, डुकरे सुध्दा यांच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत येतात. त्यांनतर शहरात मच्छरही खुप झाले आहेत. महानगरपालिकेच्या दवाखान्यात स्वानदंशावरील लस कमीत कमी उपलब्ध झाली पाहिजे. लोक खाजगी डॉक्टरकडे जातात ते १०० रू. फी घेतात. पहिले १०० घेत होते आता ४०० घेतात. तर मेहरबानी करून अशा इंजेक्शनची महापालिकेत सोय करून दया. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात काही बदल करेपर्यंत

आम्ही त्यांना इंजेक्शन देवू शकत नाही का? व कुत्र्यांच्या गाडीचा बंदोबस्त केला जावा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-साहेब हे गंभीरपणे घ्या. आणि गायीचे जे म्हंटलात ना उल्हासनगरमध्ये गौशाळा भरपुर आहेत. ५ नंबरला पण गौशाळा आहेत. ३ नंबरला पण आहेत. आज गोकुळ अष्टमी असल्यामुळे आज गायीचा विषय काढावयास नको होता. तसाही प्रश्न कुत्र्यांबाबतचा होता.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १७२ हा श्री. शांताराम निकम यांचा आहे. ते कदाचित सध्या सभेत उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. १७२:- उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यापासून (२० ऑक्टोंबर, १९९६) महापालिकेने ज्या कर्मचा-यांवर फौजदारी गुन्हे आहेत, ज्यांना निलंबित केले होते, परंतु पुन्हा सेवेत घेतले आहेत असे किती कर्मचारी आहेत, त्यांची माहिती मिळावी.

उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर फौजदारी गून्हे दाखल झाल्यामुळे निलंबित करण्यात आलेले व पुन्हा महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापित केलेल्या कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| ०१ | श्री. जेठानंद विशीनदास होतचंदानी | नाका शिपाई |
| ०२ | श्रीम. अनारकली रणबीर वाल्मीकी | सफाई कामगार |
| ०३ | श्रीम. दर्शनाबाई चंदालिया | सफाई कामगार |

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १७३ हा श्री. प्रशांत जाधव यांचा आहे.

प्रश्न क्र. १७३:- उल्हासनगर महानगरपालिकेत एकुण किती सफाई कामगार व मुकादम आहेत याची संख्या देण्यात यावी. नविन पॅनल प्रमाणे सफाई कामगारांची विभागणी केली आहे का? केली असेल तर प्रत्येक प्रभागात किती सफाई कामगार आहे याची संख्या देण्यात यावी. तसेच सफाई कामगारांना गणवेश केव्हा देण्यात आले होते?

तरी वरील प्रश्नांची उत्तरे देण्यात यावी.

उत्तर :- १. उल्हासनगर महानगरपालिकेत एकुण ११८३ सफाई कामगार व ४९ सफाई मुकादम कार्यरत आहेत.
२. नविन पॅनल प्रमाणे सफाई कामगारांची विभागणी केलेली नाही.
३. विभागणी केलेली नसल्यामुळे सफाई कामगारांची संख्यबाबत प्रश्न येत नाही.
४. सफाई कामगारांना सन २०००-२००१ सालातील गणवेश खालील प्रमाणे वाटप कलेले आहे.
पुरूष सफाई कामगारांना मार्च २००१
स्त्री सफाई कामगारांना मे २००२

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधवः- ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १७४ हा श्री प्रमोद टाले यांचा आहे.
प्रश्न क्र. १७४:- महानगरपालिकेचे "स्विमींग पुल" लिज वर देणे संदर्भात "निविदा" कधी काढले होते? किती "निविदा" प्राप्त झाले होते?

''निविदामध्ये'' किती दिवसाची मुदत ''स्विमिंग पुल '' चालु करणे बंधनकारक आहे?

सद्या स्थितीत निविदांची नेमकी स्थिती काय आहे? विस्तृत माहिती दयावी.

उत्तर :- महापालिकेचे
''स्विमिग पुल'' लिजवर देणे संदर्भात दिनांक १९.९.२००२ रोजी निविदा मागविण्यासाठी वर्तमान पत्रात सूचना प्रसिध्द केलेली होती.
१. जाहिर निविदेनुसार एकुण -०४
निविदा दाखल झाल्या होत्त्या त्या खालीलप्रमाणे

१. मे. जय अबे कंस्ट्रक्शन रू. ५,४९,९९९/-
२. मे. टाऊन ॲन्ड कंन्ट्री टाईम्स रदद
३. मे. प्रोफेशनल क्रिक मॅनजमेंट रू४,०१,१०४५०/-
४. मे. सन साइस इंटर प्राइजेस रू. ३,०१,००१/-

या निविदाकारांपैकी मे. जय अंम्बे कंपनी यांची निविदा रक्कम जास्तीत जास्त असल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६ दि. ११.११.२००२ नुसार त्यांची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे.

२. सदर निविदामध्ये ६ महिने मुदतीत काम पुर्ण करणेचे नमुद केलेले आहे.
मक्तेदाराने दि. १३.१.०३ रोजी करारपत्र पूर्ण करून दिलेले आहे. त्यानुसार दि. १५.१.०३ रोजी कामास सुरूवात करण्याचे आदेश निविदा धारक यांना दिलेले आहेत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:- ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १७५, १७६, १७७,१७८ हे श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचे आहेत.

प्रश्न क्र. १७५:- व्हाय द क्वेश्चन ऑफ सम सिलेक्टेड एम्प्लॉइज फॉर अप गेशन इन टाईम स्केल ऑफ देअर पे ड्यू टू स्ट्रेगनेशन फॉर अेनी प्रमोशन फॉर मोर दॅन १२ अियर इज नॉट बिइंग कन्सीडरेशन.

उत्तर :- होय.
उल्हासनगर महानगरपालिकेत मोजक्या कर्मचा-यांना १२ वर्षाचा लाभ देणे पासुन वंचित ठेवण्यात आले आहे अशी बाब नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत असलेल्यांना विभाग निहाय १२ वर्षाचा लाभ देणे बाबतची कार्यवाही सुरू आहे.

प्रश्न क्र. १७६:- व्हाय द केस ऑफ श्री. एस. एम. मलकानी सुपरीटेंन्डन्ट ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर इज हेल्ड अप फॉर रिवीझन ऑफ पे स्केल ॲव्हीलेबल टू हीम ॲज पर गर्व्हनमेंट क्वार्टर बाय रिझन ऑफ स्टेशन इन प्रमोशन फॉर मोअर दॅन १२ यिअर.

उत्तर :- महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पात्र कर्मचा-यांना १२ वर्षाचा लाभ देणे बाबत कार्यवाही सुरू आहे. श्री. एस.एच. मलकानी १२ वर्षाचा लाभ मिळणेबाबत पात्र झाल्यास त्यांना देखील सदरचा लाभ देण्यांत येईल.

प्रश्न क्र. १७७:- व्हाय द पेन्शन ऑफ ऑदर रिटायरमेंट बेनिफीट वेअर नॉट मेड ॲव्हीलेबल टू कु. विद्या भगत क्लर्क सिन्स लास्ट सो मेनी यिअर?

उत्तर :- कु. विदया भगत, लिपिक यांना सेवा निवृत्तीनंतर ग्रॅज्युएटी रक्कम रू. ५२१,००८/- पेन्शनचे रोखीकरण केल्यामुळे रक्कम रूपये ३७,४४२/- तसेच नियमीत पेन्शन देखील तिच्या मृत्यूच्या दिनांक पर्यंत देण्यात आलेली आहे. तसेच ५ वा वेतन आयोगाची थकबाकी रक्कम रूपये ९५,१३१/- देखील अदा करण्यात आलेली आहे.

प्रश्न क्र. १७८:- हाऊ मेनी आर द केसेस आयदर अेनी रिटायरमेंट ॲन्ड पेन्शनरी बेनिफिटस आर नॉट मेड ॲव्हीलेबल टू द सुपरॲन्युएटेड ऑर ॲट द डेथ ऑफ द एम्प्लॉइज.

उत्तर :- वयोमानानुसार सेवानिवृत्त व मयत कर्मचारी यांना सेवानिवृत्ती लाभ व पेन्शन देणे प्रलंबित असणारी ८ प्रकरणे प्रलंबित आहेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्र कुमार ठाकुरः-उत्तरे ठिक आहेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १७९ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

प्रश्न क्र. १७९:-सपना गार्डन येथील जकात नाक्याचे मुख्य नाक्याचे मुख्य कार्यालय स्थलांतर करणे विषयी महासभेमध्ये महापौरांचे आयुक्तांना (रूलिंग) आदेश होते काय? असल्यास काय आदेश होते? याचा खुलासा व्हावा.

उत्तर :- दि. १९.५.०१ च्या महासभेच्या इतिवृत्तांत पान क्र. १९ वर मा.महापौर यांनी दिलेले आदेश नमुद आहेत त्यामध्ये सध्या सपना गार्डन येथे असलेला मध्यवर्ती जकात नाका दुस-या ठिकाणी स्थलांतरीत करणेबाबत मा. महापौर यांनी उल्लेख केलेला आहे.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे :-मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब सपना गार्डन विषयी मी दिंनाक १२.२.२००३ रोजी हा प्रश्न विचारलेला आहे. सपना गार्डन येथे जो मध्यवर्ती जकात नाका आहे तो अदयाप तेथुन स्थलांतरीत झालेला नाही. याचे कारण काय?आयुक्त साहेब,नंतर गप्पा मारा ना? उत्तर दया.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे) :-हा उत्तर देतो. ते काय आहे त्या घरच्या सवयी प्रमाणे मोठ्याने बोलल्या. मा. महापौर महोदया, मागील वर्षी हा प्रश्न आला होता. व त्यावेळच्या निविदेमध्ये ही तरतुद नव्हती. त्यावेळी जी निविदा सूचना होती तीमध्ये मध्यवर्ती जकात नाका सपना गार्डन येथे दर्शविला होता. यावर्षी आम्ही जी निविदा मागविली त्यामध्ये मध्यवर्ती जकात नाक्याची तरतुद सपना गार्डन येथे ठेवलेली नाही. महानगरपालिकेच्या बाजुला फायरब्रिगेटची जी इमारत आहे. तिच्या बाजुला मध्यवर्ती जकात नाक्याची इमारत तयार झाली आहे. व यावर्षीसाठी जो जकात अभिकर्ता नेमला आहे. त्यास निर्देश दिले आहेत एक आठवड्यात मध्यवर्ती जकात नाका तेथे स्थानांतरीत होईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढील चार प्रश्न पण आपलेच आहेत.

प्रश्न क्र. १८०:- जकात नाक्याच्या स्थलांतराविषयी मी १९.१०.०२ तसेच २.११.०२ तसेच २०.११.०२ व २७.११.०२ रोजी केलेल्या पत्रव्यवहाराविषयी महानगरपालिकेने दिनांक ५.१२.०२ रोजी दिलेल्या उपोषणाच्या विषयी दिनांक १२.१२.०२ रोजी दिलेल्या पत्रानुसार आजच्या तारखेपर्यंत काय कारवाई केली?

उत्तर :- आपण दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने इकडील कार्यालयीन दि. १६.८.०२ व दि. १८.९.०२ च्या पत्रान्वये संबंधीत ठेकेदारास मध्यवर्ती जकात नाका नवीन जागेत स्थलांतरीत करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्त्या. संबंधीत ठेकेदार यांनी महापालिकेस दि. १७.१०.०२ पत्रान्वये सदर मध्यवर्ती जकात नाका स्थलांतरीत केल्यास जकात वसुलीप्रमाणे होईल व त्यामुळे जकातीच्या निविदेतील अटी व शर्तींच्या पुर्तता करू शकणार नाही. त्याप्रमाणे नाका स्थलांतर करणेचा उल्लेख निविदेतील अटी मध्ये नमुद नाही तसेच निविदेतील १३ प्रवेश नाके व अस्तित्त्वातील मध्यवर्ती नाका तपासुन सदर निविदेमध्ये भाग घेवून जास्तीची निविदा भरलेली आहे. याबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करणेत यावा अशी संबंधी ठेकेदाराने विनंती केलेली आहे. प्रशासनाने याबाबत संबधीत ठेकेदाराच्या अडचणीची दखल घेवून नविन अभिकर्त्त्याची नेमणूक होईपर्यंत मध्यवर्ती जकात नाका स्थलांतरीत करणेचे काम प्रलंबित ठेवले आहे. कारण पुढील अभिकर्त्त्याची नेमणुक करतेवेळी निविदेमध्ये जकात नाका स्थलांतरबाबतची अट घालण्यात येईल.

प्रश्न क्र. १८१:- आज पर्यंत सदर प्रकरणाबाबत आपण जर कारवाई केली नाही त्याला जबाबदार कोण आहे प्रशासन की पदाधिकारी?

उत्तर :- सपना गार्डन येथुन जकात नाका महापालिकेच्या मुख्यालयाचे पाठीमागे स्थलांतरीत करणेचे काम सा.बा.वि यांच्याकडुन दि. ५.९.२००२ रोजी पूर्ण करणेत आले तर नंतर सदर सपना गार्डन येथील जकात नाका नविन महापालिकेने बनविण्यात आलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करणे बाबत उपरोक्तलेखीत केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यास प्रशासन किंवा पदाधिकारी जबाबदार असणेचा प्रश्नच उदभवन नाही.

प्रश्न क्र. १८२:- नविन जकात मुख्य कार्यालयासाठी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसताना आजपर्यंत किती खर्च केला, खर्च केले असल्यास सदर जकात मुख्य कार्यालय स्थलांतरीत का केले नाही.

उत्तर :- होय.
महापालिका मुख्यालयातील मागील जागेत मध्यवर्ती जकात नाका उभारणीसाठी महानगरपालिकेच्या सा.बा.विभागाकडून रू. ७ लाख खर्च करण्यात आलेला आहे. तसेच जकात नका स्थलांतरीत का केला नाही याबाबत सविस्तर खुलासा वरील प्र. क्र. १८० मध्ये नमुद केलेले आहे.

प्रश्न क्र. १८३:- नाका स्थलांतरीत करणे बाबत भ्रष्टाचाराचा वास येतो. खरोखर यात संबंधित अधिकारी पदाधिकारी यांच्या संगनमताने कारवाई होत नाही हे खरे आहे?

उत्तर :- हे खरे नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-उत्तरे ठिक आहेत?

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे:-ठिक आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे सभागृहाबाहेर गेले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १८४,१८५,१८६ श्री. शांताराम निकम यांचे आहेत. ते कदाचित सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांचे प्रश्न आणि त्यांच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. १८४:- महानगरपालिका झाल्यापासुन आतापर्यंत किती भुविकासकांवर (बि
ल्डर) एम.आर.टी.पी कायदयाअंतर्गत कारवाई करण्यात आली, त्यांची नावे दयावीत.

उत्तर :- होय.

उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यापासुन आतापर्यंत एकुण सात भुविकासावर एम.आर.टी.पी. कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला असल्याचे उपलब्ध अभिलेखावरून स्पष्ट होते.

प्रश्न क्र. १८५:- उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यापासुन उल्हासनगर शहराच्या विकासासाठी खाजदार निधी, आमदार निधी, म्हाडा, दलित वस्ती, गलीच्छ वस्ती, जागतीक बॅंक वगैरे सारख्या कुठल्या कुठल्या संस्थाकडुन किती निधी उपलब्ध झाला? सदर निधीतून झालेली ठळक कामे सांगावीत यादी दयावी.

उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यापासुन उल्हासनगर शहराच्या विकासाकरिता विविध शासकीय खात्त्याकडून उपलब्ध झालेला निधी खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| खासदार निधी | रू. ९३६२७००० |
| आमदार निधी | रू. ४४०३६५०० |
| म्हाडा निधी | रू५९५६३१५ |
| दलित वस्ती निधी | रू.७६५३७९४ |
| गलिच्छ वस्ती निधी | रू. २१८९२२८ |
| जागतिक बॅंक | रू. ०.०० |
| एकुण | रू.७३४७२८३७ |

प्रश्न क्र. १८६:- १ एप्रिल १९९७ ते ३१ मार्च २००२ या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत किती ठिकाणी समाजमंदीरे, व्यायामशाळा, वाचनालये, शौचालये वा इतर तत्सम इमारतीचे बांधकाम करण्यात आले आणि त्या इमारती मालमत्ता विभागाकडे हस्तांतरीत झाल्या आहेत काय? (कृपया यादीसहीत माहिती द्यावी)

उत्तर :- १ एप्रिल १९९७ ते ३१ मार्च २००२ या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उल्हासनगर महानगरपालिका हददीत ब-याच ठिकाणी समाज मंदीरे, व्यायाम शाळा, वाचनालये, शौचालये आणि इतर तत्सम इमारतीचे बांधकामे करण्यात आली आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम खात्त्याने सन २००० पासुन मालमत्ता रजिस्टरमध्ये नोंद घेतली असुन सदर इमारती मालमत्ता विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. सदर इमारतीची यादी व माहिती लांबणीची असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाहण्यासाठी उपलब्ध आहे. (प्रश्न मागे घेतला आहे)

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १८७ हा श्री. राजेंद चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. १८७:- शासन नियमाप्रमाणे अंदाजपत्रकात ५ टक्के इतका निधी हा गलिच्छ वस्ती निर्मुलन विकासासाठी राखीव ठेवला जातो. व त्याचा विनियोग

(वापर) हा महापालिका हददीतील  गलिच्छ वस्ती निर्मुलनासाठी वापरला जातो परंतु सन २००२-२००३ च्या अंदाजपत्रकामध्ये तशी तरतुद असतांना ह्या निधीचा वापर करण्यात आलेला आहे का?  वापर करण्यांत आला असल्यास त्याचा खुलासा येत्त्या महासभेत करण्यात यावा व त्यावर चर्चा घडवून आणावी हि विनंती.

उत्तर :- गलिच्छ वस्ती सुधारणा महानगरपालिकेच्या लेखा शिर्षामधील तरतुदीच्या अनुषंगाने गलिच्छ वस्ती सुधारणा समितीचे सभापती मा. श्री. अशोक ठाकूर यांनी दिनांक २७/३/२००३ च्या पत्रासोबत पाठविलेल्या कामांच्या यादीप्रमाणे प्रस्तावांची प्राकलने व नकाशे सार्वजनिक बांधकाम खात्त्याने दिनांक २६/३/२००३ रोजी प्रशासकिय व वित्तीय मंजुरीकरीता सादर केल्यानंतर सदर कामांची छाननी करण्याची जबाबदारी शहर अभियंता व मुख्य लेखा अधिकारी यांच्यावर ठेवली असून एक महिन्यामध्ये त्यांना त्यांचा अहवाल सादर केल्यानंतर या कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता फेरसादर करण्यांत येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आपल्या निर्णयावर आयुक्त साहेबांनी त्यावेळेस आश्वासन दिले होते की महापालिकेच्या अर्थसंकल्पानुसार ७ टक्के निधी दुर्बल घटकांसाठी राखुन ठेवला जातो . ते दुर्बल घटकांचे काम मी लवकरच हाती घेईन असे दोन महिन्यापुर्वी तुम्ही म्हणाला होतात. मी प्रश्न विचारला त्यास चार महिने झाले आहेत. साहेब आपण आश्वासन देता या सभागृहामध्ये. आपण अनेक आश्वासने दिली आहेत त्यातील हे एक आहे. अजुनही त्याठिकाणची कामे झालेली नाहीत. समितीला किती वेळ लागतो तेथे जावुन पहाणी करून आपणांस अहवाल देण्यासाठी?  आणि जर खरोखरच तुम्हाला महापालिकेचा खर्च वाचवायचा असेल तर, ऐवढे मोठे रस्ते हाती घेता. घनकच-या सारखा ऐवढा मोठा विषय आपण हाती घेतला आहे. जिथे ६७ हजारामध्ये रोज कचरा उचलला जात होता तेथे एक लाख २० हजारामध्ये कचरा उचलण्याचा ठेका आपण देता. त्या खर्चाचा पण आपण विचार करावा.  दलित वस्तीची अवस्था काय असेल ही पण आपणांस माहिती असली पाहिजे. असे माझे मत आहे. तर या प्रश्नावर आपण, आपणाकडे जर त्या समितीचा अहवाल आला असेल तर कधी कारवाई कराल, काय? याचे पण उत्तर याठिकाणी मिळावे. कामे लवकरात लवकर हाती घ्यावीत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे) :-मा. महापौर महोदया, जवळ जवळ ८४ लाखाचे प्रस्ताव माझ्या समोर आले होते. यामध्ये जास्त करून नाली दुरूस्ती, झोपडपटटीमध्येय सी.सी. पॅसेज, एम-२७० ,एम-३७० करण्याचे प्रस्ताव होते. व प्रशासनाचे असे मत होते की, स्लममध्ये आधी पाण्याची गरज आहे. नंतर सी.सी. एम-२७० किंवा ३७० ची गरज आहे. त्याकारणाने आवश्यकता काय आहे. नाली दुरूस्तीची आवश्यकता आहे की नाही, एम-२७० ची आवश्यकता आहे किवा नाही हे जाणुन घेण्यासाठी एक समिती आम्ही स्थापन केली होती. त्या समितीचा अहवाल आमच्या समोर आला आहे. व तो जो प्रस्ताव आहे त्यामध्ये समितीने नमुद केले आहे की जी काही कामे करणे आवश्यक आहे. ती कामे केली जातील. व एक महिन्याच्या आत त्या सर्व कामांना प्रशासकीय व वित्तिय मंजुरी दिली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- ‘आता दिलेले हे आश्वासन कायम स्वरूपाचे असेल की तात्पुरत्त्या स्वरूपाचे असेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे) :-आमची सर्व आश्वासने कायम स्वरूपाची असतात.  व पुर्तता करण्यासाठी असतात.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मागील अनुभव आहे म्हणुन बोलावे लागते. नाही तर तुमची आणि माझी काही वैयक्तीक दुश्मनी आहे असे काही नाही साहेब.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे) :-नाही, असे कधी कुणी म्हंटले?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १८८ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. १८८:- राखीव असलेल्या भुखंडावर दुरुस्तीसाठी २००२/२००३ या वर्षामध्ये नगररचना विभागातर्फे किती नकाशे मंजुर करण्यात आलेले आहेत? मंजुर करण्यात आलेल्या नकाशापैकी किती नकाशे नामंजुर करण्यात आले आहेत? याची सविस्तर माहिती येत्त्या महासभेत घेण्यास विनंती.

उत्तर :- १)राखीव असलेल्या भुखंडावर दुरुस्तीसाठी मार्च २००२/२००३ या वर्षामध्ये नगररचना विभागातर्फे किती नकाशे मंजुर करण्यात आलेले आहेत? एकही नाही.
२) मंजुर करण्यात आलेल्या नकाशापैकी किती नकाशे मंजुर नामंजूर करण्यात आलेले आहेत दुरुस्तीसाठी परवानगी दिली नसल्याने तसा प्रश्नच उद्‌भवत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-संबंधित अधिकारी आहेत का? नगररचना विभागाचे अधिकारी आहेत का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-मी देतो आहे ना उत्तर.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-साहेब मी प्रश्न विचारलेला आहे की राखीव भुखंडावर मार्च २००२, २००३ या वर्षामध्ये नगररचना विभागाकडुन किती नकाशे मंजुर करण्यात आले? मंजुर करण्यात आलेल्या नकाशापैकी किती नकाशे नामंजुर करण्यात आले? त्याची सविस्तर माहिती येत्त्या महासभेमध्ये देण्यात यावी. उत्तर वरील प्रमाणे दिले आहे. श्री. पोखरकर साहेब आयुक्त असताना एक नंबर धोबी घाट येथे एक परवानगी दिली होती आणि एक शेड बनविण्यात आली होती. आणि ती चुकीची परवानगी दिली असे लक्षात आल्यानंतर आयुक्तांच्या अधिकारात आयुक्तांनी ती रदद केल्यानंतर त्या शेडचे निष्काशन झाले. आपण सांगता की, परवानगी दिलेली नाही. मग ही परवानगी कुणी दिली होती? का त्यांनी नकली बनविली होती. आपल्या कागदांचा गैरवापर तर केला नाही? स्टॅम्पचा वगैरे? याची पण चौकशी व्हावी.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, विकास आराखडयामध्ये जे आरक्षित भुखंड आहेत त्यावर दुरूस्तीची परवानगी दिली नव्हती. असे हे उत्तर आहे. जर आपल्याकडे या व्यतिरिक्तची माहिती असेल तर ती माहिती येथे दया. त्याची चौकशी केली जाईल. व त्यात सत्त्यता आढळली तर ज्यांनी हे चुकीचे उत्तर दिले आहे त्यांचे विरूध्दही कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मागच्या वेळेसही आपण असे म्हंटला होतात. नगररचनाकारांनी.............

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-त्याची आम्ही चौकशी सुरू केली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-तर ठिक आहे. हा विषय पुढच्या सभेत घेतला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-जर आज आपण देत असाल तर, सभागृहाच्या पटलावर माहिती ठेवत असाल तर पुढच्या महासभेत त्याबाबत....

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आपले अधिकारी उपस्थित नाहीत. त्याचप्रमाणे प्रश्नाची उत्तरेही....

मा. महापौर सभागृहा बाहेर गेल्या व उपमहापौर त्यांच्या जागी आसनस्थ झाल्या.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-मी उपस्थित आहे तर प्रश्नाचे उत्तर दिले जावु शकते. तसेही आयुक्तांनीच उत्तर दयायचे आहे. ते मी दिले आहे. अधिका-याच्या कारणास्तव प्रश्नाचे उत्तर राखीव ठेवण्याची काही आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-नगररचनाकारांबाबत मागील महासभेत माझा एक प्रश्न होता. त्यावेळेस आपण त्यांना उत्तर देण्यासाठी सांगितले होते. तर मला आजही असे वाटले की, आजही त्यांना बोलवाल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-आज ते सभागृहात नाहीत. एका प्रकरणाच्या चौकशी कामी ते डेप्युटी डायरेक्टर यांच्या कार्यालयात गेले आहेत. प्रश्नाचे उत्तर दिले आहे. त्या व्यतिरिक्त जर आपणांकडे काही माहिती असेल तर ती सभागृहाच्या पटलावर ठेवा. आम्ही त्याची चौकशी करू, कधीही दया. आज दया, उदया दया, चालेल. कुठेही देवू शकता.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १८९ हा श्री. रामदास उमाप यांचा आहे.

प्रश्न क्र. १८९:- टॅक्स बील (रोख) भरण्यानंतर किती दिवसाचे आत ती जमा करण्यात येते?
संबंधित अधिका-याने ती कॅश रक्कम वेळेला भरली नाही तर त्यावर काय कारवाई करणेत येते.
बील क्र. ३५०६९८ हे दिनांक २८/२/२००३ रोजी भरले असता वरील मालमत्ता धारकास नोटिस का देण्यात आली?
बील भरण्याची पावती दाखविली असता जबरान ५१.०० रुपये नोटिस फी मागणी का करण्यात आली? या प्रकाराने नागरीकांना वेठीस धरले जाते हे सिध्द होत नाही का?

उत्तर :- टॅक्स बील कॅश (रोख) वसूल केल्यानंतर सदरची रक्कम त्याच दिवशी महानगरपालिकेच्या कोषागरात भरण्यात येते.
संबंधीत अधिका-यांने सदर रक्कम कोषागारात वेळेवर भरली नाही तर तात्पुरता अपहार समजून संबंधीताविरुध्द शिस्त भंगाची कारवाई केली जाते.
बील क्र. ३५०६९८ या मालमत्ता धारकास ७.२.२००३ रोजी नोटिस काढली होती. मिळकत धारकाने दि. २८/२/२००३ रोजी मालमत्ता कराची रक्कम भरली आहे. म्हणजे रक्कम भरणेपूर्वी नोटिस काढलेली आहे.
नोटिस दि. ७.२.२००३ रोजी निघाली होती. मालमत्ता धारकाने दि. २८/२/२००३ रोजी मालमत्ताकर भरला असला तरी त्यांचेवर लावण्यात आलेली नोटिस फी रु. ५१/- अदयाप वसूल केलेली नाही. रक्कम भरण्याअगोदर नियमाप्रमाणे नोटिस फी आकारणी केली आहे. ती योग्य आहे. त्यामुळे नागरीकांनी वेठीस धरले असे होत नाही.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-उत्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १९० हा मागे घेतल्याने इतिवृत्तांतात त्याची नोंद घेता येत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १९१ ,१९२ ,१९३ हे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत.

प्रश्न क्र. १९१:- यु.नं. १२१ , सीट नं. ५८ , प्लॉट नं. २१७ , उल्हासनगर-७ येथिल एकूण ६२६०-६/९ चौ. यार्ड भुखंडावर खेळाचे मैदान व प्राथमिक शाळेकरीता राखीव भुखंड क्र. १५ व १०४ उल्हासनगर उप-प्रांत विभाग कार्यालयाने दिनांक १२.३.१९८७ नोंदणीनुसार सदर भुखंडाचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेला दिला आहे. त्यानुसार सदर भुखंडावर महानगरपालिकेला ताबा दिला आहे का?

उत्तर :- यु.नं. १२१ , सीट नं. ५८ , प्लॉट नं. २१७ , उल्हासनगर-७ येथिल भुखंडावर खेळाचे मैदान व प्राथमिक शाळेकरीता राखीव भुखंड क्र. १५ व १०४ उल्हासनगर उपविभागीय अधिकारी यांचे पत्र क्र. ४३० , दिनांक १२.३.१९८७ अन्वये ताबा पावती दिलेली आहे.

प्रश्न क्र. १९२:- सदर भुखंडावर महापालिकेचा ताबा असल्यास तो फिजिकल आहे का? फक्त कागदोपत्री ताबा आहे?

उत्तर :- सदर भुखंडावर महापालिका ताबा हा फक्त वरील ताबेपावतीनुसार आहे कारण फक्त कागदोपत्री बाता आहे. प्रत्यक्ष जागेवर उपविभागीय अधिकारी यांनी मोजणी करुन जमिनिचा ताबा दिलेला नाही. कारण उपरोक्त जागेवर अतिक्रमण होते.

प्रश्न क्र. १९३:- सदर भुखंडावर उल्हासनगर महानगरपालिकेचा ताबा असल्यास त्या भुखंडाची (मालमत्ता) सद्याची वस्तुस्थिती काय आहे? त्याचे सविस्तर माहिती व खुलासा समाधानकारक उत्तरे देण्याची कृपा करावी.

उत्तर :- सदर भुखंडाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.
अ) भुखंड क्र. १५ खेळाचे मैदान पूर्णपणे अतिक्रमीत.
ब) भुखंडा क्र. १०४ प्राथमिक शाळा पूर्णपणे अतिक्रमण झोपडपट्टयांनी व्यापलेले आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १९४ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. १९४:- १ एप्रिल, २००२ ते ३१ मार्च २००३ या कालावधीत उल्हासनगरात निदर्शनास आलेली एकूण किती अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आली व त्यातील कोणकोणत्त्या ठिकाणी पुनः बांधकाम झालेली आहे?
कृपया वस्तुनिष्ठ यादी दयावी.

उत्तर :- १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ या कालावधीत उल्हासनगरात एकूण ३३६ अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आलीत.
निष्कासित करण्यात आलेली बांधकाम पुन्हा बांधण्यात आली किंवा कसे? या बाबतची क्षेत्रीय तपासणी करुन माहिती संकलित करुन स्वातंत्ररित्त्या सादर करण्यात येईल.
निष्कासीत केलेल्या बांधकामांचा तपशील कार्यालयामध्ये पाहणीसाठी उपलब्ध आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-महापौर महोदया, आपल्या माध्यमातुन मी सांगु इच्छितो की, या विषयाबाबत मी आयुक्तांना पत्र दिले आहे. येथे जेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागात एखादया कामाचा प्रस्ताव घेवून जेव्हा नगरसेवक

जातात तेव्हा त्यांना सांगितले जाते की, या शिर्षामध्ये तरतुद नाही. पत्रामध्ये लेखा शिर्ष लिहुन आणा. कधी कधी असे वाटते की महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. व खरेच महापालिकेच्या तिजोरीत पैसा नाही. कामे नामंजुर सुध्दा होवू शकतात. परंतु इथे मी जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा अशी माहिती पुढे आली की, सार्वजनिक बांधकाम विभागाची जवळ जवळ....

<u>काही सदस्य :-</u>प्रश्न क्र. १९४ चालु आहे?

<u>मा. उपमहापौरः-</u>१९४ क्रमांकाचा प्रश्न चालु आहे.

<u>काही सदस्य :-</u> प्रश्न क्रमांक १९० चे काय?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. १९० त्यांनी मागे घेतला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>ठिक आहे. दुरूस्ती....

महापौर महोदया, या प्रकारचा एक प्रश्न या सभागृहात मी विचारला होता. परंतु त्यामध्ये जो कालावधी होता तो वेगळा होता. मी अगोदर असे विचारले होते की, २००१-२००२ पर्यंत किती अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. किती निष्कासित केली. त्यातील किती बांधकामे पुन्हा उभी राहिली? तर त्यावेळेस उत्तर दिले होते की, तपासणी चालु आहे. जी कायदेशिर प्रक्रिया आहे. ती पुर्ण केली जाईल. हे डयु प्रोसेस ऑफ लॉ आहे. त्याच्यावर अंमलबजावणी केली जाईल. परंतु अशी कोणतीही कारवाई शहरामध्ये झाली आहे किंवा होत आहे असे दिसत नाही. इथे अनाधिकृत बांधकामाबाबत एक विशेष महासभा सुध्दा झाली. त्यामध्ये सुध्दा याचा उल्लेख केला होता. व येथे असे उत्तर दिले आहे की, जी बांधकामे निष्काशित केली ३३६ मी विचारले आहे की, तेथे किती बांधकामे पुन्हा झाली आहेत. त्याबाबत असे उत्तर दिले आहे की माहिती संकलित करून स्वतंत्ररित्त्या सादर करण्यात येईल. तर अदयाप अशी काही माहिती मला मिळाली नाही. आयुक्त साहेब असे सांगु शकतात का अशी काही माहिती गोळा झाली आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-</u>महापौर महोदया, १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ या कालावधीमध्ये एकुण ३३६ अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली होती. व ती तोडल्यानंतर किती बांधकामे पुन्हा बांधण्यात आली. याबाबतची जी माहिती आहे ती प्रत्येक जागेवर जावुन गोळा केली जात आहे. सध्या याबाबतची पुर्ण माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. मी सन्माननिय सदस्यास सदरची माहिती २५ तारखेपर्यंत देईन.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>सदस्यास नको सभागृहास दया. सभागृहाच्या समोर दया.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-</u>सभागृहाच्या समोर देईन.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>कधी?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-</u>पुढच्या सभेत.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>खात्रीने?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-</u>खात्रीने. प्रत्यक्षात एक दोन कॅम्पाची माहिती माझ्याकडे आली नाही. बाकी सर्व माहिती आली आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १९० त्यांनी मागे घेतला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-जर ही माहिती मिळाली तर या महिन्या भरात पुढची महासभा येईपर्यंत किती बांधकामे पुन्हा तोडली? कितींवर एफ.आय.आर. दाखल केला. ही माहिती सुध्दा दिली तर अधिक चांगले होईल. मग माझा पुढचा एक प्रश्न त्यासाठी येईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-सन्माननिय महापौर, मा. आयुक्त साहेब सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांच्या प्रश्नाशी संबधित एक प्रश्न मी विचारू इच्छितो. जे अतिक्रमण तोडले जाते. आयुक्त साहेब आपल्या सुध्दा निर्दशनास आणुन देवू इच्छितो. बांधकाम तोडल्यानंतर पुन्हा ती कामे चालु होतात. आणि बीट इन्स्पेक्टर यांना विचारल्यानंतर त्यांचे एक कायमस्वरूपी उत्तर असते साहेब ते पुन्हा तोडणार आहे ना? बांधु दया त्यांना काय फरक पडतो. अशा प्रकारे उल्हासनगरमध्ये कामे चालु आहेत. ज्या ज्या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे निष्काशित केली ती आठ दिवसात तेथे पुन्हा उभी रहतात. आणि पुन्हा त्यांना आपल्या कडुन काहीतरी मदत मिळते. याची जरा आपण चौकशी करा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १९५ हा श्रीप्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. १९५:-१) नियर कल्याणी रेसिडेंशियल कॉम्पलेक्स जी + ४, सी ब्लॉक रोड, उल्हासनगर-१.
२) साई अर्पन अपार्टमेंट ऑप-५ दुकान हरीओम बेकरीच्या बाजूला, उल्हासनगर-५.
३) इंदिरा गांधी मार्केट समोर, सेक्शन-२३, उल्हासनगर-५.
४) बॅरेक १०२६ समोर , उल्हासनगर-३ नमुद केलेले बांधकाम हे नियमानुसार आहे का? यामध्ये प्लान रिवाईज आहे का? त्यामध्ये अनाधिकृत बांधकाम किती व कुठल्या स्वरुपाचे आहे?

उत्तर:-१) अ) प्रश्नांकित बांधकामाबाबत प्रत्यक्ष पहाणी केली असता सदर बांधकामाचा प्रत्यक्ष पत्ता प्लॉट नं. ६१९, शिट नं. ६० कल्याणी नगर, उल्हासनगर-१ असा आहे.
ब) सदरचे बांधकाम नियमानुसार नाही.
क) सदर बांधकामास पुर्नसुधारित बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/७०/९८/९४०, दिनांक ४/३/२००३ अन्वये सुधारीत मंजुरी देण्यात आली आहे.
ड) तथापी सुधारित मंजुरी नंतर क.अ. यांनी दिनांक १५/३/२००३ रोजी केलेल्या तपासनित ३५.७६ चौ.मी. वाढीव बांधकाम केल्याचे दिसून आले.

२) अ) प्रश्नांकित बांधकामाबाबत पहाणी केली असता बांधकामाचा प्रत्यक्ष पत्ता ब्लॉक नं. ए २४९/४९७ (भा) शिट नं. ४५, उल्हासनगर-४ असा आहे.
ब) सदरचे बांधकाम नियमानुसार नाही.
क) सदरचे बांधकाम सुधारीत परवानगी नाही.
ड) वाढीव बांधकाम १५२.५७ चौ.मी.

३) अ) प्रश्नांकित बांधकामाची पाहणी केली असता बांधकामाचा प्रत्यक्ष पत्ता बॅरेक नं. १०९७, रुम नं. १ व २ ३५, ३६ शिट नं. २६, उल्हासनगर-३ असा आहे.
ब) सदरचे बांधकाम नियमानुसार नाही.
क) सदर बांधकामास पुर्नसुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/९३/९८/९१६, दिनांक २५/२/२००३ अन्वये सुधारीत मंजुरी देण्यात आली आहे.

ड) तथापि सुधारीत मंजुरी नंतर क.अ. यांनी दिनांक ३०/५/२००३ रोजी तपासणी केली असता ५३.०४ चौ.मी. वाढिव बांधकाम केल्याचे दिसून येते.

४) अ) प्रश्नांकित बांधकामाबाबत पाहणी केली असता सदर बांधकामाचा प्रत्यक्ष पत्ता बॅ.नं. १०१७/ रुम नं. ५,६,७ शिट नं. २६, उल्हासनगर-३ असा आहे.
ब) सदर बांधकाम नियमानुसार नाही.
क) सदर बांधकामास सुधारित बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/७६/०२/५८५, दिनांक २/११/२००२ अन्वये सुधारीत मंजुरी देण्यात आली.
ड) तथापि सुधारीत मंजुरी नंतर क.अ. यांनी दिनांक ७/१/२००३ रोजी केलेल्या तपासनीत ४०४.८५ चौ.मी. वाढीव बांधकाम केल्याचे दिसून आले.
इ) बांधकाम धारकाने पुन्हा दि. १६/१/२००३ रोजी सुधारीत मंजुरी करीता अर्ज सादर केला होता. परंतु कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/७६/०२/१०२९, दिनांक २८/३/२००३ अन्वये मंजुर करण्यात आला.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-उत्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. १९६ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. १९६:- शांतीनगर येथे साईबाबानगर येथे असणा-या हिंदुस्थान गॅस व भारत गॅस ह्या गॅस कंपनीच्या गोदाम बनविण्यासाठी आपल्या महानगरपालिकाची परवानगी घेण्यात आली होती का?
परवानगी देण्यात आली असल्यास ती परवानगी महानगरपालिकेच्या नियमानुसार देण्यात आली आहे का?

उत्तर:- शांतीनगर येथे साईबाबानगर (साईबाबा मंदिर) येथे असणा-या हिंदुस्थान गॅस व भारत गॅस ह्या गॅस कंपनीच्या गोदाम बनविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे (मार्फत) परवानगी देण्यात आलेली नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-गॅसचा विषय आहे. अतिशय गंभीर असा विषय आहे. सन्मानानिय महापौरजी, जसे सुरत येथे गॅस स्फोट होवुन तीन इमारती पडल्या आहेत. एक महिन्यानंतर तर येथे सुध्दा स्फोट होईल येथे तर गोदामे व कारखाने आहेत. एक महिन्यामध्ये जर असे झाले तर आपणासच जबाबदार धरले जाईल. महापालिकेस जबाबदार धरले जाईल. आता हा विषय चर्चेस आला आहे तर त्यावर चर्चा केली जावी.

मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-बोला. घ्या. प्रश्न चर्चेस घेतला जावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्मानानिय महापौरजी, मा. आयुक्त शांतीनगर ते साईबाबा नगर याठिकाणी आपल्या महापालिकेकडुन परवानगी दिलेले रेसिडेंन्शीअल झोन आहे. तेथे मोठ मोठया इमारती आहेत. त्या इमारतींमध्ये लोक राहातात. आणि त्याच बाजुला या शहरामध्ये वितरीत होणा-या गॅसची दोन गोदामे भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम यांची दोन गोदामे, ती गोदामे किती दिवसापासुन असतील याकडे कुणी लक्ष दिले नाही. त्याच्याशी माझे काही देणे घेणे नाही. पण आता सध्या ही गोष्ट माझ्या लक्षात आल्यामुळे मी आपल्या आणि सभागृहाच्या लक्षात आणुन देतो. जर सुरत सारखी परिस्थिती येथे झाली तशी होवू नये. पण झाली तर मोठा भयंकर अपघात होईल. आणि या अपघाताला

महापालिकेला जबाबदार धरले जाईल. म्हणुन महापालिकेतर्फे, ती गोदामे जर अनाधिकृत असतील तर अनाधिकृत म्हणुन त्यांच्याकडे काय कागदपत्र असतील याची चौकशी व्हावी. आणि जरी अनाधिकृत असली किंवा अधिकृत असली तरीही त्यांच्याकडुन चौकशी करून त्यांना या शहराच्या कुठल्यातरी एका कोप-यामध्ये कशी जागा देता येईल. आणि होणारा अनर्थ कसा टाळता येईल. याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-उपाय योजना काय करणार आहात गॅस गोदामाबाबत, त्याचे उत्तर दया.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-मा. महापौर महोदया, शांतीनगर येथील साईबाबा नगर येथे हिंदुस्थान पेट्रोलियम व भारत पेट्रोलियम यांचे जे गोदाम आहे. या प्रश्नाबाबत नगररचना विभागाकडुन उत्तर देण्यात आले आहे. परवानगी तर त्यांना दिलेली नाही. परंतु विरोधी पक्ष नेता श्री. राजेंद्र चौधरी साहेबांचे या विषयावर दोन दिवसा अगोदर माझ्याकडे एक पत्र आले आहे. मी या कंपन्यांना कागदपत्र दाखल करण्याबाबतचे पत्र दिले आहे. ती कागदपत्रे पडताळल्यानंतर व त्यांच्याकडे परवानगी आहे किंवा नाही. त्या हिशोबाने पुढील कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-जरी परवानगी असली तरी हा संभाव्य अनर्थ टाळण्यासाठी आपण त्यांना विनंती करून आपल्याकडे कायदया अन्वये ज्या तरतुदी आहेत त्या तपासुन पाहुन त्यांना या शहराबाहेर कुठे तरी जागा देता येईल त्यांनी त्याठिकाणी जावुन स्थानांतरीत व्हावे. हा एक मुददा माझा आपण लक्षात घ्यावा.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-साहेब मी प्रश्न विचारू इच्छितो की, ते गोदाम किती वर्षापासुन तेथे आहे? जेव्हा आम्ही लहान होतो १९६५ च्या आसपास आम्ही तेथुन गॅस सिलेंडर घेवुन येत होतो. तेव्हा त्याच्या आजुबाजुस शेती केली जात होती. तर त्यास जरूर परवानगी असेल तसेही गॅस एजन्सी मिळत नाही. ते गोदाम किती जुने आहे ते मला सांगा. मला वाटते कमीत कमी ४० वर्षापासुन तेथे गोदाम आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-मा. महापौर महोदया, मी हेच सदनात उत्तर दिले मी डॉक्युमेंटरी कॉलची नोटीस दिली आहे. कागदपत्र समोर आल्यावर कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मा. आयुक्त साहेब, रेसिडेंन्शीअल झोनमध्ये तुम्ही तशी परवानगी देवु शकता का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा.वि):-परवानगी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे श्री. नारायण पंजाबी जसे सांगतात तसे त्यांच्याकडे परवानगी असु शकते. आणि हे उत्तर खोटे असु शकते. हे पण होवू शकते, सभागृहामध्ये.................

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-बरोबर आहे विपक्ष नेता जे बोलत आहेत ते बरोबर आहे. इतकी मोठी कंपनी अशीच इतक्या वर्ष चालु नसणार.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-म्हणुन त्याच्यापुढे जावुन मी तुम्हाला असे म्हंटले की जरी परवानगी असली तरी त्याला विनंती करून कायदयाची तरतुद बघुन कायदा तपासुन त्यांना दुसरीकडे कुठेतरी गोदाम हलविण्याची विनंती करावी. काही तरी कायदेशिर करावे अशी विनंती आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः- साहेब, नाहीतर तुम्हाला बाजुची राहती घरे तोडुन टाकावी लागतील? तुम्ही जर त्यांना परवानगी दिली असेल तर, दुसरे असे की ते गॅस गोडाऊन वाले रोडवर पुर्ण ट्रकच्या ट्रक उतरवतात

तेथून शाळेची मुले येतात, जातात. एकाच ठिकाणी नाही उदाहरण मी माझ्या इथले देखिल देतो. आमच्या येथे स्मशान भुमी जवळ तिथेच दोन-दोन तीन तीन ट्रक सिलेंडर उतरतात. त्या रस्त्त्यावरून पालक मुलांना शाळेत सोडायला न्यायला येतात. मी अगोदर देखिल तक्रार केली आहे. पोलीस स्टेशनला तक्रार केली आहे. श्री. हीवारे , स्वच्छता निरिक्षक त्यांना देखिल प्रत्त्यक्षात दाखवले. पाच-पाच ट्रक तेथे उतरले जातात तरी तिथे काही कारवाई केलेली नाही. साहेब, उदया तिथे अपघात होवु शकतो. पाच ट्रक म्हणजे समजता, पुर्ण रोड सिलेंडरने भरून जातो. अजुन काही कार्यवाही केली नाही. गंभीरतेने घ्या साहेब.

आम्हाला ऐवढेच सांगायचे आहे की तुम्ही गंभीरतेने घ्या. कोणतीही गोष्ट हातात करायला घेतली की ती आधी पुर्ण करा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौर महोदया, मी विपक्ष नेत्त्यांशी या विषयावर सहमत आहे. जर परवानगी दिली जरी असेल तरीही ऐवढी मोठी जोखिम घेवू शकत नाही. लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे म्हणुन हे गोदाम रहिवासी क्षेत्रापासुन त्वरीत हटविले जाण्याची व्यवस्था महानगरपालिकेस केली पाहिजे. असे मी मागच्या वेळी पण महासभेमध्ये बोललो होतो. याबाबतीत आवाज उठविला होता. तेव्हा पण मी श्री. राजेंद्र चौधरी यांच्या प्रश्नाचा संदर्भ दिला होता. खुपच जबाबदारीचे काम आहे. जर कोणत्त्याही प्रकारे स्फोट झाला. ऐवढा मोठा धक्का सहन करण्याचे किंवा जबाबदारी पेलण्यासाठी आमचे खांदे एवढे मजबुत नाहीत. तर मेहरबानी करून हे जे गोदाम आहे. त्यास जर परवानगी असेल तर ती पण रद्द करून शहराच्या बाहेर त्यांना परवानगी दयावी जेणेकरून जिवीत किंवा वित्त हानी होवु नये. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्केः-</u>मा. महापौर महोदया, काही दिवसापुर्वी तिथे आग लागली, तिथे रहिवासी क्षेत्र आहे. आजुबाजूच्या लोकांनी येवुन आग विझवली. तिथे दोन गोदाम आहेत. दोन्ही गोदामावर वॉचमेन नाहीत. जर लोकांनी येवून आग विझवली नसती तर खुप मोठी हानी झाली असती. तिथे त्यांनी बचावात्त्मक असे काही उपाय केलेले नाहीत. म्हणुन तेथुन ते गोदाम हटविले जावे.

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>मी आयुक्तांना निर्देश देते की त्वरीत कार्यवाही केली जावी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्नोत्त्तराचा कालावधी संपला. एक लक्षवेधी सूचना आहे त्याचे सूचक आहेत श्री. लाल पंजाबी, अनुमोदक आहेत श्री. राजेंद्र चौधरी. लक्षवेधी खालील प्रमाणे आहे. तुम्हाला प्रत दिलेली आहे.

## <u>लक्षवेधी सूचना</u>

<u>सूचकाचे नाव :-</u> श्री. लाल पंजाबी

<u>अनुमोदकाचे नाव :-</u> श्री. राजेंद्र चौधरी

आम्ही खाली सही करणारे पालिका सदस्य दिनांक <u>२०/८/२००३</u> च्या महासभेत पूढील विषयी लक्षवेधण्याकरीता लक्षवेधी सूचना देत आहेत.

सन २००३ च्या श्री. गणेश दर्शन प्रतियोगितासाठी महापालिकेतर्फे दरवर्षी सारख्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत किंवा कसे? आणि मागील वर्षाचे श्री. गणेश दर्शन प्रतियोगितेची पारितोषिके वितरीत करण्यात आली आहेत किंवा कसे?

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>लक्षवेधी सूचना स्विकारण्यात येत आहे.

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब व सहयोगी प्रत्येक वर्षी या महापालिकेची एक परंपरा आहे. गणेश उत्तसव पुर्ण देशात साजरा केला जातो. मोठा उत्तसव आहे. पर्व आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राचे हे आराध्य दैवत आहे. म्हणुन याकरिता याचे विशेष महत्त्व महाराष्ट्रात आहे. प्रत्येक वर्षी आम्ही महापालिकेतर्फे एक गणेश स्पर्धा, गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजित करतो. जे गणपती मंडळ उत्तकृष्ठ सजावट, उत्तकृष्ठ मुर्ती यासाठी अनेक प्रकारची पारीतोषिके ठेवतो. मागच्या वर्षी पण एक समिती बनविली होती. आणि त्यात ३३ जणांचा समावेश होता. आणि हा विषय जेव्हा मागच्या महासभेत आला होता. तेव्हा आम्ही खर्चाचा पण प्रश्न उपस्थित केला होता. तुमच्या माहितीसाठी म्हणुन सांगतो. कारण की, गरजेपेक्षा जास्त खर्च झाला त्यावर आम्ही असे म्हंटले होते की, ती जी अंदाजित रक्कम जी आली होती ती जास्त होती. त्यावर आम्ही असे देखिल म्हंटले होते की त्याकडे लक्ष दयावे. प्रस्ताव एकमताने सभेमध्ये पारीत झाला होता. परंतु खुप दुःखाने म्हणावे लागते की, मागच्या वर्षाचे पारीतोषिक आजपर्यंत एक वर्षानंतर देखिल त्याचे वाटप झाले नाही. ही आपल्या महापालिकेसाठी चुकीची गोष्ट आहे. त्याचा चुकीचा अर्थ असा निघतो की महापालिकेतर्फे जे पण जाहिर केले जाते त्याचे जर आपण पालन नाही केले तर लोकांचा आमच्यावर विश्वास राहणार नाही. व गणपती मंडळाचे नवयुवक ते इतक्या उत्त्साहाने साजरा करतात. त्यांच्या मनात महापालिकेविषयी एक नव्या पैशाचा देखिल विश्वास राहणार नाही. हे महापालिकेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. व मला आठवते की काही दिवसापुर्वी जेव्हा डी.सी.पी. साहेबांनी सभा बोलावली होती. तेव्हा आयुक्त साहेब नव्हते. आत ज्या महापौरांच्या खुर्चीवर बसल्या आहेत त्यांनी एक सुझाव पण दिला होता. एक अजुन पारितोषिक ठेवले जावे उत्तकृष्ठ शिस्तीसाठी. त्यावेळेस आम्हाला माहित होते की, मागच्या वर्षाचे पारीतोषिक अजुन दयायचे राहिले आहे. मला असे वाटते की महापौर, उपमहापौरांचे हे देखिल कर्तव्य असते की, त्यांनी यावर लक्ष दिले पाहिजे की, पारीतोषिक वितरण अजुन का झाले नाही. गणपती उत्तसव सुरू होत आहे. अजुन पर्यंत त्याबाबतीत एकही समिती स्थापन केली नाही. आम्ही आज लक्षवेधी याकरिता आणली आहे. शहरवासी व नगरसेवकांची वेगवेगळी समिती स्थापन केली पाहिजे. त्याचे काम सुरू झाले पाहिजे कारण आधी फॉर्म छापायचे. गणेश मंडळाला आवाहन करायचे. कॅबल तर्फे ते फॉर्म भरतात मग आम्ही विझीटसाठी जातो. यावेळी कोणतीही समिती स्थापन करण्यात आली नाही म्हणुन माझे म्हणणे आहे की एक छोटीशी समिती स्थापन करावी. जसे मागच्या वेळेस ३३ जणांची समिती होती. त्या समितीकडुन जर अहवाल आला असेल प्रथम, व्दितीय किंवा तृतीय क्रमांक ते दिले गेले पाहिजे नाहीतर असे होईल ३३ संख्या असणारी ऐवढी मोठी समिती स्थापन होवु नये. व मागच्या वर्षीचा कोणता अहवाल आला असेल तर पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला पाहिजे. नाहीतर असे होईल की, लोकांचा विश्वास महापालिकेवरून उडुन जाईल. आणि मग कोणी पण फॉर्म भरायला येणार नाही. याकरिता पारितोषिक वितरण प्रोग्राम झाला पाहिजे. आपल्याकडे समिती नसेल तर आयुक्तांना आवाहन करतो की त्यांनी समिती नेमुन काम सुरू करावे हे काम महापालिकेतर्फे कसेही झालेच पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सन्मानानिय महापौरजी, या लक्षवेधीला आव्हान देताना. लक्षवेधी दिल्यावर प्रशासनाच्या लक्षात आले. आणि प्रशासनाने लगेच एक कमिटी नेमायचे पत्र आम्हाला पाठविले. ते सदस्यांना मिळाले. असेच आम्ही तुम्हाला एकेक गोष्टी लक्षात आणुन देवू. त्याची आपण पुर्तता कराल अशी अपेक्षा ठेवतो. मागच्या वेळेस पोलिस उपायुक्तांनी एक सभा बोलावली होती. त्या सभेस मा. महापौर, मा.उपमहापौर होत्या आम्ही होतो. मा. उपआयुक्त होते त्यावेळेस सांगण्यात आले होते की,गणेश उत्तसव जसा सुरू होईल तसे शहरातील खड्डे भरले जातील. तर अजुन पर्यंत त्या कामास सुरूवात झालेली नाही. जर गणेश उत्तसव सुरू झाला. आणि ते खड्डे भरले गेले नाही, रस्ते व्यवस्थित झाले नाहीत. पोलिसांनी बोलाविलेल्या त्या सभेमध्ये उपायुक्तांनी दिलेले उत्तर आणि*

त्या उत्तराचे ते काय समजतील, कल्पना आहे म्हणुन माझी विनंती आहे की आपण त्या प्रश्नाकडे लवकरात लवकर लक्ष दयावे. तसेच आपण याआधी अशीच विरोधी पक्षांतर्फे गणेश घाटाबददल एक लक्षवेधी आली होती त्यावेळेस आपण उत्तर दिले होते आणि त्या संस्थेचे एक पत्र आम्हाला दाखवले होते. तिथे गणेश उत्त्सवासाठी हीराघाट खुले केले जाईल तर तो घाट खरोखरच खुला होणार आहे का? नाहीतर त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था तरी केली पाहिजे. नाही तर गणेश भक्तांचा अपमान होतो. त्या अपमानाला आपल्याला सामोरे जावे लागेल प्रशासनाचे प्रमुख म्हणुन. त्याची आपण चौकशी करावी आणि त्या घाटामध्ये जे घाण पाणी येणार आहे त्यासाठी आपण काय व्यवस्था करणार आहे या गोष्टीकडे पण लक्ष दिले पाहिजे. जर घाण पाणी येणार असेल पाऊस पडणार नसेल आणि त्या घाण पाण्यात विसर्जन होणार असेल तर माझी प्रशासनास अशी विनंती आहे की आपल्या बोटक्लबमध्ये बनविलेला एक घाट आहे त्या घाटामध्ये कमीत कमी घरगुती गणपती तरी विसर्जनासाठी आपण व्यवस्था करावी. तिथे व्यवस्था करताना महापालिकेच्या प्रशासनाला काही एक खर्च येणार नाही फक्त फायर ब्रिगेटची जी व्यवस्था लाईटची व्यवस्था आणि त्या घाटाला लागणा-या कुंपण, हे महापालिका प्रशासनाला तिथे करावे लागणार आहे आणि ते करताना ऐवढा काही खर्च येणार नाही असे मला वाटते. आणि जर का खर्च येणार नसेल आणि चांगली व्यवस्था होणार असेल तर ती व्यवस्था आयुक्तांनी तिथे जावुन बघावी आणि लवकरात लवकर पुर्ण करावी अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी सायंकाळी ६. ०५ वाजता सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. आयुक्त साहेब, मागच्या दोन महासभांच्या अगोदर आपण आश्वासन दिले होते की, गणेश घाटाची व्यवस्था करण्यात येईल. आपण गणेश घाटाची व्यवस्था कुठे केलेली आहे. ३१ तारखेला गणपती बसणार आहेत. काही दिड दिवसाचे गणपती असतात, काही तीन दिवसाचे, काही अकरा दिवसाचे असतात तुम्ही गणपती विसर्जनाची व्यवस्था करू शकता की नाही. नाहीतर आमच्यावर सोडा म्हणजे आम्ही आमच्या खर्चाने व्यवस्था करू. आमच्या देवाचा अपमान आम्ही सहन करणार नाही. तुमच्याकडुन जर होणार नसेल तर आश्वासन देवु नका साहेब. आश्वासन देणार तर ते काम पुर्ण करा. पुर्ण करणार असाल तरच आश्वासन दया. तुम्ही आश्वासन दिलेले आहे. ते तुम्ही पुर्ण करणार आहात की नाही. आणि उगाच इथे ज्या पाय-या आहेत त्याला गणपती घाट म्हणुन नाव देवु नका. तिथे बाजुला डुकरे मरून पडतात तिथे तर गणपतीचे विसर्जन आम्ही करणार नाही. आम्ही गणपतीची विटंबना करणार नाही. तुम्ही व्यवस्था करत असाल तर हो बोला करत नसाल तर नाही बोला. तुमच्या प्रशासनाकडुन होणार नसेल तर नाही म्हणुन सांगा.

मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया पुनः बाहेर पडल्या.

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>महानगरपालिका तर्फे गणेश उत्त्सवाची पुर्ण तयारी केली जाईल. हे मी तुम्हाला आश्वासन देते. व मी आयुक्त साहेबांना आदेश देते की ही पुर्ण तयारी त्यांनी स्वतः डोळयासमोर करून घ्यावी. आणि कुणाला तक्रारीची संधी देवू नये. त्याचे काम आहे ऐकणे ते ऐकत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>यापुर्वी पण असे झाले आहे.

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>मी आयुक्तांना निर्देश देते की, लक्षवेधीवर त्यांनी बोलावे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. महापौरजी, मला बोलायचे आहे. माझ्यावर काय वारंवार अन्याय करता मा. महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सदस्य आता काही दिवसापुर्वी पोलिस आयुक्तांनी गणेश मंडळाची सभा घेतली होती. तिथे तुम्ही उपस्थित होतात. गटनेता, विरोधी पक्षनेता, श्री. राजेंद्र चौधरी व खुप जण उपस्थित होते. श्री. लाल पंजाबी साहेब पण उपस्थित होते. तेथे उपमहापौरांनी जाहीर केले होते की, आम्ही अशी कमिटी बनवु व पारितोषिक दिले जाईल. त्यानंतर रस्त्यावर जे खड्डे पडले आहेत. ते खड्डे बुजविण्यासाठी तिथे जे अधिकारी होते श्री. कोळेकर साहेब, यांनी पण जाहिरपणे माईक वर म्हंटले होते की, काही दिवसानंतर हे खड्डे भरले जाईल. परंतु अदयाप पर्यंत त्याबाबतीत काही हालचाल झालेली नाही. आता गणपतीची स्थापना होण्यासाठी दहा-बारा दिवस बाकी आहेत. हे तुम्ही कधी करू शकता. आयुक्त साहेबांना पण मी सांगितले होते. ते पण म्हणाले होते की आम्ही हे सर्व करू. त्यांना मी म्हंटले होते की एक रस्ता आहे जो गुरूनानक स्कुल डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व भिमसेन चौक येथुन तो रस्ता जातो. तिथे पण खुपसे खड्डे पडलेले आहेत. तर ते पण भरले गेले पाहिजे. कारण पाच नंबरचे गणपती विसर्जनासाठी जातात. गणपती विसर्जनासाठी जेव्हा बोलले जाते तेव्हा उल्हासनगर ३ येथील असलेल्या घाटाविषयी बोलले जाते. किंवा उल्हासनगर स्टेशन जवळील घाटासंबंधी बोलले जाते. परंतु ५ नंबर विषयी कुणी बोलत नाही. ४ व ५ नंबरमधील लोक गणपती विसर्जनासाठी ५ नंबर येथे शिवमंदीर येथे जातात. तिथे एक मोठा खड्डा आहे. त्या खड्डयात गणपती विसर्जन करतात. तिथे नाला वाहतो, नदी आहे त्यात विसर्जन करतात. त्याची पण स्वच्छता केली पाहिजे. मागील वर्षी अंबरनाथ नगरपालिका व उल्हासनगर महानगरपालिका दोघांनी मिळुन तेथील सफाई व व्यवस्था केली होती. यावेळी पण तसे झाले पाहिजे तर यासाठी आताचे महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब यांनी याकडे लक्ष दयावे. व जसे श्री. रमेश चव्हाण यांनी म्हंटले की, जे घाण पाण्यात गणपती विसर्जन केले जाते. आम्ही दहा दिवस गणपतीची भक्तीभावाने पुजा करतो. व दहाव्या दिवशी गणपतीचे घाण पाण्यात विसर्जन करतो. ही खेदाची बाब आहे. उल्हासनगर शहरासाठी तर विशेष करून ही फार खेदाची बाब आहे. मागच्या महासभेमध्ये असा प्रस्ताव आला होता, कदाचित लक्षवेधी सूचना आणली होती की विसर्जन करण्यासाठी घाट बनविला जावा. बोटक्लब येथील जागेबददल त्यांनी सांगितले होते. परंतु त्याबददलही अदयाप काहीही झालेले नाही. आयुक्त साहेब जर आपण उल्हासनगर स्टेशन येथील नाल्याकडे जाल त्याला वालधुनी नाला म्हणतात. त्या नाल्याच्या येथे जर तुम्ही गेलात तर तेथे शहरातील लोक मेलेली कुत्री, मेलेल्या म्हशी व गायी व इतर कचरा त्याच नाल्यात टाकतात. जर आपण तेथे गेलात तर आपल्याला कळेल की तेथे काय परिस्थिती आहे. व त्याच नाल्यामध्ये गणपती विसर्जन केले जाते. ही खुप शरमेची बाब आहे. दुसरे असे की आमचे जे सदस्य आहेत श्री. सुरेश जाधव यांचे मी अभिनंदन करू इच्छितो की, त्यांनी नाल्यात जे गणपतीचे विसर्जन व्हायचे ते विसर्जन चुकीचे आहे व शहरासाठी शरमेची बाब आहे. म्हणुन त्यांनी एक योजना बनविली आहे ३० x ६०' आकाराचा एक खड्डा व आठ फुट खोल असा एक खड्डा तेथे बनविलेला आहे. तो खड्डा टॅंकरच्या पाण्याने भरून त्यामध्ये गणपती विसर्जन करण्यासाठी त्यांनी शहरातील लोकांना आवाहन केले आहे. तर येथे लक्षवेधी आणण्याची काही आवश्यकता नव्हती. ज्यांनी लक्षवेधी आणली आहे त्यांना ही बाब माहिती होती. त्यांना हे ही माहित आहे की प्रशासन काही एक करत नाही फक्त आश्वासन देतात. मला असे वाटते की त्यासाठी त्यांनी लक्षवेधी सूचना आणलेली आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, माझा हरकतीचा मुददा आहे. सन्माननिय सदस्य बोलताना असे काही बोलतात की प्रशासन काही एक करत नाही. मा. सदस्य आपणांस माहित असावयास हवे की, या सभागृहात जे काही जनहिताचे निर्णय होतात त्याची अंमलबजावणी फक्त प्रशासनच करते. जर प्रशासनाने काहीच केले नसते तर आपण येथे चर्चाच करीत बसले असते व नंतर विसरून गेले असते. आपण श्री. सुरेश जाधव

यांनी चालु केलेल्या ज्या नविन योजने बददल सांगितले. श्री. जाधव आपणांस सांगतील की, मी स्वत: श्री. जाधव यांच्याबरोबर जागेवर जावुन जागेची पहाणी केली होती. व त्यानंतर परवानगी दिली होती. आपण फक्त त्यांचेच अभिनंदन करीत आहात. परंतु यामध्ये आमचे देखिल काहीतरी योगदान आहे. तुम्ही त्यांना विचारा. माझे म्हणणे असे आहे की प्रशासन फक्त आश्वासन देते असे म्हणणे चुकीचे आहे. आपण आधी म्हंटले होते की, बोटक्लबच्या इथे जे विसर्जन होते. त्याच दिवशी आम्ही त्वरीत माहिती घेतली व विसर्जनासाठी बोटक्लब खुला राहील याचा बंदोबस्त केला. जेथेही पारंपारीकरित्त्या गणपतीचे विसर्जन होते. तेथे जी दुरूस्ती आवश्यक असेल ती आम्ही सुरू केलेली आहे. जर आता आपण म्हणाल की त्याच दिवशी तेथे स्वच्छ पाणी असावयास हवे तर त्यासाठी पाऊस पाडण्याची जबाबदारी तर मी घेवू शकत नाही. परंतु आज तेथे ऐवढया वर्षापासुन जे विसर्जन होत आहे. ते घाट दुरूस्त करण्याची जबाबदारी आमची आहे. गणेश विसर्जनाचा जो मार्ग आहे. त्यावर जर आपणांस कोठेही खड्डा आढळुन आला तर ती जबाबदारी आमची असेल. गणेश विसर्जनाच्या मार्गावर जर कोठेही आपणांस पथदिवे बंद असल्याचे आढळुन आले तर ती जबाबदारी आमची राहील. रस्त्त्यावरील दिवे चालु ठेवणे, खड्डे भरणे, विसर्जनाच्या ठिकाणी व्यवस्था करणे ही जी कामे आहेत ती आम्ही करू शकतो. पारंपारीकरित्त्या जेथेही विसर्जन होते तेथे जो बंदोबस्त करणे आवश्यक आहे तो आम्ही करू. मी आपणांस सांगु इच्छितो की आता आपण जे विधान केले की प्रशासन काहीही करत नाही. तर येत्त्या दहा दिवसात आम्ही आपणांस सर्व काही व्यवस्था करून दाखवु. व यानंतरही आपली काही तक्रार असल्यास तर गणपतीची ज्या दिवशी स्थापना होते. त्या दिवशी आम्हाला सांगा की या या ठिकाणी काही झाले नाही आम्ही ते देखिल करून दाखवु. पण फक्त आरोप करणे की काहीच होत नाही हे चुकीचे आहे.

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>मला असे वाटते की, श्री. शांताराम निकम हे आता संतुष्ट झाले असतील.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम':-</u>मी संतुष्ट नाही आहे. मा. महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी मी जे म्हणालो की प्रशासन काही एक करत नाही ही बाब फार मनावर घेतलेली आहे. तर मला आशा आहे की दहा दिवसात ते खुप काही करून दाखवतील. जे आतापर्यंत झालेले नाही. दोन महिन्यांपुर्वी या लोकांनी लक्षवेधी सूचना आणली होती. तर आतापर्यंत हे व्हायला हवे होते. म्हणुन मी बोललो की प्रशासन काही एक करत नाही. मी असेही सांगु इच्छितो की, आयुक्त साहेबांनी आता सांगितले आहे ते मागील आठ महिन्यांपासुन येथे आहेत. त्यांनी बरीच काही कामे केलेली आहेत. हे सारे शहर पहात आहे. परंतु काही कामे अशी आहेत की जी अजुन त्यांनी केलेली नाहीत ती का केलेली नाहीत? ते फक्त त्यांनाच माहित आहे. मी आयुक्त साहेबांना व महापौरांना पुन्हा एकदा विनंती करतो की, गणेश विसर्जन करण्यासाठी ज्या काही सुविधा आहे जसे आता आयुक्त साहेबांनी सांगितले त्या सर्व सुविधा लवकरात लवकर व्हाव्यात. व प्रशासन काही एक करत नाही असे जे मी बोललो ते माझे शब्द मी परत घेत आहे. जयहिंद.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>मा. महापौर साहेब व मा. आयुक्त साहेब मागच्या दोन महिन्या अगोदरची लक्षवेधी सूचना काय होती?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, गणेशजीचे विर्सजन होते तिथे खाजगी व्यक्तीने गेट लावून अतिक्रमण केले होते, तुम्हांला ही भिती होती की, तिथे तुम्हांला गणपती विर्सजन करु दिले जाणार नाही. आम्ही त्वरीत त्या संस्थेशी पत्रव्यवहार केला, लिखित रुपाने त्यांनी दिले की यावर्षीपण गणेशविर्सजन करु दिले जाणार. त्यापूढेही गणपती विर्सजन तिथे

होईल. तसे आश्वासन सभागृहासमोर ठेवले होते. आणि आजपण ती आमची जबाबदारी आहे तिथे विर्सजन करुन घेण्याची.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> साहेब, घाण पाण्याचा पण विषय होता. त्यात उल्लेख होता म्हणून तुम्ही म्हणाला होता. कृत्रिम व्यवस्था करु.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> त्यात टॅकरने पाणी टाकू शकतो. परंतु त्यात जे घाण पाणी वाहते, ते पूर्ण बदलू शकत नाही. नेहमीसाठी पाणी स्वच्छ व्हावे म्हणून त्याला जे फिल्ट्रेशन प्लॉन्ट लागते, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉन्ट पाहिजे. तो सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉन्ट एक दिवसात तर होऊ शकत नाही. एक किंवा दोन महिन्यात करु शकत नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> इतक्या मोठ्या प्रोजेक्ट विषयी आम्ही सुध्दा बोलत नाही. आम्ही पर्यायी व्यवस्था सांगितली होती. कमी पैश्यात चांगली व्यवस्था होऊ शकते आम्ही पर्यायी व्यवस्था देखील सांगितली होती. त्यावर अजून तुम्ही कार्यवाही केली नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, रेल्वे स्टेशनच्या बाजूला एके ठिकाणी तात्पुरती विहिर खोदुन विर्सजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u> ती व्यवस्था तुम्ही नाही केली आहे. नगरसेवकाने केली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> हो नगरसेवकाने केली आहे तुम्ही पण तसा प्रस्ताव आणा आम्ही करु.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> तुम्ही काय करत आहात? आपण काय व्यवस्था केली ते सांगा ना साहेब?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, प्रशासनाचे काम आहे, पारंपारिक रुपाने जिथे गणेश विर्सजन केले जाते,तिथे बंदोबस्त करणार. जर तुम्ही दर वेळेस नविन सुझाव देत राहिला तर तुम्ही हे देखील पाहिले पाहिजे की, तुमचे सुझाव योग्य आहे. पारंपारीक रुपाने जिथे होते, तिथे जर गणेश घाट दुरुस्त नसेल, तर काही दुरुस्ती हवी असेल तर ती आम्ही करु. तुम्ही आता मागणी करत आहात की, नाल्यामध्ये चांगल्या पाण्याचा बंदोबस्त प्रशासनाने करावा. कुठुन करणार?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> आम्ही नाल्याविषयी बोललो नाही. आम्ही म्हटले की, तिथे आता घाणेरडा नाला वाहत आहे पूर्वी नदी होती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> आधीच तेथे घाण पाणी आहे जर पाऊस नाही पडला तर अजून घाण पाणी होईल. त्या अस्वच्छ पाण्यात विर्सजन करायचे का? हे मी बोललो होतो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> आजपर्यंत तुम्ही जे करत होता ते पाणी जर एका दिवसात स्वच्छ करण्याचे तुमच्याकडे जर काही उपाय असेल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> साहेब, तुम्ही पर्यायी व्यवस्था सांगितली होती की, टॅकर त्यात होते. तुम्ही नाही करत तर सांगा तसे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवाणी :-</u> मा. महोदय, मी तुमचे थोडे लक्षवेधू इच्छितो की, पूर्ण पाणी आपण स्वच्छ करु शकत नाही हे ठिक आहे. परंतु काही टॅकर वाले केमिकलचे पाणी नाल्यामध्ये टाकतात. ते बंद करा. कारण त्यामुळे प्रदुषण

तर होतेच  आणि तिथे रासायनिक पाणी टाकणे हे कायदयानुसार चुकीचे आहे. असे टॅकर जे उल्हासनदी मध्ये नाल्यामध्ये टाकले जाते, त्यावर मेहरबानी करुन अनुशासन केले जावे व अश्या लोकांवर कायदेशीर कारवाई केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>विसर्जन करतांना जर जिवित हानी झाली तर याला जबाबदार कोण आहे.  तुम्ही पाण्याचे तपासणी केली आहे का? कुंभमेळयायेथे पाणी तपासले जाते.  आंघोळ करण्यालायक आहे की नाही हे पाहतात. तुम्ही चेक केले का तुमची जबाबदारी नाही का? माणुस उडी मारून तेथे

विसर्जन करणार आहेत. ते पाणी त्या लायक आहे की नाही हे कोण बघणार साहेब आम्ही बघायचे?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा.महापौरजी, मी तुम्हाला एक सुझाव देवू इच्छितो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, इतक्या वर्षापासुन तुम्ही तेथेच विसर्जन करत आला आहात. जर आपणांकडे दुसरा काही पर्याय असेल तर तो दया आम्ही त्यावर कारवाई करू.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आम्ही तुम्हाला पर्याय सुचविला होता. बोट क्लबचा आम्ही तुम्हाला सुझाव दिला होता. तुम्ही त्याकडे लक्ष दिले नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>ते इतिवृत्तात देखिल आले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया,त्यावेळी असा सुझाव होता की त्या जागेवर खाजगी व्यक्तीने अतिक्रमण केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>एक पर्याय हे वारंवार सुचवत आहेत. तुमचे लक्ष त्याकडे जात नाही आहे. ती गोष्ट ही आहे की, हिराघाट मध्ये एक तलाव बांधलेला आहे. त्यांचे हे म्हणणे आहे की, श्री. रमेश चव्हाण यांनी सुझाव दिला होता की जर गणेश घाट आपण लवकर बांधु नाही शकलो तर हिराघाट येथे जे बोटक्लब आहे तिथे एक तळे आहे. एक्झीस्टींग तळे आहे. तिथे पाणी नाही भरले जात तिथे पाण्याची व्यवस्था करून त्याचे तिथे घाट स्वरुपात वापर  करु शकतो हा त्यांचा सुझाव होता.  त्याकडे आपण लक्ष दया. त्यांचा म्हणण्याचा अर्थ हाच आहे.  ते आपण करु शकता का?  हा एक सुझाव आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u> तुम्ही त्याचवेळी जाऊन जर तेथे पाहिले असते तर तुमच्या लक्षात आले असते आज एवढा मोठा प्रश्न निर्माण नसता झाला.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> त्यांचा वेगळा सुझाव आहे. परंतु वांरवार वेगळेच वातावरण निर्माण होत आहे.  तुम्ही फक्त उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> काय झाले साहेब?  मागच्या वेळेस यावर चर्चा झाली होती.  तुम्ही ऐकले पण होते मान्य पण केले होते.  परंतु उत्तर देतांना ते चुकीने राहून गेले होते. परंतु इतिवृत्तात ते आले आहे.  लहान-लहान मुर्त्या विर्सजित करण्यासाठी कृत्रिम व्यवस्था करायची होती.  बोट-क्लबचा त्यात उल्लेख आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> तुम्हांला जी भिती होती की, ती जागा बंद होईल.  म्हणून पर्याय पाहिजे होता.  आम्हांला वाटले की, ती जागा जर बंद होती म्हणुन अशी भिती असेल, म्हणून उपाय सुचविला. मी ती भिती

घालवली म्हणून मला वाटले की, पर्यायी व्यवस्था करायची गरज नाही. परंतु तुम्हाला जर असे वाटते की येणा-या दहा दिवसात करायचे असेल तर ते पण आम्ही करू. आमची त्यासाठी ना नाही. गणपती बाबत आपल्या मनात जेवढा आदर आहे. तेवढा आमच्याही मनात आहे. तर गणपतीची विटंबना आम्ही पण सहन करणार नाही. आम्ही त्यासाठी जे काय करायचे होते तुम्ही आम्ही मिळुन करू.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधवः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आमच्या अंबिका विश्वस्त मंडळाने गेले तीन चार महिने पत्रव्यवहार करून उल्हासस्टेशन जवळ गणेश घाट करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी अर्ज केला होता. तर आयुक्तांनी आमच्या त्याठिकाणी पहाणी करून त्याठिकाणी चांगल्या कामासाठी ताबडतोब खड्डा खणु शकता असे सांगितले आणि लेखी परवानगी देखिल दिली. त्याबददल मी त्यांचा आणि अंबिका मित्रमंडळाचा आभारी आहे. ज्याप्रमाणे गणपती विसर्जन हा आजचा विषय नाही. आज कित्येक वर्षापासुन गणेश विसर्जन त्या नाल्यामध्ये होते. पण यावेळेस सर्व लोक जागे झाले आहेत. मी त्यांचेही अभिनंदन करतो की इतक्या वर्षानंतर आम्हाला गणेश विसर्जनाविषयी जाग आली आहे. ज्याप्रमाणे अंबिका मित्र विश्वस्त मंडळ या शहरामध्ये आहे त्याप्रमाणे बहतेक मंडळे देखिल आहेत आणि नगरसेवकही आहेत. फक्त पंधरा दिवस आधी जर अशा सूचना नगरसेवकांनी आयुक्तांना दिल्या असत्त्या तर त्यांनी त्या सूचना नाकारल्या नसत्त्या. तरी मी पुन्हा आयुक्तांना धन्यवाद देतो आणि ज्यांना ज्यांना गणपती विसर्जन स्वच्छ पाण्यात करायचे असेल त्यांनी उल्हासस्टेशन जवळ आमच्या अंबिका मित्रमंडळानी आणि आयुक्तांच्या सहकार्यानी सर्वांच्या सहकार्याने तेथे विसर्जनासाठी जो खड्डा तयार केला आहे. त्यात त्यांनी सर्वांना सांगावे व स्वतःही विसर्जनासाठी यावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सन्माननिय महापौरजी, मी श्री. सुरेश जाधव यांना सांगु इच्छितो. असा प्रस्ताव आम्ही एक महिना अगोदर दिला आहे. महासभेमध्ये लक्षवेधी व्दारे. आणि हे इतिवृत्तात आहे आम्ही खोटे बोलत नाही. खोटे बोलण्याची किंवा तुम्हाला पुरावा देण्याची आम्हाला गरज नाही.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधवः-</u>आम्ही तुम्हाला खोटे बोलतो असे म्हणत नाही. आणि आम्हालाही खोटे बोलायला आवडत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकलः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब आमच्या सेंच्युरी समोरचा जो रस्ता आहे. सतत तेथे बारा महिने तेरा काळ तिथे खड्डे पडलेले असतात. यावर्षी गणपती येणार आणि प्रत्येक वर्षी तिथे खुप खड्डे पडलेले असतात. रिक्षा, गाडया कशा चालवत असतील ते लोक आणि बसणारे पेशंट वगैरे असतील यांना किती त्रास होत असेल ते त्यांचे त्यांनाच माहित. तर हे दरवर्षी असे का होते? आपण जर ठेकेदारास ठेका देता.....

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, तो कल्याण मुरबाड रोड आहे. आणि ते महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामाच्या अखत्त्यारीत येते. जर तिथे काही दुरूस्ती करायची असेल तर ती पण सार्वजनिक बांधकाम विभागाला करायची आहे. त्यांनी सांगावे लागेल. जर आपली काही तक्रार आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सांगु. आणि गणेश उत्त्सवापुर्वी दुरूस्ती करण्याची त्यांना विनंती करू.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकलः-</u>तरी पण मला तुम्हाला असे सांगायचे आहे की, ठेकेदाराला ठेका देताना काही करारनामा करत नाही का? दरवर्षी रस्त्यावर खड्डे पडतात.

*<u>मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे:-</u>मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब व सन्माननिय सदस्य आज गणेश आगमनाच्या निमित्ताने मी आयुक्तांना एक सुझाव देवू इच्छितो की, एक नंबर परिसरात गणपतीचे विसर्जन धोबी घाट सेंच्युरी क्लब येथे होते. उल्हासनदी बरीच खोल आहे. पाण्याचा तिथे प्रवाह आहे. तर मी आयुक्तांना एक सुझाव देवू इच्छितो की, तिथे जर प्रोफेशनल लाईफ गार्ड ठेवले गेले तर जिवित हानी होण्याची संभावना कमी राहील. मी ऐकले होते की तिथे सेंच्युरीचे पंपिंग हाऊस आहे. भव-यात सापडुन एक दोन जण मेले होते. माझ्या मते उल्हासनगरमध्ये देखिल बहुतेक जागी जिथे पाणी खोल आहे. त्याजागी अशा समस्या येवू शकतात. जर प्रोफेशनल लाईफ गार्ड ठेवले तर ही समस्या येणार नाही. मी आयुक्तांकडुन अपेक्षा करतो की, यावेळी गणपती विसर्जनात कोणतीही जिवित हानी होणार नाही. कृपया अशी दक्षता घेण्यात यावी. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, श्रीमती. सिमा मोकल ज्या रोड विषयी बोलल्या. आयुक्त साहेब, ज्या रस्त्याविषयी श्रीमती. सिमा मोकल बोलल्या. महाराष्ट्र शासनाच्या अखत्त्यारीत येतात. आपण जर सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगुन जर ते दहा दिवसात कदाचित होणार नाही म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये तिथे तात्त्पुरती व्यवस्था जसे ग्रीट टाकुन त्या रोडला आठ-दहा गाडया ग्रीटच्या टाकल्या. व व्यवस्था केली. तर मला वाटते तिथे काम होईल. तिथे खुपच रोड खराब आहे. १ नंबर व २ नंबरचे जितके पण मंडळ आहे. ते तिथेच गणपती विसर्जनासाठी येतात. म्हणुन जर तिथे तात्त्पुरती व्यवस्था केली तर योग्य होईल.*

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवार:-</u>मा. महापौरजी, सभागृह नेताजी,*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज इथे लक्षवेधी आणलेली आहे. गणपती उत्त्सव समिती बनविण्यासाठी मी आमच्या सर्व विरोधी पक्षीय सदस्यांचे धन्यवाद मानतो. कारण मागच्या वर्षी जेव्हा समिती स्थापन केली होती. तेव्हा प्रस्ताव आणला होता तेव्हा श्री. जमनादास पुरस्वानी म्हणाले होते की हा पेन इतक्याला नाही तितक्याला मिळतो या किंमतीत नाही त्या किंमतीत मिळतो. किंवा ही वस्तु ऐवढयात नाही तेवढयात मिळते. त्यांनी विरोध केला होता. म्हणुन प्रशासन आता एकेक वस्तु दहा वेळा पाहुन वारंवार टेंडर रिकॉल करून. त्यासाठी जो आमचा बक्षिस वितरण समारंभ असतो. सार्वजनिक गणेश उत्त्सवाचा हा कार्यक्रम खुप उशिरा झाला म्हणुन यावर्षी आम्ही विचार केला जेव्हा देवाच्या कामात असे करतात. जरे आमचे श्री. रमेश बंधु म्हणाले की देवाच्या कार्यात कोणताही अडथळा नाही आला पाहिजे. त्यानुसार या समितीवर आरोप ठेवण्यात आले. त्यावरून आम्ही विचार केला की समिती स्थापन न करणेच बरे. देवाच्या नावाने जर आरोप लावत असतील परंतु आमचे आयुक्त आज आयत्त्यावेळी विषय घेवुन आले. त्यामुळे मी त्यांचा धन्यवाद मानतो. जेव्हा हा आयत्त्यावेळचा विषय शेवटी येईल. त्यावेळी त्यांनी उपाध्यक्ष म्हणुन विपक्ष नेत्त्यांना सुचविले आहे. जेणेकरून कोणत्त्याही विरोधी पक्षीयांतर्फे आरोप लावले जावु नये. जेव्हा वस्तु खरेदी केली जाईल ते तर प्रशासनाचे काम आहे. राजकीय पक्षाचा काही सहभाग नाही परंतु त्यांच्या देखरेखीत होवो. विरोधी पक्ष पण समाधानी असो म्हणुन ही जी समिती होणार आहे. त्यामध्ये काही समस्या येणार नाही. मी आयुक्तांना यात देखिल धन्यवाद देतो की त्यांनी हा कार्यक्रम ३१ तारीख ते ९.९.२००३ पर्यंत जे विझिट करणार त्याचा बक्षिस समारंभ तो जानेवारीतच ठेवला आहे. गणपती उत्त्सव सुरू होण्यापुर्वी ज्या पण सदस्याने रोड विषयी साफ सफाई विषयी, लाईटचे काम ज्या पण सोयी आहेत दरवर्षी ज्याप्रमाणे केले जाते. ३१ तारखेपुर्वी केला गेला पाहिजे. महापालिका देव कार्यात जे जे काही सहयोग करू शकते. ती करावी व जलद कामे करावीत. श्री. आर. के. सोनवणे हे सक्षम अधिकारी आहेत. शहरवासियांना त्यांच्याकडुन जास्त अपेक्षा आहे. आणि मला असे वाटते की आयुक्त साहेब त्यात खरे उतरतील. आणि जी वस्तु त्यांना योग्य*

वाटेल व जशी जशी रास्त मागणी असेल. जसे ते आता म्हणाले की कुणीही सदस्य काहीही म्हणेल. प्रशासन योग्य असेल ते करू शकते. जे पण काही योग्य देवाच्या कामात आणेल. ते जर केले तर खुप चांगले होईल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी जे म्हणाले माझ्यावर आरोप लावला आहे. माझी त्यास हरकत आहे. मी मागील वर्षी कोणत्त्याही समितीसाठी विरोध केला नव्हता. की समिती का बनली का बनत आहे. किंवा समितीने काय केले. जर एखादया वस्तु खरेदीत भ्रष्टाचार झाला तर सन्माननिय महापौर व आयुक्तांचे लक्ष वेधुन घेणे. तर ते सदस्याचे कर्तव्यच आहे. वस्तुच्या खरेदीवर भ्रष्टाचारावर मी जर लक्ष वेधुन दिले तर मी काही चुकीचे केले नाही. जर तो भ्रष्टाचार नव्हता तर त्या वस्तु कशा आणल्या गेल्या? बक्षिस समारंभ का नाही केला गेला. एक वर्षानंतर जेव्हा समितीने आपला अहवाल येथे सादर केला तर येथे आजपर्यंत गणपती पारीतोषिक वितरण समारंभ का नाही करण्यात आला. ही एक गोष्ट दुसरी अशी की, जर त्यात भ्रष्टाचार नव्हता तर त्यावेळी असे सांगण्यात आले होते की हे दर आम्ही फक्त तुमच्या समोर ठेवले आहेत. या वस्तु अजुन खरेदी करणार आहोत. त्याचे मुळ दर महासभेत सांगितले जातील. तर वर्ष झाले तरी अजुन दर का नाही सांगण्यात आले. जेव्हा एकेका वस्तुचे दहा पट दर जर महासभेत प्रस्तावात आणतील तर आम्ही डोळे बंद करून प्रस्ताव पारीत करणार. तर या गोष्टीकडे लक्ष देवून सन्माननिय सदस्य , सभागृह नेता यांच्याकडे निवेदन करेन की बोलण्यापुर्वी स्वतःच्या पदाच्या श्रेष्ठत्त्वाचे भान ठेवावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौर माझ्या बोलण्याचा अर्थ श्री. जमनु यांच्या विरोधात नव्हता. त्यांना त्रास झाला त्याबददल मी खेद प्रकट करतो. मला त्यांना बोलायचे नव्हते की, श्री. जमनुजींनी भ्रष्टाचाराच्या विरोधात का आवाज उठविला. ते तर नेहमी भ्रष्टाचाराच्या विरोधातच राहिले आहे. याबाबतीत मी श्री. जमनुजीशी सहमत आहे की ते महापालिकेचा एकेक पैसा वाचवुन आम्हाला देतात. व महापालिकेचे पण खुप कामी येतात.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>माझी हरकत आहे. तुमच्याकडुन पण हीच अपेक्षा आहे की, तुम्ही महापालिकेचा पैसा वाचवावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी तुमची प्रशंसा करत आहे. ते पण तुहाला सहन होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी':-</u>मी कोणत्त्याही समितीचा विरोध केला नव्हता. तुमचे कर्तव्य आहे आणि सर्व सदस्यांचे कर्तव्य आहे की महापालिकेचा पैसा वाचवावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी तुमची प्रशंसा करतो ते तुम्हाला सहन होत नाही का?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>तुमचे पण कर्तव्य आहे पैसा वाचविणे, मी कोणत्त्या समितीसाठी विरोध केला नव्हता. किंवा मी असे नाही म्हणाालो की समिती नका करू. असे नाही की एकदा भ्रष्टाचार तुमचा पकडला म्हणुन तुम्ही समिती स्थापन करणे बंद करा. गणपती पारितोषिक देणे बंद करा. मी असे नाही म्हंटले होते की तुम्ही पुरस्कार नका देवू किंवा गणपतीसाठी समिती नका बनवु. पाहायला जावु नका. की एका वेळच्या जेवणाचे नगरसेवक लोक २०० रू. भत्ता मागतात. एकदा गणपती पाहायला जाताना पाच-पाच हजार रू. भत्ता व तीन-तीन हजार व्हिडीओ शुटींग खर्च देवकार्यात गफला करू नका असे मी म्हंटले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- मला हे माहित नव्हते की श्री. जमनादास पुरस्वानी यांना प्रशंसा केल्यावरही राग येईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-तुमच्या सर्टीफिकेटची मला आवश्यकता नाही. कृपया तुम्ही जे काही बोलाल ते माझे नाव न घेता बोला. तुम्ही महासभेत बोला. कुणाच्या सर्टीफिकेटची गरज नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-ठिक आहे. याचा खुलासा मी करू इच्छितो. पाच वर्ष ते सत्ताधारी पक्षात पण सदस्य होते. तीनदा सभापती होते. ९७-९८ मध्ये जेव्हा समिती होती तेव्हा पण आरोप लावले गेले होते. मी जे बोलु इच्छितो ते हे बोलु इच्छितो की, यावेळी आयुक्तांनी प्रशंसा करताना म्हंटले त्यांनी विरोधी पक्ष नेत्यांना देखिल उपाध्यक्ष याकरिता केले. कमीत कमी ते तुम्हाला संतुष्ठ करतील की दर बरोबर आहेत. तर ही गोष्ट लक्षात घेवून जेव्हा आयत्त्यावेळी हा विषय येईल तेव्हा सर्वसमंतीने हा ठराव मंजुर करू. व जसे मी म्हंटले तसे गणपती पारीतोषिक समारंभासाठी जी काय व्यवस्था आहे ती त्वरीत केली जावी.

मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-आयुक्त साहेब, आपण स्टेटमेंट दया.

मा. सदस्य श्री. नाना पवारः-मा. महापौर, फक्त दोन मिनिटे. माणुस कधी कधी भावनेच्या भरात आपले मानसिक संतुलन हरवतात. असाच एक प्रकार काही वेळापुर्वी सभागृहामध्ये घडला. सन्माननिय सदस्य श्री. शांताराम निकम यांनी म्हंटले की, प्रशासन काही काम करत नाही. व सन्माननिय आयुक्त साहेबांनी त्वरीत उत्तर दिले की जर प्रशासन काम करत नाही तर अशीच चर्चा करून निघुन जातात. तर ही जी प्रश्नोत्तरे सभागृहात झाली ते दोन्ही कडुन चुकीची झाली. मी सांगु इच्छितो की, प्रशासन जर विकासाची गाडी आहे. तर लोकप्रतिनिधी चालक आहे. तुम्ही चालकाशिवाय वाहन चालवु शकत नाही. तर सभागृहामध्ये वक्तव्य करताना सभागृहाचा दर्जा, लोकप्रतिनिधीचा दर्जा त्याचा सन्मान होणे जरूरी आहे. जर प्रशासनच सर्व काम करत असेल तर मग काय जरूरत आहे लोक प्रतिनिधींची? ग्रामपंचायत पासुन एम. पी. पर्यंत लोकशाही प्रक्रियेत लोक प्रतिनिधी पाठविले जातात असे नाही. शासनाचा कुणी प्रतिनिधी असो किंवा प्रशासनाचा कुणी अधिकारी असो हे कोणी मेहरबानी करत नाही. ते आपले कर्तव्याचे पालन करतात. सर्वांना आपल्या कर्तव्याचे पालन करायचे आहे. ही भावना या सभागृहात सर्वांच्या मनात असो हे बोलण्यासाठी मी उभा होतो धन्यवाद.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-एक मिनिट, तुम्ही लक्षवेधीचे उत्तर दया. सभागृह नेता म्हणाले, की माझ्याकडे मागच्या वर्षाच्या इतिवृत्ताची प्रत देखिल आहे. १९ सप्टेंबर ला सभा होती आणि त्यामध्ये जो समितीचा ठराव आहे. तो ठराव एकमताने झाला होता. हवी असल्यास मी प्रत दाखवु शकतो. समितीस विरोध कुणी केला नव्हता. फक्त असे होते की, मी पुन्हा सांगू इच्छितो भ्रष्टाचार विषयी त्यासाठी आम्ही सुचना दिली होती. त्यात दोन तीन गोष्टी अशा होत्त्या की जे समितीचे सदस्य आहेत त्यांना एक एक्झीक्युटीव्ह फाईल दिली जाईल ज्याची किंमत दोनशे रू. आहे. प्रत्त्येक सदस्याला एक पेन दिला जाईल त्याची किंमत ४० रू. या गोष्टीला विरोध झाला होता. विरोध समितीचा नव्हता फक्त दराबाबत विरोध होता. खर्च करते वेळेस महापालिकेचा पैसा आहे. तो सावधानपुर्वक खर्च झाला पाहिजे. फक्त विरोध यासाठी होता. परंतु समितीचा ठराव एकमताने झाला होता. हवी असल्यास मी एक प्रत दाखवतो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, लक्षवेधीवर निवेदन करण्यापूर्वी मी मा. सदस्य श्री. नाना पवार यांनी जी आठवण करून दिली आमच्या कर्तव्याबाबतीत. त्याबाबतीत मी काही बोलु इच्छितो मी नेहमी

असे समजून चालतो जर खरे बोलले तर राग येण्याचा किंवा त्याबाबतीत स्पष्टपणा करण्याची कधी गरज नसते. आणि जर कोणी चूकीचे बोलले असेल जर त्या गोष्टीचे खंडन नाही झाले तर लोक समजतात ती गोष्ट बरोबर आहे. मी श्री. शांताराम निकम यांच्या गोष्टीचे खंडन याकरीता केले मला वाटत होते ते चुकीचे बोलतात.

मा. सदस्य श्री. नाना पवार :- हरकतीचा मुददा.......

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,

मा. उप-महापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- पवारजी , दोन मिनिटे बोलु दया ना?

मा. सदस्य श्री. नाना पवार :- माझा हरकतीचा मुददा आहे सदस्य श्री. शांताराम निकम यांनी जे म्हटले त्याबाबतीत त्यांनी आपल्या भाषणात त्वरीत खेद व्यक्त केला.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):- मग महापौर महोदया, त्यांना या बाबतीत सफाई देण्याची काही गरज नाही.

मा. सदस्य श्री. नाना पवार :- तुम्ही जे त्वरीत भावनेमध्ये येऊन जे बोललात, या सभागृहात, मला असे वाटते की, सभागृहामध्ये जर मा. आयुक्त साहेबांनी बोललेले शब्द जर योग्य वाटत असेल तर मलापण त्या गोष्टीवर काही बोलायचे नाही. सभागृहाला जर ते योग्य वाटत असेल तर जे आयुक्त साहेब बोलले तर मग मला काय त्या गोष्टीचे?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- मा. महापौर महोदया,

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- आता आयुक्तांना बोलु दयावे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- मी हरकतीच्या मुदयावर बोलत आहे.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- सर्व जर हरकतीचा मुददयावर बोलु लागले तर असे कसे चालेल?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- हरकतीच्या मुददयावर कोणाही सदस्याला बोलु दिले जावे.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- परवानगी न घेता? तूम्ही आधी आयुक्तांना बोलु दया.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- कुणी काहीही बोलेल आम्ही सहन करायचे का?

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- तुम्ही आयुक्तांना बोलु दया त्यानंतर तुम्ही बोला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- मला आयुक्तांच्या बोलण्यावरच हरकतीचा मूददा घ्यायचा आहे. तुम्ही मला परवानगी देऊ शकता की नाही देऊ शकत?

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- तुम्ही आयुक्तांना बोलु दया.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- तुम्ही माझ्यावर पुन्हा अन्याय करु इच्छित आहात.
मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- ठिक आहे बोला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- आता आयुक्त हे नाना पवार यांच्या भाषणावर बोलले की, ते चुकीचे बोलत होते. मी काय चुकीचे बोललो? मी प्रशासनाची गोष्ट समोर आणली कि प्रशासन आश्वासन देऊन काही सुध्दा काम करत नाही. मी गणपती घाटाविषयी बोलत होतो. तेव्हा पंजाबी साहेबांनी सांगितले, रमेश चव्हाण साहेबांनी सांगितले. जो घाट त्यांनी सांगितला तसे प्रशासनाने केले का? अशा किती गोष्टी सांगु की, प्रशासनाने आश्वासन देऊनही काम केले नाही.

माझ्याकडे अशा खुप काही गोष्टी आहेत परंतु मी सांगु इच्छित नाही. मी जसे माझे शब्द परत घेतले तसे तुम्ही तुमचे शब्द सन्मानाने परत घेतले पाहिजे.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- मी तुम्हाला आश्वस्थ करते की, यावेळी सर्व काम वेळेवर होतील. तुम्ही निश्चित रहा.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- मा. महापौर महोदया, मी असे बोललो की, आयुक्त साहेब आता बोलले की शांताराम निकम चुकीचे बोलले म्हणून मी त्याचे खंडन केले. मी काय चूकीचे म्हटले. त्यांनी सांगावे. जर कुणी सदस्य सत्य समोर आणू इच्छितो ते काय चुकीचे झाले?

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- आता आयुक्तांना बोलु दिले जावे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- बोलू दिले जावे, परंतु त्यांनी शब्द मागे घ्यावे. त्यांनी जे चूकीचे बोलले माझ्याबाबतीत की मी चुकीचे बोललो ते त्यांनी सन्मानाने मागे घ्यावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):- मा. महापौर महोदया, लक्षवेधीवर मी निवेदन देवू इच्छितो, मागच्या वर्षी जी गणेश दर्शन स्पर्धा झाली त्याचा परिणाम आजपर्यंत प्रशासनाकडे आला नाही. समितीच्या सर्व सदस्यांना माहित आहे की त्यांनी अजून रिजल्ट दिला नाही आहे. परंतु गणेशदर्शन पारितोषिक वितरण होणे पण जरुरी आहे. म्हणजे पारितोषिक खरेदी करणे ती आम्ही केली आहे. मा. महापौर महोदयांना आम्ही विंनती देखील केली होती, त्या हिशोबाने त्यांनी ५ ऑगस्टला पारितोषिक वितरण समारंभ ठेवला होता, परंतु रिजल्ट न आल्याने ५ ऑगस्टला तो समारंभ होऊ शकला नाही. त्या वर्षाची जी क्रिडा समिती आहे त्या समितीने अजून रिजल्ट दिला नाही त्यामुळे म्हणून बक्षीस समारंभ होऊ शकला नाही. यावर्षीदेखील लक्षवेधी माध्यमामार्फत आमच्याकडे आणले गेले. आम्ही त्वरीत प्रस्ताव तुमच्या समोर मांडला आहे. आज क्रिडा समिती नाही आहे. म्हणून तदर्थ समिती एक तयार केली जावी. ती सभागृहनेता यांच्या अध्यक्षतेखाली, व विपक्ष नेता यांच्या उपाध्यक्षतेखाली, ती समिती काम करेल. त्या समितीत काही सदस्य असतील. व बाहेरचे काही चित्रकार, मुर्तिकार, नेपथ्यकार व काही पत्रकार किंवा समाजसेवक ते पण या समितीत असावेत असा आम्ही प्रस्ताव दिला आहे. यात मी दोन गोष्टी बोलु इच्छितो जर ती समिती गठित झाली तर या वर्षासाठी गणेश दर्शन स्पर्धेत जे पारितोषिक निश्चित करायचे आहे ते काम सोपे होईल. आणि जर मागच्या वर्षीचा निकाल आला तर पारितोषिक वितरण समारंभ देखील लवकरात लवकर

होईल. म्हणजेच प्रशासनातर्फे मागच्या वर्षीचे पारितोषिक वितरण व यावर्षीचे गणेशदर्शन स्पर्धा पारितोषिक वितरणासाठी समिती ही दोन्ही कामे झाली आहेत. फक्त समितीचा निकला येणे बाकी आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. महापौरजी समितीला गणेश दर्शन.........

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- हा आयत्त्यावेळी विषय आहे ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- या गणेश समितीचा अहवाल आहे या महापालिकेचे कर्मचारी क्रिडा समिती सभापतीचे स्विय सहाय्यक श्री. अनुप भागिया ते दरवर्षी देतात. मुर्तीकार पण असतात तुम्ही याबाबतीत श्री. अनुप भागिया यांचेकडुन स्पष्टीकरण मागवा. त्यांनी तो आजपर्यंत तो अहवाला का नाही दिला.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- श्री. अनुप भागिया यांच्याकडुन स्पष्टीकरण मागविण्यात यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी महापौरांकडुन अनुमती मागू इच्छितो ....

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- लवकरात लवकर घेतली जावी.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- लवकरात लवकर घेतले जाईल. आठ दिवसाच्या आत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी पण तेच म्हणत आहे. ३१ तारखेपूर्वी बक्षिस समारंभ झाला पाहिजे.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- आठ दिवसाच्या आत अहवाल मागवावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- दुसरे मी अभिनंदन देऊ इच्छितो व महापौरांकडुन अनुमती मागवू इच्छितो की, आमच्या सदस्या श्रीमती अनिता धर्मेंद्र गुप्ता या माता झाल्या आहेत. यांना मुलगा झाला आहे म्हणून श्री. प्रभुनाथ गुप्ता सर्व सदस्यांचे व महानगरपालिका कर्मचा-यांचे पेढे वाटून तोंड गोड करु इच्छितात. परवानगी दयावी.
मा. महापौर :- परवानगी आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-एक आयत्त्या वेळेचा विषय आहे. सन २००३ व २००४ करीता गणेश दर्शन स्पर्धा समिती नेमणे बाबत.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- सर्वानुमते स्विकारण्यात येत आहे.
मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सर्वांना मान्य आहे ना? सर्व संमतीने ना?

मा. उपमहापौरः-सदरचा विषय सर्वानुमते आजच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत आहे.
मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय क्र. २:- मागील सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.
(सर्वसाधारण महासभा दि. १८.७.२००३ व
विशेष महासभा दि. २१.७.२००३ )

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. महापौरजी, मागच्या वेळेस जी सभा झाली होती. पान नं. ७५ वर लिहिलेले आहे की, श्री. किशोर वनवारी म्हणाले की, चौकाला लोकमान्य टिळक नाव दिले जावे. असे मी महासभेत म्हटले नव्हते. मी जेव्हा विषय वाचला गेला तेव्हा असे म्हटले होते, त्यावेळी विरोधी पक्ष नेत्याला म्हणालो होतो की, हा प्रस्ताव तुम्ही आणला आहे. तुमची व अंकुश म्हस्के यांची सही आहे. जसे हे आणले गेले गोविंदराव चौक आणि गोविंदराव अहूजा मार्ग ते म्हणाले होते ठिक आहे, ठिक आहे, परंतु मला बोलु दया. तर जेव्हा ते हे बोलले त्यावेळी माझे लक्ष नव्हते गेले. इतिवृत्तात जे आणले गेले, ते काढले जावे. लोकमान्य चौक नाव ठिक आहे असे मी नव्हतो म्हटलो. या ठरावात जो बदल करावयाचा आहे तो आम्ही पूढच्या सभेत आणू.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- नाही नाही आता चौकाचे नाव दिले आता पुढच्या मिटींगमध्ये काय आणणार?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी जे म्हटले नाही ते आले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- त्यांनी जे नाही म्हटले आहे ते काढून टाकावे.

मा. उपमहापौर / पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- ते काढण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- एक मिनिट, सचिव साहेब, हे जर असेल की सदस्य जे बोलत नाही. आणि ते जर इतिवृत्तात येत असेल तर चुकीचे आहे. म्हणजे तुम्ही अधिकाराचा गैरवापर करत आहात. अशा या पध्दतीचे हे वातावरण आहे. ते आहे की नाही हे दोन्ही सदस्यांना दाखवा आणि नसेल तर ते कट करा. तुमच्या कडे टेपस् आहेत. रेकॉर्डींग आहे. इथे तुमचे चार-चार जण इतिवृत्त लिहिणारे आहे ते खोटे लिहितात, चुकीचे लिहितात, किंवा त्यामध्ये तुम्ही काहीतरी बदल करतात. तसे होत नसेल तर जसे आहे तसे तुम्ही लिहिलेले आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- श्री. किशोर वनवारी सन्माननिय सभागृह नेता यांनी जी हरकत घेतली आहे, ७५ नं. पानावर खालून दुसरे जे वाक्य आहे, श्री. किशोर वनवारी यांच्या नावासमोर जे वाक्य लिहिले गेले आहे, ते संगणक चुकीमुळे प्रिंट झाले आहे. परंतु मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांच्या वक्तव्यात एक शेवटचे वाक्य आहे, सहमत आहात? ठिक आहे. हे वाक्य श्री. किशोर वनवारी म्हणाले होते.

मा. उपमहापौर / पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :-त्यास दुरुस्त केले जावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- नाही दुरुस्त नाही करायचे.

मा. उपमहापौर / पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :-काढुन टाकले जावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी म्हटले होते, गोविंदराम चौक व गोविंदराम मार्ग हे अंकुश म्हस्के व विरोधी पक्ष नेता यांनी आणले होते. व लोकमान्य टिळक चौक हे श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई यांनी आणले. मी म्हटले होते

राजेंद्र चौधरी यांना तुम्हीच आणले आहे गोविंदराम चौक व गोविंदराम मार्ग. त्यावर अंकुश म्हस्के यांची सही आहे त्यांना पत्र दिले आहे की गोविंदराम चौक व रोड असे पास. जसे तुम्ही दिले त्याच्याशी सहमत आहोत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- नाही-नाही. इतिवृत्तात आले आहे मी कधी म्हटले आहे मी स्पष्ट केले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- तुम्ही पत्र दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-मी नाही दिले पत्र .

मा. सदस्या श्रीमती निता अहूजा :- तुमचे पत्र आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- गोषवा-यात लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- तुम्ही एकदा रुलिंग दिले आहे. नंतर तुम्ही म्हणता मी नाही असे म्हटले.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- चौधरीजी तुमचे पत्र आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- नाही नाही मी नाही पत्र दिले माझ्या लेटरपॅडवर नसेल. कोणतरी सही घेतली असेल माहित नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- गोषवा-यात तुमचे नाव आहे.

मा. उपमहापौर / पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- गोषवा-यात तुमचे नाव असेल. यांनी सही दिली आहे का?

मा. सदस्या श्रीमती निता अहूजाः- यांनी सही दिली आहे असे कसे न वाचता सही दिली का? तुम्ही वाचले नाही का सही कशी दिली तुम्ही?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- मी म्हटले होते की चौकाला बाळगंगाधर टिळक नाव दिले जावे आणि युएमसी पासून ते प्रकाश ऑटो पर्यंत रस्त्याचे नाव दिले जावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- तुम्ही महासभेत बोलला आहात त्यासाठी मी नाही म्हणत नाही. जे गोषवा-यात होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- हे पहा लेटर दिल्यानंतर देखील मी लेटर क्लीअर केले होते.

मा. सदस्या श्रीमती निता अहूजाः- तुमची पत्रावर सही आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- सचिव साहेब, तुम्ही इतिवृत्ता बाबत बोला. जे काही इतिवृत्तात खरे आहे ते बोला.

मा. सचिव (श्रीप्रकाश कुकरेजा):- श्री. किशोर वनवारीजी फक्त दोन शब्द बोलले सहमत आहात की काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी म्हणतो ना.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे तुम्ही बोलले ते लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः- चौधरी साहेबांनी त्यावेळी काय म्हटले होते?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-सचिव साहेब तुम्ही श्री. किशोर वनवारी यांच्या तोंडी चौकासाठी लोकमान्य टिळक चौक असे नाव ठिक आहे, सर्व संमतीने मंजुर हे कुठून आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- हे संगणक चुकीमुळे झाले आहे. यांचा प्रस्ताव होता, मला कृपया खुलासा करु दया.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- नाही तुम्ही रेकॉर्डिंग दाखवा, इतकी मोठी जर संगणक चूक होऊ शकते. तर पुर्णच्या पुर्ण प्रस्तावात तुम्ही चुक करु शकतात. इतक्या मोठया वाक्याची जर संगणक चुक होऊ शकते तर पूर्ण इतिवृत्तात चूक होऊ शकते. तर इतिवृत्तातील प्रस्ताव च्या प्रस्ताव तुम्ही बदल करु शकतात. असे इतिवृत्त लिहिण्यात काही अर्थ नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- टेप अजूनपण तुम्ही चालवू शकता शब्द तोच आहे. सहमती आपली आहे. जे मी बोलत आहे ते सत्य आहे. यात काही दुमत नाही. त्यांनी अचानक उठुन सांगितले होते की, सहमत आहे , ठिक आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- कशाला ठिक आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- म्हणजे त्यांनी जो सुझाव दिला त्यासाठी ठिक आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- कोणता सुझाव दिला होता तो वाचा. लोकमान्य टिळक चौकाचा सूझाव दिला होता.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-अर्थ तोच निघत आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ठिक आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- त्यामध्ये मी सुधारणा करु इच्छितो जे गोषवा-यात आले होते, श्री. राजेंद्र चौधरी विरोधीपक्ष नेता यांनी सहमती दिली होती. त्यासाठी मी म्हटले सहमत आहात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- नाही नाही तुम्ही १० वर्षापूर्वीचे बोलाल तर काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- गोषवा-यात जे लिहितात, परत दुसरे स्टेटमेंट देतात, मी म्हटले होते जो यांनी गोषवारा आणला त्याच्याशी सहमत आहात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ते तुम्ही पाहून घ्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी वर सुचविल्याप्रमाणे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- नाही ठरावात बदल नाही होऊ शकणार. तुम्हाला प्रस्ताव आणावा लागेल सुधारणासाठी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- जे शब्द माझ्या नावापुढे लिहिले आहे ते चुकीचे आहे ते मी बोललो नाही. तुम्ही म्हटलात चुकीने लिहिले आहे. दुसरे असे की, मी म्हटले की, यांनी जो गोषवारा दिला त्यात विरोधी पक्ष नेता व श्री. अंकुश म्हस्के यांचे नाव होते, त्यांच्याशी मी सहमत होतो. पण तुम्ही म्हणत आहात तसा सुधारणा प्रस्ताव आणला तर ठिक आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- म्हणजेच लोकमान्य टिळक चौक यांस यांचा विरोध आहे. तसा यांचा प्रस्ताव आला पाहिजे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तो जेव्हा येईल तेव्हा येईल,आता म्हणत नाही आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- पुन्हा दिशाभूल करत आहे मी लोकमान्य टिळक यांचा अपमान करत नाही आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- तुम्हाला लोकमान्य टिळक नावाचा विरोध का आहे? ७ नंबर मध्ये पण आहे ,३ नंबर मध्ये पण आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- कोण म्हटले की, ७ नंबरमध्ये विरोध आहे. आपण खोटे बोलतात मी कधीच विराध केला नाही ७ नंबरमध्येपण.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :- सन्माननिय महापौर महोदया, जर सभागृहनेता यांचा विरोध नसेल तर पास करा त्या चौकाला लोकमान्य टिळक असेच नाव दिले गेले पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती. बेबी वसीटा सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- मा. महापौर, सचिव साहेब जकातीचे जे इतिवृत्त आहे, तूम्ही त्यात दाखविले आहे किती सदस्य उपस्थित आहेत. किती उपस्थित आहेत किती अनुपस्थितीत आहेत, इतर सदस्य ज्यांनी सहया केल्या आहेत पण सभागृहात नाही आले. ते अनुपस्थित दर्शाविले. तर मी निवेदन करेल की दरवेळी जे सदस्य बाहेर सही करुन आत येत नाहीत, त्यांना येथे अनुपस्थित दाखविले. आजपर्यंत असे होते की, जे सदस्य सही करुन बाहेर गेले त्यांची पण येथे उपस्थिती दाखविली. कृपया आपल्याशी निवेदन करेल की जो सदस्य सभागृहात येणार नाही, जसे तुम्ही ऑक्टायच्या इतिवृत्तात लिहिले आहे की, ज्या सदस्यांनी सही केली पण सभागृहात आले नाही. ते अनुपस्थित आहेत, आता नेहमी असेच करण्यात यावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- ही तिस-यांदा प्रॅक्टीस होत आहे, यापूर्वी श्रीमती प्रेमा खांडेकर मा. सदस्या स्वाक्षरी करुन गेल्या त्यांच्यासाठी लिहिले होते, सभागृहात प्रवेश नाही केला म्हणून अनुपस्थित समजले जाईल, ठिकयाच त-हेने मा. अनिल जयसिंघानी हे सही करुन निघुन गेले, ते सभागृहात आले नाहीत त्यांना पण आम्ही अनुपस्थित दाखविले आहे. आमच्या कर्तव्यकठोरतेवर व स्पष्टतेवर कोणी संशय घेऊ शकत नाही.

काही सदस्य :- खरे आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे: सचिव साहेब, श्री महेंद्र मुलचंदानी व श्री. अनिल जयसिंगानी यांना आम्ही कधीच सभागृहात पाहत नाही. पण ते नेहमी उपस्थित

दाखवता म्हणजे तुम्ही दुजाभाव करता. श्री. अनिल जयसिंघानी यांना आम्ही ६-७ महिन्यापासून पाहिले नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- आजपण ते होते येथे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- श्री. महेंद्र मुलचंदानीपण सभागृहात उपस्थित दिसत नाही. तरी पण तुम्ही उपस्थित दाखवता?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- नाही ते आज कुठे? नाही आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- आज नाही यापूर्वीच्या सभेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- आज आले होते ,जे खरे आहे ते बदलू नाही शकत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- त्यावेळी बोडारे साहेब नव्हते. ऑक्टोबरच्या वेळी तुम्ही नव्हता.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- पास?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- विशेष महासभेस आमचा विरोध आहे.

मा. उपमहापौर/ पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- तुम्ही उपस्थितच नव्हता तर विरोध कसा कराल? त्यावेळी तुम्ही नव्हता. तुम्ही उठून बोला काय बोलु इच्छिता?

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी :- मा. महापौरजी, आम्ही हे बोलु इच्छित आहे की, इतिवृत्त तर आता पास होत आहे ना? आम्ही उपस्थित आहोत ना? आम्ही विरोध करत आहोत.

मा. उपमहापौर/ पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :-नाही नाही तूम्ही त्यावेळी उपस्थितच नव्हता. तुम्ही पूर्ण कार्यवाही पाहिली पण नाही.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी :- आम्हाला तुम्ही येथे विचारत आहात ना?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- आमची यास सहमती नाही.

मा. उपमहापौर/ पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :-मग तुम्ही विरोध करा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- आम्ही हेच तर म्हणत आहोत.

मा. उपमहापौर/ पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- ठिक आहे, तुम्ही यांचा विरोध नमुद करा. सदरचे इतिवृत्त वरील सुधारणेसह पुढीलप्रमाणे बहुमताने संमत करण्यांत येत आहे. ज्यांचा विरोध आहे त्यांनी सांगा, नाहीतर म्हणाल संख्या कमी झाली.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- नाही जे उपस्थित नव्हते त्यांचा विरोध आहे ना?

मा. उपमहापौर/ पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :- होऊ शकते कुणाचे मन बदलले असेल तर? असे कसे तुम्ही म्हणता?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- तुमचे मन बदलले का?

मा. उपमहापौर/ पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :-माझे कसे बदलेल? असे होत नाही. माझे कर्तव्य आहे सचिवांना सांगणे.

मा. उपमहापौर/ पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :-जे सदस्य आज येथे उपस्थित आहेत परंतु दि. २१.७.०३ रोजीच्या विशेष महासभेत उपस्थित नव्हते त्यांचा विरोध येथे नमुद करण्यात येत आहे. आणि दि. १८.७.२००३चे इतिवृत्त सर्वानुमते तर दि. २१.७.२००३ चे बहुमताने कायम करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषय क्र. ३:- जलअभियंता व विकास अभियंता (विद्युत) या पदांची निर्मिती बाबत दि.९.७.२००३ स्थायी समिती ठराव क्र. ४४ कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- या प्रस्तावात दोन गोष्टी आहेत. पदनिर्मितीबाबत, एक पद आहे जलअभियंतासाठी व दुसरे पद आहे विकास अभियंता(विद्युत) पाणी पुरवठा योजनेसाठी जल अभियंता शहरात असले पाहिजे. त्यास आमची सहमती आहे. परंतु विकास अभियंता कशासाठी हवा आहे. कारण आम्हांला वाटते की आमचा विद्युत विभाग खुप चांगल्या त-हेने काम करत आहे. त्यासाठी कुणा व्यक्तीला कुणा नगरसेवकाला कुणाला तक्रार नाही. उलट आपल्या महापालिकेचे विद्युत विभाग दुस-या महापालिकेसाठी चांगले उदाहरण आहे असे मानले जाते. यासाठी अजून एक पद निर्माण का करु इच्छिता या विषयी जर खुलासा केला तर आम्ही त्यावर चर्चा करु. यासाठी माझी विनंती आहे की, तुम्ही आम्हांला याबाबतीत सांगावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):- मा. महापौर महोदया, जलअभियंता पदासाठी निवेदन करण्याची गरज नाही. व विकास अभियंता पद निर्माण करण्यामागे उद्देश फक्त एकच आहे जसे की तुम्ही सांगितले आपल्या महापालिकेचा विद्युत विभाग बाकी महानगरपालिकेकडे उदाहरण आहे, तर त्यामध्ये काम करणारे कर्मचारी किंवा कार्यकारी अभियंता यांना पदोन्नतीसाठी काहीच संधी नाही जर तुम्ही मान्य करता चांगले काम करता तर त्यांना पदोन्नतीची संधी मिळाली पाहिजे. म्हणून पद निर्माण करण्यासाठी प्रस्ताव ठेवला आहे.

काही सदस्य :-पास...

मा. उपमहापौर/ पिठसीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:- जलअभियंता व विकास अभियंता (विद्युत) या पदांची निर्मिती बाबत दि.९.७.२००३ स्थायी समिती ठराव क्र. ४४ कायम करणे बाबत.

**izLrkou %&**

mYgkluxj 'kgjkph HkkSxksfyd jpuk map l[ky vlY;keqGs ik.;kps forj.k leku rRokoj gksr ukgh- ;kph lokZuk tk.kho vkgs- lnj leL;sP;k fuokj.kklkBh fdyksZldj dUlyaVlhP;k vgokykP;k vk/kkjkoj ik.kh iqjoBk ;kstuk VIik dzekad 1 egkjk"V~ thou izkf/kdj.kk ekQZr gkrh ?ks.;kr vkysys vlqu lnj dke iq.kZ gks.;kP;k ekxkZoj vkgs- VIik dzekad 1 iq.kZ >kY;kuarj VIik dzekad 2 jkco.;klkBh egklHksus eatqjh fnysyh vkgs- lnj ik.kh iqjoBk ;kstuk jkcfoY;kuarj egkikfydsl lqiqnZ dj.;kr ;sbZy o R;k laca/kh nSuanhu ns[kHkky egkikfydsl djkoh ykxsy- lnj ;kstuk varZxr okghU;k lqfLFkrhr i.ks pkyfo.;klkBh rlsp l/;kP;k tyokghU;k O;ofLFkr d#u ufou ;kstus varZxr Vkd.;kr ;s.kk&;k tyokghU;k synchronize d#u forj.k O;oLFksoj pkaxY;k fjrhus fu;a=.k dj.;kdjhrk ,dk l{ke vf/kdk&;kph vko';drk vkgs- toGiklaP;k brj egkuxjikfydsr ty vfHk;ark gs in vLFkkiusoj vlqu ik.khiqjoBk O;oLFkk R;kaP;k vf/kiR;k[kkyh fnysY;k vkgsr- R;kp /kfrZoj mYgkluxj egkikfydsr lq/nk ,dk ty vfHk;arkps in fuekZ.k dj.ks vko';d vlqu izLrkfor vkgs- ;k inkph fufeZrh osru Js.kh #- 12000& 375&16500 e/;s dj.ks ;ksX; jkghy-

R;klkBh 'kS{k.khd vgZrk iq<hy izek.ks vklkoh-

**v½ ljG lsok izos'kkus**

**1-** egkikfydk lsosr dke dfjr vlysY;k deZpk&;kaO;frfjDr vU; mesnokjkaps o; 40 o"kkZ is{kk tkLr vlw u;s-

**2-** ekU;rk izkIr fo|kfiBkaph ch-bZ- flOghy inoh o dk;Zdkjh vfHk;ark vFkok rRle inkojhy dke dktkpk izR;{k 5 o"kZ vuqHko vko';d] vFkok Mh- lh- bZ- infodk] ifj{kk mRrh.kZ] infodk /kkjdkaP;k ckcrhr dk;Zdkjh vfHk;ark vFkok rRle inkojhy 7 o"ksZ vuqHko vko';d-

**c- inksUurhus**

1- dk;Zdkjh vfHk;ark] flOghy inkojhy vf/kdk&;kae/kwu] T;kauh ekU;rk izkIr fo|kihBkph ch-bZ- flOghy inoh vFkok Mh- lh- bZ- infodk /kkj.k dsysyh vkgs- ch-bZ- flOghy inoh/kkjdkaP;k ckcrhr dk;Zdkjh vfHk;ark inkojhy dkedktkpk fdeku 4 o"kZ vuqHko vko';d o infodk/kkjdkaP;k ckcrhr dk;Zdkjh vfHk;ark inkojhy fdeku 6 o"ksZ vuqHko vko';d-

**d izfrfu;qDrh**

1- egkjk"V~ ftou izkf/kdj.k ;sFks vf/k{kd vfHk;ark ;k inkoj dk;Zjr vf/kdkjh-

mYgkluxj egkuxjikfydk gn~nhrhy jks'kukbZ djhrk ,dw.k 10500 is{kk tkLr fo|qr fnos yko.;kr vkys vkgs- lnj fnO;kr 400 okW-] 250 okW- o 40 okW- fnO;kaP;k lekos'k vkgs- rlsp 'kgjkr fofo/k pkSdkr 8 gk;ekLV clfo.ksr vkysys vkgsr- ;klkBh egkuxjikfydsP;k fo|qr foHkkxkP;k vLFkkiuk oj ,d dk;Zdkjh vfHk;ark] nksu mi vfHk;ark] 7 dfu"B vfHk;ark] 8 fotra=h] 40 rkjra=h] 56 enrful gh ins eatwj vkgsr vkf.k fuxk o nq#Lrh lkBh 7 lsok okgu] okgupkydk lg fo|qr foHkkxk[kkyh dk;Zjr vkgsr- mYgkluxj egkuxjikfydk QDr ,d egkuxjikfydk vkgs tsFks fnokcRrhph fuxk o nq#Lrh foHkkxh; deZpk&;k ekQZr dj.;kr

;sr vkgs-  lnj O;oLFkk lqjGhr ikj ikM.;klkBh fo|qr foHkkxkr Lora= HkkaMkj O;oLFkkiu dj.;kr vkysys vkgs-

jLR;kojhy fnO;k f'kok; egkuxjikfydsP;k fofo/k foHkkxh; dk;kZy;] izHkkx {ks= dk;kZy;] gsyFk iksLV] egkikfydsps fdzMk ladqy] vfXu'kked LFkkud] gktsjh 'ksM] Hkkth cktkj] bR;knh tkxh ykbZVps fnos] ia[ks] okVj dqyj] bR;knh yko.;kr vkysys vkgsr-   f'kok; egkikfydsP;k eq[;ky;kr o izHkkx {ks= dk;kZy; ;sFks 63  okrkuqdqyhr ;a= cloysys vkgsr-   gs loZ clfo.;kps o R;kaph  fuxk o nq#Lrhps dk;Z foHkkxh; deZpk&;k ekQZr dj.;kr ;srs- rlsp e-jk-fo- eaMGkps ns;d r;kj d#u Hkj.;kps dk;Z i.k fo|qr foHkkxk ekQZr djkos ykxrs-

lnj fo|qr dk;kZ f'kok; fo|qr foHkkxkyk eq[;ky;kr cloysys bZ-ih- ,- ch- ,Dl (EPABX) T;kph {kerk 16@96  ,o<h vkgs o ch-,l- ,u- ,y (BSNL) ekQZr  67 FksV nqj/ouh eq[;ky;kr o fofo/k egkikfydk dk;kZy;kr cloysys vkgs] R;kaph ns[kHkky nq#Lrh o ns;d ikfjr dj.;kps dk;Z i.k fo|qr foHkkxkr vlysY;k deZpk&;k ekQZr djkos ykxrkr-

l/;k fo|qr foHkkxkyk jLR;kr ;s.kkjs e-jk-fo-eaMGkps iksy o jksfg=s gyfo.;kps dk;Z lksifoys vkgs] ts e-jk-fo- eaMGkus djko;kps vkgs- gkrh ?ksrysY;k dk;kZl 100 is{kk tkLr iksy o 10 is{kk tkLr jksfg=s gyfo.;kps dk;Z tksjkus lq# vkgs o vk.kf[ku dkgh iksy o jksfg=s gkyfo.;kps dk;Z dj.;klkBh  dkxn i=kps dk;Z lq# vkgs-

'kklukus 27 Qszcqokjh 2003 jksth mYgkluxj egkuxjikfydsps lax.kdhdj.k dj.;kps  fu.kZ; ?ksrysyk vkgs-  R;k fu.kZ;kP;k veyctko.kh dfjrk egkuxjikfydsus Bjko dzekd 4 fnukad 25@4@2003 jksth lax.kdhdj.k dj.;kps /kksj.kkRed fu.kZ; ?ksrysys vkgsr gs  dk;Z i.k fo|qr foHkkxkyk lksio.;kr vkysys vkgs-

ojhy loZ dk;kZoj ;ksX;jhR;k ns[kjs[k dj.;kdfjrk  vf/k{kd vfHk;ark (fo|qr) ps vf/kdkj vl.kkjs in fuekZ.k  dj.ks vfr vko';d vkgs-

'kklukus uxj fodkl foHkkx fu.kZ; dz- ih-lh-lh- 3096@825@ iz-dza- 126@ ufo &22 fnukad 20@6@1997 vUo;s fiaijh fpapoM egkuxjikfydslkBh fodkl vfHk;ark ;k inkyk ekU;rk fnysyh vkgs-  R;kp /kjrhoj mYgkluxj egkuxjikfydsps dkekP;k O;kik uqlkj fodkl vfHk;ark ¼fo|qr½ ;k inkph fufeZrh osru Js.kh   #- 12000& 375&16500 e/;s dj.ks ;ksX; jkghy-

R;klkBh 'kS{k.khd vgZrk iq<hy izek.ks vlkoh-

**v ljG  lsok izos'kkus**

1. egkikfydk lsosr dke dfjr vlysY;k deZpk&;kaO;frfjDr vU; mesnokjkaps o; 40 o"kkZ is{kk tkLr vlw u;s-
2. ekU;rk izkIr fo|kfiBkaph ch-bZ- bysfDV~zdy inoh o dk;Zdkjh vfHk;ark vFkok rRle inkojhy dke dktkpk izR;{k 5 o"kZ vuqHko vko';d] vFkok Mh-bZ-bZ- infodk] ifj{kk mRrh.kZ] infodk /kkjdkaP;k ckcrhr dk;Zdkjh vfHk;ark vFkok rRle inkojhy 7 o"ksZ vuqHko vko';d-

**c- inksUurhus**

1- dk;Zdkjh vfHk;ark] fo|qr inkojhy vf/kdk&;kae/kwu] T;kauh ekU;rk izkIr fo|kihBkph ch-bZ- bysfDV~zdy inoh vFkok Mh- bZ- bZ- infodk /kkj.k dsysyh vkgs-  ch-bZ- bysfDV~zdy inoh/kkjdkaP;k ckcrhr dk;Zdkjh vfHk;ark inkojhy dkedktkpk fdeku 4 o"kZ vuqHko vko';d o infodk/kkjdkaP;k ckcrhr dk;Zdkjh vfHk;ark inkojhy fdeku 6 o"ksZ vuqHko vko';d-

**d izfrfu;qDrh**

1- e-jk- fo eaMG fdaok lkoZtfud cka/kdke [kkR;kP;k fo+|qr Hkkx ;sFks vf/k{kd vfHk;ark ¼fo|qr½ ;k inkoj dk;Zjr vf/kdkjh-

lnj izLrkokl ek- LFkk;h lferh ;kauh Bjko dza- 44 fnukad 9@7@2003 vUo;s mYgkluxj egkuxjikfydsP;k vkLFkkiusoj #- 12000 &375 & 16500 ;k osruJs.khoj tyvfHk;ark o fodkl vfHk;ark (fo|qr) gh nksu ins fuekZ.k dj.ksl egklHksP;k eatqjhP;k vf/ku jkgqu ekU;rk fnysyh vkgs-

vkrk LFkk;h lferhP;k flQkfj'kh vuqlkj lnj izLrko egklHksP;k eatqjh lkBh lknj-

**<u>egklHkk Bjko Ø-</u> 61 <u>fnukad%&20-8-2003-</u>**

lqpdkps uko %&Jh- fd'kksj ouokjh

vuqeksndkps uko %&Jh- jktsanz pkS/kjh

gh egklHkk ojhy izLrkousuqlkj LFkk;h lferhps fnukad 9-7-2003 jksthps Bjko Øekad 44 ps vuq'kaxkus izLrkfor osru Js.khoj tyvfHk;ark o fodkl vfHk;ark ¼fo|qr½ ;k inkaP;k fufeZrhl 'kklu eatqjhP;k vf/ku jkgqu ekU;rk nsr vkgs-

lqpdkph lgh@&

vuqeksndkph lgh@&

**<u>,derkus</u>**

miegkikSj@ fiBkflu vf/kdkjh
loZlk/kkj.k egklHkk

mYgkluxj egkuxjikfydk

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय क्र. ४:- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात गटई कामगारांना जागा
/ स्टॉल्स उपलब्धी व वापर परवाना देणे बाबत.

काही सदस्य:- पास.

मा. उपमहापौर/ पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात गटई कामगारांना जागा / स्टॉल्स उपलब्धी व वापर परवाना देणे बाबत.

प्रस्तावना :-

महापालिका क्षेत्रातील गटई कामगारांना त्यांचा व्यवसाय करणेसाठी जागा, स्टॉल्स उपलब्ध करून देणेबाबत महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने उपरोक्त संदर्भाने आदेशित केले असुन महापालिकेने त्यांच्या क्षेत्रात विविक्षीत, स्टॉल्ससाठी परवाने देणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असे परवाने देण्यासंबंधी यापुर्वी कोणतीही कार्यवाही केलेचे आढळुन येत नाही.

उक्त संदर्भिय आदेशाची प्रत सोबत जोडली असुन सदर आदेशाने नमुद केलेले निकष व अटीनुसार तसेच अट क्र. १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे स्थानिक परिस्थितीचा विचार करून आवश्यक वाटणा-या अटी नमुद केल्या आहेत. त्याअनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात गटई कामगारांना परवाने देण्यास हरकत नाही. त्यासाठी धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अटी

---

उल्हासनगर महानगरपालिकेने ठरविलेल्या व वेळोवेळी ठरविण्यात येणारे ना परवाना क्षेत्रात (नोपार्कींग झोन) स्टॉलसाठी परवाने दिले जाणार नाही.

स्टॉलसाठी प्रथम परवाना देताना १००/- रूपये परवाना फी आकारली जाईल व नुतनीकरण करण्यासाठी ११ महिनेसाठी २५/- रूपये फी आकारली जाईल. ११ महिने मुदत संपणेपुर्वी १ महिना परवाना नुतनीकरण करणे अपरिहार्य आहे. अन्यथा परवाना रदद केला जाईल व स्टॉल काढुन टाकण्यात येईल. ११ महिने म्हणजे परवाना दिल्यापासुन गणणा केली जाईल.

स्टॉलसाठी जागाभाडे दरमहा रू. १५०/- आकारले जाईल. दर महिन्याचे भाडे आगावू भरणेचे आहे.

परवाना मिळणेसाठी उप-आयुक्त यांचेकडे लेखी अर्ज देवून लेखी परवानगी घेणे जरूरी आहे. परवानगी बरहुकूम स्टॉल करणेचा आहे.

महापालिका वेळोवेळी जे आदेश देईल ते पाळणे परवानाधारकांवर बंधनकारक असेल.

<u>महासभा ठराव क्र.</u> ६२ <u>दिनांक:-२० ८ २००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नाना पवार

अनुमोदकाचे नाव :-श्री.सुरेश गायकवाड

वरील प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर ही महासभा उल्हासनगर क्षेत्रात गटई कामगारांना त्यांचा व्यवसाय करण्यासाठी जागा किंवा स्टॉल उपलब्ध करून देणे व त्यांना परवाना देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी सायंकाळी ७. ०५ वाजता सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय क्र. ५:- साधु वासवानी उद्यानाची जागा सौदर्यीकरण व देखभालीसाठी रोटरी क्लब उल्हासनगर यांना विकसन <u>करणेस देणे बाबत.</u>

**मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी सायंकाळी ७. ०६ वाजता सभागृहातुन बाहेर पडल्या.**

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u> मा. आयुक्त साहेब, महापौर महोदया, तुम्ही हे रोटरी क्लबला देत आहात. हे देणे योग्य आहे परंतु यात काही अशा गोष्टी आहेत त्या लक्षात ठेवून आणि काही नियम बनवून त्यांना दिले गेले तर माझ्या मते योग्य राहिल. जसे इथे लिहिले आहे की इथे जे गाडी चालविणार किंवा इतर काही मनोरंजन साधने ठेवणार , त्यासाठी तिथे ते फी ठेवणार. तर फी किती ठेवणार? भाडे किती वसूल करणार? किंवा सभागृहा बनवणार त्याचे भाडे किती घेणार? या गोष्टीचा येथे उल्लेख नाही आहे. नंतर आपल्याकडे असे कोणतेही नियम नसणार. यावर आधिन राहून त्यावर आपण अंकुश लावू शकाल. यासाठी या सर्व बाबींकडे पुन्हा एकवार बघुन जेवढा भाग आपण त्यांना देणार आहोत, त्यामध्ये आर.सी.सी. बांधकाम किती करणार? किती भागामध्ये गार्डन

बनणार? किंवा पुर्णत: तिथे समाजमंदिर बनविणार का? तिथे लहान मुलांसाठी जी मनोरंजनाची साधने ते बसविणार आहेत. त्याचे भाडे ते किती घेतील? फी किती घेणार? त्यापासून आपल्या शहरातील मुलांना काही सुविधा मिळतील अथवा नाही? का फक्त रोटरी क्लबला देणार आहात जागा? याबाबी लक्षात घेणे अत्त्यंत आवश्यक आहे. रोटरी क्लबला ही जागा देण्यास भाजपा व शिवसेनेचा विरोध नाही आहे. परंतु या सर्व बाबी लक्षात घेणे अत्त्यंत आवश्यक आहे. जसे की आज महापौर पदावर बसलेल्या आमच्या जया साधवानीजी आहेत, यापूर्वी प्रजापिता ब्रम्हाकुमारीला आम्ही सर्व संमतीने दिले होते. परंतु एकदा आमच्या महापौरांना अडचणीला सामोरे जावे लागले. अशी खुपश्या अडचणी जेव्हा येतात. तेव्हा कुणाच्या हृदयाला ठेस पोहचू नये म्हणून या सर्व गोष्टी लक्षात ठेवून जर असे काही नियम बनविले त्यासाठी टिकिट दर काय ठेवणार? हे सर्व लक्षात ठेवून नंतर जर प्रस्ताव आणला तर काही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> मी जमनादास पुरस्वानी यांच्याशी बराच सहमत आहे. हा जो कालावधी दिला जात आहे, मला सांगितले गेले दहा वर्षासाठी दिले गेले. २५ लाख रुपये ते खर्च करणार. २५ लाख रुपये खर्च ते कोणत्त्या वस्तुवर करणार? त्या वस्तुपासून त्यांना किती आर्थिक उत्त्पन्न होणार? रोटरी क्लब एक समाजसेवी संस्था आहे. त्यामध्ये आम्हांला काही अडचण नाही. जर गौल मेदान सारखे क्षेत्र त्यांना विकसित करण्यासाठी दिला गेला तर काही हरकत नाही परंतु दहा वर्षासाठी महापालिका हे उदयान देत आहे. तर नक्कीच काही अटी शर्ती असल्या पाहिजेत की महापालिकेचा त्यावर अंकुश असला पाहिजे. जर खरोखर समाजसेवेच्या रुपात उदयानास विकसित करु इच्छितात व मुलांसाठी काही व्यवस्था करु इच्छितात. तर ना नफा ना तोटा या आधारावर त्यांनी केले पाहिजे. व त्यांना कुठे जर होर्डिंग लावायचे आहे व जाहिरात करायची आहे. तर त्यावर महापालिकेला त्यातून उत्त्पन्न मिळणार किंवा नाही अशी व्यवस्था असली पाहिजे. फक्त २५ लाख रुपये लावले व दहा वर्षासाठी दिले जर निविदा मागविल्या तर यापेक्षा जास्त महापालिकेला उत्त्पन्न मिळेल. जर हे समाजसेवी संस्थेला दिले जात आहे, तर आम्ही ही आशा ठेवू की, ना नफा ना तोटा या तत्त्वावर ते अशी व्यवस्था करतील ज्याने शहराचे व समाजाचे काही भले होत असेल. याबरोबरच महानगरपालिकेचा त्यावर अंकुश होत असेल परतु जर ती संस्था त्या अनुरुपाने कार्य करत नसेल तर आम्ही येणा-या वेळेला आम्ही काही ठेस निर्णय घेवू शकू एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> महापौरजी, मी त्या विभागाचा नगरसेवक आहे. गौल मैदान माझ्या पॅनेल मध्ये येते. त्या विभागात खूपसे असे लोक राहतात. तिथे जर कुणी वारले तर गौल मैदान येथे तिस-या दिवशी पगडी करतात. महापालिका त्यांना वापरायला देत होती. रोटरी क्लबवाले देणार का? जसे हरीकिर्तन दरबार वाले मोफत देतात. पगडीच्या कार्यक्रमासाठी गौल मैदान विभागात कोणाच्या घरी जर मयत झाली आणि त्यांना गार्डन हवा असेल तर ते म्हणतील तर ते देणार नाहीत. तर ते लोक कोठे जाणार? हा मुददा पण त्यात नक्की टाका.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> यावर जर आयुक्त साहेबांनी प्रकाश टाकला तर बरे होईल मग मंजुर करु. ,

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> एक सेकंद, श्री. जमनुजी जे म्हणाले, त्याच्यापूढे खुलासा करु इच्छितो. आमची शंका यावर आहे. रोटरी क्लबला देण्यास आमचा विरोध नाही. यात स्पष्टपणे काही लिहिले नाही. जसे की, कम्युनिटी हॉल किती लांबीचा बनणार आहे? गेट कोणत्त्या बाजूने असणार? आणि आम्हांला खुलासा याकरीता देखील हवा की, हे जे उद्यान आहे, ते उद्यान , उद्यान म्हणूनच राहिले पाहिजे, उदयानाची स्वत:ची जी ओळख आहे ती कायम असली

पाहिजे. कारण या शहरात उदयाने खुप कमी आहे. ते देखभाल करतांना जर दुस-या सुविधा देऊ शकलो तर आमची त्यावर काही हरकत नाही. आपण या गोष्टीवर खुलासा करा की उद्यानाची ओळख असणार की नाही? याचा आम्ही खुलासा मागतो.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव आणला आहे, तो प्रस्ताव पारीत होण्यापूर्वी तेथे काही काम सुरु केले आहे का त्यांनी? रोटरी क्लबने तिथे काही काम सुरु केले आहे का? हे सदनाला माहित पडले पाहिजे कारण की असे पण होते, प्रस्ताव नंतर आणला जातो त्याआधीच काम झालेले असते असे काही आहे का? दुसरे मी सदनाला सांगु इच्छितो की, गोषवा-यात लिहिले आहे की वास्तविक पाहता उद्यान विकासाची जबाबदारी महापालिकेची आहे. तथापी हे काम रोटरी क्लबच्या माध्यमातून होणार असल्यामुळे हा उद्देश सफल होणार आहे. महापालिकेच्या अर्थ संकल्पात उद्यान विकास या लेखा शिर्षाखाली असलेल्या १ कोटी २० लाख मधील निधी अन्य विकास कामासाठी वापरणे शक्य होणार आहे. तर मला असे सांगायचे आहे की, काही असे प्रभाग आहेत की त्या प्रभागात एकही गार्डन नाही. जसे की माझा प्रभाग आहे. श्री. रमेश चव्हाण यांचा प्रभाग आहे. श्री. राज असरोंडकर यांचा प्रभाग आहे. असे काही प्रभाग आहे की त्या प्रभागात उद्यानाचा विकासाठी जो जो निधी ठेवला गेला. तो निधी आपण इथे वापरू शकत नाही का? याचा विचार केला जावा. आणि हे लोक जर यांच्याकडुन पैसे घेतात तर त्यांच्यावरही काही शुल्क नगरपालिकेने आकारले पाहिजे. अशी माझी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब आता श्री. शांताराम निकम यांनी सांगितल्याप्रमाणे काम सुरू असेल तर हा महासभेचा अपमान आहे. आणि तसे असेल तर तुम्ही आता जावुन बघा काम सुरू असेल तर ते मिटिंगमध्ये आणा. महासभेला न विचारता तुम्हाला न विचारता मनमानी करून काम सुरू करतात. काम जर सुरू केले असेल तर कुणाला विचारून केले? कुणाच्या परवानगीने केले? कुणाच्या आदेशाने केले त्याची चौकशी आधी केली पाहिजे. ही काही खाजगी संपत्ती नाही. कुणीही जावुन आदेश दयायचे काम करू का. आणि जर तसे असेल तर ते चुकीचे आहे. आता जर तिथे काम सुरू असेल तर महासभेचा आमचा सर्वांचा अपमान आहे. सत्ताधारी विपक्ष असे काही नाही. सगळयांचा अपमान आहे. सगळया नगरसेवकांचा अपमान आहे. तसे असेल तर आता चौकशी करा आणि पुढच्या सभेत आणा. आणि दुसरे असे की, फळांची आणि फुलांची विक्री खाली शेवटी असे लिहिले आहे. त्यावर जरा स्पष्टीकरण करा. फळ कुणाला मिळणार आहे आणि फुल कुणाला मिळणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>याबाबतीत तुम्ही खुलासा करा आणि प्रवेश मोफत असावा. आठ आणे पण नसावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया,एक तर मी सदनाला सांगतो की, रोटरी क्लब तर्फे त्या उदयानात कोणतेही काम सुरू नाही केले. जे पण काम चालु आहे ते प्रजापिता ब्रम्हकुमारी ट्रस्ट यांनी त्यांच्या भागात विकासाचे काम सुरू केले आहे. त्यांना आधी पासुनच परवानगी आहे. त्यांना ते दिले आहे. ते काम करत नव्हते त्यामुळे त्यांना आम्ही माघार घ्यावी म्हणुन पत्र दिले. जर तुम्ही तिथे उद्यान विकसित करून सौदर्यीकरणाचे काम नसाल करत तर महापालिका तो भाग परत घेईल. व रोटरी क्लबला ते गार्डन देवु. असा आम्ही त्यांना जेव्हा निरोप दिला त्यांनी उद्यान विकसनाचे काम त्यांच्या भागात सुरू केले. दुसरे अस की या भागात जे आधी साधु वासवानी ट्रस्टनी घेतले होते परंतु त्यांनी त्याच्या ११ महिन्याच्या कालावधीत काहीही विकास केला नाही. ते ११ महिने पुर्ण झाल्यानंतरही जवळ जवळ दोन वर्ष त्या झाडांची कुणी निगा राखत नव्हते. त्यामुळे जेव्हा रोटरी क्लबने जेव्हा प्रस्ताव दिला. महापालिकेने

तुमच्या समोर आणला आहे. यात सर्वात मोठी गोष्ट अशी आहे की, जमिनीचे जे टायटल आहे. ती मालकी महापालिकेची असेल. ही जमिन महापालिकेला राज्य शासनाने दिली आहे यामुळे तिस-या व्यक्तीचे टायटल इथे निर्माण करू शकत नाही. रोटरी क्लबची जी भुमिका आहे ती बिल्कुल सिमीत आहे त्यांना फक्त सौदर्यीकरण करायचे आहे. त्यासाठी जो काही निधी लागेल तो रोटरी क्लबला दयायचे आहे हे एक. पुढील येणा-या दहा वर्षात देखभाल व दुरूस्तीसाठी जो खर्च करणार आहात तो त्यांना करायचा आहे. भलेही कोणतेही बांधकाम करण्याची परवानगी दयांना दिली जाणार नाही. ते फक्त दुरूस्त करून त्याचा वापर करणे. हा अधिकार त्यांच्याकडे आहे. या उद्यानात प्रवेश फी अजिबात असणार नाही. तुम्ही जर अटी शर्ती वाचल्या तर त्यात अट क्र. ५ जी आहे. त्यामध्ये तुमच्या सुझावाचा विचार केला गेला आहे. प्रवेश फुकट असेल. नविन बांधकाम काहीही करू दिले जाणार नाही. इथे जसे सांगितले गेले की मिनी ट्रेन मुलांसाठी जे काही खेळाची साधने असतील त्याची फी काय असेल हे ठरविण्याचा अधिकार महानगरपालिका किंवा महापालिका प्रशासनाने ठेवले पाहिजे असे मला वाटते. ते दुरूस्त करून जर प्रस्ताव मंजुर होत असेल तर शहराच्या विकासासाठी चांगले राहील. ते पुर्ण उद्यान महापालिकेचेच असणार. महानगरपालिकेच्या नावानेच त्याचे संचलन होणार. त्यावर महानगरपालिकेचे नियंत्रण असणार फक्त सौदर्यीकरणासाठी त्यांना देतो कारण आपल्याकडे निधी नाही. म्हणुन विकसित नाही करू शकत. मला वाटते महापालिकेच्या जितक्या जागा उदयानासाठी आरक्षित आहेत. त्यात जर एखादया सेवाभावी संस्थेने पुढे येवून विकसित करण्यासाठी जर सहयोग दिला कारण आपल्याकडे पैसा पाच वर्षानी येणार. नंतर आपण विकसित करणार त्यानंतर लोकांना सुविधा मिळणार. ते काय ठिक होणार नाही. जर काही सेवाभावी संस्था किंवा काही औदयोगिक कंपन्या जर पुढे आल्या व विकासासाठी आपल्याला निधि उपलब्ध करून देत असेल तर त्यांचा सहयोग घेतला पाहिजे. हे सार्वजनिक उपक्रमामुळे लोकांना काही सुविधा देणे हे पुढील येणा-या काळासाठी गरजेचे आहे. सर्व काम महापालिका नाही करू शकत. सौदर्यीकरणासाठी एक करोड खर्च करणे किंवा २५ लाख खर्च करणे हे महापालिकेच्या आर्थीक कुवतीच्या बाहेर आहे. म्हणुन हा प्रस्ताव तुमच्या समोर आणला आहे. लोकांना सुविधा देणे हा जो मुळ उददेश आहे तो मला वाटते सफल होतो. तो सफल होण्यासाठी प्रस्तावाला मंजुर करावे अशी आमची सदनाला विनंती आहे.

मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी यांनी सायंकाळी ७. १४ वाजता सभागृहात प्रवेश केला.

<u>काही सदस्य :-</u>फळ आणि फुलांचे काय?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>काही झाडे जसे की आंब्याचे रोपटे तिथे लावले गेले.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>तुम्ही आंब्याचे झाड लावण्यासाठी परवानगी देणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>उद्यान शब्दाचा अर्थ तुम्ही लक्षात घेतला तर झाड आणि रोपटे असते. काही झाडे आहेत त्यांना फक्त फळे येतात. आणि काही झाडे अशी आहेत ज्यांचा फळ आणि फुले येतात. आणि ते जर विकले गेले तर त्यापासुन जर काही उत्पन्न मिळाले तर त्याचा विनियोग हे देखभाल दुरूस्तीसाठी करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. त्याच्यावर महापालिकेचे नियंत्रण असेल.

<u>काही सदस्य :-</u>कशा कशावर नियंत्रण ठेवणार.

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-* तुमची शंका खरी आहे परंतु आम्ही आता काही करू शकत नाही.

*मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-*अजुन फक्त एकदा विचारायचे आहे. रोटरी क्लबवाले प्रवेश फी ठेवणार का?

*काही सदस्य :-*नाही. नाही.

*मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-*ठिक आहे.

*मा. महापौर :*सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

*विषय क्र. ५:-* साधु वासवानी उद्यानाची जागा सौदर्यीकरण व देखभालीसाठी रोटरी क्लब उल्हासनगर यांना विकसन करणेस देणे बाबत.

*प्रस्तावना :-*

उल्हासनगर महापालिकेची साधु वासवानी उद्यानाची जागा साधु वासवानी न्यासास दिली होती. त्याची मुदत संपलेली आहे. ती जागा सौदर्यीकरण व सुशोभिकरण यासाठी विकसीत करणेस मिळावी. म्हणुन अध्यक्ष रोटरी क्लब यांनी दि. ४.६.०३ च्या पत्राने प्रस्ताव सादर केला आहे. यामध्ये ;व्वउउनदपजल भ्ंसस्द्व कम्युनिटी हॉल, मीनी ट्रेन इ. सुविधा उपलब्ध करणार आहेत. व त्यासाठी २५ लक्ष निधी खर्च करणार आहेत व प्रस्तावित कामे २००५ पुर्वी पुर्ण केली जाणार असल्याची हमी दिली आहे. तसेच लहान आगगाडी इत्त्यादी साठी रोटरी क्लब नाममात्र फी आकारणार आहेत आणि त्यापासुन मिळणारे उत्पन्न देखभाल व विद्युत खर्च यासाठी खर्च करणार आहेत.

प्रश्नांकित ५०० चौ. फुट जागा साधु वासवानी न्यासास दिली होती त्याची मुदत १.२.४.० रोजी संपली आहे. वास्तविक पाहता उद्यान विकासाची जबाबदारी महापालिकेची आहे. तथापी हे काम रोटरी क्लबच्या माध्यमातुन होणार असल्यामुळे हा उदेश सफल होणार आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात उद्यान विकास या लेखाशिर्षाखाली असलेल्या १ कोटी २० लाख मधील निधी अन्य विकास कामांसाठी वापरणे शक्य होणार आहे. सबब यापुढे नमुद केलेल्या अटी व शर्तीवर रोटरी क्लब यांना विकसन करणेसाटी जागा देणेस महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित करीत आहे.

*अटी व शर्ती*

(१) साधु वासवानी उद्यानातील एकुण जागेपैकी खालील तपशिलातील ५३०० चौ. फुट जागा संस्थेकडे केवळ उद्यानाचा विकास करणे व दुरुस्ती व निगा राखणे या प्रयोजनासाठी हस्तांतरीत करण्यात येईल .
पुर्वेस : महापालिकेचा रस्ता
पश्चिमेस :याच नंबरपैकी महापालिकेच्या ताब्यातील साधु वासवानी उद्यानाची जागा .
दक्षिण : महापालिकेचा रस्ता
उत्तर : महापालिकेचा रस्ता

(२) संस्थेस सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्त्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्त्याही मार्गाने अन्य पक्षाचे हितसंबध निर्माण करता येणार नाहीत .

(३) उद्यानाचा विकास करून त्याची निगा व दुरुस्ती राखणेचा कालावधी परवानगी दिलेल्या तारखेपासुन पुढील १० वर्षांच्या कालावधीसाठी राहील .

(४) साधु वासवानी उद्यान विकासासाठी Plans & Estimates संस्थेने तयार करून आयुक्तांना सादर करावेत . आयुक्त त्यात जे बदल सुचवतील त्याप्रमाणे उद्यान विकसीत करणे संस्थेवर बंधनकारक राहील . उद्यान विकसीत करताना संस्थेस जो खर्च संस्था करेल त्याचा तपशिल वेळोवेळी महापालिकेत सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील . संस्थेला उद्यान विकासीत व सुशोभिकरण करणेसाठी किमान रु २५ लाख खर्च करणे बंधनकारक राहील .

(५) उद्यानातील विकास कामे एक वर्षाच्या आत पुर्ण करणे संस्थेस बंधनकारक असुन मुदतीत कामे पुर्ण न झाल्यास महापालिका उद्यानाचा ताबा स्वत:कडे घेईल व संस्थेने त्या तारखेपर्यंत केलेल्या खर्चापोटी कोणतीही भरपाई मागणेचा अधिकार संस्थेला असणार नाही .

(६) उद्यानामध्ये सर्वांना विनामुल्य व मुक्त प्रवेश देण्यात येईल व नियोजनाचे हक्क महापालिकेचे राहतील . जागेचे कोणतेही हक्क संस्थेस राहणार नाहीत .

(७) उद्यानाची निगा व दुरुस्ती यासाठी पाणी पुरवठा व नळजोडणी संस्थेस स्वखर्चाने घ्यावी लागेल व १० वर्षांपर्यंतच्या कालावधीत यासाठी येणारा सर्व खर्च संस्थेने करावयाचा आहे . महापालिका यासाठी कोणत्त्याही प्रकारचा खर्च अथवा अनुदान संस्थेस देणार नाही .

(८) उद्यानाच्या सुरक्षेसाठी दिवसभरात तीन पाळयांमध्ये आवश्यक सुरक्षा कर्मचा-यांची नियुक्ती करणे तसेच उद्यानात वृक्ष व फळझाडांची निगा राखणेसाठी माळी व बागकामगारांची नियुक्ती करणेसंस्थेवर बंधनकारक राहील व त्यांच्या वेतनावर होणारा कोणत्त्याही प्रकारचा खर्च, अनुदान अथवा अर्थसहाय्य महापालिकेकडुन संस्थेस देण्यात येणार नाही . भविष्यात सदर कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबत अथवा वेतनाबाबत वाद उद्‌भवल्यास त्याची कायदेशिर जबाबदारी संस्थेची राहील .

(९) उद्यानाच्या विकासा बरोबरच वृक्ष संवर्धन व पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष, फळे व फुले यांची प्रदर्षने आयोजित करणेस महापालिकेची कोणतीही हरकत राहणार नाही . अशा प्रकारचे वर्षभरात किमान १ प्रदर्षन संस्थेच्या खर्चाने आयोजित करणे संस्थेवर बंधनकारक राहील .

(१०) उद्यानातील समाज मंदिराची दुरुस्ती करणे व त्याचा वापर सामाजिक कामांसाठी करणेस महापालिका संस्थेला परवानगी देईल . परंतु जेव्हा महापालिकेला स्वत:चा कार्यक्रम राबवायचा असेल त्या वेळेस सदर समाज मंदिराचा वापर महापालिका करेल .

(११) उक्त नमुद १० वर्षांच्या कालावधीत सदस्यांमार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील .

(१२) संस्थेला उद्यानातील फुलांची विक्री करता येणार नाही अथवा अन्य मार्गाने त्यांची विल्हेवाट लावता येणार नाही . उद्यानात फळझाडांची लागवड केल्यास व

त्यास फळे आल्यास त्याच्या विक्रीतुन येणा-या उत्पन्नाचा विनीयोग उद्यानाच्या विकासासाठी करणे संस्थेवर बंधनकारक राहील व त्या संबधीची माहिती वेळोवेळी महापालिकेला देणे बंधनकारक राहील .

<u>महासभा ठराव क्र.</u> ६३ <u>दिनांक:-२०८.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी

<u>gh egklHkk ojhy izLrkokr ueqn dsysY;k vVh o 'krhZaoj o R;k O;frjDr vk;qDr fofufnZ"V djhy v'kk vko';d vVh 'krhZaoj egkikfydsr fughr vlysY;k lk/kq oklokuh m|kukP;k tkxsps lkSan;hZdj.k o ns[kHkkyhlkBh jksVjh Dyc] mYgkluxj ;kauk R;kaP;k vtkZo:u ngk o"kkZP;k dkyko/khlkBh Lo[kpkZus fodlu dj.;klkBh ekU;rk nsr vkgs+</u>

सुचकाची सही-

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ६:-</u> उल्हासनगर शहरात विविध रस्त्यांना चौकांना व महापालिकेच्या अन्य जागांना नावे देणे करिता तदर्थ समिती नेमणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>मा. महापौर महोदया, मागच्या वेळेस एक वर्ष झाले साहेब तुम्ही नावे पास केली आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>मी एक वर्षापुवी नव्हतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>अजुन ते काम झालेले नाही. तर तुम्ही असे म्हणणार का की आम्ही एक वर्ष नव्हतो. अगोदर जे चौकाचे किंवा रस्त्याचे नाव मंजुर झाले आहेत ते फलक अजुन लावलेले नाहीत ते तुम्ही लावणार का आम्ही लावायचे. आर्थीक काही समस्या असेल तर आम्ही लावु. ते लवकरात लवकर लावुन टाका.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब हा जो प्रस्ताव याठिकाणी आलेला आहे या प्रस्तावामध्ये जे सदस्य असणार महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता आणि सर्व मा. गटनेते हे सर्व मिळुन दहा लोक येतात. जेव्हा दहा लोकांमध्ये मतदान होईल तर पाच इकडे पाच तिकडे म्हणजे एक अतिरिक्त सदस्य घेतला जावा म्हणजे ११ वा नगरसेवकांपैकी घेतला जावा. अशी मी विनंती करतो आणि

दुसरी महत्त्वाची गोष्ट जर एखादया सदस्याने नामकरणाविषयी प्रस्ताव टाकला समिती त्यावर चर्चा करेल. त्यामध्ये त्या सदस्यांला बोलावले जाईल का? का त्या सदस्याच्या अपरोक्ष ती समिती नाव घ्यायचे की नाही ठरवेल. त्याचाही विचार झाला पाहिजे.

मा. सदस्या श्री. भालेराव गौतम हे सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया लक्ष दयावे. या समितीच्या सदस्यांची नावे व पद मी वाचतो. मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, मा. गटनेता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, मा. गटनेता कॉंग्रेस आय, मा. गटनेता शिवसेना, मा. गटनेता भा.ज.पा., मा. गटनेता आर.पी. आय. व ११ वा सदस्य असेल कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम ते सचिव सदस्य असतील समितीचे व त्यामध्ये तीन गोष्टी आवश्यक असतील. प्रत्येक महिन्यात त्या समितीची बैठक होईल. ज्यांचे ज्यांचे अर्ज येतील त्यावर विचार केला जाईल. व प्रत्येक महिन्याच्या ८ तारखेपुर्वी त्या अर्जावर समिती निर्णय घेईल व त्याचा अहवाल सदस्य सचिव ते महापालिका सचिवांकडे ८ तारखेपुर्वी पाठवतील महासभेपुढे ठेवण्यासाठी. अशा प्रकारे ठराव केला जाईल सर्वानुमते सहमती आहे ना?

<u>मा. महापौर :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ६:-</u> उल्हासनगर शहरात विविध रस्त्यांना चौकांना व महापालिकेच्या अन्य जागांना नावे देणे करिता तदर्थ समिती नेमणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर शहरामधील विविध रस्त्यांना चौकांचे महानगरपालिकेच्या अन्य मालमत्ता व सोयी सुविधांचे नामकरणाचे प्रस्ताव वेळोवेळी प्रशासनासमोर येत असतात. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे अशा आलेल्या प्रस्तावांचे गोषवारे तयार करून महासभेकडे चर्चा होवून निर्णयाकरिता सादर केले जातात. अशा प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. मा. महापौर
२. उप-महापौर
३. स्थायी समिती, सभापती
४. मा. सभागृहनेता
५. मा. विरोधी पक्ष नेता
६. सर्व मा. गटनेते

तरी अशा प्रकारची समिती गठीत करून त्यांच्या शिफारशीनंतर नामकरणाचे आलेले प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावे याकरिता महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र.</u> ६४ <u>दिनांक:-२०.८.२००३-</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

वरील प्रस्ताव विचारात घेता ही महासभा उल्हासनगर शहरात विविध रस्त्यांना, चौकांना व महापालिकेच्या अन्य जागांना वेळोवेळी नाव देणेपुर्वी प्रत्येक प्रकरणी चौकशी, अभिप्राय व अहवाल या आवश्यक त्या प्रयोजनार्थ मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे अकरा सदस्यीय तदर्थ समितीची रचना करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महापौर | - | अध्यक्ष |
| २) | उपमहापौर | - | उपाध्यक्ष |
| ३) | सभापती, स्थायी समिती- | | सदस्य |
| ४) | सभागृहनेता- | | सदस्य |
| ५) | विरोधी पक्ष नेता- | | सदस्य |
| ६) | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | | सदस्य |
| ७) | गटनेता, कॉंग्रेस (आय) - | | सदस्य |
| ८) | गटनेता, शिवसेना- | | सदस्य |
| ९) | गटनेता, भारतीय जनता पार्टी- | | सदस्य |
| १०) | गटनेता, आर. पी. आय. - | | सदस्य |
| ११) | कार्यकारी अभियंता (सा. बा. वि.) | | सदस्य सचिव |

**परंतु —**

१. सदर समितीची सभा वेळोवेळी सदस्य सचिवाकडुन प्राप्त झालेल्या अर्जावरून आवश्यक वाटल्यास प्रत्येक महिन्यात बोलाविण्यात येईल.
२. सदर समितीत बहुसंख्येने निकालात काढण्यात आलेल्या अर्जांचा अहवाल सदस्य सचिवाकडुन प्रत्येक महिन्याचे आठ तारखेपर्यंत महापालिका सचिवांकडे महासभेत ठेवण्यासाठी सादर केला जाईल.
३. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर महासभा प्रत्येक अर्ज निकालात काढेल.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ७:-</u> जैविक घनकच-याची विल्हेवाट लावणे कामी
दि. २०.६.०३ चे महासभा ठराव क्र. ४३ मध्ये
अंशतः दुरूस्ती करणे बाबत.

कृपया क्षमा असावी. मागील विषयाचा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता मंजुर समजायचा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>इतिवृत्त कायम झाल्यावर तो अंमलात आणावा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ठिक आहे. ( असे म्हणुन त्यांनी पुन्हा विषय वाचुन दाखविला)

<u>विषय क्र. ७:-</u> जैविक घनकच-याची विल्हेवाट लावणे कामी

दि. २०.६.०३ चे महासभा ठराव क्र. ४३ मध्ये
अंशतः दुरूस्ती करणे बाबत.

काही सदस्यः-पास. पास.

मा. महापौर :सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ७:- जैविक घनकच-याची विल्हेवाट लावणे कामी
दि. २०.६.०३ चे महासभा ठराव क्र. ४३ मध्ये
अंशतः दुरूस्ती करणे बाबत.

प्रस्तावना :-

मा. महासभा ठराव क्र. ४३ दिनांक २०.६.२००३ अन्ये उल्हासनगर शहरातील रूग्णालये, प्रसुती गृहे, पॅथोलॉजी लॅब, रक्तपेढी, दवाखाने येथील बायोमेडीकल वेस्ट गोळा करणे, वाहून नेणे याकामी मे. पी. आर. एस. इन्टरप्रायजेस, उंबरवाडी, आरवाडी जेल रोड, कल्याण यांचे कार्यालयीन पत्र क्र. उमपा/आवि/सामान्य /२४८ दिनांक १६.७.२००३ अन्वये अभिकर्ता म्हणुन नेमणूक करण्यात आली आहे. सदर सेवेसाठी १५/- रू. प्रतिकिलो शुल्क शहरातील रूग्णालये, प्रसुती गृहे, पॅथोलॉजी लॅब इत्यादी कडुन आकरण्यात येणार असून त्यातील १२/- रू. शुल्क हे म.पी.आर.एस. इन्टरप्रायजेस यांना देय राहील व उर्वरीत /- रू. प्रतिकिलो शुल्कापैकी ५० टक्के कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवा शुल्क म्हणुन आकरतील असे महापालिका ठराव आदेश व करारनाम्यानुसार ठरलेले होते.

परंतु याबाबत मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांचे दिनांक २१.७.२००३ चे पत्रान्वये उल्हासनगर महानगरपालिकेने उर्वरीत ५० टक्के शुल्क हे स्वतः न आकारता ते पुर्णतः कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस मिळावे अशी मागणी केलेली आहे. त्यास अनुसरून, शिफारस करण्यात येते की, उर्वरीत /- प्रतिकिलो सेवा शुल्क ही कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस अदा करण्यास हरकत नाही.

सबब, महासभा ठराव क्र. ४३ मध्ये वरीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता मिळावी.

महासभा ठराव क्र. ६५ दिनांकः-२०.८.२००३.

सुचकाचे नाव :-डॉ. नीना नाथानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. शांताराम निकम

वरील प्रस्ताव विचारात घेता ही महासभा जैविक घनकचरा व्यवस्थापन / विल्हेवाट लावणेकामी पुर्वीचा दि. २०.६.२००३ रोजीचा संबंधित ठराव क्र. ४३ मध्ये अंशतः दुरूस्ती करून शहरातील रूग्णालये, प्रसुतीगृहे, पॅथोलॉजी गृहे इत्यादी कडुन रू. १५ प्रति किलो सेवा शुल्क आकारणी पैकी कल्याण डोंबिवली महापालिकेस रू. दिड ऐवजी रू. ३ प्रति किलो या प्रमाणे अदा करणेस मंजुरी देत आहे आणि त्या मर्यादेपर्यंत पुर्वीच्या ठरावात अशंतः बदल करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ८:- उल्हासनगर शहराच्या पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल विचारात घेणे बाबत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-मा. महापौर महोदया, आता फक्त आम्ही पर्यावरण स्थितीचा अहवाल महासभेसमोर ठेवत आहोत. त्यावर जर तुम्हाला काही अभ्यास करायचा असेल, चर्चा करायची असेल तर पुढच्या सभेत करावी. कारण की मला वाटते की, खुपश्या सदस्यांनी अजुन ते वाचलेले नाही. त्यांना वाचु दया. त्यांचे काही सुझाव आहे. त्याचा पण समावेश करू. त्यानंतर त्यांनी ॲक्शन प्लान देखिल दिला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-तुम्ही विषय डिफर करू इच्छिता.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-हो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-नाही. नाही सदनासमोर ठेवले आहे. चर्चा करण्यासाठी म्हणुन पुढच्या सभेत घेवू शकता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-म्हणजे डिफर झाला ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-नाही. नाही सदनासमोर ठेवला आहे ना? हा अहवाल निर्णय घेण्यासाठी ठेवलेला नाही. तो फक्त ३१ जुलै पुर्वी महासभेसमोर ठेवला पाहिजे म्हणुन ठेवला आहे. तुम्ही वाचा त्यात काही सुझाव दिले आहेत. तुमचे पण काही सुझाव असु शकतात. त्या सर्वांचा समावेश करून ॲक्शन प्लान तयार होईल. व त्यानुसार नंतर कार्यवाही केली जाईल. डिफर कसा झाला?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढच्या सभेत येणार म्हणजे डिफर ना साहेब.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-आयुक्त साहेब तुम्ही आधीच चार दिवस दिले आहेत.

मा. सदस्य श्री. नाना पवार:-पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तुम्ही इंग्रजित दिलेला आहे मराठीत दिला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-चार दिवस झाले तुम्ही देवून आमची तयारी आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-डिफर करण्याची आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आम्ही चर्चा करायला तयार आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-तुम्ही चर्चेसाठी विषय आणा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-काही सुझाव ते तुमच्या समोर आणु इच्छितात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आमचे सुझाव तयार आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-चार दिवसापुर्वी दिले होते. पुरेसा वेळ दिला आहे.

मा. सदस्य श्री. सुरेश जाधवः-मा. महापौरजी, जर सुझावासाठी आमच्या समोर दिले आहे तर मराठीमध्ये दयावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-काय करायचे डिफर?

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय क्र. ८:- उल्हासनगर शहराच्या पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल विचारात घेणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ९:- प्रस्तावाची सूचना.

श्री. किशोर वनवारी व श्री. प्रमोद टाले या सन्माननिय सदस्यांनी ''महसुल विशेष समिती रचना'' बाबत दिलेल्या प्रस्तावाची सूचना.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आज हा जो विषय कार्यसूचीवर आला आहे. महसुल विशेष समिती बनली पाहिजे. एका वर्षासाठी त्याचे कारण आहे की, शहरात कोणत्त्याही व्यापा-याला त्रास असेल तर भले तो ऑक्ट्रायचा मुददा असो. भले टॅक्सचा विषय असो. समाजमंदीरचा विषय असो, किंवा कुणाला उद्यान लग्न समारंभासाठी हवे आहे. किंवा कोणत्त्याही कार्यक्रमासाठी हवे असेल तर त्यासाठी ही जी समिती असेल याचे जे ९ सदस्य असतील त्यामधुन एकाची सभापती निवड करून एका वर्षासाठी समिती बनली पाहिजे. कारण की कोणाही व्यापा-याला शहरवासियाला जर कोणतीही अडचण आली तर सदस्यांना भेटु शकतील. म्हणुन मी प्रस्ताव सदनासमोर मांडला आहे. मी सदस्यांना विनंती करेन की या समितीचे गठन करावे व जे ९ सदस्य आहेत. त्यांची नावे आधी जर कुणा सदस्यांना बोलायचे असेल तर त्यांनी बोलावे त्यानंतर मग मी ९ नावे जी आहेत ती मी तुम्हाला सांगतो. तर मेहरबानी करून ती जी समिती आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा महापौरजी,...

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मला अजुन बोलायचे आहे. मंचावर चर्चा चालु होती म्हणुन मी थांबलो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-तुम्ही सभागृह नेता आहात बोला ना.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-सभागृह नेता म्हणुन नाही प्रस्तावाचा सूचक म्हणुन बोलत आहे. व्यापा-यांना कोणतीही अडचण होवू नये. तर त्यासाठी ही जी समिती तयार होणार आहे त्यासाठी माझी सदस्यांना विनंती राहेन की त्यांनी ही

समिती बनु दयावी. जसे शहरवासियांना कोणतीही अडचण नाही झाली पाहिजे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सदस्य, विषय क्र. ९ चा जो प्रस्ताव आहे त्यात पहिल्या ओळीत लिहिले आहे. उल्हासनगर शहरामधील जकात व मालमत्ता कर वसुली विरूध्द अनेक तक्रारी येतात. शहरात अशी धारणा झालेली आहे की महापालिका उपभोक्त्यांच्या तक्रारीची दखल घेत नाही म्हणुन न्याय होत नाही. त्याअर्थी महापालिकेस आपल्या पालिका सदस्यांमधुन महसुल विभागासाठी विशेष समितीची नेमणुक करणे आवश्यक आहे. मा. आयुक्त साहेब जेव्हा सन्मानानिय सदस्य श्री. शांताराम निकम यांनी म्हंटले की प्रशासन कार्य करत नाही तर तुम्ही विरोध केला की हे चुकीचे आहे. आज येथे असा विषय आला आहे. जेव्हा लोक काही तक्रार घेवून येतात. तर महापालिकेचे अधिकारी काही निर्णय घेत नाही. काम होत नाही. आजपर्यंत प्रशासन जे काम चालवत आहे त्यावर सत्ताधारी पक्षाने याबाबतीत पुर्णपणे उदाहरण दिले आहे की प्रशासन पुर्णपणे बेकामी आहे. असे त्यांनी स्पष्ट शब्दात वर्णन केले आहे. प्रशासन काम करत नाही. लोकांची अशी समज आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>मी पुन्हा हरकतीचा मुददा घेवून तुम्ही जे म्हंटले त्याचे खंडन करू इच्छितो. हा यांचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाचा अर्थ तुम्ही आम्हाला समजावण्याची गरज नाही. तुम्ही या प्रस्तावाचा विरोध करता का समर्थन करता ऐवढेच ठरवा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आम्हाला बोलण्याचा का अधिकार नाही. का नाही बोलायचे?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आम्ही का बोलायचे नाही. आमचा तो हक्क आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, या प्रस्तावात असे कुठे म्हंटले की प्रशासन निकम्मे आहे. कुठे हा शब्दप्रयोग आहे. हे चुकीचे आहे. तुम्ही जे बोललात ते चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>यात लिहिले आहे की प्रशासन लक्ष देत नाही म्हणुन.

<u>काही विपक्ष सदस्यः-</u>आयुक्त साहेब शब्द मागे घ्या.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आम्हाला पुर्णपणे अधिकार आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>तो शब्द काढुन टाका. जे शब्द श्री. जमनादास पुरस्वानी म्हंटले ते काढुन टाका.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>काही गरज नाही ते शब्द काढण्याची.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-शब्द मागे घ्या.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी मी तुमचा आदर करतो परंतु तुम्ही काहीही बोलाल ते सहन होणार नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-सचिव साहेब, तुम्ही त्याचे हिंदीत भाषांतर करा. मी चुकीचे बोलतो का सांगा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-महापौर महोदया, सदनासमोर प्रस्ताव आहे अर्थ सांगण्याची काही गरज नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-सचिव साहेब, तुम्ही हिंदीत सांगा याचा अर्थ.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-प्रशासन काम नाही करत याचा अर्थ काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-जेव्हा कोकण भवन येथुन अधिकारी आले होते मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ समजावण्यासाठी त्यावेळी त्या अधिका-यांनी म्हंटले होते की, तुम्ही कितीही समित्त्या बनवु शकतात. ही समिती प्रशासनाच्या विरोधात नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आयुक्त साहेब, तुम्हाला श्री. शांताराम निकम यांच्या बोलण्याचा राग आला की नाही. आता तर यांनी तुम्हाला तसा प्रस्ताव दिलेला आहे. की प्रशासन काम करत नाही. तर तुम्हाला राग येत नाही का? त्यांनी लिहुन दिले आहे की, प्रशासन काम करत नाही. श्री. शांताराम निकम नुसते बोलले तर तुम्हाला ऐवढा राग आला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपण लक्षवेधी देवू शकता. गणपतीसाठी समिती बनवा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-मा. महापौर महोदया, मला जरा बोलु दयावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आयुक्त साहेब हे लोक गणपती स्पर्धेसाठी समिती नेमण्यासाठी लक्षवेधी देवू शकतात. आम्ही नाही समिती बनवु शकत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी, कृपया या प्रस्तावाचे हिंदीत भाषांतर करा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-तुम्ही गणपतीसाठी समिती बनवायला तयार नाही का?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-आयुक्त महोदय, तुमच्या अकार्यक्षमतेवर. परिक्षण केले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-महापौर महोदया, या प्रस्तावाबाबत मी अजुन खुलासा करू इच्छितो. ज्याप्रकारे या महापालिकेत आठ विशेष समित्त्या स्थापन होतात. त्याचप्रकारे ही समिती नेमण्यात येत आहे. जेणेकरून शासन व प्रशासन

जसा नियम आहे त्यानुसार प्रशासन शासनाच्या देखरेखीखाली काम करू शकेल आणि सर्वसाधारण जनतेचे म्हणणे ऐकुन जनप्रतिनिधी या नात्याने जास्तीत जास्त न्याय मिळवुन देवू. ठिक त्यानुसार या शहरात अशी एक चर्चा निर्माण झाली होती की, जकात जर ठेक्यावर दिली गेली तर व्यापारी वर्गांना खुप अडचणीचे होईल, जर अशी काही अडचण आली तर या समितीचे सदस्य बैठक घेवुन लवकरात लवकर त्यांची समस्या दुर करण्याचा प्रयत्न करतील. फक्त ऐवढेच नाही तर....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी, माझे बोलणे अजुन पुर्ण झालेले नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-फक्त ऐवढेच नाही तर महापालिकेच्या जितक्या जागा आहेत, भाजी मार्केट, उद्याने हे सर्व जे आपण भाड्याने देतो. तर त्यांच्याकडुन येणे बरोबर वसुल करू शकु. व त्यांना उपयुक्त कामासाठी आम्ही देवू शकु. कित्त्येक उद्याने देवू शकतो. टॉकीज वगैरे, यांची जी मालमत्ता, कर वसुलीचे उत्त्पन्न बरोबर येवू शकेल. बोट क्लब इत्त्यादी. प्रशासनाच्या कार्यावर बरोबर लक्ष ठेवले जावे. कारण प्रतिनिधी जे आहेत हे जनतेचे एक प्रकारे विश्वस्त असतात. शहराच्या प्रत्त्येक संपत्ती वर बरोबर लक्ष राहिले पाहिजे. जेणेकरुन एका पैशाचाही दुरुपयोग नाही झाला पाहिजे. किंवा कोणतीही अडचण निर्माण न होवो या गोष्टी लक्षात ठेवून किंवा पाणी पुरवठा विभागाचे कित्त्येक बिले अशीही आहेत जे वादग्रस्त आहेत. किंवा अवैद्य कनेक्शन आहेत. ज्यांच्याकडुन आपल्याला वसूली करायची आहे. किंवा कर विभागाचे काही वादग्रस्त प्रकरणे आहेत. त्या सोडविण्यासाठी कित्त्येक प्रकारचे महसूल प्रकरणे आहेत. हे सर्व पाहण्यासाठी किंवा या शहराची जनता तक्रार घेवून येते तेव्हा त्यांना असे वाटते की, आम्ही कित्त्येकदा चक्कर मारतो तेव्हा प्रशासन आमचे म्हणणे ऐकत नाही. जर असे काही आहे तर जनप्रतिनिधी या नात्त्याने शासनात असल्याने ही आपली जबाबदारी आहे की आपण त्यांचे म्हणणे ऐकले पाहिजे. व प्रशासनातर्फे त्यांना तसा दिलासा दिला पाहिजे. या गोष्टी लक्षात घेवून एक समिती नेमण्याचा प्रस्ताव येथे आणला गेला आहे, तर याचे समर्थन झाले पाहिजे. लवकरात लवकर याला पास केले पाहिजे. धन्यवाद.

मा. सदस्या श्रीमती. मीना सोंडे हया सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- माझे म्हणणे अजून पूर्ण झाले नाही.

मा. महापौर :- आयुक्त साहेब , तुम्हाला उत्त्तर देत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- हा जो प्रस्ताव आहे.

मा. महापौर :- जमनु तुम्ही बसा ना, आयुक्त उत्त्तर देत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- मी हरकतीच्या मुददयावर बोलत आहे. तुम्ही माझे म्हणणे तोडत आहात.

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :- महापौरांचा अपमान आहे हा.

मा. महापौर :- आयुक्त साहेबांना बोलु दया , मग तुम्ही बोला.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- प्रस्तावाची जी भाषा आहे ते चुकीची लिहिलेली आहे. दुसरी गोष्ट ही की सत्त्ताधारी पक्ष जो आहे...........

मा. सदस्य श्री. सुरेश जाधवः- जमनुजी तुम्ही बसा. महापौरांचा अपमान होत आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- तुम्ही बोला.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- मा. महापौरजी, असे जर सभागृहात चालले तर सभा चालु देणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-मा. पिठासीन अधिकारी, आपण महापालिका सदस्यांना जमनु या नावाने बोलविता. हे बरोबर नाही.

मा. महापौर :- आयुक्त साहेब प्रश्नाचे उत्तर देत आहेत मी काय बोलु?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- महापौर पद हे सर्वात मोठे पद आहे. व त्यांनी श्री. जमनु पुरस्वानी यांना आपलेपणातून जमनु असे म्हटले आहे.

मा. सदस्य श्री. जमनु पुरस्वानी :- तुम्ही मला जमनु असे म्हटले त्याबददल खेद नाही आहे. हे जे आपले पण तुम्ही मला दाखविले आहे त्याबददल मी आपला आभारी आहे. या प्रस्तावाची जी भाषा आहे ती चुकीची आहे. यामध्ये प्रशासनाला चुकीचे दर्शविण्यात आलेले आहे. दुसरे बाब अशी की, ................

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- माझा हरकतीचा मुददा आहे. मला पूर्ण बोलु दया.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मा. सदस्यांना पूर्ण बोलु दया. तुम्ही त्यांच्या बोलण्यामध्ये अडथळा आणता.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- हरकतीच्या मुददयावर हरकतीचा मुददा होऊ शकतो व जो सद्याचा मुददा आहे. त्यावर बोलण्याची संधी पाहिजे. आपण येथे जो चुकीचा अर्थ काढु इच्छित आहात. त्याबाबत माझी हरकत आहे. यांच्या प्रस्तावामध्ये कुठेही महापालिका प्रशासन असे लिहिलेले नाही आहे. त्यांनी लिहिले आहे महानगरपालिका. व महानगरपालिकेचा अर्थ कलम २ मध्ये जर आपण महापालिकेची व्याख्या पाहिली तर महानगरपालिका म्हणजेच आपण (सन्माननिय सदस्य) त्यामध्ये आम्ही नाही. आपण सेक्शन २ पहा, महापालिका म्हणजे काय? म्हणजे आपण लोक आम्ही नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आयुक्त महोदय, .....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- जर महानगरपालिकेचा अर्थ जर पूर्ण महासभा आहे तरी हा शब्द पूर्णपणे चुकीचा आहे. जेव्हा ही पुर्ण महासभा लोकांच्या समस्या सोडवू शकत नसेल. त्यांच्या अडचणी जर दुर करू शकत नसेल तर एक छोटीसी समिती या अडचणी कशा सोडवेल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-हरकतीचा मुददा. या समस्या सोडविण्यासाठी विशेष समितीची रचना केली जात आहे आणि या समितीमध्ये जनप्रतिनिधी असतील.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी हे पहा हे माझे बोलणे मध्येच थांबवत आहेत. कुणीही आपली परवानगी घेवुन नंतरच बोलावे.

मा. सदस्य श्री.विनोद तलरेजाः-परंतु आपणांस बोलण्यास परवानगी कुठे दिली आहे?

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>शासन, सत्ताधारी पक्ष, शासन जे आहे त्यांचा प्रशासनावरील विश्वास उडाला आहे. हे ही समिती स्थापन करण्याचे एक उदाहरण आहे. आज भारतीय जनता पार्टी व शिवसेनेचा एकेक नगरसेवक या गोष्टीची क्षमता ठेवतो की, लोकांना जर त्रास होत असेल अडचणी असतील तर ते प्रशासनाकडे जातात व या तक्रारी सोडवतात. जेव्हा असा एक नगरसेवक या समस्यांचे निवारण करू शकतो तर मग ऐवढया मोठया सत्ताधारी पक्षाला अशी समिती स्थापन करण्याची आवश्यकता का पडली?*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>हरकतीचा मुददा*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>महापौरजी, यांनी आपली परवानगी घेतली आहे का?*

*यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>आपली परवानगी न घेता ते बोलत आहेत त्यांना आपण समज दया.*

*यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>महाराष्ट्र शासनाने असा आदेश काढला आहे. व प्रत्त्येक महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्त्यांची स्थापना करण्यात आली आहे. व उल्हासनगरमध्ये ४ प्रभाग समित्त्या स्थापन करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये एक-एक सक्षम प्रभाग अधिकारी व एक-एक सभापती व त्या त्या क्षेत्रातील सदस्य त्या समित्त्यांमध्ये सदस्य आहेत. आता या ज्या व्यापा-यांच्या समस्या आहेत त्या प्रभाग अधिका-याकडे येतील तेथील सभापतीकडे येतील. व त्यांचे निवारण होवू शकते. व अशाप्रकारच्या समस्या प्रत्त्येक प्रभागात समिती क्षेत्रामध्ये सोडविल्या जावु शकतात. ऐवढी व्यवस्था असताना देखिलही सत्ताधारी पक्षापुढे अशी कोणती लालुच पुढे उभी राहिली की येथे अशी एक समिती नेमावी लागली. आज उल्हासनगर महानगरपालिकेची स्थिती इतकी दयनीय आहे की कोणतेही काम करण्यासाठी आम्ही असे सांगतो की, महानगरपालिकेकडे पैसा नाही. महापालिकेकडे व्यवस्था नाही. मग अशी समिती तयार करून जसे मागील वर्षाचे उदाहरण आताच गणपती दर्शन प्रतियोगितेमध्ये दिसुन आले की त्यांनी अदयाप आपला अहवाल सादर केलेला नाही. एका वर्ष भरात गणेश दर्शन प्रतियोगितांच्या पारितोषिके वितरीत झाली नाहीत. असे सभापती होतील. अशा समित्त्या होतील. तर त्या काय कामाच्या? महानगरपालिकेचा त्यांवर वर्षाला तीन-तीन , चार-चार लाख रू. खर्च होतो. मी आपणांस, सर्वांना निवेदन करेन की, अशा प्रकारचा व्यर्थ खर्च, अशा प्रकारचा विनाकामाच्या खर्चाचा प्रस्ताव महासभेमध्ये आणु नये. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आमचे सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी मला वाटते आज अतिशय रागात आहेत. असे असे शब्द बोलतात की, आम्ही त्यांना त्यासाठी बोलतो की त्यांनी हे शब्द मागे घ्यावेत. त्यामुळे ते आणखीनच बोलत आहेत. मेहरबानी करून संसदीय भाषेमध्ये बोलावे. प्रशासनावर आरोप लावणे.....*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>हरकतीचा मुददा,*

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आपण श्री. मनोहर जेस्वानींना बोला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी बोलत असताना आपण किती वेळा मध्येच उभे राहुन बोलत होता. आज यांनी म्हंटले की, आमचे प्रशासन ऐवढे सक्षम आहे की, हे कुणीही जेव्हा समस्या घेवून जातात तेव्हा ते ती त्वरीत सोडवितात. मग जकातीच्या मुदयाबाबत प्रशासनास विरोध का करत होतात? अडचणी आल्यानंतर प्रशासनाकडे जायचे होते ना? व यावेळी आपण जो विरोध केला, मागील बॉडीमध्ये पाच वर्ष आपण सहकार्य देत आला होतात. यावर्षी काय झाले होते? तर ही गोष्ट लक्षात घेता, काल लोकसभेचे सभापती मा. श्री. मनोहर जोशी साहेब लोकसभेमध्ये म्हणत होते की, जर तुम्ही विरोधी पक्षीय सदस्य ओरड करत राहाल जेव्हा श्री. अटलबिहारी वाजपायी यांची बोलण्याची वेळ येईल तेव्हा जर आपण ओरडत राहाल तर जेव्हा श्रीमती. सोनिया गांधी या बोलु लागतील त्यावेळेस हे सुध्दा ओरडत राहतील. तर मेहरबानी करून समजदार व्हा. मी आपणांस हे सांगु इच्छितो लोकसभेपासुन ग्रामपंचायतीपर्यंत एकेक पक्षाचा एकेक सदस्य बोलतो त्यानंतर विरोधी पक्ष नेता बोलतो त्यानंतर सभागृह नेता बोलतो. व त्यानंतर महापौर निर्णय देतात. तर यासाठी मी दोन्ही पक्षीयांनाही सांगतो की, फक्त विरोधी पक्षीयांनाच नाही तर सत्ताधारी पक्षातील सदस्यांनाही विनंती करेन की मेहरबानी करून या महासभा म्हणजे काही आखाडा नाही. व वैयक्तिक आरोप न करता सभा सूचनेवर जे विषय आहेत त्यावरच चर्चा करा. व शेवटी हे तर स्पष्ट आहे की जर आपली कोणत्त्याही विषयावर सहमती नसेल तर मा. महापौर व सचिव साहेब प्रस्ताव मतदानास टाकतील. मी आपल्या विरोधी पक्षीय सदस्यांना सांगेन की, मी ही जी नावे पुकारणार आहे. त्यामध्ये भाजपा व शिवसेनेचे वतीने......

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आम्हाला यावर चर्चा पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आपल्याकडुन फक्त नावे जी आपणांतर्फे दयायची आहेत. ती दयावीत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-नाही नाही आम्हाला नावे दयायची नाहीत. आधी चर्चा करायची आहे आम्हास.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आपण विरोध केला आहेच ना? पण आता मला असे वाटते की, चर्चा ज्यांना करायची आहे, मी आता ९ नावांचा प्रस्ताव वाचुन दाखवितो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौरजी, गोष्ट नावांबाबतची नाही. गोष्ट समितीबाबत आहे.

मा. महापौरः-त्यांना बोलु दया. त्यांचे ऐकुन घ्या.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-नावांची गोष्ट आहेच नाही आपण काय बोलत आहात. नावांचा विषय आहेच नाही.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारीः-पंजाबी साहेब आपण कृपया आवेषात येवू नका. मला माझे बोलणे पुर्ण करू दया. मी आता बोलण्यास उभा आहे. दहा-दहा वेळा तर मी बोलण्यास उभा राहणार नाही. श्री. पंजाबी साहेब आपले सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी बोलले पहिले मी सूचक होतो. म्हणुन प्रस्ताव वाचुन दाखवितो. नावे वाचुन दाखवितो. आपणांस विचारतो आपला एकेक सदस्य घ्यायचा आहे का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-नाही. नाही.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी:-नाही, ठिक आहे.तर आता जे ९ सदस्य आहेत. त्यांची नावे मी वाचुन दाखवितो.

१. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
२. श्री. मोहनदास रामरख्यानी
३. श्री. सतरामदास जेसवानी
४. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
५. श्री. अंकुश म्हस्के
६. श्री. मोहन साधवानी
७. श्री. नारायण पंजाबी
८. श्रीमती. किरण माखिजा
९. श्री. प्रमोद टाले

या ९ सदस्यांचा प्रस्ताव मी आपणांसमोर ठेवतो. जेणेकरून या सदस्यांना विशेष महसुल समितीवर एक वर्षासाठी घेतले जावे. त्यांच्या सभापतीची निवड सदस्य आपल्यामधुन करतील तरी कृपया या समितीस मान्यता दिली जावी. व हा प्रस्ताव स्विकृत करून पारीत केला जावा. धन्यवाद .

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा. महापौरजी, या मुदयावर आम्ही चर्चा करू इच्छित होतो. जसे मी म्हंटले की नावांमध्ये आम्हाला काहीही स्वारस्य नाही. चर्चा सुरू करताना मी खास करून आयुक्तांना एक प्रश्न विचारू इच्छितो की, आज आम्ही दोन वाजता एक लक्षवेधी दिली. व आपण चार साडेचार वाजता, सभा चालु झाल्यानंतर आजच एक गोषवारा आम्हास प्रस्तुत केला. बरोबर आहे. त्याबाबत आम्ही आपणांस दाद देतो. परंतु आठ दिवसापुर्वी जेव्हा हा गोषवारा प्रस्तुत केला गेला तेव्हा त्यात एक विषय होता की या विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करण्याकरिता आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे. असे लिहिले होते. जे कलम ३६ मध्ये लिहिले आहे की आपण कार्यक्षेत्र निश्चित करायचे आहे तर आपण त्याबाबत आठ दिवसात कोणताही गोषवारा तयार करून का आणला नाही? याबाबत जरा सांगितले तर मी उर्वरित चर्चा पुढे करू शकेन.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, या प्रस्तावावर मी आपले लक्ष वेधु इच्छितो. हा प्रस्ताव कलम ३० नुसार आहे. व तो महापालिकेचा अधिकार आहे. समिती स्थापन करणे किंवा नाही, समितीची निर्मीती करणे किंवा नाही त्या समितीला कोणते अधिकार दयायचे हे सर्व आपण लोकांनी ठरवायचे आहे. त्यांनी प्रस्तावात काय लिहायचे आहे, प्रस्तावात काय दयायचे तो त्यांचा अधिकार आहे. त्यांनी प्रस्तावात दिले व मी मान्य केले, किंवा आयुक्तांनी मान्य केले असे होत नाही. त्यांचा प्रस्ताव सभागृहासमोर येईल त्यानंतर सभागृहाचा त्यावर निर्णय होईल व सभागृहाचे जर मला निर्देश मिळत असतील की या समितीचे कार्यक्षेत्र काय असले पाहिजे त्यासाठी प्रस्ताव समोर ठेवला तर मी प्रस्ताव समोर आणेन. त्यांच्या प्रस्तावावर जोपर्यंत सभागृहात काही निर्णय होत नाही. त्याअगोदर मी आपल्या समोर काही प्रस्ताव आणणे ही घाई होईल. हे अपरिपक्वतेचे लक्षण होईल. सभागृहाने अदयाप यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. समिती स्थापन करायची आहे किंवा नाही हा सुध्दा निर्णय घेतलेला नाही. समितीमध्ये किती सदस्य असले पाहिजेत हा सुध्दा निर्णय घेतलेला नाही. व समितीची कार्यकक्षा काय असली पाहिजे हा सुध्दा निर्णय घेतलेला नाही. फक्त त्यांचा एक प्रस्ताव आहे की एक समिती असली पाहिजे. आधी त्यावर निर्णय घ्या. नंतर समितीमध्ये किती सदस्य असले पाहिजेत त्यावर निर्णय घ्या. नंतर समितीमध्ये कोण कोण सदस्य असले पाहिजेत यावर निर्णय घ्या. व कार्यकक्षेबाबत जर आपण काही निर्णय घेवु शकत नसाल तर या प्रस्तावात दिल्याप्रमाणे आमच्या समोर सादर करू शकता, आम्हाला निर्देश देवू शकता.

त्यानंतर आम्ही आपल्या समोर येवु. ही कार्यकक्षा समितीची असली पाहिजे. आज हा केवळ अशासकीय प्रस्ताव आहे. व प्रस्ताव आला व त्यावर आम्ही त्वरीत आमची काही प्रतिक्रिया दिली. हे प्रशासनासाठी योग्य नाही. व हे अपेक्षित सुध्दा नाही.

**मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानी हया सभागृहातून बाहेर पडल्या.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-म्हणजे महासभेने जर आपणांस प्राधिकृत केले तर आपण कार्यक्षेत्र निश्चित कराल?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी कुठेही असे म्हंटले नाही की, मी कार्यकक्षा निश्चित करेन, कार्यकक्षा आपणांसच निश्चित करायची आहे. त्यामध्ये जर आपणांस काही सहकार्य पाहिजे. काय कार्यकक्षा असली पाहिजे. त्याबाबत आम्ही विधी विभागाकडुन अभिप्राय घेवून किंवा या प्रस्तावाची कायदेशिर बाजु तपासुन पाहुन आम्ही आपल्यासमोर येवु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-नाही. तपासुन पाहण्याची गोष्ट नाही. विधी अधिकारी येथेच बसलेले आहेत. हे अधिकार आयुक्तांना प्रदान केले जावु शकतात का? कार्यकक्षा निश्चित करण्याबाबत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-महापालिका आपले कोणतेही अधिकार आयुक्तांना किंवा अन्य कोणत्त्याही अधिका-यास प्रदान करू शकते ज्याचा उल्लेख कलम ४ मध्ये केलेला आहे. जे चार-पाच प्राधिकारी आहेत. महापालिका, स्थायी समिती, आयुक्त, प्रभाग समित्त्या हे जे चार प्राधिकारी आहेत. महानगरपालिका एक प्राधिकारी म्हणुन आपले कोणतेही अधिकार कुणासही प्रदान करू शकते. वरील प्राधिका-यांपैकी.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-जर आपणांस महासभेने याबाबत प्राधिकृत केले तर आपण कराल ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-महानगरपालिका जर आयुक्तांना कोणतेही निर्देश देत असेल तर त्यावर उत्तर देणे किंवा कार्यवाही करणे हे एक प्राधिकारी म्हणुन आयुक्तांचे कर्तव्य आहे. ते मी निभावेन जर आपण आदेश दिले तर आपण प्राधिकृत करत असाल तर.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-महापौर महोदया....

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-कलम ३०शी सुसंगत, आमचे जे नियम आहेत त्यामध्ये आठ समित्त्यांची तरतुद आहे.व ही नववी समिती असेल व मला वाटते की, जी तरतुद आहे ती आठ समित्त्यांबाबत आहे त्यामध्ये ९वी समिती आपण स्थापन करू शकत नाही असे मला वाटते कारण की जेव्हा आम्ही नियम तयार केले होते. ते नियम तयार केल्यानंतर त्यास शासनाच्या मंजुरीची आवश्यकता असते. जे उपविधी तयार केले जातात त्यांना शासनाची मंजुरी घेणे आवश्यक असते. ती मान्यता आपण शासनाकडुन कशी घ्याल या बाबीमध्ये मी जावु इच्छित नाही. व त्यानंतर आयुक्तांची याबाबत काय भुमिका राहिल याबाबत आता मी काही बोलु शकत नाही. कारण की आमचे जे कायदे आहेत. व सभांच्या कामकाजाचे जे नियम आहेत. नियमांमध्ये जी तरतुद आहे ती फक्त आठ समित्त्यांबाबत आहे. कलम ३०शी सुसंगत विशेष समित्त्या तयार केल्या जातात. आम्हाला असे वाटते की, जरी आठ समित्त्यांची तरतुद आहे. जेव्हा आमचे श्री. दिलीप लालवानी जेव्हा विशेष समिती बाबत बोलत होते तेव्हा खुप चांगले वाटत होते परंतु आधीच ज्या आठ समित्त्या तयार केल्या आहेत. त्यांचे कामकाज कसे चालले आहे. हे आपणांसर्वांना माहित आहे. जर आम्ही माहिती घेतली तर असे

दिसुन येईल की कोणकोणत्त्या समितीने काय काय केले. किती सभा घेतल्या किती ठराव पारीत केले याची माहिती घेतली तर आम्हांला माहित पडेल की, समित्त्यांचे कामकाज कसे चालले आहे. याबाबत अधिक टिप्पणी करणे मला वाटते योग्य नाही. याची प्रत्त्येकास जाणीव असली पाहिजे.आम्ही या समित्त्यांवर जो खर्च करतो पहिले आठ समित्त्या होत्त्या. आता ९ वी समिती स्थापन करत आहात. या समित्त्यांना काही कामकाजच राहीले नाही. म्हणुन आत ही ९ वी समिती स्थापन करण्याचे काहीही औचित्त्य नाही. व आपण विचारणा केलीत की सदस्य किती असले पाहिजेत. विशेष समितीवर जे सदस्य असतात ते नेहमी ९ सदस्य असतात व आम्हाला असे वाटते की, आठ समित्त्यांपेक्षा अधिक समित्त्या स्थापन करणे किंवा ही समिती स्थापन करणे म्हणजे महापालिकेवर आर्थीक ओझे वाढविण्यासारखे आहे. व या समितीचे कोणतेही औचित्त्य नाही. या अगोदर एक दक्षता पथक तयार केले आहे. मला वाटते हे जे कर्तव्य आहे ते प्रशासनिक कर्तव्य आहे. न्याय देणे, ज्या काही तक्रारी येतात. त्यांची दखल घेणे हे प्रशासनिक काम आहे. ते राजनितीक काम नाही. म्हणुन आम्हास असे वाटते की ही समिती स्थापन करण्याचे कोणतेही औचित्त्य नाही. म्हणुन या नव्या समितीची तरतुद करणे हे चुकीचे आहे म्हणुन आम्ही तिला पुर्णपणे विरोध करत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौर, सचिव, आयुक्त साहेब इथे श्री. किशोर वनवारी यांनी सूचना दिली आहे व तिचे अनुमोदन श्री. प्रमोद टाले यांनी केले आहे. कोणताही प्रस्ताव जेव्हा येतो तेव्हा तो पुर्णपणे आला पाहिजे. अनुमोदन मला वाटते अदयाप पर्यंत श्री. टाले यांनी केलेच नाही. काय झाले औपचारीकता पुर्ण झाली आहे का? आयुक्त साहेब याठिकाणी कोणतेही काम आपणांस करायचे असेल तर त्यामागचे उददेश काय? कुठल्या विचाराने प्रेरीत होवून एखादी पुढील घटना घडणार आहे किंवा घटना करण्यासाठी भाग पाडणार आहे. याठिकाणी श्री. प्रमोद टाले आणि श्री. किशोर वनवारी यांनी प्रस्ताव तयार करताना गोषवारा तयार करताना, असे स्पष्टपणे लिहिले आहे की वसुली विरूध्द अनेक तक्रारी येतात. चर्चा तर झाली पाहिजे. प्रस्ताव आल्यानंतर त्या प्रस्तावामध्ये जे नमुद केले आहे त्या बाबींवर चर्चा करणारच. तुम्ही लिहिता अनेक तक्रारी येतात. शहरात अशी धारणा झाली आहे की, महानगरपालिका उपभोक्त्त्यांच्या तक्रारीची दखल घेत नाही. म्हणुन त्त्यांना न्याय होत नाही. न्याय होत नाही म्हणजेच अन्याय होतो. त्याअर्थी पालिका सदस्यांची समिती नेमणे गरजेचे वाटते. म्हणजे एक की त्त्यांच्या विरूध्द ज्या तक्रारी येतात उपभोक्त्त्यांच्या त्या उपभोक्त्त्यांकडील तक्रारींची दखल घेत नाही. आणि महापालिका त्त्यांना न्याय देत नाही. आता महापालिकेच्या वतीने म्हणजे महासभेने काय निर्णय घेतला याची अंमलबजावणी करणे. हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाचे प्रमुख म्हणजे आपणच. म्हणजे आपण न्याय देत नाही? आपण न्याय देत नाही किंवा तिकडे लक्ष देत नाही. दुर्लक्ष करत आहात आणि म्हणुन या समितीची आवश्यकता आहे. म्हणुन श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो आरोप केला. तो चुकीचा आहे तर आपले याविषयी काय मत आहे?आवश्यक आहे की नाही? राजकीय जरी असली तरी प्रशासनाचा प्रमुख म्हणुन तुमचे मत काय? आवश्यकता याची आहे का? ज्या उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती एकदम डबघाईला आलेली आहे. आर्थीक उत्त्पन्न कमी आहे. उत्त्पन्न कमी व खर्च जास्त आहे. देणेही भरपुर आहे. अशा वेळेस मागील आयुक्तांनी किवा प्रशासनाच्या वतीने अगोदरच्या आठ समित्त्या, आता ही ९ वी समिती, श्री. लाल पंजाबी यांनी याबाबत जो प्रश्न उपस्थित केला की, आपल्या नियमांमध्ये आठ समित्त्यांची तरतुद असताना ही ९ वी समिती स्थापन करता येईल का? हे महत्त्वाचे आहे. त्याचे उत्त्तर विधी अधिकारी देतीलच? परंतु समजा ही समिती स्थापन केली. तर प्रशासनाची नेमकी भुमिका काय असणार आहे? की अगोदरच्या आयुक्तांनी या उल्हासनगर महानगरपालिकेच्या विशेष समित्त्या काही काम करत नाहीत. फक्त सभापतींना भत्त्ते देणे आणि त्यांचा खर्च हा महानगरपालिकेवर एक आर्थिक भुर्दंड आहे. याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला

की तो रदद करावा तर आता हे जे अतिरिक्त ओझे महानगरपालिकेवर का? तर आपण नक्की काय करणार. यावर आपली भुमिका काय असेल आपले मत काय असेल याची खरोखरच आवश्यकता आहे का? जर तुम्हाला वाटत असेल की, महासभेने किंवा महापालिकेचा प्रमुख म्हणुन कुठली बाब आम्ही लोकप्रतिनिधी तर हाताळत नाहीत. कुठल्या उपभोक्त्यांनी, अमुक अमुक यांनी आम्हाला छळले अशा प्रकारच्या तक्रारी आमच्याकडे तरी आलेल्या नाहीत. त्या तुमच्याकडेच आलेल्या आहेत. त्या सूचक आणि अनुमोदक यांना कळल्या आणि म्हणुन हा प्रस्ताव आलेला आहे. तर याची आवश्यकता आहे का? नसल्यास जर ठराव पारीत केला तर आपण काय करणार? आहे की नाही हे महत्त्वाचे आहे. आपण याचा सविस्तर खुलासा केला तर बरे होईल. ही विशेष समिती म्हणजे अगोदरच्या आठ समित्त्या तसेच त्यांचे सभापती आणि त्यांना दालन असणार त्याला वाहन भत्ता वगैरे सर्व मिळणारच आहे. म्हणजे वर्षाला साधारणतः २ लाखाच्या आसपास जो खर्च आहे तो अतिरिक्त होणार आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. बोडारे यांनी जे काही प्रश्न विचारले त्याबाबत मी ऐवढेच म्हणु इच्छितो की, महानगरपालिकेचा जो विशेष अधिकार आहे. एखादया विशेष समितीची स्थापना करणे. तीची कार्यकक्षा निश्चित करणे त्याबाबत मी अनुकूल किंवा प्रतिकुल मत देणे हे मला योग्य वाटत नाही. महापालिका आयुक्त हे एक प्राधिकारी आहेत. महानगरपालिका ही त्यांच्यापेक्षा एक मोठी प्राधिकारी आहे. या प्राधिकारणासमोर आज जो काही निर्णय आहे किंवा जो काही प्रस्ताव आहे त्याबाबत मी काही अनुकूल किंवा प्रतिकुल काहीही मी माझे मत दिले तर मी माझ्या कार्यकक्षेचे उल्लंघन करेल. विशेष समितीची निर्मीती करायची कि नाही याचा निर्णय आपणांस घ्यायचा आहे. जर महानगरपालिकेने हा निर्णय घेतला तर त्याची अंमलबजावणी, जर आपला निर्णय महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या विसंगत असेल तरच, त्यांवर अंमलबजावणी करायची किंवा नाही हा पण अधिकार आयुक्तांस नाही. अंमलबजावणी जर करायची नसेल तर राज्य सरकारकडे कलम ४५१ मधील तरतुदी नुसार पाठवायचे आहे. जर आपला हा निर्णय या कायदयातील तरतुदीच्या विसंगत असेल तर, जर हा निर्णय कायदयाशी सुसंगत असेल तर त्याची अंमलबजावणी करण्यापलिकडे दुसरा कोणताही निर्णय महापालिका आयुक्तांकडे नसतो. प्रथम आपण हा निर्णय घ्या की ही समिती स्थापन केली पाहिजे किंवा नाही, याबाबतीत आम्ही काहीही मत देवू शकत नाही.

**मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> आम्ही आपल्याकडुन मार्गदर्शनाची अपेक्षा करतो आपण म्हणता की प्रथम आपण ठराव पारीत करा. नंतर मी पाहिन, मला असे वाटते की आपले मार्गदर्शन महासभेस झाले पाहिजे. कारण की आपण सुध्दा या सभागृहाचे एक सदस्य आहात. कलम ४ मध्ये विशेष समित्त्यांच्या स्थापने बाबत जी तरतुद आहे आपले जे नियम तयार केले आहेत त्या नियमांमध्ये ८ समित्त्यांची तरतुद आहे. तर आपण नववी समिती कशी स्थापन करु शकतो? आपण आम्हांला त्याचे मार्गदर्शन करा. आपल्या संदर्भासाठी मी नियमातील तरतुद वाचुन दाखवितो. ४ अे विशेष समितीची रचना

महानगरपालिकेस, तिला आवश्यक वाटतील त्याप्रमाणे अधिनियमाच्या कलम ३० अन्वये ठराव करुन, निम्नलिखित एक वा अधिक विशेष समित्त्या नियुक्त करता येतील.

अ) सार्वजनिक बांधकाम समिती
ब) नियोजन व विकास समिती
क) पाणी पुरवठा व जलनिःसारण समिती

ड) आरोग्य परिक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती
ई) माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
फ) गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
ग) क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती

आपले काम आहे सभागृहास मार्गदर्शन करणे. श्री. हरदास माखिजा यांनी श्री. छगन भुजबळ यांना जरी चुकीची माहिती दिली तसे होता कामा नये.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, मी सुध्दा कलम ३० मधील तरतुदीकडे सन्माननिय सदस्यांचे लक्ष वेधु इच्छितो , कलम ३० असे म्हणते महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून विशेष समित्त्यांची नेमणूक करता येईल अशा समित्त्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत.

किती समित्त्या नेमल्या पाहिजेत कोणती समिती असली पाहिजे. हे कुठेही लिहिले नाही. व पूर्ण कलम ३० मध्ये कुठेही असे लिहिले नाही की, नियमांमध्ये ठरविले पाहिजेत की, कोणती समिती असली पाहिजे, व किती समित्त्या असल्या पाहिजे. हे नियमानी ठरवायचे नाही. हे ठरावान्वये ठरवायचे आहे. आणि तो ठराव कधीही मंजुर केला जाऊ शकतो व अधिनियम हे नेहमीच नियमांपेक्षा वरिष्ठ आहेत किती समित्त्या असल्या पाहिजेत याची नियमामध्ये तरतुद करण्याची आवश्यकता नव्हती. कोणत्त्या समित्त्या असल्या पाहिजेत हे ठरविण्याची आवश्यकता नव्हती. कोणती समिती असली पाहिजे. हे महापालिकेलाच ठरवायचे आहे. तो अधिकार महापालिकेचाच आहे. व त्या समितीची सदस्य संख्या किती असली पाहिजे. कार्यकक्षा काय असली पाहिजे. हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार महानगरपालिकेस आहे. व त्यामध्ये कालावधीसुध्दा निश्चित केलेला नाही. एक वेळ निश्चित केला म्हणजे त्यामध्ये आपण बदल करु शकत नाही असे सुध्दा नाही. फक्त एकच गोष्टीची आवश्यकता आहे, महानगरपालिकेने समितीची नेमणूक केली पाहिजे. व विशेष समिती ही महापालिकेला ठरवायची आहे. महानगरपालिका केव्हाही या बाबत निर्णय घेऊ शकते, समित्त्यांची संख्या , समित्त्यांचा प्रकार आणि या समित्त्यांच्या सदस्यांची संख्या .

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> आयुक्त साहेब , मी आणखी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो जेथेपर्यंत नियमांची तरतुद आहे. नियमांमध्ये असे लिहिले आहे, जसे आपण म्हटले की, महानगरपालिकेस , आपल्या पालिका सदस्यांमधुन विशेष समित्त्यांची नेमणुक करता येईल, परंतु नियमामध्ये असे लिहिले आहे की, महानगरपालिकेस तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे अधिनियमाच्या कलम ३० अन्वये ठराव करुन निम्नलिखित एक व अधिक विशेष समित्त्यांची नियुक्ती करता येईल. खाली नमुद केलेल्या म्हणजे हे जे जी लिहिले आहे. आठ समित्त्या, यानंतर एफ लिहिलेले नाही. तर हे एक मत भिन्नता (डिफरन्स ऑफ ओपिनियन) होवु शकते परंतु हे स्पष्ट आहे. परंतु खाली नमुद केलेल्या याचा जो अर्थ होतो. तो खालील आठ समित्त्या निम्नलिखित एक वा अधिक समित्त्या नियुक्त करता येतील. खाली नमुद केलेल्या समित्त्यांची ही नावे आहेत. अ ते ग पर्यंत त्यामध्ये जकात समिती किंवा महसुल समिती नाही. व नियम जे आहेत आपल्या म्हणण्यानुसार आम्ही जे नियम तयार केले आहेत ते चुकीचे आहेत?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी कुठेही असे म्हंटले नाही की महानगरपालिकेने जे नियम तयार केले आहेत ते चुकीचे तयार केले आहेत. मी ऐवढेच म्हंटले आहे की, महानगरपालिकेस हा अधिकार आहे. नियमाअन्वये महानगरपालिकेने स्वत:वर काही बंधने लादुन घेतली आहेत. परंतु अधिनियमाची तरतुद जी आहे ती इतकी स्पष्ट आहे की महानगरपालिका वेळोवेळी ठरवेल. नियमामध्ये कधीही बदल करण्यास आपणांस प्रतिबंध नाही. परंतु अधिनियम कायम स्वरूपी आहे.

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>नियमांसाठी शासनाची मंजुरी नको आहे?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>नियमांमध्ये जर सुधारणा करायची असेल तर त्याबाबतची तरतुद कलम ४५४, ४५५ मध्ये दिलेली आहे. ती नियमांसाठी आहे परंतु जर आपण नियम सुध्दा पाहिले तर, कोणत्त्या कारणासाठी नियम तयार केले आहेत हे जर आपण पाहिले तर विशेष समित्त्यांच्या स्थापनेसाठी त्यांचे कामकाज चालविण्यासाठी नियम तयार करणे हे कुठे लिहिलेले नाही. ४५७, ४५८ आपण वाचुन पहा. तुम्ही नियमांच्या तरतुदी पहा. नियम कशासाठी तयार करायचे आहेत. विशेष समित्त्यांचे संख्येबाबत नियम तयार करण्याची आवश्यकता नाही. मला आपणांस असे सांगायचे आहे की, कुठेही बंधन नाही की, विशेष समित्त्या किंवा विषय समित्त्यांची स्थापना करण्यास कुठेही प्रतिबंध नाही. याबाबत आपणांस पुर्णपणे अधिकार आहेत. महानगरपालिकेला याबाबत अधिकार आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. आयुक्त साहेब,मा.महापौर महोदया, महापालिका या शब्दाचा अर्थ काय? याचा शब्दशः अर्थ काय?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, येथे एक प्रशिक्षण सत्र घेण्यास मला अतिशय आनंद होईल. परंतु सन्माननिय सदस्य मला महानगरपालिका या शब्दाचा अर्थ विचारत आहेत. सेक्शन २ मध्ये महानगरपालिका या शब्दाची व्याख्या दिलेली आहे.*

*यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनदास पुरस्वानी:-</u>सचिव साहेब, हे सांगा की महानगरपालिका या शब्दाचा अर्थ काय?*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आपण वैयक्तिक टिका टिप्पणी करण्याचा मोह का टाळत नाहीत?*

*<u>मा. महापौर:-</u>जर आपण या गोष्टीवर ऐवढी चर्चा करत बसलात तर.....आयुक्त साहेबांनी आपणांस उत्तर दिले आहेच ना?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मला एक गोष्ट केली पाहिजे. मी येथे जो बसलो आहे तो आपल्या समोर जे प्रस्ताव येतात त्याबाबत जर का अधिक माहिती हवी असेल तर ती दयावी म्हणुन. जर कुणी मला महानगरपालिका या शब्दाचा अर्थ विचारत असेल तर अधिनियमांची पुस्तके आपणांकडे आहेत त्यात आपण पाहु शकता. आपणांस अर्थ समजावुन सांगणे हे काही माझे काम नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>दोन वेळा हे सदस्य म्हणुन निवडुन आले त्यांना महानगरपालिका या शब्दाचा अर्थ माहित नाही?*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मी आपणांस हे सांगु इच्छितो की, येथे महानगरपालिका या शब्दाचा दुरूपयोग केला गेला आहे. ऐवढया मोठया महासभेस महानगरपालिका म्हंटले जाते. व जे काम ऐवढी मोठी महानगरपालिका करू शकत नाही ते काम ऐवढी छोटीशी विशेष समिती करेल? आपण ते वाचा येथे लिहिले आहे. महापालिका उपभोक्त्यांच्या तक्रारीची दखल घेत नाही. महानगरपालिकेचा अर्थ आहे. पुर्ण महासभा, ही महासभा जे काम करू शकत नाही. ते एक*

लहानशी समिती करेल? व या महानगरपालिकेतील सर्वेसर्वा महापौर आहेत. त्या महापौरांवर असा आरोप लावला जात आहे की, आयुक्तांवर आरोप लावला जात आहे. याचे विश्लेषण कृपया सचिव साहेबांनी करावे. महानगरपालिका या शब्दाचा शब्दशः अर्थ काय आहे?

<u>मा. महापौरः</u>-आपण एकाच गोष्टीवर चर्चा करत राहिलात तर पुर्ण रात्रभर इथेच बसुन रहावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः</u>-जी समिती स्थापन करत आहात....

<u>मा. महापौरः-</u> समिती तर स्थापन करायची आहेच ना आज नाही तर उदया.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः</u>-आयुक्त साहेब, मला अतिशय आनंद होत आहे की, आपण ही जी दक्षता समिती स्थापन केली आहे. तिच्यावर सत्ताधारी पक्षातील सदस्यांचा विश्वास नाही का? म्हणुन ही विशेष समिती स्थापन करीत आहात. मला वाटते की दक्षता समिती काहीही काम करत नाही. जी आपण अधिका-यांची दक्षता समिती स्थापन केली आहे ती की जी सत्ताधारी पक्षातील सदस्यांना मंजुर नाही. तर मी हे विचारू इच्छितो की, ही जी विशेष समिती स्थापन होईल. त्यांना निर्णय घेण्याचे काही अधिकार आहेत का? जेव्हा आपण अधिका-यांची ही जी दक्षता समिती नेमली आहे. तर या सदस्यांना दक्षता समितीवर का विश्वास नाही. दुसरी गोष्ट मी सत्ताधारी पक्षाला विचारू इच्छितो की २१ तारखेला जकात अभिकर्ता नेमणेबाबतची सभा आपण चार मिनिटांमध्ये पुर्ण केलीत. तेव्हा आपणांस हे माहित नव्हते का की व्यापा-यांच्या ब-याचशा तक्रारी येणार आहेत? तक्रारी होत्त्या बरेचसे मोर्चे आले होते. त्यानंतरही आपण त्या सभेचे कामकाज चार मिनिटामध्ये पार पाडले आता आपणांस एक महिन्यानंतर असे कसे आढळुन आले की, ब-याचशा तक्रारी आहेत. प्रशासन त्यांची दखल घेत नाही म्हणुन या विशेष समितीची आवश्यकता भासली. मला समजत नाही. त्या गोष्टीस एक महिना देखिल पुर्ण झाला नाही. आमच्या सत्ताधारी पक्षातील सदस्यांना वाटले की व्यापा-यांच्या तक्रारीची कोणी दाद फिर्याद घेत नाही. जेव्हा व्यापारी म्हणत होते की, आमच्या तक्रारींची दखल घेतली जात नाही तेव्हा यांनी ४ मिनिटांमध्ये, जकात अभिकर्ता नेमण्याबाबत चार मिनिटामध्ये सभेचे कामकाज पार पाडले. १८ तारखेला आमच्या आयुक्त साहेबांनी जेव्हा दक्षता पथकाची स्थापना केली आहे. तेव्हा त्यांनी म्हंटले आहे की,या दक्षता पथकाची स्थापना केली आहे. त्यानंतर सत्ताधारी पक्षाचा प्रशासनावरच विश्वास नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-म्हणजे याचा अर्थ असा आहे की, हा जो प्रस्ताव आणलेला आहे. तो प्रशासनाशी चर्चा करून आणला आहे. महापालिकेवर त्यांनी आरोप केला आहे तो तुम्हाला मान्य आहे? उपभोक्त्यांकडुन आलेल्या तक्रारीची दखल घेतली जात नाही व प्रशासन ऐकत नाही. त्यामुळे ही समिती आहे असा त्यांचा आरोप होता. तुम्ही त्यांचे समर्थन करता म्हणजे तुमच्या मान्यतेनेच ते आलेले आहे. माझे बोलणे पुर्ण होवू दया त्यानंतर तुम्ही बोला. त्यामुळेच ही कमिटी स्थापन करण्यासाठीच. आतापर्यंत लोकांनी केलेल्या तक्रारीची आपण दखल घेत नव्हता व त्यांच्या समस्यांची सोडवणुक होत नव्हती असा आमचा स्पष्ट आरोप आहे. या लोकांना अशा समितीकडे जाण्यासाठी आपण जाणुन बूजुन प्रवृत्त केले आहे, प्रशासनाने उद्युक्त केले आहे. जाणुन बूजुन सत्ताधा-यांना कमिटी स्थापन करण्यासाठी आपण भाग पाडलेले आहे. प्रशासन सुध्दा यामध्ये सहभागी आहे.

**मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल, श्रीमती. कृष्णानी रेखा, श्रीमती. संगिता जावळे रात्री ८.०० वाजता सभागृहातुन बाहेर गेल्या.**

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, माझा हरकतीचा मुददा आहे. तुम्ही असे म्हंटले आहे की, तक्रार केली व त्यावर आम्ही दखल घेतलेली नाही. आपण जेव्हा आमच्यावर आरोप करता, जेव्हा प्रशासनावर आरोप करता की आम्ही अशी स्थिती निर्माण केलेली आहे समिती स्थापन करण्यासाठी. मा. महापौर महोदया, आपण असे एकतरी उदाहरण आम्हाला दाखवा की ज्याची आम्ही दखल घेतलेली नाही. मी एक गोष्ट सांगु इच्छितो की कुठल्याही तक्रारीची दखल घेणे हे हेच कार्यकारी कर्तव्य आहे. ही समिती झाल्यानंतरही आम्ही आमच्याकडील कार्यकारी अधिकार त्या समितीकडे सोपविणार नाही. कोणतेही आयुक्त आपले कार्यकारी कर्तव्य कोणत्त्याही समितीकडे सोपविणार नाही. आपण विचारले म्हणुन आम्ही आपल्याला कायदेशिर माहिती दिलेली आहे. याचा अर्थ जर आपण असा काढत असाल की, आमचे या प्रस्तावाला समर्थन आहे तर ते चुकीचे आहे. आपण या चुकीच्या समजुतीत राहु नये. या प्रस्तावावर आपण आरोप करू शकता, आपल्याला देवाने तोंड दिले आहे आपण आरोप करू शकता. परंतु.....*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>काही गोष्टी दिसतात, काही दिसत नाहीत. तरी पण ते दिसुन येते.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया ,हा जो आरोप आहे याचे मी स्पष्टपणे खंडन करत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>या विषयावर आतापर्यंत पुष्कळ चर्चा झाली. श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी जे म्हंटले की आपणांस समितीची आवश्यकता आता का भासली. त्यावेळी ४ मिनिटातच बैठक पुर्ण का केली तर यावर मी उत्तर देवू इच्छितो. सत्ताधारी पक्षाचे ४९ सदस्य सभागृहात उपस्थित होते त्यादिवशी आपल्याला काय अडचण होती. की आपला एकही सदस्य आतमध्ये नव्हता.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>माझा हरकतीचा मुददा आहे. त्यादिवशी बैठक ४ वाजताच सुरू करण्याची काय आवश्यकता होती. ऐवढी काय घाई होती. आज ४ वाजता का आला नाहीत?*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>तुम्ही ऐवढे घाबरट का बनता? स्वतःचा घाबरटपणा का कबुल करता आपण एवढे घाबरट केव्हापासुन झालात?*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>त्यादिवशी ज्या लोकांनी हजेरीपटावर सही केली होती ते सुध्दा निघुन गेले. आतापर्यंत असे कधी झाले आहे? विरोधी पक्षातुन एकही सदस्य उपस्थित नव्हता असे का झाले?*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>श्री. वनवारीजी अशी गोष्ट असेल तर त्यादिवशी तुम्ही महापौर येण्याची देखिल वाट पाहिली नाही?*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>आपण तर महापौरांचा सुध्दा अपमान केला.*

*<u>मा. महापौर:-</u>आपण लोक आले नव्हतात,महापौर आल्या नव्हत्त्या तरी श्रीमती. जया साधवानी या पिठासिन अधिकारी म्हणुन उपस्थित होत्त्या.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आपण नेहमी असे म्हणता की महापौरांचा अपमान होतो, महापौरांचा अपमान होतो तर त्यादिवशी काय झाले होते?*

*<u>मा. महापौर:-</u>मी उपस्थित नसले तरी उपमहापौर उपस्थित होत्त्या दोघींपैकी एकना एक उपस्थित होती. त्यावेळी माझ्या कार्यालयात बैठक चालु होती.*

काही सदस्य :-महापौर महोदया, आपले निवदेन आहे........

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

मा. महापौरः-नंतर मी आले होते पण तुम्ही आले नव्हतात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आपण असे म्हणता की ५० जण बसलो होतो मग २० जणांना का घाबरलात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-श्री. दिलीप गायकवाड जे म्हणत आहेत, त्यांच्याशी मी सहमत आहे. महापौरांनी जो उशिर केला, आम्ही त्यांची वाट पाहिली नाही. तुम्हा लोकांना लक्षात आहे का, जेव्हा महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभागृह नेता आलेले नव्हते तेव्हा श्री. जमनादास पुरस्वानी यांना महापौर म्हणुन बसविले होते.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-आपण असे म्हणता की ५० जण बसलो होतो मग २० जणांना का घाबरलात का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-प्रभाग समिती नं. १ येथे दोनवेळा हे बिच्चारे जमनु सभापती म्हणुन बसले होता.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-माझी हरकत आहे, त्यांनी पुनश्च जमनु असे म्हंटले त्याबददल माफी मागा. आपण सभागृह नेता आहात आपण सदस्यांचा मान ठेवायला हवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-तर मग आम्ही सुध्दा किशोर बोलू.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आपण सभागृह नेता आहात, आपण सन्माननिय सदस्याचा मान ठेवा, जमनु असे एकेरी शब्द वापरू नका.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-तुम्ही भित्रे आहात.

**मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया रात्री ८.१४ वाजता सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मग आपणासही ते तसेच म्हणतील, आपण सभागृह नेता आहात, सभागृह नेत्त्यांचा अपमान होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-त्यांनी त्यांचे शब्द परत घ्यावेत मी देखिल माझे शब्द परत घेतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आपण सभागृह नेता आहात आपण लहान मुलांसारखे वागलात तर कसे चालेल?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-हा जो प्रस्ताव आहे तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास करण्यात यावा.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-जेव्हा पण मतदानाची वेळ येते तेव्हा महापौर निघुन का जातात.

यावेळी काही सन्मानिनिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-या विषयावर पुष्कळ चर्चा झाली आता मी हा प्रस्ताव मतदानासाठी टाकत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आप-आपले हात वर करावेत.

## ३७ मते

१७. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
१८. श्रीमती. रामचंदानी भावना
१९. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
२०. श्री. ऐडके गणपत
२१. श्रीमती. शर्मा कमला
२२. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
२३. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
२४. श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्री. पवार नाना आनंदा
१० श्रीमती. आहुजा नीता
११ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१२ श्री. शांताराम निकम
१३ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१४श्रीमती. मसंद माया
१५ श्री. गायकवाड सुरेश
१६ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१७ श्री. लुंड गोविंदराम
१८ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
१९ श्रीमती. कारीरा रेखा
२० श्री. पमनानी ईश्वर
२१श्री. पंजाबी नारायण
२२ श्रीमती. पंजाबी दिपा
२३ श्रीमती. भठिजा कोमल
२४ श्रीमती. माखिजा किरण
२५ श्री. होशियारसिंग लबाना
२६ श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
२७ श्री. तलरेजा विनोद
२८ श्रीमती. नाथानी निना
२९. श्रीमती. रिझवानी सुजाता
३० श्रीमती. भारती पहलाज छाबिया
३१ श्रीमती. दासानी मिनु
३२. श्री. म्हस्के अंकुश
३३ श्री. जाधव सुरेश
३४ श्री. जाधव प्रशांत

३५ .श्री. टाले प्रमोद
३६ श्री. साधवानी मोहन
३७ श्रीमती. साधवानी जया

<u>मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-</u> जे सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

## <u>१५मते</u>

१२. श्री. ठाकुर वेहरानी
१३. श्री. उमाप रामदास
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्री.राज असरोंडकर
६. श्री. सोनावणे नथु
७. श्री. गायकवाड दिलीप
८. श्रीमती. वामणकर नंदिनी
९. श्रीमती. माने किरण
१० श्री. चव्हाण रमेश
११ श्री. बोडारे धनंजय
१२ श्री. पाटील विश्वनाथ
१३ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१४ श्री. चौधरी राजेंद्र
१५ श्रीमती. जयश्री सुर्वे

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ९:- प्रस्तावाची सूचना</u>.

श्री. किशोर वनवारी व श्री. प्रमोद टाले या सन्माननिय सदस्यांनी ''महसुल विशेष समिती रचना'' बाबत दिलेल्या प्रस्तावाची सूचना.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव:- श्री. प्रमोद टाले

## <u>प्रस्ताव:-</u>

उल्हासनगर शहरामधील जकात व मालमत्ता कर वसुली विरूध्द अनेक तक्रारी येतात. शहरात अशी धारणा झालेली आहे की महापालिका उपभोक्त्यांच्या तक्रारीची दखल घेत नाही म्हणुन न्याय होत नाही. त्याअर्थी महापालिकेस आपल्या पालिका सदस्यांमधुन महसुल विभागासाठी विशेष समितीची नेमणुक करणे आवश्यक आहे. अशा सदस्यांनी महापालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पार पाडले पाहिजे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये सदर समितीची रचना करता येईल. महापालिका आपल्या विशेष ठरावाव्दारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये या विशेष समित्त्यांकडे प्रत्त्यावर्तीत करेल.

हया विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करण्या करिता आयुक्तांस प्राधिकृत करित आहे व त्त्यांनी निश्चित केलेले कामकाज क्षेत्र या समितीचे व या प्रस्तावाचे भाग मानला जाईल.

शहरातील लोकांच्या अडचणी विचारात घेता प्रशासन आणि जनप्रतिनिधी यांच्या कामाला गती देण्यासाठी विशेष महसुल समितीची रचना आवश्यक असुन महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव ६६ दिनांकः-२० ८ २००३

वरील प्रस्ताव विचारात घेता ही महासभा पुढील नऊ सदस्यीय विशेष महसूल समितीची नेमणुक करित आहे. आणि आयुक्तांस या समितीचे कामकाज क्षेत्र निश्चित करणेस प्राधिकृत करित आहे.

१०. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
११. श्री. मोहनदास रामरख्यानी
१२. श्री. सतरामदास जेसवानी
१३. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
१४. श्री. अंकुश म्हस्के
१५. श्री. मोहन साधवानी
१६. श्री. नारायण पंजाबी
१७. श्रीमती. किरण माखिजा
१८. श्री. प्रमोद टाले

तसेच आयुक्त निश्चित करतील ते कामकाज क्षेत्र या समितीचे व या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-पुढील विषय जो आयत्त्यावेळीचा विषय आहे तो सर्वांना मंजुर आहे ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी एक बोलु इच्छितो की......सभागृह नेत्त्याला...
काही सदस्य :-मा. महापौर...

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-ते समितीच्या सदस्यांची नावे सांगत आहेत, कोण कोण या समितीमध्ये सदस्य असतील....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-जे सभागृह नेता आहेत ते सदर कमिटीचे अध्यक्ष राहतील, उपाध्यक्ष विरोधी पक्षनेता असतील ज्याप्रमाणे मागच्या वर्षी

प्रत्येक पक्षाचे सदस्य घेतले होते त्याचप्रमाणे आम्ही आपसात ठरवुन आपणांस दोन-तीन दिवसात कळवु.

<u>मा. उपमहापौर (पिठासिन अधिकारी):-</u>तीन दिवसाच्या आत?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>तिसरा कुणी नाही पाहिजे?

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u>सन २००३-२००४ या वर्षासाठी ' गणेश दर्शन स्पर्धा समिती नेमणेबाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महापालिका क्षेत्रात दरवर्षी 'गणेश दर्शन स्पर्धा' आयोजित केली जात आहे. या स्पर्धेतील पारितोषिके निश्चित करण्यासाठी महापालिकेची क्रिडा समिती, गणेश मंडळांना भेट देवून पारितोषिके निश्चित करीत. परंतु यावर्षी अदयापावेतो क्रिडा समिती गठीत करण्यात आली नसल्यामुळे पारितोषिके वितरण शक्य होणार नाही. यावर्षी श्री. गणेशाची स्थापना ३१.८.२००३ रोजी होणार असून, गणेश विसर्जन ९.९.२००३ रोजी होणार आहे. तत्पुर्वी क्रिडा समिती अस्तित्त्वात येणे शक्य होणार नाही. त्यामुळे यावर्षी गणेश दर्शन स्पर्धेचे पारितोषिक वितरणासाठी तदर्थ समिती स्थापन करण्यात यावी. असे प्रस्तावित आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी सभागृह नेता व उपाध्यक्षपदी विरोधी पक्षनेता असे प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त या समितीमध्ये १३ सभासद असावेत, असे एकुण १५ सदस्यांची समिती नियुक्त करावी. सभागृहातील १५ सभासदांव्यतिरिक्त या समितीमध्ये मुर्तिकार, चित्रकार, नेपथ्यकार व काही समाजसेवक व पत्रकार यांचा समावेश असावा.

सदर समितीने ३१.८.०३ ते ९.९.०३ या कालावधीत महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेश उत्त्सव मंडळांना भेटी देवून प्रतिवर्षाच्या निकषांप्रमाणे पारितोषिके निश्चित करून महापालिका प्रशासनाला शिफारस करावी.

गणेश दर्शन स्पर्धेसाठी क्रिडा समिती अस्तित्त्वात नसल्यामुळे तदर्थ समिती गठीत करावी सदर विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने आयत्यावेळी महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र.</u> ६७ <u>दिनांक:-२०.८.२००३.</u>

सुचकांची नावे :-श्री. नारायण पंजाबी

श्री. लाल पंजाबी

अनुमोदकांची नावे :-श्रीमती. किरण माने

श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

वरील प्रस्ताव विचारात घेता ही महासभा सन २००३-२००४ या वर्षासाठी श्री. गणेश दर्शन स्पर्धा समितीची नेमणुक करित आहेत. या समितीवर पालिका सदस्यांमधुन सभागृह नेता यांची अध्यक्ष म्हणुन व विरोधी पक्ष नेता यांची उपाध्यक्ष म्हणुन निवड करीत आहे. आणि या समितीवर काम करण्यासाठी इतर पालिका सदस्य व विशेष अर्हता धारण करणा-या व्यक्तींना या दोघांच्या सहमतीने नेमता येईल.

नेमण्यांत येणारे हे सदस्य या समितीचा व या ठरावाचा भाग मानला जाईल.

वरील निर्णय अंतर्भुत असणारा ठराव कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्याशिवाय त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यांत येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापुर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८.१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः-१९/९/२००३

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/९/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. १९.९.२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३८. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३९. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ४०. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४१. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४२. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४३ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ५१. | श्री. अंकुश म्हस्के |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५४. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५५. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५६. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५७. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५८. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्री. संजय भठीजा |
| २९. | श्रीमती. मोना वनवारी | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. मोहन साधवानी, | ६६. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्री. इदनानी राजू चंद्रभान |
| ३४. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७०. | श्री. माखिजा हरदास |
| ३६. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७१. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ७२. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर

मा. सदस्य १. श्री. वाघे शामु बाबु २. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश ३. श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेन्द,४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ५ श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे, ६. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण,७. श्रीमती. किरण लखी मारवीजा, ८. श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, शहरामध्ये डेंगु या आजाराची जी साथ सुरू झाली आहे. त्यामध्ये माझ्या प्रभागातील एक साडे तीन वर्षाचा मुलगा या आजारामुळे निधन पावला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>हे काय चालले आहे?

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>शिवराज शंकर राठोड नावाचा तो मुलगा....

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>महापौरजी, हे काय चालले आहे?

<u>मा. महापौरः-</u>त्यास श्रध्दांजली अर्पित करायची आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>श्रध्दांजली अर्पित करायची आहे?

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>डेंगुच्या साथीने त्याचे निधन झाले आहे. म्हणुन मी आपणांस विनंती करतो की, दोन मिनिटे उभे राहुन त्यास श्रध्दांजली अर्पित केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>मा. महापौरजी, आपल्या आरोग्य विभागातील एक कर्मचारी श्री. प्रविण वानखेडे यांचे सुध्दा दि. १४.९.२००३ रोजी अपघाती निधन झाले. त्यांना सुध्दा श्रध्दांजली वाहीली जावी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया आपापल्या जागेवर उभे राहुन मौन धारण करावे.

सुचकाचे नाव :- श्री. अशोक ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

<u>शोक प्रस्ताव :-</u>

उल्हासनगर शहरामध्ये पसरलेल्या डेंगुच्या साथीमध्ये प्रभाग क्र. १८ क मधील बंजारा कॉलनी, पवई चौक, उल्हासनगर -३ येथील कुमार शिवराज शंकर राठोड या साडेतीन वर्षाच्या मुलाचे निधन झाले.

तसेच महापालिकेच्या आरोग्य विभागातील एक कर्मचारी श्री. प्रविण वानखेडे यांचे दि. १४.९.२००३ रोजी अकस्मित अपघाती निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>विशेष महासभा ठराव क्र.</u> **६८ अ** <u>दिनांकः-१९.९.२००३.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कुमार शिवराज शंकर राठोड व श्री. प्रविण वानखेडे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, एक प्रश्न विचारतो की सभागृहावर जी प्रेक्षक गॅलरी आहे. त्या गॅलरीमध्ये जे प्रेक्षक येतात त्यांच्यासाठी काही नियम आहेत का? गॅलरीमध्ये जे प्रेक्षक येतात त्यांना प्रेक्षक गॅलरीत प्रवेश देण्यासाठी काय नियम आहेत?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सभागृहाच्या गॅलरीमध्ये ज्यांना प्रवेश दयायचा आहे, कुणाला प्रवेश दयायचा कुणाला दयायचा नाही. त्यासाठी विनियम तयार करण्याचा मा महापौरांना अधिकार आहे. व पुढील सभेपर्यंत ते विनियम तयार केले जातील व विनियमाच्या हिशोबाने जे पात्र असतील त्यांनाच प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>जर महापौरांनी म्हंटले की, एखादयाला प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दयायचा आहे. परंतु सुरक्षा कर्मचारी त्यांना प्रेक्षक गॅलरीत प्रवेश देत नसेल तर त्याबाबत काय करायचे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>पुढच्या सभे पर्यंत विनियम तयार केले जातील. व त्यानुसार प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जाईल.

विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कृष्णानीः-</u>मा. महापौरजी, उप-महापौरजी व आयुक्त साहेब, माझ्या नगरसेवक निधीतील मागील वर्षीचे काम अदयाप होत नाही. तीन महिन्यापासून गल्ली खोदून ठेवली आहे. परंतु काम होत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतचे काम आहे. ते होत नाही. तरी याबाबत कार्यवाही केली जावी. तीन महिन्यापासून गल्ली खोदून ठेवली आहे परंतु काम करत नाहीत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :- मा. महापौरजी व आयुक्त साहेब, गेल्या दोन-तीन महिन्यापासून मा. आयुक्त साहेब यांनी आश्वासन दिले आहे की, दुर्बल घटकातील काम लवकरात लवकर चालु करू असे त्यांनी आम्हाला मागच्या वेळेस आश्वासन दिले आहे. आणि या अगोदरही सांगितले आहे आणि दोन दिवसापुर्वी पाण्याच्या समस्येबाबत आमचे शिष्ट मंडळ त्यांना भेटण्यासाठी गेले होते त्यावेळेस त्यांनी सांगितले की, पाच कामे चालु केली आहेत. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागात चौकशी केल्यानंतर आम्हाला असे कळाले की कुठलेही काम चालु केलेले नाही. फक्त एकच काम, कलवर्टचे काम चालु केले आहे. तर याठीकाणी मी आपल्या असे निर्दशनास आणुन देवू इच्छितो की, म्हाडा आणि दुर्बल घटकांची जी कामे थांबलेली आहेत. ज्या कामांच्या अभावामुळे या शहरामध्ये डेंगु सारखा भयानक साथीचा रोग पसरून काही लोकांचा मृत्यु होत आहे. म्हणुन दुर्बल घटकांची, गलिच्छ वस्त्यांमधील याबाबतची कामे लवकरात लवकर सुरू करावीत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १९७ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-मा. महापौर महोदया व आयुक्त महोदय, आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती. रेखा कृष्णानी यांनी जो मुददा मांडला. त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या प्रभागामध्ये जे काम सुरू आहे तर त्यामध्ये ठेकेदार कामाकडे लक्ष देत नाही. ब-याच दिवसापासुन काम बंद आहे. आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही अधिकारी त्याचा पाठपुरावा करत नाही. तर अधिका-यांने कर्मचा-यांनी या कामाचा पाठपुरावा केला पाहिजे. व लवकरात लवकर हे काम झाले पाहिजे आणि ठेकेदार जर काम करत नसेल तर त्याचा ठेका रदद करा, त्यांच्यावर कारवाई करा. काहीतरी करा. आपण त्याच्यावर कारवाई केली पाहिजे.

प्रश्न क्र. १९७ :- ब्लॉक नं. ए-२ रुम नं. ७ व ८ शिट नं. ८१, उल्हासनगर-१ जागेवरील बांधकाम परवानगी क्र. उमपा/नरवि/बांप/८५/०२/४२० मंजुरीच्या (सो. चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या मालकीच्या) इमारत बांधकामाचे पायाभरणीचा दाखला घेतला आहे का व कोणत्त्या तारखेला घेतला?
अ) सदर इमारतीचे बांधकाम परवानगी पासून ते दि. १३.६.२००३ पर्यंत इमारतीचे बांधकाम पुर्ण करुन रहिवास वापर सुरु केला आहे का?
ब) बांधकाम पर्णू झाले नसल्यास दि. २५/६/२००३ पर्यंत इमारतीचे किती बांधकाम सद्यस्थितीला पूर्ण झाले आहे तसेच सद्या त्या इमारतीची वस्तुस्थिती काय आहे?
क) दिनांक १३.६.२००३ च्या उमपा/नरवि/बांप/८५/०२/४६५ चे पत्रकाच्या नोटिसीनुसार बांधकाम पुर्णतेचा दाखला प्राप्त न करता इमारतीचे रहिवास वापर सुरु केले असल्याचा सदर इमारतीच्या बांधकामास नोटिसा वस्तुस्थिती पाहून कोणत्त्या अधिका-यांच्या अहवालावर नोटिस बजावली आहे?
ड) अशा प्रकारच्या खोटया व बदनामकारक नोटिस किती जणांना डोळेझाक करुन पाठविल्या आहेत, त्याचा सविस्तर तपशिल देण्यात यावा व महापालिकेच्या भ्रष्ट बेजबाबदार अधिका-यांवर महापालिकेने कोणती कार्यवाही केली आहे का?

उत्त्तर :- १) पायाचा दाखला घेतलेला आहे.
२) सदर पायाचा दाखला दि. ८/५/२००३ रोजी दिलेला आहे.
अ) सदर इमारतीचे तळमजल्याचे आरसीसीचे बांधकाम पूर्ण करुन पहिल्या मजल्याचे बांधकाम चालू होते. अर्जदार यांना १३/६/२००३ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम पुर्णतेचा दाखला घेतल्याशिवाय वापर करण्यात येऊ नये वापर चालु

केला असल्यास त्याबाबतचा खुलासा १५ दिवसाच्या आत सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. याबाबतचा अर्जदार यांनी दिनांक २३/६/२००३ रोजीच्या पत्रान्वये वापर चालु नसल्याचा खुलासा सादर केला असता दि. ४/७/२००३ रोजी प्रत्यक्ष जागा पाहणी करुन अर्जदार यांना दि. ११/७/२००३ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगीतील कोणत्त्याही अटींचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत अर्जदार यांना कळविण्यात आलेले नाही.
ब) दि. २५/६/२००३ पर्यंत तळमजल्याचे बांधकाम पूर्ण होऊन पहिल्या मजल्याचे बांधकाम प्रगती पथावर होते. दि. ४/७/२००३ रोजी प्रत्त्यक्ष जागेची पाहणी केली असता तळमजल्याचे बांधकाम पूर्ण करुन पहिल्या मजल्याचे आरसीसीचे काम चालु करण्यासाठी सेंट्रिंगचे काम जवळपास पूर्ण केले असल्याचे दिसून आले.
क) अर्जदार यांच्या इमारतीची प्रत्यक्ष जागा पाहणी करण्यापूर्वी अर्जदार यांच्याकडून प्रथम १५ दिवसाच्या आत खुलासा मागविण्यात आलेला आहे. अर्जदार यांच्या दि. २३/६/२००३ रोजी खुलासा प्राप्त झाल्यानंतर दि ४/७/२००३ रोजी नगररचनाकार यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली आहे. जागा पाहणीनंतर दि. ११.७.२००३ रोजीच्या पत्रान्वये मंजुर नकाशातील कोणत्त्याही अटिंचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत अर्जदार यांना कळविण्यात आलेले आहे.
ड) इमारतीच्या पायाचे दाखले घेतलेले आहेत. परंतु बांधकाम पुर्णतेचा दाखला घेतलेला नसल्याने एकूण्पा १३९ अशा इमारतींना नोटिसा बजाविलेल्या आहेत. त्यापैकी एकूण ५० अर्जदारांचा खुलासा प्राप्त झालेला आहे. करीता प्रकरणात अर्जदार यांच्याकडुन प्राप्त झालेल्या अर्जानुसार प्रत्यक्ष जागा पाहणी करुन अंतिम कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच ज्या अर्जदारांनी अदयाप खुलासा सादर केलाला नाही अशा इमारतीची प्रत्यक्ष जागा पाहणी करुन अंतिम कार्यवाही करण्यात येणार आहे. बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार वेळोवेळी चालु असलेल्या बांधकामाची पाहणी करण्यापूर्वी प्रथम अर्जदार यांच्या मार्फत खुलासा मागवून खुलाशाच्या अनुषांगाने प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन जागा पाहणीमध्ये आढळून आलेल्या बाबीनुसार संबंधित अधिकारी / कम्रचारी यांनी कर्तव्य परायजता दर्शविलेली नसल्यास संबंधित बेजबाबदार आकि-यावरती आणि कर्मचा-यावरती आवश्यक ती कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>साहेब मी हा जो प्रश्न विचारला आहे. त्यामध्ये मी असे विचारले आहे की ही जी नोटीस काढली आहे ती कोणत्त्या आधारावर काढलेली आहे? त्याचे उत्तरही चुकीचे दिले आहे. याचे उत्तर आपण दयाल की, नगररचनाकार यावयास पाहिजे. ज्यांनी उत्तरे दिली आहेत. नविन नगररचनाकार आला असेल तर त्यास उत्तर देण्यासाठी पुढे केले जावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हा जो १९७ क्रमांकाचा प्रश्न आहे. त्यामध्ये जे उपप्रश्न होते त्यांची उत्तरे दिली गेली आहेत. फक्त एक शेवटचा प्रश्न आहे की या ज्या नोटीसा दिल्या त्यामधील काही मागे घेण्यात आल्या. किंवा जेथे चटई क्षेत्राचे उल्लंघन झालेले नव्हते त्यांना सुध्दा नोटीसा दिल्या होत्या. अशा अधिका-यावर काय कारवाई केली जाईल? याबाबत मला सभागृहाला अशी माहिती दयायची आहे की या अधिका-याची प्राथमिक चौकशी आम्ही सुरू केली आहे व त्यांच्या कार्यकालामध्ये जेवढया पण अशा परवानग्या दिल्या गेल्या. किंवा परवानग्या दिल्यानंतर त्या मागे घेण्यात आल्या. काम थांबविले. या सर्व बाबींची चौकशी आम्ही सुरू केली आहे. व सध्या जे नगररचनाकार आहेत ज्यांच्याकडे येथील अतिरिक्त कार्यभार सोपविण्यांत आलेला आहे त्यांच्याकडे या चौकशीचे काम सोपविले आहे. प्राथमिक चौकशीचे काम दिलेले आहे. जेव्हा त्यांच्याकडुन याकामीच्या सविस्तर अनियमिततेचा अहवाल प्राप्त होईल त्यानंतर संचालक नगररचना व राज्य सरकार यांना सुध्दा अहवाल पाठविला जाईल. ज्यांची येथे नगररचनाकार नेमणुक झाली आहे. त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार असल्यामुळेच ते येवू शकले नाहीत. त्यांना निरोप दिलेला आहे. ते रजेवर आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-ते रजेवर आहेत की त्यांना रजेवर पाठविले आहे? या दोघांमध्ये फरक आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आपण जे योग्य समजाल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-नाही, वस्तुस्थिती काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-वस्तुस्थिती अशी आहे की, ते रजेवर गेले आहेत. ते रजेवर आहेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. १९८ हा सुध्दा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. याच्या पुढील प्रश्न सुध्दा तुमचाच आहे.

प्रश्न क्र. १९८ :- प्रभाग क्र. १ मधील इंदरि गांधीनगर, ए ब्लॉक, उल्हासनगर-१ येथे अस्तित्त्वात असलेल्या दुमजली मजिद इमारतीचे महापालिकेच्या संबंधित कर निर्धारक विभागाने मोजमापनी करुन कर आकारणी झालेली आहे का?

सदर दुमजली मस्जीदच्या इमारतीच्या कोणत्त्या वर्षापासुन मोजमापनी करुन कर आकारणी केली गेली व त्या इमारतीचा कर निर्धारक खाता क्रमांक कोणता?

सदर दुमजली मस्जिदच्या इमारतीच्या झालेली मोजमापणी व कर आकारणी करुन घरपट्टी लागु झाली आहे का? सदर इमारतीला घरपट्टी लागु असल्यास त्या इमारतीवर कोणाचा मालकी हक्क आहे व कोणाच्या नावे घरपट्टी देयक देण्यात येते?

उत्तर :- नाही.
कर आकारणी केलेली नाही.
मिळकत क्र. १५०५ खाता क्र. १४६४ मिळकतीस फकुददीन हसन ए बादशहा यांचे नावाची नोंद आहे. यापूर्वी असे ब्रीक्स (वाणीज्य) अशी नोंद आहे. त्याचे क्षेत्र ५०० चौ. फुट आहे व कर रुपये १२८६/- आकारणी आहे.

प्रश्न क्र. १९९ :- प्र.क्र. १ मधील इंदिरा गांधी नगर ए ब्लॉक, उल्हासनगर-१ येथे अस्तित्त्वात असलेल्या दुमजली मस्जिद (अंतर्गत मदरसाची) इमारतीचे बांधकाम महापालिकेच्या परवानगी घेवून मंजुर आराखडयानुसार बांधकाम झाले आहे का?

प्रभाग क्र. १ मधील इंदीरागांधी नगर, ए ब्लॉक उल्हासनगर-१ येथे अस्तित्त्वात असलेली दूमजली मस्जिद (अंतर्गत मदरसा)बांधण्यात आलेली इमारतीचा भुखंड महापालिकेच्या विकास आराखडयानुसार आरक्षित आहे का? असल्यास कशासाठी सदर भुखंड आरक्षित आहे?

प्रभाग क्र. १ मधील इंदिरा गांधी नगर, ए ब्लॉक उल्हासनगर-१ येथे अस्तित्त्वात असलेली दुमजली मस्जिद (अंतर्गत मदरसा) चा भुखंड कोणाच्या मालकी हक्काची आहे व सदर मस्जिदच्या जगोवर मालकी हक्क असल्यास त्या मालकाचे नाव काय?

उत्तर :- १) महापालिकेने परवानगी दिलेली नाही.
२) सदर इमारतीचा भुखंड महापालिकेच्या विकास मंजुर आराखडयानुसार आरक्षण क्र. ५ खेळाचे मैदान यासाठी आरक्षित आहेत. तसेच सुधारित विकास योजनेत आरक्षण क्र. ३९ मनोरंजनासाठी खुली जागा म्हणून आरक्षित केलेली आहे.

३) सदर भुखंडाचा ताबा महानगरपालिकेकडे दि. ७/४/२००३ रोजी मा. उप-विभागीय अधिकारी यांनी तत्त्कालीन नगरपरिषदेकडे दिलेला आहे. तथापी प्रत्त्यक्ष जमीनीची मालकी महसूल विभागाने अदयाप या महापालिकेस दिलेली नाही. त्यामुळे नेमकी जागा कोणाच्या मालकीची आहे. याबाबत महसूल विभागाशी संपर्क साधुन मालकी हक्काची खातरजमा करुन घेण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर :- ठिक आहे.
मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २०० हा श्री. नथु काशिराम सोनावणे यांचा आहे.

प्रश्न क्र. २०० :- १) शांतीनगर जकात नाका समोरील बिल्डींगचे ३ माळयावर व्यापारी दृष्टीकोन ठेवून छोटे-छोटे रुम बनवून लॉजिंग बोर्डिंगचे काम चालु आहे आपण सदर बांधकामास फेरबदल करण्यास परवानगी दिली का?
२) दिली असेल तर सदर इमारती जवळ साईबाबा मांदिर आहे अशा ठिकाणी ते योग्य आहे काय?

उत्त्तर :- १) शांतीनगर जकात नाका शेजारी असलेले वाणिज्य वापराच्या इमारतीमध्ये ३-या मजल्यावर केलेले अंतर्गत बदलाच्या कामाला महापालिकेने मंजुरी दिलेली नाही.
२) सदर अंतर्गत बदलाच्या कामाला महापालिकेने परवानगी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :-हा, मी असे विचारले होते की शांतीनगर येथे जे साईबाबा मंदीर आहे तेथे श्री. भगवानदास अगीचा यांनी जे कॉम्प्लेक्स तयार केले आहे त्याचे तिस-या मजल्यावर लॉजिंग बोर्डिंगचे काम चालु आहे ब-याचशा खोल्या बांधल्या आहेत. व बाजुलाच साईबाबा मंदीर आहे. याबाबत मागे आमच्या विरोधी पक्ष नेत्त्यांचा एक प्रश्न होता त्याबाबत उत्त्तर देताना असे म्हंटले आहे की, त्यांना परवानगी दिली आहे. मला जे उत्त्तर दिले आहे त्यात म्हंटले आहे की त्यांना परवानगी दिलेली नाही. तर नेमके काय हे जरा आपण सांगितलेत तर बरे होईल.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे ४. ३५ वाजता सभागृहातुन बाहेर पडले.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, या प्रश्नाच्या उत्त्तरात असे सांगितले आहे की, शांतीनगर जकात नाका शेजारी असलेले वाणिज्य वापराच्या इमारतीमध्ये ३-या मजल्यावर केलेले अंतर्गत बदलाच्या कामाला महापालिकेने मंजुरी दिलेली नाही. सदर अंतर्गत बदलाच्या कामाला महापालिकेने परवानगी दिलेली नाही. तेथे जे बांधकामात बदल केले आहेत ते अंतर्गत बदल आहेत. परंतु त्यानंतर आमचे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त तेथील जागेची प्रत्त्यक्ष पहाणी करतील व त्यांचा जो काही अहवाल असेल जसे की, त्यामध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे किंवा नाही. तसेच त्या जागेचा वापर जर आमच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या विरोधात जर असेल तर कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-मा. महापौरजी, या मागील सभेत माझा असाच एक प्रश्न होता. प्रश्न क्र. १२७ हा होता. त्यामध्ये श्री. भडकवाड साहेबांनी त्याचवेळी सांगितले की, आम्ही प्रत्त्यक्ष जागेवर जावुन पहाणी करु. व कारवाई करु. तर त्यावर काय कारवाई झाली? व तोच प्रश्न आज पुन्हा आला आहे.

श्री. दत्त्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):- मा. महापौर महोदया, जर आपण त्या महासभेचे इतिवृत्त्त पाहिले. तर या प्रश्नाचे उत्त्तर मी प्रश्न क्र. १२७ मध्ये दिले होते. त्यामध्ये माझ्या नावाने अशी इतिवृत्त्तांतामध्ये अशी नोंद आलेली आहे. तसेच श्री. नथुराम सोनावणे यांनी २०० क्रमांकाचा प्रश्न विचारला आहे. प्रश्न मला वाटते एकच आहे. अशी माझ्या नावे इतिवृत्त्तांतात नोंद आहे. व त्याचवेळी

मी याचा खुलासा केला होता की मी स्वत: तेथे पहाणी करून आलेलो आहे. व तेथे कोणतेही नविन बांधकाम चालु नाही. तेथे प्लास्टर ऑफ पॅरीस व अंतर्गत सजावटीचे काम, फर्निचरचे काम चालु आहे. व त्यास वेगळी अशी परवानगीची आवश्यकता असली नाही पाहिजे. असे मी त्या प्रश्नाचे उत्तर दिल्याचे इतिवृत्तांतात आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-व त्यापुढे मी आपणांस असे सांगितले होते की, तेथे लॉजिंग, बोर्डींगचे काम चालु आहे. त्याची परवानगी आपण दिली आहे का? त्यावेळी आपण म्हंटले होते की आम्ही तेथे जावुन चौकशी करू. याची इतिवृत्तांतात नोंद आलेली आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-आराखडयामध्ये जे पॅसेज सोडले जातात ते सुध्दा कव्हर केले आहेत. आराखडयामध्ये त्याचा काही एफ.एस.आय. नसतो. तर असे पॅसेज सुध्दा कर्व्हड करून ब-याचशा खोल्या तयार केल्या आहेत.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):-मी मागील वेळी सुध्दा त्याचे उत्तर दिले होते. तेथे जो नकाशा मंजुर झाला होता. तो जुना होता, १३ वर्षापुर्वी प्लान मंजुर झाला होता. त्या प्लानमध्ये बांधकामाचे कोणतेही काम चालु झालेले नव्हते हे मी स्वत: तेथे जावुन पाहिले. मी जेव्हा पहाणी केली तेव्हा तेथे फक्त प्लास्टर ऑफ पॅरीस व फर्निचरचे काम चालु होते व अंतर्गत कोणत्त्याही कामासाठी परवानगीची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-तेथे असे अंतर्गत काम झालेले नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-श्री. भडकवाड साहेब, आपण त्याचवेळी सांगितले होते की, मी तेथे गेलो होतो. प्लास्टर ऑफ पॅरीसचे काम चालु आहे. परंतु त्यास दोन महिने झाले. दोन महिन्यापुर्वी हा प्रश्न आला होता. या महासभेमध्ये तेव्हा आपण सांगितले होते की आम्ही पुन्हा तेथे जावु व चौकशी करू. त्यावेळी मी आरोप केला होता. व येथे सांगितले होते की, तेथे लॉजिंग बोर्डीगचे काम चालु आहे. आपण म्हणाला होतात की आम्ही तेथे जावुन पाहु, चौकशी करू तर त्याचे काय झाले?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):-नाही. त्यावेळी मी असे म्हंटले नव्हते की चौकशी करू. याबाबात आता आयुक्त साहेबांनी उत्तर दिले आहे की आता आणखी जर काही चटई क्षेत्राचे उल्लंघन असेल तर आम्ही पडताळणी करुन अहवाल सादर करु.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :- चटई क्षेत्राचे उल्लंघन नाही परंतु आपण जे म्हणता की, काही बदल केलेले नाहीत. पहिले तेथे ज्या मोठ-मोठया खोल्या तयार केल्या होत्त्या, त्यांचे पॅसेज कव्हर्ड करुन लॉजिंग बोर्डीगचा उद्देश ठेऊन छोटया-छोटया खोल्या तयार केल्या आहेत. व्यवसायीक वृत्ती ठेवून त्या तयार केल्या आहेत. तेथे लॉजिंग बोर्डींग चालू झाली तर बाजूलाच साईबाबा मंदिर आहे. त्यास जबाबदार कोण?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):- मा. महापौर महोदया , मी मागील वेळेस सांगितले होते की, मी काल पर्वाच पाहणी केली आहे. त्यावेळेस तेथे नविन बांधकाम कुठलेच चालू नव्हते. मी जेव्हा पाहणी केली तेव्हा अंतर्गत सजावट व फर्निचरचे काम चालु होते, आता आयुक्त साहेबांनी उत्तर दिले आहे की, जो मुळ प्लॉन मंजुर झाला आहे, त्याचे उल्लंघन करुन जर नविन काही बांधकाम करत असतील. तर त्यावर कारवाई केली जाईल.

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:-</u> आपण म्हणता की, काही अंतर्गत बदल केलेले नाहीत. समजा, पुढे एक-दोन महिन्यात तेथे लॉजिंग बोर्डींग चालु झाली तर त्यासाठी आपोआपच खोल्यांमध्ये बदल तर झाला नाही? जादूची कांडी फिरवून रुम तयार झाल्या, रातो-रात लॉजिंग बोर्डींग चालु झाली असे तर नाही?*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मा. महापौर महोदया, हे आमचे श्री. भडकवाड साहेब म्हणतात की, बदल झाले, प्लॉस्टर ऑफ पॅरीसच्या कामाबाबत बोलतात तर त्याबाबत तशी दुरुस्ती केली आहे का? व हे आपण म्हटले होते की मी प्रत्यक्ष पाहून येईल आणि त्यानंतर ........................ दुस-यांदा मी असे म्हणतो की, आम्ही एखादा प्लान मंजुर करुन घेतला तर त्यामध्ये अंतर्गत काही बदल करायचे झाले तर त्यास परवानगीची आवश्यकता नाही?आपण जसे म्हणता की, जर असे नसेल तर आम्ही जे काही दुरूस्तीचे काम करतो. तर मग त्यावेळेस आपल्या अनाधिकृत बांधकाम विभागाचे लोक आमची ती बांधकामे का तोडुन जातात? आम्हास का नोटीस देतात? आम्ही नकाशा एक मंजुर केला आणि बांधकाम दुस-या प्रकारे करू शकतो का? आपण म्हणता की त्यास परवानगीची आवश्यकता नाही. मग हे जे आपले उत्तर आहे ते चुकीचे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-</u>जेव्हा रहिवासी वापराचे बांधकाम तयार होते त्याच्या अंतर्गत बांधकामात बदल होतो तर ते चालु शकते परंतु तेथे तर लॉजिंग बोर्डींग तयार होत आहे.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):-</u>मी मागील महासभेत जे उत्तर दिले होते त्याच प्रकारे उत्तर देत आहे. मी जेव्हा त्या जागेस भेट दिली तेव्हा त्याठिकाणी कोणत्त्याही प्रकारचे बांधकाम चालु नव्हते. तेथे जे काम चालु होते ते डेकोरेशनचे काम चालु होते. मी मागच्या वेळीही जावुन आलेलो आहे. तेथे अंतर्गत बदल कोणतेही केले जात नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-</u>लॉजिंग बोर्डींग तयार होत आहे. अंतर्गत बदल तर प्रत्येक माणुस आपल्या घरामध्ये करू शकतो.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):-</u>आपण जो प्रश्न विचारला आहे. त्याचे उत्तर दिले आहे. जे पुढे होणार आहे. त्याचे उत्तर मी आजच्या तारखेला देवू शकत नाही. व मला ते मंजुर सुध्दा नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>भडकवाड साहेब, हा दोन महिन्यापुर्वीचा प्रश्न आहे. आपले कर्तव्य होते त्याठिकाणी पहाणी करून येण्याची. १२७ क्रमांकाचा जो श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रश्न होता त्याबाबत आपण काय केले? व दोन महिन्यानंतर उत्तर देता की, अंतर्गत बदल केलेले नाहीत. हे उत्तर आपण कधी देत आहात, आजच्या तारखेला.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):-</u>महापौर महोदया, मी दोन महिन्यापर्वी सुध्दा पहाणी केली आहे. पहाणी केली नाही अशी गोष्ट नाही. मी बिल्कुल पहाणी केलेली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मी पुन्हा आपणांस सांगतो. आज आपण उत्तर देत आहात. आज तारीख काय आहे? आजच्या तारखेला तेथे काय आहे?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.बा. वि):-</u>आजच्या तारखेला, तेथे जे मुळ बांधकाम होते. त्यामध्ये कोणताही बदल नाही.*

मा. सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानी:-पुन्हा मी आपणांस सांगतो की, आपण स्वतः सांगता की दोन महिन्यापुर्वी मी स्वतः पहाणी केली आहे. आज आपणांस कसे माहित पडले की तीच स्थिती आहे म्हणुन?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.ब्रा. वि):-मी माझ्या क्षेत्रिय अधिका-यांकडुन अहवाल घेतला आहे. महासभेत उत्तर देण्यासाठी मी माझ्या क्षेत्रीय अधिका-यांकडुन याबाबत माहिती घेतली आहे. मुळ ज्या खोल्या होत्त्या त्यामध्ये काही बदल केलेला नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तर असे करू या यासाठी एक समिती नेमुया.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त अ.ब्रा. वि):-ठिक आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-एक समिती नेमु आणि पहाणी करू. समितीचे काय झाले?

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-समिती नेमा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, उत्तर येथे दिलेले आहे. त्यामध्ये असे लिहिले आहे की, परवानगी दिलेली नाही. परंतु त्यामध्ये हे सुध्दा लिहिले पाहिजे होते की, परवानगी घेणे जरूरीचे होते कींवा नव्हते. जसे की, उपायुक्त श्री. भडकवाड यांनी सांगितले की ते स्वतः तिथे पहाणी करून आले आहेत. तेथे फक्त अंतर्गत बदलाबाबतचे काम चालु होते. इंटेरियरचे काम चालु होते. प्लास्टर ऑफ पॅरीसचे काम चालु होते ते जर पाहिले तर त्यास परवानगीची आवश्यकता नाही. जेव्हा कोणत्त्याही व्यक्तीला आपल्या बांधकामामध्ये अंतर्गत बदल करायचे आहेत. व त्या बदलामुळे बाहेरच्या बांधकामात किंवा मुळ बांधकामात, जसे बांधकामास परवानगी दिली आहे त्यामध्ये जर काही बदल होत नसेल. तर परवानगी घेण्याची जरूरत नाही. यामध्ये जर आपणांकडे अशी काही माहिती असेल की त्यांनी बाहेरील बांधकाम सुध्दा बदली केले आहे. किंवा इंटेरियरचे काम करताना त्यांनी काही चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे. जादा बांधकाम केले आहे. तर त्याबाबत विचार केला जाईल. येथे आपण असेही विचारले आहे की तेथे लॉजिंग बोर्डीगचे काम चालु आहे. ते जे इंटेरियर काम करत आहेत त्यांनतर ते तेथे लॉजिंग बोर्डीग चालु करणार आहेत की काय याबाबतची माहिती आमच्याकडे नाही. परंतु जर तेथे लॉजिंग बोर्डीग चालवु इच्छित असतील तर त्यांना दुकाने व संस्था निरीक्षक यांचेकडुन परवाना घ्यावा लागेल. तो परवाना घेतल्यानंतरच ते काम सुरू करू शकतात. जे जे आवश्यक परवाने आहेत ते घेतल्यानंतरच त्या जागेचा त्याबाबतचा वापर केला जावु शकतो. जेथेपर्यंत आपला प्रश्न आहे. त्याचे उत्तर बिल्कुल स्पष्टपणे दिले आहे. तेथे इंटेरियरचे काम चालु होते. त्यासाठी कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

**मा. सदस्या श्रीमती. निना नाथानी यांनी ४.३९ वाजता सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-साहेब, इंटेरियरचे नाही. तेथे विटकाम चालु होते. जेव्हा प्लान तयार होतो तेव्हा इंजिनिअर त्या बांधकामात बीम देतात. कॉलम देतात. त्या हिशोबाने विट काम झाले पाहिजे. एखादा कोपरा इकडे तिकडे होवून जर इमारत कोसळली तर त्यास जबाबदार कोण आहे? व उदया इंटेरियर बदल करताना एखादया हेलीकॅप्टरसाठी हेली पॅड तयार केला तर त्यास काही हरकत नाही आहे का?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-महापौर महोदया, आयुक्त साहेब,

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, असे वाटते की, एक वेळा पुन्हा त्या जागेवर जावुन तीन किंवा दोन अधिकारी त्या जागेवर जावुन चौकशी करतील. जर त्यामध्ये असे आढळुन आले की त्यांनी फार मोठया प्रमाणावर बदल केले आहेत. किंवा जी परवानगी दिली आहे तिच्या अतिरिक्त काम केले आहे. तर त्यावर कारवाई केली जाईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २०१ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २०१:-कल्याणी रेसीडेंशिअल कॉम्पलेक्स सी-ब्लॉक, उल्हासनगर-१ / मधुभटिजा निवास, निअर भाजी मार्केट, उल्हासनगर-२/ मधूर व्हिला , सी ब्लॉक रोड, उल्हासनगर कॅम्प -१ या ठिकाणी चालु असलेले काम हे महानगरपालिकेच्या नियमानुसार असून महानगरपालिकेच्या नियमाव्यतिरिक्तचे क्षेत्रफळ किती आहे व त्यावर काय उपाययोजना आहे?

उत्तर :- १) प्रश्न क्र. २०१ चा उप-प्रश्न १ मधील बांधकामासंबंधी प्रश्न क्र. १९५ चा उप-प्रश्न १ अन्वये उत्तर सादर केलेले आहे.

सदर बांधकामात वाढीव असणारे ३५.७६ चौ.मी. बांधकामास एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ५२,५३ नुसार दिनांक २४.३.२००३ रोजी नोटिस बजावण्यात आली होती. सदर नोटिसला विकासधारक यांनी दिनांक २७.३. २००३ रोजी उत्तर दिले असून सदर उत्तरामध्ये बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असल्याचे नमुद केले आहे व बांधकामास पुन्हा तपासणी करण्याची विनंती केली आहे. त्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्या तपासणीचे अनुषंगाने व विकास धारकाचे उत्तराचे अनुषंगाने सदर बांधकामाची तपासणी नगररचनाकार यांचेकडुन करुन घेण्यात येत आहे. नगररचनाकार यांच्या अहवालात वाढीव बांधकाम आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

२) मधुभटिजा निवास निअर भाजी मार्केट, उल्हासनगर-२ येथिल बांधकामास महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त आहे.

महापालिकेच्या नियमाव्यतिरिक्त ८५.९५ चौ.मी. क्षेत्रफळाचे वाढवी बांधकाम केले आहे.

एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ मधील तरतूदीनुसार वाढीव बांधकामावर कारवाई करण्यात येत आहे.

३) मधून व्हिला , सी ब्लॉक रोड, उल्हासनगर-१ या ठिकाणी संबंधीत क्षेत्र निरिक्षक यांनी दिनांक १५.७.२००३ रोजी तपासणी केली असता सदर ठिकाणी कोणतेही नविन बांधकाम नसल्याचे आढळून आले आहे.

तथापि मधुर व्हिला या ईमारतीचे पाठीमागे दिनांक २०.६.२००३ रोजी अनोळखी व्यक्तीने अनाधिकृत बांधकाम सुरु केल्याचे आढळून आल्यावर सदरचे अनाधिकृत बांधकाम दि. २०.६. २००३ निष्कासित केले आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सहा सहा महिने प्रश्न चर्चेस येत नाही. आणि प्रश्न आल्यानंतर त्या प्रश्नाची जी उत्तरे तुम्ही देता. त्यामध्ये काय कारवाई केली याविषयी आम्ही विचारतो. तुम्ही उत्तरे देता कारवाई चालु आहे, कारवाई होणार आहे. माझा प्रश्न वरील प्रमाणे आहे. त्यामध्ये उत्तर दिले आहे की, तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे. ठिक आहे आमचे काही म्हणणे नाही. परंतु त्यानंतर त्या प्रश्नाचा पुढे पाठपुरावा होत नाही. आणि तो प्रश्न तसाच राहतो. मी हा जो प्रश्न विचारला आहे. या अगोदरही बरेचसे प्रश्न विचारले आहेत त्यावर काय कारवाई झाली माहिती नाही परंतु आता या प्रश्नाच्या संदर्भात मी मा. महापौरांना सांगेन यावेळेस की त्यांनी संबंधित प्रशासनाला आदेश दयावेत. तावडतोब कारवाई व्हावी.

मा. सदस्या श्रीमती प्रेमा खांडेकर यांनी ४. ४० वाजता सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी सभागृहास सांगु इच्छितो की, जसे की श्री. टाले साहेबांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याबाबत आम्ही पहिलेच सर्व विभाग प्रमुखांना आदेश दिले आहेत की सभागृहात प्रशासनाच्या वतीने जेवढी काही आश्वासने दिली जातात. त्यांची पुर्तता झाली पाहिजे. व ती पुर्ण झाल्यानंतर सभागृहास त्याबाबत माहिती पण दिली पाहिजे. आजपर्यंत येथे प्रश्नांची उत्तरे दिली गेली आहेत. प्रश्नाचे उत्तर देताना आमच्याकडुन काही आश्वासने दिली जातात. किंवा समिती नेमली जाईल. किंवा अहवाल आम्ही तयार करू. व तो केला किंवा नाही. याबाबत आपणांस अदयाप पर्यंत माहिती नाही. परंतु मी आपणांस सांगु इच्छितो की याबाबत सर्व विभागांना आदेश दिलेले आहेत. व आजपर्यंत सभागृहात आम्ही जेवढी काही आश्वासने दिली आहेत. त्याबाबत एक सविस्तर टिप्पणी येणा-या महासभेत आम्ही सभागृहासमोर ठेवु. प्रश्नाच्या उत्तराबाबत जी खात्री दिली होती ती किंवा लक्षवेधी सुचनेवर निवेदन करताना जी खात्री दिली होती. किंवा एखादया तहकुबीच्या मुददयावर जी खात्री दिली जाते. त्याबाबत सभागृहास माहिती दिली जाईल. व लेखीस्वरूपी माहिती दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मी हा प्रश्न जवळ जवळ सहा महिन्यापुर्वी विचारलेला आहे. आणि अजुनही तुमची कार्यवाही करण्यात येत आहे. आजच्या महासभेमध्ये मी अपेक्षा व्यक्त करेन की त्यावर काय कार्यवाही झाली? कमीत कमी पुढल्या महासभेपर्यंत तुम्ही सर्व नगरसेवकांना नाही पंरतु कमीत कमी संबंधित नगरसेवकास कळवु शकता काय कारवाई झाली त्याबाबत त्या प्रश्नाचे उत्तर तुम्ही लेखी कळवु शकता.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, प्रशासकीय बाबीबाबत जेव्हा सभागृहात प्रश्न विचारला जातो त्याचे उत्तर सुध्दा सभागृहात दिले जाते व कारवाई करण्याबाबत प्रशासनाच्या वतीने जी काही आश्वासने सभागृहात दिली जातात. त्याचे उत्तरही सभागृहातच दिले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>म्हणजे पुढच्या महासभेत याचे उत्तर मिळेल?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>महापौर महोदया, आयुक्त महोदयांनी सभागृहामध्ये सांगितले की जी आश्वासने दिली जातात. तर त्यांची पुर्तता होते की नाही हे पाहण्याचे आदेश विभाग प्रमुखांना दिलेले आहेत. पण ते आदेश देताना त्याची पुर्तता जर झाली नाही तर कारवाईचा पण इशारा त्यामध्ये दिलेला आहे का त्या आदेशामध्ये? जर पुर्तता नाही होत तर कारवाई काय त्यांच्यावर? अशी किती तरी आमच्याकडे उदाहरणे आहेत मी तर रोज बसुन बसुन अशी उदाहरणे काढत असतो की किती आश्वासने दिली गेली आहेत. गेल्या सहा महिन्यापुर्वी, आठ महिन्यापुर्वी, दहा महिन्यापुर्वी त्यांची पुर्तता अजुनही झालेली नाही. तर अशा प्रकरणात आपण काय करणार? गेल्या महासभेत जकात नाक्याचा विषय निघाला होता. त्यावेळेस एका आठवडयामध्ये हा जकात नाका स्थलांतरीत केला जाईल असे आश्वासन दिले होते. आता चार आठवडे झाले. असे अनेक विषय आहेत. हा एकच विषय नाही. मागच्या वेळेला महालक्ष्मी बारच्या संदर्भात येथे चर्चा झाली होती. ती वेळ दिल्यामुळे तो माणुस कोर्टामध्ये गेला. आणि श्री. रमेश चव्हाण यांचे इतिवृत्तांतामध्ये असे निवेदन आहे की, त्याला आपण न्यायालयामध्ये जाण्यासाठी संधी देत आहेत म्हणुन. तर कारवाई सुध्दा झाली पाहिजे. जे विभाग प्रमुख पुर्तता करणार नाही त्यांच्याविरूध्द कारवाई पण झाली पाहिजे. आणि तसे आश्वासन तुम्ही या सभेत दयावे आणि त्याची पुर्तता करावी अशी विनंती आहे.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा व श्री. मनोज साधवानी यांनी ४.४५ वाजता सभागृहात प्रवेश केला

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २०२ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २०२ :- सन २०००-२००१/ सन २००१-२००२/ सन २००२-२००३ मध्ये शहरातील अनाधिकृत बांधकामे तोडण्यास हायकोर्टातर्फे महापालिकेला निर्देश देण्यात आलेत असे किती बांधकामे तोडण्याचे आदेश महापालिकेला हायकोर्टाने दिलेले आहेत? त्याची नावे व कोणत्त्या बांधकाम धारकाची कामे आहेत याची विस्तृत माहिती दयावी . त्या आदेशावर महानगरपालिकेने नेमकी काय कारवाई केली आहे? या संदर्भात विस्तृत माहिती दयावी.

उत्तर :- सन २००० ते २००३ पर्यंत शहरातील तीन अनाधिकृत बांधकामे तोडण्याचे उच्च न्यायालयातर्फे महापालिकेला निर्देशित केले आहे. त्या ३ अनाधिकृत बांधकामापैकी टिलसन मार्केट या अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त सतनाम साखी सिटी सर्वे नं. १९३६९ ब्लॉक नं. २००४ चे समोर, उल्हासनगर-५ येथे आणि सिटी सर्वे नं. १९३३२ ते १९३४१, सिटी सर्वे नं. ८५५७ ब्लॉक नं. ७७५ समोर या दोन्ही जागेवरील अनाधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश प्राप्त झाले होते. तदनंतर या दोन्ही इमारतींचे भोगवटादारांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली व तदनंतर शासनाने त्यांना सुनावणीची संधी दयावयाचे असे निर्देश दिल्याने त्या दोन्ही इमारतीचे निष्कासन करण्यात आले नाही.

शासनातर्फे भोगवटारांचे सुनावणी अंती अर्ज फेटाळल्यानंतर परत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली व मुंबई उच्च न्यायालयाने दोन्ही इमारतीचे निष्कासन केव्हा करायचे हे महापालिकेच्या विवेकाधीन ठेवण्यात आले आहे.

दोन्ही इमारतीतील विस्थापीत होणा-या भोगवटारांची जास्त संख्या लक्षात घेऊन तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता निष्कासनाची कार्यवाही अदयाप करण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २०३ हा श्री किशोर वनवारी यांचा आहे.

प्रश्न क्र. २०३ :- मनपातील काही उप-अभियंता सा.बां. विभागातून, पाणी पुरवठा विभागांत गेले होते, ते तेथे सहया करत होते. पुन्हा ते सा.बां. विभागात बदलून आहे त्यांची तेथे बदली कशासाठी केली होती व पुन्हा ते सा.बां. विभागात का आले?

उत्तर :- पाणी पुरवठा विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागातील श्री. यु.के. नारवानी, श्री. बी.जे. भटिजा व श्री.पी. आर. डिंगरेजा, कनिष्ठ अभियंता यांची दिनांक ३ जुलै, २००३ च्या आदेशान्वये पाणी पुरवठा विभागामध्ये बदली करण्यात आली होती.

पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत असलेले कनिष्ट अभियंता, शाखा अभियंता व उप-अभियंता / कार्यकारी अभियंता यांच्या सेवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून उसनवारीने महानगरपालिकेच्या आस्थापनेवर घेण्यात येतात. हे टाळण्यासाठी व महानगरपालिकेचा स्वतःचा कर्मचारी वृंद असणे आवश्यक असल्याने नवनियुक्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्त्य) यांच्या सेवा कार्यकारी अभियंता / पाणी पुरवठा यांनी पुन्हा मागणी केल्यानुसार नविनियुक्ति कनिष्ठ अभियंता श्री. आर.एम. शेलार, श्री.एम.बी. भोपे व श्री. डी.आर. ढोले यांच्या सेवा पाणी पुरवठा विभागाला वर्ग करण्यासाठी दि. ३ जुलै, २००३ चे आदेश रदद करण्यात आले. परिणामी सदर आदेशाप्रमाणे पाणी पुरवठा

विभागाकडे वर्ग करण्यात आलेले कनिष्ठ अभियंता सा.ब्रां. विभाग यांच्या बदल्या रद्द झाल्या आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-सर्वात प्रथम मा. महापौरजी, उपमहापौरजी, सचिव साहेब, आयुक्त साहेब यांना विनंती करतो की, आमचे नवनिर्वाचित सदस्य श्री. संजय भठीजा सभागृहात आज उपस्थित आहेत. त्यांचे अभिनंदन आहे. ते पोट निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडुन आले आहेत. ते सर्व नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी यांचे तोंड गोड करू इच्छितात. तर त्याची कृपया अनुमती दयाल. धन्यवाद.

त्यानंतर माझा प्रश्न क्र. २०३ आहे मी या विषयाबाबत खुलासा करू इच्छितो की, माझा जो प्रश्न होता त्याचे प्रशासनाने आज उत्तर दिले आहे. माझा प्रश्न वरील प्रमाणे होता. तेथे त्यांना सांगितले जात होते की, तुम्ही कनिष्ठ अभियंत्याचे काम करा. उप अभियंता म्हणुन काम करू नका. परंतु आयुक्तांना धन्यवाद आहे की, त्या तिन्ही कनिष्ठ अभियंत्त्यांना उप अभियंता पदी पदोन्नती देण्याचा प्रस्ताव आज महासभे पुढे आणला आहे. यासाठी धन्यवाद. माझा प्रश्न सुध्दा हाच होता की त्यांच्याकडुन उप अभियंत्त्याचे काम करून घेतले जावे व त्यांना उप अभियंता म्हणुन पदोन्नती दिली जावी. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आमची एक हरकत आहे. श्री. वनवारी हे सभागृह नेता आहेत म्हणुन त्यांचे काम आपण अगोदर करता. आमच्या आश्वासनाची पुर्ती नंतर करता. हा आमचा आपल्यावर आरोप आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-गणपती विषयीचा आपण जो विषय आणला होता त्याची त्याच दिवशी पुर्तता झाली.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढचे प्रश्न क्र. २०४ , २०५ ,२०६ ,२०७ सुध्दा आपलेच आहेत.

प्रश्न क्र. २०४ :- आपण कार्यभार स्विकारल्यानंतर (मा. आयुक्त सो. यांनी) किती कर्मचा-यांना निलंबित केले? किती जणांना पुन्हा कामावर घेतले? व किती जण शिल्लक आहे?

उत्तर :- १) प्रभारी आयुक्त पदांचा कार्यभार स्विकारल्यानंतर १३ लोकांना निलंबित केले आहे.
२) ५ कर्मचा-यांना पुन्हा सेवेत घेतले आहे.
३) ७ कर्मचारी अदयाप निलंबित आहेत आणि एक कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे.

प्रश्न क्र. २०५ :- मनपाच्या मुख्यालयातील चहाचा व्यवसाय करणा-यांवर काय कार्यवाही केली? त्याचा कोणाचे संरक्षण आहे? त्यला तेथुन काढणार किंवा नाही?

उत्तर :- अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यात येईल.

प्रश्न क्र. २०६ :- आपण अतिरिक्त / प्रभारी आयुक्त म्हणून कार्यभार स्विकारल्यावर किती अनाधिकृत बांधकामे पाडलीत? पैकी किती पुन्हा उभी राहिली?

उत्तर :- अतिरिक्त आयुक्त या नात्याने कार्यरत असतांना सद्याचे प्रभारी आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांचेकडे अतिक्रमण विभागाशी संबंधित कामकाज नव्हते.

तथापी प्रभारी आयुक्त म्हणून दिनांक २०/२/२००३ रोजी कार्यभार स्विकारले पासून एकूण १४७ अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत.

पैकी किती बांधकामे पुन्हा उभी राहिलीत याची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश सर्व संबंधीत क्षेत्र निरिक्षकांना देण्यात आले आहेत. सदरचा अहवाल प्राप्त होताच महासभेपुढे माहिती सादर करण्यांत येईल.

प्रश्न क्र. २०७ :- सद्या शहरात मोकाट कुत्री भटकत आहेत, डुक्कर वाढले आहेत तसेच गाय, बैल मोकाट भटकत आहेत. ब-याच लोकांना कुत्री चावली आहेत त्यांचा बंदोबस्त होणार की नाही?

उत्तर :- मोकाट जनावरे व डुकरे पकडण्यासाठी अ.क्र. उमपा/ सामान्य /३९५, दिनांक २/८/२००३ अन्वये पथक कार्यान्वीत करण्यात आले असून सदर पथकामार्फत मोकाटा जनावरे व डुकरे पकडण्याचे काम चालु करण्यातम आलेले आहे. शहरातील कुत्री पकडण्यासाठी काम चालु करण्यात आलेले आहे. शहरातील कुत्री पकडणे व त्यावर नियंत्रण करण्यासाठी प्राणी जन्मानियंत्रण करण्यासाठी (कुत्री) नियम २००१ (एनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) २००१) प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदर नियमांनुसार कार्यवाही करण्यासाठी प्रशासकिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २०८ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. २०८ :- नेताजी चौक येथिल अग्निशमन स्थानकाचे सद्याच्या अवस्थेस जबाबदार असलेल्या अधिका-यांवर कारवाई करणे बाबत.

दिनांक ६/७/२००३ रोजीच्या स्थायी समितीमध्ये विषय क्र. ८, ठराव क्र. २५ नुसार नेताजी चौक येथिल अग्निशमन स्थानकाचे दुरुस्तीकामी श्री. बुलचंद सोनेसर यांची स्थापत्त्य तज्ञ म्हणून नेमणूकीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला.

त्या अनुषंगाने काही मुददे उपस्थित होतात कृपया याची माहिती दयावी व पुढील अपेक्षित कारवाई करावी.

१) सदर अग्निशमन स्थानकाचे बांधकाम केव्हा पूर्ण झाले?
२) बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला केव्हा घेण्यात आला?
३) इमारतीचे बांधकाम चालु असतांना कोणत्त्या मुख्य अधिका-यांच्या देखरेखी खाली बांधकाम चालु होते?
४) बांधकाम ठेकेदार कोण होता?
५) सदर इमारतीसाठी किती रक्कम मंजुर करण्यात आली होती?
६) त्यापैकी ठेकेदाराला किती रक्कम दिली व काम पुर्ण व विहित मुदतीमध्ये न झाल्याने त्याच्यावर दंडात्मक कार्यवाही काय केली?
७) सदर इमारत बांधकाम करतेवेळी स्थापत्त्य तज्ञ कोण होते?

सदर इमारतीवर प्रचंड खर्च करून ६ मार्च, ९९ रोजी उदघाटन केलेल्या इमारतीला २००२ मध्ये धोकादायक इमारत म्हणून महापालिका घोषित करते व आता स्थापत्त्य तज्ञ नेमुन जवळ पास १५ ते १८ लाख दुरुस्तीसाठी खर्च करावा लागत असल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान करणा-या तसेच महापालिकेतील इतर कामकाजाबाबत सर्व सामान्यांमध्ये संशय निर्माण करणा-या संबंधित सर्व अधिका-यांवर, स्थापत्त्य

तज्ञ व बांधकाम ठेकेदार यांच्यावर कारवाई करून त्यांच्याकडुनच इमारत दुरुस्तीवरचा होणारा संपुर्ण खर्च वसुल करणार का?

कृपया सदर बाबत काय कारवाई करणार? तसेच इतर माहिती आगामी महासभेमध्ये दयावी.

उत्तर :- १) दिनांक ३०/६/१९९७ साली पुर्ण झाले.
२) बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला ३०/७/१९९७ साली घेण्यांत आला.
३) श्री. मोहन एस. चिजवानी, शहर अभियंता.
४) i) रविंद्र मजुर कामगार सोसायटी
ii) मे. साईनाथ मजुर कामगार सोसायटी
iii) मे. संध्या कन्स्ट्रक्शन
५) रुपये २१,५०,०००/- इतका खर्च झाला.
६) ठेकेदारांना रुपये २१,५०,००० इतकी रक्कम दिली.
७) तांत्रिक सल्लागार श्री. बुलचंद सोनेसर.

सदर इमारतीचे बांधकाम १९८७ साली सुरू करण्यात आले होते. इमारतीचे काम टप्या टप्याने पूर्ण करण्यात आले होते. सदर इमारतीचे बांधकाम तांत्रिक सल्लागार श्री. बुलचंद सोनेसर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सदरच्या त्रुटीस कोण जबाबदार आहे. त्याची संपुर्ण चोकशी केल्यावरच जबाबदारी कायम करण्यात येईल.

सध्या इमारतीस आवश्यक असलेली दुरूस्ती पूर्ण करून अग्नीशन केंद्र पुन्हा सुरू करण्यात येईल. सदर इमारत असुरक्षित असल्याचे मत तत्त्कालिन कार्यकारी अभियंता यांचे होते. परंतु त्यावेळी स्थापत्त्य अभियांत्रिकी तज्ञाने मत घेतले नव्हते आता मे. बुलचंद सोनेसर यांनी सदर इमारत रहीवासास सुरक्षित असून त्या इमारतीमध्ये असलेल्या काही दुरूस्त्या केल्यास इमारतीचे आयुष्य वाढणार आहे. या दुरूस्त्या करण्याकरिता सदर इमारत रिकामी असणेही आवश्यक असल्याने सदर दुरूस्त्या झाल्यानंतर अग्निशमन केंद्र पुन्हा कार्यान्वित करता येईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>मा. महापौर, उपमहापौर आणि आयुक्त साहेब सदर प्रश्न हा नेताजी चौक येथील अग्निक्षामक इमारतीबाबत आहे. त्यामध्ये विचारल्याप्रमाणे सदर अग्निक्षामक स्थानकाचे बांधकाम कधी करण्यात आले त्याचे उत्तर दिले आहे १९९७ साली. त्यानंतर त्यांना बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला कधी मिळाला. ते त्याच वेळेस म्हणजे १९९७ साली. आता बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला मिळाल्यानंतर इमारतीचे बांधकाम चालु असताना कोणत्त्या मुख्य आधिका-याच्या देखरेखीखाली हे बांधकाम चालु होते. तर सध्याचे शहर अभियंता श्री. मोहन चिजवानी यांच्या देखरेखीखाली. बांधकाम ठेकेदार तीन वेगवेगळे दिले आहेत त्यांची कारणे काय ती माहिती नाहीत. परंतु रविंद्र मजुर कामगार सोसायटी, साईनाथ मजुर कामगार सोसायटी, मेसर्स संध्या कंन्स्ट्रक्शन या तिघांनी मिलुन की भागीदारीमध्ये केले होते का ते माहित नाही. हे तिन एकाच वेळेस कसे काय आले? सर्वसाधारणपणे काम देताना एकाच ठेकेदारास दिले जाते. पण याठिकाणी तीन मजुर कामगार संघटनांची नावे दिलेली आहेत. त्या इमारतीसाठी खर्च आलेला आहे २१ लाख त्यापैकी ठेकेदाराला किती दिले? पुर्णच्या पुर्ण दिले. २१लाख ५० हजार पुर्ण रक्कम दिली आहे. म्हणजे महानगरपालिकेने ती इमारत ताब्यात घेतल्यानंतर महापालिकेच्या इथल्या अधिका-यांचे समाधान झाले होते. की ती इमारत कामात येण्यासारखी आहे उपयोगात येण्यासारखी आहे. प्रत्येक इमारतीचे आयुष्य काय असते? ते सर्वसाधारणपणे निर्धारीत केलेले असते. त्यासाठी मला वाटते की, स्थापत्त्य तज्ञ त्या इमारतीच्या बांधकामाच्या वेळेस नियुक्त केले होते. मला वाटते ते बुलचंद सोनेसर होते. असे उत्तरात येथे नमुद केले आहे. त्याठिकाणी स्थापत्त्य तज्ञ म्हणुन श्री. बुलचंद सोनेसर हे सल्लागार म्हणुन त्याठिकाणी होते. त्या इमारतीचे

बांधकाम ६ मार्च १९९७ ला पुर्ण झाले. ६ मार्च ९९ ला उदघाटन केले आहे. की ते जनतेच्या सार्वजनिक कार्यासाठी उपयोगात आणली. इथले फायरब्रिगेडचे कर्मचारी, अधिकारी तेथे गेले. फायरब्रिगेडची वाहने तेथे गेली. आणि लगेच २००२ मध्ये महानगरपालिकेने तयार केलेल्या धोकादायक इमारतीच्या यादीमध्ये त्या इमारतीची गणना झाली. म्हणजे ज्या इमारतीचा उपयोग ९९ साली सुरू झाला. तिच्या पुर्णत्त्वाचा दाखला ९७ साली घेतला. तिच इमारत महापालिकेचे अधिकारी २००२ मध्ये धोकादायक इमारत आहे म्हणुन घोषित करतात. यावरून सर्वसामान्य लोकांना महापालिकेच्या आणि आपल्या सर्वसाधारण कारभाराबाबत शंका निर्माण होण्यासारखी आहे. की नक्की काय चालले आहे, काय झाले आहे? सावळा गोंधळ काय चालु आहे की ज्याच्यामुळे प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. २१ लाख गेले कुठे? २१ लाख होते की फक्त मातीच होती तिथे? तर ज्यावेळेस पुर्णत्त्वाचा दाखला घेतला आपण त्यावेळेस या इमारतीचे आयुष्य काय हे बघितले नव्हते काय? ते स्थापत्त्य तज्ञ होते. व मला वाटते पुन्हा आपली तिच चुक होत आहे. हा विषय ब-याच वेळेला चर्चेला आलेला आहे की ज्या स्थापत्त्य तज्ञांच्या देखरेखी खाली, ज्या शहर अभियंत्त्यांच्या देखरेखी खाली ती इमारत पुर्ण झाली आणि ज्यामुळे महापालिकेचे जवळ जवळ साडे एकवीस लाख निकामी गेले. ती इमारत केव्हाही पडेल. तेथे अपघात होवू शकत होता. म्हणुन जिवित हानी होवू नये, वित्त हानी होवु नये म्हणुन आपण तात्त्काळ कार्यवाही केली आणि जी व्यवस्था होती ती आपण हलविली. तेथील कर्मचा-यांना इतरत्र हलविले. परंतु आज त्या इमारतीचे दुरूस्तीचा प्रस्ताव तयार केला. आणि त्यासाठी मी असा प्रश्न विचारला की, संबंधित सर्व अधिका-यांवर, स्थापत्त्य तज्ञ व बांधकाम ठेकेदार यांच्यावर कारवाई करून त्यांच्याकडुनच इमारत दुरुस्तीवरचा होणारा संपुर्ण खर्च वसुल करणार का? कारण हे ब-याच वेळा चालु आहे. परंतु तसे न करता त्याठिकाणी नेमके पुन्हा स्थापत्त्य तज्ञ श्री. बुलचंद सोनेसर यांना ३ टक्के कधी त्यांनी ५ टक्के सांगितले होते. त्यामध्ये वाटाघाटी करून आम्ही ३ टक्यावर आणले. हे महापालिका मोठेपणा दाखविते की आम्ही कसे कमी केले आहे ३ टक्के देवून म्हणजे जबाबदारी त्यांची होती. ती त्यांनी टाळली ती त्यांनी पार पाडली नाही. त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे होते. उलट मला वाटते त्यांना ब्लॅक लिस्ट करणे गरजेचे होते. त्यांच्या निष्काळजीपणा मुळे महापालिकेचे नुकसान झालेले आहे. तिथे प्रचंड अपघात होवू शकत होता. असे असताना सुध्दा ज्या इमारतीवर साडे एकवीस लाख खर्च आलेला आहे. त्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी आज साडे एकवीस लाख काहीही वापर न करता करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण हे संशयास्पद असल्यामुळे या पुर्वी महापालिकेतील सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी व्हावी आणि संबंधीत अधिका-यांवर त्या कामाशी संबंधित असणा-या सर्वांवर कारवाई करावी ही अपेक्षा असताना याठिकाणी त्याचे उत्तर दिलेले नाही. महापालिका सचिव नेहमी सांगतात की, उत्तर दिल्यानंतर समाधान झाले असेल तर, परंतु येथे समाधान होतच नाही. कारवाई काय करणार ती अनपेक्षित आहे. तुम्ही काही स्पष्ट केलेली नाही. फक्त काम होवू दया. म्हणजे पुन्हा काय करणार? पुन्हा दुसरे स्थापत्त्य तज्ञ नेमणार? याचे उत्तर दया. त्यानंतर माझे उपप्रश्न असतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, ही जी फायरब्रिगेडची इमारत आहे. हे खरे आहे की, तिचे आर्कीटेक्ट श्री. बुलचंद सोनेसर हे होते परंतु त्यांनी ते काम सोडले होते. मुळ ठेकेदार जो होता त्यांनी ही हे काम सोडले याकामामध्ये तीन ठेकेदार आहेत. हे काम कधी सुरू झाले? सोनेसर यांनी कधी काम सोडले? पहिल्या ठेकेदाराने कधी काम सोडले. दुस-या ठेकेदाराची कधी नेमणुक झाली. दुस-या ठेकेदारानेही काम पुर्ण केले नाही. म्हणुन तिसरा ठेकेदार नेमावा लागला. असे या कामाबाबत नेहमी होत गेले. याच्या तारखा जर आपणांस पाहिजे असतील तर त्याही मी देवू शकतो.

मा. सदस्या श्रीमती. मोना वनवारी यांनी सायंकाळी ४. ५७ वाजता सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आमचा तारखांवर विश्वास नाही कार्यवाही वर विश्वास आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जेव्हा या इमारतीचे काम सुरू झाले किंवा या इमारतीचा जो आराखडा तयार केला गेला तो सोनेसर यांनी केला. काम सुरू झाले तरी श्री. सोनेसर आर्कीटेक्ट होते. परंतु प्रशासन व त्यांच्यामधील काही मतभेदामध्ये ते काम त्यांनी मध्येच सोडले. त्यानंतर दुस-या कुणाची नेमणुक करण्यात आली. तीच परिस्थिती ठेकेदाराबाबत झाली. व एक काम करण्यासाठी दोन-दोन, तीन-तीन ठेकेदार लागले. या सर्व गोष्टीमुळे म्हणजे बरोबर योग्य ते पर्यवेक्षणाच्या अभावामुळे योग्य त्या समन्वयाच्या अभावामुळे यासर्व कारणांमुळे ही इमारत आज सुध्दा वापरात आणण्या योग्य नाही. तिचा जर वापर करायचा असेल तर त्याबाबत दोनच पर्याय आमच्या समोर होते. सध्याचे जे बांधकाम आहे त्याची दुरूस्ती करणे किंवा पुर्ण इमारतीचे निष्कासन करून नविन इमारत बांधणे. नविन बांधकाम करण्यामध्ये जो खर्च येणार होता तो जास्त येणार होता. म्हणुन या इमारतीचा ज्यांनी प्रथम आराखडा तयार केला आहे. ज्या व्यक्तीने पहिले या इमारतीचे आराखडे व प्राकलने तयार केली त्यालाच आम्ही विनंती केली की याबांधकामामध्ये काय काय चुका झाल्या आहेत की ज्या त्यांनाच माहित आहेत. व त्या चुकांमुळेच या इमारतीची आज अशी अवस्था झाली आहे. तर आम्ही त्यांना विनंती केली की आपणच ती प्राकलने पुन्हा एकदा तपासुन पहा. इमारतीची परिस्थिती पुन्हा एकदा तपासुन पहा व आपण तिची दुरूस्ती करण्यासाठी काही सल्ला दया. जेथेपर्यंत आमची माहिती आहे. व सभागृहामध्ये सुध्दा याबाबत दुमत होणार नाही की श्री. बुलचंद सोनेसर हे उल्हासनगर मधील प्रख्यात वास्तुविशारद आहेत. व इमारतींच्या आराखडयाबाबत त्यांना जेवढी माहिती आहे. तेवढी माहिती उल्हासनगर मधील एखाद दुस-या आर्कीटेक्टकडे कदाचितच असेल. त्या कारणामुळे आम्ही त्यांना दुस-यांदा विनंती केली आहे. बाकी दुसरे काहीही कारण नव्हते. याबाबत श्री. रूपचंदानी यांचाच जास्त पाठपुरावा होता. व त्यांची सूचना होती की ज्यांनी प्रथम या इमारतीचे आराखडे तयार केले आहेत. त्याच व्यक्तीस जर येथे बोलाविले व चर्चा केली तर समजु शकते यामध्ये काय चुका आहेत. कार्यवाहीमध्ये काय काय चुका झाल्या आहेत. त्या कार्यवाहीतील चुका सुधारण्यासाठी त्यांची नेमणुक केली आहे. आराखडे व प्राकलने अदयाप आमच्याकडे आली नाहीत. परंतु ती आल्यानंतर त्या इमारतीची स्थिती सुधारू शकते. दुसरा राहिला प्रश्न जो अधिकारी यास जबाबदार आहे. त्यांच्याबाबत अदयाप पर्यंत काही कारवाई केली नाही हे खरे आहे. परंतु त्या अधिका-यावर कारवाई करण्यासाठी प्रथम तर सविस्तर चौकशी करावी लागेल. की ते यासाठी किती जबाबदार आहेत? त्यांची जर पर्यवेक्षणामधील बेजबाबदारी जर असेल, वेळोवेळी आर्कीटेक्ट सुध्दा बदली केले आहेत. होवू शकते वेळो वेळी अधिकारी सुध्दा बदली झाले असतील. म्हणुन याबाबत प्रथम मी प्राथमिक चौकशी करेल व त्यामध्ये जर कुणी अधिकारी दोषी असल्याचे आढळुन येईल तर त्यावर सुध्दा कारवाई करण्यासाठी महासभेपुढे प्रस्ताव ठेवला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आयुक्त साहेब, ही जी इमारत धोकादायक झाली २००२ सालामध्ये ती धोकादायक असल्याचे समजले आहे. धोकादायक घोषित केली आहे. आपणांस स्वतः असे वाटले नाही की याबाबत चौकशी समिती गठीत केली पाहिजे व संबंधित जे दोषी अधिकारी आहेत, एक आयुक्त म्हणुन आपणांस स्वतःस असे वाटले नाही का? की याबाबतीत चौकशी नेमण्यासाठी मी आदेश दिले पाहिजेत? महापालिकेची एक इमारत पाच वर्षात धोकादायक होते. आपल्या सारखी व्यक्ती याबाबत महासभेत प्रश्न येई पर्यंत वाट का पाहते?

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, महासभेपुढे प्रश्न येईपर्यंत मी वाट पाहिलेली नाही. जेव्हा आमच्याकडे तक्रार आली त्यानंतर त्वरीत ते बांधकाम दुरूस्त करण्यासाठी काय करता येईल. यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेवून श्री. बुलचंद सोनेसर यांची नेमणुक केली. व आता राहिला आमचा दुसरा प्रश्न आम्ही ऐवढी वेळ का वाट पाहिली. अधिका-यांवर कारवाई करण्यासाठी चौकशी समिती का नेमली नाही. आम्ही ऐवढाच विचार केला की, सध्याचे बांधकाम धोकादायक झाले आहे. ते सुधारण्यासाठी काय केले पाहिजे. ते आम्ही केले आहे. आता जे यास जबाबदार आहेत त्यांच्यावर सुध्दा आम्ही कारवाई करू. याकामी आमच्याकडुन दिरंगाई झाली आहे. हे आम्ही मान्य करतो. अधिका-यांच्या विरूध्दही चौकशी सुरू करावयास पाहिजे होती. ती केली नाही. ती आम्ही आता सुरू करू.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्त साहेब, तुम्ही ती इमारत दुरूस्त करावयास घेतली त्यामागे तुमची भावना काय होती. पण आमचे एकच म्हणणे आहे मराठीमध्ये म्हण आहे की, '' म्हातारी मेली त्याचे दुःख नाही परंतु काळ सोकावता कामा नये '' याबाबत काळजी काय घेणार की असेच ठेवणार. आणि नंतर आयुक्त म्हणणारच आहेत की पर्यवेक्षणाचा अभाव प्रशासनाचा अभाव, प्रशासन तेच आहे, पर्यवेक्षण करणारे सुध्दा तेच आहेत. हे पुन्हा पुन्हा तेच होणार का? आमचे म्हणणे तेच आहे की, आता सुध्दा प्रशासन बरोबर नाही. पर्यवेक्षणाचा अभाव आहे. व ही इमारत पुन्हाही तशीच होणार आहे. आणि तुम्ही पुर्णत्त्वाचा दाखला घेणार आणि दोन वर्षानंतर पुन्हा दुरूस्तीसाठी येणार यापुढे जी काही मार्केटस् उभी राहतील. महापालिकेच्या इमारती उभ्या राहतील त्या अशाच चालणार का? आणि नंतर कारवाई करू. एक तर त्या मजुर सोसायटयांवर आपण कारवाई केली का? त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकले आहे का की त्यांच्या निष्काळजीपणामुळे तो फंड गेला. तर त्यांच्यावर कारवाई केली असती तर तुम्ही त्यांचे पुर्ण पेमेंट केले नसते. साडे २१ लाख जी प्राकलनिय रक्कम होती. ती तुम्ही पुर्ण दिलेली आहे. म्हणजेच त्या संस्थाचा त्याठिकाणी कुठलाही दोष नव्हता. त्यानंतर तुम्ही श्री. बुलचंद सोनेसर यांचे जे वर्णन केले ते बरोबर आहे. परंतु एक नैतिक जबाबदारी म्हणुन श्री. बुलचंद सोनेसर यांनी त्या इमारतीचे बांधकाम विनाशुल्क करायला पाहिजे होते. कारण त्यांनी असे म्हणावयास पाहिजे होते की ती माझी जबाबदारी होती. मी त्याठिकाणाहुन पळुन गेलो. ते मी करू शकलो नाही. आता पुन्हा तसेच होत आहे ते काम घेतील आणि नंतर पुन्हा हे काम मागे घेत असल्याचे पत्र देतील. या अगोदर त्यांनी खाजगी इमारतींचे प्लान तयार केले आहेत. त्यांनी जर विथड्रॉ केले तर आपण त्यावर कारवाई करण्याची सुरूवात केली आहे. तीच प्रक्रिया याठिकाणी का नाही? महापालिकेच्या बाबतीत वेगळा नियम कारण त्यात महापालिकेचे अधिकारी सहभागी आहेत म्हणुन? तर श्री. बुलचंद सोनेसर यांची ज्या पध्दतीने तुम्ही स्तुती केली. त्यापध्दतीने त्याने निशुल्क हे काम केले पाहिजे. उलट त्यांनी ५ टक्के रक्कम मागितली होती. त्यामध्ये आपण वाटाघाटी करून ती रक्कम ३ टक्के केल्याचे, कमी केल्याचे आपण दाखविले आहे. हे चुकीचे आहे. ती त्यांची जबाबदारी होती ती त्यांनी पुर्ण केली पाहिजे आणि प्रशासनाच्या वतीने ते जरी लेट झाले तरी चालेले परंतु कारवाई अगोदर होवू दया. जेणेकरून महापालिकेचे यापुढे होणारे प्रकल्प अयशस्वी होणार नाहीत. एकदा जरब बसली तर पुन्हा निष्काळजीपणा होणार नाही. याची काळजी आपण घ्या. धन्यवाद.*

***मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी यांनी सायंकाळी ४.५९ वाजता सभागृहात प्रवेश केला.***

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, या चर्चेसोबत आणखी एक मुददा या सभागृहा समोर येणे गरजेचे आहे. की ज्यावेळेला ही अग्निक्षमण विभागाची इमारत धोकादायक असल्याचे निर्दशनास आले. तीची पाहणी झाली. त्यानंतर निश्चित झाले की, ही धोकादायक इमारत आहे. तर त्यावेळेस तेथे राहणारे जे रहिवाशी होते जे अग्निक्षमण विभागाचे कर्मचारी आहेत. शहरामध्ये कुठेही दुर्घटना घडली की सर्वात प्रथत हे लोक त्यांचे जीव वाचविण्यासाठी धावुन*

जातात. हेच ते आपल्या अग्निक्षमण विभागाचे कर्मचारी तेथे रहात होते. अशा इमारतीला सुध्दा आपल्या महापालिकेने नोटीस बजावताना. त्यामध्ये असे शब्द वापरले की, ही सदरची इमारत धोकादायक आहे. ती अमुक काळामध्ये आपण खाली करा. अन्यथा तिकडे जिवित हानी झाली तर आम्ही जबाबदार असणार नाही. महापालिकेचे कर्मचारी फायरब्रिगेडचे कर्मचारी त्यांच्या सुध्दा जिवित हानीला आपण जबाबदार राहणार नाही अशा प्रकारचे पत्र त्या फारब्रिगेडच्या इमारतीसाठी आपण येथुन पाठविले. तर अशा प्रकारचा बेजबाबदारपणा किंवा निष्काळजीपणा अशी अमानवियता असू नये, आपल्या कर्मचा-यांच्या बाबतीत तरी असू नये. कर्मचा-यांच्या बाबतीत तरी आपण सहानुभूती दर्शाविली पाहिजे. अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**मा. सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठकुर :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ज्या प्रकारे फायरब्रिगेडच्या धोकादायक इमारतीवर चर्चा चालू आहे, असेच एक उदाहरण आहे उल्हासनगरच्या फायर ब्रिगेडच्या बाजूला एक बरेच मोठे बांधकाम तयार केले आहे. मी त्याबाबत आपणांस विचारु इच्छितो की, ते बांधकाम सुध्दा दिवसेंदिवस धोकादायक होत चालले आहे. ते बांधकाम कशासाठी तयार केले आहे व त्यावर महापालिकेने किती रक्कम खर्च केली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, इथे श्री. बोडारे साहेबांनी पर्यवेक्षणाचा अभाव असल्याचा प्रशासनावर आरोप केला. या अगोदर काय झाले ते तर मी सांगु इच्छित नाही. परंतु आता जे चालु आहे त्यामध्ये बदल घडविण्यासाठी आम्ही पूर्ण प्रयत्न करत आहोत. आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो जी सुध्दा कामे पूर्ण झाली आहेत व ज्यांची देयके तयार होऊन पेमेंटसाठी प्रलंबित आहेत. म्हणजे ज्यांची देयक रक्कम अदा करायची आहे अशी सर्व देयके मी माझ्याकडे मागविली आहेत सर्व ठेकेदारांची, सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागाअंतर्गत जेवढी काही कामे चालु आहेत ती सर्व बिले मी माझ्या कार्यालयात मागविली आहेत. ठिकठिकाणी जावुन बांधकामांची पहाणी केली जाईल. त्यांचा दर्जा काय आहे याबाबत तज्ञांचे मत घेतले जाईल व त्यानंतरच त्याचे पेमेंट अदा केले जाईल. व असे जवळ जवळ दहा कोटीची बिले जी लेखा विभागात पडुन होती ती सर्व बिले मी माझ्याकडे मागविली आहेत. दुसरे असे की यानंतर जी कामे पुर्ण होतील. ते काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र असेल ते बिल आता थेट लेखा विभागात पेमेंट अदायगीसाठी जाणार नाही. ती बिले माझ्या टेबलवर येतील. कामाची पहाणी तज्ञव्यक्तींबरोबर होईल व त्यानंतरच पेमेंट अदा केले जाईल. आपण जे म्हणत आहात पर्यवेक्षणाचा अभाव ती आजची गोष्ट नाही. हे जे झाले आहे ते यापुर्वी झालेले आहे. जे सत्त्य आहे ते सांगण्याची मला काही वावगे वाटत नाही. जेथे पध्दतच चुकीची झाली आहे ती सुधारली पाहिजे. आजही जर कुणी चुक केली असेल तर तिच्याकडे लक्ष देण्याऐवजी जी पध्दत चुकली आहे. ती सुधारली पाहिजे. पध्दती सुधारण्यासाठी आम्ही हे केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी:-</u>आयुक्त साहेब, आपणांस धन्यवाद आहेत. की आपणास असे वाटते की मी सुधारणा करून दाखवेन एकदा नाही तर कोटी कोटी वेळा आपणांस धन्यवाद आहेत. परंतु आज शहराची स्थिती अशी आहे. महानगरपालिकेतही प्रत्येक विभागाची स्थिती अशी आहे. जी मी कागदावर लिहिले आहे तो कागद मी आपणांस देतो. प्रत्येक विभाग अपंग झाला आहे. जेसीबी मशिन एक महीन्यापासुन खराब आहे. मच्छर मारण्याची जी धुराची मशिन आहे ती सुध्दा एक दोन महिन्यापासुन खराब आहे. सर्व विभागामध्ये अंधारच अंधार आहे. मी हे लेखी पत्र आपणांस सादर करीत आहे. जरा याच्यावर विचार करा. आपण जे महासभेत सांगितले आहे की मी या स्थितीमध्ये सुधारणा घडवुन आणेन त्याबाबत आपणांस एक वेळा नाही तर कोटी कोटी वेळा धन्यवाद आहे. आम्हाला असेच आयुक्त पाहिजेत. की जे वर्षानुवर्षानंतर आम्हाला मिळाले आहेत. आम्ही काहीतरी नविन घडलेले पाहु इच्छित आहोत. ते नविन काही आपण करून

दाखविले तर एक वेळेस नाही तर कोटी कोटी वेळा आपणांस धन्यवाद देवू. धन्यवाद. हे घ्या पत्र.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-नाही. नाही. मला आता बोललेच पाहिजे. आपण जे जेसीबी मशिनचे बोलत आहात. ती जेसीबी मशिन दुरूस्त झाली आहे. याची सुध्दा आपण माहिती घ्यावयास पाहिजे होती. व जे फॉगींग मशिनचे म्हणत आहात तिचे सुध्दा दुरूस्तीचे काम झालेले आहे.

मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड हे सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी:-जेसीबी मशिनचीच तक्रार नाही तर प्रत्येक विभागात काही ना काही तक्रार आहे. फायरब्रिगेडमध्ये कटर नाही. एक महिन्यापासुन कटर खराब झालेला आहे. रस्त्यांमध्ये झाडे पडुन आहेत. ती सरकवण्यासाठी काही मशिनरी नाही. काही डंम्पर्स नाहीत. ही महानगरपालिका आहे की काय आहे? सुधारणेचा आपण जो ठेका घेतलेला आहे तो आपण करून दाखवा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-मा. आयुक्त साहेब मी एक प्रश्न विचारला होता. की फायरब्रिगेटच्या बाजुला जे बांधकाम केलेले आहे ते दिवसेंदिवस धोकादायक होत चालले आहे. तर महानगरपालिकेने किती पैसे खर्च करून ते बांधकाम केले व कशासाठी केले? त्याचे उत्तर दिले जावे ना?

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आपणांस येथे या महासभेत आठवण करून देवू इच्छिते व श्री. धनंजय बोडारे यांना धन्यवाद देते की त्यांनी जो फायरब्रिगेडच्या इमारतीचा मुददा येथे उपस्थित केला. त्याच्याशी संबंधित एका मुदयाची मला येथे आठवण झाली. सहा महिन्यापुर्वी मी आपणा कडुन एक पहाणी करून घेतली होती. व पाच नंबर विभागात सफाई कामगारांसाठी महापालिकेने चार इमारती बांधलेल्या आहेत. ज्या धोकादायक इमारती म्हणुन घोषित करण्यात आल्या आहेत. शुळ साहेबांच्या कार्यकालावधीत या इमारतींच्या दुरूस्तीसाठी आठ लाख रू. खर्च केला आहे. व आपण आश्वासन दिले होते की, एकेक इमारत निष्कासित करून तेथे शेजारी जो भुखंड आहे. त्यावर इमारती तयार करू. व सफाई कामगारांना सुविधा उपलब्ध करून देवू. मी आपणांस आवाहन करते की, आपण लवकरात लवकर, जे गरीब सफाई कामगार राहतात त्या आपल्या महापालिकेच्या इमारतींची लवकरात लवकर दुरूस्ती करावी.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढील प्रश्न क्र.२०९ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. २०९:-दि. ७.६.२००३ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समितीमध्ये विषय क्र. ३ ठराव क्र. २१ नुसार रस्त्यात पडलेले खड्डे पावसाळयापुर्वी भरणे कामी मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांची रूपये ४९. ९० लाखाचे प्राकलन मंजुर करण्यात आले त्या अनुषंगाने खालील प्रश्नाचे उत्तर दयावे.

पावसाळयापुर्वी खड्डे भरण्यासाठी, पावसाळयामध्ये खड्डे भरणेसाठी व पावसाळयानंतर खड्डे भरणेसाठी प्रत्येकी किती रक्कम ठरविलेली आहे? त्यापैकी पावसाळयापुर्वी किती व कोठे कोठे रक्कम खर्च करण्यात आली ते रस्ते व्यवस्थित आहेत का? सध्या पावसाळा चालु असल्याने पडलेले खड्डे भरण्याचे काम चालु आहे का? व पावसाळयानंतर ते केव्हा चालु होणार?

कृपया सदर प्रश्नांची सवितस्तर माहिती महासभेमध्ये देण्यात यावी.

उत्तर :-लेखा शिर्ष c-4(ii) p-ii तरतुद १,००,००,०००/-
पावसाळयापुर्वी २१ रस्त्यामधील खड्डे भरण्यात आले आहे.
पावसाळा संपल्यावर रस्त्यामधील खड्डे भरण्याचे काम हाती घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-ठीक आहे.
मा. महापौर:-नाही. आयुक्त साहेब यावर बरीच चर्चा झाली आहे. आपण या गोष्टीचा खुलासा करावा. कॅम्प ५ येथे सफाई कामगारांच्या वसाहतीमध्ये जे वाल्मिकी समाजाचे लोक राहतात. त्यांच्या जिवित्त्वास उदया जर धोका निर्माण झाला तर त्यास जबाबदार कोण?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, फायरस्टेशनची इमारत खराब आहे. किंवा सफाई कामगार जेथे राहतात ती वस्ती खराब आहे. गार्डनमध्ये गेले तर ते गार्डनही खराब आहे. हे सर्व खराब आहे. महापालिकेत जेवढया काही इमारती आहेत त्यांची स्थिती खराब आहे. रस्त्यांची स्थिती या शहरात कमीत कमी चांगली आहे. परंतु बाकी जे आहे ते प्रत्येक विभागात कुठेना कुठे काहीना काही तक्रार आहे. आपल्या माहितीसाठी सांगु की, ती सफाई कामगारांची जी वस्ती आहे तेथे आम्ही पहाणी करून आराखडे व प्राकलने तयार केली आहेत. तेथे जे रस्ते खराब आहेत त्यांची सुध्दा स्वतंत्र अशी प्राकलने तयार केली आहेत. लवकरच ती कामे सुरू होतील.

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-सहा महिन्यापुर्वी पहाणी केली आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, पहाणी केल्यानंतर कामाची आवश्यकता लक्षात येते. आराखडे व प्राकलने तयार केली जातात. प्रशासनामुळे कामास विलंब होत नाही. निधीमुळे कामास विलंब होत आहे. आपण जेवढी काही कामे सुचवत आहात ती सर्व जर एकाच वेळेस करायची असतील तर ४००-५०० कोटी रू. त्यास लागतील. तेवढे तर आपले उत्पन्न नाही. आपले उत्पन्न किती आहे व कोणते काम जरूरीचे आहे याचा विचार करूनच ते काम हाती घेतले जाते. व कामाचे आराखडे व प्राकलने तयार करण्यास काहीच वेळ लागत नाही. आपल्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो. सार्वजनिक बांधकाम विभागाचा कर्मचारी वर्ग आराखडे आणि प्राकलने तयार करण्यास बिल्कुल चुस्त आहे. सकाळ पासुन संध्याकाळपर्यंत माझ्या टेबलवर कोणतीही फाईल येत असते. चुस्त आहे असे मी म्हणतो. बिल्कुल चुस्त. एका दिवसातच कनिष्ठ अभियंत्यापासुन शहर अभियंत्यापर्यंत, सर्व जण चुस्त आहेत. मी चुस्त म्हंटलो आहे. ऐवढे चुस्त आहेत, ऐवढे कार्यक्षम आहेत. कनिष्ठ अभियंत्यापासुन शहर अभियंत्यापर्यंत लेखा विभाग, लेखा परिक्षण विभाग यासर्व विभागांमध्ये फाईल जावुन आठ तासाच्या आत माझ्या टेबलवर फाईल येते. म्हणजे आराखडे व प्राकलने तयार करण्यात येथे कोणताही विलंब नाही. विलंब जर आहे तर तो फक्त निधीबाबत आहे. व नंतर जे काम होते त्याच्या दर्जाबाबत असते. येथे मी जास्त काही बोलु इच्छित नाही परंतु आपण जे म्हणत आहात की विलंब का आहे? विलंबाचे कारण हे आहे की निधीची उपलब्धताही पहावी लागते.

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:-मा. महापौरजी, आयुक्त साहेब चुकीचे म्हणत आहेत. नगरसेवक लोक आपापली फाईल घेवून सार्वजनिक बांधकाम विभागात फिरत असतात. शिपायासारखे काम नगरसेवक लोक करत आहेत. सार्वजनिक विभागाचे काम ऐवढे खालच्या स्तराचे आहे की आम्हाला स्वत: आमच्या फाईल इकडुन तिकडे घेवून जाव्या लागतात त्याशिवाय कामे होत नाहीत.

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी): '-या गोष्टीशी आम्ही सुध्दा सहमत आहोत. पी.डब्लु.डी. विभाग निकम्मा विभाग आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-सन्माननिय आयुक्त साहेब, तुम्ही चुस्त बोललात त्याबददल धन्यवाद आहे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-मा. महापौरजी, जसे आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, ज्या कामास निधी पाहिजे. निधी अभावी कामास विलंब होवू

शकतो. परंतु अशी काही कामे की ज्यास निधीची आवश्यकता नाही. तेथे फक्त आपल्या अधिका-यांना लक्ष दयायचे आहे. व पेन चालवायचा आहे. अशा कामात जर विलंब झाला तर?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>ती आमची जबाबदारी आहे. व ती आम्ही पुर्णपणे निभावू.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u> मी दोन दिवसाची वेळ घेतो. संबंधित अधिका-यांशी भेटेन जर त्याच्याकडुन ते काम झाले नाही तर आपल्याकडे येईन.

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेब म्हणत आहेत की, निधी उपलब्ध नाही. बाकी सर्व कामांना निधी आहे. इकडे-तिकडे काम करण्यास निधी आहे. श्रीमती ज्या साधवानी यांच्या प्रभागात सफाई कामगारांची जी वसाहत आहे तेथील इमारतीत जर काही अपघात झाला तर त्यास आपण जबाबदार राहाल का? बाकी सर्व काम सोडुन आपण या कामाकडे लक्ष दिले तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रुपानी :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आता आपल्या पर्यवेक्षणाचा जो प्रश्न चालू होता त्याच्या संदर्भात व आता सार्वजनिक बांधकाम विभागाबाबत सांगितले गेले तर मी असे विचारु इच्छितो की, लेखा विभागास अशा हरकती काढण्याचे अधिकार आहेत का की एखादया ठराविक अशा विभागात हे काम करण्याची आवश्यकता आहे का? आम्ही एक-दोन अशी प्रकरणे सादर केली आहेत ज्या बाबत उप-अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली आहे. जनतेसाठी त्या कामाची त्या प्रभागात आवश्यकता आहे. परंतु लेखा विभागाने त्या बाबत हरकत घेवून दोन-तीन वेळा फाईल परत पाठविली आहे. असे लिहिले आहे की, या कामाची तेथे जरुरत आहे का? जसे की, उदाहरण दाखल आरोग्य विभागाचे एक कार्यालय तयार करण्याचा मी एक प्रस्ताव दिला आहे. लेखा विभागाने लेख्यासंबधी फक्त हरकत नोंदवावयास पाहिजे असे मला वाटते. व त्या गोष्टीची तेथे आवश्यकता आहे की नाही अशी हरकत त्यांनी घेण्याची गरज नाही. या गोष्टीबाबत जरा खुलासा करावा असे मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> मा. महापौरजी, आता-आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभाग अतिशय सक्षम आहे. आजपर्यंत कुठलाही कनिष्ठ अभियंत्याने प्रत्यक्ष जागेवर जाऊन प्राकलन तयार केले आहे का? कुणीही प्रत्यक्ष प्रभागात जाऊन प्राकलन तयार केले आहे का? की नाली किती रुंद करायची आहे, रोड किती रुंद करायचा आहे? घरात बसून किंवा कार्यालयात बसून प्राकलन तयार केले जाते.

<u>मा. सदस्य श्री. देंवेंद्रसिंह खेमाणी :-</u> माझ्या प्रभागात होते.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> त्यानंतर मी माझ्या प्रभागातील गोष्ट सांगतो एक वर्षापूर्वी माझ्या प्रभागातील आठ सार्वजनिक शौचालय तोडण्याचा आदेश आपण दिला होता. अनाधिकृत बांधकाम विभागाने आठ सार्वजनिक शौचालये तोडुन दिलीत. आठ शौचालय तोडल्यानंतर त्यांचा मलबा आज सुध्दा तेथे पडुन आहे. आपल्या आदेशानंतर भडकवाड साहेबांनी आठ सार्वजनिक शौचालय एक दिवसात तोडुन दिली. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागास रोज-रोज सांगुन सुध्दा आठ सार्वजनिक शौचालय तोडल्यानंतर त्यांचा जो मलबा आहे, तो आजपर्यंत उचलला नाही. येथे सार्वजनिक बांधकाम विभागात एवढे कर्मचारी आहेत की, काही वर्षापूर्वी आमच्या येथे प्राकलने तयार होत नव्हती. साहित्य येत होते व उल्हासनगर महापालिकेचे कामगार काम करत असत. परंतु आज अशी स्थिती आहे की, मजूर असतांनाही रस्त्यावर पडलेला मलबा उचलला

जात नाही. अशाप्रकारे आमचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम आहे. व त्यांची आपण शिफारस करता?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, असे वाटते की, श्री. पुरस्वानी साहेबांसारख्या व्यक्तीस आमच्या चुस्त या शब्दाचा अर्थ समजला नाही तर आम्ही जाणीव पुर्वक त्या शब्दाचा वापर केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग प्राकलने तयार करण्याच्या कामात बिल्कुल चुस्त आहे. सकाळ पासुन संध्याकाळपर्यंत म्हणजे एक दिवसात प्राकलन तयार होवून मंजुरीस येते. हे आम्ही सांगितले होते. आपण कदाचित लक्षपुर्वक ऐकले नाही. त्याबाबत आम्ही जी शिफारस केली व जे बोललो ते त्यांना समजले असेल व काही असे समजदार लोक आहेत त्यांना समजले असेल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आयुक्त साहेबांनी असे केले आहे की एखादया व्यक्तीचे नाक पकडले तर तो तोंड उघडतो. दुसरे लोक कामास लागतात. आज आमच्या विरोधी पक्षाचे सदस्य असोत किंवा सत्ताधारी पक्षाचे सदस्य असोत. आमचे सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी असोत किंवा श्री. धनंजय बोडारे असोत जे पण सदस्य बोलले, उल्हासनगर महानगरपालिकेत नगरसेवकांची स्थिती मुकादम सारखी आहे. ते कागदपत्रे घेवून फिरत राहतात. व सर्वात वाईटात वाईट व निकम्मा विभाग जर कोणता असेल तर तो सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग हे बोलण्यामध्ये काहीच हरकत नाही कारण की, काम प्रशासनास करायचे आहे. आमच्या पुढे जेव्हा प्रस्ताव येईल तेव्हा आमचे काम आहे त्यास मंजुरी देणे. कनिष्ठ अभियंत्त्यास जर सांगितले की प्राकलन तयार करा. तर तो म्हणतो की मला प्रभाग समितीमध्ये बसण्यास सांगितले आहे. ५ नंबर येथे झोन ऑफीस बंद केले आहे. म्हणतात की श्री. रामसिंघानी यांनी म्हंटले आहे की नेताजी येथे झोन ऑफीस चालु करा. हे काय आहे? आज दोन महिन्यापासुन सदस्य जेसीबीची मागणी करतात त्यांना सांगितले जाते की जेसीबी खराब आहे. कधी म्हणतात की अतिक्रमण विभागात पाठविली आहे. तर आज जर आरोग्य खात्त्याच्या कामासाठी प्राकलन तयार करण्यासाठी कनिष्ठ अभियंत्त्यापासुन त्यावरचे जेवढे काही अधिकारी आहेत त्यांना साहेब साहेब म्हणावे लागते. त्यांना पदोन्नती आम्ही देतो. प्रतीनियुक्तीवरील नेमणुकीस आम्हीच मान्यता देतो. व त्यांना आम्हाला साहेब,साहेब म्हणावे लागते. ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. सभागृह नेता या नात्त्याने मी सांगु इच्छितो की, सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग हे संपुष्ठात आले आहेत. त्यांना आपली उलट सुलट कामे पार पाडायची असतात. ते मुंबईला जातात सांगतात कॅम्प नं. ४ येथे जातो म्हणुन, असतात दुसरीकडे सांगतात इथे आहे म्हणुन. पुर्णपणे चुकीची माहिती देतात. पुर्ण शहराचा सत्त्यानाश जोपर्यंत हे लोक करणार नाहीत. शहरास सोडणार नाहीत. तर मी आपणांस विनंती करतो की, आपल्यासारख्या मोठयात मोठा अधिका-यांनी सांगावे की कर्मचारी काम करत नाहीत. तर बाकी लोक कुठे जातील? आज आयुक्त साहेबांची जबाबदारी......... आपण चुस्त या शब्दाचा जो प्रयोग केलात त्यावरून जे समजलो मी श्री. गायकवाड साहेबांच्या मताशी पुर्णपणे सहमत आहे. त्यांनी झोपडपटटयांमधील कामांबाबत वेळोवेळी आवाज उठविला आहे. मान्यच्या पुढे अ जोडुन त्यास अमान्य केले जाते. तर मेहरबानी करून जे मान्य करतात त्यापुढे अ लावुन अमान्य करू नका. व शहरामध्ये जेवढे काही काम ५ वर्षापासुनची झोपडपटटयांची कामे, नगरसेवक निधी, सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे. प्रभाग समितीनिधीतील प्राकलने किंवा गोषवारे याबाबत नगरसेवक लेखा विभागात धक्के खात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही अधिकारी प्राकलने गोषवा-यांची फाईल घेवून स्वतः लेखा विभागात जात नाही. कधी कनिष्ठ अभियंता कधीही फाईल घेवून लेखा विभागात गेलेला नाही. प्रत्त्येक नगरसेवक स्वतः प्राकलने घेवून फिरत असतो. मला आयुक्त साहेबांनी स्वतः दहा वेळा म्हंटले आहे की, आपण कागदपत्रे घेवून फिरता मला दुःख होते. अशी जी आमची परिस्थीती करून ठेवली आहे हे लोक कामाचे पगार घेतात. मेहरबानी करून त्यांनी शहरास परिणाम दयावा. व काम

करून दाखवावे. जर कोणी सक्षम अधिकारी नसेल तर त्यांनी आपली खुर्ची सोडावी.खुर्चीवर बसायचे असेल तर काम करा. त्यांनी स्वतःहुन खुर्ची सोडली पाहिजे. फक्त नुसते बोलत असतात की आम्ही जावु इच्छित आहोत. परंतु प्रत्यक्षात ते जावु इच्छित नाहीत. म्हणतात मी जावु इच्छितो परंतु प्रत्यक्षात ते दुस-याला पाठवतात. तर मेहरबानी करून असे होवु नये त्यांनी आपल्या कामातुन परिणाम दाखवुन दयावा. किंवा खुर्ची सोडावी. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आयुक्त साहेब, संपुर्ण सभागृहाची भावना आपल्या लक्षात आली असेल. जरा आतमध्ये झाकुन पहा तुम्ही सांगीतली सिस्टीम चांगली आहे आमचे आताचे पर्यवेक्षण चांगले आहे. प्रशासन चांगले आहे. परंतु ही वस्तुस्थिती नाही. हे संपुर्ण सभागृहाने तुम्हाला दाखवुन दिले आहे. सार्वजनिक साफसफाई बाबत बोंबाबोंब आहे. पाणी पुरवठयाबाबत श्री. किशोर वनवारी यांनी आताच तुम्हाला सांगितले आहेच. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबतीतही तेच आहे. आमच्या श्री. सतरामदास यांनी जेसीबी आणि सॅनिटेशनचे मशिनरी बाबत प्रश्न उपस्थित केला. म्हणजे तुम्हाला जे वाटते की ती वस्तुस्थिती नाही. वस्तुस्थिती आम्ही तुमच्या समोर आणलेली आहे. तुम्हाला माहित असुन सुध्दा तुम्ही काही करू शकत नाहीत. असे वाटते कारण तुम्ही सांगीतले की सार्वजनिक बांधकाम विभाग चुस्त आहे. आणि यामागे सांगण्याची माझी भावना वेगळी आहे. असेही सांगता. म्हणजे त्यामध्ये काय खाचखळगे आहेत. हे तुम्हाला कळते आहे. तरी तुम्ही समस्या सोडवु शकत नाहीत. हे तुमचे काय आहे? हताश कशामुळे आहात हे समजु शकत नाही. जर तुम्हाला समजते की अमुक अमुक समस्या आहे तर त्यावर पर्याय काय हे तुम्ही शोधले पाहिजे प्रशासनाचा प्रमुख म्हणुन. तुम्ही चुस्त आहे म्हणुन सांगता एका दिवसामध्ये फाईल येते. त्याची कारणे काय, अशा प्रकारे येवु नये म्हणुन त्यासाठी तुम्ही काही केले का? ते ही सांगा ना की यासाठी मी हे केले आहे.

**मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी या ५. २० वाजता सभागृहा बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-मा. महापौरजी, जसे आता श्री. किशोर वनवारी व आमच्या आयुक्त साहेबांनी प्रशासनाबाबत सांगितले त्याबाबत मी एक गोष्ट सांगु इच्छितो की, आयुक्त साहेब आपणांवर आम्हास गर्व आहे. जर आपण प्रशासनावर लक्ष देता. जेथपर्यंत आपल्या कनिष्ठांच्या बाबतीत प्रश्न आहे. आपण त्यांना ताकीद दया. पाणी पुरवठा विभागात सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत कुणीही अधिकारी येत नाही. हे गेल्या एक महिन्यापासुन पहात आहे. माझा स्वतःचा अनुभव आहे. हे मी श्री. लोणारे साहेबांना लेखी सुध्दा दिले आहे. श्री. ठाणेकर यांना एक अतिरिक्त कार्यभार दिला आहे. शहरातील विंधन विहिरी बंद आहेत. आणि ठाणेकर भेटण्यास तयार नाहीत. श्री. जवांदे साहेब पण येत नाहीत. त्यांच्या घरची काहीतरी अडचण आहे. त्यांची घरगुती अडचण आहे त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. त्यांचा कालावधी खराब चालला आहे. त्याच्याशी आम्ही सहमत आहोत परंतु त्यांचा पुर्ण विभाग सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत कुणी कर्मचारी अधिकारी येत नाही. तर यावर जरा आपण लक्ष दया.

मा. सदस्य श्री. सांगिता जावळेः-मा. महापौरजी, आयुक्त साहेब, पाण्याच्या गंभीर विषयावर मला थोडी चर्चा करायची आहे. पाण्याचा पहिला मुख्या प्रश्न आहे साहेब, पुढचे विषय नंतर घ्या. दिड वर्ष झाले मी प्रभाग समितीमध्ये ओरडते. आणि आयुक्त साहेबांना सुध्दा ते ब-यापैकी माहित आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढचा प्रश्न प्रश्न क्र. २१० हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. २१० :-दि. ६.७.०३ रोजीच्या स्थायी समितीमध्ये महापालिकेतर्फे उभे केलेले पथ दिवाबत्ती नियंत्रक चालु बंद करणे कामी मे. प्रेम इंटरप्रायझेस, उल्हासनगर-१ यांना उल्हासनगर १ ते ५ मधील महानगरपालिकेतर्फे उभे केलेले

पथ दिवाबत्ती वेळोवेळी चालु बंद करण्याकरिता प्रति दिवस प्रतिपथ दिवाबत्ती रू. १०.९८ या दराने दिलेले आहे. त्या अनुषंगाने खालील प्रश्न उपस्थित होतात.
१)दिवाबत्ती पथ कसे ठरविलेले आहेत, दिव्यांची संख्या रस्त्याची लांबी की चालु बंद करण्याचे स्विच.
अ)महापालिका क्षेत्रामध्ये दि. ३०.४.२००३ रोजी किती दिवाबत्ती पथ (नियंत्रक) आहेत (कृपया सविस्तर माहिती दयावी)
ब)या कंत्राटामुळे महापालिकेला प्रतिदिवस तसेच प्रतिवर्ष किती खर्च अपेक्षित आहे?
क)मागील वर्षी २००२ ते २००३ या वर्षामध्ये महापालिका सदर कर्तव्य कसे करत होती व त्यासाठी प्रति दिवस / प्रति वर्ष किती खर्च होत होता?

<u>उत्तर :-</u>१)रोडची लांबी, रूंदी, वाहतुक घनता इ.
अ)३१९
ब)प्रति दिवस रू.३,४१४.७८
प्रति वर्ष रू.१२,४६,३९४.७०

क) प्रति दिवस २००२-२००३ रू.४,१००/-
प्रति वर्ष २००२-२००३ रू. १४,९६,६६०/-

हे कार्य ठेकेपध्दतीवर होते.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>याठिकाणी सार्वजनिक दिवाबत्तीचा प्रश्न आहे. स्पष्टीकरण कोण करेल, स्पष्टीकरण करणारे आहेत का? कसे ठरविले आहे दिव्यांची संख्या, रस्त्यांची लांबी, चालु बंद करण्याचे स्वीच, रोडची लांबी, रूंदी आणि तुलनात्तमक इत्त्यादी याचा अर्थ समजला नाही. मला उदाहरण मिळाले तर बरे होईल. एकुण महापालिका क्षेत्रामध्ये ३१९ पथ आहेत. दिवाबत्ती पथ आहेत. ते मला समजले नाही. वाको कंम्पाऊंड पासुन माणेरा जंक्शन पर्यंत किती पथ आहेत? सांगु शकाल का? पथ नियंत्रक,....

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-</u>पवई पासुन सुरू होतो. सुर्या हॉटेल नंतर हरीसन पिकल, हरीसन पिकल नंतर पेन्सील फॅक्टरी, पेन्सील फॅक्टरी नंतर व्ही.टी.सी. ग्राऊंड, व्ही.टी.सी. ग्राऊंड पासुन श्रीराम नगर, श्रीराम नगर पासुन २८ सेक्शन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>हे मुख्य रस्त्याचे झाले.

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-</u>मुख्य रस्त्याचेच आपण विचारले आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मुख्य रस्त्यापासुनजे पुरक रस्ते आहेत. त्यावरील....

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-</u>साहेब, पुर्ण नकाशा येथे आहे. आपण पाहु शकता.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>त्या रस्त्यावर वाकोजंक्शन पासुन पवई पासुन मानेरा पर्यंत जवळ जवळ सहा ते सात स्वीच असतात. म्हणजे रोज त्या रस्त्यावरील दिवाबत्ती चालु करण्यासाठी ७७ रू. खर्च येतो.

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-</u>होय. बरोबर आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>एकुण ३१९ आहेत.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-होय बरोबर.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-यावर खर्च येतो. दिवसाला ३४१४/- रू. म्हणजे एका वर्षाला येते. १२ लाख ४६ हजार

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-साहेब मी आपणांस सांगतो ना. साहेब यावर या वर्षाचा आपला अपेक्षित खर्च आहे १२ लाख रू. हे स्वीच चालु बंद करणे हे आमचे काम नाही. हे एम.एस.ई.बी चे काम आहे. म्हणुन यासाठी आम्हाला रस्त्यावरील दिव्यांच्या बिलातुन पाच टक्के रक्कम सुट मिळते. आम्हाला अपेक्षा आहे की यावर्षी ती दहा लाख ६४ हजार रू. मिळतील. यावर आमचा पुर्ण वर्षाचा, पुर्ण शहराचा खर्च होईल १ लाख ८२ हजार व प्रति दिवसाचा ४९९ रू. यामध्ये फक्त स्वीच चालु बंद करण्याचेच काम नाही तर त्याबरोबर इतरही कामे आहेत. त्यामध्ये आमच्या रात्रीच्या गस्तीचा समावेश आहे. आमची १४ माणसे प्रत्येक दिवशी १४ झोनमध्ये रात्रीचे गस्त घालतात. वेगवेगळया जागेवर, रात्री जर दिवाबत्ती मध्ये काही बिघाड होत असेल तर त्याबाबत रात्रीच कार्यवाही केली जाते. ६० टक्के तक्रारींची रात्रीच दखल घेतली जाते. व दुस-या आणि ४ थ्या शनिवारी म्हणजे जेव्हा आपले कार्यालय बंद असते. त्यावेळेस स्वीच चालु बंद करणा-यांची जबाबदारी आहे. दिवाबत्ती मध्ये काही बिघाड असेल तर एम.एस.ई.बी. कडे जावुन रिपोर्ट केला तर व त्याकामी जर काही साहित्य लागणार नसेल तर एम.एस.ई.बी. वाले त्याच दिवशी त्याची दुरूस्ती करतात. व ६० टक्के बिघाडांची रात्रीच दखल घेतली जाते. जे ४९९ रूपयामध्ये पुर्ण उल्हासनगर शहरामधील सार्वजनिक दिवाबत्तीच्या बिघाडाचे काम केले जाते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-४९९ रूपये? आणि ते ठेकेदारानेच करायचे आहे. ?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-होय.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आमच्या विद्युत विभागातील कर्मचा-यांचे काम काय आहे?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-देखभाल दुरूस्ती, हे तर स्वीच चालु बंद करण्याचे काम आहे ना?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-या अगोदर हे काम महापालिका करत होती.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-साहेब, चार वर्षापुर्वी करत होती. त्यानंतरच तर साहेब यामध्ये सुधारणा आली आहे.

**मा. सदस्या श्रीमती. मीनु दासानी यांनी ५. २५ वाजता सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-म्हणजे ४ वर्ष लागोपाठ ठेकेदाराला देत आहात?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-त्यामुळेच तर सुधारणा आली आहे. आपणास उदाहरण देतो. गणपतीच्या वेळेस चौधरी साहेबांनी सायंकाळी पावणे सात वाजता मला फोन केला. एका तासामध्ये त्यांच्या विभागातील सार्वजनिक दिवाबत्ती पुर्ववत चालु झाली. आपल्या समोर उदाहरण आहे. हेच कारण आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-जर याप्रकारचे काम महानगरपालिकेच्या वतीने आपण करायचे ठरविले तर होवू शकणार नाही का? आम्ही ठेकेदार पध्दतीवरच का विसंबुन राहतो. आता आम्ही वायरमनची जी नविन भरती केली आहे.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-साहेब मी सांगतो आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-हेच काम जर आम्ही महापालिकेच्या वतीने करायचे ठरविले तर यापेक्षा चांगला दर्जाचे सामान देवून तर खर्च किती येईल?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-मी आपणांस याचे उत्तर देतो. साहेब, सध्या १०,८४० लाईटस् आहेत ज्यांची आम्हाला देखभाल दुरूस्ती करायची आहे. व यावेळेस सध्या आमच्याकडे एकच काम नाही की आम्ही हे देखभाल दुरूस्तीचे काम करावे. यावेळेस आमच्याकडे एम.एस.ई.बी. चे पोल स्थानांतरीत करायचे फार मोठ्या प्रमाणाचे काम चालु आहे. जर आपली इच्छा असेल तर आम्ही हे काम विभाग करून घेवू शकतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-जर यामध्ये कमी खर्च येत असेल आमचे काही पैसे वाचत असतील तर काय हरकत आहे. जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की आमच्याकडे निधीची कमतरता आहे. त्यामुळे आम्ही कामे करू शकत नाही. जर प्रत्येक ठिकाणी आपण निधीची बचत करू शकत असु तर का नाही करावी?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-यामध्ये निधीची बचत होत आहे. मी आपणांस त्याचे स्पष्टीकरण करतो. ४९९ रूपयात आमची पाच कामे होतात स्वीच चालु बंद करण्याचे काम सोडुन त्यासाठी एम.एस.ई.बी. पैसे देते.
मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-स्वीच चालु बंद करण्यासाठी?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-त्यासाठी एम.एस.ई.बी. पैसे देते. ४९९ रूपयामध्ये आमची पाच कामे होतात. रात्रीच्या वेळेस दिवाबत्ती मध्ये झालेल्या बिघाडाची दखल घेतली जाते. याबाबत मी एकउदाहरण आपणांस सांगतो. समजा थ्री फेज लाईन आहे. तेथील कोणताही फेज काम करत नसेल तर रात्रीच्या वेळीचा कर्मचारी काय करतो की त्यास लुपिंग करून दुस-या फेजवर टाकतो. त्यामुळे रात्री लाईट चालु होते. आणि त्यानंतर सकाळी आमच्याकडे त्याबाबतचा अहवाल येतो. तसे आम्ही बरोबर करतो. एम.एस.ई.बी. च्या मदतीने, दुस-या व चौथ्या शनिवारीही दुरूस्तीचे काम होते.बरोबर आहे? ठिक आहे म्हणुन मी आपणांस सांगतो की,आमचे १४ कर्मचारी रोज रात्रीच्या वेळी गस्त घालतात. आपणांस कदाचित आठवत असेल, किती नगरसेवकांच्या दररोज माझ्याकडे तक्रारी येत असतात. क्वचितच काही तक्रारी माझ्याकडे येतात. परंतु तक्रारी तर असतातच लाईट तर बंद होतात. हे तर नैसर्गिकच आहे. तर ४९९ रूपयामध्ये आपण १४ माणसे कामास ठेवु शकतो का प्रतिदिवसाच्या हिशोबाने?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-हे ठेकेदाराचे लोक आहेत?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-ठेकेदार, जे हे करत आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-जे प्रस्तावामध्ये होते की स्वीच चालु बदं करण्याकरिता एका स्वीचचे १० रू. होते. हे खर्चीक होते.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-आम्ही अेनर्जीचीही बचत करतो. त्याचा सुध्दा माझ्याकडे तपशिल आहे तो सुध्दा मी तुम्हाला देवू शकतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-हे काम जर महानगरपालिका करत असेल तर खर्च ऐवढा येईल?

______मा. सदस्य श्री. मनोज साधवानी ५. २७ वाजता सभागृहातुन बाहेर गेले.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-ठिक आहे साहेब?

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-मा. महापौर महोदया, विद्युत खांबांवर महानगरपालिकेने जे मक्युरी बसविलेले आहेत. त्याच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी ही महापालिकेची आहे की एम.एस.ई.बी. ची आहे? साहेब दोन दोन तीन तीन महिने तक्रारी देवून सुध्दा दुरूस्ती होत नाही.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-एम.एस.ई.बी. च्या पोलवर जर मक्युरी बसविला असेल तर त्याबाबत महापालिका व एम.एस.ई.बी यांची संयुक्त जबाबदारी आहे. आम्ही व एम.एस.ई.बी. मिळुन काम करतो. त्यामुळे एम.एस.ई.बी. कडुन आम्हाला बिलामध्ये सवलत मिळते. महापालिकेचा स्वतःचा पोल असेल तर आम्ही स्वतः दुरूस्तीचे काम करतो.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-महापालिकेच्या विद्युत विभागात तक्रार दिल्यानंतर सुध्दा दोन दोन, तीन-तीन महिने सुध्दा तक्रारींची दखल घेतली जात नाही.व त्याचे कारण सांगतात की, एम.एस.ई.बी. चा माणुस नाही तर ही जबाबदारी कुणाची आहे?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-साहेब आपण अशा प्रकारची तक्रार कधी मला दिली आहे?

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-आपल्या कार्यालयामध्ये तक्रार नोंदविलेली आहे. माझ्या स्वतःच्या प्रभागातील, मी स्वतः तक्रार नोंदविली आहे. एम.एस.ई.बी.च्या पोलवरील लाईट दोन दोन तीन तीन महिने दुरूस्त केली जात नाही. आता आताच पाच सहा दिवसापुर्वीच त्यांनी दुरूस्ती केली आहे. मी स्वतः एम.एस.ई.बी. च्या अधिका-यांना फोन करून त्यांचा कर्मचारी मागुन घेतला व त्याचेकडुन मी लाईटची दुरूस्ती करून घेतली.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-जर असे झाले असेल तर क्षमा करा. यापुढे असे होणार नाही. आपणाकडे माझा फोन नंबर आहेच दोन तीन दिवसामध्ये आपल्या तक्रारीची दखल घेतली नाही तर आपण मला फोन करा.

मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी, श्रीमती. दिपा पंजाबी यांनी ५. ३० वाजता सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-विद्युत विभागाच्या कामकाजाबाबत मी सांगु इच्छितो की, जेव्हा पण तक्रार केली जाते २४ तासाच्या आत दुरूस्तीचे काम केले जाते.

मा. सदस्य श्री. चिमण रूपाणीः-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आपल्या महापालिकेत हा एकच असा विभाग आहे की जो अधिक तत्परतेने काम करतो. व श्री. आयलानी हे सक्षम अधिकारी आहेत. ते तक्रारींची त्वरीत दखल घेतात.

मा. सदस्या श्रीमती. मीना सोंडेः-मी सुध्दा त्यांचे समर्थन करते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. चार लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत. पहिली लक्षवेधी सूचना, जे खाडाबदली वर सफाई कामगार नेमायचे होते. त्यांच्या अदयाप पर्यंत नमेणुका करण्यात आलेल्या नाहीत.

त्याबाबतची लक्षवेधी सूचना आलेली आहे. तिचे सूचक आहेत. श्री. गोविंदराम लुंड व अनुमोदक आहेत श्री. सतरामदास जेसवानी.

व दुसरी लक्षवेधी सूचना आहे. सिरु चौक ते ईएसआय हॉस्पीटलकडे जाणा-या रस्त्त्याचे काम गेल्या चार महिन्यापासून बंद का पडले आहे? या लक्षवेधीचे सूचक आहेत श्री. राजेश वदरीया व अनुमोदक आहेत श्री. दिलीप लालवानी परंतु त्यांनी ही लक्षवेधी सूचना मागे घेतली आहे.

तिसरी लक्षवेधी सूचना आहे शहरात डेंगुचा आजार पसरलेला आहे. त्यामुळे याबाबतची लक्षवेधी सूचना आणली आहे तिचे सूचक आहेत श्री. अशोक ठाकुर व अनुमोदक आहेत श्री. गौतम भालेराव त्याचबरोबर याच विषयाबाबतची दुसरी लक्षवेधी सूचना आहे तिचे सूचक आहेत श्री. राजेंद चौधरी व अनुमोदक आहेत श्री. लाल पंजाबी.

श्री. गोविंदराम लुंड व श्री. सतरामदास जेसवानी यांच्या लक्षवेधी सूचनेस स्विकृती दिलेली आहे. व दुसरी जी लक्षवेधी सूचना आहे श्री. अशोक ठाकुर व श्री. गौतम भालेराव यांच्या लक्षवेधी सूचनेस स्विकृत दिली आहे. एक लक्षवेधी सूचना मागे घेण्यात आली आहे. या दोन्ही लक्षवेधी सूचनांवर आपण आपला प्रस्ताव ठेवू शकता.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>एक लक्षवेधी सूचना मागे घेतली आहे. एक स्विकृत केली आहे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. राजेश वदरीया यांची लक्षवेधी सूचना मागे घेण्यात आली आहे. आपल्या लक्षवेधी सूचनेबाबत मी म्हंटलेले नाही. व एक आयत्त्यावेळीचा विषय सुध्दा आहे. मी काय म्हंटले की डेंगु आजाराबाबत दोन लक्षवेधी सूचना आलेल्या आहेत. एकाच विषयावर. व एक आयत्त्यावेळचा विषय आहे. अघोषित झोपडपट्टया घोषित करण्याकरिता उपायुक्त शहर यांना प्राधिकृत करणे व सदर कामाचे सर्व्हेक्षण अभिकर्त्यामार्फत करून घेणे करीता व या कामाकरिताचे खर्चास मंजुरी मिळणे बाबत. यास मा. महापौरांनी स्विकृती दिलेली आहे. परंतु आपणां सर्वांची अनुमती असेल तर चर्चेस घेतला जाईल. स्विकृती आहे सर्वांची? विषय सभेच्या कामात समाविष्ट केला जावा का?

<u>मा. महापौर:-</u>सदरचा आयत्त्यावेळीचा विषय आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत आहे.

## <u>पहिली लक्षवेधी सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे सफाई कार्यालयाचे सफाई कामगार सुटटीवर असतात, बरेचसे कामगार सुटटीवर असल्यामुळे सफाई कामात अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे जनतेमध्ये नाराजी उत्त्पन्न होत आहे. तरी त्यांचे सुटटीचे काळामध्ये काम करणेसाठी खाडा बदली कामगार नेमणुक करून काम करून घेणेसाठी महासभेत लक्षवेधी ठेवून चर्चा करणेबाबत विनंती आहे.

सुचक:- श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदक :- श्री. सतरामदास जेसवानी

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>कुणाची लक्षवेधी घेत आहात?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. गोविंदराम लुंड यांची....

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंडः-मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आम्हाला अतिशय दुःखाने म्हणावे लागत आहे की,दोन वेळा आपल्या महापौरानी आदेश दिला आहे की खाडा बदली वर सफाई कामगार नेमले जावेत. अदयाप पर्यंत खाडा बदली सफाई कामग्रारांच्या नेमणुका करण्यात आलेल्या नाहीत. शहरामध्ये दुर्गंधी पसरलेली आहे. व सफाई कामगार चार-चार, पाच- पाच दिवस सुट्टीवर जातात. प्रत्येक प्रभागात दररोज चार-चार, पाच-पाच कामगार कामावर नसतात. यासाठी या प्रश्नाकडे लक्ष दिले जावे. याबाबत मी महापौर व आयुक्त साहेबांना म्हणतो तर ते म्हणतात की, भडकवाड साहेबांकडे जा. श्री. भडकवाड म्हणतात श्री. लोणारेंकडे जा. अशी परिस्थिती आपल्या महानगरपालिकेत चालली आहे. या दोघांकडे आम्ही जावुन जावुन थकलो आहोत यासाठी आपणांस विनंती करतो की, प्रत्येक प्रभागात चार-चार, पाच-पाच कामगार नाहीत. किती लोक कामावर आहेत हे आपण पाहु शकता. म्हणुन यासाठी मी आपणांस विनंती करतो की त्वरीत खाडाबदली सफाई कामगारांच्या नेमणुका केल्या जाव्यात कारण की शहरामध्ये दुर्गंधी पसरून डेंगुचा आजार पसरेल. व त्यामुळे खुपच त्रासाचे होईल. व यापुढे सुध्दा मी आपणांस विनंती केली आहे की, अजुनही श्री. भडकवाड लोणारेंकडे पाठवतात व श्री. लोणारे श्री. भडकवाड यांच्याकडे पाठवितात. म्हणुन आपण या बाबींकडे जरा लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-आयुक्त साहेब, कृपा करून आम्हाला परिणाम दया. जे आपण आज सांगितले आहे. सर्व सदस्यांना आनंद सुध्दा झाला की पुढे चालुन आम्हा सर्व सदस्यांचा मान ठेवला जाईल. जे काम जनतेसाठी जरूरी आहे ते काम होईल. परंतु महापौरांनी आपणांस दोनदा आदेश दिले आहेत सर्व सदस्यांसमोर आपणही कबुल केले होते की मी लवकरात लवकर हे काम पुर्ण करेन हे काम पुर्ण का झाले नाही? कृपया याचा खुलासा करा. ज्या अधिका-यांनी यामध्ये विलंब केला आहे त्यास कृपया कमीत कमी एक रूपया तरी दंड करा. धन्यवाद.

मा. महापौरः-याबाबत आयुक्त साहेब यांनी निवेदन करावे,

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आम्हास बोलायचे आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-लक्षवेधीवर फक्त ज्यांनी मांडली त्यांनी आणि अनुमोदक यांनी बोलायचे आणि प्रशासनाचे निवेदन.

काही सदस्यः-असा काही नियम आहे.
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-नियम मी नाही सांगणार.
मा. महापौरः-आयुक्तांना बोलु दया.
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, ही जी लक्षवेधी येथे आणली आहे. व सन्माननिय सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांनी इथे जे निवेदन केले. ते खरे आहे की प्रशासनाकडुन याकामी विलंब झाला आहे. मी प्रशासनाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करतो व पुढील महासभेच्या अगोदर खाडाबदली सफाई कामगारांची नेमणुक केली जाईल ऐवढेच सभागृहाला आश्वस्थ करू इच्छितो. व याची जबाबदारी, आपण जे म्हंटलात की, एक दुस-यावर ढकलत आहेत. असे होणार नाही. आम्ही लवकरच त्यावर कारवाई करू.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-एक रूपयाचा दंड जरूर.

मा. महापौरः-आयुक्त साहेब, दोन महासभांमध्ये असे सांगितले जात आहे की पुढल्या महासभेच्या वेळेस खाडा बदली सफाई कामगारांच्या नेमणुका करू. या नेमणुका होतील किंवा नाही ते स्पष्टपणे सांगुन टाका. दहा दिवसात पंधरा दिवसात होतील किंवा नाही ते स्पष्टपणे सांगुन टाका. शहरामध्ये दुर्गंधी पसरत आहे. त्याकडे जरा लक्ष दिले तर आमच्या सदस्य लोकांसाठी बरे होईल. कारण

की कुणी चप्पल घेवून येतो तर कुणी शिवीगाळी करतो. कोण काय करत आहे. हे आपण तर पहात नाहीत. म्हणुन आपण लवकरात लवकर या बाबीकडे लक्ष घालुन खाडा बदली कामगारांना लवकरात लवकर कामावर घेतले जावे. जेणेकरून शहरातील दुर्गंधी दुर केली जाईल.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-महापौरजी, मी आयुक्त साहेबांकडुन हे जाणुन घेवू इच्छितो की, खाडाबदलीवर आपण किती सफाई कामगारांची भरती करू इच्छित आहात? व कायम सफाई कामगारांची सध्याची संख्या किती आहे. दुसरे असे की, जे लोक युनियनशी संबंधित आहेत. व ज्यांच्याबाबत उच्च न्यायालयाचे सुध्दा आदेश आहेत की या लोकांनी महानगरपालिकेत नगरपालिकेत ऐवढे ऐवढे दिवस काम केलेले आहे. त्यांना कायम पदावर सामावुन घेतले जावे. अशा कर्मचा-यांची संख्या किती आहे या सर्वांची सविस्तर माहिती दिलीत तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब मी हे विचारू इच्छितो की हा जो भयानक डेंगुचा आजार आहे ज्यामुळे...

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौरजी आयुक्त साहेबांनी आता सांगितले की पुढील महासभेत खाडाबदली सफाई कामगारांना घेतले जाईल. माझा असा अनुभव आहे की, या प्रकरणाबाबत आयुक्त साहेबांनी अदयाप काही अभ्यास केलेला नाही. अभ्यास केला आहे का? की या सफाई कामगारांना कसे कामावर घेतले जाईल काही लोक न्यायालयात गेले आहेत. न्यायालयातील त्यांची ती केस कुठपर्यंत आली आहे. ते पाहिले नाही असे मला वाटते. म्हणुन आपण जे उत्तर दिले आहे. त्याबाबत आपण आपल्या अधिका-यांना, विधी अधिका-यांना विचारून पहा. ते लोक न्यायालयात गेले आहेत का? न्यायालयामुळे आपणांस काही त्रासाचे होणार आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,जो न्यायालयाचा निर्णय आहे त्या अनुसरून आम्ही ही प्रक्रिया सुरू केली आहे. आता आमच्या आस्थापनेवर १,२८० सफाई कामगार काम करत आहेत. आमच्या शहरातील जी लोकसंख्या आहे तिच्या आधारावर पाहिले तर आम्हास ११०० पेक्षा जास्त सफाई कामगारांची आवश्यकता नाही. हे जे कामगार आहेत हे कायम स्वरूपी कामगार आहेत. व त्यामध्ये १५ टक्के खाडाबदली कामगार आहेत किंवा लिव्ह रिझर्व्ह सफाई कामगार असले पाहिजेत. आमच्या इथे कायम स्वरूपी सफाई कामगारांची संख्या ही आवश्यक असलेल्या सफाई कामगारांपेक्षा जास्त आहे. पंरतु त्यामध्ये अनुपस्थितीचे जे प्रमाण आहे ते ३० टक्यापेक्षा जास्त आहे. त्यामुळे १८७ हे कामगार आहेत त्यांना खाडाबदलीवर घेतले जाईल. ती जी लिस्ट आहे, न्यायालयाने जी लिस्ट दिलेली आहे त्यामध्ये जवळ जवळ ४००० पेक्षा जास्त सफाई कामगारांची नावे दिलेली आहेत. कोर्टाच्या आदेशानुसार, ज्यांनी महानगरपालिकेत याआधी काम केले आहे त्यांची सेवाजेष्ठता यादी तयार केली आहे. ती सेवाजेष्ठता यादी पहाता सुरवातीचे जे १८७ कामगार असतील त्यांना कामावर घेतले जाईल त्यातील काही लोक निधन पावले असतील किंवा दुसरीकडे कामास लागले असतील. ते लक्षात घेवून जे १८७ सर्वात जास्त सेवाजेष्ठ यादीत आहेत त्यांना खाडाबदलीवर कामावर घेतले जाईल. व या सर्व प्रक्रियेसाठी जी प्राथमिक प्रक्रीया आहे ती पुर्ण केली आहे. आता एक समिती किंवा निवड समिती जी असते ती स्थापन करून अशा कर्मचा-यांची कागदपत्रे किंवा त्यांचे याबाबतीतील दावे यांची शहानिशा करून त्यांना नेमणुक दिली जाईल.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-सफाई कामगारांची काही कायम पदे रिक्त आहेत. जेथपर्यंत माझी माहिती आहे अशी किती पदे आहेत? व आज पर्यंत ती का भरली गेली नाहीत?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आज आमच्याकडे जी मंजुर पदे आहेत ती मंजुर पदे जवळ जवळ १,५०० आहेत त्यापेक्षा जास्त आहेत. ती पदे जेव्हा मंजुर केली जातात त्यावेळी लिव्ह रिझर्व्ह करूनच ती मंजुर केली जातात. आमच्या महानगरपालिकेचे पुर्ण क्षेत्र, लोकसंख्या, रस्त्यांची लांबी, गटारांची लांबी हे सर्व लक्षात घेता जे नॉमर्स आहेत त्यांच्या हिशोबाने १२०० पेक्षा जास्त सफाई कामगारांची आवश्यकता नाही. परंतु अनुपस्थितीचे प्रमाण जास्त असल्यामुळे आम्हाला १५ टक्के पेक्षा जास्त लिव्ह रिझर्व्ह म्हणुन ठेवावे लागतील. ११०० पेक्षा जास्त कायम सफाई कामगार अगोदरच आमच्याकडे आहेत. त्यामधील बाकीचे जे लोक आहेत त्यांना तर कायम सफाई कामगार म्हणुनच गृहीत धरले जाईल. परंतु खाडाबदली कामगार म्हणुन त्यांची सेवा वापरली जाईल. आमचा हा सुध्दा एक प्रयत्न होता. आज या शहरात वर्षातील ३६५ दिवस सफाई होत नाही. एका आठवडयात जर लागोपाठ तीन दिवस सार्वजनिक सुटटीचे दिवस येत असतील तर सफाईचे काम पुर्णपणे बंद रहते. हा पण आम्ही प्रयत्न केला की, वर्षातील ३६५ दिवस काम व्हावे म्हणुन युनियन बरोबर आम्ही प्रथम वाटाघाटी केल्या. वाटाघाटी अयशस्वी झाल्यानंतर युनियनला नोटीस दिली गेली. त्यामध्ये सुध्दा औद्योगिक कलह निर्माण झाला. तो कलह अदयाप संपलेला नाही. या कलहाची सुनवाई जे सहाय्यक कामगार आयुक्त यांनी थांबविली आहे. तर मला असे वाटते की ३६५ दिवस सफाई करण्यासाठी पुर्ण विभागाची पुर्नरचना करावी लागेल. ती या महिन्यामध्ये पुर्ण होईल व हे सर्व १८७ खाडाबदली सफाई कामगार व जे कायम ११८० कामगार जे आहेत. त्यांचे वेळापत्रक तयार करून. त्यानुसार ३६५ दिवस सफाई करून घेतली जाईल.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-मा. आयुक्त साहेब, दस्तऐवजाच्या हिशोबाने उल्हासनगरची लोकसंख्या किती आहे? व प्रत्यक्षात आम्हाला असे वाटते की उल्हासनगरची जी लोकसंख्या आहे ती त्यापेक्षा दुप्पट आहे हे कोणत्या हिशोबाने ते जरा स्पष्ट करा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,२००१ ची जी जनगणना झाली त्यानुसार महानगरपालिकेची जनसंख्या ४, ७२००० ऐवढी आहे. या शहरात उदयोगधंदे जास्त असल्यामुळे फ्लोटींग पॉप्युलेशन जे आहे ते जर पाहिले तर या शहराची लोकसंख्या ६ लाखापेक्षा जास्त नाही व ही जी सहा लाख लोकसंख्या आहे ती सफाई कामगारांची संख्या निश्चित करण्यासाठी कधीच आधारभुत मानली जात नाही. जनगणनेचा जो आकडा आहे. तोच प्रमाणभुत मानला जातो. व येथे दुसरा जो निकष आहे. लोकसंख्या हा एक निकष आहे. व महानगरपालिकेचे क्षेत्र हा दुसरा निकष आहे. त्यानुसार पाहिले गेले तर आपल्याकडे पुरेसे सफाई कामगार उपलब्ध आहेत.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-मा. महापौरजी, उल्हासनगर महानगरपालिकेत असे काही कर्मचारी आहेत ज्यांना २.११.९६ रोजी कायम केले आहेत. परंतु अदयाप पर्यंत त्यांना नियमित केले नाहीत. त्या कर्मचा-यांना पण नियमित केले पाहिजेत ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,आता आम्ही प्रशासनामध्ये राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान जे सुरू करत आहोत. त्यानुसार कर्मचा-यांच्या आस्थापनेशी संबंधित ज्याकाही मागण्या आहेत त्या पुर्ण केल्या जातील. व आपण आमच्या समोर जो मुददा मांडला त्याबाबत उपायुक्त मुख्यालय हे योग्य ती कार्यवाही करतील.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढील लक्षवेधी सूचना श्री. अशोक ठाकुर, श्री. गौतम भालेराव, श्री. राजेंद चौधरी, श्री. लाल पंजाबी यांची आहे.

## लक्षवेधी सूचना

उपरोक्त विषयान्वये शहरात सध्या डेंग्युची साथ पसरत चालली आहे. यांचे मुख्य कारण म्हणजे शहरातील साफसफाई, कारण सफाई कर्मचारी कमी आहेत.

माझ्या प्रभागातील बंजारा कॉलनी, पवई चौक उल्हासनगर-३ मधील साडेतील वर्षाचा मुलगा शिवरात शंकर राठोड यांचा डेंग्यु आजाराने मृत्यु झाला त्याचप्रमाणे त्यांचा शेजारील एक मुलगा आजारी आहे. दुसरी एक वसीटा कॉलनीतील बॅ. नं.१२४२, रू. नं. १२ मधील पाच वर्षाची मुलगी आजारी आहे.

याबाबत आजच्या महासभेत चर्चा होणे आवश्यक आहे. आम्ही ही लक्षवेधी सूचना मांडत आहोत.

तरी आपणांस विनंती की शहरातील या गंभीर बाबीवर सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे.

कळावे हि विनंती.

सूचक :- श्री. अशोक ठाकुर
अनुमोदक :- श्री. गौतम भालेराव

## लक्षवेधी सूचना

उल्हासनगर शहरामध्ये डेंग्युचे रूग्ण आढळुन आले आहेत. त्यामधील काही रूग्ण मध्यवर्ती रूग्णालयात तर काही रूग्ण खाजगी रूग्णालयात औषधोपचारासाठी दाखल झाले आहेत. त्यामधील एका रूग्णाचा मृत्यु झाला आहे.

तरी महापालिका प्रशासनातर्फे जनजागरण उपचार व प्राथमिक उपचाराबाबत कोणती कार्यवाही केली आहे. यावर सविस्तर चर्चा महासभेत होण्यासाठी लक्षवेधी सूचना देत आहोत.

सूचक :- श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदक :- श्री. लाल पंजाबी

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आठ दिवसापुर्वी आमच्या प्रभागात तीन डेंगुग्रस्त रूग्ण आढळून आले. त्यामधील एक साडे तीन वर्षाचा एक मुलगा मृत्युमुखी पडला. डेंगुचा ताप काय आहे आणि तो कसा पसरतो. याचे उत्तर दिले जावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आपल्याकडे आरोग्य अधिकारी आहेत. आम्हाला चर्चा करायची आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः-प्रशासनातर्फे डेंगु का आला याची माहिती मिळु दे.

श्री. खरात (आरोग्य अधिकारी):-मा. महापौर महोदया, डेंगुचा ताप हा आजार वायरसने होणारा आजार आहे. या तापाचा प्रसार डास चावल्याने होतो. तीन प्रकारचे डास असतात. एक मलेरीया निर्माण करणारा, दुसरा हत्तीरोग व तिसरा डास डेंगुचा आजार पसरवतो. हा संसर्गजन्य रोग असुन एकाला झाल्यावर दुसरा होतो. या डासांच्या सवयी वेगवेगळया असतात. मलेरीया निर्माण करणेस डास हे पाण्यामुळे निर्माण होतात. दुषित पाणी आणि स्वच्छ पाणी. आज इथे विषय आहे. डेंगु तापाचा. जो डास हा आजार पसरवतो. या डासांची उत्पत्ती स्वच्छ पाण्यात देखिल होते जसे फुलदानीमध्ये आपण पाणी भरले असेल. सात दिवस जर त्यात तसेच ते साचुन राहिले त्या पाण्यामध्ये या डासांची उत्पत्ती होते. कुलर असतो, कुंड्या असतात जिथे स्वच्छ पाणी जमा होते. शहरात नारळाचे पाणी विक्री करणारे असतात. नारळाचे पाणी पिल्यानंतर जो रिकामा नारळ असतो तो आपण कुठेही फेकतो. या नारळात जर पावसाचे पाणी जमा झाले त्यात या डासांची

निर्मीती होते. गॅरेजमध्ये रिकामे टायर असतात, कित्येक गल्यांमध्ये लहान मुले टायर खेळत असतात, या टायरमध्ये जे पाणी जमा होते त्या पाण्यामध्ये या डासांची निर्मीती होते. व हे डास कुणा माणसाला चावतात तेव्हा त्या माणसाला संसर्ग होवून ॲटेक होतो व डेंगु होतो. आणखी एक कारण यामध्ये आहे ते म्हणजे घरात आपल्या टाकीमध्ये किंवा कोणत्त्याही भांड्यात सात दिवसापर्यंत पाणी भरून ठेवतो व तेच पाणी वारंवार वापरतो त्यात पाण्याची भर घालतो तिथे देखिल डासांची निर्मीती होते.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब मी आरोग्य अधिकारी यांना विचारू इच्छितो की, सफाई कामगारांच्या कमतरतेमुळे शहरात इतस्त्र घाण आहे. संडासांची सफाई होत नाही. शौचालये तुटलेली आहेत, जागोजागी कच-यांचे ढीग आहेत. नाल्या साफ होत नाहीत. त्यामुळे पुढे जावुन किंवा आता शहरात कोणते आजार पसरू शकतात. त्याला जबाबदार कोण?

<u>श्री. खरात (आरोग्य अधिकारी):-</u>मी आताच सांगितले की डेंगु तापाचे जे डास आहेत. ते स्वच्छ पाण्यात देखिल होवु शकतात. असेच घाण पाण्यात जे डास ब्रिड करतात. त्यांना क्युलेटस म्हंटले जाते. आता मी सांगितले हत्ती रोग हा आजार होवू शकतो. परंतु आमच्या ठाणे विभागाचे जे क्षेत्र आहे. त्यामध्ये फक्त वसई बेल्ट जे पोस्टल बेल्ट आहे. त्याच पटट्यात हे आजार आहेत. आमच्या उल्हासनगर, ठाणे, कल्याण या शहरात हत्ती रोग हा आजार कॉमन नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-</u>याच्यावर उपाय काय ते सांगा ना?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, हे जे त्यांनी सांगितले डेंगुचा आजार कशामुळे होतो. प्रसार कुठून होतो. मी यांना विचारू इच्छितो की डेंगु शहरात झाला हे माहित पडल्यावर आपण त्या परिसरात जावून स्वत: पहाणी केली. तिथे काय काय अशा वस्तु आढळल्या, काय काय पहाणी केली. एकाच क्षेत्रात तीन तीन डेंगुचे रूग्ण पाहिले. ते रूग्ण पाहिल्यानंतर आपण काय केले? व शहरात इतर काय पाऊले उचलली ते जरा आम्हास सांगा.

<u>श्री. खरात (आरोग्य अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, १० तारखेला सायंकाळी ५ वाजता सूचना मिळाली. खाजगी दवाखान्यातुन की या ऐरीयात तीन प्रकरणे डेंगुची आहेत व खाजगी लॅबमधुन त्यांचा रिपोर्ट आला आहे. अर्ध्या तासात म्हणजे साडे पाच वाजता आम्ही तिथे पाहेचलो. १० तारखेला संध्याकाळी तेथिल परिक्षण केले. येथील काही सन्माननिय नगरसेवक पण आमच्या सोबत होतोच. त्यांच्याबरोबर तेथील सर्व्हे केला. जनतेला सूचना दिल्या की काय केले पाहिजे काय नाही केले पाहिजे. दुस-या दिवशी ठाण्यामध्ये जे मलेरियाचे मुख्य कार्यालय आहे. तेथुन एक विशेष टीम बोलावली. ज्या टिमने घराघरात जावुन सर्व्हे केला. त्याचा अहवाल आता माझ्या हातात आहे. त्यांनी नमुना म्हणुन वसिटा कॉलनीचा सर्व्हे दिला आहे. १३ घरांमध्ये त्यांनी सर्व्हे केला. त्यापैकी पाच घरात त्यांना हे जे डेंगुचे डास आहेत. या डासाच्या अळया पाण्यामध्ये घरामध्ये आढळल्या त्यांनी एकुण ३५ बॅरल त्यांनी निरिक्षण केले त्यापैकी सहा बॅरलमध्ये या अळया आढळल्या. व त्याचा अहवाल त्यांनी पाठवला आहे.  याचा अर्थ हाच आहे की या एरीयात घरा-घरात लोक बॅरल मध्ये किंवा फुलदानीमध्ये पाणी भरून ठेवतात. एका फुलदानीत देखिल हे कीडे मिळाले आहेत. त्याचा सुध्दा अहवाल इथे आला आहे. त्यानंतर दुस-या  दिवशी आम्ही घरोघरी सर्व्हे केला. आरोग्य यंत्रणा नाही म्हणण्यासारखीच आहे. शासनाच्या कर्मचा-यांवर आपण अवलंबुन आहोत. शासनाच्या कर्मचा-यांना सोबत घेवून सर्व्हे चालु केले आहे. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ३२,७८० घरे सर्व्हे केली. घरात जावुन त्यांना सूचना दिल्या आहेत की काय केले पाहिजे. पाणी साचवुन नाही ठेवले पाहिजे. त्यातुन कसे संरक्षण करायचे १,६३,९०० लोकसंख्या कवर केली आहे. त्यापैकी ७९३ तापाने आजारी होते. त्यांचे रक्त आम्ही तपासणीसाठी घेतले आहे ते ठाणे येथे मलेरीया ऑफीसरकरडे पाठवले आहे. आम्हाला जे डेंगुग्रस्त जे वाटत होते ११ मधुन दोन केस या विभागाचे नाही. एक मुरबाड, एक अंबरनाथ येथील आहेत. अशा ११

रूग्णांचे रक्त आम्ही डेंगु आहे की नाही हे माहिती करण्यासाठी आपली जी राष्ट्रीय संस्था जी पुण्यामध्ये आहे. त्यांना १२ तारखेलाच पाठविले आहे. त्याचा रिझल्ट आम्हाला उदयापर्यंत मिळेल अशी आशा आहे मी सकाळीच त्यांच्याशी बोललो आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:</u>-मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सहयोगी, ही जी गोष्ट आहे डेंगु ताप आला असा अहवाल आहे. त्यानंतर आपण झोपेतुन उठतो. नंतर सर्व्हे करणे वगैरे, वगैरे हे शहरात होते. आधी असे झाले होते. कॉलरा पसरला होता. तशा केसेसची माहिती मिळाल्यानंतर झोपेतुन उठल्यासारखे उठलो सर्व्हे केला. असे का होते परंतु असे म्हणतात की प्रीव्हेंन्शन इज बेटर दॅन क्युअर महापालिका आरोग्य विभाग का स्थापन करते. की या प्रकारचे आजार या शहरात येवूच नयेत. तर पहिला जो मुददा असतो तो म्हणजे प्रीव्हेंन्शन ते महापालिकेतर्फे होत नाही. जे प्रीव्हेंन्टीव्ह मेजर आहे ते आपल्या इकडे कधी होते का? मलेरीया व डेंगु सारखे फिवर होतात. अनफॉरच्युनेट थिंग आहे. एका ऐरीयात एक मुलगा वारला त्यानंतर दोन तीन डेंगुचे रूग्ण आढळले. त्यानंतर तुम्ही सांगितले की मलेरीयाचा ताप एक वर्षात त्याच्या किती केसेस शहरात होतात. दुसरे आजार किती होतात. आरोग्य अधिकारीचे काम असते की शहरातील स्वास्थ्य टिकुन कसे राहिल याकडे लक्ष देणे. शहरातील आजाराविषयी प्रिव्हेंन्टीव्ह मेजर्स असतात. हे आजार थोपविण्यासाठी ज्या जंतुनाशकाचा उपयोग झाला पाहिजे. किटकनाशकांचा उपयोग झाला पाहिजे. आम्ही आज पर्यंत आमच्या शहरात जर कोणी महत्त्वाची व्यक्ती आली बाहेरून तेव्हा फक्त आम्ही चुना पावडर रस्त्त्यावर टाकतो. याचा जो वापर होतो. पेस्टींग साईडचा तो केला जात नाही. ते पहाणे आरोग्य विभागाचे काम नाही का? खुपशा गोष्टी पाहील्या पाहिजे. प्रीव्हेंन्टीव्ह मेजर आमच्या शहरात अजिबात नाही. त्याबाबतीत त्यांनी लक्ष दिले पाहिजे व त्यामध्ये जास्त काळजी घेतली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:</u>-मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, दरवर्षी या उल्हासनगर शहरामध्ये कुठला ना कुठला रोग येतो. मला वाटते गेल्या चार-पाच वर्षापासुन बघतो. प्रत्त्येक वेळेस कुठे कॉलराची साथ आलेली आहे आता ही नविनच साथ ऐकली डेंगुची. डेंगु आम्हालाही काही माहिती नाही परंतु पेपरमध्ये ज्या बातम्या येतात त्यावरून तो फार मोठा भयानक रोग किंवा साथ या शहरामध्ये आलेली आहे. आणि जेव्हा अशी साथ शहरामध्ये येते. तेव्हा या शहराचे नाव या संपुर्ण राज्यामध्ये खराब होते. उल्हासनगर शहर हे एक गलिच्छ शहर म्हणुन ओळखले जावु शकते आणि म्हणुन ही साथ रोकणे सर्वात पहिल्यांदा या महानगरपालिकेचे काम आहे असे मला वाटते. श्री. खरात साहेबांनी सांगितले डेंगु नेमका कशामुळे होतो. त्यांनी ज्या पध्दतीने सांगितले त्या पध्दतीत मला असे वाटते की या सर्व साथीला जबाबदार आपले आरोग्य विभाग, महानगरपालिकेचा विभाग असे मला वाटते. साफसफाईची समस्या सोडविण्यासाठी किंवा या डेंगुवर मात करण्यासाठी आयुक्त साहेबांनी युध्द पातळीवर एक कुठला विशिष्ठ कार्यक्रम जर राबविला साफसफाईच्या संदर्भात नेहमीची साफसफाई चालुच आहे. परंतु एक विशिष्ट असा युध्द पातळीवर कार्यक्रम राबविला तर मला वाटते त्यावर मात करता येईल. दुसरी गोष्ट जसे साफ सफाई नसल्यामुळे डेंगु होवू शकतो. तसेच पाण्याच्या समस्येमुळे डेंगु होवू शकतो असे मला वाटते. याचे कारण असे आहे की ज्या ज्या विभागामध्ये पाणी आपण नळाव्दारे पोहचवु शकत नाही. किंवा गटारी मधुन जाणा-या लाईमध्ये घाण पाणी येते. तसेच टॅकरव्दारे जे तुम्ही पाणी देता. त्या टॅकरची पण स्वच्छता आणि टॅकरचे पाणी जे जे लोक वापरतात त्या त्या लोकांच्या वापराची साधने त्याच्यामुळे मला वाटते डेंगु व्हायला काही हरकत नाही. कदाचित श्री. खरात साहेब याचे उत्त्तर देतीलही परंतु आयुक्त्तांना मी विनंती करेन की, याच्यावर आवर घालण्यासाठी त्त्वरीत एक बजेट प्रोव्हीजन करणे. आणि एक विशिष्ठ ठराविक युध्द पातळीवरचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. आणि तो त्यांनी अंमलात आणावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सन्माननिय महापौरजी, आज या सभागृहामध्ये डेंगुच्या विषयावर एकाच वेळेला दोन लक्षवेधी सूचना आल्या आहेत. आरोग्य अधिकारी यांनी सांगितले आहे की डेंगुची रूग्णे एकाच विभागात आहेत. माझी माहिती अशी आहे की, मी खाजगी रूग्णालयामध्ये गेलो होतो. साई आशिष मध्ये, सेंट्रल हॉस्पीटलमध्ये गेलो होतो तिथे जे जे रूग्ण होते. त्यांचे पत्ते घेतले. सर्व रूग्ण हे स्लम विभागातील आहेत. स्लम विभागाकडे आयुक्तांनी जास्त लक्ष दिले पाहिजे. आयुक्त जाणुन बूजुन स्लम विभागाकडे जास्त लक्ष देत नाही असा माझा आरोप आहे. जो हक्काचा, मागच्या वर्षाचा ५ टक्के निधी विकर सेक्शनचा तो मागच्या वर्षीच व्हायला पाहिजे. पण दुसरे वर्ष अर्धे संपले तरी आयुक्त महोदय अजुन त्या विभागामध्ये काम करत नाहीत. त्यामागचे कारण काय? मघाशी सभागृह नेते यांनी सांगितले . मान्यच्या जागी अमान्य लिहिले. खरी गोष्ट आहे का ही, सत्त्य परिस्थिती आहे का? मान्य केले नंतर अमान्य केले. जर असे असेल तर डेंगुला जबाबदार आपण आहात. जर स्लम विभागाकडे आपले जाणुन बूजुन दुर्लक्ष होत असेल.

**मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी यांनी ६. ०५ वाजता सभागृहात प्रवेश केला.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-हरकतीचा मुददा आहे. मा.महापौर महोदया, या विषयावर मी जास्त बोलु इच्छित नव्हतो. कारण की हा एक आजार आहे आणि आजाराबाबतीत डॉक्टरच चांगल्यात-हेने माहिती देवू शकतात. म्हणुन मी त्यांना माहिती दयायला सांगितली. ३० तारखेला पहिली डेंगुग्रस्त केस खाजगी रूग्णालयात दाखल होते. ३० ऑगस्टला नंतर जेव्हा १० सप्टेंबरला एकाचा मृत्त्यु होतो त्यावेळी खाजगी दवाखान्याचे डॉक्टर येवून आमच्याकडे अहवाल देतात. व ३० तारखेला आमच्याकडे रिपोर्ट आल्यानंतर अर्ध्या तासाच्या आत माझी पुर्ण टिम, एम.ओ. एच. डेप्युटी कमिशनर पब्लिक हेल्थ, सी. एस. आय. वार्ड ऑफिसर सर्वांना कामाला लावुन दोन महत्त्वाच्या गोष्टी आम्ही केल्या जेथुन डेंगु रूग्ण आढळल्याचा अहवाल आला होता. त्या पुर्ण विभागात फॉगिंग ॲण्ड क्लीनींग ऑपरेशन सुरू केले. तुम्ही जे बोलत आहात की, खाजगी दवाखान्यात डेंगुचे रूग्ण आहेत. तेथील पुर्ण ऐरियाचा सर्व्हे करून ३२००० घरांचा सर्व्हे करून १,६३७०० लोक कवर केली. आपण बोलत आहात की डेंगुला जबाबदार मी आहे. बॅरलमध्ये पाणी जर सात दिवस साठवुन ठेवतात. मी हे मानतो की पाण्याच्या टंचाईमुळे ते साठवुन ठेवतात. पंरतु बॅरमध्ये सात दिवसापेक्षा जास्त दिवस पाणी ठेवणे व त्यामुळे डेंगुसारखा आजार पसरू शकतो याची माहिती नागरिकांना असुन देखिल हे होते. डेंगुची पहिली केस ३० ऑगस्टला आढळुन देखिल जेव्हा मृत्त्यु होतो तेव्हा खाजगी दवाखान्याचे डॉक्टर आमच्याकडे रिपोर्ट करतात. त्यांची ती जबाबदारी आहे. तर त्याबाबतीत त्वरीत माहिती महापालिकेला दिली पाहिजे. तरी पण आम्ही आमची जबाबदारी टाळली नाही. डेंगु ज्या त-हेने डासामुळे होतो. डासांच्या नियंत्रणासाठी महापालिकेकडे काहीही साधन नाही. कारण की राज्य शासनाचा मलेरियासाठी विभाग वेगळा आहे. जे डीस्ट्रीक्ट मलेरिया नियंत्रणाखाली येतो. तेथे सुध्दा जे लोक काम करतात त्यावर महापालिकेचे काही नियंत्रण नव्हते. ते काम तिथे होते. आम्ही आमची जबाबदारी टाळत नाही परंतु कुणी जर असे बोलले की या डेंगुला आयुक्त जबाबदार आहे तर त्या गोष्टीला मी अजिबात मानत नाही. हा एक राजनैतिक हेतुने प्रेरीत आरोप आहे. असे मला स्पष्टपणे म्हणायला काही वाटत नाही. कारण की अशा विषयामध्ये जर असे आरोप करू लागलात. लोकांनी शुध्द पाणी साठवुन ठेवल्यामुळे डेंगु झाला आहे. या शहरात नेहमी पावसाळयात वॉटर लॉगिंगचा खुप प्रॉब्लेम होता. मी विभागाचे नाव नाही सांगु इच्छित. या पुर्ण वर्षात पावसाळयामध्ये कुठे किती पाऊस झाला. व यानंतर शहरात कुठेही वॉटर लॉगिंगचा प्रॉब्लेम झाला नाही. या शहरात गॅस्ट्रो, कॉलरा, लॅप्टोपायरॅसिस दरवर्षी येणारा आजार होता. यावर्षात कॉलरा, गॅस्ट्रोची एक केस तरी दाखवा. तर मी जबाबदार राहिल. परंतु हा डेंगुसारखा आजार झाला आहे आता तो फक्त उल्हासनगरमध्ये नाही झाला. मी आपल्या माहितीसाठी संख्या सांगतो. कारण की मी उपसंचालक यांच्या कार्यालयात संपर्क साधुन माहिती मिळविली आहे.

ठाण्यामध्ये ३२ केस आहेत. कल्याणमध्ये १६ केस झाल्या आहेत व उल्हासनगरमध्ये आजपर्यंत ६ केसेस दाखल झाल्या आहेत. मला काही असे वाटत नाही की उल्हासनगरमध्ये इतरांपेक्षा कमी केसेस झाल्या. एकही केस येथे झाली नाही पाहिजे. ही जबाबदारी मी मलेरीया विभागावर नाही तर तुम्ही म्हणता त्याप्रमाणे प्रशासनाचा प्रमुख म्हणुन मी ही जबाबदारी स्विकारतो आहे. परंतु गलिच्छ वस्तीत काम नाही झाले म्हणुन डेंगु झाला हा आपला आरोप मला मान्य नाही. स्लमचे काम कोणते, सी.सी. पॅसेज करून जर डेंगु थांबत असेल तर मी प्रत्येक स्लममध्ये सी.सी. पॅसेज करून देतो. नाली रिपेअर करून जर डेंगु थांबु शकतो तर मी तुमच्या प्रभागातील नाल्या, सी.सी. पॅसेज रिपेअर करून देतो. दिवाबत्ती लावुन जर डेंगु थांबत असेल तर ते पण मी करेन. तुमचे जितके पण प्रस्ताव आहेत मी करून देतो. परंतु जर तुम्ही फक्त आरोप करायचे म्हणुन करत असाल तर माझ्यासारखा संवेदनशिल व्यक्ती हे कधीच सहन करणार नाही. माझी आपणांस विनंती आहे.की कोणताही आरोप करण्यापुर्वी तुम्ही हे पहा की आम्ही काय केले आहे. अदयाप पर्यंत पावसाळा संपला नाही म्हणुन मी अजुन पर्यंत क्लेम पण नाही केला की वॉटर लॉगिंग झाले नाही. मी असे पण नाही म्हंटले की कॉलरा झाला नाही. परंतु आजपर्यंत काय होत होते. आणि आज काय परिस्थिती आहे. मी असा पण नाही दावा करत की आम्ही खुप काही केले आणि खुप बदल झाला आहे. परंतु आम्ही प्रयत्न करत आहोत. निदान इतके तर कमीत कमी माना. आम्हाला जबाबदार म्हणण्यापुर्वी आमच्यावर जबाबदारी ढकलण्यापुर्वी आपण हा तर विचार करा की या शहरात ऐवढे डॉक्टर आहेत. ३० तारखेला जर अहवाल मिळाला असता. तसे जर पाहिले गेले तर वास्तविक मी थांबायला पाहिजे होते. तोपर्यंत जोपर्यंत राज्य शासनाची जी प्रयोगशाळा आहे त्यांचा रिपोर्ट जोपर्यंत येत नाही तोपर्यंत मी हेच म्हणायला पाहिजे होते इकडे डेंगु नाही. एका खाजगी रूग्णालयाच्या रिपोर्टवर विश्वास ठेवुन एखादा खाजगी डॉक्टर रूग्णाचा मृत्यु झाल्यानंतर येतो सांगतो त्यावर विश्वास ठेवुन अर्ध्या तासाच्या आत आम्ही आमची कार्यवाही सुरू केली ही काय आमची चुक आहे? आतापर्यंत माझ्याकडे कायदेशिर असा शासनाच्या प्रयोगशाळेचा रिपोर्ट नाही. ते नसताना देखिल हा आजार जास्त पसरू नये. यासाठी आम्ही त्वरीत पाऊले उचलली. आमचे आरोग्य अधिकारी जे आहेत श्री. डॉक्टर खरात त्यांची मी प्रशंसा करू इच्छितो. व त्यांना धन्यवाद देखिल देवू इच्छितो की इतक्या कमी वेळात एका आठवडयाच्या आत ३२ हजार घरांचा सर्व्हे केला. ७९३ जे तापग्रस्त होते. त्यांचे रक्त तपासणी केली गेली. ते रक्त तपासणीसाठी पाठविले गेले. ऐवढे सर्व करून देखिल जर तुम्ही असा आरोप करत असाल तर मी मान्य करतो परंतु मी तुमच्या मताशी सहमत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. संगिता जावळे:-</u>मा. महापौर महोदया, उल्हासनगर शहरामध्ये डेंगुची जी लागण झालेली आहे व पाण्याचा प्रश्न पण माझा त्याच्याशी संबंधित आहे. तीन-चार महिने झाले इतके दुषित पाणी आमच्या प्रभागात येत आहे. म्हणजे मी जिथे राहते तिथे. ते पाणी मी बाटलीत भरून आयुक्तांना दाखवायला गेले होते. पण तेव्हा ते स्वच्छता निरिक्षक यांच्या बैठकीत बीझी होते. आणि परत आठ दिवसांनी मी गेले तेव्हा साहेब म्हणाले की आठ दिवसानंतर मी निर्णय देतो. तर अदयाप काही निर्णय आलेला नाही. आणि दिड वर्ष झाले प्रभाग समितीमध्ये मी ओरडते आहे पाण्याच्या निधीसाठी. पहिला निधी लॅप्स झाला आणि दुसरा निधी पण लॅप्स होण्याची शक्यता आहे. तर हे काय राजकारण आहे. दरवेळेस आम्ही पत्र देतो आणि ते हरवतात. कसे काय हरवतात ते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>मा. महापौरजी, डेंगुच्या विषयावर लक्षवेधी आणल्याने चर्चा झाली. त्यावर आरोप प्रतिआरोप झाले. त्याच्यात उत्तर दिले. आयुक्त साहेबांनी उत्तर दिले डेंगुसाठी काय काय उपाययोजना केल्या. तर साहेब त्याचे कारण काय? हे जे रूग्ण आहेत मी स्वत: जावुन बघितले झोपडपटटी भागातील आहे. २ शास्त्रीनगर येथील, ३ वसीटा कॉलनी, २ धोबी

घाट येथील आहेत. ते स्लम ऐरीयाचे जाणुन बूजुन जर काम न केल्याने डेंगु नसेल होत पण दुसरा रोग जरूर होतो. याची पण आपण काळजी घ्या. आणि आताच सभागृह नेत्यांनी सांगितले मान्य असते तिथे अमान्य केले जाते. तिथेच काय तुमचे ऐवढे हे झाले होते. की बाबा नाही मोठा डोंगर कोसळणार होता ती कामे केल्याने. तरी.....

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मान्य लिहुन अमान्य करणे ही माझी वृत्ती नाही. जे काम मला वाटले जरूरी नाही. त्यासाठी निधी नाही. ते काम आम्ही आधी कमिटी नेमुन मी स्वतः एकट्याने निर्णय नाही घेतला की हे काम करायचे नाही. मी तीन अधिकारींची समिती स्थापन केली त्यांना त्याजागी पाठविले कारण येथे नेहमी एकच तक्रार येते. की गरज नसताना देखिल कामे प्रस्तावित केली जातात. कामाचा दर्जा चांगला नसतो. जिकडे गरज आहे तिकडे काम होत नाही. व जिकडे गरज नाही तिकडे काम होते. यासाठी मी तीन अधिकारींना फिल्ड विझिटसाठी पाठविले व ८४ लाखाचा प्रश्न होता. ८० लाखापेक्षा जास्त रक्कम खर्च करून जर शहराला त्याचा उपयोग होत नसेल तर खर्च करून काय उपयोग ही माझी जबाबदारी आहे की एक रूपया जर महानगरपालिकेच्या निधीतुन खर्च झाला तर तो योग्य कामासाठी झाला पाहिजे. ते जर चुकीचे आहे की मी समिती नेमली जागोजागी विझीट दयायला सांगितली. कामाची गरज आहे की नाही ते पाहिले. व नंतर निर्णय घेतला जर ते चुकीचे आहे तर माझी चुक आहे. परंतु ते केल्यानंतर मी काम थांबविले नाही. मागील महासभेत मी आश्वासन दिले होते की, आम्ही ते काम करू त्याला मंजुरी आम्ही दिली आहे. कमीत कमी पाच कामे आम्ही मंजुर केली आहे. एक काम सुरू झाले आहे. असे नाही की नुसते बसुन आहोत. मी हे म्हंटले आहे की पाच कामांना मंजुरी दिली आहे आणि एक काम सुरू झाले आहे ही माझी माहिती आहे. मी पाच म्हंटलो त्यापासुन मागे होणार नाही. आजची परिस्थिती तर मी माहिती करून घेतली नाही ते पण मी तुम्हाला पुढच्या महासभेत सांगेन की १९ तारखेपुर्वी आम्ही किती कामांना मंजुरी दिली.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सांगणार केव्हा डेंगु झाला हे पण महासभेत, डेंगुवर उपाययोजना केल्या हे पण महासभेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>महापौर महोदया, याठिकाणी आयुक्त साहेबांनी राजकारण होते आहे असा एक आरोप आमच्या विरोधी पक्षनेत्त्यांवर केला आहे. मी याठिकाणी यांच्या निर्दशनास आणुन देवू इच्छितो की आमचे सन्माननिय सदस्य विरोधी पक्षनेते श्री. राजेंद्र चौधरी यांनी राजकारण न करता वेळोवेळी आपल्या निर्दशनास आणुन दिले आहे की, स्लमचे जे काम गेल्यावर्षापासुन जे होत नाही ते आपल्या लक्षात आणुन दिल्यांनतर देखिल आपण ते का करत नाही. त्यासाठी याठिकाणी बोलले नंतर सन्माननिय आयुक्त सोनवणे साहेब यांनी आरोप केलेले आहेत त्यांच्यावर मी याठिकाणी आरोप करू इच्छितो तो फक्त आरोप नसुन आपल्याच काही अधिका-यांनी मला ही गोपनीय बातमी दिलेली आहे. ते मी याठिकाणी न बोलण्याचे ठरविले होते परंतु आपण आमच्यावर राजकीय आरोप केला आहे तो आरोप खोटा आहे तो कसा सिध्द होईल हे मी आपणांस सांगु इच्छितो. आपण जी समिती स्थापन केली होती. या समितीचे अधिकारी माझ्या प्रभागात गेले होते. त्यांनी आपल्याला येवून रिपोर्ट चांगल्या पध्दतीने दिला आहे की, ३ नंबर प्रभागामध्ये तानाजी नगर , कमला नेहरू नगर, शिवनेरी नगर , हनुमान नगर याठिकाणी स्लम विभागात काम करण्याची अत्यावश्यकता आहे. नागरी व्यवस्था कोलमडलेली आहे. कित्त्येक लाईनी लिकेज आहेत. बाहेरून ओपनली सर्व ड्रेनेज वाहत आहे. संडास वाहत आहे याशब्दामध्ये मला आता याठिकाणी बोलावे लागणार आहे तर अशा घाणेरडया परिस्थितीमध्ये अशा वातावरणामध्ये नागरिक त्याठिकाणी तानाजी नगर येथे राहत आहेत. धोबीघाट, कमला नेहरू नगरमध्ये राहत आहेत तर यापासुन डेंगु होवू शकत नाही का? इतर आजार होवू शकत नाहीत का? हा चांगला रिपोर्ट दिल्यानंतरही तुम्ही

जाणुनबूजुन आमच्या प्रभागामध्ये काम करू इच्छित नाहीत. तुम्ही आम्हाला वेठीस धरत आहात. असा आमचा याठिकाणी आरोप आहे. तुमचे काय म्हणणे आहे ते सांगा. तुम्ही का नाही स्लम ऐरीयामध्ये आमचे काम सुरू करत? तुमच्या टिमवर्कनी तुम्हाला रिपोर्ट दिला आहे. स्लमची कामे सुरूवात करा. तुम्ही त्यांना सांगता की रिपोर्ट सांगु नका, देवु नका. तुमचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता देखिल सांगतात साहेब आम्ही काय करणार आयुक्त साहेब काम करत नाही. हे तुमच्या अधिका-यांचे आरोप आहेत माझे आरोप नाहीत. आणि तुम्ही आमच्यावर आरोप करता की, तुम्ही राजकारण करता येथे. येथे आल्यापासुन तुम्ही राजकारण करता याठिकाणी. तुम्ही जबाबदार आहात या डेंगुला.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण हे ६.१६ वाजता सभागृहातुन बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>नाही. नाही. हे चुकीचे आहे मेहरबानी करून मा. महापौरजी, जे पण इथे बोलायचे आहे ते डेंगुवर बोलावे आरोपावर आरोप काय लावत आहे. हे काय आहे. अशी महासभा चालते का? काय राजकारण आहे? डेंगुच्या विषयावर आयुक्तांनी ऐवढे चांगले उत्तर दिले आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>तुमच्या प्रभागात सिमेंटचे रस्ते बांधले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आयुक्त साहेब जे सांगतात ते ऐकत नाही. राजकारण कसले राजकारण आहे.

<u>मा. महापौरः-</u>कृपया श्री. हरदास माखिजा यांना बोलु दिले जावे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>जे काही बोलायचे आहे ते मुददेसुद बोला. आपण कामाची गोष्ट करा ना. राजकारण कसले आहे? त्यांनी ठाण्याचे, कल्याण डोंबिवलीचे उदाहरण दिले. एखादया गोष्टीची हवा बनवतात. असे काय बोलता तुम्ही. काही बोलणार का तुम्ही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u>मी सर्व सदस्यांना सांगते की खाली बसा. श्री. हरदास माखिजा यांना बोलु दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी याविषयावर बोलणार होतो मघाशी पण श्री. गायकवाड साहेब उठले. व श्री. बोडारे साहेब म्हणत होते की सभागृह नेता यांना बोलु दया. पण मी म्हंटले श्री. गायकवाड साहेबांना बोलु दया त्यानंतर मी बोलेन. आज इथे जो विषय आहे डेंगुबाबतचा आहे. यामध्ये लहान मोठ्या तीन चार जणांचा मृत्यु झाला आहे त्यासाठी सर्व पक्षात दुःख आहे. त्यासाठी राजकारणाचा काही प्रश्न नाही की आम्ही नाराज नाही झालो. आपण नाराज आहात. प्रत्येक सदस्य सदस्या, अधिकारी सर्व नाराज आहेत. सर्वांना दुःख झाले आहे म्हणुन आम्ही सर्वप्रथम त्यांना श्रध्दांजली दिली. आज आमच्या आयुक्त साहेबांनी जे म्हंटले त्याचा खुलासा करू इच्छितो. श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी जेव्हा दोन प्रकरणे कॉलराची झाली. पुर्ण उल्हासनगर कॉलराग्रस्त जाहिर केले होते. संपुर्ण महाराष्ट्राच्या वर्तमानपत्रात आले. पुर्ण उल्हासनगर शहराचे नाव बदनाम झाले होते. मी अंबरनाथ येथे एसीपी साहेबांकडे बैठक चालु होती तिथे गेलो होतो. ते म्हणाले

की तुमच्या उल्हासनगरमध्ये तर मलेरिया, डेंगु सर्व होते. ठाण्याला गेलो सीपी ऑफीसमध्ये बैठकीमध्ये तर तिकडे पण म्हणत होते आमच्या येथे कधी येतो का आजार. देव करो कोणत्त्याही महापालिकेत असे आजार येवू नये. मलेरीया, कॉलरा, डेंगु परंतु आज ठाणे, कल्याण, डोंबिवली देखिल यापासुन बचावले नाहीत. ते पण दुधाने न्हालेले नाहीत आमच्यावर आरोप करतात. उल्हासनगरमध्ये फक्त कॉलरा होतो, डेंगु होतो सर्व ठिकाणी होवू लागला आहे. परंतु आमच्या आरोग्य अधिकारी यांनी सूचना दिल्या त्यावर कोणी लक्ष दिले नाही. त्यांनी सांगितले की उल्हासनगरवासी शहाळे पितात. ते जे रिकामे शहाळे फेकले जाते त्यामध्ये पावसाचे पाणी साचते त्यामुळे डेंगुची निर्मीती होते. त्यांनी दुसरे हे देखिल सांगितले की चांगले पाणी जास्त दिवस साठवुन ठेवल्यामुळे, तिसरे सांगीतले की घरात जी झाडे असतात त्याला जे पाणी दिले जाते त्यात पण पावसाचे पाणी जमा होते व त्यामुळे डेंगु होतो. सायकल किंवा गाडीचे चाक फेकले जाते त्यात जर पाणी जमा झाले तर त्यापासुन सुध्दा डेंगुचा आजार होतो तर या गोष्टीवर विचार केला पाहिजे व येथे राजकारण खेळण्याचा प्रश्न येत नाही. राजकारण तर आपण खेळतो, अधिकारी काय राजकारण करणार तर मला वाटते अधिका-यावर राजनितीचा आरोप न लावता. त्यांना उल्हासनगरमध्ये डेंगुचा आजार यापेक्षा जास्त पसरू नये. कॉलरा किंवा इतर कोणता आजार उल्हासनगरमध्ये येवु नये. म्हणुन मी आयुक्तांना सर्वात प्रथम धन्यवाद देवू इचिछतो. की त्यांनी खाजगी प्रयोगशाळेच्या चाचणीवरून व डॉक्टरांच्या म्हणण्यावरून जाहीर केले. पुण्याहुन अदयाप पर्यंत अहवाल आला नाही. तरी त्यांनी जाहिर केले. अजुन तेथील रिपोर्ट आला नाही. त्यांना जर वाटले असते तर त्यांनी जाहिर केले नसते. मी काही प्रयोगशाळांची तुम्हाला उदाहरणे देतो. आमचा एक पत्रकार तपासणीसाठी प्रयोगशाळेत गेला. उल्हासनगरच्या प्रयोगशाळा अशा आहेत. श्री. बच्चाराम रूपचंदानी हसत आहेत त्यांना बहुतेक हे माहित आहे. पाच नंबरच्या प्रयोगशाळेत तपासणी केली असता त्यांनी सांगितले की तुम्हाला मधुमेह आहे. ३ नंबर येथे चेक केले तर त्यांनी सांगितले की तुम्हाला मधुमेह नाही. तर काही प्रयोगशाळा पण अशा आहेत. त्यांना रिपोर्ट सुध्दा व्यवस्थित देता येत नाही. त्यांच्यावर पण थोडे लक्ष दिले जावे. की रिपोर्टमध्ये खरे लिहीलेले असते. भविष्यात डेंगुचा आजार पसरू नये. त्यासाठी आम्ही काय काळजी घेवू शकतो. मलेरीया ऑईल, डी.डी.टी पावडर टाकावी, खाडाबदली कामगार भरती करावे. आणि आमचे जे सदस्य म्हणाले त्याचा देखिल खुलासा करू इच्छितो. मी म्हणालो की, मान्यचे अमान्य करू नये. त्यांच्या टेबलावर अजुन अधिका-यांकडुन प्राकलने गेली नाहीत. आम्ही आयुक्तांना विनंती करू की, आयुक्तांकडे जर गेले असेल तर मान्य केले असेल तर धन्यवाद. जर नाही मान्य केले तर मान्य करतील. झोपडपटटी विकसित जेव्हा करतील तेव्हा पुर्ण शहरात झोपडपटटया आहेत. आयुक्त साहेबांनी मागच्यावर्षी वर्क इन प्रोग्रेस करून आमच्या सदस्यांच्या भावनाकडे लक्ष दयावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>-मा. महापौर....

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः</u>-मा. महापौर....

<u>मा. महापौरः-</u>श्री. हरदास माखिजा यांना बोलु दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब व उपस्थित सर्व सदस्य हिंदीमध्ये एक म्हण आहे की,
''बदनाम न होंगे तो नाम कहासे होगा''
मला असे वाटते की उल्हासनगर शहराच्या बाबतीत एक मोठे षडयंत्र रचले गेले आहे. उल्हासनगरचे नाव बदनाम करत आहेत. माझा जो अनुभव आहे मागील सात-आठ वर्षामध्ये पाहिले आहे. जेव्हा पासुन महापालिका स्थापन झाली आहे. कधी कावीळची जाहिरात करण्यात आली. आमची बहिण मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी त्यांच्या एका नातेवाईकाचा मृत्यु झाला होता मला वाटते त्यावेळी

मा. आयुक्त कॅप्टन शुळ साहेब आयुक्त होते. त्यांनतर कॉलराची साथ आली त्यावेळी मी महापौर होतो. त्यात एक दोन जणांचा जीव गेला. खुप मोठया प्रमाणावर प्रसिध्दी झाली. षडयंत्राबाबतीत मी सांगत आहे. कॉलरा पसरला जसे सभागृह नेत्यानी सांगितले की पुर्ण हिंदुस्थानभर टीव्ही चॅनल व वर्तमानपत्रात आले की, उल्हासनगरमध्ये कॉलरा झाला आहे. लोक यायला घाबरत होते इथला धंदा व्यापार संपुष्ठात आला. आता पुन्हा डेंगुचा ताप त्याला वर्तमानपत्रवाल्यांनी प्रोत्साहन दिले आहे. एक गोष्ट मी आयुक्तांना स्पष्टपणे सांगु इच्छितो. आयुक्त साहेबांना यासाठी जबाबदार धरले मी त्यांना सांगु इच्छितो की आयुक्त यासाठी जबाबदार नाही हे मी मानतो. परंतु या महानगरपालिकेचे जे आरोग्य खाते मेडीकल विभाग हा नक्कीच जबाबदार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>आम्ही पण तेच म्हणत आहोत ना.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>त्याचे कारण सांगतो आम्ही. या महापालिकेचे दोन सदस्य श्री. विनोद तलरेजा असो श्री. हरदास माखिजा असो. त्यांच्याबरोबर शहराचे अनेक नगरसेवक व आम्ही मुंबई उच्च न्यायालयात तगादा लावला होता. शहरात साफसफाई होत नाही. कच-यांचे ढीग साचत आहेत. इथ पर्यंत की त्या याचिकेला ऐकुन मुंबई उच्च न्यायालयाचे जे मा. न्यायाधिश होते. त्यांनी मुंबईच्या दोन सेवा निवृत्त आयुक्त श्री. सुखथनकर व श्री. तिनईकर यांची एक कमिटी स्थापन केली. की तुम्ही उल्हासनगरमध्ये जा आणि उल्हासनगरची काय दशा आहे ते पहा लोकांना भेटा समाजसेवकांना भेटा नगरसेवकांना भेटा व आम्हाला अहवाल दया काय झाले पाहिजे. तो जो अहवाल मुंबई उच्च न्यायालयाने सबमिट केला व त्यानंतर निर्देश दिले. जे उल्हासनगर महापालिकेला मिळाले आहेत. ते पण काटेकोरपणे पाळले जात नाही. हा माझा महापालिकेवर स्पष्ट आरोप आहे. हा परीणाम म्हणुन दिसत आहे. मी षडयंत्र शब्दाचा का उल्लेख केला एक गोष्ट मी आयुक्तांना सांगु इच्छितो. इथे वारंवार महापालिका किंवा पुर्व नगरपालिका होती. त्यात कित्त्येक षडयंत्र चालतात. आम्ही स्वत: डोळयाने पाहिले आमच्या कित्त्येक मित्राने देखिल पाहिले आहे. मी आयुक्त साहेब तुम्हाला सावधान करू इच्छितो. तुम्हाला पण नाकामयाब करण्यासाठी कित्त्येक षडयंत्र रचली जात आहेत. खुप सावधानतेने रहा. तो डेंगुचा आजार असो किंवा कॉलरा असो. किंवा कावीळ असो, कावीळ झाल्यामुळे मा. आयुक्त कॅप्टन शुळ यांना जावे लागले. कॉलरा शहरात आल्यावर श्री. शिंदे साहेब यांना जाता जाता आम्ही वाचविले. त्यांना पण पुन्हा पाठविण्याचा प्रयत्न केला जात होता. त्यांना आम्ही वाचविले. आम्ही तुमचा पण बचाव करू. परंतु तुम्हाला सतर्क राहायचे आहे. तुमच्या पदाधिका-यांकडुन विशेष करून मी आरोग्य खाते विभागाविषयी बोलत आहे. इथला आरोग्य विभाग काही कामाचा नाही. इथपर्यंत शहरातील गल्ली, बोळे, शौचालये साफ करण्यासाठी, नाल्या साफ करण्यासाठी डी.डी.टी. पावडर आणली जाते ती पण बाजारात विकली जाते. हे आजपासुन नाही कित्त्येक वर्षापासुन चालु आहे. नोबडी हॅज बी अेबल टू प्रीव्हेंन्ट इट, ॲन्ड यु हॅव टू प्रीव्हेंन्ट इट तुम्हाला याबाबतीत सावध राहायचे आहे. याबाबतीत माहिती ठेवायची आहे. या शहराचे हे चलन आहे. या गोष्टीसाठी तुम्हाला सावध राहायचे आहे. शहरात जितके स्वच्छता निरीक्षक आहे. त्यांच्यावर तुम्ही वचक ठेवला पाहिजे. सफाई कामगार यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. आरोग्य अधिकारी यांना टाईट ठेवले पाहिजे. जसे आमचे मित्र श्री. लाल पंजाबी म्हणाले की प्रीव्हेंन्शन इज बेटर दॅन क्युअर वुई हॅव गो टु फॉर प्रीव्हेंन्शन आपल्याला औषध नाही शोधायचे. रोग निर्माणच झाला नाही पाहिजे त्याकडे पुर्ण लक्ष दिले पाहिजे व त्याची पुर्ण जबाबदारी तुमच्या खांदयावर व तुम्हाला पाहायचे आहे की या शहराला बदनाम करण्याचे जे षडयंत्र आहे व यात-हेचे आजार शहरात येवून शहराचे नाव खराब होत आहे. राज्यांमध्ये किंवा देशात त्याला वाचविणे तुमचे काम आहे. आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर, श्री. संजय बठीजा, श्रीमती. नीना नाथानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-मा. महापौर, याठिकाणी डेंगु या विषयावर जी चर्चा चालु आहे. त्या चर्चेमध्ये डॉक्टर साहेबांनी उत्तर दिले की डेंगु का होतो. ३० ऑगस्टला माहिती आली. १० सप्टेंबरला तुमच्याकडे माहिती आली. त्यानंतर तुम्ही सर्व्हे केला पाण्याचे नमुने तपासले, रक्ताचे नमुने तपासले. ३२००० कुटूंबाचे. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की प्रीव्हेंन्शन इज बेटर दॅन क्युअर ठिक आहे झालेले आहे पण पुढे वाढु नये यासाठी तुम्ही प्रीव्हेंन्टीव्ह ॲक्शन काय घेतली. याठिकाणी आज जशी तुमची आरोग्य विभागाची जी कार्यप्रणाली आहे. डेंगुचा प्रसार झाल्यानंतर एक तीन वर्षाचा मुलगा वारला. डॉक्टर रोचलानी यांच्याकडे पाच रूग्ण आहेत. सेंट्रल हॉस्पीटलमध्ये एक आहे. जे.जे. हॉस्पीटलमध्ये पाठविला आहे. आणि आज एक ओंकार हॉस्पीटलमध्ये आहे. असे डेंगुग्रस्त रूग्ण किती आहेत. हे पाहिले असेल पण त्याचबरोबर होवू नये यासाठी काहीतरी काळजी घेतली पाहिजे. पुढे वाढणार नाही यासाठी पण काळजी ठेवायची आहे. त्यासाठी युध्दपातळीवरचा प्रचार करणे प्रसार होवू नये म्हणुन तुम्ही काही केले आहे का? आणि हा जो आजार आहे तो स्लम विभागात होत आहे. आणि स्लम विभागामध्ये तुमचे दुर्लक्ष आहे आज श्री. आर. के. सोनवणे म्हणुन नाही तर आयुक्त म्हणुन श्री. माखिजा साहेबांनी सांगितल्याप्रमाणे प्रशासनाचा एक प्रमुख म्हणुन माखिजा साहेबांना सांगायचे होते जसे लेकी बोले सुने लागे त्यांनी हे विभागावर टाकले. पण आम्ही प्रशासनाचा प्रमुख आम्ही तुम्हालाच जबाबदार धरू. परंतु ते तुम्ही व्यक्तीगत घेता. इमोशनल व्हायची गरज नाही. इथे राजकारणाचा उल्लेख तुम्ही केला. एखादया सदस्यांनी एखादया आयुक्तांकडुन असलेली अपेक्षा व्यक्त केल्यानंतर तुम्ही राजकारणाचा उल्लेख केला मला वाटते त्यात तुमचा उददेश काय ते समजत नाही. याठिकाणी राजकारण कुठे येतच नव्हते. एका सदस्यांने एका महापालिकेच्या आयुक्ताकडुन प्रशासनाचा प्रमुख म्हणुन झोपडपटटी विभागांमध्ये ज्याठिकाणी कॉलरा म्हंटल्यानंतर सम्राट अशोक नगर, आझाद नगर, शास्त्रीनगर याविभागामध्ये सुरवात झाली. कावीळचे पण तसेच झाले होते. ते करत असताना स्लम विभागातच जास्त लक्ष केंद्रीत केले पाहिजे हे सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला त्यात तुम्हाला राजकारण वाटले. प्रशासनाचा जबाबदार म्हणुन तुम्ही भावनाशिल आहात. पण एक आयुक्त आहात जबाबदारीने त्याठिकाणी बोलले पाहिजे. भावनाशिल ठिक आहे तुमच्या घराच्या बाबतीत कुणी बोलणार नाही आणि कुणी बोलले तर आम्हीही त्यांना नाव ठेवू. पण एका प्रशासनाच्या प्रमुखाकडुन अपेक्षा मांडल्यांनतर याठिकाणी तुमच्या भावना उध्दुक्त व्हायला नको. ते टाळता येईल ते टाळण्यासाठी मी प्रयत्न करेन हे साधे आणि सरळ उत्तर होते. की मी हा हा प्रयत्न केलेला आहे. त्यामागे एकच भावना होती की प्रतिबंधात्मक उपाययोजना अजुनही काही झालेल्या नाही अशी माझी तरी खात्री आहे. कारण माझ्या विभागात मी पाहता आहे अजुनपर्यंत कुठेही फवारणी झालेली नाही. धुराची मशिन असते ज्याने मच्छर पळतात ती आतापर्यंत कुठे फिरवलेली नाही. फक्त सर्व्हे केला म्हणजे झाले का? रूग्ण किती सापडतात याची आम्ही वाट बघायची का?आज पाच सापडले उदया दहा होतील. उदया पंधरा होतील. त्या पंधराचे पाच होतील किंवा अजिबात होणार नाही यासाठी सुध्दा काळजी घेणे हे प्रशासनाचे काम आहे. ते आपण घेतले नाही. म्हणुन हा आरोप आहे. जर ते घेतले असते तर आरोप झाला नसता. ठिक आहे रोग आहे. त्याचा अटकाव करणे आपले काम आहे. पसरणार नाही याची काळजी घेतली पाहिजे व त्याचबरोबर ज्यामुळे महापालिकेचे दुर्लक्ष असु दे किंवा नसु दे यामुळे लोक पीडीत झालेले आहेत त्याचा खर्च प्रचंड प्रमाणावर झाला आहे. आज जवळ जवळ एका दिवसाला पाचशे ते सातशे रूपये रूटीन टेस्टचा खर्च झाला आहे. तो जो खर्च आहे तो गरीब लोकांना परवडणारा नाही. त्यामुळे त्याचा खर्च आपण महापालिकेने आणि संबंधित विभाग सेंट्रल हॉस्पीटल यांच्याशी संपर्क करून आपण तो उचलावा अशी याठिकाणी अपेक्षा करून याचा प्रादुर्भाव वाढु नये त्यासाठी आपण लवकरात लवकर फवारणी आणि किटकनाशके वापरावी ही अपेक्षा आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवारः-मा. महापौर, उपमहापौर,.....

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब जरा एक मिनिट लक्ष दया. आता आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की डेंगुचा आजार स्वच्छ पाणी साठविल्यामुळे होतो. १० तारखेला यांना माहित पडले. १० तारखेनंतर ते आजपर्यंत त्यांनी आता आम्हाला सांगितले आहे की स्वच्छ पाणी साठविले नाही पाहिजे. त्यामुळे हा त्रास होतो परंतु १० दिवसात त्यांनी काय काम केले. जनतेला अजुन त्यांनी हे नाही सांगितले की पाणी सात दिवसाच्या वर साठवुन ठेवले नाही पाहिजे. यासाठी त्यांनी काही केले नाही. त्याचे कारण काय? त्यांनी कमीत कमी टीव्ही चॅनलवर किंवा हॅण्ड बिल किंवा कमीत कमी शहरातील स्थानिक पेपरमध्ये त्यांनी दयायला पाहिजे होते. ते मोफत सुध्दा छापायला तयार आहेत की शहरात डेंगु झाला आहे. या या त-हेने त्यापासुन बचाव करा. असे त्यांनी काही केले नाही. आज महासभेमध्ये आम्हाला कारणे सांगत आहेत. १० दिवसापुर्वी जर बचावात्मक उपाय केले असते. त्यांनी टीव्हीवर केबलवर, हॅण्ड बील मार्फत झोपडपटटी भागात वगैरे वाटले पाहिजे म्हणजे लोकांना माहिती पडेल. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>साहेब, या बिसलरी बाटलीमुळे डेंगु होवू शकतो का?*

***मा. सदस्या श्रीमती. भारती छाबिया, श्रीमती. कोमल बठिजा ह्या सभागृहातुन बाहेर पडल्या.***

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य उल्हासनगर येथे टायफाईड मलेरीया यासारखे आजार आले व यावर्षी डेंगु सारखा भयंकर आजार आला आहे. हे सर्व जे आजार आहेत ते का येतात? चार वर्षापासुन असे एकही वर्ष नाही की साथ नाही आली. कॉलरासारखी भयंकर साथ येथे आली. आम्ही इथे एक गोष्ट पाहिली आहे. की या आजाराचे जे रूग्ण असतात ते कोणत्त्या परीसरात सापडतात. कॉलरा पण आला आज ज्या परीसरात डेंगुचे रूग्ण सापडत आहेत. त्याच परिसरात कॉलराचे पण रूग्ण मिळतात. त्या परिसरात टायफाईडचे पण रूग्ण सापडतात. त्याच परिसरात मलेरीयाचे पण रूग्ण आढळतात. तर यावर विचार झाला पाहिजे. हे काही हसण्याचे किंवा मस्करीची बाब नाही. आपण एका गंभीर विषयावर सभागृहात चर्चा करत आहोत. व दरवर्षी ऑक्टोबर नोंव्हेंबर आणि डिसेंबर या तीन महिन्याच्या कालावधीत हे आजार निर्माण झाले आहेत. मी सभागृह व आयुक्तांच्या नजरेस आणुन देतो की, कॉलरा,टायफाईड, मलेरीया, डेंगु हे सर्व आजार जे आहेत जास्त करून दुषित पाणी पिण्यामुळे होतात. आताच डॉक्टर साहेबांनी देखिल सांगितले की दुषित पाणी पिल्याने हे आजार होतात. हे दुषित पाणी कित्त्येक वर्षापासुन येते हे पाणी नळाव्दारे येते ते कुठून येते. मी सभागृहाच्या निर्दशनास आणुन देतो. उल्हासनगरमध्ये जे न्युएमबीआर येते जेथुन पाणी येते. त्या न्युएमबीआरचे पाणी जिथपर्यंत जाते. त्याच ऐरीयात लगातार चार वर्षापासुन मी रूग्ण पहात आहे. माझा सुझाव सदनाला असा आहे. व न्युएमबीआर चे पाणी जिथे जाते. उल्हासनगर शहराचा जो घाणेरडा नाला आहे. तिथुनच आम्ही पाणी भरतो. त्या नाल्यावर अजुन उपाययोजना केल्या पाहिजे होत्त्या त्या केल्या जात नाहीत. मला असे वाटते की यासर्व आजारांचे मुख्य कारण तो नाला आहे. दुषित नाल्याचे पाणी तिथुन जाते. तिथुन महापालिका किंवा एम.आय.डी.सी. पाणी देते व तेच पाणी आपण पितो. आता झोपडपटट्यांमध्ये याचे रूग्ण मोठ्या संख्येने आढळतात यात काही शंका नाही. इतरत्र आढळत नाही. मला वाटते सुशिक्षित वर्ग राहतो. पाणी उकलुन पिणे, किंवा पाणी र्निजंतुक ठेवत असतील. झोपडपटटीमध्ये राहणारा तो उपाययोजना करत नसेल तर ती उपाययोजना महापालिकेने केली पाहिजे. आयुक्त साहेब तो जो नाला आहे. त्यावर काय कार्यवाही लवकरात लवकर करावी.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-</u>तो नाला किर्तीपथ येथुन जातो. नदीमध्ये डायरेक्ट पाणी जातो.*

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>तो एक महापालिकेचा मोठा निर्णय होईल.*

मा. महापौरः-आता बरीच चर्चा झाली आहे कार्यसूचीच्या विषयावर येवू या.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-मा. महापौरजी, आयुक्त साहेब,...

मा. महापौरः-आता कुणीही बोलायचे नाही.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-तो नाला किर्तीपथ येथुन जातो. खुप घाण पाणी असते त्यात जनावरे वगैरे लोक फेकतात. ऐवढे घाण पाणी आहे. ते पाणी नदीत पुन्हा जाते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-महापौर महोदया, आयुक्तांना यावर निवेदन करू दया. या लक्षवेधीवर एक तर चर्चा संपुर्ण झाली. मी पुन्हा त्या कारणामध्ये जात नाही. परंतु आमचे सहकारी श्री. बोडारे साहेबांनी जी सूचना मांडली की त्या रक्त तपासणीचा जो खर्च आहे. १००० रूपये त्याचा खर्च आहे. तर सेंट्रल हॉस्पीटलमध्ये एक तर स्वतंत्र कक्ष असला पाहिजे यासाठी आपण पुढाकार घेवू दुसरे असे की, त्यांच्या रक्त तपासणीचा जो खर्च आहे तो महापालिका आणि सेंट्रल हॉस्पीटल यांना मिळुन उचलता येईल का? यादृष्टीने प्रयत्न झाले पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-लक्षवेधीचे उत्तर द्या तुम्ही प्रीव्हेंन्शन आणि इनफरमेशन त्यासाठी काय करणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, या लक्षवेधीवर जी चर्चा झाली. त्यामध्ये सदनातील सदस्यांनी ब-याच उपयुक्त सूचना केल्या. त्यात लोकांना माहिती देणे व लोकांना उपचारासाठी मदत करणे. मेडीकल ट्रीटमेंट ब्लड सॅम्पल चेक करण्यासाठी मदत करणे. त्याप्रमाणे प्रशासनातर्फे कारवाई केली जाईल. लोकांना प्रसार माध्यमामार्फत माहिती दिली जाईल. वर्तमानपत्राच्या माध्यमातुन किंवा इलेक्ट्रॉनिक मिडीयातर्फे माहिती दिली जाईल. ते ब्लड सॅम्पल महापालिका स्वतः घेवून पुण्याच्या प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठवतील. खाजगी प्रयोगशाळेत चेक केले तर त्याचा खर्च महापालिका देणार नाही. कारण की खाजगी प्रयोगशाळेत तपासले तर त्याचा खर्च देण्याचे जाहीर केले तर खुप सारे लोक डेंगु नसताना देखिल आपल्याकडे येतील व तो खर्च मागतील. परंतु जिथे पण तापाचे प्रकरण आहे. सरकारी शासनाची जी प्रयोगशाळा आहे तिथे तपासणीसाठी पाठविले जाईल. सदस्यांनी ज्या उपयुक्त सूचना केल्या त्यात या दोन-चार गोष्टी समोर आल्या. त्यावर अंमलबजावणी केली जाईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषयः- मागील सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.
(सर्वसाधारण महासभा दि. २०.८.२००३ व विशेष महासभा
दि. २५.८.२००३ )

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी, श्री. मोहन बेहरानी, श्री. हरदास माखिजा, श्री. मोहन साधवानी, श्री. नथु सोनावणे, श्री. विनोद ठाकुर, श्री. ईश्वर पमनानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

काही सदस्य :-पास.

__मा. महापौरः-__दि. २०.८.२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे व दि. २५.८. २००३ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

__मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-__विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

__विषय क्र ३ :-__ मुख्य लेखा परिक्षकाकडुन माहे मार्च २००३ पर्यंतचा जमाखर्चाच्या अहवालाबाबी स्थायी समितीचे ठराव क्र. ७१ दि. २८.८.२००३ व्दारे केलेला आदेश विचारात घेणे.

__काही सदस्य :-__पास.

__मा. महापौरः-__सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

__विषय क्र ३ :-__ मुख्य लेखा परिक्षकाकडुन माहे मार्च २००३ पर्यंतचा जमाखर्चाच्या अहवालाबाबी स्थायी समितीचे ठराव क्र. ७१ दि. २८.८.२००३ व्दारे केलेला आदेश विचारात घेणे.

__प्रस्तावना :-__

**__eqacbZ izkafrd egkuxjikfydk vf/kfu;e 1949 ps dye 105 o 106 ¼1½ ¼v½ uqlkj ekgs ekpZ] 2003 i;Zarpk tek [kpkZpk vgoky mRiUu %&__**

foRrh; oÔZ 2002&2003 ^v * o ^d * lq/kkjhr vFkZladYi loZlk/kkj.k egklHkk Bjko dzekad 101 fnukad %&20@2@2003 vUo;s eatwj dj.;kr vkys ;k vFkZladYikUe/;s visf{kr /kjysys mRiUu o izR;{k izkIr >kysys mRiUu [kkyh nÓZfoysys vkgs-

| vFkZladYi | visf{kr mRiUu | izR;{k mRiUu | deh ¼&½ mRiUu |
|---|---|---|---|
| ^v * | **94]67]44]000** | **79]90]92]780** | **14]76]51]220** |
| ^d * | **20]39]48]000** | **16]26]28]010** | **4]13]19]990** |
| ,dw.k | **1]15]06]92]000** | **96]17]20]790** | **18]89]71]210** |
| izkjaHkhph fÓYyd #- | **4]09]34]000** | | **16.42%** |
| ,dw.k #- | **1]19]16]26]000** | | |

iqjslk deZpkjho`an ulY;kus mRiUukps ys[kk ifj{k.k v?kkor Bsork ;sr ukgh foRrh; oÔZ lu **2002&2003** e/;s # **-95]39]70]713@&¼#i;s iaP;k..ko dksVh ,dks.kpkGhl yk[k lRrj gtkj lkrÓs rsjk QDr½** [kpZ ys[kkafdr >kysyk vkgs- [kpkZps iqoZ ys[kkifj{k.k gksr vlrs- vk{ksikps fujkdj.k >kY;kojp ns;dkps iznku gksr vlrs >kysyk [kpZ gk l{ke izkf/kdk&;kP;k eatwjhus >kysyk vlwu miyC/k rjrqnhP;k e;kZnfr vkgs-

tek [kpkZps ys[kkfÓÔZfugk; ifjfLFkrh nÓZfo.kkjs i=d lkscr tksMys vkgs-
**__ys[kk ifj{k.kke/;s funÓZukl vkysY;k xaHkhj ckch ¼eqaacbZ izkfrd egkuxjikfydk vf/kfu;e 1949 ps dye 106 ¼1½ ¼v½ P;k rjrqnhizek.ks½__**

## ekyeRrk dj foHkkx

**vk{ksi dzekad %&1** **__Jh ts -ds -bljkuh ¼jks[kiky½ ekyeRrk dj foHkkx ;kauh__**

**__dsysY;k jDde__ __# -4]99]790@&P;k vigkjkckcr__**

ekyeRrk dj foHkkxkrhy dj olqyh fyihdkauh ekyeRrk djkiksVh u oVysY;k /kuknsÓakaP;k cnY;kr jks[k jDde fLodk#u lnj jDde ;qfuV dzekad 6] 7 o 8 ps jks[kiky Jh- ts- ds- bljkuh ;kaP;kdMs tek dsysyh vkgs- Jh- ts -ds - bljkuh ;kauh u oVysY;k /kuknsÓkP;k cnY;kr laca/khr dj olqyh fyihdkadMwu fLodkjysyh ,dw.k jDde #- 4]99]790@& ¼v{kjh #Ik;s pkj yk[k uO;k..ko gtkj lkrÓs uOon ek=½ pk Hkj.kk egkikfydk dksÔkxkjkr dsysyk ukgh- ;kpkp vFkZ lnj jDde #- 4]99]790@& pk R;kauh dk;e Lo#ih vigkj dsY;kps fnlwu vkY;kus] lnjph jDde rkRdkG olqy d#u lacf/krkaoj ;ksX; rh dkjokbZ dj.ks dfjrk dj fu/kkZjd vkf.k ladyd o mi vk;qDr ¼Ógj½ ;kauk ;k foHkkxkps v/kZlekl Kkiu i= dzekad meik@ysifo@dj foHkkx @82 fnukad 21@2@2003 o Ik= dzekad meik @ ysifo @ 83 fnukad 3@3@03 vUo;s dGfoys vlwu ;kckcrpk IfoLrj vgoky ek- vk;qDr ;kauk i= dz- meik@ysifo@16 fnukad 10@3@03 vUo;s lknj dsyk vkgs- Jh- ts- ds- bljkuh ;kauk vknsÓ dzekad meik@lkizfo@vkLFkk@Vs- 4@93 fnukad %& 25@3@2003 vUo;s fuyafcr dsys vkgs-

## vk{ksi dzekad %& 2 <u>Jh- Hkxoku mnklh]olqyh fyihd]dj foHkkx ;kauh vigkjhr dsysY;k jDde # - 27538@& P;k vigkjkckcr-</u>

ekyeRrk dj foHkkxkrhy olqyh fyihd Jh- Hkxoku mnklh] ;kauh ekyeRrk djksikVh olqy dsysyh jDde #-27538@&¼ # -lRrkohl gtkj ikpÓs vMrhl ek=½ pk Hkj.kk egkikfydk dksÔkxkjkr dsysyk ukgh R;keqGs lnj jdespk R;kauh dk;e Lo#ih vigkj dsY;kps fnlwu vkY;kus lnjph vigkjhr jDde laca/khrkdMwu rkRdkG olqy d#u egkikfydsP;k dksÔkxkjkr Hkj.kk dj.;kckcr o lnjP;k jdesP;k vigkjkckcr laca/khrkoj ;ksX; rh dkjokbZ dj.;kckcr mivk;qDr ¼Ógj½ ;kauk ;k foHkkxkps v/kZlekl Kkiu i=-dz- 20 fnukad %& 19@3@03 vUo;s dGfoys vkgs- ofjy vigkfjr jDde Jh- Hkxoku mnklh ;kapsdMwu olwy d#u egkikfydk dksÔkxkjkr Hkj.kk dsY;kp mi&vk;qDr ¼Ógj½ ;kauh R;kaps i-dz- meik@dj@403 fnukad 18@8@03 vUo;s dGfoys vkgs- Jh-Hkxoku mnklh ;kauk izÓklukus fuyafcr dsys vkgs-

## vk{ksi dzekad %& 3 <u>Jherh- feuk flrykuh jks[kiky ;kauh dsysY;k jDde #- 3010@& P;k vigkjk ckcr</u>

ekyeRrk foHkkxkrhy Jh- vkseizdk'k xqjukuh ;kauh fnukad 31<u>@3@2002</u> jksth ikorh iqLrd dzekad 980 ef/ky ikorh dzekd 97907 vUo;s #- 3010@& ¼#Ik;s rhu gtkj ngk QDr½ olwy dsysyh jDde R;kauh R;kp fno'kh dj foHkkxkrhy jks[kiky Jhe -feuk flrykuh ;kapsdMs tek dsyh iajrq Jhe feuk flrykuh ;kauh lnjph jDde #Ik;s 3010 ¼#Ik;s rhu gtkj ngk½ ek= gh egkikfydk dks"kkxkjkr Hkj.kk dsysyh ulY;kus lnj jDdespk lqd`r n'kZuh vigkj >kY;kps fnlqu vkY;kus ;kckcr ;ksX; rks [kqyklk Rojhr dj.;kdfjrk o lnjph jDde laca/khrkadMwu rkRdkG olwy d#u egkuxjikfydsP;k dks"kkxkjkr tek d#u rlk vgoky ns.;kdfjrk ;k foHkkxkps v/kZlekl Kkiu i- dz- tk- dz meik@ysifo@ djfoHkkx @vlKk@ 81 fnukad %&23@1@03 vUo;s ekyeRrk dj foHkkxkl dGfoys vkgs ijrq R;kauh vk{ksikps fujkdj.k dsysys ukgh-

vuqeksndkps uko %& Jh- jkenkl meki

gh LFkk;h lferh eq[; ys[kk ifj{kdkus ekgs ekpZ] 2003 i;Zar tek [kpkZpk lknj dsysyk vgoky ikgqu Nkuuh varh iz'kklukl ys[;kaP;k ckcrhr ojhy fofuZnh"V dsysys v;ksX; o fo/kh vxzkg; izdkjkeqGs lacaf/kr dekZpk&;kfo#/n [kkrsfugk; pkSd'kh clfo.ks fdaok xqUgk nk[ky dj.ksl vkns'k djhr vkgs vkf.k gk vgoky egklHksiq<s izLr`r dj.ksl funsZf'kr djhr vkgs-

lqpdkph lgh@&

vuqeksndkph lgh@&

**,derkus**

lHkkirh @ fiBklhu vf/kdkjh
LFkk;h lferh lHkk
mYgkluxj egkuxjikfydk

---

महासभा ठराव क्र. ६९ दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी

ही महासभा मुख्य लेखा परीक्षकांचे माहे मार्च, २००३ पर्यंतचा जमाखर्चाच्या अहवाला बाबी वरील स्थायी सामिती ठराव क्र. ७१, दि. २८.८.२००३ व्दारे केलेला आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. ईश्वर पमनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

विषय क्र. ४:- विद्युत विभागाचे दोन तारतंत्री पदांचे पदनाम बदलणे बाबी स्थायी सामितीचा ठराव क्र. ६५, दिनांक २८.८.२००३ कायम करणे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-काय आहे? आमची हरकत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-दोन तारतंत्री पदाचे कर्मचारी आहेत. त्यांना ड्रायव्हिंग पण येते. त्यांच्याकडे लायसन्स पण आहे. त्याचे पदनाम बदलले तर दोन्ही कामासाठी त्यांचा उपयोग होईल. वेतनात वाढ होणार नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यांना वाहन चालक तरी करा नाहीतर तारतंत्री तरी करा दोन्ही पदे कशाला?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, जेव्हा इथे पदनाम बदलुन महापालिकेच्या कामात सुविधा होईल तसे की वायरमन आहेत, त्याच्याकडे लायसन आहे तो वाहन चालवु शकतो ते जर दिले तर बचत महापालिकेची होईल एका ड्रायव्हरवर जो खर्च करायचा आहे तो वाचेल. आज सरकारी कार्यालयात आपण पहाल, पोलिस खात्त्यातील उदाहरण घ्या. पोलिस जीपचा ड्रायव्हर नसतो तो पोलिस देखिल असतो. जर आपल्या वायरमननी वायरमन कम ड्रायव्हर म्हणुन काम केले तर महानगरपालिकेच्या एका ड्रायव्हरचा पगार शिल्लक उरतो. त्यामध्ये आपण हरकत घेण्यासारखे काय आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-कर्मचा-यांवर अन्याय होत आहे.
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-कर्मचा-यांवर अन्याय होत नाही ते स्वतःहुन त्या कामास तयार आहेत. एका रूपयाची पण अपेक्षा न ठेवता. तर त्यात अडचण काय येवू शकते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-शहर अभियंत्त्यांना पण गाडी चालवायला येते मग तुम्ही तसे करणार का?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आयुक्त महोदय मुददा असा आहे की महापालिकेतील अनेक कर्मचा-यांना अधिका-यांना त्यांच्याकडे वाहनचालकाचा परवाना असु शकेल. तर प्रत्येकाचे पदनाम बदलुन आपण असे करणार आहोत का? मुददा काय आहे यामध्ये. तो जर वायरमन असेल आणि त्याच्याबरोबर एक वाहन चालक गाडी घेवून कुठेही रिपेरींगला जाणार असेल त्याठिकाणी जर वाहनचालक नसेल तर तो तिथे अडवणुक करेल हा एक मुददा असु शकतो कदाचित परंतु पदनाम बदलुन वायरमनला गाडी चालविण्यासाठी भाग पाडुन एकदा पदनाम त्याचे बदलले तर त्याच्यावर जबाबदारी आली वाहनचालकाची हे तर बरोबर आहे. आज तो वायरमन आहे. तुम्ही त्याला गाडी चालविण्यासाठी तुम्ही बळजबरी करू शकत नाही. परंतु त्याचे पदनाम जर बदलले तर त्याला तुम्ही गाडी चालवायला भाग पाडु शकता म्हणजे याचा अर्थ काय की त्याने ती गाडी घेवून जायची. आणि त्यानेच सगळे रिपेअरींग वगैरेचे काम करून घ्यायचे म्हणजे हे त्याच्यावर बर्डन आहे आणि शोषण देखिल आहे तर त्यादृष्टीने तुम्ही त्यांना काहीतरी भत्ता त्याला दिला पाहिजे. जर आपण वाहनचालकाचा पगार वाचवताना काही प्रमाणामध्ये भत्ता किंवा दुस-या स्वरूपात फायदा त्याला झाला पाहिजे. कारण आपण जास्तीचे काम त्याच्याकडुन करून घेणार आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, हे वायरमन विद्युत विभागात जर गाडी चालवु इच्छितात. कधी ड्रायव्हर नाही आले तर गाडी घेवून जातील आणि स्ट्रीट लाईट बनवतील. ते जर स्वतःहुन काम करायला तयार आहेत. व काही मोबदला मागत नाही. तर मला असे वाटते की, महापालिकेला ड्रायव्हरच्या पगाराऐवढे पैसे शिल्लक राहतात. कधी इमरजन्सीमध्ये ड्रायव्हर आला नाही. तर जसे आमचे मा. सदस्य म्हणाले की खुप उशिरा तक्रार ऐकली जाते. ती तक्रार देखिल लवकर ऐकली जाईल तर मला वाटते हा मुददा पास करण्यास काही हरकत नाही. दोन्ही पास केले जावे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-असे पदनाम बदलायचे कारण काय? माझा विरोध आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावेत. ३७........

<u>प्रस्तावाच्या बाजूने मतेः-</u>

२५. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२६. श्रीमती. रामचंदानी भावना
२७. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
२८. श्री. ऐडके गणपत
२९. श्रीमती. शर्मा कमला
३०. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
३१. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्री. पवार नाना आनंदा
९ श्रीमती. आहुजा नीता
१० श्री. रूपाणी चिमन अमरूमल
११ श्री. शांताराम निकम
१२श्रीमती. सोनेजी मीना
१३श्रीमती. मसंद माया
१४ श्रीमती. वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१६ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१७ श्रीमती. खिलनानी भावना
१८ श्री. खेमाणी दर्शनासिंग देवेंद्रसिंग
१९ श्रीमती. कारीरा रेखा
२० श्री. पमनानी ईश्वर
२१श्री. पंजाबी नारायण
२२ श्रीमती. पंजाबी दिपा
२३ श्री. लबाना होशियारसिंग
२४ श्री. तलरेजा विनोद
२५ श्रीमती. रिझवानी सुजाता
२६ श्रीमती. दासानी मिनु
२७. श्री. म्हस्के अंकुश
२८ श्री.लालबिहारी यादव
२९ श्री. जाधव सुरेश
३० श्री. जाधव प्रशांत
३१ .श्री. टाले प्रमोद
३२ श्रीमती. साधवानी जया
३३ श्री. भालेराव गौतम
३४ श्रीमती. वसिटा बेबी
३५ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
३६ श्रीमती. करोतिया मालती
३७. श्री. गोविंदराम लुंड

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. १६.......

<u>प्रस्तावाच्या विरोधात मतेः-१६</u>

१४. श्रीमती. जावळे संगिता
१५. श्रीमती. मोकल सिमा
१६. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास

५. श्री. रूपचंदानी बच्चाराम
६. श्री.राज असरोंडकर
७. श्रीमती. कृष्णानी रेखा
८. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
९. श्री. गायकवाड दिलीप
१० श्रीमती. बामणकर नंदिनी
११ श्री. खांडेकर प्रेमा
१२ श्रीमती. माने किरण
१३ श्री. बोडारे धनंजय
१४ श्री. पाटील विश्वनाथ
१५ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१६ श्री. चौधरी राजेंद्र

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव बहूमताने पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ४:-</u> विद्युत विभागाचे दोन तारतंत्री पदांचे पदनाम बदलणे बाबी स्थायी समितीचा ठराव क्र. ६५, दिनांक २८.८.२००३ कायम करणे.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका शहरात दिवाबत्ती दुरूस्तीचे कार्य विभागीय कर्मचा-यांमार्फत करतात यासाठी विद्युत विभागाकडे ७ सेवावाहन आहेत आणि त्यासाठी ७ वाहनचालकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

परंतु वाहनचालक अनुपस्थित राहिला तर वाहने बंद राहतात. त्याच्या परिणामस्वरूपात शहराच्या दिवाबत्ती दुरूस्तीचे कार्य होत नाही आणि दुस-या दिवशी तक्रारीची संख्या वाढते.

याकारणे विद्युत विभागाने अशी विनंती केलेली आहे की, त्यांच्या विभागात दोन तारतंत्री १. श्री. कृष्णा पावशे २. श्री. बन्सीलाल जैस्वार यांच्याकडे वाहन चालकाचा परवाना आहे. त्यांना अनुपस्थितीत सेवावाहन चालविण्याची परवानगी मिळावी.

वरील संदर्भात प्रशासन अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१. तारतंत्री व वाहनचालक या दोन्हीही पदांची वेतनश्रेणी एकच आहे. व ती वेतन श्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० आहे. त्यामुळे कोणत्त्याही आर्थिक लाभ या कर्मचा-यांना मिळणार नाही.
२. दोन्ही ही वर्ग ३ चे कर्मचारी आहेत. परंतु त्यांच्या कार्यात फरक आहेत.
३. विद्युत विभागाने केलेली मागणी तक्रारीचे शिघ्रगतीने निराकरण होणारे दृष्टीने योग्य आहे.
४. विद्युत विभागाची गरज लक्षात घेता जर हया दोन तारतंत्रीचे पदनाम बदलून तारतंत्री/ वाहनचालक पदनाम करण्यात आले तर त्यांना वाहनचालविण्याची परवानगी देण्यास हरकत राहणार नाही.

वरील बाबी लक्षात घेता श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन त्यांच्या सध्याची वेतन श्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० यात तारतंत्री / वाहनचालक पदनाम मंजुरीसाठी हा प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्यात आला होता व

स्थायी समितीने ठराव क्र. ६५ दिनांक २८.८.२००३ अन्वये विद्युत विभागातील कर्मचारी श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन त्यांची सध्याची वेतनश्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० यात तारतंत्री / वाहनचालक पदनाम देणेस मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महासभे पुढे कायम करण्यासाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र.</u> ७० <u>दिनांकः-१९.९.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलेरजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे

ही महासभा वरील स्थायी समिती ठराव क्र. ६५ दि. २८.८.२००३ प्रमाणे विद्युत विभागातील उल्लेखिलेल्या २ कर्मचा-यांकरिता त्यांचे तारतंत्री पदाऐवजी तारतंत्री / वाहनचालक असे पदनाम देणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र ५ :-</u> महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदाची वेतनश्रेणी फेरनिश्चित करणे बाबी स्थायी समितीचे ठराव क्र. ६० दि. २८.८.२००३ कायम करणे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> या पदाची वेतनश्रेणी कमी आहे शासनाने लिहिले आहे की, १० हजारापर्यंत वेतनश्रेणी असली पाहिजे. जितके शासनात आहे तेवढेच वेतनश्रेणी ठेवली आहे.

<u>काही सदस्य :-</u> पास...

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव पूढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र ५ :-</u> महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदाची वेतनश्रेणी फेरनिश्चित करणे बाबी स्थायी समितीचे ठराव क्र. ६० दि. २८.८.२००३

कायम करणे.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. उमपा २२९८/२०३०/प्र. क्र. २५९/९८/नवि-२३, दिनांक १३.६.२००३ अन्वये सहाय्यक संचालक, नगररचना हे एक पद रू. ८०००-१२५-१३५०० या वेतनश्रेणीत निर्माण केले आहे. सदर रिक्त पदावर नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळवुन सक्षम अधिका-याची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करणेबाबत विनंती केली होती. नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले आहे की, सहा संचालक, नगररचना या पदाची वेतनश्रेणी रू. १००००-३७५-१५२०० अशी आहे.

या महानरपालिकेने सहा, संचालक, नगररचना हे पद रू. ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत निर्माण केलेले आहे. त्यास शासनाने दि. १३.६.२००२ च्या आदेशान्वये मंजुरी दिलेली आहे. सबब, सदर पदाची या महापालिकेला आवश्यकता असल्याने सदर पदाची वेतनश्रेणी रू. ८०००-२७५-१३५०० वरून रू. १००००-३२५-१५२०० या वेतनश्रेणीत आणणेकामी मंजुरी मिळणेस स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६० <u>दिनांकः-२८.८.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंदकुमार

वरील प्रस्ताव विचारात घेता ही स्थायी समिती महापालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदाची वेतनश्रेणी रू. ८०००-२७५-१३५०० वरून रू. १० ,०००-३२५-१५२०० या वेतनश्रेणीत आणणे कामी मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

.................................................................................................................

<u>महासभा ठराव क्र.</u> ७१ <u>दिनांकः-१९.९.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. होशियारसिंग लबाना
अनुमोदकाचे नाव :-श्री. भालेराव गौतम

ही महासभा महापालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदी रू. १० ,०००-३२५-१५२०० वेतनश्रेणी बसविणेस मंजुरी देवून वरील स्थायी समिती ठराव क्र. ६० दि. २८.८.२००३ कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ६ वाचून दाखवितात.
विषय क्र.६ :- महापालिकेतील २ कनिष्ठ अभियंता श्री. यु. के. नारवाणी व श्री. बी. जे. भटीजा यांना, उपअभियंता या पदावर पदोन्नती देणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- मागच्या वेळेस मुख्य बाजार निरिक्षक म्हणून अधिका-याची नेमणूक करण्यात आली होती. श्री. मोरे यांना बढती देण्यात आली होती. अजून कमीटी नेमली नाही, त्यांचा पगार तर वाढला. त्यांचे काम अजून सुरु झाले नाही. त्यांना जर प्रमोशन दिले तर त्यांचे काम सुरु झाले पाहिजे ना? अजून कुठलेही काम सुरु झाले नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा.महापौर महोदया, जी बाजार निरिक्षकाचे पद आम्ही निर्माण केले त्यानुसार प्रमोशन देऊन नियुक्ती करण्यात आली आहे. काम अजून सुरु झाले नाही. कारण त्यासाठी जे उप-नियम बनवायचे आहे, बॉयलॉजचा ड्राफ्ट बनवून महापालिकेसमोर ठेवले होते, महापालिकेने त्यावर अभ्यास करण्यासाठी एक कमीटी स्थापन केली आहे. सहा महिन्यात अहवाल दयायचा होता. सभागृहाची एक कमिटी आहे. सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला अजुन अहवाल आला नाही. म्हणुन ते काम सुरू नाही होवू शकले. मी ट्रेड लायसन्स चे ड्राफ्ट सभागृहासमोर ठेवले होते ते काम तसेही चालु करू शकतात. मी सभागृहाला विनंती करतो की त्या समितीची लवकर सभा बोलवुन रिपोर्ट जर महासभेसमोर दिला तर कामात गती येवू शकते व सुरळीत ते काम होवू शकते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-आयुक्त साहेब, पदोन्नतीचा विषय आहे. मागच्या दोन महिन्यापुर्वी श्री. व्ही.आर.गर्जे यांच्या पदोन्नतीचा विषय आला होता. त्याआधीच्या महासभेमध्ये सुध्दा तोच विषय आला होता. एकाचवेळी दोन पदोन्नतीचे विषय एकत्र आले आहेत. पण आता हे मात्र एकाच पदासाठी असल्याने एकत्र आलेले आहेत. तसाच तो विषय आहे. परंतु त्यावेळेस वेगळा आणावा म्हणुन सांगितले. त्यानंतर स्वतंत्र विषय आणल्यानंतर तो विषय बाजुला ठेवला गेला की चुकीच्या पध्दतीने आणला आहे म्हणुन बाजुला ठेवला गेला. पण त्याच्यानंतर तो अनुत्तरीत आहे. आणणार आहेत की नाही त्याचे कारण काय ते समजत नाही. पदोन्नती करतात फक्त एकाच इसमाची का मागे आहे ते जरा स्पष्ट केले तर बरे होईल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा.महापौर महोदया,तो पण प्रस्ताव आहे त्यात फक्त एक वेरीफाय करायचे होते. ते करणे जरूरी होते. आता ज्या पदावर ते काम करत आहेत ते पद डयु प्रोसेसर फॉलोव्ह करून दिले होते की नाही. जर इनिशीअल अपॉइंटमेंट चुकीची आहे तर पुढे जावुन पदोन्नती देखिल चुकीची होवू शकते. यामुळे आम्ही हा प्रस्ताव मागे घेतला. कागदपत्राची तपासणी चालु आहे. आम्ही लवकरच त्यांचा प्रस्ताव महासभेसमोर आणु.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मंजुर ?

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र ६ :- महापालिकेतील २ कनिष्ठ अभियंता श्री. यु. के. नारवाणी व श्री. बी. जे. भटीजा यांना, उपअभियंता या पदावर पदोन्नती देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर उप-अभियंता (सा.बा.वि) या संवर्गामध्ये एकूण १० पदे मंजुर आहेत. त्यातील २ पदे सरळ सेवेने व ८ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सरळ सेवेची दोन्ही पदे रिक्त आहेत. पदोन्नतीने भरावयाची ५ पदे रिक्त आहेत. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७ प्रकरण क्रमांक ६३/९७/१६-ब दिनांक १८.१०९७ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पदोन्नतीतील बिंदु नामावलीनुसार पदोन्नतीची पदे भरणे आवश्यक आहे.

उप अभियंता (स्थापत्त्य) या पदाच्या सेवा भरती नियमानुसार सरळ सेवा व पदोन्नती याचे प्रमाण ३ : १ असे आहे. त्यानुसार एकूण मंजुर १० पदांपैकी ८ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. शासनाच्या दिनांक १८.१०.९७ तील आदेशानुसार खुल्या प्रवर्गासाठी ६७ टक्के व राखीव प्रवर्गातील ३३ टक्के असे प्रमाण आहे. त्यानुसार ८ पदोन्नतीच्या पदांपैकी ३ पदे राखीव व ५ पदे खुल्या प्रवर्गातील आहेत

राखीव प्रवर्गातील अ.जा. या प्रवर्गातील १ पद भरलेले आहे. अनु. जमाती साठी व भटक्या जमातीसाठी उमेदवार नसल्याने सदर पदे भरता येणार नाही. दिनांक ११.७.२००३ रोजी दुपारी २. ०० वाजता महानगरपालिका कार्यालयातील पदोन्नतीने भरावयाची रिक्त पदे भरण्यासाठी निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यात खुल्या प्रवर्गातील ५ जागांपैकी ३ जागा यापूर्वीच पदोन्नतीने भरलेल्या आहेत. आता दोन जागा रिक्त असून जेष्ठतेनुसार श्री. यु. के. नारवाणी व श्री. बी. जे. भटीजा, कनिष्ठ अभियंता हे महापालिकेच्या सेवाप्रवेश नियमावलीनुसार उप-अभियंता या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असल्याने त्यांना उप अभियंता या पदावर पदोन्नती देण्याची निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ७२ दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे निवड समिती शिफारशीला अनुसरून श्री. यु. के. नारवानी व श्री. बी. जे. भटिजा कनिष्ठ अभियंता यांना उप अभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र.७ :- श्री. नितेश प्रकाश रंगारी, यांची कर निरीक्षक या पदासाठी नियुक्ती रद्द करणे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब विषय क्र. ७ हा जो प्रशासनातर्फे विषय इथे आलेला आहे. मी बोलतो आणि त्याच्यानंतर बोला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-तुम्हाला जास्त माहिती आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-पहिली गोष्ट मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची जी प्रक्रिया आहे. ती महानगरपालिका असताना जेव्हा सुरूवात झाली आणि मला वाटते या उल्हासनगरमध्ये आता आताशी कुठे मागासवर्गीयांना न्याय मिळायला लागला होता. आणि आज हा जो विषय आयुक्तांनी इथे आणला आहे. हा विषय वाचुन असे वाटले की कदाचित तुम्ही राजकीय प्रेरीत होवून विषय आणला असेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-असे बोलतात मग बोलावे लागते.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-पहिली गोष्ट हा विषय येऊच शकत नाही असे माझे म्हणणे आहे. हा विषय आणायलाच नको पाहिजे होता. या विषयामध्ये तुम्ही जे लिहिले आहे त्यामध्ये तुम्ही स्पष्टपणे लिहिलेले आहे वाचुन दाखवितो. अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवाराच्या महापालिकेने गठीत केलेल्या निवड समितीने माहे जुन २००३मध्ये मुलाखत घेवून गुणवत्तेनुसार उमेदवाराची निवड करून त्याची यादी व प्रतिक्षा यादी महापालिका महासभा ठराव क्र. ५९ दि. १८.७.२००३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सरळ सरळ लिहिले आहे त्याची गुणवत्तेनुसार निवड केली आहे. कर निरिक्षक यासाठी एक पद भरावयाचे होते व त्यासाठी गुणवत्तेनुसार नितेश प्रकाश रंगारी यांची निवड केली होती. गुणवत्तेनुसार तुम्ही निवड केलेली आहे. सदर उमेदवारास निवडीस २० जुन, २००३ रोजी झालेल्या महासभेच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली त्यानंतर सदर उमेदवारास ३०जुलै रोजी आदेश पाठविले आहेत. आणि १ ऑगस्ट रोजी तो उमेदवार रूजु झालेला आहे. ऐवढे सर्व तुम्ही गोषवा-यात क्लीअर करत आहात ही त्यांची गुणवत्ता आहे तो पात्र उमेदवार आहे. त्यांना सेवायोजन कार्यालयामार्फत पात्र उमेदवारांच्या यादीत पाठविले आहे. त्याची निवड समितीने निवड केलेली आहे. आणि मग हा पुन्हा काय प्रकार आहे. हा ठराव आहे ठरावाची महासभेमध्ये मंजुरी घेतलेली आहे. महासभेमध्ये मंजुरी घेतल्यानंतर तुम्ही पुन्हा दुसरे ठराव करत आहात. त्याला काढुन टाकण्याचा. तुम्ही हा ठराव राज्य शासनाकडे का नाही पाठविला. इथे आणण्याचा मतलब काय होता. माझी सूचना अशी आहे, माझी विनंती अशी आहे की मागील जो ठराव होता तुमची जर काही हरकत असेल प्रशासनाची काही हरकत असेल तर राज्य शासनाकडे पाठवा. त्यांना मान्यता दयावी. किंवा तसे होत नसेल, तुम्हाला मागासवर्गीयांवरचा अन्याय जर थांबवायचा असेल तर तुम्ही आता सुध्दा ठराव बदलु शकता. तुम्ही

मागे जे ३१ वर्षाचे वय असलेला त्याला घेतले वय क्षमापनाचा ठराव तुम्ही केला आहे. ३१ वर्षे वयाची मंजुरी दिली. फायरमनसाठी जी नियमावली मागवली होती. त्यामध्ये उमेदवार पात्रतेमध्ये बसला नसताना देखिल तुम्ही त्याला प्रशिक्षणाला पाठविले आहे. या व्यक्तीचा ऐज्युकेशनमध्ये ३ वर्षाचा अनुभव आहे. शैक्षणिक क्षेत्रामधुन त्यांनी लिपिकसाठी जो अनुभव होता तो त्यांनी इथे दिलेला आहे. तुम्ही कर विभागासाठी जो अनुभव मागितला आहे. कर विभागात जर तीन वर्ष असेल तर तो इथे कशाला येईल. तुमची नियमावली जी आहे, ती बदलायला पाहिजे होती. त्याचवेळी बदल करायला पाहिजे होती. तुम्ही त्या नियमावलीच्या माध्यमातुन हे उमेदवार इथे आले आहे. आणि श्री. नितेश रंगारी यांच्या गुणवत्तेनुसार तुम्ही त्याची नियुक्ती केली आहे. महासभेने मंजुरी दिलेली आहे. त्याची एक निवड वैद्य ठरवायला पाहिजे. तुम्हाला जर वाटले तुम्ही हा ठराव राज्य शासनाकडे पाठवा त्यांची मंजुरी आल्यानंतर तुम्ही घ्या.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>हा जो प्रस्ताव आला आहे श्री. नितेश रंगारी यांचा. तो कोण आहे कुठला आहे याविषयी आम्ही विचारत नाही. परंतु प्रश्न हा आहे की, २० जुनच्या सभेमध्ये त्याची नियुक्ती मंजुर केली जाते. नंतर १ ऑगस्ट पासुन त्याला कामावर घेतले. त्याचे आदेश नंतर १८ तारखेला रदद केला. आम्ही पण ब-याच मुलाखती दिल्या आहेत नोकरीसाठी. मुलाखत होते त्यावेळी सर्व कागदपत्रे तपासली जातात जसे या प्रकरणात पण झाले आहे. की नियमावलीनुसार असे व्हायला पाहिजे होते की तो पदवीधर आहे की नाही व तीन वर्षाचा अनुभव त्यास आहे की नाही? सर्वात आधी जेव्हा सेवायोजन कार्यालय येथुन त्याचे नाव आले आहे. त्यांनी नियमानुसार जर त्यांचे नाव बसत असेल तरच नाव पाठवायला पाहिजे होते अन्यथा नाही. त्यांनतर पण जेव्हा महापालिकेत मुलाखतीसाठी म्हणुन उमेदवार येतो तेव्हा महापालिकेत जी पण निवड समिती होती एक दोन-तीन सदस्य होते त्यांचे हे काम होते त्याचे सर्व जे कागदपत्रे आहेत ते तपासण्याचे. तो पदवीधर आहे की नाही? त्यास तीन वर्षाचा अनुभव आहे की नाही? ते त्याचवेळेस तपासावयास पाहिजे होते. तिथे पण महापालिकेची चुक झाली आहे. तिथे पण पाहिले नाही. त्यानंतर जेव्हा नियुक्ती केली जाते तर कामावर घेण्यापुर्वी हजेरी पत्रकावर सही करण्यापुर्वी आपण त्यांना तोपर्यंत नियुक्त करायचे नाही जोपर्यंत कागदपत्र तपासत नाही. ही तिसरी चुक कशी झाली? आणि आमचे अधिकारी एकाच विषयावर तीन-तीनदा चुक कशी करतात. याचा पण तुम्ही विचार केला पाहिजे. कारण की असे बरेचसे लोक आहेत ज्यांनी सर्विस केली आहे. आम्ही असे कधीच नाही ऐकले की माणसाची कागदोपत्री पात्रता नव्हती. तरी त्याला नियुक्त केले व नंतर नियुक्ती रदद केली. ऐवढी मोठी चुक कशी झाली आहे त्याचा जरा खुलासा करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आमच्या समोर आला आहे. जी पदे वर्षापासुन रिक्त होती ती भरली जात आहे. त्यासाठी आम्ही आयुक्तांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर जेव्हा जेव्हा नियुक्ती केली जाते मला वाटते त्यांचे जे कायम आदेश असतात ते तात्पुरते दिले जातात. जे मागासवर्गीय आहेत त्यांना जातीचा दाखला दयावा लागतो. मी श्री. दिलीप गायकवाड यांना सांगु इच्छितो की, मी उपायुक्त मुख्यालय श्री. लोणारे साहेब यांना विचारले होते त्यांनी म्हंटले होते की आम्ही ज्यांची पण नियुक्ती करतो त्यांना त्यात अट घालतो. की दोन वर्षासाठी हे पद तात्पुरते असेल. तुम्ही जर कार्यक्षमतेत खरे उतरला नाहीत. प्रमाणपत्रे वैद्य आहेत ती जर वेळेवर दिली नाहीत तर तुमचे जे पद आहे ते रदद केले जाईल. जेव्हा आम्ही इथे पदोन्नती दिली होती तेव्हा महासभेत या गोष्टी बोललो होतो. निवड समितीने जर कोणताही निर्णय घेतला व चुकीची नियुक्ती झाली तर महासभा जबाबदार राहणार नाही. तुम्ही कायदयानुसार नेमणुक करा. जर त्यांनी चुक सुधारली तर मला वाटते जेव्हा जागे होतो तेव्हापासुन सकाळ परंतु ती जी चुक झाली आहे. यापुढे अशी चुक होवू नये. याकडे लक्ष दयावे जर दुसरी पण नियुक्ती अशी झाली असेल तर ती पण रदद करू ज्याचा अधिकार आहे त्याला मिळाला पाहिजे नगरसेवक जे

आरक्षित जागेवरून निवडुन येतात. आम्हाला पण प्रमाणपत्र वैद्य आहे की नाही हे दाखवावे लागते. अवैध असेल तर पण रदद केले जाते त्यानुसार नियुक्ती अनुशेषने होते मी श्री. प्रमोद टाले यांना सांगु इच्छितो की सक्षमता, तीन वर्षाचा अनुभव किंवा शिक्षण प्रमाणपत्र या ज्या गोष्टी आहेत त्यासर्व जरूरी आहे व जर प्रशासनाने योग्य नियुक्ती म्हणुन आणले होते आम्ही ती मान्य केली. आता ती नियुक्ती चुकीची म्हणुन आहे असे आणले आहे तर महासभेचे काम आहे चुकीच्या कामाला नाही म्हणणे भले मग ते ॲन्टी करप्शनचे असो किंवा चुकीची अपॉइंटमेंट असो महासभा कधीही रिस्क घेणार नाही. तर मला वाटते हा जो विषय आहे हा सर्वसंमतीने पास झाला पाहिजे. हे पद रदद केले जावे. मी असे ऐकले आहे की यातुन एक व्यक्ती कोर्टात देखिल गेला आहे. तर महापालिका तिथे देखिल वकील नेमुन केस जिंकतील अशी अपेक्षा ठेवुन हे जे पद भरले होते ते रदद केले जावे धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय क्र. ७ आलेला आहे. त्यामध्ये कुणाला पद देणे व नंतर रदद करणे त्यामध्ये काय असले पाहिजे. ४-५ जण जी कागदपत्रे तपासायला मुलाखतीच्या वेळी बसले होते त्यांनी त्यावेळी काय केले. त्यांनी काय पाहिले नव्हते का की त्यांच्याकडे पात्रता आहे की नाही? त्यांची पात्रता नसुन देखिल त्यांना दिले तर पात्रता असलेल्या व्यक्तीला रदद केले असेल असे पण बरेचसे लोक असतील जे अनेक पदावर येण्यापासुन मुकले असतील. जेव्हा ऐवढी चुक करतात. त्याच्याकडे कागदपत्र नसुन त्यांना पदावर घेतले जात नाही. तर अशा खुपशा चुका देखिल झाल्या असतील माझ्या मते ज्याची योग्यता असुन सुध्दा त्यांना निवडले नसेल. यात मला खुप मोठा घोटाळा वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u>मा. महापौर, मला वाटते आधी निवड समितीचा त्याच्यामध्ये इंटरेस्ट असेल आता नसेल म्हणुन रदद करण्यात येत असेल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. महापौरजी, अनुशेष भरतीच्या निमित्ताने पहिल्यांदा प्रशासनाने पाहिले की निवड समिती काय असते. याच्यापुढे अशी पध्दत नव्हती. आम्हाला आवडला एखादा माणुस आम्ही ठराव केला. आणि नेमुन टाकला. परंतु या भरतीच्या निमित्ताने पहिल्यांदा निवड प्रक्रिया काय असते. उमेदवार कसे मागविले जातात. त्यांच्या मुलाखती कशा घेतल्या जातात. त्यांच्या कागदपत्रांची छाननी केली जाते त्यांना आठ आठ लोकांसमोर मुलाखतीसाठी जावे लागते आणि त्याच्यानंतर महासभेसमोर आल्यानंतर कायदेशिर प्रक्रियेमध्ये या नेमणुका केल्या जातात. हे पहिल्यांदा आम्हाला अनुशेष भरतीच्या निमित्ताने बघायला मिळाले आहे. आणि आम्हाला वाटते ही एक चांगली पध्दती या महापालिकेमध्ये सुरू झालेली आहे परंतु त्याच्यानंतर आता अशा पध्दतीमध्ये एखादया उमेदवाराच्या बाबतीमध्ये अनुभवाची किंवा कुठली तरी एखादी या नेमणुकीमध्ये फार अशी गंभीर अट आहे. किंवा आवश्यक अट आहे असे म्हणता येणार नाही. अशा प्रकारच्या अटीला धरून त्यावर बोट ठेवून एखादया उमेदवाराला नोकरीला लागल्यानंतर रूजु झाल्यानंतर १८ दिवसानंतर लक्षात यावे व त्याची नेमणुक रदद करावी हे मला असे वाटते की अत्यंत चुकीचा पायंडा याठिकाणी पडतो. चांगला पायंडा नाही. याच्यापुर्वी जर आपण बघितले तर तुम्ही तपासले तर सगळी प्रकरणे तपासली तर अनुभव आणि पात्रता या सगळयाच गोष्टी तुम्हाला दिसतील. मुददा यामध्ये असा आहे की, एखादया संपुर्ण प्रक्रियेमध्ये सेवायोजन कार्यालयातुन नावे मागवल्यानंतर त्यांना त्या आठ-आठ लोकांसमोर मुलाखतीसाठी गेल्यानंतर आणि पुन्हा तुम्ही महासभेसमोर तो विषय ठेवला होता त्या विषयामध्ये तुम्ही स्पष्टपणे म्हंटले होते पात्र उमेदवारांची यादी पुढीलप्रमाणे निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांची यादी पुढील प्रमाणे ही सगळी नावे तुम्ही त्यामध्ये दिली होती. आणि त्या तुमच्या गोषवा-यावर या ऐवढया सगळया समितीने मंजुर केलेली यादी आयुक्तांनी आपल्या सहीने हा गोषवारा इथे सादर केला आहे. त्या विश्वासावर या नेमणुका महासभेने मंजुर केल्या तर अशा पध्दतीने महासभेने मंजुर केलेल्या नेमणुका या परस्पर आपण

रदद करता. तर अशा प्रकारच्या महासभेने मंजुर केलेल्या नेमणुका आहेत त्या परस्पर रदद करण्याचा अधिकार आपल्याला आहे का? हा सुध्दा येथे एक तांत्रिक मुददा आहे. हा एक भाग दुसरा मुददा असा आहे की, ज्या नेमणुका आपण मंजुर केल्या महासभेच्या ठरावाने केल्या होत्त्या आणि साधारणपणे महासभेचा एखादा ठराव हा तीन महिन्यापर्यंत दुरूस्त होत नाही. जर आपल्याला ही नेमणुक रदद करायची असेल किंवा यामध्ये दुसरा काही बदल करायचा असेल तर त्या ठरावामध्ये सुध्दा आपल्याला दुरूस्ती करावी लागेल. तर साधारणपणे तीन महिन्यापर्यंत एखादा ठराव दुरूस्त होत नसेल तर आज ते आपण कसे काय करणार हा एक मुददा आणि तिसरा मुददा असा की मागच्या महासभेमध्ये मी जो मुददा मांडला होता की एखादे प्रकरण जर न्यायालयामध्ये असेल तर त्याबाबतीत आपण चर्चा करू शकतो का? निर्णय घेवू शकतो का आता हे प्रकरण मला वाटते तुम्ही गोषवा-यात दिले आहे. की सदर उमेदवार न्यायालयात गेलेला आहे मग न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित असताना आपण त्यावर कुठल्याही बाबतीत निर्णय घेवू शकतो का? हे तीन मुददे आहेत. तर त्या मुददयावर आपण यावर स्पष्टीकरण दयावे. आणि त्यादृष्टीने आपण पुढचे निर्णय घ्यावेत असे मला वाटते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा.महापौर महोदया,या नियुक्ती विषयी जी प्रक्रिया झाली त्यात कुठे चुक झाली हे मी सभागृहासमोर आणु इच्छितो, माझ्याकडे एक तक्रार आली एका अपात्र उमेदवाराची नियुक्ती झाली. त्यानंतर आम्ही तपासणी केली व जेव्हा माहिती पडले की हा उमेदवार अपात्र असताना देखिल निवड समितीने शिफारस केली ,आम्ही महापालिकेसमोर ठेवले महानगरपालिकेने सुध्दा आमच्या अहवालावर विश्वास ठेवुन मान्यता दिली आम्ही नंतर त्यास नियुक्त केले. नंतर ते काम करू लागले. ज्यादिवशी त्यांची मुलाखत झाली त्याच दिवशी त्याची कागदपत्र तपासली गेली होती. व त्याच दिवशी ज्यांनी कागदपत्रे पाहिली त्यांना माहित होते की त्यांच्याकडे अनुभवाचा जो दाखला पाहिजे . तो नाही. त्यानंतरही त्याची शिफारस केली गेली व तुमच्या समोर ठेवून आपण मंजुर केले. ही जी चुक झाली ती सर्वात प्रथम सेवायोजन कार्यालयाकडे मागणी केली. तिकडुन चुक सुरू झाली. आमच्या भरती नियमानुसार उमेदवाराकडे तीन वर्ष कोणत्त्याही स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर विभागाचा अनुभव असणे गरजेचे होते. ही जी शैक्षणिक पात्रतेची अट आहे त्याशिवाय अनुभवामध्ये स्पष्ट लिहिले होते. की तीन वर्ष स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कर विभागात काम केल्याचा अनुभव पाहिजे भले तो लिपिक म्हणुन असो. वरीष्ठ लिपिक म्हणुन असो. किंवा कर निरीक्षक म्हणुन असो. परंतु तीन वर्षाचा अनुभव असणे जरूरी होते. तरी पण आम्ही सेवायोजन कार्यालयात रिक्वीझीशन पाठविले. सेवायोजन कार्यालयाने हा व्यक्ती नोकरीवर असुन देखिल त्याचे नाव बेरोजगार यादीत पाठविले याचा अर्थ जेव्हा सेवायोजन कार्यालयातुन नाव येते. जर अनुभवी कर्मचा-याची आवश्यकता असते तेव्हा सेवायोजन कार्यालयात जाण्याची आवश्यकता नसते. अनुभवी कर्मचा-याची आवश्यकता असुन देखिल आमचे रिक्वीझेशन चुकीचे होते. सेवायोजन कार्यालयाने त्याची शिफारस केली त्याचा अनुभव पाहुन नाही तर त्याची शैक्षणिक पात्रता पाहुन शिफारस केली. व नंतर निवड समितीने त्याचे नाव सुचवायला नाही पाहिजे होते त्यांच्याकडुन ती चुक झाली. ती चुकी जेव्हा आम्ही तुमच्या समोर प्रस्ताव पाठविला त्यावेळी आमच्या लक्षात आली नाही. प्रस्ताव पाठविल्यानंतर लक्षात आल्यावर तर मला वाटते जेव्हा एखादी चुक लक्षात येते मला वाटले असते किंवा इतरांना वाटले असते ही चुक तुमच्या समोरून देखिल गेली होती. त्यात जर काही अनफेअर प्रॅक्टीस असती तर ती चुक तशीच ठेवली असती. त्या व्यक्तीला कामावर कंन्टीन्यु केले असते. परंतु मला वाटते चुक जर समोर आली आहे व त्यात काही चुकीचे नाही. ते लक्षात आणणे व ते कॅन्सल करून घेणे व ती जी चुक झाली आहे ती सुधारणे. आपल्या सर्वांचे काम आहे. हा प्रस्ताव आणण्यामागे काही व्देषभाव नव्हता. या व्यक्ती ऐवजी जेव्हा भरती केली जाईल. ती अनुसूचित जातीच्या उमेदवाराचीच केली जाईल दुस-या कुणाला

भरती करायची आहे असे पण नाही. फक्त ही चुकीची नेमणुक झाली होती. जसे श्री. टाले साहेब म्हणाले की रिलॅक्सेशन झाले असते. ते पण झाले असते जर त्या व्यक्तीकडे तीन वर्षाच्या अनुभवाऐवजी एक वर्षाचा अनुभव असता परंतु कोणत्त्या तरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाहिजे. आम्ही त्याची स्वतः शिफारस केली असती ती अट शिथिल करा. असे नव्हते की अट शिथिल करण्याच्या बाजुने आम्ही नव्हतो. हे मी स्वतः तुमच्या समोर ठेवले

असते की, त्याच्याकडे तीन वर्षाचा अनुभव नाही एक वर्षाचा आहे. तर ते रिलॅक्स करा. असा प्रस्ताव मी स्वतः दिला असता. आज पण रदद करायला तुमच्या समोर आणला आहे त्याआधी आम्ही सर्व पाहिले जेव्हा हे शक्यच नाही. द अपॉइंटमेंट गैरकायदेशिर म्हणजे आधीपासुनच ही नियुक्ती बेकायदेशिर आहे असांविधानिक आहे. यासाठी आम्ही तुमच्या माध्यमाने तुमच्या मंजुरीने सुधारू इच्छितो. त्याची निवड आम्ही रदद केली ती पण संविधानिक पध्दतीने कॅन्सल केली तो आता उच्च न्यायालयात गेला आहे आम्ही तुमच्या समोर प्रस्ताव ठेवला आहे. त्यामध्ये त्याचा बचाव झाला असता की महानगरपालिकेच्या मंजुरीशिवाय आमची नेमणुक रदद केली गेली. ज्यादिवशी तो डिसक्वालिफाईड झाला. सेवेमध्ये राहण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्याला आम्ही टर्मिनेट केले परंतु जर उच्च न्यायालयात जर त्यांनी डिफेन्स घेतले की महानगरपालिकेने आतापर्यंत आमच्या टर्मिलनेशनला मंजुरी नाही दिली. तर होवू शकले असते त्याला काही दिवस कंन्टीन्युची ऑर्डर देवून नगरपालिकेची मान्यता घेवुन अपॉइंटमेंट रदद केली असती. तो मुददा कोर्टासमोर राहु नये. म्हणुन यासाठी आम्ही तुमच्या समोर आणला आहे. कायदेशिर मत असे आहे की, महानगरपालिकेसमोर जो प्रस्ताव आहे जोपर्यंत कोर्टाचा निर्णय होत नाही तोपर्यंत याबाबतीत मत घेतले जावु नये. आम्ही कोर्टासमोर ठेवु की महापालिकेसमोर आम्ही हा प्रस्ताव ठेवला आहे. आज कोर्टात प्रकरण आहे त्यामुळे निर्णय नाही घेतला गेला. परंतु निर्णय जो आहे जसा प्रस्ताव आहे. तसाच निर्णय राहील. जर कोर्टाचा निर्णय असा असेल की त्याला रिलॅक्स करून कंन्टीन्यु केले जावे. तर तुमच्या समोर तसे आणु. कोर्टाचा निर्णय जर असा लागला की महापालिकने जर मंजुरी दिली.तर त्याची नोकरी टर्मिनेट करावी. ती व्यक्ती तुमचा किंवा आमचा शत्रु नाही. परंतु जी चुक झाली आहे. ती चुक सुधारणे म्हणजे चुक दाबुन ठेवण्या ऐवजी ती दुरूस्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामुळे मी तुमच्या समोर आणले आहे. पुढचा प्रस्ताव पण तसाच आहे त्याच्याकडे तर ती पदवी सुध्दा नव्हती. इलेक्ट्रीकल इंजिनिअर पाहिजे होता तर त्याकडे इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरचा डिप्लोमा होता. प्रत्त्येक व्यक्तीकडुन चुक होते. ही तर चुक आधी लक्षात आली होती त्याचवेळी जर निर्दशनास आली असती तर त्याचवेळी प्रस्ताव आणला असता. जर निवड समितीने आमच्या समोर मांडले असते तर हा प्रस्ताव तुमच्या समोर नसता आला माझी आपणांस विनंती आहे की, आज या प्रस्तावावर चर्चा करून फक्त निर्णय प्रलंबित ठेवला जावा. निर्णय उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरच आम्ही देवू. आज या प्रस्तावावर चर्चा करून फक्त निर्णय प्रलंबित ठेवला जावा. निर्णय उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आम्ही देवू.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>नाही. नाही. हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>आयुक्त साहेबांनी, ऐवढे चांगल्या त-हेने समजावले अजुन काय बोलायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>ठिक आहे. माझी हरकत आहे. पहिली गोष्ट तर रिलॅक्सेशनची जर तुम्ही गोष्ट करत असाल तर याआधी असाच एक ठराव आला होता. कॉमर्सचे सायन्स केले होते. तेव्हा कुठे गेले होते तुमचे रिलॅक्सेशन तेव्हा कुठली पध्दत होती. तुम्ही ३ वर्षाचे १ वर्ष मागाल. कॉमर्सचे सायन्स केले तेव्हा कुठले रिलॅक्सेशन होते याचे उत्तर दया मला.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा.महापौर महोदया, त्यावेळी आम्ही भरती नियमावलीमध्ये तसा बदल करण्याचा प्रस्ताव देखिल आणला होता. तसेच सायन्सचे कॉमर्स, कॉमर्सचे सायन्स आम्ही केले नाही. पहिले भरती नियमावलीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव आम्ही आणला. नंतर आम्ही केले. इथे आम्ही तसा काही प्रस्ताव आणला नाही कारण की, कर निरिक्षकासारखी जबाबदारी असणारे पद आम्हाला वाटते ती सुपरवायझर पोस्ट आहे. त्या पदासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत कामाचा अनुभव असणे जरूरी आहे. कॉम्प्युटर ऑपरेटरसाठी सायन्स असल्याची जी अट ठेवली होती त्याऐवजी कोणतीही शाखा ठेवली आहे. तुमची मंजुरी घेतली आहे नियमात बदल केला नंतर भरती केली. आधी नाही केले.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-पहीली गोष्ट माझी सूचना आहे आयुक्तांना की याआधी जो ठराव झाला होता. .........

सत्ताधारी सदस्य:-पास. पास.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-काय पास?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:- अधिन राहुन पण काय? तुम्ही निर्णयालाच ठेवु नका. असा ठराव मंजुर करा की न्यायालयाचा जो आदेश आहे तो पुढच्या महासभेत ठेवून नंतर आम्ही स्विकारू.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-योग्य पात्रतेचा उमेदवाराचा अर्ज या पदासाठी आला होता का?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-चुकीचा विषय आणला तुम्ही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-या पदासाठी शैक्षणिक पात्रता व अनुभव महानगरपालिकेने ठरवून दिलेला आहे. असा योग्य उमेदवारानी या पदासाठी अर्ज केला होता का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-आम्ही सेवायोजन कार्यालयात मागणी केली होती. वर्तमानपत्रात जाहिरात देवून जर अर्ज मागविले तर पात्र उमेदवार मिळु शकतो. असे नाही की पात्र उमेदवार उपलब्ध नाही. परंतु असे झाले नाही आहे सेवायोजन कार्यालयातुन जी पण यादी आली. एकही उमेदवार शैक्षणिक पात्रतेत अनुभवात बसत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-ठराव या पध्दतीने असेल ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाअधिन राहुन श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची कर निरीक्षक या पदावरील नियुक्ती रदद करणे संबंधी आयुक्तांनी दिलेले आदेश कायम करीत आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाअधिन राहुन निर्णय घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-मा. उच्च न्यायालयाचा निर्णय बंधनकारक आहे. परंतु आमच्या पक्षपातळीवर ही जी मागासवर्गीय विशेष भरती मोहीम होती. आमचे असे म्हणणे आहे, आयुक्तांना विनंती आहे सभागृहासमोर की ही मागासवर्गीयांची विशेष भरती मोहीम असल्याकारणाने यात असलेली अनुभवाची अट शिथिल करून

त्यांना कामावर घेतले पाहिजे. व त्यानुसारच उच्च न्यायालयात प्रेझेंन्ट केले पाहिजे अशी माझी विंनती आहे म्हणुन तुमच्या आदेशास आमचा विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, हे चुकीचे आहे. निवड समितीला जर चुक सापडली आहे. सेवायोजन कार्यालयाने आता लक्षात आणुन दिली आहे आम्ही तर म्हणतो जी भरती केली गेली आहे. आम्ही आयुक्तांना सदनातर्फे विनंती करतो की, प्राधान्य उल्हासनगरवासियांना दिले जावे. आज सेवायोजन कार्यालयातर्फे जी पदे भरली जातात त्यात काही टक्के उल्हासनगरवासियांना आधी प्राधान्य दिले जावे. आज उल्हासनगरवाल्यांना सोडुन बदलापुर, पनवेल, ठाणे, डोंबिवली, भिवंडी येथील लोक नियुक्त होत आहेत. उल्हासनगरात भरती असुन इथलेच लोक बेरोजगार आहेत २५ ते ५० टक्के आयुक्त साहेब ठरवुन सेवायोजन कार्यालयात पाठवावो. उल्हासनगर रहिवासींनी सेवायोजन कार्यालयात नाव दिले असेल त्यांना प्राधान्य दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>जर रिलॅक्सेशन घ्यायचे असेल तर उल्हासनगर वासियांसाठी घेवू.

**मा. सदस्य श्री. यादव लालबिहारी व श्री. जाधव प्रशांत हे सभागृहाबाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>तुम्ही म्हणालात की उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहुन या नियुक्तीला रदद करत आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>असे नाही आयुक्तांचा आदेश कायम करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्तांचा आदेश काय आहे?ही त्याची नियुक्ती आहे ती रदद करायची. म्हणजे आम्ही उच्च न्यायालयाला ग्राहय धरतो की आमच्या आदेशानुसार उच्च न्यायालय निर्णय देईल. त्याचा अर्थ तसाच झालेला आहे. तसाच हायकोर्ट आदेश देईल. समजा उदया उच्च न्यायालयाने त्याची नियुक्ती कायम केली. अशी अनियमितता याआधी सुध्दा महापालिकेत झाली आहे. जसे नियम शिथील करणे. अट बदली करणे. जर हायकोर्टाने तसा निर्णय दिला तर तुमचा आदेश काय होईल. मग या महासभेच्या प्रस्तावाला सुध्दा काही अर्थ राहणार नाही. जर सायन्सच्या ठिकाणी कॉमर्स केले व कॉमर्सच्या ठिकाणी सायन्स केले. फायरब्रिगेडचा डिप्लोमा नसताना देखिल त्या वर्गातला उमेदवार मिळाला नाही म्हणुन आम्ही ती अट शिथील केली हे उच्च न्यायालयाच्या निर्दशनास आणुन दिल्यानंतर जर उच्च न्यायालयाने ही अट सुध्दा शिथिल करा जशी अगोदर दोन उमेदवारांसाठी दिली आहे तर तुम्ही काय करणार मग तुमचा आदेश आणि या महापालिकेच्या ठरावाला काही अर्थ नाही. त्यासाठी श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, ऐवढी घाई काय आहे. हायकोर्टाच्या निर्णयाची आम्ही वाट पाहु त्यांनतर नियुक्ती रदद करू की काय ठरवु. महासभेने काहीही निर्णय घेतला परंतु उच्च न्यायालयाने निर्णय घेतला त्याला कायम करा तर काय करणार?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तुमच्या शंकेचा जरा खुलासा करतो. या प्रकरणात आम्ही आधीच ॲफीडेव्हीट केले आहे उच्च न्यायालयात. त्यात आम्ही असेच लिहिले आहे की आमची जी प्रारूप नियमावली आहे. त्यात जी पात्रता निर्धारीत केली आहे. त्यानुसार त्याची नियुक्ती केली होती. परंतु तो पदास पात्र नसल्याने आम्ही त्याला कामावरून काढुन टाकले आहे. तर रिलेक्सेशनचा इथे प्रश्न नाही. जर आपण रिलेक्सेशन करायचे ठरविले तर परिस्थितीत बदल होईल. तर आजच्या परिस्थितीत बदल करायचा आहे तो बदल केला नाही अजुन. अटी आणि शर्ती ज्या नियमावलीत आहेत त्यानुसारच केले आहे त्यात बदल नाही केला. त्यात बदल करण्यासाठी तसा प्रस्ताव आणला जाईल जर बदल झाला तर

त्याला त्याचा फायदा होईल. आधी प्रस्ताव बदल करण्यासाठी येईल, व त्यांनतर नियुक्ती होईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-श्री. टाले व श्री. असरोंडकर यांचे हेच म्हणणे आहे की दोन उमेदवारांसाठी बढती नियमावलीत बदल करण्याचा प्रस्ताव आणला होता तर याच्यासाठी का नाही आणला.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-परिस्थितीत बदल होईल आता ते आपण करू शकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-चुकी आपल्याकडुन झाली आहे. अट शिथील करण्याचा प्रस्ताव तुम्ही आपल्याकडुन आणु शकला असता.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम, श्री. नाना पवार, श्रीमती. मीना सोंडे, श्री. अंकुश म्हस्के, श्री. जाधव सुरेश हे सभागृहातुन बाहेर पडले.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मला योग्य वाटत नाही. तो जो उमेदवार आहे. त्याच्याकडे नेमणुकीसाठी जी शैक्षणिक पात्रता पाहिजे अनुभव पाहिजे तो त्यांच्याकडे नव्हता. तो त्यानेही लपवुन ठेवला. आमच्या निवड समितीने जेव्हा छाननी केली छाननी केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले. त्यांनीही ही गोष्ट महासभेच्या निर्दशनास आणली नाही. आम्ही आमच्या प्रस्तावामध्ये आणतो या अगोदरच्या दोन प्रस्तावामध्ये आणले आहेत. आपल्या समोर आणले आणि आपल्या मान्यतेनंतर त्यांची नेमणुक केली. या कारणामुळे ही जी नेमणुक आहे ती गैरकायदेशिर आहे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणीः-मा. महापौरजी, मी आपले लक्ष गोषवा-याकडे वेधु इच्छितो आपण नेमणुक केली, ठिक आहे. त्यानंतर आपणांस माहित पडले की चुक झालेली आहे. आपण नेमणुक रदद केली हा पुर्ण अहवाल आपण गोषवा-यामध्ये समोर ठेवला आहे. आपल्या गोषवा-याचे शेवटचे वाक्य असे म्हणते सदर प्रस्ताव महासभेच्या माहितीकरिता सादर. आपण आम्हाला माहिती देवू इच्छिता की आपण जी नेमणुक रदद केली आहे. तिचे समर्थन, सहमती हवी आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आम्हाला त्यावर निर्णय पाहिजे. आम्ही त्यांची नियुक्ती रदद करण्याचा जो आदेश दिला आहे त्याबाबत निर्णय पाहिजे. महासभेकडुन.

मा. सदस्य श्री. देंवेदसिंग खेमाणीः-बरोबर आहे. त्यांची नेमणुक रदद करण्यासाठी सदन सहमत आहे ना? तर पुढच्या विषयाकडे गेले पाहिजे ना. प्रशासनाकडुन जी चुक झाली आहे ती सुधारली जात आहे. अतिशय चांगले पाऊल उचलले जात आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, जेव्हा अनुशेष भरतीचा प्रश्न येथे आला होता तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, या गोष्टीला महासभा जबाबदार राहणार नाही. तो प्रशासनाचा निर्णय आहे. आणि आज हा विषय आमच्या दृष्टीकोनातुन चुकीचा विषय आहे. आणि या चुकीच्या विषयावर या महासभेने मला वाटते कुठलाही निर्णय घेवू नये आणि तुम्हाला जर त्यामध्ये काही अडचण असेल तर तुम्ही हा विषय राज्य सरकारकडे पाठवुन दयावा.

मा. सदस्य श्री. राजेश वदरीयाः-मा. महापौरजी, ही अट जर येथे शिथील केली जात असेल तर ज्या उमेदवारांची आम्ही निवड केली नाही. त्यांची नेमणुक करण्याची संधी त्यांना मिळावयास पाहिजे होती. किंवा असेही उमेदवार येवू शकतात की जे म्हणतील मला माहित नव्हते की आपण ही अट शिथील करू

इच्छित आहात. व आता आपण ही अट शिथील करत आहात तर होवू शकते. त्यामध्ये माझा समावेश होवू शकत होता.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ज्या प्रकारे मी आपणांस सूचना दिली. तर याप्रकारे आपण ठराव केला आणि मा. उच्च न्यायालय मा. आयुक्तांचा आदेश मान्य करत नसेल तर आपला ठराव सुध्दा आपोआपच रदद होवू शकेल. आणि जर मान्य केला तर दोन्ही मान्य होतील.

मंजुर?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आम्ही आयुक्त महोदयांच्या आदेशांच्या विरूध्द आहोत.

**मा. सदस्य श्री. भालेराव गौतम हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मतदान घेतले जावे काय? एक मिनिट सत्ताधारी पक्षाचे सदस्य आपसामध्ये सल्लामसलत करत आहेत.

जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ३५ मते</u>

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. ऐडके गणपत
५. श्रीमती. शर्मा कमला
६. श्री. गुप्ता प्रभुनाथ
७. श्री. मोहन साधवानी
८. श्रीमती. आहुजा नीता
९. श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१० श्रीमती. मसंद माया
११ श्रीमती. वनवारी मोना
१२ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१३ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१४ श्रीमती. खिलनानी भावना
१५ श्री. खेमाणी दर्शनासिंग देवेंद्रसिंग
१६ श्रीमती. कारीरा रेखा
१७ श्री. पमनानी ईश्वर
१८ श्री. पंजाबी नारायण
१९ श्रीमती. पंजाबी दिपा
२० श्री. लबाना होशियारसिंग
२१ श्री. तलरेजा विनोद
२२ श्रीमती. रिझवानी सुजाता
२३. श्रीमती. दासानी मिनु
२४ श्रीमती. साधवानी जया
२५. श्रीमती. वसिटा बेबी
२६ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२७ श्रीमती. करोतिया मालती
२८ श्री. राजेंद्रसिंग भुल्लर
२९ श्री. गायकवाड दिलीप
३० श्रीमती. बामणकर नंदिनी
३१ श्रीमती. खांडेकर प्रेमा
३२ श्रीमती. माने किरण
३३ श्री. धनंजय बोडारे
३४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी

३५ श्री. राजेंद्र चौधरी

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>पास? सर्वानुमते?

श्री. प्रमोद टाले फक्त आपला विरोध असेल? भाजपाचा सुध्दा? ठिक आहे.

<u>प्रस्तावाच्या विरोधात मते:-८</u>

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती. मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम
६. श्री.राज असरोंडकर
७. श्रीमती. कृष्णानी रेखा
८. श्री. टाले प्रमोद

<u>मा. महापौर:-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.,

<u>विषय क्र.७ :-</u> श्री. नितेश प्रकाश रंगारी, यांची कर निरीक्षक या पदासाठी नियुक्ती रद्द करणे.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. बीसी. सी. <u>२००२/१३०६/१६/ब</u> दिनांक २६ मार्च, २००३ मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दिनांक ३० जुन, २००३ पर्यंत मुदत दिलेली होती. त्यानुसार महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवा योजन कार्यालय ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर तसेच विदयार्थी रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई यांच्याकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या महापालिकेने गठित केलेल्या निवड समितीने माहे जुन, २००३ मध्ये मुलाखती घेवून गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करून त्याची यादी व प्रतिक्षा यादीस महापालिका महासभा ठराव क्र. ५९ दिनांक १८.७.२००३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत सदर उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. करनिरिक्षक (अनु. जमाती) १ पद भरावयाचे होते व त्यासाठी गुणवत्तेनुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची निवड केली होती. सदर उमेदवाराच्या निवडीस दिनांक २० जुन, २००३ रोजी झालेल्या महासभेच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली. त्यानंतर सदर उमेदवारास दिनांक ३० जुलै, २००३ रोजी आदेश पाठविले होते. त्यानुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी हे दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी कर निरिक्षक या पदावर रूजु झाले.

सेवाप्रवेश नियमावलीमध्ये कर निरिक्षक या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये

जकात / कर विभागात ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असावा असे नमुद केले आहे. सदरच्या नियमावलीनुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची शैक्षणिक पात्रतेविषयी कागदपत्रांची पडताळणी केली असता, सेवा भरती नियमाप्रमाणे कर निरिक्षक या पदाची अर्हता धारण करीत नसल्यामुळे जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१२० दिनांक १८ ऑगस्ट, २००३ च्या आदेशान्वये त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

सदर आदेशाविरूध्द श्री. नितेश प्रकाश रंगारी यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ३०३०७५/०३ दाखल केली आहे.

सदर प्रस्ताव महासभेच्या माहितीकरीता सादर.

महासभा ठराव क्र. ७३ दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाधीन राहुन श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची कर निरीक्षक या पदावरील नियुक्ती रद्द करणे संबंधी आयुक्तांनी केलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढचा विषय सुध्दा याच प्रकारचा आहे. मंजुर? सर्वानुमते?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-पुढच्या विषयावर आम्हास चर्चा करायची आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- तो उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी, दोन्ही विषय अलग अलग आहेत. एक उच्च न्यायालयात गेला आहे. दुसरा उच्च न्यायालयात गेलेला नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

विषय क्र. ८:- श्री. दिनेश सोनाजी गावित यांची कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदासाठी नियुक्ती रदद करणे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी, सभेपुढे चर्चा करण्यासाठी जेव्हा कोणताही विषय येतो. त्यावेळेस सन्माननिय सदस्यांचे त्यावर काय विचार आहेत ते ऐकुन घेतले पाहिजेत. हिंदीमध्ये एक म्हण आहे.

'' सच्चे कोई न पतजाए, झुठे जग पतजाए ''
गली गली गोरस बीके, मदिरा बैठ बिकाये ''

सत्य कुणाला पसंत पडत नाही. सत्य गोष्ट बोलली तर ती चुकीची वाटते ''झुठे जग पतजाए. खोटया गोष्टीवर सर्वजण विश्वास करतात. कबीर पुढे म्हणतात की ज्याप्रमाणे दुध गल्लोगल्ली जावुन विकावे लागते व दारू बसल्या बसल्या विकली जाते. मी या विषयावर बोलु इच्छितो या विषयाच्या प्रस्तावामध्ये लिहिले आहे. डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअर.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-विश्वास देण्याचा प्रयत्न करू नका.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-हा जो विषय आहे. कनिष्ठ अभियंता विद्युत, यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट ही होती की, त्या व्यक्तीस विद्युत इंजिनिअरची पदविका असणे आवश्यक आहे. सर्वात प्रथम प्रमाणपत्र जे पाहायचे होते. तेथे जी निवड समिती बसली होती. त्यांनी हे पाहायचे होते की, त्यांच्याकडे विद्युत इंजिनिअरची पदविका आहे किंवा नाही. ऐवढी लहानशी चुक, आमचे जे उपायुक्त तेथे बसले होते. ते करतात तर ही अतिशय आश्चर्याची गोष्ट आहे. स्पष्टपणे लिहिले आहे की, त्याच्याकडे विद्युत पदविका असली पाहिजे. यामध्ये चुक होवू शकते की जो पहिला विषय होता त्यामध्ये एक चुक होती. त्यांना त्याचे ज्ञान नाही. श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की, ज्याप्रकारे नगरसेवकांचे पद रदद होते. इतर मागासवर्गीयांचे प्रमाणपत्र सादर करून नगरसेवक झाले. नकली सर्टीफीकेट लावुन यांनी कमीत कमी नकली पदवीकेचे प्रमाणपत्र तर लावावयास पाहिजे होते? त्यानंतर रदद केले असते तर गोष्ट वेगळी होती. प्रमाणपत्रच नाही. आणि विनाप्रमाणपत्राची त्याची नेमणुक केली जाते. याचा अर्थ स्पष्ट होतो की जी भरती झाली आहे ती डोळे बंद करून झाली आहे कित्येक असे लोक असतील, किती असे विद्यार्थी असतील जे भरतीसाठी येथे आले असतील व त्यांना पात्रता असुन देखिल ते लोक या पदापासुन वंचित राहिले असतील. ही गोष्ट लक्षात घेता मी. मा. आयुक्त साहेबांना निवेदन करेन. कृपया या विषयाकडे गंभीरतेने लक्ष देवून जेवढी पण भरती झाली आहे, जर आपणांस काही चुका आढळुन आल्या असतील, कुणी चुका आपल्या निर्दशनास आणल्या असतील तेव्हा कुठे आपण या दोन प्रकरणांकडे पाहिले आहे. असे बरेचसे लोक आणखी असु शकतील. कृपया मी आपणांस निवेदन करेन की जेवढी काही भरती झाली आहे. त्याबाबत आपण योग्य प्रकारे लक्ष दिले पाहिजे. हे नाही की जेव्हा कुणी तक्रार करेल तेव्हा तिचा पाठपुरावा केला पाहिजे. कृपया मी आपणांस निवेदन करेन की, जी भरती झाली आहे ती चुकीच्या पध्दतीने झाली आहे. व आपण कृपया आणखी एक वेळा कमीत कमी प्रमाणपत्रे तर पाहावीत. अशी मोठी चुक की त्यांच्याकडे पदविकेचे प्रमाणपत्रच नाही. कृपया माझे निवेदन आहे की, जेवढी काही भरती झाली आहे त्या लोकांची प्रमाणपत्रे आपण पाहावित.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, प्रमाणपत्र नव्हते असे नाही. त्यांच्याकडे डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर हे प्रमाणपत्र होते. व आमच्या येथे इलेक्ट्रीकल इंजिनिअर साठी अर्ज मागविले होते. व सेवायोजन कार्यालयानेही या व्यक्तीची शिफारस केली होती. इलेक्ट्रीकल इंजिनिअर साठी, इतरही होते. हा पुर्ण प्रस्ताव आम्ही रदद केला आहे. दुसरा जो

उमेदवार आहे त्यासही आम्ही घेणार नाही. पुन्हा अर्ज मागवु. व नंतर सेवायोजन कार्यालयाकडुन पून्हा शिफारस मागवु. व नंतर ही भरती होईल.

**मा. सदस्या श्रीमती. नीना नाथानी ह्या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आतापर्यंत जी भरती झालेली आहे. त्यात ही दोनच प्रकरणे आहेत. आणखी नाहीत ना? तुमचे समाधान झाले आहे. बाकीच्यांचे बाबतीत, जे तुमच्या लक्षात आले ते तुम्ही आणले आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी सभागृहास सांगु इच्छितो जेव्हा कुण्याही व्यक्तीची नेमणुक होते. तेव्हा दोन वेळा त्याच्या कागदपत्रांची छाननी होते. एक मुलाखतीच्या दिवशी, व नंतर दुस-यांदा जेव्हा तो कामावर हजर होण्यासाठी येतो. कामावर हजर होण्याच्या वेळेस मुळ कागदपत्र पाहिली जातात. कधी कधी एखादया व्यक्तीकडे मुळ कागदपत्र नाहीत. त्यांची सत्य प्रत आहे तिच्यावर सुध्दा त्या व्यक्तीस मुलाखतीची संधी दिली जाते. परंतु नेमणुक करण्याअगोदर त्यांची मुळ कागदपत्रे पडताळुन पाहणे जरूरीचे असते. ती मुळ कागदपत्रे पडताळुन पाहताना ही चुक लक्षात आली. हा जो दुसरा माणुस आहे त्याला आम्ही कामावर रूजु करून घेतलेले नाही. निवड झालेल्या उमेदवारांमध्ये त्याचे फक्त नाव आले होते. नेमणुकीचे पत्र त्यास पाठविले होते. परंतु त्यास कामावर रूजु करून घेतले नाही कारण की त्या व्यक्तीकडे याबाबतची पदवी नव्हती. यानंतर प्रत्येक उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची छाननी होईल. पोलिस रेकॉर्डची सुध्दा छाननी होईल. जर कुण्या उमेदवाराच्या बाबतीत पोलिसांकडुन काही अहवाल प्राप्त होत असेल त्याचे पोलिस रेकॉर्ड ठिक नाही. असा जर अहवाल येत असेल काही फौजदारी केसेस जर त्याच्यावर असतील तर होवू शकते पुन्हा एकदा आम्हास आपल्या समोर यावे लागेल. असे नाही की पुन्हा यावे लागणार नाही. हे सर्व होते जर कुणी व्यक्ती जर अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देत असेल, यासाठी आता शासनाने जोपर्यंत त्यांचे प्रमाणपत्राची छाननी होत नाही. तोपर्यंत नेमणुकाच करू नका. असे निर्देश दिले त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या ज्या चुकीच्या नेमणुका होत होत्या ते आता पुर्णपणे थांबल्या आहेत. परंतु अशा ज्या गोष्टी आहेत त्या होत असतात. त्याबाबत मी अधिक निवेदन करू इच्छित नाही. इलेक्ट्रीकल्स आणि इलेक्ट्रॉनिक यामुळे चुक झाली.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मा. महापौर महोदया, प्रत्येक विषयात आमचे आयुक्त साहेब म्हणतात की ही चुक झाली जो अधिकारी चुक करतो त्याच्या बाबतीत आपण काहीच करत नाहीत. प्रत्येक विषयात आपण म्हणता हा जो प्रश्न आहे त्याच्या उत्तरात चुक आहे. यांनी हे चुकीचे केले. निवड समितीने ऐवढी मोठी चुक केली त्यांना शिक्षा काय? ते आपण कधीच सांगत नाहीत. प्रत्येक विषयात आपण म्हणता की, अधिका-यांनी ही चुक केली आहे. चुक झाली आहे. अशा कितीवेळा चुका होणार? ऐवढी मोठी निवड समिती त्यांना हे माहित पडत नाही. तर यासाठी आपण काय करता? नेहमी अशी चुक होत राहणार का? आज यांनी चुक केली. उदया दुसराही कुणी चुक करेल. एक रिझॉल्युशन पारीत केला की आपली महापालिका आम्ही विकुन टाकली. नंतर म्हणाल नाही नाही ती चुक झाली. आम्ही नाही विकली असे कसे चालेल? अधिकारी जो आपली जबाबदारी निभावत नाही. त्याच्यावर कारवाई केली पाहिजे.

मा. प्रभारी आयुक्त(श्री. आर. के. सोनवणे):-मा.महापौर महोदया,आम्ही वारंवार उल्लेख केला की चुक झाली आहे. परंतु चुकीच्या मागे सुध्दा दोन उददेश असतात. कधी कधी नजर चुकीने चुकीचा निर्णय घेतला जातो. पुर्वग्रहदुषीत हेतु जर असेल तर त्यास शिक्षा करणे. त्यावेळेस ती चुक गृहीत धरली जात नाही. त्यावेळेस तो अपराध समजला जातो. एखादया चुकीच्या मागे जर अल्टेरीयल मोटीव्ह आहे तर तो अपराध ठरतो. मला आमच्या कर्मचा-यांच्या बाबतीत असे सांगायचे आहे की, एका दिवसात १०० मुलाखती घ्यायच्या होत्त्या. राज्य शासनाचे वारंवार आदेश होते. ३१ मार्चच्या अगोदर अनुशेष पुर्ण झाला

पाहिजे. त्यानंतर ३० जुनच्या अगोदर पुर्ण झाला पाहिजे. आता दिले आहे ३० सप्टेंबरच्या अगोदर अनुशेष पुर्ण झाला पाहिजे. या वेळेच्या निर्बंधामुळे एका दिवसात १०० लोकांच्या मुलाखती घ्याव्या लागल्या ते करत असताना. आपण हे समजु शकता की तेथे जे ४ लोक असतील त्यांना १०० लोकांच्या मुलाखतीचा जो ताण असेल त्यामध्ये काही गोष्टी सुटू शकतात. अल्टेरीअर मोटीव्ह जर यामागे असता तर मी स्वत: आपल्या समोर त्यांच्या शिक्षेबाबत प्रस्ताव ठेवला असता.

मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी, श्रीमती. दिपा पंजाबी, श्रीमती. माया मंसद हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सर्व संमतीने?

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे

विषय क्र. ८:- श्री. दिनेश सोनाजी गावित यांची कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदासाठी नियुक्ती रदद करणे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. बी.सी. सी. २००२/१३०६/१६/ब दिनांक २६ मार्च, २००३ मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दिनांक ३० जुन, २००३ पर्यंत मुदत दिलेली होती. त्यानुसार महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवा योजन कार्यालय ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर तसेच विदयार्थी रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई यांच्याकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या महापालिकेने गठित केलेल्या निवड समितीने माहे जुन, २००३ मध्ये मुलाखती घेवून गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करून त्याची यादी व प्रतिक्षा यादीस महापालिका महासभा ठराव क्र. ३८ दिनांक २०.६.२००३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर निवड यादीमधील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या संवर्गातील पदाचा समावेश होता. त्यानुसार अनुसूचित जाती या प्रवर्गातील श्री. दिनेश सोनाजी गावीत यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/७६, दिनांक २५.७.२००३ अन्वये नियुक्ती आदेश दिले. त्या आदेशानुसार श्री. दिनेश सोनेजी गावीत हे दिनांक १.८.२००३ रोजी मुळ कागदपत्रासह रूजु होण्यासाठी कार्यालयात आले असता, कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी त्यांच्या कागदपत्राची पहाणी केली. सदर उमेदवाराकडे महापालिका सेवाभरती नियमावलीमध्ये नमुद केलेली विद्युत अभियांत्रिकी पदविका (Diploma in electrical Engineering) ही शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे श्री. दिनेश सोनाजी गावीत यांना रूजु करून घेतले नाही आणि कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/ मुली/९८ दिनांक ५.८.२००३ च्या आदेशान्वये त्यांची नियुक्त रदद करण्यात आली.

सदर बाब महासभेच्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ७४ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. दिनेश सोनाजी गावीत यांची कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावरील नियुक्ती रदद करणे संबंधी आयुक्तांनी केलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र.९ :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर पर्यंत लिंक रस्त्याचे काम वगळणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-गोषवारा काय दिला आहे? कोणता गोषवारा समजायचा आम्ही?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मागे पुढे आहे ना? रदद करण्यासाठी आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-गोषवारा काय आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मागच्या बाजुला दिलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-काम करण्यासाठी गोषवारा आहे. आयुक्तांची स्वाक्षरी आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यांनी दिले आहे काम करण्यासाठी?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-हा गोषवारा पास करा. तुम्ही पाठविलेला हा गोषवारा, विषय क्र. ९ पास, पास ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, हा जो प्रस्ताव सभागृहासमोर आणला आहे तो निर्णयासाठी आणला आहे कारण याअगोदर महानगरपालिकेसमोर एक प्रस्ताव आला होता हे जे काम आहे ते आय. आर.डी.पीच्या प्रकल्पातुन वगळण्यात यावे. हा प्रस्ताव आला होता त्यावर चर्चा झाली नाही. त्यावर निर्णय अदयाप प्रलंबित आहे. तर आम्ही हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे निर्णयासाठी ते काम वगळले पाहिजे किंवा पुन्हा हाती घेतले पाहिजे वगळायचे असेल तर त्याची काही कारणे पण असली पाहिजेत. एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत हे काम हाती घेण्यात आले होते. विकास आराखडयामध्ये तो रस्ता आहे व तो रस्ता जर आज वगळायचा असेल तर त्याची काही कारणे असली पाहिजेत. ते काम का करायचे नाही? कारण की त्यासाठी एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत हे काम घेतल्यामुळे त्यासाठी एम.एम.आर.डी.ए. कडुन कर्ज मिळाले आहे. ते जे आम्ही कर्ज घेतले आहे त्याचे आम्ही व्याज भरत आहोत. त्या रस्त्यासाठी जे कर्ज घेतले त्यावर जे व्याज भरत आहोत त्याची जबाबदारी कुणाची?

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>साहेब यापेक्षाही दुसरे काही महत्त्वाचे रोड आहेत आम्ही दुसरे रस्ते घेवू.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आपल्या समोर आला आहे. हा विषय या अगोदर सुध्दा आला होता. त्यावेळी प्रशासनाच्या वतीने गोषवारा देण्यात आला होता. त्यात लिहिले होते की, हा रस्ता आम्ही तयार करू शकत नाही म्हणुन तो रदद केला जावा. मागील वेळेस हा प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला होता. हा रस्ता ३३ रस्त्त्यांमध्ये घेण्यात आला होता. परंतु रस्ते तयार करण्यामध्ये आम्ही सक्षम नसल्यामुळे तेथे बरीचशी बांधकामे तुटणार असल्याने इमारतीचे बांधकाम तुटणार असल्याने, झोपडया तुटत असल्याने यामुळे तो रस्ता तयार करण्यास आम्ही सक्षम नसल्यामुळे आम्ही हा रस्ता तयार करत नाही. म्हणुन त्यावेळेस कोणताही निर्णय घेण्यांत आला नाही. व प्रस्ताव पुढे ढकलण्यांत आला होता. आज हा जो विषय आमच्यासमोर आलेला आहे. तर यावर निर्णय घेतला जावा की हे काम केले जावे किंवा वगळले जावे. कारण की प्रशासनाने अगोदर गोषवारा आणला होता. त्यामध्ये बदल का झाला? प्रशासनाने हा रस्ता रदद करण्याचे जे ठरविले होते त्यामध्ये आम्ही असे लिहिले आहे की हे काम रदद झाले पाहिजे कारण की आता महापालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. परंतु सध्या तेथे जो रस्ता अस्तित्त्वात आहे तेवढया रस्त्त्याची दुरूस्ती झाली पाहिजे. परंतु विकास आराखडयानुसारच्या रूंदीप्रमाणे तो रस्ता तयार करण्यांत येवू नये असे प्रशासनाला वाटते. व ते संभवही नाही. म्हणुन तो रदद केला पाहिजे. असे पहिल्या गोषवा-यात लिहिले होते. तर त्या हिशोबाने मी म्हणु इच्छितो की हा रस्ता रदद केला जावा.*

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.**

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>मा. महापौरजी, आता आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, त्याची सुध्दा काही कारणे असली पाहिजेत. तर ती कारणे काय आहेत ती सुध्दा येथे सांगितली पाहिजेत. व शहरामध्ये जेव्हा ३३ रस्त्त्यांचा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. तर तो रस्ता आधीच सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन तो रस्ता त्या ३३ कामांच्या यादीमध्ये यावयास नको होता. जेव्हा हा रस्ता या ३३ रस्त्त्यांमध्ये आला आणि त्यानंतर त्यावर कर्ज घेण्यात आले. १९९९ पासुन आपण त्या कर्ज रक्कमेवर व्याज भरत आहोत तर मग तो रस्ता का तयार केला जात नाही याची सुध्दा कारणे असली पाहिजेत. याचाही खुलासा या सभागृहात झाला पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>म्हणजे महापौरजी, व विशेष करून आयुक्त साहेब, मला वाटते हा रस्ता ज्याबाबत आमचे विरोधी पक्षनेते आपणांस स्पष्टपणे सांगत नाहीत. परंतु आम्हाला असे वाटते की, मी कधीच आरोप करत नाही परंतु माझा असा आरोप आहे की, तेथे अशा एका व्यक्त्तीची इमारत आहे की ज्या व्यक्तीचे सत्त्ताधारी पक्षाशी जवळीक आहे. फक्त या कारणासाठी हा रस्ता विकसित केला जात नाही. व हा जो गोषवारा आहे पंचवटी स्टील इमारत येथील कामाचे, यासाठीच या रस्त्त्याचे काम केले जात नाही. प्रशासनास कधीही राजकीय गोष्टींना सहकार्य करून असा प्रस्ताव आणता कामा नये. फक्त या एका कारणासाठी प्रस्ताव आणता कामा नये. व या रस्त्त्याचे काम कोणत्त्याही परिस्थितीत झाले पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब याठिकाणी सन्माननिय सभागृह नेते यांनी हा रस्ता का रदद करावा याचे महत्त्वाचे कारण सांगितले आहे. ते मी आपल्या निर्दशनास आणुन देवू इच्छितो. सभागृह नेते यांनी याठिकाणी सांगितले की, तो जर रस्ता रूंदीकरण करून बनविण्यात आला तर काही लोकांची घरे तुटण्याची शक्यता आहे. गरीबांची घरे तुटण्याची शक्यता आहे. त्यांना चांगली कळकळ आहे. त्यांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो पण यानंतर जे रस्ते घेण्यात येतील त्याच्यामध्ये जर का गरीब*

लोकांची घरे असतील. दुकाने तुटणार असतील तर ते पण रस्ते तुम्ही रद्द करणार आहात का या महासभेमध्ये? याचा खुलासा करण्यात यावा. आणि याच्या अगोदर तो रस्ता घेताना लोकांची घरे तुटलेली आहेत. तर त्यांना आपण काय भरपाई दिलेली आहे व याच्या पुढे देणार आहात त्याचा सुध्दा याठिकाणी खुलासा करण्यात यावा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आयुक्त साहेब, इथे महासभेमध्ये विषय क्र. ९ चा जो ठराव आणलेला आहे. नक्की पास कुठला करायचे ते चौधरी साहेबांनी सांगितले आहे. विषय हा आहे की, रस्त्याचे काम वगळण्याबाबत विषय वाचा तुम्ही. आणि पुढे म्हंटलेले आहे की, विस्तृत माहिती दिलेली आहे. एमएमआरडी. ए. कडुन कर्ज घेतलेले आहे व ते फेडणेही आवश्यक आहे. आता पास म्हणजे नक्की काय होणार? रस्ता वगळला जाणार की तयार केला जाणार? वर विषय आहे, वगळण्यात यावा. सचिव साहेब, आता समजा आम्ही एकमताने किंवा बहुमताने हा प्रस्ताव मंजुर केला तर निश्चितपणे दोन्ही पैकी काय होईल?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मागील जो प्रस्ताव होता. तो काम रद्द करण्याबाबतचा होता. आता त्यावर जो नविन प्रस्ताव दिला आहे विषयामध्ये सुध्दा हे लिहिले आहे की वगळण्याबाबत. व खाली लिहिले आहे की आपणास निर्णय घ्यायचा आहे या महासभेमध्ये. तर निर्णय आपणांस घ्यायचा आहे की वगळायचे आहे किंवा नाही?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-परंतु हे करताना, विषय अलग आहे व गोषवा-याच्या शेवटची वाक्ये वेगळी आहेत.

**मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. लालबिहारी यादव, श्री. नाना पवार यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-परंतु संदर्भ तर तोच आहे. फक्त आपणांस निर्णय घ्यायचा आहे हो किंवा नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-हो किंवा नाही कसे होवू शकते. प्रशासनाचे म्हणणे आहे की हे झाले पाहिजे कारण आम्ही यावर खर्च केला आहे. आम्ही रस्ते तयार करणार आहोत त्यासाठी आम्हाला पैसे दया. आम्ही ते पैसे घेतले व दुसरीकडे खर्च केले. व पुन्हा जर आपण एमएमआरडीए. कडे जावुन कर्जाची मागणी केली तर एमएमआरडीए. आपणांस उभी करेल काय? जर तुम्ही चुकीची माहिती एमएमआरडीए. ला देता असे प्रत्येक ठिकाणी प्रशासन चुकीची माहिती देते. तुम्ही म्हणजे प्रशासन. तुम्ही वैयक्तिक तुमच्यावर घेवू नका.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-महापौर महोदया, आम्ही हा रस्ता तयार करू इच्छितो परंतु सध्या आम्ही तो तयार न करता दुसरा कुठला अन्य महत्त्वाचा रोड घेवू. जर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणवाले आमचे किर्लोस्कर कंन्सल्टसीचे पैसे दुसरीकडे वापरतात. तर आम्ही एमएमआरडीए. कडचे पैसे या रस्त्याकामी खर्च न करता अन्य दुस-या रस्त्यासाठी खर्च केले तर त्यात वावगे असे काय आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-सन्मानिय महापौर महोदया, तर मग खेमाणीच्या रस्त्याचे काम हाती घ्या.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-व या प्रस्तावावर मतदान घेवून त्वरीत निर्णय घेतला जावा.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-खेमाणीचा रस्ता घ्यावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-साहेब, त्या रस्त्याची स्थिती अतिशय खराब आहे. त्यारस्त्यावरून वाहन घेवून जाता येत नाही. त्या रस्त्याच्या बाजुला आम्ही राहतो. तेथुन जायला आम्हाला शरम वाटते ऐवढी त्या रस्त्याची हालत खराब आहे.

त्याची दुरूस्ती तरी आपण करणार आहात का? जर यांनी हा प्रस्ताव पुढे ढकलला तर?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौर, मा. आयुक्त सध्या अस्तित्त्वात असलेला रोड आहे. आमचे विरोधी पक्षनेता श्री. राजेंद्र चौधरी साहेब म्हणतात त्याप्रमाणे कमीत कमी त्याची दुरूस्ती तरी करून दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>महापौर महोदया, याठिकाणी चुकीचा पायंडा पडतो आहे. त्या रस्त्त्याची आवश्यकता आहे किंवा नाही. हे बॉडी किंवा प्रशासनाने ठरवायचे नसुन ते नियोजन प्राधिकरणाचे काम आहे. नियोजन प्राधिकरणाने जेव्हा या उल्हासनगर शहराचे नियोजन केले तेव्हा त्यांनी याठिकाणी रस्ता देण्याचे काही तरी प्रयोजन असणार तेव्हा त्याठिकाणी आवश्यकता नाही असे आम्ही कसे ठरविणार? नियोजन प्राधिकरणाने केल्यानंतर ते महापालिकेने महासभेपुढे आणले. आणि मंजुर करून घेतले. आणि एम.एम.आर.डी.ए. कडुन कर्ज मागितले व कर्जही घेतले. व त्या रस्त्त्याला काहीच अर्थ नाही. असेही होत नाही. परंतु केवळ कुणाच्या तरी स्वारस्थ्यासाठी तो रस्ता वाचवावा म्हणुन आम्ही तो रस्ता यातुन वगळायचा. म्हणजे ब-याच ठिकाणी असे विकास आराखडयामध्ये रस्ते आहेत त्याठिकाणी वसाहती झालेल्या आहेत. यापुढे या उल्हासनगरमध्ये विकास आराखडयाप्रमाणे कार्यवाही करणे मुश्किल होईल याची दखल घ्या. त्यानुसार निर्णय व्हावा ही साधी आणि सरळ अपेक्षा आहे. यापुढे प्रत्त्येक ठिकाणी तुम्हाला असा विरोध होईल. ज्याठिकाणी विकास आराखडयामध्ये रस्ता दर्शविला आहे परंतु प्रत्यक्षात तेथे वसाहती वसलेल्या आहेत. तिथले लोक तुमच्याकडे बोट दाखवतील. त्याठिकाणी तुमची माणसे आहेत म्हणुन रस्ता केला नाही आणि याठिकाणी तुम्ही करत आहात. आवश्यकता आहे नाही आपण ठरवायचे नाही. ते नियोजन प्राधिकरण ठरवते. नियोजन प्राधिकरणाने या रस्त्त्याची तरतुद केली आहे म्हणजे रस्त्त्याची आवश्यकता आहे. असे गृहीत धरून कृपया चुकीचा पायंडा या उल्हासनगरमध्ये आपण तरी पाडु नये. आणि आपण जे कर्ज घेतले आहे ते त्याठिकाणी वापरावे अशी अपेक्षा आहे.

**मा. सदस्य श्री. उमाप रामदास हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्केः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, तो रस्ता जो आहे तो लिंक रोड आहे साहेब. कोणता हायवे रोड नाही. आणि तिथे लोकवस्ती फक्त एका व्यक्तीसाठी आम्ही बोलतो आहे असे नाही. तर भरपुर गरीबांचे नुकसान होणार आहे आणि जर कुणाचे म्हणणे असेल की तो रस्ता ६० फुट रूंदीचा व्हावा तरी आम्हाला हरकत नाही. गरीबांची जी घरे तुटणार आहेत त्यांच्याकडे फक्त लक्ष दयावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>हा रस्ता तयार करताना ज्यांची घरे त्यामध्ये बाधित होतील. त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी असे ते म्हणत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आज हा रस्ता तयार होवून तीन वर्ष झाली आज महासभेसमोर आला तर सर्व सदस्य का ओरड करत आहेत. तीन वर्षा पर्यंत कुठल्या सदस्यांनी प्रयत्त्न केला की हा रस्ता बनला पाहिजे म्हणून?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>सभागृह नेत्त्यांना मी सांगु इच्छितो, याबाबत दहा वेळा आयुक्तांना सांगावे लागले. याबाबत मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-याशी भांडावे लागले. तेव्हा कुठे हा प्रस्ताव आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आता बोलु. विरोधी पक्षनेता मध्येच बोलत होते म्हणुन मी त्यांना बोलु दिले. तीन वर्षापर्यंत हा रस्ता तयार केला नाही. कुणीही या रस्त्त्याबाबत चर्चा करत नव्हता. कुणी पण महापालिकेत याबाबत बोलत नव्हते. ३३ रस्त्त्यांमध्ये हा एकच रस्ता राहुन गेला. का तयार होत नाही?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-पुन्हा आपण चुकीचे बोलत आहात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-तीन वर्षापर्यंत रस्ता तयार झाला नाही हे बरोबर आहे? तर तीन वर्षापर्यंत जो रस्ता तयार झाला नाही. तर याबाबत आठ महिन्यापुर्वीही प्रशासनाकडुन हा विषय महासभेपुढे आला होता. हा रस्ता आम्ही तयार करू इच्छित नाही तो रदद करावा. यानंतर एम.एम.आर.डी.ए.च्या कर्जातुन कोणते रस्ते तयार करायचे ते प्रशासन ठरवेल. कोणते रस्ते आवश्यक आहेत, कोणते रस्ते खराब आहेत. व त्याविषयाबाबत आम्ही बोलत नाही. हा रस्ता रदद करून तो रस्ता घ्या. किंवा तो रस्ता रदद करून हा घ्या. मला वाटते जेव्हा ३३ रस्ते तयार होत होते त्यावेळी सर्व पक्षीयांशी विचार विनिमय करून श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी रस्ते प्रस्तावित केले होते. परंतु २-३ रस्ते ३३ रस्त्यांमधुन राहिले आहेत. ते कोणत्त्या तरी कारणामुळे तयार होवू शकले नाहीत. हा एकच रस्ता नाही आणखी एक दोन रस्ते आहेत की जे तयार होवू शकले नाही त्यासाठी मी म्हणतो की, हा विषय अधिक न वाढविता हा रस्ता रदद केला जावा. व आमचे विरोधी पक्ष नेता जसे म्हणतात की सध्या जेवढा रस्ता अस्तित्त्वात आहे. त्याची स्थिती खराब आहे म्हणुन त्याची दुरूस्ती केली जावी. धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत. रदद करण्याच्या, प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी.........

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-जो प्रशासनाने प्रस्ताव आणलेला आहे. व आयुक्त साहेबांनी आता सांगितले आम्ही आयुक्त साहेबांच्या बाजुने आहोत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-हा रस्ता आता रदद केला जावा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे हा रस्ता रदद करण्याच्या बाजुने आहेत आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.
प्रस्तावाच्या बाजूने मते:-२९ मते.

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती. शर्मा कमला
५. श्री. पवार नाना आनंदा
६ श्रीमती. आहुजा नीता
७ श्री. शांताराम निकम
८ श्री. ठाकुर विनोद
९ श्रीमती. सोनेजी मीना
१० श्रीमती. वनवारी मोना
११ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१२ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१३ श्री लुंड गोविंदराम
१४ श्रीमती. खिलनानी भावना
१५ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
१६ श्रीमती. कारीरा रेखा
१७ श्री. पमनानी ईश्वर
१८ श्री. पंजाबी नारायण
१९ श्री. लबाना होशियारसिंग
२० श्री. तलरेजा विनोद
२१ श्रीमती. रिझवानी सुजाता
२२ श्रीमती. दासानी मिनु

२३ श्री. म्हस्के अंकुश
२४ श्री.लालबिहारी यादव
२५श्री. मोहन साधवानी
२६ श्रीमती. साधवानी जया
२७ श्रीमती. वसिटा बेबी
२८ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२९ श्रीमती. करोतिया मालती

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे हा रस्ता रद्द करण्याच्या विरोधात आहेत आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात :-१५मते

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती. मोकल सिमा
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्री.राज असरोंडकर
६. श्रीमती. कृष्णानी रेखा
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८. श्री. गायकवाड दिलीप
९. श्रीमती. बामणकर नंदिनी
१० श्री. खांडेकर प्रेमा
११ श्रीमती. माने किरण
१२ श्री. बोडारे धनंजय
१३ श्री. पाटील विश्वनाथ
१४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१५ श्री. चौधरी राजेंद्र

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र.९ :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमाांतर्गत राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर पर्यंत लिंक रस्त्याचे काम वगळणे.

प्रस्तावना :-

राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर जवळील कल्याण अंबरनाथ रस्त्यापर्यतचा लिंग रस्त्याचे कामाचे प्रस्ताव मा. महासभेची दिनांक १६.११.२००२ च्या बैठकीपुढे सादर केला होता. परंतु बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली. परंतु निर्णय झाला नाही. सदर कामासाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण कडून कर्ज घेतले असुन सदर कर्जाचे व्याज व हप्ते महापालिका भरत असल्याने सदर काम लवकरात-लवकर पुर्ण होण आवश्यक आहे.

मा. विरोधी पक्ष नेते श्री. राजेंद्र शां. चौधरी यांनी त्यांच्या दिनांक १३.६.२००३ च्या पत्रान्वये सदर विषय पुन्हा महासभेपुढे ठेवणेकरिता विनंती केली आहे.

कृपया उक्त प्रस्तावावर निर्णय होण्यासाठी महासभेच्या पटलावर पुनश्च ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ७५ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. अंकुश म्हस्के

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ मधील शांतीनगर ते पवई या रस्त्याचे पुढील काम राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर पर्यंत लिंक रस्त्याचे काम वगळीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

**मा. सदस्य श्री. भालेराव गौतम यांनी सभागृहात प्रवेश केला.**

विषय क्र.१० :- उल्हासनगर येथील पॅनल क्र. ११ मधील बॅरेक नं. १९३५ ते ३६ च्या बाजुला असलेल्या चौकास" ओ.टी. सेक्शन पंचायत चौक" असे नाव देणे.

काही सदस्य:-पास. पास.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मा. महापौरजी, काही सदस्यांनी या अगोदर काही रस्त्यांचे व चौकाच्या नावांचे प्रस्ताव दिले. त्यांचे याबाबतचे प्रस्ताव या महासभेत आलेले नाहीत. व त्यांनतर दिलेले हे दोन प्रस्ताव या महासभेत कसे आले? व मागील महासभेतच एक समिती तयार करण्यात आली आहे. व त्या समितीपुढे हा विषय येवू दया ना एवढी घाई का आहे चौकास नाव देण्याची? समितीचा आदर ठेवला पाहिजे ना जी मागील महासभेत स्थापन केली आहे. त्या समितीपुढे हा प्रस्ताव येवू दया ना? समिती निर्णय घेईल ना? नामकरणाबाबत सर्वजण एकत्रितपणे निर्णय घेतील ना?

**मा. सदस्या श्रीमती. रेखा कृष्णानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-विरोधी पक्षनेता श्री. राजेंद्र चौधरी यांनी जे म्हंटले मी त्यांच्या मताशी सहमत आहे. त्यांनी म्हंटले की जी निवड समिती स्थापन करण्यात आली आहे. ज्या समितीमध्ये महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व सर्व गटनेते यांची जी समिती तयार केली आहे. त्या समितीने यापुढे जे पण रस्ते आणि चौक यांच्या नामकरणाचे प्रस्ताव येतील ते या समितीमार्फत येतील परंतु मी आमच्या विरोधी पक्ष नेत्त्यांच्या हे लक्षात आणुन देवू इच्छितो की समिती इतिवृत्त कायम झाल्यानंतर लागु होईल. तर आज इतिवृत्त कायम झाले आहे. त्यांनतर जे काही प्रस्ताव येतील ते समितीच्या मार्फत येतील परंतु आजपर्यंत समिती नव्हती. आज इतिवृत्त कायम झाले आहे.

**मा. महापौर श्रीमती. मालती करोनिया हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आम्ही पण असे प्रस्ताव दिले होते ते का आले नाही? प्रशासनास आम्हाला तेच विचारायचे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आयुक्त साहेब, आमचे या अगोदरचे सहा महिन्यापुर्वीचे प्रस्ताव आहेत. ते का आले नाहीत?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-या विषयास पारीत केले जावे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आयुक्तांचे याबाबत काय म्हणणे आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आयुक्त साहेब आपण सांगा ना? आम्ही पण याअगोदर प्रस्ताव दिले आहेत. आमचे ते प्रस्ताव का आले नाहीत?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-मा. महापौरजी, मतदान घेतले जावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आपला जो गोषवारा होता तो अजेंडा निघाल्यानंतर प्राप्त झाला आहे. १२ तारखेनंतर प्राप्त झाला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आमचे प्रस्ताव का येत नाहीत.
मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-येथे सुध्दा राजकारण चालते का? सहा महिन्यापुर्वीचे आमचे प्रस्ताव आहेत ते का येत नाहीत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,सदस्यांकडुन नामकरणाचे जे काही प्रस्ताव येतात ते आम्ही महानगरपालिकेसमोर ठेवतो. आता महानगरपालिकेने एक समिती स्थापन केली आहे. जो कोणताही प्रस्ताव महानगरपालिकेच्या नावाने येईल. महानगरपालिकेसमोर ठेवण्याआधी तो प्रस्ताव समितीपुढे ठेवला पाहिजे व नंतर महानगरपालिकेपुढे आला पाहिजे. आम्ही पाठविला आहे महानगरपालिकेपुढे. व आज आमच्याकडे जितके पण प्रस्ताव प्रलंबित आहेत ते आम्ही महापालिकेकडे पाठवु.

मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आमचे प्रस्ताव सहा महिने आठ महिन्यापासुन प्रलंबित आहेत.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर, श्री. नाना पवार हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-जे काही प्रस्ताव आमच्याकडे आहेत ते आम्ही त्वरीत महापालिकेकडे पाठवुन देवू.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांना विचारा आमचे प्रस्ताव सहा महिन्यापुर्वीचे आहेत.
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-नंतर विचारतो, लवकरात लवकर पाठवेन.

**मा. सदस्य श्री. श्यामसुंदर रोहडा, श्री. रामदास उमाप यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-साहेब, राजकारण म्हंटले की तुम्हाला राग येतो. राजकारणाचा दुसरा अर्थ काय आहे? सत्ताधा-यांचे प्रस्ताव लगेच येतात तुम्ही सांगितले की २४ तासात, आमचे सदस्य सांगतात की सहा-सहा महिन्यापासुन आम्ही प्रस्ताव दिले आहेत. ते येत नाहीत. आणि तुम्ही सांगता की आमचा सार्वजनिक बांधकाम विभाग चुस्त आहे. २४ तासात किंवा १२ तासात तुमच्याकडे प्रस्ताव येतात. सत्ताधा-यांनी दिलेले त्यांचे स्वारस्थ्य असलेले

वगळण्याचे प्रस्ताव येथे येतात. याचेच नाव राजकारण. त्यामुळे राजकारण म्हंटले की कृपया राग येवू देवू नका. येत असेल तर टाळा कारण तुम्ही प्रशासनाचे प्रमुख आहात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन हे प्रस्ताव सगळयांचे बरोबरीने यावयास पाहिजे होते. पण फक्त ठराविक लोकांचे हितसंबंध असलेले दोनच प्रस्ताव येथे आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाला आणि प्रशासनाला माहित आहे की, याबाबत समिती स्थापन केली आहे. तरीही हे दोनच प्रस्ताव आलेले आहेत. म्हणुन हेच राजकारण आहे. हा चुकीचा पायंडा आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया ,मी सभागृहास सांगु इच्छितो की, किती प्रस्ताव आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत हे मला आता माहित नाहीत. परंतु जेवढे काही प्रस्ताव आहेत. ते सात दिवसाच्या आत महानगरपालिकेकडे म्हणजे सचिव कार्यालयात पाठविले जातील. व त्यांनतर आपल्या सदस्यांकडुन येणारे प्रत्त्येक प्रस्ताव नामकरणाचे जे आहेत ते सात दिवसात त्यावर प्रशासनाची टिप्पणी करून सचिव कार्यालयात पाठविले जातील.

**मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे प्रस्ताव पारीत करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने</u> :-२९ मते

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती. शर्मा कमला
५. श्री. रोहडा श्यामसुंदर
६. श्री. प्रभुनाथ गुप्ता
७. श्रीमती. आहुजा नीता
८ श्री. शांताराम निकम
९ श्री. ठाकुर विनोद
१० श्रीमती. वनवारी मोना
११ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१२ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१३ श्री लुंड गोविंदराम
१४ श्रीमती. खिलनानी भावना
१५ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
१६ श्रीमती. कारीरा रेखा
१७ श्री. पमनानी ईश्वर
१८ श्री. पंजाबी नारायण
१९ श्री. लबाना होशियारसिंग
२० श्री. तलरेजा विनोद
२१ श्रीमती. रिझवानी सुजाता
२२ श्रीमती. दासानी मिनु
२३ श्री. म्हस्के अंकुश
२४ श्री.लालबिहारी यादव
२५ श्री. मोहन साधवानी
२६ श्रीमती. साधवानी जया
२७ श्रीमती. वसिटा बेबी
२८ श्री. भालेराव गौतम
२९ श्रीमती. करोतिया मालती

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे प्रस्ताव पारीत करण्याच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती. मोकल सिमा
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्री.राज असरोंडकर
६. श्री. उमाप रामदास
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८. श्री. गायकवाड दिलीप
९. श्रीमती. वामणकर नंदिनी
१० श्री. खांडेकर प्रेमा
११ श्रीमती. माने किरण
१२ श्री. बोडारे धनंजय
१३ श्री. पाटील विश्वनाथ
१४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१५ श्री. चौधरी राजेंद्र

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

विषय क्र.१० :- उल्हासनगर येथील पॅनल क्र. ११ मधील बॅरेक नं. १९३५ ते ३६ च्या बाजुला असलेल्या चौकास'' ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नाव देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर येथील पॅनल नं. ११ मधील बॅरेक नं. १९३५-३६ च्या बाजूला असलेल्या चौकाचे नाव ''ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकास कोणताही कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकास '' ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ७६ दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. मोना वनवारी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर येथील पॅनल क्र. ११ मधील बॅरेक नं. १९३५ ते ३६ च्या बाजुला असलेल्या चौकास'' ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढचा प्रस्ताव सुध्दा असाच पारीत समजायचा ना?

विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ११:- उल्हासनगर येथिल पॅनल क्र. ११ मधील ब्ॅ. क्र. २०९९ च्या रूम क्र. १२ जवळील चौकास ''कैलासवासी श्री. दयाल चंदनमल वाधवा'' असे नाव देणे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-वरील प्रमाणेच्या बहुमताने हा विषय पारीत समजायचा का?

जे प्रस्ताव पारीत करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.
प्रस्तावाच्या बाजुने :-२९ मते

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती. शर्मा कमला
५. श्री. रोहडा श्यामसुंदर
६. श्री. प्रभुनाथ गुप्ता
७. श्रीमती. आहुजा नीता
८ श्री. शांताराम निकम
९ श्री. ठाकुर विनोद
१० श्रीमती. वनवारी मोना
११ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१२ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१३ श्री लुंड गोविंदराम
१४ श्रीमती. खिलनानी भावना
१५ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
१६ श्रीमती. कारीरा रेखा
१७ श्री. पमनानी ईश्वर
१८ श्री. पंजाबी नारायण
१९ श्री. लबाना होशियारसिंग
२० श्री. तलरेजा विनोद
२१ श्रीमती. रिझवानी सुजाता
२२ श्रीमती. दासानी मिनु
२३ श्री. म्हस्के अंकुश
२४ श्री.लालबिहारी यादव
२५ श्री. मोहन साधवानी
२६ श्रीमती. साधवानी जया

२७ श्रीमती. वसिटा बेबी
२८ श्री. भालेराव गौतम
२९ श्रीमती. करोतिया मालती

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे प्रस्ताव पारीत करण्याच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.
प्रस्तावाच्या विरोधात :-१५ मते

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती. मोकल सिमा
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्री.राज असरोंडकर
६. श्री. उमाप रामदास
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८. श्री. गायकवाड दिलीप
९. श्रीमती. वामणकर नंदिनी
१० श्री. खांडेकर प्रेमा
११ श्रीमती. माने किरण
१२ श्री. बोडारे धनंजय
१३ श्री. पाटील विश्वनाथ
१४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१५ श्री. चौधरी राजेंद्र

मा. महापौर:-सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ११:- उल्हासनगर येथिल पॅनल क्र. ११ मधील बॅ. क्र. २०९९ च्या रूम क्र. १२ जवळील चौकास ''कैलासवासी श्री. दयाल चंदनमल वाधवा'' असे नाव देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील बॅ. नं. २०९९ च्या रू. नं. १२, जवळील चौकास स्थानिक पत्रकार व प्रभाराम मंदीराचे पुजारी ''के. श्री. दयाल चंदनमल वाधवा चौक'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकाला ''के. श्री. दयाल चंदनमल वाधवा चौक'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ७७ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. मोना वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर येथिल पॅनल क्र. ११ मधील बॅ. क्र. २०९९ च्या रूम क्र. १२ जवळील चौकास ''कैलासवासी श्री. दयाल चंदनमल वाधवा चौक'' असे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१२ :- श्री. पुरूषोत्तम डिंगरेजा यांना उप अभियंता व श्री. गिरधारी ठाकुर यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नती देणे.

काही सदस्यः-पास. पास.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र.१२ :- श्री. पुरूषोत्तम डिंगरेजा यांना उप अभियंता व श्री. गिरधारी ठाकुर यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नती देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेतील ''उप-अभियंता'' या पदाच्या सेवा भरती नियमाप्रमाणे सरळ सेवेने भरावयाची पदे २५ टक्के पेक्षा अधीक असू नयेत. म्हणजेच जास्तीत-जास्त २५ टक्के पदे सरळ सेवेने भरता येतात. परंतु कमीत कमी प्रमाण निश्चित केलेले नाही.

उप-अभियंता भरावयाची आहेत. पदोन्नतीसाठी राखीव पदे ३३ टक्के व अराखीव ६७ टक्के असे प्रमाण आहे. त्यानुसार ३ राखीव व ५ पदे अराखीव प्रवर्गासाठी राहतील ०१ राखीव पद (अ. जाती) भरलेले असुन ०२ पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध नाही. अराखीव ०३ पदे भरलेली आहेत. आणि दिनांक ११.७.२००३ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. नारवाणी व श्री. भठिजा, कनिष्ठ अभियंता यांना पदोन्नती देण्याची शिफारस केलेली आहे. अशा प्रकारे अराखीव पदे भरली जाणार आहेत.

सरळ सेवेने भरावयाची पदे २५ टक्के पेक्षा अधिक असु येत. अशी तरतुद सेवा भरती नियमात आहे. परंतू कमीत-कमी कितीची तरतुद नाही. अशा परिस्थितीत महानगरपालिकेतील अनुभवी व जेष्ठ कनिष्ठ अभियंत्यांना संधी देणे योग्य असल्याने खुल्या प्रवर्गातील ०१ पद पदोन्नतीने भरण्यात यावे. जेष्ठतेनुसार

श्री. पी. आर. डिंग्रेजा हे पदोन्नतीसाठी पात्र आहेत. सेवा भरती नियमाप्रमाणे ते पदोन्नतीच्या अटी पुर्ण करित असल्याने त्यांना उप-अभियंता या पदावर पदोन्नती देण्याची शिफारस निवड समितीने केलेली आहे.

२. कनिष्ठ लेखा परिक्षक

''कनिष्ठ लेखा परिक्षक'' या पदासाठी सेवा भरती नियमानुसार सरळ सेवेने भरावयाची पदे २५ टक्के पेक्षा अधिक असू नयेत अशी तरतुद आहे. कनिष्ठ लेखा परिक्षक या संवर्गात ६ पदे मंजुर आहेत. त्यातील ०१ पद सरळ सेवेने व ५ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. पदोन्तीसाठी राखीव पदे ३३ टक्के व अराखीव ६७ टक्के पदे असे प्रमाण आहे. त्यानुसार ०२ पदे राखीव व ०३ पदे अराखीव प्रवर्गासाठी आहेत. कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नतीसाठी सेवाभरती नियमानुसार मुख्य लेखा परिक्षक यांच्या अधिपत्त्याखालील विभागात लिपिक म्हणुन ०५ वर्षे काम केल्याचा अनुभव अशी अर्हता विहित केली आहे. सेवाजेष्ठता यादीनुसार वरिल अर्हता धारण करणारे फक्त श्री. जी. एम. ठाकुर, लिपिक हे असून ते खुल्या प्रवर्गातील आहेत. त्यांचे व्यतिरिक्त खुल्या प्रवर्गात अथवा राखीव प्रवर्गात कोणताही कर्मचारी पदोन्तीसाठी पात्र नाही. त्यामुळे श्री. जी. एम. ठाकुर, लिपिक आवश्यक पात्रता धारण करित असल्याने त्यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी निवड समितीने शिफारस केलेली आहे.

सबब, निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे श्री. डिंग्रेजा यांना उप-अभियंता या पदावर पदस्थापना देण्यास व श्री. ठाकुर यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदस्थापना देण्याची शिफारस आहे.

मान्यतेसाठी सादर.

महासभा ठराव क्र. ७८ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे निवड समितीच्या शिफारशीस अनुसरून श्री. पी. आर. डिंग्रेजा, कनिष्ठ अभियंता यांची उपअभियंता या पदावर पदस्थापना आणि श्री. गिरधारी ठाकुर ,लिपिक यांची कनिष्ठ लेखा परीक्षक या पदासाठी पदस्थापना करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १३:-</u> <u>शांतीसेवा संस्थेस सहा शौचालय " पैसे द्या व वापरा" या तत्त्वावर देणे.</u>

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा. महापौरजी, हा जो सार्वजनिक शौचालयाचा विषय येथे चर्चेस आला आहे यामध्ये कॅम्प १ येथे दोन शौचालये आहेत. २ नंबर मध्ये ५ शौचालये आहेत. ३ नंबर मध्ये १ आहे. परंतु ४ नंबरसाठी आम्ही वारंवार लिहुन दिले आहे की, मेन बाजारामध्ये दुकानदारांना व येणा-या जनतेस खुपच असुविधा होते. वारंवार पत्र लिहुन देखिल सुध्दा कॅम्प ४ साठी सार्वजनिक शौचालयांची या प्रस्तावामध्ये तरतुद केलेली नाही. मेन बाजारा संबंधि दोन या तीन सार्वजनिक शौचालयाचा प्रस्ताव या प्रस्तावात समाविष्ट केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदरिया :-</u>मा. महापौरजी, येथे कॅम्प नं. १ मध्ये सिरू चौक परिसरात उल्हासनगर २ येथे जी जुनी मुतारी आहे. त्याबाबत प्रस्ताव दिलेला नाही. त्याबाबत काय म्हणणे आहे त्याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:-</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्तजी, ही जी सहा सार्वजनिक शौचालये दर्शाविली आहेत. शांतीसेवा संस्थेकडुन तयार करून ती सुलभ शौचालयासारखी वापरली जातील. मी हे जाणुन घेवू इच्छितो की ज्या विभागामध्ये महानगरपालिकेची जी शौचालये आहेत. त्यास कुणी खाजगी व्यक्ती चालवु शकतो का? सुलभ शौचालयांच्या आधारावर? जर कुणी याबाबत अर्ज केला की आम्ही यांची देखभाल करू इच्छितो तर त्यास परवानगी दिली जाईल का? कारण की असे दोन अर्ज आलेले आहेत. दोन कर्मचारी, दोन माणसे त्यांची देखभाल करण्यास तयार आहेत. तर त्यांना याच आधारावर याकामी परवानगी दिली जावु शकते का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>मा. महापौर महोदया, या विषय क्र.१३ च्या संदर्भात जे परिशिष्ठ दिले आहे. संगणकामध्ये मजकुर सेव न झाल्याने त्यामध्ये थोडेसे काही शब्द चुकीचे आले आहेत. मी त्यांची दुरूस्ती करू इच्छितो. नंबर २ मध्ये जागेमध्ये कोणताही पोट भाडेकरु ठेवता येणार नाही. अथवा हस्तांतरण महापालिकेच्या विना परवानगीने म्हंटलेले आहे ते हस्तातरण केले जाणार नाही अशी दुरूस्ती पाहिजे त्यानंतर त्यामध्ये ४ नंबरमधील ब मध्ये तीन वर्षानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे मंजुरीनुसार वेळोवेळी सेवाशुल्कात वाढ करण्यात येईल असे पाहिजे. नंबर ६ मध्ये मुददा क्र. इ जेथे आवश्यकता असेल तेथे जूने बांधकाम स्वखर्चाने व संस्थेच्या जबाबदारीवर मा. आयुक्त यांच्या मान्यतेनुसार तोडण्यात येईल असे पाहिजे आणि म मध्ये स्वच्छता गृहाचे बांधकाम कार्यादेश दिल्यापासून तीन महिन्यात सुरु करणेत येईल अन्यथा सुरक्षा अनामत जप्त करणेत येईल अशी दुरूस्ती पाहिजे. इथे जो प्रश्न विचारला आहे त्याचे मी उत्तर देतो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>गोषवा-यामध्ये ऐवढया चुका. प्रत्येक गोषवा-यामध्ये चुका होतात. उपायुक्त काय करतात?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>प्रथम श्री. राजेश वदरीया यांनी प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर देवू इच्छितो सिरू चौकाच्या परिसरात दोन मुतारी ही जी शौचालये होती. ज्या संस्थेनी दिली होती ती रस्ता रूंदीकरणाच्या वेळी निष्कासित झाली आहेत. यामुळे ती ठेवता आली नाहीत. व दुसरे एक आहे जे यामध्ये आलेले नाही. ते आहे शहाड स्टेशन समोर जे शौचालय आहे मी या संस्थेच्या पदाधिका-यांबरोबर साईट इन्स्पेक्शन केले आहे. त्यावेळी मी असे पाहिले की, ही जी शौचालये आहेत जी श्री. भुल्लर महाराज यांनी बांधुन घेतली आहेत. त्यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतुन बांधुन घेतली आहेत. या

शौचालयांबाबत मी त्यांच्या आजुबाजुच्या परिसरातील लोकांना विचारले की, पैसे दया आणि वापर करा या तत्त्वानुसार २५ रूपये प्रत्येक कुटुंबाकडुन घेवून पास दिला तर आपण या शौचालयांचा वापर करण्यास तयार व्हाल का? तर त्यास लोकांचा विरोध होता. यासाठी आम्ही त्या संस्थाना दिली नाहीत. व दुसरा जो श्री. रूपाणी साहेबांनी प्रश्न विचारला होता. खाजगी कुण्या एका व्यक्तीस हे काम देवु शकत नाहीत. कमीत कमी नोंदणीकृत संस्था असली पाहिजे तिला याकामीचा अनुभव असला पाहिजे अशी नोंदणीकृत संस्था असणे जरूरीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>अनुक्रमांक ३ पहा. यामध्ये जी लिस्ट दिली आहे तीचे....

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>पहिली लिस्ट म्हणता की दुसरी लिस्ट?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आपण जी यादी दिली आहे त्यातील अ.क्र. ३ मध्ये काय आहे?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>अ. क्र. ३ मध्ये रामचंद मार्केट समोर...

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>तेथे काय आहे?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>तेथे ६ शौचालये आहेत, १० मुतारी आहेत एकुण १६ सिटस् आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मुतारीचे पैसे घेतात का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>प्रस्तावात स्पष्टपणे लिहिले आहे मुतारीचे पैसे घेतले जाणार नाहीत. आजच्या तारखेत शौचालयांची तेथे जी परिस्थीती आहे. ती दर्शविली आहे. हे पहा अ. क्र. ४ वर फक्त मुतारी आहे हे बरोबर आहे परंतु जर तेथे शौचालयाची आवश्यकता पडली तर ती संस्था तेथे शौचालय देखिल बांधेल यासाठी दिले आहे. गोषवा-यामध्ये बिल्कुल स्पष्ट केले आहे आपण कृपया गोषवारा वाचुन पहा.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u>मा. महापौरजी, परिशिष्ठामध्ये चुकीच्या दुरूस्तीमध्ये मजुरीमध्ये मोफत लिहिले आहे हा काय प्रकार आहे? परिशिष्ठामध्ये अ.क्र. ४ मध्ये जे कॉलम दिले आहेत मजुरी व पुढे दिले आहे. बाहेर गावावरून येणा-या नागरिकांकरिता...

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-</u>महापौर महोदया, जे तेथे कामगार लावले जातील. त्यांचा काही खर्च दयायचा नाही हाच त्याचा अर्थ आहे. जे दयायचे आहे ते लाईटचे बिल, पाणी बिल व त्याच्या दुरूस्ती व देखभालीसाठी जो पैसा खर्च करायचा आहे त्यासाठी ते लागणार आहे. म्हणुन मजुरी दिलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u>मा. महापौरजी, मुतारी आहे की मजुरी आहे बरोबर आहे का ते?

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदरीया:-</u>मा. महापौरजी, यामध्ये अ. क्र. ३ मध्ये शासनाने जी परवानगी दिली आहे. की त्यांच्याकडुन वीस रूपये आपणांस घ्यायचे आहेत. प्रत्येक महिन्यास. परंतु प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे तो २५ रू. प्रतिमाह याप्रमाणे आहे. व सिरू चौक येथील जो प्रस्ताव आपण येथे दिला नाही. त्याचे काय करत आहात?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-शासन निर्णयामध्ये किमान २० रूपये असे लिहिले आहे. जास्तीत जास्त किती त्याची काही मर्यादा नाही. आम्ही २५ रूपये ठेवले आहेत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-साहेब कॅम्प ४ साठी ३, ४ शौचालयांची तरतुद ठेवा.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानीः-मा. महापौर, कॅम्प नं. ५ येथे झुलेलाल मार्केट व मेन बाजार येथील शौचालयांची तरतुद ठेवली जावी. नवजीवन बॅकेच्या बाजुला, अशा प्रकारे पैसे दया आणि वापरा याप्रकारे सार्वजनिक शौचालयाची तरतुद केली जावी.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, आपणां सर्वांना आठवत असेल की काही दिवसापुवी महानगरपालिकेच्या समोर असा प्रस्ताव, एक प्रस्ताव प्रशासनाने आणला होता की महानगरपालिका क्षेत्रात जेवढी काही सार्वजनिक शौचालये आहेत. त्यांची देखभाल व दुरूस्ती किंवा त्यांची पुर्नबांधणी सेवाभावी संस्थेकडुन करून घ्यायची आहे. आपण जर स्वतः आपल्या प्रभागामध्ये जर एखादी सोसायटी नोंदणीकृत करत असाल. ट्रस्ट नोंदणीकृत करत असाल व ते जर देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी घेत असतील तरच आपणांस सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल दुरूस्तीची परवानगी दिली जाईल. किंवा पुर्नबांधकामाची परवानगी दिली जाईल. आमच्या समोर फक्त एकच संस्था पुढे आली आहे. एका संस्थेने जो प्रस्ताव दिला त्यातील योग्य जो प्रस्ताव आहे. तो आपल्या समोर ठेवला आहे. जर आपल्या प्रभागामध्ये महानगरपालिकेची शौचालये आहेत त्यांच्या पुर्नबांधकाम आणि देखभाल दुरूस्तीसाठी लोकांनी जर आपली स्वतःची संस्था तयार करत असतील तर त्यांच्याकडे सुध्दा याबाबतची जबाबदारी दिली जावु शकते व त्यांचे सहकार्य याकामी घेतले जावु शकते. माझी सभागृहास विनंती आहे की आपण आपल्या प्रभागामध्ये अशी संस्था रजिस्टर करावी व देखभाल व दुरूस्तीसाठी लोकांना प्रवृत्त करावे. लोकांना आपण सुध्दा प्रोत्साहन दयावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय क्र. १३ मध्ये अ.क्र. ५ जो आहे. उल्हासनगर १ येथील बस स्टॉपचा. तेथे पाच मुता-या आहेत. आपण शौचालय लिहिले आहे. परंतु प्रत्यक्षात तेथे मुता-या आहेत. तर तेथे मुता-या बनणार की त्यांना तोडुन शौचालये बनणार?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त आरोग्य):-मा. महापौर, आपण जर पुर्ण प्रस्ताव वाचलात तर या संस्थेस जर त्या मुता-यांचे निष्काशनाची जरूरी पडली व तेथिल लोकांची तशी मागणी झाली मुतारी पण पाहिजे व स्नानगृह पण पाहिजे तर ते सुध्दा ते तयार करू शकतात. आजच्या स्थितीत जे तेथे आहे त्याची माहिती दिली आहे. आजच्या स्थितीला तेथे मुतारी आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदरीयाः-मा. भडकवाडजी,मा. महापौरजी, सिरू चौकच्या स्थितीबाबत आपण अदयाप खुलासा केला नाही त्याबाबत आपणांकडे आणखी काय प्रस्ताव आहे. तेथे मुतारी व सार्वजनिक शौचालयाची खुपच आवश्यकता आहे. आता आपण रस्ता रूंदीकरणाच्या वेळेला महापालिकेने ते निष्कासित केले आहे. तर त्याचे पुढे काय?

काही सदस्य :-पास. पास.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १३:- शांतीसेवा संस्थेस सहा शौचालय '' पैसे द्या व

वापर" या तत्वावर देणे.

प्रस्तावना :-

१)प्रास्ताविक :-

शांती सेवा संस्था, मुंबई यांनी त्यांच्या कडील दिनांक ११.८.२००३ च्या पत्रान्वये उल्हासनगर शहरातील खालील प्रमाणे ८ शौचालय/मुतारी यांची दुरुस्ती व पुर्न:बांधनी स्वखर्चाने करुन पैसे दयावे आणि वापर करा या तत्वावर संबंधित शौचालय/मुतारी ची निगा राखणे व सुव्यवस्थित चालवणे संबंधी प्रस्ताव दिला आहे.

१) शिरु चौकाच्या परिसरात उल्हासनगर - २ (जूनी मुतारी)
२) चेलाराम मार्केट जवळ, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
३) राणी मॉ कॉम्पलेक्स, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
४) रामचंद्र मार्केट समोर, टोकियो मार्केट समोर, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
५) उल्हासनगर - १, बस स्टॉप जवळ, (जूने शौचालय)
६) गजानन मार्केट, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
७) स्मशान भूमी जवळ, उल्हासनगर - ३ (जूने शौचालय)
८) शहाड रेल्वे स्टेशन समोर, शहाड फाटक, नयना कन्फेक्शनरी मागे, उल्हासनगर- १ (जूने शौचालय)

२) **शौचालयाची सद्यस्थिती** :-वरील ठिकाणांचे जागेवर जाऊन तपासणी केली असता सदर शौचालयांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | शौचालयाचे /मुतारीचे ठिकाण | पुरुष शिटची संख्या | | | स्त्री शिटची संख्या | | | वापर | बांधकाम स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संडास | मुतारी | एकूण | संडास | मुतारी | एकूण | | |
| १ | चेलाराम मार्केट जवळ,उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ४ | ६ | १० | - | - | - | सुरु आहे. | नादुरुस्त |
| २ | राणी मॉ कॉम्पलेक्स, उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ७ | ७ | १४ | - | - | - | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ३ | रामचंद्र मार्केट समोर, टोकियो मार्केट समोर, उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ६ | १० | १६ | - | - | - | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ४ | उल्हासनगर - १, बस स्टॉप जवळ, (जूने शौचालय) | - | ४ | ४ | - | १ | १ | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ५ | गजानन मार्केट, उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ६ | ५ | ११ | १ | - | १ | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ६ | स्मशान भूमी जवळ, उल्हासनगर - ३ (जूने शौचालय) | ३ | - | ३ | ३ | - | ३ | सुरु आहे. | नादुरुस्त |

३) **<u>शासनाचे धोरण</u>** :-

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वाच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मुंसाशी-१०००/ स.क्र.२४१/प्र.क्र. १३/पापु २१, मंत्रालय, मुंबई- ३२, दिनांक ३० ऑगस्ट, २००१ नुसार शासनाचे धोरण खालील प्रमाणे आहे.

“सुलभ वा तत्सम् सेवाभावी संस्था तर्फे “पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घ्यावा. सेवाभावी संस्थांची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती /सर्व साधारण सभा ठरवतील, त्या निकश अटी व शर्ती प्रमाणे करावे. यासाठी सर्व सुविधा (वीज, पाणी, मल:निस्सारण व्यवस्था इ.) महानगरपालिकेने उपलब्ध करुन दयाव्यात. या शौचालयाच्या बांधकाम आणि किंवा देखभाल दुरुस्तीसाठी व चालविण्यासाठी दिर्घ मुदती करारावर ते अशा संस्थाना देण्यात यावेत. यासाठी शौचालय वापरणा-या प्रत्येक कुंटुबांकडून संबंधित सेवाभावी संस्थेने मासीक किमान रु. २० वर्गणी घ्यावी व त्यातून वीज, पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्ती इत्यादीचा खर्च भागवावा.''

४) **<u>प्रशासनाचा प्रस्ताव</u>** :-

वरील पैकी स्मशान भूमी जवळ उल्हासनगर - ३ येथील शौचालयाचा वापर झोपडपट्टीवासिय लोक करत असल्याने त्यांना रक्कम रु. २५ प्रति महा प्रति कुटुंब आकारणी करुन अन्य वापर करणा-यांना इतर शौचालयाच्या अटी व शर्ती नुसार पैसे आकारणी केल्यास उपरोलेख्वीत सहा शौचालये / मुतारी खालील अटी व शर्ती नुसार देता येऊ शकतील, मात्र मुतारी साठी शुल्क आकारणी करु नये . तसेच सदरच्या सहा शौचालयासोबत संस्थेने एकास दोन या प्रमाणात अन्य आयुक्त ठरवतील अशा बारा शौचालयाची निगा राखणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

सद्यस्थितीत महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर प्रस्तावामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत परस्पर संबंधित शौचालयाची देखभाल व दुरुस्ती होणार असल्याने नागरीकांना चांगल्या प्रतीच्या सेवेची संधी प्राप्त होणार आहे.

तरी वरील परिस्थितीत शांतीसेवा संस्था, मुंबई यांना उपरोल्लीखीत ६ शौचालये/मुतारी पुढील अटी व शर्ती नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार मा. महासभेच्या मंजूरी नंतर हस्तांतरण करणेस हरकत नाही. तरी मा. महासभेसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

## <u>अटी व शर्ती</u>

१) **<u>जागेची मालकी</u>** :-

जागेची व वास्तूची संपूर्ण मालकी उल्हासनगर महानगरपालिकेची राहिल. जागेचे प्रति शिट रु. ५ (मुतारी वगळून) प्रति महीना भाडे महानगरपालिकेकडे जमा करावे लागेल.

२) **<u>जागेचा वापर</u>** :-

जागेमध्ये कोणताही पोट भाडेकरु ठेवता येणार नाही. अथवा हस्तांतरण केले जाणार नाही. तसेच सदर जागेचा वापर केवळ शौचालय/ मुतारी/स्नानगृह यासाठीच करावा लागेल.

३) **<u>वापराचा कालावधी</u>** :-

सार्वजनिक स्वच्छता गृह हे महानगरपालिकेच्या मालकीचे राहील व सदरचे स्वच्छता गृह २० वर्षे कालावधीसाठी “ पे ॲण्ड युज '' या धर्तीवर संस्थेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येईल व नंतर विनामुल्य महानगरपालिकेकडे हस्तांतर केले जाईल.

४) **<u>वापराचे दर</u>** :-

अ) पहिल्या तीन वर्षासाठी सेवाशुल्क दर पुढील प्रमाणे राहतील.

| स्वरुप | बाहेर गावावरुन येणा-या नागरीकांकरीता | कायम स्वरुपी नागरीकांकरीता |
|---|---|---|
| मुतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रु. १/- | दरमहा २५/प्रति कुटुंब/ प्रतिमाह (पाच व्यक्ती पर्यंत) |
| स्नानासाठी | रु. ५ /- | दरमहा ७५/प्रति कुटुंब/ प्रति माह (पाच व्यक्ती पुढे) |

ब) तीन वर्षानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे मंजूरीनुसार वेळोवेळी सेवाशुल्कात वाढ करण्यात येईल.

क) मंजूर सेवाशुल्क दर्शविणारा दरतक्ता दर्शनीभागावर संस्थेमार्फत बसविण्यात येईल.

५) कर्मचारी वर्ग :-

अ) नियोजित शौचालयाच्या ठिकाणी आवश्यक असणारा कर्मचारी वर्गाची नियुक्ती संबंधित संस्था स्वखर्चाने करेल

ब) संबंधित कर्मचारी कामावर असताना अपघात झाल्यास किंवा संबंधितांनी गैरवर्तन केल्यास होणा-या परिणामास महापालिका जबाबदार राहणार नाही.

क) अस्तित्वात असणारे विविध कामगार कायदे तसेच किमान वेतन कायदा यामधील तरतूदी संबंधित कर्मचा-यांनाही लागू करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

६) इतर सर्वसाधारण अटी व शर्ती :-

अ) सार्वजनिक स्वच्छता गृहाचे बांधकाम संस्था स्वखर्चाने करण्यास तयार असून त्याबाबत कोणताही मोबदला उल्हासनगर महानगरपालिकेकडून घेण्यात येणार नाही.

ब) स्वच्छता गृहाचे बांधकाम हे महानगरपालिकेने मंजूर केलेल्या संकल्प चित्रानुसार व आर.सी.सी. डिझाईन नुसार करण्यात येईल.

क) पाणी व विद्युत जोडणी संस्था स्वखर्चाने करेल तसेच पाणी व विद्युत मिटर प्रभाग क्षेत्र अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांचे नावे राहिल.

ड) पाणी वा विद्युत यांचे मासिक देयक संस्थेमार्फत अदा करण्यात येईल.

इ) जेथे आवश्यकता असेल तेथे जूने बांधकाम स्वखर्चाने व संस्थेच्या जबाबदारीवर मा. आयुक्त यांच्या मान्यतेनुसार तोडण्यात येईल.

फ) स्वच्छता गृहाचे बांधकाम करताना संबंधित शासकीय कार्यालय व शहर वाहतूक निरीक्षक यांच्या आवश्यकतेनुसार ना हरकत दाखला घेणेची जबाबदारी संस्थेची राहिल.

ग) पाणी व विद्युत व्यवस्था मान्यता प्राप्त प्लंबर व वायरमन यांचे मार्फत करण्यात येईल.

ह) स्थापत्य व विद्युत देखभाल व दुरुस्ती व सार्वजनिक दैनंदिन स्वच्छता संस्थेस स्वखर्चाने करावा लागेल.

ज) भविष्यकालीन तरतूदीसाठी अथवा रस्ता रुंदीकरणासाठी महापालिकेस जागा आवश्यक भासल्यास स्वच्छता गृह त्वरीत स्वखर्चाने तोडून दयावे लागेल.

ल) सुरक्षा अनामत रक्कम रु. २५,०००/- मात्र परताना स्वच्छता गृहाचे वापर सुरु झाल्यावर तीन महिन्यांनी मागण्यात येईल व सदर सुरक्षा अनामत रक्कम प्रति शौचालयास रु. २५,०००/- राहिल.

म) स्वच्छता गृहाचे बांधकाम कार्यदिश दिल्यापासून तीन महिन्यात सुरु करणेत येईल अन्यथा सुरक्षा अनामत जप्त करणेत येईल मात्र बांधकाम होईपर्यंतच्या काळात संस्थेने संबंधित वापर करण्यासाठी चलत शौचालयाची (मोबाईल टॉयलेट ) व्यवस्था करावी लागेल.

७) दंडात्मक कारवाई:-

शौचालय देखभाल दुरुस्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेने तीन महिन्यांच्या आत काम पूर्ण करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. विहित मुदतीत काम पुर्ण न झाल्यास प्रति दिन रक्कम रु. २५ /- दंड आकारला जाईल.

८) अटी व शर्तीचा भंग :-

संस्थेने त्यांना घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास संबंधितासोबत केलेला करारनामा रद्द ठरविण्यात येईल व जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संस्था संबंधित शौचालयाचे विनामुल्य महापालिकेस हस्तांतरण करेल.

अटी व शर्तीच्या भंग या सदराखाली खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

अ) जागेच्या वापरात बदल करणे
ब) विहित केलेल्या दरा व्यतिरिक्त जास्तीच्या दराची आकारणी करणे.
क) आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचा भंग करणे.
*ड) अन्य अटी व शर्तींचे पालन न करणे.*

९) विधीविषयक कार्यक्षेत्र :-
सदर स्वच्छता गृहाबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत महानगरपालिके मार्फत सुनावणी घेण्यात येईल व त्याबदल्यात आयुक्त यांचा निर्णय संस्थेला बंधनकारक राहिल.

महासभा ठराव क्र. ७९ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वर उल्लेखलेल्या अटी व शर्तीवर व त्या व्यतिरिक्त आयुक्तांस इष्ट वाटल्यास अशा अटी , शर्ती व निर्बंधावर शांतीसेवा संस्था, मुंबई यांना स्वखर्चाने उपरोलिखित ६ शौचालयाचे/ मुतारीचे बांधकाम/ देखभाल दुरुस्ती व चालविणेकामी २० वर्षाच्या कालावधीसाठी हस्तांतरण करणेस मान्यता व ''पैसे द्या वापरा'' या तत्वावर उपयोगास मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.*

*विषय क्र. १४:- विशेष समित्त्यांची नेमणूक करणे बाबत.*

*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौर विषय क्र. १४ जो आहे त्या विषयाबाबत मी बोलेन की आता आठ वाजले आहेत. आमच्या महिला नगरसेविकांना जायचे आहे. खुप वेळ झाला आहे म्हणुन ही सभा स्थगित करून २९ तारखेला सोमवारी सायंकाळी ४.०० वाजता ठेवण्यात यावी.*

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-साहेब १९ तारीख नको, प्लीज.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:आयत्त्यावेळी मध्ये जो झोपडपट्टी बाबत जो विषय आला आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-१९ तारखेला नको नवरात्र असल्यामुळे आम्ही येवू शकणार नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनी:-लवकर पुर्ण करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी श्री. बच्चाराम यांना धन्यवाद देतो ते म्हणाले लवकर पुर्ण करा. जास्त वेळ तुम्हीच सभा चालवता. धन्यवाद. दुसरा विषय असा आहे की आयत्त्यावेळीचा जो विषय आणला गेला आहे ६४ झोपडपट्ट्यांना घोषित करायचे आहे व त्यांचा सर्व्हे करायचा आहे. मला वाटते १९ तारखेपर्यंत. तुम्ही ६४ झोपडपट्टया कोणत्त्या आहेत याची यादी दिलेली नाही. ती यादी सर्व सदस्यांना दयावी आणि दुसरे जे सदस्य १९ तारखेपर्यंत झोपडपट्टी बाबत अर्ज देतील त्यापण जोडल्या जाव्यात अशी माझी विनंती आहे. कारण इतर झोपडपट्टया आहेत. आमच्या सदस्यांच्या प्रभागात झोपडपट्टया आहेत त्यांना मान्यता मिळाली पाहिजे. १९ तारखेपर्यंत जो अर्ज देईल त्यांची झोपडपट्टी ६४च्या यादीमध्ये जोडली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-आधी ६४ कोणत्त्या त्या तर माहित पडल्या पाहिजेत.

मा. महापौर:-आपल्या सर्वांच्या संमतीनुसार सदरच्या सभेचे कामकाज दि. १९.९. २००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

मा. सचिव:-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८.१० वाजता सभा दि. १९.९.२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२१/९/२००३

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२१/९/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. १९.९.२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आली होती सदर सभेचे कामकाज स्थगित करून ही सभा सोमवार दि. २९.९.२००३ रोजी घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | |
|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर |
| ५. | श्री. सोनावणे नथु काशिराम |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र |
| १२. | श्रीमती. ज्योती कालानी |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती |
| २०. | श्रीमती. गुप्ता अनिता |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश |
| २३. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा |
| २४. | श्री. शांताराम ओंकार निकम |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड |
| ३०. | श्रीमती. मोना वनवारी |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास |
| ३२. | श्री. मोहन साधवानी, |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ३५. | श्रीमती. भावना रवी खिलनानी |
| ३६. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ३७. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ३८. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ३९. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ४०. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ४१. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ४३ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ४४. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| ४५. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ४६. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| ४७. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| ४८. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| ४९. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| ५०. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| ५१. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| ५२ | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| ५३. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ५४. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ५५. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ५६. | श्री. संजय भठीजा |
| ५७. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ५८. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ५९. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ६०. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ६१. | श्री. इदनानी राजू चंद्रभान |
| ६२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ६३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

| | | | |
|---|---|---|---|

तर

मा. सदस्य  १. श्रीमती. सीमा चंदाराम मोकल २. श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन,३. श्री. रूपानी चिमन अमरूमल,४. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी, ५. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण ६. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ ७. श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे,८. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश ९. श्री.भालेराव गौतम यशवंत १०. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास,११ श्री. ठाकुर अशोक भगवानदास १२. श्री. अंकुश म्हस्के, १३ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास, १४. श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद,१५ श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, १६. श्री. माखिजा हरदास, १७. श्री. राजेश वदरीया हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. १५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे बैठकीस अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागेवर श्री. दत्ता भडकवाड उपायुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय :-विशेष समित्त्यांची नेमणुक करणे.

आठ विशेष समित्त्यांची नेमणुक करण्यासाठी लेखी प्रस्ताव आलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>याविषयावर आम्ही चर्चा करू इच्छितो. तरी आम्हाला बोलु दयावे. मा. महापौरजी, उपमहापौरजी, प्रभारी आयुक्त हा जो विषय समित्त्यांचा मुददा आहे तर महापालिकेचा गत् इतिहास पाहिल्यास असे दिसते की, दरवर्षी आम्ही समित्त्या गठीत करतो व महाराष्ट्रात ही पहिली महापालिका आहे जेथे ९ विषय समित्त्या आहेत. एवढया वर्षात आपण विषय समित्त्यांचे कामकाज पाहिले तर मला असे वाटत नाही की, कोणत्त्याही विषय समितीने भरीव काम केलेले आहे. या ज्या समित्त्या या सभागृहात तयार होतात त्या फक्त काही विशेष लोकांना खुश करण्यासाठी, त्यांना १५००० रू. मानधन देण्यासाठी व इतर सवलती देण्यासाठी बनतात. त्यामुळे शहराला काही एक फायदा होत नाही महापालिकेलाही काही एक फायदा होत नाही. तसेच समाजाचे देखिल काही काम होत नाही. हिंदीमध्ये एक म्हण आहे,

"ना काम का ना काज का"
ढाई सेर अनाज का"

तर काही एक काम होत नाही सभापती फक्त भत्ते घेतात, ना कोणती बैठक होते ना कोणाचे काम होते व या ज्या समित्त्या आहेत मी विशेष करून आयुक्तांना सांगु इच्छितो की याबाबतीत शासनाला अहवाल पाठविण्याची त्यांची जबाबदारी आहे. कारण महाराष्ट्रात अशी कोणतीही महानगरपालिका नाही. उदा. भिवंडी, कल्याण, ठाणे येथील महापालिकांमध्ये ९-९ विषय समित्त्या नाहीत. उपरोक्त कारणांसाठी आम्ही याचा विरोध करीत आहोत व आयुक्तांना देखिल आम्ही जाणीव करून देऊ इच्छितो की, जर विषय समित्त्या गठीत झाल्या तर याबाबत त्यांनी शासनाकडे अहवाल पाठवावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौरजी, ४ प्रभाग समित्त्या असतानाही विषय समित्त्यांची आवश्यकता आहे व विषय समित्त्यांमध्ये काही काम होते असे

मला वाटत नाही. चार प्रभाग समित्त्या आहेत व प्रभाग समित्त्यांचा मागील वर्षाचा जो निधी आहे त्यामध्युन कोणत्त्याही नगरसेवकाच्या प्रभागात, माझ्या प्रभागात काही एक काम झालेले नाही. तर प्रभाग समित्त्या असताना देखिल विषय समित्त्यांमध्युन शहराचे काम होईल असे आम्हाला वाटत नाही. म्हणुन विरोधी पक्षातर्फे आम्ही या विषय समित्त्यांचा विरोध करीत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मा. महापौरजी, आज इथे विषय समित्त्या गठीत करण्याचा जो प्रस्ताव महासभेसमोर आलेला आहे. या आठ समित्त्यांचे गठन आजच होत नसुन हे वर्षांपासुन चालत आले आहे. मी यांना आठवण करून देऊ इच्छितो की, १९९७-९८ मध्ये जेव्हा भाजपा-शिवसेनेचे राज्य होते. त्यावेळी देखिल आठ विषय समित्त्यांचे सभापती होते. आता जेव्हा सभापती नसतात तेव्हा हे लोक म्हणतात की त्यांची दालने बंद आहेत. तुम्ही सभापती का निवडत नाही. आणि जेव्हा आम्ही विषय आणतो तेव्हा त्याचा विरोध करता. तर तुमचे धोरण एकच असायला हवे. एकतर तुम्ही याला समर्थन दया अथवा विरोध करा. आमचे बंधु श्री. लाल पंजाबी यांनी जे सांगितले त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, काही दिवसांपुर्वी काही अधिकारी नगरसेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी आले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, तुम्ही शहराच्या विकासासाठी ५०-७५-१०० समित्त्या देखिल बनवु शकतात. तर आज मी यांना सांगु इच्छितो की, आपला सहयोग असल्यास आम्ही १०० समित्त्या बनवुन त्यामध्ये तुमच्या सदस्यांना देखिल सभापती म्हणुन घेऊ. नाही तर कमीत कमी तुमच्या सहयोगाची अपेक्षा ठेवतो. या विषयाबाबत मी बोलु इच्छितो की,

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>आज श्री. प्रमोद टाले हे मागे बसलेले आहेत. त्यांना पण सभापती करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>तुम्ही जे बोलाल ते आम्ही करायला तयार आहोत. या समित्त्या गठीत करणे फार आवश्यक आहे असे मला वाटते. आम्ही हे वर्षांपासुन करत आलेलो आहोत. या समित्त्यांचे जे सभापती, उपसभापती व सदस्य असतात ते समितीच्या कामावर लक्ष ठेऊन असतात, शहराचे काम व्हायला हवे. प्रलंबित काम व्हायला हवे. तर या समित्त्यांचे जे गठन आहे ते फार आवश्यक आहे. यासाठी मेहरबानी करून मी सर्वांना विनंती करतो की सदरचा प्रस्ताव एकमताने संमत करावा. धन्यवाद.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-१</u> सार्वजनिक बांधकाम समितीच्या सदस्यांची नावे खालील प्रमाणे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती — सदस्य

१. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
२. श्री. यादव लालबिहारी
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
५. श्री. साधवानी मनोज
६. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
७. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
८. श्रीमती. पंजाबी दिपा
९. श्री. लिंगे बबन

२. नियोजन व विकास समिती — सदस्य

१. श्री. रामरख्यानी मोहनदास
२. श्रीमती. दासानी मिनु
३. श्री. ठाकुर विनोद
४. श्री. पमनानी ईश्वर
५. श्रीमती. पंजाबी दिपा
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्रीमती. रामचंदानी भावना
८. श्रीमती. नाथानी नीना
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती. सदस्य

१. श्री. म्हस्के अंकुश
२. श्री. ऐडके गणपत
३. श्री. पंजाबी नारायण
४. श्री. वनवारी किशोर
५. श्री. लबाना होशियारसिंग
६. श्रीमती. आहुजा नीता
७. श्री. साधवानी मनोज
८. श्री. बेहरानी ठाकुरदास
९. श्री. गायकवाड सुरेश

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सदस्य

१. श्री. लुंड गोविंदराम
२. श्री. गायकवाड सुरेश
३. श्री. ठाकुर विनोद
४. श्री. जेसवानी सतरामदास
५. श्री. टेकचंदानी राजु
६. श्रीमती. सोंडे मीना
७. श्रीमती. वसिटा बेबी
८. श्री. ठाकुर अशोक
९. श्री. जाधव सुरेश

५. महिला व बालकल्याण समिती सदस्य

१. श्रीमती. भठिजा कोमल
२. श्रीमती. कारीरा रेखा
३. श्रीमती. रिझवानी सुजाता
४. श्रीमती. सोंडे मीना
५. श्रीमती. शर्मा कमला
६. श्रीमती. मसंद माया
७. श्रीमती. रामचंदानी भावना
८. श्रीमती. वनवारी मोना
९. श्रीमती. खिलनानी भावना

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सदस्य

१. श्री. साधवानी मोहन
२. श्री. भालेराव गौतम
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. यादव लालबिहारी
५. श्री. वाघे शामु
६. श्री. शांताराम निकम
७. श्री. पवार नाना
८. श्री. जाधव सुरेश
९. श्रीमती. गुप्ता अनिता

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती सदस्य

१. श्रीमती. माखिजा किरण
२. श्रीमती. शर्मा कमला
३. श्री. पवार नाना
४. श्री. रूपाणी चिमनदास
५. श्री. लबाना होशियारसिंग
६. श्री. मुलचंदानी महेंद
७. श्री. लुंड गोविंदराम
८. श्रीमती. छाब्रिया भारती
९. श्री. वनवारी किशोर

८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य

१. श्रीमती. रिझवानी सुजाता
२. श्री. निकम शांताराम ओंकार
३. श्रीमती. खिलनानी भावना
४. श्री. ऐडके गणपत
५. श्री. ठाकुर अशोक
६. श्री. तलरेजा विनोद
७. श्री. टाले प्रमोद
८. श्रीमती. भठिजा कोमल
९. श्रीमती. कारीरा रेखा

तसेच सदरचा प्रस्ताव हा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता संमत करावयाचा आहे. सर्वानुमते अथवा बहुमताने करावयाचा आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावेत. ४० मते..

<u>प्रस्तावाच्या बाजूने मतेः-४०</u>

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. वाघे शामु
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती. शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ

१० श्री. पवार नाना आनंदा
११. श्री. शांताराम निकम
१२ श्री. ठाकुर विनोद
१३श्रीमती. सोनेजी मीना
१४श्रीमती. मसंद माया
१५ श्री. गायकवाड सुरेश
१६ श्रीमती. वनवारी मोना
१७ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१९. श्री. लुंड गोविंदराम
२०.श्रीमती. खिलनानी भावना
२१ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२२ श्रीमती. कारीरा रेखा
२३ श्री. पमनानी ईश्वर
२४श्रीमती. पंजाबी दिपा
२५ श्री. मनोज साधवानी
२६ श्री. भठिजा कोमल
२७ श्री. रामरख्यानी मोहनदास
२८ श्री. लबाना होशियारसिंग
२९ श्री. नरेंद्र ठाकुर
३० श्री. तलरेजा विनोद
३१ श्रीमती. नीना नाथानी
३२ श्रीमती. रिझवानी सुजाता
३३ श्रीमती. भारती छाब्रिया
३४ श्रीमती. दासानी मिनु
३५ श्री. साधवानी मोहन
३६ श्रीमती. साधवानी जया
३७श्री. बेहरानी मोहन
३८ श्रीमती. करोतिया मालती
३९ श्री. बेहरानी ठाकुरदास
४० श्री प्रमोद टाले

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. १० मते..

प्रस्तावाच्या विरोधात मते:-१०
१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री.राज असरोंडकर
४. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
५. श्री. सोनावणे नथु
६. श्री. गायकवाड दिलीप
७. श्री. चव्हाण रमेश
८. श्री. बोडारे धनंजय
९. श्री. पाटील विश्वनाथ
१० श्री. चौधरी राजेंद्र

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव बहूमताने पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १४:- विशेष समित्त्यांची नेमणूक करणे बाबत.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्याचप्रमाणे ठराव करून आपल्या पालिका सदस्यामधून विशेष समित्त्या नियुक्त करता येतील. महापालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्त्यादीचे कामकाज विषयक नियमातील नियम ४ (अ) अनुसार निम्नलिखित एक वा अधिक विशेष समित्त्या नियुक्त करता येतील.

१. सार्वजनिक बांधकाम समिती.
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.
४. आरोग्य व परिरक्षण समिती
५. महिला व बालकल्याण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

दि.१५.५.९७ च्या महासभा ठराव क्र. ६ व्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले आहे. आणि अशा कोणत्त्याही क्षेत्रात समावेश केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमच समुचित समितीपुढे ठेवले जातील व ते अशा समितीच्या शिफारशीसह महासभेत येतील म्हणुन विशेष समित्त्यांची नेमणुक करणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ८० दि. २९/९/२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. मीना सोंडे

हि महासभा प्रत्त्येक विशेष समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या पुढील आठ विशेष समित्त्यांची नेमणूक करित आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती — सदस्य

१. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
२. श्री. यादव लालबिहारी
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
५. श्री. साधवानी मनोज
६. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
७. श्री. देवेंदसिंग खेमाणी
८. श्रीमती. पंजाबी दिपा
९. श्री. लिंगे बबन

२. नियोजन व विकास समिती — सदस्य

१. श्री. रामरख्यानी मोहनदास
२. श्रीमती. दासानी मिनु

३. श्री. ठाकुर विनोद
४. श्री. पमनानी ईश्वर
५. श्रीमती. पंजाबी दिपा
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्रीमती. रामचंदानी भावना
८. श्रीमती. नाथानी नीना
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती. सदस्य

१. श्री. म्हस्के अंकुश
२. श्री. ऐडके गणपत
३. श्री. पंजाबी नारायण
४. श्री. वनवारी किशोर
५. श्री. लबाना होशियारसिंग
६. श्रीमती. आहुजा नीता
७. श्री. साधवानी मनोज
८. श्री. बेहरानी ठाकुरदास
९. श्री. गायकवाड सुरेश

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सदस्य

१. श्री. लुंड गोविंदराम
२. श्री. गायकवाड सुरेश
३. श्री. ठाकुर विनोद
४. श्री. जेसवानी सतरामदास
५. श्री. टेकचंदानी राजु
६. श्रीमती. सोंडे मीना
७. श्रीमती. वसिटा बेबी
८. श्री. ठाकुर अशोक
९. श्री. जाधव सुरेश

५. महिला व बालकल्याण समिती सदस्य

१. श्रीमती. भठिजा कोमल
२. श्रीमती. कारीरा रेखा
३. श्रीमती. रिझवानी सुजाता
४. श्रीमती. सोंडे मीना
५. श्रीमती. शर्मा कमला
६. श्रीमती. मसंद माया
७. श्रीमती. रामचंदानी भावना
८. श्रीमती. वनवारी मोना
९. श्रीमती. खिलनानी भावना

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सदस्य

१. श्री. साधवानी मोहन
२. श्री. भालेराव गौतम
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)

४. श्री. यादव लालबिहारी
५. श्री. वाघे शामु
६. श्री. शांताराम निकम
७. श्री. पवार नाना
८. श्री. जाधव सुरेश
९. श्रीमती. गुप्ता अनिता

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती सदस्य

१. श्रीमती. माखिजा किरण
२. श्रीमती. शर्मा कमला
३. श्री. पवार नाना
४. श्री. रूपाणी चिमनदास
५. श्री. लबाना होशियारसिंग
६. श्री. मुलचंदानी महेंद्र
७. श्री. लुंड गोविंदराम
८. श्रीमती. छाब्रिया भारती
९. श्री. वनवारी किशोर

८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य

१. श्रीमती. रिझवानी सुजाता
२. श्री. निकम शांताराम ओंकार
३. श्रीमती. खिलनानी भावना
४. श्री. ऐडके गणपत
५. श्री. ठाकुर अशोक
६. श्री. तलरेजा विनोद
७. श्री. टाले प्रमोद
८. श्रीमती. भठिजा कोमल
९. श्रीमती. कारीरा रेखा

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहराच्या पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल विचारात घेणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-हा जो विषय आहे याचे उत्तर कोण देणार आहे? (श्री. दत्ता भडकवाड, आयुक्तांच्या स्थानावर प्राधिकृत अधिकारी यांना उददेशुन )आपण तर दोन-चार दिवसात जाणार आहात. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे लोक आपल्या मागे लागलेले आहेत. याची अंमलबजावणी कोण करणार?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौर महोदया, आता श्री. पंजाबी साहेबांनी जे शब्द उच्चारले आहेत ते चुकीचे आहेत. ते आमच्यावर आरोप करीत आहेत. जर राष्ट्रवादींना वाटले असते तर आज श्री. भडकवाड यांचे या महापालिकेत चौथे वर्ष चालु नसते. आपण जो आरोप करीत आहात तो मागे घ्या.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-याबाबतीत येणारी वेळच सांगेल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपणासही चांगल्या प्रकारे माहित आहे की, राष्ट्रवादीची मेहरबानी कुणा कुणावर आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-चार वर्ष झाली आहेत अजुन दोन वर्ष वाढवुन दया. म्हणजे दोन टर्म पुर्ण होतील.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-महापौर, उपमहापौर, आयुक्त व सर्व सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील पर्यावरणाचा अहवाल २००२-२००३ आणि उल्हासनगर महानगरपालिकेतील उल्हासनगर क्षेत्राचा पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कृती आराखडा २००४ यामध्ये नमुद केला आहे. यशदा या संस्थेने तयार केलेला हा अहवाल आहे. आणि उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिका-यांशी सल्लामसलत करून उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासनातर्फे पुर्ण माहिती त्यांनी गोळा केली आहे आणि महापालिका व यशदा यांनी हा आराखडा तयार केला आहे. हे बरोबर आहे का? या अहवालामध्ये जे आकडे नमुद केलेले आहेत त्याच्याशी प्रशासन सहमत आहे का? त्याबाबतीत कृपया निवेदन करावे. याबाबतीत प्रशासनाचे काय म्हणणे आहे, काही माहिती अपुरी आहे का? प्रशासनाचे याबाबतीत काही निवेदन आहे का?

यावेळी मा. सदस्य श्री संजय बठिजा व सदस्या श्रीमती किरण मारवीजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया व सभागृहात उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य आज महापालिकेच्या समोर जो पर्यावरण कृती आराखडा आणलेला आहे. त्यामध्ये जी माहिती दिली आहे. त्यामध्ये उल्हासनगर शहरामध्ये आज प्रत्यक्षात काय स्थिती आहे. ती माहिती महासभेपुढे आणलेली आहे. त्यानंतर यातील प्रत्येक शिर्षावर म्हणजेच प्रदुषण किती आहे? त्याशिवाय आजच्या परिस्थितीत प्रदुषणाची काय स्थिती आहे त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य असो किंवा मालमत्ता कर असो. किंवा पाण्याचे वितरण असो किंवा स्वरोजगाराचा जो प्रश्न आहे. त्यासाठी जे प्रशासकीय सुधार करावे लागतील त्यामध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व उल्हासनगर शहराचा जो चेहरा आहे तो बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तरतुदी कराव्या लागतील व यामध्ये महापालिकेचे जे लोकप्रतिनिधी आहेत, अधिकारी आहेत ,कर्मचारी आहेत व जनता आहे. या सर्वांचा सहभाग यामध्ये घ्यावा लागेल. हा जो कृती आराखडा बनविलेला आहे. त्यामध्ये आज रोजी प्रदुषणाची जी स्थिती आहे. त्याची माहिती आपणांस दिलेली आहे. हा अंतरिम अहवाल असुन याच्यानंतर महासभेच्या मान्यतेने कृती आराखडा निश्चित करण्यात येईल. जर सभागृहाने याच्यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी निर्देश दिले तर ते देखिल यामध्ये समाविष्ट करण्यात येतील. व त्यानंतर अंतिम अहवाल महासभेपुढे मान्यतेसाठी आणला जाईल.

यावेळी प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-या अहवालात जे भाष्य केलेले आहे. त्याचे प्रशासन समर्थन करते का? व ते प्रशासनाने स्विकृत केले आहेत का? स्विकारल्यानंतरच ते यामध्ये आले आहे हे तर मान्य आहे ना? यामध्ये जे भाष्य केलेले आहे ते प्रशासनाने संपुर्ण विचार करूनच महासभेमध्ये आणलेले आहेत, एक तर ही गोष्ट आणि मागच्या वेळेस जेव्हा हा प्रस्ताव पुढे ढकलला होता तेव्हा आपण कृती आराखडा यासोबत आणणार असे सांगितले होते पण तो अजुन आणलेले नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, हा जो पर्यावरण कृती आराखडा तयार केलेला आहे तो शासनाची जी यशदा नावाची जी संस्था आहे त्या संस्थेने बनवलेला आहे. त्यामध्ये पर्यावरणाच्या स्थितीबाबत जे देखिल नमुद केलेले आहे ते त्यांनी स्वत: येथे येवून पहाणी करून , माहिती गोळा करून त्यामाहितीच्या आधारे बनविलेला आहे. महापालिकेकडुन त्यांना जी आकडेवारी हवी होती ती आम्ही त्यांना दिलेली आहे. यामध्ये पर्यावरणाच्या स्थितीबाबत जे काही नमुद केले आहे ते यशदाचे मत आहे. परंतु त्याच्याशी सहमत होण्याशिवाय महापालिका दुसरे काही करू शकत नाही. त्यामध्ये पर्यावरणाबाबत जी काही स्थिती दाखवलेली आहे ती सद्य स्थिती आहे. त्यात जे काही आहे त्याच्याशी आम्ही सहमत आहोत.

यावेळी मा. सदस्य श्री संजय बठिजा व मा. सदस्या श्रीमती लक्ष्मी ससाणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-महापौर महोदया, आयुक्त साहेब आणि सर्व सदस्य प्रथम प्रशासनाचे मी अभिनंदन करतो. आयुक्त सोनवणे साहेब यांचे देखिल अभिनंदन करतो कारण उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पहिल्यांदा पर्यावरणाचा अहवाल व पुढचा कृती आराखडा दिलेला आहे. यामध्ये नमुद केले आहे की, शेजारच्या महापालिकांमध्ये १९९७ पासुन हा अहवाल देतात. दरवर्षी ३१ जुलै पुर्वी हा अहवाल द्यावयचा असतो. यापुर्वी आम्हाला असा रिपोर्ट दिलेला नव्हता आपण दिला त्याबाबत धन्यवाद. आपण आल्यापासुन श्वेतपत्रिका व पर्यावरणाचे अहवाल मिळणे चालु झाले. त्याबद्दल प्रथम अभिनंदन. हे करत असताना या अहवालात अहवाल बनविण्याचा उद्देश पान क्र. २ वर दिलेला आहे. त्यामध्ये इतर महापालिकांची तुलना केलेली आहे. या अहवालात उल्हासनगरचा इतिहास पुर्वीपासुन दिलेला आहे. लोकसंख्या वाढीचा तुलनात्त्मक तक्ता दिलेला आहे. लोकसंख्या का वाढते? कशामुळे वाढते? ते ही दिलेले आहे. यानंतर अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी जबाबदारीने कामे केली पाहिजेत. कशी केली पाहिजेत ते ही दिलेले आहे. मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. आपल्या उल्हासनगर शहरातील दारीद्रयाचे निर्मुलन करण्यासाठी काही योजना सुध्दा दिलेल्या आहेत. पण त्या पाळल्या जात नाहीत. त्या पाळाव्यात अशी याठिकाणी अपेक्षा आहे कारण उल्हासनगर महानगरपालिकेच्या बाबतीत म्हंटले तर येथे स्वयंरोजगार योजना त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे जेणेकरून दारीद्रयाचे निर्मुलन होवुन येथील लोकांचे दारीद्रय जाईल. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये दुःखाने आणि खेदाने सांगावेसे वाटते की, सुवर्ण जयंती रोजगार योजना जी होती ती पुर्ण बासनात गुंडाळुन ठेवलेली आहे. सर्वसामान्य लोकांना त्याचा काही एक उपयोग होत नाही. पैसे येतात अथवा नाही ते देखिल कळत नाही. सुरवातीला सुमारे ९२ लाख ऐवढा निधी आला पण त्याचा गैरव्यवहार झाला. त्यानंतर ४२ लाखाची कामे झाली ती पाण्यात वाहुन गेली. पुढे त्या योजनेचे काय झाले? आता पर्यंत कुणालाही काही कळत नाही त्यामुळे दारीद्रयाला हटविण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका काही प्रयत्न करीत आहे असे वाटत नाही, तर ते करावे. यानंतर शासनाला त्या योजना राबविण्यासाठी या ठिकाणी नमुद केले आहे की, एक एम.डी.एस. अधिकारी नियुक्त करण्यासाठी

विनंती करावी. जेणेकरून महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल त्यांनतर याठिकाणी पाणी साफ सफाई आणि इतर समस्यांच्या बाबतीत निगडीत असलेले अनाधिकृत बांधकाम याचा देखिल याठिकाणी उल्लेख केलेला आहे. प्रचंड प्रमाणात बांधकामे चालु आहेत. त्या बांधकामांचा तक्ता त्यांनी दिलेला आहे. पण महानगरपालिका त्याकडे कानाडोळा करत आहे. महानगरपालिकेला माहित असुन सुध्दा तो तक्ता पान क्र. १३ वर दिलेला आहे. २००१-२००२ मध्ये, २०००-२००१मध्ये निवासी स्थानात १,६०,९३५ मालमत्ता होत्त्या आणि व्यापारी स्थानात २०००-२००१ मध्ये १,०८,३८२ होत्त्या. त्या २००१-२००२मध्ये १,१२,७५३ झाल्या म्हणजे जवळ जवळ ४,३७७ ने रहिवासी मालमत्ता वाढल्या आहेत. इकडे नोंदणी फक्त २४० ची आहे. तुमच्याकडे नगररचनाकाराने जे नकाशे मंजुर केले आहेत ते फक्त २४० आहेत. इकडे व्यापारी मध्ये २०००-२००१मध्ये २३,८४६ आणि २००१-२००२ मध्ये २६,५७२ झालेले आहेत. म्हणजे २,७२६ एका वर्षात वाढलेल्या आहेत. पण नोंदणी फक्त ७ याची आहे. म्हणजे इकडे ७,०९७ मालमत्ता वाढत आहेत व नोंदणी तुमच्याकडे फक्त २४७ ची आहे. हे लक्षात आल्यानंतर पुढच्या वर्षी तरी त्याचा आलेख कमी आला पाहिजे ही अपेक्षा हेती पण तुमच्याकडुन पुन्हा तेच झालेले आहे. इकडे मालमत्ता वाढलेल्या आहेत. ३३००, २००२-२००३च्या दरम्यान, आणि नोंदणी फक्त २४० ची आहे. आता सध्या तेच चालले आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारची सुधारणा वाटत नाही. सदस्यांनी महापालिकेमध्ये अनाधिकृत बांधकामाविषयी सभा घ्यायच्या पण प्रशासनाकडुन त्यावर कुठलीही कारवाई होत नाही याचीच पुनरावृत्ती पुन्हा होते म्हणजे आता हा आलेख आता वाढतच राहणार आहे. कृती आराखडा फक्त नावापुरता कागदावरच राहणार आहे असे होता कामा नये. काहीतरी कृती करा हे सांगणे गरजेचे वाटते आणि महत्त्वाचे म्हणजे पाण्याच्या बाबतीत ज्या उपाययोजना करायच्या आहेत. त्याही यामध्ये नमुद केलेल्या आहेत. आता पर्यावरण म्हटल्यानंतर वायुप्रदुषण, जलप्रदुषण हे आलेच त्याबरोबर साफसफाई सुध्दा आली. सार्वजनिक आरोग्य म्हटल्यानंतर या अहवालात बाकीचे मी काही म्हणत नाही परंतु घनकचरा व्यवस्थापन यावर यांनी प्रचंड अभ्यास केलेला आहे. आणि त्यांचे असे स्पष्ट मत आहे की उल्हासनगर महानगरपालिकेचा सध्या प्रशासना वरील खर्च प्रचंड असुन सुध्दा एक सफाई कामगार ०.३ कि.मी. झाडु मारतो. ५०० लोकांच्या मागे एक सफाई कामगार असा त्यांनी आकडा दिलेला आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या अहवालानुसार त्यानी तक्ता दिलेला आहे की, ठाणे महानगरपालिकेचे क्षेत्र १४७ चौ.की.मी आहे. लोकसंख्या १२.६१ लाख आहे. आणि सार्वजनिक आरोग्य विभागावर त्यांचा खर्च आहे १६.५० कोटी प्रति माणसी खर्च आहे १४५ रू. आणि त्यांचा कचरा जमा होतो ६५० मे.टन. त्यांचे एकुण जमा बाजु आहे ३६९ कोटी व आस्थापनेवर खर्च २७ टक्के ऐवढा आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र १०४ चौ.की.मी. ऐवढे आहे. लोकसंख्या ११.१९ लाख आहे. त्यांचा लोकसंख्या वाढीचा दर ३१ टक्के आहे. आणि त्यांना सार्वजनिक आरोग्यावरील खर्च १६.४९ कोटी ऐवढा आहे. आपल्या अहवालात जो दिलेला आहे. व प्रति माणसी खर्च रू. १४६ एवढा आहे. कचरा ४९० टन ऐवढा जमा होतो. त्यांचे एकुण उत्तपन्न आहे २०१ कोटीचे आणि आस्थापनेवर ३२ टक्के ऐवढा खर्च आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र १३ चौ.की.मी. ऐवढे असुन लोकसंख्या ४.७२ लाख ऐवढी दिलेली आहे. लोकसंख्या वाढीचा जो दर आहे तो फक्त २१ टक्के ऐवढा दिलेला आहे. जो ठाणे महापालिका व कल्याण महापालिका यांचा ३१ टक्के आहे. अंबरनाथचा ३७ टक्के आहे. उल्हासनगरचा लोकसंख्या वाढीचा दर फक्त २१ टक्के ऐवढा आहे. पण आमचा सार्वजनिक आरोग्य विभागावरील खर्च सध्या १३.६१ कोटी ऐवढा आहे. आणि तो जर आता नविन कचरा वाहतुकीच्या दराप्रमाणे केला तर तो १५.६५ कोटी ऐवढा होतो. म्हणजे ठाणे महानगरपालिकेचे क्षेत्र १४७ चौ.की.मी. लोकसंख्या १२.६१ लाख कल्याण महानगरपालिकेचे क्षेत्र १०४ चौ. कि.मी. लोकसंख्या ११.१९ लाख उल्हासनगर महापालिकेचा खर्च १६.४९ लाख आणि नवी मुंबईचे क्षेत्र जे आहे ते १६२ चौ. कि.मी. ऐवढे आहे. लोकसंख्या आहे ६०

लाख त्यांचा प्रत्येक माणसी खर्च आहे १८५ रू. इतर महानगरपालिकांच्या तुलनेत ठाणे महानगरपालिकेच्या १६.५० कोटी कल्याण महानगरपालिकेचा जवळ जवळ १६.४९ कोटी आणि उल्हासनगर महानगरपालिकेचा १३ चौ. किमी. ऐवढया क्षेत्रासाठी व ४.७२ लाख ऐवढया लोकसंख्येसाठी सुध्दा जवळ जवळ १५.७५ कोटी हा खर्च होत आहे म्हणजे अगोदरच आमचा जो आस्थापनेवर खर्च आहे तो जास्त होता. तो कमी करण्याची आवश्यकता होती. कारण घनकचरा व्यवस्थापनाच्या खर्च आणि दर विश्लेषण याबाबत पृष्ठ क्र. ३१ वर स्पष्टपणे लिहिले आहे की इट इज पॉसिबल दॅट द कॉस्ट ऑफ सर्विस कॅल्क्युलेटेड ॲक्टीविटी वाइज ॲन्ड ऑन द बेसिस ऑफ द हेडस ऑफ एक्सपेन्डीचर मे नॉट परमिट दी यु.एम.सी टु एफेक्टीव्हली प्लान सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट इन द सिटी इन अ सस्टेनेबल मॅनर. अ रिवीह्यु ऑफ दी ॲक्सपेंन्डीचर ॲन्ड कॉस्ट मे बी रिक्वायर्ड. द कॉस्ट ऑफ एस.डब्लु. एम. सर्व्हीसेस पर कॅपिटा इन उल्हासनगर आर रिपोर्टेड टू बी रूपीज २७७ ॲन्ड पर एमटी ॲट रूपीज १५२३ वीच ॲपिअर्स टू बी फेअरली हाय. हा त्यांचा अहवाल ३१ जुलैला ज्यामध्ये स्पष्टपणे म्हंटलेले आहे की, घनकचरा व्यवस्थापना बाबतीत उल्हासनगर महानगरपालिका यावर अगोदरच खर्च जास्त असल्यामुळे अजुन खर्च करू शकत नाही. जास्त खर्च करणे उचित होणार नाही. कारण २७७ रू. प्रति माणसी हा त्यावेळचा खर्च आहे. आणि आताच्या वाढीव खर्चानुसार जवळ जवळ प्रति माणसी खर्च रू. ३२१ ऐवढा होत आहे. तुम्ही फक्त कृती आराखडा आणला पर्यावरण अहवाल आणला, ३१ जुलैला तुम्ही कृती आराखडा तयार केला असे सांगता. उल्हासनगर शहरातील पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी व आर्थीक स्थिती सुधारण्यासाठी काय कार्यवाही करायची ते आवश्यक असताना याठिकाणी मुळातच तुम्ही सुरूंग लावलेला आहे. याठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाचा तुमच्या सल्यानुसार यशदाच्या सल्यानुसार त्याच्यामध्ये वाढीव खर्च न करता खर्चात कपात करणे आवश्यक होते. इतर तुलनात्मकरित्त्या त्यांनी स्पष्टपणे म्हंटलेले आहे की, आसपासच्या महापालिकांचा व नगरपालिकांचा विचार करणे आवश्यक आहे व त्यावर विचार करूनच आपण कारवाई करावी. इतर महानगरपालिकेचा व नगरपालिकांचा खर्च बघितला तर दिसते की आपला खर्च अवाढव्य आहे. आपल्या प्रशासनावर ऐवढा खर्च का होतो. हे करणे गरजेचे होते. ते न करता उल्हासनगर महापालिकेने सार्वजनिक आरोग्य विभागावरील खर्च जवळ जवळ २.५० कोटीने वाढविला. तो अनाठायी आहे. कारण आज माझ्याकडे याठिकाणी संपुर्ण माहिती आहे. ज्याठिकाणी २.३३ कोटी आमचा कचरा वाहतुकीचा खर्च होता. तो ४.३८ कोटी ऐवढा आता आपण करणार आहोत. सध्या जरी ४.३८ कोटी ऐवढा धरला तरी ३ टक्के वाढीव दराने दहाव्या वर्षी तो ५.७६ कोटी ऐवढा होणार आहे. म्हणजे १० वर्षाचा एकुण खर्च ५०.१६ कोटी ऐवढा होणार आहे. म्हणजे सरासरी एका वर्षाचा ५,०१,६०,०००/- म्हणजे आता जो २.३३ लाख होत आहे त्याऐवजी सरासरी ५.०१ कोटी प्रतिवर्षी ऐवढा खर्च होईल. प्रशासनावरील आमचा खर्च ३४ टक्के ऐवढा आहे. कल्याण महानगरपालिकेत प्रशासनावरील खर्च ३२ टक्के, ठाणे महानगरपालिकेत २७ टक्के, उल्हासनगरमध्ये ३४ टक्के ऐवढा आहे. नवी मुंबई मध्ये फक्त १२ टक्के ऐवढा आहे. भिवंडी निजामपुर मध्ये २३ टक्के आहे. मीरा-भाइंदर येथे १३ टक्के, अंबरनाथ नगरपालिकेत २९ टक्के म्हणजे उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर सर्वात जास्त खर्च करते. असे असुन सुध्दा कल्याण महापालिका जकात वसुलीचे काम स्वत: करते. ठाणे महानगरपालिकेची जकात वसुली देखिल कर्मचारीच करतात. जर कचरा वाहतुकीचे काम कल्याण महापालिका स्वत: करत असेल, ठाणे महापालिका सुध्दा स्वत:च्या माध्यमातुन हे काम करते. हे सर्व जर यामध्ये समाविष्ट केले तर आपला आस्थापनेवरील खर्च जवळपास ४२ टक्के ऐवढा होतो. व अशावेळी आमच्या प्रशासनाचे कर्तव्य होते की, उल्हासनगर महापालिकेचे पैसे वाचवायला हवेत. परंतु त्यांनी असे केलेले नाही. माझ्याकडे आता एक प्रकल्प आहे. कचरा वाहतुकीसाठी आमच्या स्थायी समितीने जो प्रस्ताव संमत केलेला आहे. साधनसामुग्री एकुण कामगार, दहा वर्षासाठी जे फीक्सड कॉस्ट आहे. याबददल मी आपणांस आता सविस्तर माहिती देतो. माझ्याकडे एका कंपनीचे दरपत्रक

उपलब्ध आहे. कॉम्पॅक्टर विकत घेताना चेसीस सकट तो किती किंमतीला उपलब्ध होतो, एक कॉम्पॅक्टर ज्याची क्षमता १० ते १२ क्युबीक मीटर असते. आम्ही आमच्या ठरावात असे सात कॉम्पॅक्टर घेण्याचा उल्लेख केला आहे त्याची किंमत आहे १३. २५ लाख सदरची किंमत ही कमी जास्त होवू शकते. वाटाघाटी नंतर ती १२. ७५ लाख ऐवढी होते. चेसीसची किंमत आहे ८ लाख. ऑन रोड एका कॉम्पॅक्टरची किंमत होते २१. २५ लाख. जर आपल्या ठरावाप्रमाणे ७ कॉम्पॅक्टर घेतले तर एकूण किंमत होते १. ४९ कोटी. त्याच्यानंतरचा ॲटम आहे ६ ते ८क्युबीक मिटर क्षमतेचा कॉम्पॅक्टर त्याची किंमत आहे ११. ५०लाख आणि त्यावर जी चेसीस लागणार आहे त्याची किंमत ७ लाख आहे. या कॉम्पॅक्टरची एकुण किंमत १८. ५० लाख ऐवढी होते. आपण ३ कॉम्पॅक्टर मागविलेले आहे. म्हणजे त्याची एकुण किंमत होते ५५. ५० लाख ॲटम नं. ३ वर आहे स्कीपलोडर त्याची किंमत आहे फक्त ४. ५० लाख , माझ्याकडे दरपत्रक आहे. आणि १६बाय १३ ची चेसीस आहे त्याची किंमत आहे ८ लाख. असे एकुण १२५० लाख सर्व करांसहीत किंमत होते. ठरावानुसार यंत्रसामुग्रीचे आयुष्यमान १० वर्षे एवढे आहे. हे सर्व साधनसामुग्री व कचरा गोळा करणारे तीनही जर महापालिकेने घेतले तर महापालिकेला त्याचा खर्च फक्त १४८ , ५५, आणि २५असा एकुण यंत्रसामुग्रीवर २ कोटी ३० लाख एवढा खर्च येणार आहे. त्याच्यानंतर कचरापेटया ज्या १० वर्षासाठी तुम्ही नमुद केलेल्या आहेत. कोरीएन मेक जो तुम्ही दिलेला आहे, ९० लिटरची कचरापेटी त्या २४० आपल्याला लागणार आहे. त्याची किंमत आहे १८०० रुपये एकुण किंमत होते ४ लाख ३२ हजार. ६६०,७६० लिटर क्षमतेची जी कचरापेटी लागणार आहे, १६५ लागतील एवढया दिलेल्या आहेत. त्याची किंमत १० हजार आहे. त्याची किंमत होते १६५० लाख. ११०० बाय १२०० लिटर क्षमतेच्या ज्या पेटया आहेत त्या १६५ लागतील असे तुम्ही दिलेले आहे. त्याची किंमत आहे १५,०००/-. त्याची एकुण किंमत होते २४.७५ लाख आणि ज्या ५००० लिटरच्या पेटया आहेत त्या ३६ आपण नमूद केलेल्या आहेत. त्याची किंमत आहे २५,०००/- प्रत्येकी. म्हणजे त्याची एकुण किंमत झाली ९ लाख रुपये आणि सायकलची किंमत २०००/- एवढी आहे. त्याची संख्या तुम्ही १२० एवढी दिली आहे. या ९० लिटरच्या बादल्या ठेवण्यासाठी तुम्ही त्याचा उपयोग करणार आहात. त्याची एकुण किंमत होते २. ४० लाख. बिन्स आणि सायकलची एकुण किंमत होते ५७ लाख जी आम्ही १० वर्षासाठी वापरणार. जर यंत्रसामुग्री म्हणजे कॉम्पॅक्टर व कचरापेटया याची एकुण किंमत जर बघितली तर ती २. ३० कोटी एवढी होते. आणि ५७ लाख असे मिळून एकुण २. ८७ कोटी एवढे होतात. म्हणजेच जवळपास ३ कोटी. जर आमच्याकडे पैसे नाहीत आम्ही बॅंकेकडुन कर्ज घेतले व त्याचा ११ टक्के एवढा व्याज जर धरला तर १० वर्षासाठी ३ करोडवर ३ कोटी व्याज होते. तेही पकडून चला. फिक्स कॉस्ट ३ कोटी झाली. व त्याचे व्याज झाले ३ कोटी. एकुण ६ कोटी रुपये झाले. त्या कंपनीचा डिझेलवरील खर्च सरासरी ४ किलोमिटर प्रती लिटर एवढा आहे. उल्हासनगर महापालिकेचे परिक्षेत्र बघता एक कॉम्पक्टर सरासरी ३ फे-या करतो. त्यानुसार एका गाडीला इंधनावरील खर्च साधारणत: १२ ते १५ लिटर एका दिवसाला लागते. एकुण किंमत बघितली तर साधारणत: १५ लाखाच्या आसपास प्रत्येक वर्षासाठी होते. म्हणजेच १० वर्षासाठी सुमारे १५० कोटी एवढा खर्च इंधनावर होतो. प्रत्येक गाडीचा एका महिन्याचा दुरुस्तीचा खर्च रुपये १० हजार एवढा पकडला. तरी १२ गाडयांचा एका महिन्याचा खर्च होतो १.२० लाख म्हणजेच संपूर्ण वर्षासाठी १४५० लाख आणि १० वर्षाचा १४५ कोटी व १५० कोटीच्या आसपास होते. हा देखभाल दुरुस्तीचा खर्च झाला. त्यानंतर त्याला लागणारे हायड्रोलिक ऑईल वगैरे ते एकदा टाकल्यानंतर त्याला परत महिनाभर बघायची गरज नसते. परंतु त्याचा टाकीचा चार्ज दुरुस्तीप्रमाणेच धरला १०हजार रुपये महिना. तरी तोही साधारणत: १५० कोटीच्या आसपास जातो १० वर्षासाठी. आणि जे कामगार आम्ही म्हटलेले आहे आमच्या स्थायी समितीच्या ठरावामध्ये नं. १५ ते २२ त्यानुसार सफाई कामगार आणि वाहनचालक वगैरे तर शासनाच्या किमान वेतन कायदयानुसार १०० रुपये

प्रतीदिन आम्ही कंत्राटीपध्दतीने नेमलेल्या कामगारांना देत होतो. ते जरी दयायचे म्हटले तर १२० कामगारांना ३ हजार रुपये महिन्यानुसार ३.३६ लाख हा एका महिन्याचा पगार झाला. म्हणजे वर्षाचा ४३.२० लाख. १३ वाहनचालक व त्यांचे १३ सहाय्यक यांचा रुपये ४००० प्रमाणे , २२ दुसरे सहाय्यक त्यांचा रुपये ३००० असा एकुण कामगारांवरचा महिन्याचा खर्च रुपये ६ लाख एवढा होतो. तो वर्षाचा ७२ लाख म्हणजे १० वर्षांचा ७.२० कोटी अशाप्रकारे एकुण किंमत जर ७. २० कोटी, ३ कोटी यंत्रसामुग्रीवरील खर्च व्याजाचा तीन कोटी रुपये खर्च , १.५० कोटी देखभाल व दुरुस्तीवरील खर्च, १.५० कोटी सर्व्हिस चार्जेस , १.५० कोटी इंधनावरील खर्च असा एकुण जास्तीत जास्त साधारणतः २० कोटीच्या आसपास एकुण खर्च होतो महापालिकेने जर सदरचा खर्च केला २० कोटीच्या आसपास, जवळ-जवळ रुपये २२ कोटी त्याच्यापलिकडे फारफार तर जाणार नाही. १० वर्षाचा खर्च आमचा २० ते २२ कोटी होतो. जर ठेकेदाराला दयायचे झाले तर तोच खर्च ५० कोटी रुपये म्हणजे जवळ-जवळ रुपये ३० कोटी १० वर्षात महापालिकेचे नुकसान होणार आहे. म्हणजे दर वर्षाला आमचे जवळ-जवळ ३ कोटीचे नुकसान होणार आहे. हे ३ कोटीचे नुकसान कशासाठी होणार आहे? का करायचे? एकतर हे करत असतांना महापालिकेने आपल्या आस्थापनेवरील खर्च कमी केलेला नाही. जो इतर महापालिकांच्या तुलनेत, इतर महापालिका जकात वसुली स्वतः करतात. कचरा वाहतुकीचा खर्च स्वतः करतात. असे असतांना देखील त्यांचा आस्थापनेवरील खर्च २९ टक्के , ३१ टक्के आहे. पण आपल्या महापालिकेत हे दोन्ही विभाग जे महत्त्वाचे आहेत जवळ-जवळ जकातीच्या कर्मचा-यांवरील खर्च साधारणतः २ कोटीच्या आसपास नमुद केलेला आहे. जकात जर उल्हासनगर महानगरपालिका गोळा करत असतील, जर ठेकेदारीवर दिले नसते तर दोन कोटी रू. तो, कच-याचा १ कोटी रूपये आणि बाकीचे जे छोटे छोटे आम्ही ठेके देतो. ड्रेनेज सिस्टम वगैरे साधारणतः ३. ५० कोटी ते धरले तर हा खर्च ४२ टक्याच्या आसपास होईल. म्हणजे उल्हासनगर महानगरपालिका अगोदरच मागच्या वर्षीच्या आयुक्तांनी सांगितल्या प्रमाणे, वृतपत्रात त्यांनी निवेदन दिले होते की, उल्हासनगर महापालिका दिवाळखोरीत गेलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे. उल्हासनगर महापालिकेने या महासभेमध्ये किंवा स्थायी समितीमध्ये कुठलेही प्राकलन मंजुर केले तरी ठेकेदार ते काम करत नाही. कारण त्यांना त्यांचे देयक मिळण्याची खात्री नाही. म्हणजेच महापालिका दिवाळखोर झाल्याचे ते एक लक्षण आहे. तेव्हा वेळ गेलेली नाही. तुमच्या लक्षात नसेल तर लक्षात आणुन दिलेले आहे माझ्याकडे तसे पुरावे आहेत. दरपत्रके आहेत. वाटल्यास दरपत्रके तुम्ही कंपनीकडुन मागवु शकता. सदरचा खर्च १० वर्षांसाठी रू. २०-२५ कोटीच्या आतमध्येच होईल. आणि जे चित्र निर्माण केलेले आहे त्यापेक्षा किती तरी पटीने आपण उल्हासनगर घडवु शकु. कृपया या पर्यावरण अहवालामध्ये घनकच-याबाबत दिलेला सल्ला आपण अंमलात आणुन जो कृती आराखडा दिलेला आहे त्यानुसार चालु करून, कृती आराखडा नुसता कागदावरच न ठेवता त्यांनी जे दिलेले आहे की यामध्ये काटकसर करून उल्हासनगर महानगरपालिकेचा जो आर्थीक आलेख आहे तो आपण वाढवा अशी अपेक्षा करतो. आणि मी जी सूचना केलेली आहे किंवा माहिती दिलेली आहे. आपण त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न कराल अशी आशा करतो धन्यवाद.

मा. सदस्या श्रीमती ज्योती कलानी, श्रीमती प्रेमा खांडेकर यांनी ४-३४ वाजता मा. सदस्य श्री महेंद्र मुलचंदानी यांनी ४-३६वाजता सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः</u>-मा. महापौरजी, आयुक्त व सहयोगी, जेव्हा श्री. धनंजय बोडारे यांनी वक्तव्य केले त्यांनी आयुक्तांचे अभिनंदन केले. त्यावेळी आयुक्त साहेब देखिल त्यांच्याकडे आश्चर्याने पहात होते. आयुक्तांची ही प्रतिक्रीया देखिल स्वाभाविकच आहे. परंतु हा विषय त्यांनी यासाठी काढला की, मागच्या वर्षी जो पर्यावरण अहवाल आला होता त्यावेळी आम्ही म्हणालो होतो की,

हा जो अहवाल आहे तो अहवाल नसुन एक निबंध आहे. आणि हा निधीचा दुरूपयोग आहे. परंतु आजचा जो अहवाल आहे त्याचे विश्लेषण शास्त्रीय दृष्टीकोनातुन केलेले आहे. यामध्ये देखिल ब-याच काही बाबी ज्या असायला हव्या होत्त्या त्या नाहीत. त्यापैकी काही बाबीवर मी आपले लक्ष वेधु इच्छितो. यासाठी काही मुददे जे आता श्री. बोडारे साहेबांनी सांगितले मी त्यांच्याशी सहमत आहे परंतु त्यातील काही मुददयांची मी पुनरावृत्ती करू इच्छित नाही यासाठी मी दुसरे मुददे याठिकाणी निर्दशनास आणु इच्छित आहे. हा जो पर्यावरण अहवाल आहे त्यामध्ये शास्त्रीय दृष्टीकोन तर आहेच परंतु यामध्ये जो कृती आराखडा आहे त्यात कमतरता आहे. जर अहवाल पाहिला तर हा जो ४० पानांचा अहवाल आहे. त्यापैकी शेवटची जी दोन पाने आहेत त्यामध्ये फक्त एक पानाचा कृती आराखडा दर्शाविलेला आहे. हा जो कृती आराखडा आहे तो अत्यल्प आहे. शास्त्रीय दृष्टीकोन जास्त आहे. मी ध्वनी प्रदुषण, वायु प्रदुषण व इतर मुददे यावर बोलु इच्छितो. जर आपण यातील तक्ते बघितले, अहवाल बघितले तर ध्वनी प्रदुषणाचे जे सर्वेक्षण केलेले आहे. त्यामध्ये दिवसा अथवा संध्याकाळी ५ वाजेपासुन ९ वाजेपर्यंत विशेषतः ट्राफीक जंक्शनची ज्यामध्ये शिवाजी चौक, शास्त्री चौक, नेहरू चौक, श्रीराम चौक, प्रभात टॉकीज प्रत्त्येक कॅम्पाचा एक चौक येतो. जर आपण त्याचा अभ्यास केला तर आपणास असे दिसेल की, असा कोणताही चौक नाही जेथे ध्वनी प्रदुषण नाही. जो मिनिमम स्टॅंडर्ड आहे तो पाहिल्यास शिवाजी चौक येथे कमीत कमी ८४ आहे व जास्तीत जास्त ८६ आहे. शास्त्री चौकाचे कमीत कमी ८४ व जास्तीत जास्त ८८ आहे. नेहरू चौकाचे कमीत कमी ७२ व जास्तीत जास्त ८२ म्हणजे ४५-५५ यामध्ये एकही चौक नाही. ज्यास आपण ध्वनी प्रदुषणापासुन मुक्त म्हणु शकु. जर आपण निवासी क्षेत्र पाहिले ज्याबाबत २४ तासांसाठी सर्वेक्षण केलेले आहे. ज्यामध्ये अमन टॉकीज येथील भाग येतो, पोलिस स्टेशन १ नंबर येथील भाग येतो, गोल मैदान येथील भाग येतो, ३ नंबर ओटी येथील भाग येतो. खेमाणी हायस्कुल येथील भाग येतो. त्यामध्ये देखिल पाहिल्यास असे दिसुन येते की, तेथे २४ तास ध्वनी प्रदुषण असते. व फक्त अमन टॉकीज येथे रात्री १ ते सकाळी ९ वाजे पर्यंत व गोलमैदाने येथे सकाळी ६-७ च्या दरम्यानची वेळ सोडुन इतर वेळ हा मर्यादित स्तरापेक्षा जास्त ध्वनी प्रदुषण असते वरील सर्व आकडेवारी पाहिल्यास दिसुन येते की, शहरातील काही भाग सोडुन संपुर्ण शहर हे ध्वनी प्रदुषणाने ग्रस्त आहे ऐवढे आम्ही सांगु शकतो. यावर करायच्या उपाययोजनांवर मी थोडयावेळाने येतो. जर आपण वायु प्रदुषणाबददल बोललो तर असे म्हणावेसे वाटते की सभागृहात उपस्थित असलेल्यांपैकी तांत्रिक माहिती असणारा कुणी नाही. परंतु ज्यांनी देखिल याबाबत अभ्यास केला आहे. त्यांना आढळुन येईल की, ध्वनी प्रदुषणाबाबत त्यांनी कमीत कमी पातळी निश्चित केली आहे. व्हॉट इज दी ऑप्टीमम स्टॅण्डर्ड, दिवसा ५५ डेसिबल, रात्री ४५ डेसिबल ऐवढी असायला हवी परंतु यामध्ये जर वायु प्रदुषणाबाबत पाहिले तर कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनोक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन यांच्या ज्या पातळया असतात आपण रात्री जे कार्यक्रम पाहतो विविध वृत्त वाहिन्यांमध्ये ते दर्शाविले जाते की, व्हॉट इज दी सेफटी लेवल, व्हॉट इज दी डेंन्जरस लेवल, व्हॉट इज दी बर्निंग लेवल अशा तीन पातळया दाखविल्या जातात पंरतु या अहवालात मी पाहिले की, आम्ही तर इथे सर्व अतांत्रिक माणसे आहोत. आपण त्यांच्याशी विचार विमर्श केला असेल तर त्याबददल आपण आम्हाला मार्गदर्शन करा की, यासाठी धोकादायक व सुरक्षित पातळी कोणती आहे. त्याचा उल्लेख यामध्ये केलेला नाही यामुळे आम्ही त्याबाबत जास्त चर्चा करू शकत नाही. परंतु जोपर्यंत आमची माहिती आहे. या शहरात ज्या प्रकारचे रोग आहेत. श्वसन विषयक रोग आहेत. अस्थमाच्या केसेस आहेत. टीबीच्या केसेस आहेत. त्यावरून असे दिसुन येते की, आपले शहर वायु प्रदुषणापासुन मुक्त नाही. हे मी शहरात असलेल्या आजारांच्या आधारावर बोलत आहे. जो शास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास केलेला आहे. त्याबददल मी बोलु शकत नाही. त्याबाबत आयुक्तांनी आम्हाला मार्गदर्शन करावे. कारण या अहवालात सेफटी नॉर्म्स व किमान पातळी बददल काही एक उल्लेख केलेला नाही. जेथ पर्यंत जल प्रदुषणाबाबतचा प्रश्न येतो. मला वाटते की ज्या टीमने याबाबत

अभ्यास केला आहे. आपणांस माहित असेल की दोन-तीन वर्षापुर्वी या शहरामध्ये कॉलरासारख्या रोगाच्या काही केसेस झाल्या होत्या तर ज्या कोणी याबाबत सर्वेक्षण केले असेल त्यांनी हा विषय गंभीरपणे घेतल्याचे दिसुन येत नाही. जेथे जेथे पाण्यामध्ये क्लोरीनची मात्रा कमी प्रमाणात आहे अशा ठिकाणी त्यांनी सर्व्हेक्षण करणे आवश्यक होते परंतु त्यांनी ते केल्याचे दिसुन येत नाही. यापुढे आपण त्यांना तसे सांगावे की कमीत कमी वेगवेगळया विभागांमध्ये त्यांनी पहाणी करावे. मागच्या वर्षी आपण पाहिले होते की, ब-याच विभागांमध्ये पाण्यात क्लोरीनची मात्रा कमी प्रमाणात होती. ज्या शहरात कॉलरा सारख्या रोगाचा प्रसार होतो तेथे महापालिकेने शास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास करणा-या संस्थेला जे काम देते तर मला वाटते की, ही बाब त्यांच्या नजरेतुन सुटलेली आहे अथवा त्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. जल प्रदुषणाबाबत देखिल त्यांनी शास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास करावयास हवा होता. तो यात नाही. याबाबत आमच्या काही सूचना देखिल आहेत. आम्ही फक्त बोलु इच्छित नाही तर सूचना देखिल करू इच्छितो की, ठाणे शहरात आपण गेल्यास चौकांमध्ये जसे, रात्री टीव्हीवर किंवा चॅनल वर वायु प्रदुषणाबाबत माहिती देतात. तसेच मुंबई, ठाणे, नाशिक व इतर महापालिका व नागपुर येथे मी गेलो असता पाहिले की, एक तक्ता असतो. एम्बीएंन्ट एअर मॉनेटरींग ॲनलिसिस रिपोर्ट ते महत्त्वाच्या चौकावर असते तेथे राहणा-या लोकांना त्याची माहिती मिळते. व ते बंधनकारक आहे. आपल्या शहरात देखिल असे व्हायला पाहिजे. असे माहिती देणारे तक्ते आपल्या शहरात देखिल विविध चौकांमध्ये बसवायला हवेत. जसे ठाणे आणि मुंबई शहरामध्ये निऑन साईन्स व्दारे सदरची माहिती दिली जाते. शक्य होत असल्यास आपल्याकडेही त्याचप्रमाणे माहिती दिली जावी. असे केल्यास चांगले होईल व लोकांना त्याची माहिती देखिल होईल. त्याशिवाय प्रदुषणाबाबत विशेष करून डोंबिवली, ठाणे व मुंबई शहरामध्ये मी पाहिले आहे की, जलप्रदुषण, वायु प्रदुषण व ध्वनी प्रदुषण याबाबत महापालिका अशासकीय संस्था उदा. रोटरी क्लब, लायन्स क्लब किंवा अन्य संस्था यांचा सहयोग घेवून लोकांमध्ये जनजागृती करतात. तर असे उल्हासनगरमध्ये देखिल व्हायला पाहिजे. प्रदुषणाबाबतीत आयुक्तांनी अशा अशासकीय संस्थाशी चर्चा करून लोकांना प्रदुषणाबाबत माहिती मिळेल याकडे लक्ष दयावे. जल प्रदुषणाबाबत देखिल मी सांगु इच्छितो की याबाबत या अहवालात पुरेसा उल्लेख केलेला नाही. तरी पुढच्यावेळी अहवाल बनविताना या बाबीकडे लक्ष देण्यात यावे. मला असे वाटते की, आम्ही ज्या काही सुचना दिल्या आहेत त्या विचारात घेतल्या जाव्या. आम्ही या अहवालास विरोध करीत नसुन हा एक शास्त्रीय अभ्यास असुन या अहवालाला आम्ही दाद देतो. सदरच्या अहवालावर अंमलबजावणी केली जावी अशी देखिल आम्ही आशा करतो. कारण आज संपुर्ण देशात पर्यावरण विषयक बाबीकडे विशेष लक्ष दिले जाते. पर्यावरणासाठी एक स्वतंत्र मंत्रालय देखिल आहे. याकडे आपण लक्ष दिल्यास उल्हासनगर शहरासाठी काही करून दाखवु शकतो. अशी आम्ही आपणांकडुन अपेक्षा ठेवतो. जयहिंद.

मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी व मा. सदस्य श्री प्रमोद टाले व श्री मोहन बेहरानी यावेळी सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, एक म्हण आहे की...

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>पंजाबी साहेब, आपण अहवालावर जे स्पष्टीकरण दिले त्याबद्दल आम्ही आपले धन्यवाद व्यक्त करतो. आता आयुक्त साहेब यावर आपले म्हणणे मांडतील.

मा. सदस्य श्री सुरेश जाधव, श्री लालबिहारी यादव व सदस्या श्रीमती निता आहुजा यानी यावेळी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-एक म्हण आहे की, ''सोनाराने कान टोचले की दुखत नाहीत'' या अहवालामध्ये जे जे विषय उल्हासनगर शहराबाबत पर्यावरणाची स्थिती असेल, येथील अनाधिकृत बांधकामाचा विषय असेल पाणी टंचाईचा विषय असेल पाण्याच्या प्रदुषणाचा विषय असेल किंवा इतर कुठल्याही विषयाच्या बाबतीत असेल या महासभेमध्ये वारंवार चर्चा झालेली आहे. असे नाही की हे विषय येथे चर्चिले गेले नाहीत. चर्चा झालेली आहे, वेगवेगळया सदस्यांनी त्यामध्ये भाग घेताना आपापल्या पध्दतीने आपले म्हणणे मांडलेले आहे, सूचना दिलेल्या आहेत. परंतु होते असे की ज्यावेळेला अशाप्रकारच्या चर्चा सभागृहामध्ये होतात आणि ज्यावेळेला अशा सूचना केल्या जातात त्या सूचनांवर किती प्रभावीपणे अंमलबजावणी होते त्याकडे किती काटेकोरपणे, गांभीर्याने पाहिले जाते. यावर पुढच्या गोष्टी अवलंबुन असतात. आपण सर्वांनी मिळुन या गोष्टींकडे दुर्लक्ष करायचे आहे. आणि त्यानंतर मोठया प्रमाणावर जेव्हा अशी समस्या निर्माण होते त्यावेळेला आपल्या सर्वांना या अहवालाचे अप्रुप वाटते. पण मला असे वाटत नाही अप्रुप वाटण्यासारखी परिस्थिती या अहवालामध्ये नमुद केलेली आहे. ही सगळी परिस्थिती आपल्या सगळयांना माहिती आहे. या महापालिकेमध्ये काम करणारे कर्मचारी, अधिकारी, लोकप्रतिनिधी, निवडुन आलेले सदस्य या शहरातील प्रसार माध्यमे यांना ही सगळी परिस्थिती माहिती आहे व याची कारणे सुध्दा माहित आहेत. प्रश्न असा आहे की, ही परिस्थिती माहित झाल्यानंतर या कारणांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत किंवा नाही? हा प्रश्न त्यांनी अहवालामध्ये सुध्दा आपल्याला विचारला आहे. आणि या अहवालामध्ये वेगवेगळया विषयावर भाष्य करताना जर यशदा या संस्थेने कशावर जोर दिला असेल तर, ठासुन कोणता मुददा सांगितला असेल तर त्यांनी बोट ठेवलेले आहे ते येथील व्यवस्थेवर ठेवलेले आहे. या शहरातील व या महापालिकेतील एकंदरीत जी अव्यवस्था आहे. त्या अव्यवस्थेवर प्रत्येक पानावर यशदा या संस्थेने बोट ठेवलेले आहे. आणि त्यामुळे या अहवालाबददल मत दयायचे झाले तर हा अहवाल वास्तववादी आहे. परंतु यावर आपण चर्चा केली नाही का? ज्यावेळेस ही सभा अस्तित्त्वात आली आपण नविन नविन निवडुन आलो त्यावेळेला या सभागृहामध्ये नाला विस्तारीत करणेबाबत चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये ब-याच सदस्यांनी भाग घेतला. चर्चा झाली. प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की हा विषय चांगला विषय आहे, गंभीर विषय आहे. सदर विषयाकडे आपण प्राथमिकतेने पाहायला हवे. त्याच्यानंतर काय झाले? त्यानंतर नाला विस्तारीत करण्याबाबत प्रशासनाने काही एक केलेले नाही. दुसरा विषय जो प्रत्येक वेळेला सभेमध्ये चर्चेसाठी येतो अनाधिकृत बांधकामाबाबत. अनाधिकृत बांधकामांचा विषय काढला की इथे बोलणारे आणि ऐकणारे सगळे एकमेकांकडे संशयाने बघायला लागतात. काही कळत नाही की त्या विषयामध्ये काय गोम आहे. परंतु तो विषय काढला की सगळे एकमेकांकडे संशयाने बघायला लागतात. एक गमतीदार व फालतु विषय म्हणुन त्याच्याकडे बघतात परंतु जर आपण या महापालिकेच्या आयुक्तांनी काढलेली श्वेतपत्रिका पाहिली व त्या पाठोपाठ यशदा या संस्थेने बनविलेला पर्यावरण अहवाल पाहिला तर आपल्या लक्षात येईल की प्रत्येक वेळेला अनाधिकृत बांधकामाच्या समस्येकडे हीच समस्या मुळाशी असल्याबाबत त्यांनी यावर बोट ठेवले आहे. आज याठिकाणी सभागृहामध्ये आपण बसलेलो असताना श्वेतपत्रिका निघाल्यानंतर अनाधिकृत बांधकामांच्या संदर्भामध्ये कठोर उपाययोजना केल्या गेल्यात का असा जर प्रश्न आपण उपस्थित केला तर त्याचे उत्तर येते, नाही. किंवा इतर समस्या तुम्ही पाण्याची समस्या घ्या, आपण फक्त वाचायचे आणि गप्प बसायचे की हा अहवाल फार चांगला आहे. या अहवालात असे नमुद केलेले आहे की, या शहरातील ५० टक्के लोकसंख्येला पिण्याचे शुध्द पाणी मिळत नाही. हे अहवालामधील भाष्य आहे. हे फक्त आपण वाचणार आणि हाताची घडी घालुन पास, पास असे म्हणणार का? मुददा असा आहे की ते का मिळत नाही त्याची कारणे काय आहेत? त्याच्या मुळाशी आपण जाणार आहोत का? माझे सहकारी सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी कॉलराचा विषय काढला फक्त कॉलराच नाही या शहरामध्ये इतरही अनेक प्रकारचे रोग आहेत. आणि हे सगळे जे रोग आहेत आपण प्रामुख्याने पाहिले तर येथील सदस्य ही त्याच्याशी सहमत होतील.

जास्तीत जास्त रोगराई पसरत असेल तर ती झोपडपट्टी विभागातुन आहे. जर आपण पाहिले तर दिसुन येईल की, जास्तीत जास्त रोगी हे झोपडपट्टी भागातुनच येत असतात. मग झोपडपट्टी विकासाचा विषय, या कृती आराखड्यात त्यांनी उल्लेख केलेला आहे की, पिण्याचे पाणी शुध्द दया हे आपल्याला कुणी नव्याने सांगायची गरज नाही. त्यांनी म्हंटले आहे की या शहरामध्ये स्वच्छता राखा हे सुध्दा कुणी आपल्याला सांगण्याची गरज नाही. त्यांनी या अहवालामध्ये म्हंटलेले आहे की या शहरातील झोपडपट्ट्यांचा विकास करीत असताना या शहरातील दारीद्य रेषेखालील जी वस्ती आहे. तिचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करा. हा एकच विषय आपणां सर्वांसाठी नविन आहे. नविन यासाठी की ही संकल्पना आपण ऐकलेली आहे परंतु अशी संकल्पना आपल्या मनाने अजुन स्विकारलेली नाही. यशदाने कृती आराखडा बनविताना कशावर जोर दिला असेल तर तो झोपडपट्टी विकासावर दिलेला आहे. आणि झोपडपट्टी विकासावर जोर देत असताना त्यावर संपुर्ण भर दिलेला असताना आपण आपल्या महापालिकेमध्ये गेल्या अनेक वर्षामध्ये झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी जे वेगवेगळे निधी आहेत. त्यामध्ये दलित वस्ती सुधारणेचा निधी असेल त्यामध्ये दुर्बल घटकांचा निधी असेल, त्यामध्ये गलिच्छ वस्ती सुधारणेचा निधी असेल, सुवर्ण जयंती रोजगार योजनेमधील निधी असेल तर इतके सगळे निधी असताना शिवाय त्याच्याबरोबरीने सर्वसाधारण निधी देखिल असताना झोपडपट्ट्यांमध्ये आजच्या तारखेला देखिल जी दुरावस्था आहे. ज्या प्रकारची अस्वच्छता आहे, गलिच्छपणा आहे, त्याला जबाबदार कोण आहे हा सुध्दा प्रश्न याठिकाणी उपस्थित होतो. मी फक्त प्रशासनाला म्हणणार नाही याठिकाणी बसलेल्या प्रत्येकाने हा प्रश्न आपल्या मनाला विचारायला पाहिजे. आपण कुठल्या प्रकारची कामे सुचवितो. आणि प्रशासनाने कोणत्त्या कामाला प्राधान्य देवून ती स्विकारायला हवी  हा सुध्दा याठिकाणी चर्चेचा विषय आहे. आणि त्याकडे गांभिर्याने बघायला हवे असे मला वाटते. याच्यामध्ये केवळ आम्ही सुचविलेल्या प्रभागात आमचे काम होत नाही. हा मुददा नाही जर आपल्याला मुळाशी जावुन यावर चर्चा करायची असेल, जर सदस्यांनी सुचविलेल्या कोणत्त्या कामांना प्राधान्य दयायचे.कोणत्त्या गोष्टींना निधी वापरायचा, निधीची कमतरता असल्यास त्या निधीचा विनियोग नेमका कसा करायचा हा मुददा प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे.  याठिकाणी आपल्याकडे यु.एन.एफ.पी.ए. ची योजना आहे. आपले आरोग्य अधिकारी सदरची योजना चालवितात. या योजने अंतर्गत झोपडपट्टी भागातील दारीद्य रेषेखालील जो वर्ग आहे.  त्यांच्या जनजागृतीचे त्याठिकाणच्या ज्या महिला आहेत त्यांच्या कल्याणाची जी कामे आहेत. ती या फंडातुन केली जावु शकतात. आपण जर गेल्या वर्षातील माहिती काढली तर मला असे वाटते की, रूपये २ करोडचा निधी न वापरता आपण शासनाला तो परत दिलेला आहे. त्याचा विनियोग याठिकाणी झालेला नाही. म्हणजे एका बाजुला आपण म्हणायचे की या महापालिकेत निधीची कमतरता आहे. आणि दुस-या बाजुला केंद्रशासन किंवा राज्य शासनाचे दोन दोन कोटीचे निधी न वापरता परत जातात. तर याचे सुध्दा कारण आपण शोधायला हवे. व्यवस्था उभी करायची तर काय काय उभे करणार? आपल्या शहरामध्ये मोठया प्रमाणावर उपहार गृहे आहेत. त्याबाबतीत या शहरामध्ये कुठल्या प्रकारचे उपविधी बनविले आहेत काय? तर त्याचे उत्तर येते नाही. याठिकाणी फेरीवाले मोठया प्रमाणावर आहेत. फेरीवाल्यांच्या बाबतीमध्ये आपण काही उपविधी बनविले आहेत काय? त्याचे उत्तर सुध्दा नाही. या शहरामध्ये जे मास विक्रेते, मच्छी विक्रेते, मटन विक्रेते आहेत त्यावर देखिल आपले नियंत्रण नाही. या शहरामध्ये आपले तबेल्यांवर देखिल नियंत्रण नाही.  या शहरामध्ये रस्ते बनविताना त्याच्या दोन्ही बाजुला आपण गटारे बांधत नाहीत. या शहरामध्ये रस्त्त्यावर गतिरोधके बनविताना आपण ते मोजमापाप्रमाणे बनवित नाहीत. कधी लहान असतात कधी मोठे असतात. पर्यावरण याविषयावर चर्चा करतांना कुठल्या गोष्टींचा आपण विचार करणार आहोत. जर आपण या कृती आराखड्याकडे गांभीर्याने लक्ष दिले आणि याची अंमलबजावणी करायची झाली तर असं म्हणायला लागेल की, हे शहर पाडून पुन्हा एकदा नव्याने हे शहर बनवावे लागेल,आणि ते शक्य नाही.  या ठिकाणी त्यांनी नमुद केलेले आहे की, जी विकासाची कोंडी आहे, काही काही

सदस्यांना काही गोष्टीवर भाष्य केल्यास राग येतो की, उल्हासनगर शहराची बदनामी होते, उल्हासनगर बद्दल लोक वाईटच बोलतात. पण हा जो अहवाल आपण स्विकारणार आहोत या अहवालामध्ये आपण म्हंटलेले आहे की, उल्हासनगर मध्ये ज्या प्रकारच्या समस्या आहेत अशा प्रकारच्या समस्या असलेले हे एकमेव शहर आहे. आणि अशा प्रकारच्या शहराची आपण इतर शहरांची तुलना करुन आपण मार्ग काढुच शकत नाही असे या अहवालात स्पष्टपणे भाष्य केलेले आहे. तर हे आपण स्विकारणार आहोत काय ही कोंडी फोडण्यासाठी येथे उपाययोजना करणार आहोत काय? त्यांनी यामध्ये नमुद केलेले आहे की, या शहराचे क्षेत्र वाढवायला हवे परंतु शहराचे क्षेत्र वाढवित असताना ज्याप्रकारच्या समस्या, पाण्याची समस्या, लोकसंख्येची समस्या किंवा साफसफाईची समस्या त्यांनी येथे आकडेवारीसकट नमुद केले आहे. मी आकडेवारीमध्ये जात नाही. त्यांनी नमुद केलेली आहे. त्यानुसार त्यांनी भविष्यातील २५ वर्षांचा आराखडा आपल्या डोळ्यासमोर मांडलेला आहे. आणि मग त्यावेळेला जेव्हा सात गावांचा विषय या सभागृहामध्ये आला होता. त्यावेळेला येथे आम्ही अंबरनाथ, बदलापुर, उल्हासनगर आणि परिसरातील ७६ गावांची मिळुन एक मोठी महापालिका या ठिकाणी असली पाहिजे ही केवळ उल्हासनगरसाठीच नाही तर आजुबाजुच्या शहरांसाठी देखिल एक चांगली उपाययोजना आहे. असे आम्ही मत मांडले होते परंतु बहुमताच्या जोरावर आमचे मत विचारात घेतले गेले नाही. तर याठिकाणी असे होईल की, खरे बोलायला गेलो तर अनेकांची मने दुखावतील आणि खोटे बोलायला गेलो तर याठिकाणी कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना निघणार नाहीत. अशा प्रकारची परिस्थिती या शहरामध्ये आहे. कधी कधी असे वाटते की, गुपचुप बसुन राहावे. विषय वाचायचा आणि पास पास असे म्हणायचे. कधी कधी असे वाटते की आपण बोलतो ते कोणाशी बोलतो. आणि त्यामुळे ती ......

यावेळी मा. सदस्य श्री महेंद्र मुलचंदानी व श्री मनोज साधवानी सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>कृपया हिंदीमध्ये बोला. म्हणजे आम्हाला देखिल समजेल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आयुक्त महोदयांना समजले ना? मला तेवढीच अपेक्षा आहे.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>कृपा करून हा जो अहवाल आहे यावरच भाष्य केले तर उत्तम होईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, मला कोणत्त्याही वरीष्ठ सदस्यांवर भाष्य करणे योग्य वाटत नाही. पंरतु हे जर अहवाल वाचुन आले असते तर खुप चांगले झाले असते असे मला वाटते. आपणां सर्वांना असे वाटत आहे की पर्यावरणाचा जो विषय आहे हा विषय आहे झाडांशी आणि फुलांशी संबंधित आहे. परंतु असे नाही. या शहराच्या अव्यवस्थेवर, प्रशासनाच्या अव्यवस्थेवर या अहवालात भाष्य करण्यात आलेले आहे. यशदा संस्था आहे. यशदा संस्था ही शासकीय संस्था आहे. त्यांना काम दिले आहे त्यामुळे त्यांना करायचे आहे. परंतु त्यांनी ज्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत त्यावर कारवाई करायची अथवा नाही ते आपल्यावर आहे. मला असे वाटते की आज आपण पास, पास म्हणुन हा विषय प्रशासनावर सोडुन देतो. परंतु प्रत्येक सदस्यांने या अहवालास वैयक्तिक रित्या वाचायला हवे. वाचल्यानंतर सदरचा अहवाल समजुन घ्यायला हवा. एकाचवेळी उपाययोजना करणे शक्य नाही. वेगवेगळया चार प्रभाग समित्त्या आपण बनविलेल्या आहेत. आठ विषय समित्त्या आहेत. यापुढे अजुन वेगवेगळया समित्त्या बनतील. महासभा आहेत, स्थायी समिती आहे. या सर्व ठिकाणी यावर विस्तृत चर्चा होईल. आणि मी अशी आशा करतो की येत्त्या काही दिवसात, आपला दिड वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे. तीन-साडेतीन वर्षाचा

कालावधी अजुन शिल्लक आहे. आपल्या या कालावधीत या शहराचा चेहरा काही प्रमाणात, पुर्णपणे बदलणे तर शक्य होणार नाही कारण त्यासाठी संपुर्ण शहरच पाडावे लागेल. पण थोडा बहुत तरी बदलेल अशी आशा मी या ठीकाणी व्यक्त करतो. व माझे हे दोन शब्द पुर्ण करतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता पर्यावरण अहवालावर आमचे मा. सदस्य श्री. बोडारे साहेब व श्री. लाल पंजाबी व गटनेता श्री. राज असरोंडकर हे घसा दुखत असताना देखिल जे बोलले त्याबददल मी त्यांना धन्यवाद देतो. पहिल्यांदा ते बोलले की माझ्या घशात त्रास आहे तरी देखिल ते बोलले यासाठी त्यांना धन्यवाद देतो मला वाटते श्री. बोडारे, श्री. लाल पंजाबी व श्री. असरोंडकर यांचा जो अभ्यास आहे तर आम्हाला असे वाटते की पर्यावरणासाठी अजुन एक समिती बनवावी. त्यामध्ये जर श्री. बोडारे साहेब सभापती व उपसभापती म्हणुन श्री. लाल पंजाबी अथवा श्री. असरोंडकर होण्यास तयार असतील तर एक समिती अजुन बनवावी त्यांना याचा अभ्यास आहे. तर आता आमचे बंधु श्री. राज असरोंडकर जसे म्हणाले की, सर्व सदस्य म्हणतात पास, पास. तर सर्वात प्रथम मी मनापासुन आयुक्तांचे अभिनंदन करतो. कमीत कमी आयुक्तांनी सदरचा अहवाल आमच्या समोर तरी ठेवला. यामुळे तर आपण याठिकाणी चर्चा करू शकलो. अन्यथा आजपर्यंत आपण कधी यावर चर्चा केली आहे का? त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यानंतर.....

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>आपले मनापासुन अभिनंदन करतो आणि टाळया वाजवुन देखिल अभिनंदन करतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आज जेथे साफसफाई व्यवस्था बरोबर नाही. पाण्याचा प्रश्न आहे. कुठे कचरा आहे. हा प्रश्न तर संपुर्ण भारत देशात आहे. आज ठाणे, कल्याण-डोंबिवली महापालिका सर्वांनी रस्त्यात कचरा टाकणा-यांवर दंड का लावला. आज कोणी रस्त्यावर कचरा टाकु नये, थुंकू नये. जिथे कचरा टाकण्याची जागा नाही तेथे कुणी कचरा टाकु नये त्याचे कारण हेच आहे की, लोकांमध्ये सिविक सेन्स अजुन आलेला नाही. यासाठी आम्ही सत्तापक्षातर्फे, प्रभाग समितीतर्फे, शासनातर्फे, प्रशासनातर्फे, स्थायी समितीतर्फे, विरोधी पक्षातर्फे सर्व उल्हासनगर शहरवासियांना, जनतेला जर विनंती करावी लागली तर विनंती करू की कृपा करून कचरा जेथे कचराकुंडी असेल तेथेच टाकावा रस्त्यावर टाकु नका, रस्त्यांवर थुंकू नका, बाल्कनीतुन कचरा टाकु नका.तर हा जो अहवाल आहे यावर जेवढया देखिल सूचना दिल्या आहेत त्यातील ज्या सूचना योग्य वाटतील त्या स्विकारल्या तर आमचे काही एक म्हणणे नाही. त्यांनतर श्री. राज असरोंडकर यांनी सागितले की आम्ही येथे फक्त पास, पास करण्यासाठी बसलो आहोत तर यावर आमचे उत्तर आहे की आयुक्त साहेबांनी आमच्या समोर श्वेत पत्रिका सादर केली. ती आम्ही पास केली तेव्हा तर तिची अंमलबजावणी होईल. आज पर्यावरणाचा अहवाल महासभेपुढे ठेवला आहे. जेव्हा हा पास होईल तेव्हाच तर त्याची अंमलबजावणी होईल. आज येथे जर एकमताने आपण पर्यावरण विषयक अहवाल पारीत केला तरच त्यावर अंमलबजावणी होईल उदा० दुषित पाणी, कचरा त्यामध्ये या सर्व बाबी समाविष्ट आहेत. तर आम्ही आयुक्त साहेबांना विनंती करतो की हा जो अहवाल आहे तो एकमताने पारीत झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करावी व आमच्या सदस्यांनी ज्या बाबींवर सूचना दिल्या आहेत त्या देखिल विचारात घेतल्या जाव्यात तर फारच चांगले होईल. धन्यवाद.

<u>मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणेः</u>- मा. महापौर महोदया व या सभागृहात उपस्थित सर्व सदस्य सर्वप्रथम मी आपल्या सर्वांची माफी मागु इच्छितो कारण माझ्याकडे एक १० कलमी कृती आराखडा आहे, जो पर्यावरण अहवाला सोबतच सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी दिला होता परंतु शहर अभियंता यांच्या कार्यालयातुन आपल्याला फक्त एकच पुस्तिका उपलब्ध झाली. दुसरी उपलब्ध

झाली नाही. अन्यथा आपल्या ज्या सुचना होत्त्या त्या देखिल त्यामध्ये समाविष्ट आहेत मी सदनापुढे ठेवू इच्छितो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आताचे शहर अभियंता हे देखिल पुर्वीचेच शहर अभियंता प्रमाणे आहेत का?

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी ५-१६ वाजता सभागृहात प्रवेश केला.

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे:-आता ही जबाबदारी मी माझ्यावरच घेत आहे. त्यांना कधी मी आपणांसमोर एक्सपोज करणार नाही. परंतु हा जो १० कलमी कृती आराखडा आहे तो पण सभागृहासमोर ठेवु इच्छितो. त्यामध्ये आपण ज्या सूचना केल्या आहेत जसे की, ॲंबीयंट एअर कॉलिटी मॉनीटरींगसाठी शहरात फलक लावणे व संगणीकृत एअर कॉलीटी मॉनीटरींग लावणे हे त्यामध्ये समाविष्ट आहे. या सभागृहात पर्यावरणाविषयी जी काही चर्चा झाली. त्यामध्ये दोन-तीन गोष्टी प्रामुख्याने समोर आल्या. एक म्हणजे या अहवालात या शहरातील पर्यावरणाच्या दशेबाबत जे काही दर्शविले त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. श्री. बोडारे साहेबांनी घनकचरा व्यवस्थापनाबाबत काही गोष्टी सभागृहासमोर ठेवलेल्या आहेत. त्याच्याशी आज रोजीस तरी मी सहमत होवू शकत नाही परंतु जे काही त्यांनी म्हंटलेले आहे. ते तपासले जाईल दरांचे विश्लेषण आम्ही देखिल केले होते व इतर महापालिकांकडुन देखिल माहिती घेतली होती. जेव्हा मुंबई महानगरपालिकेची फक्त वाहतुकीचा दर आम्ही विचारला असता तो १२०० रू. प्रति मेट्रीक टन ऐवढा असल्याचे कळवले. त्यांचे कचरा वाहतुकीचे अंतर जास्त आहे आपला जो वाहतुकीचा दर आहे त्यामध्युन घरोघरी जावुन कचरा गोळा करणे ही बाब देखिल समाविष्ट आहे. त्याशिवाय कचरा पेट्यांची मालकी हातगाडयांची मालकी, हातगाडयांवर कर्मचा-यांची नियुक्ती हे सर्व पकडुन ५००रू. ऐवढा खर्च होतो. याबाबतीत आम्ही राज्य शासनाचा घनकचरा व्यवस्थापनासाठी जो कक्ष आहे त्यांच्याशी चर्चा करून आपल्या समोर व स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवलेला होता. याशिवाय देखिल मी सभागृहाला सांगु इच्छितो यांनी साधनसामुग्री व कर्मचा-यांच्या खर्चाबाबत जो काही तपशिल दिलेला आहे. त्याचे आम्ही अध्ययन करू. जर ते बरोबर निघाले तर जी काही कायदेशिर कारवाई करणे शक्य असेल ती आम्ही करू. दुसरे अनाधिकृत बांधकामाबाबत नेहमी सांगितले जाते आपणास माहित आहे की, या शहरात ज्याकाही समस्या आहेत. जसे पर्यावरण अहवालात दिलेले आहे व वास्तवता देखिल अशी आहे. या शहराच्या सर्व समस्या एकाच समस्येशी निगडीत आहेत. व ती आहे अनाधिकृत बांधकाम धिस सीटी वील हॅव टू पे हेवी कॉस्ट फॉर नॉन प्लान्ड डेव्हलपमेंट ऑर अनप्लान्ड डेव्हलपमेंट या शहराचा जो काही विकास झालेला आहे तो विकास आराखडयाप्रमाणे झालेला नाही. अनाधिकृत बांधकामाविषयी याठिकाणी पुष्कळ चर्चा झाली. मला असे वाटते की अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण आणण्यासाठी महापालिकेच्या विभागाने जे काही प्रयत्न केले ते आजपर्यंत सफल झालेले नाही. आता आणखी एक प्रयत्न मी करू इच्छितो, मी आपणांस त्याची माहिती देवू इच्छितो की आम्ही एक निवृत्त लष्करी अधिकारी जे पोलिस उपायुक्त या श्रेणीत निवृत्त झालेले आहेत श्री. एस.के. सेठ यांना सहा महिन्याकरिता विशेष कार्य अधिकारी म्हणुन नियुक्त केलेले आहे. या शहरात आज जे काही अनाधिकृत बांधकामे चालु आहेत. ती शुन्यावर आणणे म्हणजेच नविन अतिक्रमणांना प्रतिबंध करणे हा प्रथम हेतु आहे. दुसरा हेतु असा आहे की, १९९५ नंतर जी अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत ती निष्कासित करणे, व जिथे न्यायालयाचे आदेश पारीत झालेले आहे त्याप्रमाणे ५९८ अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणे यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात येतील. मला असे वाटते की यानंतर जर अनाधिकृत बांधकामे शुन्यावर येत असतील तर ते देखिल एक फार मोठे काम असेल मी त्यांच्याकडुन फार अपेक्षा ठेवतो व आपल्याला देखिल विंनती करतो की, १ तारखेपासुन ते काम करणे

चालु करतील आपले सहकार्य देखिल त्यांना मिळाले पाहिजे. बाकी जल प्रदुषणाबाबत जे सांगितले गेले की या अहवालात याची सविस्तर माहिती दिलेली नाही कारण की, पाण्याच्या समस्येबाबत आम्ही आमच्या श्वेत पत्रिकेत पुर्ण माहिती दिली होती. व जे दुषित नमुने येतात ते तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेत आम्ही पाठवितो. त्यातील ५ ते १० टक्के नमुने हे पिण्यास अयोग्य असतात. परंतु त्यावर त्वरीत तीन दिवसाच्या आत कारवाई केली जाते. ते देखिल मी सभागृहासमोर ठेवु इच्छितो आपण पर्यावरण अहवाल स्विकारला त्यासाठी मी आपणांस धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>वायु प्रदुषणाबाबत मी विचारले होते की यामध्ये जे तक्ते दाखविले आहेत त्यामध्ये सेफटी नॉर्मसचा उल्लेख केलेला आहे. तर आपणांस याची माहिती आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे:</u>-माहिती आहे, हा जो पर्यावरण कायदा आलेला आहे १९८६चा त्यामध्ये शहरातील हवेची जी गुणवत्ता आहे ती निवासी स्थानात किती हवी व्यापारी ठिकाणी किती हवी औदयोगिक क्षेत्रात किती हवी याबाबत माहिती दिलेली आहे. त्यानुसार मी सभागृहाला सांगु शकतो परंतु मी आपले लक्ष पर्यावरण संवर्धन कायदयाकडे वेधु इच्छितो की आपण जे फलक किंवा मॉनिटर्स दर्शवितो त्यावर शहरातील हवेची पातळी काय असायला हवी. व शहरात प्रत्यक्षात किती आहे व त्याप्रमाणे ती दाखविली जाईल. मी आपणांस विस्तृत माहिती देतो. ध्वनी प्रदुषण व वायु प्रदुषण या दोघांची माहिती आहे. ध्वनी प्रदुषणाबाबतीत जे औदयोगिक क्षेत्र आहे. ध्वनी प्रदुषण हे डेसिबल्समध्ये मोजतात. दिवसा औदयोगिक क्षेत्रात ७५ डेसिबल्स व रात्री ७० डेसिबल्स व्यापारी क्षेत्रात दिवसा ६५ डेसिबल्स व रात्री ६० डेसिबल्स निवासी क्षेत्रात दिवसा ५५ व रात्री ४५ व जे शांत क्षेत्र आहे तेथे दिवसा ५० व रात्री ४० डेसिबल्स हे ऐवढे असणे आवश्यक असते. आपण या शहराचा जो पर्यावरण अहवाल पाहत आहात त्यामध्ये ॲम्बिएंट एअर क्वालीटी मॉनिटरींग जे आहे त्याबाबत प्रत्येक वायुचे मुलतत्त्व याबाबत प्रत्येकाचे टक्केवारी दिलेली आहे. हा फार मोठा तक्ता आहे. आपणांस जर पाहिजे असेल तर मी नंतर आपणांस देईन सल्फरची मात्रा किती हवी, सल्फर डाय ऑक्साईडची मात्रा किती हवी...

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मला फक्त असे म्हणायचे होते की, वायु प्रदुषणाचा जो तक्ता दिलेला आहे. त्यानुसार आपण सेफटी नॉमर्समध्ये येतो की नाही याची माहिती मला हवी होती.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>तुम्ही येथे सांगितले की, दर विश्लेषण करून त्याच्यावर योग्य वाटले तर कारवाई करणार. आता जो ठेका आहे तो १ तारखेपासुन चालु होणार आहे त्यानंतर तुम्ही काय कारवाई करणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे:</u>-मा. महापौर महोदया, हा जो ठेका देण्यात आलेला आहे त्याचे याआधीच दर विश्लेषण केलेले आहे. घनकचरा व्यवस्थापन कक्ष आहे त्यांच्याशी याबाबत चर्चा केली जाईल. आमची जी निविदा आहे त्यामध्ये आम्ही कायदेशिर कारवाई करण्यासाठी तरतुद ठेवलेली आहे. जर असे वाटत असेल की, यामुळे महापालिकेचे नुकसान होत आहे तर आपण ते काम परत घेवू शकतो. त्यामध्ये तशी तरतुद आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आयुक्त महादेय, जो कृती आराखडा आपण सभागृहासमोर मांडलेला आहे. झोपडपट्टी सुधारणा व दारीदय निर्मुलन याबाबत काही एक उल्लेख केलेला नाही. याबाबत आपले काय म्हणणे आहे. आपण

वाल्मिकी आंबेडकर योजनेबाबत देखिल माहिती दयावी. आज रोजीस आपल्या महापालिकेत त्याची स्थिती काय आहे?

मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी यांनी या वेळेस सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे</u>:-मा. महापौर महोदया, आपणां सर्वांना माहित आहे की या शहराची जवळपास ४० टक्के लोकसंख्या झोपडपट्टयांमध्ये राहते. परंतु आपल्याकडे घोषित झोपडपट्टयांची संख्या फक्त ४८ आहे. एका माहिती प्रमाणे या शहरामध्ये झोपडपट्टयांची एकुण संख्या ६४ ऐवढी आहे. त्याचे सर्व्हेक्षण करणे आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव आम्ही आपल्या समोर आणलेला आहे. या शहरात जेवढया देखिल झोपडया आहेत. त्यांचा पुनश्च सर्वेक्षण केले जाईल व त्या घोषित करून त्या झोपडपट्टयांमध्ये दारीद्रय निर्मुलनाची योजना लागु केली जाईल. वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेबाबत आपण जे विचारले तर या योजने अंतर्गत तीन घटक आहेत. त्यामध्ये नविन घरे बांधण्यासाठी आपणांस ७७५ चे लक्ष ठरवुन देण्यात आलेले आहे. त्यामध्ये दारीद्रय रेषेखालील व आर्थीकदृष्टया दुर्बल लोकांना लाभ दयायचा आहे त्यासाठी आम्ही सर्व्हेक्षण चालु केले आहे. यासाठी आम्ही अर्ज देखिल मागविले आहेत. व ज्या घोषित झोपडपट्टया आहेत व दारीद्रय रेषेखालील लोक आहेत त्यांना अशा घरांसाठी ४० हजार रूपयांचे अनुदान मिळेल. सदरचे अनुदान नविन घर बनविण्यासाठी त्यांना वापरता येईल. जवळजवळ ४०० घरे दुरूस्त करण्यासाठी देखिल लाभ देता येईल. यासाठी त्यांना २०००० रूपयांचे अनुदान मिळेल. ते घराची श्रेणीवाढ करू शकतात अथवा दुरूस्त करू शकतात. तिसरा जो घटक आहे त्यामध्ये झोपडपट्टया, शौचालये बनवायची आहेत त्यासाठी आम्हाला जे लक्ष्य दिलेले आहे ते २८६ ऐवढे आहे. २८६ शौचालये आम्हाला बनवायची असुन त्याचा प्रस्ताव आम्ही तयार केलेला आहे. जवळ जवळ १. १४ कोटीचा प्रस्ताव आम्ही म्हाडाव्दारे शासनाकडे सादर केलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी</u>:-मा. महापौरजी, जसे आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, उल्हासनगर शहरातील ४० टक्के जनसंख्या ही झोपडपट्टयामधुन राहते परंतु अहवालात काहीतरी चुक आहे. घोषित व अघोषित झोपडपट्टयांची बेरीज केल्यास ती ४ लाखाच्या वर जाते. तर एकुण लोकसंख्या ४. ७२ लाख ऐवढी असताना झोपडपट्टयांमध्ये ४. २० लाख ऐवढी होते. तर ही एक चुक आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे</u>:-आपली माहिती कितपत खरी आहे याची माहिती मला नाही. परंतु मला जेव्हा स्वतः शासनाला अहवाल पाठवायचा होता तेव्हा माझ्याकडे जे आकडे आले होते ते आकडे असे होते की घोषित झोपडपट्टयांमध्ये २. ८३ लाख एवढी लोकसंख्या राहते व व ज्या अघोषित ६४ झोपडपट्टया आहेत त्यामध्येही जवळपास २. ५० लक्ष एवढी लोकसंख्या आहे, असा अहवाल माझ्यापुढे आला होता. त्यानंतर आम्ही त्वरित झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करण्याचा प्रस्ताव आपल्यासमोर ठेवलेला आहे. जर शहराची एकुण लोकसंख्या बघितली तर ती ४. ७२ लाख एवढी आहे व घोषित व अघोषित झोपडपट्यांमधील एकुण लोकसंख्या ४. ७२ लाखांपेक्षा जास्त होते. म्हणजेच आपली २००१ ची जनगणना बरोबर नसेल अथवा झोपडपट्टयांमधील लोकसंख्या चुकीची असेल. यासाठीच आम्ही झोपडपट्टयांचे पुन्हा सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेऊन आपल्यासमोर हा प्रस्ताव आणलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री धनंजय बोडारे</u> :- मा आयुक्त साहेब हे जे दर विश्लेषण आहे त्याची एक प्रत जर मला मिळाली तर माझी काय चुकी आहे ते मला लक्षात येईल. कारण जो फरक आहे तो फार मोठा आहे, ५० करोड व २० करोड म्हणजे ३० करोडचा फरक आहे. तर माझी जी माहिती आहे ती महापालिकेच्या

कामात येवुन महापालिकेचे रु ३० करोड वाचत असतील तर त्यासाठी मला दर विश्लेषणाची एक प्रत लवकरात लवकर द्यावी, ही विनंती.

मा. सदस्य श्री राज असरोंडकरः- कृती आराखडा मंजुरीसाठी स्वतंत्र आणणार आहात काय ?

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे:-नाही नाही, यांचे म्हणणे वेगळे आहे. कृती आराखड्याची प्रत आताच आपणांस मिळेल याची मी व्यवस्था करतो.

मा. सदस्य श्री राज असरोंडकरः- त्याच्यामध्ये निवासी क्षेत्रासाठी देखिल खाजगी क्षेत्राकडुन गुंतवणुकीची वगैरे सुचना आहे तर हा तर धोरणात्मक निर्णय होईल ना ?

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे:-कृती आराखड्यात जे नमुद केले आहे त्यानुसार जे काही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील त्यासाठी आम्ही पुनश्चः महासभेसमोर प्रस्ताव आणु.

मा सदस्य श्री शांताराम निकमः- मा. महापौर महोदया आता वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत जी घरे बनविण्यात येतील त्या अंतर्गत ४०,०००रु दिले जातील असे येथे सांगितले गेले. परंतु जी घरे बनविण्यात येतील त्यासाठी जागा महापालिका देईल अथवा ते ज्या अनाधिकृत, आरक्षणाच्या जागी राहतात तेथे घर बनवु शकतात का?

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे:-मा. महापौर महोदया, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना ज्यास संक्षिप्तमध्ये वाम्बी असे म्हणतात त्याअंतर्गत जी नविन घरे बनविली जातील त्यामध्ये जर लोक शासनाच्या जमिनीवर अनाधिकृतरित्त्या रहात असतील व ती जमिन कोणत्त्याही नागरी सुविधेसाठी आरक्षित नसल्यास तर तीच जमिन त्यांना शासनाकडुन भाडेतत्त्वावर दिली जावु शकते. जर तेथे आरक्षण असेल व तेथे त्यांचे पुर्नवसन करणे शक्य असेल तर त्यासाठी देखिल कायदयात तरतुद केली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मा. महापौरजी जसे आयुक्त साहेबांनी आता वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेबददल सांगितले की, यामध्ये घरे बनवुन दयायची आहेत. व यासाठी जो निधी दयायचा आहे. तर याची जाहिरात जनतेला माहितीसाठी वृत्तपत्रात प्रसिध्द केली पाहिजे. जेणेकरून लोकांना समजेल की महापालिका शहरातील लोकांसाठी अशी योजना घेत आहेत. व दुसरे असे की, झोपडपट्टीत आपण जे घर बनविणार आहोत ते त्याच ठिकाणी बनविणार आहोत. नाहीतर तुम्ही त्यांना हटवुन दुसरीकडे घर बनवुन दयाल असे व्हायला नको.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास करायचा का? जर यामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर प्रस्ताव पुनश्च महासभेसमोर येईल.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहराच्या पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७-अ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (२००२-२००३) तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल महासभेपुढे ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ८१ दिनांकः-२९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा आयुक्तांकडुन प्रस्तुत केलेला उल्हासनगर शहरातील पर्यावरण स्थितीचा अहवाल व प्रस्तावित उपाय योजना स्विकृत करीत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ प्रशासनास आवश्यक पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-एक सूचना आहे. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जे गटनेते आहेत त्यांनी गटनेता पदावरून राजीनामा दिलेला आहे व त्यांच्याजागी श्री. दिलीप लालवानी यांची नियुक्ती केलेली आहे. त्याबददल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आम्हाला अनुमती दया आम्ही पाच मिनिटात श्री. दिलीप लालवानी यांचे याबददल स्वागत करू इच्छितो. आणि मा. सदस्य, कर्मचारी व पत्रकारांचे तोंड गोड करू इच्छितो. सर्वांनी श्री. दिलीप लालवानी यांचे हार, पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-आमच्या पार्टी अध्यक्षा श्रीमती. ज्योती कालानी, आमदार श्री. पप्पु कालानी व आमच्या पक्षातील व सहयोगी पक्षातील सर्व नगरसेवक आमचे विरोधी पक्षातील सर्व सदस्यांनी माझे जे स्वागत केले त्यासाठी मी त्यांना धन्यवाद व्यक्त करतो व ही जबाबदारी जी माझ्यावर टाकली आहे. ती इमानदारीने पुर्ण करण्याचा प्रयत्न करेन असे आश्वासन मी माझ्या सर्व सहयोगी मित्रांना देतो. धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आयत्त्यावेळचा विषय वाचुन दाखवितात.

विषय क्र. १६:- अघोषित झोपडपट्टया घोषित करण्याकरिता उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे व सदर कामाचा सर्वेक्षण अभिकर्त्यामार्फत करून घेणे

करीता व या कामावरील खर्चाकरीता मंजुरी मिळणे बाबत.

मंजुर ?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, या विषयाबाबत मी मागील महासभेत म्हंटले होते की, ज्या ज्या नगरसेवकांना आपल्या प्रभागातील झोपडपट्टयांची नावे दयायची आहेत त्या झोपडपट्यांची नावे देखिल या यादीत समाविष्ट करून दयावीत.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा.महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>आयत्यावेळचा विषयः-</u>

<u>विषय क्र. १६:-</u> अघोषित झोपडपट्टया घोषित करण्याकरिता उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे व सदर कामाचा सर्वेक्षण अभिकर्त्यामार्फत करून घेणे करीता व या कामावरील खर्चाकरीता मंजुरी मिळणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ३६ झोपडपट्टया घोषित केलेल्या आहेत. तसेच या महानगरपालिकेत असलेल्या दस्तऐवजा वरून एकुण ६४ अघोषित झोपडपट्टया आहेत. या ६४ झोपडपट्टयांशिवाय आणखी काही झोपडपट्टया असण्याची शक्यता आहे. त्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुर्नविकास)अधिनियम १९७१ (सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम २८) यातील कलम ३ (२)(अ) मधील तरतुदीनुसार या कामी उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे. तसेच या कामी सर्वेक्षण होणे करीता अभिकर्ता नेमणे आवश्यक आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ४ अन्वये झोपडपट्टया घोषित करण्या बाबत ची कार्यपध्दती विहीत केली आहे. तसेच खाजगी जमीनीवरील २५० चौ. मीटर पेक्षा जास्त नसलेल्या किंवा २५ पेक्षा जास्त झोपडया असलेल्या झोपडपट्टया शासनाच्या मान्यतेने घोषित करण्यात याव्यात अशी सूचना मा. अफजलपुरकर समितीने केली असून ती शासनाने स्विकारली आहे. याबाबत शासनाच्या गृहनिर्माण विभागाने शासन निर्णय क्र. गवसु/१०९९ /प्रक्र.१६६ /झोपसु-१ दिनांक २८ मे, २००१ पारित केला आहे. तसेच यापूर्वी गृहनिर्माण व विशेष सहाय्यक विभागाने महाराष्ट्र शासन निर्णय क्र. युएमसी/१०७९/६१३०/सीआर-१११/७ दिनांक ९ जानेवारी, १९८७ ने सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्यानुसार १)प्लेन टेबल सर्वे करणे २)झोपडयांना क्रमांक देणे ३)संगणकीय प्लान करणे ४) स्थलदर्शक नकाशा करणे ५) की प्लान (मल चसंदद्ध तयार करणे ६ )सोशीओ इकॉनॉमिक सर्वे करणे ७ )सर्व झोपडपट्टयांचा एकत्रित गोषवारा करणे ८) उपलब्ध मुलभुत सुविधांचा तपशिल

तयार करणे आवश्यक आहे. शहरातील अघोषित उपरोक्त ६४ झोपडपट्टयांमधील तसेच सर्वेक्षणादरम्यान आढळणा-या आणखी काही झोपडपट्टयांमधील झोपडयांची संख्या अंदाजे ३५००० इतकी गृहित धरल्यास एकंदर रूपये ५० ते ६० लक्ष खर्च अपेक्षित आहे. या खर्चाकरीता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतुद नाही त्यामुळे सुधारित अंदाजपत्रकात तरतुद करणे आवश्यक आहे.

सबब

अ) झोपडपट्टया घोषित करणे करीता उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे.

ब) सर्वेक्षण करणे करीता सुधारित अंदाज पत्रकात रूपये ५० ते ६० लक्ष तरतुद करणे.

क)सदर सर्वेक्षण निविदा कार्यवाही करून अभिकर्ता नेमुन करून घेणे
या बाबीस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव महासभेच्या पटलावर ठेवणेत यावा.

महासभा ठराव क्र. ८२ दिनांकः-२९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. धनंजय बोडारे.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाच्या समायोजनाधीन राहुन उल्हासनगर शहरातील अघोषित झोपडपट्टयाच्या घोषित करण्यापुरते उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करीत आहे तसेच सदर कामाच्या सर्व्हेक्षणाकामी अभिकर्ता नेमणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ५. ४५ वाजता सभा संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२०/१०/२००३

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१०/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/१०/२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३६. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ३७. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३८. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४०. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४१. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४३ | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४५. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४६. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ४८. | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद | ५१. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५२ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५४. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २३. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५६. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६०. | श्री. संजय भठीजा |
| २८. | श्रीमती. मोना वनवारी | ६१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३०. | श्री. मोहन साधवानी, | ६३. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६४. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ६७. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३५. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | | |

तर

मा. सदस्य १. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, २. श्रीमती. सीमा चंदाराम मोकल ३. श्री. मुलचंदानी महेंद्र, ४. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ५. श्रीमती.मसंद माया घनश्यामदास ६. श्रीमती. भावना रवी खिलनानी, ७. श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे, ८ श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे ९. श्रीमती किरण लखी माखिजा, १०. श्री. विनोद चंदीराम तलरेजा ११. श्रीमती निना प्रकाश नाथानी, १२. श्री. इदनानी राजू चंद्रभान, १३. श्री. माखिजा हरदास हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र.१ वाचून दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> सभा सुरु होण्यापूर्वी मी हे सांगु इच्छितो की, १३ ऑक्टोंबर रोजी माझ्या प्रभागातील एक नौजवान दुधानी आडनाव असलेला चेंबरला कव्हर नसल्याने त्याचा मृत्यू झाला. शरमेची गोष्ट आहे वारंवार सांगुन देखील प्रशासनाचे डोळे उघडत नाही. आणि त्या मुलाने बलिदान दिले, चेंबरला कव्हर नसल्यामुळे . मला दुःख आहे की, प्रभारी अभियंता श्री. सुखरामणी यांना सांगुन देखील झाले नाही. या महापालिकेत फक्त आश्वासन दिले जाते. त्यांनी पण आश्वासन दिले. व या चेंबरमुळे एका तरूणाचा बळी घेतला गेला. प्रशासनाकडे माझी विनंती आहे की, त्याला काही ना काही तरी भरपाई दिली पाहिजे. व सभेला विनंती करतो की, दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करावी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>मा. महापौर महोदया, सर्व सदस्य, माझ्या प्रभागातच राहणा-या श्री. राकेश नागेश कांबळे हा पाणी पुरवठयाच्या टॅकरखाली येऊन १० तारखेला वारलेला आहे. वारंवार प्रशासनाला सगळे सांगून सुध्दा उल्हासनगरला पाण्याची समस्या आहे. भरतनगर वरुन येणारा टॅकर तो माझ्या प्रभागातून जातो. याने एका १० वर्षाच्या मुलाला चिरडुन टाकले. साहेब तुम्हांला मी आताच भेटून गेलो, तुम्हांला सांगितले आहे त्यालाही भरपाई मिळावी. व दोन मिनिटे त्याला श्रध्दांजली अर्पित करावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> श्रध्दांजली वाहण्यापूर्वी आयुक्त साहेब, मला एक गोष्ट सांगायची आहे. श्रध्दांजली तर आम्ही वाहू हा काही उपाय नाही. जसे त्यांनी सांगितले की, प्रशासनाचे लक्ष वेधले असतांना देखील एखादे काम होत नाही. व जसे की श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी व श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, सुर्या हॉटेलच्या बाजूला मोठे चेंबर कव्हर नाही आहे कित्त्येक दिवसापासून अपघात होत होते. सांगून सुध्दा जर झाले नाही तर माझा तर असा विचार आहे की, त्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. अधिकारी वर्ग जर ऐकत नसेल तर ही जी भरपाई देत आहे ती त्यांच्या पगारातून केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :-</u> महापौर महोदया, हा नवजवान जो वारला आहे, आपल्या महापालिकेचे जे शहर अभियंता आहेत व जे कार्यकारी अभियंता आहेत श्री. सुखरामणी त्यांच्या आळसपणामुळे झाले आहे. हा जो मुलगा वारला आहे अशा अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे वारला आहे. अशा अधिका-यांना जास्तीत जास्त दंड दयावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> महापौर महोदया, तसे आपण पाहिले तर अंडर ग्राऊंड ड्रेनेजची जी समस्या आहे, ही पूर्ण शहरासाठी मोठया त्रासाची समस्या आहे. प्रत्येक प्रभागात यामुळे लोकांना त्रास आहे. या चेंबर्सचे

ओव्हरफ्लो होणे ही तर एक साधारण गोष्ट आहे. त्यासाठी कारण ऐकावे लागते की, एकच गाडी आहे, या गाडीचे आपल्या वार्डात गुरुवारी आहे, जर रविवारी ओव्हरफ्लो चालु झाला तर गुरुवार पर्यंत आतील जो मैला आहे तो वाहत राहतो, व आम्ही चार दिवस थांबतो याप्रकारची स्थिती त्या ठिकाणी होते. व अशावेळी लोकांसमोर जाऊन तोंड दयायला त्रास होतो. त्यासोबतच जोडलेली दुसरी समस्या म्हणजे, ही जी भुयारी गटार , अंडरग्राऊंड आहेत त्यावर झाकणे बहुतेक ठिकाणी लावलेली नाही आहेत. माझ्या प्रभागात चार जागेवर जे चेंबर आहेत ते उघडेच आहेत. मी तोंडी सांगितले होते पण तोंडी सांगुन देखील लक्ष नाही दिले. एक लेखी पत्र त्या विभागाला दिले आणि त्यांना त्या चार जागा सांगितल्या जिथे झाकण लावणे जरुरी होते, त्यानंतर देखील तिथे झाकणे लावली गेली नाहीत. व मला वाटते की, चार-पाच दिवसापूर्वी आयुक्तांना माझ्या प्रभागातील कामाविषयी लिहिले होते, त्यातपण याचा उल्लेख केला आहे की, आजकाल महापालिकेमध्ये चेंबर्स बंद करण्यासाठी दोन झाकणे देखील उपलब्ध होऊ शकत नाही. ही आज परिस्थिती आहे या शहराची मुददा फक्त याच्याशी संबधित नाही की मागणी करणारा कोण आहे. त्याला दयायचे की नाही हयाच्याशी संबध नाही. ही एक धोकादायक गोष्ट आहे रस्त्त्यावर जर गटारे उघडी असतील तर लहान-लहान मुले जर त्यात पडली तर त्यांचा तर जीव जाणारच त्यांना बाहेर पडणे अवघड आहे. तर ही गंभीर समस्या आहे या गंभीर समस्येवर प्राधान्याने लक्ष दयायला पाहिजे होते. परंतु असे होत नाही आहे. ही दुःखाची गोष्ट आहे. यात-हेने एका लहान मुलाचा मृत्यु होतो आणि त्याचा मृत्यु झाल्यावर इथे शोक प्रस्ताव आणला जातो, त्यांना श्रध्दांजली वाहिली जाते, आता तर आयुक्त साहेब उठून बोलतील आम्ही यांवर काहीना काही कार्यवाही करु. परंतु जो मुलगा वारला आहे त्याच्या मृत्युची त्याची उणिव आई-वडिलांना भरुन देऊ शकतो का? माझी विनंती आहे की, दुस-या एखादया मुलाचा मृत्यु होण्यापूर्वी या शहरात जितकी गटारे आहेत फक्त एका प्रभागाची गोष्ट नाही, कुठेही दुर्घटना होऊ शकते तर पूर्ण शहरामध्ये झाकणे लावायचे जे काम आहे ते प्राधान्य पण झाले पाहिजे. त्यापूर्वी त्यांची जी रिंग आहे, कारण झाकणे आली तर रिंग आणण्यासाठी अजून दोन महिने वाट पाहावी लागेल. ती जी रिंग आहे व त्यावर झाकण टाकण्याचे जे काम आहे ते प्राधान्याने झाले पाहिजे अशी आमची विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौर, मा. आयुक्त, मा. सदस्य,आताच सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, त्यांच्या प्रभागातील एक १० वर्षाचा मुलगा राकेश नागेश कांबळे हा टॅंकरच्या खाली चिरडुन त्याचा मृत्यु झालेला आहे. हा जो टॅंकरच्या खाली चिरडलेला मुलगा आहे जरी तो रमेश चव्हाण यांच्या प्रभागात राहत असेल तरी तो माझ्या प्रभागातून भारतनगर येथुन येणा-या टॅंकरखाली आणि माझ्याच वार्डात तो चिरडला गेला आहे. ती जबाबदारी आमची सुध्दा आहे. जवळजवळ १० वर्षापासून भारतनगर आणि सुभाष टेकडीपर्यंत पाणी नाही आहे. त्यासाठी प्रशासनाने सदया प्रयत्न करायला सुरुवात केली आहे. पण प्रयत्न अपुरे आहेत. वेगाने प्रयत्न होत नाहीत. ते होणे गरजेचे आहे. सुभाष नगर परिसरामध्ये पाण्यासाठी या टॅंकरमुळेच सुनिता इंगळे नावाची मुलगी सुध्दा चिरडली गेली होती. त्यानंतर एक इंगळे नावाचे एक अधिकारी पाणी आल्यानंतर मोटार लावायला गेले आणि त्यांचा शॉक लागून मृत्यु झाला. त्यानंतर तोरणे नावाचे एक विवाहिता हिचाही त्याठिकाणी शॉक लागून मृत्यु झालेला आहे तर असे जवळजवळ पाच ते सहा मृत्यु अनेक गर्भपात झाले आहेत , पाणी भरण्यासाठी जेव्हा महिला जातात पडतात, त्यामुळे अनेक गर्भपात झाले आहे. असे किती बळी आणखी आपल्याला पाहिजेत. आणखी प्रशासनाला किती बळी पाहिजेत, भरतनगर आणि सुभाषनगर मध्ये होणार आहेत. तर महाराष्ट्रात ज्या काही पाण्याच्या योजना आहेत त्याला सुध्दा खुपवेळ लागत आहे. जर ते लवकरात लवकर जर झाले तर पुढचे बळी आपल्याला टाळता येतील आणि प्रशासनावर अशा प्रकारच्या नामुष्कीची वेळ येते. आपल्याला गुपचूप बसून ऐकावे लागते. सन्माननिय सदस्य बोलतात की ती

नामुष्कीची वेळ यापूढे येऊ देऊ नये अशाप्रकारची प्रशासनाला सूचना मी येथे करतो आणि त्याचबरोबर श्री. राज असरेंडकर यांनी एक मुददा मांडला आहे की, ड्रेनेजची जी झाकणे आहेत, माझ्या वार्डात सुध्दा दोन-चार ठिकाणी झाकणे निघाली आहेत. मी अनेकवेळा संबंधित कर्मचा-यांना सांगितलेले आहे, परंतु अदयापही त्याठिकाणी कामे होत नाही. जसे श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी सांगितले की, त्यांच्या वार्डात एक मुलगा त्या ड्रेनेजमध्ये जाऊन मेला, तर आमच्या वार्डातपण काही लोक मारण्याचा तुमचा विचार आहे का? असे या ठिकाणी प्रश्न मला विचारावासा वाटतो तर कृपया संपूर्ण लक्ष देवून काही वार्डाचा विचार न करता , संपुर्ण उल्हासनगरमध्ये ज्या-ज्या ठिकाणी ड्रेनेजची जी झाकणे मोकळी आहेत अशाठिकाणी काही ठिकाणी रस्त्यावरील आडवे पाईप फुटले आहेत ते वारंवार सांगून सुध्दा लक्ष देत नाही तर कृपया आपण आपले जे आयुक्त आहेत अतिशय कार्यक्षम असे आयुक्त आहेत त्यांना अशा गोष्टी आवडत नाही अजिबात तरी सूध्दा ते याकडे का दुर्लक्ष करतात. हे मला काही कळालेले नाही तर कृपया त्यांनी आपल्या संबंधित विभागाकडे लक्ष देवून या सगळया बाबी पूर्ण कराव्यात अशा प्रकारची मी त्यांना विनंती करतो आणि जो मुलगा टॅंकर खाली गेलेला आहे आणि त्याचबरोबर श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या प्रभागातील तरुण ड्रेनेजमध्ये पडून मेला, त्या दोघांनाही श्रध्दांजली वाहण्यासाठी मी या ठिकाणी अनुमोदन देत आहे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटिल :-मा. महापौर, मा. आयुक्त अशा अनेक गोष्टी अगोदरपण घडलेल्या आहेत. ड्रेनेजची झाकणे उघडी आहेत. काही ठिकाणी रस्त्यावर कचरा साठल्यामुळेपण ॲक्सीडंट होतात. आणि याअगोदर एका सदस्याने व्ही.टी.सी. ग्राउंड ते मानेरा रोड या रोडवरती पण ड्रेनेजची अनेक झाकणे उघडी आहेत आणि त्या रस्त्याची खुप अवस्था खराब आहे. त्याविषयी चर्चा झाली होती आणि त्यावेळेस मी पण त्या चर्चेत भाग घेवून सांगितले होते पण त्या उघडया असलेल्या झाकणांवरती आजपर्यंत कोणीही कार्यवाही केलेली नाही. झाकणे बसविलेली नाही. आणि त्याच रोडवरती पावसाळयामध्ये ड्रेनेज लाईन तुटल्यामुळे गुरानी माता मंदिर समोर एक मोठा खड्डा तिथे खोदला गेलेला होता आणि मा. भडकवाड साहेब त्यावेळेस त्या ठिकाणी होते, मी तेथे होतो. आणि तो खड्डा अजून तसाच आहे. आणि त्याचे दुरुस्ती व ड्रेनेज लाईन व्यवस्थित करण्याचे काम झालेले नाही. तीन-चार महिने झाले तो खड्डा तसाच पडुन आहे , तिथेपण वारंवार अपघात होतात. त्या खड्डयांचा नागरीकांना झाकणे उघडी आहेत म्हणून तर त्रास आहेच पण या महानगरपालिकेच्या पाणी पुरवठयामधील अधिकारी डोईफोडे साहेब हे सुध्दा उघडया झाकणामुळे त्या खड्डयामध्ये पडले होते मी स्वत: त्यावेळेस तेथे होतो. त्यांची मोटरसायकल सहित त्या खड्डयामध्ये ते पडले. आम्ही त्यांना उचलून बाजूला केले आणि त्यांना व्यवस्थित पाठवून दिले. तर फक्त नागरीकांनाच त्रास नाही. महानगरपालिकेच्या अधिका-यांसुध्दा त्रास होत असून महानगरपालिकेचे अधिकारी डोळयावर पटटी बांधून हे सर्व उघडया डोळयांनी पाहत आहेत. त्यावर कुणीही काही कार्यवाही करत नाही. आणि हे असे लयाले गेलेले अधिकारी वर्ग आणि महानगरपालिकेचा कारभार हे असे किती दिवस चालणार आहे प्रत्येक वेळी प्रत्येक सदस्यांनी समस्या मांडायच्या. आणि त्याबददल काहीही कारवाई करायची नाही. स्वत: त्रास झाला तरी तो सहन करायचा आणि नंतर त्याच्यावर काही कार्यवाही करायची नाही असे किती दिवस चालेल, अधिका-यांना त्रास होवून देखील ते त्यावर काही कार्यवाही करत नाही आहे. हे किती दिवस चालणार आहे. याकडे महानगरपालिकेच्या अधिका-यांनी वेळोवेळी जातीने आणि कार्यपुर्वक लक्ष देवून हया समस्या दूर कराव्यात. ब-याच प्रभागात उल्हासनगर महानगरपालिकेचे एरियामध्ये ब-याच ठिकाणी ड्रेनेज लाईनचे आणि फुटपाथ जिथे जिथे तयार केलेले आहे त्याठिकाणी झाकणे उघडी आहेत. त्यात लहान मुले जर पडली तर त्याच्यामध्ये समजणार सुध्दा नाही की तो मुलगा आत मध्ये गेला, मेला की काय झाले समजणार नाही. दक्षता घेवून ती ड्रेनेजची झाकणे बसविण्यांत यावी. ही विनंती.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- मा. महापौर महोदया, माझ्या प्रभागामध्ये कमीत कमी मी दोन महिन्यापासून सांगितले आहे की एक झाकण टाका तिथे बाजूला माताचे मंदिर आहे, बसंतराम चौकापासून जो मुख्य रोड जातो बॅरेक नं. ७१ येथे जो चाळीस फुटाचा रोड आहे तिथे झाकण नाही आहे. चार दिवसापूर्वी एक महिला तिथे पडली, दुर्घटना घडली, मरणापासुन वाचली. कारण लोक तिथे होती, मंदिर व गुरुद्वारामध्ये गर्दी होती म्हणून लोकांनी काढले. परंतु खुपदा सांगितल्या नंतर तिथे चेंबर साफ करतात परंतु पुन्हा कचरा जातो झाकण नसल्यामुळे तिथे एक छोटीसी फरशी ठेवून आले. महिला त्यावरुन जात होती ती फरशी तुटली व ती आत गेली आम्ही तिला बाहेर काढले परंतु अजूनपर्यंत त्या चेंबरवर झाकण नाही टाकले. कृपया सर्व शहरतील चेंबर्सवर लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. उप-महापौरजी, सन्माननिय सदस्य प्रभागातील आमचा राकेश नागेश कांबळे असु दया, किंवा अजुन कुठलाही व्यक्ती असु दे त्याचा अपघात होतो त्याच्या पाठीमागची कारणे वेगवेगळी होत असतात. आमचा नागेश कांबळे पाण्याच्या टॅंकर खाली चिरडला गेला. राकेश कांबळे आमच्याच कार्यकर्त्याचा छोटा मुलगा होता. त्याच्या अगोदर बरीचशी अशी प्रकरणे झाली. मला चांगले आठवते मागच्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये मी नगरसेवक असतांना काही सन्माननिय सदस्यांना आठवत असेल की पाणी जिथे नाही आहे, ज्या ज्या प्रभागात पाणी नाही आहे ज्या ज्या लोकांना पाणी मिळत नाही अशा लोकांना पाण्याची बिले जी तुम्ही पाठवितात. त्याचे संपुर्ण पाण्याचे बिल माफ करण्यासाठी मला वाटते मागच्या वेळेस मी हा ठराव घेतला होता. आजही आम्ही पाण्याची बिले माफ करावी हे का सांगतो कारण आज ...................

काही सदस्य :- श्रध्दांजली झाल्यावर बोला.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-श्रध्दांजली जर तुम्हाला दयायचीच असेल तर दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली देण्यापेक्षा ज्या ज्या लोकांचे पाण्यामुळे मृत्यू होतात, बळी जातात, त्या त्या लोकांची बिले माफ करा. आणि ती खरी श्रध्दांजली राहिल.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :- मा. महापौरजी, मी दोन मिनिटे बोलण्याची अनुमती मांगतो की, आमच्या शहरात पाण्याची जी गंभीर समस्या आहे, दिवसेंदिवस याबाबतीत चांगला रिझल्ट आहे. जिथे जिथे जलकुंभ सुरु झाले आहेत. त्या परिसरात बरीच सुधारणा झाली आहे. मी अभिनंदन करतो मा. आयुक्त साहेबांचे, पाणी पुरवठा अधिका-यांचे , खास करुन जवांदे साहेबांचे व एम.जे.पी.च्या अधिका-यांचा कारण कालच आमच्या परिसरात त्यांनी महिन्यातून २४ तास काम करुन रात्रंदिवस काम करुन जो परिणाम दिसला आहे रात्री एक चमत्कार झाला, १४ नं. शाळेच्या बाजुला मिनल नगर व जागृती नगर नावाचा परिसर आहे. तिथे बरीचशी प्रगती झालेली आहे व कालच लोकांनी तिथे दिवाळी साजरी केली. व त्यासाठी मी आयुक्त, पाणी पुरवठा अधिकारी व एमजीपी च्या अधिकारी यांचे आभार मानतो.

मा. महापौर :- मी सर्व सदस्यांचे ऐकले आहे, १ ते ५ नंबर पर्यंत , मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, हे जे गटार-नाले खुले असल्याचा जो विषय आला आहे याकडे लवकरात लवकर लक्ष दिले जावे. व आपले काम करुन आदेशाचे पालन पूर्ण करावे

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):- कृपया श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी आपापल्या स्थानावर उभे राहून दोन मिनिटे मौन धरावे.

## शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :-१)श्री. बच्चाराम रुपचंदानी

२)श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :-१)श्री. प्रमोद टाले

२)श्री. शांताराम निकम

उल्हासनगर शहरामधील प्रभाग क्र. १३ क मधील एक नौजवान श्री. जवाहर हिरालाल दुधानी आडनाव असलेले चेंबरला कव्हर नसल्याने त्यात पडुन त्यांचे अपघाती निधन झाले आहे.

तसेच १४ क प्रभागामधील राहणा-या श्री. राकेश नागेश कांबळे यांचे १० तारखेला पाणी पुरवठयाच्या टॅकरखाली येऊन अपघाती निधन झाले आहे. त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र. ८२ अ दिनांकः-२०.१०.२००३.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. जवाहर हिरालाल दुधानी व श्री. राकेश नागेश कांबळे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

एकमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे सर्वांनी मौन धारण करून वरील मृत्यात्मास श्रध्दांजली अर्पित केली.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १ वाचून दाखवितात. प्रश्नोत्तरे.. ..................

प्रश्न क्र. २११ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. २११:-रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या बांधकामांना पुर्नबांधकाम करु देण्यासाठी महापालिकेचे नेमके धोरण काय आहे.?

सदरच्या धोरणाला कायदेशीर आधार आहे? काय ?

कायदयानुसार किती क्षेत्रफळाचे बांधकाम बाधित झाल्यावर किती क्षेत्रफळाचे पुर्नबांधकाम अनुज्ञेय आहे?

रस्ता रुंदीकरणाच्या आड आलेल्या बांधकामांच्या बाधित क्षेत्रफळाबाबतच्या नोंदी नाव पत्त्यासहित महापालिकेकडे उपलब्ध आहे काय ?

एकुण किती बाधित बांधकामांच्या ठिकाणी पुर्नबांधकामे झाली आहेत?

उत्तर :- महानगरपालिकाचे असे नेमके धोरण ठरलेले मात्र सदर विषयाबाबत महानगरपालिकेमध्ये दि. २०/७/२००० रोजी चर्चा झालेली आहे.

सदरच्या धोरणास कायदेशिर आधार नाही.

कायदयानुसार किती क्षेत्रफळाचे बांधकाम बाधित झाल्यावर किती क्षेत्रफळाचे बांधकाम अनुज्ञेय आहे. याबाबत बांधकाम नियंत्रण नियमावली मध्ये तरतुदी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

रस्ता रुंदीकरणाच्या आड आलेल्या बांधकामांच्या बाधित क्षेत्रफळाबाबतच्या नोंदी महानगरपालिकेकडे (अ.बां.वि.) उपलब्ध नाहीत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मा. महापौर महोदया, शहरामध्ये आय.आर. डी.पी. नंतर जे रोडचे काम केले गेले. रोडचे रुंदीकरण करतांना त्याच्या दोन्ही बाजुला जेपण बांधकाम होते. रोड वायडिग मुळे जे लोक बाधित झाले, या महापालिकेची काय पॉलिसी आहे त्यांच्याविषयी काय परिस्थिती ठरली आहे. कुणाला पुन्हा घर बांधण्यासाठी परवानगी दयायची आहे. कुणाला नाही दयायची, याबाबतीत मी प्रश्न विचारला होता, तर उत्तर दिले की, महानगरपालिकाचे असे नेमके धोरण ठरलेले मात्र सदर विषयाबाबत महानगरपालिकेमध्ये दि. २०/७/२००० रोजी चर्चा झालेली आहे. मी विचारले आहे की, याला काही कायदेशीर आधार आहे का तर प्रशासनाने प्रामाणिकपणे उत्तर दिले आहे की, सदरच्या धोरणास कायदेशिर आधार नाही. याचा अर्थ सरळ आहे की, रोड वायंडिंगच्या आधारे जे पण बांधकाम या शहरात प्रत्येक ठिकाणी उभे आहेत त्याला काहीही कायदेशीर आधार नाही. एका त-हेने हे अनाधिकृत बांधकाम आहे. कायदेशीर दृष्टीकोनातून पाहिले तर अनाधिकृत बांधकामाच्या यादीमध्ये ते आले पाहिजे. गोष्ट अशी होती की, जितपत मला माहिती आहे की सहानुभुतीच्या आधारे महापालिकेने असा निर्णय घेतला होता जे पण बांधकाम बाधित झाली आहेत त्याला पुर्नबांधकाम करण्याची परवानगी दिली गेली परंतु हे ठरविले नाही गेले की, कशात-हेने बांधकाम करणार ? कोणाचे किती बांधकाम बाधित झालेले आहे? त्याआधारावर कोणती किती पुर्नबांधकाम करायेच? लोकांनी पुर्णपणे गैरफायदा घेवून फक्त जे साईडचे बांधकाम होते तेच न बांधता आजुबाजुची जी रिकामी जागा होती मागे पुढे जितकीपण जागा मिळाली त्या जागेला हडप करुन त्यावर अतिक्रमण करुन बांधकाम केले गेले. काही ठिकाणी जे बांधकाम शिल्लक होते, मोठ-मोठया इमारती उभ्या होत्या. त्या मोठ-मोठया इमारती उभारतांना ज्याची जितकी क्षमता होती कोणी एक अधिक एक माळा केला, कुणी एक अधिक दोन काही काही ठिकाणी एक अधिक तीन मजले पण उभारले गेले. हे कुठपर्यंत योग्य आहे व आपण किती दिवस हे डोळे मिटून पाहत बसणार आहात. कारण पाहता पाहता या बांधकामांनी पुन्हा शहरामध्ये नविन समस्या निर्माण होत आहेत एका बाजूने आपण महासभेमध्ये जेव्हापण अवैध बांधकामाचा विषय येतो चर्चा खुप होते. अवैध बांधकाम तर येथे होते परंतु रोड वाईडिंगच्या नावाखाली येथे अवैध बांधकाम होत आहे. त्याला कशाप्रकारे थांबवावे या बाबतीत प्रशासनाने गंभीरतेने विचार केला पाहिजे. हे मानुन आपण चालु. सहानुभूतीच्या दृष्टीकोनातुन आपण कानाडोळा देखील करु. परंतु बांधकाम करणा-याने त्याचा किती गैरफायदा घेतला. तिथे काही तरी अंकुश लावला गेला पाहिजे. आणि इकडे चार नंबरच्या प्रश्नाला जे उत्तर दिले आहे, मी विचारले आहे की ठिक आहे बांधकाम करणारे बांधकाम करतात परंतु मी विचारले होते रस्ता रुंदीकरणाच्या आड आलेल्या क्षेत्रफळाबाबत महापालिकेकडे नोंदी आहेत काय तर उत्तर दिले आहे की अशा क्षेत्रफळावर कोणतीही माहिती महापालिकेकडे नाही. मी यावर खुलासा मागु इच्छितो, प्रशासनातर्फे असे का झाले कारण की, कोणताही प्रकल्प जेव्हा घेतला जातो, त्या प्रोजेक्ट मध्ये जे पण अफॅक्टेड आहे, त्याचा पुर्ण विवरण आपल्याकडे असले पाहिजे. जेणेकरुन

त्यांचे योग्य त-हेने पुर्नवसन होवो. बाकीच्या ज्या हालचाली आहेत त्या चांगल्या त-हेने करु शकतो. परंतु उल्हासनगरच्या रोड वाईंडिंग बाबत कुठेही जेपण बांधकाम बाधित झाले आहेत, त्याबाबतीत महापालिकेकडे कसलीही माहिती नाही. ही माहिती का नाही ठेवली गेली, याचा खुलासा प्रशासनाने केला पाहिजे. ही एक गोष्ट दुसरी गोष्ट ज्या त-हेने रोड वाईंडिंगच्या नावाने आजही काही ठिकाणी तर असेही झाले आहे ज्यांचे रोड वाईंडिंगमध्ये त्यांचे काही मार्किंगपण नव्हते. मार्जिन नव्हते तरीपण दोन-दोन माळयाच्या इमारती उभ्या राहिल्या. अशा बांधकामांसाठी त्यावर अंकुश लावण्यासाठी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही आजपर्यंत केली आहे आणि जर नाही केले तर पुढे काय करणार? या प्रश्नाचा खुलासा करावा हे माझे निवेदन आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):- मा. महापौर महोदया, हा प्रश्न जरा किचकट आहे. आणि मला वाटते , आणि आम्ही प्रामाणिकपणे याचे उत्तर दिले आहे. आजपर्यंत रोड वाईंडिंगमध्ये जिथेपण बांधकामे तोडली गेली, त्याबाबतीत पुर्नवसन करण्याचे जे धोरण या महासभेत ठरविले गेले त्या धोरणानुसार त्या धोरणास थोडे बाजुला सारुन काही लोकांनी आपली घरे बनविली. व आम्ही स्पष्टपणे लिखित स्वरुपात सांगितले आहे की, जी पण धोरण सभागृहाने बनविले होते, लोकांनी स्वत: पुनर्वसन केले. ते कोणत्त्याही शासनाच्या धोरणाला अनुसरुन नव्हते. याबाबतीत आम्ही सदनात एवढीच माहिती देवू इच्छितो की, रोड वाईंडिंग जी महापालिका करत आहे, त्यात आम्ही योजनापूर्वक सर्व्हे करु कोणाची किती जागा जाते? आणि कोणाला किती बांधकाम करण्याची परवानगी दिली जाईल? कायदेशीर रित्त्या जर परवानगी देता आली नाही तर भरपाई कशी दयायची पैशाच्या स्वरुपात की पर्यायी जागा देवून हे पाहूनच करु. जर कडक स्वरुपात केले गेले तर या शहरात रोड वाईंडिंग शक्यच होणार नाही. कारण की, वर्षापासून तिथे लोक बसले आहेत. फक्त शॉप फॉर डिस हाउस शॉप आपण पाहिले तर रिझर्वेशन काही शिल्लक नाही. रोडच्या लाईन सर्वांना माहित असून सुध्दा लोकांनी त्यावर बांधकाम केले. हे सर्व पाहून पूर्नवसनासाठी पॉलिसी ठरविणे व तो ठराव, ती पॉलिसी सभागृहाकडुन मंजुर करुन घ्यावी त्यावर अंमलबजावणी करणे हे पण खुप कठिण काम असेल कारण की, येथे जे रोड आहेत, ते आधीपासूनच अतिक्रमणाने बाधित आहेत. जो प्रॅक्टीकल अप्रोच प्रशासनाने यापूर्वी घेतला आहे तसेच प्रॅक्टीकल अप्रोच घेवून पूर्नवसन केले आहे इतकेच मी सदनाला बोलू इच्छितो जर मी याबाबतीत जास्त बोललो तर सर्वजण, तुम्ही, प्रशासन, आपण सर्वजण कशातरी गुंतून जावू. म्हणून मी याबाबतीत जास्त बोलू इच्छित नाही.

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २१२ श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. २१२:- दि. ३१ मार्च, २००३ रोजी महानगरपालिकेमध्ये असलेल्या नोंदणीनुसार कॅम्प क्र. १ ,२ ,३ ,४ व ५ कॅम्प नुसार किती मालमत्ता आहे (मालमत्ता धारक) त्यांची माहिती दयावी. तसेच घोषित व अघोषित झोपडपट्टयाची संख्या देण्यात यावी.

अ) एकुण ईमारतीची संख्या किती व त्यांमधील खोल्यांची संख्या किती?<br>
ब) ब्लॉक्स व बॅरेक मधील मालमत्ता धारकांची संख्या किती?<br>
क) घोषित झोपडपट्टया मधील मालमत्ता धारकांची संख्या किती?<br>
ड) अघोषित झोपडपट्टयामधील मालमत्ता धारकांची संख्या किती?

उत्तर :- महानगरपालिकेच्या दप्तरी नोंदीमध्ये मालमत्ताधारकांची नोंद कॅम्प नुसार नसुन विभाग (युनिट) नुसार आहे. एकुण १ ते ५ कॅम्पामध्ये ८ विभाग (युनिट) असुन त्या मधील असलेल्या मालमत्ता धारकांची संख्या खालीलप्रमाणे

१) विभाग क्र. १--१७६१२
२) विभाग क्र. २--१६२५४
३) विभाग क्र. ३--१७७६९
४) विभाग क्र. ४--१८८८५
५) विभाग क्र. ५--१७४३१
६) विभाग क्र. ६--१५२९४
७) विभाग क्र. ७--१६८९२
८) विभाग क्र. ८--२१८३३
-----------
एकुण--१४१९७०

तसेच घोषित झोपडपट्टया ३६ असून अघोषित झोपडपट्टया ६४ आहेत. तथापि त्यांचे सर्वेक्षण अदयाप पुर्ण होणेचे आहे. प्रत्येक मालमत्ता धारकास कर आकारणी केली जाते. उदा. एका इमारतीत १० प्लॅट असतील तर १० मिळकत धारक संबोधले जातात. त्यामुळे इमारतीची अशी वेगळी नोंद नाही. महापालिका क्षेत्रात एकुण १,४१,९७०/- मिळकत धारक आहेत.

ब्लॉक व बॅरेकच्या वेगळया नोंदी नाहीत. बॅरेक व ब्लॉकमध्ये जेवढे मालमत्ताधारक असतील त्यांना मालमत्ता बिले दिली जातात.

घोषित झोपडपट्टयांमध्ये १/१/९५ च्या मतदार यादीत ज्या झोपडपट्टी धारकांचे नांव आहे. असे एकंदर अकरा हजार झोपडपट्टी धारक आहेत.

इकडील नोंदीप्रमाणे अघोषित संख्या ६४ आहे. तथापि यांचे पुर्नर निरिक्षण करण्याचे काम सुरु आहे. त्यामधील मालमत्ता धारकांची वेगळी संख्या उपलब्ध नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> याठिकाणी प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. प्रशासनाच्या वतीने कशी माहिती चुकीची दिली जाते. त्याचे जिवंत उदाहरण याठिकाणी आहे. ६/८/२००३ ला या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे की, १,२,३,४ कॅम्प वाईज एकंदर संख्या दिली आहे १,४१,९७०/- त्यानंतर एकुण इमारतीची संख्या किती व त्यातील खोल्यांची संख्या किती तसेच घोषित झोपडपट्टया ३६ असून अघोषित झोपडपट्टया ६४ आहेत. तथापि त्यांचे सर्वेक्षण अदयाप पुर्ण होणेचे आहे. ब्लॉक्स व बॅरेक मधील मालमत्ता धारकांची संख्या किती? ब्लॉक व बॅरेकच्या वेगळया नोंदी नाहीत. बॅरेक व ब्लॉकमध्ये जेवढे मालमत्ताधारक असतील त्यांना मालमत्ता बिले दिली जातात. म्हणजे आपल्याकडे सर्व्हेक्षण झालेच नाही का? की त्यानंतर क प्रश्न आहे घोषित झोपडपट्टया मधील मालमत्ता धारकांची संख्या किती? यामध्ये उल्लेख केला आहे की, घोषित झोपडपट्टयांमध्ये १/१/९५ च्या मतदार यादीत ज्या झोपडपट्टी धारकांचे नांव आहे. असे एकंदर अकरा हजार झोपडपट्टी धारक आहेत. म्हणजेच शासनाने सर्व्हे केल्यानुसार महापालिका चालते. २००१ चा सर्व्हे महापालिकेने केलेला आहे. त्यानुसार काय आहे, मी त्यानुसार विचारले होते. ई.एस.आर. रिपोर्ट (पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल)मध्ये तुम्ही इंत्थंभूत माहिती दिली आहे की ३६ झोपडपट्टयांमध्ये व अघोषित झोपडपट्टयामध्ये किती आहे? मालमत्ता धारक किती? १,२,३,४,५ नंबर मध्ये किती कर्मशियल किती? आणि झोपडपट्टया किती नोंदणीकृत किती आणि नोंदणी न झालेले किती अशी व्यवस्थित व्यवस्थित माहिती तुम्ही दिली आहे. जो जुलै मध्ये सुरुवात केलेला आहे. ईएसआरचे माध्यम उल्हासनगर महानगरपालिकेनेच त्यांना माहिती दिलेली आहे. त्याच्यामध्ये मात्र तुमची माहिती व्यवस्थित आहें की एवढया नोंदी होत्या. प्रत्यक्षात बांधकामे ऐवढी झालेली आहे. ते मी फिगर सुध्दा त्यावेळस सांगितलेली होती. अघोषित झोपडपट्टयांची संख्या ९० हजारच्या आसपास आहे. घोषित झोपडपट्टयांची संख्या ४५ हजार आहे. हे सगळे तुम्ही दिलेले आहे त्यानंतर बॅरेक आणि ब्लॉक्स मध्ये एवढया इमारतींची संख्या आहे हे ईएसआर रिर्पोटमध्ये आहे मग महासभेत गंभीरतेने उत्तर दयावे असे तुम्हांला वाटले नाही का? आमच्याकडे नाही आहे विषय संपला. म्हणजेच महापालिकेच्या कुठल्याही सदस्याने विचारलेल्या

प्रश्नाचे गांभीर्य तुम्हांला काहीच नाही. तुमच्या मात्र रिर्पोटमध्ये मिरविण्यासाठी व्यवस्थित देतात. म्हणजेच तुमच्याकडे माहिती आहे. तरी या ठिकाणी तुम्ही देत नाही. ईएसआर रिपोर्टमध्ये ही सगळी माहिती आहे की नाही नाही तर एकतर ही माहिती खोटी आहे किंवा ती माहिती तुम्ही हे कबुल करा की आम्ही काहीतरी चुकीचे दिलेले आहे त्या ईएसआर रिपोर्टमध्ये. नक्की तुमच्याकडे आहे की नाही नोंदी. इकडे क्लीअरकट लिहिलेले आहे भडकवाड साहेब. इकडील नोंदीप्रमाणे अघोषित संख्या ६४ आहे. तथापि यांचे पुर्नर निरिक्षण करण्याचे काम सुरु आहे. त्यामधील मालमत्ता धारकांची वेगळी संख्या उपलब्ध नाही. त्याच्यानंतर घोषित झोपडपट्टयांबददल म्हटले आहे घोषित झोपडपट्टयांमध्ये १/१/९५ च्या मतदार यादीत शासनाने केलेली तुम्ही काय केले ते लिहिले नाही. मतदार यादीत ज्या झोपडपट्टी धारकांचे नांव आहे. असे एकंदर अकरा हजार झोपडपट्टी धारक आहेत. मग ती फिगर कुठून आणली?

<u>मा. श्री. दत्ता भडकवाड ( उप-आयुक्त ):-</u>मा. महापौर महोदया, सन्मानिय सदस्य बोडारे साहेबांनी आता जो प्रश्न विचारला आहे, त्यात पहिल्या प्रश्नात कॅम्प क्र. १ ,२ ,३ ,४ व ५ कॅम्प नुसार किती मालमत्ता आहे हा प्रश्न सचिव कार्यालयातून उप-आयुक्त, शहर यांना दिला गेला. उप-आयुक्त, शहर यांनी प्राप्रर्टी रजिस्टरच्या हिशोबाने जेवढया नोंदणीकृत प्रॉपर्टी आहेत त्या १ ,४१ ,९७०/- आहेत, ३६ झोपडपट्टया हया शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाले आहेत. ६४ झोपडपट्टयांना अजून जाहिर केले नाही आहे. म्हणून अघोषित आहेत. व झोपडपट्टी पाससाठी जो आमचा सर्व्हेक्षण आहे त्यात शासनाचे आदेश होते २५च्या वर जिथे झोपडया असतील त्यांचेच आधी सर्व्हेक्षण करायचे. ते आदेश रदद केले गेले आहे. नवे ऑर्डर जे आले होते फोटोपाससाठी त्यात ९५ आधीचे जितक्या झोपडपट्टया आहेत, त्याचे सर्व्हेक्षण करुन फोटोपास दयायचे होते. हा विषय देखील उप-आयुक्त शहर बघतात म्हणजे मी बघतो ती जी नोंद माझ्याकडे आहे त्यानुसार ११ हजार पात्र झोपडपट्टया ९५ च्या आधिच्या आहेत. त्याच त-हेने ते उत्तर दिले गेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>भडकवाड साहेब, तुमचे पुर्ननिरिक्षण चालले काय चालले याचे मी विचारले नव्हते आहे किती, तुम्ही या ठिकाणी माहिती न देता त्या ईएसआर रिर्पोटमध्ये विस्तृत माहिती देतात, जो जुलै मध्ये झालेला आहे. ३१ जुलैला ईएसआर रिर्पोटचे काम सुरु झाले. त्यांना माहिती उल्हासनगर महानगरपालिकेने म्हणजेच तुम्हीच दिलेली आहे. त्यांचा एका महिन्यात रिपोर्ट पुर्ण होतो, ही ७ लोकांची टिम येते उल्हासनगर बाबतच्या पर्यावरणाचा अहवाल पूर्ण करते. पण उल्हासनगर महानगरपालिकेची एवढी यंत्रणा असून त्यांना ही माहिती व्यवस्थित देता येत नाही. पंचममध्ये यादीनुसार,पंचममध्ये यादीनुसार काम चालु आहे ही कुठली पध्दत आहे एक यशवंतराव मुक्त विदयापिठातले १ते ८ विदयार्थींची टिम येते. आणि उल्हासनगर महानगरपालिकेच्या पुर्ण क्षेत्राचा अभ्यास करते. आढावा घेते. आणि त्यावर एक्शन प्लॅनसुध्दा तयार करते, तुमच्याकडे मागचेही काही नाही पुढचेही काही नाही. मागचे पाठ नाही पुढचे सपाट आहे अशा पध्दतीने प्रशासन हे कसे चालणार तुम्ही कुठली दिशा देणार की त्याठिकाणी दिले होते ते चुकीचे होते की हे चुकीचे आहे. आम्हांला माहित नव्हते हे कबुल करा म्हणजे ती चुक कुठून आली हे कळेल आम्हांला.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया........

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>महत्त्वाचा मुददा असा की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदीमध्ये ४८ झोपडपट्टया आहेत घोषित आणि इथे ३६ देतात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया हा प्रश्न महानगरपालिका असेसमेंट लिस्ट यादीच्या हिशोबाने नंबर ऑफ प्रॉपर्टी किती आहे म्हणजे इथे कर भरणा-या मालमत्ता किती आहेत तो प्रश्न त्याबाबती आहे व

आता उप-प्रश्न व या प्रश्नाचे पण उप-प्रश्न (मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे उभे असतांना) तुम्ही बसा मी सांगतो, तुम्ही जर बसला तर मी चांगल्या त-हेने सांगेन. तुम्ही आरामशीर बसा. हा प्रश्न जो आहे त्यात दोन गोष्टी विचारल्या आहेत. महानगरपालिकेच्या एकूण मालमत्ताच्या असेसमेंटच्या यादीप्रमाणे किती आहेत हे दिले आहे १,४१,९७०/- त्यानंतर घोषित झोपडपटटया त्यात किती मालमत्ता आहेत हे दिले गेले आहे. ही जी माहिती आहे घोषित झोपडपटटयांची त्यात पूर्ण मालमत्ता इ-रिसपेक्टीव्ह ऑफ वेदर दे आर पेईंग टॅक्स ऑर नॉट हे त्यात दिले गेले आहे. जो पण आधी सर्व्हे झाला आहे. इकडे हा देखील वाद आहे की, ४८ झोपडपटटया आहेत की ३६ झोपडपटटया आमच्याकडे जे राजपत्रात प्रसिध्द झाले दोनदा सर्व्हे झाला एकदा नगरपालिका असतांना आम्ही स्वत: डोळयांनी गॅझेट पाहिले आहे. मला माझे उत्तर पूर्ण करु दया. माझ्या उत्तराशी तुम्ही सहमत नसाल काही विसंगती आढळत असेल तुम्ही सांगु शकता. दोनदा गॅझेट झाले. त्याहिशोबाने जितक्या नोटीफाईड स्लम्स आहेत. त्याचीपण माहिती तुम्हांला दिली गेली आहे. घोषित झोपडपटटयामध्ये ज्या झोपडया आहेत त्याची संख्या दिली गेली आहे. लोकसंख्यापण दिली गेली आहे. ६४ झोपडपटटयांचा सर्व्हे अजून झाला नाही आहे. मागच्या महासभेत आम्ही प्रस्ताव आणला होता. तो सर्व्हे आता लवकरच सुरु होईल. परंतु जे कर भरणा-या मालमत्ता आहेत, झोपडपटटी विभागात जे कर भरत नाहीत त्यांच्यापण मालमत्तेची संख्या त्यात आली आहे. काही झोपडपटटी क्षेत्र असे देखील आहे जिथे लोक कर भरत नाहीत. त्यामुळे तुम्हांला उत्तरात थोडी विंसगती वाटत आहे. मला वाटते उत्तरात विसंगती नाही. उत्तरात जर तुम्ही पहाल तर १/१/९५ च्या हिशोबाने झोपडया येथे आहेत. ते पण आम्ही जेव्हा तिसरा सर्व्हे केला फोटोपास देण्यासाठी त्यात झोपडयांची संख्या जास्त आहे. परंतु पात्र झोपडया कमी आहेत. पात्र लोक कमी आहेत. प्रोटेक्टेड ऑक्युपायर जे आहे ते कमी आहेत हया तीन्ही संख्या या वेगवेगळया आहेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>हरकतीचा मुददा आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> मला बोलणे पूर्ण करु दया.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> मी प्रश्न विचारला की, ३१ मार्च, २००३ रोजी महापालिकेच्या नोंदीनुसार तुमच्या किती मालमत्ता आहेत. आणि त्याच्यानंतर पुढचा प्रश्न आहे यामध्ये कुठेही टॅक्स विभागाचा उल्लेख नाही. मी म्हणतो तुमच्या आरोग्य खात्यात देखील हे असले पाहिजे कारण माझा मूळ प्रश्न हा होता की, २४० टन कचरा झाला कसा?
<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> हा प्रश्न होता?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>नाही हा प्रश्न नव्हता, तुम्ही टॅक्सकडे वळविले मी सेनीटेशनकडे वळवितो. मी इथे कुठेही टॅक्सचा उल्लेख केलेला नाही. मी फक्त विचारले महापालिकेच्या नोंदीनुसार दिनांक ३१ मार्च, २००३ विस्तृत माहिती मला पाहिजे. २४० टन कचरा निर्माण करतांना एका माणसामागे झोपडपटटीच्या २५० ग्रॅम प्रतीदिवस आणि सुधारीत एरिया मध्ये ४०० ग्रॅम तर सुधारीत एरियाची लोकसंख्या किती? आणि स्लम मधली किती? ही मला अपेक्षित आहे. टॅक्सचे मी विसरुन जातो टॅक्समध्ये काय आहे मला माहित नाही. तर महापालिकेच्या नोंदीमध्ये काय आहे? जर ९० हजार झोपडपटटया असतील झोपडपटटीमधील मालमत्ता असतील तर १ लाख ४१ मधल्या ९० हजार सोडल्या तर ५६ हजार या सुधारीत एरियामध्ये येतात. सुधारीत एरियाचे ५०० ग्रॅम तुमचा कुठला निकीचा अहवाल आहे. त्यानुसार धरले तर त्याची लोकसंख्या किती? तर प्रत्येक मालमत्ता मागे पाच लोक म्हणजे ९ x ५ = ४५ ही जी संख्या आहे ती तशी तुलनात्मक बरोबर नाही. त्यासाठी महापालिकेने सर्व्हेक्षण करणे आवश्यक होते ते केलेले नाही. त्यामुळे सर्व अंदाज चुकतात. आणि नको तिथे भरकटतात हे मला दाखवायचे आहे. आणि हे खरे ठरलेले आहे

तुमची उत्तरे खोटी आहेत, चुकीची आहेत. ते तुमच्या उत्तरावरुन दिसते. प्रशासन सभागृहाची आणि त्याबरोबर उल्हासनगर मधील जनतेची दिशाभूल करते. चुकीच्या मार्गाने ही गाडी चाललेली आहे. त्याला कुठेतरी रुळावर आणा. हे या ठिकाणी नमुद करुन अशीच माहिती यापूढे देऊ नका सभागृहाला. हे या ठिकाणी आवश्यक सांगून माहिती मिळाली त्यामुळे समाधान झाले नसले तरी गप्प बसल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. धन्यवाद.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, मराठीमध्ये मला बोलण्याची परवानगी जर दिली तर वडाची साल पिंपळाला लावायचा प्रयत्न करतो. हा प्रश्न एकदम स्पष्ट आहे. महापालिका क्षेत्रात मालमत्ता किती?मालमत्ता म्हटल्यानंतर जे लोक महापालिकेत कर भरतात करासाठी जेवढया मिळकतींचे संरक्षण केले त्या मिळकतींची संख्या सांगणे त्याप्रमाणे मी मालमत्ता कर भरणा-या मिळकतींची संख्या सांगितली. दुसरा प्रश्न होता की त्यात इमारती किती? आता मिळकतींची संख्या व इमारत जी संख्या आहे ती कधीच मिळणार नाही. कारण एक इमारत एक मिळकत नाही आपल्याकडे वन प्रॉपटी इज नॉट वन बिल्डींग वन प्लॅट इज वन प्रॉप्रर्टीज. देअर मे बी मोर देन १० ऑर १५ प्लॅटस् इज इन वन बिल्डींग देअर मे बी मोर देन १५ ॲण्ड २० प्रॉपर्टीज. वुई डु नॉट हॅव द एक्झट नं. ऑफ बिल्डींगस् इन दी सिटी बट ऑन द बेसीस ऑफ असेसमेंट लिस्ट वुई हॅव स्टेटेउ दॅट देअर हॅज १,४१,९७०/- प्रॉप्रटीज. नाउ ऑल दट यु वॅट टु क्नो दिस. हे जे महापालिका क्षेत्र आहे त्यामध्ये घोषित झोपडपटटया किती? व अघोषित झोपडपटटया किती? आमच्या माहितीप्रमाणे ३६ झोपडपटटया आहेत. वाद हा आहे की, ३६ आहेत की ४८ झोपडपटटया घोषित आहे. ते वेरिफाय करावे लागेल. आजपर्यंत आम्ही कुणाला सांगितले ४८ झोपडपटटया आजच्या उत्तरात ३६ सांगितले. त्याबददल वाद आहे हे मी मानतो. त्याबाबतीत वेरीफीकेशन करणे जरुरी आहे. अघोषित मध्ये ६४ झोपडपटटया आहेत. त्यात काही वाद नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> तुम्हाला हे माहित नाही आहे का? ४८ झोपडपटटया घोषित आहेत. त्यात तर ८३ मध्येच घोषित झाल्या आहेत. त्यात त्यांची नावे आपल्या कार्यालयात देखील लावली आहे. भडकवाड खुप वर्षापासून आहे त्यांना माहित असले पाहिजे की, ४८ झोपडपटटया आहेत. ही ८३ सालची माहिती आहे. २००३ वर्ष आले तरी त्यांना माहिती नाही पडले? इतक्या वर्षात त्यांना माहिती नाही पडले.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, मला अजून एका गोष्टीची माहिती हवी आहे. ३६ का ४८मला जितपत माहिती आहे आम्ही पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करतांना ४८ चा आम्ही सांगितले आहे. ते लिखित स्वरुपात आमच्याकडेपण आले आहे त्या हिशोबाने आम्ही त्यांना माहिती दिली आहे. आजचे हे पण उत्तर आले आहे ३६ . ते ३६ का व ४८ का? यासाठी मला गॅझेट पहावे लागेल. एका गॅझेटमध्ये जेव्हा मी पाहिले होते तेव्हा ३६ ची यादी होती. दुसरी शासकीय अधिसूचना पाहिली त्यामध्ये ३६ होते. त्याव्यतिरिक्त अधिसूचना असेल तर पहावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> पटल ....

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>याच्यापूढे असे उत्तर देवू नका. फिरवाफिरवीची उत्तरे देवू नका.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २१३ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २१३ :-</u>प्लॉट १५८, पार्ट ८,९,१०, शिट नं. ३४, कॅम्प नं. ३ सदर परिसरात सार्वजनिक शौचालये किती आहेत? सदयस्थितीत त्यांची शौचालये

किती आहेत? तेथिल बॅरेक ११७० जवळील ४/३ सिटर शौचालयाचे शिवमंदिर बनविले आहे हे खरे आहे काय? असल्यास काय कारवाई केली आहे?

<u>उत्तरः-</u> प्लॉट १५८, पार्ट- ८,९,१०, शिट नं. ३४, कॅम्प नं. ३ येथिल परिसरात एकुण तीन सार्वजनिक शौचालये आहेत. त्याची सदयस्थिती खालीलप्रमाणे-----

| अ.क्र. | शौचालय संख्या | सिटची संख्या | वापर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | १ | ३ | सुरु | मोडकळीस आलेले आहे. |
| २) | १ | ३ | बंद आहे. | सेप्टीक टॅकवर शिवलिंग व नदीची प्रतिमा ठेवलेली आहे. |
| ३) | १ | २ | बंद आहे. | अतिक्रमित आहेत. |

बॅरेक ११७० जवळील ३ सिटचे शौचालय जागेवर अस्तित्त्वात आहे. तथापि सदर शौचालयाचे सेप्टीक टॅकवर शिवलिंग व नदीची प्रतिमा ठेवलेली आहे. सदर शौचालयाच्या वापराची मागणी झाल्यास सार्व. बांध. विभागामार्फत दुरुस्ती करतेवळी उचित कार्यवाही केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> मा. महापौर, २१३ नंबरचा प्रश्न विचारला आहे, २५ ऑगस्ट ला उत्तर दिलेले आहे, परंतु जसे मघाशी बोडारे साहेब बोलले की, तुमच्याकडे माहिती असते बरोबर पण जशी आहे तशी उत्तरे देतात. जे आहेत तेच उत्तरे देतात. तिथे जर काही अतिक्रमण झाले असेल तर तसेच उत्तर देतात अतिक्रमण झाले आहे. याच्यावर हा प्रकार झाला आहे त्यावर तो प्रकार आहे. त्याच्यावर कार्यवाही काय केली आहे? ती कार्यवाही कधीच होत नाही. कॅम्प नं. ३ मध्ये शौचालयाबाबत प्रश्न विचारला आहे. याच्यामध्ये संख्या दिलेली आहे. मला वाटते तुमच्याकडे उत्तरे आहेत. शौचालयाची संख्या १, शिटची संख्या ३, वापर सुरु आहे. आता आम्ही गेलो तेव्हा वापर बदं होता. वापरच नव्हता, वापर बंद होता. दोन शिट बदं आहे. तुम्ही इथे दिले सुरु आहे. आता काही कोण गेले होत माहित नाही. दुसरे दिले आहे, शौचालयाची संख्या १, शिटची संख्या ३इथे दिले बंद आहे. त्याच्या पुढे दिले आहे शेरा. सेप्टीक टॅकवर शिवलिंग व नंदीची प्रतिमा ठेवणे माहिती आहे महापालिकेला. ३ रे दिले आहे शौचालयाची संख्या १, सिटची संख्या २, तिथे दिले आहे बंद. एक्चुली ते दोन नाही ४ शिट आहेत. म्हणजेच तुमचे अधिकारी पण जाणूनबूजून चुकीची माहिती देत असतात. याच्यापूढे तुम्ही उत्तर दिल बॅरेक ११७० मध्ये ३ सिटचे शौचालय जागेवर अस्तित्त्वात आहे. शौचालय जागेवर अस्तित्त्वात आहे. सेप्टीक टॅकरवर शिवलिंग व नंदीची प्रतिमा ठेवलेली आहे. सदर शौचालयाच्या वापराची मागणी झाल्यास सार्व. बांध. विभागामार्फत दुरुस्ती करतेवळी उचित कार्यवाही केली जाईल. आयुक्त साहेब हे जे शहर आहे या शहराचा कुलदैवत जे म्हणतात ना असा भोळा शंकर आहे, संपूर्ण या शहराची जनता भोळा शंकरला मानणारी आहे. ते कुलदैवत आहे. कदाचित सिंधी लोकांचे ते फार मोठे दैवत आहे व अशा दैवताची हिंदु देव -देवताची जर विटंबना पध्दतशीर होत असेल. हे अधिका-यांना माहित आहे, कोणी केले माहित आहे. ते हिंदु देव-देवताची विटंबना या शहरामध्ये होत असेल तर................

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u> मा. महापौरजी, ................

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- हा फोटो दाखवतो .

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- हा फोटो मी मागच्या सभेत आयुक्त साहेब, महापौर यांना उपमहापौर यांना मंचापाशी येवून दाखविले होते. हा फोटो मी तुमच्या हातात दिला होता. दाखविले होते की, याप्रकारे सेप्टीक टँकवर असे मंदिर बनविले आहे. असा फोटो मी सभागृहात दाखविला होता.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- हा फोटो जर तुम्ही पाहिला तर स्पष्ट दिसेल निरखुन बघा तो फोटो, एका संडासावर जर शिवलिंग आणि नंदीची प्रतिमा जर होत असेल तर एवढा मोठा विटंबनेचा प्रकार कुठला असू शकतो. जर अशी विटंबना होत असेल तर त्याला दोषी कोण आहे? हा पध्दतशीरपणे जो प्रकार आहे महानगरपालिकेचे अधिकारी आणि ज्यांनी शिवलींग बनविले आहे. मला वाटते त्याचे नाव देखील अधिकारीला माहिती आहे. या दोघांमिळून पध्दतशीरपणे जागा हडपण्याचा प्रकार आहे. आणि त्याचा वापर बंद आहे. हा वापर पण लोकांसाठी पध्दतशीरपणे बंद केला आहे. लोकांनी तुमच्याकडे वारंवार वेळोवेळी वापर सुरु करण्याबददल मागणी केलेली आहे आणि त्याचे रितसर पत्र पण तुमच्याकडे आहे, त्याच्यानंतरही तुम्ही बोलता की, कुणी वापराची मागणी केल्यास सदर शौचालयाच्या वापराची मागणी झाल्यास म्हणजे आता पर्यंत मागणी झाली नाही का? माझ्याकडे रितसर त्याचे अर्ज आहेत आणि तुमच्याकडे तशी पत्र पण आहेत. लोकांनी मागणीपण केली मग असे असतांना कार्यवाही का होत नाही? हिंदु देव-देवतेची तुम्ही विटंबना जर करत असाल तर याला जबाबदार कोण आहे. त्याच्यासाठी तुम्ही काय कार्यवाही करत आहे. कायदेशीर कार्यवाही काय करणार आहे. याचा मला इथे खुलासा करावा.

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- मा. महापौर महोदया, सन्माननिय नगरसेवक श्री. टालेजींनी इथे जो प्रश्न विचारला आहे, ते आधीच म्हणाले की, प्रशासनाचे अधिकारी दिशाभूल करत आहेत. मी सदनाला आश्वस्त करु इच्छितो की, हे उत्तर मी स्वत: साईट इन्स्पेक्शन करतांना मी जी आजची परिस्थिती सांगितली आहे, त्याची सघस्थिती खालीलप्रमाणे....... त्यामध्ये मी एका इंचाचा फरक केला नाही, ती गोष्ट लपविण्याचा प्रयत्न केला नाही. तिथे ३ शौचालय आहे हा स्वंयस्पष्ट उत्तर आहे. आणि जे टाले साहेब म्हणाले, हिंदु धर्माच्या लोकांचे दैवत आहे त्याची विटंबना हे अधिकारी करत आहेत. जो कोणी नंदी आणि शिवलिंगाची प्रतिमा ज्याने लावली आहे. जो कोणी समाजकंटक असेल त्याच्यामुळे प्रशासनाने जर नंदी उचलून आणला शिवमुर्तीची तोडफोड केली तर लोकांच्या भावना भडकू नये. विटंबना न होवो. यामुळे मी उत्तर दिले जर तिथे मागणी केली तर त्याची पुजा करुन प्रशासन सन्मानाने तेथुन घेवून येईल. तुमच्याकडे जी मागणी आली आहे, एकटा व्यक्ती स्वत:च्या वैयक्तीक दुश्मनीमुळे ही मागणी करत आहे. मी स्वत: ती साईड पाहून आलो आहे. प्रत्येक घरात प्रत्येक बॅरेकमध्ये तिकडे शौचालय आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- मा. भडकवाड साहेब, तुम्ही जे बोलत आहात ते चुकीचे बोलत आहात.

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- मा. महापौर महोदया, हरकतीचा मुददा आहे. सदनाचा कुणीही सदस्य येवो मी त्यांचा सोबत आता जायला तयार आहे. जर तुम्ही आदेश देत असाल तर मी त्यांच्याबरोबर जायला तयार आहे. या प्रश्नाचे कुठेही चुकीचे उत्तर असेल तर मी जबाबदार राहिन.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- शौचालय ही कुणाची मालमत्ता आहे. शौचालय ही महानगरपालिकेची संपत्ती असतांना त्यावर जर दुसरे कोणी अतिक्रमण करत असेल तर तुम्ही काय करता मग? मी वेळोवेळी सुचना दिल्या आहेत तेव्हा तुम्ही का नाही केले?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- मी त्याचेच उत्तर देवू इच्छितो. मी कोणतेही चुकीचे उत्तर दिले नाही. जी वस्तुस्थिती आहे ती सांगितली . जे सत्य आहे ते मी दाखविले आहे. कार्यवाही करणार नाही असे देखील म्हटले नाही. जर जनतेची मागणी असेल तर सन्मानपूर्वक नंदीला उचलून त्याची विटंबना न होवो अशात-हेने कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-सोनवणे साहेबांसकट इतर सर्व अधिकारी जसे मघाशी बोडारे साहेब बोलले उचित कार्यवाही करण्यात येईल. येईल ती येईलच पण मधीलच कार्यवाही होणार नाही. नुसतेच उत्तर देतात त्याच्यावर कार्यवाही होत नाही. हा प्रश्न १५ ऑगस्टला दिला आहे मग आतापर्यंत का नाही कार्यवाही केली त्याच्यावर? जो पर्यंत प्रश्न येत नाही तोपर्यंत कार्यवाही करत का नाही? ऑगस्ट किती महिने झाले?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- मा. महापौर महोदया, तिथे जी लोकांची मागणी आहे, आमच्याकडे काही मागणी आली नाही, आणि आली जर असेल तर ती एका व्यक्तीची असेल ती जरुरी नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- मा. महापौर महोदया, सर्वात प्रथम गोष्ट म्हणजे तिथे जी संडास आहे त्याच्यावर शिवलिंग ठेवले आहे ती हटविले पाहिजे तिथे मागणी काय आहे काय नाही हे जास्त महत्त्वपूर्ण नाही सर्वात जास्त महत्त्व पूर्ण आमच्या धर्माची गोष्ट आहे की तिथे जे मंदिर केले आहे ते हटवायचे आहे. शिवलिंग हटविण्यासाठी कोणताही हिंदु धर्मी नाही म्हणणार नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-शिवलिंगची जी मुर्ती आहे ती काही संडासावर नाही. प्लॉस्टर केलेली आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-नाही ते सेप्टीक टॅकवर आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-फोटो दाखविले आहे, फोटो प्रत्यक्ष बघा.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटिल :- महानगरपालिकेने खोटे बोलणेची हद्द ओलांडली आहे वाटते.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते कळत नव्हते.

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- या सदनातील सदस्यांची याविषयी भावना पाहून मी सदनाला हे आश्वासन देवू इच्छितो की, ती मुर्ती जी आहे ती सन्मानपूर्वक पुजा करुन हटविली जाईल.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आतापर्यंत का झाले नाही. त्याचे उत्तर काय आहे?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आज कार्यवाही करता का?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- ज्यांनी हे केले आहे त्यांच्यावर कार्यवाही केली जावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- पुढच्या महासभेत रिपोर्ट मिळाला पाहिजे हटविली की नाही हटविली ते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आज कार्यवाही करा. पूढच्या नको.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- पुढची महासभा नाही उदयाच्या उदया हटविली पाहिजे. पुढच्या महासभेची आवश्यकता नाही. वाट बघायची नाही उदयाच्या उदया कार्यवाही करायची. समस्या काय?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-महापौर महोदया, या आठवडयात हटविली जाईल कारण कायदा आणि सुव्यवस्थाचा प्रश्न येवू शकतो. पोलिस बंदोबस्त मिळाल्यावरच हटविले जाईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- ज्यांनी केले त्यांच्यावर काय कारवाई करणार?

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकूर ५.०० वाजता सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- महापौर महोदया, जर कुणी व्यक्ती मग ती समाजकंटक असो किंवा आणखी दुसरा कोणी व्यक्ती असो जर तो शौचालयाच्या जागेवर, सेप्टीक टँकवर शिवलिंग उभे करत असेल, शंकराची मुर्ती ठेवत असेल तर त्याचा उद्देश धार्मिक नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. एखादा लहान मुलगा आपणांस समजावू शकतो की, त्यांचा जो हेतू आहे तो ती जागा हडप करण्याचा आहे. अशा जागेवर कारवाई करणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. त्यानंतर पोलीस वैगेरे, आपण पोलीसांना कळविले काय?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :- मा. आयुक्त साहेब, भडकवाड साहेब, .. ....................

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- पोलीसांना आपण याबाबत कळविले आहे का की, याबाबत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो, म्हणजे एखादया सदस्याने प्रश्न विचारला की, त्याच्यामध्ये वैयक्तीक सारस्य? आम्ही अनेकवेळा अनुभव घेतला आहे वैयक्तीक सारस्याचा, तुमची जबाबदारी काहीच नाही याच्यामध्ये?म्हणजे तुम्ही ज्या ज्या ठिकाणी असफल ठरता त्या त्या ठिकाणी तूम्ही सदस्यांवर टिकात्मक भाष्य करणार..........................

श्री. दत्ता भडकवाड(उप-आयुक्त):-मा. महापौर महोदया, यापुढचे सर्व प्रश्न पाहिले तर ते (याच मिळकती संदर्भातील प्रश्न) आहेत, यासाठी मी असे म्हणत आहे की,..........................................

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी ५.०२वाजता सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- प्रश्न कुठला आहे ते महत्त्वाचे नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-हा विषय इथेच घ्या, या विषयापुरतेच बोला ना?

मा. महापौर :- मी आयुक्त साहेबांना असे निर्देश देवू इच्छिते की, आमचे जे सदस्य ओरड करत आहेत यासाठी की, शौचालयावरच शंकराच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटिल :- महापालिकेच्या अधिका-यांना सवय लागली आहे, चुकीची माहिती देण्याची.

मा. महापौर :- शौचालयाच्या टाकीवर जी देवी-देवतांची मंदिरे तयार केली आहेत, दिवाळीच्या नंतर त्या ठिकाणचा सर्व्हे करुन आम्ही ती हटवू व कारवाई करु. याबाबत मी आयुक्त साहेबांना निर्देश देत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आपण करणार की, प्रशासन करणार कारवाई?

मा. महापौर :-प्रशासनाबरोबर श्री. भडकवाड साहेब, दिवाळीच्या नंतर कारवाई करतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आयुक्त साहेब यामध्ये जर वेळ गेली व देवतांची विटंबना झाली तर त्यास जबाबदार कोण? जर यामधल्या कालावधीमध्ये त्या मुर्तीची विटंबना झाली, तोडफोड झाली तर त्यास जबाबदार कोण? जर आपण सगळीच जबाबदारी घेता तर ही जबाबदारीपण घ्या.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा. महापौर महोदया, सभागृहाचे हे रुप पाहून मला पुन्हा एकदा सभागृहात सांगावे लागत आहे की, आजपर्यंत सभागृहात किंवा सभागृहाबाहेर महानगरपालिके विषयी जे काही होते त्याची मी नेहमीच जबाबदारी घेतो जे उत्तर प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेले आहे, त्याबाबत मी सभागृहास सांगु इच्छितो की, दिपावलीच्या अगोदर शिवलिंग तेथुन हटविले गेले तर होवू शकते कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो यासाठी सभागृहास माझी विनंती की, दिपावली नंतर त्वरीत ही जी शंकराची मुर्ती व शिवलिंग तेथे बसविले आहे ते हटविले जाईल. व तेथिल शौचालयाची दुरुस्ती करुन ते वापरात आणले जाईल. मी आपणांस सांगु इच्छितो की, काही दिवसापूर्वीच विरोधी पक्ष नेता व काही लोक मला भेटले होते व त्यांनी असे सांगितले होते की, या शहरामध्ये बरीचशी अशी शौचालये आहेत, तेथे त्यांची आवश्यकता आहे परंतु त्यांची स्थिती अतिशय खराब असल्यामुळे , त्यांची दुरुस्ती करु शकत नाही. ती सर्व शौचालये दुरुस्त करण्यासाठी प्राकलने तयार करण्यासाठी मी सार्वजनिक बांधकाम विभागास लेखी कळविले आहे.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता ५.१० वाजता सभागृहातून बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- महापौर महोदया, मुददा असा उपस्थित केला आहे की, शौचालयावर जे शिवलिंग बसविले गेले आहे, त्याबाबत असे सांगितले जात आहे की, दिपावली नंतर ते हटविले जाईल. सदस्यांनी प्रश्न विचारला त्याचे आपण उत्तर दिल्याने आपली जबाबदारी पुर्ण केली, हा गंभीर मुददा आहे. यावरुन शहरामध्ये जातीय दंगल होवू शकत होती. हे जे मंदिर किंवा शिवलिंग जे काही आहे, ते त्वरीत हटविले गेले पाहिजे. व जर आपण दिवाळीपर्यंत आपण थांबत असाल व या प्रतिमेची या दरम्यान जर कोणी विटंबना केली तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याची जबाबदारी आम्ही उचलू शकणार नाही. व असे कोणते तत्त्व आहे की, जे तेथून शिवलिंग, शंकराची मुर्ती तेथून हटविण्यास विरोध करेल ? असे कुणी करणार नाही म्हणून लवकरात लवकर तेथून ते हटविले जावे. अन्यथा कुण्या उपद्रवी व्यक्तीने किंवा आमच्या शहराच्या कुण्या शत्रुने त्या प्रतिमेबाबत काही गडबड केली तर शांत असलेले उल्हासनगर शहर पेटून उठेल व त्याची जबाबदारी महासभेवर व आपणावर असेल.यासाठी हे काम दिवाळी नंतर न करता आताच करावे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-महासभेवर जबाबदारी राहणार नाही आयुक्तांवर जबाबदारी राहिल, प्रशासनावर राहिल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- आम्हां सर्वांची जबाबदारी आहे की, हे शहर शांत रहावे. व असे कोणतेही कार्य होवू नये की ज्यामुळे शहरातील शांतता धोक्यात येईल म्हणून हे कार्य लवकरात लवकर झाले पाहिजे.

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, आता येथे जी माहिती प्राप्त होत आहे या शौचालया शेजारी जे शिवमंदिर तयार झाले ते काही वर्षापूर्वी, किती वर्ष?*

*<u>काही सदस्य :-</u> चार वर्षापुर्वी ........*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> किती वर्षापुर्वी, चार वर्षापूर्वी? व आता काही लोक म्हणतात, जी गोष्ट चार वर्षापूर्वी झाली आहे, चार दिवसानंतर म्हणजे दिवाळी नंतर ते शिवमंदिर हटविले तर असे कोणते संकट या शहरावर येणार आहे?एवढया दिवसापासून तयार झालेले आहे. त्याकडे आजपर्यंत कुणाचे लक्ष गेले नाही. व आज लक्षात आले आहे तर सर्वांना असे वाटते की, काहीतरी अनर्थ होणार आहे. व त्यास प्रशासन जबाबदार राहिल? जर पोलिस बंदोबस्त मिळत असेल तर उदयाच आम्ही तेथून हटवू. व पोलिस बंदोबस्त घेवूनच आम्ही ते हटवू. मुददा काय आहे व आपण काय म्हणत आहात? चार वर्षापूर्वी कोणी काहीच बोलले नाही. व आज आपणांस जाग आली व सर्व जबाबदारी प्रशासनावर ढकलत आहात. हे असे होता कामा नये. वस्तूस्थिती आपण सर्वांनी जाणून घेतली पाहिजे. एवढे दिवस झाले, व मी आपणांस फक्त एक आठवडयाची वेळ मागत आहे की, या भितीने की दिवाळी मध्ये शहरामध्ये कोणतीही अशांतता होवू नये. जर आपण सर्वांना खात्री आहे की काहीच होणार नाही तर आम्ही सुध्दा कारवाई करु. उदयाच ते तेथुन हटविले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मा. आयुक्त साहेब,..............*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u>आयुक्त महोदय, आपण म्हणता की, ते मंदिर तेथे चार वर्षापासून आहे मी आपणांस हे सांगु इच्छितो की, चार वर्षापासून पत्र व्यवहार सुध्दा चालु आहे. परंतु आपले प्रशासन झोपेत आहे. चार वर्षापासून ही तक्रार येत आहे. एवढी मोठी फाईल झाली आहे. प्रशासन झोपेतून उठत नाही म्हणून आम्ही प्रश्नाच्या माध्यमातून आम्ही जागे करत आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, आज येथे हा जो मुददा उपस्थित होत आहे. या विषयाबाबत मी सर्वात प्रथम आमच्या आरपीआयचे नगरसेवक व गटनेता श्री. प्रमोद टाले नगरसेवक यांचे अभिनंदन करतो. ते पूर्ण उल्हासनगर शहरात फिरत असतात व समस्या शोधत राहतात. तसे तर ते कुर्ला कॅम्प येथुन निवडुन आले आहेत व कॅम्प नं. ३ मधला प्रश्न विचारत आहेत. यासाठी त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत ते पूर्ण उल्हासनगर शहरात फिरत असतात. म्हणून त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. मला त्यात काही हरकत नाही. मी त्यांना दाद देतो. असेच आणखी काही आमचे सदस्य आहेत जे पूर्ण उल्हासनगर शहराचे मुददे येथे मांडत असतात. त्यांचा तो विषय आणि त्यामागचा हेतू हा शहराबाबतीत अतिशय चांगला असतो. असे ही ऐकिवात येते. तर असे मुददे आपण दुस-या कॅम्पामधून सुध्दा आणत रहा. यासाठी आपणांस धन्यवाद आहे श्री. प्रमोद टालेजी, व दुसरे असे की, जेथे मंदिर तयार केले पाहिजे तेथे ते पुर्ण भारतभर मंदिर बांधू शकले नाहीत. येथे जे मंदिर बांधले आहे ते तर राहू दया? तर आज चार वर्षापासून जे भोलेनाथ यांचे मंदिर बांधलेले आहे मला हे एक उदाहरण आठवते एक माझ्या प्रभागात भोलेनाथाचे मंदिर बांधले होते ते महापालिकेने तोडले , ज्या दिवशी ते मंदिर तोडले त्याच्या दुस-या दिवसापासून ते मंदिर तोडणारा कर्मचारी निलंबित झाला. त्याची नोकरी संपुष्ठात आली. व ज्यांनी हे मंदिर तोडण्यास लावले तो आजपर्यंत आजारी आहे. यासाठी सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे त्याची योग्य त्या प्रकारे पुजाअर्चा करुन, जेणेकरुन जे लोक हे मंदिर तोडु इच्छितात त्यांचीही तब्येत ठिकठाक राहील. श्री. प्रमोद टाले जर बोलत असतील की, ठिक आहे आता तोडु नका. जर ती संबंधित व्यक्ती त्यांना भेटत असेल , त्यांचा जो काही हेतू आहे तो*

मोकळा ठेवून , यासर्वगोष्टी लक्षात घेवून, ज्या मंदिरास चार वर्ष झाली आहेत ते मंदिर तोडण्यासाठी येथे बोलले जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> श्री. किशोर वनवारीजी, आपण या महापालिकेचे सभागृह नेता आहात. व सर्व नगरसेवकांचे नेते आहात. याचा अर्थ असा नाही की, कुण्याही नगरसेवकाच्या बाबतीत आपण चुकीच्या पध्दतीने बोलावे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> आपण इतिवृत्त पाहू शकता, कॅसेटसही पाहू शकता मी कधीही चुकीचा शब्द उच्चारला नाही. मी अदयापपर्यंत चुकीचा शब्द उच्चारला नाही. मी काय म्हटले की, श्री. प्रमोद टाले यांना जी हरकत आहे ती जर दुर होत असेल ...............

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> आपणांस जर शिवलिंग व शंकराची मुर्ती शौचालयावर हवी असेल तर आपण तसे बोला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> आपण तर कधीही काहीही विचारता, माझ्या प्रभागातीलही एक प्रश्न विचारला आहे. बसंत बहार येथिल किती दुकाने गेली? किती जागा गेली? आपण पूर्ण उल्हासनगरचे प्रश्न विचारता.प्राच नंबर मधील सुध्दा प्रश्न विचारता.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> हरकतीचा मुददा, आयुक्त साहेब मला याचे उत्तर दया की, नगरसेवक कुठल्याही विभागाचा प्रश्न विचारु शकतो ना? त्यांना तसा अधिकार आहे की नाही? अधिकार नसेल तर .................

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>आपले म्हणणे मीच अधिक स्पष्ट करतो. सदस्य पूर्ण उल्हासनगर शहरामधील कोणताही प्रश्न विचारु शकतो. उलट मी तर असे म्हणतो की, आपण पूर्ण उल्हासनगर मधील समस्या शोधून काढता. त्यासाठी धन्यवाद. तर माझे असे म्हणणे आहे की, तेथे दंगा वगैरे होवू नये म्हणून भलेही त्यासाठी आणखी थोडे दिवस लागले तरी व पुजाअर्चा करुन, कारण की, येथे मंदिर तोडण्याच्या गोष्टी चालतात आणि तिकडे आयोध्येमध्ये मंदिर बांधण्याच्या गोष्टी चालतात. तर मेहरबानी करुन मंदिराचा जो मुददा आहे तो थोडया गंभीरतेने घेवून.................

मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी ५.१६ वाजता सभागृहातून बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u>मा. महापौरजी, आयोध्येमध्ये जे मंदिर बांधण्याचे कार्य चालु आहे ते मंदिराच्या जागेवरच बांधण्याचे काम चालु आहे. येथे जे मंदिर बांधले आहे ते एका शौचालयाच्या टाकीवर, ज्यांच्यावर आम्ही हिंदु धर्माच्या रक्षणाचे कार्य सोपविले आहे. तर हा मुददा आयोध्येच्या मुददयाशी जोडला जावू नये.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटिल :-</u>येथे ज्यांनी मंदिर बांधले आहे त्यांचा उददेश ठिक नाही.

<u>मा. महापौर :-</u>या मूददयावर बरीच चर्चा झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> सभागृहनेता आयोध्येपर्यंत मूददा नेतात आमचे प्रमोद टाले उल्हासनगरमध्ये जावू शकत नाहीत काय?

यावेळी काही सन्मानानिय सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-हिंदु देवदेवतांची विटंबना होत नाही का?

मा. महापौर :- या मुददयाबाबत आम्ही लोक प्रत्यक्ष जागेवर जावून सर्व्हे करु यथासांग पुजा करुन ती मुर्ती तेथुन उठवू व सदस्यांसमोर हा मुददा घेवून येऊ.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढील प्रश्न क्र. २१४ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. आपणांस काही विचारायचे आहे?

प्रश्न क्र. २१४:- प्लॉट १५८, पार्ट-८,९,१०, शिट ३४ कॅम्प नं. ३ या प्लॉटमध्ये असणारे कारखानदारामुळे तेथिल रहिवासी त्रस्त असून कारखान्यामुळे होणारे ध्वनी प्रदुषण, हवा प्रदुष,ण या संबंधित लोकांच्या तक्रारी असुन सदर कारखाने स्थलांतरीत करणेकरीता महानगरपालिकेतर्फे काय योजना करण्यात येत आहे. याचा विस्तृत खुलासा करावा.

उत्तर :- सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-हा मी जो प्रश्न विचारला आहे, त्याच्यामध्ये तुम्ही असे लिहिले आहे की सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. म्हणजे नेमके काय त्याच्यामध्ये आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- हा जो कारखाना आहे, प्लॉट नं. १५८, शिट नं. ८,९,१० या कारखान्याच्या प्रदुषणामुळे काही तक्रारी आल्या होत्या. हया तक्रारी महानगरपालिकेकडे, प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे, उप-विभागीय अधिका-यांकडे, तर जनतेस उपद्रव होत असल्यामुळे सी.आर.पी.सी. १३३ सेक्शनमधील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे उप-विभागीय अधिका-यांकडे अधिकार आहेत. तर उप-विभागीय अधिका-यांनी सी.आर.पी.सी. च्या कलम १३३ मधील तरतुदीनुसार नोटिस बजावली होती. तो कारखाना बंद करण्यासाठी तर त्या त्याच्या विरोधात त्यांनी कल्याण येथिल न्यायालयात स्थगिती आदेश मिळविला.

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव यांनी ५.२० वाजता सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- महानगरपालिकेचे कोर्टात काही आहे का? न्यायप्रविष्ट जे लिहिले आहे तर महानगरपालिकेशी काही संबंधित आहे का?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-ते कारखाने बदं करावेत असा मुददा होता , प्रदुषणाबाबत, उप-विभागीय अधिका-यांनी जे आदेश बजावले आहेत त्याच्या विरोधात तो स्थगिती आदेश आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- त्यांचा स्थगिती आदेश आहे ना?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-कोर्टाचा स्थगिती आदेश आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- महानगरपालिकेचा काय संबंध आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-कारखाने बंद करण्यावर स्थगिती आदेश आहे. आणि ते प्रदूषण करतात. म्हणून उप-विभागीय अधिका-यांनी आदेश बजावले होते. त्याच्या विरोधात न्यायालयात स्थगिती आदेश आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- माझे म्हणणे असे आहे की, आता महानगरपालिकेच्या कुठल्या मुददयावर मी प्रश्न विचारल्यावर सचिव साहेब कधी कधी उत्तर देतात की, न्यायप्रविष्ठ आहे.........................

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- आपला जो प्रश्न आहे सदर कारखाने ध्वनी प्रदुषण व हवा प्रदुषण करतात या लोकांच्या तक्रारी आहेत, असा प्रश्न आहे. म्हणून त्याच्यावर काय कारवाई करणार ? असा प्रश्न आहे. म्हणून त्यावर सी.आर.पी.सी च्या कलम १३३मधील तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी साहेबांनी नोटिस बजावली आहे. व त्याच्या विरोधात स्थगिती आदेश आहे. म्हणून ते उत्तर दिले आहे की, सदर बाब न्याय प्रविष्ट आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- म्हणजे महानगरपालिका त्यावर काही कारवाई करु शकत नाही?

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- सदया नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-ठिक आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):- मा. महापौर महोदया, मी एक गोष्ट या उत्तराशी जोडु इच्छितो परंतु यात २००६ पर्यंत , प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचे सर्व नॉर्म्स तपासून त्यांना परवानगी व मुदतवाढ दिली आहे. ना हरकत दाखला दिला आहे. कन्सेन्ट दिले आहे, त्यासाठी प्रदुषणाचा काही संबंध येत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढील प्रश्न क्र. २१५ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. ठिक आहे ना? तोच प्रश्न आहे.

प्रश्न क्र. २१५:- प्लॉट नं. १५, पार्ट- ८ ,९ ,१० , शिट नं. ३४ , कॅम्प नं. ३ सदर प्लॉटवर महानगरपालिकेचे कुठले रिझर्वेशन आहे?

सदर परिसरातील निवासी जागेंना तडे पडले आहेत या बददल स्थानिक रहिवासचे आपल्याकडे तक्रारी आहे का?

सदर प्लॉटवर किती कारखाने आहेत? कोणाचे आहेत? सदर कारखाने धारकांवर अनाधिकृत बांधकाम विभागामार्फत कारवाई केलेली आहे काय ? असल्यास काय कारवाई केली ?सदर कारखाने धारकांना विजेचे कनेक्शन घेणे संदर्भात महापालिकेने ना हरकत दाखला दिला आहे काय ? दिल्यास कुठल्या नियमानुसार दिला आहे?

उत्तर :- उल्हासनगर येथिल भुखंड क्र. १५८ (भाग नं. ८ ,९ , व १०) बॅरेक नं. ११६८ समोर पवई चौक, उलहासनगर-३ ही जमिन उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार रहिवास विभागात अंतर्भुत असून ती कोणत्त्याही आरक्षणाने बाधित होत नाही.

सदरच्या जमिनिवर असलेल्या ५ कारखान्यांबाबत स्थानिक रहिवासी यांच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या होत्त्या. व त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने सदरचे कारखाने व उदयोगधंदे हे बंद करण्याचे आदेश निर्गमित करणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर भाग उल्हासनगर यांना कळविलेले होते व सदरच्या अहवालाचे अनुषंगाने मा. उपविभागीय अधिकारी उल्हासनगर भाग उल्हासनगर त्यांचे आदेश क्र. उपवि/टे-१/प्रदुषण /कावि दिनांक ९/६/१९९७ सदरचे कारखाने हे त्वरीत बदं करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. सदरच्या आदेशाविरुध्द संबंधित कारखानदारांनी मा. दुसरे अप्पर सत्र न्यायालय, कल्याण येथे क्र. ५७/९७ अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा अदयाप प्रलंबित आहे. तथापि मा. दुसरे अप्पर सत्र न्यायालय, कल्याण यांनी मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी पारीत केलेल्या उक्त आदेशास स्थगिती दिली असून, सदरचे स्थगिती आदेश हे अदयाप कायम आहेत.

दरम्यानच्या सदरच्या जमिनिवर असलेल्या पाच कारखान्यांबाबत श्री. हरेश एल. खत्री यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे दि.

१६/१२/२००१ रोजी तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीचे अनुषंगाने आयोगासमोर आतापर्यंत दि. १/४/२००२, दि. १९/११/०२ व दि.१६/१२/०२ रोजी सुनावणी झालेल्या आहेत व त्यास उमपाचे अधिकारी उपस्थित राहिलेले आहेत. सदया सदरचे प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्याने, आयोगामार्फत कोणत्त्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. मात्र प्रलंबित दाव्यात न्यायालयाने आदेश पारीत केल्यास, आवश्यकता भासल्यास तक्रारदार हे अपिल करु शकतील ही बाब आयोगाने दि. १६/१२/२००२ चे सुनावणीत स्पष्ट केलेली आहे. व सदरची बाब ही माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी मा. उपविभागीय अधिकारी उल्हासनगर भाग, उल्हासनगर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/जीआर/१३३, दिनांक १३/१/२००३ अन्वये कळविलेली आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:- उत्त्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पुढील प्रश्न क्र. २१६ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २१६:- प्लॉट १५८, पार्ट-८,९,१०, शिट ३४ कॅम्प नं. ३ सदरील प्लॉटमध्ये अस्तित्त्वात असले कारखानदार श्री. सुरेश खटवानी, श्री. रमेश आहुजा आणि इतर कारखानदार यांना महानगरपालिकेतर्फे ट्रेड-लायसन्स दिले आहेत का? दिले असल्यास कुठल्या नियमानुसार दिले आहेत? नसल्यास महानगरपालिकेतर्फे कायदेशीर काय कारवाई केली आहे का? नसेल केली तर कारणे काय? सदर कारखाने धारकावर आज तारखेपर्यंत ''कर'' बाकी आहे का? किती आहे?

उत्त्तर :- सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:- आता दुसरा प्रश्न, २१६ क्रमांकाचा ना? माझा प्रश्न आला की काही लोकांच्या पोटात दुखते ना? ते जाऊ दया. पण मी २१६ क्रमांकाचा हा जो प्रश्न विचारला आहे, या प्रश्नाच्या संदर्भात तुम्ही जे उत्त्तर दिले आहे की, सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. आमचे त्याच्याबददलही काही म्हणणे नाही. परंतु ट्रेड लायसन्सचा हा जो विषय आहे. या महासभेच्या या प्रश्नाच्या माध्यमातून मी आयुक्तांना एक गोष्ट येथे सुचवू इच्छितो की, ट्रेड लायसन्स जे महापालिकेच्या माध्यमातून दिले जातात प्रत्यक्षात ट्रेड लायसन्स म्हणजे काय? त्याची नेमकी व्याख्या काय? आणि ते कोणा-कोणाला लागू होते? आणि ही जी व्याख्या जर तुम्ही योग्य पध्दतीने राबविली. तर आज शहरामध्ये जवळपास ५० हजार, माझ्या माहितीप्रमाणे ५० हजार लायसन्स दर वर्षी दिले जातात. आणि जर ते दिले गेले तर आपल्या महानगरपालिकेचा जो महसूल आहे तो खुप वाढू शकेल आणि या दृष्टीकोनातून मी हा प्रश्न विचारला आहे. आणि याबाबतीत जर तुम्ही व्यवस्थित खुलासा, ट्रेड लायसन्सच्या बाबतीत आणि ते आपण या शहरामध्ये देवू शकतो का? त्याचा जर व्यवस्थित खुलासा दिला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. संजय बठिजा ५.२५ वाजता सभागृहात प्रवेश केला.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. टाले साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सभागृहास माहिती देवू इच्छितो की, हे जे ट्रेड लायसन्स आहेत ते मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७६ नुसार दिले जातात. हे ट्रेड लायसन्स देण्यासाठी आम्हांस उपविधी तयार करणे जरुरीचे आहे. व आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, याअगोदर सुध्दा आपणांस सर्व सभागृहास विनंती केली होती हे जे उपविधी आहेत त्यांच्या मसुदयास अंतिम रुप देण्यासाठी सभागृहाची एक समिती स्थापन केली होती. व ती समिती नेमण्याचा आपण जो ठराव पारीत केला होता त्या हिशोबाने मला वाटते सहा महिन्यामध्ये या समितीने आपला

अहवाल दयावयास पाहिजे होता. व ते उपविधी राज्य शासनाच्या अंतिम मंजुरी नंतर अंमलता आणावयास पाहिजे होते. परंतु अदयापपर्यंत त्या उपविधींना मंजुरी मिळालेली नाही. मंजुरी मिळाल्यानंतर या शहरामध्ये जेवढे काही उदयोग व्यवसाय आहेत त्यांना परवाना दिला जाईल व आपण जी महसूलाची गोष्ट करत आहात , महसूल वाढविण्याचे प्रयत्न केले जातील.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-</u>या महासभेमध्ये ट्रेड लायसन्स बाबत पहिले विषय आणला होता. त्यामध्ये प्रशासनाच्या वतीने आम्ही उपविधी सुध्दा आणले होते तर त्यावेळेस या सभागृहात असे ठरले होते की, मा. महापौर महोदयाच्या अध्यक्षतेखाली एक समिती असेल त्यात सर्व गटनेते आहेत व प्रत्येक समितीचे सभापती आहेत. आता सभापती व गटनेते बदली झाले आहेत. त्याचा प्रारुप मसुदयास आयुक्त साहेबांकडून मंजुरी घेतली आहे. त्यांच्याऐवजी यांना समितीमध्ये घेवून सभेसाठी बोलाविले जावे. असा मसुदा तयार करुन उप-आयुक्त (मुख्यालय) जे आहेत ते या समितीचे सदस्य सचिव आहेत ते लवकरच या समितीची सभा बोलावणार आहेत. महापौर महोदयांकडे ती फाईल गेली होती.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आपण ही जी समिती स्थापन केली आहे तीची सभा झाली आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त):-</u>मी हे सांगु इच्छितो की, समिती स्थापन झाल्यानंतर तीची सभा झालेली नाही. ७ महिन्याअगोदर याबाबत ठराव झाला होता. व समिती स्थापन झाली होती. त्या समितीची सभा न झाल्यामुळे प्रशासनाने जे उपविधी तयार केले आहेत त्याच्यामध्ये समितीला जी काही सुधारणा करायची आहे. ती समितीची सभा न झाल्यामुळे आतापर्यंत सुधारणा करता आलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> ठराव काय म्हणतो की, सहा महिन्यामध्ये अहवाल दिला पाहिजे. आता सात महिने पुर्ण झाले. अदयापपर्यंत एक सुध्दा सभा झालेली नाही. तर आणखी सहा महिने लागतील काय?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>पुढील प्रश्न क्र. २१७ सुध्दा आपला आहे श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २१७:-</u> प्लॉट १५८ , पार्ट-८ ,९ ,१० , शिट ३४ कॅम्प नं. ३ येथिल कार्यरत असलेले कारखानदार यांचेकडे महानगरपालिकेने पाण्याचे नळ कनेक्शन दिले आहे काय? नळ कनेक्शन परवानगी दिली आहे काय ? कुठल्या नियमानुसार दिले आहे ? त्या व्यतिरिक्त अनाधिकृत नळ जोडणी असल्यास तोडण्याबददल काय कारवाई केली आहे?

<u>उत्तर :-</u> प्लॉट १५८ , पार्ट-८ ,९ ,१० , शिट ३४ कॅम्प नं. ३ येथिल कारखान्यांची पाहणी करण्यात आली. या ठिकाणी १५ कारखाने आहेत, या पैकी १३ कारखान्यांची नळ जोडणी परवानगी घेवून करणेत आलेली आहे व सदर जोडण्या बिगर घरगुती आहेत प्रत्यक्ष पाहणीत एकाच जोडणीतून पाणी पुरवठा चालु असल्याचे आढळून आले तरी सुध्दा नळ जोडणी विषयक कागदपत्रे सादर करणेविषयी संबंधीत कारखानदारांना नोटिस बजावण्यात आलेली आहे. अनाधिकृत नळ जोडण्या आढळून आल्यास तात्काळ खंडीत करणेत येतील.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>उत्तर ठिक आहे ना? प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

मा. महापौर :-आता थकले श्री. प्रमोद टालेजी ...................

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा. महापौरजी, सभासूचनेवरील कामकाज चालु होण्यापूर्वी, मा. महापौर,उप-महापौर,मा. आयुक्त, व सर्व सन्माननिय सदस्यांकडुन दोन गोष्टींबाबत अनुमती घेवू इच्छितो की, एकतर आमच्या भाभी श्रीमती निता प्रकाश अहूजा व आमच्या उप-महापौर श्रीमती जया साधवानीजी यांच्यामध्ये जे नाते संबंध जुळून आले आहेत, श्री. मोहन साधवानी यांची मुलगी व श्रीमती निता अहूजा यांचा मुलगा , यांचा विवाह निश्चित झाला आहे. त्या प्रित्यर्थ ते आपले तोंड गोड करु इच्छितात. व दुसरे असे की, दिवाळी निमित्त मी सुध्दा सर्व सदस्यांचे तोड गोड करु इच्छितो. सर्व सदस्यांना भेट वस्तु देवू इच्छितो. तर कृपा करून या दोन गोष्टीस सर्व सदस्य सर्वानुमते अनुमती देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

मा. महापौर :- ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. दिवाळीच्या शुभ प्रसंगी श्रीमती निता अहूजा व आमच्या भगिनी श्रीमती जया साधवानी या सर्वांचे तोंड गोड करत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- आणखी दोन आनंदाच्या गोष्टी सांगु इच्छितो, मा. सदस्य श्री. शांताराम निकम यांचा आज वाढदिवस आहे.

मा. महापौर :- हार्दिक शुभेच्छा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- तसेच श्रीमती निना नाथानी यांचा सुध्दा आज वाढदिवस आहे. त्याबाबत सुध्दा शुभेच्छा.

मा. महापौर :- त्यांना सुध्दा हार्दिक शुभेच्छा.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :-मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब काही दिवसापूर्वी आम्ही आपणांस एक निवेदन दिले होते की, लायन्स क्लब , पवई चौक, उल्हासनगर-३ येथे एक मोठे रुग्नालय आहे, एक अंतर्राष्ट्रीय संस्था आहे. त्यांच्या प्रवेशद्वारासमोर कुण्या व्यक्तीने चुकीच्या पध्दतीने बांधकाम नकाशा मंजुर करून घेतला होता व हा जो मुददा आहे तो हरकतीचा मुददा आहे तर मेहरबानी करून यास परवानगी दिली जावी. तर तो नकाशा महानगरपालिकेने रदद केला होता व परत तेथे आर.सी.सी. बांधकाम दिवस रात्र चालू आहे. व तेथील सर्व लोकांची व संस्थेची त्यास हरकत आहे. आम्ही लोकांनी लेखी पत्र सुध्दा दिले आहे की, त्यावर काही चर्चा केली जावी. तो बांधकाम नकाशा रदद झाल्यानंतर सुध्दा तेथे काम कसे चालु आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- या महासभेमध्ये ..............

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-मा. सचिव साहेब, श्री. अशोक ठाकुर यांनी जो मुददा उपस्थित केला आहे त्याबाबत जरा खुलासा दिला तर बरे होईल. त्यांनी असाच मुददा उपस्थित केला आहे की, एक बांधकाम चालु आहे पवई चौक येथे रस्त्याच्या बाजूलाच,त्याचे ना पुढच्या बाजूला ना इतर बाजुला काही मार्जिन आहे. व असे माहित पडते की, जो प्लॉन मंजुर केला आहे तो बेकायदेशीर आहे. त्याबाबतीत, कमीत कमी ते बांधकाम तरी बंद झाले पाहिजे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, प्रथम तर माझी अशी हरकत आहे की, हरकतीचा जो मुददा असतो तो सभागृहाच्या कामकाज पत्रीकेवर जे विषय असतात त्यांच्या बाबतीत असतो. व जर आपण असा विचार करत असाल की येथे जे काही बांधकाम चालु आहे त्याची माहिती आमच्याकडे असेल. व ती त्वरीत आम्ही आपणांस दिली पाहिजे. हे शक्य नाही.

मला प्रथम ती माहिती घ्यावी लागेल. जर आपणांस माहिती पाहिजे असेल तर या सभेनंतर कागदपत्र पाहून मी आपणांस माहिती देईन. परंतु माझी आपणांस विनंती आहे की, जे सभागृहाचे कामकाज आहे त्यावरच ही चर्चा झाली पाहिजे. हे जे आपण सांगितले आहे त्याची तपासणी करुन जर आपणांस हवे असेल तर सभेचे काम संपतात. माझ्या दालनात या. कागदपत्र पाहून मी आपणांस सांगेन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>आयुक्त साहेब हरकतीचा मुददा उपस्थित केला नाही केला परंतु अनाधिकत बांधकामावर चर्चा होती म्हणून त्यांनी हे केलेले आहे. प्लान नं नुसार आहे.

<u>मा. सदस्य श्री लाल पंजाबी :-</u> १३३ नुसार.........

<u>मा. सदस्य श्री धनंजय बोडारे</u> :- १३३ की काय . लायन्स क्लबच्या समोर आहे. याच्या सांगण्यानुसार महानगरपालिकेने एकदा अगोदर मंजुर केलेला नकाशा रदद केला आहे. आणि रदद केलेला प्लान अचानक कसा मंजुर झाला व त्याठिकाणी पुन्हा इमारतीचे बांधकाम कसे सुरू झाले ही त्यांची हरकत आहे. याबाबत त्यांनी व समोरच्या लोकांनी हरकत घेतली तेथे निर्दशने झालेली आहेत बाकी काही प्रश्न निर्माण होण्या अगोदर चौकशी करून सदया चौकक्षी पुर्ण होई पर्यंत काम बंद ठेवण्यात यावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर के सोनावणे):-</u> मा. महापौर महोदया जो प्लान एकदा मंजुर झाला पुन्हा रिओक झाला व पुन्हा मंजुर झाला हे कसे हे तर आपणा सर्वांना माहित आहे असे मला वाटते त्याहिशोबाने त्या नगररचनाकाराची आम्ही चौकशी ही सुरू केली आहे. त्यांनी जी अनियमीतता केली अहे त्याबाबत आम्ही राज्यशासनाकडे संचालक नगररचना यांचे कडे एक सविस्तर अहवाल आम्ही पाठविला आहे . होवु शकते हे ही यांचेच काम असु शकते हे मला पाहू दया नंतर.........

<u>मा. सदस्य श्री लाल पंजाबी</u> :- तो पर्यंत काम बंद ठेवा चौकशी करून

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर के सोनावणे)</u> :- चौकशी करू जर चुकीचे असेल तर काम बंद केले जाईल.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा)</u>:-या वेळेस दोन लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत पहिली लक्षवेधी आहे ॲन्थोनी नामक ठेकेदारास ठेका दिल्या नंतर शहरात साफसफाईची कमतरता आहे व उल्हासनगर शहरात डेंग्यु मलेरिया या आजारांची शक्यता वाढली आहे या विषयी काय उपाययोजना केली याबाबत आहे या लक्षवेधीचे सुचक आहेत श्री प्रमोद टाले व अनुमोदक आहेत श्रीमती प्रेमा खांडेकर व दुसरी लक्षवेधी आहे तीचे सुचक आहेत श्री राजेंद्र चौधरी व अनुमोदक आहेत श्री राज असरोंडकर ही लक्षवेधी याबाबत आहे की विकास आराखडयानुसार जे रस्ते तयार होत आहेत त्यामध्ये बाल्कनजी बारी येथील रोडबाबत काही अलाइन्मेन्ट आणलेली आहे. त्याबाबत याचा प्रश्न आहे व त्यावर आयुक्त साहेबां कडून त्यांना खुलासा पाहिजे या दोन्ही लक्षवेधी मा. महापौरांनी अस्विकृत केल्या आहेत व आयत्या वेळचे तीन विषय आहेत

<u>मा. सदस्य श्री रमेश चव्हाण</u> :-स्विकृत केली नाही म्हणजे अस्विकृत केल्या आहेत.

<u>मासदस्य श्री राजेंद चौधरी</u> :-अस्विकृत करण्याची कारणे काय आहेत?

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- डॉल्फीन क्लब बाबतची जी लक्षवेधी सूचना आहे ती विहीत केलेल्या वेळेत प्राप्त झाली नाही म्हणुन ती नाकारण्यांत आली. व दुसरी जी लक्षवेधी आहे डेंगु व मलेरिया या आजारां बाबत जी शंका व्यक्त केली जात आहे. त्याबाबत मागील महासभेत चर्चा झालेली आहे यावर पुन्हा चर्चा करणे योग्य नाही असे मा. महापौरांचे म्हणणे आहे. आदेश आहेत.
मागील वेळेस डेंगु वर चर्चा झाली होती .

मा. सदस्य श्री राज असरोंडकर :-एक ऑक्टोबर पासून तर कॉन्ट्रक्ट सुरू झाले.
मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे) :-मा. महापौर महोदया या ज्या दोन लक्षवेधी सूचना आल्या आहेत त्या बाबत सदनाचे असे मत होवु शकते की प्रशासन उत्तर देण्यास तयार नाही. परंतु मी आपणास एवढे सांगु इच्छितो की दोन्ही लक्षवेधींवर उत्तर देण्यास प्रशासन तयार आहे जर आपणास कायदयानुसार त्या घ्यायच्या असतील तर आपण त्या घेवु शकता घ्यायच्या नसतील तर निर्णय घेतला पाहिजे सदनाने निर्णय घेतला पाहिजे परंतु दोन्ही लक्षवेधींवर निवेदन करण्यास मी तयार आहे .

मा. सदस्य श्री रमेश चव्हाण :-महापौर महोदया आयुक्त साहेब निवेदन करण्यास तयार आहेत तर मग आपणास काय अडचण आहे ?

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- मा. महापौरांचे म्हणणे आहे की एकवेळ निर्णय घेतला तो घेतला त्यामध्ये काही बदल करता येणार नाही या शिवाय तीन आयत्यावेळीचे विषय आहेत त्यातील एक आहे तीनशे सफाई कामगार रोजंदारीवर घेणे कामी त्याबाबतचा प्रस्ताव आहे दुसरा प्रस्ताव आहे कामगारांना दिवाळीची भेट देण्यासाठी व तिसरा विषय आहे ३९ विंधन विहीरींवर जेट पंप बसविणेकामी १० टक्के रक्कम जी अपणास भरावयाची आहे त्याबाबत आहे आपणा सर्वांची सहमती असेल तर हे विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येतील . या विषयांना सामावून घेण्यासाठी मा. महापौरांनी समंती दिली आहे. ठिक आहे तिन्ही विषय घेतले जावेत?

मा सदस्य श्री राज असरोंडकर :-मा. महापौरजी ३०० सफाई कामगारांचा जो मुददा होता त्याचे काय?

मा . सदस्य श्री देवेंद्रसिंह खेमानी:-मा . महापौरजी हा जो जेट पंपचा विषय आहे तर कोण कोणत्त्या प्रभागामध्ये हे जेट पंप लागणार आहेत त्याची यादी सोबत दिलेली नाही .

मा . सदस्य श्री राज असरोंडकर :-विषय कमांक ९ अलग आहे काय

मा.सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-तोच विषय आहे विषय कमांक ९च आहे

मा.सदस्य श्री राज असरोंडकर :- आयत्यावेळीचा विषय कुठे आहे?

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-विषय कमांक ८ नंतरचा हा विषय असून त्याचा `गोषवारा या अगोदरच आपणास प्रस्तुत करण्यांत आलेला आहे. आयत्यावेळीच्या विषयांचा आजच्या सभेच्या कामकाजात समावेश केला जावा काय ? ठिक आहे ? आणखी एक जरूरी सूचना आहे उदया महापालिका कर्मचा-यांच्यावतीने येथे श्री सत्यनारायणच्या महापूजेचे आयोजन करण्यांत आले आहे आपणा सर्वांना आमंत्रित करण्यांत येत आहे आपण सर्वांनी येवून तिर्थप्रसादाचा लाभ घ्यावा. उदया महानगरपालिकेचा वर्धापनदिन सूध्दा आहे उदया सकाळी १० वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत कधीही आपण येथे तिर्थप्रसादाचा लाभ घेवू शकता याशिवाय आपल्या माहितीसाठी काही पत्रं

प्रस्ताव आपणास प्रस्तुत करण्यांत आले आहेत. नगररचनाकार याच्या अस्थाई पदास शासनाने जी मुदत वाढ दिली आहे त्याबाबतच्या पत्राची प्रत ही आपणास देण्यांत आली आहे तसेच महापालिका प्रेक्षकगॅलरीतील प्रवेशासंबंधि तयार करण्यांत आलेल्या विनियमांची प्रत ही आपणास देण्यांत आली आहे डेंग्युच्या आजाराबाबत काय उपाययोजना केली याचाही अहवाल आपणांस देण्यांत आला आहे. तसेच आणखी एक सूचना आहे माहितीच्या आधिकारा बाबत शासनाने आता जो कायदा तयार केला आहे त्याची सुध्दा आपणास सूचना देण्यांत आली आहे

पुढील विषय आहे

**विषय कमांक २:-** मागील सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत

<u>¼loZlk/kkj.k egklHkk fn- 19-9--2003 o R;kr LFkxu egklHkk fn- 29-9-2003 ½</u>

<u>मा. सदस्य श्री लाल पंजाबी :-</u> मा. महापौरजी व आयूक्त साहेब हा विषय खासकरून प्रभारी आयुक्त साहेबां विषयी मी येथे मांडत आहे प्रत्येक सभेचे आपण इतिवृत्त पाहिले तर आपणास असे दिसून येईल की आयुक्ताचे काहीना काही आश्वासन येत असते पुढील महिन्यात याबाबत आपणास उत्तर दिले जाईल किंवा कारवाई केल्याचे आपणास दिसून येईल आता बरेचसे प्रश्नपण चालु होतें कित्येक नगरसेवकाचे मनात असे प्रश्न येत होते की आयुक्त वारंवार जे आम्हाला आश्वासन देतात परंतु त्या आश्वासनांची पुर्तता होईल किवा नाही मागील वर्षाचे शेवटच्या महिन्यातील महासभेत आपण म्हंटले होते की आज पर्यत जी काही आश्वासने दिली आहेत त्याचे पुर्ततेबाबत पुढील महासभेत आपणास लेखी स्वरूपी माहिती दिली जाईल. पाहिजे तर याबाबतची इतिवृत्तांतातील नोंद मी आपणांस दाखवू शकतो. इतिवृत्तांताचे पृष्ठ क्र.१२ वर याची नोंद आलेली आहे की आपण म्हटले होते की, जो हरकतीचा मददा असतो, जे प्रश्न येतात, जे तहकुबीचे मूददे येतात, ज्या लक्षवेधी सूचना येतात, त्यांच्यावर जी काही आम्ही आश्वासने देतो त्याबाबतीत आपण आणखी एक आश्वासन दिले होते की, पुढील महासभेत म्हणजे आजच्या महासभेत या सर्वांबाबतची माहिती , या सर्वांबाबतचा अहवाल आपण या महासभेत ठेवाल, लेखी स्वरुपी, आपण लिहिले आहे की, लेखी स्वरुपी माहिती दिली जाईल. हे आपले इतिवृत्त आहे, पाहिजे तर मी आपणांस वाचून दाखवितो पृष्ठ क्र. १२ वर नोंद आलेली आहे. परंतु आतापर्यंत ते आम्हांस मिळाले नाहीं. व मला वाटते की, ब-याचवेळेस असे होते की, कधीकधी माझ्यासारख्या माणसाला वाटते की, महासभेत काही बोलणे, किंवा लक्षवेधी देणे याचे काही औचित्य रहत नाही. व असे वाटते की, आम्ही सारे सदस्य बरीचशी वेळ फुकट घालवित आहोत. व प्रशासन त्याबाबत माहिती देत नाही. मी असे म्हणतो की हा एक गंभीर असा मुददा आहे. विधानसभा किंवा लोकसभा यासारख्या प्रत्येक ठिकाणी विशेष करुन जी आश्वासने दिली जातात त्यांचा पाठ पुरावा केला जातो. परंतु ही पहिली महानगरपालिका आहे जेथे आम्हांस दिसते की, त्यांचा कोणत्त्याही प्रकारे पाठपुरावा केला जात नाही. यासाठी मी म्हणतो की, प्रशासन याबाबतीत गंभीरतेने घेत नाही. प्रशासनाची गंभीरता याकामी असली पाहिजे. नाहीतर सभेमध्ये बसण्यात कोणतेही औचित्य नाही किंवा कोणताही फायदा नाही असे आम्हांस वाटते.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब.........

<u>मा. महापौर :-</u> आयुक्त साहेब उत्तर देत आहेत. त्यांना प्रथम उत्तर देवू दया.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> त्याच मुददयावर मी बोलू इच्छितो, जसे आमचे सभागृह नेता शेवटी बोलतात. तसे आपण सुध्दा आम्हां सर्वांच्या नंतर बोलला तर बरे होईल. श्री. लाल पंजाबी यांनी आता जे सांगितले ते माझ्याच प्रश्नाच्या संदर्भात होते. मागच्या वेळेस मी जो प्रश्न विचारला होता त्याचे तुम्ही उत्तर

दिले आहे की येणा-या पुढच्या महासभेचे अगोदर त्यावर कार्यवाही केली जाईल. आणि आता नेमकी काय कार्यवाही केली किंवा नाही केली याचेपण जरा उत्त्तर मिळाले तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, त्यांनी सांगितले त्यात माझा एक मुददा राहिलेला आहे. तुम्ही मागच्या महासभेत सांगितले की, दुर्बल घटकातील कामे करतो, जी राहिलेले आहेत, समिती नेमली आहे. समितीचा अहवाल आला की कामे करतो. या सभागृहामध्ये तुम्ही सांगितलेले होते त्याचे काय झाले ? त्याचाही खुलासा करावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, माझ्या लक्षात आले नव्हते जे मी बोलणार आहे किंवा माझ्या जवळ जे उत्त्तर आहे जे मी देणार आहे, ते मी देत आहे. काही लोकांना एवढी सुध्दा सबुरी नाही . मी मागील महासभेमध्ये आपणांस सांगितले होते की, जी काही आश्वासने लेखी स्वरुपी दिली जातील, महासभेत दिली जातील, त्यांचे लेखी स्वरुपी आपणांस उत्त्तर दिले जाईल. आज जर आपण पाहिले तर डेंग्यु बाबत महानगरपालिका प्रशासनाने जी काही कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल आपल्या समोर ठेवला आहे. याबाबत आश्वासन आम्ही महासभेमध्ये दिले होते. एक सविस्तर अहवाल आपणासमोर येथे ठेवण्यांत आला आहे. ज्याबाबत कार्यवाही चालू आहे जसे की, प्रश्न क्र. १९७ व २१०, आपला एक प्रश्न होता मला वाटते की, श्री. प्रमोद टाले यांचा एक प्रश्न होता त्याबाबत सुध्दा कार्यवाही जी आहे, अधिका-यांचा जो अहवाल माझ्याकडे यायचा होता, तो अहवाला माझ्याकडे आता आला आहे. त्याचे फक्त नगररचनाकार यांचेकडुन फक्त छाननी करणे बाकी आहे. मला वाटते एक इमारत, शांतीनगर साईबाबा मंदिराशेजारी एका इमारतीचे जे काम चालु होते त्याबाबत तीन अधिका-यांची एक समिती स्थापन करुन त्याबाबत अहवाल घेतला जाईल, त्या समितीचा अहवाल माझ्या हाती आला आहे, व त्यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, फक्त अंतर्गत सजावटीचे काम केले आहे. अंतर्गत काही बदल केले आहेत. जास्त काही बदल किंवा चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले नाही. तो अहवाल माझ्याकडे आहे, परंतु या व्यतिरिक्त मला यावर नगररचनाकारांचे अभिप्राय पाहिजे होते. त्यामुळे मी याबाबतचा अहवाल सभागृहासमोर ठेवला नाही. दुसरा जो प्रश्न होता सफाई कामगारांच्या धोकादायक इमारतींबाबतचा त्याबाबतीत सुध्दा आराखडे व प्राकलने तयार केली आहेत. त्याबाबत कार्यवाही पुर्ण झाली नाही म्हणून सभागृहासमोर मी ठेवले नाही. खाडाबदली सफाई कामगारांबाबतचा एक प्रस्ताव आम्ही सभागृहासमोर आज आणला आहे. जर आपण तो पाहिला तर, तो प्रस्ताव सर्वांना वाटप केला आहे ना? तो प्रस्ताव आपल्या समोर , सभागृहासमोर आहे. २/११/१९९६ रोजी कायम सेवेत सामावून घेतलेल्या कर्मचा-यांना नियमित करण्याबाबतचा जो प्रश्न होता त्या कर्मचा-यांना नियमित नेमणूकीचा जो लाभ देण्यात आला होता त्यांच्याबाबतचा सविस्तर अहवाल उपायुक्त मुख्यालय यांच्याकडुन अदयाप माझ्याकडे आलेला नाही. त्यामुळे मी सभागृहासमोर ठेवू शकलो नाही. परंतु अंतरिम अहवाल जो आहे तो माझ्याकडे आहे. अंतरिम अहवाल दिल्याने आपले समाधान होणार नाही असे मला वाटते. त्यामुळे मी तो दिलेला नाही. व डेंग्युबाबत मी येथे सांगितले आहे. रस्त्त्यांना नावे देण्याबाबत असे सांगण्यात आले होते की, समितीची सभा झाल्यानंतर सभागृहासमोर विषय ठेवला जाईल. विषय पत्रिकेवर शेवटचा विषय जो आहे तो रस्त्त्यास नाव देण्याबाबतचा आहे. याव्यतिरिक्त पंजाबी साहेब जर आपणांस .............. या व्यतिरिक्त जर काही लेखी आश्वासन दिले असेल व त्याची पुर्तता झाली नाही तर तीही आम्ही करु. आपणांसमोर ठेवू परंतु असे नाही की आम्ही येथे काही सांगतो व करत मात्र काहीच नाही. एवढेच मला म्हणायचे आहे. शांतीनगर येथे जे हॉलचे बांधकाम चालले होते. त्याबाबतचा अहवाल आहे. त्यामध्ये दोन गोष्टी नमुद केल्या आहेत. शांतीनगर कल्याण अंबरनाथ रोड येथिल इमारतींची पाहणी केली असता पहिला मजला वापरात असून दुस-या मजल्यावर हॉस्पीटलचा वापर आहे. आणि तिस-या

मजल्यावर हॉटेल , निवासी व्यवस्था येथे नुतनीकरणाचे काम चालु आहे. या नुतनीकरणाच्या कामामध्ये निवासी खोल्या नुतनीकरण, टाईल्स बसविणे ,फर्निचर करणे, अंतर्गत सजावटी इत्त्यादी कामे अद्यापी सुरु आहेत. नुतनीकरणाशिवाय प्रत्यक्ष बांधकाम आढळून आले नाही. हा अहवाल आहे. यावर नगररचनाकारास लिहिले आहे की, नुतनी करणासाठी परवानगी आवश्यक आहे काय? ती पडताळून व जे काही काम तेथे चालू आहे बदलांचे, ते पण मंजुर नकाशाप्रमाणे आहे किंवा नाही. ही पाहण्यासाठी आम्ही नगररचनाकारांकडे पाठविले होते. त्यांचा रिपोर्ट जो आहे, नुतनीकरण व टाईल्स बसविण्यासाठी महापालिकेच्या परवानगीची आवश्यकता नाही. परंतु हा रिपोर्ट , नगररचनाकार रजेवर गेले आहेत त्यामुळे हा अहवाल अंतिमता नाही. कनिष्ठ अभियंत्त्याचा अहवाल आहे. व त्यावर पुर्ण विश्वास ठेवून आपणांस काही माहिती देणे हे मला योग्य वाटत नाही. यामुळेच मी तो सभागृहासमोर ठेवला नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> सन्माननिय आयुक्त साहेब, ज्यावेळेस हा प्रश्न सभागृहात आला त्यावेळस आमचा हाच आरोप होता की, तेथे हॉटेलचे व लॉजिंग बोर्डीगचे काम चालू आहे. आपल्या उपायुक्तांनी सांगितले की, तेथे कोणतेही काम चालु नाही मी स्वतः तेथे जाऊन आलो आहे. माझ्या क्षेत्रिय अधिका-यांकडुन मी अहवाल घेतला आहे. त्याचा अर्थ असा होतो की, त्यावेळस खोटे उत्तर या सभागृहास दिले. आणि त्या असे खोटे उत्तर देणा-या अधिका-यांचे तुम्ही चौकशी केल्यानंतर खोटे पाडतात. त्यांच्यावर नंतर प्रशासन काय कारवाई करणार आहे? दुसरी गोष्ट अशी की ती इमारत जर महानगरपालिकेची परवानगी घेवून बांधली असे आपले म्हणणे आहे तर जो ८० फुटाचा जो रोड तयार होणार आहे त्यामध्ये ती आर्धी इमारत का तुटते? जर महानगरपालिकेची परवानगी घेवून ती इमारत बांधली असेल तर ८० फुट रुंदीच्या रस्त्त्यामध्ये ती इमारत का बाधित होते हा प्रश्न येथे निर्माण होतो. याचा पण आपण जरा खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा. आयुक्त साहेब, आपण म्हणता मी जे बोलतो ते करतो. मागच्या तीन महासभेअगोदर मी आपणांस अनाधिकृत बांधकामाची एक लिस्ट दिली होती. तुम्ही काय म्हटला होतात की पुढच्या महासभेत मी याबाबत तुम्हांला सविस्तर माहिती देतो. काय दिले आहे साहेब तुम्ही आम्हांला? काय दिले आहे? आजपर्यंत किती महासभा झाल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे व्हावीत असे वाटते का तुम्हाला? तुमचा पाठिंबा आहे का त्यांना? त्या विशेष अधिका-यास कामावर रुजू होवून २० दिवस झाले त्यांनी काय काम केले? कुठले अनाधिकृत बांधकाम तोडले? त्यांच्यावर आपण महिन्याला ५० हजार रुपये खर्च करणार आहोत. हे कशासाठी चालले आहे सगळे त्याचा पण खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>अनाधिकृत बांधकामांची आम्ही जी यादी दिली तिच्यावर तुम्ही काय कार्यवाही केली? किती अनाधिकृत बांधकामे तोडली?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u> मी एक तक्रार केलेली आहे झुलेलाल मंदिराची. ते बांधकाम आपण एक वेळेस तोडले ते आता पुन्हा तयार होत आहे. त्यास जबाबदार कोण? मागच्या क्षेत्रनिरिक्षकांवर तुम्ही कारवाई केली त्यांना निलंबित केले. झोपडपटटीमध्ये टिअरगर्डरचे काम चालु असतांना त्याबाबतचा आरोप त्यांच्यावर ठेवून त्यांना तुम्ही निलंबित केले. मग या क्षेत्र निरिक्षकांवर का कारवाई नाही? यांचा आणि तुमचा काय संबंध आहे याचाही खुलासा व्हावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हा अनाधिकृत बांधकामांचा विषय आणि त्याबाबत जेवढे काही चिखल कोणी उडवू इच्छित असेल त्यांनी तो उडवावा. या शहरामध्ये मी आल्यानंतर ही समस्या निर्माण

झाली असे तर नाहीच आहे. मी मागील महासभेत असे म्हटले होते की, अनाधिकृत बांधकामे पुर्णपणे थांबाविली आहेत असा दावा तर आम्ही कधी केला नाही. परंतु आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, ९५ बांधकामांची माझ्याकडे यादी आली होती. प्रत्येक बांधकामास नोटिस देणे , सुनवाई देणे, व जर बेकायदेशीर असेल तर तोडणे ही कारवाई आम्ही सुरु केली आहे. आमचा हेतू नेक आहे हे यावरुन स्पष्ट होते की आम्ही अतिक्रमणे काढुन टाकण्यासाठी लष्करी सेवानिवृत्त अधिकारी , उप-आयुक्त पदाच्या संवर्गाचा येथे नियुक्त केला. मला वाटते की, आजपर्यंत असे कुणी केले नाही. इतकेच नाही तर प्रत्येक बांधकाम तोडु. आपणांस सबूरी घेण्याची गरज आहे. असे मला वाटते. आपण जी ९५ बांधकामांची यादी दिली आहे, त्या यादीतील बांधकामांबाबत आम्ही चौकशी सुरु केली आहे. आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, मागे आपण जो प्रश्न विचारला होता, त्यामध्ये ५६ बांधकामे अशी आहेत की, जी बांधकामे एकदा तोडल्या नंतर पुन्हा तयार झाली होती पुन्हा बांधकामे झाल्यामुळे ५६ मधील ४० बांधकामे आम्ही तोडली आहेत. सभागृहास मी नेहमी असे आश्वासन देवु इच्छितो की अनाधिकृतबांधकामा बाबत आम्ही कठोरात कठोर कारवाई करू, आम्ही कुणालाही सोडणार नाही. आपले या मध्ये समाधान होत नसेल तर त्या बाबत मी काही करू शकत नाही.

मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती दिपा पंजाबी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा.सदस्य श्री लाल पंजाबी:-</u>आपल्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो की जो मध्यवर्ती जकात नाका आहे तो स्थानांतरीत करण्याचे दोन वर्षापासून चालले आहे. १९ मे २००१ ला आपण सांगितले होते की मा. महापौरांचा आदेश आहे तर नाका स्थानांतरीत करा, दोन वर्षापुर्वी आपण म्हंटले होते की, एक आठवडयाच्या आत आम्ही मध्यवर्ती जकात नाका स्थानांतरीत करू परंतु तो अदयाप पर्यंत झाला नाही. आज दोन प्रश्न आले आहेत , दोन-दोन नगरसेवक प्रश्न देत आहेत. त्यांना सवलत दयायची की काय ? मागच्यावेळी आम्ही म्हटले होते की, यावर चौकशी झाली पाहिजे. परंतु ती आजपर्यंत होत नाही. ३ महिन्यापूर्वी आमच्या श्री. भुल्लर महाराज यांनी सांगितले होते की, एका जागेच्या ऐवजी दुस-या जागेवर बांधकाम होत आहे. आपण म्हटले होते की, लेखाधिका-यांकडील अहवाल आम्ही पुढील महिन्यात सादर करु. ३ महिने झाले तरी तो अहवाल आलेला नाही. फक्त अनाधिकृत बांधकामांबाबतच नाही तर कोणत्त्याही बाबतीत दिलेल्या आश्वासनांची पुर्तता होत नाही. मध्यवर्ती जकात नाक्याचे एक उदाहरण आहे. दोन महिन्यांपासून आपण त्यास स्थानांतरीत करु शकला नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, गोष्ट इथेच संपत नाही प्रत्येक सदस्यांनी वेगवेगळया सभेत वेगवेगळया प्रकारचे प्रश्न विचारले आहेत. व त्या प्रश्नांवर जी-जी आश्वासने दिली आहेत ते सदस्य त्याबाबत आयुक्त साहेबांना येथे आठवण करुन देत आहेत. जेव्हा आम्ही असे आरोप करतो की, तिथे कामे होत नाहीत तेव्हा आपण साध्यासरळ भाषेत सांगतात की, हा राजकियदृष्टीने प्रेरित असा आरोप आहे. परंतु येथे एखादा सदस्य उदाहरण देऊन सिध्द करुन दाखवत आहे की, आपण चार महिन्यापूर्वी पाच महिन्यापूर्वी जे आश्वासन दिले होते, त्याबाबत आपण काहीही कार्यवाही केलेली नाही. मला वाटते कदाचित माझा ४४ , ४५ क्रमांकाचा प्रश्न होता. त्याला जवळ जवळ एक वर्ष झाले असेल. त्या प्रश्नावर जेव्हा आयुक्त साहेबांनी उत्तर दिले होते, मी कर्मचा-यांच्या नेमणुकीबाबत प्रश्न विचारले होते. ४० पासून ते ४५ क्रमांकापर्यंतचे प्रश्न होते त्याबाबत असे सांगण्यात आले होते की आम्ही या पूर्ण प्रकरणांची चौकशी करु. सर्व कर्मचा-यांना एकसारखा न्याय देवू त्याचे काय झाले? त्याच्यावरती , त्या प्रकरणांमध्ये काडीचीही कार्यवाही झालेली नाही. अनाधिकृत बांधकांचा विषय सदस्यांनी काढला एकाही अनाधिकृत बांधकामांवर

कारवाई होत नाही. अशी अनेक उदाहरणे प्रश्नांमधुन त्यांनी समोर दिलेली आहेत. तुम्ही बाकीचे जे स्वतः, टॅंकरच्या बाबतीत , टॅंकरपुरवठयाच्या बाबतीत आयुक्त साहेबांनी स्वतः आपल्या स्वाक्षरीने वेळापत्रक तयार केले होते, कोणत्त्या दिवशी कोणत्त्या प्रभागात किती वाजता टॅंकर जाईल याचे वेळापत्रक होते परंतु त्या हिशोबाने एकही टॅंकर गेला नाही. एक दिवशीही त्या हिशोबाने टॅंकर गेला नाही. यांनी स्वतः जेव्हा हे अतिरिक्त आयुक्त म्हणून आले होते तेव्हा सफाईच्या बाबतीत एक यादी तयार केली होती की कोणत्त्या प्रभागात किती सफाई कामगार काम करतील? प्रभागामध्ये सफाईची जी पध्दत होती ती पुर्ण पध्दतच बिघडवून टाकली व यांनी जे वेळापत्रक तयार केले होते त्यानुसार सुध्दा काम झाले नाही. ही अतिशय साधी गोष्ट आहे की, राजकिय दुष्ट्या प्रेरित असे आरोप आहेत असे म्हणणे व सोडुन देणे. परंतु आम्ही यांना पत्रामध्ये सुध्दा लिहून दिले आहे, स्पष्टपणे आम्ही लिहून दिले होते की, जेव्हा आरोप होतात तेव्हा त्यावर त्वरीत अशी उपाययोजना केली जात नाही. कार्यवाही दाखविण्याचे सुध्दा प्रयत्न केले नाहीत. आपण कार्यवाही दाखवा. फक्त महासभेत गोष्टी करु नका की, प्रत्येकवेळेस म्हणता की मी हे करेन ते करेन, अधिका-यांनी आश्वासन दिले आहे ते आमचे अधिकारी करणार आहेतच , आता होणारच आहे. नंतर आता आश्वासनांवर एक समिती नेमावी लागेल की, आपण महासभांमध्ये जी आश्वासने दिली होती त्यांचे काय झाले? आता आपण डेंग्युबाबतचे आपण पत्र दिले आहे. व म्हणत आहात की डेंग्युबाबत मी फार चांगल्या प्रकारची माहिती आपल्या समोर आणली आहे. कुणी पत्रकारांना बोलावून सांगितले होते की, या शहरामध्ये डेंग्युचा रोगी आढळून आला आहे म्हणून ही सुरुवात कुणी केली होती? एक खाजगी डॉक्टराच्या अहवालानुसार , एक खाजगी डॉक्टर आपल्या दालनामध्ये येतो व म्हणतो की, माझ्या दवाखान्यामध्ये एक डेंग्युचा रोगी निधन पावला. आपण पत्रकारांना बोलावून सांगितले की डेंग्युच्या आजाराने एक रुग्ण निधन पावला.

मा. सदस्य श्री. वाघे शामु सभागृहातून बाहेर गेले.

<u>मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):-</u> महापौर महोदया, हरकतीचा मुददा आहे. मी यांना पुन्हा विनंती करेन की, नवाकाळ मध्ये जे वृत्त प्रसिध्द झाले आहे ते आपण पुन्हा वाचून पहावे. डेंग्युचा रुग्ण आहे, असे मी कधीच म्हटले नाही. एका खाजगी डॉक्टराने आम्हांला माहिती दिली आहे व ती माहिती मी पत्रकारांना दिली आहे. आपण जरा लक्षपुर्वक वाचत जा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u>आपण एक जबाबदार अधिकारी आहात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):-</u> खाली आरोप करण्यासाठी , आरोप करायचे असतील तर आपण करु शकता. त्यास मी उत्त्तर देवू शकणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> आपण एक जबाबदार अधिकारी आहात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):-</u> खाली आरोप करायचे असतील तर आपण करा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> आम्ही खाली आरोप करत नाहीत तर उदाहरणे देवून सिध्द करुन दाखवित आहोत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):-</u> आपण बोलत आहात, तर २/११/९६ चा अहवाल आपल्या हाती देवू का? आपणांस जर आरोप करायचे असतील तर मी आपल्या एका सुध्दा आरोपाचे उत्त्तर देणार नाही. लक्षपूर्वक ऐकून घेईन. आपल्या प्रत्येक आरोपाचे उत्त्तर शब्दाऐवजी कृतीतून दाखवून देईन.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते , त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आपण जेव्हा पण उत्तर दिले आहे ते योग्य पध्दतीने दिलेले नाही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:- आश्वासनांवर आश्वासन देवून, आयुक्त साहेब, निष्क्रीय प्रशासन, तुम्ही नुसते सांगता की,

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- निष्क्रिय आयुक्त .................

मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):- माझा पुन्हा हरकतीचा मुददा आहे, माझ्या निष्क्रियतेबददल बोलण्यास आपणांस काही अधिकार नाही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-प्रशासन आश्वासने देते व त्याची पुर्तता होत नाही. ही निष्क्रियता नाही तर काय आहे?

मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):- माझ्या निष्क्रियतेबददल बोलण्याचा आपल्याला काही अधिकार नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-जर अशा निष्क्रीयतेच्या गोष्टी करत राहिलात तर आम्ही सुध्दा ब-याचश्या गोष्टी याबाबत करु शकतो. येथे इतिवृत्तांताची गोष्ट चालू आहे, इतिवृत्तांतावर आपण बोला ना?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आपण सुध्दा करा, आम्ही सुध्दा करतो.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- मागील सभेत जे बोलले गेले आहे, त्याची इतिवृत्तांतात बरोबर नोंद आली आहे किंवा नाही? याबाबत आपणांस बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-वर्तमानपत्रात आपण मुलाखत देता. त्यात असे म्हणता की, यांची कामे मी करत नाही त्यामुळे यांचे वैयक्तीक हितसंबंध दुखावतात. सांगा आम्ही कोणती वैयक्तीक कामे तुमच्याकडे आम्ही सांगितली होती? कोणत्त्या इमारतींच्या बांधकाम परवानगीसाठी तुमच्याकडे आलो होतो.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-आपणांस कोणी असे म्हटले आहे का आपणांस कोणी असे बोलत थोडे आहे? ना आम्ही बोलत आहोत, ना आयुक्त साहेब बोलत आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-वर्तमानपत्रामध्ये यांनी निवेदन दिले आहे की यांची मी वैयक्तीक कामे करत नाही त्यामुळे त्यांचेशी हितसंबंध खराब होत आहेत. हे बोलण्याचा अधिकार यांना आहे का? तर मग निष्क्रीय बोलण्याचा अधिकार आम्हांला नाही का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. विरोधी पक्ष नेत्त्यांना मी विनंती करतो की, आता श्री. राज असरेंडकर हे जे बोलत होते, एक-एकास बोलु दया. त्यांना त्यांचे बोलणे पुर्ण करु दया.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- एक-एक करुनच बोलत होतो ना? माझे बोलणे मध्येच का थांबविले?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- आमच्या लोकांनी नाही थांबविले. आपल्याच लोकांनी थांबविले. आपले पाच-सहा लोक बोलण्यास उभे होते त्यानंतर श्री. दर्शनसिंग खेमाणी बोलले.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-ते लोक तर पहिल्यापासूनच उभे होते.

मा. प्रभारी आयुक्त (आर.के. सोनवणे):-महापौर महोदया, माझा हरकतीचा मुददा आहे. महापौर महोदया, इतिवृत्त कायम करायचे किंवा नाही हा मुददा आहे. आम्ही काय केले , काय नाही केले.............

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते , त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- इतिवृत्तांतावरच आम्ही बोलत आहोत.

मा. महापौर :- सर्व सदस्य असे उभे राहून बोलू लागले तर कोण काय बोलत आहे हे कसे समजून येईल? आम्ही काय ऐकायचे आणि काय समजायचे?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-महापौर महोदया, आम्ही इतिवृत्तांतावरच बोलत आहोत.

मा. महापौर :- एक-एक सदस्यांनीच बोलावे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- काय एक-एक सदस्य ...............

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी श्री. राज असरोंडकर यांना विनंती करतो की, चार महिन्यापुर्वीचा, सहा महिन्यापुर्वीचा , आठ महिन्यापुर्वीचा मुददा आपण येथे आणु नका. मागच्या महिन्यामध्ये सभेत काय झाले त्यावर बोला.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:- त्या महासभेच्या इतिवृत्तांत लिहिले आहे की पुढील महिन्यात याबाबत लेखी स्वरुपात अहवाल देवू.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- जर काही आश्वासन दिले असेल तर काही कारणामुळे उशिर झाला असेल तर ते मान्य करत आहेत ना?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आपण वकिली करु नका.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- नाही वकिली नाही करत,मी म्हणत आहे की, सभेची वेळ आपण फुकट घालवू नका. सभेची वेळ व्यर्थ जात आहे काही कामकाज होत नाही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-आमचाही वेळ व्यर्थ जात आहे, सभेत जी आश्वासने दिली जातात त्यावर कार्यवाही होत नाही.

मा. सदस्या श्रीमती किरण माने :-आयुक्त साहेबांना उत्तर देवू दया ना तुम्हांला का राग येतो?

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते , त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- मा. महापौर महोदया, सविस्तर चर्चा झाली पाहिजे. इतिवृत्तांतावर चर्चा होत आहे, श्री. राज असरेंडकर बोलत आहेत. एक-एक सदस्यांनी बोलावे. सविस्तर चर्चा व्हावी असे आम्हांलाही वाटते.

मा. सदस्य श्री. राज असरेंडकर :-परंतु चर्चा केल्यानंतर त्यातून परिणाम काहितरी निघाले पाहिजे ना? खाली चर्चा करुन फायदा काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- गोंगाट करुन जर वेळ घालविली जात असेल तर हे चुकीचे आहे. एक-एकाने सविस्तर चर्चा करावी. होवू शकते की आपल्याकडुन सुध्दा अशया काही चांगल्या सुचना येतील ज्यामुळे प्रशासन अधिक कार्यक्षमपणे कार्य करेल. जे आपल्या शहराच्या हिताचे असेल गोंधळ करुन वेळ फुकट घालवू नये. कृपया एक-एकाने बोलावे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राज असरेंडकर :- महापौर महोदया, आयुक्त महोदयांनी सांगितले की, येथे आरोप होत आहेत. कुणास माझ्या निष्क्रियतेबाबत बोलण्याचा अधिकार नाही. मला बरोबर आठवते की काही दिवसांपूर्वी आठ-पंधरा दिवसांपूर्वी, महाराष्ट्र टाईम्स मध्ये त्यांची एक मुलाखत आली होती. त्यात त्यांनी म्हटले होते की, काही सदस्यांचे हितसंबंध माझ्याकडुन जे दुखावले गेले आहेत किंवा त्यांनी जी काही बेकायदेशीर कामे मला सांगितली होती. की जी मी केली नाहीत म्हणून ते माझ्या विरोधात मोहिम चालवत आहेत या महासभेमध्ये आमचे यांना पुर्णपणे आव्हान आहे की कोणत्त्या कामामध्ये आमचे हितसंबध दुखावले गेले आहे व कोणती बेकायदेशीर कामे आम्ही आपणांस सांगितली आहेत जी आपण केली नाही. व ज्या कारणामुळे आम्ही दुःखी झालो. व आपणाविरोधात मोहिम चालविण्यास मजबूर झालो, त्या कामांची यादी आपण या महासभेमध्ये , जर आपणामध्ये हिंमत असेल तर आपण सांगा. नाहीतर आमच्याकडे आपली फार मोठी श्वेतपत्रिका आहे आम्ही सुध्दा आपल्या विरोधात मोहिम काढू शकतो. आम्ही ती तर काढणारच आहोत. फक्त काढु शकतो एवढया पुरतीची गोष्ट नाही. अशा प्रकारची प्रतिक्रिया काही सदस्यांकडुन का येते? याबाबत आपण ब-याच अगोदर आत्मचिंतन करावयास पाहिजे होते. परंतु त्यानंतरही जेव्हा कोणताही सदस्य उभा राहतो. जेव्हा महसूल समितीचा विषय आला होता. तेव्हा आमचे श्री. जमनादास पुरस्वानी त्यांनी म्हटले होते की............

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- मा. महापौरजी, ही इतिवृत्तांतावर चर्चा होत आहे का? नाही हे चुकीचे आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोरात बोलत होते , त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-मुददयावर चर्चा करा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ऐकणारे ऐकत आहेत आपणांस काय त्रास होत आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-सभासुचनेवरील विषयांवर चर्चा करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- गटनेते श्री. राज असरेंडकर यांना मी पुन्हा एकदा विनंती करतो की, वर्तमानपत्रांमधील बातमीचा उल्लेख महासभेमध्ये करु नये.

मा. सदस्य श्री. राज असरेंडकर :- वर्तमानपत्राचा उल्लेख , जेव्हा आपणांस जरुरत पडते आयुक्तांना टार्गेट करण्यासाठी तेव्हा करु शकता?

मा. महापौर :- मी सर्व सदस्यांना सांगु इच्छिते की, महासभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणासर्वांना एकमेकांशी सहकार्य करूनच चालवायचे आहे. असे भांडत राहिलात तर अशाप्रकारे थोडेच महासभेचे कामकाज चालते?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-मा. महापौरजी, इतिवृत्तांच्या पृष्ठ क्र. ११३ वर आमचे मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी म्हटल्याची नोंद आलेली आहे की, ते जे काही बोलतात, ते आयुक्तांनी ऐकावे एवढीच त्यांची अपेक्षा आहे. तर मग आम्ही का ऐकायचे? ११३ क्रमांकाचे पृष्ठ काढा त्यावर अशी नोंद आली आहे की, आमच्या नेत्त्या श्रीमती ज्योती कालानी यांनी म्हटले की, आपण हिंदीत बोला. तर ते म्हणतात की नाही मी बोललो आहे, ते मा. आयुक्त साहेब समजले एवढीच माझी अपेक्षा आहे. इतरांना समजो अगर न समजो. आम्ही आपल्या बाहेरच्या गोष्टी का ऐकून घ्यायच्या?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-आपण बाहेर फिरून या ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-आम्ही का फिरून यायचे? आपण तासभर बोलत रहाणार? आपण इतिवृत्तांतावर बोला आम्ही सर्व ऐकण्यास तयार आहोत. इतिवृत्तांतावर बोला आम्ही चार तास ऐकुन घेण्यास तयार आहोत. बाकी आपल्या कथा-कहान्या ऐकण्यासाठी आम्ही येथे आलेलो नाहीत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-श्री. दर्शनासिंगजी आपण पृष्ठ क्र. १२ काढा. आपणांस वाटते ना की, इतिवृत्तांतावर बोलत नाहीत. श्री. सोनवणे साहेब, बोलत आहेत. आयुक्त साहेब बोलत आहेत की, आजतागायतच्या महासभेत जी आश्वासने दिली आहेत जी चर्चा झाली जी प्रशासनाकडुन उत्त्तरे दिली गेली त्यावर कार्यवाही केली गेली नाही. ही दुर्भाग्याची गोष्ट आहे परंतु यापुढे आजपर्यंत आम्ही सभागृहात जेवढी काही आश्वासने दिली आहेत त्याबाबत एक सविस्तर टिप्पणी येणा-या महासभेत , येणा-या महासभेत म्हणजे कोणत्त्या? आजच्या महासभेत , येणा-या महासभेत आम्ही सभागृहासमोर ठेवू, ठेवले आहे का ते? आजपर्यंत किती आश्वासने दिलीत? तर तेच विचारत आहे, काय झाले त्याचे? हे इतिवृत्त कायम करण्याचा अर्थ काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-आपण जे बोलत आहात ते बरोबर आहे. परंतु श्री. राज असरोंडकर हे मुददा सोडुन बोलत आहेत. वारंवार ते विषयांतर करत आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- महापौर महोदया, मी कुठेही मुददा सोडुन बोलत नाही. जसे श्री. खेमाणी साहेबांना वाटते की येथे काही सदस्यांनी बोलत रहावे आम्ही ऐकत रहावे त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. हीच भावना आमची पण आहे.

मा.सदस्य श्री देवेद्रसिह खेमाणी :- परंतु त्यांनी मुददयावर बोलावे, इतिवृत्तातावर बोलले तर चार तास काय आम्ही आठ तास ऐकण्यास तयार आहोत परंतु वर्तमानपत्रामध्ये ज्या काही गोष्टी छापून येतात त्या ऐकुन घेण्यास तयार नाहीत.

मा.सदस्य श्री राज असरोंडकर :- दुःख तर या गोष्टीचे आहे की उक्ती व कृती मध्ये अंतर आहे, त्यानी म्हंटले की आम्ही चर्चा ऐकुन घेण्यास तयार आहोत. आयुक्त साहेब प्रत्येक सभेत प्रत्येक मुददयावर नवीन नवीन आश्वासन देत राहतात व प्रत्येक सभेत आम्ही येथे बसुन म्हणतो की पास, पास. आपण कराना पास, आपणाला तर याची सवय आहे. आम्हाला या गोष्टींची सवय नाही. हे मी आपणांस सभेत स्पष्ट करून देतो की, आपली या महापालिकेत सत्त्ता चालविण्याची जी कार्यपध्दती आहे त्या कार्यपध्दतीशी आम्ही सहमत नाही व

आपण या महापालिकेत अशा प्रकारच्या प्रशासनास पाठिंबा दिला तर ते या महापालिकेच्या व शहराच्या हिताचे नाही. यामध्ये शहराचेच नुकसान होत आहे. पुढे जावुन हे नुकसान आम्हाला सुध्दा भोगायचे आहे. आम्ही देखिल याच शहरात राहतो. आम्ही या महासभेत सदस्य म्हणुन बसलो आहेत, आम्हाला बोलण्याचा शौक आहे यासाठी बोलत नाही आहोत. कधी कधी असे भाष्य करता की, यांना बोलायचेच आहे. तसे नाही आहे. येथे मी ज्या मुददयांवर बोलत आहे ते माझ्या प्रभागाशी संबधित नाहीत, तर शहराशी संबधित आहेत. मी सभागृह नेता यांच्याकडुन परवानगी घेवु इच्छितो की शहरातील मुददयांवर मी बोलु इच्छित आहे. येथे आयुक्त साहेबांना असे वाटत असेल की, त्यांनी हे केले आहे, ते केले आहे, श्री धनंजय बोडारे यांनी सांगितले की, पृष्ठ क्र १२ वर त्यांनी काय काय बोलल्याची नोंद आलेली आहे. तर ती टिप्पणी कुठे आहे. येणा-या महासभेत आपण टिप्पणी देणार होतात, ती टिप्पण कोठे आहे? ती या महासभेत आमच्या समोर आहे का? आपण दोन चार मुददे असे फिरवता की, यामुळे आम्ही गप्प बसु का? आम्ही येथे कुठेही, उदाहरणे दयायची झाली तर बरीचशी आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> मा महापौर महोदया आम्ही सांगितले होते की, प्रत्येक आश्वासनाबाबत आपणांस लेखी स्वरुपात माहिती देवु. परंतु आज ज्या दोन गोष्टी आपल्या समोर आलेल्या आहेत मी अगोदरच आपणांस सांगितले की, डेंग्युच्या बाबतीत मी आपणांस आश्वासन दिले होते, त्याबाबत विस्तृत अहवाल आपल्या समोर आलेला आहे. खाडाबदली कामगारां बाबत विस्तृत अहवाल आलेला आहे. जी गोष्ट अदयाप अपुर्ण आहे, त्याचा अहवाल आपल्या समोर आणणे मला उचित वाटले नाही त्यामुळे त्याचा अहवाल मी आपल्या समोर आणलेला नाही. जर आपणांस सदयस्थितीचा अहवाल हवा असेल, व तो अर्धवट हवा असेल तर तो देखिल मी आपल्या समोर ठेवेन. जे काम होत आहे, होत नाही त्याबाबतची माहिती सभागृहासमोर ठेवणे मला काही चुकीचे वाटत नाही. परंतु फक्त हे जे येथे लिहिले आहे त्याबाबत कोणी म्हणेल निष्क्रिय आहेत, आश्वासन देतात पण काम नाही करत, तर वस्तुस्थिती जी आहे ती सभागृहासमोर ठेवली जात नाही. यासाठी मी तर एक टप्पा आणखी पुढे जावुन आपणांस सांगु इच्छितो की, आपणा कडुन जी पत्रे येतात व त्याबाबत जर आपणांस लेखी स्वरुपी सांगितले जात असेल की, हे काम केले जाईल, जेवढी कामे झाली आहेत, त्याबाबत सुध्दा प्रशासकीय अहवाल जो आहे त्याच्या माध्यमातुन आम्ही आपल्या समोर येवु. मी ना आजपर्यंत कोणती गोष्ट लपवुन ठेवण्याचा प्रयत्न केला आहे ना कधी जी गोष्ट झाली नाही तिची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला आहे. जर झाले नसेल तर आम्ही खरे ते सांगितले आहे की, अशा अशा कारणांमुळे ते होवु शकले नाही. जर आमच्या अधिका-यांकडुन काही चुक झाली असेल तर त्याची जबाबदारी देखिल मी माझ्यावर घेतलेली आहे. या नंतरही जर सभागृहास वाटत असेल की, मी काही करत नाही, फक्त बोलतो तर मला असे वाटते की, हा माझ्यावर फार मोठा अन्याय आहे. यामुळे मी सभागृहास आता अशी विनंती करेन की, येथे महापालिका अधिनियमामध्ये एक तरतुद आहे जी महापालिकेच्या प्रशासना बाबतीत किंवा एकुण कारभारा बाबतीत जसे की एक गोष्ट मी सभागृहात सांगितली होती की, मध्यवर्ती जकात नाका सात दिवसांमध्ये स्थलांतरित केला जाईल, तर ते होवु शकले नाही एक सदस्य आहे मी आता नाव पाहिले नाही, परंतु त्यांनी असे का झाले नाही ही गोष्ट प्रश्नाच्या माध्यमातुन विचारलेली आहे. ते कलम आहे ४४. हा एक मार्ग आहे. जर झाले नसेल, का झाले नाही, तर याचे उत्तर सुध्दा आपणांस दिलेले आहे. परंतु आपण ते पाहिलेले नाही. आजच्या महासभेत ते आपणांस वितरीत करण्यात आलेले आहे. नंतर याबाबतीत विस्तृत उत्तर दिले जाईल. आपणांस सांगितले जाईल, का होत नाही? आपल्या हातात शस्त्र काय आहे, कलम ४४ अनुसार प्रश्न विचारणे. याशिवाय माझी सभागृहास एक विनंती आहे. मी तर आज प्रभारी आयुक्त आहे. शासनाने काही दिवसांसाठी नेमणुक केलेली आहे. व आपण माझ्या या कामाबाबत सुध्दा संतुष्ट नसल्यास तर कलम ३६ नुसार, त्यामध्ये लिहलेले

आहे की, जर सभागृहास वाटत असेल की, आयुक्त अकार्यक्षम आहेत तर माझी सभागृहास विनंती आहे की, आपण निश्चित करावे की मी कार्यक्षम आहे की अकार्यक्षम आहे. मी काही कामे करताना चुकीचे केले असल्यास  अथवा बरोबर केले आहे. याबाबतीत सभागृहाने कलम ३६ नुसार निर्णय घेतल्यास, ठराव पास केल्यास  मी एक मिनीट सुध्दा, या शहरात आयुक्तच काय पण अतिरिक्त आयुक्त म्हणुन देखिल काम करण्यास तयार नाही. हे मी सभागृहास सांगु इच्छितो. मी माझ्या कोणत्त्या वैयक्तिक हेतुसाठी या शहरात आलेलो नाही. जर आपणांस कोणासही वाटत असेल की मी वैयक्तिक हेतुसाठी आलो आहे तर हे देखिल आपण ठरवा. जर असे काही असेल तर मी येथे राहु इच्छित नाही. म्हणजेच काम होत नसेल तर मी स्वतः जबाबदारी घेतो. ते पाहतो काम कसे होईल. व जर आपली अनुमती असेल तर पुढील महासभेत हे देखिल सांगेन की, पाण्याची समस्या या शहरामध्ये मी सांगण्याची आवश्यकता नाही, आपणा सर्वांना माहिती आहे, असे काही विभाग होते की, जेथे जेथे १०-१० वर्षांपासुन पाणी येत नव्हते. जेथे देखिल मी जात होतो, आपल्या पैकी काही सदस्य माझ्या सोबत असायचे, तेथे काही महिला डोळयात पाणी आणुन सांगायच्या की, १० वर्षांपासुन पाणी येत नाही, १२ वर्षांपासुन पाणी येत नाही, ५ वर्षांपासुन पाणी येत नाही व आम्ही तेथे आश्वासन देत होतो की, २ महिन्यांमध्य, ३ महिन्यांमध्ये पाणी येईल. व याबाबतीत तेथील जनतेला विचारा आम्ही ती आश्वासने पुर्ण केली आहेत अथवा नाही? आम्ही जनतेस दिलेली किती आश्वासने पुर्ण केलेली आहेत. या उपरही आपणांस वाटत असेल तर कलम ३६ मधील तरतुदीनुसार आपणाकडे अधिकार आहे, आपण ठरवा, की, मला येथे रहायचे आहे की नाही. आपण जर निर्णय घेतला तर मी एक मिनीट सुध्दा या शहरामध्ये राहणार नाही.

<u>मा. सदस्य श्री देवेंद्रसिंह खेमाणीः-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब मी हे सांगु इच्छितो की, आपल्या आदेशानुसार मी एक सुचना देवु इच्छितो की, प्रशासनाद्वारे महासभेत जी आश्वासने दिली जातात तर त्यांची एक स्वतंत्र यादी तयार केली पाहिजे की, अशी अशी आश्वासने दिलेली आहेत. त्यासाठी किती वेळ घेतलेला आहे. पुढील महासभेपर्यंत आहे किंवा २ दिवसांची वेळ घेतलेली आहे. अशाप्रकारची एक यादी तयार केली जावी व त्या बाबतीत कार्यवाही केली जावी. कारण की हे जे ५०-१०० पानांचे इतिवृत्त आहे त्यामध्ये आश्वासने हरवली जातात. तर माझी अशी एक सूचना आहे की, एका पानावर सारांश रुपाने आश्वासनांची यादी दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री दिलीप लालवाणीः-</u> मा. महापौर महोदया आयुक्त साहेबांनी जड अंतःकरणाने त्यांची जी व्यथा प्रकट केली आहे, तर आमचा त्यांच्यावर पुर्ण विश्वास आहे. त्यांच्या निती व नियतीबाबत आम्हांस कोणताही संशय नाही. आज २०/२/२००३ आपण प्रभारी आयुक्त म्हणुन कार्यभार सांभाळला व आज आपणांस आठ महिने पुर्ण झालेले आहेत. आम्ही आपणांस आठ वर्षांपर्यंत या शहरात पाहु इच्छितो, जर आपण असे बोलाल तर आम्हांस दुःख होईल. सभागृहातील सर्व सदस्य मग ते विरोधी पक्षातील सदस्य असले तरी, ते या शहरातील समस्यांसाठी आपणाशी संघर्ष करीत आहेत. व आपण स्वतः म्हटले आहे की, जे सदस्य आपल्या शहरातील समस्यांसाठी माझ्याशी संघर्ष करतात ते नगरसेवक मला प्रिय वाटतात. आपल्या अशा भावनांची मी कदर करतो व जर कोणत्त्या सदस्याने मला असे वाटत नाही की, कोणा सदस्याने जाणता अजाणता आपले मन दुखावण्याचा प्रयत्न केला असेल तर तो त्यांच्या मतदात्त्यांशी प्रामाणिकता दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. समस्यांबाबत संघर्ष करुन मतदारांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपणांशी कोणत्त्याही प्रकारचा वैयक्तिक द्वेष नाही, अशा प्रकारची भावना जर आपल्या मनात असेल तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा गटनेता व या महापालिकेत एक स्वीकृत सदस्य म्हणुन आपल्याला निवेदन करतो की, ही भावना आपल्या मनातुन काढुन टाका. कारण हे सर्व सदस्य, मग ते सत्त्ताधारी पक्षातील असोत अथवा विरोधी पक्षातील आपण सर्वांसाठी माननीय

आहेत व अशा प्रकारे जड अंत:करणाने आपण बोलत असाल तर आमच्या मनालाही वाईट वाटते. धन्यवाद !

मा. सदस्य श्री लाल पंजाबी:- मा. महापौरजी आयुक्तांनी जी भावना प्रकट केली आहे, त्यांनी एक भावनात्मक असे भाषण दिले आहे. तर मी सांगु इच्छितो की, आपल्या या भावनात्मक भाषणाने आपण मुददे दाबुन टाकु शकत नाही. आपण त्या कलमाबददल आम्हाला जे सांगितले तर आम्हाला ते माहित आहे. आम्हाला हे देखिल माहित आहे की आमच्याकडे बहुमत नाही. तर आपण त्या कलमाचा उल्लेख सुध्दा करु नका. आपल्या या दबावाच्या राजकारणाने आम्ही दबुन जाणार नाही. आमचा फक्त एकच मुददा आहे की या सभागृहात जी काही आश्वासने दिली जातात, तर त्यांची पुर्तता झाली पाहिजे. हे जे सदस्य बसलेले आहे ते फक्त असे नाही की आपले भाषण ऐकुन निघुन जातील. जी काही आपण आश्वासने देता, एक तर आपण सभागृहामध्ये आश्वासने देवु नका, किंवा आश्वासने देत असाल तर त्याची पुर्तता करणे हे आपले कर्तव्य आहे. आम्ही येथे आपले भावनात्मक भाषण ऐकण्यासाठी येत नाही तर काम पाहण्यासाठी येतो. मी जसे आपणांस सांगितले की, तीन महिन्यानंतर, ऑगस्ट महिन्यानंतर, मे २००१, दोन वर्षांपूर्वी कोणताही महापौर आश्वासन देत असेल, आयुक्तांना निर्देश देत असेल. . . . .

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- मा महापौर महोदया मे २००१ मध्ये मी येथे नव्हतो.

मा. सदस्य श्री लाल पंजाबी:- आपल्या कार्यकालाकडे देखिल मी येतो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- जे काही बोलायचे आहे ते माझ्या कार्यकालावधी बाबत बोला.

मा. सदस्य श्री धनंजय बोडारे:- आम्ही तुमच्याकडे सोनवणे म्हणुन नाही तर आयुक्त म्हणुन उत्तर मागत आहोत. मागच्या आयुक्तांनी काय केले?

या वेळी काही सन्माननीय सदस्य एकाच वेळ जोरजोरात बोलत होते, त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री लाल पंजाबी:- २० ऑगस्टच्या सभेमध्ये आपण प्रभारी आयुक्त म्हणुन उपस्थित होते ना, २० ऑगस्टच्या सभेचे इतिवृत्त काढुन पहा, आपण बोलला होतात की, एका आठवडयाच्या आत जकात नाका स्थलांतरित केला जाईल, आतापर्यंत झालेला नाही. ऑगस्टच्या सभे अगोदर जुलैच्या सभेत आपण म्हणाले होते की, श्री भुल्लर यांनी जो एक मुददा उपस्थित केला होता, श्री. हजारेंच्या बाबतीत, त्याबाबत आपण म्हटला होतात की, पुढील महासभेत अहवाल येईल, ३ महिने झाले परंतु तो अदयाप आलेला नाही. असे बरेचशे मुददे आहेत. मी आपणांस सांगितले तर आणखी १० मुददे आहेत. आपण फक्त २ मुददयांबाबत माहिती दिलीत. डेंग्यु व खाडाबदली कामगारांबाबतचे. बरेचसे मुददे येतात आपण दुस-यांची जबाबदारी स्वत:वर घेतात, परंतु प्रशासनाचे प्रमुख या नात्याने आपली जबाबदारी आहे की जे आश्वासन दिले जाते त्याची पुर्तता केली पाहिजे. नाहीतर आपण आश्वासन देण्याचे बंद करा. आपल्याबददल बरेचसे लोक असे म्हणतात की, हे जे आयुक्त आहेत ते आश्वासन सम्राट आहेत. वारंवार आश्वासने देत राहतात, परंतु त्यांची पुर्तता झाली पाहिजे. नाहितर आम्ही आपले ऐकणार नाही.

मा. सदस्या श्रीम. भारती छाब्रिया सभागृहातून बाहेर गेल्या.

*<u>मा. सदस्य श्री धनंजय बोडारेः-</u> आयुक्त साहेब आपण या ठिकाणी भावना व्यक्त केली, की हे हे कलम आहे. ते सर्व माहिती आहे. आणि तुम्हाला ही माहिती आहे की त्याच्या पुढे काय आहे. तर त्याचे उत्तर श्री दिलीप लालवाणी यांनी दिले आहे. आणि हे अपेक्षित होते तुमच्याकडुन पण एखादा माणुस, एखादा नगरसेवक या ठिकाणी आपण दिलेल्या आश्वासनांची पुर्तता होत नाही याची तुम्हाला जाणीव करुन दिल्यानंतर तुम्हाला वाईट वाटायला नको. तुम्हाला त्याचे वाईट वाटले. तुम्ही आश्वासनांची पुर्तता करत नाही म्हणजे तुम्ही कियाशील नाही, म्हणजेच निष्क्रिय आहात. त्याबाबतीत तर निष्क्रिय झालात की नाही आता येथे मोठी यादी आहे. अनधिकृत बांधकामाबाबतची सभा ७/७/२०००३ ला बोलावली, त्या सभेत तुम्हाला सांगितले होते की, तुम्हाला माहिती नाही म्हणुन आम्ही तुम्हाला ही यादी देत आहोत. त्यावर कारवाई काय करणार ते करा, किती वेळ लागेल? तुम्ही सांगितले होते की, एक महिना लागेल, लवकर कारवाई करतो. कायदेशिर असेल तर कायदेशिर आहे म्हणुन सांगा. बेकायदेशिर असेल तर त्यावर कारवाई करा. त्याच्यावर देखिल तुम्ही कारवाई केलेली नाही. तर तुम्ही कियाशील आहात का? ९५ बांधकामे तशीच्या तशी आहेत, त्याच्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. जिथे चांगले होते तेथे अभिनंदन करतात. श्री अशोक ठाकुर यांनी सांगितले की त्यांच्या प्रभागात पाणी मिळाले, त्यांनी अभिनंदन केले. तीच भावना आमची आहे. ब-याच दिवसांपासुन ज्या विभागांत पाणी नव्हते, तेथे ते मिळाले. पण याचा अथे ते नेहमी येईल असे नाही. सध्या चाचणी सुरु आहे. जेव्हा नियमीत पणाने पाणी चालु होईल आम्ही तुमचे अभिनंदन करु. तात्पुरते अभिनंदन केले. त्यानंतर त्याच महासभेमध्ये हाऊसिंग फॉर डिसहाऊसिंग साठी आरक्षित असलेल्या जागेवर होतचंदानी यांनी बांधलेल्या गाळयाबाबत, त्या ठिकाणी ३०० चौ फुटाचे गाळे बांधण्याचे महापालिकेने त्यास निर्देशित केल्यानंतर त्यांनी जवळजवळ १२०० ते २००० चौ फुटाचे गाळे तेथे बांधलेले आहेत. ते गाळे महापालिकेने ताब्यात घेतले का? त्या ठिकाणी ३०० चौ फुटाचेच गाळे झाले आहेत का? हे पाहयचे तुम्ही आश्वासन दिले होत, त्यानंतर इतर ४ बांधकामांच्या बाबी तुमच्या समोर आणल्यावर सुध्दा तुम्ही कारवाई काही केलेली नाही. किंवा काय केले ते ही तुम्ही दिलेले नाही. त्यानंतर जकात मुददयाबाबत तुम्ही सांगितले की, ७ दिवसांमध्ये नाका स्थलांतरित करु, त्यानंतर एटी ॲण्ड टी, बीपीएल कंपनीचे टॉवर ज्याचा श्री किशोर वनवारी यांनी मघाशी उल्लेख केला, त्याबाबत सदस्य काय करु शकतो, प्रश्न उपस्थित करु शकतो. तुमच्या लक्षात आणुन देवु शकतो, परंतु त्यावर कारवाई करणे हे प्रशासनाचे काम आहे. त्याच्यावर कारवाई काही केली अथवा नाही ते ही माहित नाही. ही झाली यादी, त्यानंतर बरीचशी बाकीची कामे आहेत, काय करणार, तुम्ही सांगितले होते की, आम्ही आश्वासन देतो. आश्वासन दिल्यानंतर त्याची पुर्तता करुन काय झाले त्याची लेखी स्वरुपी माहिती देवू. ती माहिती येथे दिली नाही. म्हणून निष्क्रिय , पाणी दिले म्हणून क्रियाशिल आणि आम्ही तुमचे अभिनंदन करु. हे बघा जेव्हा आम्ही एखादी चांगली गोष्ट करतो तेव्हा वर्तमानपत्रवाले म्हणतात की, तुम्ही काही मेहरबानी करत नाही. तुम्ही ते करण्यासाठीच आहात. हे तुमचे कर्तव्य आहे. तुमचे कर्तव्य निभवतांना कुणी शाबासकी दिली म्हणजे तो त्याचा मोठेपणा आहे. तुमच्या जबाबदारीची जाणीव आहे म्हणून ते तुम्ही करत आहात. तुम्ही चुकता आहात ते दाखवून देणे हे सुध्दा आमचे काम आहे. तुम्ही चुकता कुठे? हे लक्षात घ्या. तुम्ही सांगितले की माझ्या स्वारस्याने येथे आलो नाही. कुणाच्या स्वारस्याने आलात ते तुम्हांला माहित आहे, आम्हांलाही माहित आहे, आम्हांला त्याच्याशी काही घेणेदेणे नाही. शहराचे स्वारस्य फक्त तुम्ही सांभाळा आणि तुम्ही ते सांभाळत नाहीत याची आम्ही तुम्हांला जाणीव करुन देतो. मागच्यावेळेस सुध्दा सांगितले होते की, झोपेत आहेत त्याला जागे करता येते झोपेचे सोंग करणा-याला जागे करता येत नाही. तुम्ही आता जो उल्लेख केला की, माझी जायची तयारी आहे मी क्रियाशील नसेल तर, आम्ही या अगोदर सांगितले की, क्रियाशील अधिकारी ते आयुक्त होते. जे निःपक्षपातीपणे कारभार करत होते. त्यांच्याबाबत आम्ही कधीही आवाक्षर शब्द सुध्दा या महासभेत काढला नाही. हा आमचा शिष्टाचार आहे. आताही कधी तुमच्याशी आवास्तव*

बोललो नाही. अवाजवी बोललेलो नाही. जे आहे ते उल्हासनगरच्या जनतेच्या हितासाठी उल्हासनगरच्या आर्थिकदृष्टीच्या दृष्टीने चांगले कसे पडेल त्यासाठी भांडतो,बोलतो, त्याचा तुम्हाला जर राग येत असेल तुमचा स्वारस्य काय असेल माहित नाही. परंतु तुम्हाला का खटकत , लोकांनी समस्या मांडल्यानंतर तुम्हांला राग का येतो? जसे श्री. लाल पंजाबीने सांगितले की, मी जावू शकत नाही हे तुम्हांला माहित आहे. कारण सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर आहे. सरकार त्यांचा आहे. मी सांगितले होते की, एकशे एक कौरव होते, पाच पांडव होते याबाबत मागे सांगितले होते. एकशे एक कौरव असूनही पाच पांडवांचाच विजय झाला होता. हा इतिहास आहे, तुम्ही कितीही निक्षुन सांगितले की, तो मी नव्हेच, तो मी नव्हेच, तो मी नव्हेच परंतु आम्ही हेच म्हणू की तो तुम्हीच आहात, तुम्ही आहात, तुम्हीच आहात धन्यवाद, याबाबत आम्हांला काही बोलायचे नाही. अशा निष्कीय प्रशासनाची पाठीराखण करणा-या आणि वकीली करणा-या सत्ताधा-यांबरोबर एक मिनिट सुध्दा याठिकाणी आम्हांला रहायची इच्छा नाही. आम्ही याठिकाणी बहिष्कार करतो.

सांयकाळी ६.३० वाजता शिवसेना-भाजपाच्या उपस्थित सदस्यांनी सभात्याग केला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, विरोधी पक्षाचे सदस्य श्री. बोडारे साहेब बोलत होते, त्यांना मी असे उत्तर देवू इच्छितो की, असे आयुक्त आपणांस आयुष्यभर कधी मिळणार नाहीत. दुसरे असे की, आज पोखरकर साहेब, यांच्या कोणत्या गोष्टी पूर्ण करत होते? त्यांना सांयकाळी ७ ते ८ वाजपर्यंतची भेटण्यासाठी वेळ देत होते. हे लोक काय-काय काम त्यांच्याकडुन काढून घेत होते? एकतर आपण त्यांचे ऐकून ती कामे करुन दया. आता त्यांनी श्री. बोडारे साहेबांनी स्वत: सांगितले की, आजपर्यंत जेवढे काही आयुक्त झाले, तर आम्ही त्यांच्याबाबतीत कधीही एक अवाक्षरही बोललो नाही. तर आपण त्यांच्याकडुन अशी कोणती कामे करुन घेत होता, आज अनाधिकृत बांधकामांचा मुददा उपस्थित करुन आमचे सत्ताधारी पक्षाने कधीही ना झोपडपटटी किंवा इमारत तोडण्याचा प्रश्न उपस्थित केला. हे लोक प्रत्येकवेळी अनाधिकृत बांधकामांचा मुददा पूढे करत रहतात. हे काम प्रशासनाचे आहे. व प्रशासन ते करत आहे. आज आयुक्त साहेबांबददल त्यांनी जे म्हटले हे लोक पाण्याचे बिल लाईट ऑफिसमध्ये जाऊन भरतात. महाराष्ट्र शासनाच्या आदेशाने आयुक्त साहेब येथे बसले आहेत. हे लोक उपोषण करतात. आज हे लोक जे बोलत आहेत त्यांना फक्त बोलायचेच आहे. शहरास काय परिणाम मिळतो याबाबत यांना काही देणेघेणे नाही. वैयक्तीक दुश्मनी कुणीही कुणाबरोबर ठेवता कामा नये. आज आयुक्त साहेबांनी आमच्यासमोर जे दोन शब्द म्हटले आम्ही त्यांना आश्वासन देतो की, आपण येथे नेहमी करता राहाल. आणि सत्ताधारी पक्ष आम्ही आहोत. शहराची जबाबदारी सत्ताधारी पक्षावर आहे. विरोधी पक्षावर नाही. आज सत्ता आम्हांला मिळाली आहे लोक उल्हासनगरमध्ये आम्हांला पसंत करतात. घराघराचेमधून आमचे सदस्य निवडुन आले आहेत. सत्तेमध्ये आम्ही आहोत. आम्ही लोक शहराचा विकास ओळखतो. फक्त मुददे उपस्थित करणे. किंवा खाली उलटसुलट बोलणे यापेक्षा हे चांगले आहे की मुददेसुदद बोलावे. आज आयुक्त साहेबांना मी फक्त एक विनंती करेन की, आयुक्त साहेब आपल्या कनिष्ठांना नेहमी जे संरक्षण देतात, हे त्यांचे कर्तव्य आहे, परंतु त्यांनी त्यांच्याकडुन काम पण करुन घेतले पाहिजे. आम्हांला शासनाचे असे निर्देश आहे की, कुणीही खासदार , आमदार, लोकप्रतिनिधी कुणीही सदस्य पत्र लिहितो. त्यास एका आठवडयाच्या आत उत्तर मिळाले पाहिजे. श्री. पोखरकर साहेबांनी अशा स्वरुपाचा आदेशही काढला होता. व असे लिहिले होते की, जो अधिकारी एका आठवडयाच्या आत उत्तर देणार नाही अशा अधिका-यावर कारवाई केली जाईल. आज आपण कनिष्ठांना संरक्षण देतात, ते लोक काम करत नाहीत म्हणून आपणांस ऐकून घ्यावे लागते. आपण एवढे सक्षम आहात आपण आल्यानंतर उल्हासनगर मध्ये ज्या विभागात आयुष्यभर पाणी येत नव्हते, तेथे पाणी येऊ

लागले आहे. सत्ताधारी पक्षाच्या वतीने आपणांस आश्वासन आहे की, आपण या शहराचा विकास करत राहाल. सत्ताधारी पक्ष आपल्या सोबत आहे. व नेहमी सोबत राहिल.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u>मा. महापौर इतिवृत्तांताच्या पृष्ठ क्र. ६४ वर, मी काही बोललो होतो, तेथे चुकीने श्री. लाल पंजाबी यांचे नाव लिहिले आहे, कृपया ती चुक सुधारली जावी. व त्यानंतर पृष्ठ क्र. ८५ वर शौचालयाचे जे प्रकरण होते, त्यात मी मा. आयुक्तांना विनंती केली होती की, त्यामध्ये आमच्या कॅम्प नं. ४ मधील मुख्य बाजारातील काही भाग समाविष्ट केला जावा. मुख्य बाजारपेठेसाठी शौचालयाची तरतूद केली जावी. त्यानंतर पृष्ठ क्र. ११३ वरील नोंद. आता आमचे विरोधी पक्षाचे सदस्य आमचे मित्र सभागृहातून बाहेर गेले आहेत. आमच्या श्री. राज असरोंडकर यांनी अतिशय चुकीचे असे निवेदन केले आहे. आमच्या भाभी श्रीमती ज्योती कालानी यांनी म्हटले की कृपया हिंदीमध्ये बोला म्हणजे आम्हांलादेखील समजेल. तर त्यावर त्यांनी म्हटले की, आयुक्त महोदयांना समजले ना? आम्हांला तेवढीच अपेक्षा आहे. हे अतिशय चुकीचे निवेदन आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> श्री. देवेंद्रसिंह खेमाणी मा. सदस्य यांनी जी सुचना दिली आहे दुरुस्ती करण्यासाठी त्यापैकी एक दुरुस्ती ६४ क्रमांकाच्या पानावर जी करायची आहे ती केली जाईल व जेथपर्यंत शौचालय समाविष्ट करण्याची गोष्ट आहे, त्यासाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव आणावा लागेल. शौचालयाचा समावेश केला जावू शकणार नाही. त्यासाठी एक स्वतंत्र प्रस्ताव उपायुक्त आरोग्य विभाग हे आणतील.

<u>मा. महापौर :-</u> मागील सभेच्या इतिवृत्तांतातील पृष्ठ क्र. ६४ वर श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांनी सुचविलेली दुरुस्ती करुन सर्वसाधारण महासभा दि. १९.९.२००३ व त्यात स्थगन महासभा दि. २९.९.२००३ रोजीच्या सभेचे उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ३:-</u> शहरातील विविध विकास कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी तयार केलेली <u>२००३ व २००४ ची दरसुची लागु करणे.</u>

<u>काही सदस्य:-</u>पास.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ३:-</u> शहरातील विविध विकास कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी तयार केलेली <u>२००३ व २००४ ची दरसुची लागु करणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत तसेच सार्वजनिक बांधकाम खात्यात विविध विकासाची तसेच दुरूस्तीची व देखभालीची कामे प्राकलने बनवून सदर प्राकलनीय किंमतीला मजुर सहकारी संस्था अथवा निविदा मागवून करून घेतली जातात. प्रस्तावित कामाची उपरोक्तपणे बनविलेली प्राकलने हि महाराष्ट्र

शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खाते सदरची दरसुची दरवर्षी नव्याने तयार करून प्रकाशित करीत असते. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र ठाणे जिल्हातर्गत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या ठाणे विभागाने तयार केलेली दरसुची प्रकाशनानंतर उल्हासनगर महानगरपालिकेत तसेच जिल्हयातील इतर नगरपालिकेत व महानगरपालिकेत लागु केली जाते. सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या ठाणे विभागाने २००३-२००४ वर्षाकरिता दरसुची तयार केलेली असून दिनांक १.७. २००३ पासून लागू करण्यात आली आहे. सदर दरसुची उल्हासनगर महानगरपालिकेसह उपलब्ध झाली असून या दरसूचीतील दर पान क्र. (I) (vI)

या वरील टिप्पणीसह उल्हासनगर महानगरपालिकेस लागु करून त्याप्रमाणे होणा-या दरांची प्राकलने, निविदा, देयके तयार करून कंत्राटदारांना केलेल्या कामांचे पेमेंट करण्यासाठी मंजुरी मिळणेकामी सर्वसाधारण महासभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ८३</u> <u>दिनांकः-२०.१०.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. दर्शनसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात विविध विकास कामासाठी ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेली २००३-२००४ ची दरसूची दि. <u>१/७/२००३</u> पासून उल्हासनगर महानगरपालिकेत लागू करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजूर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ४:-</u> श्री. विजय गोसावी (कनिष्ठ अभियंता) यांचे <u>निलंबनाधिन आदेश कायम करणे.</u>

<u>काही सदस्यः-</u>पास.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ४:-</u> श्री. विजय गोसावी (कनिष्ठ अभियंता) यांचे <u>निलंबनाधिन आदेश कायम करणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. महेश जयसिंग साधवानी, उल्हासनगर गगनमहल, प्लॉट नं. ५९, उल्हासनगर-२ यांनी फर्निचर बाजार, उल्हासनगर-३ येथे असलेल्या त्यांच्या दुकानाची सुमारे एक महिन्यापुर्वी दुरूस्ती करून घेतली होती. सदर दुकानातील दुरूस्तीच्या कामासाठी त्यांनी परवानगी घेतली नव्हती तसेच त्यांनी कोणताही पत्रव्यवहार महानगरपालिकेशी केलेला नाही.

सदर दुरूस्तीच्या कामाची श्री. विजय दामोदर गोसावी, कनिष्ठ अभियंता, (मालमत्ता विभाग) यांनी पहाणी करून सदर बांधकाम गैरफायदेशिर व अनाधिकृत असून सदरचे बांधकाम कायदेशिर कारवाई करून तोडावे लागेल. अशी भिती त्यांनी सदर दुकानदारास घातली आणि त्यानंतर सदर बांधकाम न तोडण्यासाठी दुकानदाराकडे लाचेची मागणी कली. त्यानंतर सदर दुकानदार श्री. महेश जयसिंग साधवानी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेकडे तक्रार केली. त्यानुसार दि. ११.९.२००३ रोजी लाचेचा सापळा आयोजित करून १६. ०० वा माया फर्निचर, उल्हासनगर येथे रू. ५०००/- लाचेची रक्कम स्विकारताना श्री. गोसावी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. अशा प्रकारे श्री. विजय दामोदर गोसावी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचा नोकर या नात्त्याने पदाचा गैरवापर करून स्वत:चा आर्थिक फायदा केला आहे. यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथील अधिकारी यांनी श्री. गोसावी व तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवरून त्यांचेविरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन गुन्हा रजि. नं. II १०६/२००३ ला.प्र. का. सन १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे ११.९.२००३ रोजी २०. ३० वा.गुन्हा दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२०३ दि. २२.९. २००३ अन्वये श्री. विजय दामोदर गोसावी, कनिष्ठ अभियंता यांना महापालिकेच्या सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे.

सबब, श्री. विजय दामोदर गोसावी (निलंबित) कनिष्ठ अभियंता, मालमत्ता विभाग यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१)(ब)नुसार महासभेपुढे ठवुन निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ८४</u> <u>दिनांक:-२०.१०.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. दर्शनसिंह खेमाणी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. विजय गोसावी महापालिका सेवेतील, कनिष्ठ अभियंता यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे महापालिका सेवेतून निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजूर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय क्र. ५:-श्री. अनिल खतुरानी (लिपिक) यांचे
निलंबनाधिन आदेश कायम करणे.

काही सदस्य :- सदरचा विषय वगळण्यांत यावा.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजातून वगळयांत येत आहे.

विषय क्र. ५:-श्री. अनिल खतुरानी (लिपिक) यांचे
निलंबनाधिन आदेश कायम करणे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

विषय क्र. ६:- श्री. रमेश कुडीया, लिपिक यांचे निलंबन
आदेश रदद करून कामावर पुर्नस्थापन
करणे.

काही सदस्य :- सदरचा विषय वगळण्यांत यावा.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजातून वगळयांत येत आहे.

विषय क्र. ६:- श्री. रमेश कुडीया, लिपिक यांचे निलंबन
आदेश रदद करून कामावर पुर्नस्थापन
करणे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

विषय क्र. ७:- श्री. पी.डी. कोळेकर यांची उल्हासनगर
महापालिका सेवेतील उपायुक्त पदावरील
प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.

काही सदस्य :-पास.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ७:- श्री. पी.डी. कोळेकर यांची उल्हासनगर
महापालिका सेवेतील उपायुक्त पदावरील
प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १०.१०.२००२ च्या आदेशान्वये श्री. पी.डी. कोळेकर यांची या महापालिकेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे. त्यानुसार श्री. पी.डी. कोळेकर हे या महापालिकेत दिनांक ११.१०.२००२ पासुन कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ नुसार महासभा ठराव क्रमांक ५७ दिनांक २६.१२.२००२ अन्वये श्री. पी.डी. कोळेकर यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस एका वर्षाकरीता मान्यता दिलेली आहे. श्री.

पी. डी. कोळेकर यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीची मुदत दिनांक १०.१०.२००३ रोजी संपुष्टात येत आहे.

श्री. पी. डी. कोळेकर यांच्या प्रतिनियुक्तीच्या वाढीव कालावधीस आणखी एका वर्षाकरीता मान्यता मिळणे कामी महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. ८५</u> <u>दिनांक:-२०.१०.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भावना रामचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पी.डी. कोळेकर, उप-आयुक्तयांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>
अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजूर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

ण <u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ८:- शहरातील रस्ते व जागा नामकरण समिती शिफारसीनुसार रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.</u>

<u>काही सदस्य :-</u>पास.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ८:- शहरातील रस्ते व जागा नामकरसमिती शिफारसीनुसार रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अनु. क्र. | रस्त्या / चौक | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर-१ येथील सरस्वती सागर अपार्ट. ते बॅ नं २६२ (साई दिष्टी अपार्ट) पर्यतच्या रस्त्याला | ''दादी भगवंती किशनचंद उधानी मार्ग'' |
| २ | उल्हासनगर- येथील पॅनल नं २० मध्ये सुनिता अपार्टमेंटचे समोरील | ''मातोश्री मोहिनीबाई मार्ग'' |

| | | |
|---|---|---|
| | राधास्वामी दावेवाली गल्ली ते ठाकूर फकीर आश्रम च्या मार्गाचे | |
| ३ | प्रभाग क्र. मुक्ती अपार्टमेंट ते निखीलेश्वर कॉम्पलेक्स पर्यतच्या रस्त्यास | ''कै श्रीमती मीराबाई पाटकर मार्ग'' |
| ४ | उल्हासनगर-३ शांतीनगर साईबाबामंदिर ते डॉल्फीन क्लबकडे जाणा-या मार्गाचे | ''समाजसेवक स्वर्गीय श्री रामकिशन करोतिया मार्ग'' |
| ५ | उल्हासनगर-५ येथील पॅनल नं १२ मध्ये स्कुल नं १५ , १९ चे मध्ये असलेल्या रस्त्याला | ''माता माई राजाइन मंदिर मार्ग'' |
| ६ | आनंदनगर फर्स्टगेट येथील कमानी पासून राजाई सोसायटी पर्यतच्या मार्गास | साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे |
| ७ | संतोषनगर महावीर किराणा स्टोअर्स समोरून सम्राट अशोकनगर मधील आर पी आय कार्यालय समोरील चौकापर्यतचा रस्ता | ''महात्मा ज्योतिबा फुले मार्ग'' |
| ८ | बॅरेक नं १३१७ व १३२८ समोरील चौकास | ''बाजी प्रभू देशपांडे चौक'' |
| ९ | उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रोडवरील स्मशान भुमी चौकाचे नामकरण | ''स्वर्गीय विनायक दामोधर सावरकर चौक'' |
| १० | उल्हासनगर-५ येथील बॅ नं २०९६ रूम नं ११ जवळ समाज मंदिरास | ''कै. श्री. टहीलराम सुगनोमल वनवारी'' |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव १ दिनांक ८/१०/२००३ अन्वये उपरोक्त दर्शविलेले १० नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा. महापौर, अध्यक्ष व इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण १० नामकरण प्रस्तावांस अंतिम मंजुरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ८६</u> <u>दिनांक:-२०.१०.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती दिपा पंजाबी

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीला अनुसरुन वर नमूद केलेल्या उक्त रस्त्यांचे, जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

विषय क्र ९ :-पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४७ दिनांक २०/६/२००३ मध्ये बदल करुन ३०० सफाई कामगार रोजंदारीवर भरती करणे

काही सदस्य :-पास.

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड:- मी मा. महापौर व आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो आपण शहरवासियांना दिवाळीची ही भेट दिली आहे त्याबददल आभारी आहे.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र ९ :-पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४७ दिनांक २०/६/२००३ मध्ये बदल करुन ३०० सफाई कामगार रोजंदारीवर भरती करणे

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका हददीमध्ये नागरी घनकचरा (व्यवस्थापन / हाताळणी)अधिनियम २००० ची अंमलबजावणी प्रभाविपणे होण्याच्या दृष्टीने सफाईच्या कामामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने उल्हासनगर शहरामध्ये सफाईचे काम वर्षातील ३६५ दिवस (१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, वीर गुरुदेव जयंती व महर्षी वाल्मीकी जयंतीच्या सुटटया वगळून) घेणे आवश्यक आहे. त्यासाठी उपलब्ध सफाई कामगारांना चक्रानुक्रमे सुटटया देवून सदर काम पूर्ण करुन घेणे अपेक्षित आहे. तथापी, कामगार संघटनाबरोबर दिनांक १७/१/२००३, ७/५/२००३, ४/९/२००३, २४/९/२००३ व ३०/९/२००३ रोजी बैठका घेवूनही कामगार संघटनाकडून योग्य प्रतिसाद मिळालेला नाही. सदर बैठकामध्ये कामगार संघटनांचे प्रतिनिधी २६७ रिक्त पदे कायम आस्थपनेवर भरती करावी या मागणीवर अग्रही होते.

सफाई कामगारांच्या नियमित अनुपस्थितीमुळे सफाईच्या कामावर परिणाम होत असल्याने अनुपस्थित कर्मचा-यांच्या बदली खाडा बदलीने कर्मचारी कामावर नियुक्त करुन सफाईच्या कामामध्ये सुधारणा आणण्याच्या दृष्टीने एकूण १८७ सफाई कामगार खाडा बदलीने भरणेसाठी मा. महासभेने महासभा ठराव क्र. ४७,

दिनांक २०/६/२००३ ने मान्यता दिलेली आहे. कामगार संघटना सदर प्रस्तावासाठी सुध्दा उचित प्रतिसाद देत नसून २६७ सफाई कामगारांची कायम पदावर भरती करण्याच्या मुददयावर आग्रही आहेत.

अशा परिस्थितीत वर्षातील ३६५ दिवस साफसफाई काम पूर्ण करुन घेण्यास प्रशासनापूढे अडचणी निर्माण होत आहेत. त्यणवर उपाययोजना म्हणून सफाई कामगारांच्या सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी रोजंदारीने ३०० कामगार नियुक्त करुन शहरंतील साफसफाई वर्षातील ३६५ दिवस करुन घेणे हा पर्याय उपलब्ध आहे.

२६७ सफाई कामगारांची कायम आस्थापनेवर भरती केल्यास येणारा प्रतिमहा खर्च, खाडाबदलीने १८७ कर्मचारी भरती केल्यास येणारा प्रतिमाह अपेक्षित खर्च व सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी रोजंदारीवर कामगार लावल्यास येणारा प्रतिमाह अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे............

| २६७ सफाई कामगार कायम स्वरुपी भरती केल्यास प्रतिमाह अपेक्षित खर्च (४९८८ रुपये प्रति कामगार प्रमाणे) | खाडा बदलीने १८७ सफाई कामगार भरती केल्यास येणारा प्रतिमाह अपेक्षित खर्च | रोजंदारीवर ३०० कर्मचारी भरती केल्यास येणारा प्रतिमाह खर्च (प्रतिमाह ६ सार्वजनिक सुट्टया अपेक्षित धरुन) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| रक्कम रुपये<br>१३ ,३१ ,७९६/- | रक्कम रुपये<br>५ ,७९ ,७००/- | रक्कम रुपये<br>१ ,८० ,०००/- |

वरील खर्चाचा तपशिल लक्षात घेता नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) अधिनियम २००० ची अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी रोजंदारी कामगार लावून शहरातील स्वच्छता करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाची तरतुदी करणे व सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करणेसाठी मंजुरी देण्याची शिफारस आहे. प्रस्ताव मान्यतेसाठी महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र. ८७</u> <u>दिनांक:-२० १० २००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले

हि महासभा वरील परिस्थिती विचारात घेता पूर्वीचा महासभा ठराव क्र. ४७, दिनांक २०/६/२००३ यामध्ये बदल करुन त्यासाठी अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाच्या तरतूदीच्या अधीन राहून, प्रशासनास रोजंदारीवर ३०० सफाई कामगार भरती करणेस मान्यता आणि अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १० वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. १०:-</u>उल्हासनगर शहरातील एकूण ३९ विंधन विहिरींवर २ एच.पी. जेटपंप बसविणे कामी शासकिय अनुदान प्राप्त करीता १० टक्के लोकवर्गणी रक्कम भरणे.

<u>काही सदस्य :-</u>पास.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> साहेब या विषयावर मला जरा बोलायचे आहे. साहेब ७८ विंधन विहिरींवर जेटपंप बसविण्याचा एक ठराव पारित झालेला आहे, त्याचे अदयापपर्यंत काम झालेले नसतांना आता ३९ विंधन विहिरींवर जेटपंप बसविण्याचा प्रस्ताव आणला तर मग आमचे काम कधी होईल? याअगोदर महासभेत तो प्रस्ताव पारीत झालेला आहे. श्री. ठाणेकरांना याबाबत विचारले जावे. आता मी त्यांच्याकडे यादी मागतो तर यादीपण देत नाहीत. आता हे नविन काम आहे. तर मग जुने काम काय खड्डयात गेले काय? ७८ विंधन विहिंरींवर जेटपंप बसविण्याचे काम मंजुर झालेले आहे.

<u>मा.महापौर :-</u>मी हे विचारु इच्छिते की, जेव्हा स्थायी समितीमध्ये आमची सभा झाली होती, आमचे श्री. दिलीप लालवानी हे सुध्दा होते, सर्व सदस्य होते, तर तेथे काय ठरले होते की, श्री. रमेश कुकिया यांच्या प्रस्तावास मंजुरी दयायची आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मा. महापौरजी, हा विषय आता निघुन गेला आहे, त्याविषयावर आपण आता बोलु शकत नाहीत. तो विषय पुढे ढकलण्यांत आला आहे. आता हा दुसरा विषय चालु आहे. तो विषय निघुन गेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> साहेब, ३९ ज्या विंधन विहिरींवर जेटपंप बसविणार आहात ते कुठे व त्या कोणत्त्या प्रभागातील आहेत हे काय माहित नाही. व याअगोदर ज्या ७८ विंधन विहीरींवर जेटपंप बसविण्यास मंजुरी दिली आहे त्याचे काय झाले?

<u>मा. प्रभारी आयुक्त(श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हा जो सभागृहासमोर प्रस्ताव आहे विंधन विहिरींवर जेटपंप बसविणे हे महाराष्ट्र शासनाची जी तातडीची पाणी पुरवठा योजना आहे त्यानुसारचे काम आहे. यातील ९० टक्के निधी आम्हांस राज्य शासनाकडुन मिळणार आहे. व १० टक्के महानगरपालिकेच्या निधीतून खर्च करायचा आहे. यामुळे कदाचित ते काम झाले नसेल. मी पाहतो, पाहिल्याशिवाय आश्वासन देणे मला योग्य वाटत नाही. ते काय आहे ते मला पाहू दया त्यानंतर मी सांगेन.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> ठिक आहे साहेब, ३९ विंधन विहिरींवर जेटपंप बसवायचे आहे तर प्रत्त्येक पॅनेल मध्ये एक-एक विंधन विहिर तर दया. त्यामध्ये तर कमीत कमी आम्हांला हिस्सा मिळाला पाहिजे ना? हे म्हणतात तुम्ही अर्ज तर दया, माझा अगोदरच अर्ज दिलेला आहे ते काम अजून झाले नाही.

काय आम्ही वारंवार त्यासाठी अर्ज देत बसायचे काय? ३९ विंधन विहिरीपैकी एक-एक प्रभागात एक-एक तर दया.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी,मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी जे म्हणत आहेत ७८ ज्या विंधन विहरींवर जेटपंप बसविण्याचे काम मंजुर झाले आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u>त्या बाजुला ठेवाव्यात व ३९ विंधनविहीरींपैकी सर्वांना समान हिस्सा मिळाला पाहिजे. असे होवू नये की, एखादया पॅनेलमध्ये ४-५ विंधन विहीरींवर जेटपंप लागावेत व एखादया पॅनेलमध्ये एकसुध्दा नाही. साहेब , ते श्री. ठाणेकर लक्ष देत नाहीत. ते कुठे गेले आहेत काय माहित? त्यांच्याकडे श्री. दर्शनसिंग यांनी यादी मागितली तर ते यादीही देत नाहीत.

<u>मा. प्रभारी आयुक्त(श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, कुणाच्या प्रभागात किती विंधन विहिरींवर जेटपंप बसवायचे हे आम्ही पाहिलेले नाही. जेथे जरूरत आहे तेथेच जेटपंप बसवित आहोत. व जेथे व्यवस्थितरित्त्या पाणी येत आहे तेथे जेटपंप बसविण्याची आवश्यकता नाही. जेटपंप अधिकतर झोपडपट्ट्यांमध्ये आम्ही प्रस्तावित केले आहेत. की जेथे व्यवस्थितरित्त्या पाणी येत नाही. आपले जे म्हणणे आहे जर तेथे पाणी येत नाही तेथे आम्ही जेटपंप बसवू शकतो. परंतु ज्या प्रभागात पाणी व्यवस्थितरित्त्या येत आहे, तेथे जेटपंप बसविण्याची आवश्यकता नाही. प्रत्त्येक प्रभागात एका विंधनविहीरीवर जेटपंप बसवायचे झाले तर ७८ पेक्षा जास्त जेटपंप लागतील.

<u>मा. सदस्य श्री.नारायण पंजाबी :-</u> नाही प्रत्त्येक पॅनेल मध्ये एक असे मी म्हटलो ना?

<u>मा. प्रभारी आयुक्त(श्री. आर.के. सोनवणे):-</u>आपल्या प्रभागामध्ये जर पाण्याची तकलिफ असेल तर तेथे जेटपंप बसविण्यासाठी आम्ही प्रस्ताव तयार करु. परंतु तेथे जरूरत आहे किंवा नाही हे प्रथम पाहिले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u>साहेब काही ठिकाणी अगोदर पाणी येत नव्हते. आता तेथे पाणी येऊ लागले. व काही ठिकाणी अगोदरपण पाणी येत नव्हते व आताही पाणी येत नाही. जसे की, गौल मैदान, चोपडा कोर्टाच्या मागील बाजुस व अमन टॉकीजच्या बाजूला जी झोपडपट्टी आहे तेथेही पाणी येत नाही तो तर झोपडपट्टीचा विभाग आहे. तेथे तरी कमीत कमी जेटपंप बसविला पाहिजे. मी अगोदर अर्ज दिलेला आहे आता पुन्हा थोडा मी अर्ज देवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मा. महापौरजी , ७८ विंधन विहिरींवर जेटपंप बसविण्याचे काम मंजुर झालेले आहे.त्यामधील जे आपणांस जरुरीचे वाटेल ते आपण घ्या जसे श्री. नारायण पंजाबी बोलत आहेत

<u>मा. सदस्य श्री. चिमण रुपानी :-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ब-याचश्या जागांवरील विंधन विहिरीबंद पडलेल्या आहेत. त्यांची दुरुस्ती होत नाही अनेकवेळा आम्ही संबंधित अधिका-यास याबाबत सुचना दिल्या आहेत. प्रभागसमितीच्या सभेतही मुददा उपस्थित केला आहे. परंतु प्रभाग समितीच्या सभेत संबंधित अधिकारी येत सुध्दा नाहीत. व त्यांच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, मी मा. सदस्य श्री. चिमण रुपानी यांच्या मताशी सहमत आहे. प्रभाग समितीमध्ये जेवढी काही चर्चा होते ठराव होतात, त्यांच्यावर काहीही कार्यवाही होत नाही. त्यादिवशी प्रभाग समिती क्र. ४ ची सभा स्थगित झाली होती. व उदया त्यांची सभा स्थगित करुन

ठेवण्यात आली आहे. आयुक्त साहेब स्वत: १२.०० वाजता त्या सभेस आले होते. पाण्याच्या प्रश्नावर आमच्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी सभेचे कामकाज स्थगित केले. तेथे सांगण्यात आले की, आपण आमच्या भावना आयुक्त साहेबांपर्यंत पोहचवत नाहीत. प्रभाग समितीचे जे अधिकारी बसले आहेत त्यांना माझी विंनती आहे की, उल्हासनगरमध्ये ६० टक्के विंधनविहिरी खराब आहेत. त्यांची दुरुस्ती केली जावी व आमच्या सदस्यांच्या ज्या भावना आहेत जी आवश्यक-आवश्यक कामे आहेत त्यांच्याकडे लक्ष दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रुपानी :-</u> साहेब , विंधनविहीरी बदं असल्यामुळे त्यांचे बरेचसे भाग भंगारवाले काढुन घेवून जातात. विंधनविहिरी जर दुरुस्त केल्या तर त्या वापरात येतील. व जेथे-जेथे पाण्याची समस्या आहे ती ही दुर होईल यासाठी माझी विनंती आहे की, विंधन विहीरी दुरुस्तीचे काम लवकरात लवकर केले जावे.

<u>काही सदस्य :-</u>पास.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>आयत्त्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. १०:-</u>उल्हासनगर शहरातील एकूण ३९ विंधन विहिरींवर २ एच.पी. जेटपंप बसविणे कामी शासकिय अनुदान प्राप्त करीता १० टक्के लोकवर्गणी रक्कम भरणे.

<u>प्रस्तावना :-</u>

महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाने पाणी पुरवठयाची पर्यायी उपाय योजना म्हणून पुरेसे पाणी उपलब्ध असणा-या विविध ठिकाणांच्या विंधन विहिंरींवर ३९ ठिकाणी २ एच.पी. चे जेटपंप बसवून कार्यान्वीत करणे या कामासाठी रु. २५००६४१/- या रक्कमेचे प्राकलन तयार करुन तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे दि. ४.३.२००३ रोजी पाठविला होता. त्यास अनुसरुन मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र/सामान्य/का.३/टे-४. नपाकावि २८०४, दि.३०.९. २००३ अन्वये अनुदान प्राप्तीसाठी १० टक्के लोकवर्गणी रुपये २५००६४/- शासनाकडे भरणे आवश्यक आहे, असे कळविले आहे.

सदर कामाची निकड लक्षात घेऊन या १० टक्के लोकवर्गणी भरण्यासाठी मंजुरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव महापालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र. ८८</u> <u>दिनांक:-२०.१०.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

हि महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरात विविध ठिकाणी एकूण ३९ विंधन विहिरींवर दोन एच.पी. जेटपंप बसविणे कामी रुपये २५,००,६४१/- या रक्कमेच्या प्राकलनीय खर्चापोटी शासनाकडून तातडीच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अनुदान प्राप्तीसाठी १० टक्के लोकवर्गणी रक्कम रुपये २५,००,६४/- शासनाकडे भरणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

विषय क्र. ११:-महापालिका कर्मचा-यांना दिवाळी निमित्त भेट देणे.

काही सदस्य :-पास.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा. महापौरजी , याचबरोबर मी एक विनंती करतो की, सर्व कर्मचा-यांना आम्ही हा जो ३-३ हजार रुपयांचा बोनस देत आहोत. त्याचबरोबर ऑक्टोंबर महिन्याचा पगार जो २१-२२ तारखेला दिला जातो तो सुध्दा उदया-पर्वाच दिला जावा. जेणेकरुन आमचा महापालिकेचा कर्मचारी वर्ग आहे तो दिवाळी चांगल्या प्रकारे साजरी करु शकेल.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. ११:-महापालिका कर्मचा-यांना दिवाळी निमित्त भेट देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका कर्मचा-यांना वित्तीय वर्ष २००३-२००४ साठी सर्व कर्मचा-यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहून दिपावली भेट खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) दिपावली भेट गट क्रमांक क व ड मधील सर्व कर्मचा-यांना अनुज्ञेय राहिल.

२) जे कर्मचारी ३१ मार्च २००३ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २००२-२००३ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली आहे, असे कर्मचारी दिपावली भेट मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२००२ ते ३१/३/२००३ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी दिपावली भेट मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर भेट ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावीत आहे.

अनुज्ञेय वित्तलब्धी रुपये
------------------------------ x हजर दिवस
३६५ दिवस

५) कर्मचा-यांच्या सेवा कालावधीचा विचार करता सर्व प्रकारच्या मंजूर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.

६) दिपावली भेट दिपावलीपुर्वी एक रक्कमी देण्यात यावी.

७) दिपावली भेट संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

सदर खर्चाची तरतुद वित्तीय वर्ष २००३-२००४ च्या सुधारीत अर्थ संकल्पात करण्यात यावी.

महासभा ठराव क्र. ८९ दिनांकः-२० १० २००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा उपरोक्त सर्व बाबींच्या आधिन राहून महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना वर्ष २००३-२००४ साठी दिपावली भेट म्हणून रुपये ३०००/- प्रति कर्मचारी देण्याचे प्रस्तावास मंजूरी देत आहे व येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-व आपणांस माहितीसाठी ज्या चार सुचना दिल्या होत्या त्याबाबत तर काही शंका नाही ना? एक डेंग्यु बाबत जी कार्यवाही केली आहे. व एक अभ्यांगतांसाठी जे विनियम तयार केले आहेत याबाबतची पुस्तिका आपणासर्वांना दिलेली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-मा. महापौरजी, आमच्या ब-याचशया सदस्यांना मराठी येत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-त्याबरोबर इंग्रजी प्रतही आहे ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-कृपा करुन हिंदीमध्येही दया. मुख्य मुददा हा आहे की, कुणा-कुणाला प्रेषक गॅलरीत प्रवेश मिळेल ते जरा सांगा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय असा आहे की, अभ्यांगतांचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे पहिला वर्ग जो आहे विशेष हक्क ठेवणारा, आमच्याकडे ज्या सन्माननिय नगरसेविका आहेत त्यांचे पती , मुलगा किंवा अन्य कुणी नातेवाईक यांना प्रेषक गॅलरीत प्राधान्यक्रमाने प्रवेश दिला जाईल. व दुसरे जे अभ्यांगत आहेत ज्यांची कुणी नगरसेवक किंवा कुणी अधिकारी शिफारस करेल. त्याच लोकांना प्रवेश दिला जाईल. त्यानंतर जर काही जागा शिल्लक राहिल्या तर इतर लोकांना प्रवेश दिला जाईल. व त्याचप्रमाणे पत्रकारांचेही तीन वर्ग तयार करण्यांत आले आहेत. प्रथम प्राधान्य जी राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे आहेत किंवा इलेक्ट्रॉनीक मिडीया आहे त्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. त्यानंतर वृत्तपत्रांची जी शासनमान्य अधिकृत यादी तयार केलेली असते त्यांना, तिसरा वर्ग जे उर्वरित पत्रकार आहेत त्यांना प्रवेश दिला जाईल.

कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ६. ४७ वाजता सभा संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

ब्रम्हकुमारी एक अशी संस्था आहे जी पुर्ण विश्वामध्ये काम करीत आहे. त्यांना आम्ही १० वर्षासाठी देत आहोत व एक अशी संस्था जी संस्था फक्त उल्हासनगरमध्ये कार्य करत आहे त्या संस्थेस आम्ही ३० वर्षासाठी उदयान सुशोभिकरणासाठी देत आहोत. या दोन्ही गोष्टी अनुचित आहेत.

**मा. सदस्या श्रीम. सिमा मोकल, श्रीम संगिता जावळे, श्रीम. रेखा कृष्णानी सभागृहातून बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- महापौर महोदया, हा जो ठराव येथे आलेला आहे तो ३० वर्षासाठी, उल्हासनगर शहरामध्ये अशा काही जागा आहेत त्या विकसित झाल्या पाहिजेत ही आमची सुध्दा धारणा आहे एक इच्छा आहे. प्रबळ इच्छा आहे. यापूर्वी या ठिकाणी प्रजापिता ब्रम्हकुमारी यांच्या मार्फत एक ठराव आला होता, ४ वर्षापूर्वी. गोल मैदानच्या ठिकाणी उदयानाची पडझड झाली होती त्याठिकाणी कचरा होता त्याठिकाणी पीसपार्क बनविण्यासाठी परवानगी मागितली होती आणि त्यावेळचे आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेब यांनी सांगितले बीपीएमसी ॲक्ट मधील तरतुदीनुसार फक्त एका वर्षासाठी आम्ही तुम्हांला देवू शकतो आणि एका वर्षाचीची मुदत ही चांगली आहे जेणेकरुन आम्हांला समजेल तुम्ही कशयाप्रकारे उदयान सुशोभित करता? जास्त वर्षासाठी दिले तर तुमची मनमानी होईल. आणि एक वर्षाच्या कालावधीसाठी देवून सुध्दा त्यांनी ते पीसपार्क एवढे सुंदर केले आहे, त्यानंतर प्रत्त्येक वर्षी या महासभेमध्ये पीसपार्कचा मुददा आल्यानंतर काही सदस्य त्यास नाकारुच शकत नाहीत. त्यांनी ते पीसपार्क अशा पध्दतीने तयार केले आहे अगदी मन लावून. त्यामुळे दरवर्षी काय वर्षानुवर्ष जरी तो प्रस्ताव आला तरी त्याला नाकारण्याची कोणत्त्याही सदस्यांची इच्छा होणार नाही आणि हिम्मत सुध्दा होणार नाही आणि असे असतांना आपण ३० वर्षासाठी हा प्रस्ताव कशयासाठी आणला आहे? त्याची कारणे काय समजतच नाहीत. म्हणजे पुन्हा मागे

सांगितले होते की, टाउनहॉल ज्या पध्दतीने ३० वर्षासाठी दिला, स्विमिंग पुल ३० वर्षासाठी गहाण टाकल्यासारखेची आहे. विकास झाला पाहिजे परंतु तो सर्व सामान्य जनतेला केंद बिंद ठरवून सर्वसामान्य जनतेला त्याचा उपयोग झाला पाहिजे. याठिकाणी हा ठराव आणतांना त्या संस्थेकडुन उदयानासाठी किती खर्च होईल. हे अपेक्षित नाही. त्यांनी काय काय केल पाहिजे? एक कोटी? एक कोटीसाठी आम्ही ३० वर्ष उदयान देणार. हे चुकीचे आहे. एक-एक वर्षासाठी हा ठराव आणावा. चांगले असेल तर ही महासभा मान्यता देणार आहे. चांगल्या गोष्टीला ही महासभा किंवा महासभेतील सदस्य विरोध करत नाहीत. ही प्रथा आहे चांगले असेल तर त्या संस्थेने जास्तीत जास्त प्रयत्न करुन महापालिकेची किंवा महापालिका प्रशासनाची मान्यता घेवून त्या ठिकाणी सुशोभिकरण कराव आणि दरवर्षी मंजुरीसाठी आणाव. आमच्या चौधरी साहेबांनी सांगितले किंवा श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, आमचा कालावधी, प्रत्येक बॉडीचा कालावधी हा पाच वर्षाचा आहे. साडेतीन वर्ष गेलेली आहेत. पुढच्या महासभेला काहीतरी कार्य ठेवली पाहिजेत. म्हणून जास्तीत जास्त ३ वर्षाचा कालावधी ठेवावा. जर चांगले काम केले तर महासभा त्यांना मुदतवाढ देईल. सुशोभिकरण व्हावे हा उददेश जरी असला तरी सर्वसामान्य जनतेच्या हिताचा व्हावा हा ही उददेश असावा. जर सर्वसामान्य माणसांचे हित डावलले जात असेल तर आपण रददही करु शकतो. त्यांच्या हिताचे जर जतन होत असेल तर मुदत वाढवूही शकतो. हे लक्षात ठेवून हा प्रस्ताव महापालिकेने पुर्णपणे प्राकलन तयार करुन महासभेकडुन मंजुरी घेवून कार्योत्तर मंजुरीसाठी तरी महासभेपूढे ठेवावा. आणि जास्तीत जास्त ३ वर्षासाठी दयावा. यासाठी आमच्या शिवसेना, भारतीय जनता पार्टीचा पाठींबा आहे.

मा. सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे, श्रीम. प्रेमा खांडेकर हया ७०२ वा. सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u>मा. आयुक्त साहेब, आणखी एक गोष्ट आहे त्यांनी १० लाख रुपये महापालिकेकडे अनामत रक्कम म्हणून ठेवायची आहे. परंतु यामध्ये त्यांचा जो प्लान आहे ते कोणकोणत्त्या बाबींवर किती खर्च करणार आहे याबाबत काहीच सविस्तर माहिती दिलेली नाही. तर कृपया याबाबतचा प्लान सविस्तर प्लान व कोणकोणत्त्या बाबींवर किती खर्च होईल याची माहिती महासभेतील प्रत्येक सदस्यासव पत्रकारांना मिळाली पाहिजे.

<u>मा. महापौर :-</u>मी सदरचा प्रस्ताव मतदानास टाकते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> जे प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. जे लोक प्रशासनाच्या प्रस्तावाचे समर्थन करतात त्यांनी, प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने १२ मते?

तसेच प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात म्हणजे त्यांना कामावर घेवू इच्छितात, त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात ३९ मते?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>आयुक्त साहेब, हा प्रस्ताव पारीत झाला तो तुम्ही शासनाकडे पाठविणार आहात का? आणि सचिव साहेब, तुम्ही मोजले ते चुकीचे मोजले, ११ आणि ३.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आपले?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> शिवसेना भाजपाचे ११ व तिकडे सत्त्ताधारी पक्षातील ३ असे १४ होतात.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तर मग ३९ मधून ३ वजा केले असता ३६ होतात व आपल्या बाजूने १४.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> आमच्या बाजूने १४ होतात साहेब.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रस्तावाच्या विरोधात ३६ व आपल्या बाजूने ११ अधिक ३ म्हणजेच १४ होतात.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :-</u> मा. सचिव साहेब माझे मत तटस्थ म्हणून मोजा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने १४ व विरोधात ३५ सदस्य तटस्थ, ठिक आहे?

प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने १४ मते

१) श्री. उमाप रामदास
२) श्री. जमनादास पुरस्वानी
३) श्री. राज असरोंडकर
४) श्री. राजेंदसिंह भुल्लर
५) श्री. सोनवणे नथु
६) श्री. गायकवाड दिलीप
७) श्री. रमेश चव्हाण
८) श्री. बोडारे धनंजय
९) श्री. पाटील विश्वनाथ
१०) श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई
११) श्री. राजेंद्र चौधरी
१२) श्री. नाना पवार
१३) श्री. विनोद ठाकूर
१४) श्री. शांताराम निकम

प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात ३५ मते
१) श्री. टेकचंदानी राजु
२) श्री. लिंगे सुर्यकांत
३) श्री. मुलचंदानी महेंद्र
४) श्रीमती कालानी ज्योती

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- आपण या आधी प्रारुप नियम बनविले होते. तुम्ही एक समिती नियुक्ती केली होती. सहा महिन्याच्या आत रिपोर्ट दयायचा होता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-अजुन रिपोर्ट आला नाही, पुन्हा बनवा ना? आता कुणाकडे काही नाही? कुणाला माहिती देखील नाही काय नियम आहेत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्हांला यापूर्वी जी पुस्तीका दिली त्यात सर्व काही होते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- ते तर जूने होते ना?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तेच आहे ना, समिती नियुक्त केली होती ना.
मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- हा आयत्त्यावेळचा विषय आणतात कुणाला माहित देखील नाही.

मा. उप-महापौर (पिठासीन अधिकारी):- पुढच्या महासभेच्या नियमीत कार्यसूचीवर विषय आणावा. सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

**vk;R;k osGpk fo"k; Ø- 18%&**mYgkluxj 'kgjkr oLrw Bso.kslkBh vkf.k /akns o O;olk; dj.ksdjhrk ijokuk laca/kh izk#i mifo/kh vkf.k izk#i fu;ekoyhyk ekU;rk ns.ksckcr-

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १९ वाचून दाखवितात.

विषय क्र. १९:-उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे
^^Økarhck T;ksrhck Qqys** ;kapk
iw.kkZd`rh iqrGk clfo.ksckcr-

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-या जागी त्यांनी चार जागा सुचविल्या आहेत, कोणत्त्या जागी बसवायचा आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :- उल्हासनगर महापालिकेमध्ये गेल्या अनेक वर्षापासून या उल्हासनगर मधील सार्वजनिक संस्थेची मागणी होत असे. महात्त्मा ज्योतीबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उल्हासनगर शहरामध्ये बसवावा. ही मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत होती. त्या मागणीचा मागणीसाठी महात्त्मा ज्योतीबा फुले माळी सेवा मंडळ यांनी आयुक्त व या महानगरपालिकेचे पदाधिकारी यांना एक पत्र दिले होते महिन्यापूर्वी, ते पत्र दिल्यावर ते पत्र विरोधी पक्ष नेता म्हणून मला पण दिले होते, ते पत्र बघितल्यावर असे वाटले होते की, हा विषय सत्त्ताधारी पक्ष महासभेच्या कार्यसूचीवर ठेवतील. पण त्या सत्त्ताधारी तो विषय कार्यसूचीवर ठेवला नाही. म्हणून विरोधी पक्षाचा एक ठराव या महासभेला दयावा लागला. ठरावामध्ये नमूद केले की, आयत्त्यावेळी का होईना पण हा विषय घ्यावा. आणि ते पत्र बघितल्यावर सत्त्ताधारीला असे वाटले की याचे क्रेडीट विरोधी पक्षाला मिळेल म्हणून सत्त्ताधारी पक्षांनी आयत्यावेळचा विषय आणला. तो विषय आयत्त्यावेळचा असो पण एक चांगले काम या शहरामध्ये थोर महापुरुषाचा पुतळा बसणार आहे. विरोधी पक्षातर्फे या ठरावाला या प्रस्तावाला मंजुरी देत आहे.

त्यांच्याकडे तसे पुरावे असतील व त्यांचे यापूर्वी पुनर्वसन झाले नसल्यास ते आता करण्यात येईल ती जबाबदारी महापालिकेची आहे. ते उत्त्तर आम्ही लेखी स्वरुपात दिलेले आहे. आजही जे लोक उपोषणाला बसलेले आहेत. त्यांना देखील हेच सांगितले की, १/१/९५ पूर्वीपासून आपण तेथे राहत असल्याचा पुरावा सादर करा. त्यानंतर आपले पुनर्वसन करण्याची जबाबदारी वाल्मीकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत महानगरपालिकेची आहे. या रस्त्याच्या पुर्ननिर्माणाचा निर्णय कसा घेण्यात आला. हे सर्व सदनाला माहित आहे. त्यामुळे त्या प्रकरणात मी जाणार नाही. परंतु आज ते काम का थांबले आहे? ते थांबण्याचे एकच कारण आहे आम्हांला सांगण्यात आले की, डॉल्फीन हॉटेल १६ फुट जात होते. आज ती मार्किंग बदललेली आहे. सचदेव नगरमध्ये एक बंगला आहे त्याचे देखील काही जागा जात आहे. परंतु त्याची मार्किंग व्यवस्थितरित्त्या झालेली नाही. असा संशय काही लोकांनी प्रकट केला होता. त्यानंतर आम्ही डीआयएलआर यांना पत्र लिहून निष्पक्षपणे काम होण्यासाठी त्यांना मार्किंग करण्यासाठी सांगितले. त्यांनी आम्हाला लेखी उत्त्तर दिले की, जर जमिनिचे मोजमाप घ्यायचे असेल तर त्यासाठी जमिनमालकाने अर्ज करणे आवश्यक आहे. यासाठी आम्ही शेजारच्या सोसायटीला विनंती केली की, आपण अर्ज करुन मार्किंग करुन घ्यावी. जेणेकरुन रोड व्यवस्थितरित्त्या होवू शकेल. ते अदयाप झालेले नाही. आज येथे डॉल्फीनला वाचविण्याबाबत काही आरोप केले गेले, डॉल्फीनला आम्ही वाचवू इच्छितो अथवा व्यवस्थितरित्त्या तोडु इच्छितो. हे येणारी वेळच सांगेल. तसेच सचदेवचा जो बंगला आहे त्याबद्दलही येणारी वेळच सांगेल. परंतु मला असे वाटते की, डीआयएलआर कडुन मार्किंग न मिळाल्यास एमएमआरडीएला विनंती करुन त्या रस्त्त्याची ते सांगतील तशी हद्द ठरवून मार्किंग देण्यात येईल. कारण चुकी ही दोन्ही बाजुने झालेली आहे. डॉल्फीन हॉटेलवाल्यांनी देखील पुढील सामासिक अंतरामध्ये बांधकाम केलेले आहे. तसेच विरुध्द बाजुस असलेल्या सोसायटीने देखील सामासिक अंतरामध्ये बांधकाम केलेले आहे. चुकी दोघांची आहे. त्याशिवाय तेथुन ८० फुट रस्ता निघतो आहे, जर आम्ही कोणाला वाचवत असलो तर जो रस्ता मिळत आहे ज्याला आपण फिजिबल लाईन असे म्हणतो. प्रॅक्टीकल लाईन फिजिबल लाईन असे शब्दप्रयोग इथे नियमित ऐकण्यात येतात. तर फिजिबल लाईन पाहिल्यास आज जो रस्ता आहे तेथुनही रस्ता होवू शकला असता. परंतु विकास आराखड्याप्रमाणे जी लाईन असायला हवी त्या लाईनबद्दल काही विवाद आहे. डॉल्फीन वाल्याचे म्हणणे आहे की, त्यांचे खरे आहे. समोरील सोसायटी वाल्यांचे म्हणणे आहे की, त्यांचे खरे आहे. महापालिकेच्या

अधिका-यांनी दोन वेळा मार्किंग दिली. आपण जसे सांगितले की, श्री. सोनवणे असतांना १६ फुटांची मार्किंग देण्यात आली. श्री. शिंदे जेव्हा आले तेव्हा ८ फुटांची मार्किंग देण्यात आली. दोन मार्किंग जेव्हा दिल्या तेव्हा त्यात सत्यता किती आहे? ते एकतर ऑफीस कडुन कळू शकेल. किंवा एमएमआरडीएच्या ऑफिसमधुन कळू शकेल. सत्यता समोर आल्यानंतरच आम्ही रस्त्याचे काम सुरु करु इच्छितो. त्यामुळे आम्ही थांबलेले आहोत. कोणला वाचविण्यासाठी थांबलो आहे असे जर आपल्याला ऐकिव गोष्टीवरुन जसे श्री. असरोंडकर यांनी येथे सांगितले की, त्यांचा दुस-या ठिकाणी प्रकल्प चालू असून त्याठिकाणी भरपाई करण्यात येणार आहे तर कृपा करून माझी अशी विनंती आहे की, ऐकिव गोष्टींवर विश्वास ठेवून तुम्ही आरोप करीत असाल तर ते चुकीचे होईल. आपल्याकडे काही पुरावा असेल व त्यानुसार तुम्ही आरोप करीत असाल तर एक मिनिट सुध्दा आम्ही येथे थांबणार नाहीत. हे आम्ही वारंवार येथे सांगितले आहे. परंतु लोकांच्या मनात संशय निर्माण करणे. आम्ही येथे काम करु इच्छितो आरोप केला व त्याचे उत्तर दिले हे करु इच्छित नाही. मला असे वाटते की, आपला वेळ जास्त करून भरीव कामांवर खर्च करायला हवा. आमच्यावर आज फारच घाणेरडे आरोप करण्यांत येत आहे. यानंतरही आम्ही गप्प बसण्याचे ठरविले आहे. कारण आरोपांचे खंडण करणे यावर आपली शक्ती खर्च करणे हे मला वाटते की, मुर्खतेचे लक्षण आहे. यापेक्षा जे आरोप केले आहेत ते खोटे आहेत हे कृतीने सिध्द करणे हे आमचे काम आहे. व हेच तत्त्व घेवून आम्ही येथे काम करु इच्छितो कृपया आपण आरोप करण्याअगोदर ऐकीव गोष्टीवर आरोप करु नये. आम्हांला जे भरीव काम करायचे आहे ते करु दया. या उपरही आपल्याला आपल्या आरोपाचे लेखी स्वरुपात उत्तर हवे असल्यास ते देण्यास देखील मी तयार आहे. परंतु मी माझा वेळ खर्च करणार नाही. आपण फक्त काही दिवस थांबा नंतर आपणांस दिसेल की, आम्ही व्यवस्थित होण्यासाठी थांबलो आहे की, कोणाला वाचविण्यासाठी थांबलो आहे. त्यावेळी आपणांस असे वाटत असेल की, आम्ही कोणाला वाचविण्यासाठी थांबलो आहे. तर त्यादिवशी तुम्ही सभागृहात विचारा की, हे असे का झाले?

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१९/१२/२००३

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१२/२००३ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९/१२/२००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ५. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ३९. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ६. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४३ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १०. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे |
| १३. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७. | श्री. अंकुश म्हस्के |
| १४. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, | ४८. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद | ५१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्री. नाना आनंदा पवार | ५२ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २०. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५४. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २१. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५५. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) |
| २२. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५७. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्रीमती.मसंद माया घनश्यामदास | ५८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २५. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५९. | श्रीमती निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्रीमती. मोना वनवारी | ६०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६१. | श्री. संजय भठीजा |
| २८. | श्री. मोहन साधवानी, | ६२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६३. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३१. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६५. | श्री. इदनानी राजू चंद्रभान, |
| ३२. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ६६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६७. | श्री. माखिजा हरदास |
| ३४. | श्री. रमेश महादेव चव्हाण | ६८ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३५. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ | ६९ | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३६. | श्री. जाधव सुरेश मधुकर | | |

तर

मा. सदस्य १. श्री. टेकचंदानी राजु, २. श्रीमती. सीमा चंदाराम मोकल, ३. श्री. मुलचंदानी महेंद्र, ४. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ५.श्री. यादव लालबिहारी बुझारत ६. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा ७. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ८. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी, ९. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास, १०. श्रीमती किरण लखी माखिजा, ११. श्रीमती. मीनु राजकुमार दासानी हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>मा. महापौरजी, आजच्या या सभेचे कामकाज सुरु करण्यापूर्वी एक शोक प्रस्ताव मांडु इच्छितो, प्रबोधनकार ठकरे यांचे चिरंजिव, हिंदु हदय सम्राट श्री. बाळासाहेब ठकरे यांचे धाकटे बंधू व्यंग चित्रकार व संगितकार श्री. श्रीकांतजी ठकरे, यांचे काही दिवसापूर्वी आजाराने निधन झाले. तसेच ठण्याचे आमदार श्री. मो. दा. जोशी हे १९७० साली शिवसेनेचे पहिले जिल्हाध्यक्ष झाले होते. आणि १९८६ साली ते ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते. आणि १९९९ साली ते आतापर्यंत महाराष्ट्र विधान सभेत आमदार होते. अशा या नेत्त्यांना या ठिकाणी श्रध्दांजली आर्पित करावी.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मा. उप-महापौर, श्रध्दांजली देण्याच्या अगोदर आज या डिसेंबर महिन्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर ४७ वा महापरिनिर्वारण दिन होतो. ज्या भारताची राज्य घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बनविली होती. त्या राज्य घटनेच्या आधारे या शहराचा कारभार या सभागृहात चालविला जातो. श्री. आर.डी. शिंदे जेव्हा आयुक्त होते. तेव्हापासून या सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावण्यात यावे अशी मागणी आमच्या रिपब्लीकन पक्षाचे सर्व नेते, आमचे शहर जिल्हा सरचिटणीस श्री. किशोर धडके , श्री. देविदास निकम, नंतर त्यावेळचे आमचे माजी नगरसेवक श्री. प्रल्हादजी सोनवणे, श्री. अशोक बच्छाव, श्री. रमेश इंगळे तसेच येथिल तमाम रिपब्लीकन जनतेच्या भावना होत्त्या की, या सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावण्यात यावे. त्यासाठी आता थोडया दिवसापूर्वी श्री. चुडामन मोरे जे अध्यक्ष होते श्री. जे. के. डोके वगैरे यांनी सुध्दा अशी मागणी केली होती. आमचे पक्षाचे श्री. राधाचरण करोतिया यांनी सुध्दा वारंवार मागणी केली होती. की या सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावण्यात यावे. श्री. गणेश चौधरी ,प्रथम महापौर त्यानंतर श्रीमती यशस्वीनी नाईक महापौर आणि आज ज्या चळवळीतून आमच्या श्रीमती मालती करोतिया महापौर झालेल्या आहेत त्या सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्य घटनेची परिणीती होती. आणि म्हणून जसे संसदेमध्ये तसेच विधानसभेमध्ये प्रत्त्येक ठिकाणी हे तैलचित्र असणे आवश्यक आहे. आणि मी .................

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> प्रथम श्रध्दांजली आर्पित करायची आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> श्रध्दांजली बाबतच मी बोलत आहे. फक्त दोन मिनिट, मी आज महापौरांना विनंती करेन की, आज या महासभेमध्ये आलेल्या शोक प्रस्तावानुसार श्रध्दांजली आर्पित करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक तैलचित्र या महासभेमध्ये लावून मा. महापौरांच्या हस्ते , सभागृह नेता, विराधी पक्ष नेता, सर्व गटनेते यांच्या हस्ते, त्यांना पुष्पहार चढवून श्रध्दांजली आर्पित करण्यात यावी. ही माझी नम्र विनंती आहे, तैलचित्र सद्या आता माझ्याकडे आहे. तर मी महापौरांना विनंती करतो, त्यांनी तैलचित्र सभागृहात आणण्याची परवानगी दयावी. आणि त्याच्यावर सर्वांनी पुष्प अर्पण करुन श्रध्दांजली अर्पण करावी.

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, रिपब्लीकन पक्षाचे गटनेते श्री. प्रमोदजी टाले यांनी आपणाकडे आता परवानगी मागीतलेली आहेच की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र सभागृहात आणून श्रध्दांजली अर्पण करावी. त्यांच्या त्या म्हणण्याला किंवा त्यांच्या त्या श्रध्दांजली वाहण्याच्या अनोख्या पध्दतीला मी याठिकाणी अनुमोदन देतो, त्याचबरोबर आमचे मित्र श्री. चौधरी साहेब यांनी श्रीकांत केशव ठाकरे जे की, व्यंगचित्रकार होते बाळासाहेब ठाकरेंचे धाकटे बंधू होते , प्रबोधनकार ठाकरे यांचे चिरंजीव होते , आणि ते चित्रपट सृष्टीतील समिक्षक सुध्दा होते. त्यांना श्रंध्दांजली अर्पित केली जावी. त्याचबरोबर ठाण्याचे आमदार श्री. मो. दा. जोशी जे की आमदार म्हणून जितके प्रसिध्द आहेत, त्यापेक्षा जास्त ते नगरसेवक म्हणून प्रसिध्द होते. ज्याप्रमाणे हरकतीच्या मुददयावर नेहमी चर्चा केली जाते, त्याप्रमाणे हरकतीचा मूदयावर ते नेहमी बोलायचे. पूर्ण सभागृह ते दणाणून सोडायचे. शेवटपर्यंत ते आमदार होते, आणि आमदार असतांना सुध्दा शेवटपर्यंत दोन खोल्यांच्या घरामध्ये ते राहत होते. तर त्यांचा अनेक राजकारण्यांनी अनुकरण करावे. त्याचा आदर्श ठेवावा. म्हणून या ठिकाणी त्यांना श्रध्दांजली अर्पित करावी. त्याचबरोबर नाशिकचे श्री. धैर्यसिंगराव पवार जे की शिवाजी महाराजांच्या नातेवाईकांपैकी येतात, राजवाडयाला आग लागल्यानंतर गुदमरुन त्यांचा मृत्यु झाला. तर त्यांना सुध्दा याठिकाणी श्रध्दांजली अर्पित करावी. त्याचबरोबर भारतीय चित्रपटसुष्टीमध्ये विनोदी नट म्हणून ज्यांनी कारर्किद गाजविली त्यांना पाहिल्यानंतरच लोकांना हसू यायचे अशा त्या टुणटुण त्यांना उमादेवी असे म्हटले जायचे गायिका म्हणून त्यांनी पदार्पण केले. परंतु नंतर त्या विनोद नटी म्हणून प्रख्यात झाल्या. त्यांचेही नुकतेच निधन झालेले आहे. तर त्यांनाही याठिकाणी श्रध्दांजली अर्पित केली जावी. त्याचबरोबर पंतप्रधान योजना , ज्या योजनेमध्ये रस्त्यांची कामे केली जात होती आणि त्यामध्ये प्रचंड असा भ्रष्टाचार होता. आणि त्यामध्ये टक्केवारीचे प्रमाण प्रंचड वाढले होते, हे प्रकरण ज्या इंजिनिअरने उकरुन काढले , दुबे नावाचा ३० वर्षाचा इंजिनिअर ज्याची बिहारमध्ये हत्त्या झाली आहे, त्याला सुध्दा या सभागृहामध्ये श्रध्दांजली अर्पित केली जावी. त्याचे कारण असे आहे की, त्याचा जो आदर्श आहे, तो आदर्श इतर कर्मचारी व अधिका-यांनी घ्यावा. यासाठी त्यांना याठिकाणी श्रध्दांजली अर्पित केली जावी. त्याचबरोबर उल्हासनगरचे सफाई कर्मचारी ज्यांने पत्नी व स्वतःची आत्महत्त्या करुन घेतली. श्री. गोपाल मरोठिया व श्रीमती रेखा मरोठिया यांना सुध्दा वाल्मीकी समाजाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी. तर अशा पध्दतीची मी सभागृहाला मी एक विनंती करतो. जयहिंद.*

*<u>मा. महापौर :-</u> मा. सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी सांगितल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावण्यास परवानगी दिली जात आहे. या तैलचित्रस पुष्पहार घालण्याची व्यवस्था केली जावी.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मा. महापौरजी, आता आमचे बंधू श्री. प्रमोद टाले यांनी जो प्रस्ताव दिला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र सभागृहात लावले जावे. त्यासाठी आमची हरकत नाही. तर मला असे वाटते की, याबरोबर आम्ही सुध्दा पुढल्या महिन्यामध्ये पुज्य झुलेलाल यांचे तैलचित्र जसे श्री. टाले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र आणले आहे तसे तैलचित्र आम्ही आणू. व सर्व सदस्यांना विनंती करु त्याचे सुध्दा उदघाटन मा. महापौरांच्या हस्ते करु. म्हणून सर्व सदस्यांना विनंती करतो की, पुढल्या महिन्यामध्ये आम्ही हे जे तैलचित्र आणणार आहोत त्यास आज परवानगी दिली जावी.*

*<u>मा. महापौर :-</u>मी या दोन्ही प्रस्तावास मान्यता देत आहे.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी आपआपल्या आसनाशेजारी उभे राहून मौन धारण करावे.*

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-** मा. सचिव साहेब, श्रध्दांजली प्रस्तावात आणखी एक नाव समाविष्ट करावे, या सभागृहाचे एक सदस्य श्री. आनंदराम बिजलानी यांचे सुध्दा नुकतेच निधन झाले आहे. ते या सभागृहात प्रदिर्घ काळापासून सदस्य होते, तर त्यांचेसुध्दा नाव श्रध्दांजली प्रस्तावात समाविष्ट केले जावे.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-** मा. महापौरजी, श्रध्दांजली अर्पित करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घातला जावा. त्यानंतरच श्रध्दांजली अर्पित केली तर योग्य होईल. श्री. टाले यांनी जो प्रस्ताव दिला आहे तो सुध्दा श्रध्दांजलीसाठीचाच आहे.

## शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :-१) श्री. राजेंद्र चौधरी
२) श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :-१) श्री. लाल पंजाबी
२) श्री. प्रमोद टाले

प्रबोधनकार ठाकरे यांचे चिरंजिव, हिंदु हृदय सम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे धाकटे बंधू व्यंग चित्रकार व संगितकार श्री. श्रीकांतजी ठाकरे, यांचे काही दिवसापूर्वी आजाराने निधन झाले. तसेच ठाण्याचे आमदार श्री. मो. दा. जोशी हे १९७० साली शिवसेनेचे पहिले जिल्हाध्यक्ष झाले होते. आणि १९८६ साली ते ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते, १९९९ पासून आजपर्यंत महाराष्ट्र विधान सभेत आमदार होते. याचबरोबर नाशिकचे श्री. धैर्यसिंगराव पवार जे की शिवाजी महाराजांच्या नातेवाईकांपैकी होते, राजवाड्याला आग लागल्यानंतर गुदमरुन त्यांचा मृत्यु झाला, भारतीय चित्रपटसृष्टीमध्ये विनोदी नटी म्हणून ज्यांनी कारर्किद गाजविली त्यांना पाहिल्यानंतरच लोकांना हसू यायचे अशा त्या टुणटुण त्यांना उमादेवी असे म्हटले जायचे गायिका म्हणून त्यांनी पदार्पण केले. परंतु नंतर त्या विनोद नटी म्हणून प्रख्यात होत्या, पंतप्रधान योजना , ज्या योजनेमध्ये रस्त्यांची कामे केली जात होती आणि त्यामध्ये प्रचंड असा भ्रष्टाचार होता. त्यामध्ये टक्केवारीचे प्रमाण प्रंचड वाढले होते, हे प्रकरण ज्या इंजिनिअरने उकरुन काढले तो दुबे आडनावाचा ३० वर्षाचा इंजिनिअर ज्याचे बिहारमध्ये हत्त्या झाली आहे, त्याचबरोबर उल्हासनगरमधील एक सफाई कर्मचारी ज्यांने पत्नी व स्वतःची आत्महत्त्या करुन घेतली तो श्री. गोपाल मरोठिया व त्याची पत्नी श्रीमती रेखा मरोठिया व या सभागृहाचे या सभागृहात प्रदिर्घ काळापासून सदस्य असलेले एक जेष्ठ सदस्य श्री. आनंदराम बिजलानी, या सर्वांचे नुकतेच निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या सर्व मृतांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १०९ (अ)** **दिनांकः-१९/१२/२००३.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. श्रीकांतजी ठाकरे, श्री. मो. दा. जोशी, श्री. धैर्यसिंगराव पवार, हास्य अभिनेत्री टुणटुण (उमादेवी), श्री. दुबे, श्री. गोपाल मरोठिया ,श्रीमती रेखा मरोठिया, श्री. आनंदराम बिजलानी या सर्वांच्या

*निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.*

<u>*एकमताने*</u>

*महापौर / पिठासिन अधिकारी*
*सर्वसाधारण महासभा*
*उल्हासनगर महानगरपालिका*

<u>*मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-*</u> *मा. महापौरजी,तुम्ही येथिल रिपब्लीकन जनतेच्या व शहरातील सर्व जनतेच्या भावनेचा विचार करुन आज या सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावण्याची जी परवानगी दिलीत, त्याबददल तुमचे, उप-महापौर, व आयुक्त यांचे विशेषतः मी आभार मानतो आणि मी आयुक्तांना विनंती करेल की, या सभागृहामध्ये सर्व राष्ट्रपुरुषांची तैलचित्रे लावण्यासाठी एक रितसर प्रस्ताव या महासभेमध्ये आणावा. आणि मी आता मा. महापौरांना विनंती करेल की, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तैलचित्राला हार अर्पण करुन हे रितसर आणावे.*

<u>*मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-*</u>*मा. महापौरजी, आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तैलचित्रास सभागृहात आणण्यास जी परवानगी दिलीत त्याबददल रिपब्लीकन पार्टीच्या वतीने मी आपले आभार मानतो. तसेच मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. सभागृहनेता, मा. विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते व सर्व सदस्य यांनी जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचे आभार मानतो आणि त्याचबरोबर हे तैलचित्र पुन्हा सभागृहाबाहेर जावू नये अशी विनंती करतो.*

<u>*मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :-*</u>*मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सभागृहात बसलेले सर्व सदस्य यांना विनंती आहे की, महापालिका इमारतीच्या प्रवेशद्वारासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसविला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीचा पुतळा बसविलेला आहे. त्याप्रमाणे आपणांस विनंती आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचेही सभागृहात तैलचित्र लावण्यास परवानगी दया. याबाबत खुलासा केला जावा.*

<u>*मा. सदस्य श्री. चिमण रुपानी :-*</u> *मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव आणि सर्व सन्मानिय सदस्य, आज मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सभागृहात तैलचित्र लावण्यास जी परवानगी दिलीत त्याबददल मी मा. महापौरांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर सिंधी समाजाचे दैवत पूज्य झुलेलालजी यांचे तैलचित्र लावण्यास जी परवानगी दिलीत त्याबददलही मा. महापौर व सर्व सन्माननिय सदस्यांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर आमचे सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी जसे म्हटले की, सभागृहात आमच्या देशाचे सर्व राष्ट्रपुरुष जसे की, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी यांचे सुध्दा तैलचित्र सभागृहात लावली जावीत. धन्यवाद.*

<u>*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-*</u> *मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव आणि सर्व सन्मानिय सदस्य, ही जी तैलचित्रे लावली जातील त्यामध्ये आमच्या गुरुनानक यांचेही तैलचित्र लावले जावे. अशी आमची मागणी आहे.*

<u>*मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-*</u> *मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावण्या कामी*

परवानगी मागण्याची सुरुवात केली आणि त्यानंतर मला असे वाटते की, सर्व सभागृह त्यांच्या मागे रांगेत उभे आहे. सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लागले पाहिजे या विषयास मला नाही वाटत की, कुण्या सदस्यांने विरोध केला असता? जर महानगरपालिकेने हे तैलचित्र लावले असते, जर हा प्रस्ताव योग्य पध्दतीने आला असता महापालिकेच्या वतीने एक मोठे तैलचित्र येथे लावले असते. तर मला नाही वाटत की, या सभागृहामध्ये बसलेल्या कुण्याही सदस्याने त्यास विरोध केला असता? येथे ते तैलचित्र आले आहे ही चांगली गोष्ट आहे, परंतु असे होते की, जेव्हा एखादया गोष्टीला चुकीच्या पध्दतीने मान्यता मिळते त्यानंतर अशी ही रांग लागते. आता या सभागृहामध्ये ८१ सदस्य आहेत. प्रत्त्येकाच्या मनामध्ये आपापले आदर्श आहेत. मला असे वाटते की, जर खरोखरच आपल्या मनामध्ये एखादया व्यक्तीबददल आदर , सन्मान आहे, तर आमचे वागणे सुध्दा त्या प्रकारचे असले पाहिजे. म्हणून त्यांचा कधीही प्रत्त्यक्ष अप्रत्त्यक्ष अपमानसुध्दा होवू नये. मागच्या वेळेस सुध्दा असेच झाले होते, महात्त्मा फुलेच्या पुतळयाचा विषय होता, त्यावेळेस सुध्दा हा विषय निघाला की, पुज्य झुलेलाल यांचाही पुतळा लागला पाहिजे, त्यानंतर आठवण झाली की, अण्णाभाऊ साठेंचा पुतळा बसविण्यास यापूर्वीच मंजुरी मिळालेली आहे. शहरामध्ये वल्लभभाई पटेलांपासून , शामाप्रसाद मुखर्जीपासून बरेचसे पुतळे या शहरात लागलेले आहेत. त्या पुतळयांची स्थिती खराब आहे. येथे जे पुतळे बसविलेले आहेत, त्यांचा मानसन्मान ठेवण्याचे आम्ही विसरतो, व नविन नविन प्रस्ताव आपणाकडुन येत असतात. आता जी बाब झाली आहे, खरेच मला त्यावर काही टिप्पणी करायची नव्हती, काही विषय असे असतात की, त्यांच्यावर टिप्पणी करणे किंवा सत्त्य बोलणे हे सुध्दा एक त्रासाचे होते. आता येथे तैलचित्र लावण्यास मान्यता मिळाली आहे. लोकांनी आनंद व्यक्त केला आहे. परंतु त्याच प्रमाणे काही विषय सुध्दा असे असतात की, ज्यांच्यावर आजच्या तारखेला काही रुढी नाही, काही काही विषय असे आहेत , सदस्यांस माहिती असते की, मी हे बोलल्यानंतर इतरांना हो बोलणे भागच आहे, तर मला असे वाटते की, या परिस्थितीचा आम्ही दुरुपयोग करता कामा नये. व आज येथे जे तैलचित्र लागले आहे ते येथे कायम राहिले पाहिजे. त्याचा आम्ही योग्य तो सन्मान तर करुच परंतु मी अशी मागणी करतो की, सर्वांच्या संमतीने महानगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोठे तैलचित्र सभागृहात लावले पाहिजे हीच योग्य अशी पध्दत आहे. व शासनास सुध्दा माहित आहे की, कोण-कोणते राष्ट्रपुरुष आहेत. सरकारी कार्यालयांमध्ये कोण-कोणती तैलचित्रे लावली जातात. कोणती तैलचित्रे लावावीत याबाबत शासनाच्या सुध्दा मार्गदर्शक सूचना आहेत. जर आम्ही एखादया स्थानिक स्वराज्य संस्थेत बसलेलो आहोत. तर आम्हांला कुठे ना कुठे या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंबन करावा लागणार आहे. आम्हांला ते तर करायचेच आहे. तर मी असे समजतो की, असे एक-एक प्रस्ताव आणून आमचे जे राष्ट्रीय नेते आहेत त्यांचा प्रत्त्यक्ष किंवा अप्रत्त्यक्ष अपमान न करता सर्वांचा एकत्रितपणे प्रस्ताव आणावा. व यापूढे अशाप्रकारचे प्रस्ताव योग्य त्या पध्दतीने महानगरपालिकेच्या वतीने महासभेपूढे आणले पाहिजेत. अशी माझी सूचना आहे.

<u>मा. महापौर :-</u>आयुक्त साहेबांना मी निर्देश देते की, येणा-या महासभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पूज्य झुलेलाल यांची सभागृहात तैलचित्रे लावण्याबाबतचा प्रस्ताव महासभेपूढे आणावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> पूज्य गुरुनानक यांच्या तैलचित्राचाही ..........

<u>मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ताः-</u> राष्ट्रपिता महात्त्मा गांधी यांचेही तैलचित्र सभागृहात लावले जावे नाहीतर आमचा यास विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>गुरुगोविंदसिंह यांचेही तैलचित्र सभागृहात लावले जावे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-सभागृहात कोणकोणती तैलचित्रे लावली पाहिजेत की ज्या बाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्या हिशोबाने सर्व तैलचित्रे लावली जावीत. व मा. महापौरांना मी विनंती करतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तैलचित्राचे अनावरण केले जावे.

मा. महापौर :-ठिक आहे, मी आपल्या म्हणण्याशी सहमत आहे. समिती तयार करु या समितीमध्ये सभागृह नेता , विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते यांच्या संमतीने कोणकोणती तैलचित्रे लावावीत याचा निर्णय घेवू.

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :- महापौर महोदया, धन्यवाद.

मा. सदस्य श्री. गणपत ऐडके :- मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, माझी या सभागृहास अशी विनंती आहे की, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचे तैलचित्र सभागृहात लावण्यात यावे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-आयुक्त साहेब माझी सभागृहाला विनंती आहे की, मागच्या सभेमध्ये ...............

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):- कृपया सन्माननिय सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता......................

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-सचिव साहेब, मला जरा बोलू दिले जावे त्यानंतर कामकाज पूढे चालवावे, त्याच संदर्भात माझे बोलणे आहे.

मा. महापौर :- तैलचित्र लावण्यास मी परवानगी दिलेली आहे, आता त्याचे अनावरण करायचे आहे.

मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-सर्व पक्षाचे गटनेते यांनी कृपया मंचावर यावे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :- सन्माननिय महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, मी या पुतळयाच्या आणि या तैलचित्राच्या संदर्भामध्ये सभागृहाला एक विनंती करेल, मला हा विषय मांडण्याकरीता अत्यंत दुःख वाटते की, १९९६-९७ मध्ये नगरपालिका असतांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्यास त्याच वेळेस मंजुरी मिळाली होती. ६ लाखाचा निधी मंजूर केला होता, तरी सुध्दा त्या पुतळयाचे आता पर्यंत कुठलेही काम पूर्ण झालेले नाही की, आज लहूजी सेनेचा व मातंग सेनेचा एक मोर्चा आलेला आहे व उपोषण या महापालिकेसमोर सुरु असून, अशी उपोषणे, धरणे , मोर्चे यांचे आयोजन कित्येक वेळा करण्यात आलेले आहे व त्यांच्यामध्ये मी सक्रिय व अग्रभागी असतांनाही हा विषय आजपर्यंत लांबणीवर टाकण्यात आलेला आहे. मला एक असे म्हणायचे आहे की, त्या काळच्या प्रशासनापासून शासनापर्यंत दलितावर एक जाणीवपुर्वक अन्याय करणारा हा एक विषय चालत आला आहे. म्हणून माझी याठिकाणी मा. महापौर, आयुक्त साहेब व सभागृहाला विनंती आहे की, अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्यासाठी जर शासनाची परवानगी लागते तर याची जाणीव मलाही आहे. आणि त्या प्रमाणे जर ती मान्यता मिळत नसेल तर मी सभागृहाला विनंती करेन की, आपल्या महापालिकेच्या हद्दीमध्ये जितकी उदयाने असतील तर, जसे मुंबई महानगरपालिकेमध्ये अण्णाभाऊ साठे उदयान म्हणून एक उदयानच देवून त्याठिकाणी त्यांचा पुतळा प्रस्थापित करण्यात आलेला आहे त्याप्रमाणे या महापालिकेमध्ये कुठलेही एक उदयान अण्णाभाऊ साठे यांच्यासाठी देण्यात येवून त्याठिकाणी त्यांच्या पुतळयाची उभारणी करण्यात यावी अशी मी या सभागृहाला व प्रशासनाला विनंती करतो. दुसरी गोष्ट अशी आहे की, वेळोवेळी हा समाज , ही संघटना, आंदोलन, उपोषण, मोर्चे हे जर

काढतच राहिली तर एका विषयासाठी सारखेसारखे मार्च व सारखीसारखी आंदोलने करणे ही एक समाजाची नैतिक समाजाची जबाबदारी पडते. आपण दलित समाजावर अन्याय करीत आलो आहोत किंवा करीत आहोत. हे सिध्द होता कामा नये. दुसरी गोष्ट अशी की, पुतळा बसविण्याकरीता जो विलंब लागलेला आहे, तर तो का लागलेला आहे? कशामुळे लागलेला आहे? त्यामध्ये ज्या त्रुटी आहेत , त्या त्रुटींबाबत आमची अशी मागणी आहे की, कमीत कमी या शहरामधील लहान मोठे एक उदयान अण्णाभाऊ साठे उदयानम्हणून जाहिर करावे ही विनंती. सपना गार्डनमध्ये ही जरी एका बाजूची जागा दिली तरी चालेल, आम्ही फार मोठया लालचीचे लोक नाहीत. लहान-मोठे का होईलना एखादे उदयान अण्णाभाऊ साठे उदयान म्हणून दिले गेले पाहिजे. या शहरामध्ये अण्णाभाऊ साठेंच्या नावाने कुठेही उदयान किंवा त्यांचा पुतळा नाही......... मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी या सभागृहात जो मुददा मांडला त्याबाबत आपण खुलासा करावा हा पुतळा नेमके कुठे बसविणार? की नाही बसविणार? यासाठी एक छोटया-मोठया उदयानाची जी मागणी केली ती तुम्ही देणार की नाही देणार ? देवू शकतात की नाही देवू शकत? असे काहीतरी त्याचा खुलासा झाला पाहिजे. हा विषय सभागृहामध्ये किंवा सभागृहाबाहेर पेटता कामा नये. म्हणून याचा खुलासा व्हावा ही विनंती.

<u>मा. महापौर :-</u> अण्णाभाऊ साठेंच्या पुतळयाबाबत एक समिती गठित केली जाईल आणि त्याबाबत निर्णय घेतला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> मा. महापौरजी, समिती गठित करण्याचा हा विषय नाही. हा विषय १९९७-९८ सालापासून चालत आलेला आहे. याच्याकरीता आंदोलने आणि उपोषणे कशाकरीता? याच्याकरीता तुमच्या प्रशासनाचा काय विचार आहे? तुम्हांला अण्णाभाऊ साठेंच्या पुतळयाकरीता जागा देता येईल का? कि नाही? एखादे उदयान देण्यासारखे आहे किंवा नाही? असे स्पष्ट उत्तर दयायला पाहिजे. यासाठी समिती गठित करून वर्षभर असेच करत राहणार का? मी आयुक्त साहेबांना विनंती करेन की, त्यांनी याबाबत खुलासा करून सांगावे. नक्की काय ते.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> मा. आयुक्तांनी खुलासा करण्याअगोदर मी एक सूचना करतो की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयाच्या संदर्भात नगरपालिका असतांना जो ठराव आला होता, ठराव पास पण झालेला आहे, परंतु त्यामध्ये तांत्रिक अडचणी ज्या आहेत किंवा जागेबददल काही अडचणी असतील त्या अडचणी लवकरात लवकर सोडवून तावडतोब हा पुतळा उभा करण्यास काही हरकत नाही. आणि मला वाटते महापौरांच्या कारकिर्दीत त्याचे अनावरण जर करता आले तर ते जास्त चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्याबाबत चर्चा चालू आहे. त्यांच्याबाबत मागील महिन्यामध्ये आम्ही ठराव केला आहे. मा. ज्योतीबा फुले यांच्या पूतळयाबाबत विषय आला होता. त्यास ३-४ आणखी नावे जोडुन सर्व संमतीने ठराव पारीत केला होता. व सांगितले होते की, महानगरपालिकेच्या कार्यालयाच्या आवारात म्हणजे जेथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व राष्ट्रपिता महात्मा गांधीचा पुतळा आहे. त्यांच्या बाजूला हे दोन-तीन पुतळे लावले पाहिजेत. कारण की, जो ठराव आला होता त्यांच्या जागेबाबत कोणतीही आम सहमती होत नव्हती. कुर्ला कॅम्प, लालचक्की किंवा संभाजी चौक , किंवा कैलास कॉलनी या जागांपैकी जर आम्ही महानगरपालिका कार्यालयाबाहेर कुठेही पुतळा बसवायचा झाला तर त्यास राज्य शासनाची परवानगी लागते. परंतु महानगरपालिका कार्यालयाच्या आवारात पुतळा बसविण्यासाठी आम्हांला महाराष्ट्र शासनाच्या परवानगीची आवश्यकता वाटत नाही. व याकामी निधी सुध्दा उपलब्ध आहे. तर हे जे लोक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयासाठी उपोषण करत होते, मी आयुक्त साहेबांच्या

आदेशानुसार उपायुक्त मुख्यालय यांच्याबरोबर गेलो होतो व त्यांना लेखी सुध्दा दिले की, मागील महिन्यामध्ये याबाबतचा ठराव सूध्दा पारीत झालेला आहे. त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होईल. मागील महिन्यामध्ये आम्ही जो ठराव पारीत केलेला आहे त्यामध्ये उल्लेख केलेले पुतळे लवकरात लवकर बसविले जातील जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधीचा पुतळा बसविण्यात आला आहे, त्यांच्या बाजूला, याबाबत वास्तुविशारद तज्ज्ञांचा सल्ला घेवून या पुतळयांच्या बाजूलाच कशयाप्रकारे पुतळे बसविता येतील हे जरुरीचे आहे. व आज भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचे येथे जे तैलचित्र, श्री. शांताराम निकम व श्री. प्रमोद टाले यांनी जे लावले आहे त्याचे आम्ही सर्वांनी पुष्पहार व पुष्पअर्पण करुन स्वागत केले मला वाटते ते तैलचित्र नेहमी करीता तेथे लावलेले राहो. तसेच आणखी कुण्या सदस्यास, कुण्या राष्ट्रपुरुषाचे तैलचित्र लावायचे असेल तर ते सुध्दा एका रांगेतच लावले पाहिजे. अशी माझी सभागृहास विनंती आहे, जसे मी म्हटले की, आम्ही सुध्दा पुढील महिन्यामध्ये पुज्य श्री. साई झुलेलाल यांचे तैलचित्र लावू. महापौरांनी मला परवानगी दिली आहे की, आपण पुढील महिन्यामध्ये तैलचित्र लावा. त्याचप्रमाणे जर कुणी आमचा मा. सदस्य दुस-या कुण्या राष्ट्रपुरुषाचे तैलचित्र लावू इच्छित असेल तर त्यास आमची हरकत असता कामा नये, व यावर सुध्दा राजकरण करता कामा नये. हे जे आम्ही राष्ट्रपुरुषांचे पुतळे बसवितो किंवा तैलचित्रे लावतो त्यासाठी सर्वांना प्रेम असले पाहिजे, सर्वांच्या मनामध्ये त्याबाबतीत चांगली भावना असली पाहिजे. सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. तर मला असे वाटते की, महापालिकेमध्ये व महापालिकेच्या आवारात पुतळे बसविण्याबाबत मागील महिन्यामध्ये आम्ही जो ठराव केला आहे, त्याबाबत राज्य शासनाच्या परवानगीची काही आवश्यकता नाही. महात्मा गांधी, व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविलेला आहे. जसे की, शिवसेना व भाजपाच्या कालावधीत १९९७-९८ मध्ये व आमचे प्रथम महापौर श्री. गणेश चौधरी यांनी आमचे मा. छत्रपती शिवाजी महाराज यांचा सभागृहात मंचावर जो पुतळा ठेवला आहे, त्यावेळस सर्वांनी त्याचे स्वागत केले होते, कुणीही हरकत घेतली नव्हती. आजपर्यंत तो जसा आहे तसाच तो तेथे आहे, सर्वजण सभागृहात प्रवेश करतांना त्यांना अभिवादन करतात, तर अशाच प्रकारे सर्वांना त्यांच्याबाबत व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत आदर आहे. महाराज भुल्लर म्हणतात की, गुरुगोविंदसिंह यांचेही तैलचित्रे लावायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> गुरुगोविंदसिंह नाही, गुरुनानक.......

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> क्षमा करा. गुरुनानक यांचे तैलचित्र.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> गुरुगोविदसिंह यांचे तैलचित्रे नाही लावले तरी चालेल परंतु गुरुनानक यांचे तैलचित्र लावलेच पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> तर ते पण लावले पाहिजे. श्री. प्रभुनाथ गुप्ता हे सुध्दा कुणाची आठवण करत असतील तर त्यांचे सुध्दा तैलचित्र लावले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :-</u> महात्मा गांधीजी यांच्या तैलचित्राबाबत मी म्हटले होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>माझ्या मते पूर्ण सभागृह भरले तरी काही हरकत नाही. सर्वांची तैलचित्रे लागली पाहिजेत. त्यासाठी ओळ निश्चित करुन दिली पाहिजे की या या ठिकाणी आपण तैलचित्रे लावू शकतात. म्हणून या प्रस्तावावर जास्त चर्चा न करता हा एक राजकिय मुददा आहे यावर आम्ही सर्वसंमतीने निर्णय घेतला तर या बाबत आयुक्त साहेबांना निवेदन करण्यास न सांगता मा. महापौर जर निर्णय देत असतील तर अधिक चांगले होईल तर

यासाठी सर्वांना महापुरुषांबाबत आदर असला पाहिजे. याबरोबर दोन शब्द संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा. आयुक्त साहेब, उड्डान पुलाच्या येथे शाहू महाराजांचा जो बोर्ड होता, मार्बलचा, तो अजून तेथे लागलेला नाही, कोनाशिला. मागची सूचना अशी आहे की, तो बोर्ड तुम्ही तेथे लावणार होतात, ती जागा तेथून बदलली नाही पाहिजे. अजून बोर्ड लागत नाही याचा अर्थ काय? साहेब तिथे जागा बदललेली आहे असे समजते. कुणाची तरी जागा वाचविण्यासाठी तिथे जागा बदलली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, ती जागा बदललेली नाही फक्त तो बोर्ड इनग्रेव्हींग साठी दिलेला आहे. जी नावे एकवेळ बोर्डवर लिहिली जातात नंतर ती नष्ट होतात ती नष्ट होवू नयेत म्हणून इनग्रेव्हींग करण्यासाठी दिलेली आहे नंतर तो फलक त्याच जागेवर, पहिले ज्या जागेवर लावला होता त्याच जागेवर लावला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u> आणखी किती दिवस लागतील? आता तीन महिने झाले तो फलक कुठे पाठविला आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>आता शहर अभियंता नाहीत. किंवा कार्यकारी अभियंता सुध्दा नाहीत, परंतु मी लवकरात लवकर काम करुन घेईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> यामध्ये एक दुरुस्ती आहे. त्यांनी जसे म्हटले त्याप्रमाणे तो फलक तेथे लागलाच पाहिजे. मास्टर चंदरचा मार्गाचा जो फलक आम्ही लावला होता तो सुध्दा काढून टाकण्यात आलेला आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>तो सुध्दा इनग्रेव्हींग करण्यासाठीच काढण्यात आलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> तर तो सुध्दा तेथे लागला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणी :-</u>मा. महापौरजी, माझी एक सूचना आहे की, जी पण महापुरुषांचे तैलचित्र लावली जातील त्यांचा आकार निश्चित केला जावा. एकाच आकाराची जर ती तैलचित्रे लागली तर खुपच चांगले होईल, पाहण्यास सुध्दा खुपच चांगले दिसेल. व लहान-मोठे फोटो लागले जाणार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> मा. महापौरजी, सभागृहनेत्त्यांनी सांगितले की, आपण तैलचित्रे लावण्यास परवानगी दिली आहे. तर पुढील महासभेत आम्ही तैलचित्रे घेवून यावीत का? सभागृहनेत्त्यांनी सांगितले की, परवानगी दिलेली आहे. तर त्यासाठी आतापासूनच प्रयत्त्न करावे लागतील ना? आकार वगैरे सांगितला जावा कोणत्त्या आकाराची तैलचित्रे लावली जातील? त्याप्रमाणे आता ऑर्डर दिल्यानंतरच कुठे ती तैलचित्रे लागतील ना? आता आपण निर्णय घ्या. तर पुढील महासभेत तैलचित्रे आणावीत की नाही? महापौरजी परवानगी आहे ना? ठिक आहे तर पुढील महासभेत तैलचित्रे घेवून येतो.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, सभा सुरु होण्यापूर्वी मी एक अभिनंदन प्रस्ताव आणू इच्छितो की , आमचे आयुक्त मा. श्री. रमनाथ सोनवणे यांनी कार्यभार स्विकारण्याच्या वेळी एक श्वेतपत्रिका काढली होती. व त्याच्यात सांगितले होते की, पाण्याची समस्या काही दिवसातच सोडविली जाईल. तर मी येथे आपणासर्वांना येथे सांगू इच्छितो की, आमचा जो प्रभाग आहे, त्या प्रभागात, जेव्हा आयुक्त साहेबांनी पदभार स्विकारला त्यावेळेस १७-१८ टॅंकर दर दिवशी येत होते, आजची स्थिती अशी आहे की, फक्त ४-५ टॅंकरने

आमच्या प्रभागात पाणी पुरवठा होत आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, मी कधी असा विचारही केला नव्हता की एवढया लवकर येथिल कामे होतील. आयुक्त साहेबांना पत्र लिहित होतो स्मरण पत्र देत होतो की, हे काम का होत नाही , पाणी पुरवठ्याचे काम का होत नाही? व सभागृहात सुध्दा मी असे म्हटले होते की, रस्त्यावरुन जेव्हा आम्ही जातो तेव्हा लोक आमच्याकडे पाहत सुध्दा नाहीत. लोकांमध्ये आमच्याबाबत एवढा तिरस्कार निर्माण झाला आहे. परंतु आज परिस्थीती एकदम उलट झाली आहे. आता जेव्हा आम्ही रस्त्यावरुन जातो, तर लोक आम्हांला चहापाण्यासाठी घरी घेवून जातात. त्यामागे आयुक्त साहेबांची जी टिम आहे, त्या टिमचे पूर्ण श्रेय आहे. त्यामध्ये श्री. जवांदे साहेब, श्री. डोईफोडे साहेब, श्री. कांबळे, श्री. भोये ही टिम आहे, या पूर्ण टिमने माझ्या प्रभागात पाणी पुरवठ्याचे काम सुरळीत केले आहे. सोनवणे साहेबांनी आयुक्त म्हणून जेव्हा कार्यभार स्विकारला होता, तेव्हा माझ्या प्रभागात ८० टक्के विभागात पाणी पुरवठा पुरेसा होत नव्हता. फक्त २० टक्के पाणी पुरवठा होत होता आता परिस्थती उलट आहे ८० टक्के पाणी पुरवठा होत आहे, फक्त २० टक्के विभागात अपूरा पाणी पुरवठा होत आहे. या विभागातील समजशाही एक-दोन महिन्यात सुटेल तर त्यांनी तेथिल जनतेला जो पाणी पुरवठा सुरळीत करुन दिला आहे, त्याबाबत मी आयुक्त साहेब व त्यांच्या पूर्ण टिमचे अभिनंदन करु इच्छितो.

<u>मा. उप-महापौर :-</u> मा. सदस्य श्री. निकम यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यांच्या प्रभागात पाणी पुरवठा होत आहे ही चांगली गोष्ट आहे, परंतु बरीचश्या प्रभागांमध्ये पाण्याची समस्या आहे, मी आयुक्त साहेबांना निवेदन करते की, आपण त्या विभागांकडे लक्ष दया. याबाबत आपणांस जी-जी पत्र मिळाली आहेत, मा. सदस्य श्री. निकम यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यांच्या प्रभागातील लोक त्यांना चहापाणी पाजतात ही चांगली गोष्ट आहे, तर मला सुध्दा चहापाणी करावे अशी लोकांमध्ये इच्छा व्हावी, तर चहा तर नको पण कमीत कमी पाणी तरी आम्ही लोकांना देवू शकू. ज्यामुळे त्यांनीसुध्दा आम्हांला एक ग्लासभर पाण्याची ऑफर करावी एवढी अपेक्षा मी आयुक्त साहेबांकडुन जरुर करु इच्छिते.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :-</u> मा. महापौरजी, माझ्या १८ नं. पॅनल मध्ये पाणी पुरवठा बरोबर होत नसल्याबाबत आम्ही आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. १८ नं. पॅनल मध्ये पाण्याची खुप टंचाई आहे. व ब-याच दिवसापासून टंचाई आहे. आम्ही २२ तारखेला याबाबत आम्ही मोर्चा काढणार असल्याचे आम्ही आपणांस पत्रही दिले आहे. परवानगीही घेतली आहे, आमचे आपणांस निवेदन आहे की, आम्ही आपणांस वारंवार म्हटलेही आहे की १८ क्रमांकाच्या पॅनल कडे आपण लक्ष देवून तेथिल पाण्याची समस्या सोडवावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :-</u> मा. महापौरजी, मागील महासभेत मी म्हटले होते की, उल्हासनगर कॅम्प -५ येथे जीन्स पॅन्ट धुलाईचे जे कारखाने चालू आहेत, तर त्याबाबत काय झाले ते जरा आयुक्त साहेबांना विचारावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हया ज्या जीन्स डाईंग व ब्लीचींगच्या कारखाने आहेत कॅम्प क्र. ५ येथे त्यामधील १३ कारखान्यांची आम्ही पाहणी केली. त्यापैकी ५ ठिकाणी नळ जोडणी मंजुर करुन घेतलेली आहे. ३ ठिकाणी ते लोक बोरवेलचे पाणी वापरत आहेत. व ५ ठिकाणी अनाधिकृत नळजोडण्या होत्त्या. त्या हटविण्यात आल्या आहेत. १३ पैकी ५ ठिकाणी अनाधिकृत नळजोडण्या असल्याचे आढळून आले आहे. व त्या खंडित करण्यात आल्या आहेत. व कॅम्प नं. ५ मध्ये गायकवाड पाडा व इतर ठिकाणी आणखी काही ठिकाणी डाईंग व ब्लिचींगचे कारखाने आहेत. तेथे सुध्दा आमची

पाहणी चालू आहे.  जेवढे काही अनाधिकृत नळजोडण्या आढळून येतील त्या खंडीत केल्या जातील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> अनाधिकृत नळजोडण्या फक्त खंडीत करणार आहात का त्यांच्यावर कारवाई करणार आहात?  अनाधिकृत नळजोडण्या ग्राहय आहेत का?  जेवढया वर्ष त्यांनी त्या घेतल्या, त्या घेतल्या............

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> पहिले तर त्या खंडीत केल्या, त्यानंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई जी करायची आहे ती करण्याचे आदेश दिले आहेत.  आता माझ्याकडे जी माहिती आहे ती फक्त खंडीत केलेल्या नळ जोडण्यांची.  परंतु कायदेशीर कारवाईसुध्दा पुढे केली जाईल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. २१८ हा श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे. ते आजच्या सभेस अनुपस्थित असल्याने त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र. २१९ हा श्री. विश्वनाथ पाटील यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २१९:</u>-उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात जनावरांचे (गाई व म्हशीचे) किती तबेले आहे?  त्यांना महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय? त्यांच्या तबेल्यातून निर्माण होणा-या कच-यांची विल्वाट कोण व कशाप्रकारे लावतो? त्यापासुन नागरीकांना होणा-या असुविधा व त्रासास जबाबदार कोण? यापूर्वी काही तबेल्यावर कारवाई करण्यात आली आहे काय?  तरी कृपया वरील प्रश्नांची येत्या महासभेत माहिती दयावी ही विनंती.

<u>उत्तरः</u>-उल्हासनगर शहरात गायी म्हशींची एकुण २१० तबेले आहेत, सदर तबेल्यांना तबेला म्हणून महानगरपालिकेनेउपरवानगी दिल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन आढळून येत नाही.  तबेल्यांच्या आतील भागाची स्वच्छता संबंधीत मालक स्वतःच करतात.  तथापी काही कचरा रस्त्यावर अथवा नालीमध्ये टाकल्यास महापालिकेमार्फत उचलण्यात येत आहे.  कचरा दिसताच त्यांची विल्हेवाट लावण्यात येते, त्यामुळे महापालिका प्रशासनाची जबाबदारी प्रशासन वेळीच पार पाडते.  तबेल्यांमुळे दुर्गंधीचा त्रास झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधितास यापूर्वी तसेच वेळोवेळी नोटिस काढुन समज देण्यात आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब व सभागृहात उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य, प्रश्न असा विचारला होता उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात जनावरांचे (गाई व म्हशींचे) किती तबेले आहे?  त्यांना महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय? त्याचे आरोग्य खात्याच्या उपायुक्तांनी उत्तर दिलेले आहे की, उल्हासनगर शहरात गायी म्हशींची एकुण २१० तबेले आहेत, पण सदर तबेल्यांना तबेला म्हणून महानगरपालिकेने परवानगी दिल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन आढळून येत नाही याचा अर्थ काय?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, याचा अर्थ हाच आहे की, ते जे सर्व तबेले आहेत ते अनाधिकृत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u>तबेले म्हणून त्यांना परवानगी दिलेली नाही मग काय म्हणून परवानगी दिलेली आहे? तबेले म्हणून परवानगी दिल्याचे आढळून येत नाही.  मग तबेलेले तर चालू आहेत २१०, तुम्ही उत्तरात दिले आहे २१० तबेले चालू आहेत.

__मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-__ मला वाटते आपण आपले सर्व उपप्रश्न विचारल्यानंतरच मी काही उत्तर देवू शकेन.

__मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-__ परंतु त्यांचे स्पष्ट उत्तर दिलेले नाही. अभिलेखामध्ये तबेला म्हणून परवानगी दिल्याचे आढळून येत नाही, तर मग काय म्हणून परवानगी दिलेली आहे? मग काय म्हणून परवानगी दिलेली आहे? आणखी काही आहे तेथे, तबेला म्हणून परवानगी दिली आहे? २१० तबेले तर आहेतच तेथे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये पण परवानगी दिल्याचे आढळत नाही. याचा अर्थ व्यवस्थित लागत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे, जर परवानगीच नसेल त्याला तर मग तबेले कसे चालू आहेत? त्याच्यावरती आजपर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे? दुसरी गोष्ट तबेल्यातील आतील

__प्रश्न क्र. २२०:__-२००३-२००४ या आर्थिक वर्षासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने अंदाजीत केलेल्या 'अ' अंदाजपत्रकातील एकूण उत्त्पन्नापैकी किती टक्के उत्त्पन्न १ एप्रिल ते ३१ जुलै, २००३ या कालावधीत प्रत्यक्ष झाला आहे.

'अ' अंदाजपत्रकातील एकणू अंदाजित खर्चापैकी किती टक्के खर्च सदरच्या कालावधीत प्रत्यक्ष झाला आहे?

__उत्तर:__-सन २००३-२००४ या आर्थिक वर्षासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने रुपये १,२०,९९,१५,०००/- एवढी रक्कम जमा हाईल हे 'अ' अंदाजपत्रकामध्ये अंदाज केलेला आहे. १ एप्रिल, २००३ ते ३१ जुलै, २००३ रुपये २७,१२,४९,७८४/- (२२.४१ टक्के) एवढी रक्कम प्रत्यक्षामध्ये जमा झालेली आहे.

'अ' अंदाजपत्रकामधील एकुण खर्च १ एप्रिल, २००३ ते ३१ जुलै, २००३ या कालावधीमध्ये १७,०३,३२,५४०/- (१६.६८ टक्के) एवढा हा खर्च झालेला आहे. २००३-२००४ या वित्तीय वर्षासाठी रुपये १,०२,११,७०,०००/- एवढा खर्च अंदाजीत आहे.

__प्रश्न क्र. २२१:__-३१ मार्च ०३ रोजी देय असलेली रक्कम वगळल्यास सी-४ (I) सी-४ (II) सी-४ (IV)सी-४ (XII) सी-४ (XIII) सी-४ (XIV) सी-४ (XV) सी-४ (XVI) या लेखा शिर्षात प्रत्त्येकी उरलेली रक्कम किती?

सदरच्या उर्वरीत रक्कमांपैकी किती लेखा शिर्षातर्गत ३१ जूलैपर्यंत किती खर्चाच्या किती कामांना मंजुरी देण्यात आली आहेत?

पैकी किती कामे प्रत्यक्ष सुरु झाली आहेत?

__उत्तर:__- सी-४(१) -----------
सी-४(२) = ३९,९०,७००/- ४ कामे २ काम प्रगतीपथावर
सी-४(४) = ३३,०६,९३७/- १५ कामे ११ काम प्रगतीपथावर
सी-४(१२)= १०,२६,६१०/- १० कामे ६ काम प्रगतीपथावर
सी-४(१३)= १८,००,८६०/- १८ कामे ८ काम प्रगतीपथावर
सी-४(१४)= १,४९,७७९/- १ कामे ---------------
सी-४(१५)= ४,६९,६००/- ५ कामे ४ काम प्रगतीपथावर
सी-४(१६)= ----- ----- -------------

प्रश्न क्र. २२२:-मागील महासभेत आयुक्तांनी मध्यवर्ती जकात नाका हटविणेबाबत सात दिवसांची मुदत दिली होती. परंतु एक महिन्याच्या कालावधी उलटून गेला असून प्रशासनातर्फे अदयापपर्यंत कारवाई केली गेली नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असून यास सर्वस्वी जबावदार कोण असा प्रश्न पडला आहे की.....

१) सदर ठेकेदाराने ठेका कराराच्या अटीचे पालन केली नाही म्हणून त्याचा ठेका रद्द केला का?

उत्तर:-मध्यवर्ती जकात नाका हलविण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. ज्या ठिकाणी जकात नाका स्थलांतरीत करावयाचे आहे त्या ठिकाणाच्या काही असुविधांबाबत अभिकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून सुविधांची पुर्तता करणेची कार्यवाही प्रशासनातर्फे सुरु आहे. सदर सुविधांची पुर्तता करुन घेवून जकात नाका स्थलांतरीत करण्यात येत आहे. त्यामुळे ठेका रद्द केला नाही.

प्रश्न क्र. २२३:-एन.सी.टी. कॉन्व्हेंट स्कुल, उल्हासनगर-४ सदर इमारतीस बांधकाम पुर्णतेचा दाखला दिला आहे काय?

सदर बांधकाम मंजुर आराखडयानुसार झाले आहे काय?

सदर बांधकामात वाढीव बांधकाम आहे काय? असल्यास किती?

बांधकाम पुर्णतेचा दाखला न घेता रहिवास अथवा वापर करता येतो का?

सदर ठिकाणी कुठल्या प्रकारचा वापर असल्यास कोणता?

सदर प्रश्नांचे उत्तर येत्त्या महासभेत मिळावे ही विनंती

उत्तर:-दिलेला नाही.

अंतर्गत बदल केलेले आहेत.

नाही.

शैक्षणिक वापर.

वरीलप्रमाणे.

प्रश्न क्र. २२४:-उल्हासनगर कॅम्प -२ येथे इमारतींची बांधकामे सुरु असून बांधकामाचे ठिकाणी महानगरपालिकेने बांधकामास दिलेल्या मंजुरीचे फलक लावण्यात आलेले आहेत. सदर इमारतीचे प्लॅन व मंजुरी बाबत शंका निर्माण झाली असल्याने कृपया खालील प्रश्नांची उत्तरे येत्त्या महासभेत मिळावी ही विनंती.

१) पंजाबी कॉलनी रोड गुरुद्वाराचे मागे, उल्हासनगर-२ (युएमसी/टीपीडी/बीपी/नं. १०८/०२/५८९, दिनांक २५.२.०३)
२) पप्पु सोसायटीचे मागे रमेश मुकणे यांचे घराजवळ, उल्हासनगर-२ (युएमसी/टीपीडी/बीपी/नं.१८२/०२/९१५, दिनांक २५.२.०३)

सदर बांधकामे मंजुर आराखड्यानुसार झाले आहे का? सदर बांधकामात वाढीव बांधकाम आहे का? असल्यास किती?

उत्तरः-आजमितीस सदर इमारतीचे काम मंजूर नकाशाप्रमाणे चालू आहे.

सदर इमारतीचे काम मंजुर आराखड्यानुसार चालू नसून त्यामध्ये वाढीव बांधकाम २०४.३४ चौ.मी. एवढे आहे. व सदरच्या विकासधारकास दि. १६/१०/२००३ रोजी एम.आर.टी.पी. कलमाप्रमाणे नोटिस बजावण्यात आली आहे.

प्रश्न क्र. २२५:-ओमकार हॉस्पीटलच्या बाजूला, उल्हासनगर कॅम्प २ पगारे यांचे घराजवळ (युएमसी/टीपीडी/बीपी/नं.२१९/०२/२४६, दिनांक २६.५.०३)

सदर बांधकामास परवानगी देतांना सर्व कागदपत्रांची (जागेच्या) पडताळणी केली आहे काय? सदर जागेवर पुर्वी बॅरेक होती का डोंगराळ भाग होता? डोंगर खोदुन इमारतीचे बांधकाम करता येते का? हे योग्य आहे का? डोंगर खोदुन इमारत बांधकामास मंजुरी दिली आहे का? सदर बांधकाम मंजुर आराखडा व प्लॅन प्रमाणे सुरु आहे काय?

वरील माहितीसाठी सादर.

उत्तरः-१) ओमकार हॉस्पीटलच्या बाजुला सर्व कागदपत्राची पडताळणी करुन बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.
२) सदर बॅरेक डोंगराळ भागावर आहे.
३) होय.
४) आजमितीस सदर इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे चालु आहे.

प्रश्न क्र. २२६:-अंबा अपार्टमेंटच्या जी + २ सी ब्लॉक उल्हासनगर-१ च्या बांधकामात वाढीव बांधकाम किती?
प्लॅन आराखड्यानुसार मंजुर केलेले किती?

उत्तरः-जागेचा तपशिल अपुर्ण दिलेला असल्यामुळे उत्तर देवू शकत नाही.

प्रश्न क्र. २२७:-टेल्को मार्केट नं. २ जवळील तोडलेले शिवम मार्केटचे उल्हासनगर-२ पुन्हा बांधकाम चालु आहे त्याच्यात अधिकृत किती व अनाधिकृत किती?

उत्तरः-सदर इमारतीमध्ये चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले नाही अंतर्गत बदल केलेले आहे.